टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

ग्रंथसंशोधनप्रकाशनमंडळ-प्रकाशन : ५ वे

[ महाराष्ट्र-राज्य साहित्य संस्कृति मंडळाचे अनुदान मिळालेला ]

# आदिशक्तीचे विश्वस्वरूप

अर्थात्

## देवीकोश

खंड १ ला

लेखक

प्रल्हाद कृष्ण प्रभुदेसाई

शके १८८९ ] स्वातंत्र्यदिन १५ ऑगस्ट [ सन १९६७

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे २.

प्रकाशक :

शि. ह. धुपकर

वा. वा. भागवत

मन्त्री

ग्रंथसंशोधनप्रकाशनमंडळ

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे २.

© सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन

किंमत रु. १२·५०

मुद्रक :

शां. दे. जोशी व वि. द. लोखंडे

प्रतिभा मुद्रणालय,

टिळक रस्ता, पुणे १.

मातृदेवो भव

पितृदेवो भव

आचार्यदेवो भव

राष्ट्रदेवो भव

# प्रकाशकाचे निवेदन

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या ग्रंथ संशोधन प्रकाशन मंडळाचे पाचवे प्रकाशन—देवीकोश, प्रथम भाग—मराठी जनतेच्या हाती देताना आम्हांस आनंद होत आहे. ह्या ग्रंथाचे संपादक—श्री. प्र. कृ. प्रभुदेसाई यांनी या ग्रंथाच्या स्वरूपासंबंधीची माहिती प्रस्तावनेमध्ये सविस्तर दिलेली आहे. त्यावरून देवीभक्तां-प्रमाणेच देवी उपासना परंपरेसंबंधी संशोधनात्मक अभ्यास करणाऱ्यानाही हा ग्रंथ फार उपयोगी पडेल असा विश्वास वाटतो.

देवीकोशाच्या तीन भागाच्या प्रकाशनासाठी महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळाने पाच हजार रुपये अनुदान मंजूर केले आहे. मंडळाच्या या साहाय्याबद्दल प्रकाशक ऋणी आहे.

देवीकोशाच्या एकूण तीन भागांपैकी हा पहिला भाग प्रसिद्ध होत आहे. राहिलेले दोन भाग ( प्रत्येकी सुमारे पाचशे पृष्ठे—डेमी आकार ) चालू वर्षअखेर ( शके १८८९ ) प्रसिद्ध करण्याचा संकल्प आहे.

ग्रंथ-संपादक श्री. प्र. कृ. प्रभुदेसाई यांनी ग्रंथ-संपादनासाठी फार परिश्रम घेतले आहेत. ग्रंथामध्ये संकलित केलेल्या विविध माहितीवरून वाचकांना या विधानाची सत्यता पटून येईल. ह्या परिश्रमपूर्वक संपादनाबद्दल त्यांना ससंतोष धन्यवाद देत आहो.

ह्या ग्रंथामध्ये मांडलेली मते व इतर ग्रंथातून घेतलेली अवतरणे इत्यादी-बाबतची सर्व जबाबदारी ग्रंथ संपादकाची आहे. प्रकाशकावर त्यासंबंधी कसलीही जबाबदारी नाही.

प्रतिभा मुद्रणालयाने ग्रंथ-मुद्रणाची जबाबदारी योग्य रीतीने पार पाडली, त्याबद्दल त्या मुद्रणालयाच्या व्यवस्थापकांचे आभार मानून हे निवेदन पूर्ण करीत आहे.

प्रकाशक

मंत्री

१ ऑगस्ट १९६७

ग्रंथ संशोधन प्रकाशन मंडळ,

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे २.



श्री छत्रपती शिवाजी महाराज यांची

कुलस्वामिनी " भवानी माता "

जल-मंदिर, सातारा येथील सुवर्णमूर्ति

# ग्रंथकर्त्याची विज्ञप्ति



भालीं भास्कर भर्जनाम भरती भू-सेवकें भाषितां ।
भंडारा भटमाळिलें भारतिमे भू-देवता भाउकां ॥
भूतात्मा भरगच ग्रन्थि भजका, भामे भुमा कां भुरां ।
भक्तांना भरभीतिला भिरधना भांडार-भांडें भरा ॥

या ग्रंथाचे प्रकाशन बुधवार दि. २३ ऑगस्ट १९६७ रोजी पुणे येथे वैदिक-संशोधन मंडळाच्या सभागृहात राष्ट्रपती डॉ. जाकीर हुसेन यांच्या हस्ते झाले त्या प्रसंगी.



"इतके परिश्रम घेतलेल्या ग्रंथाची कदर ही व्हायलाच पाहिजे. अत्यंत चिकाटीने व प्रदीर्घ काळाच्या तपस्येनंतर या ग्रंथाचे संपादन पूर्ण झाले आहे याबद्दल मी लेखकाचे अभिनंदन करतो."

# बुद्धिमंतांनी भारतीय भाषांतूनच लेखन करावे

इंग्रजीतून लेखन करण्यात व भारतापेक्षा भारताबाहेर त्या लेखनाबद्दल प्रशंसा प्राप्त करण्यात आमच्यातील बहुतेक विद्वानांनी यापूर्वीच्या काळात समाधान मानले आहे. भारतीय बुद्धिमंत व जगातील विविध देशांतील विद्वान यांच्या निकट सहकार्याचे महत्त्व कमी लेखण्याचा माझा उद्देश नाही, परंतु आमच्या बुद्धिमंतांनी ज्ञानाचा प्रसार सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी व त्यांचा सांस्कृतिक दर्जा उन्नत करण्यासाठी भारतीय भाषांतून लेखन करण्यावर भर देण्याची नितांत आवश्यकता आहे व भारतीय भाषांतून लेखन करून भारतीय जनतेला ज्ञानाचे भांडार खुले केले तरच आंतरराष्ट्रीय सामंजस्याचा व सहकार्याचा हेतू सफल होऊ शकेल.

प्रचलित शिक्षणपद्धतीमुळे आपल्याच मताचा अतिरेकी आग्रह धरणारे लोक अधिकाधिक प्रमाणात निर्माण होत आहेत, याचा खेद वाटतो. भूतकाळाची प्रशंसा करणारे लोक एका बाजूला. दुसऱ्या प्रकारातील लोकांना प्राचीन परंपरेचे काही सोयरसुतक नाही असे आढळते. या लोकांचा गटही मोठा आहे. पाश्चात्त्यांकडून उसन्या घेतलेल्या पण त्यांचे यथार्थ आकलन न झालेल्या सांस्कृतिक स्वरूपांच्या कल्पनांबरोबर ते वाहवत जातात. आमच्या शिक्षणात प्राचीन परंपरांची मुळे जशी रुजली पाहिजेत, त्याबरोबर विज्ञान व तंत्रविद्येचा प्रभाव, मानवामानवांतील एकता यांबद्दल आमच्या ठिकाणी पुरोगामी दृष्टिकोन व पुरेशी जागरूकता असली पाहिजे.

# ग्रंथाचे उद्दिष्ट

★

या देवी सर्वभूतेषु मातृरूपेण संस्थिता ।
इति सप्तशतीवाक्यात् सर्वमम्बामयं जगत् ॥ ७ ॥

विद्या समस्ता तव देवि भेदाः ॥
स्त्रियः समस्ता. सकला जगत्सु ॥ ( सप्तशती ११।६ )

विश्ववंद्य कीर्तीचे स्वामी विवेकानंद आपल्या My Master या ग्रंथामध्ये म्हणतात की, युरोपियन देशामध्ये स्त्री-वर्गाचे पूजन होते, ते त्याचे तारुण्य आणि सौंदर्य यासाठी असते रामकृष्ण परमहंसानी कोणतीही स्त्री पाहिली म्हणजे वरील श्लोकात वर्णन केल्याप्रमाणे, त्याना ती अखंड सुखदायी अंबादेवीचीच प्रतिकृति वाटत असे घरामध्ये राबणारी माता असो, माडीवर उभी असणारी सुंदर गणिका असो, अगर जिच्याकडे कोणीही कधीही ढुंकून पाहणार नाही, अशी एखादी भिकारी दुर्दैवी रस्त्यावर पडलेली स्त्री असो, त्याच्याकडे पाहून ते पाया पडत आणि बेनावाटे घळघळा अश्रू वाहत असत सर्व परावरात आपण भरलेले आहोत व आपल्यात तीच शक्ति वावरत आहे, अशी एक विलक्षण एकात्मता, अभिन्नता, सर्वात्मकता, प्रकर्षाने त्याच्या अनुभवास येत असे त्या वेळी त्याच्या मुखातून सहजोद्गार निघत, " हे दयाळू माते अंबाजननी, एका रूपाने तू घरात आहेस, दुसऱ्याने खिडकीत आहेस आणि तिसऱ्याने रस्त्यावर पडलेली दिसत आहेस अधिक विचार केला, तर तूच विश्व झाली आहेस, तूच विश्वाचा पसारा चालवीत आहेस आणि ठायी ठायी तुझ्या रूपाचेच मला दर्शन घडत आहे हे आईग, मी तुला नमस्कार करतो, वंदन करतो, वंदन करतो "

रामकृष्णांच्या ठिकाणी आदिमातेविषयी दृग्गोचर होत असलेला अनन्यभाव ज्या क्षणी मातेच्या दर्शन-सुखाला आसुसलेल्या भक्ताच्या अंतःकरणात प्रकट होऊन, त्याप्रमाणे प्रत्यक्ष वर्तन घडेल, त्याच क्षणी माता त्याला दर्शन दिल्याविना राहणार नाही. याविषयी या ग्रंथातील अनुभवाच्या अनेक उदाहरणांवरून त्याची खात्री होईल. ही दृष्टि आल्यास त्या साधकाला

( अ ) जळी-स्थळी-काष्ठी-पाषाणी आदिशक्तीचे कर्तृत्व दिसेल;

(आ) कनक आणि कांता या द्वंद्वात अडकून पडलेले जीव, खरे सुख समजल्याने अक्षय-सुखाचे मार्गाकडे वळतील, आणि

( इ ) मातेचे साक्षात दर्शन घडेल, हीच फलश्रुति.

# ऋणनिर्देश

माझ्या सुमारे दहा वर्षांच्या खटपटीतून सिद्ध झालेले लिखाण आज प्रकाशित होत आहे, हे पाहून मी समाधानी आहे. या ग्रंथात समाविष्ट केलेली माहिती ही बव्हंशी 'मधमाशी' वृत्तीचेच द्योतक आहे. माझे असे त्यांत अत्यल्प आहे.

कुलदेवतांचे विस्मरण व कुलाचारांची उपेक्षा हा समाजाचा स्थायीभाव बनत चालला आहे. माझ्या या प्रयत्नामुळे कुलाचाराचे सांस्कृतिक, ऐतिहासिक व सामाजिक महत्त्व वाचकाच्या मनात ठसले तरी माझ्या श्रमाचे चीज झाले असे मी मानीन. हे पुस्तक तयार करताना मला अनेकांचे अनेकपरीने साह्य झाले आहे. ही कृतज्ञतावृत्ति नमूद करणे माझे कर्तव्य होय. माझे बालपणापासूनचे एक स्नेही श्री. गोविंदराव अभ्यंकर यांनी मला वेळोवेळी प्रोत्साहन देऊन काही मौलिक सूचनाही केल्या. मीमांसातीर्थ पं. श्रीपादशास्त्री किंजवडेकर यांनी वेळोवेळी चर्चा करून ग्रंथ शक्य तितका निर्दोष व्हावा म्हणून मार्गदर्शन केले व ग्रंथाची प्रकरणवार सुसंगत जुळणी करण्यास मदत केली. अनेक अधिकारी विद्वानांनी ग्रंथ नजरेखाली घालून काही सूचना केल्या व अभिप्राय देऊन ग्रंथ प्रसिद्ध करण्यास उत्तेजन दिले. गुरुवर्य म. म. दत्तो वामन पोतदार यांनी ग्रंथ लवकर प्रसिद्ध व्हावा म्हणून मला वरचेवर त्वरेने काम करण्यास भाग पाडले. तसेच टिळक महाराष्ट्र विद्यापीठाने ग्रंथ प्रकाशनाची जबाबदारी स्वीकारली. ह्याबद्दल ग्रंथ संपादक गु. पोतदार व विद्यापीठ ह्या उभयतांचा अत्यंत आभारी आहे. ग्रंथप्रसिद्धीसाठी आर्थिक साहाय्य उपलब्ध करून देण्यासाठी श्री. गोविंदराव अभ्यंकर व प्रा. न. र. फाटक यांचे साहाय्य यशस्वी ठरले. महाराष्ट्र-राज्य-साहित्य-संस्कृति-मंडळाचे अनुदान हेच त्याचे गमक होय. ग्रंथलेखनासाठी लागतील ते ते ग्रंथ तत्परतेने माझे हवाली करून माझे अध्ययन सुकर केल्याबद्दल मुंबई विद्यापीठाचे ग्रंथपाल श्री. दारा नसरवानजी मार्शल यांचा उल्लेख आवर्जून केला पाहिजे. या ग्रंथाची मुद्रणप्रत सुवाच्य नीटनेटकी करण्यास श्री. हेमचंद्र अवसरकर यांचे बहुमोल साहाय्य झाले. वे. शा. स. बाळाभाऊ पणशीकर यांचाही यांनी निवेदन लिहिण्याचे कामी जी आत्मीयता दाखविली, त्याबद्दल लेखक आभारी आहे. ग्रंथछपाईचे काम प्रतिभा मुद्रणालयाने आपल्या लौकिकास साजेसे पार पाडले आहे. या कामात श्री. जोशी व श्री. लोखंडे व त्यांचे कुशल कामगार यांची आपुलकी मी विसरू शकत नाही. मुद्रितशोधनाची जबाबदारी माझे शाळासोबती व विख्यात ग्रंथपाल श्री. कृ. ग. भागवत यांनी जाणीवपूर्वक

सांभाळली, म्हणूनच हा ग्रंथ या स्वरूपात वाचकांच्या हातीं मी देऊ शकलो. ग्रंथाचे वेष्टनचित्र नू. म. वि. प्रशालेचे चित्रकलाशिक्षक श्री. राजे यांनी अल्पावधीत तयार करून दिले. याशिवाय आणखीही अनेक स्नेह्यांनी मला उपकृत केले आहे. निर्दिष्ट वा अनुल्लेखित अशा सर्व ज्ञात व अज्ञात मित्रांचा मी शतशः ऋणी आहे. हे ऋण केवळ औपचारिक आभारप्रदर्शनाने हलके होणार नाही. काहींना ते रुचणार नाही परंतु रूढाचार सांभाळावयास हवा. या सर्व साहाय्यकांचे मी मनःपूर्वक आभार मानतो माझे ग्रामस्थ सहकारी व आदिशक्तीचे उपासक श्री दादा पेंडसे यांनी विनंती करताच त्वरित प्रस्तावना लिहून दिली या विषयातील त्यांचा अधिकार जनमान्य आहे. आदिशक्तीचा यथार्थ आविष्कार त्यांच्या प्रस्तावनेत वाचकांना आढळेल त्यांच्या अनमोल सहकार्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

ह्या ग्रंथात ठिकठिकाणीं अनेक ग्रंथांतील अवतरणे घेतलेली आहेत त्या मूळ ग्रंथ लेखकांचा मी ऋणी आहे. ग्रंथांतील अवतरणे व मांडलेली मते ह्या बाबतीत सर्व जबाबदारी माझ्यावर आहे.

महाराष्ट्र शासन-साहित्य व संस्कृति मंडळाने, संपूर्ण हस्तलिखिताचे परीक्षण करून, तिन्ही भागांच्या प्रकाशनासाठी सुतें पांच सहस्र रुपये मंजूर केले आहेत. याबद्दल लेखक मंडळाचा अत्यंत ऋणी आहे.

या ग्रंथाची अनुक्रमणिका ही स्थूलमानाने सूचिस्वरूपाची आहे. सविस्तर तपशीलवार सूचि तिसऱ्या खंडाच्या शेवटी द्यावी असा विचार आहे. वर्षभरात उरलेले दोन्हीही खंड व विभाग वाचकांच्या हाती देता येतील अशी उमेद मी बाळगून आहे. या ग्रंथासंबंधी वाचकांशी मला जे जे बोलावयाचे ते सर्व मी माझ्या प्रदीर्घ उपोद्घातात सांगितले आहे. त्यांची पुनरुक्ति नको. पुन्हा एकवार सर्व साहाय्यकांचे अंतःकरणपूर्वक आभार मानून हा ग्रंथ वाचकांचे हाती देत आहे.

# अ नु क्र म णि का


अर्पण ... ... .. ... पृ. ३– ३

प्रकाशकाचे निवेदन . ... ... पृ १

ग्रंथकर्त्यांची विज्ञप्ति, आदिशक्ति प्रतिमा ( आर्ट पेपर ) पृ. १– २

ग्रंथाचे उद्दिष्ट ... ... ... ... पृ. १– २

ऋणनिर्देश ... ... ... ... पृ १– २

आशीर्वाद (प्रस्तावना) [तंत्राचार्य द. मो. तथा दादा पेंडसे] पृ. १– १३

उपासना स्वरूप १–२; संन्यासी व संसारी धर्मपीठे २; तंत्रकाराची त्रयी–मंत्र-यंत्र-तंत्र ३; शक्ति-उपासना व संत ४–६; शक्ति-उपासनेची प्रतीके ६–७; गायत्रीचे स्वरूप ९–१०; मुद्राचे प्रकार १०–११; मंत्र-तंत्रविद्या व गुरुमुख ११–१२; तान्त्रिक विद्येच्या र्‍हासाची कारणे १२; प्रस्तुत ग्रंथाचे स्वरूप १२–१३.

विषयप्रवेश .. ... ... ... पृ. १४– ८०

प्राकृत स्वरूप १४; संस्कृत वाङ्मयस्वरूप १५; देवीविषयक अज्ञान १५; आदिशक्तीचे मातृत्व १७; मातृशक्ति १८; भारतीय दृष्टिकोन हवा १९; देवमाता १९; पुराणग्रंथ २०; पाश्चिमात्यांची मते २१; अध्यात्मिक अधिष्ठान २२; पुराणाचे अधिष्ठान व मूल्यमापन २२–२३; गीतागौरव २३; ग्रीक पुराण-कथा २५; देवताचे वर्गीकरण २६; दृष्टांताने मंदिरस्थापना २८; शक्तितत्त्व २९; उत्खनने व देवतास्वरूप ३०; सिंधुखोरे संस्कृति ३३; प्राचीन दर्यावर्दी मार्ग ३४; शिल्पकला ३४, मूर्तिशिल्प ३६; प्राणप्रतिष्ठा ३७; चित्रकलेचा उगम ३७; धार्मिक समजुती ३८; अनिष्ट टीकाकार ३९; भू-भागाची भरणी ४०, तेजापासून देवतानिर्मिती ४१; देवताच्या नावाचा घोटाळा ४२; भारत–पाश्चिमात्य देवता–तौलानिक स्वरूप ४३; स्त्री-पुरुष देवता ४४, नामोत्पत्ति ४५; शस्त्रधारी देवता ४६, त्रिमूर्ति-तत्त्व ४६; ग्रामदेवता ४७; देवतांचे बीभत्सस्वरूप ४७; नाण्यावरील ठसे ४८; आदिशक्ति सर्वत्र एकच ४९; देवताची मूळतत्त्वे एकच ४९; पाश्चिमात्यांची ज्ञानलालसा ५१; डॉ. ॲनी बिझंट व

श्रीकृष्ण-लीला ५२; तात्त्विक स्वरूप ५३; वाममार्गी ५३; दक्षिणाचारी ५५; मयासुर-संस्कृति ५५; पुराणकाळी दैत्यवस्ती ५७; दैत्यवृत्ति ५८; महीप कोण? ५९; नाम संशोधन ५९; ग्रामदेवता ५९; देवताचे दर्शन ६०; आदिशक्ति स्वरूप व गणेशसाम्य ६३; शक्तिपूजा आणि संत ६४; छाया-चित्रे ६७; ग्रंथकल्पना ६७, देवीअनुग्रह ६८; आधारभूत माहिती ६८; निरीक्षण मतभेद ६९; निष्ठावान वाचक ७०; प्रकरणांची मांडणी ७०; ग्रंथकार—लेखक नव्हे ७०; उपदेशकांची पात्रता ७१; ग्रंथाचे महत्त्व ७२; देवताचा इतिहास ७३; पाश्चिमात्यांची सहकारिता ७४; राष्ट्रीय एकात्मता ७५, संशोधन संस्था हवी ७५; इस्लामी राज्यकर्त्यांचे औदार्य ७६; आदिशक्तीचा इतिहास ७७; संशोधनास वाटचाल ७८; कीर्तनकार-बंधूंना विनती ७९; प्रकाशक-संपादकांचे आभार ७९; महासागर तरून निघालो ८०.

१ आदिशक्तीचे स्तवन ... ... पृ. १– ११

देवकृत २; इंद्रकृत ३; महाभारतकालीन ४; संत एकनाथकृत ५; रामदासकृत ६, रामकृष्ण परमहंसकृत ७; विवेकानंदकृत ८; अरविंदकृत ९; सावरकरकृत १०; लेखककृत १०–११.

२ वैदिक देवता ... .. . पृ १२– ७७

भारतातील मूर्तिपूजा १६; वेदकाळ—स्त्रीदेवता १७; देवता—संख्या १७; ॐकार १८; गजानन—गणपती २०–२६; अदिती २७, आपो देवी २९, इडा ३०; उर्वशी ३०; उषा ३०; गायत्री ३१; सावित्री ३२; सरस्वती ३२, गायत्री मंत्र ३३; त्रिपुरा ३५, दिति ३८, निऋति ३८; पृथ्वी देवी ३९; भगवती ४१; योगमाया ४१, रात्री ४७, लक्ष्मी ४७; वेदवती ५७; सरस्वती ५७; संध्या ६८; हुताशनी ७०; सिनीवाली ७३; ब्रह्मवादिनी देवता यादी ७७.

३ पौराणिक देवता ... ... ... पृ. ७८–१९०

५१ देवताची यादी ७८; श्री ९२, अंबिका ९२; अभयदा ९२; अमथेर माताजी ९३; अलक्ष्मी ९३; आनंदनायकी ९८, उनाई-माता ९८; उमा ९९; काळरात्री १०१; क्षुद्रिका १०३;

कुलकुल्या १०४; कौशिकी १०४; कंकाळी १०७; गजांतलक्ष्मी १०८, गोत्रदेवी १११; गौरी ११२; चंद्रवदनी ११४; कुष्मांडिणी ११६; चंद्रघंटा ११६; ब्रह्मचारिणी ११६; महागौरी ११६; सिद्धिदात्री ११६; स्कंदमाता ११७, शैलपुत्री ११७; चक्रपदी ११७; जगद्धात्री ११८; दुर्गा १२०; नीलसरस्वती १३३; पद्मावती १३४; प्रत्यंगिरा १३५; पार्वती १३७; पपावती १३८; बगळामुखी १३९; बळातिबळा १४१; भवानी आनंदी देवी १४१; भुवनेश्वरी १४३; महिषासुरमर्दिनी १४५; महाकाली १६१; महासरस्वती १६५; मातन देवी १६६; मूकांबिका १६७, योगेश्वरी १६७; राई १६८; वृंदा १७८; विद्यावती १७८; वैष्णवी १८०; शताक्षी १८१; वत्सला १८३; शिवदूती १८३, सहस्रकाळमाता १८४; सशादेवी १८५; हुंकारेश्वरी १८९.

४ आदिशक्तीचे तात्त्विक स्वरूप .. पृ. १९१–२५५

सृष्टीची उत्पत्ति १९१; कालगणना १९७; परमात्म्यशक्ति २०१; मातृशक्ति २०३; अर्धनारी नटेश्वर २०७; त्रिमूर्ति २१०; आदिशक्तीची रूपे २१२; आर्यांच्या देवता शस्त्रधारी का? २१७; देवतांची उत्पत्ति २१९; नवरात्र-दुर्गापूजा २२०; चैत्र नवरात्र कथा २२०; विजयादशमी दसरा २२७, देवी मंदिरे स्थाने २३७, देवताची नामोत्पत्ति २३९, देवतांचे प्रकार २४१, देवताचे रंग २४२; मानवाचे देवताविषयक अपराध २४३; नरबली २४३; कुंडलिनीशक्ति-चक्रे २४७.

५ दक्षयज्ञ व पीठनिर्मिती ... ... पृ. २५६–२९४

बारा ज्योतिर्लिंगे २५६; शंकराना पाच मुखे का? २५७, शंकरलिंग पूजा २५९, भस्मचर्चित शंकर २५९, लिंगनाम उत्पत्ति २६०, रुद्राक्ष २६१; दक्ष २६३, सतीची कोणी निंदा केली तर–२६६, पीठ निर्मिती २६९, दक्ष-यज्ञभूमि २७१, पीठ निर्णय २७४; चतुष्पीठाचा इतिहास २७६, एकावन्न शक्तिपीठे २७९, १०८ शक्तिपीठे २९१, देवीची प्रमुख स्थाने २९३.

६ ऐतिहासिक देवता... ... पृ. २९५–३५५

यादी २९५, कनक सुंदरी २९६, कालिका ( चितोड ) २९८, कालिका( दिल्ली ) ३०८, खोडियार माता ३०९, चामुंडा ३१०,

तुळजाभवानी (महाराष्ट्र) ३१४; तुळजाभवानी ( नेपाळ ) ३३१; देवगिरी अंबा ३३३; नागनकी ३३८; भवानी देवी ३४०; विदर्भ चंडिका ३४२; शिवछत्रपति व देवीकृपा ३४३.

७ पर्वतीय देवता ... ... ... पृ. ३५६–३९१

यादी ३५६; अर्बुदा ३५८; अरासुरी अंबा ३६२; ओसाम माता ३७१; कराला ३७४; कालिका ( पावागड ) ३७५; कालिका ( कालीमठ ) ३७९; कालिका ( दिल्ली ) ३८०; कालिका ( पूर्णागिरी ) ३८१; कालिका ( अकोला ) ३८२; गिरनार अंबा ३८२; जननी देवी ३८६; नयना ३८८; नंदा ३८८; भीमेश्वरी ३८९.

८ दशमहा विद्याशक्ति विवरण ... ... पृ. ३९२–४२७

महाविश्वरचना ३९२; महाशक्ति व विश्वगोल परिभ्रमण ३९०; आगम ४०१; निगम ४०२; निदान ४०२; महाकाली ४०५; उग्रतारा ४०७; षोडशी ४०९; भुवनेश्वरी ४१०; छिन्नमस्ता ४१३; भैरवी ४१५; धुमावती ४१५; बगळामुखी ४१७; मातंगी ४२१; कमला ४२२ त्रिपुर-सुंदरी ४२६.

अधिकारी विद्वानांचे अभिप्राय ... ... पृ. १– १२

श्रीमद् जगद्‌गुरु शंकराचार्य ( श्रीद्वारका पीठ ); श्रीमद् जगद्‌गुरु शंकराचार्य ( करवीर पीठ ); वेदमूर्ति पं. श्री. दा. सातवळेकर; लोकनायक मा. श्री. अणे; म. म. द. वा. पोतदार; तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी; प्राचार्य शं. दा. दांडेकर; पं. श्रीपादशास्त्री सातवळेकर; कीर्तनकेसरी कऱ्हाडकरबुवा; हरिजन-सेवक काकासाहेब कारखानीस; प्रा. वि. मा. दी. पटवर्धन; श्री. बा. गो. महाबळेश्वरकर; नामदार बाळासाहेब मारदे; डॉ. एस्. एम्. कत्रे; श्री. त्र्यं. दि. धाकनीस; रा. ब. एस्. आर्. पटवर्धन.

# आशीर्वाद ( प्रस्तावना )

सृष्टीच्या उत्पत्तिकालापासूनचा जर सखोल विचार केला, तर सप्रमाण असे सिद्ध करता येईल की, शक्तिउपासनेव्यतिरिक्त दुसरी उपासनाच अस्तित्वात नव्हती. युगपरत्वे या उपासनेची नावे बदलत गेली ही गोष्ट वेगळी. सत्ययुगात त्या वेळी धर्माचे चारही पाद आचरणात होते, असे मानले जाते, त्या वेळी ही उपासना पराविद्या अथवा परोपासना म्हणजेच निर्गुणाची उपासना होती अर्थात् त्या वेळी मूर्तीचा उगमच झालेला नव्हता, हे निराळे सांगण्याची गरज नाही. निर्गुण उपासना हीच आजही सर्वश्रेष्ठ उपासना मानली जाते, ती याच कारणामुळे होय. या निर्गुण उपासनेमुळेच ऋषीमुनींना अतर्क्य सामर्थ्य प्राप्त झालेले होते, याचा प्रत्यय आपणाला आजही त्यांच्या वाङ्मयावरून येतो. द्वापारयुगात धर्माचा एक पाद कमी झाला आणि कालपरत्वे याच विद्येला ब्रह्मविद्या असे नाव प्राप्त झाले. त्यानंतरच्या त्रेतायुगात ही श्रीविद्या म्हणून नामाभिधान पावली आणि कलीयुगात धर्माचे अधिक पाद ऱ्हास पावल्यावर आदिशक्ति विद्या म्हणजे शक्तीची उपासना या नावाप्रत आलेली आहे वरील विधानाला प्रमाण असे देता येईल की, वेदकाळी सगुण मूर्तीची पूजा अस्तित्वात नव्हती. सांप्रत आपण जेव्हा यज्ञयागांसारखे श्रेष्ठ धार्मिक विधि आचरतो, त्या वेळीही पूर्वकालीन पद्धतीप्रमाणे त्या ठिकाणी मूर्तीचे प्रतीक नसून, निर्गुणाची पूजा केली जाते. चैतन्यशक्तीचे निरनिराळे गुण आहेत पंचमहाभूतांच्या चैतन्यशक्ति निरनिराळ्या आहेत त्या गुणांची पूजा होत असे परंतु कालांतराने त्या गुणांचे प्रतीक म्हणून त्या त्या गुणाचा होणारा दृश्य परिणाम लक्षात घेऊन तशा प्रकारच्या मूर्ति बनविल्या गेल्या आणि मूर्तिपूजा अस्तित्वात आली

परंतु पंचमहाभूतांच्या गुणदर्शक मूर्ति या मानवांनी घडविलेल्या आहेत, हे विसरून चालणार नाही यासाठीच पराविद्येचे उपासक या मूर्तीची पूजा करण्यास आजही तयार नाहीत आणि यात आश्चर्य कसले ! ज्याला मधुर बासुंदीची चव समजली तो भजी कधीही खाणार नाही परंतु निर्गुण पूजेचे तत्त्व अज्ञानी बहुजन समाजाला रुचणारे व पचणारे नसल्याने या अनंत गोष्टींचा विचार करून आचार्यांचे वचन आहे, ते असे की,

यद्यपि शुद्धं लोकविरुद्धं न करणीयं नाचरणीयम् ।

बहुजन समाजाला त्यांच्या ज्ञानाच्या पातळीप्रमाणे आकलन होणारे ज्ञान दिले, त्याला आचरणात सुलभ रीतीने करता येण्यासारखी उपासना सांगितली,

तरच त्याचे पूर्ण समाधान होते. निर्गुण उपासनेची ज्याला कल्पनाच होणार नाही, त्याला मूर्तिपूजा सांगितली आणि पुढे ती वाढीस लागली. लहान अज्ञानी मुलाला त्याच्यापुढे मानवाकृति एखादे निर्जीव बाहुले टाकले म्हणजे ते जसे त्याच्या ठिकाणी रममाण होते, तद्वतच काहीसा हा प्रकार आहे. एकदा मूर्तिपूजेचा सुलभ मार्ग बहुजन समाजाला सापडल्याबरोबर, निर्गुणाचे तत्त्वही समजून घेण्यास तो तितकासा उत्साही राहिला नाही आणि यामुळेच सगुण मूर्तीची पूजा वाढीस लागली.

निर्गुणातून मूर्तिपूजेकडे येते वेळी त्यांनी नुसत्याच मूर्ति बनवून पूजा करावयास सांगितली नाही, तर त्या त्या मूर्तीत प्राण आणण्याची म्हणजे खरीखुरी जाग्रत मूर्ति बनविण्याचीही विशिष्ट योजना कृतीमध्ये आणली. मूर्ति बनविल्यावर आणि स्थापन करताना त्या त्या निर्गुण पंचतत्त्वांच्या मंत्राचा उच्चार करून त्यामध्ये प्राण आणण्याची व्यवस्था केली. यासाठीच तर त्या विधीला ' प्राणप्रतिष्ठा ' असे नाव प्राप्त झाले आहे. यावरून हेच सिद्ध होते की, निर्जीव पाषाणाच्या अथवा धातूच्या मूर्तीला सजीव करणारी विद्या अथवा शक्ति, या सगुणोपासनेच्या आधी अस्तित्वात होती. सृष्टिक्रमात काळ व परिस्थितिपरत्वे जसजशी वाढ व बदल होत गेला, तसतसे मूळ चैतन्य शक्तीपासून उत्पन्न झालेल्या पंचतत्त्व अथवा पंचमहाभूते यांची उपासना सुरू झाली हे स्पष्ट आहे. आजही आर्यधर्मात सर्वच मूर्तिपूजक नाहीत, निर्गुणोपासक आहेतच. पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश यापैकी कोणत्या तरी एका तत्त्वाची पूजा ते करतात. हेच भारतीयांचे मूळ तत्त्व इस्लाम अथवा झरतुष्ट्र धर्मीयांनी स्वीकारलेले आहे. इस्लाम संस्कृति अग्नितत्त्वाचे प्रतीक जे रोशनी म्हणजे चिराग म्हणजे ज्योत याची उपासक आहे. त्यांच्या कोणत्याही धर्मस्थानात गेल्यास तेथे कोनाड्यामध्ये ज्योत पेटत असलेली दिसेल; मूर्ति नाही. तद्वत् पारशी अग्यारींमधून अग्निकुंड सतत धगधगत असते. तेथेही मूर्ति नाही. याचाच अर्थ असा की, या संस्कृति भारतीयांच्या परंपरेच्या निर्गुण उपासकाप्रमाणे, निर्गुणोपासक आहेत.

बौद्ध धर्माच्या मताचा पगडा आर्य धर्मावर जबरदस्त झाला आणि त्यांचे खंडण करण्यासाठी आद्य शंकराचार्यांचा अवतार सातव्या शतकात झाला. त्यांनी भारतसंचार करून शृंगेरी, बदरीनारायण, द्वारका आणि जगन्नाथपुरी अशी चार सन्यासी धर्मपीठे स्थापन केली. म्हणजे या ठिकाणचे अधिकारी पुरुष हे संन्यास वृत्तीचेच असले पाहिजेत. परंतु शंकराचार्यांचे गुरु गौडपादाचार्य हे संसारी होते आणि निर्माण केलेली सन्यासी पीठे त्या त्या जबाबदारी पार पाडण्यास असमर्थ होती. यास्तव त्यांना एक संसारी धर्मपीठही स्थापन करावे लागले. संसारी पीठामध्ये तांत्रिक मार्गाने अनेक धर्मकृत्ये आचरावयाची असतात आणि ते

शुद्ध आचरण तर चालू राहिले पाहिजे, यासाठीच या संसारी पीठांची स्थापना करण्यात आली. या पीठाचे वैशिष्ट्य असे की, ते स्थिर (एका जागी) नसते, तर अधिकारी व्यक्तीच्या मागोमाग त्या त्या गावी जाते व रहाते या संसारी पीठाचे कर्तव्यकर्म इतकेच की शुद्धमार्गी तन्त्राचार स्वतन्त्रपणे चालू ठेवणे आणि तितक्याच उच्च पातळीचा शिष्य आढळल्यास, त्याजकडे पीठाची सूत्रे सोपवून आपण इहलोकीची यात्रा समाप्त करणे. सांप्रत हे संसारी पीठ गोरेगावी माझे वास्तुमध्ये आहे. इतकेच नव्हे तर संन्यासी पीठाचे अधिकारी पीठस्थानावर आरूढ करताना वैदिकांचे मन्त्रविधान झाल्यानंतर या संसारी पीठाकडूनच त्यांना मन्त्र तन्त्रविद्येची दीक्षा दिली जाते म्हणजेच पूर्णाभिषेकाचा संस्कार पूर्ण होतो. इतर कोणालाही तो अधिकार नाही. एवढे श्रेष्ठत्व या पीठाला आहे.

अठराव्या शतकात भास्करराय नावाची अतिशय उच्च कोटीची अधिकारी व्यक्ति या पीठामध्ये होऊन गेली. त्यांची बिरुदावली 'स्वतन्त्र तन्त्राचार्य' अशी होती त्यांचाच संप्रदाय आजही बरानसा दिसून येतो काही वर्षांपूर्वीचे लोलियराज, जुन्नर, रघुनाथराव गोडबोले महाराज, बडोदे, भटगुरु, इंदोर, यांची नावे त्यांचेच सांप्रदायी म्हणून सांगता येतील. हे शिष्य पूर्ण वामाचारी होते शाक्त संप्रदाय हा निषिद्ध, गौण, तान्त्रिक मार्ग हा कनिष्ठ, असे मत असणाऱ्या काशीच्या चिंतामणभट, नारायणभट, काशिनाथभट, अशा स्थीमहारथी विद्वान ब्राह्मणांचा भास्कररायांनी, ज्योतिर्मठाचे शंकराचार्यांचे अध्यक्षतेखाली जाहीर वादविवाद करून पराभव केला, आणि शेवटी त्यांनाही शाक्तपंथाचा अनुग्रह दिला. गुजराथमधील वेदान्ती पंडितांचा पराभव करून तेथे शक्तितत्त्वाचा प्रसार चालू केला सामवेदाचा जीर्णोद्धार करणारी एकमेव तन्त्रउपासक विभूति गुरुश्रेष्ठ भास्कररायच होत कोणीही वदान्ती जे कार्य करू शकला नाही ते जीर्णोद्धाराचे कार्य यांनीच केले. म्हैसूर प्रांतीचे त्या वेळचे शासक हैदरअली आणि टिपू सुलतान हे पिता पुत्र त्यांचे शिष्य असून शिव शक्तिपूजक होते

तन्त्रकाराची अर्धी म्हणजे मन्त्र यन्त्र तन्त्र असून हीच वैदिकांची आहे इतकेच नव्हे तर वैदिक पूजेमध्येही पंचपात्र व वामाचार मार्गातील पंचमकाराचे प्रतीक असते. जसे केळे, आले, सुपारी, मोहरीची पाने इ० मग दोघांच्या पूजनात जर पंचमकारात्मक पदार्थ असतात, तर एकमेकांना द्वेष करण्यासारखे काहीच नाही. तेव्हा आपण आचरतो तो शुद्ध उत्तम प्रकार आणि तान्त्रिकांचा कमी प्रतीचा असे वैदिकांना म्हणता येणार नाही अशा प्रचाराने समाजाची दिशाभूल करणे प्रशस्त नाही सांप्रत काळीचे परंतु उपपदस्थ वेदान्ती पंडित तन्त्रे सांप्रदायिक उपासक आहेत, हे निश्चितपणे मला माहीत आहे परंतु समाजाच्या

टीकेस पात्र न व्हावे या भीतीने ते पुढे येत नाहीत. याचे कारण असे समवते की, त्यांच्या उपजीविकेचे प्रमुख साधन जी मूर्तिपूजक समाजरूपी गाय आहे, ती त्यांचे खरे आचरण समजून आल्यावर त्याना दूध देऊन पोषण करणार नाही. यास्तव उघड रीतीने ते त्या आचरणाचे प्रदर्शन करीत नाहीत. मी निश्चित-पणे सांगू शकतो की, वैष्णव संप्रदायाचे आजचे मठाधिकारी मध्वाचार्य, हेही श्रीयंत्राचेच उपासक असून शिव शक्तिपूजक आहेत. कारण एके वेळी त्र्यंबकेश्वरी सोमवारी या आचार्यांनी रुद्राभिषेक केला आणि त्याचे पूजन चालू असताना मी प्रत्यक्ष उपस्थित होतो. या विषयावर माझे त्यांचे बोलणेही झाले. पण समाधान-कारक उत्तर मिळाले नाही. यावरून निष्कर्ष एवढाच निघतो की, बाह्यांगी जरी एखादा सगुणाच्या अनंतरूपापैकी एकाचा उपासक असला तरी अंतर्यामी मात्र तो शक्तिदेवीचा पूजकच असतो.

हाच प्रकार पण थोडया निराळ्या रूपाने मध्ययुगीन संतामध्ये दिसून येतो. संत ज्ञानेश्वर हे सर्वांचे मुकुटमणी आणि त्यांचा गुरु निवृत्तिनाथ हा आदि-नाथाच्या शिष्यपरंपरेतील एक होता. आदिनाथ म्हणजे साक्षात शंकर भगवान होय. तेव्हा नाथपंथी साधकही शिवशक्तीचेच उपासक असल्याने ज्ञानेश्वरही शक्ति-उपासक ठरतात. ज्ञानेश्वर समाधीचे चित्र जे ज्ञानेश्वरी ग्रंथामध्ये छापलेले आहे, त्यावर दर्शनभागी शंकराचा आडव्या गंधाचा भव्य त्रिपुंड लावलेला आहे. यावरून माझ्या विधानाला दुजोराच मिळतो. या नाथपंथियामध्ये असा एक दंडक आहे की, तपश्चर्या भारतामध्ये कोठेही केली जावो, शेवटी सप्तशृंगीच्या गडावर आणि त्र्यंबकेश्वर क्षेत्री त्याची परिपूर्तता केल्याविना सिद्धि प्राप्त होत नाही. ज्ञानेश्वराची ही परंपरा तुकाराम महाराजापर्यंत चालत आली. नाथसांप्रदायी ज्ञानेश्वराच्या उपासनामार्गाचे परिवर्तन आजच्या वारकरी पंथामध्ये झालेले आहे. वारकरी सांप्रदायाचे म्हणजे नाथपंथियाचे जे एकमेव दैवत पीठ, योगपीठ, पंढरपूर क्षेत्र, येथेही विठ्ठल हा एकटाच नसून त्याच्या सांनिध्यात रुक्मिणीदेवी शक्तिरूपाने आहेच आणि या गोष्टीचा उच्चार 'विठ्ठल—रखुमाई' या घोषणेने वारकरी सदैव करीत असतात आता या पीठाच्या ठिकाणी जी अज्ञात वस्तु आहे तिचा विचार करता असे दिसून येते की, विठ्ठलाच्या शिरोभागी, श्री शंकराची पिंडी असून, शिरोभाग हीच आदिशक्ति पार्वती अद्वैतरूपाने अधस्थ राहिलेली आहे. म्हणजे दृग्गोचर मूर्ति जरी विठ्ठल रखुमाई दिसत असली, तरी ज्ञात्यांना शिव-शक्तीचे तेथे दर्शन घडते याला पुरावा म्हणून नरहरी सोनाराला कमरेच्या पट्याचे माप घेताना शिवलिंग दिसणे, एकनाथ महाराज अथवा संतकवि दासगणू यांना दर्शनाच्या वेळी शक्तिदेवीचे दर्शन घडून विठ्ठलमूर्तीलाच अबाबाई नावाने हाक मारणे, ह० देता येईल या संतांचा भाव शुद्ध असल्याने मूर्तीच्या ठिकाणी त्यांना

द्वैतभाव नव्हता. म्हणून दृश्य मूर्तीमधील अज्ञातरूपही त्याना दिसत होते. आधुनिक काळातील साईबाबा, गोंदवलेकर महाराज, प. मदनमोहन मालवीय, मध्वाचार्य, वल्लभाचार्य या सर्व थोर विभूति शक्तिपूजक होत्या साईबाबा तर असे म्हणत की, “ माझी आई सात शृगाच्या डोंगरावर रहाते, आणि बाप त्याचे पलिकडील डोंगरावर राहतो ” ( त्र्यंबकेश्वर ). गोंदवलेकर महाराजांनी नवचडी, शतचडी याग करून घेतले असून त्यामुळे एक विशिष्ट शक्ति संपादन केलेली होती. अतर्शाक्त, बहिः शैव समाया च वैष्णवः । असे शकराचार्यांचे एक वचन आहे. त्याचेच अनुकरण या सतानी केले आहे आपण स्वत शक्तींची उपासना करावयाची आणि इतरेजनाना वैष्णव साप्रदाय सागावयाचा.

मग प्रश्न असा उद्‌भवतो की, स्वत.चे वर्तन याप्रकारचे शक्तिपूजेला पूरक असताना, त्यांनी भक्तीमार्गाचा उपदेश का केला ? वर म्हटल्याप्रमाणे काल परत्वे वामाचारी त्र्याचरणामध्ये फरक पडत गेला आणि मूळ शुद्ध हेतु बाजूला राहून, स्वैराचार फोफावला. सयमी म्हणून तत्रमार्ग घेतल्यावर त्याचा सयम सुटला, आणि कामनिक इच्छा प्रबळ झाल्याने, समाजात त्याच्या स्वैर वर्तनामुळे बजबज-पुरी माजून समाजाचे स्वास्थ्य नष्ट झाले. देव आणि देवीचे नावावर अनत अघोर कृत्ये प्रत्यही घडू लागली. जिव्हालोलुपपणा कमालीचा वाढल्यामुळे, पचमकारादि उपचाराची विकृतपणे पूजा होऊ लागली. त्यामुळे या पूजकाची सर्वसाधारण समाजाला घृणा उत्पन्न झाली. काही समाजात तर इष्टीची ( देवीची ) कृपा सपादन व्हावी म्हणून, नरबली अर्पण करण्यात येई व काही वेळा खुद्द मामाताचेही बलीदान निष्ठुरतेने करण्याची अघोरप्रथा रूढ झाली. मद्य, मास, मदिरा इ० पचमकाराचा सरसहा कामनिक हेतूसाठी दुरुपयोग राजरोसपणे होऊ लागला. त्यामुळे समाजाचे स्वास्थ्य बिघडून समाजाची मूळ बैठकच कोलमडून पडली अशा दुर्धर प्रसगी समाजाला सावरण्याचे काम संतांना करावयाचे होते. वामाचारी वर्तणुकीवरून त्यांना शुद्ध सात्विक उपासनेकडे समाजाला खेचून परत आणावयाचे होते या बहकलेल्या आणि परिस्थित्यनुरूप निर्जीव झालेल्या समाजाला मार्गावर आणण्याचे कठीण काम सतांना करावयाचे होते. तेव्हा शक्ति-तत्त्वाच्या मूळरूपाला बाध न आणता, ते गुप्त राखून, स्वत पुरते आचरणात ठेवून, समाजाला रामनाम, ज्ञानेश्वर, तुकाराम, विठ्ठलरुखुमाई या सुलभ व सोप्या, पण अती मोक्षपद प्राप्त करून देणाऱ्या मार्गाचा उपदेश केला तेव्हा एकनाथ-तुकारामांनी शाक्तपथावर कोरडे ओढले आहेत, ही गोष्ट जरी सत्य असली, तरी त्यामध्ये वरीलप्रमाणे त्याचा शुद्धभावच दिसून येतो. याचा अर्थ ते शक्तिपूजेच्या विरुद्ध होते असा मात्र काढता येणार नाही त्या काळात समाजाला वळणावर आणण्यासाठीच त्यांचा सर्व खटाटोप होता, असे निश्चितपणे म्हणता येते.

हे सतमहात्मे शक्तिपूजेच्या विरुद्ध कसे नव्हते याचे ठळक उदाहरण म्हणजे समर्थ रामदासाचे देता येईल. गोदावरी तीरावर टाकळी मुक्कामी तेरा कोटींचा रामनामाचा जप, त्यानी पाण्यात उभा राहून केला, ही गोष्ट सर्वत्रांस जाहीर आहे परतु या जपाबरोबरच त्यानी गायत्री पुरश्चरण करून शक्तीसचय केला ही गोष्टही सत्य आहे शक्तिउपासनेविना पुढील कार्य यशस्वी होणार नाही याची त्याना जाणीव होती. पण हे शक्तिपूजेचे सतीचे वाण बहुजन समाजाला पेलणारे नाही, याची खात्री असल्यानेच त्यांनी समाजाला सुलभ असा रामनामाचा उपदेश दिला परतु कठीण प्रसगी म्हणजे शिवाजी अफझुलखान भेटीच्या वेळी अगर आग्रा येथे औरंगजेबाच्या बदीत असताना, त्यांनी गद्‌गदून, अतःकरण पिळवटून शिवरायाचे अभिष्ट व जीवदान मागण्यासाठी निर्वाणीची हाक मारली ती आदिभवानी तुळजापूरच्या मातेला, आणि त्यांच्या हाकेला माताही त्वरित धावली व तिने दर्शन दिले स्वामी स्वत म्हणतात ‘देखिली तुळजामाता । निवालों अतरीं सुखें ॥’ ध्यानात घेण्यासारखी गोष्ट आहे की, या ठिकाणी त्याचे उपास्य दैवत रामरायाला त्यानी पाचारण केले नाही त्याना पक्के माहीत होते की, लकेच्या मार्गावर असताना रामरायाना रावणाचे विरुद्ध विजय सपादनासाठी आशीर्वाद देणारी, वर देणारी माता, तुळजाभवानी हीच होती यासाठीच त्या देवीला रामवरदायिनी असे नामाभिधान प्राप्त झालेले आहे तेव्हा त्याच आद्यशक्तिकडून वरदान आणि आशीर्वाद घेणे उचीत होय या प्रकारचे समर्थगुरुछत्रपति शिवाजी महाराजांना लाभले म्हणून त्याचेही सामर्थ्य वाढत गेले शिवाजी महाराज स्वत देवीचे उपासक, तिच्याकडून येणाऱ्या कौलाप्रमाणे आचरण करणारे, आणि त्यात रामदासासारखे गुरु लाभल्याने, सर्वत्र जयच जय होत गेला, पण तो शक्तिदेवीच्या पूजनामुळे, हे वाचकानी विसरू नये

शक्तिउपासनेच्या निरनिराळ्या प्रतीकाचा विचार करता असे दिसून येते की गुणपरत्वे भिन्न भिन्न आकाराच्या अनत मूर्ति पूजिल्या जात आहेत, हे निर्विवाद आहे परतु प्रथमदर्शनी निवेदिल्याप्रमाणे विशिष्ट स्थिति प्राप्त झाल्या नतर, सगोपासक या मूर्तिपूजेमध्ये रममाण न होता, त्याच्यावरची श्रेष्ठ पायरी जी निर्गुण उपासना त्याकडे जाण्यासाठी यत्राची पूजा करतो पचमहाभूताना प्रत्यक्षात प्रथम यत्रामध्ये आणले गेले आणि नतर यत्राच्या प्रतीकात्मक मूर्ति साकार झाल्या यामुळे अस्तित्वात असलेल्या सर्व देवताची वेगवेगळी यत्रे आहेतच मग तो शकर भगवान असो, विष्णु असो, गणपती असो वा देवी असो म्हणजेच यत्रपूजा ही मूर्तिपूजेच्या आधीची आहे या सर्व यत्रामध्ये श्रीयत्र हे प्रमुख व सर्वश्रेष्ठ मानलेले आहे या एकाच यत्रावर स्त्री व पुरुष याचे आवाहन होते फक्त त्याची मांडण्याची पद्धति वेगळी आहे. यत्रपूजा ही निर्गुण व सगुण याच्या मधली

पायरी मानली असून त्याच्या एकाग्र चित्ताच्या पूजनाने व सातत्याने ही पायरी आपोआप गळून पडते, आणि पूजक निर्गुणाचे पूजनाला प्राप्त होतो. या प्रकाराला 'आत्मार्चन' अशी संज्ञा आहे शक्तिपूजकामध्ये ही सर्वश्रेष्ठ परमोच्च स्थिति मानली जाते व त्या स्थितिप्रत पोहोचलेल्या व्यक्तीला निर्गुणोपासक म्हणतात.

सांप्रत इस्लामधर्मीयांचे जे महान धर्मपीठ मक्का शहर, तेथेही शाळिग्रामाच्या भव्य शीळेवर ( काबा ) श्रीयंत्र असून, याच ठिकाणी सर्व यात्रेकरू आपली प्रार्थना ( नमाज ) पढत असतात. काब्याचे मागील बाजूस भिंतीच्या कोनाड्या सारख्या जागेमध्ये एक तुपाचा दिवा सतत तेवत असतो. त्यामधून निघणारी ज्योति ( चिराग ) ही अत्यंत पवित्र मानली जाते श्रीयंत्राचे ताबीज करून घरोघर नेले जातात आणि स्वास्थ्यासाठी शरीरावर धारणही केले जातात. हिंदुधर्मीय अग्निस्वरूप याच ज्योतीची पूजा करीत असतात साध्या नित्याच्या पूजेमध्ये निरंजन अथवा समईमधील पेटत्या ज्योतीला फूल वहावे लागते काबा येथील ज्योतीला हाररूपाने जी पुष्पे अर्पण केली जातात, ती सर्व मुनाशिफ असून श्वेत व रक्त वर्णांची असतात. इतर कोणत्याही रंगाचे फूल तेथे पूजेला चालत नाही, घेतले जात नाही. या ठिकाणी श्वेत पुष्प म्हणजे शिवाचे आवडते आणि रक्त पुष्प म्हणजे शक्तीचे आवडते. अल्ला या शब्दाचा अरबी भाषेतील अर्थ शिव आणि शक्ती असाच आहे आपल्या काही तंत्रग्रंथामध्ये या क्षेत्राचा उल्लेख 'मक्केश्वर' म्हणजे शंकराचे स्थान असाच आढळून येतो म्हणजे दोन्ही संस्कृतींच्या पूजनात एवढ्यापुरता तरी भेदभाव नाही.

श्रीयंत्र हे सर्वश्रेष्ठ असून त्याचे तीन प्रकार आहेत व ते उत्पत्ति स्थिति आणि लय यावर आधारित आहेत. त्या त्या प्रकारांनी पूजक त्या यंत्राचे पूजन करीत असतो दुसरा प्रमुख भेद म्हणजे उर्ध्वरेखी आणि अधोरेखी असते परंतु अधोरेखी यंत्र पूजण्याचा मूर्खपणा करू नये उर्ध्वरेखा म्हणजे एम्बॉस पद्धतीने वर रेखा उमटून दिसणारे यंत्र होय आणि तेच पूजनीय होय. या यंत्रामध्ये ४५ त्रिकोण असून निरनिराळ्या देवतांची आवाहने त्यांच्या ठरलेल्या त्रिकोणातच करावी लागतात तसे आवाहन योग्य ठिकाणी योग्य वेळी झाले नाही, तर उपासकांना भयंकर यातना सहन करून शेवटी देहदंडही भोगावा लागतो यासाठीच सर्वसामान्य माणसांना श्रीयंत्रांनी पूजा सांगितलेली नाही. तो परम संयमी गृहस्थ असला पाहिजे, तरच हे पूजन करू शकतो पंचदशी पूजा ही शाक्तांची शेवटची उपासना होय आणि ती गुरुकृपेने यावी लागते. शिष्याची मानसिक पातळी परमोच्च संयमी आहे, याची खात्री झाल्यावरच ही पूजा गुरुजी देतात. संयमी व्यक्तींनाही यातील मंत्रपठण किती कठीण आहे, याचे उदाहरण

घ्यायचे झाले तर स्त्री-पुरुषांची भोगलिंगे संलग्न झाल्यावर पुढे कोणतीही हालचाल न करता त्या स्थितीत निश्चल राहून काही जप करावा लागतो. मनाचा कच्चा संयमी यामध्ये घसरतो आणि रौरव नरकाचे साधन करतो. तेव्हा बहुजन समाज जो सर्वस्वी बहिर्मुख आहे, त्याला हा मार्ग मुळीच पेलणारा नाही हेच दिसून येईल. या यंत्राचा मुख्य भाग म्हणजे केंद्रस्थानीचा शक्ति-त्रिकोण होय. या त्रिकोणाचे तीन कोनाला रज-सत्व-तम; स्वर्ग-मृत्यु-पाताल; ब्रह्मा-विष्णु-महेश; काली-लक्ष्मी-सरस्वती इ० इ० अनंत त्रयींची नावे दिली असून त्रिकोणाचे मध्यभागी असलेला बिंदु हाच परमोच्च भाव होय. कारण या बिंदूमध्येच अद्वैत रूपाने निर्गुणत्वाचे शिव–शक्ति पूजन होते. शिव हा मूळचा अचेतन पण शक्तीच्या चैतन्यामुळे शवचा शिव झाला आणि कालांतराने ती शक्ति-देवी निघून गेल्यावर पुन्हा शव बनतो. असा हा सृष्टिक्रम चालू आहे.

संत तुलसीदास महाराजांनी हनुमान अष्टकामध्ये खालील श्लोक घातले आहेत—

**देवी हि पूजी भली विधिसों, बलि देहु सबय मिलि मंत्र विचारो ।**
**जाय सहाय भले तब हि, अहिरावण संमते सैन्य संहारे ॥**

याचाच भावार्थ असा की, अहिरावणाने राम-लक्ष्मणाला बंदी करून नेल्यावर एका देवीच्या मंदिरात बंदिस्त केले होते. तेथे रामाने शक्तिदेवीचे पूजन केले, आणि तिने प्रसन्न होऊन रामाला अस्त्र दिले. या अस्त्राचा उपयोग राम-रावण युद्धात झाला. हें सांगण्याचे तात्पर्य इतकेच की शक्तिपूजेशिवाय रामचंद्रासारख्या अवतारी पुरुषालाही गत्यंतर नव्हते.

दत्तावतार नरसिंहसरस्वती हे अमरजा संगमावर श्रीयंत्राचीच उपासना करीत असत. त्याच आत्मलिंगाची ओळख आजही त्या क्षेत्री भेट देणाऱ्याला करून देण्यात येते. एकनाथाच्या वेळी जुन्नर शहरी लोलिंबराज नावाचे महान अधिकारी होऊन गेले. हवनाचे वेळी आहुति कमी पडल्यावर स्वतःच्या मांडीच्या मांसाचे लचके तोडून हवन पूर्ण झाल्यावर भिल्लिणीच्या स्वरूपात स्वतः देवीने दर्शन देऊन इच्छापूर्तीचे वरदान केले होते. त्यांनी तेथील तहसीलदाराचे मुलीबरोबर विवाह केला होता. म्हणून ब्राह्मणवर्गाने त्यांना वाळीत टाकले होते. एकनाथांनी एकदा त्या गावी सहस्र भोजन घातले आणि सर्व ब्राह्मणांना निमंत्रण दिले. लोलिंबराजांनी जाण्याचे नाकारले, पण मुसलमान पत्नीने त्यांना जाण्यास भाग पाडले. तो दिवस साधन द्वादशीचा असल्याने भोजन सकाळी सूर्योदयाबरोबर होते. लोलिंबराज सकाळी लवकर उठले नाहीत व स्नानसंध्यादि विधीही केले नाहीत. पण पत्नीने त्यांना उठविले आणि भोजनाला पाठविले. आंघोळ झालेली नाही, डोळेही साफसूफ

केलेले नाहीत आणि रात्रीचे वस्त्रच अंगावर अशा थाटानें स्वारी मंडपात गेली व पाटावर बसली. पण इतर ब्राह्मणांना या भ्रष्ट इसमाबरोबर पंक्तीस बसणे आवडले नाही. त्यानी तक्रार केली. त्या वेळी लोलिंबराज म्हणाले, " माझे स्नान झाले असून शंकराना बेलपानही वाहिलेले आहे " आपली शेंडी पिळून चार-दोन भांडी पाणी दाखिवले. इतकेच नव्हे तर शंकराचे मंदिर उघडले नसताही, मंडळी जेव्हा आत गेली तेव्हा एक ताजे बिल्वपत्र पिंडीवर घातलेले दिसून आले. अर्थात् हे बिल्वपत्र घराबाहेर निघताना त्यांनी आपल्या पत्नीच्या मस्तकावर घातले होते. ते येथे येऊन पडलेले होते हा चमत्कार पाहून त्यांची योग्यता नाथाना आणि इतरांना कळली आणि मंडळी भोजनास बसली. या प्रकारचे श्रेष्ठदर्जाचे शाक्त आजही भारतामध्ये अनेक आहेत.

या ग्रंथामध्ये गायत्रीची माहिती देताना ती चतु:पदा असे वर्णन आलेले आहे. पण ते तितकेसे बरोबर आहे असे वाटत नाही. कारण गायत्रीचे वर्णन करताना वेदऋचा म्हणते " षट्स्वरा पिंगाक्षी त्रिपदा " असा संकल्प आहे. गायित्री मात्रांची वर्णसंख्या २४ आहे, आणि अर्थाचे दृष्टीने पाहिले तर फक्त तीनच पदे पडतात. चार नाही. ही तेजाची उपासना आहे. निर्गुणापासून ते तेज सूर्यामध्ये आले आहे. त्याची प्राप्ती प्रार्थना करणाराला व्हावी असा भावार्थ आहे. पंचशास्त्रात षट्पदा गायत्री सांगितलेली आहे, पण चतुष्पदा नाही. हे ध्यानात असावे. ' परमात्मा देवता, देवी गायत्री, सविता गायत्री ' इ. संकल्पामधील पदे स्पष्टपणे दर्शवितात की ती त्रिपदा आहे. याच त्रिपदा गायत्रीची म्हणजे धौम्य मुनींनी सांगितल्याप्रमाणे १०८ सूर्यतेजाची उपासना करून पांडवांनी वनवासात हजारो ब्राह्मणांना भोजन घालू देणारी ताम्रथाली सूर्याकडून उपलब्ध करून घेतली, असा महाभारतामधील कथाभाग आहे. इतकी श्रेष्ठता त्या उपासनेची आहे.

गायत्रीचे महत्व इतके आहे की तिला विश्वजननी असे म्हटले आहे. मूळ निर्गुण निराकार जे आहे ते परब्रह्म म्हणतात व त्यापासून माया झाली. तिचाच विस्तार होऊन तिची जी इच्छाशक्ति तीच कन्यारूप सतरावी शक्ति विश्वजननी होय. या स्वामिनीचे जे त्रिगुण झाले तेच ब्रह्मा, विष्णु, महेश, किंवा राजस, सात्विक व तामस होत. यापासून पुढे सर्व प्राणिमात्रांची उत्पत्ति, म्हणून या गायत्री स्वरूपाचे ध्यानमनन, पूर्वी ऋषि, मुनि व लोक करीत, म्हणून ते धनधान्य, विद्या, बल, व शक्ति यानी संपूर्ण होते. षोडशकाल पूर्ण झाल्यावर हिची उत्पत्ति झाली म्हणून सतरावी नाव आले.

पण जेव्हा गाय म्हणजे गायत्री असे मानण्याकडे सर्वसाधारण समाजाची प्रवृत्ति झाली, तेव्हा त्याचे मूळ फल कसे प्राप्त होणार ? पशुरूप ही गाय, आपले

वधुपुत्रादिकासंगे अनेक कर्मे करते विधिनिषेध पाळीत नाही, इतकेच नव्हे तर अमंगल भक्षण करते, तेव्हा अशा अपवित्र रूपाचे भजनपूजन केल्याने, उद्धार कसा होणार, याचा कोणी विचारच करीत नाही तेव्हा आज जर कशाची खरी जरुरी असेल तर या भोळ्या समजुतीमधून समाजाने बाहेर पडून, त्या त्रिपदा गायत्रीची धारणा धरणे याची आहे अशा गायत्रीचे ध्यान करणाराला पूर्वी राजे लोक सांभाळ करीत, कारण तेणेकरून त्याना यशप्राप्ति होत असे

गायीचे पालन करणे, रक्षण करणे, सेवा करणे, हे धर्माच्या मानाने हाचे बाह्यांग स्वरूप आहे, देह धारणासाठी उपयुक्तता आहे, पण मूळच्या त्रिपदा गायत्री शक्तीबरोबर याचे काहीही साम्य नाही, हे प्रत्येकाने ध्यानी धरावे पुराणामध्ये कामधेनु, सुरभी याच्या कथा आहेत, व त्या गायीच होत्या, असे जरी वरवर भासत असले, तरी ऋषि व गायीचे पूजन याचे अन्योन्य संबंध उघडरीतीने विशद करून सांगणे इष्ट नाही, म्हणून खुलासा टाळीत आहे

भूचरी, चाचरी, अगोचरी, उन्मनी व अलक्ष्य या प्रकारे अनेक मुद्रा आहेत, पण आत्मभापणी मुद्रा सर्वश्रेष्ठ होय

खेचरी मुद्रा आत्मसात केल्याने खेचरी विद्येचे अध्ययन केल्याने, अगर खेचरीवटी नावाची औषधी वटी खाल्ल्याने मनुष्य हवेमध्ये उड्डाण करू शकतो आणि याची उदाहरणे माझ्या पाहण्यात आहेत सुमारे ५० वर्षांपूर्वीची गोष्ट आहे काठेवाडातील गोंडल शहरी डॉ गाडगीळ नावाचे एक तांत्रिक रहात असत एके दिवशी दुपारी काकबली टाकीत असता, आकाशमार्गे एक तपस्वी घोंगडी पांघरून असलेला समोर उभा राहिला अर्थात् गाडगीळ तितकेच अधिकारी असल्याने, तो त्याच्याकड आलेला होता भोजन म्हणून फक्त दोन पेले दूध दिवसापोटी घेतले तीन दिवस त्याच्याकडे त्याचे राहणे झाल्यावर, तपस्वी संतुष्ट होऊन त्याना खेचरीवटी खावयास दिली नंतर आठ दिवसांपर्यंत तेथे राहून, आकाशउड्डाणाची प्राथमिक तालमही देऊन, आकाशमार्गे तपस्वी निघून गेले पण डॉक्टर महाशयाना ती विद्या आत्मसात करता आली नाही सातारा जिल्ह्यातील चाफळ खोऱ्यात सुमारे २०–२१ मैल उड्डाणाचा प्रयोग करीत असता, अपघाताने खाली पडून त्यांचा चक्काचूर झाला

दुसरे उदाहरण म्हणजे शृंगेरी मठाधिपती चंद्रशेखर भारतीयांचे देता येईल हे थोर अधिकारी पुरुष होते एके समयी हैदराबाद येथील निजामाचे वैद्यराज रायरात बहाद्दूर आजारी झाले आणि ४२ दिवसपर्यंत परमेश्वरावर भरवसा ठेवून, त्यानी कोठलेही औषधपाणी घेतले नाही शेवटचे दिवशी रात्री १२ वाजण्याच्या सुमारास पूर्वीच्या ऋणानुबंधामुळे, चंद्रशेखर भारती तेथे अचानक

प्रगट झाले आणि औषध घेण्यास सांगितले. रुग्णाने ते नाकारले. तेव्हा भारतींनी स्वत: देवाचे तीर्थ आपले हाती दिले आणि निमिषातच अदृश्य झाले. पुढे वैद्यराज रोगमुक्त झाले ही गोष्ट वेगळी. चंद्रशेखर भारतींनी तेथे अचानक प्रकट होणे, व जाणे याचे कारण त्याना खेचरी विद्या अवगत होती हेच होय.

हिंदुविश्व, नोव्हेंबर १९६६, या अंकातील डॉ. लोकेशचंद्र यांचा बाली बेटातील संस्कृति व तेथील मुख्य धर्मगुरू पेदान्दा याच्या ध्यानमुद्रासनघी विवरण करावयाचे झाले तर असे म्हणता येईल की, त्या मुद्रा आणि न्यास जरी तांत्रिक पद्धतीच्या असल्या, तरी भारतीय तांत्रिकाच्या मुद्रा व न्यास यापेक्षा निराळ्या आहेत पेदान्दाच्या कृतीवर बौद्ध तांत्रिकाचा काही अंशी पगडा बसलेला असावा, आणि हे जगदी सहज शक्य आहे. पधरावे शतकात जावा-सुमात्रा द्वीपामध्ये इस्लाम संस्कृतीने आक्रमण केल्यावर, आर्य धर्मियानी आपली वस्ती तेथून हलवून, आपल्या ग्रंथसंपत्तीसह बाली बेटाकडे प्रयाण केले, असे इतिहास सांगतो पण त्यापूर्वी अनेक शतके त्या प्रांतामधून बौद्ध संस्कृतीची चलती होती, हे तेथील उत्कृष्ट बौद्धशिल्पावरून सिद्ध करता येते त्यामुळे पूर्वीच्या आर्यसंस्कृतीवर बौद्ध संस्कृतीची छाया पडणे आणि ध्यान मुद्रावर परिणाम होणे अशक्य नव्हे.

प्राणायामाचे जे प्रकार वरील अंकातील छायाचित्रात दाखविले आहेत, ते भारतामधील प्रकारापेक्षा वेगळे वाटतात जसे प्राणायामाचे वेळी भारतीय कृतीत, नासिकाग्र बोटांनी धरले जाते, तर चित्रातील आकृतीत प्राणायामाचे वेळी दोन बोटे, नासिकाचे एका बाजूला धरलेली आहेत. आचमन करण्याची कृतीही निराळी दिसते. ध्यानधारणेच्या वेळी समोर शिवाची पिंडी अगर प्रतीक नाही, उलट तो शिव पेदान्दाच्या मस्तकी शिरतो असे म्हटले आहे. धुपाटण्यात अग्नि प्रज्वलित करून, धूप जाळून, त्याचा धूर पैलावणे, ही क्रिया भारतीय आचरीत नाहीत भारतीय तांत्रिक शास्त्राप्रमाणे सर्वोत्तम तांत्रिकान्ना 'षोडान्यास' आणि ५१ मुद्रा सांगितल्या आहेत, पण त्याचे प्रदर्शन केले जात नाही. ती गूढ विद्या गुरूपासून प्राप्त करून घ्यावी लागते. गुरुचरणाची सेवा करून आत्मसात करावी लागते. पुस्तकातील चित्रावरून त्याचे ज्ञान होणार नाही. तितकाच अधिकारी पुरुष झाल्याविना गुरु ही विद्या कोणाला देणार नाही. तेव्हा ज्या देशात मुद्रा आणि न्यास याचे पुस्तकातून छापील प्रदर्शन घडू शकते, त्यावर बौद्ध धर्माचा पगडा आहे, असे निश्चितपणे म्हणता येते.

या मंत्रतंत्रविद्येबाबत अतिशय गूढता बाळगण्यात येत असे, आणि म्हणून गुरुमुखाने आलेली मंत्रविद्या फलदायी होत असे. सांप्रत त्याप्रमाणे अनेक

गुरु, शिष्याने मागितला की मंत्र देतात, याचाच अर्थ असा की एका पारड्यात मंत्र व दुसऱ्यात गुरुदक्षिणा घ्यावयाची, तद्वत परिस्थिति खाचित नव्हती. ज्याप्रमाणे उत्तम गायनविद्या प्राप्त करून घेण्यासाठी गुरुगृही वास करून त्यांची सेवा करून, त्यांचे लहरीस येईल तेव्हा शिष्याची पात्रता वाढेल, त्याप्रमाणे ती विद्या हळूहळू मिळत असे, त्याप्रमाणे या विद्येबाबतही होते. माझे गुरुजींनी विद्या मला याप्रमाणेच दिली आहे. शिष्याची पात्रता वाढली आहे किंवा नाही हे पाहण्यासाठी त्याला प्रत्यक्ष मंत्र न देता मंत्रोद्धार दिला जात असे. हा मंत्रोद्धार प्राप्त झाल्यावर शिष्याने त्याचे मनन करून, योग्य ती पदे शोधून, मंत्राचे संशोधन करावयाचे आणि गुरुकडून त्याच्या इष्टानिष्टतेची खात्री करून घ्यावयाची असते. सर जॉन वुड्रफच्या ग्रंथातून असे अनेक मंत्रोद्धार दिलेले आहेत. पण त्याचे संशोधन व खात्री गुरुच्या सहाय्याविना होणे अशक्य आहे. हे मंत्रोद्धार जरी कागदोपत्री उघड करून सांगावयाचे नसतात, तरी केवळ या विषयाची कल्पना यावी म्हणून मी एक उदाहरण देत आहे.

सांतरांतसमायुक्तं चतुर्थस्वरसंयुतम् ।
रेफाक्रांतं बिंदुयुक्तं ब्रम्हास्त्रैकाक्षरो मनु : ।।

याचा अर्थ असा की, ह् ल र् ई बिंदु या सर्वांचे एक अक्षर बनेल = ह्ल्रीं = बीजाक्षर तयार होईल. हीच पद्धत यंत्राचे बाबतीत यंत्रोद्धार म्हणून प्रचारात होती. ही विद्या गूढ राहिल्याने तांत्रिक संप्रदाय ऱ्हासाला लागला ही गोष्ट जरी सकृत दर्शनी खरी वाटत असली, तरी ते मूळ कारण नव्हे. खरे कारण असे आहे की, विद्या हस्तगत करण्यासाठी श्रम घेणारे विद्यार्थीच मिळत नाहीत. वैदिक ब्राह्मणांची हीच तक्रार आहे, शास्त्रोक्त गायकाची हीच तक्रार आहे, मग तांत्रिकांची असली तर नवल कोणते ! आणि याचे मुख्य कारण म्हणजे अर्थप्राप्ति. इतर विद्या अथवा शास्त्रे शिकल्याने दैनंदिन जीवनक्रमाला उपयुक्त आर्थिक प्राप्ति होते, तद्वत् या विद्यांनी होत नाही. पूर्वी याची भरपाई राजाश्रयाने होत असे, तोही मार्ग सांप्रतच्या लोकशाहीच्या जमान्यात खुंटला आहे. तेव्हा इच्छा असूनही, विद्येची श्रेष्ठता दिसत असूनही विद्यार्थी या मार्गाकडे वळत नाही. हेच विद्या लोप पावण्याचे खरे कारण आहे. जशी मातेची इच्छा ! वेदान्ती माणूस विशिष्ट योग्यता आल्यावरच तांत्रिक विद्येचा अधिकारी होऊ शकतो, म्हणूनच त्यांना शास्त्री म्हणतात. जसे गोडबोलेशास्त्री, नाशिकचे वारेशास्त्री इ. यंत्राचे उपासक होते.

आमचे गावचे रहिवासी व येथील अंबाबाई देवस्थानाची जातीने व्यवस्था पाहणारे श्री. प्र. कृ. प्रभुदेसाई यांनी शक्तीच्या उपासनेवर प्रचंड ग्रंथ तयार करून

वाचकांसमोर ठेवलेला आहे. या उतारवयात व सेवानिवृत्तीच्या आरामकाळी संशोधनपर एवढा ग्रंथराज निर्माण केला, हे खरोखर त्यांना आणि आम्हा गावकऱ्यांना भूषणावह आहे. साधारणपणे शक्तिउपासनेची ही गंगोत्री म्हणता येईल. अनंत पुस्तके अथवा अवघड ग्रंथ धुंडाळण्यापेक्षा वाचकाचे आणि देवीउपासकाचे सर्वसाधारणपणे या ग्रंथाने समाधान होईल, असा विश्वास वाटतो. ग्रंथामध्ये दिलेली निरनिराळ्या प्रकरणातील माहिती ही अर्थात बाह्यस्वरूपाची असून, अक्षरशः मंत्र अथवा तंत्रसामर्थ्याचे विवरण, या सर्वसंग्राहक ग्रंथामध्ये पूर्णपणे अरू शकणार नाही आणि ते इष्टही नाही, म्हणून तो विषय सखोलपणे घेण्याचे लेखकाने टाळलेले आहे. मानवाला शक्तिमान बनविणारी मंत्र-तंत्र विद्याशक्ति ही गुरुमुखानेच येणे इष्ट असते. साररूपाने सांगणे इतकेच, शक्तीच्या उपासकांनी, आणि जिज्ञासू वाचकांनी हा ग्रंथ अवश्य संग्रही ठेवावा, इतक्या मोलाचा तो आहे. शक्तिग्रंथाची ध्वजा सर्वत्र फडकेल असा आमचा आशीर्वाद आहे.

शोभतचे अनेक उच्चपदस्थ अधिकारी, अथवा लक्ष्मीपुत्र श्रीयंत्राचे उपासक असल्याचे आढळून येईल. शेवटी आवर्जून सांगणे इतकेच की राष्ट्र, समाज व व्यक्ती ही सर्व प्रकारे सुखी, समर्थ व निर्भय व्हावी असे वाटत असेल, आणि ऊर्जितावस्था प्राप्त होऊन राष्ट्रवैभव वाढावे असे वाटत असेल, तर एकच एक मार्ग आहे आणि तो म्हणजे त्या आदिशक्ति जगन्मातेचे शुद्ध, सात्विक भावनेने पूजन-स्मरण करून सतत तिच्या चरणकमळसेवेत रत होणे होय.

सर्वेऽत्र सुखिनः सन्तु सर्वे सन्तु निरामयाः ।
सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चित् दुःखमाप्नुयात् ॥

वैशाख शु. ३ शके १८८९
अक्षय्य तृतीया

सर्वमंत्र स्वतंत्र तंत्राचार्य
रघुनाथ मोरेश्वर तथा दादा
पेंडसे, गोरेगाव, मुंबई ६२.

---

॥ श्री ॥

जय जगदंब उदयोऽस्तु

# विषय-प्रवेश

त्वमेव सर्वजननी मूलप्रकृतिरीश्वरी ।
त्वमेवाद्या सृष्टिविधौ स्वेच्छया त्रिगुणात्मिका ॥१॥
कार्यार्थे सगुणत्वं च वस्तुतो निर्गुणा स्वयम् ।
परब्रह्मस्वरूपा त्वं सत्या नित्या सनातनी ॥ २ ॥
तेजस्वरूपा परमा भक्तानुग्रहविग्रहा ।
सर्वस्वरूपा सर्वेशा सर्वाधारा परात्परा ॥ ३ ॥
सर्वबीजस्वरूपा च सर्वपूज्या निराश्रया ।
सर्वज्ञा सर्वतो भद्रा सर्वमंगलमंगला ॥४॥ (ब्रह्मवैवर्त पुरा॥

अखिल जगाचे देवघर मानल्या गेलेल्या भारतात आजवर धर्मविषयक अनेक ग्रंथ लिहिले गेले व प्रत्यही लिहिले जात आहेत. पण आदिशक्तीच्या कर्तृत्वावर आणि जगचालकत्वावर अतिशय कमी ऊहापोह झालेला आढळून येतो. देवीभागवत व काही पुराणे हे संस्कृतग्रंथ सोडले तर इतर प्रादेशिक भाषामध्ये या विषयावर सर्वांगीण ऊहापोह झालेला प्राय आढळून येत नाही. नाही म्हणावयास इ. स. १९३४ साली गोरखपूर मुद्रणालयाने एक शक्ति अंक प्रसिद्ध केला आहे. भारतीय विद्याभवन, मुंबई यांनी १९६१ साली मातृशक्ति अंक प्रसिद्ध केला. पण ते हिंदी भाषेत असून सर्वव्यापक नाहीत. भारत हा आध्यात्मिक ज्ञानामध्ये सर्व जगाच्या गुरुस्थानी मानला जातो, त्याच्याकडे मूलस्थान म्हणून पाहिले जाते, त्याच ठिकाणी आद्यशक्तीबद्दल इतकी अनास्था आढळते, मग इतर देशांत काय परिस्थिति असेल याची कल्पनाच केलेली बरी. निदान भारतात तरी या शक्तिदेवीची यथासांग माहिती उपलब्ध करून देणारा, आजवरचे ग्रंथ, स्तोत्रे, काव्ये इत्यादीकांची समग्र माहिती एकत्रित करून देणारा ज्ञानकोशासारखा ग्रंथ तयार व्हावयास पाहिजे होता. येरं, आजवर जी पुराणे स्तोत्रे वगैरे देवीच्या शक्तिवर्णनपर झाली आहेत ती सर्व संस्कृत भाषेत असल्याने, अगर त्यांचा अनुवाद आंग्लभाषेत असल्याने, सर्व साधारण समाजास सहज सुलभ उपयोग करून घेता आलेला नाही.

## संस्कृत वाङ्मय

श्रीमत् आद्यशंकराचार्यांनी आनंदलहरी, सौंदर्यलहरी अगर त्यांचे गुरु गौडपादाचार्य यांनी सुभगोदय आदि ग्रंथ लिहिले आहेत, आणि त्यांमध्ये शक्तितत्त्वाचे दिग्दर्शन केले आहे. तसेच अनेक तंत्रकारांनीही ते कार्य काही अंशांनी केले आहे. पण भाषेच्या अडचणीमुळे त्यातील अर्थगांभीर्य आणि गूढार्थ त्यामुळे सर्व साधारण जनता त्याचा लाभ घेऊ शकलेली नाही. बंगालमध्ये तंत्रशास्त्राचे संशोधन आणि त्याचे उत्कृष्ट दिग्दर्शन केले गेले आहे, पण इंग्रजी भाषेतून सर अर्थर अव्हेलॉनसारख्या एका पाश्चात्य लेखकाकडून. रे० मार्टिन आपल्या ग्रंथात म्हणतात, " विश्वातील वाढत्या ज्ञानाबरोबर आणि त्याच वेळी आर्य लोकांच्या सर्वांगीण जीवनक्रमाकडे जगातील लोकांचे लक्ष वेधले जात असताना त्यांच्या देवदेवतांकडे दुर्लक्ष करणे कोणाही सुज्ञाला शक्य नाहीं, नव्हे, ते योग्यही नाही. " इतर देशातील विद्वानांना भारतीय देवतांबद्दल इतकी आपुलकी असताना भारतीयांचे मात्र या विषयाकडे दुर्लक्ष झाले आहे याला काय म्हणावे कळत नाहीं.

## देवीविषयक अज्ञान

या विषयासंबंधी सर्वसाधारण समाजात देवीविषयक खूपच अज्ञान आहे, असे म्हणावे लागते. या विषयाच्या अभ्यासाला सुरुवात केल्यावर जो अनुभव आला त्याचा साराशच देतो. एके वेळी आगगाडीत प्रवास करीत असता ठाणे येथील एक प्रसिद्ध वयोवृद्ध विधिज्ञ भेटले आणि बोलण्याच्या ओघात विषय निघाला. तेव्हा ते म्हणाले, मी देवीभक्त आहे. पण जेव्हा त्यांना देवीसंबंधी काही माहिती विचारावयाचा प्रयत्न केला, तेव्हा त्यांची कुलस्वामिनी आणि कोल्हापूर, तुळजापूर येथील देवता याशिवाय इतर नांवेही माहीत नसल्याचे समजून आले. प्रत्यक्ष त्यांच्या कुलस्वामिनीचे वर्णन करणे त्यांना कठीण गेले. गोरेगाव येथील श्रीअंबाबाई देवस्थानात अलीकडे अनेक विद्वान्, प्रवचनकार, शास्त्री व कीर्तनकार येतात. त्यांच्याजवळ विषय काढल्यास अनेकांनी स्वच्छ कबुली दिली, " आम्ही व्यवसायानिमित्त अनेक ग्रंथ वाचतो, पण आपण विचारता तशा प्रकारची माहिती आमच्याजवळ नाही. " एकदा एका भजन-मंडळी बरोबर भजनाला गेलो. दिवस नवरात्राचे होते, आणि यजमान देवीभक्त होते. शिवाय त्यांच्या घरात कोणा स्त्रीच्या अंगात देवीचे वारे येई. साहजिकच यजमानांनी भजनमंडळींस देवीस्तुतीपर एकदोन अभंग म्हणावयास सांगितले. पण भजनमंडळींना ते म्हणता आले नाहीत. भजन संपल्यावर मी बुवांना विचारले की, यजमानांची इच्छा या पूर्ण केली नाहीत! त्यावर त्यांनी उत्तर

दिले की, " अहो देवीस्तुतीपर अभंग रचलेलेच आम्हांला आढळत नाहीत." घरी आल्यावर विचाराच्या तंद्रीत बिछान्यावर पडलो असता संतवाङ्मयाचा पडदा नेत्रांपुढे सरकू लागला. ज्ञानदेव, एकनाथापासून तुकाराम, समर्थ रामदासांपर्यंत सर्व परिचित संतकवि एकामागून एक मनःश्चक्षूसमोर आले व गेले. पण कोणीही देवीच्या स्तुतीपर अभंग रचल्याचे दिसून येईना. असे का झाले असावे, याचा विचार करता असे दिसून आले की, महाराष्ट्रातील सर्व संत विठ्ठलभक्त होते, तर समर्थ रामभक्त होते. त्या सर्वांनी आपल्या इष्ट देवतेची स्तुती केली. ज्याची काव्यरचना आज मुक्तकंठाने आणि अतिशय भक्तिभावाने गायिली जात आहे, ते सर्व विठ्ठलभक्त होते.

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज अमृतानुभवाच्या पहिल्या शिव-शक्ति प्रकरणात या आदिशक्तिस्वरूपाचा थोडासा ऊहापोह करताना म्हणतात—

जो प्रियुचि प्राणेश्वरी । उलथे आवडीचिये सरोभरी ।
चारूस्थळीं येकाहारी । येकांगाची ।। २ ।।
जेणें यादवे संपूर्ण देवी । जियेवीण कांहीं ना तो गोसावी ।
किंबहुना येकोपर्जावी । येकायेकाचीं ।। १० ।।
जिये प्राणेश्वरी वीण । शिवींही शिवपण ।
भारो न शके ते आपण । शिवें घडली ।। २८ ।।

ज्ञानेश्वरांनी अमृतानुभवामधील केलेले वरील अर्थाचे विवरण, श्रीसमर्थ रामदासांचे तुळजाभवानी स्तवन, अगर क्वचित् कोठे संतवाङ्मयातून आलेले उल्लेख हेच त्याला अपवाद. पण ते प्रसंगानुरोधाने आलेले आहेत, मुख्य प्रतिपादन नव्हे.

मातापूरच्या रेणुकेची अनेक वर्षे सेवा करणारे विष्णुदास यांनी त्या देवीच्या स्तुतीपर काही काव्यरचना केलेली आहे आणि 'विष्णुदासांची कविता' या नावाने ती प्रसिद्ध झालेली आहे. पण ती विसाव्या शतकातील आहे; आणि त्याचा प्रसार अद्याप व्हावा तसा झालेला नाही. नाणावलेल्या अनेक शास्त्रीजींना माहिती विचारण्याचा प्रयत्न केला पण सर्व ठिकाणी निराशाच पदरात पडली. हा त्यांचा दोष आहे असेही मी म्हणणार नाही. कारण जो विषय त्यांनी अभ्यासिला, त्यात त्यांनी पारंगतता मिळविली. या विषयाकडे ते वळलेले नाहीत. अंबेजोगाई येथील देवीसंबंधी माहिती मिळवीत असता तेथे चारी वेळा जाऊन आलेले, शिकलेसवरलेले पुजाऱ्यांच्या घरात पोचलेले आणि ती देवी त्यांची कुलस्वामिनी असलेली एक गृहस्थ भेटले. प्रथमदर्शनी मोठा आनंद वाटला.

पण प्रत्यक्ष देवीचे वर्णन करण्याची विनंती केली तेव्हा त्यांना काहीही सांगता येईना. स्वरूपवर्णन करता येईना. हातातील आयुधे सांगता येईनात, मग उत्पत्ति अगर दंतकथा याची तर गोष्टच सोडा. शेवटी त्यांनी कबूल केले की, कुल-स्वामिनी म्हणून तेथे जाणे होते. दर्शनाचे वेळी बहुधा देवीचे स्वरूप वस्त्रालंकाराने झाकलेले असते आणि इतके खोल कधी त्यांनी पाहिलेले नाही. कित्येकांना कोल्हापूरची महालक्ष्मी, तुळजापूरची अष्टभुजा, अगर मातापूरची रेणुका या सर्व एकरूपच वाटतात.

यावरून दिसून येईल की, देवीभक्त आहेत पण आपल्या प्रत्यक्ष कुल-स्वामिनीचीही पुरती माहिती त्यांना असत नाही, मग इतर देवतांची कोठून असणार ! ही सर्व परिस्थिति अवलोकन केल्यावर सामान्य जनतेला या विषयाची सर्वसाधारण ओळख करून देण्यासाठी माझा हा प्रयत्न आहे. संपूर्ण ग्रंथ नव्हे हे मात्र ध्यानी असावे.

आदिशक्तीचे मातृत्व

आदिशक्ति आहे, त्याची जाणीव त्यांना होऊ लागली. भूमि सर्वांचे पोषण करते म्हणून ती मातृशक्ति झाली. आकाश पृथ्वीवर छाया घातल्याप्रमाणे सर्व बाजूंनी टेकलेले दिसले, म्हणून ते अदिति या संज्ञेने पितृरूप झाले. पृथ्वीपेक्षा आणखी काही जास्त आहे व त्याला बंधन नाही, असे समजून आल्यावर ती अदिति म्हणून नामाभिधान पावली. अमर्याद अवकाश त्याला आदि व अंत नाही अशी शाश्वत माता म्हणू लागले. वस्तु उत्पन्न होण्यास बीजरूपाचा संयोग अवश्य वाटल्यावरून प्रकृति म्हणजेच बीजरूप मानू लागले. आणि त्याला पुरुषप्रकृति ही संज्ञा मिळाली. अशा रीतीने मातृशक्तीची कल्पना पक्की रुजल्यावर निर-निराळ्या स्वरूपात भूमाता, वनस्पतिमाता, जलमाता इत्यादि स्वरूपे दृग्गोचर झाली. तेव्हा या रूपांना दुर्गा, पार्वती, डिमिटर इत्यादि स्वरूपे कल्पिली गेली आणि त्याच मातृशक्ति अगर आदिशक्ति बनल्या.

परप्रांतातील मातृपूजक लोक जेव्हा आपला मूळचा शेतकी व्यवसाय सोडून वीरवृत्तीकडे वळले, तेव्हा सहजच मातृदेवतेचे महत्त्व कमी झाले. वीरवृत्तीसाठी पुरुष दैवताची गरज त्यांना भासू लागली आणि त्यांना जास्त मान मिळू लागला. पण भारतात मात्र उलट परिस्थिति आली. आर्य लोकांनी वसाहती स्थापन करताना वेद रचले, असे काहींचे मत आहे. म्हणून त्या वेळी त्यांना स्त्री देवताची गरज भासली नाही. पण पुढे सर्वत्र स्थिरस्थावर करण्यासाठी आणि प्रसरणकाळी अनार्यांवर सत्ता प्रस्थापित करून सर्वत्र शांतता नांदविण्यासाठी त्यांना शक्तिदेवींची गरज भासली. त्यामुळे काली, दुर्गा, सरस्वती, चंडी आदि शक्ति देवता उदयोन्मुख झाल्या. सारांश असा की, मूळचे मातृशक्तीचे स्वरूप बदलत बदलत आजच्या देवी स्वरूपाप्रत प्राप्त झाले. अशाने यासंबंधी अधिक ऊहापोह पौराणिक देवता प्रकरणातील प्रास्ताविकमध्ये पहावयास मिळेल.

वाढत गेली तशी शेती व पाळीव जनावरे यांचा प्रसार वाढत गेला. तसेच पुरुषाचे व्यवहार वाढत गेले. प्रत्येकाचे ठायी देवतास्वरूप दिसू लागले. आदिशक्ति मातृशक्तीची कल्पना वाढत गेली. तिने गूढवाद आणि वेदांतात प्रवेश केला.

## भारतीय दृष्टिकोन हवा

पाश्चात्यांनी आपल्या देवतापुरते खूपच परिश्रम केलेले आढळतात. त्यांच्याकडून चिकित्सात्मक अनेक ग्रंथ तयार होत आहेत. त्यांनीही आदिशक्ति-तत्त्वाचा मूलार्थ आपल्या परीने पूर्णपणे केलेला आहे. पण मला असे प्रामाणिकपणे वाटते की, हे काम कोणा भारतीय विद्वानाचे आहे. पाश्चात्यांच्या आणि भारतीयांच्या आध्यात्मिक दृष्टिकोनात मूलत च खूप फरक असल्याने आपल्या श्रद्धेची वाढ होईल असा संशोधनात्मक ग्रंथ तयार व्हावयास पाहिजे त्या ग्रंथाची व्याप्ति आशियापुरतीच मर्यादित न राहता पाचही खंडे त्याने व्यापली पाहिजेत, आणि संक्षिप्त रूपाने माहिती एकत्रित केली गेली पाहिजे एखादी संशोधन संस्था अगर या विषयाबद्दल आपुलकी असणाऱ्या विद्वान् लेखकास ज्या दिवशी ही दृष्टि येईल तो सुदिन समजावयास हवा. वेदाचार्य श्री दा सातवळेकर मला म्हणाले "या विषयाची आबाळ झालेली आहे हे सत्य आहे."

## मध्यवर्ति कल्पना सर्वत्र एकच

पृथ्वीतलावरील सर्व वंशांच्या देवतांचा इतिहास चाळला, तर आपणांस असे दिसून येते की, देवतांची कल्पना सर्वत्र सारखीच होती. ल्हानसहान गोष्टींसाठी देवता मानल्या गेल्या आहेत, आणि त्यांच्या कृपेनेच मानवाचे बरे-वाईट होते अशी सर्वत्र समजूत आहे. शेतीचे रक्षण करण्यासाठी क्षेत्रदेवता, युद्धात जय मिळण्यासाठी युद्धदेवता, अग्नीने प्रसन्न व्हावे आणि सर्वांना सुखी ठेवावे म्हणून अग्निदेवता, चांगली फळेफुले मिळावीत म्हणून वनस्पतिदेवता, तसेच प्रेमदेवता, पृथ्वीदेवता, बुद्धिदेवता, विद्युद्देवता, जलदेवता, मेघगर्जना करणारी देवता, गर्भधारण व प्रसूती सुकर व्हावी म्हणून देवता, अर्भकांना वाढविणारी देवता, इ० इ० अनेक देवता उत्पन्न झाल्या. ही यादी आणखी खूपच वाढविता येईल. पण उदाहरणादाखल एवढी पुरेशी आहे. सर्वांना आश्चर्याचा धक्का देणारी गोष्ट इतकीच की, जगाच्या एवढ्या अवाढव्य पसाऱ्यात, निरनिराळ्या समाजांत सर्वत्र एकच कल्पना यावी आणि त्याप्रमाणे समस्वरूप देवता निर्माण व्हाव्यात हीच होय.

## देवमाता

दुसरी विशेष गोष्ट अशी की, प्रत्येक संस्कृतीमध्ये एक तरी देवता अशी आहे की, जिला सर्व देवांची माता मानली गेली आहे काही संस्कृतींमध्ये त्या

एकापेक्षा जास्त आहेत पाताळ, स्वर्ग, पृथ्वी, मेघ, पर्जन्य ही स्वरूपे सर्वत्र असून त्या प्रत्येकाला एक एक देवता मानली गेली आहे या ठिकाणी प्रामुख्याने लक्षात ठेवण्यासारखी घटना म्हणजे अतिप्राचीन काळी मानवांमध्ये दळणवळण वाढलेले नसताना, एका संस्कृतीची दुसऱ्याला माहिती असणे शक्य नसताना किंबहुना एकमेकांना ते अज्ञात असताना पंचमहाभूतात्मक कल्पना सर्वांना सारखीच यावी ही घटना मला वाटते आदिशक्तीच्या प्रेरणेशिवाय होणे असंभवनीय आहे. याच कारणास्तव आदिमायेची शक्ति अनादि व अवर्णनीय मानली गेली आहे

## पुराण ग्रंथ

भारतवर्षीयांचा प्राचीन इतिहास फार उज्ज्वल आहे पाश्चात्य लेखकांनी आपल्या संस्कृत धर्मग्रंथांची भराभर भाषांतरे गेल्या अर्ध शतकात केल्यानंतर सुदैवाने अनेक भारतीय विद्वानांनी या विषयात लक्ष घालून संशोधन चालविले आहे कित्येक प्रकाशकमंडळींनी जनतेच्या व भूतपूर्व राजेरजवाडे यांच्या सहाय्याने अनेक संस्कृत ग्रंथांची भाषांतरे करून, झीज सोसून व अतिशय कष्ट घेऊन ती मराठी जनतेस उपलब्ध करून दिली आहेत या त्यांच्या तळमळीबद्दल व पदरमोड करून केलेल्या कार्याबद्दल जनता सदैव ऋणीच राहील व त्यांना धन्यवाद देईल या भाषांतरित ग्रंथामुळेच बहुजनसमाज या विषयाकडे ओढला जात आहे पाश्चात्यांच्या इतपत जरी आपण ज्ञानलालसेच्या बाबतीत पायरी गाठली नसली तरी अनेक विषयांवरील आपली साधनसंपत्ति मात्र वाढत असल्याने मूळ इतिहास हळूहळू जनतेपुढे येत आहे आर्यांनी प्राणापलीकडे जपून ठेवलेले वेद पुराणाचे आपले धन, आज सर्व जगाला प्रकाश देत आहे वेद पुराणातील कथा या भाकडकथा नसून सत्यकथा आहेत असा अनुभव सर्वांना येऊ लागला आहे सहस्रावधी वर्षांचा काळ लोटला असल्याने त्यांच्या निवेदनात काही सौम्य दोष शिरले असतील ही गोष्ट वेगळी

या संबंधात आपण एकच उदाहरण पाहू मत्स्यपुराणात अध्याय १२३ मध्ये सूर्याची गति दोन घटकेला एकलक्ष एक्याऐंशी हजार योजने अशी दिली आहे ( श्लो ४१ ) कोणत्या वेळी सूर्य कोणत्या द्वीपात असतो व पुढे कोठे भ्रमण करतो याचेही वर्णन मिळते मेरू पर्वतावर सूर्य अस्तास गेल्यावर पृथ्वी गोलाच्या रेखाशाखाली सागराच्या उदकात तो किती बुडतो याचे प्रमाण दिले आहे मेरूपर्वत सर्व द्वीपाच्या उत्तरेस आहे लोकालोक पर्वत दक्षिणेस आहे विषुववृत्ताचे मंडळ ३,२१००० योजने लांब आहे चंद्राच्या निभावरी नगरीत मध्यरात्र होते तेव्हा इंद्रपुरीत सूर्यास्त होतो उषानामक वरुणाचे नगरीत जेव्हा सूर्य

मध्यान्हीस येतो तेव्हा विभावरी नगरीत सूर्योदय होतो (श्लो. २९). इत्यादि माहिती दिली आहे. तसेच सप्तद्वीपांची नांवे दिली असून त्या प्रत्येकाची लांबी-रुंदी, पर्वत, त्यांचे रंग, त्यावरील प्रमुख वनस्पती त्यांची नावे व तेथील नद्यांची नावे इ० प्रत्यक्ष पाहिल्याप्रमाणे वर्णने आढळतात.

हरिवंशात उत्तरार्धाच्या प्रस्तावनेत या द्वीपासंबंधी पाश्चिमात्यांची काही मते दिली आहेत व ही द्वीपे कोठे असावीत याचे दिग्दर्शन केले आहे. लो० टिळकांनी दिवस, महिना, वर्ष, नक्षत्रे व सूर्याची गति या सर्वांचे सूक्ष्म गणिताने असे प्रमाण काढले आहे की, क्रांतिवृत्तावर एका नक्षत्रास पूर्ण फेरी करण्यास सुमारे २७ लक्ष वर्षे लागतात. आजचे क्रांतिवृत्त व विषुववृत्त यावरील संपातबिंदू लक्षात घेता युग अगर त्यालगतचा काळ म्हणजे सुमारे ६००० हजार वर्षा-पूर्वीचा असावा असे त्यांचे मत आहे.

पुणे येथील पं. विद्यानिधी सिद्धेश्वरशास्त्री चित्राव यांनी इ. स. १९३२ साली 'भारतवर्षीय प्राचीन चरित्र कोश' या नावाचा ग्रंथ प्रसिद्ध केला आहे. त्यातील परिशिष्टात सप्तद्वीपांचा संपूर्ण ऊहापोह केलेला आहे. त्यांनी द्वीपांची भौगोलिक परिस्थिति वरील मत्स्यपुराणातील माहितीच्या आधारे काही निष्कर्ष काढून त्यावरून ठरविली किंवा कसे हे समजण्यास मार्ग नाही. पण त्यातील माहितीवरून एवढे मात्र नक्की म्हणता येईल की, आर्यांची जंबुद्वीपादि सप्तद्वीपे म्हणजे अर्वाचीन पाचही खंडाचा समावेश त्यामध्ये झालेला आहे. आशिया, आफ्रिका, युरोप व अमेरिका ही खंडे त्यात येतात. श्वेतद्वीप म्हणजे उत्तर-दक्षिण अमेरिका होय. तसेच पौराणिक पर्वतांची अर्वाचीन नावे, नद्यांची अर्वाचीन नावे वगैरे सर्वांचे संशोधन करून तक्ता जोडलेला आहे. तो भाग संपूर्णपणे येथे देता येणे अशक्य आहे. जिज्ञासूंनी तो मूळ ग्रंथातून पहावा. या संशोधनावरून एवढे निश्चित होते की, पुराणातील वर्णने काल्पनिक नसून त्या वेळच्या तुटपुंज्या साधनसामग्रीमध्ये सुद्धा संपूर्ण भौगोलिक स्थळांची निदर्शक आहेत. पुराणकारांचे ज्ञान किती प्रगल्भ व सत्य परिस्थितीवर आधारलेले होते, याची साक्ष पटविणारे आहे.

## पाश्चिमात्यांची मते

भारतीयांचे वेदग्रंथ हे जगातील कोणत्याही धर्मग्रंथापेक्षा जुने आहेत, काहींच्या मते अपौरुषेय अनादि आहेत. ते सत्य परिस्थितीवर आधारलेले असल्याने ते आजवर अग्रभागी तळपत आहेत. आर्यधर्म व त्याची सामाजिक घडण ही अत्यंत प्राचीन आहे, याबद्दल कोणाचेच दुमत नाही. अशा सामाजिक घडणीतून त्यांच्या अतीव भक्तिभावामुळे आणि प्रतिभासपन्नतेमुळे जेव्हा देव-देवतांची निर्मिती झालेली आपण पाहतो, तेव्हा काही अर्वाचीन विद्वानांना

अतिशय आश्चर्य वाटते. परंतु भारतातील जे लोक अद्यापही भक्तिभावाने त्या जुन्या देवतांची पूजाअर्चा करतात, आणि ज्यांचे आचार, विचार व चालीरीती आजवरच्या नियमांनी बद्ध आहेत, त्या कोणालाही प्रगत समजल्या जाणाऱ्या जगाच्या धर्मपथापेक्षा कणभर सरसच समजले जातात हे निश्चित आहे.

लॉर्ड मेकॉले एका ठिकाणी म्हणाले,

"The Brahminical Mythology is so absurd, that it necessarily debases every mind that receives it as truth"

ब्रिटिश अमल सुरू झाल्याबरोबर घाईघाईने उच्चारलेले हे मत त्या वेळी येथील हिंदुधर्मीयांना बदनाम करण्यासाठी दिलेले असावे, परिपक्व असे म्हणता येणार नाही. कारण त्यानंतरच्या पाश्चात्यांची मते वरील मताच्या अगदी विरुद्ध आहेत.

रे० मार्टिनसाहेब म्हणतात,

"We consider it extremely difficult for the most sympathetic and learned European scholar to understand the mental position of the devout Hindu, who implicitly believes the wildest and most contradictory myths, and worships with utter abandon at the shrine of some strange conception of diety And if a Hindu is 'not made but born' and the inwardness of his religions ideals is not easily understood by our best Western scholars, how then are they ( European scholars ) capable of guiding us to the correct moral value of Hindu mythology?

( Martin, P 310 )

अध्यात्मिक अधिष्ठान

पाश्चात्यांच्या दृष्टिकोनातून जरी एकवेळ आपण पुराणग्रंथांकडे पाहिले तरी त्यांमध्ये पुष्कळ शिकण्यासारखे आहे हेच सिद्ध होते. आर्यांचे अध्यात्मिक अधिष्ठान हे पाश्चात्यांच्या दैनंदिन भौतिक कल्पनेपेक्षा खूपच श्रेष्ठ दर्जाचे आहे, हे तर सर्वांना कबूलच केले पाहिजे. भारतीयांच्या या धर्मश्रद्धेबद्दल पाश्चात्य-शिक्षणाच्या अर्धवटकुडाने पिवळे झालेल्या व्यक्तींना, अगर त्या संस्कृतीच्या बाह्य दिखाऊ वर्तनाने अवश्रद्ध झालेल्या अनुगामिन्यांना जे काय वाटावयाचे ते खुशाल वाटो. पण पंढरपूरच्या आषाढी-कार्तिकीच्या वारीत अगर कुंभमेळ्याच्या ठिकाणी लाखो भक्तजन एकत्र येऊन अनेक कष्ट सोसून अन्नपाण्याविना दोनदोन तीन तीन दिवस उपवास काढून जेव्हा भक्तिभावाने आजवागायत हजारो वर्षे दर्शन

घेत आहेत, तेव्हा भारतीय संस्कृति अमर आहे हेच सिद्ध होते. या विषयाकडे पाहण्याची अनेकांची दृष्टि अधु आहे त्याला कोण काय करणार ! माझ्या पाहण्यात एकदोन हजार मासिक तनखा घेणारे वृद्ध गृहस्थ आहेत. धर्मावर श्रद्धा नाही असे लोकांना दाखवितात. गावातच मंदिरात हजारो माणसे उत्सवप्रसंगी एकत्रित येतात. पण या गृहस्थांना नेहमी शका असी— वर्गणी जमा करून जी धार्मिक कार्ये मंदिरात होतात त्याला मदळी जमते की नाही ! तपासाअंती समजले की, गावात पाचदहा वर्षे राहूनही मंदिर कोठे आहे याचाही त्या गृहस्थाना पत्ता नाही. अशा गृहस्थांनी धार्मिक कार्यावर केलेल्या टीकेला किती किंमत द्यावयाची ते जिज्ञासू वाचकांनीच ठरवावे.

## पुराणांचे मूल्यमापन

ब्रिटिश तत्त्ववेत्ता रस्कीन याने भारतीय पुराणांचे मूल्यमापन करताना काही सिद्धांत ठरवून दिले आहेत. ( अ ) सूर्य, आकाश, मेघ, सागर, अगर याच पंक्तीमध्ये बसणारी दुसरी शाश्वत मूल्ये सृष्टीचे अस्तित्व व्यतीत करणारी ज्यात वर्णिली आहेत असे ग्रंथ; ( आ ) लहान मूल ज्याप्रमाणे आपल्या बहिणी-बरोबर हसतखेळत विश्वासाने चालत जाते. त्याप्रमाणे व्यक्तिशः अवतार अगर रूप धारण करून मानवाचा खरा व विश्वासाई सोबती बनणे आणि या व्यक्त स्वरूपात दृग्गोचर झालेले नैतिक महत्त्वाचे आविष्करण ज्यामध्ये झाले आहे असे ग्रंथ; ( इ ) वरुण, इंद्र, सूर्यादि देव हे सृष्टीचे मूलतः अस्तित्व दर्शविणारे आहेत. त्यांनी व्यक्त स्वरूपात अनेक रूपे घेतली आहेत. मानवांनी अनेक वेळा मदतीसाठी त्याना पाचारण केले आहे, आणि ती मदत त्यांना मिळाली आहे, असा सूनांचा अनुभव आहे. संकटप्रसंगी अशी मदत मिळाल्याने त्याचे नैतिक महत्त्व वाढलेले असून लोकसमाजाच्या वागणुकीवर त्यांचे विभूतिमत्त्व उमटलेले स्पष्टपणे दिसते. याच गुणामुळे पुराणाचे महत्त्व त्यालाही पटलेले आहे. ब्रह्मा, विष्णु, शंकर या त्रिमूर्तीचे तत्त्व म्हणजे सृष्टीच्या मूलतत्त्वाप्रमाणे असल्याने आजवर सहस्त्रावधि वर्षे अद्याप टिकून आहे. उत्पत्ति, स्थिति आणि लय हे त्याचे कार्य अव्याहतपणे चालू आहे. त्याच्या या कार्यांचे ज्यात वर्णन आहे ते पुराणग्रंथही टिकून आहेत.

## गीता गौरव

आर्यधर्माचे महत्त्व ज्यांना समजले आणि ज्यांच्या हृदयपटलावर बिंबले असे अनेक आर्येतर विद्वान आहेत. त्यापैकी ब्रुकसाहेब भारतीयांच्या गीता ग्रंथाबद्दल काय लिहितात ते पाहण्यासारखे आहे. ते म्हणतात, भगवद्गीता हे भारतीयांचेच नव्हे तर अखिल जगताचे भावी धर्मपुस्तक आहे. मानवजातीची ती एक देणगी

आहे. पण ही देणगी आता भारताच्या हातून सुटली आणि दुसऱ्यांच्या हाती लागली आहे. आता भारतीयांनी एवढे तरी करावे की, ज्या पाश्चात्याना ते म्लेंच्छ अगर रानटी म्हणून आजवर हिणवीत आले त्यांनी ऋषिप्रणीत योगविद्येचा अभ्यास करून व प्रत्यक्ष आचरणात आणून भारतीयां पुढे ते आघाडी न मारोत, एवढी तरी बाजू त्यानी ( भारतीयानी ) सभाळावी भगवद्गीतेचे खरें मर्म समजणे व त्याप्रमाणे चालणे म्हणजे थट्टा नव्हे त्याला अगी प्रभुत्व लागते लुग्यासुग्या आणि लेच्यापेच्याचे ते काम नव्हे लोकसेवा करण्याची अगात ताकत लागते. यापेक्षा आपल्या पुराण ग्रथाची महती अधिक कोण वर्णन करू शकेल ? निधर्मी म्हणून भिरवणाऱ्या लोकाचा कितीही कडकट हल्ला वेद, पुराणग्रथावर होवो तरी सतशिरोमणि कबीराच्या दोहऱ्याप्रमाणे " हाथी चाल चलते है अपनी " ही धिम्मेपणाने इतराच्या भुकण्याकडे लक्ष न देता पुढेच जात राहणार.

भारतीयाच्या पुराणग्रथाबद्दल लॉर्ड मेकॉले याचे मत वर दिले आहे. पाश्चात्याचे अनुकरण करणारे व छिद्रान्वेषीपणाने सशोधन करणारे अलीकडे भारतामध्ये काही विद्वान निघाले आहेत आजवरची सर्वांची अशी समजूत आहे की भगवान व्यासानी अठरा पुराणे, अठरा उपपुराणे, चार वेद इ ग्रथ केले, परतु श्री गो. ना. दातार पद्मपुराणाच्या मराठी भाषांतराच्या प्रस्तावनेत म्हणतात, ' सर्व पुराणे एकाच व्यासाने लिहिलेली नाहीत व्यास ही पूर्वी एक सज्ञा होती. पुराणे सागणारा ज्याप्रमाणे सूत या नावाने ओळखला जातो त्याप्रमाणे व्यास ही सज्ञा होती '

अतीतास्तु तथा व्यासा सप्तविंशतिरेव च ।
पुराणसंहितास्तैस्तु कथितास्तु युगे युगे ॥

( देवी भागवत, स्कध १, अ. ३, श्लो २४ )

सारांश असा की, चालू मन्वतरामध्ये सत्तावीस व्यास होऊन गेले.* व्यासांनी प्रत्येक युगात पुराणसंहिता सांगितल्या आहेत यावरून असे अनुमान काढण्यास हरकत नाही की सर्व पुराणे एकाच वेळी रचलेली नाहीत व एकाच व्यासानेही रचलेली नाहीत पुराणरचनेचे कार्य वेदकालापासून आजतागायत चालूच आहे एका पुराणातील शेकडो श्लोक दुसऱ्या पुराणात जसेच्या तसे आढळतात

---

* प्रथम व्यास प्रजापति द्वापार युगामध्ये. नतर झाले उशना, बृहस्पति, सविता, मृत्यु, मघवा, वसिष्ठ, सारस्वत, त्रिवृष, भारद्वाज, अतरिक्ष, धर्मा, त्रय्यारुण, धनजय, मेधातिथी, वृति, अत्रि, गौतम, उत्तम, हर्यात्मा, आजश्रवाश्व, सोम, उत्त्यायन, तृणबिंदु व कृष्णद्वैपायन. ( देवीभागवत )

पद्मपुराणात पहिल्या खंडात मत्स्यपुराणातील सुमारे शभर श्लोक आले आहेत. याखंधी दातार म्हणतात, 'सुमारे ८०० वर्षापूर्वी काही विद्वान मंडळींनी एकत्र जमून पुराणग्रंथाची श्लोकसंख्या ठरविली व कमी पडेल तेथे पूर्वीच्या मूळच्या श्लोकांत भर घालून आजची श्लोकसंख्या घालून दिली.' परंतु यांचे खंडन धर्ममार्तंड वा. वा. लेले ( वाई ) यांनी केले असून अर्वाचीन काळी पुराणात कोणताही फरक केलेला नाही, याची ते ग्वाही देतात. मतामतांचा गलबला येथे देऊन जागा अडविण्याचे कारण नाही. पण साधारणपणे भारतीय पुराणासंबंधी भारतीय व पाश्चात्यांची मते कशा प्रकारची आहेत याचे थोडक्यात दिग्दर्शन व्हावे आणि पुराणांचे श्रेष्ठत्व कळून यावे याच हेतूने थोडासा अल्पमतीप्रमाणे ऊहापोह केला आहे.

याला आणखीही एक कारण आहे की, प्राचीन भारतीय कालीन समाजातील पातिव्रत्य, गुरुसेवा, ईश्वरभक्ति, अथितीस्वागत, वचनपरिपालन इ० इ० काही नैतिक मूल्ये भावी समाजात रूढ करण्यासाठी, पौराणिक कथांची रचना झाली. या कथांमध्ये सामान्य जनांची मनाची पकड घेण्यासाठी, थोडी फार अतिशयोक्ति, अद्‌भूतता व ईश्वरी सामर्थ्याचे दर्शन मुद्दामच अंतर्भूत केलेले असावे, आणि त्यामागे नैतिक मूल्ये समाजात दृढ करण्याचे कार्य, पौराणिक कथांनी केलेले आहे, ही गोष्ट सत्य आहे. पाश्चिमात्य अगर पौर्वात्य देशामध्येही वाङ्मयाचा हा प्रकार आहे, त्याना ते 'मिथ अथवा लिजंड' नावाने संबोधतात. लिजंडमधील कथानकांना काही आधार असतो, पण मिथमध्ये तसा असत नाही. त्या गोष्टी केवळ दंतकथेच्या आधारावर अधिष्ठित असतात. असा जरी फरक असला, तरी दोन्ही कथांचा मूळ हेतु धार्मिक भावनांची वाढ व्हावी, नैतिक मूल्ये वाढावीत हाच असल्याने, त्या एकच गोविल्या जातात. शिवाय विशेष महत्त्वाचे म्हणजे दंतकथाही मंदिर स्थानाबद्दल भक्तांची श्रद्धा वाढवितात आणि आकर्षक होतात, पूरक ठरतात या दृष्टीकोनातून विचार केल्यास देवतासंबंधीच्या दंतकथाही देवाचे श्रेष्ठत्व वाढविण्यास उपकारकच ठरतात, यात मतभेद नसावा.

ग्रीक पुराण कथा

ग्रीक संस्कृति ही फार प्राचीन मानली जाते आणि त्याच्या पुराण कथांची तुलना अनेक वेळा भारतीय पुराणकथांबरोबर केली जाते. तौलनिक दृष्टया अभ्यास केला तर अनेक कल्पनांमध्ये साम्य आढळते ही गोष्ट सत्य आहे. पण भारतीय संस्कृतीबरोबर तुलना केल्यास जमीनअस्मानाचे अंतर आढळून येईल. थोडक्यात सांगावयाचे तर असे म्हणता येईल की, सांप्रतच्या युगात दोन्ही संस्कृतीमध्ये जे

दृश्य दिसते तसाच प्रकार पुराणातील देवतासंबंधीतही आढळून येतो जी एक विशिष्ट ठेवण आणि वागणुकीतील उच्चतम भाव भारतामध्ये आढळतो, तो इतरत्र आढळत नाही इतर समाज ज्याप्रमाणे भारतीय संस्कृतीकडे आकर्षिले जातात, देवताच्या कार्याकडे एका विशिष्ट दृष्टिकोनातून पाहतात, त्या गोष्टीचा ग्रीक कथातून अभाव दिसून येतो.

ट्रोजनचे युद्ध हे खिस्ताब्द ११९० वर्षांपूर्वी झाले. रोम शहर सातवे शतकात उदयास आले. यावरून असे अनुमान करण्यास हरकत नसावी की, या देवतांचा काल खिस्तपूर्व १५ शतकापूर्वीचा नसावा भारतीय देवता त्यामानाने प्राचीन ठरतात झेउस हा त्यांचा प्रथमदेव भारतीय ब्रह्मदेवाप्रमाणे आहे झेउस पोसेडन आणि पाताळदेवता हेडिस हे तीन भाऊ असून, त्यांचीच प्रजा म्हणजे इतर देव देवता होत भक्ताच्या रक्षणासाठी अथवा दुष्टाच्या निर्दालनासाठी देवतांचे जन्म झालेले नसून प्रेमसंबंधातून त्यांची उत्पत्ति आढळते सर्वशक्तिमान म्हणून झेउसची योजना आहे पण तो इतका विषयलंपट आणि कामुक आहे की, कोणत्याही स्त्री देवतेबरोबर त्याचे प्रियाराधन झाले नाही असे नाही. आपली इच्छा पूर्ण करून घेण्यास, अनेक रूपे घेणे, निरनिराळे मार्ग योजणे व फसवणूक करण्यास तो कचरत नाही स्त्री देवतांचे स्वभावचित्रण मानवी स्त्री स्वभावानुरूप झालेले दिसते, त्यामध्ये उच्चभाव नाही दोन देवतांनी भांडणे, सवती मत्सर करणे, पतीवर पाळत ठेवणे, आणि सवतीचा काटा काढणे या गोष्टी देवता करतात. या पुराणात एक विशेष दिसून येतो तो असा की, जन्मत च मुले टाकून दिली जातात, त्यांचे पोषण पशुपक्ष्यांकडून होते, आणि नंतर त्यांना देवपण प्राप्त होते तसेच अनेक वेळा उपजण्यापूर्वी गर्भ गिळून टाकणे आणि नंतर मस्तक अगर शरीरातील कोणत्यातरी भागातून मुलांची उत्पत्ती होणे, असेही प्रकार दिसून येतात देवस्त्रियांना निरनिराळ्या पतींकडे राहण्यासाठी मुदत घालून देणे, आणि एकापेक्षा अनेकांबरोबर संबंध असणे हा ग्रीक जीवनातील प्रकार, देवतांचे माथी मारण्यात आलेला असावा सारांशाने म्हणावयाचे तर म्हणता येईल की, भारतीय देवतांप्रमाणे भक्तपरिपालन, उच्चतर नीतीतत्त्वे, स्पृहणीय वर्तणूक नसल्यामुळे आणि वैषयिक विकास अधिक असल्याने त्यांच्या ठिकाणी उत्कट प्रेमभावना व आदर वाढीस लागण्याचा संभव कमीच आहे

## देवतांचे वर्गीकरण

एका पाश्चात्य ग्रंथकाराने देवतांचे वर्गीकरण करणारा आलेख आपल्या ग्रंथामध्ये घातला आहे. एका मोठ्या वर्तुळाचे दोन समान भाग केल्यावर

वरचा उत्तरेकडील भाग आध्यात्मिक व दक्षिणेकडील भाग नाशात्मक दाखविला आहे. या वर्तुळात दोन काड्या काटकोनात ठेविल्या तर त्याची दोन टोके वरच्या भागात व दोन टोके खालच्या भागात त्रिज्येला टेकून राहतील. क्रमाने त्रिज्येपासून या टोकांना अ ब क ड अशी नांवे देऊन प्रत्येक टोकाजवळ देवीचे कोणते स्वरूप आपणास दिसेल आणि त्या वर्गात कोणत्या देवता वसतात याची नांवे दिलेली आहेत. ( अ ) विकास-विस्तार कार्य. वनस्पति संवर्धनातील गूढवाद, जन्म, पुनर्जन्म या टोकाचे कार्य होय. त्यामध्ये इसिस्, डिमिटीर, आर्टेमिस ( ग्रीक ), इस्टर ( बॅबीलोन ), क्वायिन ( बुद्ध ), शेकिन्हा ( ज्यू ), मेरिया ( इसाइ ) या पाश्चात्य देवता आणि पार्वती, उमा, लक्ष्मी, गौरी, शाकंभरी इ० भारतीय देवता मोडतात.

( ब ) स्फूर्ती, चेतना, शहाणपण, दूरदृष्टि परमानंद, भावनांचे उदात्तीकरण इत्यादि कार्य मानले जाते. यांमध्ये मेरी, सोफिया, म्यूझ, अथेनी, आर्टेमिस, कोरे या पाश्चिमात्य आणि सरस्वती, तुळजाभवानी, भुवना, अंबा, कमला, श्रीवरदायिनी इ० भारतीय देवता मोडतात.

( क ) मरणपूर्वकाळचा गूढवाद, आजारीपणा, गुप्तपणा, मरण, लय, इत्यादिप्रत नेणारे सर्वभक्षण हे कार्य या ठिकाणी होते. यामध्ये हेकाटी, गार्गेन, इसिस, आर्टेमिस् इस्टर या देवतांमधील भयानकपणाची तेवढी बाजू मोडते. भारतीय देवी चामुंडा, दुर्गा, काली, ललिता, हिंगुळजा या देवता होत.

( ड ) कैफी माणसाचे गूढवर्तन, वेडेपणा, दुबळेपणाची गुंगी, परमानंद, फसवा व पापीमार्गाकडे नेणारा वर्ग हा भाग येतो. यामध्ये अष्टार्ट, अफ्रोदिता, आर्टेमिस, लिलिथ, कोरेमी, मिडिया आणि भारतीय बगला, मातंगी, छिन्नमस्ता, धूमावती इत्यादि देवतांचा समावेश होतो.

देवतांमध्येसुद्धा चांगलेवाईट करणाऱ्या देवता आहेत. हे वरील विवेचनावरून वाचकांच्या ध्यानी येण्यास मदत होईल.

वरील वर्गीकरणाचे तत्त्व अनुसरून भारतीय देवतांचेही कालमानाप्रमाणे वर्गीकरण करता येईल. याचे प्रामुख्याने तीन काळ पडतील.

( १ ) वैदिक काळातील देवता— आर्यलोक जेव्हा प्रथम उत्तर भारतात आले तेव्हा त्यांनी आपल्याबरोबर ज्या देवता आणल्या त्यामध्ये वरुण, मरुत, पूषा, द्यौ, पितर, अग्नि, सूर्य, चंद्र, सोम, यम, अश्विनौ इ० समावेश होतो. त्यांचे पूजन ते करीत असत. पण कालांतराने आणि संस्कृतिमिश्रणाने अधिक कर्तृत्ववान् देव प्रचारात आल्याने क्रमाक्रमाने या देवतांचे दररोजच्या पूजनातून

उच्चाटन झालेले आढळून येते. अग्नि हा फक्त यज्ञकर्मात आणि सूर्य हा प्रखर तेज देणारा म्हणून टिकून राहिले.

( २ ) पौराणिक काळातील देवता– आर्यलोक स्थायी झाल्यावर ज्या देवताना त्यानी रोजच्या पूजनात आणले ते देव ब्रह्मा, विष्णु, मत्स्यापासून बौद्धापर्यंत सर्व अवतारी देवता, जगन्नाथ, कामदेव, चैतन्य, शिव, उमा, दुर्गा, गणेश, कार्तिकेय अयनार आदि देवता होत. अर्वाचीन काळांतही बहुतेक सर्व देवता पूजनात आहेत पण सामान्यतः उच्चवर्णीयाचा या देवताकडे अधिक ओढा आहे. इतराचा त्यामानाने कमी.

( ३ ) आधुनिक काळातील देवता–कमी प्रतीच्या देवता यक्ष, गंधर्व, नदी देवता, गाय, गुरु, हनुमान, तुळशी, वड, सती, षष्ठी, शीतला, मनसा, साधुपुरुष, नारद, दक्ष, भृगु, अगस्ति आदि ऋषि, मान्यवर पूर्वज, पितर व ग्रामदेवता, याचा समावेश होतो या देवताचे पूजन भारतामधील सर्वसाधारण जनता करते असे म्हणण्यास प्रत्यवाय नसावा. यातील काही देवताकडे गाय, ऋषि, जलदेवता, इ० उच्चवर्णीयही जास्त लक्ष देणारे आहेत, तर शीतला, मनसा, मरीआई इ० कडे फक्त कनिष्ठवर्गच लक्ष पुरवितो, आणि त्या वर्गात त्या लोकप्रिय आहेत.

याचा सारांश असा घेता येईल की, कालमानाप्रमाणे देवतांचे स्वरूप बदलत आहे गरजेप्रमाणे नवीन देवता आल्यावर साहजिकच जुन्याकडे दुर्लक्ष होते साधुसंतामध्ये ज्ञानेश्वर, तुकाराम एक वेळ गाजून राहिले, तर आज शिरडीचे साईबाबा, मेहेरबाबाआदि संताचे पूजनाला भर आला आहे रामकृष्णादींची पूजा मागे पडून बौद्ध, गांधीजी, लोकमान्य टिळक, आंबेडकर यांचे व्यक्तिमत्त्व वाढलेले दिसत आहे हा कालमहिमा आहे नवीन स्वरूपाची ओढ आहे इतकेच.

मूळचे स्थान भूमीत गाडले होते. पण पधराव्या शतकात विश्वविद्यांच्या युद्धात प्रचीती आल्यावर त्याने ते उकरून काढून पुन्हा बांधले. मुसलमान राजवटीत मूर्तिभजनाच्या काळात मुंबई येथील महालक्ष्मीने समुद्रात खाडीत उड्या घेतल्या. नतर बंधाऱ्याचे काम चालू असता रामजी प्रभू इंजिनिअरला दृष्टांत देऊन जाळ्यातून वर आल्या, आणि आपण पहात असलेले आजचे महालक्ष्मीचे मंदिर तयार झाले. चाफळ येथे समर्थांनी प्रथम देवालय बांधले आणि मूर्तीची मार्गप्रतीक्षा करीत असता अगणापुरच्या डोहांतून आवाज आला की, "आम्ही येथे आहोत. वर काढून घे " अशी अनेक मालिका सांगता येईल. उदाहरणे म्हणून काही नमुने वर दिले आदिशक्तीच्या अभ्यासकांनी हा मुद्दा जरूर ध्यानात धरण्यासारखा आहे. कोणास शका येईल की, असे दृष्टांत शक्य आहेत काय ? मी एवढेच स्वानुभवावरून म्हणू शकेन की, आजच्या विसाव्या शतकातही हे घडते. मग ज्या सत्पुरुषांची त्या विषयात तन्मयता झालेली होती, त्याना ते घडले नसतील, ही शकाच व्यर्थ आहे

शक्तितत्त्व

या निवेदनाच्या शीर्षभागी जो उतारा दिला आहे, तो ब्रह्मवैवर्त पुराणातील आहे. श्रीकृष्ण स्वत सांगतात, निर्गुणस्वरूप देवी, प्राणिमात्रांवर दया करून सगुणरूपात अवतरते. ब्रह्मा, विष्णु , महेश स्वरूपात उत्पत्ति, स्थिति व सहार ही कार्ये करते तीच विश्वजननी मूळ प्रकृति ईश्वरी सर्व सृष्टीच्या उत्पत्ति समयी आद्यशक्तीच्या स्वरूपात विराजमान असते व सर्व काही तीच आहे असा सारांश आहे. ब्रह्मरूप चेतनाशक्तीचे सामान्यत दोन प्रकार आहेत एक सगुण व दुसरा निर्गुण सगुण प्रकारात पुन्हा दोन उपप्रकार आहेत, निराकार व साकार. या स्वरूपांचा शोध घ्यावयाचा तर क्रमाक्रमाने घ्यावा लागतो. प्रथम साकाररूप आत्मसात् झाल्यावर मग मानव निराकाराकडे वळू शकतो त्या पायरीवर अभ्यास पूर्ण झाला आणि निराकाररूप आत्मसात झाल्यावर नतरच तो निर्गुणाकडे वळू शकतो. एकदम कोणालाही ही पायरी गाठता यावयाची नाही या पायरीवरचा त्याचा अभ्यास पूर्ण झाल्यावर मग 'ब्रह्मानदीं लागली टाळी। कोण देहातें सांभाळी ॥ ' ही स्थिति प्राप्त होते याला च पराशक्ति असे सबोधिले जाते

"तस्या एव ब्रह्मा अजीजनत् । विष्णुरजीजनत् । रुद्रोऽजीजनत् । सर्वे मरुद्गणा अजीजनन् । गधर्वा अप्सरा किन्नरा अजीजनन् । भोग्यमजीजनत् । अडज स्वेदजमुद्भिज्ज जरायुज स्थावर जगम मनुष्या अजीजनन् । सैषा पराशक्ति ॥"
( बृहदारण्यकोपनिषद् )

या परा शक्तीपर्यंत मनुष्य पोचला म्हणजे त्याची काय स्थिति असते याचें उत्कृष्ट वर्णन आपल्याला वरील उपनिषदामध्ये पदोपदीं छापलेल. चित् जगतांत चिच्छक्ति ही पराशक्ति, जीवशक्ति ही अपराशक्ति, आणि मायाशक्ति ही अधमशक्ति गणली जाते. विष्णुपुराण म्हणते,

विष्णुशक्ति परा प्रोक्ता क्षेत्रज्ञाख्या तथाऽपरा।
अविद्या कर्मसंज्ञाऽन्या तृतीया शक्तिरिष्यते ॥

भगवान् विष्णूची स्वरूपशक्ति, ही पराशक्ति, क्षेत्रज्ञ (जीव) ही अपरा या व्यतिरिक्त कर्म नांवाची अविद्या-माया ही तिसरी शक्ति आहे.

शेवटी गीतेमधील एक श्लोक पाहून हे शक्तिरहस्य स्वरूप आटोपते घेतो

मयाऽध्यक्षेण प्रकृतिः सूयते सचराचरम्।
हेतुनानेन कौंतेय जगद्विपरिवर्तते ॥ (अ० ९-१०)

श्रीभगवान् म्हणतात—मी अध्यक्ष राहून प्रकृतीकडून (शक्तीकडून) सर्व चराचर सृष्टि प्रसवितो. जगाची घडामोड, उत्पत्ति, स्थिति, लय हा सर्व व्यवहार याच प्रकारामुळे चाललेला आहे. माझें हे परमस्वरूप फार विरळ, मनुष्य देह धारण केल्यावर रूपाची स्तुति भक्ति करणारे अनेक, परंतु ते मूज्ञ नसून मूढ म्हटले पाहिजेत. सगुणस्वरूप त्यांना निर्गुण स्वरूपाप्रत नेण्यास कारणीभूत होते. म्हणून ते उपयोगी मानले आहे इतकेंच.

## उत्खननें व देवतास्वरूप

शक्तिपूजा ही भारतांत आणि इतर देशांत फार प्राचीन काळापासून चालत आलेली आहे. याची साक्ष ज्याप्रमाणे कथा, पुराणे देतात त्याचप्रमाणे आजवर जनेक ठिकाणी झालेलीं उत्खननेंही देतात. तेव्हां त्या उत्खननाची चर्चा थोडक्यांत करणे या ठिकाणी अप्रस्तुत होणार नाही असे वाटते. शिवाय ते विषयाला धरूनच होईल हरप्पा, महेंजोदरो, रायर या दोन तीन ठिकाणचेच अवशेष पाहणे आहे.

पंजाब प्रांतांत रावीनदीच्या काठी हरप्पा हे शहर वसलेले होते. नदीच्या बदलत्या प्रवाहामुळे ते गाळाखाली ४० फूट खोल गडप झाले महेंजोदरो हे दुसरे शहर हरप्पा शहराच्या दक्षिणेला सुमारे ४०० मैल अंतरावर सिंधप्रांतांत असून सिंधूच्या प्रवाहापलीकडे सुमारे शंभर मैल पश्चिमेकडे होते तरीही नदीच्या गाळाखाली गडप झाले. याचा अर्थ असा की, सिंधुपात्र एवढ्या कालमानात शंभर मैल पूर्वेकडे सरकले पण असल्या अचाट बदलाचाही कालांतराने मानवाला

विसर पडतो, हे आश्चर्य नव्हे काय ? इ. स. १९२२ सालापासून या दोन्ही ठिकाणीं भारतसरकारतर्फे उत्खनन झाले. तेथे मिळालेल्या अवशेषावरून त्या वेळची लोकवस्ती आणि संस्कृति दोन्ही एकच होत्या असे प्रसिद्ध झाले आहे. त्या संस्कृतीला सिंधु खोरे संस्कृति असे म्हणतात. उत्तरेला अंबाला आणि दक्षिणेस लोथल, काठेवाडपर्यंत ती पसरली होती.

अवशेषाचा सारांश असा की, भाजलेल्या विटाच्या भव्य इमारती १६८'X १३४', सार्वजनिक स्नानगृह १०८' X १०८' आणि त्यामध्ये ४०' X २४' पोहण्यासाठी तळे होते. रेखीव सार्वजनिक रस्ते तीस फूट रुंदीचे, दोन घराच्या मध्ये लहान लहान बोळ, रस्त्याच्या चौकात मोठमोठी विश्रांतीस्थाने, रस्त्याच्या दोन्ही बाजूस सांडपाणी जाण्यास गटारे, तसेच रस्त्याच्या मध्यभागी उत्तवस्यावरून जाणारे व विटानी बांधलेले गटार, घरांना चुन्याचा गिलावा, विहिरीमधून तळ्यामध्ये शुद्धपाणी घेण्यासाठी नळाची व्यवस्था, अशुद्ध पाण्याचा दुसऱ्या नळाने निचरा होण्याची व्यवस्था, इत्यादि आजच्या आधुनिक पद्धतीप्रमाणे सर्व सुखसोयी होत्या. उत्खननात मिळालेले अवशेष असे की, नाणी, मुद्रा, मातीची चित्रे, पृथ्वीदेवीची रूपके, अलंकार, आयुधे, पुतळे, पशुपक्ष्यांची चित्रे, लिंगाकृती शिवलिंगे, मणि, बोटातील आंगठ्याचे ठसे, इ० इ० अनेक साहित्य उपलब्ध झाले असून त्या वेळची समाजस्थिति, देवदेवता याचे संशोधन करण्यास उपयुक्त ठरणारी आहे.

देवतासंबंधीचे स्वरूप समजून घेण्यास विपुल माहिती उपलब्ध झालेली आहे. एका मातीच्या पुतळीच्या अंगावर भरपूर अलंकार, डोक्यावर पंख्याच्या आकाराचा मुकूट व त्याच्या दोन्ही बाजूला धुपाटण्यासारखे गोल पेले व धुराचे डाग अद्याप दिसत असलेले अशी आढळते. यावरून देवीपूजक या मातृदेवतेची पूजा करीत असावेत हे स्पष्ट दिसते. या बाहुल्या जरी जीर्ण झालेल्या असल्या तरी त्या मातृशक्तीच्या निदर्शक होत त्यात संशय रहात नाही. या बाहुल्या बहुधा प्रत्येक घरात टांगून ठेवीत असावेत. कारण त्यांची पृष्ठबाजू जरा खडबडीतच दिसते. देवी ही सर्वांची रक्षक आहे ही भावना जशी आज रूढ दिसते तशी ती त्या काळीही असावी. या देवीचा जोडीदार कोण हे जरी निश्चितपणे सांगता येत नसले तरी तो नसेलच असे समजण्याचे कारण नाही. कदाचित ती शक्तिदेवी एकटीच असण्याचा संभव आहे. कारण आजही अनेक देवीच्या मंदिरात तिची पूजा एकट्याच स्वरूपात होते. पुरुष जोडीदार आढळत नाही. शंकरपार्वती, लक्ष्मी नारायण, या प्रमुख जोड्याव्यतिरिक्त माता, जरीमरी, रेणुका, जाखाई, जोगाई, दुर्गा, चंडी इ० अनेक देवतांची एकट्याचीच पूजा होते. क्वचित् तिची दुसरी रूपे आढळतात. पण पुरुषरूप मात्र आढळत नाही.

दुसऱ्या एका पुतळीच्या अंगावर अतिशय तोकडा झगा, गळ्यात वक्ष-स्थळापर्यंत रुळणारा हार, बारीक कटीवर, सरळ लांब हात, दोनतीन वेटोळ्या घातलेल्या नागाचा कमरपट्टा, आणि पुढील भागी जननस्थानावर फणा पसरलेला, रुंद तोंड, वटवटीत डोळे, कानात कुंडले असे स्वरूप आहे. उमा, पार्वती, काली, दुर्गा या जरी शंकराच्या स्त्रिया असल्या तरी यांच्या स्वरूपात दोन प्रकार दिसून येतात, सौम्य व उग्र. बाहुल्यांच्या आकृति आणि त्यांच्या मुखावरील भाव, यावरून असे अनुमान निघते की, देवीची सौम्य स्वरूपेच त्यावेळी प्रचलित असावीत. या बाहुल्यांचे सूक्ष्म निरीक्षण करून तज्ज्ञांनी असे मत व्यक्त केले आहे की, वक्ष-स्थळाची वाढ ध्यानी घेता ही स्वरूपे कुमारिकेचीच असावीत.

एका शिक्क्यावर देवीचे सुंदर स्वरूप कोरलेले आहे. मस्तकावर दोन शिंगे असून पिंपळाच्या झाडामध्ये उभे असलेली, समोर एक पूजक नतमस्तक झालेला, दोघांच्या मस्तकावर केशकलाप वाढलेले, हातात विपुल कंकणे, काही ठिकाणी शिंगामधून फुलांची डहाळी मागे सोडलेली पूजकाच्या मागे मानवमुखी बकरा उभा असलेला, खालील बाजूस सात आकृति ( परिचारिका ) देवीकडे मुख करून उभ्या असलेल्या असे स्वरूप आहे या स्वरूपाचा संपूर्ण अर्थ ध्यानी येण्यास कठीणच पण सूज्ञ असे अनुमान करतात की, पिंपळवृक्षावर लक्ष्मी विष्णूची वस्ती असते, त्या ठिकाणी देवता उभी आहे अशा लक्ष्मीयुक्त देवतेची पूजा भक्त करीत आहे मानवमुख बकरा म्हणजे मानव व पशु यांचे सख्यत्व दर्शविणारे देवीच्या पूजनार्थ उपस्थित आहेत तसेच देवीच्या अंगावर फुलांच्या डहाळ्या व परिचारि-कांच्या डोक्यावर फुलांच्या डहाळ्या म्हणजे सर्व वनस्पति आपआपल्या परीने शक्तिदेवीला सजवीत आहेत पुरुषपूजकाबरोबर परिचारिका म्हणजे स्त्रीवर्गही शक्तिपूजनात सहभागी आहे तात्पर्य, शक्तिदेवीच्या पूजनात मानव, पशु, पक्षी व वनस्पति सर्वजण सामील आहेत आणखी एका चित्रात देवी दोन वृक्षांच्या मध्ये उभी असलेली दाखविली आहे एका भाजलेल्या विटेवर मस्तक खाली टेकून पाय वर करून उभ्या असलेल्या चित्रात तिच्या गर्भ भागातून मानवाची उत्पत्ति दाखविली आहे

(मॅके, पृ ६८–९८), (जेम्सकोश, पृ ३४–३६), (काळीकर, २६–४ ).

सिंधुसंस्कृतीतील उत्खननामध्ये ज्या मातृशक्तीच्या मूर्ति आढळल्या, त्याच प्रकारच्या मूर्ति इजिप्त, फिनेशिया, आशिया मायनर व ग्रीस देशांतही आढळून आल्या आहेत दोहोंमध्ये भरपूर साम्यही आहे याचाच अर्थ असा की, दोन्ही संस्कृतींचा काल सनपूर्व ३००० वर्षांचा असावा हे सिद्ध होते

( १ ) देवीचे वाहन सिंह, तर तिच्या पतीचे वाहन वृषभ होते.

( २ ) दोन्ही ठिकाणी ही देवता युद्धदेवता मानलेली आहे.

( ३ ) ती विवाहित आणि कुमारी अशी दोन्ही प्रकारची दाखविली आहे.

( ४ ) तिचे वास्तव्य पर्वत व दऱ्याखोऱ्यांशी निगडित आहे.

( ५ ) नाना हे नाव जसे सुमेरियात रूढ होते तसेच ते काबूलमध्ये हिंग्लजदेवीला रूढ आहे.

यानाच अर्थ असा घ्यावयास हरकत नाही की, मातृशक्तीचा संचार एकसमयावच्छेदेकरून सर्वत्र सारखाच होता. अंबा हे लोकमातानिदर्शक नाव होय.

इराकमधील समरा येथील उत्खननात ६००० वर्षांपूर्वीच्या ग्राममातृकांच्या मूर्ति आढळून आलेल्या आहेत.

सिंधुसौवीर संस्कृति

हरप्पा येथील संस्कृतीचा काळ साधारणपणे इसवी सनापूर्वी ३००० ते २८०० वर्षांचा धरला जातो. काही संशोधक अलीकडेपलीकडे थोडासा फरक करतात. संशोधक मॅके याने या उत्खननासंबंधी भरपूर विवेचन आपल्या ग्रंथामध्ये केलेले आहे. तसेच दुसऱ्या अनेकांनीही केलेले आहे. मॅके म्हणतात की, येथील उत्खननामध्ये ज्या वस्तु सापडल्या त्या–उदाहरणार्थ तलवार, ब्रॉंझ धातूची कुऱ्हाडीची पाती, ब्रॉंझनी चित्रे, दगडाची वजने, दशांश वजने, मातीच्या वस्तु, चुना व अलबेस्टर यांचे मिश्रण, दगडाच्या मूर्तींच्या शिंपाचे डोळे, वस्तूवरील चकाकी आणणारे पदार्थ, त्याच प्रकारचे अवशेष, पॅलेस्टाईन, कॉकेशस, इजिप्त, सुमेर, एलम, मेसापोटेमिया, बॅबिलोनिया, क्रीट येथील उत्खननात आढळून आले आहेत. यावरून असा निर्णय काढावयास हरकत नाही की, पूर्वी या देशात भरपूर दळणवळण चालू होते, आणि हा सर्व व्यापार जहाजांतून होत होता. भारतीय नौकानयनविद्या ही रामचंद्राच्या काळापर्यंत मागे नेता येते. कर्नल चर्चवुड याने आपल्या आयुष्याची पन्नास वर्षे भारत आणि मेक्सिको यांतील प्राचीन संबंध स्थापित करण्यात व दळणवळणाचे मार्ग शोधण्यात घालविली. शेवटी तो निर्णयाप्रत आला की, 'मय संस्कृतीमधील लोक नौकानयन विद्येत परिपूर्ण असून तरबेज नावाडी होते. त्यांची जहाजे उत्तर समुद्रापासून दक्षिण सागरापर्यंत आणि पूर्वेपासून पश्चिमेकडे अनिर्बंध वावरत असत. हे वाल्मिकी ऋषींचे विधान पूर्णपणे सत्य आहे.' मेक्सिकोमधील सूर्यवंशी लोक बहुधा श्रीरामचंद्राच्या सूर्यवंशापैकी असून त्या वेळेस ते वसाहतीसाठी तिकडे गेले असावेत, आणि त्यामुळे त्या देशात मयसंस्कृति, सूर्य (इंका) संस्कृति व ऐस्टिक (आस्तिक) संस्कृतीचे लोक आढळतात असे

संशोधक भिक्षु चमनलाल यांनी आपले मत ' हिंदु अमेरिका ' या ग्रंथात व्यक्त केले आहे. कदाचित् ते मंगोलियातून हिमवर्षावाच्या वेळी परस्पर गेले असण्याचीही शक्यता आहे.

### प्राचीन दर्यावर्दी मार्ग

काहींना अशी शंका येते की, या संस्कृतीमधील एवढा व्यापार कोणत्या बंदरामधून होत असावा, आणि हराप्पा, मोहोंजोदरो ही शहरे नष्ट झाल्यावर पुढे त्या लोकांचे काय झाले असावे ! शंका रास्त आहे, पण त्याचे उत्तर श्री. राव ( पुराणवस्तुसंशोधनखाते अधिकारी ) यांनी दिनांक ५–७–१९६० रोजी झालेल्या आकाशवाणीवरील भाषणात दिले. ते म्हणाले, अलीकडील उत्खननात त्या संस्कृतीचे अवशेष काठेवाड, गुजरात येथे विपुल आढळून आले आहेत. खंबायत आखातातील लोथल बंदर, काठेवाडमध्ये लाखा व घोघा या ठिकाणी उत्खनन झाले. हराप्पाप्रमाणे या ठिकाणी गटारे, भाजलेल्या विटांचे वाडे, बाहुल्या, नाणी इ० वस्तु तर आढळल्याच, पण लोथल येथे ७९०' × ५२५' लांबी रुंदीचा बोटीचा धक्का आढळून आला आहे. भरतीच्या वेळी जहाजे गोदीत घेण्यासाठी ज्याप्रमाणे आज लॉक–गेटचा उपयोग केला जातो तसा २३ फूट रुंदीचा मार्गही आढळला आहे. अरब खलाशांचे पुतळे, मुखवटे आढळले आहेत. यावरून हे स्पष्ट दिसते की, या बंदरातून मेसापोटेमिया, मिसर, अरबस्थान या देशांबरोबर व्यापार चालत असे. याच बंदरावर अद्याप वारुणादेवीचे स्थान आहे. खलाशी लोक आपली जहाजे दर्यात सोडण्यापूर्वी ' जहाज सुखरूप परत येवो ' अशी या देवीची प्रार्थना करीत. प्राचीन आर्यांच्या कृतीचे जास्त प्रगत स्वरूप पाश्चिमात्य संशोधकांनी प्रगट केले आहे. पण त्याचे मूळ भारतात आहे.

अनुषंगाने येथे हे नमूद करण्यास हरकत नाही की, राजा भोज याने " युक्तिकल्पतरू " नांवाचा संस्कृत ग्रंथ रचला असून त्याची प्रत कलकत्ता संस्कृत विद्यालयात पहावयास मिळते. त्यामध्ये जहाजबांधणीचे शास्त्र व प्रमाण दिले आहे. जहाजाचे लाकूड कोणत्या प्रकारचे असावे, लांबी, रुंदी, उंचीची प्रमाणे, तसेच त्याचे आकार हत्ती, घोडे, वाघ, सिंह, पोपट इ० पशुपक्ष्यांचे वर्णन पर आढळते. जहाजामध्ये एकेवेळी सुमारे तीनशे माणसे बसू शकत इत्यादि वर्णन आढळते. ( हिंदु अमेरिका, पृ. २६२–६३ )

### शिल्पकला

प्राचीन वस्तूंच्या उत्खननातून ज्याप्रमाणे आपण आदिशक्तीचे स्वरूप पाहिले तसेच ते प्राचीन शिल्पकलेतही पाहणे बोधप्रद होईल. या कलेचा उगम

इ. स. पूर्व २७३ वर्षापर्यंत आढळून येतो. मौर्य घराण्यातील सम्राट अशोक त्या वेळी गादीवर असावा, तेव्हापासून या कलेचा इतिहास उपलब्ध आहे. साधारणतः या शास्त्राचे तीन टप्पे धरतात. बौद्ध–अशोककाळापासून इ. स. तिसऱ्या शतकापर्यंत पहिला टप्पा इ. स. ३०० ते ६०० पर्यंत गुप्तवंशातील चंद्रगुप्त व समुद्रगुप्त यांच्यापर्यंतचा दुसरा टप्पा, आणि जैन राजवटीनंतरचा बाराव्या शतकापर्यंतचा तिसरा टप्पा होय.

घारापुरी येथील एलिफन्टा, एलोरा व देवगड, झाशी, नाशिक, भुवनेश्वर सांची आणि भारहूत येथील शिल्पकला ही गुप्त घराण्याच्या वेळेपासून पुढे तयार झालेली आहे असे मानले जाते. हिंदुधर्मामध्ये शैव व वैष्णव असे जे दोन पंथ आहेत. त्यापैकी शैव पंथी हे गुहा खोदणारे असून त्यांच्या खोदकामात शिव व त्याची प्रतीके यांचा प्रामुख्याने भरणा आहे. डॉ. बर्जेसच्या मताप्रमाणे पश्चिम भारतात ९०० पर्यंत शिल्पगुहा असून साष्टीवेट व मुंबईच्या आसपास सुमारे १३० पर्यंत गुहा आहेत. इ. स. ८ व्या अगर ९ व्या शतकात घारपुरी येथील खोदकाम झाले असावे. त्याच सुमारास वेरूळ व देवगड येथेही खोदकाम झाले असावे. शिल्पकला ही यानंतर अधिक प्रगत झाली आणि खजुराहो येथील मंदिरे, दिलवारा येथे विमलशहाने कोटयवधि रुपये खर्चून बांधलेली जैन मंदिरे डौलाने मिरवीत आहेत. ह्या कलाकृति पाहण्यासाठी दूरदूरचे हौशी प्रवासी प्रतिवर्षी हजारोंनी भारतात येतात आणि आपल्या नेत्राचे पारणे फेडून घेतात. ताजमहालव्यतिरिक्त प्रत्येक ठिकाणी आपणास आदिशक्तीचे स्वरूप दृग्गोचर होते. यानंतर मात्र शिल्पकला प्रगत स्वरूपात उरलेली नाही कलाकारांचा राजाश्रय तुटला आणि विधर्म राजवट अस्तित्वात आली हे त्याचे कारण असू शकेल.

असे जरी असले तरी क्वचित ठिकाणी शिल्पकला अद्यापही पाहण्यास मिळते. इ. स. १९५७ साली लेखक आग्रा येथे गेले असताना तेथे तयार होत असलेले राधास्वामींचे मंदिर पहाण्यास गेला. दयाळबाग विभागात त्याचे बांधकाम चालू आहे. तेथे असे समजले की, ४० वर्षांपूर्वी हे बांधकाम चालू झाले व आणखी दहावीस वर्षेपर्यंत चालणार आहे. सुमारे अडीचशे माणसे कामावर दिसली. तेथे संगमरवरी पाषाणावर एक कलाकार घडासहीत द्राक्षाची वेल कोरीत होता. कणसासह बाजरीचे ताटही त्यामध्ये दाखवीत होता कलाकृति जवळजवळ तयार होत आली होती. त्याने सांगितले की, गेली तीन वर्षे तो या एकाच पाषाणावरील आकृति खोदीत आहे. कानपूर येथे श्रीमान् शेट पदमपत सिंघाणिया कमलादेवीचे मंदिर याच पद्धतीने संगमरवरी शिल्पाचे बांधीत आहेत.

## मूर्तिशिल्प

शिल्पकलेचा उत्पत्तिकाल जो वर दिला आहे तो गुहा खोदणे आणि आतील शिल्पाचा होय. याशिवाय ज्याला आपण मूर्ति शिल्प म्हणतो ते फार प्राचीन काळापासून लोकांना अवगत होते यात शंका नाही. हरप्पा, मोहोंजोदरो, आदि भारतीय उत्खनन आणि इजिप्त, मेसापोटेमिया, सुमेरी आदि परकीय उत्खननातून ज्या मूर्ति, पुतळे, ताम्र्याची कोरीव नाणी व पत्रे आढळून आली आहेत, ती सर्व त्या त्या काळातील शिल्पकलेचे अस्तित्व दाखविण्यास पुरेसे आहे. पुराणकाली ही कला प्रगत होती. मत्स्यपुराणात ( अध्याय २६१–६३ ) अनेक देवींच्या मूर्ति कशा असाव्यात त्यांची मोजमापे दिलेली आहेत. त्यामध्ये दशभुजा, कात्यायनी, मातृका, माहेश्वरी, कौमारी, वैष्णवी, इंद्राणी, चामुंडा, कपालमालिनी, रुद्रदेवी, तसेच ब्रह्मा, विष्णु, महेश, वामन, बळी, नरसिंह, कार्तिकस्वामी, मदन, इ० इ० मूर्तीच्या आकाराचे प्रमाण दिले आहे. मूर्तीची उंची, कंबर, पायाची लांबी, पायाच्या बोटांची लांबी, इ० प्रमाणे आहेत. पूर्वी मालवदेश हा मूर्तीसाठी प्रसिद्ध होता. अद्यापही चांगली मूर्ति त्याच भागातून बनवून आणली जाते. इतर प्रांतामध्ये मूर्तीची कामे होतात, पण येथीलप्रमाणे सुबकपणा नसतो. दक्षिण भारतामध्येही मूर्तिकला उत्तम परिणत झालेली होती, असे तेथील कोरीव शिल्प मूर्तीवरून दिसून येईल. नटराजाचे शिल्प याचा प्रामुख्याने उल्लेख करावयास हरकत नाही.

शिल्पशास्त्र या नावाचा आपल्या पूर्वजांनी ग्रंथ रचून ठेवलेला आहे. भारतीय शिल्पकार या ग्रंथाचा अभ्यास करूनच मग देवादिकांच्या मूर्तीची घडण, डोळे, नाक, हातपायाची बोटे इत्यादि अवयवांचा आकार देतात. प्रमाणशीर मूर्ती असली तरच ती सुंदर व आकर्षक दिसते असा अनुभव आहे. भारतीय मूर्ती रम्य वाटतात याचे कारण हेच आहे. काही शतकापूर्वी मद्रास प्रांतात असे काही शिल्पकार होते की, मूर्तीसाठी दगड योग्य आहे की नाही हे त्यातून निघणाऱ्या आवाजावरून ठरवीत. तसेच कोणता पाषाण स्त्रीरूपास योग्य व कोणता पुरुषरूपास योग्य याचे ज्ञान पाषाणाच्या आवाजाने त्यांना होत असे. अनेक ग्रंथांतून मूर्तीचे ध्यान व आयुधे कशा प्रकारची असावीत यावर श्लोकरचना आहे. हे जरी बाह्य साहित्य असले तरी पूर्ण चिंतन आध्यात्मिक तत्त्वाने करून एकाग्र चित्ताने जेव्हा मूर्ति घनविली जाते तेव्हाच ती उत्कृष्ट बनते. पाश्चिमात्य शिल्पकारही याच मताचे आहेत. याचे उदाहरण पहा.

कै. सयाजीराव गायकवाड विलायतेत एकचित्ताने प्रदर्शन पहात असता " एक धर्मात्मा मुलीचे लग्न झाल्यावर आपली सर्व संपत्ति तिला अर्पण करीत

आहेत," असा देखावा त्यांनी पाहिला. चित्रकाराचा शोध करून त्यांनी तशा रीतीचे दुसरे चित्र त्याला तयार करण्यास सांगितले, पण त्याने साफ नकार दिला. तो म्हणाला, त्या चित्रात माझे सर्वस्व ओतलेले आहे. ती भावना व मन स्थिति पुन्हा येणार नाही म्हणून तशी प्रतिकृति पुन्हा निर्माण होणार नाही. चित्रकार वा मूर्तिकार किती तन्मय होतो याचे हे उदाहरण म्हणता येईल. साहित्य क्षेत्रातही असे उत्कृष्ट नमुने अनेक दाखविता येतील.

### प्राणप्रतिष्ठा

देवीची मूर्ति तयार झाली म्हणजे तिच्यामध्ये देवपण येत नाही तिची प्राणप्रतिष्ठा करावी लागते. होमहवन करून दैवीतेजाने तिला युक्त करावे लागते. जशीजशी तिची आराधना होईल व अर्चन होईल तसेतसे तेज वाढते. देवपण वाढते आणि देवपण अधिक लोकांच्या प्रत्ययास येते. ते जागृतस्थान बनते. याकरिता मंदिरात नेहमी राबता असावा लागतो, धार्मिक कार्ये सतत चालू ठेवावी लागतात म्हणजे लोकांची श्रद्धा वाढून त्यांना प्रत्यय येतो, साक्षात्कार होतो. जेथे हे घडत नाही ती मंदिरे लय पावतात. दिनांक १०–१०–१९६० रोजी पुणे आकाशवाणीने एक लोककथा सादर केली. त्याचा सारांश असा की, राष्ट्रकूट घराण्यातील दंतीदुर्ग राजाची स्त्री माणकावती अगर घृष्णावती हिच्या इच्छेवरून सुमान शिल्पकाराने एका रात्रीत घृष्णेश्वर मंदिराची प्रतिकृति निर्माण करण्यासाठी प्रथम मंदिराचा कळस उभा केला. आणि बाकीचे बांधकाम नंतर छन्नडीने पुरे केले. हे कसे शक्य झाले ? असे विचारता तो राणीला म्हणाला, "शिल्पकार कलासमाधीत शिरल्यानेच तसे करणे शक्य झाले. एरव्ही ते शक्य नाही. किती उच्च दर्जाची शिल्पकला या भूमीत होऊन गेली, याचे हे उदाहरण आहे हे सर्व सांगण्याचा उद्देश इतकाच की, शिल्पकारांनी ही आद्यशक्तीची निरनिराळी स्वरूपे तयार करून तिचा प्रसार होण्यास मदत केली आहे, एरव्ही कैलास लेणे व घारापुरी येथील शिवपार्वतीविवाहाच्यासारखा सोहळा आपणाला पहावयाला मिळाला नसता

### चित्रकलेचा उगम

शिल्पकाराने जशी प्रसारास मदत केली तशी चित्रकलेनेही केलेली आहे ही चित्रकला कशी जन्म पावली याचा इतिहास गमतीचा आहे प्रा फणींद्रनाथ बोस यांनी 'शिल्पशास्त्राची मूलतत्त्वे' या नावाचा ग्रंथ लिहिलेला आहे. यामध्ये खालील कथा मिळते. एके काळी भयजित नावाचा सत्त्वशील राजा होता. नेहमी धार्मिक वृत्तीने वागून विपुल पुण्य पदरी साठविलेले होते. त्याच्या राज्यात एकदा एका ब्राह्मणाचा मुलगा अकाली मृत झाला. मुलाचे प्रेत ब्राह्मणाने राजाकडे आणले आणि मुलाचे प्राण परत देण्याची विनंती केली. राजाने आपल्या सत्त्वशील वर्तनाच्या

पुण्याईवर यमराजाकडे मुलाचा प्राण परत करण्याची मागणी केली. पण यमाने आपल्या विहित कर्तव्याच्या आड न येण्यास राजाला विनविले. राजाने ते ऐकले नाही, तेव्हा तो व यम यांमध्ये युद्ध झाले, आणि यमाचा पराभव झाला. इतक्यात ब्रह्मदेव तेथे प्रगट झाले आणि राजाला म्हणाले, "प्रत्येकाला त्याच्या पूर्वकर्मानुसार जन्म व मृत्यु येतो." इतके झाले तरी राजा आपला हट्ट सोडीना. मृताचा प्राण परत करण्यास आज्ञा केली, तेव्हा तंटा मिटविण्यास उपाय म्हणून ब्रह्मदेव राजाला म्हणाले की, मृत मुलाचे चित्र काढावे राजाने चित्र काढल्यावर ब्रह्मदेवाने त्यामध्ये प्राण भरला. हेच जगातील पहिले चित्र होय. तेथून चित्रकला सुरू झाली आणि आजची प्रगत अवस्था प्राप्त झाली.

(महाराष्ट्र परिचय, पृष्ठ ५०४)

## धार्मिक समजुती

जगातील सर्व जमातींचा इतिहास पाहिला तर प्रत्येकात अनेक धार्मिक समजुती असल्याचे आढळून येते. आजचा सुधारणावादी समाज सहस्रावधी वर्षांच्या समजुतींना फार तर वेडगळ म्हणो अथवा अन्य काहीही नावे ठेवो, पण त्या सर्वत्र आढळून येतात, ही गोष्ट सत्य आहे. या समजुती प्रत्येकाच्या श्रद्धेवर आधारभूत असल्याने श्रद्धाविहीनांना त्या समजण्यासारख्या नाहीत असे म्हटले पाहिजे प्रत्येकाची श्रद्धा अगर निष्ठा ही एकच प्रकारची असू शकणार नाही आध्यात्मिक शिखर गाठण्याचा प्रयत्न कोणी ज्ञानमार्गाने, भक्तिमार्गाने तर तिसरा कर्मकांडाने करील. यामध्ये एकाने दुसऱ्याला हसण्यासारखे काही नाही. प्रत्येकाने हा फरक ध्यानात धरला पाहिजे.

वार्षिक पर्जन्य येण्यास थोडासा वेळ झाल्याबरोबर शेतकरी वर्ग हवालदील होतो, आणि अनेक ठिकाणी शंकराच्या पिंडीवर अगर ज्याच्या त्याच्या इष्ट देवतेवर अभिषेक करून मिरवणुकाही काढल्या जातात, हे आपण सन १९६६ सालीही पाहतो व वाचतो कारण हा त्यांचा श्रद्धेचा प्रश्न आहे पटकी, महामारी व देवीसारखे सर्सगजन्य रोग उत्पन्न झाले, म्हणजे काही भारतीय लोक त्यांचे निवारण होण्यासाठी देवीची पूजाअर्चा करतात, नवससायास देऊन त्यांची बोळवण करतात हे सर्व आजच्या विसाव्या शतकात घडत आहे. हे रोग का उत्पन्न होतात, याचे शास्त्रीय निवरण झालेले असून वे सर्सगजन्य आहेत, औषधोपचाराने त्यांचे निवारण होते, हे माहीत असतानाही त्यांची समजूत अशी की, हा दैवी कोप आहे मेघगर्जना का होते, याचे शास्त्रीय निवरण करून आले असतानाही आकाशात दोन देवांचे भांडण होते, अगर देव कोपला म्हणून कडकडाट होतो आणि त्याला शांत करण्यासाठी रक्त मिश्रीत अगर राड गढूळ

पाणी बांबूच्या पिचकारीने वर उडविले जाते, ही समजूत आस्ट्रेलियामधील काही वन्य जमातींत आढळून येते. अडाणी लोक या समजुतीवर चालतात असे नाही, तर चांगले सुधारलेलेही यावरच चालतात. नरबळी दिल्याने आयुष्य वाढते, या समजुतीने पूर्वी जर्मन राजा ओडीन याने आपले नऊ पुत्र बळी दिले. हरसिद्धीला प्रसन्न ठेवण्यासाठी राजा विक्रमाने अकरा वेळा आपले मस्तक अर्पण केले. याचे प्रतीक म्हणून त्या मंदिरात सांप्रत अकरा लाल शेंदूरयुक्त पाषाण दाखवितात. अनेक असाध्य रोग कोणी साधु महात्मा बरा करील, या समजुतीने आजही कित्येक तो मार्ग चोखाळतात. तात्पर्य एवढेच की, पूर्वयुगात काय अगर आजच्या युगात काय, सर्व तऱ्हेची माणसे कमीअधिक प्रमाणात समजुतीप्रमाणे व आपल्या श्रद्धेप्रमाणे वागतात. भक्तिमार्गात तर अलिखित नियम आहे की, जेथे श्रद्धा आहे तेथे त्याचे इच्छित त्या त्या मार्गाने त्याला प्राप्त होते आणि म्हणूनच ते आचरले जाते.

आळंदी, पंढरपूर क्षेत्री एकादशीच्या वेळी लाखो भक्त वाहनांनी अथवा पायी या ठिकाणी येतात. सुशिक्षित मनुष्य परगावी गेला, तर उत्तम राहण्याचे हॉटेल शोधतो, पण या भक्तांना जेवणाची, राहण्याची, पाण्याची कसलीच भीती नसते. परमेश्वर या सर्वांचा व्यवहार बरोबर चालवितो. गावोगावी वारकऱ्यांना अन्नदान करणारे शेकडो श्रीहरीचे लाल आहेत. ग्रहणाच्या वेळी कुरुक्षेत्रावर अथवा कुंभमेळ्याच्या वेळी अलाहाबाद येथे लाखोंनी यात्रा जमते. कित्येक गर्दीत देहही ठेवतात. ते सर्व वाळवंटामध्ये झोपतात, नदीवर स्नान करतात, मिळेल ते खातात. पण आपली निष्ठा सोडीत नाहीत. काही सुशिक्षितांना हे सर्व वेडगळ वाटते, पण हजारो वर्षे हा क्रम नित्य चालू आहे. देवाविषयी निष्ठा—अगदी अढळ निष्ठा, यामुळेच हा सर्व व्यवहार सुरळीत चालतो. देवाजवळ नव्हे पण मातापित्या-बद्दल निष्ठा असणारांनाच हे कोडे उलगडण्यासारखे आहे, इतरांना नाही.

### अनिष्ट टीकाकार

संशोधनाच्या बुरख्याखाली एखाद्या रूढीवर काही वेळा टीका केली जाते. पण त्या रूढी अस्तित्वात आल्या त्या वेळची परिस्थिति, समकालीन इतर देशातील परिस्थिति यांचा संपूर्ण अभ्यास केल्याशिवाय कोणा परदेशीय छिद्रान्वेषी टीकाकारांनी त्यांच्या दृष्टिकोनातून केलेले आमच्या रूढींचे आविष्करण सत्य आधारभूत मानून, स्वधर्मातील पूर्वजांनी घालून दिलेल्या रूढींवर, समजुतींवर टीका करीत सुटणे म्हणजे हे 'घरच्याच म्हातारीचे काळ' होत. इतर समाजावर टीका केली तर त्या समयी त्या धर्मवेड्या समाजाकडून प्राणास धोका आहे, याची जाणीव सतत असल्याने हे संशोधक तिकडे तोंड वळवणार नाहीत. मात

वर्षांपूर्वी भारतातील एका गव्हर्नर पदावर असलेल्या उच्चपदस्थ व्यक्तीने परदेशातील ग्रंथाच्या आधारे एका समाजावर टीका केली, तर शेवटी नाकदुऱ्या काढाव्या लागल्या, आणि तो भाग ग्रंथातून गाळावा लागला. आश्चर्य इतकेच की, ते मूळ पुस्तक अद्यापही मोठ्या डौलाने परदेशात एक तपाचे वर विकले जात आहे, आणि भारतातही काही ग्रंथालयात पाहायास मिळते. हे विचार येथे मुद्दाम सुचविण्याचे कारण असे की, एका लेखकाने सती या संस्थेवर आपल्या ग्रंथात टीका केली आहे ती पाहाण्यात आली. ' सती जाणाऱ्या स्त्रीला ताटीला व चितेला घट्ट बांधीत. ' इ० इ० विधान त्याने केले आहे. जी माहिती उद्धृत केली आहे ती पाश्चिमात्य दृष्टिकोनातून लिहिलेली. भारतीय दृष्टिकोनाचा तेथे लवलेश नाही. टीकेमध्ये समतोलपणा नाही. त्या संस्थेतील चांगली बाजू तेथे रेखाटलेली नाही. एकाददुसऱ्या अपवादात्मक उदाहरणावरून सर्व सतीसंस्थेवर शिंतोडे उडविलेले आहेत आणि सतीच्या आत्मधैर्याचे, पातिव्रत्याचे आणि पुण्यशील भावनांचे वाभाडे काढले आहेत. त्या वेळच्या कालमानाच्या समजुतीप्रमाणे तो पवित्र मार्ग होता, शीलरक्षणाचा होता. आजच्या बदलत्या परिस्थितीत तो योग्य नसेलही, म्हणून तो आचरणे योग्य ठरणार नाही. पण ज्या वंदनीय माता सती गेल्या त्यांनी आपल्या विहित समजल्या जाणाऱ्या कृत्याने स्वर्ग मिळविला हे टीकाकारांनी विसरू नये.

### भू-भागाची भरणी

हराप्पा, मोहेंजोदरो, खजुराहो, कपिलवास्तु, कौशंबी, पैठण इ० ठिकाणी आजवर उत्खनन झाले, तसे परदेशातही अनेक ठिकाणी झाले आहे. कोठे पाच फूट तर कोठे ४० फुटांपेक्षाही जास्त. हे उत्खनन झाल्यावर त्या वेळची भू-पातळी आढळली आणि अवशेष सापडले. एवढा मोठा सागराचा पसारा व भूभागात लांबवर खाडीरूपी पसरलेले त्याचे हात, ज्यामधून जलमार्गाने वाहतूक होत असे. पण त्या खाड्या होऊन निघाल्या. चौल, सोपारा, खारेपाटण-सारखी पूर्वीची बंदरे गाळाने भरून गेल्यामुळे बंद पडली. यावरून असा विचार सुचला की, इतक्या मोठ्या प्रमाणावर हा भूभाग कसा भरून निघत आहे ! वरदीकर नावाचे संशोधक म्हणतात की, पूर्वी राजपुतान्याचा फार मोठा भाग पाण्याखाली होता. तो सागर आता सिंधुसागरापर्यंत मागे हटला.

पूर्वीची शहरे भूपृष्ठाखाली इतकी खोल कशी गेली आणि त्यावर एखाद्या जाडीचे मातीचे थर कोठून आले ! पर्वतमाथ्यावरून नद्यांतून गाळ येऊन ही भरणी झाली असावी असे एक मत दिसते. म्हणजे ही शहरे नदीकाठी इतक्या खोलीवर वसलेली होती काय ! तेथे जशी शहरावर माती भरली तसे नदीने

पात्र भरून आजच्या इतक्या उंचीवर आले काय! भूकंपाने अगर भूपृष्ठाचे संकुचनाने तर असे काही झाले नसावे ना! अर्थात हा विषय भूगर्भशास्त्र वेत्त्यांच्या कक्षेत असल्याने त्यांनी त्यावर विचारविनिमय केलेला असेलच

श्री वाय् जोगळेकर, जलसंशोधक केंद्र, खडकवासले आकाशवाणीवरील भाषणामध्ये म्हणाले, ( १८-१-६१ ) कोशी अथवा कौशिकी ही बिहार प्रांतातील नदी म्हणून विश्वामित्राची कन्या होय हिमालयामध्ये ज्या भागात तिचा उगम झालेला आहे, तेथील ठिसूळ दगड पाण्याच्या प्रवाहाबरोबर वाहत जाऊन नदीच्या सखल भागात गाळ रूपाने बसतो आणि नदीचा प्रवाह बदलतो गल्या १०० वर्षात असा प्रवाह पूर्णा या गावाजवळ ७० मैल पश्चिमेला सरकला आहे, आणि फार नुकसान झालेले आहे

कथापुराणातून या सर्व गोष्टी विश्वकर्मा करीत असल्याचा उल्लेख मिळतो द्वारका शहर वसविताना श्रीकृष्णाला जागा अपुरी पडली, म्हणून विश्वकर्म्याने सागरापासून जागा मागून घेतली म्हणजेच सागर भरून काढून जागा मिळविली कामाख्या देवीचे मंदिर, पायऱ्या, नदीवरील घाट, सर्व रात्रीत विश्वकर्म्याने नरकासुराकरिता तयार केला अशी अचाट कामे आजही तो विश्वकर्मा करीत आहे मुंबई शहराला भूभाग कमी पडला म्हणून सागरात भर टाकून आजचा मरीनड्राईव्ह भाग तयार झाला भाक्रा नागल, कोयनेसारखी अचाट कामे सुरू आहेत सगरसुतांनी गंगेचा ओघ वळवून भारतात आणला, तसे अचाट कालवे काढून तो ओघ इतरत्र वळविला जात आहे पंजाबातील पाणी कालव्याने राजस्थानात आणून तो भूभाग सुपीक करण्याचे प्रयोग चालू आहेत सांताक्रूझ विमानतळाजवळील टेकडीने एक विमानाचा धुक्यामुळे बळी घेतला, म्हणून त्याच विश्वकर्म्याने ती सर्व टेकडीच नाहीशी केली आहे आणि तेथील भूभाग सपाट करून टाकला आहे

## तेजापासून देवतानिर्मिती

या विषयाचे परिशीलन करीत असता प्रामुख्याने असे दिसून येते की, राक्षसांनी मानवांना त्रास द्यावा, त्याचा परिहार करण्यासाठी देवांनी शंकरादि वरिष्ठ देवांची प्रार्थना करावी, आणि देवांनी आपल्या तेजापासून देवीची उत्पत्ति करावी काही उदाहरणांनी याचे स्पष्टीकरण पाहू महिषासुराच्या धुमाकुळाला कंटाळून देवांच्या प्रार्थनेनंतर ब्रह्मा, विष्णु, शंकर यांनी आणि इतर देवांनी आपले तेज, एकवटून जी आकृति तयार झाली तीच महिषासुरमर्दिनी होय. नागकुळाने पृथ्वीवर धुमाकूळ घातला ब्राह्मणांनी कश्यपमुनींना संकट निवारण करण्याची विनंती केली त्या ब्राह्मणाने आपल्या तपस्तेजाने मनसादेवी उत्पन्न

केली. देव दानवांच्या युद्धांत देवांचा पराजय झाला. तेव्हा सर्व पराजित देवांना एकत्र करून त्यांच्या तेजामधून देवता उत्पन्न करून दैत्यांचा नाश केला. तेजापासून देवता उत्पन्न होण्याचा हा प्रकार झाला. आता दुसरा पाहू.

मीनाक्षीच्या उत्पत्तिसंबधांत तिच्या वडिलांनी पुत्रप्राप्तीसाठी यज्ञ केला. तेव्हा यज्ञकुंडातूनच तटातका ( मीनाक्षी ) चा जन्म झाला. द्रुपद राजाने पुत्रकामेष्टी यज्ञ केला. तेव्हां यज्ञकुंडातून द्रौपदी बाहेर आली, म्हणून तिला अयोनिसंभवा, याज्ञसेनी ही नावे मिळाली. महिषासुराच्या मातेने तिचा पति रंभदैत्य याचे चितेवर देह अग्निसमर्पण केला असता त्या चिताभस्मातून महिषासुर जन्म पावला.

मात्र या उदाहरणावरून विचार करण्यासारखी गोष्ट म्हणजे त्या काळी तेजापासून मानवनिर्मिति होऊ शकत होती. ते सामर्थ्य उच्च कोटीतील व्यक्तींना शक्य होते. तेव्हा आजच्या विज्ञानयुगात यांत्रिक मानवाची निर्मिती झाली आहे त्याप्रमाणे संशोधकांनी याचाही प्रयोग करून पाहण्यासारखा आहे.

चंड मुंडांना मारले म्हणून कालीच चामुंडा झाली. श्लोक २३ प्रमाणे रक्तबीजाचे रक्त चामुंडा प्याली. इत्यादी इ०.

आता पहा की, शिवाशंकरादी देवांच्या तेजापासून उत्पन्न झाली असे झाल्यावर पुन्हा ती पार्वतीच्या कोशापासून कशी निर्माण व्हावी ! शिवादेवीलाच चामुंडा, अंबिका, दुर्गा, लक्ष्मी, गौरी असे म्हटल्यावर गौरी ही हिमवान् पर्वताची मुलगी, तर लक्ष्मी सागरातून उत्पन्न झाली हे कसे मानावे ! शिवा हीच कौशिकी, मग ती गौरीच्या शरीरातून अलग कशी व्हावी !

दुसरे उदाहरण—देवतांच्या तेजसमूहाने जी शिवा अगर कौशिकी निर्माण झाली असे म्हटले आहे, तीच महालक्ष्मी व तीच महिषासुरमर्दिनी, तसेच पार्वतीच्या कोशापासून शिवा कौशिकी निर्माण झाली व त्यांनी शुंभ निशुंभांची कटकट मिटविली असे विधान केल्यावर पुन्हा त्याच शिवादेवीला महासरस्वती असे संबोधण्यात आले आहे. अशी अनेक उदाहरणे देता येतील. पण त्याचे प्रयोजन नाही.

यावरून असे कळून येईल की, नावाबाबत सूत्रबद्धता राखली गेली नसल्याने वैचारिक गोंधळास जागा राहून गेली आहे. देवींचे मूळ स्वरूप जरी सर्वत्र सारखे असले तरी अशा रीतीने मनन करून ग्रंथ वाचताना मनाला खटकल्याशिवाय रहात नाही. (येथील श्लोकांचे आधार श्री. सोमणशास्त्रींनी प्रसिद्ध केलेल्या सप्तशती ग्रंथामधून घेतले आहेत.)

याचा किंचित् उलगडा देवीभागवत ग्रंथ वाचल्यावर मिळतो. तेथे असे म्हटले आहे की, शिव व चामुंडा आदि देवींनी महिषासुराला मारल्यावर भगवती चंद्रिका अंतर्धान पावली आणि मणिद्वीपात जाऊन आपल्या स्वस्थानी विराजमान झाली (स्कंध ५ अध्याय १८-१९). शुंभ निशुंभ पाताळातून वर आले आणि पृथ्वीवर त्रास देऊ लागले. देवांनी हिमालय पर्वतावर तपश्चर्या केली देवी प्रगट झाली. तिची प्रार्थना केल्यावर पार्वतीच्या देहापासून कौशिकी व काली निर्माण झाली चंडमुंड, रक्तबीज, धूम्रलोचन, शुंभ निशुंभ दैत्यांना या देवतांनी मारले. हे दोन कथाभाग निराळे आहेत. पण सप्तशतीमध्ये एकत्र गुंफले गेल्याने घोटाळा वाढला आहे (स्कंध ५-२३-३१). या विवरणाने पूर्ण समाधान होण्यासारखे नाही. नावाचा वापर वाटेल तसा केला गेला आहे हेच सत्य दिसते

### भारत-पाश्चिमात्य देवता सौलनिक स्वरूप

भारतामधील आदिशक्तीच्या माहितीपर हा ग्रंथ व्हावा असा जरी प्रधान हेतु असला तरी संक्षिप्तरूपाने विश्वातील सर्व देवतांचा परामर्श येथे घेण्यात

आलेला आहे, हे ग्रंथ चाळल्यावर आढळून येईल. पाश्चिमात्य देवतांची तीन प्रकरणे या ग्रंथामध्ये आहेत. तेव्हा पाश्चिमात्य व भारतीय देवतांचे लौकिक स्वरूप काय आढळते याचे थोडेसे विवरण अपरिहार्य आहे, म्हणून ते येथे करीत आहे. पाश्चिमात्य देवता या प्रकरणामध्ये सुमारे ८० देवतांची माहिति त्रोटकपणे संकलित केलेली आहे. याव्यतिरिक्त अनेक लहानसहान देवता, यक्षिणी, परी या सदरात मोडतात. पण विस्तारभयास्तव त्यांचा नामनिर्देश टाळला आहे. आर्यावर्तातील लोकांप्रमाणेच शक्तिपूजा पूर्वी इजिप्त, आशिया-मायनर, बॅबिलोन, अशिरिया, हिटाईट आदि वंशाचे वा देशाचे लोक करीत असत. कालांतराने इसाई व इस्लामी धर्मांच्या जोरदार आक्रमणापुढे पूर्वीची संस्कृति बुडाली आणि आता अवशेषापेक्षा जास्त काही आढळून येत नाही. या देवतांमध्ये जलदेवता, युद्धदेवता, पर्वतदेवता, उत्पत्तीच्या देवता, जनन-काळच्या संवर्धन करणाऱ्या देवता, दुष्टवृत्तींच्या देवता इ० सर्व प्रकारच्या देवता आहेत. देवतांची उत्पत्ति भारतीय देवतांप्रमाणे एकापेक्षा अधिक प्रकाराने झालेली आढळून येईल. उदाहरणार्थ, आफ्रिकेत या देवींच्या उत्पत्तीचे तीन निरनिराळे प्रकार आहेत.

या देवतांची कालमर्यादा इसवी सनापूर्वी अंदाजे तीन सहस्र वर्षेतरी असावी, असे सूज्ञांचे मत आहे. अनाहिता, इस्टर, मयाईन देवता, डायाना इ० देवतांच्या सापडलेल्या अवशेषांवरून असे विधान करता येते. आर्यांच्या देवता हरप्पा व महेंजोदरो काळीही पूजनात होत्या. म्हणजे साधारणपणे तोच काळ येतो. पाश्चिमात्य देवतांची स्वरूपे काही प्राण्यांची असलेली आढळतात. थोर देवता गाईची शिंगे असलेली, बास्ट मांजरमुखी, याहेव सर्प अगर वृषभमुखी, सेकेत सिंहमुखी, हेकाटी-लांडगीमुखी अशी आढळतात. इकडे आर्यांच्या देवतांमध्ये मत्स्य, कच्छप, वराह, नारसिंह, तसेच मनसा या देवता. शिवाय पशुपक्षी स्वरूपाच्या गरुड, हनुमान, सर्प इत्यादी देवता आढळतात. मत्स्य, कच्छप स्वरूपे ही जंतुशास्त्राच्या प्रगत अवस्थांचीच रूपे होत. कारण याच योनीतून अनेक प्रक्रियेने पुढे मानवत्व मानवांना मिळाले आहे असे काही संशोधकांचे एक मत आहे.

### स्त्री-पुरुष स्वरूपदेवता

इस्टार या देवतेचे स्वरूप स्त्री व पुरुष असे दोन्ही प्रकारचे मानले गेले आहे. आपल्याकडे चंद्राचे स्वरूप त्याचप्रकारे मानले आहे. इजिप्तमध्ये असिरिस देवीचा ज्येष्ठपुत्र व पति, ज्युनो ही ज्युपिटरची बहीण व भार्या; हिरादेवी ही झ्युसची बहीण व भार्या, अशा तऱ्हेची नाती आढळतात. आपल्याकडे अदितीसंबंधी,

तशाच उल्लेख आहे. ती दक्षाची माता व भार्या. अंबिका ही शंकराची भार्या म्हणून प्रसिद्ध असता ' त्र्यंबक यजामहे ' या ऋचा मंत्राचा अर्थ करताना कोणी तिला शंकराची माता मानतात, तर शुक्लयजुर्वेद तिला शंकराची बहीण म्हणतो. याचा उलगडा करणे असल्यास आपणाला मानवाच्या अति प्राचीन काळच्या मातृवंश समाजापर्यंत जावे लागते. त्या वेळी जी समाजस्थिति होती, तेव्हा माता हीच स्वसा होऊ शकत होती, भार्या होऊ शकत होती. कारण उघडच आहे की, लग्नसंस्थेचे आजच्यासारखे बंधन त्या काळी नव्हते. याचे सार असे काढता येईल की, यांपैकी काही देवता त्या त्या संस्कृतीकालीन असाव्यात. अगर पूर्णपणे पितृवंश समाज होण्यापूर्वीच्या तरी असाव्यात, असे मानल्याशिवाय कोड्याचा उलगडा अन्य रीतीने होणे कठीण दिसते.

पण भारतीय, ग्रीक आणि इजिप्शियन प्राचीन शास्त्रज्ञांनी देवता या आकाशातील ताऱ्याचे रूपक आहे असेही मानलेले असल्याने, तसे संबंध असणे स्वाभाविक आहे. पण मानवांनी आपल्या समाजव्यवस्थेवरून ही नाती जोडलेली असावीत.

### नामोत्पत्ति

अथेनीदेवी पारथेनान शहरी गेली म्हणून ती पारथेनान अथेनी या नावाने प्रसिद्ध झाली. अफ्रोदिता सायप्रस बेटात प्रथम आली म्हणून सायप्रीस देवी झाली. सायप्रस बेटातील सिथेरा या बंदरावर आली म्हणून सिथेरादेवी झाली. अटार गॅटिसचे सिरियामधून ग्रीसमध्ये स्थलांतर झाले म्हणून ती डी सीरिया नाम पावली इस्टारदेवी निनेव्ह या राजधानीच्या गावी आली म्हणून तिचे नामांतर निनेव्हमध्येच झाले. तसेच सिबिलेदेवी अगदस पर्वतावर स्थापन झाली म्हणून तिचे नाव अगदसतीस व डिंडीमन पर्वतावर वसली म्हणून डिंडीमनी देवी झाली. सायप्रसमधील दिक्ते पर्वतावर आष्टार्टेदेवी स्थापन झाली म्हणून ती दिक्तेयानी झाली. ही यादी खूप वाढविता येईल. गावाच्या नावा वरून अगर पर्वतवासावरून जशी नावे तिकडे बदलली तशी भारतातही बदलली आहेत. अष्टभुजादेवी विंध्यपर्वतावर जाऊन वसली म्हणून ती विंध्य-वासिनी समजतात. पण वास्तविक कौशिकी म्हणजे विंध्यवासिनी अष्टभुजा दुसरे स्थान आहे.

अंबादेवी आरासूर पर्वतावर स्थापन झाली म्हणून आरासुरी, चंडीने महिषासुराला ठार केले म्हणून महिषासुरमर्दिनी नाम पावली. चंडमुंडाला मारले म्हणून चामुंडा झाली तात्पर्य, दोनही ठिकाणी देवींची नावे प्रचारात येण्याचा प्रकार सारखाच आहे.

### शस्त्रधारी देवता.

भारतामधील देवतांचे वैशिष्ट्य म्हणून असे दाखवितात की, त्या नेहमी शस्त्रधारी असतात. राम, कृष्ण, परशुराम, गणेश कोणताही देव घ्या, हातात शस्त्रे आहेतच. विशेषतः शक्तिदेवता तर सर्वच शस्त्रधारी आहेत. पण तिकडे / पाश्चिमात्य देवतांपैकी अथेनादेवी हातात ढाल, तलवार बाळगते. अनाप--भाला, परशु, इस्टर–धनुष्य, बास्ट--ढाल, मा–कुऱ्हाड, खंजीर, बाळगणाऱ्या असून शस्त्रधारीच आहेत. दोघांची शस्त्रे बहुधा समानच आहेत.

इसीस, नीथ, न्हीआ, आदि देवता या सर्व देवांच्या माता समजल्या गेल्या आहेत. वास्तविक सर्व देवांची माता ही कोणीतरी एकच असावयास पाहिजे. पण तसे घडलेले दिसत नाही. हा फरक कदाचित् भक्ताने आपल्या इष्टदेवतेचे श्रेष्ठत्व स्थापन करण्याच्या उद्देशाने प्रचारिला असावा. भारतात सर्व देवांची माता म्हणून अदितीचाच उल्लेख आढळतो.

अनाहिता, आर्टिमिस, डिमिटर इत्यादि देवतांचे पूजनाच्या वेळी आणि त्यांचा क्रोध शांत व्हावा म्हणून पशुबळी अर्पण करण्यात येई. भारतात काली देवी ही सर्वांत वडील बहीण मानावी लागेल. कारण फक्त नवरात्रामध्ये पूजेच्या वेळी अनेक बळी अर्पण करण्यात येतात. कित्येक ग्रामदेवतांना सुद्धा कोंबडे, बकरे, डुकर बळी मिळाल्याशिवाय त्या शांत होत नाहीत.

अथेनी, आर्टिमिस, इसीस, इस्टार, डिमिटर, नीथ, मा, हलेनी, सेलेत, हॅथोर इ० सर्व देवता या मातृशक्तीच्या स्वरूपात आद्यशक्ति मानल्या गेल्या आहेत. तद्वत् भारतामध्ये लक्ष्मी, पार्वती आणि सरस्वती, गायत्री, अंबिका, सीता, सावित्री या देवता, मातृशक्तीचा अवतार मानल्या गेल्या आहेत.

### त्रिमूर्ति तत्त्व

त्रिमूर्तीचे तत्त्व दोन्हीकडे समानच आहे. ब्रह्मा, विष्णु, महेश, सरस्वती (सावित्री), लक्ष्मी, पार्वती या त्रिमूर्तीच्या जोड्या आम्ही मानतो. तर पाश्चिमात्य चंद्र, पृथ्वी, पाताळ ही त्रिमूर्ति मानते. सिरियन संस्कृतीत आटार गाटिस, हदाड तिचा मुलगा मिळून त्रिमूर्ति बनली, तर बॅबिलोनियन संस्कृतीमध्ये अनु (स्वर्ग)+ येळ (पृथ्वी)+ आप (जल) ही त्रिमूर्ति मानली गेली. का (आत्मा)+ खु (वासनादेह)+ शरीर ह्यांची इजिप्तमधील त्रिमूर्ति होते. शामस् (सूर्य)+ चंद्र + तारे यांची त्रिमूर्ति कोणी मानतात. मेक्सिकन देशांतही त्रिमूर्तीची कल्पना आहेच.

हलक्या प्रतीच्या देवता या दोन्ही ठिकाणी आढळतात व त्यांचे कार्यही साधारणपणे एकच आहे. शीतला, मरीआई, जोखाई, मरिअम्मा इ० देवता या चव्हाठा अगर तिकटीवरच्या देवता म्हणून आर्यभूमीत आढळतात. त्यांना शांत करण्यासाठी शिजविलेले अन्न, पाणी, कपडयाचा तुकडा, तिकटीवर ठेवतात. क्वचित् लहानसा पशूही बळी दिला जातो तिकडे हेकेटी, निरती देवी हेच कार्य करतात, आणि शांत करण्यासाठी वरीलप्रमाणे अन्नपाणी देतात.

## ग्रामदेवता

भारतात ग्रामदेवता म्हणून अनेक ठिकाणी देवळात, गाव शिवेवर अगर झाडाखाली धोडे धोंडे मांडून त्याजवर शेंदूर, गंधफूल घालून पूजन करतात. पाषाण हा येथे देवतेचे प्रतीक मानला जातो तेथे भक्ताची भावना वास करीत असते. देवतेचे स्वरूप हे तिच्या स्वभावगुणाचे दर्शक समजले जाते. पूर्ण ज्ञानी मनुष्य तर सगुणापलीकडे गेल्यावर निर्गुण स्वरूपाचीच पूजा करतो. त्याला समोर कोणत्याही देवतेचे प्रतीक लागत नाही. त्याची भावना, श्रद्धा, इतक्या उच्च कोटीला पोचलेली असल्याने त्याला कोणतेच सगुण रूप लागत नाही. असे असताना काही पाश्चिमात्य टीकाकार भारतीयांच्या या ग्रामदेवतेच्या पूजेला हसतात, हिणवतात पण इ. स. १९५१ च्या या अर्वाचीन सुधारलेल्या काळात एरिक न्यूमन व जेम्स यासारखे आद्य शक्तीचे संशोधक लिहितात की, त्यांची ग्रेट मदर ही सुद्धा असाच एक उल्का पाषाण आहे. रोमजवळील पर्वतावर तो प्रथम पूजिला गेला म्हणजे सर्वांत प्रमुख अशी शक्तिदेवतेचे स्वरूप एक पाषाणच आहे. अशी जर स्वत च्या ग्रेट मदरची उत्पत्ति आहे, तर मग कशासाठी कोणी कोणाला हसावे आणि हिणवावे ! हेच कळेनासे होते

## देवतांचे बीभत्स स्वरूप

आता शेवटचा एक मुद्दा घेऊन ही तुलना संपवू या विशाल, भयंकर, विदारक उग्र असे रूप भारतामध्ये एक काली देवीचे दाखविले गेले आहे तर तसे का आहे त्याची उपपत्ति आर्थर ॲव्हेलोनसारख्यांनी आपल्या ग्रंथातून दिली आहे तरीही त्या रूपाचे सम्यक ज्ञान झाल्याविना ते बीभत्स आहे अशी टीका केली जाते सत्य स्वरूप त्यांना समजते, तर ते टीका करते ना. परंतु या टीकाकारांनी अंतर्मुख होऊन आपल्या देवतेची स्वरूपे पूर्णपणे पाहिली आहेत किंवा नाही याची शंका येते. उदाहरणार्थ, आर्टिमिस देवी, लाइगी स्वरूप गॉरगन, हेकाटी, इसीस यांची स्वरूपे छापून प्रसिद्ध केलेली आहेत ही पाहावत

नाहीत इतकी अश्लीलतेच्या विरुद्ध आहेत. या विधानाची सत्यता पडताळावयाची असल्यास लाला लजपतराय यांचे 'फादर इंडिया' हे पुस्तक पहावे. जे अज्ञानी टीकाकार कालीदेवीचे स्वरूप बीभत्स समजतात त्यांनी अत्यंत बारकाईने निरखून पहावे की, त्या स्वरूपात सुद्धा तिचा कमरेखालील भाग हा तुटलेल्या हातांच्या माळांनी झाकलेला आहे, विवस्त्रासारखा उघडा नाही. या दोन्ही संस्कृतींमधील देवींची तुलना करता बीभत्सपणा कोठे आहे त्याचा निर्णय वाचकांनीच करावा.

## मूलगामी आर्यनीति

जे विद्वान् टीकाकार आर्यांच्या नीतितत्त्वावर टीका करतात, त्यांना ती पूर्णपणे उमगलेली नाहीत असेच म्हणावे लागेल. पुरातन काळापासून ती चालत आलेली आहेत आणि उच्चच राहिली आहेत. म्हणून असे म्हणण्यास प्रत्यवाय नसावा की, काली देवीच्या स्वरूपात जरी उग्रपणा, भीतिदर्शन नसले तरी बीभत्स-प्रकार मुळीच नाही.

## नाण्यावरील ठसे

पाश्चिमात्य देवतांचे निरीक्षण करताना एका गोष्टीचा प्रामुख्याने उल्लेख केलाच पाहिजे. बोघाजक्वेयू, ॲटिक येथील उत्खननात जे अवशेष मिळाले त्यामध्ये काही नाणी मिळाली आहेत. अर्वाचीन नाण्यावर जशी राजपुरुषांची अगर वंद्य व्यक्तींची चित्रे त्यांच्या स्मृतीस्मरणार्थ पोस्टाच्या तिकिटावर छापतात, त्याप्रमाणे पूर्वी आपल्या पूज्य देवतांची चित्रेही नाण्यावर छापीत असत. त्याकालीन समाज धार्मिक वृत्तीचा असल्याने आराध्यांची चित्रे नाण्यावर असण्यात भूषण मानणारा होता. येसली या उत्तर ग्रीसमधील गावी अथेना देवीचे चित्र असलेले नाणे आढळले आहे. सिरियामध्ये एका सोन्याच्या नाण्यावर अस्टार्ट देवीचे चित्र आहे. इसवी सनाच्या सुमारास इजिप्तमध्ये एका तांब्याच्या नाण्यावर इसिस देवीचे चित्र रेखाटले आहे. रोम शहरी गार्डियन बादशहा राज्य करीत असता कोरादेवीचे चित्र त्याने आपल्या नाण्यावर घातले. दुसऱ्या एका रोमन नाण्यावर डायनादेवीचे रथात बसून चालली असल्याचा देखावा आहे. शक अगर कुशान राजांनी जी नाणी पाडली त्यामध्ये एकावर निपूरची निनलिल देवीचे स्वरूप खोदलेले आहे. अशी अनेक उदाहरणे नमूद करता येतील. भारतामध्ये जुनी नाणी मिळाली आहेत, लक्ष्मी, गजलक्ष्मी, भद्रा, पुष्कलावती, कुमारदेवी, नानिआ, सिंहवाहिनी दुर्गा, दुर्गादेवी अशा शिक्क्यांची

नाणी आढळली आहेत. पतंजली म्हणतात की, मौर्यराजांनी आपला रिकामा झालेला खजिना भरण्यासाठी देवीविषयक नाणी अधिक किमतीस विकली.

## आदिशक्ति सर्वत्र एकच

आदिशक्तीसंबंधी मूलतः सर्वांची कल्पना सारखी कशी आहे हे पाहण्यासाठी काही विद्वान् लेखकांची मते पाहणे इष्ट ठरेल. 'दी ग्रेट मदर' या ग्रंथाचा कर्ता एरिक न्यूमन आपल्या ग्रंथात मान्य करतात की, आदिशक्ति स्वरूपे खालील देवतामध्ये दृग्गोचर होतात'—ब्रिटोमार्टिस, दिक्त्याना, सिबिल, मा, डिंडिमनी, हेकेटी, आर्टिमिस्, डिमिटर, पर्सोफिन, सलेनी, मेडुसा, अफ्रोदिता, ईष्टोर, इसिस, इ० इ० ( पृ० २७५ ), तसेच सरजॉन् वुड्राफ् आपल्या 'शक्ति व शाक्तज' या ग्रंथात म्हणतात की, एडवर्ड सलोन या संशोधकाच्या मते आद्यशक्तीची स्वरूपे खालील देवतामध्ये आढळून येतात:— इसिस, काली, ईष्टोर, इडा ( गायत्रीदेवी ), त्रिपुरासुंदरी, अयोनिक मदर, ॲफ्रोदिता, जॅस्टार्टे, बेबीलोनमधील मिल्लिता तारा, हेलेनिक ओसिया, आफ्रिकन डल्यो, रोमन जुनो, इजिप्तची वास्ट, असिरियनची मदर मुकुय, फ्रिया, सिबिल, कुंडालिनी, गुह्य-महाभैरवी इ० इ० ( पृ० ३० ).

या दोन ग्रंथकाराची मते येथे मुद्दाम देण्याचा हेतु इतकाच की, पाश्चिमात्य संस्कृतीत आद्यशक्तीचे स्वरूप त्यांनी ओळखले आहे, आणि त्याप्रमाणे ते मानतात. आपले भारतीयच ब्रह्म-माया यात गुरफटलेले नसून जगातील सुधारल्या समजणाऱ्या देशातील विद्वानाची हीच स्थिति आहे. यावरून एवढेच समजावयाचे की, धर्मतत्त्वे कोणतीही असोत, मूलतत्त्व सर्वत्र सारखेच आहे.

## देवतांची मूलतत्त्वे एकच

मूलतत्त्वे सर्वत्र सारखी कशी होती हे सी. आर. कॅडन या गृहस्थाने एक तक्ता तयार करून जगापुढे मांडली आहेत. आर्यवंशीय हे पंचमहाभूतांचे पूजक होते. प्रत्येक भूताच्या ठायी एक अधिष्ठात्री देवता मानलेली होती उत्तरध्रुवापासून आर्यांच्या टोळ्या निघाल्या आणि प्रथम दक्षिणेकडे निरनिराळ्या मार्गांनी आल्या. नंतर त्या पूर्व व पश्चिमेकडे विभागल्या गेल्या व नवीन प्रांतात स्थाईक झाल्या तरी आपली मूळची संस्कृति त्यांनी कायम ठेवली. पंचमहाभूतात्मक देवींची पूजा चालू ठेवली. स्थानपरत्वे नावात बदल आढळला तरी त्यांचे मूळस्वरूप कायम राखले गेले. निरनिराळ्या संस्कृतींमधील त्यांची नावे, दर्शविणारा हा पुढील तक्ता पहा म्हणजे अर्थ ध्यानी येईल व समानता कळून येईल.

| मूळस्वरूप | अक्केडिअन् | असिरियन | ग्रीक | लॅटिन | हिंदु | इजिप्त | सिरिया |
|---|---|---|---|---|---|---|---|
| आकाश | औ | इलु | औरोनासे | कोलस | ब्रह्मा | नट | सुल्ह |
| पृथ्वी | नाना | बेलतु | गी | टेरा | देवी | सेब | बलाथ |
| सागर | ए | आ | ओकोनासे | नेपच्युन | विष्णु | ओसिरिस | डॅगोन |
| नरक | नेरगळ | बेल | हरदेस | प्लूटो | यम | सेट | बाळ |
| सूर्य | तामुझ | समस | हेलिआसे | अपोलो | कृष्ण | होरस | शमस |
| चंद्र | इस्टर | अस्टारथु | आर्टिमिस् | डायाना | सिनिवाली | इसिस | अस्थोरेथ |
| द्यौस | मेर | रिमॉन | झ्यूस | ज्युपिटर | इंद्र | शू | हदाद |
| देवदूत | अक्कू | नेबो | हरमिस् | मर्क्युरी | अग्नि | ऑनिस | एस्युन् |

तसेच भारतीय देवतांच्या पाश्चिमात्य नावांचा काही नमुना पहा.

इंद्र–झ्युस अगर ज्युपिटर
दुर्गा–जुनो
कृष्ण–अपोलो
रति –व्हीनस
लक्ष्मी–सिरीज्

वरुण–नेपच्युन
सरस्वती–मिनर्व्हा
कार्तिकेय–मार्स
यम–प्लूटो

गणेश–जानुस
काम–क्युपीड
कैलास–इडा
मेरू–ऑलिंपस
( मार्टिन, पृ. ६ )

मूळची एकच संस्कृति असल्याने नामसादृश्य नसले तरी मूर्तीचे कल्पना-सादृश्य आहे असे दिसून येईल.

## पाश्चिमात्यांची ज्ञानलालसा

अनेक विषयांत संशोधन करून ज्याप्रमाणे पाश्चिमात्यांनी ग्रंथ-निर्मिति केली, तशी ती आद्यशक्तीच्या स्वरूपाबद्दलही केली आहे. भारतात फक्त एस्. के. दीक्षित यांनी मातृशक्तीवर एक ग्रंथ प्रसिद्ध केलेला आहे. त्याव्यतिरिक्त त्या स्वरूपाचे विवरण करणारा दुसरा ग्रंथ मला आढळला नाही. हिंदुधर्मग्रंथांतील देवदेवतांचे अतिशय परिश्रम करून जे संशोधन पाश्चिमात्यांनी केले आहे, तेच बहुधा सर्व संशोधकांना मार्गदर्शक होते, संपूर्ण स्वरूप समजण्यास उपयोग होतो. देव-देवतांच्या जीवितकार्याचा विश्वासार्ह पुरावा उपलब्ध झाल्याने त्याचा स्वभाव समजू शकला व इतिहासपूर्व काळातही त्याचे समाजावर केवढे वजन होते याची त्यामुळे माहिती मिळाली. त्यांच्या तीव्र कोटीतील ज्ञानलालसेमुळे हे सर्व शक्य झाले आहे. एरिक न्यूमन, जेम्स् हेस्टिंग, मॅक्डोनल्ड, मॅक्स् मुलर इत्यादि लेखकांची अवाढव्य ग्रंथरचना पाहिली आणि ती स्वकीय नाही तर परकीय भाषेतील— म्हणजे अनेक थोर विद्वानांची मती कुंठित होते. सन १९५९ साली इगर्टन नावाचा जर्मन संशोधक भारतात येतो. पुणे येथे मराठी भाषा शिकून मीमांसा शास्त्राचा अभ्यास करतो. त्या वेळी झालेल्या वाजपेय-यज्ञाचे बारकाईने निरीक्षण करतो आणि इंग्रजीमध्ये ग्रंथनिर्मिति त्याने केल्यावर मग आमची विश्वविद्यालये जागी होतात, आणि तो ग्रंथ अभ्यासक्रमामध्ये नेमतात. अनेक भारतीय विद्वानांनी त्याच्या या ज्ञानलालसेचे गुण गायिले आहेत. रत्नपारखीच हिरे पारखू शकतो, इतरेजनाचे ते काम नाही. स्वामी विवेकानंदासारख्यांनी पाश्चिमात्यांचे गुण पूर्णपणे ओळखले होते आणि त्याबद्दल ते एके ठिकाणी म्हणतात की, " खरे युरोपियनत्व ज्या गुणामध्ये आहे, त्यापैकी एकही गुण आम्ही भारतीयांनी उचललेला नाही. त्यांची उद्यमपरता, चिकाटी, कालनियमित्व, ज्ञानलालसा, सर्वगामिता, साहस, कल्पकता, दीर्घदृष्टि, स्वदेशप्रीति, नेमस्तपणा, दक्षता, धोरणीपणा, दमदारी, नियमितपणा, महत्त्वाकांक्षा, स्वावलंबन-प्रियता, प्रसरणशीलता, कार्यैकपरता, विद्याव्यासंगिता, टेक, पोच, सफाई इत्यादि अनेक स्पृहणीय गुण जे हरघडी पहावयास सांपडत आहेत, त्यांतील एकतरी कोणी आमच्यातून उचलला आहे काय ! नुसते विचार आणि बाह्यांग (बहिरंग) युरोपिअन केल्याने तुम्ही विटंबनेला मात्र पात्र होता. इंग्रजाचे इंग्रजत्व चहा, कॉफी, सोडा, लेमन पिण्यात, मटण खाण्यात किंवा सूटबुटात नाही तर वरील गुणांत आहे."

## डॉ. ॲनीबिझांट व श्रीकृष्णलीला

डॉ. अॅनिबिझांट या पाश्चात्य विदुषीने भारतात आल्यावर संस्कृतभाषा शिकून सर्व पौराणिक ग्रंथांचे परिशीलन भारतीय दृष्टिकोनातून केले आणि ग्रंथनिर्मिति केली. श्रीकृष्णाच्या बाळलीलेबद्दल अर्वाचीन विद्वान व अनेक धुवट सोवळे, पाश्चिमात्य दृष्टिकोनातून एखादी विदारक टीका वाचून मूळ ग्रंथाचा अभ्यास केल्याशिवाय उगीचच नाके मुरडतात, आणि वाह्यात टीका करून भाविकांच्या श्रद्धेला धक्का देतात. आपली ज्ञानलालसा तृप्त करण्या साठी बाईंनी श्रीकृष्णचरित्राचा सखोल अभ्यास केला आहे आणि श्रीकृष्णलीले बद्दलची टीकाकारांची तोंडे बंद केलेली आहेत. आपल्या धर्मग्रंथांचे परिशीलन न करता व दुसऱ्यांनी ते ऐकविले तर त्यावर विश्वास न ठेवता जेव्हा मनुष्य चार्वाकपणाने जीभ वायफळ चालवितो, छिद्रान्वेषीपणा करीत राहतो आणि स्व-बांधवांची निंदा करतो अशा लोकांसाठी बाई म्हणतात, " ऋषिजनहो, आपण आजकालच्या असल्या या अपात्राच्या हाती श्रीमद्भागवत लागू दिलेत, त्यापेक्षा इतर पुराणग्रंथाप्रमाणे ते लपविलेत का नाही! कृष्णप्रभूच्या प्रेमलीलांना निंदे वाचून आणि सकाम दृष्टीवाचून मानवाची निर्मळ व पवित्र दृष्टीने बाचण्याची पात्रता येईपर्यंत तो भागवत ग्रंथही लपविला का नाही?" श्रीकृष्णावरील गोपीप्रेमाची साक्ष कबीर कशी देतात ती पहा.

> कबीर कबीर क्या करो । जाचो जमुनाके तीर ।
> एक एक गोपीके प्रेममें । हो गये कोटि कबीर ॥

पाहिजे तर या पूर्वकालीन गोष्टी सोडून द्या. इ. स. १९६० च्या मे महिन्यात एक जर्मन युवक आपला मायदेश सोडून भारतासारख्या परदेशात येतो. ज्ञानलालसा तृप्त करण्यासाठी पुण्यात राहतो. मधुकरीसंस्थेचा अभ्यास करण्यासाठी मस्तकावर फक्त शेंडी राखून संपूर्ण हजामत करवून घेतो सोवळे नेसून गळ्यात जानवे घालून भर दुपारच्या उन्हामध्ये अनवाणी इतर मधुकरी मुलांबरोबर झोळी घेऊन गावात आठ दिवस फिरतो. हे सर्व कशासाठी? तर भारतीय मधुकरी संस्थेचा इतिहास शोधण्यासाठी, त्यातील हालअपेष्टांची प्रत्यक्ष माहिती करून घेण्यासाठी, त्यांचे चटके अनुभवण्यासाठी. आजकालच्या शिकल्या-सवरलेल्या सुशिक्षितांची मधुकऱ्यांसाठी पाट्या बदलण्याची वृत्ति कोणीकडे, आणि एका पाश्चिमात्य तरुणाची त्याच संस्थेतील ज्ञान मिळण्याची लालसा कोणीकडे? जमीनअस्मान इतका फरक. पाश्चात्यांची ही ज्ञानपिपासू वृत्ति अव्याहत चालूच आहे. सन १९६६ साली वर्तमानपत्रात माहिती प्रसिद्ध झाली की, एक जर्मन श्रीमंत बापाची मुलगी आपल्या सुखाच्या जीवनाचा त्याग

करून, आठ वर्षे भारतामध्ये मंदिरशिल्पाचे संशोधन करण्यासाठी फिरत आहे जवळ एक मोटारगाडी, त्यामध्ये एक छायाचित्रकार, एक दोन मजूर व आपण भारतामध्ये अनेक ठिकाणी फिरून जरूर पडल्यास थोडेसे उत्खनन करून, मंदिर-शिल्पाचे चित्रीकरण करीत आहे. आजवर सुमारे तेहेतीस हजार चित्रे तिने जमविली आहेत हे तिचे संशोधन पुरे झाल्यावर, मग त्याचे मनन आणि वर्गी करण करून नंतर तो प्रचंड ग्रंथ तयार व्हावयाचा आहे तो तयार झाल्यावर मग आम्हाला कळणार की, आमचे मंदिरशिल्प किती रेखीव व शास्त्रशुद्ध आहे ते या स्वातंत्र्याच्या युगातही आम्हाला अजून परकीयांनी अन्न शिजवून, तोंडा-मध्ये घास भरविणे किती श्रेयस्कर आहे याचा सुज्ञांनी विचार करावा याबद्दल विपुल लिहिता येईल पण मूळ उद्देश तो नव्हे. पाश्चिमात्यांची ज्ञानलालसा स्वामी विवेकानंदांनी म्हटल्याप्रमाणे किती पराकोटीची आहे याच्या प्रदर्शनार्थ ही उदाहरणे घेतली इतकेच या पार्श्वभूमीवर आजच्या भारतीय तरुणांनी आपली ज्ञानलालसा पारखून घ्यावी इतकेच म्हणतो म्हणजे झाले

## तान्त्रिक स्वरूप

आद्यशक्तीच्या पूजनात शक्तिपंथाला महत्त्व आलेले आहे त्या पंथातील लोक शास्त्रापेक्षा तन्त्रावर जास्त भर देतात तेव्हा हे तांत्रिक म्हणजे काय ? आणि त्याचा वामाचार मार्गाबरोबर कसा हितसंबंध आहे, हे पाहणे उद्बोधक आहे कारण वामाचाराबद्दल सर्वत्र एक तिरस्करणीय भावना पसरलेली आहे, ती सत्य का असत्य याचे थोडक्यात विवेचन करणे शक्तिसंशोधनाच्या या ग्रंथात इष्ट वाटते

तान्त्रिक धर्म हा सर्वसाधारणपणे वैदिक धर्माबरोबरच चालत आला आहे, असे दिसते कारण दोन्ही धर्म हरिहरापासूनच उत्पन्न झाले आहेत ज्याप्रमाणे हरि हर ही जोडी अभेद्य आहे त्याचप्रमाणे हे दोन्ही धर्म अभेद्यच आहेत स्वत भगवान् श्रीमद्भागवतामध्ये सांगतात, ' वैदिक , तान्त्रिको मिश्र इति मे त्रिविधो मख । ' याचा अर्थ असा की, वैदिक, तान्त्रिक, तथा वेद आणि तन्त्र या तीन प्रकाराने माझा यज्ञ करता येतो वैदिक आणि तांत्रिक ह्या पद्धति जर एकमेका पासून निराळ्या ठेवल्या तर द्वैतभाव वाढेल या भीतीस्तव आमच्या ऋषींनी सनातन धर्मामध्ये वेदतन्त्रमिश्रित कर्मकांड आणि उपासनामार्ग या दोन्ही पद्धति निर्माण केल्या आहेत कोणत्याही मार्गाने जरी आचरण केले तरी तो ज्ञानकांडाकडेच जातो

## वाममार्गी

परंतु ' कालस्य कुटिला गति । ' या न्यायाने आजकाल तन्त्रशास्त्राची संपूर्ण माहिती न घेता तांत्रिक म्हणजे वाममार्गी हेच समीकरण मनात आणून

त्या मार्गावर टीका होत असते तांत्रिक मार्गामध्ये सुद्धा दक्षिणाचारी लोक आ
हे काही वेळा छोट्यारूपाने निघाले आहे वाममार्गाचा विचार करताना त्या
पच प्रकाराने भावरून न जाता या शब्दाचे स्पष्टीकरण शोधले पाहिजे. 'अ
वामस्य सूक्त तु जपेश्वा-यत्र वा जले ।' (ऋग्वेद) वामसूक्ताने पाठ केला अ
विष्णुपद प्राप्त होते. निरुक्तामध्ये वामशब्दाचा अर्थ प्रशस्य असा केला अ
आणि प्रशस्य व्यक्तीच प्रज्ञावान् होऊ शकते. 'य एव हि प्रज्ञावानस्य एव
प्रशस्या भवन्ति। (दुर्गाचार्य)' यावरून असे अनुमान करावयास हर
नाही की, प्रज्ञावान् योगी म्हणजे वाममार्गी होय. तन्त्रशास्त्राचे प्रत्यक्ष प्रव
भगवान् शकर म्हणतात, 'वामो मार्ग परमगहनो योगिनामप्यगम्य ।' म्ह
वाममार्ग हा फार कठीण आहे, आणि काही वेळा योगी लोकानाही अग
ठरता आता योगीलोकाना जो अगम्य आहे तो इद्रियलोलुप मानवाना
सहजसुलभ होणार ? शकराचे स्वत चे वचन तर असे आहे की, 'लोलुपो न
भजेत् ।' वाममार्गाने जाणारा लोलुप मनुष्य हा नरकगामी ठरतो वाममार्ग
जितेंद्रिय लोकासाठी आहे, आणि प्राय योगीच जितेंद्रिय असू शकतो तेव्हा
मार्गाचे अधिकारी कसे पाहिजेत याची व्याख्या आढळते ती अशी

परद्रव्येषु योऽन्धश्च परस्त्रीषु नपुसक ।
परापवादे यो मूक सर्वदा विजितेंद्रिय ॥
तस्यैव ब्राह्मणस्यात्र वामे स्यादधिकारिता ॥

परद्रव्य, परदारा, तथा परापवाद—विन्मुख, सयमी ब्राह्मण हाच व
मार्गाचा अधिकारी होऊ शकतो या मार्गाचा अधिकारी होणे किती क
आहे हे वरील व्याख्येवरून ध्यानी येण्यासारखे आहे

अय सर्वोत्तमो धर्म शिवोक्त सर्वसिद्धिद ।
जितेंद्रियस्य सुलभोऽन्यास्य स्यादनन्तजन्मभि ॥ (पुरश्चर्यार्णव

भगवान् शकरांनी उपदेशिलेला सर्वसिद्धि देणारा हा वाममार्ग, इं
जिंकलेल्या योगी लोकानाच सुलभ आहे विषयलोलुप माणसाला अनतजन्म घेउ
ही साध्य होण्यासारखा नाही तत्राची गति गूढ असल्याने त्यातील भावही
असतो वेदशास्त्राचे सपूर्ण तत्त्वज्ञान आत्मसात् करणारा जितेंद्रिय योगी,
शास्त्रातील गूढार्थांचे विवरण करून स्वत च्या आचारात आणणाराच वाममार्गी
खरा अधिकारी होऊ शकतो तत्रग्रथामध्ये अशारीतीने वाममार्गाचे अधिक
कोणी व्हावे, याचे सपूर्ण विवरण पहावयास मिळेल आजकाल बगालमध्ये दु
पूजेच्या निमित्ताने अगर कालीदेवीच्या आराधनेनिमित्त जो मार्ग आचरला ज

आणि हिडिस प्रदर्शन घडविले जाते ते वाममार्गाचे विकृत स्वरूप समजावयास पाहिजे. मनुष्य एकदा पराशक्तीप्रत पोहोचला म्हणजे तो स्वतःला विसरतो. याचे उत्तम उदाहरण आजच्या काळी पहावयाचे असेल तर वज्रेश्वरी येथील नित्यानंद स्वामींचे देता येईल. तसेच कै. गुरुवर्य रानडे हे सुद्धा या स्थितीला पोचले होते, असे प्रत्यक्ष पाहणारे सांगतात. स्वतंत्र भारताचे दुसरे अध्यक्ष डॉ. राधाकृष्णन्-सारखा तत्त्वज्ञानी आणि एक वेळचा त्यांचा वर्गबंधू हे त्यांना भेटावयास गेले असता त्या ध्यानमग्न स्थितीत त्यांना ओळखणेही कठीण गेले असे शिष्य सांगतात. तात्पर्य, समोर चित्र दिसते, पण चित्त परमानंदात मग्न असल्याने समोरच्या चित्रास हा योगी ओळखू शकत नाही. ब्रह्मानंदात मग्न असलेले चित्र कोणत्याही प्रियवस्तूच्या दर्शनाने विचल होत नाही. कारण तेथे त्याचा ठसाच उमटत नाही.

## दक्षिणाचारी

दक्षिणाचारी पंथाचे ४ पोटभाग आहेत—(१) वैदिक, (२) वैष्णव, (३) शैव व (४) दक्षिणआचार. पण या सर्वांनाच दक्षिणाचारी संबोधिले जाते. हा पंथ सामाजिक नीतितत्त्वे व बंधने पाळतो. वाममार्गाचे वामाचार, सिद्धातआचार आणि कौलआचार असे पोटभेद आहेत. वर सांगितलेच आहे की, या मार्गाचे आचरण करणारे लोक कडक शिस्तीचे असावे लागतात. ज्यांचा मनावर व पंचेंद्रियांवर पूर्ण ताबा आहे, व ज्यांना या मार्गाचा गूढवाद पूर्णपणे आकलन झाला आहे त्यांच्याचसाठी हा मार्ग आहे. लुंग्या-सुंग्यासाठी नाही हे निश्चित समजावे; परंतु इतकी साधनशुचिता न पाळता काही भक्त विकृत स्वरूप आचरतात, आणि म्हणूनच या मार्गाबद्दल लोकांत तिरस्कार निर्माण झालेला आहे. आजही बौद्धसंप्रदायामध्ये या सर्वोत्तम अवस्थेपर्यंत पोहोचलेले व कौल आचार पाळणारे योगी आढळून येतात. सर जॉन वुड्रॉफसारखे तंत्रशास्त्रावरील अधिकारी लेखक हेच म्हणतात की, तांत्रिक मूळ बाजूला सारून त्याविरुद्ध आचार होत असल्याने वाममार्गाला विकृत स्वरूप प्राप्त झाले आहे. कामाख्या देवीची पूजा बहुधा दक्षिणाचारी पद्धतीने होते.

## मयासूर संस्कृति

पाताळखंडाचे विवेचन करताना मयासूर दैत्याचा उल्लेख आढळतो. मेक्सिकोमध्ये सूर्य व ॲस्टीक संस्कृतीबरोबरच मयसंस्कृतीचा उल्लेख करावा लागतो. तेव्हा खरोखर हे प्रस्थ काय आहे हे पहाणे उद्बोधक वाटल्यावरून येथे थोडेसे विवरण करण्याचे ठरविले आहे. तारकासूर वधाच्या वेळी मयासूर दैत्याने आपल्या मनात कल्पना केल्याप्रमाणे तीन पुरे उत्पन्न केली. पहिले लोखंडाचे

नगर, दुसरे रुप्याचे, ज्यात विद्युन्माली दैत्य राहिला व तिसरे सुवर्णाचे, ज्यामध्ये स्वतः मयासूर राहिला. दैत्यांनी आपल्या संरक्षणासाठी या शहराला तीन प्रकारचे संरक्षक कोट उभारले असे समजून हा प्रश्न टाळण्याइतका सोपा दिसत नाही. कारण, त्या शहराची रचना कशाप्रकारे केली जाई याचे संपूर्ण वर्णन मिळते, आणि ते आधुनिक स्थापत्य शास्त्राच्या दृष्टीनेही विचारार्ह आहे.

मयासुराने उभारलेल्या शहराची रचना कशाप्रकारे असावी हे सांगताना तो म्हणतो, शहराच्या मार्गावर कोट उभारावेत, पुराला द्वारे असावीत, घराला गच्च्या असाव्यात आणि त्यावर गोपुरे असावीत. घराच्या बाजूने मोठा राजमार्ग असावा तिव्हाटयाच्या ल्हान मोठया गल्ल्या व चव्हाटे असावेत. अत पुरात भरपूर जागा असावी. वटवृक्षासहित तळी, विहिरी, सरोवरे, बागा, सभागृहे व राज्याची क्रीडावने असावीत इ० इ०. पुराणकार असे सांगतात की, मयासूर नवीन नगरे वसविण्यासाठी पश्चिमेकडे जाई, तेव्हा ती इच्छामात्रेच उत्पन्न होत. म्हणजे याचा इत्यर्थ असा की, त्वरित त्याची बांधणी होत असे. देवांनी सदा द्वेषच करावा, अशी सोने, रुपे, लोखंड यांची रत्नजडित नगरे दैत्यांची असत. मयासुराने एकूण अशी १०८७ नगरे बांधली असल्याचा उल्लेख मिळतो. ती सर्व नगरे वरीलप्रमाणे सर्व सोयींनी युक्त व सुंदर अशी सारखी होती. ( प्रत्यक्ष वर्णन पहावयाचे असल्यास मत्स्यपुराण अ० १२९ पहावा. )

हे सर्व वर्णन मेक्सिकोमधील शहराना लागू पडते असे अर्वाचीन संशोधकाचे मत आहे त्या देशापासून पश्चिमेकडे म्हणजे क्रमाने पॉलेनेशिया, मॅलेनेशिया, या मार्गाने भारताकडे असे सरळ सरळ अनुमान दिसते. अतल, वितल आदि सप्त पाताळे कोणती, याचा बोधपूर्ण ऊहापोह प. चित्रावशास्त्री यांनी आपल्या चरित्रकोश परिशिष्टात केलेला आहे. पण ते या पाताळाची भौगोलिक सीमा सध्याच्या न्यूझीलंडपर्यंतच नेतात त्यानतरचे संशोधक भिक्षु चमनलाल यांचा ' हिंदु अमेरिका ' हा ग्रंथ वाचल्यावर पाताळ म्हणजे अमेरिका हाच निष्कर्ष निघतो प चित्रावशास्त्री सुद्धा श्वेतद्वीप म्हणजे अमेरिका खंड असाच अर्थ देतात सोन्याचांदीची नगरे उभारण्याइतकी अलोट संपत्ति या काळी दैत्याजवळ होती मेक्सिको, पेरुदेश हे आजही सोन्याच्यासाठी प्रसिद्ध आहेत. लंकेत सोन्याच्या विटा ही त्या वेळची परिस्थिति दिग्दर्शक उक्ति आजही प्रचारात आहे पूर्वीच्या आणि आजच्या परिस्थितीत फरक पडलेला नाही जगातील सर्वात मोठा सुवर्णसाठा अमेरिकेत केण्टकी राज्यात फोर्ट नोक्सजवळ आहे. त्याचे वजन दहा हजार टन आणि किंमत सुमारे ८१५७ कोटी रुपये होईल. तो साठा भूगर्भात ८० फूट खोलीच्या तळघरात, लोखंडी दरवाज्यात व

१० पहारेकऱ्यांच्या रक्षणाखाली आहे माणसाचे उचीचे गोष्यप्रमाणे चौकोनी चारस तुकडे आहेत आर्यांनवळ संपत्ति नसल्याने ते दैत्यांचा हेवा करीत असावेत त्यांजबरोबर युद्ध करून त्यांची संपत्ति हरण करीत असावेत संस्कृति प्रकरणाबरोबर दोघांमध्ये द्वेषाचे हेही एक मूळ कारण असू शकेल शंकराचार्य खरेशास्त्री आपल्या 'मंत्रशास्त्र' ग्रंथात म्हणतात, पाताळ म्हणजे अमेरिका देशातील असुरांना अश्वमेधाच्या वेळी पांडवानी जिंकले, खंडणी वसूल केली व मया सुराला हस्तिनापुराला आणून त्याच्याकडून मयसभा बांधून घेतली हाच उल्लेख महाभारतात आहे

काही वर्षांपूर्वी पाटलिपुत्र ( पाटणा ) येथे प्राचीन वस्तुसंशोधन खात्याचे काम चालले असता तेथे अति प्राचीन काळी बांधण्यात आलेला सभामंडप व राजगृह जमिनीत गाडलेली सापडली कोणी या कामाची तुलना असुर मंडळींच्या कामाबरोबर केली ( आर्यांच्या सणाचा इतिहास, पृ १०५ ) पण त्यांनी कल्पिल्याप्रमाणे हे असुर म्हणजे इराणी बंधू नसावेत आर्यांच्या देवांनाच इराणी बंधू असुर म्हणतात, आणि अशा अद्भुत बांधणीशी देवांचा संबंध जोडणे मुतराम योग्य होणार नाही शिवाय घरबांधणी कशी करावी, याचे मयासुराने उत्तम शास्त्र तयार केले होते त्या ग्रंथाचे नाव 'मयामतम्' असे आहे विमान विद्या त्याला अवगत होती त्यानी बांधलेल्या विमानाची नावे वैहायस व सोम अशी होती ( भागवत स्क ८ । १० । ६ ) यावरून असे दिसून येईल की, दैत्य म्हणजे कोणी रानटी लोक नसून उत्तम सुसंस्कृत व कलाकुशल संस्कृतीचे होते आपले स्वत्व टिकविण्यासाठी त्यानी देवांबरोबर युद्धे केली युद्धामध्ये प्रतिपक्षाला नामोहरम करणे हे ध्येय सर्वांनच असते ते त्यानी अनुसरले

## पुराणकाली दैत्य वस्ती

अशी दैत्यवस्ती त्या काली कोठे कोठे होती हे थोडक्यात पाहू या

अतल, वितल या पाताळ भागात तर दैत्यांची वस्ती होती, असे अनेक पुराणातरी सांगितले आहे भगवान् विष्णूच्या नारसिंह अवतारापासून भारतामध्ये दैत्य या शब्दाचा वापर केलेला आढळतो प्रल्हादाचा पिता हिरण्यकशिपू हा दैत्य समजला जातो शुक्राचार्य हे त्याचे गुरु वामन अवताराच्या वेळी बळीचे साम्राज्य विस्तारले होते व ते पूर्वेकडील देशे व्यापून राहिले असावे आर्यांनी आपल्या संस्कृतीच्या विस्तारकार्यात त्याला मागे लोटीत लोटीत बळी पेटापर्यंत नेला म्हणजे त्याला सप्तपाताळात घातला उत्तर भारत, आसाम, ब्रह्मदेश, जावा, सुमात्रा इतक्या विस्तीर्ण प्रदेशात त्याची वस्ती असल्याचे पुरावे

मिळतात. बळी हा दैत्यवंशीय राजा परम विष्णुभक्त होता, तरी त्याला मागे लोटण्यात आले. परशुराम काळी दैत्यांची राज्ये शोणितपूर, आसाम इत्यादि ठिकाणी होती. सहस्रार्जुनासारखा दैत्य त्या काळी नर्मदाकाठी वावरत होता. पण परशुरामकाळ म्हणजे ब्राह्मण-क्षत्रियवादाचा काळ धरला जातो. क्षत्रियांनी ब्राह्मणांचा छळ मांडल्याने त्याला त्या जातीवर वर्चस्व गाजवावयाचे होते. म्हणून त्याने अनेक वेळा नि:क्षत्रिय पृथ्वी केली.

प्रभू रामचंद्राच्या काळी यज्ञाचा विध्वंस होऊ लागला, म्हणून त्याचे रक्षण करण्यासाठी विश्वामित्राने रामलक्ष्मणाला अयोध्येच्या जंगलात आणले आणि दैत्यांचा नाश करविला. दंडकारण्यातही तुरळक दैत्यवस्ती होती, हे ताटका आणि खर दैत्यांचा वध यावरून दिसून येईल. अर्थात त्या वेळी या भागावर रावणाची सत्ता असावी. नाशीक हे त्यांचे संरक्षणव्यवस्थेमधील टेहळणीचे नाके असावे. रावणाचा वध रामाने लंकेत जाऊन केला. बळीचा पुत्र बाण हा शोणितपूर ( हिमालय प्रदेश ) व नरकासूर हा कामरूप ठिकाणी होऊन गेला. हिडिंबराक्षस व हिडिंबा यांचा भीमाबरोबरचा संग्राम प्रसिद्धच आहे. पांडव वनवासात असता एकचक्रा ( एरंडोल–धुळे ) नगरीत बकासुरराक्षसाचा भीमाने वध केला. सुमारे सहा वर्षांपूर्वी वर्तमानपत्रात बातमी होती की, नाशिकजवळ दोन राक्षस शरीराचे बारा फूट लांबीचे सांगाडे सापडले आहेत. अर्जुनाने मयासुराचा पराभव पाताळात जाऊन केला. कृष्णावतारानंतर यांचे नाव कोठे आढळत नाही. अर्थात हे सिद्धच आहे की, आर्यांची वस्ती सर्व भारतात पसरली, ती समर्थ झाली, पूर्वींच्या अनार्यांचा पराजय होऊन ते हतबल झाले आणि दुष्प्रवृत्तीला लगाम पडल्याने दैत्य समजला जाणारा वर्गच नष्ट झाला. सारांश, आर्यांनी आपल्या प्रसरणकाळी पूर्वींच्या अनार्यांना दैत्य म्हणून संबोधिले आणि आपल्या विजयी वृत्तीची श्रेष्ठता दाखविण्यासाठी अनार्यांना दैत्य बनविले, त्यांच्या स्वसंरक्षणाच्या धोरणावर दुष्टपणाचा आरोप केला आणि त्यांचे भडक चित्र जगापुढे उभे केले.

### दैत्यवृत्ति

दैत्य अगर असुर म्हणजे काही खास जमात नसून ती इतर मानवांसारखीच होती इतकेच नव्हे तर दोन सख्या बहिणींची ती मुले होती. हे सिद्ध करण्यासाठी दोन उदाहरणे पाहू. पुणे येथील वि. स. बापट म्हणतात की, नरकासुर हा जनकराजाचा मुलगा. हा एक अनाथ मुलगा जनकाजवळ आला आणि त्याला जनकाने मोठा केला. पण पुढे त्याला स्वतंत्र राज्य स्थापण्याची इच्छा झाल्याने तो तेथून निघून गेला आणि रानटी टोळ्या जमवून तेजपूर

येथे राज्य स्थापन केले. पुढे त्याच्या दुष्कृत्यामुळे त्याला दैत्य म्हणू लागले. मुंबईतील देवीचा इतिहास पाहता चौदाव्या शतकात मुबारक दैत्याच्या त्रासाने काही देवस्थाने हलली असा उल्लेख मिळतो. पण हा मुबारक दैत्य इतर कोणी नसून दौलताबाद जिंकणाऱ्या मुसलमान सुभेदाराचा एक सरदार मुबारकखान या कोकणप्रांताचा व्यवहार पाहात होता. तोच दैत्य झाला. लंका येथील रावण हा दशग्रंथी ब्राह्मण होता. पण दुष्प्रवृत्तीने वागल्याने दैत्य झाला. दुष्ट क्रूरवृत्तीने वागणाराला आजही दैत्य ही उपाधी लावली जाते, ही मुंबई शहरातील काही मराठी भाषिक दैनिके वाचताना दिसून येते. तेव्हा दैत्य म्हणजे त्या त्या काळची दुष्ट माणसे हा अर्थ घेणे योग्य ठरेल.

### महीष कोण ?

महिषासुर, शुंभ, निशुंभ इ० दैत्य म्हणजे रूपक असावे असे कित्येक विद्वानांचे मत आहे. एकनाथ म्हणतात, " मोहमहिषासुर मर्दुनी " म्हणजे मोह हाच महिषासुर होय. तसेच शुंभ निशुंभ, मधु-कैटभ म्हणजे अहंकार राग इत्यादिकांचे रुपक असावे. आदिशक्तीचे मूळ रूप समजल्यावर विश्वाची उत्पत्ति करणाऱ्या शक्तीची ओळख मानवाला झाली म्हणजे मोह, अहंकार यांचा नाश होतो हाच त्याचा अर्थ आहे.

### नाम संशोधन

देवतांची नावे शोधताना आणि त्यांचा समावेश या ठिकाणी करताना एक दृष्टिकोन पाळला आहे. तो असा की, पृथ्वीतलावर पूर्वी जे चिरंतन कार्य करून पुरुष होऊन गेले त्यांच्या स्त्रियांची नावे टाळण्याचा प्रयत्न केला आहे. कारण जरी काही ठिकाणी त्यांना आज देवतास्वरूप आले असले तरी एके काळी ते मानवरूप होते. जसे मनुप्रजापतीची माता शतरूपा, त्यांची पत्नी अनंती, अंगराजपत्नी व वेनराजाची माता सुनीथा, दक्षप्रजापतीच्या अनेक कन्या दनु, अदिती, सुरसा, सुरभि, विनता, कद्रु इ० इ०, श्रीरामप्रभूंच्या माता कौसल्या, कैकेयी, श्रीकृष्णाच्या माता देवकी, यशोदा इ० इ० यांचा देवता म्हणून उल्लेख टाळलेला आहे तसेच अहल्या, अनुसया, तारामती, सावित्री, मंदोदरी, तारा या जरी वंदनीय मानल्या असल्या तरी त्यांचा निर्देश टाळला आहे, हे ध्यानात असावे. या स्त्रिया वंदनीय आहेत, पण देवता नाहीत.

### ग्रामदेवता

शक्तिपीठांची माहिती जरी बरीच आलेली असली तरी स्थानिक ग्रामदेवतांची माहिती प्राय नाही म्हटली तरी चालेल. या ग्रंथातील ग्रामदेवता या

विषयावरील प्रकरण लक्षपूर्वक वाचल्यावर असे आढळून येईल की, सर्व ग्राम-देवतांची माहिती एकत्रित करणे फार कठीण आहे व खर्चीक आहे. कोणी प्रयत्न करून पहावा. तेव्हा अनेक वाचकांच्या दृष्टीने यामध्ये ग्रामदेवता प्रकरणात न्यूनत्व व अपुरेपणा वाटण्याचा संभव आहे, त्याबद्दल क्षमा असावी. ब्राह्मण व काही समाजाच्या देवता या प्रकरणामध्ये काही समाजाच्या देवतांची यादी दिलेली आहे. भारतामध्ये जे निरनिराळे वन्य समाज चहूकडे पसरले आहेत ते शक्तिपूजक आहेत, त्यांच्या ग्रामदेवता अलग आहेत. आर्यांच्या शक्तिपीठाची हे लोक विशेष पूजाअर्चा करीत नाहीत. त्या पीठापासून फटकूनच वागतात. आजच्या सुधारलेल्या राहणीतसुद्धा त्यांनी आपल्या देवता अलग राखलेल्या आहेत. म्हणून जेवढी माहिती उपलब्ध झाली तेवढी या प्रकरणात पहावयास सापडेल.

## देवतांचे दर्शन

देवताचे दर्शन घडते काय? असा प्रश्न सर्वसाधारण जनता विचारीत असते. देवावर विश्वास नसणारे तर बेधडक ठोकून देतात की, देवबिव सर्व झूट आहे. तो कोणालाच दिसत नाही. येथे मला हे दाखवून द्यावयाचे आहे की, असली अनुभवशून्य विधाने करण्यापूर्वी त्यांनी या ग्रंथातील काही कथा अधिक लक्षपूर्वक वाचाव्यात व त्याचे एकाग्र चित्ताने प्रथम मनन करावे.

( १ ) कालीदेवीचा इतिहास वाचताना त्यांना दिसून येईल की, स्वामी रामकृष्णपरमहंसांना देवीने साक्षात् दर्शन दिले होते. त्यांनीही आपले शिष्य स्वामी विवेकानंद यानाही देवीचे दर्शन घडविले.

( २ ) कालीदासाने गडकाली येथे तपश्चर्या केल्यावर देवी प्रकट झाली व स्वतः तो त्या वेळी आपली मान तरवारीने अर्पण करू लागला, त्या वेळी त्या देवीने त्याचा हात वरचेवर धरला, त्याला दर्शन दिले. त्याचे नाव कालीदास असे ठेवून त्याच्या जिव्हेवर सरस्वती अखंड राहील असे त्याला वरदान दिले.

( ३ ) *समर्थ रामदास स्वामींचे जेष्ठ बंधू गंगाधरपंत यांनी रामरायाचे सगुण* स्वरूपात दर्शन व्हावे, म्हणून वयाचे ९ वे वर्षी, कडकपणे हनुमंताची तपस्या केली. पाण्याचा थेंबही त्या काळात मुखात घेतला नाही. याप्रमाणे ११ दिवस तपस्या झाल्यावर, हनुमंत सगुण स्वरूपात अवतरले, आणि त्यांनीच गंगाधर-पंतांना रामरायाचे दर्शन घडवून आणले. शके १५३५ फाल्गुन महिन्यात समर्थांनी जेष्ठ बंधूजवळ बीजमंत्राचा उपदेश मागितला. वय लहान, अपरिणत बुद्धि म्हणून त्यांनी देण्यास नकार दिला. त्यावेळी समर्थांनी हनुमंताची उपासना

केली, ते प्रसन्न झाले, आणि रामरायाचे प्रत्यक्ष दर्शन घडले. स्वतः रामप्रभूंनी ' श्रीराम जयराम जय जय राम ' ह्या बीजमंत्राचा उपदेश समर्थांना दिला.

( ४ ) यमाई देवीचा भक्त कुळकर्णी याच्या घरी देवी प्रकट झाली. त्याच्या सौभाग्यवतीचे बाळंतपण केले. घरातील कामे केली आणि शेवटी त्यालाही दर्शन देऊन त्याच्या मागोमाग औंधपासून किनई गावापर्यंत आली.

( ५ ) रामानंद महाराज बीडकर हे नर्मदा नदीची परिक्रमा करीत असता दोन वेळा नर्मदादेवीने त्यांना दर्शन दिले आणि त्यांची संकटे दूर केली.

( ६ ) शेगावचे गजानन महाराज नर्मदा नदीतून नावेत बसून चालले असता खडकाला आपटून नावेला भोक पडले. तेव्हा नर्मदादेवी प्रकट होऊन तिने नाव सावरून धरली आणि महाराजांना नदीच्या काठावर आणले. इ० इ०.

ही सर्व उदाहरणे आधुनिक आहेत ज्यांना देवाचे दर्शन झाले असे जे लोकांना सांगतात, ती माणसे सामान्य नव्हेत. जनसमुदायामध्ये मान्यता पावलेली आहेत. योगसामर्थ्याने पराकोटीला पोहोचलेली आहेत. त्यांचे भक्त त्यांना प्रति ईश्वर मानतात. मग या सर्वांचे अनुभव खोटेच म्हणावयाचे काय ? अर्थात् त्यांचे सामर्थ्य ज्यांना कळतच नाही त्यांनी विरोधी आवाज उठविला नाही तरच नवल. आजकाल माणसाची वृत्ति स्वतःच्या दुर्बल वर्तनावरून दुसऱ्याची पारख करण्याची झाली आहे. साधुसंतांच्या वचनावर व अनुभवावर निष्ठा व विश्वास नसल्यामुळे ज्यांनी याचा विचारच केलेला नाही त्यांना हे सर्व खोटे वाटते. आपण एक साधे उदाहरण घेऊ.

महाभारत असे सांगते की, भीमाला नवनागाचे बळ होते बकासुर वधाच्या वेळी त्याने गाडाभर अन्न खाल्ले. पेशवाईच्या काळात बाळंभट ब्राह्मणाने हाताने चार्दीची भाडी वाकविली. दुसऱ्या एका कुलाबा जिल्ह्यातील ब्राह्मणाने आपले संपूर्ण जेवण झाल्यावर दीडशे केळ्यांचा घड आणि बरोबर तीन शेर लोणकढे तूप खाऊन दाखविले. सन १९३६ च्या सुमारास राजापूर येथे रा. गोविंदराव गुणे यांच्या लग्नप्रसंगी लेखक स्वत इतर सहा माणसांच्याबरोबर साडेतीन तास म्हणजे ३ ते ६।। पर्यंत जिलब्यांचे जेवण जेवला व शेवटी आचारीबुवांनी नमस्कार घातला, तेव्हाच पंगत संपविली ही उदाहरणे आजच्या पिढीतील एक सिंगल चहा पिणाऱ्या माणसांना कशी खरी वाटणार ? आपल्या दुर्बल आहारावरूनच ते भीमाची अगर इतरांची परीक्षा करणार ! सुप्रसिद्ध मल्ल किंगकाँग यांना आहार वाचला, तर अनेकांना भोवळच येईल.

तद्वतच आध्यात्मिक गंध नसणारीही माणसे म्हणतात की, देवाचे दर्शन होणे ही गोष्ट खोटी. स्वतःची पात्रता वाढवावयाची नाही, अधिकारी व्यक्तीवर विश्वास ठेवावयाचा नाही, तेव्हा ते आपल्या दुर्बल अनुभवावरून दुसरे कोणते मत देणार, याचा विचार चाणाक्ष वाचकांनी करावा. एकनाथ महाराजांनी सांगितल्याप्रमाणे 'भाव आहे तेथे देव आहे' हेच खरे. भाव नाही त्यांना देव दिसणार नाही. आधुनिक संतकवि तुकडोजी बुवा हेच सांगतात. 'मनीं नाहीं भाव । देवा मला पाव । देव बाजारचा भाजीपाला नाही रे ।।' हेच सत्य आहे.

अलौकिक गुणांनी संपन्न असलेल्या यशस्वी योगी पुरुषाला, जनसमुदाय ईश्वराचा अथवा आदिशक्तीचा अवतारी पुरुष मानतात. केवळ लोककल्याणा-प्रीत्यर्थ आपल्या असामान्य सामर्थ्याने, समयानुरूप प्राप्त झालेले कार्य तडीस नेणाऱ्या विभूतीला अवतार म्हणतात. समाजाने, राष्ट्राने अथवा व्यक्तीने ज्या ज्या वेळी उत्कट भावनेने लोककल्याणासाठी, ईश्वराची अनन्यभावे प्रार्थना केली आणि अवतार घेण्याची तळमळीची हाक मारली, त्या त्या वेळी त्या दयाघन आदिमायेने अवतार घेतलेला आहे. आपल्या अचाट सामर्थ्याने भक्तांची संकटे निवारण केली आहेत, असा धार्मिक इतिहास ग्वाही देत आहे. याजसाठी शतकानुशतके त्या आदिमायेचे अनेक स्वरूपात नित्य पूजन, भजन, मनन समाजात अखंड चालू राहिलेले आहे. सातव्या शतकात बौद्ध धर्माचे आक्रमण परतवून लावण्यासाठीच आद्य शंकरांचा जन्मावतार झाला, आणि कार्य-समाप्ति करून वयाच्या ३२ व्या वर्षी समाधीस्थ झाले. अगदी हीच स्थिति ज्ञानेश्वर–तुकारामांची आहे. छत्रपति श्रीशिवाजीराजे यांचा अवतार मुसलमानी आक्रमण हटविण्यासाठीच झाला. अशी अनेक उदाहरणे भारतभूमीत आजही घडत आहेत. विसाव्या शतकातील अरविंदबाबू, रमण महर्षि व भगवानस्वरूप श्रीधरस्वामींना अवतारी पुरुषच मानतात.

नास्तिक बंधूंनी देवतेकडे आणि त्यांच्या चमत्कारांकडे पाहण्याचा दृष्टिकोन प्रथम बदलला म्हणजे आजही विसाव्या शतकात देव आहे, तो कोणत्या ना कोणत्या रूपाने अवतरतो, लोकांना दिसतो हे त्यांनाही पटेल. या गोष्टीचा उलगडा त्यांच्या बुद्धिवादाला जोपर्यंत करता येत नाही तोपर्यंत भाविकांप्रमाणे त्यांनीही विश्वास ठेवावा हेच उचित वाटते.

यासंबंधी जर आपणाला शंकानिरसन करून घ्यावयाचे असेल, तर भारतीय संस्कृतिकोश ( खंड १ ) मधील ईश्वर या शीर्षकातील मजकूर भावनेने वाचावा म्हणजे, त्याच्या अस्तित्वाविषयी आणि कर्तृत्वाविषयी शंकानिरसन होईल, असा भरंवसा वाटतो ( पृ० ५७८ ).

## आदिशक्तिरूप व गणेशसाम्य

महिषासुरमर्दिनी, काळरात्री इत्यादि देवतांच्या उत्पत्ति आपण पाहिल्या असता वेळकालानुसार त्यामध्ये जसा बदल झालेला दिसतो, त्याप्रमाणे गणेशाच्या जन्माच्या बाबतीत आढळून येते. पार्वतीने अंगाच्या मळापासून गणेशाची मूर्ति बनविली व विष्णूने त्यात प्राण घातला. तसेच नरतांकच्या विनाशासाठी विनायक, बल्लाळाच्या उद्धारासाठी पालीच्या बल्लाळाचा जन्म झाला असा अनेक कथा दाखविता येतील. देवीच्या बाबतीत मस्तक सर्वत्र एकच असल्याचे आढळते, तर गणेशाच्या बाबतीत ही संख्या निरनिराळी आहे. नेपाळमधील सूर्यविनायक, हेरंब-गणपती, नागापट्टण, टिरोवोट्टिपूर येथील मूर्तींना पाच पाच मस्तके आहेत. पण या उलट प्रकार हिमालयातील मुडकटा गणपतीचा आहे. त्याला मुळी मस्तकच नाही. म्हणून पूजेच्या वेळी छातीला गंध लावावे लागते. मूर्तींच्या हाताच्या बाबतीत तोच प्रकार आढळतो. देवीला दोन, चार, आठ, अठरा, एकशेआठ याप्रमाणे हात आढळतात. त्याप्रमाणे गणेशाच्या बाबतीत आढळते. इंडगुंजी, गोकर्ण महाबळेश्वर येथे दोन हात, नेपाळमधील सूर्यविनायक व महाराष्ट्रातील अनेक स्थानी चार हात, नेपाळातील हेरंब गणपति, मदुरा व टेंकाडी येथे दहा हात, तर बानपूर ( टिकमगड ) येथील मूर्तीला १९ हात असलेले आढळतात. तिसरे साम्य शरीर भागांत. देवीची उंची धातूंच्या बाबतीत काही अगुळे तर पाषाणमूर्ति २ फूट, ४ फूट, बारा फुटांपर्यंत आढळते. सप्तशृंगी येथील मूर्तीची पूजा शिडी लावून करावी लागते. गणेशाच्या लहानमोठया मूर्ति आहेत. अजिंठा-वेरुळजवळ खडकामध्ये ८ फूट, नागपूर शुक्रवार तलावाजवळ ६ फूट उंच, तर वाई येथे ढोल्या गणपतीची पूजा शिडी लावूनच करतात. प्रांतानुसार गणेशाला बलम्पुरी विनायक, इदम्पुरी विनायक, तुंबीकाई अलवार, आलयद्रपिल्लैयार लयन्तुपिल्लैदार, अष्टविनायक, बल्लाळ, मोरयागणपति, महावरदगणपति, लेंडी गणेश इ० नांवे आढळतात.

तात्पर्य, आदिशक्तीच्या स्वरूपात जसा फरक आढळतो तद्वतच गणेशाच्या बाबतीत आढळतो. आपल्या आवडत्या इष्टदेवतेला कालानुरूप व प्रसंगानुरूप लहानमोठे अनेकरूपी बनविणे हे भक्ताच्या कल्पनेवर अवलंबून आहे. सांप्रत गणेशोत्सवात मूर्ति कशाप्रकारे बनविल्या जातात ते निरीक्षण केले तर वरील विधानास दुजोरा देणारेच ठरेल.

## शक्तिपूजा आणि संत

महाराष्ट्रातील ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकारामादि सर्व संत वैष्णव होते आणि यासाठीच त्यांनी विष्णुस्वरूप पाडुरंगाची भक्ती केली व लोकाना तीच शिकवण दिली. दुसरी लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे हे सर्व आर्यधर्माचे प्रसारक होते. हिंदुसमाज रचना आणि त्यांची वाढ यांचा विचार करता व आक्रमक चालू असता या संस्कृतीने अनेक लहान लहान वंशखंड आपल्यामध्ये सामावून घेतले आणि त्यांच्यापाशी मनुष्यबळ कमी असल्याने त्या त्या वंशखंडां-नाच कामास लावून, अनेक उद्योगधंदे व द्रव्य उत्पत्तीचे मार्ग उपलब्ध करून दिले. श्री. म. माटे म्हणतात की, हे वंशखंड आर्यसंस्कृतीमध्ये मिसळताना, त्यानी आपली दैवते बरोबरच आणली. ही दैवते बहुधा सर्व स्थानमहात्म्य असणारीच दैवते होती. शिवस्वरूपी बहिरोबा, खळनाथ, वेताळ, म्हसोबा इ० इ० पुरुष दैवते, तर जोखाई, दुर्गाम्बा, वाघेश्वरी, बहिरी, घंटादेवी, नवलाई, डंगलाई. इ० इ० पार्वतीस्वरूप स्त्रीदैवतेही होती. आर्य संस्कृतीमध्ये विलीन झालेले बहुजन समाज याच देवतांचे पूजन करीत असत, आणि आर्यांचे पांडुरंगासारखे शुद्ध स्वरूप देवांना मानीत नव्हते. इस्लाम अथवा ईसाई धर्मप्रचारकानी आक्रमण-काळी आक्रमक संस्कृतीची देव-मंदिरे उध्वस्त करून, आपली स्थाने स्थापन केली. आर्यधर्मीय संत हे सहिष्णु असल्याने, त्यांनी ही अनार्यांची दैवते उखडून काढली नाहीत, तर त्याच्या पूजा व उत्सव याजवर कोरडे ओढून, त्यांना त्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला. मनातील अंतस्थ हेतु असा की, हा सर्व समाज विठ्ठलाचा भक्त व्हावा, आर्यांच्या देवताच्या मागे यावा.

ज्ञानेश्वर महाराज तेराव्या अध्यायातील, अकराव्या श्लोकावर भाष्य करताना लिहितात.

कुणवट कुळवडी । तैसा आन आन देव मांडी । आदिकाची परवडी । करी तया ॥ ८१२ ॥ माझी मूर्ती निफजवी । ते घराचे कोनी बैसवी । आपण देवोदेवी जायी । यात्रा कारणे ॥ ८१५ ॥ एकादशीचे दिवशी । जेतुला पाडु आम्हासी । तेतुलाचि नागासी । पंचमीचे दिवशी ॥८१८॥ चौथी मोटकी पाहे । आणि गणेशाचाचि होये । चावदशी म्हणे माये । तुझाचि वो दुर्गे ॥ ८१९ ॥ इ. इ.

देवरूपेसाठी सैरावैरा पळणाऱ्या भक्ताचे हे चित्र ज्ञानेश्वरांनी रंगविले आहे. एकाच ठिकाणी निष्ठा नाही, हे त्यांना दाखवावयाचेच आहे. पण त्याच-बरोबर आपले वंशखंडातील पूर्वीचे देवाना सोडावयाचे नाही आणि तीच शक्ति-पूजा चालू ठेवणारावर प्रतिकूल टीकाही आहे.

संत एकनाथ महाराज तर आर्येतर देवतांवर तुटूनच पडलेले आहेत. इतकेच नव्हे तर त्यांना पिटाळून देण्यावरच संतुष्ट न राहता विठ्ठलाचीच पूजा करा असे आग्रहाचे प्रतिपादन करतात.

देव म्हणती मेसाबायी । पूजाअर्चा करिती पाहीं ।
नैवद्य वाहती नारळ । अवघा करिती गोंधळ ।
मेंढरें बोकड मारिती । सुकी रोटी तया म्हणती ।
वळेंचि आणिती अंगा । नाचताती शिमगा सोंगा ॥

वरीलप्रमाणे शाक्त पद्धतीने पूजन करून, खंडोबाचें भंडार लावून दिवट्या घेऊन नाचणाराला महाराज कळवळून विचारतात,

सांडोनिया विठाबाई । कारे पूजिता मेसाई ।
अरे जोगाई तुकाई । इज पुढें बापुडया काई ।
काय देईल ती ओंगळ । सदा खाय अमंगळ ।
आपुलिये इच्छेसाठी । मारी जीव लक्षकोटी ।
एका जनार्दनी माझी आई । तिहि लोकीं तिची साई ॥

तुकाराम महाराजांच्या वेळी शाक्त पूजेवर त्यांनी भयंकर भडिमार केलेला आहे. काही वचने पहा :—

नव्हे आसाई जोखाई । मायराणी मेसाबाई ।
बळिया माझा पंढरीराज । जो या देवांचाही देव ।
रंडी चंडी शक्ति । मद्यमांसातें भक्षिती ।
वेताळे फेताळे । जळो त्यांचें तोंड काळें ।
तुका म्हणे चित्ती । धरा रखुमाईचा पती ॥

शाक्तांच्या उपासना मार्गावर तर तुकोबाचा भयंकर रोष दिसतो.

शाक्त गधडा जये देशीं । तेथें राशी पापांच्या ।
मद्य भक्षण मांगिण जाती । विटाळ चित्तीं साठविला ।
स्तवूनिया पूजी रांड । न लाजे भांड, दाढिसी ।
तुका म्हणे भगवती । नेईल अंतीं आपणापे ॥

या प्रमाणे शाक्त पथियांवर कोरडे ओढून शेवटी सार काढले आहे की, ही भगवतीची पूजा, अथवा तिच्याच इतर स्वरूपाची ही शाक्तपथीय पूजा, पूजकाला घनघोर यातना भोगावयाला लावील, तेव्हा बहुजन समाजाने वरील गोष्टीचा त्याग करून विठ्ठलाच्या उपासना मार्गाकडे वळावे हेच श्रेयस्कर होय.

किंवा असेही संभवते की, आर्य-अनार्य देवतांच्या बुजबुजाटात खरा देव कोणता, ते तुकारामाना दाखवून द्यावयाचे होते. म्हणूनही त्यांनी या लहान सहान देव देवतावर टीकेचा प्रहार केलेला असावा.

समर्थ संप्रदायातील परम निष्ठावान शिष्य दिनकर गोसावी आपल्या स्वानुभव दिनकर ग्रंथामध्ये शक्तिपूजेचे किती भीषण स्वरूप वर्णन करतात हे खालील काही काव्यावरून कळून येईल.

कुळवधु निर्लज्ज झाल्या । त्या हीन जातिसी रतल्या ।
लोकापवादे भ्रष्टल्या । देशोदेशीं फिरती ॥
असो ऐसी आद्याशक्ती । तियेसी कोणी न विचारती ।
आणि मर्थ्येंची थोतांडे चढविती । नाना प्रकारची ॥३९॥
कोणी उपासती बाळा बगळा । कोणा उच्छिष्ट चांडाळीचा सोहळा ।
नाना जाति मिळोनी अन्योन्य कवळा । येकांकार करिती ॥४०॥
वनमाळीनी मेसको भैराळी । शिवाभवानी कंकाळी ।
कालिका काळरात्री भद्रकाळी । वनशंकरी मातंगी ॥४१॥
कचळार्णव क्रिया अघोर मंत्र । शाक्तागम प्रेतसाधन विचित्र ।
भग माळीनी पूजा स्वतंत्र । मध्यरात्री समयीं ॥४२॥
कुंभपूजा कंचुकी विधान । अघोर क्रिया मद्यपान ।
आणि त्रिपुरसुंदरी पूजन । कामाक्षा विधी ॥४३॥
बाह्याकारें शाक्तनाम मिरविती । आणि कर्म करूं नये ते करिती ।
अभक्ष भक्षुनी अंगिकारिती । मद्य आणि उन्मत्त द्रव्यें ॥४४॥
भगपूजामिसें परदारा भोगिती । कचळमिसें भ्रष्टाकार करिती ।
परस्त्री हातीं स्वलिंग पूजा करविती । नाना विषयभोगार्थ ॥४५॥

धंड पापाड करू लागले, आणि जे करू नये तेच आचरण करू लागले. मद्य-मांसादि पंच-प्रकाराचे भरपूर विडंबन करून शरीरसौख्यार्थ त्याचे रूपांतर केले, आणि म्हणूनच संताचे टीकेस ते पात्र झाले. वास्तविक बाराव्या शतकापासून सतराव्या शतकापर्यंत परकीय संस्कृतीचे आक्रमण आणि धुडगूस चालू असता, महाराष्ट्रीय संतांनी प्रतिकारार्थ शक्तिपूजेचे महत्त्वच वर्णन करावयास पाहिजे होते, पण तसे त्यांनी केलेले नाही, याचे कारण वरील उताऱ्यामध्ये मिळते. त्यांचे सर्व वाङ्मय वैष्णवभक्तीसंबंधी असून, भजनामध्ये म्हणण्यासाठी एकही अभंग शक्तिदेवतेसंबंधी नाही, इतके ते एका टोकास गेलेले आहेत, असे दिसून येते. पाखंड्यांचे खंडण करण्यात सर्व लक्ष एकवटल्यामुळे, अभंगरचनेकडे दुर्लक्ष झालेले असावे, असे सार काढता येईल.

## छाया-चित्रे

वरील विवेचनावरून वाचकांच्या ध्यानी येईल की, या ग्रंथात सुद्धा छाया-चित्राची केवढी आवश्यकता आहे, याची जाणीव असली तरी आर्थिक कष्टेमुळे शक्य झाले नाही. भारतीय देवतांची प्राचीन व अर्वाचीन उत्खननात आढळलेली काही स्वरूपे, तसेच एलिफंटा, एलोरा, येथील खोदकामाची काही चित्रे देता आली असती तर वाचकांबरोबर लेखकाचाही आनंद द्विगुणित झाला असता. पण लेखकाला जेवढी छायाचित्रे देणे शक्य होईल, तेवढी तिन्ही खंड छापून झाल्यावर, चित्रावलीचे रूपाने देण्यात येतील.

## ग्रंथ–कल्पना

या ग्रंथाची जुळवणी करताना जे अनेक विषय निवारण्यास योग्य वाटले त्याचा परामर्ष घेतल्यावर आता स्वतःबद्दल चार शब्द लिहिणे योग्य वाटते. प्रथम म्हणजे या ग्रंथाची प्रेरणा कशी झाली हे पाहताना सुरुवातीला थोडेसे दर्शन केलेच पाहिजे. पंधरा वर्षापूर्वी मुंबईशहर पोलिस खात्यातून सेवानिवृत्त झाल्यावर गोरेगावी काही सामाजिक संस्थात काम करण्याची संधी मिळाली. त्यांपैकी श्री अंबाबाई देवस्थान ही एक संस्था होय. हे देवस्थान ७८ वर्षांचे जुने असून प्रत्यक्ष कार्यकर्त्यांच्या अभावी मागे पडले होते. येथील धार्मिक कार्यक्रम आयुक्त करून ते ऐकताना असे दिसून आले की, भारतात अनेक शक्तिपीठे आहेत, त्यांच्या चित्तवेधक कथा आहेत, आजच्या विसाव्या शतकात ही अभक्तांची श्रद्धा बसावी असे चमत्कार उपलब्ध आहेत, पण त्यांचे संकलन झालेले नाही. देवीबद्दल जे काही साहित्य उपलब्ध आहे ते इंग्रजी अगर संस्कृतमध्ये असल्याने बहुजन समाजास त्याचा व्हावा तसा उपयोग होत नाही. तेव्हा जनीवजा मराठीमध्ये काही करता आले तर पहावे म्हणून हा प्रयत्न केला आहे.

## देवीअनुग्रह

> यावन्नानुग्रहः साक्षाज्जायते परमेश्वरात् ।
> तावन्न सद्गुरुं कश्चित् सच्छास्त्रं चापि नो लभेत् ॥ १ ॥
>
> (योगवासिष्ठ २१)

साक्षात् परमेश्वराचा अनुग्रह जोपर्यंत झाला नाही तोपर्यंत सच्छास्त्र किंवा सद्गुरु यांची प्राप्ती होणार नाही, त्याचप्रमाणे या ग्रंथाचे आहे. वरील श्लोकावर माझा पूर्ण विश्वास आहे. प. सातवळेकर मला म्हणाले, "तुमच्या मनात हा विषय येणे आणि तुम्ही इतके कार्य करणे हेच तुमचे भाग्य होय." या श्रेष्ठ वचनातील गर्भितार्थ माझ्या मनाला ततोतत पटला आहे.

## आधारभूत माहिती

अर्वाचीन भारतीय इतिहासकारांनी देवताविषयक दृष्टिकोनातून इतिहास लिहिलेला नाही. पुराणग्रंथ प्रक्षिप्त आहेत असे काही संशोधक म्हणतात. तेव्हा लेखी वा कर्णोपकर्णी जी माहिती हाती आली ती सत्याच्या विषयाची चाळण न मारता येथे उध्दृत केलेली आहे.

पण जी माहिती आली आहे, ती आधाराशिवाय घेतलेली नाही. मग तो आधार काव्ये, पुराणे, इतिहास, दंतकथा अगर प्रत्यक्ष निवेदन कोणत्या तरी प्रकारचे असेल हे सत्य आहे. अशा प्रकारचा ग्रंथ तयार करताना अनेक स्थळांना प्रत्यक्ष भेट देऊन माहिती जमा करण्याचा जो एक प्रघात आहे, तो मला पूर्णपणे आचारता आलेला नाही तेव्हा वाचकांना विनंती इतकीच की, अनेकांच्या कुलदेवतांचे दर्शन येथे पूर्णपणे घडलेले नसेल, कदाचित नुसता नामनिर्देश मिळेल, काही वेळा तोही मिळण्याची न्यूनता आढळेल. ऐतिहासिक घटनांच्या स्थळ-काळादिकातील सत्यासत्य शब्दाचा कीस काढलेला नाही.

ज्याला आधुनिक महिपति असे साहित्यसम्राट न. चिं. केळकर संबोधित होते, अशा संतकवि दासगणू महाराजांच्या चरित्रात या गोष्टीचा खुलासा उत्तम प्रकारचा आलेला आहे. इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांजबरोबर दासगणूंची त्यांच्या संतचरित्राबद्दल चर्चा चालू असता, राजवाडे क्रोधाने म्हणाले, "तुम्ही कीर्तनकारांनी मातीत घातलेत राष्ट्राला, काही तरी भाकडकथा, कीर्तन प्रवचनातून वर्णन करता आणि यामुळेच लोक दुबळे होतात. तेलाचे पाणी झाले पाण्याचे तूप झाले, अशा गोष्टींस सगळे कागद खर्च करावयाचे काय ?"

दासगणूंनी यावर दिलेले उत्तर अतिशय मार्मिक आहे. ते म्हणतात, " अहो, तुमचे पाहूनच आम्ही कीर्तनकार मंडळी हे सर्व शिकलो. सुताने स्वर्गाला जावयाचे कौशल्य तुम्हामध्येच अधिक. कल्पनेच्या वावड्या अधिक कोण उडवितो ? तुम्ही संशोधक तरी काय दिवे लावता ? सगळे वाद हलक्यासलक्या तपशिलात. ही गोष्ट सत्तावीस साली घडली का तीस साली घडली, पंचवीस तारीख खरी का अठ्ठावीस तारीख खरी. अमुक ऐतिहासिक व्यक्तीची उंची किती, यासाठीच सगळे वाद ! प्रसिद्ध तरवारीची लांबी तीन फूट दोन इंच होती, का तीन फूट चार इंच होती, यातच सगळे बळ खर्ची पडते आणि श्रमाचा व वेळेचा अपव्यय करताना ! घटनेच्या मागील हेतु आणि ऐतिहासिक मूल्य कितिदा उघड करून दाखविता ! सगळा भर परमार्थतः निरुपयोगी असलेल्या स्थळकाळाच्या निश्चितीवर व्यर्थ दवडिता. आम्ही कीर्तनकार चरित्रे रचितो, ती मानवांची निष्ठा वाढीस लागून, चारित्र्यवान् प्रजा निपजावी या शुद्ध हेतूनेच सर्व धडपड करतो. " दासगणू पुढे निक्षून सांगतात,

वृक्षाचें पाहिल्या मूळ । दिसेल दगड माती आणि गाळ ।
म्हणूनि चिखल चिवडूं नका । फळ स्वादिष्ट तेंचि चाखा ।
इतिहासासी देऊं नका । महत्त्व भक्ती वर्णनी देखा ।
इतिहासासी महत्त्व देतां । पुण्यफळ नयेचि हातां ॥

हा मतभेद तर कर्णोपकर्णी चालत आलेल्या दंतकथा, पुराणात कितीतरी मतभेद आढळणार. आणि त्या सर्वांची छाननी कोण करणार ! शिवाय त्याचा उपयोग काय !

## निष्ठावान वाचक

हा ग्रंथ वाचताना एक गोष्ट वाचकांनी पक्की लक्षात ठेवली पाहिजे की, यातील माहिती अगर विधाने वाचताना ईश्वरावर अगर आदिशक्तीच्या कर्तृत्वावर संपूर्ण निष्ठा असावयास पाहिजे. त्या निष्ठेने हा ग्रंथ वाचल्यास आदिशक्तीची अगाध लीला कळून येईल. प्राचीन धर्मग्रंथातील काही विधाने रूपकात्मक असण्याची शक्यता आहे. आधुनिक पद्धतीने गुणदोषावलोकन करणाऱ्या वाचकास त्यामध्ये विपरीत दिसण्याचीही शक्यता आहे. उदा० कृष्ण व राधा किंवा गोपी यांचे संबंध, श्रीकृष्णाच्या १६१०८ स्त्रिया, गोपालतापिनी उपनिषदा मध्ये यासंबंधी असे दाखविले आहे की, येथे तीनही वेदातील ऋचांचे हे रूपक केले आहे. गोपी म्हणजे शरीरातील गात्रे तर राधा म्हणजे शरीरातील जीवात्मा होय. तेव्हा श्रद्धेने वाचन केल्यास शब्दाच्या उघडपणे दिसणाऱ्या वाच्यार्थावर वाचक फसला जाणार नाही. आधुनिक वाङ्मयाचा दृष्टिकोन अगर कसोटी या ठिकाणी लागू होण्यासारखी नाही हे ध्यानी असू द्यावे.

## प्रकरणाची मांडणी

शक्तिपीठाची माहिती देताना नाव, ठिकाण, स्वरूप, दंतकथा व चमत्कार आणि आजची स्थिति यांचे संक्षिप्त वर्णन प्रथम दिलेले आहे. त्यायोगे सामान्य वाचकास त्या शक्तिपीठाची माहिती होऊ शकेल. हाती आलेली माहिती वाचकांना संपूर्णपणे कवितारूपाने देणे अशक्य वाटल्याने काही जागी प्रथम गद्यामध्ये संपूर्ण माहिती आणि नंतर काव्य अशी मांडणी केली आहे

## ग्रंथकार—लेखक नव्हे

आदिशक्तीसारख्या अतिशय महत्त्वाच्या विषयावर ग्रंथ तयार करणे हे काम सोपे नव्हे. त्याला अतिशय उत्कृष्ट लेखकाचे गुण अंगी असावयास पाहिजेत. मजजवळ ते नाहीत हे कबूल करण्यास मला मुळीच संकोच वाटत नाही.

या ग्रंथात माझे स्वतःचे असे काहीच नाही. हिंदुधर्मावरील धार्मिक पुस्तकांत जी माहिती आद्यशक्तीबद्दल उपलब्ध झाली ती एकत्रित केली आहे. तुलनात्मक दृष्ट्या तीही माहिती जोडलेली आहे. आदिशक्तीच्या कर्तृत्वाची, व्यापकतेची, भव्यपणाची कल्पना यावी, यासाठीच हा सारा खटाटोप होय

कबीरमहाराजांसारखे साधुपुरुष, ज्याचे वाङ्मय अतिभावाने सर्वत्र वाचले जाते, ते म्हणतात.

दोहा

" मेरा मुझमें कुछ नहीं, जो कुछ है सो तेरा ।
तेरा तुझको सौंपतें, क्या लगेगा मेरा ॥

तद्वत माझे काहीही नाही, जमविलेली माहिती आदिशक्तीच्या चरणी रुजू करीत आहे.

इंग्रजी साहित्यामध्ये जॉन्सनचे चरित्र बॉस्वेलनी लिहिलेले आहे. त्यात तो म्हणतो '—

" I have spared no pains obtaining material concerning the subject from every quarter, where I could discover that they were to be found I flatter myself that few writters have entered upon such a work as this, with more advantages, independent of literary abilities in which, I am not vain enough to compare myself with same great names, who have gone before me in this kind of writing "

शाळेमध्ये अव्वल असणारे मूलही, पुढे श्रमाच्या जोरावर ग्रंथकार होऊ शकते. ऑलिव्हर गोल्डस्मिथ हा नावाजलेला आंग्लकवी आहे. तो कबूल करतो की, शाळेमध्ये लहानपणी मी एक चुकार विद्यार्थी म्हणूनच प्रसिद्ध होतो. पण पूर्वसंचिताने काही विवक्षित काळानंतर ज्ञानप्राप्ति झाल्यावर जीवापाड श्रम घेतले आणि काव्य नावरूपाला आणले. "

वर वर्णन केलेली परिस्थिति प्रस्तुत ग्रंथलेखकांचे बाबतीत तंतोतंत लागू पडत असल्याने मुद्दाम उद्धृत केलेली आहे.

## उपदेशकांची पात्रता

काही सत्पुरुष परमात्मपदाला पोहोचले असले तरी देखील लोकांना उपदेश करीत सुटत नाहीत. याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे वज्रेश्वरी येथे होऊन गेलेले नित्यानंद स्वामी. याबाबतीत रामकृष्ण परमहंस एक उत्कृष्ट दृष्टांत देतात. तो उतरण्याचा मोह टाळता येत नाही. " एका खेडेगांवात एक पाण्याचे मोठे तळे असून पिण्यासाठी व इतर कामासाठी गावकऱ्यांना उपयोग होत असे. पण त्याचा

काही उच्छृंखल वृत्तीचे लोक सकाळी शौचविधीसाठी त्याचा उपयोग करीत व पाणी खराब करीत. गावातील सज्जनांनी तसे न करण्याची विनती करून पाहिली, पण जेव्हा उपयोग होईना तेव्हा राजशासनाकडे तक्रार केली शासनाने एक आज्ञा काढून आपला शिपाईवजा साधारण अधिकारी तेथे पाठविला. त्याने राजाज्ञा तेथे तळ्याच्या काठी लावली. 'हे पिण्याचे पाणी आहे. घाण करू नये. घाण करणारास दंड केला जाईल.' तेव्हापासून लोकांनी घाण करण्याचे बंद केले ही गोष्ट सांगून रामकृष्ण म्हणतात, "लोकांना उपदेश करण्याचा भगवंताकडून आदेश मिळाला पाहिजे. तोपर्यंत साधकाने चुकून सुद्धा या भानगडीत पडू नये." तद्वतच हा ग्रंथ उपदेशात्मक नसून, शक्तिस्थानांची माहिती देण्याचे कार्य आदि शक्तीचे इच्छेनुसार पूर्ण केलेले आहे.

## ग्रंथाचे महत्त्व

प्रस्तुत ग्रंथाचे महत्त्व किती, असा प्रश्न काही वाचकांच्या मनात उद्‌भवणे शक्य आहे. सप्तशती ग्रंथाचे मूळ नाव देवीमाहात्म्य असे आहे त्या ग्रंथातील सातशे मंत्रसंख्येवरून " सप्तशती " हे नाव दृढमूल झाले असावे. या ग्रंथाचे महत्त्व किती आहे याचे वर्णन त्याच ग्रंथात खालीप्रमाणे आढळते

> दुर्वृत्तानामशेषाणां बलहानिकरं परम् ।
> रक्षोभूतपिशाचानां पठनादेव नाशनम् ॥ ( १२–१९ )
> सर्वं ममैतन्माहात्म्यं मम सन्निधिकारकम् ॥ ( १२–२० )

या माहात्म्याचा उपयोग काय, असा विचार मनात येताच प्रत्यक्ष जग दम्बिका सांगते की, " हे माहात्म्य श्रवण केल्याने सर्व दुष्टांचे बळ पूर्णपणे नष्ट करणारे, केवळ पठणामुळे राक्षस, भूत, पिशाच्चे यांचा नाश करणारे आणि सदैव देवींचे सान्निध्य करून देणारे आहे तसेच माझे जो स्तवन करील त्याला द्रव्य, ऐश्वर्य, वैभव, धन यांचा लाभ होऊन वृद्धी होईल " यासाठीच अनेक ठिकाणी या ग्रंथाचे पाठ करून नवचंडी, शतचंडी, सहस्रचंडी व लक्षचंडी याग केले जातात

या ग्रंथातील संस्कृत श्लोकांचे ब्राह्मणाकरवी पठण करून जर एवढा लाभ मिळतो, तर सप्तशतीमधील सार मराठी भाषेत या ग्रंथात वाचावयास मिळून त्यापेक्षा सहस्रपट अधिक माहिती शक्तिपीठासंबंधी वाचावयास मिळाली आणि ती तितक्याच श्रद्धेने वाचली गेली तर अनेकपट पुण्य गाठी संचित झाल्याशिवाय

राहणार नाही, अशी लेखकाची श्रद्धा आहे. ज्ञान प्राप्त होऊन शिवाय करमणुकी-बरोबरच मनमुराद आनंद लुटता येण्यासारखा आहे. हेच या ग्रंथाचे महत्त्व आहे असे मी समजतो

शिवाय आजच्या सुधारलेल्या समजणाऱ्या जगात लेखकाला असाही प्रश्न विचारणारे निघतील की, " अवतार घेऊन देवींने राक्षसांना ठार मारले " असल्या गोष्टींचा चालू युद्ध कार्यात उपयोग होणार आहे काय ? याला थोडक्यात उत्तर असे देता येईल की, दैवीशक्तीची अंतिम मर्यादा मानवाला ज्ञात झाली, मानवी उपाय सर्व खपतात तेथे याच शक्तींनेच मानव तरून जातो, हे ज्ञात असल्याशिवाय मानवाच्या प्रयत्नामध्ये वैफल्याची भावना निर्माण होईल. भारताचे प्राचीन वैभव काय होते, प्राचीन उदात्त संस्कृति काय होती हे जर सांप्रतच्या पिढीला माहीतच नसेल, तर तो भारतदेशाला पूर्व वैभवपरंपरेला नेणार तरी कसा, आणि रामराज्याचे स्वप्न साकार करणार तरी कसा ! रामराज्य साकार करण्यासाठी व सर्वांना सुख संपत्ती लाभावी यासाठी रामराज्यात काय स्थिति होती ती तर माहीत असावयाला पाहिजे ना ? काळ आणि साधने बदलली तरी शक्ति तत्त्व मूळचेच कायम आहे. या तत्त्वाची उपासना कोणी कोणत्याप्रकारे केली आणि त्यांना फलद्रूप झाली, हे या ग्रंथाच्या वाचनाने कळेल आणि यामुळेच आधुनिक युगाला अनुरूप असा मार्ग शोधता येईल यासाठी अशा ग्रंथाची गरज राहणारच.

## देवतांचा इतिहास

या ग्रंथात नवीन काही नाही. देवदेवतांचा, त्यांच्या क्षेत्रांचा आणि कर्तृत्वाचा इतिहास जो अनेक ठिकाणी विखुरलेला होता तो एकत्र आणण्याचा यात प्रयत्न केलेला आहे. एकाच विषयाला संबंधित अशा स्वरूपाच्या, गतकाली घडलेल्या गोष्टी अनेक ग्रंथातून जमा करून अगर क्वचित् समक्ष पाहून येथे नोंदलेल्या आहेत आणि म्हणून एकपरीने हा देवतांचा इतिहासच आहे

ग्रंथाच्या कार्यांचा वृथाभिमान त्याला नाही. " मी केवळ लिहिणारा निमित्तमात्र असून, ग्रंथप्रकरणाच्या आदिशक्तीच्या कृपेस पात्र झालेला आहे." यातच त्याला सात्त्विक आनंद आहे.

## पाश्चिमात्यांची सहकारिता

हा ग्रंथ तयार करताना ज्या अडचणी आल्या त्याचा विचार करता पाश्चिमात्य लेखक किती भाग्यवान् आहेत, हे पाहणे योग्य होईल. भारतीयांनी जर हा दृष्टिकोण स्वीकारला तर संशोधनकार्यास व ग्रंथनिर्मिती करण्यास किती सुलभ होईल याचे तुलनात्मक विवेचन त्यांच्या पुढे येईल. जेम्स् हेस्टिंग या गृहस्थांनी आपल्या इकडील डॉ केतकरांप्रमाणे एन्सायक्लोपिडीआ तयार केला आहे (Encyclopædia of Religions and Ethics) प्रत्येक भाग सुमारे हजार पृष्ठांचा असे बारा भाग प्रसिद्ध केले आहेत, आणि त्यांमध्ये जगातील सर्व धर्मपंथाची माहिती, देवताविषयी माहिती, प्रसिद्ध धार्मिक प्रचारकांची अगर संस्थापकांची माहिती इ० अनंत विषय त्यामध्ये आढळतील. पण हे सर्व काम त्यांनी एकटयाने केलेले नाही. अनेक विद्वानांचे सहाय्य त्यांना लाभलेले आहे भारतातील रामायणकालीन माहिती घ्यावयाची म्हणजे ज्याचा त्या विषयाचा अभ्यास तयार असेल त्याच्याकडून तेवढा प्रबंध तयार करून घेऊन त्याचे नावासह ग्रंथात समाविष्ट केलेला आहे संचालकाने फक्त त्या त्या विषयाचे तज्ज्ञ शोधून काढून माहिती एकत्रित केली आणि त्या सर्वांच्या सहकार्यामुळे त्याचे काम सोपे झाले, सुलभ झाले

हा ग्रंथ तयार करताना किमान पंचवीस तरी शक्तीपीठचालकांना पत्रे पाठविली, काही संस्थांना पत्रे पाठविली, पण एकाचेही उत्तर आले नाही तेव्हा यथाशक्ति, यथामति, माझ्या कुवतीप्रमाणे जी माहिती जमा झाली ती एकत्रित मोडक्यातोडक्या शब्दात प्रगट केली आहे ती संपूर्ण आहे असे वाचकांनी समजू नये हाच धागा घेऊन कोणा विद्वानाने अगर संस्थेने पुढे जाऊन हे कार्य पुरे करावे, हीच त्या आदिशक्तींजवळ प्रार्थना आहे

एरिक न्यूमन या संशोधकाने 'दि ग्रेट मदर' या नावाचा अतिशय सुंदर व माहितीपूर्ण ग्रंथ या विषयावर लिहिलेला आहे आपल्या प्रस्तावनेत ग्रंथकार म्हणतात, " सुमारे ३५ ग्रंथप्रकाशक कंपन्यांनी त्यांच्या संग्रही असलेली माहिती छायाचित्रे व इतर साहित्य ग्रंथकाराला उपलब्ध करून दिले व त्यामुळेच इतका सर्वांगपूर्ण ग्रंथ तयार होऊ शकला " त्या ग्रंथात सुमारे १७५ देवतांची निरनिराळ्या कालमानाची छायाचित्रे व ७५ चित्रकारांनी देवतांच्या काही प्रसंगांवर चितारलेली चित्रे यांचे ठसे उत्तम गुळगुळीत कागदावर स्पष्टपणे दिलेले असल्याने

विषय समजण्यास व ग्रंथवाचताना येणारा कंटाळवाणेपणा घालविण्यास मदत झाली आहे. लेखक हे सर्व का करू शकला तर सर्वांची सहानुभूति व प्रत्यक्ष मदत हेच कारण होय. या भूमिकेचीच आपल्याकडेही जरूरी भासत आहे.

## राष्ट्रीय एकात्मता

हिंदुराष्ट्रवादाचे बंधुत्व वाढविण्यास लावण्याचे असेल तर अशा ग्रंथाचा पुष्कळ उपयोग होण्यासारखा आहे. भारतामध्ये अनेक प्रांत–उपप्रांत व जमाती वास करून आहेत. या ग्रंथामध्ये निरनिराळ्या जमातींची श्रद्धास्थाने एकत्र गोवलेली आहेत. त्यामुळे प्रत्येक जमातीला दुसऱ्या जमातींच्या भावना, चाली रीती, समजुती समजून येतील व सर्वांना समान भूमिकेवर एकत्र आणण्यास मदत होईल असा विश्वास वाटतो. अनेक प्रचारकांना जे शक्य होणार नाही ते कार्य हा ग्रंथ करू शकेल असे वाटते. यालाच भारताची साहित्यिक ऐक्यता म्हणता येईल राष्ट्रपति डॉ. राधाकृष्णन् व कै. पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांची राष्ट्रीय एकात्मता वाढविण्याची जी मनीषा आहे ती या ग्रंथाने पुरी होईल असा लेखकास विश्वास वाटतो.

## इस्लामी राजकर्त्यांचे औदार्य

इस्लाम आणि ईसाई संस्कृतीने हिंदुसंस्कृतिदर्शक प्रतिकावर क्रूर हल्ले केले, आणि त्याची मोडतोड केली असे दृश्य अनेक वेळा या ग्रंथामध्ये वाचावयास मिळेल, कारण तो सत्य इतिहास आहे. पण त्याबरोबर असेही वाचावयास मिळेल की, इस्लामसंस्कृति वर्धकानी अनेक वेळा हिंदुजागृत देवस्थानांचा आणि मान्यवर पीठाचा योग्य तो सत्कारही केलेला आहे. अकबर बादशहाचे याबाबतचे औदार्य सर्वत्र प्रसिद्धच आहे. त्याच्या पदरी अनेक मुस्लीम संस्कृत पंडित होते, त्यानी संस्कृत ग्रंथरचनाही केलेली आहे. हुमायून राजाने तर पंडित जगन्नाथाची सुवर्णतुला करून, ते दान वाटून टाकले आहे. औरंगजेबसारखा कट्टर हिंदुसंस्कृति-द्वेष्टा, पण त्यानेही जेजुरीच्या खंडोबाला सव्वा लक्षाचा रत्नजडित भुगा अर्पण केला, तर यमाई मंदिराचे शिल्प पाहून तोडण्यासाठी पुढे केलेला हात मागे घेतला दक्षिणेतील राज्यकर्त्यांनी तर अनेक श्रद्धास्थानाना वार्षिक उत्पन्नासाठी गावे इनाम दिलेली आहेत आणि आजतागायत ती त्या त्या संस्थांकडे चालत आहेत. शृंगेरीच्या शारदामठाला, हैदरअली आणि त्याचा मुलगा टिपू सुलतान यानी सहाय्य व योग्य तो मानमरातब दिलेला दिसून येतो. आनंदी भवानीचा इतिहास पाहताना, तेथील मुसलमान राजाने खर्चासाठी गाव इनाम दिल्याचे दिसून येईल. याप्रमाणे अनेक उदाहरणे या ग्रंथामध्ये पहावयास सापडतील. टिपू सुल्तानाने एक सहस्र चंडी यज्ञ करवून घेतला, ४० दिवस ब्राह्मणांना सुग्रास भोजन दिले, आणि भरपूर दक्षिणाही देऊन संतुष्ट केले. विजापूर शहरापासून काही मैलांवर येलगूर गावी हनुमानाचे प्राचीन मंदिर आहे. मूर्ति भव्य आणि जागृत मानली जाते. मूर्तीच्या अंगावर कित्येक लक्ष रुपयांचे सुवर्णालंकार असून, हे एक श्रीमंत देवस्थान मानले जाते पूर्वीच्या आदिलशाही राजांनी देवस्थानच्या सेवेकरी, पुजारी, सनई, चौघडावाले इ० इ० सेनेकऱ्यांना शेतजमिनी इनाम दिल्या असून, आजपावेतो ती मंडळी त्याचा उपभोग घेत आहेत.

चिंचवड ( पुणे ) येथील मोरया गोसाव्याचे संस्थानचा इतिहास घ्या. त्यालाही औरंगजेब बादशहाने इनाम गावे खर्चासाठी दिलेली आहेत. या देवाचे सत्व पाहण्यासाठी, औरंगजेबाने दोन ताटांत गोमांस भरून वरती सुंदर आच्छादन घालून, भेट म्हणून मोरया गोसावीकडे पाठविली. अंतर्ज्ञानामुळे मोरयाच्या सर्व प्रकार ध्यानी आला. पण वरकरणी चलबिचल न दाखविता, पूजा संपल्यावर नैवेद्य म्हणून त्या ताटावर जलाचे सिंचन केले नंतर ताटे उघडण्यात आली, तर ती दोन्ही ताटे सुंदर टवटवीत गुलाब पुष्पांनी भरलेली दिसली बादशहाच्या मनावर या गोष्टीचा परिणाम झाला, म्हणून जहागीर बक्षीस दिली.

अशा प्रकारची अनेक उदाहरणे दाखविता येतील. अर्थात या संस्कृतीने केलेल्या दुष्कृत्याच्या मानाने ती कमी असतील. पण राज्य करताना, सर्व प्रजाजनांना समदृष्टीने वागविणे हितावह आहे हे त्यांना समजत होते, हे दर्शविण्यास पुरेशी आहेत. याच दृष्टिकोनातून, सांप्रतचे भारतीय केंद्र सरकारही सर्व समाजाकडे समभावाने पहात आहे, ते यथायोग्यच होय. तेव्हा सारांश असा की, हा ग्रंथ वाचताना, वाचकांनी ही उदाहरणे दीपगृहाप्रमाणे दृष्टीसमोर ठेवावीत, आणि सर्वैक्यता साधण्यास प्रयत्नशील रहावे. एक संस्कृति दुसऱ्यावर आक्रमण करू लागली म्हणजे काय होते, त्याचे स. १९६६ सालातील चीनमधील लालरक्षक दलाची कृत्ये पाहिली म्हणजे त्वरित ध्यानी येईल.

## आदिशक्तीचा इतिहास

आदिशक्तीचा इतिहास शोधताना एक गोष्ट नेहमी खटकत राहिली, बोचत राहिली की, या पीठाचा संपूर्ण सत्य इतिहास जर उपलब्ध असता तर आजच्याइतकी धर्मग्लानी मार्गाने आली नसती. या इतिहासातील अनेक प्रसंग चीड आणणारे आहेत इतिहासात त्यांची नोंद आहे. आंग्ल संस्कृतीच्या सहवासाने एखादा कितीही जरी दूषित असला तरी त्याचे आंतरिक भारतीय मन तो इतिहास वाचल्यावर अस्वस्थ झाल्याशिवाय रहाणार नाही. सिंहगड घेताना आपल्या शिपायांची मने आपल्या राष्ट्रकार्याकडे वळवून घेण्यासाठी तानाजीने हा यवनांचा क्रूर इतिहासच त्यांच्यापुढे मांडला, पवाड्यारूपाने मांडला आणि त्यांना आवाहन केले " अरे! आपल्या आयाबहिणी तरी सांभाळा, का त्या ही देता मोगलाला." त्याच्या या बोलण्याचा तात्काळ परिणाम झाला, व कोळी, मेटकरी त्याच्या साह्याला धावले. साधनांच्या अभावी हा इतिहास आज उपलब्ध नाही. कोणी इतिहाससंशोधकाने या विषयाकडे या दृष्टिकोनातून पाहिलेले नाही. सत्य इतिहास लिहिलेला असता आणि तो सरकारमान्य झाला असता तर त्यातील उतारे माझ्या-घराघराला निर्भयपणे देता आले असते. आज जरी वंचित ठरला असला तरी परधर्मीयांची त्याकडे पाहण्याची दृष्टि कोणती राहील याचा भरवसा

ठिकाणी प्रसंगानुरोधाने इतर परिस्थितीचाही उल्लेख आढळून येईल. त्यामुळे त्या शक्तिपीठाचे अगर देशकालाचे चित्र डोळ्यासमोर उभे करण्याचा प्रयत्न केलेला आढळून येईल.

मुसलमानी अमदानीत हिंदु मंदिरे व लोक यांवर जे अत्याचार झाले त्याचे वर्णन फिरिस्ता, सुर्धी सादिक, अमीर खुश्रु, महंमद शाही इत्यादि मुसलमान इतिहासकारानीच बखरीच्या रूपाने लिहून ठेवलेला आहे. ब्रिटिश अमलात त्यांची भाषांतरे ब्रिग्स, इलियट यासारख्या इतिहासकारांनी जनतेला उपलब्ध करून दिलेली आहेत. या बखरींची मराठी भाषांतरे उपलब्ध झाल्यास मराठी जनतेला त्याचे वाचन करणे सुलभ जाईल, व मराठी वाङ्मयामध्ये ऐतिहासिक साधनाची भर पडेल. हे काम महाराष्ट्र सरकारने हाती घ्यावे अशी नम्र सूचना आहे.

## संशोधनास वाटचाल

काही क्षेत्राच्या माहितीवरून दृष्टिक्षेप टाकला असता असे दिसून येते की, त्या ठिकाणी लहान लहान अनेक तीर्थे अगर व्यक्तिदर्शक नांवे आढळून येतात. पौराणिक कालातील अनेक देव अगर दैत्य यानी भेटी दिल्याचे आढळून येते. कित्येक ऐतिहासिक व्यक्तींचा संबंध त्या क्षेत्राबरोबर आढळून येतो. या सर्वांचा फार बारकाईने अभ्यास व्हावयास पाहिजे. म्हणजे त्यायोगे देवतेच्या स्थापनेचा काल उमगता येईल. आपण काही उदाहरणे पाहू. कोल्हापूरच्या महालक्ष्मी मंदिरासंबंधी इतिहाससंशोधक खरे म्हणतात की, जास्तीत जास्त आठव्या शतकापर्यंत पुरावा आढळतो. पण तेथील कथामध्ये कोल्हापूर, करवीर, मयासूर दैत्य यांचा संबंध येतो. पीठजादेवीचा इतिहास पाहताना तेथील एका राजाचा प्रधान शूद्रक याने राणीच्या शोधासाठी महालक्ष्मीपर्यंत प्रवास केला, आणि तिथेच दृष्टान्तावरून मंदिरात होम केला त्या वेळी मयासूर बाहेर दृग्गोचर झाला, व राणी परत मिळाली. वनशंकरीचा इतिहास पाहताना असे समजते की, अगस्ती ऋषींनी या क्षेत्राला भेट देऊन देवीची आराधना केली. देवीने दृष्टांत दिला आणि त्यांना तिलकवनांत वनशंकरीची आराधना करण्यास सांगितले. वरील तीन उदाहरणांचे सार काढावयाचे झाले तर आपण निश्चितपणे म्हणू शकतो की, अगस्तीऋषि दक्षिण संचाराला आले तेव्हा हे देवीचे स्थान निश्चितपणे स्थापन झालेले होते. त्याचप्रमाणे वनशंकरीचेही स्थान स्थापन झालेले होते. इतिहासकरांनी जरी या ऋषींचा काळ खिस्ताब्द पाचवे किंवा सहावे शतक ठरविले असले तरी, आठव्या शतकाच्या मागे एक सहस्र वर्षे निश्चितपणे जाता येते. काठेयावाडातील ओखाम देवीच्या इतिहासावरून आपण निश्चित म्हणू शकतो की, पांडवकालापूर्वी तिची

स्थापना झालेली आहे. गुजरातमध्ये वरददायिनीचा इतिहास पाहता आपण म्हणू शकतो की, प्रभू रामचंद्राच्या वेळी या देवीचे क्षेत्र होते. तेव्हा दंतकथामध्ये जरी काही समस्यांची अतिशयोक्ति झालेली असली तरी क्षेत्राचा पौराणिकपणा निश्चित-पणे ठरविण्यास त्याची मदत होत आहे. तसेच दुसरा महत्त्वाचा भाग म्हणजे देवतांची वाढ कसकशी होत गेली व केव्हा झाली हे निश्चित करण्यास या माहितीचा उपयोग होणारा आहे. संशोधकाने वरील गोष्टींचा विचार आपुलकीने अवश्य केला पाहिजे.

## कीर्तनकार-बंधूंना विनंती

मागे आपण पाहिलेच आहे की, सतवाङ्मयामध्ये शक्ति-उपासना हा विषय उपेक्षिलेला आहे. तसेच अनेक कीर्तनकार नवरात्रामध्ये देवीविषयक आख्याने लावीत नाहीत हा माझा स्वानुभव आहे. कारण त्यांनाही हा विषय अज्ञातच आहे, असे समजण्यास हरकत नाही. स्वभावतः नवरात्र हा शक्ति उपासनेचा काल, तेव्हा या महोत्सवात तरी शक्तीच्या वर्तृत्वाचा महिमा वर्णिला पाहिजे. तरी सर्व कीर्तनकार बंधूस माझी आग्रहाची विनंती आहे की, त्यांनी या ग्रंथातील माहितीच्या आधारे देवीविषयक अनेक आख्याने स्वतः रचावीत आणि त्याचा प्रचार हिरिरीने करावा.

## प्रकाशक संपादकाचे आभार

अनेक ग्रंथातून महत्त्वाचे उतारे या पुस्तकात विषयमांडणीसाठी घेतलेले आहेत. अनेकांची भाषांतरे करून ती दिलेली आहेत. ग्रंथकर्त्यांची व प्रकाशकाची अनुज्ञा असे उतारे घेण्यास आहेच आणि प्रत्यक्षात मागितली असता ती मिळालीच असती, या समजुतीवर ते येथे घातलेले आहेत. तेव्हा त्या त्या असंख्य ग्रंथकर्त्यांची साधी अनुज्ञाही मी घेतलेली नाही, याची पूर्ण जाणीव आहे. पण तसे करणे अगदी अशक्य कोटीतीलच ठरले असते. त्यांच्या माहितीचा आणि टिप्पणीचा उपयोग या ग्रंथामध्ये लोकाहितार्थ, ज्ञानदानासाठी केलेला असल्याने, ते सर्व ज्ञात व अज्ञात ग्रंथकार, उदार अंतःकरणाने मला क्षमा करतील, अशी खात्री वाटते. तसेच अनेकांनी स्वतः पुरविलेल्या माहितीचा उपयोग येथे केलेला आहे. संदर्भासाठी वाचलेल्या सर्व ग्रंथाच्या ग्रंथकर्त्यांचे व प्रकाशकांचे आभार मानणे अवश्यच आहे, ते माझे कर्तव्यच आहे. भारतीय व पाश्चिमात्य विद्वान संशोधकांनी अत्यंत परिश्रमपूर्वक जी माहिती गोळा करून प्रसिद्धिली आहे व ज्याचा उपयोग या ग्रंथामध्ये मुक्त हस्ताने केला आहे त्या सर्वांचा मी अत्यंत ऋणी आहे. संदर्भ ग्रंथाची यादी व ग्रंथात पसरलेले अनेक उल्लेख यावरून त्या ग्रंथांची नावे वाच-कांना कळून येतीलच. मुंबई विश्वविद्यालयाचे ग्रंथपाल श्रीयुत मार्शल साहेब याचे

तर त्याच आभार मानले पाहिजेत. नियमानुसार ग्रंथालयात मला प्रवेश नसतानाही केवळ त्यांच्या सौजन्यपूर्ण व आश्वेवर्धक वृत्तीने मला तेथील ग्रंथसंग्रह उपलब्ध करून या ग्रंथालयाच्या सहकार्यानेच मी हा पर्वत चढू शकलो आहे. या ग्रंथात माझे असे काहीच नाही. मी माहिती फक्त एकत्रित केलेली आहे. 'नामूल लिख्यते किंचित्'' हे ब्रीदवाक्य साधारणपणे ध्यानात असावे.

महासागर तरून निघालो.

या निवेदनाच्या सुरवातीला म्हटल्याप्रमाणे या ग्रंथाचा एवढा विस्तार होईल ही कल्पना नव्हती. शोधक बुद्धीचा अभाव आणि विषय सुबोधपणे व सुगमपणे मांडण्याची असमर्थता, यामुळेच लहान तोंडी मोठा घास घेत असल्याची पदोपदी जाणीव होई. परंतु जगात पूर्णत्व कोठेच नाही. अपुरेपणाच्या ओढीतच पूर्णत्व गाठता येते. त्या महत्त्वाकांक्षेने मानव सतत प्रयत्नवादी राहतो. तसेच माझेही झाले. लेखकाच्या दुबळेपणाबद्दल कोणाचाच उपाय नाही व तो कोणी सुधारू शकणार नाही परंतु आवश्यक साधने जमविण्याचे प्रयत्नांत चुकारपणा केलेला नाही, एवढे तरी मनाला समाधान लाभलेले आहे. विषय-प्रवेश झाल्यावर इतके साहित्य आपोआप चालून आले की, त्या महासागरात मी साफ बुडून गेलो. नवशिक्या पोहोणाराने सागरात उडी मारावी आणि पोहता पोहता हातपाय दमून जावेत, नाकतोंडात पाणी शिरावे आणि जीव गुदमरावयास लागला म्हणजे बाहेर येण्यासाठी धडपड तो करतो व कसे तरी प्राण वाचवितो, तद्वतच मी या अफाट सागरातून बाहेर पडत आहे सेवा गोड मानून घ्यावी हीच विनती, पुन्हा पुन्हा करण्याशिवाय, त्या आदिशक्तीजवळ आणि जनताजनार्दनाजवळ आणखी काय मागणे मागू ! नमस्ते.

ह्या ग्रंथासंबंधी वाचकांना काही सूचना करावयाशा वाटल्यास किंवा काही अधिक माहिती पाठविण्याची असल्यास कृपया त्यांनी लेखकाकडे पाठवावी पुढील आवृत्तीत त्या सूचनांचा अवश्य विचार केला जाईल.

३० जून १९६७ प्र. कृ. प्रभुदेसाई

# स्तवन

ॐ नमो देव्यै महादेव्यै शिवायै सततं नमः ॥
नमः प्रकृत्यै भद्रायै नियताः प्रणताः स्म ताम् ॥
सर्वमङ्गलमाङ्गल्ये शिवे सर्वार्थसाधिके ।
शरण्ये त्र्यम्बके गौरि नारायणि नमोऽस्तु ते ॥

★

## ब्रह्मांडनायिका आदिशक्तीचे विश्वस्वरूप

अहं रुद्रेभिर्वसुभिश्चराम्यहमादित्यैरुत विश्वदेवैः ।
अहं मित्रावरुणोभा बिभर्म्यहमिन्द्राग्नी अहमश्विनोभा ॥ १ ॥
मया सो अन्नमत्ति यो विपश्यति यः प्राणिति य ईं शृणोत्युक्तम्
॥ ४ ॥ ( १ )
अहमेव स्वयमिदं वदामि जुष्टं देवेभिरुत मानुषेभिः ।
यं कामये तंतमुग्रं कृणोमि तं ब्रह्माणं तमृषिं तं सुमेधाम् ॥ ५ ॥
अहं रुद्राय धनुरा तनोमि ब्रह्मद्विषे शरवे हन्तवा उ ।
अहं जनाय समदं कृणोम्यहं द्यावापृथिवी आ विवेश ॥ ६ ॥
अहमेव वातइव प्र वाम्यारभमाणा भुवनानि विश्वा ॥ ८ ॥ ( १ )
( ऋग्वेद १०–१०–१२५ )

( १ ) परब्रह्मस्वरूपिणी आदिशक्ति ब्रह्मांडनायिका आपल्या विश्वस्वरूपाचे दर्शन घडविताना वर्णन करते की, रुद्र, वसु, आदित्य आणि विश्वदेव यांच्या रूपांनी मीच भूतलावर विहार करीत असते. मी त्यांचा आत्मा असून खरीखुरी सत्ता आहे. तसेच मित्र–वरुण, इंद्र–अग्नि, अश्विनीदेव इत्यादि देवतांचे रूप मीच धारण करीत असते, आणि माझ्यामुळेच त्यांना अस्तित्व लाभलेले आहे.

जो कोणी अन्नपाणी खातो, श्वासोच्छ्वास करतो, नेत्रांनी पाहतो, कानांनी ऐकतो, तो हे सारे व्यवहार माझ्याच शक्तीमुळे करीत असतो. मग तो प्राणी द्विपाद असो, चतुष्पाद असो, जलचर असो, अगर वृक्षसृष्टीतील असो. सर्वांच्या

अंतर्यामी असलेले माझे हे विश्वस्वरूप जो कोणी जाणीत नाही अगर मानीत नाही, तो अज्ञानी पुरुष नाश पावतो, त्याचा लोप होतो. जो हे माझे सर्वव्यापी स्वरूप जाणतो, मला आपली समजतो, माझ्या ठिकाणी श्रद्धा ठेवतो, आणि त्यामुळे ज्यावर माझी सदैव दयेची पाखर असते, त्यालाच श्रद्धेने प्राप्त होणारी ही ब्रह्मविद्या मी स्वतः सांगत आहे. हीच विद्या इंद्रादिदेवांनी आणि सर्वश्रेष्ठ मानवांनी सेवन केलेली आहे. ज्याचे रक्षण करावे असे मला वाटते, त्याला मी तेजस्वी बनविते, इतरांपेक्षा श्रेष्ठपणा देते, कोणाला मी सृष्टिकर्त्या ब्रह्मदेवाचे पद देते, कोणाला अतींद्रिय सत्याचा द्रष्टा ऋषि बनविते, तर कोणाला मी प्रज्ञावंत बनवीत असते, नामवंत लेखकही बनविते.

ब्रह्मद्वेष्ट्या, हिंसाचरण करणाऱ्या त्रिपुरासुराचा निःपात करण्यासाठी रुद्राच्या धनुष्याला प्रत्यंचा चढविणारी शक्ति मीच होय. माझ्यामुळेच रुद्र त्रिपुरासुराचा वध करू शकला. शिवाला शक्तीचे पाठबळ असल्याविना तो काहीही करू शकणार नाही. माझे जे कोणी श्रद्धेने, भक्तीने स्तवन करतात, त्यांच्या शत्रूबरोबर झुजून, परस्पर मीच त्यांचे निर्दालन करीत असते.

स्वर्ग, मृत्यु, पाताळ हे तीनही लोक व्यापून मी आहे. इतकेच नव्हे तर, त्यांचे नियमन-नियंत्रण करणारी शक्ति मीच आहे. मी सर्वकारणस्वरूपिणी एकमेवाद्वितीय स्वरूपाची असून, इतर कोणाच्याही सहाय्याखेरीज समस्त विश्व-कार्ये, समस्त भूतमात्राची निर्मिती, पालन व क्षय करण्यास प्रवृत्त असते. ज्या-प्रमाणे वारा अन्य कोणाच्याही प्रेरणेविना स्वच्छंदे स्वतःच वाहत असतो, तद्वत् माझी ही वृत्ति अखंड चालू असते. द्युलोक, भूलोक अगर अखिल विश्वब्रह्मांड-गोल या स्वरूपात जरी मी विलसित असले, तरीही या सर्वांच्या पलीकडे माझे स्थान आहे. यासाठीच मी ब्रह्ममयी, परब्रह्मस्वरूपिणी, विश्वातीत अशी आहे. मीच विश्वस्वरूप आहे. अखिल ब्रह्मांडगोल माझाच महिमा आहे. माझेच सर्व कर्तव्य आहे. अशा या विश्वरूप आदिमायेला आमचा त्रिवार नमस्कार असो.

## ( २ ) देवांनी केलेले शक्तीचे स्तवन

महिषासुराला देवीने ठार मारल्यानंतर, इंद्रादि देवगणांनी या देवीचे स्तवन केले :—हे देवी, तू संपूर्ण विश्वाचे पालन करणारी आहेस. तुझ्या अनित्यरूपाचे वर्णन करणे केवळ अशक्य आहे. असुरांचा नाश करणाऱ्या पराक्रमाचे, आणि त्याजबरोबर झालेल्या संग्रामात तू केलेल्या पराक्रमाचे वर्णन करण्यास, आमची बुद्धि असमर्थ आहे. हे देवी, अखिल विश्वाची पीडा तूच निवारण करतेस, हे आज आम्ही प्रत्यक्ष पाहिले आहे. सर्व शास्त्रांचे सार अशी जी मेधाशक्ति ती तूच आहेस. मधु-कैटभ दैत्यांचा जो शत्रू भगवान विष्णु,

त्याच्या हृदयात तुझे निवासस्थान आहे चंद्रशेखर शंकराकडून सन्मानित झालेली गौरी, ती तूच होय. तुझे मुख मंद हास्याने शोभणारे व पूर्ण चंद्राचे अनुकरण करणारे असून ते सुवर्ण कांतिमय आहे हे देवी, हेच तुझे अनुपम सौंदर्य पाहून महिषासुराला मोह झाला, क्रोध आला आणि तुझ्यावर चालून आला. शत्रु अंगावर येताना पाहून तुझे सुवर्ण कांतिमय मुखकमल, उदयकाळी लाल असणाऱ्या चंद्रबिंबाप्रमाणे संतप्त झाले, भुवया क्रोधाने विस्फारित झाल्या आणि आक्राळ विक्राळ स्वरूपात तुझे मुखकमळ, महिषासुराला त्रस्त करीत राहिले. त्या तुझ्या महाभयंकर उग्र स्वरूपामुळे महिषासुर आणि त्याची प्रचंड सेना, एका क्षणात नष्ट पावली. हे महादेवी दुर्गे, आमचे दुःख, दारिद्र्य व भय यांचे हरण तुझ्या शिवाय कोण करील? हे देवी, आम्हाला हे कोडे उलगडत नाही, की तुला शत्रू वर प्रत्यक्ष प्रहार करण्याची गरजच काय? साध्या दृष्टिक्षेपाने त्याचा नाश का करता येणार नाही? पण असेही वाटते की, ते रहस्य मोठे आहे तुझ्या शस्त्राने शत्रूचा नाश झाला म्हणजे त्यालाही सद्‌गती मिळते व जीवन्मुक्त होतो केवढी ही तुझी कृपादृष्टि! अशा तुझ्या या अलौकिक पराक्रमानेच आम्हाला धीर येतो,

दावानल आदेत तेथे तेथे तू प्रकट होऊन भक्तांचे रक्षण करतेस. देवी, सरोसरच सर्व विश्वाचे पालन करून 'विश्वेश्वरी' हे नाव सार्थ केले आहेस. भगवान् विश्वनाथानाही तू वदनीय आहेस. हे रणचंडिके, माते, आज त्याप्रमाणे तू दैत्य-संहार करून आमचे रक्षण केलेस, तसेच यापुढे सदैव करीत रहावे. सर्व जगातील पाप व पापवासना तू नष्ट कर. तसेच उत्पात व रोगराई यांच्यापासून रक्षण कर. हे देवी, तुझ्या मस्तकावर किरीट आहे. हातामध्ये महाखड्ग आहे. तुझ्या सहस्र नेत्रांतून तेज पसरत आहे, वृत्रासुराचा नाश करणारी देवता तूच होय संकटसमयी तू भयंकर रूप धारण करून विकट गर्जना करून, दैत्यांच्या महासेनेचाही नाश करतेस. तुझ्या दाढा विशाल आहेत. दैत्यांच्या मुंडक्यांची माळ सदैव गळ्यात असणे तुला आवडते. अशी उग्रस्वरूपा चामुंडा नारायणी, तुला आमचा नमस्कार असो ''

(सप्तशती, अध्याय १० वा)

## (४) महाभारतकालीन पांडवांचा नंदादीप

बारा वर्षांना वनवास संपवून, पांडव एक वर्षांच्या अज्ञातवासाच्या तयारीत होते. वेगवेगळ्या भूमिका घेऊन, पाच बधूंनी विराट राजाच्या पदरी राहण्याचे ठरविले. विराट नगराच्या प्रवेशद्वारी येताच, आपले येथील वास्तव्य यशोदायी व्हावे यासाठी, त्यांनी त्रैलोक्याची अधिष्ठात्री आदिमाया, दुर्गादेवीचे स्तवन केले दुर्ग म्हणजे संकट. त्याच्या निवारणार्थ त्यांची प्रार्थना होती .—

भगवान् श्रीकृष्णाच्या जन्माच्या वेळी योगमाये, तू यशोदा मातेच्या पोटी पूर्वसंकेतानुसार जन्म घेतलास, आणि कंस तुला ठार मारण्यासाठी तुझी तंगडी धरून शिळेवर आपटणार, तोच तू त्याच्या दुष्ट हातातून निसटून, अंतराळामध्ये प्रविष्ट झालीस, आणि कंसाला आकाशवाणीने सांगितलेस की, तुझा शत्रु सुखरूप जन्म पावला असून, वाढत आहे त्यानंतर हे देवी, तू आपले वास्तव्य विंध्यपर्वतावर, विंध्यवासिनी दुर्गा या नावाने प्रतिष्ठित केलेस. हे कृष्णस्वरूपे, वरदायिनी, कुमारिके, ब्रह्मचारिणी, तू बालसूर्याप्रमाणे तेजस्विनी आहेस. हे पूर्णचंद्राननें, तुला आमचा नमस्कार असो. इंद्रध्वजाप्रमाणे उभारलेले तुझे दोन विशाल बाहु, आम्हाला अभयदान देणारे आहेत तुझे हाती पाश परशु धनुष्य-महाचक्र व इतर नानाप्रकारची आयुधे आहेत, ती आमचे रक्षण करोत तुझ्या ध्वजावर उचभागी मोरपिसे झळकत आहेत, ती आमची संकटे वरचेवर उडवून लावोत. कौमार्य व्रताचा अंगिकार तू केला असल्याने, तुझ्यायोगे स्वर्गालाही पवित्रता प्राप्त झाली आहे हे देवी! त्रैलोक्याच्या रक्षणासाठी देवसुरवरही तुझीच

स्तुति करीत असतात. हे महिषासुरमर्दिनी देवते, आमच्यावर कृपा कर. जया आणि विजया या देवता तूच असून, युद्धात जय देणारी तूच आहेस. काली-महाकाली तूच आहेस. दुर्ग म्हणजे संकट. त्या पासून तू भक्ताला तारतेस, म्हणून तुला दुर्गा नाव प्राप्त झाले. महासागरात बुडणारे, घोर अरण्यात संकटांनी वेढलेले, चोरांनी अडविलेले पुरुष, हे देवी! तुझेच स्मरण केल्याने संकटमुक्त होतात, आणि मग त्यांचा नाश कधीही होत नाही हे देवी, कीर्ति, लक्ष्मी, सिद्धि, लज्जा, विद्या, निद्रा, कांति, ज्योत्स्ना, क्षमा, दया सर्व काही तूच आहेस. ती तुझीच रूपे आहेत" याप्रमाणे प्रार्थनेनंतर दुर्गादेवी प्रसन्न झाली. तिने दर्शन दिले आणि कौरवांबरोबरील युद्धात जय मिळेल असा आशीर्वाद दिला.

(महाभारत, विराट पर्व, अध्याय ८–७–२६)

## (५) संत एकनाथकृत देवीचे स्तवन

मुसलमानी अमलाच्या वैभवशिखराच्या वेळची भयंकर बिकट परिस्थिति नाथांना देवीची स्तुति करण्यास कारणीभूत झाली. दिल्लीपती अकबर बादशहा, दक्षिणेतील आदिलशाही, कुतुबशाही, निजामशाही यांमध्ये साम्राज्ये बनविण्याची चुरस चाललेली होती. या परकीय सुल्तानांसाठी मराठी सेना मरत होती, भाऊबंदाचे गळे कापून दरबारी मानमरातब मिळवीत होती मराठी शेतकऱ्यांचे धान्य मोगरी फौजा लुटीत होत्या, मराठी मावळ्यांना अंग झाकण्याइतके वस्त्र प्रावरणही मिळत नव्हते

हुमायून शहा बहामनी गादीवर आल्यावर त्याने सात हजार हिंदूंना ठार केले. वरातीमधील मराठे वधू आणि प्रजाजनांच्या मुली पळवून नेऊन त्यांना भ्रष्ट करीत असे. दुर्गादेवीचे बारा वर्षांचे भयंकर अवर्षणाने आधीच प्रजाजन हैराण झालेले होते. हुसेनशहाने सैन्य जमवून (सन १५६४) विजयनगरच्या हिंदु रामरायावर स्वारी करून ९ लक्ष सैन्य, १ लक्ष घोडेस्वार, २ हजार हत्तीदल आणि १५ हजार मदतगार सैन्याचा पडाव पाडून रामरायाचे शिर मोरीच्या द्वारावर बसविले होते. १५ चौरस कोस लांबीरुंदीचे आणि २० लक्ष वस्तीचे राजधानीच्या विजयनगर शहराची मसणवाट केलेली होती. शेकडो इमारती, राजवाडे, विद्यामंदिरे, देवतांची मंदिरे यांची राखरांगोळी केलेली होती. एका पुणेप्रांती जनाब मीर मुहम्मद इमान याने ३३ मंदिरे उध्वस्त केलेली होती खानदेशात जिजीया कर हिंदूवर लादलेला होता तिकडे गोव्यातील फिरंग्यांनी वर हिंदूचा अमानुष छळ चालविला होता. एका पंधरवड्यात त्यांनी सहाशे मंदिरे भुईसपाट केली हिंदूंना जिवंत जाळणे, तापलेल्या सैन्याच्या कर्दळीत तळून काढणे, त्यांना गुलाम करून परदेशी विक्री करणे, असे क्रूरपणाचे प्रकार चालू होते.

बन्या, नीटठ, गोऱ्या, जातीनत गुणविणी बाजारात सहज धनवीस होनाठ पाच यात्रमाणे विकल्या जात होता.

पैठणच्या नाथ महाराजांना हे सर्व पटावले नाही. पण शत्रूवरोवर उघड सामना देण्याची सोयच नव्हती. इतके धार्मिक व सामाजिक जुलूम चालू होते. तरी प्रतिकारात्मक शब्द बोलण्याचे धाडस कोणी करीत नव्हता. नाथानी ही परिस्थिति हेरली आणि ते आपल्या कथाकीर्तनातून या अत्याचाराचे दिग्दर्शन करीत. "मग डोंग होता शब्द। तुर्कांचा गरफटा ग्रासी मन्दिरा ॥" अशी लोकाची नादानी दाखवीत. वासुदेव, वाघ्या, मुरळ्या, रोडगा इ० भारूडातून ते आपल्या परीने लोकजागृतीचे कार्य करीत होते. शेवटी त्यानी आदिशक्ति भवानी मातेच्या दरवाज्यावर मुठी आपटून, जुलूम करणाराचा संहार करण्यासाठी आक्रोश केला. परिणामकारक रीतीने, तळमळीने आक्रोश केला —

"बये दार उघड, बये दार उघड, बये दार उघड ॥ अलक्षपूर भवानी दार उघड। माहूर लक्ष्मी, कोल्हापूर लक्ष्मी, तुळजा लक्ष्मी, तेलगण लक्ष्मी, कनड लक्ष्मी, पाताळ लक्ष्मी, अष्टभुजा लक्ष्मी, दार उघड, बया दार उघड ॥" असे काव्य तयार केले. या काव्यामध्ये ते देवीची स्तुति करतात—

हे जगदंबे, तू राम बनून रावणाचा वध केलास, नृसिंह बनून हिरण्यकश्यपूला फाडलास, अर्जुनाचे रथावर बसून गीता सांगितलीस, अशा अनेक संकटांच्या वेळी तू धावून आलीस. आता म्लेच्छानी देव-भक्ताना गांजले आहे. तीर्थक्षेत्री भ्रष्टता आली आहे. मंदिरे जमीनदोस्त झालेली आहेत आणि त्यातील देवदेवता लुप्त झाल्या आहेत आई, तरी तू मौन धरून बसलीस! काय हे! तुला आमची अतर्क्य दुःस्थिति पाहवेनाशी झाली, म्हणून का तू दार बंद करून बसली आहेस! माउली, आई लवकर धाव ग. कृपा कर, कृपा कर, दार उघड. बये, दार उघड, दार उघड.

भाविकांची अशी श्रद्धा आहे की, नाथांची ही आर्द्र हाक ऐकूनच, भोसले कुळामध्ये, शिवाजी महाराजाच्या रूपाने देवी प्रकट झाली, आणि मराठी मानव्याचे दुःख नाहीसे झाले

*(राजा छत्रपती, ब. मो. पुरंदरे).*

## ( ६ ) रामदासकृत देवीचे स्तवन

राजा शिवछत्रपती तर तुळजाभवानीचा एकनिष्ठ भक्त होता. तिचा कौल घेतल्याविना, तो कोणतीच धाडशी कामगिरी अंगावर घेत नसे. त्याच वेळी शक्तिउपासना करणारे समर्थ रामदास श्री भवानी तुळजादेवीचे स्तवन करतात—

शक्तीनें पावतीं राज्यें । शक्ति नसता विटंबना ॥
शक्तीनें नेटका प्राणी । वैभवें भोगितां दिसे ॥

स्वराज्याच्या धन्याधन्याच्या मामल्यात अशक्त माणसाला कोण विचारतोय ! त्याला तेज नसते, कांती नसते आणि चेवही नसतो ' शक्तीनें मिळतीं राज्यें । युक्तीनें यत्न होतसे ॥ ' हीच शक्तिउपासना त्यांनी सर्वत्र फैलावली हे तुळजा भवानी माते, तूच शक्तिस्वरूपा आहेस, रामवरदायिनी माता, तूच आहेस. तू आम्हा सर्वांची माता आहेस. ब्रह्मा, विष्णु, महेशानी तुझाच गोंधळ घातला आणि प्रसन्न करून घेतले. हे भवानी, " मुलाची लाज मातेला " हे शब्द ध्यानात आहेत ना ? तू रामाला वर दिलास, आणि त्याने रावणावर विजय मिळविला मीही रामाचा एक दासच आहे. मलाही एक वर दे.

एकची मागणें आता । द्यावें तें भजकारणे ॥
तुझा तू वाढवी राजा । शीघ्र आम्हांचि देखतां ॥

हे भवानी माते, तू दुष्टांचा संहार केलास, असे आम्ही खूप खूप ऐकले आहे. परंतु आम्हाला अशी वेळ प्राप्त आहे की, ' परंतु रोकडे काहीं । मूळ सामर्थ्य दाखवीं " हेंच मागणे चरणी आहे. इतराच्या माता एक वेळ चुका करतील, पण माझी माता अचूक आहे, न चुकणारी आहे, आणि ती भक्ताचे रक्षण केल्याशिवाय राहणार नाही, आमच्या शिवरायाची इच्छा पूर्ण कर. देशाची पराधीनता नष्ट होऊ दे, आणि मराठी सत्ता उदंड भरभराटीला येऊ दे. ती अवस्था प्रलयकालपावेतो अखंड चालू दे. यासाठी तुझा उतराई आज होण्यासाठी एक सुवर्ण पुष्प तुझे चरणी अर्पण करीत आहे. हे पुष्प तुझे तुलाच मी अर्पण केलेले आहे. हे आई भवानीदेवी, माझी ही इच्छा पूर्ण कर, मनापासून आतुर होऊन तळमळीने मी हे मागणे मागत आहे.

( समर्थ रामदास, श्री देवकृत )

## ( ७ ) रामकृष्ण परमहंसकृत काली देवीचे स्तवन

माझी आई काय खरोखर काळी आहे रे ? ती कृष्णवर्णा, वसनहिना, हृदय पद्म प्रकाशित करीत असते. काली, काली, म्हणून जर माझे प्राणोत्क्रमण होणार असेल, तर मग पवित्र तीर्थक्षेत्रे काशी, कांची, प्रभासपट्टण अथवा पवित्र नद्या गंगा, यमुना, कावेरी, सरस्वती इ० स्थाने भटकण्याची मला काय बरे गरज आहे ! सकाळ, दुपार आणि सायंकाळ, या तिन्ही समयी जो काली देवीचे नामस्मरण करतो, भजनपूजन करतो, त्याला इतर दैवतें पूजण्याची आणि

स्नानसंध्यादि नैमित्तिक कर्मे करण्याची काय गरज आहे ! देवाधिदेव महादेव, आपल्या पाचही मुखानी, ज्या देवीचे गुणगान करतात, त्या काली देवीचे नावात किती अवर्णनीय गुण आहेत, हे कोण जाणू शकणार !

जगदंबेच्या पायातील पैंजणाचे तालात, माझा ताल मिसळून गावयाचे एक गाणे मी शिकलो आहे. माझी झोप मोडलेली आहे. योगनिद्रेतून-समाधी मधून-अखेर तुझ्यामध्ये तन्मय होऊन, आई, मी झोपेलाच झोपवून टाकलेले आहे. जगन् मातेच्या अभय स्वरूपी श्रीचरणी मी आपले पचप्राण समर्पण केलेले आहेत, आता मी यमराजानाही भिईन की काय ? मी माझे शिरेला काली-नामाचा महामत्र बाधलेला आहे. भावरूपी बाजारात माझा देह विकून मी श्रीदुर्गादेवीचे नाम विकत घेतले आहे. माझ्या अतःकरणरूपी खोल खोल गाड्यामध्ये कालीनामरूप कल्पद्रुम वृक्षाची लागवड केलेली आहे. अहकारादि सहा दुष्टाना मी बाहेर घालवून दिले आहे. जयदुर्गा, श्रीदुर्गा, जय काली माते, या नावाचे प्रस्थान ठेवून मी जीवनयानामार्ग क्रमणिण्याचे निश्चित केले आहे. माझी काळीआई मला आपल्यामध्येच सामावून घेणार आहे, आणि त्या क्षणासाठी मी डोळ्यात प्राण आणून, तिचे रूप पाहण्यात निमग्न आहे, आत्मानंदात आहे इतर कोणतेही आनंद मला दिसत नाहीत.

( जीवनविकास, नागपूर )

## ( ८ ) विवेकानंदकृत शक्तीचे स्तवन

परमहंस रामकृष्ण याचे शिष्य स्वामी विवेकानद, हे गुरुजींप्रमाणेच कालीदेवीचे महान भक्त होते कालीदेवीने कलियुगात कोणत्या जागी आकांड-तांडव करून उपस्थित रहावे, यासबधात स्वामी म्हणतात—

ज्या क्षेत्री रणवाद्याचे घोष निनादत आहेत, जेथे शिंगे व भेरीचे आवाज उठत आहेत, वीराच्या पदाघाताने भूमी थरकाप हादरून सर्वच धुराळा गगनात उडत आहे, घोर गर्जना करून तोफा सर्वत्र आगीचा वर्षाव करीत आहेत, " धडकति तोफा झडति बदुका, फेरीमागुनि फेरी । लोट धुराचे ती रणभूमी मृत्यु उभा सामोरी " सूर्याच्या रक्तकिरणाप्रमाणे तोफेतून गोळे सुटत आहेत, शूर विराची मर्मस्थाने भेदून त्याचे प्राण ते घेत आहेत, पर्वतासमान हत्ती, तेजस्वी घोडे, या सर्वांचा नाश होत आहे. अनताचे जणू आकाडताडव सुरू आहे. इतक्यात " पुढे चला रे " अशी गर्जना होते. नरसिंहाप्रमाणे सहस्र शूर स्वार शत्रूवर तुटून पडत आहेत. तोफगोळे वर्षाव करीतच आहेत. निबिड धुराचे लोट अतराळात उडत असतात. अशा भयकर परिस्थितीत ते शूर

वीर, मारुगर्दी करून पुढे पुढे घुसून शत्रुफळी फोडतात आणि आघाडीवर जाऊन निशाण फडकवितात. ही विजयाची खूणच नव्हे का ! निशाणाचे काठी-वरून अद्याप रक्ताचे पाट वहात आहेत, त्या शूरवीराच्या मागील बाजूने बंदुका झडत आहेत, पुढच्याला गोळी लागली, की तो खाली पडतो, इतक्यात मागचा निशाण पेलून धरतो, असा मारखा संग्राम चालू आहे. अशा रणकंदनाच्या वेळी, ती असुरमर्दिनी माता उभी असावी. या देवीने तेव्हा काय करावे !

कालीं असती, मूर्तिमंत तूं काळचि सकळ जनातें ।
पसरिसि वारें नाना व्याधीं, भवविज भर्जनातें ॥

तव हस्तें तूं भक्ति देसी, प्याले रोग विषाचे ।
मृकंडुसुतहि तुजला दिसतो, साथी जणुं निमिषाचें ॥

## (१०) स्वातंत्र्यवीर सावरकरकृत रणचंडिकेचे स्तवन

वीर विनायकराव सावरकर यांनी कविता म्हणजे रणचंडिकेचे संपूर्ण स्तवनच होय. आपल्या प्रतिभा–शारदेने कोणते रूप धारण करावे याचे वर्णन त्यामध्ये मिळते. लंडन येथील पोलीस–कोठडीत बंदिस्त असताना त्याना आपल्या प्रतिभेने उग्ररूप दाखवावे असे वाटले, ते रूप असे—हे महिषासुरमर्दिनी देवी, आज समरभीषण अशी चंडमूर्ति मला माझ्या डोळ्यांसमोर हवी आहे. तुझ्या अधरावर रणकर्कश रणशृंग हवे. तुझ्या दाढा विक्राळ हव्यात. रणभेरीचे सूर आज हवेत. सागराच्या उसळत्या लाटांप्रमाणे प्रबळ होणाऱ्या अबलांच्या हृदयींच्या ऊर्मीही गर्जना करीत उठाव्यात. देवी, तुझी रणचंडिकेची मूर्ति आज समोर उभी पाहिजे. तुझे कुरळे केस व मृदु केस क्रोधाने राठ व्हावयास पाहिजेत. एखाद्या वारुळातून विषारी सर्प सुटावेत, तसे तुझ्या मस्तकीचे केस चवताळत सुटावेत आणि तुझ्या ग्रीवावर, वक्षावर, पाठीवर, मुखावर असे पसरावेत की, त्यामुळे तू महाभयंकर दिसावीस. एका हातातील खड्गाने तू एक मुंडके छाटून हातात घ्यावेस; या वेळी वाहणारी रक्ताची धार तू घटघटा प्यावीस; रक्त पिऊन शांत झालेली रुंडधारा, छिन्नमुंडा अशी तू मला हवीस. त्याच मूर्त स्वरूपाला "नमो नमः सहस्रधः प्रमत्तनर्तने।" तूच काव्यमूर्ति आहेस. तू या अनाव रुंडधारा, छिन्नमुंडा, खंडकृपणा स्वरूपात मला दर्शन दे.

(वीर सावरकरकृत–मूर्ति दुजी ती)

## (११) लेखकाकडून आदिशक्तीचे आवाहन—

सुदिन सुवेळ राष्ट्रवर्धनी राष्ट्ररक्षणीं रंगण्याची।
रंजक गातो विश्वकीर्तिची शक्तिचरित्रे स्फूर्तीची॥ ध्रु०॥

आदिशक्ति जगदंबे माते, कैलासीचे पार्वती ये।
चंडमुंड भंडासुर खंडिणी, महीषमर्दिनी श्रवणा ये॥ १॥

महाराष्ट्र धर्माची रक्षक, तुळजापूर भवानी ये।
कोल्हापूरच्या अंबाबाई, वणिच्या सप्तशृंगी ये॥ २॥

जोगाईचे अंबे येई, माहुरच्या रेणूके ये।
प्रतापगडच्या भवानी माते, राष्ट्ररक्षणा गर्जत ये॥ ३॥

शिवनेरीचे शिवाई, शिवा–जना शिराणी ये।
कवळ्याचे शांतादुर्गे, जगत् शांतीसाठीं ये॥

अमरावतीचे अंबाबाई, रुक्मिणीवरा घेऊन ये।
नेवाश्याचे महालये, अमृत-कुंभ वाटणीस ये ॥ ४ ॥

प्राचि दिशेच्या काली माते, मुंडमाळा मिरवित ये।
कामरूपच्या कामाख्ये ग, चिनी-यावनी चेपुनी ये ॥ ५ ॥

पश्चिमेच्या रक्षक मुंबा-काळबा-महालक्ष्मी या।
आरासूरी हर्षदमाते, गिरनारीचे अंबे या ॥ ६ ॥

दक्षिणेच्या रक्षक-दक्ष कामाक्षी-मीनाक्षी या।
विवाह अतुरा कुमारीकन्ये, करांत मंगळ माळा या ॥ ७ ॥

उत्तरेच्या ज्वालादेवी, क्षीर-भवानी, वैष्णवी या।
काटमांडुच्या गुह्येश्वरी, हिंदु-ध्वज फडकावित या ॥ ८ ॥

वैदिक आणि पुराणकालीच्या देवींनो आधीं या।
पीठदेवता, शिखरदेवता, ग्रामदेवता सत्वर या ॥ ९ ॥

वृक्षदेवता, तन्त्रदेवता, मन्त्रदेवता सगळ्या या।
नाणक मुद्रा, कोरिव शिल्प, जळदेवींनो वर्षत या ॥१०॥

पश्चिम देशीं मिसरपासून पेरु मेक्सीकोपर्यंत।
बॅबीलोन, रोमना, हिटाईट, इंका संस्कृति विख्यात ॥११॥

पूर्व बाजुला चीन, जपान, सयाम, जावा, बालींत।
आदिमायेची विखुरलेलीं रूपें नमितों नमनांत ॥१२॥

(प्र कृ. प्रभुदेसाई)

# वैदिक देवता

वैदिक देवता हे प्रकरण सुरू करताना प्रथम आपणांस वेदकालीन इतिहासाचे संक्षिप्त स्वरूप अवलोकन करावयास हवे. अतिप्राचीन काळी भारतामध्ये मनुष्यप्राण्याची वस्ती नव्हती, असे काहींचे मत आहे. कालांतराने ऑस्ट्रिक वंशीय लोक ईशान्य बाजूने भारतामध्ये हळूहळू येऊन वस्ती करू लागले. हा ऑस्ट्रिक वंश पूर्वाश्मयुगीन म्हणता येईल. ते गव्हरात अगर गुहेमध्ये वस्ती करून रहात. ते दगडाची ओबडधोबड शस्त्रे वापरीत. साधारणत: ते शरीराने बुटके, वर्णाने चिंगट-काळसर, जाड, मोठे नाक अशा प्रकारचे असत. तिबेटी, ब्रह्मी, मोन्-ख्मेर, आणि मुंड, हे भाषासमूह ऑस्ट्रिक म्हणून दाखविता येतील. हे वर्णन सांप्रतच्या भारतामध्ये वस्ती करून असलेल्या मुंड, कोल, संताळ इत्यादि पूर्व भागात राहणाऱ्या लोकांना लागू पडते. पण भारतीय पुराणवस्तु संशोधनाच्या इतिहासाप्रमाणे मद्रास, मुंबई, बिहार, म्हैसूर, हैद्राबाद या ठिकाणी नद्यांच्या थरांतून जे उत्खनन झाले, त्यामध्ये कुऱ्हाडी, छिन्न्या, खोदकामाची हत्यारे आढळली आहेत, आणि ती सुमारे पांच लक्ष वर्षांपूर्वीची असावीत असे मत आहे. कर्नूलजवळ बिलासुमाम गावी एक जुनी गुहा आढळली आहे; ज्यामध्ये अश्मयुगीन मानवाची वस्ती होती. नेवासे येथील उत्खननातील वस्तु तर लक्षावधी वर्षांच्या पूर्वीच्या होत्या, असे मत आहे. तेव्हां भारतामध्ये मूळची वस्ती नव्हती असे विधान करता येण्यासारखे नाही.

कालांतराने मेडिटरेनिअन लोक बलुचिस्तानमार्गे भारतात आले, आणि त्यांची संस्कृति ऑस्ट्रिक वंशात मिसळून द्रविडीयन लोकांची संस्कृति तयार झाली या संस्कृतीमध्ये तामीळ, तेलगू कानडी, मल्याळी, तुळतोड, कोटा, गोंड, खोंड इत्यादि पोटसंस्कृति निर्माण झाल्या ( Dr Caldwell Comparative Grammar of Dravidian Languages ). मोहेंजोदरो व हराप्पा येथील संस्कृति ह्याच लोकांची होती. सुमेरिअन व द्रविडीयन एकच होत. इजिप्त, बॅबिलोन वगैरे देशांबरोबर त्यांचा व्यापार चालत असे. ह्या काळात मंगोलियन व इतर वंशीय लोकही हिमालय पर्वताच्या पलीकडून भारतामध्ये शिरत होते. अशा परिस्थितीमध्ये वैदिक आर्य वायव्य भागातून आले. पंडित श्री. दा. सातवळेकर आपल्या ‘ आर्यांचे मूलस्थान ’ या ग्रंथामध्ये लिहितात की, आर्यलोक बाहेरून भारतामध्ये आले हे पाश्चिमात्य संशोधकांचे म्हणणे बरोबर नाही. ते भारतातील मूळचे रहिवाशी आहेत. तसेच डॉ. पारगी व रावसाहेब नानासाहेब पावगी यांचेही मत तेच आहे. लो० टिळक म्हणतात की, आर्यांची मूळवस्ती उत्तर प्रदेशात होती. हिमवृष्टीच्या ह्या प्रदेशामधून टोळ्या टोळ्यांनी ते त्या प्रदेशाबाहेर

पडल्यावर जवळपासच स्थायिक झाले. पण पुन्हा मागाहून येणाऱ्या अधिक टोळ्यांच्या दट्ट्यामुळे त्याना आणखी खाली सरकणे भाग पडले. किंवा असेही झाले असेल की, मागाहून आलेल्या टोळ्या पुढील मोकळ्या जागेत सरकून स्थायिक झाल्या असतील. श्री अ. ज. करंदीकर यानी (महाराष्ट्र टाईम्स, मुंबई, दि. १–८–१९६३) एका लेखात प्रतिपादन केले आहे की, वैदिक आर्य उत्तर ध्रुवावर क्रांतिकारक परिवर्तन झाल्यावर, तो देश सोडून खाली कुरुल पर्वताकडे सरकले हे केव्हा घडले यासबंधी पश्चिमात्य सशोधक वेकफिल्ड. जोन्स लिहितात—

The arctic wasteland is a burial ground for hundreds of thousands mammoths that seem to have died about ten thousand years ago and being quickly deep frozen some in the mid summer

भावार्थ असा की, सैबेरिया अगर त्याच्या उत्तरेला आज ज्या हस्तिदंताच्या खाणी आढळून येत आहेत, त्या ठिकाणी सुमारे दहा हजार वर्षांपूर्वी सहस्रावधी हत्तींचे कळप गाडले गेलेले आहेत. असा या कडक थंडीच्या लाटेमुळे, आर्य तो देश सोडून खाली सरकले वैदिक परंपरेतील कुरुकुल अथवा कुरुपांचाल देश हा उत्तरध्रुव प्रदेशाला लागूनच आहे. रामायणामध्ये याचा उल्लेख आढळतो तो असा की,

न कथंचन गंतव्य कुरूणामुत्तरेण व. ।
अभास्करममर्यादं न जानीमस्तत. परम् ॥

सीतेचा शोध घेण्यासाठी वानर निघाले असता सुग्रीव त्याना सांगतो की, " उत्तर कुरुच्या पुढील प्रदेशी तुम्ही जाऊ नका कारण तेथे सूर्य नाही. आणि तेथील मर्यादाही ज्ञात नाहीत " तात्पर्य इतकेच की, या टोळ्यांनी काही काळ मध्य आशियात वस्ती केली मनुष्यवस्तीची दाटी झाल्यावर या टोळ्या आणखी पुढे सरकल्या दक्षिणेकडे आल्या त्या इंडो इराणी नावाने ओळखल्या जातात पश्चिमेस गेल्या त्या इंडो युरोपियन नावाने ओळखल्या जातात पारशी समाजाचा धर्मग्रथ अवेस्ता यातील भाषा आणि वेद पुराणातील संस्कृत भाषा यामध्ये अतिशय साम्य आढळते. पारशी समाज आपणास आर्य वंशीय समजतो दोघांच्या धार्मिक व पौराणिक कल्पनांत फारच साम्य आहे त्यापैकी काही आर्य टोळ्या अफगाणिस्तानमधील डोंगराळ मुलुखातून खैबरघाट ओलांडून पंजाबमध्ये येऊन स्थायिक झाल्या.

प्रथम आलेली टोळी ही मद्र, कैकेय व अयोध्या येथील पुरु इत्यादि वश बनले. पंजाबात आल्यावर त्यांना तेथील द्रविडीयन लोकांवर हल्ला

कराव्या लागल्या. आर्यांजवळ असलेल्या उत्तम शस्त्रांमुळे द्रविडीयन लोकांचा पराभव झाला व काही पूर्वेकडे तर काही दक्षिणेकडे सरकले. दस्यू हे नाव ऋग्वेदामध्ये आढळते. हे लोक आर्य लोकांच्या भीतीने आपली घरेदारे व शेतीवाडी सोडून पळून जात. आर्य त्यांचा ताबा घेत. सूडबुद्धीने काही वेळा दस्यू, आर्य लोकांवर हल्ला करीत आणि आर्यांना त्यांचा प्रतिकार करावा लागे. वस्तीसाठी आर्य लोक झाडेझुडपे तोडून जागा साफ करीत, आणि उदरनिर्वाहासाठी शेतीची लागवड करीत. काही दस्यू घराणी जरी लांब गेली होती, तरी काही तेथेच शेतवाडीवर कामधंद्यासाठी राहिली. आर्य लोकांनी काही दस्यू स्त्रियांबरोबर विवाह करून संकर घडवून आणला, आणि पूर्वीच्या रहिवाशांना आत्मसात करून टाकले.

अशा रीतीने थोडीशी स्थिरस्थावर झाल्यावर आर्यांनी काही वेदरचना करण्याचे कार्य चालू केले असावे. साधारणतः हा काळ इ. स. पूर्व ४००० वर्षांचा समजला जातो. प्रसिद्ध इतिहासकार राधाकुमुद मुकर्जी म्हणतात की, आर्य भारतामध्ये इसवी सनापूर्वी २५०० वर्षे आले, तर दुसरे इतिहासकार रामशंकर त्रिपाठी म्हणतात की, ते १६०० वर्षांपूर्वी आले. लो. टिळक ४००० वर्षांचा काळ गृहीत धरतात. ह्याबाबतीत एकवाक्यता नसल्याने त्यानंतरच्या इतिहासाचा उलगडा करण्यास कठीण जाते. लो. टिळक म्हणतात की, वसंतसंपात मृगशीर्ष नक्षत्रामध्ये असताना येथील आर्य लोकांत फूट पडली. त्या वेळी त्यांचा धर्म अनेक देवतात्मक होता व पशुबळी देऊन यज्ञयाग होत असत. पण सृष्टिचालक म्हणून अनेक देव मानणे आणि त्यांना प्रसन्न करून घेण्यासाठी निरपराधी आणि गरीब पशूंचा वध करणे हे त्यातील काही आर्यांच्या बुद्धीला पटेना. ह्यास्तव ते फुटून निघाले आणि पर्शियामध्ये जाऊन राहिले. अहुरमझ्द ही एकच देवता त्यांनी मानली आणि यज्ञामध्ये पशुबली वर्ज्य केला.

कालांतराने भारतामध्ये दुसरी आर्य टोळी आली आणि ती मगध, चेदी, शूरसेन, मत्स्य, कुरुपांचाल ही चंद्रवंशीय बनली. दुसरी टोळी आल्यावर पहिली अयोध्येकडे पुढे सरकली असावी. सिंधुसंस्कृति ज्याला म्हणतात ती द्रविडीयन लोकांची अथवा पहिल्या आर्य टोळीची संस्कृति असावी. हराप्पा, मोहेंजोदरो येथे सापडलेले अवशेष व पॅलेस्टाईन, कॉकेशस, इजिप्त, बॅबिलोन इत्यादी भागात सापडलेले अवशेष ह्यामध्ये बरेच साम्य आढळून आलेले आहे. ह्याचा अर्थ सिंधुसंस्कृतीमधील लोकांचा त्या त्या देशाबरोबर व्यापार चालत असे. किंबहुना असेही म्हणता येईल की, भारतामध्ये येण्यापूर्वी या दोन्ही ठिकाणचे लोक एकत्र नांदत होते. त्यापैकी काही सिंधुझोन्यात आले व काही पश्चिमेकडील देशांमध्ये गेले. सिंधुसंस्कृतीमधील लोकांनी द्रविडीयन लोकांपासून तो प्रदेश घेतल्यावर

त्याना स्वस्थता मिळाली आणि त्यानी उत्कृष्ट कार्य केले. प्राचीन गोष्टींचे संशोधक मॅकेसाहेब तर म्हणतात की, सिंधुलोकांतील हे लोक येथे येण्यापूर्वी दुसरी उच्च संस्कृति तेथे होती. शिवपूजा आणि प्राणीपूजा ही त्या संस्कृतीमधूनच सिंधु-संस्कृतीने उचलली. दुसरी आर्यांची टोळी भारतात आली, तेव्हा मूळ द्रविडीयन लोकांचा त्रास कमी झाला होता आणि बहुधा पहिल्या टोळीने शांतता प्रस्थापित केलेली होती. यामुळेच दुसऱ्या टोळीतील आर्यांना मंत्ररचना करण्यास भरपूर वेळ मिळाला. यालाच वेदकालाचा प्रारंभ असे सर्वसाधारणपणे मानले जाते.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी आपल्या 'वैदिक संस्कृतीचा विकास' या ग्रंथात (पृ. २) म्हणतात की, वैदिक काळापूर्वी, वैदिकेतरांच्या महान संस्कृतीचा इतिहास भारतवर्षात चालू होता. त्यानी राज्ये, ग्रामे व नगरे येथील नद्यांच्या तटावर व पर्वताच्या परिसरात उभारली गेली होती. भाषा, धर्म, कला, स्थापत्य, शेती, व्यापार, इ० सुधारणादी मानवाच्या व्यवहाराचे त्यांना ज्ञान होते. मोहेंजदरो व हराप्पा येथील अवशेष त्याचेच द्योतक होत. याच विषयाचे सखोल विवरण डॉ. रा. ना. दांडेकर यानी केलेले आहे, आणि त्यांच्याने तेच 'भारतीय संस्कृति कोश' (खंड १ ला) मध्ये उद्धृत केले आहे (पृ. ४८०). जिज्ञासूंनी हा मूळ स्थानाचा प्रश्न त्या ठिकाणीच पाहणे श्रेयस्कर वाटते. विस्तारभयास्तव येथे तो टाळला आहे.

असे जरी असले तरी दिवसेंदिवस संशोधनात प्रगति होत आहे, आणि अधिक साधने उपलब्ध झाल्यावर, पूर्वीचे अंदाज मागे पडत आहेत. डॉ. वा. मो. कानिटकर यानी या विषयावर नुकताच एक लेख प्रसिद्ध केला असून, वेद-काळाच्या निर्णयासंबंधी ते म्हणतात की, वेदांग ज्योतिषाच्या काळी वसंतसंपात भरणी नक्षत्रात दहा अंश पुढे होता, म्हणून तो काळ सनपूर्व १२०० वर्षांचा ठरतो. तैत्तिरीय उपनिषदात तो कृत्तिका नक्षत्रात असल्याने, तो सनपूर्व २५०० वर्षांचा ठरतो, तर ऋग्वेदामध्ये तो मृगशीर्षात असल्याने ४००० वर्षांचा ठरतो.

आता भूस्तरशास्त्र, भूगर्भशास्त्र, मानववंशशास्त्र, पुरातत्त्वशास्त्र यांचे निर्णय हाताशी धरून आचार्य ज्वालाप्रसाद सिंघल, यांनी लिहिलेल्या "दि सिंध् एपिक्" या ग्रंथात असे प्रतिपादिले आहे की, जन्मयुगीन मानवांपर्यंती, कमीत कमी पाच लक्ष वर्षांपूर्वी असली पाहिजे तेव्हा वरील शास्त्रशोधनाच्या आधारे वेदऋचांचा अभ्यास केल्यावर असा मतितार्थ काढता येतो की, (अ) ज्या नैसर्गिक घटना घडल्या, त्या शक्तीनांच देव मानून, इंद्रादि देवता अस्तित्वात आल्या, (आ) नैसर्गिक प्रकोपांची जी वर्णने वेदामध्ये आहेत, ती भूगर्भशास्त्रज्ञांना मान्य आहेत, (इ) हिमालय अधिक अधिक वर उचलला गेला असल्याने,

तसाच काश्मीर भाग उचलला गेल्याने, त्यातून सात नद्या खाली वहात आल्या, आणि सप्त सिंधू प्रदेश तयार झाला; (ई) सप्त सिंधू तयार झाला तेव्हा त्या प्रदेशातील अश्मयुगीन मानव तेथे रहात होते. अश्मयुगीन मानव आणि वृत्र-कुळनाशाचे काव्यमय वर्णन वेदात आहे. तेव्हा निष्कर्ष असा की, वेदकाळ कमीत कमी पाच लक्ष वर्षांपूर्वीचा असावा.

(केसरी, पुणे. दि. १-८-१९६९)

## भारतामध्ये मूर्तिपूजा केव्हा सुरू झाली ?

भारतामध्ये देवतापूजन वेदकाळापासून किंवा तत्पूर्वीही चालू असावे त्यासंबंधीची ही वचने पहा—

१. देवतानां हरादीनां पुष्पादिनार्चनम् । (गोविंदराज)

२. अतः प्रतिमा स्वे वैतत्पूजनविधानम् । (मेधातिथी)

३. देवतानामार्चनं पुष्पाद्यैः । (सर्वज्ञनारायण)

४. देवतापतनानि कम्पन्ते, देवप्रतिमा हसन्ति, रुदन्ति ।

(षड्विंश ब्राह्मण)

पतंजली ऋषीच्या वेळी मूर्तिपूजा होती. पाणिनीच्या वेळी ती पूजा होती, (पाणिनी हा ख्रिस्ताब्दपूर्व सातव्या शतकात होऊन गेला) कारण ते आपल्या ग्रंथात प्रतिकृति हा शब्द वापरतात. प्रतिकृति म्हणजे पूर्वी काही अस्तित्वात असलेल्या मूर्तीची हुबेहुब प्रतिमा बनविणे असा आहे. त्याचा अर्थच हा की, पाणिनीपूर्वीही मूर्तीचे अस्तित्व होते. 'षड्विंश ब्राह्मणा'च्या सहाव्या प्रकरणात हसणाऱ्या, रडणाऱ्या, गाणाऱ्या इत्यादी प्रकारच्या मूर्ती होत्या, असे वर्णन आढळते. 'यक्ष निरुक्त'मध्ये मूर्तीचा उल्लेख आढळतो. रामायणकाळी व त्या-आधीच्या परशुरामकाळीही मूर्तिपूजा होती हे तर प्रसिद्ध आहेच. त्या वेळी दक्षिण भारतामध्ये, लंकेत देवळाचाही उल्लेख आढळतो. सारांश, वेदकाळापासून मूर्ति-पूजन होते असे मानावयास हरकत नाही. (Elements of Hindu Iconography by T. A. Gopinath Rao).

मूर्तिपूजन जर चालू होते असे आपण मानले तर त्या काळी देवस्थाने अगर देवालयांचे अस्तित्व का आढळून येत नाही ? देवाचे शारीरिक दर्शन अस्पष्ट असले तरी मनुष्यगुणारोपित असते. देवतांनी कुळे दर्शविण्यासाठी त्यांच्या स्वाभाविक मूळ गुणास्तवच आकृति व अलंकारांमध्ये दिग्दर्शित केलेल्या

असतात. जसे शिर, नेत्र, उदर, पाद इत्यादि अवयव निरनिराळ्या देवांवर आरोपित केलेले असतात. वस्त्रे धारण करणाऱ्या देवतांचेही वर्णन आढळते. शोभिवंत व तल्प वस्त्रे धारण करणारी उषादेवी, शिरस्त्राण वापरणारे देव, रेशमी वस्त्रयुक्त असणारा इंद्रदेव, इतका स्पष्ट बाह्य आकार कल्पिलेला असूनही ह्या देवतांची देवस्थाने का आढळत नाहीत हे समजणे कठीण आहे. ( Ibid, T A Gopinath Rao, Page 348 )

## वेदकालामधील स्त्रीदेवता

ज्याप्रमाणे आद्यशक्ति ही विश्वसंचालक म्हणून समस्त मानली जाते, त्याप्रमाणे तिला वेदकाळात महत्त्व नव्हते. वैदिक उपासनेत ह्या देवता कनिष्ठ दर्जाच्या आहेत. त्या काळी देवतांचे श्रेष्ठत्व व ज्येष्ठत्व त्यांना मिळणाऱ्या यज्ञभागातील हविर्भागावर अवलंबून असल्याने स्त्रीदेवतांना त्यात स्थान नसल्याचे दिसून येईल. उषादेवीलाच काय ते थोडेसे महत्त्व आहे. इंद्र, वरुण, ब्रह्मा यांनीच सर्व हविर्भाग आत्मसात केलेला आहे. वैदिक काळ हा बराचसा यज्ञयागांनी गजबजलेला असे. एवढेच नव्हे तर यजुर्वेद त्यासाठीच निर्माण झाला. तात्पर्य, ज्यांना हविर्भाग नाही, त्या देवता कनिष्ठ दर्जाच्या होत्या असे मानावयास हरकत नाही दुसरे प्रमाण वेदांतील सूक्तसंख्येचे देता येईल. इंद्र, वरुणादि देवतांसाठी असंख्य सूक्तसंख्या खर्ची पडली आहे. पण ते भाग्य स्त्रीदेवतांना लाभलेले नाही. उषा, सरस्वती ह्या देवतांबद्दल काही सूक्ते विखुरलेली आढळतील, पण हविर्भाग त्यांना मिळालेला नाही पृथ्वी, रात्री, वाक्, पुरंध्री, इळा ( दधि दुग्ध इति ), इडा ( धेनु ), बृहद्दिवा, राका, सिनीवाली, कुहू, मरुतांची माता पृश्नि, विवस्वानांची भार्या सरण्यु व सूर्या १० देवतांची नावे आढळतात.

देवांच्या बायका म्हणून इंद्राणि, वरुणानी, अग्नायी, अश्विनी इत्यादि नावे आढळतात. पण वेदांमध्ये त्यांना फारसे महत्त्व दिलेले नाही.

## देवतांची संख्या

संख्या ३३ च दिलेली आहे. शतपथ, ऐतरेय ब्राह्मण ह्यांमध्ये ८ वसू, ११ रुद्र, १२ आदित्य असे तीन समूह पाडलेले असून द्यावा-पृथिवी व इंद्र-प्रजापति किंवा वषट्कार व प्रजापति मिळवून ३३ ही संख्या पुरी केली आहे.

असे जरी असले तरी ऋग्वेदकाळी इतर अनेक देवतांचे पूजन, आवाहन होत असे. याचे कारण असे होते की, " यस्य वाक्य स ऋषिः, या तेनोच्यते सा देवता। " म्हणजे ऋषीच्या उच्चाराप्रमाणे जी निर्माण झाली, ती देवता होय. 'भारतीय संस्कृतिकोश' ( खंड १ ), या प्रकरणाचे विवरण करताना अशा मंत्रोक्त देवतांची संख्या सुमारे २५० ची देतो ( पृ. ७१५-१६ ). त्यामध्ये खाली वर्णिलेल्या काही देवतांचा समावेश झालेला आहे. या देवतांचे स्वर्गस्थ, मध्यस्त आणि पृथ्विस्थ असे तीन भाग कल्पिलेले आहेत. या देवतांचे एक रूप दृश्य व स्थूल असून, दुसरे सूक्ष्म व गूढ आहे. देवतांचे नेत्रगोचर असणारे जे रूप ते स्थूल, अतएव आधिभौतिक होय. जे इंद्रियांना अतीत आणि ज्ञानेंद्रियानाही अगम्य ते गूढ रूप होय, त्यालाच आधिदैविक समजावे. याचा तिसरा प्रकार म्हणजे आध्यात्मिक स्वरूप होय. जसे विष्णूला सूर्यरूपात पाहत असताही, त्याला आध्यात्मिक " परम पद " आहे.

वेदकाळामध्ये स्त्रीदेवता कनिष्ठ दर्जाच्या असल्याने साहजिकच त्यांची संख्या कमी आहे. मूर्तिपूजेचे महत्त्व कमी असल्याने आणि यज्ञयागांवर सर्व भर असल्याने ही संख्या कमी असणे स्वाभाविकच आहे. आता क्रमश ह्या देवतांचा इतिहास आपण पाहू.

सांगते की, प्रत्यक्ष ब्रह्मदेवाने ह्याच पदाचे पूजन केल्यामुळे त्याला सर्व देवाचे आधिपत्य मिळाले.

'आर्यांच्या अतिप्राचीन ग्रंथांतून मात्र ह्या पदाचा उल्लेख आढळून येत नाही तसेच ऋग्वेद, अथर्ववेद ह्या ग्रंथामध्येही त्याचा उल्लेख आढळत नाही. तैत्तिरीय संहितेमध्ये क्वचितच उल्लेख आढळतो,' असे जे काही पाश्चिमात्य विद्वानांचे मत बनले आहे, ते सर्वथैव भ्रममूलक होय. ॐची कल्पना स्वच्छपणे ऋग्वेदामध्ये मांडलेली आहे. ह्यानंतरचे ग्रंथ म्हणजे वाजसनीय संहिता, मैत्रायणी संहिता, शतपथ ब्राह्मण इ०. यामध्ये ॐ आढळून येतो. सामवेदामध्ये या पदाला 'उद्गीथ' असे संबोधिले असून 'प्रणव' म्हटल्याचेही आढळून येते. सर्व रसांमध्ये तो उत्तम रस मानला असून उच्चस्थानी विराजमान होण्यास योग्य होय, असे वर्णन आढळते. गोपथ ब्राह्मणातील उल्लेखावरून असे दिसते की, देव-दानवांच्या युद्धात देवांचा नेहमी पराभव होई शेवटी देवांनी ॐचे नेतृत्व पत्करल्यावर, युद्धाचे पारडे फिरले आणि दानवांचा पराभव झाला. ह्या विजयाचे प्रतीक अगर स्मृति म्हणून वेद, ऋचा म्हणताना ॐ या बीजमंत्राने प्रारंभ करावा असे सर्व देवांनी ठरवून दिले

कैवल्य उपनिषदामध्ये असा उल्लेख आहे की, "प्रणवो धनु शरो ह्यात्मा ब्रह्म तल्लक्ष्यमुच्यते।" ज्याला ब्रह्मपद प्राप्त करून घ्यावयाचे असेल त्याने प्रणवाचा धनुष व मनाचा शर करून पुढे पुढे जावे, तरच ते पद प्राप्त होणे शक्य आहे. ॐकारयुक्त गायत्री मंत्राचे जपानुष्ठान केल्यास तो भयमुक्त होतो सोळा वेळा श्वास दाबून व्याहृति व ॐकाराचा उच्चार केल्यास एक महिन्याच्या अवधीमध्ये ब्रह्महत्येचाही दोष नाहीसा होतो. पातंजलयोगसूत्रांमध्ये ॐकाराचे सर्वात्मकत्व व ईश्वरस्वरूप "तस्य वाचक प्रणव" ह्या सूत्रात वर्णिले आहे. मांडूक्य उपनिषदामध्ये ओंकाराचेच संपूर्ण वर्णन केलेले आहे.

आत्मतत्त्व आणि परमात्मतत्त्व या दोन्ही देहांमध्ये प्रणवाने म्हणजेच नाम-ध्यान-जप याने ग्रहण करणे योग्य आहे, असे श्वेताश्वतरोपनिषद्कारांचे म्हणणे आहे.

स्वदेहमरणिं कृत्वा प्रणवं चोत्तरारणिम् ॥ (श्वे. १ १४)

ज्याला परमकल्याणमार्गाचा अभिलाष असेल, त्याने आपला देह हाच अरणीचा खालचा भाग समजून त्यामध्ये प्रणव हा वरचा आहे असे समजून ध्यानरूप होऊन अभ्यास केला असता व मननपूर्वक नामस्मरण केल्याने साक्षात् भगवानाचे दर्शन होते.

ओमित्येतदक्षरमुद्गीथमुपासितोमिति ॥ (छांदोग्य. १)

भावार्थ असा की, भगवद्भक्ताने उपासनांमध्ये, ओम् या शब्दाने सुरुवात करावी, कारण अशी सुरुवात केली असता योग्य फळ मिळते आणि त्याला उद्गाता असे म्हणतात.

भूत भवेत् भविष्यदिति सर्वमोंकार एव ॥ (मांडुक्य. १)

भूत, भविष्य आणि वर्तमान या तिन्ही काळाला पुरून जे काही उरणारे आहे व जे सर्व नेत्रगोचर आहे, ते सर्वच ओंकारमय होय.

ॐकाररूपी भगवान गजाननाचे पूजन सर्वांनी मंगलकार्यारंभी केल्यास विघ्ने दूर होतात, अशी भारतीयांची आजही अटळ श्रद्धा आहे. राजसूययज्ञामध्ये पांडव, गणपतीचे आवाहन विसरले म्हणून दिगूळासानी गणपतीने यज्ञीय घोडा अडकवून ठेवला, अशी कथा आहे. अर्जुनाने गजाननापुढे नाक घासून क्षमा-याचना केली, तेव्हाच तो अश्व गणरायांनी सोडून दिला देव, गंधर्व, राक्षस, किन्नर, चारण, नाग इ० इ० सर्व योनी गजाननाचे पूजन करतात. तामीळ भाषेत " आम " व इंग्रजीमध्ये " आमेन " ही ॐकार पदाचीच रूपे होत. छांदोग्य उपनिषद म्हणते की, प्रजापतीने मानवाचे निरीक्षण केल्यावर, प्रथम त्रयी विद्या आणि नंतर ॐकार तयार झाला. मानवाची वाणी संपूर्णपणे ओंकारालाच चिकटलेली आहे. हरिवंश–उत्तरार्ध–खंडामध्ये ॐकाराची महती वर्णिलेली आहे. जैन व बौद्ध धर्मांतही प्रणवाचे स्वरूप आढळते. जसे— " ॐमणिपद्मेहुम् ".

ह्या पदाचे विपुल वर्णन करता येईल या पदावर विपुल ग्रंथनिर्मितीही झालेली आहे. इतर ग्रंथांप्रमाणे ह्या ग्रंथातही ॐकाराचेच स्मरण करावयाचे म्हणून त्रोटकपणे केलेले आहे, आणि ते त्याचे विश्वव्यापी स्वरूप दर्शविण्यास पुरेसे आहे.

### गजानन

ॐकार म्हणजेच गजानन तेव्हा या देवतेबद्दल थोडीशी माहिती या ठिकाणी दिल्यास ती उचितच होईल ह्या गजाननाचे अनेक अवतार झाले, त्यामुळे त्याच्या जन्मकथाही वेगवेगळ्या उपलब्ध आहेत. आपण त्यांमधील काही पाहू

राक्षसांनी यज्ञयागादि कर्मे करावीत, आणि भगवान शंकर प्रसन्न झाले, म्हणजे त्या भोलेनाथाकडून अमरपद मागून घ्यावे. या गोष्टीमुळे देवांना फार

त्रास होऊ लागला. तेव्हा सर्व देवांनी शंकराची प्रार्थना केल्यावर शंकरांनी असा एक सामर्थ्यसंपन्न देव उत्पन्न केला की, जो राक्षसांपासून देवांचे रक्षण करील. शंकरांनी आपल्या अंशापासून ह्या देवाची उत्पत्ति केली आणि त्याचे नाव विघ्नेश्वर असे ठेविले. असुरांच्या धर्मकृत्यांमध्ये विघ्ने उत्पन्न करणे आणि देवांना साहाय्य करणे हेच त्याचे कार्य होते ( लिंग पुराण ).

श्वेतकल्पाच्या वेळी नंदी, भृंगीसारखे नोकर पार्वतीच्या तैनातीला होते. तरीही जय विजयांनी सुचविले की, स्वतःचा असा विश्वासातील नोकर तिने जवळ बाळगावा. पार्वती एकदा स्नानगृहात असताना व बाहेर कोणीही द्वाररक्षक नसल्याने शंकर स्नानगृहात शिरले, आणि तेव्हाच तिला खास माणसाची गरज भासली. तात्काळ तिने आपल्या अंगाच्या मळापासून एक सुंदरशी लहान मूर्ति तयार केली आणि त्यामध्ये प्राणवायु भरला. पार्वतीचा द्वाररक्षक म्हणून तो वावरू लागला. शंकर पुन्हा एकदा अशेच भेटण्याकरिता निघाले असता, ही मूर्ति त्यांना आत प्रवेश देईना. ही मूर्ति कोण, याची शंकरांना कल्पना नसल्याने क्रोधावश होऊन त्यांनी या मूर्तीचे मस्तक तोडून फेकून दिले. नारदांनी हे वृत्त पार्वतीदेवीला कळविले. पार्वतीने एक सहस्र गण उत्पन्न केले आणि त्या मूर्तीच्या मदतीस पाठविले. होत असलेल्या पाठलागामुळे शंकर बेचैन झाले आणि त्या मूर्तीस जिवंत करण्याचे त्यांनी मान्य केले. त्या वेळी त्यांच्या हाताला जे पहिल्याच प्राण्याचे शीर लागले, ते घेऊन त्यांनी त्या मूर्तीच्या धडावर बसविले, आणि ती मूर्ति जिवंत झाली. पण जे शीर बसविले गेले ते एका हत्तीचे होते. त्याला एकच दात होता, म्हणून त्या मूर्तीचे नाव एकदंत पडले. गजाचे शीर बसविले म्हणून गजानन असे नाव मिळाले. शंकरांनी या गजाननाला आपल्याच रुद्रगणांचा प्रमुख म्हणून नेमले ( शिव पुराण )

द्वापरयुग व कलीयुग ह्यांच्या संधिकाळात क्षुद्र, पापी माणसे आणि रानटी आयुष्य कंठणारी माणसे, मरणाचे वेळी सोमनाथाचे दर्शन घेत आणि नरकाचा रस्ता चुकवून स्वर्गाची वाट धरीत. त्यामुळे पुण्यवान् व पापी अशी दोन्ही माणसे स्वर्गात गेल्यामुळे तेथे अतिशय दाटी झाली. सर्व देव शंकराकडे आले आणि त्यांनी शंकराची–यावर उपाययोजना करावी म्हणून–प्रार्थना केली. शंकरांनी त्यांना पार्वतीदेवीकडे जाण्यास सांगितले. त्याप्रमाणे देवांनी पार्वतीची स्तुति केल्यावर ती प्रसन्न झाली आणि तिने गजानन उत्पन्न केला. आदिमायेने सांगितले की, गजानन योग्य ती उपाययोजना करील. तरी त्यांनी निश्चितपणे परत जावे. गजाननाने माणसांची दुर्बलता कशात आहे हे बरोबर ओळखले. पापी माणसांनी सोमनाथाला न जाण्यासाठी त्याने अशा लोकांना संपत्ति, स्त्रिया व मुले दिली. त्यामुळे ते लोक त्यांमध्येच रममाण झाले. मरणाच्या वेळीही त्याना धनसंपत्तीचा लोभ न सुटल्याने त्यांच्याकडून सोमनाथाला जाणे घडेना. ते त्याला विसरले. सर्व देवांना मोठा आनंद झाला आणि त्यांनी गजाननाला वर दिला, “ दर चतुर्थीला लोक तुझी भक्तिभावाने पूजा करतील आणि त्यामुळे त्यांची मनःकामना पूर्ण होईल. ” या कारणास्तव चतुर्थीला उपवास करण्याचा प्रघात पडला असावा ( स्कंद पुराण ).

गणपति

शंकरांनी गणपतीला एकदा बोलता बोलता सहज त्याच्या जन्माची कथा सांगितली. ते म्हणाले, “ एके काळी पार्वतीसह मी हिमालयाच्या उतरणीवर फिरत असता, हत्तींच्या प्रेमयुगुलांच्या प्रेमलीला पाहून आम्हांलाही कामवासना उत्पन्न झाली. आम्ही दोघेही हत्तीसारखेच वागलो, आणि त्यामधूनच तुझा जन्म झाला ( सुप्रभेदागम तंत्र ).

वरीलप्रमाणे गणपतीच्या जन्माच्या अनेक कथा असल्याने, गणपतीची नावेही अनेक आहेत. त्यांपैकी काही पुढीलप्रमाणेः–– बाळ–गणपति, तरूण–गणपति, भक्ति–विघ्नेश्वर; वीर–विघ्नेश्वर; शक्ति–गणेश, लक्ष्मी–गणपति, महा–गणपति, उर्ध्व–गणपति, पिंगळ–गणपति, हेरंब-गणपति ( नागापट्टण येथे), उच्छिष्ट–गणपति ( नानजनगुडा ), प्रसन्न–गणपति ( पद्मीश्वरम्–त्रिवेंद्रम् ), ध्वज–गणपति, उन्मत्त–गणपति, विघ्नराज–गणपति, भुवनेश–गणपति, नृत्य–गणपति ( हळेबिडुर ), हरिद्रा–गणपति; भालचंद्र–गणपति, शूर्पकर्ण–गणेश, केवळ–गणेश इत्यादि इत्यादि ( Elements of Hindu Iconography by T. A. Gopinath Rao )

मूषकवाहन—गजाननाचे वाहन मूषकच का, असे प्रत्येकाला कुतूहल वाटते. त्याला मूषकवाहन अथवा मूषकध्वज अशी नावेच आहेत, आणि ती पडण्याला काही कारणे झाली. ती येणेप्रमाणे—

पूर्वी क्रौंच नावाचा एक गंधर्व इंद्रसभेमध्ये वावरत असताना त्याची लाथ वामदेवांना लागली. ताबडतोब ऋषींनी शाप दिला, "तू भूलोकी मूषक होशील." त्याप्रमाणे तो गंधर्व पराशर ऋषींच्या आश्रमात मूषकरूपाने अवतीर्ण झाला, आणि आश्रमातले अनेक पदार्थ कुरतडण्यास सुरुवात केली. पराशराने गणेशाची प्रार्थना केली व प्रसन्न झाल्यावर त्याने उदरावर आपला पाश टाकला, आणि "आजपासून तू माझे वाहन होशील" असा शाप दिला. त्या दिवसापासून मूषक वाहन बनला (गणेश पुराण).

या मूषकवाहनाविषयी आणखी एक खगोल सृष्टीतील उत्पत्ति पाहण्या सारखी आहे. आपल्या पौराणिक कथा या आकाशातील ताऱ्यांच्या रूपकांवर आहेत, असे आपल्याला अनेक ठिकाणी आढळून येते. आकाशात रुद्राचा तारा आहे मृग नक्षत्राजवळ हा तारा आहे याला लागूनच एक नक्षत्र आहे त्याचे नाव एकशिंगी अथवा एकदंती ( मिनो सरोज ) असे आहे. रुद्रासहित या समूहाला केनिस मेजर ( मोठा कुत्रा ) म्हणतात, तर गणेशाच्या ताऱ्याला केनिस मायनर म्हणतात हे नक्षत्र गणेशाच्या वर्णनाबरहुकूम आहे सोंडेच्या उगम स्थानी तारा, शिरोभागीच्या गंधाप्रमाणे वाटतो, डाव्या बाजूला हस्तीदंतीप्रमाणे एक तुकडा आहे व सोंडेत लाडवासारखा गोल पदार्थ आहे गणेश ताऱ्याचे खालील बाजूस लेपस ( हेअर = ससा ) नक्षत्र आहे. मीर चित्रकार याचे चित्र मूषकासारखे काढतात, आणि हेच गणेशाचे वाहन मानलेले आहे वैदिक पचांगावर काही वेळा मूषकाचे चित्र असते साध्या डोळ्यांना या घटना नीट दिसणार नाहीत, पण दूरदृष्टीच्या दुर्बिणीमधून पाहिल्यास याची प्रचिती येते वृषभ रास म्हणजे वृषभ हे जसे रुद्राचे वाहन, तसेच या ठिकाणी मूषक हे गणेशाचे वाहन मानले आहे. रूपकरूपाने यावर कथा रचून पुराणांत त्याचे वर्णन घातलेले आहे इतकेच.

भारतीय जनता, पुराणकाळापासून आजतागायत, प्रत्येक मंगलप्रसंगी ह्या देवतेचे आवाहन केल्याशिवाय रहात नाही प्रत्येक कामाचा आरंभच ह्याच्या पूजनाने करण्याचा प्रघात आहे " ॐ गणानां त्वा गणपतिं हवामहे " ह्या मंत्राच्या उच्चाराने शास्त्रोक्त विधीला सुरवात होते कारण ही देवता बुद्धि दात्री व विघ्नहर्ती आहे अशी प्रत्येकाची श्रद्धा आहे गणेशपूजनाचे अनेक प्रकार गणेश–पुराण ग्रंथामध्ये सांगितलेले आहत ( अ ६० ) शैव व वैष्णव या दोन्ही पंथांचे लोक ह्या देवतेची पूजा करतात

' आनंदगिरी ' नावाच्या लेखकाने शंकरविजय ह्या नावाचा ग्रंथ लिहिलेला आहे त्या ग्रंथात गाणपत्याचे पुढीलप्रमाणे सहा वर्ग दिलेले आहेत

( १ ) महागणपति पंथ –– या पंथीयाचे मत असे की, गणपति हाच आदिकारण असून तो जगत्कर्ता आहे त्यानेच ब्रह्मदेवादि देव व चराचर विश्व उत्पन्न केले

( २ ) हरिद्रा गणपति — ह्या पंथीयांचे मत असे की, ब्रह्मणस्पति हाच गणपति असून तो सर्वश्रेष्ठ होय त्याची पूजनीय मूर्ति यज्ञोपवीत, पीतवस्त्रे धारण करणारी असते.

ह्या पंथाचे लोक गणपतीची सोंड व दंत ह्यांच्या तप्त मुद्रा अंगावर धारण करतात.

(३) उच्छिष्ट गणपति:—ह्या पंथाचे लोक, वाममार्गी शाक्तपंथीयाप्रमाणे निंद्यमार्गाने गणपतीची आराधना करतात.

(४) नवनीत गणपति, (५) स्वर्ण गणपति, (६) संतान गणपति. ह्या तिन्ही पंथाचे लोक श्रुतिशास्त्राप्रमाणे त्याची आराधना करतात (जेम्स धर्मकोश, ६।१७५).

तारकासुराच्या वधाकरिता ह्या देवतेचा जन्म झाला, आणि देवकार्यामध्ये त्याने आपल्या बुद्धीच्या सामर्थ्यावर हरहुन्नरी कामे केली असल्याने, त्याची कृत्ये वर्णन करणारी ग्रंथनिर्मिती अनेकांनी केली आहे. गणेश-प्रताप, गणेश-लीलामृत, गणेश-भागवत, गणेश-पुराण, गणेश-विजय इत्यादि अनेक ग्रंथ प्रसिद्ध असून श्लोकसंख्या दीड लक्षावर आहे. अद्यापही ह्या देवतेच्या स्तुतीपर ग्रंथनिर्मिती होतच आहे.

ह्या देवतेची अनेक प्रमुख स्थाने भारतामध्ये आहेत. महाराष्ट्र प्रांती 'अष्ट विनायक स्थाने' प्रसिद्ध आहेत. मोरगाव, थेऊर, रांजणगाव, लेण्याद्रि, ओझर, सिद्धटेक, महड व मुरुड (पाली) ही ती स्थाने होत. कोकणप्रांती गणपति-पुळे, उत्तर कॅनरामध्ये इडगुंजी, कल्याणजवळ टिटवाळा ही स्थाने जागृत मानली जातात. तामिळ भाविक या देवतेला 'तुंबिकाई अळवार' ह्या नावाने ओळखतात. तंजावर येथे 'उच्छिष्ट-पिळ्ळैयार' गणेशाची अतिशय भव्य मूर्ति आहे. नागपूर येथील शुक्रवार तलावाजवळ तशीच भव्य मूर्ति आहे. वाई (सातारा) येथील मूर्तीची पूजा तर शिडी लावून करावी लागते. बहुधा सर्वत्र या देवतेची मंदिरे आढळतील.

कासरगोड (मंगलोर) येथून पाच मैलावर माधुरे गावी एक बाई गवत कापीत असताना तिचा कोयता गवताखाली झाकून गेलेल्या ? फूट लांब व १॥ फूट वर आलेल्या गणेशाच्या मूर्तीस लागला आणि त्याच्या शरीरातून रक्त बाहेर येऊ लागले. त्या अज्ञानी स्त्रीला हा प्रकार पाहून आश्चर्य वाटले व देवाच्या अंगाला आपण जखम केली याचे दुःख झाले. तिने त्वरेने गावातील माणसांना हा प्रकार कळविला आणि ती तेथे गोळा झाली. त्यांनी सर्वांनी देवाची प्रार्थना केली आणि त्या बाईला क्षमा करण्यासाठी विनविले. त्यानंतर रक्तप्रवाह बंद झाला. गावकऱ्यांनी नंतर त्या मूर्तीसाठी लहानसा गाभारा बांधला. या गोष्टीस ८०० वर्षांचा काळ लोटला आहे. मात्र आश्चर्य असे की, त्या वेळेपासून गणपतीची

मूर्ति वाढतच आहे. सांप्रत मूर्तीची उंची १० फूट असून रुंदी ४॥ फूट आहे. गाभाऱ्याच्या छताला मूर्तीचे मस्तक टेकले असल्यामुळे पुढील वाढ बंद झालेली दिसते. असे हे प्राचीन अद्‌भुत क्षेत्र आहे.

(कल्याण, क्षेत्र अंक १९५७/३२१)

गणपतीचा पराक्रम वर्णन करताना नेहमी आपण सिंदूर दैत्याचा वध केला अशी कथा ऐकतो. हे स्थान कोणते, याचा शोध लागलेला आहे. मराठवाड्यात औरंगाबाद शहरापासून २० मैल अंतरावर आणि वेरूळपासून पाच-सहा मैलांवर सिंदूरवाड हे ठिकाण आहे. सध्या तेथे मध्वमुनींचा मठ आहे. हेच सिंदुरदैत्याचे ठिकाण मानले जाते. अजिंठ्यापासून ८ मैलांवर डोंगरावर कोरलेल्या गुहेमध्ये ७ फूट उंच व ४ फूट रुंद अशी गणपतीची भव्य मूर्ति आहे. या ठिकाणी साधना करण्यासाठी अनेक भक्तगण जातात.

मूळ गणेश पुराण म्हणते, " घृणेश्वर सान्निध्यात सिद्ध सिंदूरवाडकम् " या भागात यदुमाणिक नावाचे एक महान् कवि होऊन गेले. त्यांनी समग्र गणेशपुराण " संजीवनी टीका " या नावाने प्रसिद्ध केले आहे. त्यामध्ये ते म्हणतात—

घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग । जे जगत्प्रसिद्ध निःसंग ।
त्याचें सन्निध अंतरंग । दक्षिणा सिंदुरवाडे ॥ ४२ ॥

तसेच मध्वमुनी म्हणतात, " उभा होता वेणुनादीं, तो सिंदुरवाडी प्रकटला. " एका गणपतीच्या आरतीचा चरण असा आहे—

" चिंतामणीचें शरण जाईन । सिंदूरवाडा राहीन ॥ "

यावरून असे कळून येईल की, सिंदुर दैत्याच्या वास्तव्याचे हे ठिकाण होते.

(मराठी संशोधन पत्रिका, मुंबई, ऑक्टोबर १९५९, पृ. ६८.)

या देवतेचे अनेक नामवंत भक्त होऊन गेले. त्यांपैकी चिंचवड येथील मोरया—गोसावी, धरणीधर, गोसावीनंदन, निरंजनदास, चिंतामणि देव इ० नावे प्रसिद्ध आहेत. पेशवे काळामध्ये एका गणपतीभक्ताने जंजिऱ्याच्या मुसलमान नवाबाला अमावास्येच्या दिवशी अंतराळामध्ये चंद्र-दर्शन घडविले, अशी कथा उपलब्ध आहे. थोरले माधवराव पेशवे हे गाणपत्य होते. त्यांनीच भाद्रपद महिन्यात गणेशचतुर्थीचा उत्सव सार्वजनिकरीत्या शनिवारवाड्यात सुरू केला. लो. टिळकांनी स. १८९६ साली, आपली राजकीय चळवळ जनतेमध्ये अगदी खालच्या थरापर्यंत पोहोचविण्यासाठी ह्याच उत्सवाचा आश्रय घेतला, आणि

त्याला सार्वजनिक स्वरूप दिले सार्वजनिकरीत्या हा उत्सवसमारंभ जरी भाद्रपद महिन्यात साजरा होत असला, तरी वास्तविक गणपतीने सिंदुर दैत्यावर विजय मिळविला त्याचा हा स्मृतिदिन आहे. माघ शु ४ ही गणेशाची जन्मतिथि असल्याने गणपतीच्या स्थानी हा उत्सव त्या दिवशी साजरा केला जातो, आणि रामजन्म, कृष्णजन्म ह्याप्रमाणे तोच दिवस योग्य दिसतो

ह्या विघ्नहर्त्या देवाची आराधना भारतामध्येच होते असे नव्हे, तर इतर देशातही ती होत असे श्री एलिस गेटी या इंग्रज लेखिकेने जगातील सर्व देशांना भेटी देऊन, दहा वर्षे संशोधन करून जी माहिती मिळविली, ती तिने, "Ganesh, A Monograph on the Elephant-faced God" ह्या नावाच्या ग्रंथाने प्रसिद्ध केली आहे हा ग्रंथ १९३६ साली प्रसिद्ध झालेला आहे ग्रंथकाराने असे दाखवून दिले आहे की, नेपाळ, चीन, कंबोडिया, जावा, सुमात्रा, बलुचिस्तान, तिबेट, सयाम, जपान, मेक्सिको, तुर्कस्थान इ० देशांमध्ये ज्या मूर्ति आढळून आल्या, त्यावरून तेथे ह्या देवतेची आराधना होत असे. अवशेष व संग्रहालयातील प्रतिकृति ह्यांनी निरनिराळी स्वरूपे दर्शविणारी ४० छायाचित्रे छापलेली आहेत. ती स्वरूपे आपणाला भारतामध्ये क्वचितच पाहावयास मिळतात असा ह्या विघ्नहर्त्या गजाननाचा हा त्रोटक इतिहास आहे.

प्रारंभी म्हटल्याप्रमाणे शनिश्वरीसारख्या चिरंतन ग्रंथाची निर्मिति करण्यासाठी त्यांनी गणेशाची स्तुति केली महाभारतासारखा पाचवा वेदतुल्य ग्रंथ व्यासांनी तयार केला, आणि त्याचे लेखन अत्रुटित व्हावे म्हणून ते लिहिण्याची कामगिरी प्रत्यक्ष गजाननांनी स्वीकारली. कलीयुगाच्या विलक्षण स्वैर वातावरणात योग्य उपासना शास्त्रकारांनी सांगितल्याप्रमाणे 'कलौ चंडीविनायकौ' याची म्हणजे चंडी देवी आणि गजानन यांचीच सांगितली आहे. हा ग्रंथच मुळी चंडीचे म्हणजे आदिशक्तीचे महत्त्व वर्णनपर आहे. तेव्हा या ग्रंथाच्या आरंभी, देवादिक, व्यास वाल्मीकि, स्मृतीकार, महाकवि, नाटककार, संत, महंत इत्यादिकांचे लेखनकार्यात ज्याप्रमाणे गजाननाचे वर्णन असते, तद्वत् चिरस्थायी ठरणाऱ्या या शक्तिग्रंथामध्ये गणेशाचे वर्णन करण्याचा अल्पमति यत्न केला आहे भारतीय साहित्यग्रंथाचा हाच विशेष आहे, की प्रथम मंगलमूर्तीला मनोभावे वंदन करावे लागते म्हणजे पुढील विघ्ने नाश पावतात आणि खऱ्या अर्थाने विघ्नराज मंगलमूर्ति आपले वैशिष्ट्य प्रकट करतो

२ अदिति

त्वं परा प्रकृति साक्षात् ब्रह्मण परमात्मन ।
त्वत्तो जात जगत्सर्वं त्व जगज्जननी शिवे ॥

हे शिवे, तू परब्रह्म परमात्म्याची पराप्रकृति आहेस तुझ्यापासून सर्व जगताची उत्पत्ति झाली असून, तूच विश्वाची माता आहेस (कल्याण, शक्ति अंक, १९३४).

आपल्या डोळ्यांनी पृथ्वी, आकाश अगर त्याच्याही पलीकडे आपण जे काही पाहू शकतो, ते सर्वच म्हणजेच अदिति होय. ऋग्वेदामध्ये ह्या देवतेचा उल्लेख अनेकवार आलेला आहे. तिला अनर्वा हे विशेषण लावले आहे. मुलांबाळांचे व गुराढोरांचे पालन करणारी म्हणून ह्या देवतेचे आवाहन केलेले आहे. "अदिति स्वर्ग आहे. अदिति अंतरिक्ष आहे. जगन्माता, पिता, पुत्र, देव, पंचानन म्हणजे अदिति होय. फार काय? आजवर उत्पन्न झालेली व पुढे होणारी प्राणिजात व जीवसृष्टि म्हणजेच अदिति होय." (ऋग्वेद, १-८-१०) ह्या देवतेला देव-माता म्हणजेच सर्व देवांची माता म्हटले आहे. ही दक्ष-प्रजापतीची माता, तर दुसऱ्या बाजूने कन्या म्हटले आहे. या देवीने आठ पुत्र उत्पन्न केले, म्हणून तिला "पस्त्या" असे म्हटले आहे. आठवा पुत्र मार्तंड (सूर्य) तिने टाकून दिला, आणि सात पुत्रांना घेऊन ती देवांसमोर आली ह्याच सात पुत्रांना सात आदित्य म्हणतात.

यजुर्वेदामध्ये ह्या देवीचे विष्णु पत्नी, जगाची सम्राज्ञी, पृथ्वीला स्थिर ठेवण्यासाठी सावरून धरणारी, अंतरिक्षाला आपल्या अनेक बाहूंनी पेलून धरणारी असे वर्णन केले आहे. विष्णु-पुराणामध्ये अशी कथा आहे की, समुद्रमंथनाच्या वेळी मेरुपर्वताची रवी क्षीरसागरामध्ये खाली तळ धरीना, तेव्हा भगवान विष्णूंनी कूर्मरूप घेऊन ते सागरी तळी बसले, आणि त्यांच्या पाठीवर रवी ठेवल्यानंतर मंथन सुरू झाले. त्या मंथनातून अनेक रत्ने बाहेर निघाली. त्यापैकी एक कर्ण फुलांची जोडी इंद्राने प्रथम या अदिति देवीला दिली. काही काळाने नरकासुराने ती जोडी, तिजपासून चोरून आणली, आणि आपली राजधानी प्राग्ज्योतिषपूर येथे नेली. श्रीकृष्णाने नरकासुरावर स्वारी करून त्याचा पराभव केल्यानंतर ती जोडी परत मिळविली आणि अदितीला परत दिली. वैदिक ग्रंथातून तिला "गो" म्हणूनही संबोधिले आहे. (डोसन पुराण शब्दकोश, पृ. ३)

अदिति ही मित्रावरुणाची माता तशीच अर्यमादेवीची माता होय द्यौस व पृथ्वी ह्यांच्याबरोबर ती एकरूप कल्पिलेली आहे. ती दक्षकन्या होय असे वर सांगितले आहे. ह्या ठिकाणी ती प्राचेतस दक्ष व त्याची पत्नी असिक्नी यांची कन्या असा अर्थ घ्यावयाचा. देव युगामध्ये पुत्रप्राप्तीसाठी तिने एका पायावर उभे राहून उग्रतप केले, आणि त्यामुळेच तिला पहिले अकरा पुत्र झालेले असतानाही विष्णु हा बारावा पुत्र झाला. तैत्तरीय संहितेप्रमाणे तिला आठ पुत्र झाले असे

वर म्हटले आहे. पण आठव्या पुत्राचा गर्भ तिने स्वतःच फोडला ( चित्राव, प्राचीन चरित्र कोश, पृ. १६ ). अत्यंत विस्तीर्ण, अनेक शुभ कार्ये करणारी, यज्ञ-पालक, अनेक संकटातून पार करणारी, कधीही वार्धक्य न पावणारी, अत्यंत गमनशील, जगातील प्राणिमात्रांची आश्रयदात्री, अशा अदिति देवीला आमचे रक्षण करण्यासाठी बोलावीत आहोत. ( शुक्ल यजुर्वेद, २१/५ ).

इतर देशातही या देवीचे स्वरूप मानलेले आहे. " द्यौर्मेपिता जनिता नभिर्त्रा बन्धुर्मेमाता पृथ्वी महियम् । " ( ऋग्वेद, २-३-२० ) हाच द्यौसपिता युनानच्या पुराणामध्ये ज्यूपितर ( Zeus Pitar ) अथवा त्याचा अपभ्रंश ज्यूपिटर असा झाला आहे. हाच द्यौपिता यहुदी लोकाचा ' जेहोवा ' ( Jehovah ) आणि इसाई लोकाचा ' यावेह ' ( Yaweh or Yahveh ) म्हणजे स्वर्गात राहणारा पिता झालेला आहे. ईश्वराचे मातृस्वरूप अशा रीतीने सर्वत्र दृग्गोचर होत आहे. भारतीय संस्कृति कोश ( खंड १ ) मध्ये असेच वर्णन आहे.

भारतीय ऋषींनी ज्ञानदृष्टीने दिक्कालगणनाचे अचुक सिद्धांत मांडलेले आहेत. दिति, अदिति, देव, तारे यांचे वर्णन व स्वरूप रेखाटलेले आहे. अखिल विश्व हे दिति म्हणजे मर्यादित नसून, अदिति म्हणजे मर्यादित आहे. दिति म्हणजे बंधन, त्यापासून जे उत्पन्न झाले ते दैत्य व अदिति म्हणजे अमर्यादित, त्यापासून जे उत्पन्न झाले ते ते आदित्य म्हणजेच देव होत. तेजापासून उत्पन्न झालेले म्हणजे स्वतः जे अतितेजस्वी आहेत, त्यांनाच आपण देव म्हणतो. आकाशातील अनेक तेजस्वी तारे हे देव होत. त्यांची नावेही ब्रह्महृदय, अग्नि, रुद्र, गणेश, कार्तिकेय, ध्रुव, शर्मिष्ठा, देवयानी, अगस्ती अशा प्रकारचीच आहेत. देवाचे निवासस्थान हे अदितीमध्ये आहे. म्हणून त्याचे मापन शक्य होत नाही. आधुनिक वैज्ञानिक संशोधक आइन्स्टाइन म्हणतो, अदिति म्हणजे Boundless & unbounded, असे तो अखिल विश्वाचे प्रतिपादन करतो व ते भारतीय परंपरेला धरूनच आहे. अदितीमध्ये असंख्य सूर्यगोल, ग्रहमाला, विश्वे, व ब्रह्मांडे आहेत. आणि या सर्वांना ताब्यात ठेवणारी अथवा सत्ता चालविणारी शक्ति त्याचे नाव " अनंतकोटीब्रह्मांडनायक " असे ठेवलेले आहे.

आराधना केली असता ह्या साधकाला रोगराईपासून दूर ठेवितात आणि दीर्घायुष्य देतात ( ज्ञानकोश, प्रस्तावनाखंड, २।३३३ ).

( ४ ) इडा

देवांनी यज्ञापासून स्वर्ग व अमृतत्व प्राप्त करून घेतले, त्या वेळी भूतलावर मनूही यज्ञ करीत होता. तो यज्ञ पाहण्यासाठी इडा तिकडे गेली आणि तेथेच राहिली. देवांनी तिला अप्रत्यक्षपणे आव्हान दिल्यावर मगच ती कायमची देवांकडे राहावयास गेली ( तै. सं. १–७१ )

( ५ ) उर्वशी

अंतरिक्षामध्ये वावरणाऱ्या अनेक अप्सरा आहेत. पण त्यांपैकी एक उर्वशीचेच नाव ऋग्वेदामध्ये आढळते. ही अप्सरा होती, ह्याला पुराणा म्हणजे वसिष्ठ ऋषीला एका ऋचेमध्ये उर्वशी–पुत्र संबोधिले असून दुसरीकडे त्याला अप्सरा-पुत्र दाखविले आहे ( ऋ. ७·३३।११–१२ ). एके ठिकाणी उर्वशीची तुलना नदीबरोबर केलेली आहे. उत्तरकालीन सूक्तांमध्ये उर्वशी व तिचा प्रियकर राजा पुरूरवा ह्याचा संवाद दिलेला आहे. तो फारच उच्च प्रतीचा असून, मूळ मधांतून तो वाचावयाला पाहिजे या सूक्तामध्ये तिला “ अप्या ” म्हणजे अंतरिक्षदेवता म्हटले असून ती मारून टाकणारी व आक्रमण करणारी दाखविली आहे. वेबर या पाश्चात्य पंडिताने उर्वशी–पुरूरवा म्हणजे उषा–रवि असा संबंध दाखविला आहे ( ज्ञानकोश प्रस्तावना खंड २, पृ. ३४२ ).

नारायणाच्या ऊरूपासून ही निर्माण झाली म्हणून हिला उर्वशी नाव आले. हिला पाहताच वासतीवर सत्रामध्ये मित्रावरुणाचे रेतःस्खलन झाले. आणि त्यामुळे अगस्त्य व वसिष्ठ ऋषींचा जन्म झाला. ही ब्रह्मवादिनी असून मार्गशीर्षमासाची अधिष्ठात्री देवता होय

( ६ ) उषा

ही द्यु देवाची कन्या होय. आदित्य, भग व निशा यांची भगिनी. पहाटेच्या प्रसन्न काळी पूर्वेकडे दिसणारे आश्विन हे उषेचे मित्र होय. उषःकालाची हीच देवता होय. ऋग्वेदामध्ये ह्या देवीच्या २० ऋचा आहेत, आणि ३०० हून अधिक वेळा तिचा उल्लेख आलेला आहे. प्रकाशरूपी वस्त्रप्रावरणाने तिने आपले अंग झाकून घेतले असून, नर्तकीच्या भपकेबाज पोशाखात आणि नवयौवना कुमारीच्या तोऱ्यामध्ये ती मोहक हावभाव करीत असल्याचा भास प्रात काळी सर्वांना होतो. आपल्या आगमनाने ती सर्व पादचारी प्राणिमात्रांना जागृत करते. देवाचे जे खरे भक्त आहेत, जे आपले आयुष्य देवकार्यासाठी सर्व

करतात, अशांना ती उठविते, तर नास्तिक क्षुद्र लोकांना तसेच झोपेत लोळत राहू देते. मोठ्या दिव्य रथात बसून ती प्रथम येते आणि सूर्याचा मार्ग खुला करून देते. ह्याचसाठी तिला काही वेळा सूर्याची पत्नी म्हणतात ( ज्ञानकोश ).

संस्कृतमधील वस्–प्रकाशणे, या धातूला संप्रसारण होऊन हा शब्द तयार झाला आहे, आणि यास्तव हिला प्रकाशकाळाची देवता असे संबोधण्यात आले. याच घटनेला वैदिक ऋषींनी देवत्व दिले आणि तिच्यावर मानवी अनेक गुणांचा विशेषत: स्त्रीसौंदर्याचा अध्यारोप करून तिजविषयी काव्यसूक्ते रचली ऋग्वेदातले तिचे वर्णन पहा :–

प्रति ष्या सूनरी जनी व्युच्छन्ती परि स्वसुः । दिवो अदर्शि दुहिता ॥ भावार्थ असा की, ही प्रकाशकाळची लावण्यावती रमणी. ही आकाशकन्या उषा पहा. सुप्रकाशित होऊन ही आपल्या बहिणीच्या (रात्र) पोठापाठ दृष्टिगोचर झाली आहे. ती सूर्याच्या उदयस्थानाच्या पलीकडे असलेल्या प्रदेशातून रथात बसून येते, आणि सूर्याला येण्यासाठी मार्ग मोकळा करून देते. ऋग्वेदामध्ये हा शब्द अनेक वेळा बहुवचनी वापरलेला आढळतो. यावरूनच लो. टिळक अनुमान करितात की, ते वर्णन उत्तरध्रुव प्रदेशातील असावे. येथील उषा दीर्घ स्वरूपात दृग्गोचर होई आणि तिच्या प्रथमदर्शनापासून, प्रत्यक्ष सूर्योदयापर्यंत कित्येक दिवस जात असत, अथवा अनेक उषा एके ठिकाणी राहून एक मताने वागत. उषेचे तीस भाग पृथक् पृथक् नसून, अत्रुटित असत आणि चक्राप्रमाणे घाटोळे फिरत असत. वरील कारणास्तव त्यांचे म्हणणे असे की, आर्यांचे मूलस्थान उत्तरध्रुव प्रदेशी होते.

भावार्थ असा की, या देवीचा वर्ण मोती, पोवळे, सोने, नीलमणी यांच्यासारखा आणि धवलवर्ण असा आहे. तिच्या पाच मुखांचा वर्ण वरील-प्रमाणे निरनिराळा असून ती त्रिनेत्री आहे. मस्तकावरील मुकुटात चंद्रकला जडविलेली आहे. तिच्या नावाच्या प्रत्येक वर्णांना तात्त्विक अर्थ आहे. ती दशभुजा असून, प्रत्येक हाती चाबूक, अंकुश, शंख, चक्र, गदा, शुभ्रकपाल, दोन हाती कमळे, एक हात अभय व दुसरा वरदमुद्रा आहेत, अशा स्वरूपाला माझा नमस्कार असो.

गायत्री या शब्दाचा अर्थ त्रिविध आहे. तो पुढीलप्रमाणे—( १ ) गायत्री देवी, ( २ ) गायत्री मंत्र, ( ३ ) गायत्री यंत्र. याशिवाय सर्वसामान्य जनांना परिचित म्हणजे गाय हा आणखी एक अर्थ आहेच.

( अ ) गायत्री देवी—ब्रह्मा, विष्णु, महेश हे गायत्रीचे त्रिपाद समजले जातात. या देवीची उपासना शैव-वैष्णव दोन्ही पंथांचे लोक करतात. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य हे सर्व गायत्री देवीचे उपासक होत. गायत्रीचे त्रिकाळरूप—म्हणजे सकाळी गायत्री, दुपारी सावित्री व रात्री सरस्वती असे समजले जाते. या प्रत्येकाची स्वरूपे अलग आहेत. ही देवी पंचमुखी मानलेली आहे.

गायत्री—दोन हात, हंस वाहन, हातात रुद्राक्षमाळा, भिक्षापात्र, पाश, शुभ्रवर्णी व सूर्यमंडळात राहणारी.

सावित्री—तरुण युवती, नीळकमळाप्रमाणे वर्ण असणारी, गरुडवाहिनी चतुर्भुज, शंख–चक्र–गदा–पद्म धारण करणारी व सूर्यमंडळात वास्तव्य असणारी. या देवीला वैष्णवी असेही म्हणतात.

सरस्वती—उतारवयाची, शुभ्रवर्णी, हाती त्रिशूळ–डमरू, मस्तकावर चंद्र धारण करणारी, वृषभवाहिनी, रुद्राणीसारखे वर्तन असणारी, सूर्यमंडळात राहणारी व सामवेदाची प्रमुख देवता.

डॉ अनी बेझंट यांनी गायत्री मंत्राचे संशोधन करून असे मत नमूद केले आहे की, हा ध्वनीमंत्र असल्याने याचा परिणाम अर्थावर अवलंबून असतो. म्हणजे अर्थाकडे लक्ष देऊन मंत्रपठण झाले तरच त्याचा परिणाम होतो. मंत्राच्या आधी प्रणवाचा उच्चार आवश्यक आहे, कारण त्यायोगे मानवी देहातील सूक्ष्म द्रवकण शिस्तबद्ध होतात, आणि मंत्रशक्ति सुलभपणे अंतरंगात प्रवेश करू शकते. अर्थाकडे लक्ष देऊन पठण झाल्यास मंत्राच्या सूर्य देवतेपासून एक तेजोधारा निघते व ती जपकर्त्यांच्या अंतरंगात प्रवेश करते. तेथून ती नानारंगी प्रवाहांनी माणसाच्या देहातून बाहेर पडते. ही रेषा किंचित् शुभ्रवर्णी व सोनेरी असून

केवड्याच्या पानासारखा तिचा आकार असतो. अर्थात् हे बाहेर पडणारे सात प्रवाह ज्वाळारूप असतात आणि त्यामुळेच त्यांची टोके जवळ येणाऱ्या माणसाच्या मेंदूला अथवा हृदयाला स्पर्श करू शकतात व तेज निर्माण करू शकतात. अनेक माणसांनी सामुदायिक प्रार्थना केली तर अनेक रेषा न येता एकच मोठा प्रवाह येतो आणि मंत्र पाठकाच्या शरीरात प्रवेश करतो. याकरिता या मंत्राच्या पठणाने माणसाच्या बुद्धीला उत्तेजन मिळून सद्भावना वाढीस लागतात. जपकर्त्याच्या आसमंतातील वातावरणही शुद्ध रहाते. (भारतीय संस्कृति कोश, २।७९१).

शिव-गायत्री, विघ्नेश-गायत्री, गरुड-गायत्री, दुर्गा-गायत्री, विष्णु-गायत्री असे गायत्रीचे पाच प्रकार सांगितले आहेत. यावरूनच कदाचित गायत्री पंचमुखी झालेली असावी.

ह्या देवीची मंदिरे अनेक ठिकाणी आढळतात. त्यांपैकी एक पुष्कर येथे असून दुसरे महाड (कुलाबा) येथे आहे. तसेच एक मंदिर ठाणा (कारकर आळी) येथे आहे.

(आ) गायत्री मंत्र— ह्या मंत्राचे चार चरण असतात. हा वैदिक मंत्र आहे. ब्रह्मोपासनेसाठी ह्या मंत्राने सूर्याची उपासना करतात. (१ पाद)— चारी दिशांना प्रकाशित करणारा, (२ रा)— अनंतवान्– पृथ्वी, आकाश, स्वर्ग व सागर यांना व्यापणारा, (३ रा)–ज्योतिष्मान्– अग्नि, चंद्र, सूर्य इत्यादिकांना व्यापणारा, (४ था)– आयतनवान्– प्राण, नेत्र, श्रोत्र व मन ह्यांना व्यापून राहणारा, (छांदोग्य., ३. १–१२–१). गायत्री मंत्राचा जप करण्याच्या वेळी प्रथम प्राणायाम करताना चतुर्भुज विष्णु–मूर्ति नेत्रासमोर उभी करावी. श्वास रोधून धरताना कमलासनस्थ चतुर्भुज ब्रह्मदेवाचे ध्यान करावे, आणि श्वास सोडताना भालप्रदेशी प्रखर तेजामध्ये महेश्वर पहावा. या गायत्रीचे स्वरूप मंत्रामध्ये दाखवितात. ह्या विषयावर अफाट वाङ्मय निर्माण झालेले आहे गायत्री मंत्र

पुरश्चरण विधि" ह्या नावाचा ग्रंथ, 'आनंदाश्रम' पुणे, ह्यांनी प्रसिद्ध केला आहे तो पहावा.

(इ) गायत्री नदी—पूर्वी चाक्षुष मन्वन्तरामध्ये ब्रह्मदेवाने यज्ञ करण्यास आरंभ केला. निमंत्रणाप्रमाणे सर्व देव उपस्थित झाले. यज्ञदीक्षेकरिता स्वरा नामक पत्नीस आवाहन करण्यात आले. काही अडचणीमुळे ती वेळेवर येऊ शकली नाही. म्हणून ब्रह्मदेवाने गायत्रीसह यज्ञकर्म चालू केले. काही वेळाने स्वरा आली, आणि आपल्या आसनस्थानी गायत्री बसलेली पाहून, क्रोधाने तिला शाप दिला, "तू जड होशील" काही कारण नसताना सवतीने शाप दिला, म्हणून तिनेही उलट तोच शाप स्वरेला दिला, "जड व्हाल" याचा अर्थ देवांनी "जल व्हाल" असा केला, आणि पृथ्वीवर जलरूपाने प्रकट व्हावे अशी आज्ञा केली. या कारणास्तव भूलोकावर गायत्री व सावित्री या नद्यांचा उगम झालेला आहे (पद्मपुराण, स. १७).

(ई) गाय—गायत्री म्हणजे गाय हा शब्द सर्वांना परिचित आहे. आर्यधर्मीय असे मानतात की, ह्या गायत्रीमध्ये ३३ कोटी देवतांची वस्ती आहे ह्यामुळेच ती परमपूज्य आणि आर्यधर्माचे प्रतीक बनली आहे. तिच्या उत्तम पौष्टिक दुग्धगुणामुळे ही श्रेष्ठत्व पावली आहे. सारांश, गायत्री ह्या शब्दाचे विविध अर्थ आहेत, आणि अनेक ग्रंथकारांनी ह्या देवतेचा ऊहापोह केलेला आहे सर ऑर्थर ॲव्हेलोन यांनी तर ह्या गायत्रीचे उत्तम विवरण केले आहे (Principles of Tantras, 1952, Edi., P 270)

जानेवारी सन १९६७ साली भारतामध्ये सर्वत्र गोवधबंदी व्हावी याकरिता श्रीमत् शंकराचार्य, जगन्नाथपुरी पीठ व प्रभुदत्त ब्रह्मचारी इ० नामांकित व्यक्तींनी ७२ दिवसांचे उपोषण करून गोरक्षा समितीद्वारे, केंद्रसरकारवर दडपण आणण्याचा प्रयत्न केला असून सरकारच्या विचाराधीन तो प्रश्न आहे

८. त्रिपुरा—

जगताची इच्छामात्रे उत्पत्ति करणारी शक्ति ती त्रिपुरा होय. ब्रह्मतत्त्वाचा परबिंदु, अमरबिंदु व तिचे तीन भाग म्हणजे बिंदु, बीज, नाद. ह्या सर्वांचे प्रतीकात्मक चिन्ह जे त्रिकोण △ त्याला त्रिपुराधाम म्हणतात श्रीचक्र ह्याच चिन्हावर आधारित आहे, आणि ह्या सर्वांची माहिती करून देणाऱ्या ज्ञानाला "श्रीविद्या" म्हणतात

त्रिपुरा ह्या नावाची व्युत्पत्ति अशी दिली जाते—त्रिपुरा = तीन पुरे = तीन नगरे. त्रिपुरासुर नावाच्या दैत्याची तीन नगरात वस्ती होती. ती नगरे अनुक्रमे सुवर्णाची, चांदीची व लोखंडाची असून मयासुर नामक दैत्य

शिल्पकाराने बांधून दिलेली होती. या त्रिपुरासुराला शंकरांनी यमसदनास पाठविले, म्हणून शंकरांना त्रिपुरारि अथवा त्रिपुरांतक नामाभिधान प्राप्त झाले. शिव आणि शक्ति एकत्रित होतात तेव्हाच असुरांचा नाश होतो, तेव्हा या वेळी-सुद्धा शंकरांना शक्तीचे सहाय्य असलेच पाहिजे. "त्रिपुरांतक" या शब्दातील 'अंतक' प्रत्यय गळला आणि त्रिपुर म्हणजेच शंकर असा अर्थ रूढ झाला. वास्तविक त्रिपुर म्हणजे शंकर नव्हे.

या तीन शहरांसंबंधी दुसरी एक व्युत्पत्ति देतात. ती अशी—तारकासुर राक्षसाला तारकाक्ष, विद्युन्माली व कमललोचन नामक तीन मुलगे होते. या तीन मुलांनी उग्र तपश्चर्या केल्यावर त्यांनी शंकराची एक सहस्र कमळांनी पूजा चालू केली. पण चमत्कार असा झाला की, त्या संख्येतील एक एक कमळ कमी व्हावे. पहिल्या वेळी कमळ कमी पडल्यावर प्रत्येक मुलाने आपला एक एक नेत्र काढून पूजा पूर्ण केली. दुसऱ्या वेळी प्रत्येकाने स्वतःचे शिरकमल अर्पण करून संकल्पाची सांगता केली. शेवटी शंकर प्रसन्न झाले आणि या तीन मुलांना राहण्यासाठी विश्वकर्म्यांहस्ते अंतरिक्षामध्ये तीन पुरे तयार करून दिली. नंतर नेहमीप्रमाणे ते उन्मत्त झाल्यावर शंकरांनी त्यांचा वध केला ही गोष्ट वेगळी.

मानवी शरीराला पुर ही संज्ञा आहे. या शरीरात तीन देह आहेत. स्थूल, सूक्ष्म व कारणदेह. तेव्हा मानवी शरीराचे त्रिविध कार्य करणारी ती त्रिपुरा असे नाव संभवते. मानवी शरीरात त्रिगुणात्मक स्वरूपाने वावरणारी ती त्रिपुरा अगर त्रिपुराम्बा होय. वस्तुतः ती निर्गुणात्मक शुद्ध संविद्रूपच आहे, पण गुणोपाधीने त्रिपुरादेवी त्रिगुणा, त्रिदेहा झाली. मूळचे संविद्रूप शुद्ध राहून ती क्रीडार्थ त्रिगुणा झाली, त्रिलोका झाली.

"सा त्रिपुरा कीदृशी? कथं भूता? किं स्वभावा?" असे प्रश्न परशुरामाने गुरू दत्तात्रयाना केल्यावरून ते उत्तर देतात, "हे राम, लोकेश्वरै ब्रह्मादिभिरपि कैयं कुत्रास्थितेति अविज्ञाता, वेदशास्त्रतंत्र्यातीता, समस्तमातृवर्ग-स्वरूपा, तर्केण युक्त्या वा ज्ञातुमशक्या अस्ति। अनुभवमात्रवेद्या, प्रमाणानां प्रमात्री, चिच्छक्तिर्लीला, गृहीतदेहामहिम्याम्बुधिः, सा भगवती न केनाऽपि वर्णयितुं शक्यते!" ही प्रश्नोत्तरे 'त्रिपुरा-रहस्य' ग्रंथातून घेतली आहेत. ह्या देवीचे वर्णन करणे अशक्य होय असे दत्तात्रय सांगतात. ह्याच देवीने जगत्पालनासाठी विष्णूला, उत्पत्तीकरिता ब्रह्मदेवाला आणि विध्वंसनासाठी शंकरांना उत्पन्न केले असे वर्णन आहे. "एषा त्रिपुरनाम्न्या देव्या भेदान्—कुमारी, त्रिरूपा, गौरी, रमा, भारती, काली, चण्डिका, दुर्गा, भगवती, कात्यायनी, ललिता" इ० इ० तसेच या देवीला कामेश्वरी, ललितावा,

कल्याणी, शिवा, बाला, मोहिनी, त्रिपुरसुंदरी (कारण ती अतिशय सुंदर आहे म्हणून), त्रिपुरा-बाला, त्रिपुरा-प्रौढा, महात्रिपुरसुंदरी ही नावे आहेत.

महाविष्णूने ज्याप्रमाणे जगत्कल्याणासाठी निरनिराळे मत्स्य, कूर्मादि अवतार धारण केले, त्याप्रमाणे या त्रिपुरादेवीने कारणपरत्वे दैत्यनाशासाठी अनेक रूपे व अवतार घेतले, जसे— महाकाली, महासरस्वती, महालक्ष्मी, चंडा, योगेश्वरी इ० इ० 'त्रिपुरा-रहस्य' ग्रंथात देवीने अनेक वेळा अवतार घेतले. त्यासंबंधी ही वाक्ये पहा—

(अ) सा देवी द्वादशभुजा, दशवक्त्रा, निमूर्त्यात्मिका, प्रादुर्भूता। (अ. १०)

(आ) सा देवी स्वांगाद्वाणीं, रमां, रुद्राणीं च सृष्ट्वा। ब्रह्माविष्णु-महेशेभ्यो दत्वा अंतर्बभूव। तत्र ब्रह्मणा सह वाण्याः, विष्णुना रमायाः, रुद्रेण रुद्राण्याश्च विवाहः संजातः।

(इ) गौरी स्नानादिं कृत्वा रात्रौ तृणमयीं त्रिपुरां निर्माय नानोपचारै स्तां समाराध्य। ततः प्रसन्ना त्रिपुरा तत्राविर्भूय। (अ. ३०).

(ई) कामो मार्गे गंगातटे त्रिपुरामध्यात्। प्रसन्नया त्रिपुरया तत्राविर्भूय। (अ. ३६).

(उ) त्रिपुरा प्राह–देवाः शृण्वन्तु, अस्या गोपकन्याया उत्पत्तिं वक्ष्यामि। (अ. ३९); त्रिपुरात्मिका गायत्री चतुर्भुजत्रिनयनं रूपं प्राप्य सर्वैः कृतप्रणतिः।

(ऊ) त्रिपुरा वक्ष्यति, हे देवाः, अहं नंदाख्यगोपस्य गृहे संभविष्यामि। एष हरिश्च वासुदेवात्मजो भूत्वा मां कंससमीपे प्रेषयिष्यति। (अ. ४०).

(ए) त्रिपुरया प्रेरिता गौरी स्नानार्थं तत्रागता कालीरूपमधारयत्। शुंभं, निशुंभं हनिष्यामि। (अ. ४२).

(ऐ) कोटिकंदर्पसौंदर्यां, त्रिनयनां, पाशाद्यायुधधरां त्रिपुरां दृष्ट्वा देवा दंडवत्प्राणमन्पदम्। (अ. ४४)

(ओ) एवं सा त्रिपुरा विविधानि रूपाण्यासाद्य जगद्रक्षितुं तत्तत्स्थाने विराजते। (अ. ४७)

(औ) विधिराह, चिन्मात्रस्वरूपा त्रिपुराम्बा एकाऽपि जगत्क्रिया-निर्वाहार्थं ब्रह्मादिरूपेणानेकरूपा भवति। (अ. ५६)

यावरून हे उघड आहे की, आदिमाया मूळशक्तीलाच त्रिपुरा संबोधिले आहे. शेषशायी भगवानाजवळ असलेली योगमाया आदिशक्ति ती हीच होय. मूळ आदिशक्तीने कारणपरत्वे धारण केलेले हे नाव आहे. ह्या देवीचे वास्तव्य वर्णन करताना सांगितले आहे की, " पुरा क्षीराम्बुधिमध्ये फणितल्पके, आदिनारायणः शाशास्तस्याः सत्वतनुर्हरिः " म्हणजे " महाभारतामध्ये मिळा योगमाया म्हटली तीच ही त्रिपुरा होय. "

अनेक पीठामध्ये मूर्तीऐवजी त्रिपुरायन्त्राची पूजा होते. त्याचा खुलासा असा की, त्रिपुरा म्हणजे त्रिगुणदर्शक आहे, हे आपण वर पाहिलेच आहे. त्रिगुणदर्शक रूप दाखविण्यासाठी त्रिकोण △ चिन्ह वापरतात. ह्या त्रिकोणाचा जो मध्यबिंदु आहे तो शिवदर्शक जाणावा, असे एक मत आहे, आणि त्रिकोण हे शक्तिदर्शक चिन्ह होय. सारांश हेच त्रिपुरादेवीचे प्रतीक मानून त्या यन्त्राची पूजा केली जाते.

त्रिपुरा-रहस्य ( अ. ५६ ) ग्रंथामध्ये श्रीचक्रासंबंधी निरूपण करताना सांगितले आहे की, " सृष्टादौ तत्र सा देवी महात्रिपुरसुंदरी । तां बिंदुभूम्या धिष्ठात्रीं कृत्वा स्वाग्रे न्यवेशयत् ॥ " या त्रिकोणामध्ये त्रिपुरा बिंदुवत् राहिली असे वर्णन आहे. शेवटी सांगितले आहे की, " एवं तां. शक्तयश्चक्रे सृष्ट्वा प्रकृतिशक्तिभिः ॥७८॥ " सारांश इतकाच की, मूर्तीऐवजी यन्त्राची पूजा केली तरी तेच फळ मिळते. " चक्रस्थापनतुल्यं नो विद्यते त्रिपुराप्रियम् । बिंदु चक्रे समासीना देवदेवमहेश्वरी ॥२४॥ " ( रुद्रयामल तंत्र )

मानवी शरीरात रुद्रग्रंथी, विष्णुग्रंथी व ब्रह्मग्रंथी वास्तव्य करून आहेत. योगधारणा करणाऱ्या माणसाला ह्याच ग्रंथींतून कुंडलिनी शक्ति सहास्रार चक्राला चालना मिळते येथेच शिव शक्तींचे मीलन होते. म्हणून ह्या तीन ग्रंथींना त्रिपुराशक्ति म्हणता येईल. ( ही माहिती जमा करण्यात रा. ब खाडिलकर, वकील, नाशिक ह्यांचीही फार मदत झाली आहे. )

त्रिपुरातापिनीविद्यावेद्यचिच्छक्तिविग्रहम् ।
वस्तुतश्चिन्मात्ररूपं परं तत्त्वं भजाम्यहम् ॥

त्रिपुरोपनिषद, त्रिपुरतापिनी उपनिषद, यामध्ये त्रिपुरतापिनी विद्या याची माहिती दिलेली आहे, म्हणजेच ती परम तत्त्वाची माहिती आहे.

गायत्रीमन्त्राच्या एकूण अक्षरसंख्येपैकी, पहिली १५ अक्षरे म्हणजे त्रिपुराविद्या असे मानले जाते

( ललिताकल्प, ले. रामचंद्रन् दीक्षितर. )

## ( ९ ) दिति

ही देवी आदितीप्रमाणे प्राचेतस् दक्ष व आसिक्नी ह्यांची कन्या होय. ह्या देवीचे लग्न काश्यप ऋषींबरोबर झाले होते. ऋग्वेदामध्ये ह्या देवतेचा उल्लेख तीन वेळा आलेला असून इष्ट फळ देणारी असे तिचे वर्णन आहे. अथर्ववेदामध्येही तिचा उल्लेख असून तिची मुले दैत्यवृत्तीची म्हटली असून, पौराणिक काळात ही मुले देवांचे शत्रु दाखविलेली आहेत. इंद्र हा आदितीचा प्रतापवान् पुत्र असल्याने तसा पुत्र आपल्याला असावा म्हणून दितीने पतीजवळ हट्ट धरिला. ती गर्भवती झाल्यावर अदितीला ते सहन न होऊन, वहिणीच्या गर्भाचा नाश करण्यासाठी तिने आपला पुत्र इंद्र याला आज्ञा केली. इंद्र सूक्ष्मरूपाने दितीच्या गर्भामध्ये शिरला, आणि त्याने त्याचे सात तुकडे केले. दितीला या कृत्याची जाणीव झाल्यावर ती रुदन करू लागली. कश्यप ऋषि हे द्रष्टे असल्याने त्यांनी पत्नीला सांगितले की, " जरी तुकडे झालेले असले तरी काळजी करण्याची मुळीच गरज नाही. तुला सात पुत्र होतील आणि मरुत् नावाने प्रसिद्ध होऊन इंद्राची बरोबरी करतील " इंद्राने ज्या वेळी गर्भाचे तुकडे केले तेव्हा ते रडू लागले, म्हणून इंद्राने त्यांना म्हटले, " मा रुदित " म्हणजे रडू नका ह्याचाच अपभ्रंश पुढे ' मरुत् ' असा झालेला आहे हेच पुत्र पुढे ' मरुत् ' म्हणून प्रसिद्ध झाले

येथे एक गोष्ट ध्यानात ठेवली पाहिजे की, दितीला जेव्हा असे समजले की, इंद्राला अदितीने आपल्या गर्भाचे तुकडे करण्यास फर्माविले, तेव्हा तिने अदितीला शाप दिला, " तू राज्यभ्रष्ट होशील आणि पुढील जन्मी तुझे पुत्र जन्मल्याबरोबर ठार केले जातील. त्या वेळीच तुला पुत्रशोकाचे दुःख कळून येईल " द्वापरकाली अदितीला देवकीचा जन्म आला. तिचे पुत्र कंसाने कसे ठार केले हे आपणांस माहीत आहेच ( देवीभागवत, ४।१–३ ) प. चित्रावशास्त्री म्हणतात की, केवळ अदितीला विरोधक म्हणूनच ही देवी उत्पन्न केली गेली असावी

## (१०) निष्टिग्री

इंद्र हा ह्या देवतेचा पुत्र असे सांगितले आहे. निष्टिग्री हा शब्द फक्त येथेच आढळतो, आणि त्याच्या अर्थाबद्दल असून विद्वानामध्ये बराच मतभेद आहे. सायनाचार्य निष्टिग्री ह्याचा अर्थ अदिति असा करतात, कारण इंद्र हा अदितीचा पुत्र असे म्हटलेले आहे पण पुढे ते म्हणतात, दिति व निष्टिग्री ह्या एकच होत तेव्हा अदितीचा पुत्र असा अर्थ देण्यामध्ये थोडासा घोटाळा झालेला असावा

परंतु शर्कीप्रमाणे ही देवताही केवळ काल्पनिकच कशावरून नाही? असाही प्रश्न पिङ्क उरतोच (ज्ञानकोश, ख. २ पृ २५८).

## (११) पृथ्वीदेवी

ऋग्वेदामध्ये ही देवता द्यु बरोबरच आलेली असून, फक्त तीन ऋचामध्ये तिचा स्वतंत्रपणे उल्लेख आहे (ऋ ५-८४) अथर्ववेदामध्ये तिच्या वर्णनपर मोठे सुंदर स्तोत्र आहे (ऋ १२-१) पृथ्वीवर केलेला व्यक्तित्वाचा आरोप अगदी अल्प असून, ह्या दवतेमधील बहुतेक सामान्य गुण, जड पृथ्वीच्या गुणासारखेच आहेत ऋग्वेदातील वर्णनात पृथ्वी अनेक उच उच वस्तूंनी भरलेली, पर्वताचा भार वहन करणारी व अरण्यातील वृक्षांत आधारभूत असलेली असेच म्हटले आहे. पृथ्वी या शब्दाचा अर्थ 'विस्तृत' असा आहे ती दयाळू असल्याने तिला द्यावापृथिवी असे संबोधिले आहे (ज्ञानकोश, ख. २ पृ. ३३७).

ह्याच देवीला भूदेवी असेही म्हणतात. भूदेवी ही विष्णूची प्रिया होती असे म्हणतात ह्याचे कारण वराहरूपाने विष्णूने पृथ्वी दातानी वर उचलली हे असावे ह्या देवीचे स्वरूप, फिक्कट हिरवा वर्ण, मस्तकी करडक मुकुट, पीत वस्त्रे व पीत अलंकार धारण करणारी—दोन्ही हातात कमळ व निलोत्पल घेणारी, पद्मासनावर बसलेली अगर उभी असलेली—असे दिले आहे हे वर्णन जवळजवळ विष्णुस्वरूपासारखेच आहे. (विष्णुधर्मोत्तमपूर्वकारणागम).

ब्राह्मणवर्गाच्या संध्येमध्ये असा एक मंत्र आहे—

> "ॐ पृथ्वि त्वया धृता लोका देवि त्वं विष्णुना धृता।
> त्वं च धारय मां देवि पवित्रं कुरु चासनम्॥"

"हे पृथ्वीदेवते, तू या भूतलाचे धारण केले आहेस, तुला विष्णूने धारण केले आहे तू मला धारण कर व आसन देऊन पवित्र कर" तिच्या स्वरूपाचे वर्णन पुढे असे दिले आहे की, "तुझे केस लांब आहेत, डोळे भयंकर आहेत व तू मांस व रक्त भक्षण करतेस कोणीही जिचा पराभव केलेला नाही अशा हे अपराजिते, चामुंडादेवी, तू माझे हाडांचे गाठीवर सदैव वास्तव्य कर"

भारतामध्ये अनेक ठिकाणी प्रातःकाळी ह्या देवतेला वंदन करण्याचा प्रघात आहे त्यासाठी पुढील श्लोक म्हटला जातो —"समुद्रवसने देवि, पर्वतस्तनमंडले। विष्णुपत्नि नमस्तुभ्यं पादस्पर्शं क्षमस्व मे॥" पंजाबमधील लोक सकाळी उठल्यावर धरतीमातेला वंदन करून म्हणतात —"सुखी राखिया धरती माता" नवीन गाय अगर म्हैस व्याल्यावर किंवा ती आणल्यावर पहिल्या पाच

धारा ह्या धरतीमातेला अर्पण करण्याचा प्रघात आहे. इतकेच नव्हे तर एखादे औषध घ्यावयाचे असेल तर त्यापैकीही दोन तीन थेंब प्रथम भूमीला अर्पण करतात. कोकण प्रांती माता आपल्या लहान मुलाचे अंगाला तेल लावण्याचे वेळी प्रथम भूमीवर तेलाचे तीनचार थेंब लावीत, हे बाळपणी लेखकाने पाहिले आहे त्याचा अर्थ भूदेवीपूजन असाच असावा जमीन नांगरताना, शेत कापताना भूमय्या प्रथम ह्या देवीची प्रार्थना करतात प्रस्तुत ग्रंथाचा लेखक, गोरेगाव येथील आपल्या निवासस्थानी गेली दहा पधरा वर्षे एका लहानशा जमिनीच्या तुकड्यावर भातशेती करतो व चार-दोन मण भात पिकवितो त्या वेळी कामाला येणारे मजूर जमीन नांगरताना अगर कापणी करताना प्रथम नारळ, उदबत्ती, हळद कुंकू एका कोपऱ्याला वाहून भूमि-पूजन करतात, मालकाला (लेखकाला) कुंकू लावतात आणि मगच कामाला सुरुवात करतात. असा प्रस्तुत लेखकाचा स्वतःचा अनुभव आहे एखादे गावी नवीन वस्ती करावयाची झाली तर ज्या गावी भूमय्याचे मंदिर असेल त्यातून पाच विटा घेऊन, नवीन गावी मंदिर बनवितात, पाच दिवे लावतात, पाच लाडू समोर ठेवून नैवेद्य दाखवितात आणि ब्राह्मणभोजन घालून मगच तेथे वस्ती करतात (लाहोर जिल्हा गॅझेट)

## (१२) भगवती

भग ह्या देवतेच्या स्तुतीपर ऋग्वेदामध्ये एक सूक्त आहे (ऋ ७-४१) व इतर ठिकाणीही हिचा उल्लेख आढळतो भग ह्या पदाचा अर्थ 'देणारा' असा आहे संपत्ति देणारी देवता म्हणून वैदिक सूक्तामध्ये ह्या देवतेची कल्पना सर्वत्र आढळून येते. भग म्हणजे "समृद्धि, संपत्ति, सुदैव" असाही अर्थ अनेक ठिकाणी आढळतो उषा ही भगाची भगिनी होय इराणी भाषेत "बगदेव" हे अहुरमज्द याचेच नाव होय. इंडो-युरोपिअन काळामध्ये "बोगूदेव" हा शब्द आढळतो यावरून ही देवता फार प्राचीन आहे यात शंका रहात नाही भग या पदाचेच स्त्रीलिंगीरूप भगवती असे झाले असावे (ज्ञानकोश, प्रस्तावना. खंड २।३१७)

## ( १३ ) योगमाया

योगनिद्रां यदा विष्णुर्जगत्येकार्णवीकृते ।
आस्तीर्य शेषमभजत्कल्पान्ते भगवान् प्रभुः ॥ ४९ ॥
तदा द्वावसुरौ घोरौ विख्यातौ मधुकैटभौ ।
विष्णुकर्णमलोद्भूतौ हन्तुं ब्रह्माणमुद्यतौ ॥ ५० ॥

( मार्कंडेय पु., अ. ८१. )

शेषशय्येवर भगवान विष्णु योगनिद्रेमध्ये असताना, त्यांच्या कानातील मळापासून मधु आणि कैटभ हे दोन दैत्य उत्पन्न झाले. तपाचरण करून ते सागरामध्ये महाप्रतापी म्हणून मिरवू लागले. एकदा त्यांच्या मनात असा विचार आला की, कोणतीही जडवस्तु आधाराशिवाय राहू शकत नाही आणि याच सिद्धांतानुसार, पृथ्वी व पाणीही राहू शकणार नाही. त्याला कोणत्यातरी गुप्त शक्तीचा आधार असलाच पाहिजे. या विचारात ते मग्न झाल्यावर त्या शक्तीची त्यांनी उपासना केली. कालांतराने ती अद्‌भुत शक्ति प्रगट झाली आणि तिने त्यांना इच्छित वर दिला की, " तुम्ही इच्छामरणी व्हाल. " या वरामुळे ते दैत्य अतिशय मातले आणि प्रत्यक्ष ब्रह्मदेवालाही त्यांनी शरणचिठ्ठी द्यायला सांगितली. साहजिकच संरक्षणासाठी ब्रह्मदेव विष्णूकडे आले. भगवान् विष्णु त्या वेळी निद्रावस्थेत होते. त्यांना जागे आणण्यासाठी ब्रह्मदेवांनी आदिमायेचा धावा केला. लौकरच तमोगुणी निद्रादेवी, विष्णूचे नाक, नेत्र, मुख, हृदय या इंद्रियांमधून बाहेर आली आणि ब्रह्मदेवासमोर उभी राहिली. निद्रादेवीचे पटल दूर होताच भगवान जागे झाले आणि ब्रह्मदेवाच्या विनंतीवरून दैत्यांबरोबर युद्ध करू लागले. अनेक सहस्र वर्षे हे युद्ध चालले होते, तरीही दैत्यांचा धीमोड होईना. तेव्हा विष्णूने कपटनीतीचा अवलंब केला. त्याने एका सुंदर स्त्रीचे रूप घेतले आणि तो त्या दैत्यांवर नेत्रकटाक्ष फेकू लागला. नेत्रबाणांनी राक्षस हैराण झाले. कुमारीने राक्षसांच्या शौर्याची खूप तारीफ केली आणि त्यांना खूष केले. आत्मस्तुतीने मानव तेव्हाच प्रसन्न होतो, असा मानवधर्मच आहे. दैत्य आनंदावस्थेत आल्यावर कुमारी त्यांना म्हणाली, " मी सर्वशक्तिमान् असल्याने तुम्हाला युद्धात सहाय्य करण्यास तयार आहे. दैत्यांना आपल्या शक्तीची घमेंड होतीच व त्यामध्ये आणखी स्त्रीस्तुतीची भर पडल्याने त्यांचा अहंकार पराकोटीला पोहोचला. त्यांनी कुमारीची मदत झिडकारली. इतकेच नव्हे तर ते तिला उर्मटपणे म्हणाले, " आम्ही दैत्य तुजकडे काही मागण्यासाठी आलेलो नाही. शिवाय आमच्यासारख्या अजिंक्य वीरांना तू देणार तरी काय ! आम्ही दैत्य

याचक नाही. याचकपणा हा विष्णूने अनेक रूपाने व अनेकवेळी करावा. बळीराजाकडून वामनरूपाने पृथ्वी दान घेतली, कर्णाकडून कवच-कुंडले घेतली, भीष्माकडून त्याच्याच मृत्यूचे गूढ काढून घेतले. याचकपणा हे लढाऊ दैत्याचे काम नव्हे. तुलाच काही पाहिजे असल्यास आम्हा-पासून मागून घे." पडत्या फळाची आज्ञा समजून ती कुमारी तत्काळ म्हणाली, "तुम्ही दोघे माझ्या हातून मरण स्वीकारा." त्यांनी मागणी मान्य केल्यावर विष्णूने आपले खरे रूप प्रकट केले आणि दोन्ही दैत्यांना आपल्या मांडीवर घालून ठार केले. अशा रीतीने त्यांची चार सहस्र योजने विस्तार असलेली शरीरे मृत्युमुखी लोटली गेली. सागर दैत्यांच्या रक्ताने भरून गेला. दैत्यांच्या मेदाने पृथ्वी भरून गेली. त्यामुळेच पृथ्वीचे नाव मेदिनी असे पडले. राक्षसांच्या मेदाने ही भूमि तयार झाली म्हणून माती खाणे निषिद्ध मानले आहे (देवीभागवत, अ. ६–९).

विष्णुधर्मोत्तर पुराणामध्ये मधु–कैटभाची उत्पत्ति ब्रह्मदेवाच्या घामापासून झाली असे वर्णन आहे. (पद्मपुराण, स. ४०) म्हणजे ती ब्रह्मदेवाच्या तमोगुणा-पासून झाली. (गणेशपुराण कथा दुसरी).

कंसाने आपला मेहुणा वसुदेव याचे राज्य ल्याड नेले आणि देवकी आपल्या पूर्वजन्मीच्या शापानुसार राज्ञीपदावरून दूर सारली गेली (अदिति पहा). तसेच आपला शत्रु देवकीच्या पोटी जन्माला येणार म्हणून कंसाने देवकीची मुले ठार मारण्याचे ठरविले. यासाठी तिला आणि तिचा पति वसुदेव ह्याला कैद खान्यात डांबून ठेवले. परमेश्वराची लीला अगाध आहे हे हरघडी प्रत्ययास येते. पण आपण त्या गोष्टीकडे वास्तवतेच्या दृष्टीकोनातून पाहातच नाही. भगवान शेषशायी विष्णूला काळजी पडली की, देवकीच्या पोटी जन्म घेतल्यावर आपला घात न व्हावा आणि शत्रूचे निर्दालन तर करता यावे, यासाठी त्यांनी योगमायेची मदत घेण्याचे ठरविले. सहा गर्भांचा नाश झाल्यावर भगवान योगमायेला म्हणाले, "पूर्वीचे दैत्यरूपी षड्गर्भ ठार मारल्यावर सातवा गर्भ हा नारायणाचा अंश असेल. तो गर्भ सातव्या महिन्यात देवकीच्या गर्भाशयामधून काढून नंदपत्नी रोहिणीच्या गर्भाशयात तू नेऊन स्थापन करावा. त्याचे नाव संकर्षण ठेवले जाईल आणि तो माझा वडील बंधू असेल (बलराम म्हणून हा प्रसिद्ध आहे). कंसाला मात्र वाटेल की, सातव्या महिन्यात देवकीचा गर्भपात झालेला आहे. यानंतर मी स्वतः देवकीच्या उदरात सूक्ष्मरूपाने प्रवेश करीन आणि तू यशोदेच्या पोटी जा. आम्हा दोघांचा जन्म झाल्यावर दोघांची अदलाबदल केली जाईल आणि माझ्याऐवजी कंस तुझी हत्या करण्याचा प्रयत्न करील. तू त्या दुष्टाच्या हातून निसटल्यावर, इंद्रदेव तुला गिरीश्रेष्ठ विंध्याचलावर

स्थान देईल. तेथे विंध्यवासिनी म्हणून तू प्रसिद्ध होशील. तुझे वर्णन असलेला हा आर्यास्तव जो कोणी भक्तिपूर्वक पठण करील त्याचा मी सदैव पाठीराखा होईन "

हा आर्यास्तव ३५ श्लोकाचा असून देवींच्या कर्तृत्वाने भरलेला आहे. हरिवंश, विष्णुपर्व अध्यायात तो संपूर्णपणे दिलेला आहे आणि त्याच्या पठणाचे फळही दिलेले आहे रा. रा. एस्. के दीक्षित यांनी " मदर गॉडेस " नावाचा इंग्रजी ग्रंथ लिहिलेला आहे. त्यामध्ये त्यांनी आद्यशक्तीच्या स्वरूपाचे वर्णन करताना, याच स्तवातील भाग उद्धृत केलेला आहे देवीभागवत ४।१८ मध्ये हाच विषय आहे तो सर्व भाग मूळ ग्रंथातून वाचकांनी वाचावा

या देवींची मूर्ति कशी असावी ?

मूर्ति तयार करताना ती मंचकावर निद्रिस्त स्थितीत असून नेत्रकमळ मिटलेले असावेत अवयव अतिशय रेखीव असावेत. दोन भुजा असाव्यात व पाणी पिण्याचे भांडे जवळ असावे ( विष्णुधर्मोत्तर पुराण )

या देवीची मंदिरे अनेक स्थानी आढळतात आपण त्यांतील दोन स्थाने पाहू

( अ ) योगमाया ( काश्मीर )—क्षीर भवानी

योगमाया ( काश्मीर ) म्हणजेच क्षीर भवानी—

ॐ नमो भगवते वासुदेवाय।
इसा परि उसा परि भवसर तार॥

काश्मिरी मायेतील क्षीर भवानी देवीचा हा महामंत्र आहे. याचा अर्थ असा की, " हे देवी, या भवसागरातून तारून, तू आम्हाला पैलतीराला नेऊन सोड " या देवीचे हे क्षेत्र श्रीनगरपासून सुमारे २० मैलांवर, गांदरबळ गावाजवळ तुल्मुल्ला या गावी आहे चिनार वृक्षांच्या घनदाट राईमध्ये, विस्तीर्ण आवारात पण लहानशा पाण्याच्या तळ्यामध्ये छोट्याशा मंदिरात या देवीचे स्थान आहे त्या प्रांतीचे भक्त " क्षीर भवानी " या नावानेच हिला ओळखतात

हा ग्रंथ सन ११२८ च्या सुमारास तयार झालेला आहे. काही शतकांपूर्वी श्रीकृष्ण टपिलू नावाच्या भक्ताला या देवीच्या महत्त्वाची साक्ष पटली, आणि तेव्हापासून तिचे महत्त्व वाढीस लागले.

गाभाऱ्याच्या चोही बाजूंना निर्मळ उदक असून मध्यभागी डुमदार मंदिर आहे. चारी कोपऱ्यांत पाण्याची लहान लहान कुंडे असून, त्यातील पाण्याचा रंग ऋतुमानाप्रमाणे बदलत असतो हे विशेष होय. या बदलत्या रंगावरून काही शुभाशुभ गोष्टींचा विचार करण्याची भक्तांमध्ये प्रचलित रूढी आहे. जलाशयाभोवती मजबूत कठडा असून, एकंदरीत स्थळ रम्य व प्रेक्षणीय आहे.

( कल्याण, शक्ति अंक, पृ. ६६९ ).

मुसलमान राजवटीत, हिंदु समाजावर अनेक बंधने घातलेली होती. अनेकांना जुलमाने बाटविले होते व अनन्वित छळ चालू होता. या देवीचे दर्शन घेण्यास अगर सेवा करण्यासही बंदी घातली होती. पण या देवीने असा चमत्कार दाखविला की, ज्या पाषाणाखाली भक्तमंडळी एके काळी चिरडली जात होती, त्या पाषाणाचे तुकडे झाले, असे सांगितले जाते. सन १८६७ साली दिवाण नरसिंह दयाळ याने या मंदिराचा जीर्णोद्धार करून जलाशयाची कुंडे साफसुफ करून आजची स्थिति प्राप्त करून दिली. प्राचीन मंदिराचे अवशेषही या वेळी त्याला आढळून आले.

हा देश पूर्वी वैष्णव धर्मीयांचा असल्याने या प्रदेशात शिवालये अगर शक्तींची मंदिरे फारशी नाहीत. अवन्तीपूर येथील सांप्रतचे मंदिर याची साक्ष देण्यास पुरेसे आहे. मुख्य मूर्तीच्या बाहेरील प्राकारात एका कोपऱ्यात पूर्वी महिषासुरमर्दिनीची मूर्ति होती होती. या प्रांतातील मंदिराचे कळस खुजे असत. कारण नेहमी बर्फ पडत असल्याने उंच बांधणी शक्य नव्हती. पाऊस व बर्फ यांपासून संरक्षण व्हावे यासाठी ती पाषाणाची बांधलेली असत ( ग. ह. खरे, लोकसत्ता, ४ डिसेंबर १९६१ ).

काश्मीरमध्ये अनेक तीर्थक्षेत्रे आहेत. त्यामध्ये श्रीनगरपासून ७४ मैल अंतरावरील शारदाक्षेत्री, दुर्गादेवीचे मंदिर, तसेच १५ मैलांवर सिव या गावी ज्वालामुखीचे मंदिर, श्राद्धकर्मासाठी प्रसिद्ध असलेले कपालमोचन तीर्थ, आणि दल सरोवराच्या बाजूला १००० फूट उंचीवरील शंकराचार्य वस्ती करून राहिलेले शिवमंदिर यांचा समावेश होतो. कार्कोट राजवंश सातव्या शतकाच्या सुरुवातीला या प्रदेशात राजसत्ता गाजवीत असता त्याने प्रसिद्ध मार्तंडमंदिर, देवतामंदिरे व विष्णुमंदिरे बांधली. येथील विशेष असा की, येथील बऱ्याच विष्णुमूर्ति,

शिवमूर्तीप्रमाणेच त्रिमुखी अथवा चतुर्मुखी आहेत व त्यापैकी एक मानव, दुसरे वराह, तिसरे सिंह व चौथे राक्षसाचे असते. मूर्तीला भुजा मात्र चारच असतात. (काश्मीरसंबंधी ऐतिहासिक माहिती, शिल्प, संस्कृति, पोषाख यांची माहिती 'भारतीय संस्कृती कोश', भाग २ मध्ये पहावयास मिळेल.)

येथील मंदिराचा विध्वंस शिकंदर याने केला. तो प्रांत ताब्यात घेतल्यावर त्याने सरकारी परिपत्रकच काढले की, सर्व हिंदु मंदिरे जमीनदोस्त करण्यात यावीत. पंच-हजार जिल्ह्यातील जगदेवाचे मंदिर तोडत असताना त्याच्या पाया-तून अकस्मात् धुराचे लोट निघाले आणि पाठोपाठ अग्निज्वाला भडकल्या. हिंदुधर्मीयांचे असे म्हणणे होते की, मूर्तिभंजकावर हा देवतेचा कोपच होता. कॅप्टन कनिंगहॅमचे असे मत आहे की, इजिप्तमधील पिरॅमिडप्रमाणे अवन्तीपूर येथे अनेक भव्य मंदिरे होती, ती दारुगोळ्याने उडवून देण्यात आली. कोणी असे म्हणतात की, ती भूकंपामुळे पडली. पण कनिंगहॅमने स्वतः दारु-गोळ्याने अनेक किल्ले उडविलेले असल्याने स्वानुभवावरुन तो म्हणतो की, ती मंदिरे भूकंपाने पडलेली नाहीत. शिकंदर हा तैमूरलंगाचा समकालीन म्हणता येईल, कारण तो त्या वेळी भारतामध्ये दिल्ली प्रांती होता. शिकंदर सन १४१६ साली पैगंबरवासी झाला. श्रीनगरमध्ये त्याच्या पत्नीचे थडगे आहे, ते मंदिराच्या अवशेषांमधूनच उभारलेले आहे त्याचप्रमाणे त्याचा मुलगा झैनुल अबेदी याच्या थडग्याभोवती जी भिंत आहे ती पूर्वी एका हिंदु मंदिराची होती. (Studies in Indian History, Elliot and Dowson Page 86-89)

गंधर्वचल येथे ज्याप्रमाणे पाण्याचा रंग बदलतो, त्याप्रमाणे महाराष्ट्रामध्ये तुळजापूर क्षेत्री कल्लोळ तीर्थाचाही रंग बदलत असतो तेथे चार ऋतूमध्ये चार रंग दृग्गोचर होतात. चैत्र-वैशाख-ज्येष्ठ यामध्ये शुभ्र पांढरा, आषाढ-भाद्रपद ह्या महिन्यात पिवळा, आश्विन-मार्गशीर्ष ह्या महिन्यात हिरवा, पौष-फाल्गुन ह्या महिन्यात निळसर. हे कुंड १० × ६ चौरस फुटांचे असून, एकाच काळ्या पाषाणात कोरलेले आहे. आतमध्ये पाणी येण्यास मार्ग नसून फक्त बाहेर जाण्याचा मार्ग गोमुखातून आहे (लोकसत्ता, मुंबई, तारीख २९ मार्च १९६२)

क्षीर भवानी देवीचा मुख्य उत्सव नवरात्रामध्ये साजरा केला जातो आणि दहाव्या दिवशी महिषासुराचा वध होतो. असे मानल्यामुळे त्याच्या प्रतीकाचा नाश करण्यात येतो. याचाच अर्थ असा की, नाव जरी क्षीर भवानी असले तरी स्वरूप अष्टभुजा महिषासुरमर्दिनीचेच असावयास पाहिजे

दि. ४ आगस्ट १९६५ साली पाकिस्तानाने भारतावर युद्ध लादले, आणि त्यांची सुसे सेनानी जयतीमाय नौशरी याजकडे आली. हा सेनानी शांति-

पूजक देवीभक्त असला पाहिजे. कारण प्रथम वेळी जेव्हां हैद्राबादची कामगिरी त्याच्याकडे आली तेव्हा तुळजाभवानीचा त्याने रक्ताचा टिळा लावला होता असे बोलले जाते. गोवामुक्तिसंग्रामात हाच सेनानी होता, आणि गोव्यातील शांतादुर्गा, म्हाळसादुर्गा यांचे त्याने दर्शन घेतले होते. काश्मीर प्रांतीय भक्तांची अशी श्रद्धा आहे की, या विजयी सेनापतीला देवीने आपल्या रक्षणासाठी घेऊन त्याला शेवटी विजय प्राप्त करून दिला. याचे तात्पर्य हेच की, शक्तिदेवता प्रसन्न असली तर सेनानी विजयी होतो.

( आ ) योगमाया ( दिल्ली )

दिल्ली येथील लोहस्तंभाच्या शेजारी हे मंदिर आहे. महाभारतकाळी युधिष्ठिराने येथे राज्य करीत असताना हे मंदिर स्थापन केले, अशी कथा प्रचलित आहे. अनेक वेळा डागडुजी करूनही अद्याप हे प्राचीन मंदिर सन्मान पावत आहे ( कल्याण, शक्तिअंक, १९३४/६६० ).

भारतामध्ये नव्हे तर इराणसारख्या देशातही या देवीचे मंदिर आहे. व्यापारानिमित्त भारतीय जेव्हा इतर देशी गेले, तेव्हा त्यांनी आपली कुलदेवतेही तिकडे नेली असे अनेक दाखले दाखविता येतील. शीख समाज त्या देशात गेल्यावर त्यांनी गुरुद्वाराची स्थापना तर केलीच, पण योगमाया, हनुमान, श्रीकृष्ण इत्यादि देवतांच्या मूर्तींचीही स्थापना केल्याचे आढळते या गुरुद्वाराचा विस्तार ६ बिघे जमीनीवर असून त्याला " हिंदुबाग " हा यथार्थ नावाने संबोधिले जाते. ( कल्याण, शक्तिअंक, १९५७/४४८ )

भु. प्र.	जगीं मातला कंस तो क्रूर भारी ।
वदे योगमायेस विष्णु, निवारी ॥
स्वयें जन्मतों देवकीपोटिं मायें ।
यशोदोदरीं जन्म घे तूंचि मायें ॥१॥
दिला देवि नारायणी स्तोत्र सांगे ।
तुम्ही रक्षिण्या वंदिता तीं सदा गे ॥
महाभारतीं नाम आर्यास्तवा तें ।
बहू वर्णिती देविकीर्ति यशातें ॥२॥

स्रग्धरा	काश्मीरीचे वनश्री सुरगण जमती एक ठायीं रमाया ।
पूजी आर्यावरांची परिणत प्रगती संस्कृती योगमाया ॥

तोयानें वेष्टिलेल्या सुखद बहु अशा मंदिरीं नांदते ना।
शुद्धाचारा-विचारा करित जळ जई रंग तो पालटे ना ॥३॥

आर्या तव पीठ योगमाये दुसरें गमतेंच हस्तिनापुरितें।
पांडव संकटकाळीं असतां ते निर्मिती स्वदिस-हांसें ॥४॥
आकृति नच मूर्तीची, योनी रूपांत देवता दिसतें।
कामाख्या पीठासम शक्तीपीठासि या कुणी यजतें ॥५॥

## (१४) रात्री देवता

दिवस आणि रात्र हे जरी दिवसाचे दोन भाग असले तरी रात्रीला ऋग्वेदामध्ये देवता म्हणून मानले आहे. या देवतेला मूर्त स्वरूप दिलेले आढळून येत नाही, पण वर्णन मात्र आढळते. अनेक प्रदेश व्यापून टाकणारी, आकाशातील लुकलुकणाऱ्या तारारूपी नेत्रांनी सर्वत्र पाहणारी, प्रथम आकाशाला आपल्या प्रावरणांनी झाकून टाकून नंतर ग्रह व नक्षत्रे यानी प्रकाशित करणारी, ती प्रसन्न झाली तरच अखिल प्राणिमात्रांना, पशुपक्ष्यांना सुखाने झोपू देणारी, अशी ही देवता आहे. हे रात्रीदेवी! लांडगा, सिंह, वाघ यांसारखे हिंस्र पशु, तसेच चोर, चिलटे यांना तू आमच्यापासून दूर दूर ठेव. अंतरिक्ष व द्युलोक यांना तूं आपल्या प्रतापाने भारून टाक. लोकाना दिसणारे तुझे ९९, ८८, ७७ असे २६४ भाग आहेत. तू सर्वांना आधार आहेस, मंगलकारक आहेस, शक्तिवर्धक आहेस, आणि सर्वांना विश्रांति देणारी आहेस. अशा या मातृस्वरूप देवतेला मी शरण आहे. ( ऋग्वेद, १० । १२७ )

## (१५) लक्ष्मी

हिरण्यवर्णां हरिणीं सुवर्णरजतस्रजाम्।
चन्द्रां हिरण्मयीं लक्ष्मीं जातवेदो म आवह ॥११॥
( श्रीसूक्त, ऋग्वेद )

लक्ष्मी देवीचेच श्री असेही नाव आहे. भगवान विष्णूची ती उत्साही शक्ति आहे. अद्वितीय सौंदर्य, मोहकपणा व निर्मळ चारित्र्य या गुणांची ती मूर्ति आहे. अवतार कार्यासाठी भगवान विष्णूला अनेक जन्म घ्यावे लागले. त्या वेळी प्रत्येकदा ती त्याच्याबरोबर आलेली आहे. श्रीरामाच्या अवतारात ती रामाची सीता बनली, श्रीकृष्णाबरोबर रुक्मिणी झाली, हे सर्वांना विदित आहेच. उत्कर्ष, सौंदर्य व वैभव यांची ही देवता मानली जाते; ॲफ्रोदिता या ग्रीक देवतेप्रमाणे तिचा जन्म सागरातून झालेला आहे.

या देवतेच्या उत्पत्तीची कथा अशी आहे. एकदा दुर्वास ऋषि भ्रमण करीत असता, अंतरिक्षामध्ये त्यांना एक अप्सरा भेटली. तिच्याजवळ एक अत्यंत मधुर आणि सुवासिक फुलांचा हार होता. ऋषींना तो आवडला आणि तो त्यांनी तिच्याजवळून मागून घेतला. त्याच्या दरवळणाऱ्या सुवासाने ऋषींचे मन प्रसन्न झाले आणि ते आनंदाने बेहोष झाले. तशा स्थितीत त्यांना इंद्र भेटला. देवांच्या राजांचे स्वागत करण्यासाठी दुर्वास ऋषींनी तो हार इंद्राला अर्पण केला. इंद्राने त्याचा स्वीकार केला; परंतु तो हार स्वतःच्या गळ्यात घालण्याऐवजी त्याने आपला हत्ती ऐरावत ह्याच्या गळ्यात घातला. याचा परिणाम मात्र फारच विचित्र झाला. त्या मधुर सुवासाने तो ऐरावत प्रक्षुब्ध झाला आणि त्या उन्मत्तावस्थेत त्याने ती माला भूमीवर फेकून दिली. मराठीत एक म्हण आहे, "गाढवाला गुळाची काय चव?" त्या देव-पशूला माळेची योग्यता समजली नसल्याने, त्याने ती फेकून दिली अथवा खाली पाडली. वास्तविक इंद्राने त्याला ती द्यावयास नको होती.

दुर्वास मुनींना हे दृश्य पाहिल्यावर अतिशय वाईट वाटले आणि संतापही आला. हेतुतः अपमान करण्याच्या बुद्धीने इंद्राने हे कार्य केले, असे समजून त्यांनी इंद्राला शाप दिला, "तुझी सर्व शक्ति क्षीण होईल व संपत्तीचा नाश होईल." त्याप्रमाणे इंद्राची शक्ति क्षीण होऊ लागली आणि कुबेराकडील धनही क्षय पावू लागले. इंद्राची शक्ति क्षीण होणे म्हणजे सर्व देवावर संकट येणे असेच होय. कारण इंद्राव्यतिरिक्त देवशत्रूंचा नाश दुसरा कोण करणार! सर्व देव मोठ्या संकटात सापडले. संकटनिवारणार्थ उपाययोजना करण्यासाठी त्यांनी ब्रह्मदेवाला विनंती केली. त्याने देवाना विष्णूकडे पाठविले. विष्णूने उपदेश केला की, "दैत्यांच्या सहाय्याने देवानी समुद्रमंथन करावे, म्हणजे त्यामधून एक अद्‌भुत स्त्री उदयास येईल आणि इंद्राचे संरक्षण करील."

ह्याप्रमाणे क्षीरसागराचे मंथन झाले, आणि लक्ष्मी नावाचे रत्न बाहेर आले. ती उदयाला आल्यावर सर्व देवानी तिची स्तुति केली, आणि अंतरिक्षा-मधील अप्सरागणाने नृत्याला प्रारंभ केला. त्या वेळी तिच्या अंगावर सुवर्ण-मौक्तिकाचे अनेक अलंकार झळाळत होते. दिव्य तेजाने ती तळपत होती. त्या दिव्य तेजमयीने भूपृष्ठावर पदकमल टेकताच, ते अपूर्व लावण्य पाहून सर्वांना ग्लानीच आली. भूमीवर पदार्पण करताच आपल्या हातात पद्मसुमनाला कुरवाळीत तिने एकवार सर्वांकडे दृष्टिक्षेप टाकला आणि आपल्या हातात कमळ धारण करणाऱ्या विष्णूच्या देहावर झेप टाकली. लक्ष्मी स्वतः कमळरूप असल्याने, कमळ धारण करणाऱ्या विष्णुच्याच गळ्यात तिने आपली माळ घातली. त्यावेळी ऐरावताने तिच्या अंगावर आपल्या सोंडेतून पाण्याचा शीतल फवारा उडविला.

गंगा आदि नद्यांचा समूह तिच्यामागून जाऊ लागला. क्षीरसागराने तिला कधीही न कोमेजणारी फुले वाहिली. कलाकारांनी उत्तम अलंकारांनी तिला मंडित केले आणि उत्तमरीतीने अभ्यंगस्नान झाल्यावर ती विष्णूच्या हृत्कमलावर विश्रांति घेती झाली. सर्व देवांना तिने अमृत प्यावयास दिले. तसेच तिने ते इंद्रालाही दिले व त्याला शापमुक्त केले ( मार्टिन, पृष्ठ १०४ ). प्रस्तुत प्रकारचेच वर्णन विशीष यांच्या रामायण ग्रंथामध्ये आढळून येते ( पृष्ठ २०५ ).

ऋग्वेदामध्ये पंचम मंडळाच्या शेवटी श्रीसूक्त म्हणून काही ऋचा दिलेल्या आहेत. त्यांमध्ये ह्या देवीचे अपूर्व वर्णन केलेले आहे. तिच्या पूजनाने भक्तांना संपत्ति-गृहसौख्य मिळते, संकटातून पार होता येते, असे सांगितले आहे. या सूक्ताचा संपूर्ण अर्थ समजून घेण्यासाठी पं. श्रीपादशास्त्री किंजवडेकर यांचा "श्रीसूक्तदीपिका" हा ग्रंथ पहावा. त्यामध्ये संपूर्ण विवरण पाहाता येईल. ज्याला लक्ष्मी आपल्या घरी नांदावी असे वाटत असेल, त्याने शुचिर्भूत होऊन अग्नि सुसंस्कृत करून ह्या देवीप्रीत्यर्थ दररोज "आज्याहुति" अर्पण कराव्यात आणि श्रीसूक्ताचे पठण करावे.

महाभारतामध्ये रुक्मिणीने श्रीदेवीला विचारले आहे की, "तुझे नित्याचे वास्तव्य-स्थान कोणते?" त्यावर लक्ष्मीने उत्तर दिले आहे की, "इंद्रियदमन करणारे, देवपूजेत नित्य रममाण होणारे व नित्य उद्योगात दंग असणारे असे जे पुरुष आहेत त्यांच्याच घरी माझे वास्तव्य असते. तसेच ज्या स्त्रिया कधीही कोपायमान होत नाहीत, सरळ वृत्तीने वागतात, देव-ब्राह्मण-पति यांच्या पूजनात दंग असतात, पतीला कधीही दुरुत्तरे करीत नाहीत, अशा स्त्रियांच्या घरी माझा निवास असतो." ( पंडित महादेवशास्त्री जोशी—"गाजती दैवतें" ).

शतपथ ब्राह्मण ( ११–४–३ ) मध्ये खालील वर्णन आढळते:—

वर वर्णन केलेले वैभव इतर देवांना रुचले नाही. त्यांनी लक्ष्मीच्या अपहरणाचा विचार चालविला. ती अतिशय तेजस्वी स्त्री, स्त्रीस्वभावयुक्त लज्जेने विष्णूजवळ उभी राहिलेली पाहून इतर देवांना तिच्याविषयी लोभ सुटला. त्यांनी त्यांनी प्रजापतीला अशी विनंती केली की, "या देवीला ठार मारून तिची सर्व संपदा लुटण्याचा आमचा बेत आहे. या कृत्याला आपली अनुज्ञा असावी." प्रजापतीने त्यांना तसे न करण्याचा उपदेश केला. कारण पुरुषाने सहसा स्त्रीहत्या करू नये असे शास्त्रवचन आहे. असे असून देखील अन्य मार्गाने तिची संपदा लुटण्यास प्रजापतीने देवांना आपली अनुमति दिली. या उपदेशानुसार अग्निदेवाने तिचे अन्न शोषून घेतले, सोमाने तिचा राजसत्तेचा अधिकार हरण केला, वरुणाने

साम्राज्यसत्तेचा अधिकार काढून घेतला, मित्रदेवांनी तिची लढाऊ वृत्ति हरण केली. इंद्राने शक्ति, सवित्राने सार्वभौम सत्ता, पूषनने सौंदर्य, सरस्वतीने तिचा पौष्टिकपणा आणि बृहस्पतीने राजपुरोहितासम होणारा तिचा गौरव हरण केला. हे सर्व स्वरूप गेल्यावर ती निस्तेज झाली म्हणजे मृत झाली असे देव समजले. याच ग्रंथामध्ये म्हटले आहे की, श्रीदेवीची उत्पत्ति प्रजापतीपासून झाली.

विष्णुपुराणामध्ये असा उल्लेख मिळतो की, लक्ष्मीचा जन्म प्रथम भृगु ऋषि व त्याची पत्नी ख्याती यापासून झाला, आणि नंतर ती सागरातून बाहेर आली. म्हणून तिचे नाव क्षीराब्धि-तनया असे पडले. बाहेर येताना ती पद्मदलातून आली म्हणून तिचे नाव पद्मा पडले (डौसन, पृष्ठ १७६). हरिप्रिया, जलधीजा व लोकमाता अशीही तिची नावे आहेत.

देवदानवांनी वासुकी सर्पाची दोरी आणि मंदार पर्वताची रवी करून जेव्हा क्षीरसागर घुसळला, तेव्हा अनेक रत्ने बाहेर आली, त्यांपैकीच लक्ष्मी हे एक होय.

लक्ष्मीः कौस्तुभपारिजातकसुरा धन्वंतरिश्चंद्रमाः ।
गावः कामदुघाः सुरेश्वरगजो रम्भादिदेवांगनाः ॥ इ० इ०

या श्लोकामध्ये जी चवदा रत्ने वर्णिली आहेत, ती येणेप्रमाणे— लक्ष्मी, कौस्तुभ, पारिजात, सुरा, धन्वंतरी, चंद्रमा, कामधेनु, विष, हरिधनु, शंख, अमृत, ऐरावत, रंभा (आदिअप्सरा), उच्चैःश्रवा नामक अश्व. यांशिवाय लक्ष्मीची धाकटी बहीण अलक्ष्मी हिचाही जन्म झालेला आहे. भगवान विष्णु नेहमी वैजयंतीमाळा वापरीत, पण तीमध्ये कोणती रत्ने असत? ती माळ पंचमहाभूतांच्या, पंचतत्त्वांची प्रतीक होती. तीमध्ये पृथ्वी, आप, तेज, वायु व आकाश याचे पूर्णतत्त्व असलेली अनुक्रमे सफायर, मोती, माणिक, टोपेझ व हिरा ही पंचरत्ने असून ह्या पंचरत्नांनी ती माळ गुंफलेली होती. वैजयंती शब्दाचा अर्थ "रान तुळस" असा मराठी कोशात दिला आहे. पण या ठिकाणी तो लागू पडत नाही.

समुद्रमंथनातून लक्ष्मी भूमीवर आल्यानंतर तिने आपल्या नावाने लक्ष्मी-नगर वसविले आणि ते भृगु ऋषीला दान दिले. हेच भृगुकच्छ (भडोच) शहर होय. (ॲफ्रोदिता देवीने सागरातून उत्पत्ति झाल्यावर सायप्रस बेटाच्या किनाऱ्यावर नगर वसविल्याचा उल्लेख मिळतो. कदाचित् दोन्ही कथा एकच असाव्यात.) कालांतराने लक्ष्मीने ते नगर भृगूजवळ परत मागितले. पण मुखासुखी तो ते परत देईना. नगर परत मिळविण्यासाठी भगवान विष्णूंनीही मध्यस्थी केली पण व्यर्थ! भृगु ऋषीला विष्णूची ही कृति आवडली नाही. त्याने शाप दिला

की, " तुला भूमीवर दहा जन्म घ्यावे लागतील आणि भार्या वियोग सहन करावा लागेल. " भृगूने हा शाप देण्याचे कारण असे संभवते की, ब्राह्मणाना एकदा कुठलीही गोष्ट दान दिल्यावर ती परत मागणे अगर घेणे हे शास्त्राविरुद्ध कृत्य होय. ही शास्त्राच्या विरुद्ध असलेली कृति विष्णूने करावयास नको होती. मानवाना अशी प्रथा घालून देण्यास नको होती ( पद्मपुराण, स. ४ ). या शापामुळेच भगवान विष्णूंना दहा जन्म घ्यावे लागले असे म्हणता येईल.

विष्णुपुराणादि ग्रंथातून अनेक ठिकाणी लक्ष्मी चचल आहे असे वर्णन आढळते, आणि त्यामुळेच तिचे नाव चंचला पडले असावे. पण तिला जर चंचला म्हणावयाचे तर भगवान विष्णु योगनिद्रेमध्ये असताना, दासी म्हणून विष्णूच्या पदकमलाशी शांतपणे बसून ती सेवा करताना दिसते. लक्ष्मी चंचल बनावयास कारणही सबळ आहे. ती म्हणते, " ज्या घरी सलोखा, न्याय, नीति, औदार्य हे सद्गुण वास्तव्य करीत नाहीत, शुचिर्भूत होऊन माझे स्तवन, पूजन केले जात नाही, सदान्कदा कलह, मत्सर, अतिथींचा द्वेष इ० दुर्गुणांचा वास असतो, अशा दुर्गंधीच्या अपवित्र घरी मी वास्तव्य कसे करावे ? " ( विष्णुपुराण ). देवीभागवत हा ग्रंथ लक्ष्मीचे वास्तव्य कोठे होत असते ह्यासंबंधी अधिक माहिती देतो. विष्णु-लक्ष्मीचे हे गुणगान पाहिल्यावर असे म्हणावेसे वाटते की, सर्व काही पुरुषवाचक उत्तम आहे ते विष्णु होय, आणि सर्व काही स्त्रीवाचक उत्तम आहे ते लक्ष्मी होय. या जोडी-व्यतिरिक्त दुसरे काहीही नाही. पचतत्र ग्रंथामध्ये एका श्लोकात असे वर्णन आहे की, जो माणूस शूर, कर्तव्यदक्ष, उपकार जाणणारा, दयाशील, परमेश्वराचे अस्तित्व मानून त्याचे भजनपूजन करणारा व शुद्ध आचरणाचा असतो, त्याच्या घरी लक्ष्मीचा वास असतो. ज्या घरी शंखध्वनी होत नाही ( पूजेतील घटा-नादाला अनुलक्षून असावे ), तुळशीचे पूजन होत नाही, शंकराची पूजा घडत नाही, ब्राह्मण—अतिथींना भोजन मिळत नाही, भक्तजनांची नेहमी नालस्ती चालते, एकादशी व कृष्ण—जन्माष्टमीचे दिवशी अन्नभक्षण केले जाते, तेथे लक्ष्मीचा वास रहात नाही. जो ब्राह्मण अशुद्ध आचरण करतो, क्रूर व हिंसकपणे वागतो, शूद्राकडून यज्ञकर्म करवून घेतो, आपल्यापेक्षा हीन जातीच्या लोकांकडील अन्न भक्षण करतो, निष्प्रयोजन झाडाची पाने तोडतो, हातापायांच्या नखांनी भूमीला उकरून त्रास देतो, दिवसा झोप घेतो, सूर्योदयाच्या वेळी नित्यकर्म न करता भोजन घेतो व सदाचारहीन असतो, त्याच्या घरी लक्ष्मीचा वास कदापि रहात नाही. तसेच जी अल्पज्ञानी व्यक्ति भिजलेले कपडे अंगावर तसेच ठेवते, वस्त्रविरहित होऊन निद्रा घेते, कारणाविना बडबड करीत रहाते, आपल्या मस्तकावर तेल चोपडून दुसऱ्याच्या अंगाला पुसून जाते, त्याचप्रमाणे जो

मनुष्य व्रत, उपवास, संध्याकर्म आणि विष्णु-भक्ति यांपासून अलिप्त आहे, जो निर्दय आहे आणि सदा ब्रह्मनिंदा करीत राहतो त्याच्या घरीही लक्ष्मी वास करीत नाही. (देवीभागवत ९/४१-४२.)

भारतामध्ये लक्ष्मी व लक्ष्मी–नारायणाची मंदिरे अनेक ठिकाणी आहेत. कुंभकोणमपासून तीन मैलांवर उप्पीलियापन कॉईल या नावाचे गाव आहे. त्या गावी लक्ष्मीची मूर्ति आहे. त्या क्षेत्री अशी दंतकथा प्रचलित आहे की, तेथेच एका तुळशी वृक्षाच्या खाली लक्ष्मीचा जन्म झाला. ह्या ठिकाणी ते मूल तसेच पडले होते. मार्कंडेय मुनींनी ते बाळ आपल्याकडे ठेवून घेऊन त्याचे पालनपोषण केले; कालांतराने भगवान विष्णु एका विप्राच्या वेशात त्या गावी अवतरले, आणि हा वर योग्य आहे असे समजून मार्कंडेय मुनींनी त्या मुलीचे लग्न त्या विप्राबरोबर लावून दिले. त्या प्रसंगी ते अतिथीला म्हणाले, "मुलीचे अल्लड-पणातील वागणे व अपराध विसरून जा, तिला क्षमा करा आणि अनाहुतपणे क्षाररहित केलेले भोजन सेवन करा." या दंतकथेच्या आधारे तेथील देवीला नैवेद्य दाखविताना स्वयंपाकामध्ये मीठ वापरत नाहीत. तरीही ते भोजन रुचकर लागते. (अय्यर, पृष्ठ ७६). हीच रूढी थोड्याफार अंशी महाराष्ट्रात चालू आहे. स्वयंपाकातील वस्तूंमध्ये जरी मीठ वापरलेले असले, तरी नैवेद्य वाढताना, मीठ वाढत नाहीत. नैवेद्य दाखवून झाल्यावर भोजनाच्या वेळी वाढतात.

## दीपलक्ष्मी

भारतामध्ये अनेक ठिकाणी दीपलक्ष्मीच्या मूर्ति आढळतात. दीपलक्ष्मी म्हणजे दिवा धारण केलेल्या स्त्रीची मूर्ति. ती धातूची अथवा पाषाणाची बनविलेली असते. आर्य लोकांनी सूर्याच्या खालोखाल दिव्याच्या प्रकाशाला प्राधान्य दिलेले आहे, कारण दोन्हीही मानवाना प्रकाश देण्याची क्रिया करतात. फरक इतकाच की, एक स्वयंप्रकाशित तर दुसरा कृत्रिम रीतीने प्रकाश देणारा. सध्याच्या विज्ञानयुगात विद्युत् दिव्यापर्यंत जरी मजल गेली असली, तरी पावित्र्य व मांगल्य म्हणून दीपलक्ष्मीचाच उपयोग करण्यात येतो. कारण ते एक सांस्कृतिक धार्मिक प्रतीक आहे. मंगल कार्याच्या वेळी पूजेचा पहिला मान या लक्ष्मीलाच मिळतो. दीपदान हे सुद्धा पुण्यकारक मानलेले आहे. हजारो वर्षां-पूर्वीच्या सिंधू संस्कृतीच्या उत्खननात ज्या मातृकांच्या मूर्ति आढळल्या आहेत, यांच्याही दोन्ही खांद्यावर पणत्या असून, जगाचे पालन करणाऱ्या या मातृका जगाला प्रकाशित करीत आहेत, हीच शिल्पकारांची भावना व्यक्त होत आहे.

ऐतिहासिक काळात तर मूर्तिकारांनी या दीपलक्ष्मीची अनेक नयन-मनोहर रूपे तयार करून ठेवलेली आढळतात. दक्षिणेकडे एकीच्या खांद्यावर

घोषदाची आकृति, तर दुसरी गजारूढ असून मस्तकावर पाच नागफणे शोभत आहेत. दोन्ही बाजूस दोन दीप लावण्याची सोय असून, मध्यभागी तेलाच्या संचयासाठी भांडे आहे. दीप जळत असताना थेंब थेंब तेल खाली उतरावे अशी त्यामध्ये कल्पकतेने योजना केलेली आहे. निरनिराळ्या प्रांतांत या दीपलक्ष्मी पाहिल्या, म्हणजे त्या त्या प्रांतीय स्त्रीजीवनाच्या जणू त्या प्रतिमाच भासतात. अशा काही मूर्तींचा संग्रह राजा केळकर संग्रहालय, पुणे येथे लेखकास अनुभवविता आला.

## लक्ष्मीची मूर्ति कशी असावी ?

क्षीरसागर मथनातून लक्ष्मीची उत्पत्ति झाली असल्यामुळे, ती कमळावर उभी अगर बसलेली असावी, तसेच दोन्ही बाजूंनी हत्ती पाण्याचे कलश तिच्या मस्तकावर ओतीत आहेत अशी असावी. विष्णुधर्मोत्तर पुराणात ह्या देवतेचा वर्ण काळा वर्णिला आहे, पण अंशुमदभेदागम तत्रप्रमाणे तो सुवर्णासदृश पीत सांगितला आहे. ऋग्वेदामध्येही पीत वर्णन सांगितला आहे. सौंदर्यवान, नवयौवना, रत्नजडीत सुवर्णालंकारविभूषित अशी, कानामध्ये नक्र-कुंडले, नेत्र कमळ पाकळी समान, भरदार कमर, तंग कचुकी, मस्तकावर अनेक अलंकार घातलेली, उजव्या हाती कमळ व डाव्या हाती बेलफळ घेतलेली, मौल्यवान वस्त्रप्रावरणावर नक्षीदार कमरपट्टा असलेली अशी तिची मूर्ति असावी.

शिल्पशास्त्राप्रमाणे तिचा वर्ण शुभ्र आहे. गळ्यात मोत्यांचा कंठा, आणि दोन्ही बाजूला तिच्या सख्या तिजवर चवऱ्या वारीत असाव्यात. तिची मूर्ति जेव्हा विष्णूबरोबर असेल तेव्हा दोन भुजांची, पण मंदिरामध्ये एकटीच असेल तर चार भुजांची असावी. या वेळी तिच्या हातामध्ये कमळ, बिल्वफळ, अमृतघट व शंख ह्या चार गोष्टी असाव्यात. तसेच केयूर कंकणे असावीत

महाबलीपुरम्, एलोरा ह्या ठिकाणी जे शिल्प आहे, त्यामध्ये वरील वर्णनाची श्रीदेवीची मूर्ति पाहण्यात येते. पूर्वकारणागम व रूपमंडण ह्या ग्रंथा-मध्येही वरीलप्रमाणेच वर्णन आढळते

भगवान शंकराचे ज्याप्रमाणे अर्धनारीनटेश्वराचे स्वरूप प्रसिद्ध आहे, त्याप्रमाणे भगवान विष्णूचेही अर्धलक्ष्मीहरि असे स्वरूप रेखाटलेले आहे.

उद्यत्प्रद्योतनशतरुचिं तप्तहेमावदातम् ।
पार्श्वद्वन्द्वे जलधिसुतया विश्वधात्र्या च जुष्टम् ॥
नानारत्नोल्लसितविविधाकल्पमापीतवस्त्रम् ।
विष्णुं वन्दे दरकमलकौमोदकीचक्रपाणिम् ॥ (तंत्रसार)

भावार्थ असा की, शतसूर्याप्रमाणे तेजस्वी, तप्त सुवर्णाप्रमाणे निर्मळ, अशा स्वरूपाची विश्वजननी लक्ष्मी, ही ज्यांचे अर्धांग बनली आहे, अशा विविध रत्नांनी झगमगणारी वेषभूषा केलेल्या, पिवळसर वस्त्र परिधान केलेल्या, विकसित कमळ कौमोदकी गदा व चक्र हातामध्ये धारण करणाऱ्या, अशा विष्णूला मी नमस्कार करतो.

तन्त्रसार ग्रथात या स्वरूपाचे पूजाविधान वर्णन केलेले आहे. वैष्णव आगमकारांनी, शैव पंथियांची अर्धनारीनटेश्वराची कल्पना या ठिकाणी उसनवार घेतलेली दिसते. (भा. सं. को., १/२४०)

मालिनी

असुर सुर वरानीं मंथिले सागरातें।
कमळ पद कुमारी ये उफाळोनि त्यातें ॥
कुसुम नयन गात्रीं लाल तारुण्य गालीं।
रुचिर नयन तेजा शुक्ति सौवर्ण ल्याली ॥ १ ॥
अविरत शुभ दावी तेज राज्ञीपदाचें।
विखुरत कर-दंडी रत्न भाण्डार साचें ॥
मुकुट शिरिं विराजें संथ भालप्रदेशीं ॥
शिरिं अहि कच-ढोळे सागरीं लाट जैशी ॥ २ ॥
कचवलय सुतेजें मौक्तिका झाकु पाहे।
उजळत परि कांती कांचना दग्ध काये ॥
रवरितहि सुर राज्ञी झेंप भूमीस घाली।
सुरवर-असुरातें देखता ग्लानि आली ॥ ३ ॥
रसभरित करानें पद्म गोंजारिताना।
कमल धर सुरातें झेप घाली युवाना ॥
कमलिनी कमळाला प्रेम आलिंगना दे।
नववधुवर लीला काव्य प्रेमा कवी दे ॥ ४ ॥

शार्दूलविक्रीडित

विष्णु मानसश्रेष्ठ लक्ष्मिपति हा, लक्ष्मीच वाणी असे।
अधिराज्य सुराज्य विष्णु करि ही, तीं दूरदर्शी असे ॥
प्रामाणीकपणा वरा गुण बरा, निष्ठाच पत्नीपदीं।
विष्णूबुद्धि अमोल ग्राहकपणा, सामर्थ्य लक्ष्मीपदीं ॥ ५ ॥

पृथ्वी

सु-वैभवित देवि श्री सुरस वर्णि ऋग्वेद तो ।
सुवर्णसम कांतिवर्ण पिवळ्या जिळा शोभतो ॥
सुवर्ण रजतांस साम्य बहु पुष्पमाळ्या गळां ।
सुवर्णसम रूप तें तुकतुकीत श्री देविला ॥ ६ ॥
सुहास्यवदना सदा नच अपाय कोणा असे ।
निवासयुत मंदिरीं सचित लाभ ती देतसे ॥
सुवर्ण विपुला मिळे, मिळत गाई घोडे किती ।
कृपावरि प्रसन्न श्री जरिहि देवता राहि ती ॥ ७ ॥
सुवेळीं शुभ जन्म घे, वदत आर्द्र नक्षत्रिं ती ।
मनोरथ पुरें करील मन-कामना पूर्ति ती ॥
तिची मळिन दुःखिता भगिनि ती अलक्ष्मी त्यजो ।
तिचा सु-पुत्र कर्दमासहित या गृहीं वास हो ॥ ८ ॥
सुभाग्यवती रुक्मिणीस वदते तिचा वास तो ।
सु-कार्यरत इंद्रिया-दमनि नित्य उद्योगिं तो ॥
सु-भक्त अनुरागिं तत्परहि देव पूजेत जो ।
सु-धैर्य गुण मंडिता सतत थोर ज्यासंगि जो ॥ ९ ॥
स्त्रिया मुळिं न कोपती दमनि समता पाळिती ।
सदा सरळ-वृत्ति देव-द्विज पूजनीं गर्क ती ॥
पतीस प्रतिकूळ शब्द विनयें मनीं नाणिती ।
सुखें घडत वास त्या गृहिं वदेच श्रीदेवि ती ॥ १० ॥

शार्दूलविक्रीडित

शूरां केवि वरूं नसे भरंवसा मृत्यूमुखीं तो उभा
अर्पि दान उदार नित्य म्हणुनी, तो दाळुला वाटगा ॥
विद्वत्वर्य नको सरस्वति सुता, राही दरिद्री सदा ।
श्रीलक्ष्मी कृपणास वास्तव वरी, त्यागी तिला ना कदा ॥ ११ ॥
कोणी नित्य वदें बहु चपळ मीं, नामें असे चंचला ।
जेथें लोप घडे वरील गुणिंही, त्यांना ठरे चंचला ॥
नीती-न्याय-दया नसेचि गृहिं ज्या, ना प्रेम औदार्य तें ।
धर्माचारण लोपतां वद सखे, नांदु कशी मीं तिथें ? ॥ १२ ॥

## (१६) वाक् देवता

वेदवाङ्मयामध्ये या देवतेचे अधिष्ठान प्राधान्येकरून जास्त आहे. ही देवता सर्व मंत्रांची माता असून ऋक्, यजु, साम ही तिची अपत्ये होत. ऋग्वेद ( १०–२५ ) सूक्तामध्ये वाक् ही स्त्रीलिंगी आणि वाणी या अर्थी वापर केलेला आहे. अथर्ववेदामध्ये तसाच उपयोग केलेला आढळतो. अनेक सूत्रामधून तिचे प्रमुख कार्य असे सांगितले आहे की, रुद्र, वसु, आदित्य, मित्र, विश्वदेव, वरुण, अग्नि, इंद्र, पूषन, भग, इ० देवतांच्या कार्यवाहीत त्यांना उत्तेजन देणे; आधारभूत होणे. याचा अर्थ असा की, या देवताचे कार्य चालू ठेवण्यात, ही प्रधान स्त्रीशक्ति आहे. काही सूक्तांमध्ये तर स्पष्टच सांगितले आहे की, " मी सोम, भग, पूषन, त्वष्टा या देवशत्रूंचा नाश करणाऱ्या देवतांना आधारभूत असून त्यांना उत्तेजित करीत असते. " काही सूक्तांमध्ये ती सम्राज्ञी आहे, सर्व प्राणिमात्रांच्या हालचालींची प्रधान शक्ति आहे, आपल्या प्रिय भक्ताला ती ब्राह्मण, ऋषि, अथवा ज्ञानी प्रज्ञावंत बनविते, असे वर्णन आढळते. ती स्वर्ग व पृथ्वी व्यापून शिल्लक उरते इतके तिचे स्वरूप विशाल आहे. सातव्या सूक्तामध्ये तिची जन्मभूमि पाण्यांत असून, तेथून ती सर्वव्यापी बनली असा उल्लेख आहे.

ब्राह्मण ग्रंथामध्ये तिला प्रजापतीशेजारी बसविली असून त्याची शक्ति मानलेली आहे. वाक् ही वैदिक मंत्रांची जननी होय या श्रद्धेमुळेच आगम ग्रंथांमध्ये, तंत्रशास्त्रामध्ये, तिला मातृका शक्ति मानली आहे. यामुळेच ती मंत्र-माला अथवा परावाक् नाम पावली आहे. दहाव्या मंडलामध्ये ऋषींनी, सर्व पुरुषदेवतांचे एकीकरण करून त्यांचे रूपांतर प्रजापति या शब्दात केले, तर सरस्वती, धिषणा, वरुणी इ० स्त्रीदेवतांचे एकीकरण वाक् या शब्दात केले आहे. अथर्ववेद सूक्तांत (५–१९–१३) " इयं या परमेष्ठिनी वाक् देवी ब्रह्मसंशिता " म्हणजे ही देवी परमेष्ठिनी शक्ती आहे. तसेच ब्राह्मण ग्रंथामध्ये ती प्रजापतीच्या शेजारी बसवून पत्नी बनली आहे. शतपथ ब्राह्मणामध्ये ( ६–१–९ ) प्रजापतीने आदियुगातील प्राण्यांची उत्पत्ति वाक्द्वारा केली असे सांगितले आहे. काठक उपनिषद (१२-५-२७) स्पष्टपणे सांगते की, ब्रह्मदेव प्रजापतीची वाक् ही पहिली पत्नी होय, आणि तिच्याच उपयोगाने तो चराचर सृष्टीची उत्पत्ति करतो.

> " प्रजापतिः वा इदम् आसीत्, तस्य वाक् द्वितियासीत्, तम् मैथुनं समभवत्, सा गर्भम् अधत्, सोमप्रजा असृजत् " ।

याप्रमाणे वेदातील वाक् देवतेचे संक्षिप्त वर्णन आहे.

( Shakti or Divine Power by S. K. Das, Page 22 )

## (१७) वेदवती

ब्रह्मदेवाचा पुत्र कुशध्वज व त्याची पत्नी मालावती यांची ही कन्या होय. जन्मत च तिने वेदध्वनी केला, यास्तव तिला वेदवती हे नामाभिधान मिळाले. जन्मत च तिने स्नान वगैरे झाल्यावर तप आचरण्यासाठी ती पुष्कर तीर्थाच्या ठिकाणी गेली. तेथे एक मन्वंतरपर्यंत तिने तप केले आणि आकाशवाणी झाली की, " भगवान श्रीहरि दुसऱ्या जन्मी तुला पति लाभेल " त्यानंतर ती गंधमादन पर्वतावर गेली ( ब्रह्मवैवर्त पु० २–१४–५२ व देवीभागवत, ९।१६ )

हिमालयाच्या भागात तिची तपश्चर्या चालली होती या मार्गाने कैलासास जात असता रावणाने तिला पाहिले व तिच्यावर तो मोहित झाला तिला विवाहाची मागणी घातली असता ती रावणाला म्हणाली, " देव व गंधर्व यांनी मला मागणी घातली असता त्यांना माझ्या वडिलांनी नकार दिला, कारण विष्णुव्यतिरिक्त दुसऱ्या कोणाबरोबरही माझा विवाह करून देण्यास ते राजी नव्हते नंतर शंभुराजाला नकार दिला नकार दिल्यावर त्याने माझ्या पित्याचा वध केला " इतके तिने सांगितले, तरी रावणाने तिचा पिच्छा सोडला नाही एकदा तर ती ध्यानस्थ असताना रावणाने आपल्या हाताच्या बोटांनी तिच्या केशकलापास स्पर्श केला हे पाहून ती अतिशय क्रोधायमान झाली आणि म्हणाली, " ज्या अर्थी मी जगलात एकटी असता तू हे दुष्ट कृत्य केलेस, आणि माझे शरीर भ्रष्ट केलेस, त्याअर्थी मी पुन्हा जन्म घेऊन तुझा नाश करीन." असे म्हणून तिने चितेत उडी टाकली आणि स्वतःला जाळून घेतले हीच स्त्री पुढे भूमिकन्या सीता म्हणून जन्मली आणि रावणाच्या वधास कारणीभूत झाली ( आनंदरामायण प्रस्तावना आणि डौसन शब्दकोश, पृ ३५३)

## ( १८ ) सरस्वती

या कुन्देन्दुतुषारहारधवला या शुभ्रवस्त्रावृता ।
या वीणावरदण्डमण्डितकरा या श्वेतपद्मासना ।।
या ब्रह्माच्युतशंकरप्रभृतिभिर्देवैः सदा वन्दिता ।
सा मां पातु सरस्वती भगवती निःशेषजाड्यापहा ।।

भारतीय वाङ्मयामध्ये सरस्वती हा शब्द द्व्यर्थी वापरलेला आहे एक अर्थ नदी व दुसरा देवी असा होय

या नदीच्या उत्पत्तीबद्दल अशी कथा आहे की, सरस्वती ही ब्रह्मदेवाची मुलगी. एकदा ती पितृदर्शनार्थ जात असता, मार्गात राजा पुरूरवा याने तिला

पाहिले, तिच्या सौंदर्यावर तो मोहित झाला म्हणून त्याने आपली प्रिया उर्वशी हिच्याकरवी सरस्वतीला बोलावून आपल्या घरी आणले आणि तिचे कौमार्य नष्ट केले. ही वार्ता ब्रह्मदेवाला समजताच त्याने सरस्वतीला शाप दिला की, " भूतलावर तू नदी होऊन पडशील " यास्तव ती नदी झाली.

ब्रह्मा कोण ? विज्ञान युगातील त्याचे खगोलस्थ स्थान कोणते ?

या ग्रंथामध्ये आर्यांच्या देवांच्या कल्पना खगोलस्थ तारकांवर आधारित आहेत, असे अनेक ठिकाणी दाखविण्यात आले आहे, आणि ते सांप्रतच्या विज्ञान युगात संशोधकांना मान्य आहे. तसाच विचार ब्रह्मदेवासंबंधी मांडणार आहे.

निर्मूर्ति स्वरूपातील प्रथम क्रमांकाचा देव म्हणजे ब्रह्मदेव होय. दुसरा विष्णु आणि तिसरा रुद्र अथवा शंकर. याची उत्पत्ति विष्णूच्या नाभी कमलातून झाली व तो हंसवाहन आहे असे वर्णन प्राचीन द्रष्ट्या ऋषींनी केलेले आहे. सांप्रतच्या वैज्ञानिक युगात दूरदर्शनिकनलिका ( टेलीस्कोप ) सारखी प्रभावी साधने उपलब्ध झालेली आहेत. त्यातून खगोल सृष्टीचे निरीक्षण करता नाम-सादृश्य असलेले तारकागोल आकाशात स्पष्टपणे दिसतात.

आकाशातील मृगशीर्ष नक्षत्राच्या उत्तरदिशेला हंस ( स्वान-सिग्नस ) नक्षत्र आहे. त्याच्या वरील बाजूस वेगा अथवा ब्रह्मा हा तारा आहे. म्हणजे ब्रह्मदेवाचे वाहन हंस झाले. ब्रह्मताऱ्याच्या आणखी थोडे खाली व बाजूला एक तेजोगोल ( नेब्युला ) आहे. अत्याधुनिक दूरदर्शनिकेतून पाहिले असता, या तेजोगोलाचा आकार कमळाप्रमाणे दिसतो. म्हणून त्याची उत्पत्ति कमळातून झाली असे मानले असावे.

ब्रह्मताऱ्याच्या बाजूला दुसरा जरासा कमी प्रकाशमान तारा आहे, त्याला अग्नि म्हणतात. याच्याजवळ " एप्सिलियॉन " नावाच्या चार तारकांचा एक पुंजका आहे. हीच ब्रह्मदेवाची चार मुखे मानली आहेत. ब्रह्मताऱ्याला हृदय ही दुसरी संज्ञा आहे. कारण या तारकापुंजाला भागवतामध्ये धाता हे नाव दिलेले आहे. तारकापुंजाचा आकार हुबेहुब अंड्यासारखा असल्याने, या सर्वांना ब्रह्मांड हे नाव प्राप्त झाले. सर्वांचे वर असलेला ब्रह्मा हा विश्वरूप मानला गेला. प्राचीन ऋषींना निदान असे १०० पुंज ज्ञात होते. म्हणून त्या सर्वांना त्यांनी शत-ब्रह्मांड असे नाव दिले.

भारतीयांना असलेले खगोल ज्ञान इतर संस्कृतींनाही ज्ञात होते, मग ते त्यांचे स्वत चे असो वा भारतामधून गेलेले असो. हंस ताऱ्याचा आकार त्यांना त्यांच्या आवडीच्या धार्मिक चिन्ह क्रूसप्रमाणे दिसला, म्हणून त्याचे नाव त्यांनी

" मार्दने फॉग " असे ठेवले. दिनांक ३१ डिसेंबर रोजी ब्रह्मा तारा सूर्याचे बरोबरच उगवतो आणि बरोबरच मावळतो. या नैसर्गिक कृतीवरून इसाई पंथियांनी अशी धार्मिक समजूत करून घेतली की, त्यांचा देव दि. ३१ डिसेंबर रोजी मरतो, आणि दि. १ जानेवारी रोजी पुन्हा जन्म पावतो. याचाच अर्थ असा की, सूर्याबरोबर होत असलेला उदय-अस्त डोळ्यांना दिसत नाही. पण त्याप्रमाणे आपण द्वितीयेचा चंद्र उघड डोळ्यांनी पाहू शकतो. तद्वत हा तारा दिनांक १ जानेवारीला दिसू शकेल, म्हणून त्याचा जन्म झाला असे मानतात. हेच त्यांचे नवे वर्ष, आणि उत्सवाचा दिवस ठरला.

इजिप्शिअन संस्कृतीमध्ये ओसिरिस हा सर्वात मोठा देव मानतात. ओसिरिस = रुद्र = अग्नि तारा होय. दिनांक ३१ डिसेंबर रोजी ब्रह्मातारा अस्त पावला, म्हणजे रुद्र मरतो असे ते मानतात. दिनांक २ जुलै रोजी पुन्हा तो पूर्व क्षितिजावर दिसू लागला म्हणजे देवाचा जन्म झाला असे समजून, नवीन वर्ष सुरू होते. कच्छ, काठेवाड, मारवाड येथील काही संस्कृतींचे मतही हेच आहे. हा दिवस साधारणतः आषाढ महिन्यात येतो, आणि तो नवीन संवत्सरदिन म्हणून पंचांगानी मानलेला आहे. त्यांची पंचांगे याच दिवसावर आधारित असतात.

याचा सारांश हाच की, प्राचीन भारतीय धर्मरचनेला आणि देवादिकांच्या कथानकांना खगोल शास्त्राचा भक्कम पाया आहे. खगोल तारकावर रूपके रचून, कथारूपाने ते ज्ञान सुलभ करून दिलेले आहे. आजची प्रभावी साधने नसतानाही केवळ ज्ञातदृष्टीने त्यांनी केलेले सूक्ष्म अवलोकन, आजच्या विज्ञान-संशोधकाना मार्गदर्शक असेच आहे. यातच त्यांचे श्रेष्ठत्व जगाला कळून येते. ( अनवचंद भायामाला, नवशक्ति, १७-७-६६ ).

पद्मपुराण ( सृष्टिखंड ) सरस्वतीच्या उत्पत्तीबद्दल दुसरी कथा सांगते. वडवाग्नीने भूतलावर एकदा प्रलय मांडला. देव-दानवही त्या प्रलयामध्ये होरपळून निघू लागले. संकटमुक्त करण्यासाठी त्यांनी ब्रह्मदेवाची प्रार्थना केली ब्रह्म देवाने अग्नीला एका पात्रात कोंडले आणि ते पात्र सागराकडे नेऊन देण्यास सरस्वतीला सांगितले. रडत रडत मोठ्या नाखुशीने वडिलांच्या आज्ञेस्तव तिने ते पात्र उचलले, पण त्याचे तेज तिला असह्य झाले. सागराकडे ते पात्र नेत असताना ती स्वतःच जलरूप झाली, आणि पृथ्वीवर वाहू लागली. मनुस्मृतीमध्ये सरस्वती व ईषद्वती या नद्यांना देव-नद्या असे संबोधिले आहे, आणि त्या ब्रह्मावर्ताच्या सीमा होत असे मत दिले आहे.

सरस्वती नदी आकाशात वहात असून, शेवटी वरुणाच्या मुखात पडते (ऋग्वेद, ६-११-६१) ती अत्यंत वेगवान् असून प्रजापतीकडून निर्मिली गेली (ऋग्वेद, ६-६१-१३) पर्वतावर उगम पावून ती सागराला मिळत असे, पण महाभारतकालापासून तिचे जल आटले, आणि राजपुतान्याच्या वाळवंटामध्येच ती अडकून पडली आर्यांनी पंजाब प्रांती वस्ती केल्यावर पूर्वेकडील पवित्र नदी म्हणून तिची पूजा होत असे गंगा व यमुना बहुधा आर्यांना माहीत नसाव्यात, तेथपर्यंत त्यांची नजर पोहोचली नसावी ही नदी मारवाडमध्ये गुप्त झाल्यावर, अबुंदा पर्वताच्या उत्तरेस पुन्हा उगम पावून दक्षिणेकडे वाहत जाऊन सिंधु सागराला मिळते, असे काहींचे मत आहे, तर एका इंग्रज लेखकाच्या मते ती सतलज नदीला मिळाली आणि तिच्याबरोबरच गुप्त झाली प्रयागक्षेत्री गंगा-यमुना संगमाच्या ठिकाणी ती गुप्तरूपाने वाहत आहे असेही मानतात, म्हणूनच त्याला त्रिवेणीसंगम हे नाव प्राप्त झाले आहे.

पार्शी धर्मग्रंथ अवेस्ता ह्यामध्ये अर्द्विसुर अनाहिता नदी हुकैर्य पर्वताच्या शिखरावर उगम पावून वैरुकश पर्वताकडे जोराने वाहत जाते, असे वर्णन आहे ऋग्वेदातील वर्णनात व ह्या वर्णनात बरेचसे साम्य आहे राधाकुमुद मुकर्जींच्या भारताच्या प्राचीन इतिहासात जो नकाशा दिला आहे, त्यामध्ये सरस्वती व सेतुमता नद्या गांधार, कपिशा प्रदेशात (अफगाणिस्थानात) दाखविल्या असून त्या दक्षिणेकडे वाहतात मग हुकैर्य पर्वत तो हाच तर नसेल ना? श्री ओगले आपल्या ग्रंथामध्ये म्हणतात की, या दोन्ही नद्या आकाशातील असून, पृथ्वीवरील सर्व जीवमात्रांना जीवनरसाचा पुरवठा पर्जन्यरूपाने करतात ही नदी पंजाबमधून वाहते, असे जे वर म्हटले आहे, ते मत त्यांना मान्य नाही ही नदी आपल्या प्रवाहाने दूरदूरच्या प्रदेशात उदक पसरविते, आणि प्राणिमात्रांच्या बुद्धीला प्रकाशित करते (यजुर्वेद, २०-८६)

पृथ्वीवरील अकाल निवारणार्थ ब्रह्मदेवाने एकदा यज्ञ करण्याचे ठरविले. पण तो कोठे करावा हे स्थान निश्चित करण्यासाठी त्याने एक पद्म स्वर्गातून खाली भूमीवर फेकले. ते खाली ज्या ठिकाणी पडले त्याला पुष्कर असे नाव देण्यात आले. या ठिकाणी यज्ञ करण्याचे निश्चित ठरले. या क्षेत्री ब्रह्मदेवाची मूर्ति असलेले देवालयही बांधण्यात आले. यज्ञाला सुरुवात होताच, एक विवस्त्र इसम तेथे आला आणि "आत्मा, आत्मा" अशी ओरड करू लागला. लगेच त्याने यज्ञभूमीवर माणसाचे एक मुडके टाकले. अशुभ म्हणून ते बाजूस काढावयास लागल्यावर तेथे दुसरे आले, तिसरे आले व मुडक्यांची रास पडली. शंकराच्या सांगण्यावरून ब्रह्मदेवाने त्या क्षेत्री एक शंकर-मंदिर स्थापन केले आणि त्याचे नाव "आत्मेश्वर" असे ठेवले. मंदिर तयार झाल्यावर सर्व मुडकी नाहीशी झाली. ( पद्म पु., पुष्कर माहात्म्य ).

यज्ञकार्यात दीक्षा घेताना ब्रह्मदेवाची पत्नी सरस्वती हिला आवाहन केले गेले, परंतु काही अपरिहार्य कारणामुळे ती वेळेवर उपस्थित राहू शकली नाही. मुहूर्त टळू नये म्हणून त्याने इंद्राला दुसरी स्त्री आणावयास सांगितले. इंद्राने एक गोपकन्या आणून गाईच्या मुखातून काढून तिला शुद्ध केली आणि ब्रह्मदेवाजवळ बसविली. हीच गायत्री झाली. यज्ञकर्म चालू झाले. काही वेळाने आपल्या सखीसह सरस्वती मोठ्या लवाजम्यानिशी मंडपात आली. आपल्या जागेवर आपल्या पतीशेजारी दुसरीच परस्त्री बसलेली पाहून तिला मनस्वी संताप आला. आपला अपमान व्हावा याासाठी हा बनाव हेतुत: घडला असावा असे समजून, तिने त्वरित सर्वांना शाप दिले—( १ ) ब्रह्मदेवाची पूजा लोक वर्षातून एकदाच करतील, ( २ ) इंद्राला कुठल्यातरी परक्या देशात शृंखलाबद्ध होऊन पडावे लागेल, ( ३ ) विष्णूने सहकार्य दिले असल्यामुळे त्याला मानवयोनीत गुराखी व्हावे लागेल, (४) रुद्राचा शूरपणा नष्ट होईल, (५) अग्नि सर्वभक्षक बनेल, (६) ब्राह्मण उपाध्याय यापुढे फक्त दक्षिणा मिळवण्याच्या दृष्टीने यज्ञकर्माचे आचरण करतील. यानंतर लक्ष्मीने मध्यस्थी केली आणि सरस्वतीचा राग शांत केला. तिचा कोप शांत झाल्यावर ती ब्रह्मदेवाजवळ नांदण्यास कबूल झाली

ब्रह्मदेवाने पुष्करतीर्थी आपले क्षेत्र स्थापन केल्यानंतर त्याने तेथे सरस्वती सरोवर तयार केले, आणि सरस्वतीला अवतरण्याचे आवाहन केले. नारायणांनी सरस्वतीला तिचे गंगेबरोबर भांडण झाले त्या वेळी सांगितलेच होते की, एक अंशाने ती पृथ्वीवर नदी म्हणून राहील आणि एक अंशाने ब्रह्मदेवाची पत्नी होईल. कलीयुगाची पाच सहस्र वर्षे लोटली म्हणजे ती नदीचा गुप्तपणा सोडून उघडपणे वाहू लागेल. यासाठी ब्रह्मदेवाने आवाहन

केले असता ती म्हणाली, "पापी लोकांचा जनसंपर्क न व्हावा म्हणून मी नेहमी पाताळात लपूनछपून रहात असते. परंतु आपली आज्ञा म्हणूनच या क्षेत्री प्रकट होत आहे." त्याप्रमाणे सरस्वती त्या क्षेत्रात प्रकट झाली आणि ब्रह्मदेवाने तिच्या संरक्षणार्थ मोठमोठे सर्प सभोवार ठेवले. अनेक त्रिवेणी संगमांत दोन नद्या मिळालेल्या दिसतात, आणि तिसरी सरस्वती गुप्त आहे असे सांगितले जाते, त्याचे कारण येथे वाचकांना सापडेल.

ऋग्वेदामध्ये ह्या देवीचे गुणगान, 'ती ब्रह्मदेवाची पत्नी, सर्वांची रक्षणकर्ती, अन्नपाणी पुरविणारी, सामर्थ्यसंपन्न करणारी, शत्रूंना भयंकर त्रास देणारी, दान देणाऱ्याना उत्तम वरदान देणारी, स्वधान्याने संतुष्ट होणारी, यज्ञकर्मामध्ये विपुल धनधान्य देणारी' असे केले आहे. शुक्लयजुर्वेद (२१-१९-३७) म्हणतो, इडा, भारती, सरस्वती या प्रयाज देवता होत. भरत, विराट नावाचा छंद व दुभती गाय ह्या सहाजणांमध्ये उपस्थित असलेल्या इंद्रदेवाला इंद्रियशक्ति व दीर्घायुष्य देवोत. देवाच्या यज्ञातील होता त्याचे यजन करो, यजमानाला भरपूर द्रव्यसंपत्ति मिळावी म्हणून ती आज्य हवींचे सेवन करो, आणि यशदायांच्या नाभीमध्ये बल व तज्जन्य कार्यक्षम शक्ति स्थापन करोत.

संशोधक विल्सन म्हणतो की, पूर्वी बंगालमधील वैष्णव धर्मीयांची अशी श्रद्धा होती की, सरस्वती ही विष्णूचीच पत्नी होय. तसेच लक्ष्मी आणि गंगा या दोघीही त्याच्याच बायका होत्या. पण मिनर्व्हा देवीप्रमाणे सरस्वती शिकली-सवरलेली नसल्यामुळे त्याची भांडणे विकोपास गेली. त्याचे कारण असे की, नारायणाच्या या तीन बायका एकत्र नांदत असता एकदा अशी घटना घडली की, भगवान नारायणांनी अंतःपुरामध्ये प्रवेश केल्यावर, त्या तिघीजणी स्वागतासाठी उठून उभ्या राहिल्या, पण त्यातल्या त्यात त्या दिवशी गंगेने विशेष कटाक्ष नारायणावर टाकले आणि "फक्कड की मौज फक्कड जाने" याप्रमाणे नारायणांनी त्याला प्रतिसाद दिला. मंदहास्यही केले. त्या वेळी दोघीजणी विशेष बोलल्या नाहीत. पण स्त्रीदृष्टीतून ही घटना सुटली नाही. नारायण बाहेर गेल्यावर सरस्वतीने गंगेच्या त्या चवचाळकीचा जाब विचारला. त्या सहजसुलभ गोष्टीचा सरस्वतीने बाऊ केल्यामुळे, गंगेनेसुद्धा कठोर शब्दांत प्रतिसाद दिला. शेवटी भांडण विकोपाला जाऊ लागताच लक्ष्मीने त्यांना शांत करण्याचा विफल प्रयत्न केला. क्रोधाच्या भरात सरस्वतीने गंगेला शाप दिला, "तुझे रूपांतर वृक्ष व नदीच्या प्रवाहात होईल." याउलट गंगेने शाप दिला, "तुझे रूपांतर नदीच्या प्रवाहात होईल." याप्रमाणे सवतीमत्सर अगदी शिगेला पोहोचला. या पेचातून

पुन्हा होण्यासाठी विष्णूने सरस्वतीला ब्रह्मदेवाकडे व गंगादेवीला शंकराकडे पाठविले. सरस्वतीदेवीची अनेक नावे आहेत. भारती, ब्राह्मी, पुष्करी, शारदा, वागीश्वरी, वीणा, सरस्वती, गायत्री, महासरस्वती, नृत्य अथवा तांडव सरस्वती इत्यादि, इत्यादि.

वरील सुभाषिताच्या श्लोकात सरस्वतीचे ध्यान वर्णिले आहे. या देवतेचे वर्णन करताना वायुपुराण म्हणते, " सरस्वती च प्रतिमां कुर्यात् भुजचतुष्टयम् । वरदं चाभयं च बिभ्रति दक्षिणे करे । पुस्तकं चाभयं वामे दधाना हंसवाहनम् । अतिशुभ्रेण वस्त्रेण कृष्णवर्णेन वा भवेत् ॥ आसनं च प्रकुर्वीत सौवर्ण-हंसवाहनम् । चतुर्भुज, अतिशुभ्रवस्त्र कमलासन किंवा हंसवाहन असून हातामध्ये पुस्तक, रुद्राक्षमाळा असावी. काही ठिकाणी देवीच्या हातामध्ये वीणा व कमंडलु दिलेली असावी.

सरस्वती ही विद्यादेवता म्हणून भूतलावर कशी अवतरली यासंबंधी अशी कथा सांगतात की, ब्रह्मदेवाने सरस्वतीला आज्ञा केली की, भूतलावर कोणी योग्य मानव आढळल्यास त्याच्या जिव्हेवर तिने प्रवेश करावा. ती भूतलावर आली आणि अशा मानवाच्या शोधात असता सत्ययुग संपले व त्रेतायुग चालू झाले असता, तमसा नदीचे तीरावर जेव्हा ती प्राप्त झाली, तेव्हा तिने त्या ठिकाणी वाल्मिकि ऋषींना पाहिले. व्याधाने नुकतेच एका क्रौंच पक्ष्याला ठार केले होते आणि त्याची प्रिया शोक करीत असता, वाल्मिकि त्याची शुश्रूषा करीत होते. हे करुणाजनक दृश्य पाहून सरस्वतीला दया आली, आणि त्याचे वर्णन करण्यासाठी तिने ऋषींच्या मुखात प्रवेश केल्याबरोबर भूतलावरील पहिले काव्य बाहेर पडले—

मा निषाद प्रतिष्ठां त्वमगमः शाश्वतीः समाः ।
यत्क्रौंचमिथुनादेकमवधीः काममोहितम् ॥

या काव्यामुळेच वाल्मिकींना आदिकवि असा मान मिळाला.

वेदवाङ्मयामध्ये ग्ना ( GNĀS ) वर्गातील काही देवता मानलेल्या आहेत. त्यांना देवांच्या सहचारिणी अगर पत्न्या मानलेल्या आहेत. शक्तिदेवतांचा विचार करताना या देवतांना वगळून चालण्यासारखे नाही. ग्ना याचा शब्दार्थ स्त्री असून ऋग्वेदामध्ये त्यांचा उल्लेख आहे. एकूण १७–१८ ऋचा यासंबंधी आहेत. ( १–२२–१०, २–३१–४, ५–४६–२, ५–४९–७ इ० इ० ) काही ठिकाणी ग्ना शब्द सरस्वती, भारती, वरुत्री इळा, पुरन्ध्री, आरमति, वरुणानी या देवतांबरोबर आढळतो. सायणाचार्य याचा अर्थ उपळल्या ज्योति,

गायित्री वृत्त व देवतांच्या सहचारिणी असा देतात (५-४६-२). सारांश, या वर्गातील देवतांचे कार्य समृद्धि व फलोत्पादन यांची कार्यवाही करणे हे होय. निसर्गशक्तीचा पुरुष हा जसा एक भाग, तसा स्त्रीशक्ति हा दुसरा भाग होय. जसे शिव + शक्ति, विष्णु + लक्ष्मी इ० इ०. वरील अर्थाने या स्त्रिया जरी समान भागिदारिणी असल्या तरी पुढे पुढे त्यांना देवतांच्या पत्नीपदी बसविल्यावर अर्थात त्यांची मूलतः असलेली किंमत कमी झाली. प्रा. मॅकडोनल्ड आपल्या 'वेदिक मायथॉलॉजी' ग्रंथात याचे विवरण करतात. "Goddesses occupy a very subordinate position in Vedic belief and worship. They hardly play any part as rulers of the world." स्त्री-देवतांना दुय्यमपद दिल्याने त्यांनी विश्वाच्या कारभारात प्रमुख भाग घेतलेला दिसत नाही. देवांच्या स्त्रिया यापेक्षा त्यांना अधिक महत्त्व प्राप्त झालेले नाही. इंद्राणी, वरुणानी, अग्नायी, इ० शब्दांवरून त्यांचे कमी असलेले महत्त्व दिसून येते. काही ब्राह्मणामध्ये, ग्ना शब्द आढळतो, पण कालांतराने 'ग्ना' चा अर्थ छंद असा करण्यात आला. (छंदासि वै ग्ना). गायित्री, त्रिष्टुभ, जगति छंद म्हणजे ग्ना होत.

सरस्वती ही मूळची वरीलप्रमाणे ग्ना वर्गातील देवता आहे. इला व भारती या तिच्या सख्या होत. आर्यांनी सरस्वती नदीच्या तीरावर वसाहत केल्यावर, तेथे यज्ञयाग केले, आणि स्थानदेवता मानून हिचे पूजन झाले असावे. पुरुवंश या ठिकाणीच समृद्ध झाला आणि मंत्ररचनेमध्ये या नदीचे सहकार्य व संरक्षण मिळाले म्हणून ती विद्या अथवा वाणी देवता मानलेली नव्हती. मग ही विद्या देवता कशी झाली!

यज्ञयागाच्या वेळी ही सरस्वती देवता आपल्या भक्ताच्या इच्छा परिपूर्ण करते असे म्हटले आहे. (ऋ. २-३-८), सूक्त ९-८१-४ मध्ये तिला सुयामा म्हणजे भक्ताना सद्गत्या पावणारी मानले आहे. सूक्त १०-१२-१२ मध्ये तिचा संबंध बुद्धि आणि अमृत शब्दाबरोबर जोडला आहे. या सर्वांचा साकल्याने विचार केला, म्हणजे ग्ना वर्गातील देवता वाढू नशी फलोत्पादक मातृशक्ति मानली गेली, त्याचप्रमाणे सरस्वतीचेही महत्त्व वाढीस लागले.

या संबधात प्रा. मॅकडोनल्ड म्हणतात, "सरस्वती नदी देवतेचे संक्रमण बुद्धिदेवता अथवा वाक्देवतेमध्ये झाले. याचा उगम देवांनी ज्या वेळी यज्ञ-समारंभ केले, त्या वेळी अश्विनी कुमारांनी वैद्यकीय साधनांनी, व सरस्वती देवीने, वाणीने इंद्राला जोम आणला, आणि त्याचे बळ वाढविले." तैत्तिरीय उपनिषद (२-६-४) या देवीच्या संक्रमणावर अधिक प्रकाश टाकते. ती शरीरातील मांस, अस्थि, चर्म यांना एकत्रित करून मानवशरीर तयार करते. अश्विनी

देवतेच्या सहकार्याने ती मनोव्यापार करणारी अतर-इद्रिये तयार करते. विणकर त्याप्रमाणे उभ्या आडव्या धाग्यानी कापड विणतो, त्याप्रमाणे ती शरीरातील रक्त तयार करते, सर्व शरीरात अतर्भूत असलेला व्यानवायु तीच उत्पन्न करते आणि गर्भाची वाढ करते. वरील सर्व कार्याचा सांगोपांग विचार केला म्हणजे ती बुद्धि-देवता कशी झाली याचा उलगडा होतो. ब्राह्मणकालात ती वाक्देवता बनून, सत्यभाषा करणारी, म्हणून तिला सत्यवाक नाव प्राप्त झाले.

सरस्वतीला अबीतमा-दयाळू माता असे नाव प्राप्त झाले आहे (ऋ. २-४१-१६). ज्या वेळी आर्यांनी या नदी किनाऱ्यावर वसाहती केल्या, त्या वेळी फलोत्पादनासाठी तिने पाणीपुरवठा केला. कधी काळी तिचे किनारी वन्य जमाती रहात असतील, त्यांना बाजूला पसरणाऱ्या लहान लहान ओढ्यानी पाणीपुरवठा केला व सर्वत्र समृद्धि निर्माण केली त्यामुळे तिच्या या मातृप्रेमामुळे हे नाव तिला प्राप्त झाले.

मातृत्व अथवा मातृशक्तीची कल्पना वेदकालीन आहे, याचे पुरावे अनेक देता येतील. सरस्वती नदी प्रमाणे सिंधु, गगा या नद्याना सुद्धा "मातृतमा नद्यः" असे ऋग्वेदात म्हटले आहे (१-२३-१). त्याचप्रमाणे अदिति, पुरंध्री, इद्राणी यांनाही मातृत्व दिलेले आहे वैदिक काळाची ही मातृशक्तीची कल्पना पुढे पौराणिक कालात उमा, दुर्गा, पार्वती, लक्ष्मी इ० देवतामध्ये अतर्भूत झालेली आढळते. कालातराने अनेक संस्कृतींनी मातृत्वाची ही कल्पना पुरस्कारिली आहे. पडित राहुल सास्कृत्यायनासारखेही मातृत्वाची कल्पना पुरातन म्हणून उचलून धरतात. पण या सर्वांचे मूळ आर्यांचे वेदवाङ्मयामध्ये आहे, हे विसरता येत नाही

(The Shakti or Divine Power by S. K Das याचे आधारे)

सरस्वतीचे वर्णन करताना ते अशुमत्भेदागमाप्रमाणे पुढीलप्रमाणे असावे.—

शुभ्र कमलासनावर आरूढ झालेली, शुभ्रवर्णा, शुभ्रवस्त्रा, चतुर्भुजा, उजव्या हातात अक्षमाला व व्याख्यानमुद्रा, आणि डाव्या हाती पुस्तक व कमळ असावे, गळ्यात यज्ञोपवित, अगावर रत्नजडीत अलकार, मस्तकावर जटामुकुट असावा. ऋषिमुनि आजूबाजूला ध्यानस्त असून तिचे सतत चिंतन करीत असावेत. विष्णुधर्मोत्तरपुराणाप्रमाणे कमळाऐवजी हातात कमडलु व कानात कुडले असा फरक आहे. सूतसहिता, देवीमाहात्म्य, स्कंदपुराण, रूपमडण इत्यादि ग्रंथामध्ये ह्या

देवीचे वर्णन थोडयाफार फरकाने आढळते. (Hindu Iconography by T. A. Gopinath Rao, 1/378 ).

काही ठिकाणी ह्या देवीच्या हातात वीणा देतात, असे वर्णन आपण वर वाचलेच आहे. वीणा हे नृत्यसगीताचे प्रतीक असल्याने सरस्वती ही त्या विद्येचीही देवता मानतात या देवीला हसवाहन का दिले, याचे मार्मिक विवेचन एकनाथ महाराजानी असे केले आहे की, " सारासार निवडी जनीं। त्या हसावरी हसवाहिनी ॥ " हसपक्षाचा सर्वपरिचित गुण म्हणजे तुकारामानी म्हटल्याप्रमाणे, " निवडी वेगळे क्षीर आणि पाणी " हा असल्याने, सर्व वस्तुमात्रामध्ये योग्य निवड करण्याचे ज्ञान तिजपाशी आहे, म्हणून तिला हंसवाहन दिले गेले. हा गूढार्थ दर्शविण्यासाठी हंसवाहनाची योजना केली असावी. तसेच ही देवता म्हणजे भाषा, कला, अलकार इत्यादि गुणाची जननी मानली गेली आहे. शृगेरी-मठामध्ये आद्य शकराचार्यानी भारतीचे स्वरूप स्थापन केले आहे. त्या ठिकाणी हातात माळा, अमृतकुभ, पोपट व हसवाहन दाखविले आहे.

पुष्करक्षेत्री ब्रह्मदेवाने यज्ञ केला हे आपण पाहिलेच आहे. या ठिकाणी गायत्री, सावित्री, ब्रह्मा याची मंदिरे आहेत. त्या ठिकाणच्या मोठया तळ्याला जेष्ठ पुष्कर, दुसऱ्याला मध्य पुष्कर व तिसऱ्याला कनिष्ठ पुष्कर अशी नावे आहेत. ह्या क्षेत्राच्या स्थापनेनतर बराच काळ याची लोकाना विस्मृति झाली होती. अकराव्या शतकामध्ये मदोराचा राजा नरहरराव एकदा शिकार करीत करीत ह्या तळ्याच्या ठिकाणी आला तहान लागलेली असल्याने राजा घोडयावरून खाली उतरला आणि त्या तळ्यातील पाणी त्याने प्राशन केले. राजाचे शरीर कोडयुक्त होते. पाणी प्राशन केल्यावर चमत्कार असा झाला की, राजाचे कोड बरे झाले, आणि अग निर्मळ दिसू लागले. राजाला या क्षेत्राची महती समजल्यावर, त्याने सर्व तळी उकरून काढली, आणि त्याना घाट बांधले या ठिकाणी गायत्री, सावित्री मंदिराशिवाय सरस्वती, बद्रिनारायण व वराह याचीही मंदिरे आहेत ( अजमेर गॅझेट ).

मध्यभारतामध्ये अबूच्या पहाडावर काही प्रेक्षणीय शिल्पक्षेत्रे आहेत. इ. स. १०३२ च्या सुमारास गुजराथचा राजा भीमदेव ( पहिला ) याच्या पदरी विमल-शाह नावाचा दिवाण होता. कलेचा तो अतिशय भोक्ता होता. त्याने विमल-वसाही, तेजपाल, आदिनाथ, पार्श्वनाथ, गोपिनाथ इत्यादि मूर्ति असलेली मंदिरे बांधलेली आहेत, सर्व काम शुभ्र संगमरवरी दगडाचे आहे. शिल्प अतिशय प्रेक्षणीय आहेच. येथील एका मंदिराच्या छतावर विष्णु हिरण्यकशिपुयुद्ध, गजाचे युद्ध इत्यादि देखावे कोरलेले आहेत. विमलवसाही मंदिराचे छत सर्व बाजूनी सरस्वतीच्या भव्य आणि सुंदर अशा मूर्तीच्या मस्तकावर टेकून ठेवलेले आहे. असे सागवात

की, ह्या सर्व कलाकृति निर्माण करण्यास, त्या स्वस्ताईच्या काळातही अठरा कोटि रुपये खर्च केले गेले ताजमहालची कृति पाचसहाशे वर्षांनतरची! ज्ञानकोश काराच्या माहितीप्रमाणे ताजमहालचा खर्च फक्त नऊ कोटि झालेला आहे ताजमहालची कीर्ति जगांत सर्वत्र दुमदुमत आहे पण त्याहीपेक्षा येथील शिल्पाची योजना खासच श्रेष्ठ आहे, असे तज्ज्ञांचे मत आहे परदेशी प्रवाश्यांनी हे स्थान पहावे म्हणून केंद्रसरकारने, "दिलवारा टेंपल्स" ह्या नावाचे लहानसे चोपडे प्रसिद्ध केले आहे त्यामध्ये शिल्पाच्या छायाकृतीही दिलेल्या आहेत.

भारतीयांच्याच नव्हे तर परदेशीय कलारसिकांच्याही कौतुकाला पात्र झालेले हे स्थळ व आतील ऋषभदेवाची हिरेमाणकांनी मढविलेली नयनरम्य मूर्ति आणि भिंती व छत यावर ऋषभदेवादि तीर्थंकरांच्या जीवनातील घटना, कलापूर्ण रीतीने संगमरवरी दगडांत रेखाटलेल्या, तसेच हिंदुधर्माबद्दलही विशाल दृष्टिकोनदर्शक कोरलेले पुराणातील कथाप्रसंग, अनेक स्तंभावरील प्रेक्षकाची नजर खिळून जावी, इतके नाजूक शिल्पकाम इत्यादिकाने नटलेले मंदिर, इ स १३१८ मध्ये अलाउद्दीनाने भग्न केले अर्थात् पुढील दहा बारा वर्षांच्या अवधीतच मंदोधाना राजा लखनसिंह व त्यांना बंधु यांनी जिद्द बाळगून त्या मंदिराचा जीर्णोद्धार केला

त्यापूर्वी इ स १२३१ च्या सुमारास वस्तुपाल व तेजपाल हे दोघे गुजरायचा राजा वीरधवल याचे मंत्रि असताना तेथील शिल्पात गोमतेश्वर, ब्रह्मशाळा, दानशाळा, धर्मशाळा, वापी, तलाव इत्यादि भारतामधील जैन धर्माव्यतिरिक्त इतर संस्कृतींचाही आदर राखून अनेक इष्टपूर्त कामे केली असे सांगतात की, हे सर्व निर्माण करावयाला आणि कायम निधी ठेवण्यासाठी त्यांना ३ अब्ज, ८४ लक्ष खर्च आला (भा स को, ११७७)

दिलवारा येथील संगमरवरी शिल्प हे जैन शिल्पकलेचे उत्कृष्ट प्रतीक मानले जाते सनपूर्व दुसऱ्या शतकातील खंडगिरी, उदयगिरी ही त्यांची प्रथम शिल्पे होत, तर येथे ती कला पूर्णत्वाला पावलेली दिसून येते प्रसिद्ध संशोधक फर्गीसन् म्हणतो, "साध्यासुध्या लोखंडी छिन्न्या अथवा हत्यारे तेथे काम करण्यास असमर्थ ठरली, इतकी नाजूक हळुवार कलाकुसर तेथे आहे असे सांगितले जाते की, संगमरवरी पाषाणावर शिल्प तयार करताना ते घासून काढावे लागले घासून काढल्यावर जो पाषाण धूळी निघेल तिच्या वजनावर, कलाकाराची मजुरी दिली जाई" (भारतीय पुराणवस्तु प्रकाशन, पृ १३७) उत्तम कृति तयार करण्यास काय मेहनत घ्यावी लागते, त्याचे हे योग्य निदर्शक आहे

• उत्तम शिल्प असलेले एक प्राचीन सरस्वतीचे मंदिर गदग (धारवाड) येथे फार प्रसिद्ध आहे. 'सरस्वतीकंठाभरण' या नावाचा एक उत्तम काव्यमय राजा भोज ह्याने लिहिलेला आहे.

शार्दूलविक्रीडित

बालेंदु धवला समा मिरविते जी शुभ्र वस्त्रांकिता।
वीणा उत्तम शोभते निज करीं, शुभ्रांबुजा ही स्थिता॥
ब्रह्मा विष्णु-महेश वंदन सदा अत्यादरें अर्पिती।
मी त्या देवि सरस्वतीस विनवीं, काव्यास हो साह्य कीं॥ १॥
शुद्ध ब्रह्मचि सार आद्य वदती व्यापून राही जगा।
वीणा पुस्तक धारिणी अभयदा अज्ञान नाशी जगा॥
माला ती स्फटिकाचि हातिं विलसे, पद्मासनीं वास तो।
देई बुद्धि जना सदा भगवती, त्या शारदे वंदितो॥ २॥

(१९) संध्यादेवी

ब्रह्मदेवाचे ध्यान सम्यग्रीत्या चालले असता जी मानस कन्या जन्मली ती संध्यादेवी होय. दिवस आणि रात्र ह्यांच्या संधिकाळाचा ह्या ठिकाणी काही एक संबंध नाही. जन्मत च तिच्या मनामध्ये सकामभाव उत्पन्न झाला. तेव्हा त्या साध्वीने निश्चय केला की, असा भाव इतरांच्या ठिकाणी उत्पन्न झाल्यास पृथ्वीवर अनर्थ ओढवेल. तेव्हा तपश्चर्या करून ब्रह्मदेवाकडून वरदान मागून घ्यावे की, यापुढे अशी जन्मत सकाम संतती निर्माण होऊ नये. एवढेच नव्हे तर शैशव व कौमार्य ह्या दोन अवस्था संपल्यावर मग ती उत्पन्न व्हावी. तपश्चर्या करून असा वर प्राप्त व्हावा यासाठी जन्मत ती चंद्रभाग पर्वतावर तपश्चर्येसाठी निघून गेली. गुरूच्या शोधार्थ रानावनात फिरत असताना "बृहल्लोहित" सरोवराजवळ ती आली. त्या ठिकाणी तिला वसिष्ठ मुनि भेटले, आणि त्यांनी तिला द्वादशाक्षरी मंत्राचा उपदेश केला. चार युगेपर्यंत तिने आपली खडतर तपश्चर्या चालू ठेवली. शेवटी भगवान विष्णु गरुडावर बसून तेथे प्रकट झाले, आणि त्यांनी तिला वर मागण्यास सांगितले. तिने वर सांगितले ते असे— (१) प्राणिमात्र जन्माला येताच त्यांच्या मनात काम भावनेचा उद्भव होऊ नये, (२) माझे पातिव्रत्य अखंड रहावे, (३) भगवत्स्वरूप पतीविना इतर कोणत्याही परपुरुषावर माझी सकाम दृष्टि पडू नये, (४) कोणी परपुरुषाने सकामदृष्टीने मजकडे पाहिले तर त्याचे पौरुषत्व नष्ट व्हावे

भगवान विष्णूंनी "तथास्तु" असे म्हटले या वरामुळेच बाल्य आणि कौमार्यावस्थेत प्राण्याला कामभावना नसावे. विष्णूने तिला सांगितले की, "येथून जवळच चंद्रभागा नदीवर मेधातिथि यज्ञ करीत आहे. तो यज्ञ एकदोन वर्षे चालणार आहे." भगवत्स्वरूप पतीविना जरी अन्य पुरुष नको होता, तरी पुढे पुढे ती संसारसुखाला आसुसली, अतृप्त इच्छेमुळे तिचे शरीर अत्यंत कृश झाले, आणि शेवटी निराशेने तिने यज्ञकुंडात देहत्याग करावयाचे ठरविले. पण मानवी देह यज्ञकुंडात टाकला तर अग्नि मांसभक्षक गणला जाईल, म्हणून यज्ञीय पुरोडाश बनून तिने आपली आहुति दिली. आहुतीपूर्वी तिने विष्णूची प्रार्थना केली की, "वसिष्ठ मुनींनी मला गुरुपदेश दिलेला असल्याने त्यांची गुरुदक्षिणा द्यावयाची राहिलेली आहे. तेव्हा पुढील जन्मी वसिष्ठपत्नी होण्याचे भाग्य मला लाभावे."

पुरोडाशरूपी संध्या सूर्यलोकामध्ये गेली. सूर्यदेवाने तिला वंदन केले आणि पुरोडाशाचे दोन भाग करून आपल्या रथावर ठेवले. शरीराचा वरील भाग प्रातःसंध्या आणि खालील भाग सायंसंध्या ह्या नावाने प्रसिद्ध झाला. कालांतराने यज्ञाची पूर्णाहुति झाली. त्या वेळी अग्निदेव प्रत्यक्ष प्रगट झाले, आणि त्यांनी एक कन्या मेधातिथीला प्रसाद म्हणून दिली. तिचे नाव अरुंधती ठेवले गेले. सूर्यलोकांत सावित्री देवींच्या सान्निध्यात काही काळ ती राहिल्यानंतर त्या दोघी मानसपर्वतावर गेल्या. तेथे त्यांना गायत्री व बहुला देवी भेटल्या. अरुंधती सात वर्षे त्यांच्याजवळ राहिली, आणि त्या काळात तिने उग्र तपश्चर्या केली. एके वेळी वसिष्ठ ऋषींचे तिला दर्शन घडले, आणि तात्काळ तिला गतजन्माचे स्मरण झाले. हेच आपले पती होय असे मानून तिने त्यांच्याशी विवाह केला. (शिवपुराण, रुद्रसंहिता, अ. १-६; कालिका पु., २१).

पंढरपूर शहरी संध्यावळी भागात ह्या देवीचे मंदिर आहे. चंद्रभाग पर्वत व चंद्रभागा नदी याच भागात आहेत. कारण त्या ठिकाणचे मंदिर ह्या विधानाला पुष्टी देणारेच आहे. पंढरपूर येथील विठ्ठलमंदिराचे 'उत्पात' ह्या उपनावाचे जे पुजारी आहेत, त्यांची ही कुलस्वामिनी होय.

(श्री. ग. म. वैद्य-प्रसाद, पुणे दिवाळी अंक १९६१)

शार्दूलविक्रीडित

संध्या ब्रह्मसुता जई उपजतां जाई वनाभितरीं ।
देई मंत्र वसिष्ट तीप्रति, तये गाठो स्वधेया तरी ॥
मंत्रा सिद्धिस देवता उतरली, संध्ये म्हणे घे वरा ।
इच्छापूर्ति मिळे, दुजा पुरुष ना, स्पर्शि तुला गे जरा ॥ १ ॥

शिखरिणी

वर प्राप्त संध्या अनुपम सुगाशे बहरली ।
नरस्पर्शाविना परि सुख मनीपे असुवली ॥
कृपागी ती झाली तिळतिळ झुरोनि प्रतिदिनीं ।
रवीच्या तेजाते कणकणहि जाई मिसळुनी ॥ २ ॥

वसंततिलक

नाही वसिष्ठ गुरूला दिली दक्षिणा ही ।
येणें घडे पुनरपि परि जन्म पाही ॥
नामें अरुंधति म्हणोनि वरी गुरूला ।
सध्यार्चना समयीं वंदन देवतेला ॥ ३ ॥

सारंग

सध्ये तुझे मंदिर स्थान कोठेंच ।
संध्यावळी भार्गी पंढरी क्षेत्रांत ॥
'उत्पात' विप्रा कुलस्वामिनी तूंच ।
धार्मिक कृत्यांत देवीस वंदीत ॥ ४ ॥

( २० ) हुताशनी

सप्तहस्ताचतु श्रृंगीसप्तजिव्हाद्विशीर्षिकाम् ।
त्रिपदा हृष्टवदनां सुखासीनां शुचिसीताम् ॥ १ ॥
मेषारूढामग्निरूपां जिव्हाललनभीषणाम् ।
तप्तकांचनसंकाशां होलिका हृदि चिंतयेत् ॥ २ ॥ ( धर्मसिंधु )

या देवतेचे रूप कसे असावे हे सांगणारे धर्मसिंधु ग्रंथातील वरील दोन श्लोक आहेत दोन मस्तके, चार शृंगे, सात जिव्हा, सात हात, तीन पाय, मेषावर आरूढ झालेली इत्यादि असे तिचे रूप असावे. फाल्गुन महिन्याच्या पौर्णिमेला ह्या देवतेची पूजा होते.

या देवीच्या उत्पत्तीसबंधी अशी कल्पना प्रचलित आहे की, हिरण्यकश्यपु दैत्याची फाल्गुनी नावाची एक बहीण होती. हिरण्यकश्यपूने आपला पुत्र प्रल्हाद

त्याला ठार करण्याचे अनेक प्रयत्न केले, कारण तो विष्णूची उपासना करीत असे. या कामी त्याला त्याच्या बहिणीची, होलिकेची मदत झाली. त्या बहिणीला असा वर मिळालेला होता की, अग्नि तिला केव्हाही व कोठेही स्पर्श-बाधा करू शकणार नाही. यामुळे प्रल्हादाला ठार करण्याचे काम तिने आपल्याकडे घेतले. तिने त्याला मांडीवर बसवून सभोवार अग्नि पेटवून घेतला. तिची अशी समजूत होती की, वरामुळे अग्नीची बाधा तिला होणार नाही आणि त्या अग्नीत प्रल्हाद मात्र जळून जाईल. पण वरदानाचा उपयोग दुष्ट हेतूने केल्यामुळे तो निकामी झाला आणि ती मात्र स्वत च जळून गेली. परमेश्वर-कृपेने त्या दिव्य संकटातून प्रल्हाद मात्र वाचला ही गोष्ट निराळी. ज्या दिवशी ती जळून मेली, तो दिवस फाल्गुन पौर्णिमेचा असल्यामुळे त्या कृत्याचे स्मरण म्हणून हुताशनी फाल्गुनी पौर्णिमेचा सण साजरा केला जातो.

हिंदुवर्ष सवत याला होलिका नावाची बहीण होती. एकदा वर्षारंभी अचानकपणे सवत मृत्यू पावला, तेव्हा चितेवर ठेवून त्याला दहन करावे अशी इच्छा होलिकेने प्रदर्शित केली. त्याप्रमाणे सर्व तयारी झाल्यावर तिने भावासाठी शेवटी प्रार्थना केली की, याचे नाव अमर होवो. भावावरील आत्यंतिक प्रेमाने तिने प्रार्थना केली असल्याने, तो पुन्हा जिवत झाला या प्रकारची स्मृति म्हणून प्रत्येक वर्षी होळी पेटविली जाते.

(Popular Religion & Folklore of Northern India by W Crooke, Vol II, P 315)

संस्कृत ग्रंथ निर्णयाप्रमाणे कथा अशी की, श्रीकृष्णाच्या आदेशाप्रमाणे युधिष्ठिराने प्रादुर्भाव झालेल्या एका व्याधीच्या रोगनिर्मूलनार्थ पूजा केली त्या वेळी श्रीकृष्ण म्हणाले की, होळी नावाची एक राक्षसीण मानवाचे प्राण, ते निद्रिस्त असता हरण करते म्हणून सांप्रत पेटवावे दरवर्षी फाल्गुन पौर्णिमेच्या दिवशी विधीपूर्वक तिचे दहन केल्यास व्याध निघून जाईल याप्रमाणे धर्मराजाने पूजा केली आणि तीच रूढी प्रचारात राहिली.

(Brahmins, Theists & Muslims of India by John Campbell Oman, P 250)

ही एक वैकारिका देवता असून, वेदकाळापासून तिचे पूजन होत आलेले आहे मानवी स्वभावातील मूलभूत प्रमादी विचार निघून जावे यासाठी या देवतेची योजना केलेली आहे प्रामुख्याने नैर्ऋत्य दिशेची ही देवता मानली जाते फाल्गुन पौर्णिमा ही सक्रमण काळात येत असल्याने, मागील चारी ऋतूमध्ये मानवामध्ये साठलेले प्रमादी विचाराचे निर्मूलन व्हावे व नवीन वर्षाचा प्रारंभ

मंगलमय असावा ह्या हेतूने या देवीच्या नावाने होळीमध्ये हवन केले जाते. प्रत्येक गावी ह्या देवतेचे पूजन होत असल्यामुळे, ही एक ग्रामदेवताच बनली आहे. होलिका पुराणामध्ये ह्यासंबंधी विस्तृत माहिती मिळू शकेल.

हुताशनी देवी उत्सवाची प्राचीनता इसवी सनापूर्वीची आहे, हे आपण पाहिलेच आहे. पूर्वमीमांसासूत्रावरील शबरभाष्यात या उत्सवाचा उल्लेख आहे. तसेच जैमिनीय न्यायमाला विस्तारमध्येही आलेला आहे. जाणकारांची अशी समजूत आहे की, स्त्रियांच्या सौभाग्यरक्षणासाठी राकादेवी ( पूर्ण चंद्र ) पूजनाचा हा प्रकार आहे. वात्स्यायनकामसूत्रामध्येही या उत्सवाचे वर्णन आढळते. शिशिर ऋतूची समाप्ति व वसंताचे आगमन सुचविणारा हा उत्सव असून, दोन अडीच सहस्र वर्षे तो अव्याहतपणे भारतात चालू आहे. होलिका देवीच्या चितेची राख म्हणून चिखलफेक करणे, तिच्या रक्ताचा म्हणून लाल पाण्याचा सडा घालणे, गुलाल उधळणे, पिचकाऱ्यांमधून नानातऱ्हेच्या रंगांचे फवारे उडविणे किंवा सुगंधी चूर्णे उडविणे इ० अनेक प्रकार समाजाच्या चालीरीतिप्रमाणे अथवा आर्थिक परिस्थितीनुरूप सांप्रतही आधुनिक काळात घडत आहेत. भारतीय केंद्र सरकारच्या शासनीय शहरात पंतप्रधान व परदेशी राजदूत सामील होत आहेत. इतके या उत्सवाचे वैभव आहे. अनेक राजे झाले, साम्राज्ये झाली व लयाला गेली, पण या उत्सवाला खंड पडलेला नाही. प्रांतपरत्वे हा सण होळी, हुताशनी, शिमगा, दोलायात्रा, कामदहन इत्यादि नावाने साजरा केला जातो.

अशा पार्श्वभूमीवर पेशवाईकालीन या उत्सवाचे वर्णन लक्षवेधक आहे, म्हणून येथे देत आहे. दिनांक १६ मार्च १७८६ साली सवाई माधवराव पेशवे शनिवारवाड्यात हा खेळ खेळले. त्याचे वर्णन पहा—

" तिसरा प्रहरा पंचमीचा रंग केला. मजलस गणपतीचे दिवाणखान्यात केली. कलावंतीणीचे दोन तर्फे होते. मंडळीस अगोदर बोलावणी केली, तेही आले. पाच-सहा घटिका दिवस असताना श्रीमंत दिवाणखान्यात आले. अमृतराव कृष्णाजी नाईक, थत्ते, आनंदराव रास्ते इ० लोक होते. चार घटिका नाच होऊन मग रंगास आरंभ झाला. श्रीमंतांनी आपल्या हाते कार्याकारणें त्यांच्या अंगावर चिरकांडीने रंग उडवला. तदनंतर गुलालाची रेल झाली, अंग व पोषाक भिजून चिंब झाली, येथपर्यंत रंग खेळले, मग उठोन स्नानास गेले. भोजन करून, दोन घटिका रात्रीस चाफेखणीत येऊन फडीस बसले. खेळ, डफ गाणे, पोरांचा नाच व गोविंदाची सोंगे सहा घटिकापर्यंत झाली, मग श्रीमंत उठोन निद्रेस गेले. "

पुढे सन १७९२ साली महादजी शिंदे यांची स्वारी पुण्यास होती. त्या वेळी त्यांनी उत्तर भारतीय राजे हुताशनीचा रंग खेळतात, तसा रंग श्रीमंतांनी खेळावा म्हणून विनंती केली. त्या दिवशी श्रीमंत शनिवारवाड्यामधून अंबारीत बसून सरदार, दरकदार व सैन्यासह शिंद्याच्या गोटास वानवडीस गेले. वाटेत हरिपंत फडक्याच्या वाड्याजवळ श्रीमंतावर रंगाचा भडीमार झाला. शेकडो पल्ले गुलाल उधळला गेला व रस्त्यामध्ये गुलालाचा चिखल झाला. पुढे रास्त्यांच्या वाड्याजवळ गच्चीवरून रंगाचे बंब त्यांचे अंगावर उडू लागले, जणू सहस्र धारांनी रंगाचे मेघच वर्षाव करीत होते. पुणेकरांच्या रंगाचा हा दिवस सर्वत्र कौतुकाचा झाला होता. त्या प्रसंगाचे वर्णन होनाजी बाळा शाहीर खालीलप्रमाणे करतो—

द्वापारीं श्रीमाधवविलास भागवती प्रत्यय पहावा।
तसें कलीमधें रंग खेळले श्रीमंत पाटीलबावा॥

हाच शाहीर पुढे त्या खेळाचे विश्लेषण असे करतो की—

लौकिक रंग हा पृथ्वीवर पसरला।
पुत्रपौत्राशी सांगायाशीं झाला॥

वीर पराक्रमी पुरुष हा रंग खेळत, तेव्हा त्यांच्या पराक्रमाचा रंग-लौकिक जगभर पसरला जाई आणि त्याची खरी रंगत लोकांना उपभोगावयास मिळे. पराक्रमाचे सहचर्याने हा राजविलास शोभून दिसत होता. पण सांप्रत विक्रम संपला आणि उरला तो केवळ रंगविलास. यामुळे सांप्रतच्या रंगविलासाला पौरुषहीनतेच्या धुळवडीचे स्वरूप प्राप्त झालेले दिसते. " शिमगा गेला पण त्याचे कवित्व मागे राहिले. " तसाच हाही प्रकार समजावा.

(रा. चिं. ढेरे, केसरी-पुणे. दि. १-३-१९६४)

दक्षिण भारतामध्ये होलिकोत्सव साजरा करतात. पण त्याला कामदहनम् असे नाव आहे. त्या दिवशी कामदेवाची मूर्ति करून तिचे दहन करतात आणि तसे केल्याने वैवाहिक जीवन सुखी होते, अशी त्यांची भावना असते

राजसूययज्ञ करावयास घेतला असता, लोकमाता त्याला भेटावयास आल्या. लक्ष्मी, सिनीवाली, धुति, तुष्टि, प्रभा, कुहु, कीर्ति, वसु, धृति अशी त्या लोकमातांची नावे होती. या स्त्रिया आपल्या पतीदेवांना सोडून आलेल्या होत्या. ह्या चंद्राकडे येऊन त्याची सेवा करू लागल्या. ह्या मातांचे आपल्यावरील प्रेम पाहून चंद्रही त्यांची मातांप्रमाणे सेवा करू लागला ( मत्स्यपुराण, अ. २३ ). काशीखंडामध्येही ह्यांचे वर्णन आहे. ते असे--

( १ ) चंद्रांसिनी कुहुश्चैव द्युतिः पुष्टिः प्रभावसुः ।
कीर्तिं धृतिश्च लक्ष्मीश्च नवदेव्याः सिषिवरे ॥
( काशीखंड, १४-३३. )

( २ ) या गुंगूर्या सिनीवाली या राका या सरस्वती ।
या इंद्राणी मौभ ऊतये वरुणानीं स्वस्तये ॥ ( ऋ. २।७।१३ )

याप्रमाणे ही सहा नावे आहेत.

( ३ ) भागवत स्कंद, ५।२० मध्ये चंद्रदेवता म्हणून अनुमती, सिनिवाली, सरस्वती, कुहु, रजनी, नन्दा, राका अशी सात नावे आढळतात.

सिनीवाली देवता ही अमावस्या व पौर्णिमा ह्या तिथींची अधिष्ठात्री देवता मानली गेली आहे. चंद्र ज्योतिश्चक्रावर फिरत असताना, ज्या निरनिराळ्या कलेने फिरतो, त्या प्रत्येक कलेवर कुहु, अनुमति, राका इत्यादि देवता मानल्या आहेत.

शशिनी सिनीवाली सादृष्टे नष्टे कुहुरमावास्या ।
अनुमती रुने राका संपूर्णे पूर्णमासा च ॥
( हलायुध अभिधान रत्नमाला, १-११२ )

दृष्टचंद्रा सिनीवाली, नष्टचन्द्रा कुहुरित्येतावमावास्या भेदौ ( श्रीधर. )
तसेच अमरकोशात ह्याचा उल्लेख मिळतो. तो असाः—

" कलाहीने सानुमती पूर्णे राका निशाचरे ।
सादृष्टेंदु सिनीवाली सानष्टेंदु कला कुहुः ॥
( अमर., १२९-३० )

सिनीवाली, सुकपर्दा सुकुरीरा स्वौपशा।

(शुक्ल. यजुर्वेद, ११-५६)

आपल्या मस्तकावरील केशांची उत्कृष्टपणे वेणी घातलेली, मस्तकावर सुवर्णमुकुट धारण केलेली, उत्कृष्ट गात्रे असलेली, जिचे कंठ-करादि अवयव शृंगारादि विलासाला योग्य असलेली, अशी ही भूदेवी पूजनीय आहे. यजुर्वेदातील (३४-१०) ऋचेमध्ये सांगितले आहे की, "देवांची भगिनी सिनीवाली देवी, आम्ही अर्पण केलेला हविर्भाग तू प्रेमाने सेवन कर, आणि आम्हाला पुत्रपौत्रादि प्रजा दे."

वरील वर्णनाची सिनीवाली देवींची मूर्ति रायर येथील उत्खननामध्ये आढळून आली. रायर हे गाव जयपूर स्टेट रेल्वेच्या नवाई ह्या स्टेशनपासून सुमारे १५ मैलांवर आहे. ह्या भागाला "धील नदीचे खोरे" म्हणतात. इ. स. पूर्व दुसऱ्या शतकात ज्या वेळी शुंग घराणे ह्या भागावर अधिराज्य गाजवीत होते त्या वेळी हे गाव वसलेले असावे. सध्या मात्र हे वीसपंचवीस घरांचेच खेडेगाव आहे. येथील उत्खननामध्ये मातीची भांडी, दगडाची भांडी, धातूची भांडी, देवीचे आणि यक्षिणीचे पुतळे, धातूंची यंत्रे, हत्यारे, सौंदर्यप्रसाधने, शिक्के इत्यादि अवशेष आढळून आले आहेत. देवींच्या सुमारे वीस प्रतिकृतीही मिळाल्या आहेत. मूर्तींची उंची सामान्यतः आठ इंचापेक्षा जास्त नाही.

एका ठशावर पुढील वर्णनाचे चित्र आहे. मूर्ति समोर मुख करून उभी आहे, मस्तकावरील केसांची मोठी गाठ बांधलेली असून त्याखालील केस चापूनचोपून बसविलेले आहेत, त्या गाठीवर फुलांच्या वेण्या असून मुखाच्या दोन्ही बाजूंना ताडाची तीन तीन फांद्या असलेली व त्याला फळे लागलेली झाडे उभी आहेत, कानाच्या खालच्या पाळयात दोऱ्याच्या रीळाच्या आकाराची वाटोळी कर्णभूषणे, उजव्या खांद्यावरून पुष्पमाला खाली सुटलेली आणि लाल रंगाने रंगविलेली, कमरेपासून घोट्याच्या खालवर लोंबत असलेल्या झग्याला क्षितिजसमांतर घड्या आहेत, त्याच्यावर कमरपट्टा, व दोन कर कमरेवर ठेवलेले आहेत. अशा वर्णनाच्या देवींचा तो ठसा आहे. सिनिवाली देवीचे हेच खरे स्वरूप होय असे रा. ब. दीक्षित यांचे मत आहे. झग्यावरील चुण्या, त्याचा पारदर्शकपणा, दागिन्यावरील कलाकुसर, ह्या गोष्टी त्या काळी कला किती उच्च कोटीला पोहोचली होती ह्याचे निदर्शक मानावयास हरकत नाही. (डॉ. पुरी, रायर उत्खनन ग्रंथ)

सिनीवाली कुहूरिति देवपत्न्याविति। (निरुक्त, ११-३१) सिनीवाली कुहू या देवपत्न्या आहेत असे निरुक्त सांगते, तर त्या अमावास्या आहेत असे याज्ञिक ब्राह्मण मानतात.

सिनीवाली देवी ही आदिशक्ति इला देवतेचे स्वरूप होय. इला व चंद्र ही पदे स्त्री अगर पुरुषवाचक म्हणून समजणे कठिण आहे, कारण ह्यांची दोन्ही रूपे दोन्ही लिंगामध्ये दिसून येतात. परदेशातील अमोराईट संस्कृतीत एल्, एलोहिम् व इलाह् हे देव आपली लिंगे बदलतात. पुराणकालीन एलवंश व सोमवंश ह्यांची प्रिय देवता इला ही सुद्धा आपले लिंग बदलते. इलाह् ह्या अरब लोकांचे देवीला इलाट अथवा अलाट अथवा अल्लाह् असे म्हणतात. संस्कृत भाषेत अल्ला, अक्का ही अंबेची रूपे म्हणून वर्णन केली आहेत. पाणिनी म्हणतात अकारान्त पुरुषवाचक नाव बदलून हे अल्लं, हे अम्ब, हे अक्क अशी वचने होऊ शकतात.

वरील विवेचनावरून असे दिसून येईल की, सिनीवाली देवीचे पवित्र दिवस अमावास्या व पौर्णिमा हे होत. याच कारणासाठी हिंदुधर्मात हे पवित्र दिवस मानले जातात. ह्या दिवशी दानधर्म करावा आणि स्त्री-संभोग करू नये असा निर्बंध घातला आहे. (एस्. के. दीक्षित-मदर-गॉडेस)

शिखरिणी

सिनीवाली देवी सुरस तव गाथा कथितसे।
नभींच्या चंद्रातें तव स्वरूप देवी वसतसे॥
तुला पौर्णिमेला आणिक अमवास्या द्वय-दिनीं।
अधिष्ठात्री देवी जन समजुनी पूजि जननी॥ १॥

अनुष्टुभ

वेणीच्या रम्य गांठीनें, नाम पावे सुकर्पदा।
शिरींच्या भव्य तेजानें, नाम शोभे सुकुरिरा॥
उत्कृष्ट अंगिच्या गात्रीं, स्वैपाशा वदति तुला।
रायर भामीं ही मूर्ती, नांदली सर्व लक्षणीं॥ २॥

वसंततिलक

चंद्रास लागती कळा फिरवां भरेला।
देवी दरेक वसली परि त्या कलेला॥

राका-कुहु-अनुमती असतील नावें।
दृष्टेंदु-काळीं सिनीवाली सदां वदावें ॥

वरील देवतांव्यतिरिक्त ऋग्वेदसंहिता सर्वानुक्रमखंड १२ यामध्ये खालील ब्रह्मवादिनी म्हणजे स्वतः ब्रह्म जाणणाऱ्या देवता असा उल्लेख आढळतो.

(१) इंद्राणी, (२) इंद्रमाता, (३) उर्वशी, (४) श्री, (५) गोधा, (६) घोषा, (७) जुहू, (८) दिति, (९) दक्षिणा, (१०) मेधा, (११) यमी, (१२) रोमशा, (१३) रात्री, (१४) लाक्षा, (१५) लोपामुद्रा, (१६) विश्ववारा, (१७) वाक्, (१८) नारी, (१९) शाश्वती, (२०) सरमा, (२१) श्रद्धा, (२२) सार्पराज्ञी, (२३) सूर्या, (२४) सावित्री

वरील २४ पैकी उर्वशी, दिति, रात्री, वाक् ह्यांचे वर्णन वर आलेले आहे बाकीच्या देवता महत्त्वाच्या न वाटल्याने त्यांचे सविस्तर विवरण केलेले नाही

# पौराणिक देवता

(१) श्रीदेवी,
(२) अंबिका,
(३) अभयदा,
(४) अमथेर माताजी,
(५) अलक्ष्मी,
(६) आनंदनायकी,
(७) उनाई माता,
(८) उमा,
(९) काळरात्री,
(१०) कुंडिका,
(११) कुळकुल्या,
(१२) कौशिकी,
(१३) कंकाळी,
(१४) गजांतलक्ष्मी,
(१५) गोत्रदेवी,
(१६) गौरी,
(१७) चंद्रवदनीदेवी,
(१८) चन्द्रघण्टा,
(१९) कूष्मांडिणी,
(२०) ब्रह्मचारिणी,
(२१) महागौरी,
(२२) सिद्धिदात्री,
(२३) स्कंदमाता,
(२४) शैलपुत्री,
(२५) चक्रपदी,
(२६) जगद्धात्री,
(२७) दुर्गा,
(२८) नीलसरस्वती,
(२९) पद्मावती,
(३०) प्रत्यंगिरा,
(३१) पार्वती,
(३२) पपावती,
(३३) बगळामुखी,
(३४) बळातिबळा,
(३५) भुवनेश्वरी,
(३६) महिषासुरमर्दिनी,
(३७) महाकाली,
(३८) महासरस्वती,
(३९) माखनदेवी,
(४०) मूकांबिका,
(४१) योगेश्वरी,
(४२) राखईदेवी,
(४३) वृंदा,
(४४) विद्यादेवी,
(४५) वैष्णवी,
(४६) शताक्षी,
(४७) वत्सलादेवी,
(४८) शिवदूती,
(४९) सहस्रकाळमाता,
(५०) सशा,
(५१) हुकारेश्वरी.

भारतीय इतिहासामध्ये साधनांची उणीव आहे, याची जाणीव पदोपदी होते. ह्यासाठी अनेक गोष्टी ऐतिहासिक दंतकथेवर अवलंबून ठरवाव्या लागतात, आणि सत्य मानाव्या लागतात. इतिहासकार अलबेरूनी म्हणतो, " हिंदु लोकांनी आपल्या इतिहासाकडे लक्ष न दिल्यामुळे त्यांना दंतकथेवर अवलंबून रहावे लागते " ( Alberuni in India, Vol II, page 10 ) आर्यांनी ही साधने उपलब्ध करून न ठेवण्याची अशी कारणे संभवतात—( १ ) त्या काळी लेखन-साहित्याचा तुटवडा होता, ( २ ) पाठांतर करून ग्रंथाचे जतन करण्याची रूढी पूर्वापार चालत आलेली होती, ( ३ ) आर्यांचे धार्मिक वातावरण इतके विशुद्ध होते की, त्यामध्ये असे काही करून ठेवण्याची त्यांना आवश्यकताच भासली नसावी इतिहासकार जेव्हा असे विरुद्ध प्रतिपादन करतात, तेव्हा असे म्हणावेसे वाटते की, ते आपल्या काळातील सद्य स्थितीवरून मागील काळाचे चित्र रेखाटीत असावेत विशेषत जे आर्येतर इतिहासकार आहेत, ते त्यांच्या स्वधर्मा पूर्वी दोन ते तीन हजार वर्षांपूर्वी आर्यांनी काय करावयास पाहिजे होते, ह्याविषयी

मत प्रतिपादन करतात पण ते बरोबर नाही. आर्यांच्या काही टोळ्या भारतामध्ये आल्या, त्याच वेळी काही पश्चिमेकडील देशात गेल्या. तेथेही इतिहासाची साधने म्हणून उत्खनन, नाणी ह्यांवर अवलंबून रहावे लागते. तेव्हा भारतीय आर्यांनी साधने न ठेवल्याबद्दल त्यांना दोष देण्यात विशेष अर्थ नाही.

इतिहासकाराचे असे मत आहे की, भारताचा इतिहास लिहावयाचा झाला तर त्याची काही साधने म्हणजे ऋग्वेद, ब्राह्मण्ये, उपनिषदे, सूत्रे, बुद्धाची जातके व पीटके, जैनांची कल्पसूत्रे, रामायण, महाभारत, पुराणग्रंथापैकी मत्स्य, वायु, विष्णु, ब्रह्मांड, भागवत इ०, पाणिनीची अष्टाध्यायी, हर्षचरित्र, रामचरित्र, कल्हणाची राजतरंगिणी इ० इ० उपलब्ध आहेत. ह्या ग्रंथांमध्येही व्यक्ति व काळ ह्यांच्या नामाभिधानामध्ये व कालवेळामध्ये फरक पडत असल्याने, संशोधन-कालाबद्दल निश्चित मत बनविणे कठीण जाते. ह्याशिवाय शिल्प, नाणी, ताम्रपट, शिलालेख ह्यांचाही अभ्यास करावा लागतो. भारतातील वरील साधनांव्यतिरिक्त ग्रीक, रोमन, चीन, तिबेट यांचा इतिहास, हिरोटोडस्, टॉलेमी, मेगॅस्थेनीस फा हियान, युवनस्वांग यांची प्रवासी वृत्ते, आणि मुसलमान बखरी, फेरिस्ता, सुर्वीसादिक, अमीर खुश्रु, महमदशाही इत्यादींच्या बखरीही पहाव्या लागतात. वरील साधनांवरून जे काही ज्ञान प्राप्त होईल त्यावर समाधान मानावे लागते. वरील साधनसंपत्तीवरून भारताचा ऐतिहासिक, सांस्कृतिक इतिहास लिहिता येईल, पण ती माहिती माझ्या विषयाला प्राय उपयुक्त नाहीच असे म्हटले तरी चालेल. एखादे वेळी आर्यांचे प्रमुख देव ब्रह्मा, विष्णु, महेश ह्यांचा उल्लेख त्यामध्ये मिळेल, पण शक्तिदेवतांबद्दल तो मिळत नाही हे मुद्दाम नमूद करावेसे वाटते. भारतीय इतिहासकारांनी हा दृष्टिकोन इतिहास लिहिताना वापरलेला नाही. कारण भारतीयांच्या शक्तिदेवतांबद्दल तेवढे औत्सुक्य त्यांना वाटत नसावे. तद्वतच आर्यांना साधने जपून ठेवण्याची गरज भासली नसावी. कारण पुढेमागे त्या साधनांची इतकी उपयुक्तता भासेल, इतकी त्यांची त्या काळी दूरदृष्टि नसावी ह्याशिवाय आणखी एक मुद्दा ध्यानात घ्यावयास पाहिजे, तो म्हणजे, इतक्या लांबलचक काळात, विशेषत परकीय अमलाखाली अनेक ठिकाणी धर्मस्थानांची सखेहोलपट झालेली असताना, ती नष्ट होण्याचाही संभव विचारा बाहेर ठेवता येणार नाही, किंबहुना नष्ट केल्याचे पुरावेही आहेत

वैदिक प्रकरणामध्ये आर्य भारतात केव्हा आले आणि पंजाबमध्ये प्रथम केव्हा स्थायिक झाले ते आपण पाहिलेले आहे लो टिळक म्हणतात तो काळ खिस्तपूर्व चार हजार वर्षांपूर्वीचा होता, तर इतिहासकार राधाकुमुद मुकर्जी म्हणतात, तो काळ २८०० वर्षांचा होता रामशंकर त्रिपाठींच्या मते तो काळ १६०० वर्षांचा होता. भारतीय विद्याभवनचा वैदिक इतिहास तो काळ २५००

वर्षांचा असे सांगतो. ह्याशिवाय आणखी अनेक मते आहेत, ती निराळीच. ह्यावरून एक निष्कर्ष निघतो की, आर्य भारतामध्ये केव्हा आले ते निश्चितपणे कोणी सांगू शकत नाही. सर्वांचा जुना आधार म्हणजे मोहेंजोदरो व हरप्पा येथील उत्खनने. सामान्यतः ह्याचा काळ २८०० ते २२०० वर्षे असा धरला जातो. काहींच्या मते ही सिंधुसंस्कृति होय. आर्यांची पहिली टोळी आली आणि तिचे त्यापूर्वीच्या द्रविडी, बाल्हिक व असूर लोकांबरोबर संभ्रमण होऊन ती तयार झाली. त्याचे शिल्पकार द्रविडियन, व्रात्य, पण्य, बाल्हिक, असूर, दस्यू व नाग हे लोक असावेत. आणि यानंतर म्हणजे खिस्ताब्द २००० वर्षांपूर्वी आर्य भारतामध्ये आले.

पण वरील विधान कसे सुसंगत दिसत नाही ते पहा. भारतीय विद्याभवन इतिहास ( भाग पहिला ) म्हणतो, " प्रलय कालानंतर एकटा मनु शिल्लक राहिला, आणि त्याने मानवजात व पशुपक्षी निर्माण केले. मनूला नऊ पुत्र होते आणि त्यांनी निरनिराळ्या ठिकाणी आपली राज्ये स्थापन केली. इक्ष्वाकु ह्याने अयोध्या येथे, नाभाग ह्याने गंगाखोऱ्यात, शर्यातीने अर्नातामध्ये, नाभोदिष्ट ह्याने वैशाली येथे, कारुष ह्याने मध्य भारतात रेवा-शोण नद्यांच्या विभागात, इत्यादि. इक्ष्वाकु वंशातील मनूची कन्या इला हिचा बुधाबरोबर विवाह झाला आणि त्याला पुरुरवस हा पुत्र झाला. ह्या ऐल वंशापासून पुढे कान्यकुब्ज यादव ( हैहय, अंधक, वृष्णिक ) तुवर्ष, द्रुह्यु, पांचाळ, चेदी, बृहद्रथ ही राजघराणी झाली. ऐल वंशाने खिस्ताब्द पूर्व ३०००–२७५० वर्षे राज्य केले. म्हणजेच ह्या काळाच्या आधी काही शतके मनु भारतात उपस्थित असला पाहिजे. कारण वरील सर्व राजघराणी ही आर्यांपैकीच असावीत. ऐलवंश हा चंद्रवंशीय होता. पुढे २५५०–२३५० पर्यंतचा परशुरामाचा काळ, २३५०–१९५० हा प्रभुरामचंद्राचा काळ; १९५०–१५०० हा श्रीकृष्णाचा काळ होय. त्यानंतर परिक्षित, जन्मेजय वगैरे राजांचा सहाव्या शतकापर्यंतचा काळ गेल्यावर ५८३ मध्ये भगवान बुद्धाचा जन्म झाल्यावर बौद्ध काळ मानला जातो.

याचाच अर्थ असा की, भारताच्या पूर्व भागात परशुराम, रामकाळ आगेकूच करीत असता, पंजाबप्रांती मात्र सिंधुसंस्कृतीच होती. इतिहास असे म्हणतो की, ह्या संस्कृतीने सिंध, पंजाब, सौराष्ट्र, नायव्य प्रदेश व गंगा खोऱ्यातील काही प्रदेश व्यापलेला होता. म्हणजे सिंधुसंस्कृति आणि मनुपुत्र नाभाग ह्याचे गंगाखोऱ्यातील राज्य ही एकमेकांजवळ होती. भारतीय युद्ध खिस्ताब्द पूर्व १५२५ साली झाले हा इतिहासकारांचा सर्वमान्य सिद्धांत दिसतो. महाभारतकार चिंतामणराव वैद्य याचे मत तर असे आहे की, श्रीकृष्णाचा जन्म शकपूर्व ३२६१ साली श्रावण वद्य अष्टमीला, रोहिणी नक्षत्रावर बुधवारी झाला.

पाच कारणासाठी पंढरपूर क्षेत्रामध्ये विठ्ठलाचा दिवस म्हणून बुधवार पाळला जातो. " जाशील बुधी तर येशील कधी " ही म्हण याचसाठी प्रचारात आली आणि श्रीकृष्णाचे प्रयाण जसे मथुरेला या दिवशी झाले व परत तो आला नाही, त्याप्रमाणे माणसाचे जाणेही त्या दिवशी निषिद्ध मानले आहे. ३२६३ + १८८८ = ५१५१ (सन १९६६ सालचा हा हिशेब आहे) वर्षे त्याच्या जन्माला झाली. १८ व्या वर्षी त्याने कंसवध केला, २५ व्या वर्षी रुक्मिणी बरोबर विवाह झाला, वयाच्या ८३ व्या वर्षी भारतीय युद्ध झाले आणि १२५ व्या वर्षी अवतारकार्य संपविले. या सर्वांचा अर्थ असा की, भारतीय युद्ध शक पूर्व ३१८० साली झाले आहे (मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड १, ले. पांगारकर, पृ. ३२८)

एहोळ (विजापूर) येथील दुसऱ्या पुलकेशीच्या एका शिलालेखात म्हटले आहे की, ३७३५ इतका कलिकाळ मागे पडला असता व शकाची ५५६ वर्षे होऊन गेली असता हा लेख लिहिला गेला याचाच अर्थ शालिवाहन शकापूर्वी ३१७९ या वर्षी भारतीय युद्ध झाले. जेसलमीर येथील शिलालेखावरून हेच गणित येते.

या पार्श्वभूमीवर खिस्ताब्द पूर्व १५२५ हा आकडाही खरा मानता येत नाही. तेव्हा अशा पार्श्वभूमीवर रामशंकर त्रिपाठी जेव्हा म्हणतात की, आर्य भारतात १६०० वर्षांपूर्वी आले, तेव्हा या विधानावर कसा विश्वास ठेवावा हेच कळत नाही. त्रिपाठी यांनी जो काल ठरविला, तो पाश्चिमात्य संशोधकाच्या मताप्रमाणे ठरविला एवढे नमूद केले म्हणजे पुरे. असो, हे त्रोटक विवेचन करण्याचा उद्देश एवढाच की, येथेही एकवाक्यता नाही आधुनिक संशोधक म्हणतात हा काळ पाच लक्ष वर्षांपूर्वीचा आहे.

पंजाबभोवती स्थायिक झाल्यावर आर्यांनी वेदरचना करण्यास सुरुवात केली आपापसातील सत्तास्पर्धेमुळे मतभेद वाढीस लागले आणि आर्य अनेक गोत्रांमध्ये विभागले गेले. प्रसंगकाळी त्यांना अनार्यांबरोबर युद्धे करावी लागली परुष्णी नदीवरील युद्ध ह्याची साक्ष देते ह्या युद्धामध्ये सुदास ह्या पूर्वकालीन भारत राजाने विश्वामित्र ऋषीच्या आधिपत्याखाली असलेल्या आर्यांच्या १० टोळ्यांचा पराभव केला. प्रसंगकाळी दस्यूबरोबर अनेक लढाया झाल्याचा उल्लेख वेदामध्ये मिळतो त्या वेळी आर्य युद्धशास्त्रात पुढारलेले होते युद्धसमयी ते चिलखत (वर्म), रथ, लोखंडी शिरस्त्राण (शिप्रा), धनुष्य-बाण, भाला, कुऱ्हाड, तरवारी इ० शस्त्रे वापरीत असल्याने त्यांच्यापुढे अनार्यांची डाळ शिजेना. सैनिकांना स्फूर्ति देण्यासाठी ते रणदुंदुभि वाजवीत असत आर्यांच्या टोळ्या

ह्याप्रमाणे पराक्रम करीत व भूभाग पादाक्रांत करीत मगध, विदेहापर्यंत पोहोचल्या आणि राज्यस्थापना केली. (याचाच अर्थ आर्यांची पहिली टोळी पुढे आली असावी, असे जे एक मत आहे ते बरोबर दिसते). साहजिकच पंजाबमधून विद्येचे क्षेत्रही बदलून ते कुरुक्षेत्र, मैथिली, काशी, कौसंबी ह्या ठिकाणी आले.

खिस्ताब्द पूर्व २५५० ही परशुरामकाळाची सुरुवात धरली, तर त्याआधी वामनाचा काळ येतो. त्या वेळी शुक्राचार्यांसारखे तपोधन ब्राह्मण आणि बळीसारखा कर्तृत्ववान व दातृत्ववान राजा अस्तित्वात होता. बळीचा पाडाव करण्यासाठी वामनाला (आर्य) त्याला फसवून पाताळापर्यंत न्यावे लागले. परशुरामाची "पृथ्वी निःक्षत्रिय करण्याची" प्रतिज्ञा म्हणजे एका तऱ्हेने अनार्यांचे उच्चाटणच होय. आणि आर्यांचे अधिष्ठान स्थापन करण्याचा प्रयत्न होय. राधाकुमुद मुकर्जी म्हणतात, "रामायणाचा कथाभाग म्हणजे आर्य-अनार्य ह्यांच्या लढाया होत, किंवा अनार्यांवर आक्रमण म्हणता येईल." (प्राचीन भारत, पृ. ५५). दशरथ-पुत्र रामाने वनवासाच्या निमित्ताने आर्यांचे प्रसरण चालविले आणि अनेक वन्य जमातींची सहानुभूति मिळवून (शबरी भिल्लीणीची कथा) व काहींचे निर्दालन करून (वालीची कथा) लंकेपर्यंत मजल मारली. त्या वेळी जनस्थान हे रावणाचे संरक्षण-व्यवस्थेमधील एक टेहळणीचे ठिकाण असावे आणि तेथील ठाणेदाराचा (ताटिका वध) बीमोड केल्यामुळे चिडून जाऊन रावणाने रामाची पत्नी सीता हिचे हरण केले असावे. इतिहासकारांनी जरी ह्या काळाचे संपूर्ण विवेचन केले नसले तरी शक्तिदेवतांची उत्पत्ति ह्याच वेळी झाली असली पाहिजे. असुरांमध्ये रावणासारखा पराक्रमी ब्राह्मण, शंखचूड, भंडासूर, मयासूर, तारकासूर, त्रिपुर यांसारखे एकापेक्षा एक महान पराक्रमी वीर होते. त्यांचा देव शंकर. ह्याची उपासना करून ते इच्छित वर घेत असत आणि आक्रमणाला तोंड देत असत. आर्यांना ह्याच वेळी शक्तिदेवतांची गरज भासली असली पाहिजे. ह्या वेळी देवतांची प्रसंग-अनुरोधाने उत्पत्ति झाली. इतिहासकारानी इतिहास ह्या दृष्टिकोनातून लिहिलेले नसल्याने देवतांची नावं त्यात आढळत नाहीत इतकेच.

वरील विधानाला आधारभूत म्हणून असे दाखविता येईल की, मध्य-आशियातील उत्खननामध्ये सापडलेले देवतांचे पुतळे आणि शिक्के ह्यांचा काळ साधारणतः खिस्ताब्द पूर्व ३००० ते २५०० वर्षांचा धरला जातो. आर्यांच्या काही टोळ्या भारतामध्ये आल्या आणि त्याच वेळी काही मध्य आशियात इजिप्त भागाकडे वळल्या हे इतिहासकार मानतात. तेव्हा तिकडील देवतानिर्मितीचा काळ आणि भारतामधील काळ समान असावा असे दिसते.

ह्यानंतर कौरवपांडवांचा काळ. ह्या वेळी उत्तर भारतात अनेक लहान लहान राज्ये आसामपासून काबूल-कंदाहारपर्यंत पसरलेली होती. म्हणजेच सर्व

उत्तर भाग आर्यांच्या आधिपत्याखाली होता. भारतीय युद्धामध्ये ज्या अनेक राजांनी भाग घेतला, त्या सर्वांची नावे उपलब्ध आहेत. त्यामध्ये हिमालया-पलीकडीलही एक राजा होता. आसामचा भागदत्त होता असे महाभारत सांगते. देवतापूजन त्या वेळी चांगलेच अस्तित्वात होते. कारण युद्धाला निघण्यापूर्वी अर्जुनाने कालीदेवीची स्तुति केली, स्थापना केली, ह्याची दिल्लीमधील कालीदेवीचे मंदिर साक्ष देते. भागदत्त हा नरकासुराचा मुलगा आणि नरकासुर हा कामाख्या देवीचा मोठा भक्त होता. देवीसाठी त्याने मंदिर व पायऱ्या बांधल्याचा पुरावा मिळतो. आर्यांची यज्ञसंस्था त्या वेळी आकुंचन पावलेली नव्हती. द्रौपदीचा जन्म एका यज्ञकुंडातून झाला. पांडवांनी राजसूय, अश्वमेध यज्ञ केले, याची महाभारतही साक्ष देते. म्हणजेच शक्तिपूजा जरी अस्तित्वात होती, तरी यज्ञसंस्थेचे महत्त्व कमी झालेले नव्हते.

इतिहासकार आर. सी. मुजुमदार म्हणतात की, भारतीय युद्ध संपल्यानंतर १५००–१००० ह्या कालावधीत व्यासांनी इतस्ततः पसरलेल्या वेदांच्या ऋचांचे एकीकरण केले आणि रचना पूर्ण केली. त्यानंतरच्या चारशे वर्षांच्या काळात रामायण, महाभारत व ब्राह्मणे (ज्यामध्ये यज्ञसंस्थेचे महत्त्व वर्णन केलेले आढळते.) ही तयार झाली त्यानंतर अरण्यके ( म्हणजे अरण्यात आश्रम बांधून त्यामध्ये बसून एकाग्र चित्ताने अध्यात्ममार्गाचे चिंतन करणे ) ही लिहिली गेली. पुढे यथावकाश यज्ञसंस्थेचे महत्त्व कमी होत गेले, कारण बहुधा राजशासनाचा आश्रय तुटला असावा. त्यानंतर ज्यांचा कल ज्ञानमार्गाकडे वळला त्यांच्याकडून उपनिषदे लिहिली गेली. सातव्या शतकात पाणिनीने अष्टाध्यायी लिहीली. त्यानंतर गौतम (पाचवे शतक ) याज्ञवल्य, आपस्तंभ ( चौथे शतक ) आणि वसिष्ठ ऋषींचा काळ इतिहासकार देतात. येथे पुन्हा मन साशंक होते. कारण रामाचे गुरु वसिष्ठ ऋषि होते असे रामायण सांगते. आणि तो काळ तर कितीतरी मागचा हे आपण वर पाहिलेच आहे. मग चवथ्या, पाचव्या शतकातील वसिष्ठ ही व्यक्ति कोणी निराळीच होती याचा खुलासा इतिहासकार देत नाहीत. संशोधक मॅकडोनॉल्ड ह्यांच्या मते गौतमधर्मसूत्रे, विष्णुधर्मसूत्रे, मानवधर्मसूत्रे याज्ञवल्क्यस्मृति, नारदस्मृति, इतकेच नव्हे तर रामायण, महाभारतही याच काळी म्हणजे चवथ्या, पाचव्या शतकात लिहिले गेले. ह्यावरून असा निष्कर्ष काढावा लागेल की, देवीभागवत व इतर पुराणे, ज्यामध्ये देवता असुर ह्यांची युद्धे वर्णन केलेली आहेत, ती ह्याच काळची असावीत. त्याचे लिहिणे इ. स. आठव्या शतकापर्यंत चालू होते असे श्री. दातार नावाचे टीकाकार म्हणतात.

श्री. त्रिपाठी आपल्या इतिहासामध्ये लिहितात, "पुराणामध्ये गुप्तराज-वंशाचा उल्लेख आढळतो. त्यावरून त्याची पुनर्रचना त्या सुमारास झाली असावी"

(प्राचीन भारत, पृष्ठ २७३). अठरा पुराणे व्यासांनी लिहिलेली नाहीत. व्यास ही एक संज्ञा होती. एकूण २८ व्यास होऊन गेले असा उल्लेख देवीभागवतामध्ये मिळतो (१ स्कंद, ३-२४)

श्री. दातार म्हणतात, "आठव्या शतकात सर्व पुराणांची पुनर्रचना झाली, आणि ज्यांमध्ये श्लोकसंख्या कमी आढळली, त्यामध्ये इतर पुराणांतून भरती करून, सर्वांची लांबी साधारणपणे सारखी करण्यात आली." ह्याचा अर्थ पुराणे लिहिण्याचे काम आठव्या शतकापर्यंत चालूच होते प्रत्येकजण आपापल्या बुद्धीनुसार त्यामध्ये भर घालीतच होता. याचकरिता भविष्यपुराणामध्ये मोगल बादशहाचाही उल्लेख मिळतो. मुंबई येथील मुंबादेवीचा इतिहास पाहताना मुबारकदैत्याचा उल्लेख मिळतो. परंतु हा मुबारकदैत्य म्हणजे दौलताबाद येथील खिलजी घराण्याचा कोंकणप्रांतीय सुभेदार मुबारकखान होता, असे इतिहास सांगतो.

हे विस्तृत विवेचन करण्याचे कारण इतकेच की, देवतांच्या उत्पत्तीसंबंधी इतिहासकार अधिकृत माहिती देत नाहीत, पुराणे विश्वसनीय मानावयाची नाहीत, मग माझ्या विषयाला आधारभूत म्हणून माहिती मी कोठून घ्यावी? इतिहासा प्रमाणे सत्य माहिती म्हणून कोठून नमूद करावी? तेव्हा प्राप्त परिस्थितीत देवता उत्पत्तीच्या अगर माहितीच्या दृष्टीने ज्या काही कथा उपलब्ध झाल्या आहेत (मग त्या लेखी नमूद केलेल्या असोत, अगर वर्षोवर्षे चालत आलेल्या दंतकथा असोत), त्या तशाच ह्या ग्रंथामध्ये दिलेल्या आहेत त्यांना सत्याच्या निकषाची चाळण लावता आलेली नाही, एवढेच वाचकांनी ध्यानात धरावे.

बौद्धधर्मीय बनली, व प्रचारक झाली. आर्यधर्माच्या तत्त्वज्ञानाचा पाडाव झालेला दिसतो. अनेक अनुयायी ह्या नवीन पंथांना मिळाले, याचे कारण तत्कालीन परिस्थितीच म्हणता येईल.

रा. कन्हैय्यालाल मुनशी इतिहासाच्या प्रस्तावनेत म्हणतात, “ खिस्तान्द ६०० ते १५० वर्षांच्या काळ म्हणजे पाणिनी, मनु, कात्यायन, पतंजलि, भास, नारद, बृहस्पति आणि याज्ञवल्क्य यांचा काळ होय,” (भाग दुसरा, पृ. २०). ते पुढे म्हणतात, “ ह्या वेळी हिंदुवर्णाश्रमधर्माचे स्थैर्य झपाट्याने कोलमडत होते आणि ते सावरण्यासाठी विष्णु, लक्ष्मी, वासुदेव, कृष्ण इत्यादि प्रमुख देवतांच्या पूजनाची प्रतिक्रिया चालू झाली. सामान्य जनतेच्या पातळीमध्ये मात्र पूर्वीच्याच लहान लहान देवतांची पूजा सुरू होती.” (पृष्ठ २२). महिषासुरमर्दिनी देवीची पूजा ह्याच सुमारास अधिक प्रमाणात सुरू झाली. दक्षिण भारतामध्ये द्रविडियन संस्कृतीचे देव, शिव, उमा, गजलक्ष्मी, मुरुगन (स्कंद), विरूपाक्ष, पशुपति, वृषकपि (हनुमान) यांची पूजा चालू होती. ह्या काळापासूनच इतिहासकाळाचा प्रारंभ झाला असे त्याचे मत आहे. ह्या काळाचा दुसरा टप्पा सन १५० ते ३०० पर्यंत आणि तिसरा टप्पा ते सन ३०० ते ६०० असा धरतात. सर्वसाधारणपणे असे विधान करण्यास हरकत नसावी की, तिसऱ्या काळाच्या अंतापर्यंत देवता-निर्मिती पूर्ण झालेली होती, आणि अनेक शक्तिपीठामधून शक्तिदेवतांची पूजा चालू होती. यज्ञसंस्थाचे महत्त्व संपलेले होते.

बौद्धकाळात उत्तर भारतामध्ये मौर्य, शुंग, कुशान, हर्षवर्धन गुप्त इत्यादि राजवटी बहुधा बौद्धधर्माला प्राधान्य देणाऱ्या असल्यामुळे व बौद्धधर्म हा वेदप्रणीत नसल्याने आणि आर्यांच्या शक्तिदेवतांना मानीत नसल्यामुळे उत्तर-भारतात शक्तिदेवतांची वाढ व्हावी तशी झालेली नाही. पण दक्षिणभारतामध्ये बौद्धधर्माचे प्राधान्य नव्हते, आणि चालुक्य व पल्लव राजवंश हे शक्तिदेवतांचे उपासक असल्यामुळे महिषासुरमर्दिनीसारख्या शक्तिदेवतांची वाढ या काळात झालेली दिसून येते. दक्षिणभारतातील हे द्रविडियन राजवंश बहुधा सिंधुसंस्कृतीच्या काळी दक्षिणेकडे सरकलेले असावेत आणि आपली सत्ता स्थिरस्थावर करण्यासाठी, स्थानिक वन्य अथवा असुर जमातींबरोबर संघर्षाच्या काळी त्यांना शक्तिदेवतांची गरज भासलेली असावी.

आठव्या शतकात आद्य शंकराचार्यांचे आर्यधर्मप्रसाराचे कार्य बहुंशी उत्तर भारतातच झालेले दिसून येईल कारण त्या ठिकाणी बौद्धधर्माचा पगडा अधिक प्रभावी होता. आणि यासाठी, जगन्नाथपुरी, द्वारका, बद्रिकेदार या क्षेत्री मठांची स्थापना करून त्या ठिकाणी शक्तिदेवतांचे पूजन चालू करावे लागले.

या देवतापूजनात वाढ होण्याचे आणखी एक कारण असे देता येईल की, जनसमुदायाच्या दुःखाचे निवारण करण्यासाठी देवी म्हणते, "मी पुन्हा पुन्हा अवतार घेत असून, दैत्यांचा नाश करणार आहे." श्रीकृष्ण गीतेमध्ये ज्याप्रमाणे आश्वासने देतात की, 'धर्मग्लानी झाली म्हणजे मी पुन्हा पुन्हा अवतार घेतो.' तद्वतच आर्त भक्ताना हे आश्वासन मिळत गेल्यामुळे शक्तिपूजा वाढली. शिवाय आर्यांचे इतर देव ब्रह्मा, विष्णु, अर्यमा, इंद्र यांचे कार्य संपलेले होते, आणि शत्रूंचा समाचार घेण्यासाठी लोकांना शक्तिदेवता पाहिजे होत्या. दैवीशक्तीचे पाठबळ आपल्या कार्यात त्यांना हवे होते. ते ह्या पूजनाने त्यांना मिळत होते, म्हणून शक्तिदेवता पुढे आल्या. शिवाच्या आठ स्वरूपांपैकी काही घोर व काही अघोर, तद्वतच शक्तिदेवीची काही स्वरूपे गौरी, पार्वती, उमा, भवानी, अन्नपूर्णा ही शांत, तर चामुंडा, काली, कात्री, दुर्गा, चंडा, कात्यायनी, भद्रकाळी, भैरवी, कांतारवासिनी ही उग्र होत. उग्र रूपांची पूजा उग्र मार्गाने केल्यावर त्वरित फळ मिळते अशी श्रद्धा वाढल्याने या देवतांना पशुबलीच काय, पण नरबलीसुद्धा अर्पण करू लागले. मुसलमानांच्या काळी रजपुताना शक्तिदेवीची पूजा करण्याची गरज भासली. तोच वारसा मराठ्यांचा पहिला राजा शिवछत्रपतींने चालविला, आणि प्रत्येक महत्त्वाच्या प्रसंगी देवीचा कौल घेऊनच तो पुढे पाऊल टाकी, हे प्रतापगडच्या अफजुलखानवधाच्या प्रसंगावरून दिसून येते.

यानंतरचा काळ म्हणजे भारतातील अनेक राजघराण्यांचा इतिहास होय. ह्यामध्ये मौर्य, शुंग, सातवाहन, शक, हूण, कुशान, गुप्त, वाकाटक, राष्ट्रकूट, हर्ष, कळचुरी, चालुक्य, यादव, शिलाहार, पल्लव, पांड्य इ० इ० घराण्यांचा समावेश होतो. कनिष्काने पामीर ओलांडून काशगरपर्यंत मुलूख जिंकला. या काळात बुद्ध-विहारांची उभारणी, स्तूप-उभारणी, मंदिर-बांधणी आणि गुहा खोदणे ही कामे झाली आहेत.

ऐतिहासिक साधनांवर जर चौफेर नजर टाकली, तर असे दिसून येते की, एके काळी भारतीय राजांचे साम्राज्य पूर्वेस जावा-सुमात्रा-बालीबेटापर्यंत, तर पश्चिमेस बाल्टिक समुद्र, इराण, अरबस्थानपर्यंत पसरलेले होते. इराणचा राजवंश पेहलवी हा २६०० वर्षे चालू असून, वसिष्ठ-विश्वामित्रसंघर्षामध्ये त्याचा उल्लेख आलेला आहे. हा सूर्यवंशीय क्षत्रीय राजा होय. बाल्हिक, इराण, अरबस्तान येथपर्यंत विक्रमाचे राज्य होते, असे अरबी ग्रंथावरून पु. ना. ओक प्रतिपादितात. काबूल, कंदाहार, गांधार हे भारतीय प्रदेश होते. मुसलमानधर्माचा उदय होईपर्यंत हे सर्व चालले होते. नंतर क्रमाक्रमाने एक एक देश भारसाला मुकला.

सातव्या शतकात या मुस्लीम-संस्कृतीचा उदय झाला आणि पुढच्याच शतकात मीर कासीमने सिंध प्रांत जिंकला आणि पुढे मुल्तानपर्यंत मुसंडी

मारली. बाप्पा रावळ व इतर रजपूत राजे यांनी जोरदार प्रतिकार केला, म्हणूनच भारत पूर्णपणे यावनी झाला नाही. परन्तु त्या संस्कृतीने जशी घोडदौड स्पेन-पर्यंत केली, तीच अवस्था प्राप्त होत होती. अकराव्या शतकात गझनीच्या महमदाने पचवीस-तीस वर्षांचे काळात भारतावर स्वाऱ्या केल्या. शेकडो मंदिरे फोडली, हिंदूंच्या कत्तली केल्या, आणि सुमारे दहा सहस्र हिंदूंचे धर्मांतर केले. इतकेच नव्हे तर सहस्रावधी हिंदु स्त्रियांची परदेशात दासी म्हणून विक्री केली. त्यानंतर दीडशे वर्षांनी सन ११७६ पासून पुढे महमद घोरीने पाच-सहा स्वाऱ्या केल्या. पृथ्वीराजसारख्या रणशूराला कैद केले, कनोजचा जयचंद राठोड गारद केला, काशीविश्वेश्वर फोडला, त्यावर मशीद उभारली, आणि अपरंपार लूट नेली. कुतुबुद्दीन ऐबक आणि शमसुद्दिन अल्तमश हे मूळचे गुलाम, पण कर्तबगारीने उच्चपद पावले. सन ११९७ साली कुतुबुद्दीनने गुजराथवर स्वारी केली, वीस सहस्र हिंदूंची कत्तल केली. नंतर पाटण, अनहिलवाड जिंकून सर्व गुजराथ मुसल्मानी अमलाखाली आणला. सन १२०२ साली याच ऐबकने कलिंजर किल्ला घेतला. मंदिरे पाडून मशिदी उभारल्या, आणि ५० सहस्र हिंदूंना गुलाम करून सोडले. त्याच साली बख्त्यार खिल्जीने बंगाल, बिहार जिंकले, विक्रम-शील विद्यापीठाची राखरांगोळी केली सर्व बौद्ध मठालय भस्मसात केले, आणि सहस्र बौद्ध भिक्षूंची कत्तल केली याच सुमारास अल्तमश सुल्तानाने ग्वाल्हेरचा किल्ला जिंकून घेतला, आणि सहस्रावधी स्त्रियांना जोहार पत्करावा लागला सन १२३४ साली त्याने पुन्हा विदिशा ( भेलसा ) नगरीवर स्वारी करून, शहर व मंदिरे यांचा पूर्ण विध्वंस केला. तेथून पुढे उज्जयनी येथे जाऊन महाकाळाचे देवालय फोडले, आणि विक्रमादित्याची मूर्तीही फोडली.

याप्रमाणे उत्तर भारत यावनी झाल्यावर आता दक्षिणेची पाळी आली. देवगिरीचे यादव, हळेबिडचे होयसळ यादव, मदुरा येथील पाण्ड्य आणि वरंगळचे काकतीय यांचा क्रमाक्रमाने नाश करण्यात आला. सन १२९४ साली प्रथम देवगिरीवर अल्लाउद्दीन खिलजीने स्वारी केली व लूट नेली. दहा वर्षांनी मलीक कफूर आला, त्याने वरील अनेक राजांचा पाडाव करून थेट रामेश्वर गाठले आणि तेथे मशीद उभारली. याचे वैशिष्ट्य असे की, हा प्रथम अस्पृश्य होता, पण परजातीत गेल्यावर मानमरातब पावला आणि हिंदूंच्याच नाशास कारणीभूत झाला. सन १३०३ साली अल्लाउद्दीनाने चितोड घेतला. त्या वेळी रतनसिंह रावळ मारला गेला, आणि त्याची राणी पद्मिनी हिने सहस्रावधी स्त्रियांसह जोहार पत्करला. चितोडवरील शेवटची स्वारी अकबराने केली आणि अनेक मंदिरांचा विध्वंस केला, व लूट नेली. सन १३३९ चे सुमारास शहामीरने काश्मीर घेतला आणि अनेकांचे धर्मांतर केले वर म्हटल्याप्रमाणे मलीक कफूरने

सन १३०९ साली वरंगळ येथील काकतीय राजावर स्वारी केली, प्रतापरुद्राचा पराभव केला, आणि अमाप लूट नेली. दोन वर्षांनी तो पुन्हा दक्षिणेत आला, द्वारसमुद्रापर्यंत त्याने धडक मारली. वीरबल्लाळला जिंकले, आणि मदुरेचे पाण्ड्य राजाला लोळविले. सन १२९४ पासून १३३६ पर्यंत खिलजींने दक्षिणेवर वीस स्वाऱ्या केल्या, पण एकदाही त्याचा पराभव कोणी केला नाही.

विजयनगर साम्राजाची स्थापना विद्यारण्यस्वामींनी हरिहर व बुक्क यांच्या हस्ते केली. पण तोही एक हिंदुसंस्कृतीच्या भाग्यकाळाचा योगायोग होय. त्याचे कारण असे की, साम्राज्याचे हे संस्थापक पूर्वी कंपिलदेव राजाच्या पदरी सरदार होते. धारवाड, बेल्लारी, रायचूर भागात हे राज्य होते. महमंद तघलखाने हे बुडविले, आणि राजासह अनेक सरदारांना कैद करून दिल्लीला नेले. तेथे त्यांचे धर्मांतर केले. काही काळाने हरिहर व बुक्क यांची दक्षिणेत सुभेदार म्हणून नेमणूक केली. या वेळी हिंदूंच्या बलवत्तर दैवाने त्यांची व विद्यारण्यस्वामींची भेट होऊन, दूर दृष्टीने स्वामींनी त्यांना शुद्ध करून पुन्हा हिंदु धर्मात घेतले, आणि राज्यसंस्थापक बनविले. ही व्यापक दृष्टि नसती तर मलीक कफूरप्रमाणे हे सरदारही हिंदूंच्या नाशाला कारणीभूत झाले असते. सुमारे तीनशे वर्षे या साम्राज्याने पुढे यावनी सत्तेबरोबर यशस्वी टक्कर दिली. कृष्णदेवराय व रामदेवराय हे दोघे कर्ते पुरुष या वंशात निपजले आणि त्यांनी संस्कृतीची वाढ केली. शेवटी १६५२ चे सुमारास या साम्राजाचा अंश व्यंकट आणि श्रीरंग यांचा नाश मीरजुमला, मुस्तफाखान आणि शहाजी राजे भोसले, या विजापूरच्या सरदारांनी केला. या वंशात रामराजा हा एकमेव राजा असा दिसतो की, आदिलशहा व कुतुबशहाच्या मदतीने त्याने अहमदनगरवर स्वारी करून यावनी संस्कृतीची मानचिन्हे व मशिदीची मोडतोड केली, स्त्रियांची विटंबना केली, आणि कुराणाचाही अपमान केला. पुढे या कृत्यामुळे राक्षसतागडी येथे त्याचा यवनांनी पराभव केल्यावर, त्याचे अतिशय हाल हाल झाले.

सुमारे एक सहस्र वर्षांचा धावता आढावा घेण्याचे कारण इतकेच की, यावनी आक्रमणाचा एवढा अफाट मारा हिंदुराज्यावर होत असतानाही आदिशक्तीची उपासना या काळात वाढली नाही. कोणत्याही राजाने, संताने अथवा देवी उपासकाने त्याची तीव्र जाणीव करून दिली नाही. अर्थात् ही राज्ये कोलमडण्यास हिंदुराजांचे आपसातील वैर, असुया, द्वेषभेद कारणीभूत होते. अजमीर, मारवाड, जोधपूर, जयपूर येथील रजपूत राजांनी सामुदायिक प्रतिकार कधीच केला नाही. तीच स्थिति, देवगिरी, वरंगळ, पाण्ड्य येथील राजांची होती. उत्तराच्या दातखात शिवाजी राजे देवीभक्त निपजले आणि पुढे हिंदूंचा उदयकाळ आला.

भारतात ज्या गुहा अगर लेणी अनेक ठिकाणी विखुरलेली आहेत, त्यांची विभागणी बौद्धकाळ, ब्राह्मणकाळ व जैनकाळ ह्यामध्ये करतात. म्हणजे ह्याचा अर्थ, त्या गुहा त्या त्या वेळी खोदल्या गेल्या. ही लेणी कोणी खोदली हे तेथील देवतांच्या स्वरूपावरून ठरवितात. कार्ले, वेरूळ ह्या ठिकाणी बौद्ध देवता, घारापुरी, कान्हेरी या ठिकाणी ब्रह्मा-विष्णु-महेश-कार्तिकेय, तर इतर ठिकाणी जैनांच्या देवता आढळतात. काही ठिकाणी दुर्गा, उमा, पार्वती या देवतांशिवाय इतर देवतांचा उल्लेख आढळत नाही. इतिहास हा व्यक्ति, राजघराणी, लढाया ह्यावर भर देऊन लिहिलेला असल्याने देवतांचा उल्लेख मिळत नाही. कुशान, दंतिदुर्ग, चंद्रगुप्त, हर्षवर्धन या राजांनी नाण्यांवर काही देवींची चित्रे टाकली आहेत. हर्षवर्धनाने तर २०० मंदिरे बांधली, पण त्यामध्ये शक्तीचे मंदिर असल्याचा उल्लेख नाही. वि. का. राजवाडेकृत महिकावतीची बखर २५० पानांची आहे, परंतु त्यामध्ये तेथील प्राचीन महिकावती देवीचे नावदेखील आढळून येत नाही. कारण कोणीही तो दृष्टिकोनच वापरलेला नाही. एक ह्याला अपवाद भारतीय विद्याभवनच्या इतिहासाचा होय, भाग तिसऱ्यात, ४३१ ते ४४१ ह्या पृष्ठांवर या शक्तिदेवतेच्या प्रकारासंबंधी विवरण आहे.

आणखी एक उदाहरण पहा. मुकर्जींचा प्राचीन भारताचा इतिहास हा मामुख्याने सांस्कृतिक दृष्टिकोनातून लिहिलेला आहे. लोकांची राहणी, धंदा, व्यापार, धार्मिक स्थित्यंतरे इत्यादि माहिती त्यामध्ये मिळते. हा ग्रंथ प्रमाण मानला जातो. वेदोत्तर काळातील वस्तुस्थितीचे वर्णन करताना ते म्हणतात, "विदेहाचा राजा जनक ह्याने आठ तत्त्वज्ञानी पंथांचे विद्वान एकत्र जमविले, त्यांत गार्गीही होती. त्यांची त्याने परिषद भरविली. चर्चेनंतर याज्ञवल्क्य श्रेष्ठ ठरले. त्यामुळे त्या वेळच्या रिवाजाप्रमाणे त्यांना एक सहस्र गायी, ज्यांच्या शिंगांना पाचपाच सुवर्ण निष्क बांधलेले आहेत, अशा देण्यात आल्या. सर्व गायी शिष्यांनी आश्रमात नेल्या. येथे एका निष्काची किंमत २० रु. धरली तर १००० × १० = १०,००० × २० = २,००,००० रु. इतकी त्या सुवर्णांची किंमत झाली. म्हणजे इतक्या किंमतीचे सुवर्ण दिले. याशिवाय गाईंची किंमत निराळीच ! म्हणजे सध्याच्या काळातील हे नोबेल पारितोषिक म्हणावयास हरकत नाही !!" (प्राचीन भारत, पृष्ठ ८३.)

येथे जनक कोणता ह्याचा उलगडा होत नाही. प्रभुरामचंद्रांचे श्वशुर जनक की कोणी आधुनिक जनक होते ह्याचा उलगडा इतिहासकाराने केलेला नसल्याने वाचक साशंक होतो. कारण, वसिष्ठ-गौतमादि ऋषींना त्यांनी सहाव्या शतकापर्यंत खाली आणलेले आहे. रा. मुनशीही म्हणतात, "याज्ञवल्क्य हा

सहाव्या शतकातील होय." म्हणून अर्थाचा पूर्ण उलगडा होत नाही. खालील विवेचन पहा :—

विदेहाचा राजा जनक हा ब्रह्मवेत्ता होता आणि तो याज्ञवल्क्य व श्वेतकेतु याचा समकालीन होता असा उल्लेख मिळतो. तैत्तिरीय उपनिषदात याचा उल्लेख येतो ( ३–१०–९ ). शतपथ ब्राह्मणातही तो उल्लेख मिळतो. या जनकाचे नाव दैवराती असून श्रीरामाचा श्वशुर तो हाच होय. तरी पण विष्णु, ब्रह्मांड, पद्म पुराणांत सीतेचा पिता जनक याचे नाव सीरध्वज होय, असे सांगितले आहे वाल्मिकि रामायणात दोन जनकांचा उल्लेख मिळतो ( १–७१ ). त्यांतील पहिला म्हणजे मिथीचा पुत्र आणि दुसरा न्हस्वरोमाचा पुत्र सीरध्वज. यावरून असे दिसत की, जनक हे व्यक्तीचे नाव नसून ते कुलनाम आहे. इक्ष्वाकूच्या शंभर मुलांपैकी, दुसरा मुलगा निमी याचा अंत वसिष्ठाच्या शापाने झाला. पण ब्राह्मणांनी मृत देहाचे मथन करून एक पुरुष निर्माण केला. त्याचे नाव मिथी-नामक जनक होय. पुढे प्रत्येक राजाला हे नाव प्राप्त झाले.

ज्या देवतांचा समावेश "पीठदेवता" प्रकरणात केलेला नाही, पण निश्चितपणे ज्या देवता आहेत असे वाटले, शिवाय ज्यांचे वर्णन मिळते, उत्पत्ति मिळते, पण ज्यांना पीठस्थानाचे महत्त्व प्राप्त झालेले दिसत नाही, अशा देवतांचा समावेश ह्या प्रकरणात करण्याचे योजिलेले आहे. क्वचित् वर्गवारीत चूक होण्याचा संभव आहे, त्याबद्दल देवीभक्तांनी क्षमा करावी

भारताच्या शेजारच्या राष्ट्रांमध्ये शक्तीचा प्रसार कसा व केव्हा झाला, याचे थोडक्यात समालोचन करून हा विषय संपवू. भारताचे शेजारी म्हणजे चीन, श्याम, अनाम, कंबोडिया, जावा, सुमात्रा, बाली इत्यादि देश होत. मुकर्जी आपल्या प्राचीन भारताच्या इतिहासात म्हणतात, "तिसऱ्या शतकात चीनमध्ये १८० मठ आणि ३७०० बौद्धभिक्षु होते. त्यामध्ये संस्कृत ग्रंथांचे चिनी भाषेत भाषांतर करणारे ११ भाषांतरकार ऊर्फ दुभाषी होते. मंदिरांची संख्या वाढत गेली आणि चवथ्या शतकाच्या शेवटी तेथे १७०६८ मंदिरे झाली. साधारणत दहाव्या शतकापर्यंत ही परिस्थिति होती."

ब्रह्मदेश, श्याम ह्या ठिकाणी दुसऱ्या शतकापासून दहाव्या शतकापर्यंत बौद्धसंस्कृति असून शक्तिपूजा चालत असे. युनानमध्ये सातव्या शतकात थोई लोकांनी राज्य स्थापन केले आणि ते सहाशे वर्षे अस्तित्वात होते. त्या वेळी त्यांनी 'गांधार' हे भारतीय नाव धारण केले होते. दुसऱ्या एका भागाला ते विदेह म्हणत व त्याच्या राजधानीला मैथिली नाव होते. कंबोजमध्ये जयवर्मा

( दुसरा ) याने हिंदुराज्य स्थापन केले आणि पन्नास वर्षे राज्य केले. सन ८८९ मध्ये त्याचा वंशज यशोवर्धन ह्याने साम्राज्य बनविले. संस्कृत शिलालेख खोदविले आणि मंदिरे व आश्रम बांधले. बायनचे मंदिर हे कंबोडियन संस्कृतीचा उत्कृष्ट नमुना म्हणून दाखविता येईल. ह्या मंदिराचा कारभार एखाद्या संस्थानिकासारखा होता. ३४०० गावांकडून देवालयाला उत्पन्न मिळत होते. ६६६२५ नोकरांचा नोकरवर्ग असून शिक्षणखात्यामध्ये ४३९ शिक्षक, ९७० विद्यार्थ्यांना मंदिराच्या खर्चाने शिक्षण देत होते. ह्या वेळी राज्यामध्ये ७९८ मंदिरे, १०२ दवाखाने आणि १२० धर्मशाळा होत्या. संस्थांना मदत म्हणून राजाकडून चार लक्ष मण तांदूळ दिला जाई.

चंपा ( अनाम ) येथे हिंदुराज्य दुसऱ्या शतकात चालू झाले. ह्या भांती उमा, गौरी, भगवती, महाभगवती, देवी, महादेवी, गणेश, विनायक, कार्तिकेय, लक्ष्मी, पद्मा, श्री, चंद्र, सूर्य इत्यादिकांच्या पूजा होत असत. ही मंदिरे विटांनी बांधलेली होती. ती बदामी अगर कांजीवरम् येथील शिल्पाप्रमाणे होती. जावामध्ये सन ७८ साली वीस हजार गृहस्थ वसाहत करण्यासाठी गुजरात व कलिंग देशातून गेले. बोर्निओमध्ये चवथ्या शतकात ब्राह्मणांनी वसाहत केली आणि कौंडिण्याचा नातू मूळवर्मा याने “ बहुसुवर्णक यज्ञ ” करून त्यामध्ये वीस हजार गायी दान केल्या. फा-हिन हा चिनी प्रवासी म्हणतो की, तो ज्या जहाजातून गेला, त्यात २०० ब्राह्मणजातीचे व्यापारी होते. जावामध्ये डिआंगाच्या पठारावर चंडीसेवू, भिमा, महिषासुरमर्दिनी ह्यांची मंदिरे होती. तेराव्या शतकात मुसलमानी आक्रमणाला सर्व संस्कृति बळी पडली. म्हणतात ना, “ कालाय तस्मै नमः ”

बृहत्तर भारतासंबंधी जेव्हा आपण बोलतो, तेव्हा अनेक गोष्टींचा इतिहास लक्षात घ्यावा लागेल. ज्याला पूर्वी गांधार म्हणत तो आज कंदहार आहे. ज्याला सुवास्तु म्हणत तो स्वाट आहे. कुंभा नदी–काबूल नदी; गोमती नदी – गोमाळ नदी; ऋग्वेदामधील पक्थान – पख्तुनीस्तान, पठाण; अश्वकायन देश – अफगाणिस्तान; अप्रिता जमात – आफ्रिडी वंश; मधुमंता – मोहमदी अशी अनेक साम्ये दाखविता येतील. सांप्रतची पठाणांची पुश्तुभाषा ही बव्हंशी संस्कृत शब्दभरण्याचीच आहे. काबूलदरीत बुद्धाचा अतिशय भव्य १५९ फूट उंचीचा पाषाणाचा, खडकात कोरलेला पुतळा असून, प्राचीनकाळी भारतामध्ये येणारे प्रवासी याच मार्गाने येत आणि त्याला बुद्धप्रवेशद्वार म्हणत. चिनी प्रवासी ह्युवेनसँग याच मार्गाने भारतामध्ये आला. आजही अनेक भारतीय संस्कृतीचे अवशेष या मार्गावर सापडतात.

## ( १ ) श्रीदेवी

महिदपूर ( माळवा ) येथून एक मैल अंतरावर एक किल्ला आहे. त्याच्या पायथ्याजवळ दुसऱ्या एका टेकडीवर ह्या देवीचे मंदिर आहे. पश्चिमेच्या बाजूला क्षिप्रा नदीचा घाट आहे. हे मंदिर कोणी बांधले ह्याचा नामनिर्देश मिळत नाही. गाभाऱ्यात काळ्या पाषाणाची चतुर्भुज मूर्ति असून शंख, चक्र, गदा व ढाल ही आयुधे आहेत. मस्तकावर शंकराचे प्रतिक (एक बाण) असून त्यावर शेषाने आपली फणा उभारली आहे. मूर्ति आकर्षक असून ती लक्ष्मीचे प्रतिक मानले जाते. अश्विन नवरात्रामध्ये होमहवन आणि उत्सव साजरा होतो. असे समजते की, होळकर सरकारने ह्या देवीला खर्चासाठी काही उत्पन्न दिलेले आहे. ( कल्याण, शक्तिअंक, ३४/६७९ ).

## ( २ ) अंबिका

ही शंकराची पत्नी मानली जाते. हिचेच नाव उमा असेही आहे. रुद्राचा इतिहास पाहाताना आपणाला दिसून येईल की, त्र्यंबक ह्या शब्दाचा अर्थ शिवाचे तीन नेत्र असा घेतात आणि त्याची व्युत्पत्ति अंब ह्या धातूपासून झालेली आहे. ह्यावरून अंबिका हे रूप बनलेले आहे. काही वेळा रुद्राची बहीण तर काही वेळा माता असा अर्थ केला जातो. ( रुद्र वर्णन पहा. )

ह्या देवीचे स्वरूप, सिंहवाहिनी, त्रिनेत्री, अनेक अलंकारांनी सजलेली, चतुर्भुज, आयुधे घेतलेली, हातात आरसा, खड्ग व ढाल आणि चौथा हात वरद असे असते. ( लक्ष्मणसमुच्चयतंत्र. )

विष्णुधर्मोत्तरपुराणाप्रमाणे अंबा हे दुसरे स्वरूप आहे. ती शुभ्रवर्णा, आयुधे, पाश, पद्म, पात्र आणि चवथा अभय अशी आहे.

तेव्हा ह्या दोन वर्णनांवरून निष्कर्ष असा निघतो की, अंबा व अंबिका ही दोन निराळी रूपे आहेत. दोन्ही नावे निराळी आहेत. सर्वसाधारण माणूस दोनही देवता एकरूपच मानतो. असे न व्हावे म्हणून हा खुलासा करणे प्राप्त झाले.

## ( ३ ) अभयंबा

चिदंबरम् ( मद्रास ) पासून २५ मैलांवर मायावरम् नावाचे रेल्वेस्टेशन आहे. त्या गावी अभयंबा देवीचे मंदिर आहे. तामीळनाडमधील जनता या देवीला " अचलादेवी " असेही म्हणते. या देवीची उत्पत्तिकथा अशी आहे की, दक्ष-यज्ञामध्ये रुद्रगणांनी यज्ञाचा विध्वंस आरंभिण्यापूर्वी, एक मयूर सतीला शरण

गेला आणि त्याने तिच्याजवळ प्राणरक्षणाची याचना केली. पुढे सतीने योगाग्नीने देहत्यागसमयी, त्या मयूराचे स्मरण करताकरताच प्राण अर्पण केल्यामुळे तिचा पुनर्जन्म मयूर-स्वरूपात झाला. कारण आर्यधर्माचा असा सिद्धांत आहे की, मृत्युसमयी ज्याचे स्मरण करावे ती योनी त्याला पुनर्जन्मी मिळते. मायावरम् ह्या क्षेत्री तिने मयूर स्वरूपातच शंकराची आराधना केली. शंकर प्रसन्न झाल्यावर तिला दर्शन घडले, आणि नंतर मयूर शरीराचा त्याग करून ती शंकराबरोबर कैलास पर्वतावर गेली. सतीने मयूरला अभय दिले होते म्हणून देवीचे नाव अभयदा असे ठेवण्यात आले. आणि मायावरम् येथे आराधना केली म्हणून त्या क्षेत्री तिची मूर्ति स्थापन करण्यात आली. या क्षेत्री एक सप्तमातृका मंदिरही आहे. ( कल्याण, क्षेत्र अ. ५७।३६० ).

## (४) अमथेर माताजी

सौराष्ट्रामध्ये वडनगर मेहेसाणापासून २० मैलावर ह्या देवतेचे मंदिर आहे. येथील दुसरी प्रमुख देवता हाटकेश्वर होय. पुराणामध्ये ह्याचा उल्लेख मिळतो —

> आनर्तविषये रम्यं सर्वतीमयं शुभम् ।
> हाटकेश्वरजं क्षेत्रं महापातकनाशनम् ।। (स्कंदपुराण नागर, ६७/७६).

भूतलावर शंकराची जी प्रमुख स्थाने दिली आहेत, त्यापैकी हाटकेश्वर हे एक होय. त्याचे वर्णन ' पाताळे हाटकेश्वरम ' असे केले जाते. तेव्हा मुख्य लिंग जरी पाताळामध्य असले, तरी नागर ब्राह्मणाचे हाटकेश्वर हे कुलदैवत असल्याने त्या समाजाची वस्ती ज्या ठिकाणी झाली, तेथे त्यांनी मंदिर उभारले असल्याने अशी अनेक मंदिरे दिसून येतात. ह्या शहराचे प्राचीन नाव चमत्कारपूर असे आहे. आणि तो चमत्कार हाच की, वामनाने त्रिपादाने भूमि व्यापताना प्रथम पाऊल ह्या ठिकाणी ठेवले होते अशी दंतकथा आहे.

हाटकेश्वर आणि अमथेर माताजी या मंदिराशिवाय येथे महाकाली, बहुचराजी, शीतला, वाराहीमाता व भुवनेश्वरी यांच्या मूर्ति आहेत, तसेच जवळच पिठोरीमाता व आशापुरी देवीची स्थाने आहेत ( कल्याण, क्षेत्र अ. ५७/७६ ).

## (५) अलक्ष्मी

लक्ष्मीदेवीची ही वडील बहीण होय. देव-दानवाच्या सागर-मंथनामधून जी अनेक रत्ने बाहेर पडली, त्यापैकी हे एक ( उपद्रव्यापी ) रत्न असून, लक्ष्मीच्या आधी बाहेर पडले म्हणून त्याला वडीलपण प्राप्त झाले. कालकूट विष

बाहेर आल्यानंतर ह्या बाईचा क्रमांक असल्याने साहजिकच विषाचे काही स्वाभाविक गुण या बाईच्या स्वभावात उतरले आहेत. ह्या देवीचे स्वरूप काळे मुख, लाल लाल डोळे, पिंगट केस आणि दिसावयाला वृद्धा असे आहे. पाण्यातून बाहेर आल्यावर तिने देवांना विचारले, "माझ्या राहण्याची सोय तुम्ही कोठे केली आहे?" देवांनी सांगितले, "तू स्वतःच आपले निवासस्थान शोधून काढ. तुला राहावयाला योग्य असे घर म्हणजे, ज्या घरी कलह चालत असेल, कठोर व खोटे बोलणारे लोक रहात असतील, सायंकाळच्या राक्षसवेळी भोजन करीत असतील, हातपाय स्वच्छ केल्याविना भोजन करीत असतील असे होय. ह्या घरामध्ये देखील चांगल्या स्वच्छ जागी न रहाता कोळसे ठेवण्याची जागा, घरात पडलेले किंवा टाकलेले केस अगर कोंडा, पडलेले हाडांचे तुकडे ह्यामध्ये तू आपले वास्तव्य कर. तू आणखी एक काम कर की, 'जे अभक्ष्यभक्षण करतात; देव, गुरु, अतिथी ह्यांना मानीत नाहीत; यज्ञ व वेदपठण करीत नाहीत, जुगार खेळतात, नेहमी कलहामध्येच आनंद मानतात, पति-पत्नी नेहमी छत्तिसाच्या आकड्याप्रमाणे वर्तन करतात ह्या प्रकारच्या लोकांना तू दरिद्री ठेव."

पद्मपुराण (उत्तरखंड, अ. ११६) असे वर्णन करते की, वर वर्णन केलेल्या रूपवान व सद्गुणी (!) मुलीबरोबर विवाहास कोणी तयार होईना. धाकटी बहीण लक्ष्मी हिचे विष्णूवरोबर लग्न ठरले गेले. परंतु वडील बहिणीचे लग्न झाल्याशिवाय ती बोहल्यावर उभी राहण्यास तयार होईना. (यावरूनच आधी वडील बहिणीचे लग्न व नंतर धाकट्या बहिणीचे लग्न अशी सांप्रत दिसत असणारी रीत पडली असावी). शेवटी सर्व देवांनी विचार केला आणि एक ब्राह्मणपुत्र उद्दालक ऋषि यांना तिच्याबरोबर विवाह करण्यास प्रोत्साहन दिले. ह्या बहिणीचा विवाह झाल्याशिवाय विष्णूचा विवाह होत नाही असे पाहून ह्या देवकार्यात सहकार्य करण्यास तो मोठ्या कष्टाने तयार झाला. एका मुहूर्तावर त्या दोघांचा विवाह झाला.

विवाहाची वरात आश्रमात आली. तेथे होमहवन आणि वेदघोष चालूच होता. होमाचा धूर सर्वत्र पसरला होता. ही परिस्थिति पाहून ह्या नववधूचे पित्त खवळले. तिचे डोके दुखू लागले, भणाणून गेले. तिला तेथे एक क्षणही थांबणे असह्य होऊ लागले. कोणताही विचार न करता ती पतीला म्हणाली, "मी जर ह्या घरी रहावे असे आपणास वाटत असेल तर यज्ञयाग बंद करा, वेदपठण आणि अतिथींची ये-जा थांबवा, मला हे यज्ञयागादि विधि चालत असलेले घर बिलकुल आवडत नाही. मी येथे राहू शकणार नाही. ज्या ठिकाणी असली धार्मिक कृत्ये चालतात, पति-पत्नी एका दिलाने नांदतात, एकमेकांची उणी-दुणी काढून भांडत नाहीत, मुले वात्सल्याने आणि आपले प्रमुख कर्तव्य म्हणून वडील

माणसांची सेवा करतात, ती घरे मला बिलकुल आवडत नाहीत. ज्या घरी अहर्निश जुगार चालतो, मद्यपानात लोक उन्मत्त झाले आहेत, सज्जनाना शिव्या देऊन दुर्जनांची स्तुति केली जाते, नेहमी कलह होत असतात, परद्रव्य अधर्माने लुबाडले जाते, अशी स्थळे मला रहावयास आवडतात."

विवाहाची वरात नुकतीच कोठे घरात आली नाही तोच अशारीतीने उन्मत्त प्रलाप करणारी धार्मिक आचारविचारांचा लोप करणारी, आणि गृह-सौख्याचा अंत करणारी स्त्री पाहिल्यावर कोणता सात्विक माणूस तिच्या बरोबर संसार करण्यास राजी होईल? कोण आपल्या पायावर स्वतःच कुऱ्हाड मारून घेईल! इतर देवाच्या मिडेला बळी पडल्याबद्दल उद्दालकाला पश्चाताप झाला लगोलग एका क्षणाचाही विलंब न लावता त्याने आपल्या पत्नीला घराबाहेर हाकलून दिले. योग्य असे घर तिला कोठेच उगमेना प्रत्येक ठिकाणी तिला काही ना काही अप्रिय गोष्टी दिसत असल्याने शेवटी ती एका पिंपळाच्या झाडाच्या खोडाजवळ जाऊन बसली, आणि कालक्रमण करू लागली.

काही दिवसानी लक्ष्मी आपल्या पतीसह बहिणीच्या समाचारास आली असता तिला सर्व वृत्तान्त समजला बहिणीला पाहून अलक्ष्मी रडू लागली. शेवटी लक्ष्मीने तिची समजूत घातली आणि त्याच ठिकाणी कायमचे वास्तव्य करण्यास तिने तिला सांगितले. इतकेच नव्हे, तर तिने तिला वर दिला की, जे कोणी तुझी पूजा करतील त्यांना धन प्राप्त होईल. सनत्सुजातसंहिता म्हणते की यानंतर लक्ष्मी आपल्या बहिणीला भेटण्यासाठी दर शनिवारी पिंपळाच्या झाडाखाली येते आणि बहिणीची विचारपूस करीत असते. याच कारणामुळे शनिवारी पिंपळ वृक्षाला भेट देणे आणि त्याची पूजा करणे हितावह असते. कारण साक्षात् लक्ष्मीचा निवास त्या दिवशी तेथे असतो परंतु इतर दिवशी भेट दिल्यास अलक्ष्मीबरोबर गाठ पडेल हे भाविकानी ध्यानात घ्यावे (चित्रावशास्त्री कोश, पृष्ठ ३६)

याच संदर्भात एका हरिदासी कथेची आठवण येते लक्ष्मीची प्राप्ति व्हावी यासाठी एका लक्ष्मीमंदिरात ब्राह्मणांनी आवर्तने चालू केली ब्राह्मणांनी इतकी गर्दी केली की, बसायला जागा मिळायची पंचाईत पडली तेव्हा एक मायेफिरू ब्राह्मण तेथून परत फिरला आणि गावाबाहेर एका अलक्ष्मीच्या मंदिरात जाऊन आवर्तने करू लागला. कधीच कोणी तिच्या मंदिरात जात नसे आणि पूजाअर्चा करीत नसे. तेव्हा ह्या ब्राह्मणाचे धाष्टर्य पाहून आणि भक्तिभावाने केलेली पूजाअर्चा पाहून ती संतुष्ट झाली आणि तिने ब्राह्मणास वर मागण्यास सांगितले. ब्राह्मण मोठा हुशार नि बुद्धिमान! त्याने वर मागण्यात चातुर्य खर्च केले. तो म्हणाला, "हे देवी! तू जर मजवर प्रसन्न आहेस, आणि वर देण्यास तयार

आहेस, तर एवढेच मला दे की, तुझी मजवर नेहमी अवकृपा रहावी." देवीने "तथास्तु" म्हटले आणि ती अंतर्धान पावली. अर्थात अलक्ष्मीची अवकृपा झाल्याने त्याच्या घरात लक्ष्मीचे वास्तव्य झाले आणि तो लक्ष्मीपुत्र झाला.

ऋग्वेदामध्ये ह्या देवतेसंबंधी सूत्रे आहेत. ती पहा—

(अ) "अरायि काणे विकटे गिरिं गच्छ सदान्वे।" (१०।१५५-१) "हे दानविरोधी देवते, हे सदा दुर्मुखलेले, विकटांगे, सदा आक्रोश करणाऱ्या दरिद्रदेवते, तू दूर पर्वतावर निघून जा. नाहीतर आम्ही आकाशातील मेघोदकाने तुझा समूळ नायनाट करून टाकू. आम्ही ह्या दरिद्रदेवतेची येथून हकालपट्टी केली पाहिजे. म्हणजे दुसऱ्या लोकातूनही तिची आपोआप हकालपट्टी होईल. गर्भातील कोवळ्या कोवळ्या अर्भकांना आणि शेतातील नवांकुरांना निर्दयपणे मारून टाकणारी ही नीच-कृत्या आहे. हे तीक्ष्ण तेज धारण करणाऱ्या ब्रह्मणस्पति देवा, ह्या अवदसेचे येथून उच्चाटन कर आणि मगच तू येथून जा. (१०।१५५-२)

(आ) हे बेडकाप्रमाणे आवाज करणाऱ्या कर्कश अवदसे, जेव्हा तू येथून जाशील, तेव्हा इंद्राचे सर्व शत्रू, पाण्यातील बुडबुड्याप्रमाणे एका क्षणात नाहीसे होतील (१०।१५५-४).

ह्या सर्व ऋचा अवर्षणाने शेती सुकविणाऱ्या अवदसेला अनुलक्षून रचलेल्या आहेत, हे स्पष्ट आहे. भरपूर मेघोदक झाले म्हणजे ही सर्व आपत्ति टळणारी असल्याने इंद्रदेवाला तिची हकालपट्टी करण्याची विनंती करण्यात आलेली होती. असल्या नतद्रष्ट देवीलाही मानव दूर ठेवू शकतो, फक्त तिला आवडणाऱ्या गोष्टींचा त्याग करावयाचा आणि न आवडणाऱ्या गोष्टी सतत करीत रहावयाचे. असे उलटे आचरण केल्यावर अलक्ष्मी नेहमीच मानवापासून दूर दूर राहील.

आगम व विष्णुपुराणात या देवतेचे वर्णन मिळते. ते असे की, कृष्णवर्ण, त्रिनेत्र, द्विभुज, लांब नाकाची, स्तन व पोट मोठे असलेली, कमळ व काकध्वज धारण करणारी, वृषभमुखी, केरसुणी ही तिचे हातीचे आयुध, म्हणजे साधारणतः धुमावती देवीचे स्वरूप होय.

या देवतेचा प्रवेश आपल्या घरी न व्हावा म्हणून आश्विन शु. ८ च्या दिवशी ज्या वेळी महालक्ष्मीचे पूजन केले जाते, त्या वेळी प्रथम या देवतेची पूजा करण्याची रूढी आहे. कारण तिने शुभ कार्यात विघ्न आणू नये, म्हणून या देवतेला घरातून बाहेर जाण्यासाठी मागील दारी दिव्याची ज्योत पेटवावयाची, घरातील कोनाकोपऱ्यांतून ती फिरवावयाच्या आणि शेवटी पुढील दारी ठेवावयाची म्हणजे ती कोठेही असली तरी दिव्याच्या प्रकाशामागे जाऊन, घरातून निघून जाते.

बंगाल प्रांती आश्विन अमावस्या दिनी होणारी "क्षणिका अलक्ष्मी" ची मूर्ति बनून लक्ष्मीप्रमाणे तिचे पूजन करून, मग विसर्जन करतात.

या बायेला बाहेर घालविण्याचा आणखीही एक प्रकार आढळून येतो. पौष पौर्णिमा दिनी पुष्य नक्षत्राच्या योगावर, पुरुषवर्गाने पांढऱ्या मोहरीचा कल्क बनवून अंगाला लावावा आणि नंतर अभ्यंगस्नान करावे. मग या देवतेची पूजा करून वरीलप्रमाणे घरातून निरोप घ्यावा. नंतर नारायण, इंद्र, चंद्र, बृहस्पति व पुष्य यांच्या मूर्तींना सर्वौषधिक गुणाने युक्त अशा जळाने स्नान घालून, पूजा, होम करावा म्हणजे लक्ष्मीची समृद्धि होते.

(भारतीय संस्कृतिकोश, भाग १, पृ. २०७).

असंबाधा

लक्ष्मीची ज्येष्ठा बहिण बघ अलक्ष्मी ही।
काळी रोडी ताम्र नयनी बहु वृद्धा ही ॥
हाडे-फोडा इंधन-मलिन कच प्रिय वस्तीचें।
खोटें नाटें कर्मे करिती नर मर्जीचें ॥ १ ॥
उद्दालक श्रेष्ठ मुनी विवाहातें।
यज्ञ वेद-पठण ऐकुनि विटते जीवातें ॥
अक्षय-वृक्षातळीं रुसुनि बसली वस्तीला।
लक्ष्मी-विष्णू भेटव नित्य शनिवाराला ॥ २ ॥
निर्बंधाविण अशन करिती वस्तूला।
वादावादीं चालत अनुदिनीं वास्तूला ॥
भक्षी कोणी राक्षस समयीं अस्वच्छाना।
दरिद्री आणि अनृत वदावे ऐशी स्थानें वस्तीला ॥ ३ ॥

वैश्वदेवी

सत्याचाराने नित्य कार्या करावे।
मिथ्याचाराला त्यागुनि त्वां रहावें ॥
या मार्गानें ठेवि अलक्ष्मीस दूरी।
या रीतीनें पूजितां ती न मारी ॥ ४ ॥

## ( ६ ) आनंदनायकी

अयणी ( जि० बेळगाव ) गावच्या ईशान्य दिशेला सुमारे १५ मैल अंतरावर रामतीर्थ नावाचे क्षेत्र आहे. त्या ठिकाणी ह्या देवीचे स्थान आहे. हे स्थान फार पवित्र मानले जाते. एका लहानशा टेकडीला आनदपर्वत अगर अक्षय पर्वत म्हणतात. ह्या ठिकाणी एका १५'×२०'×१०' आकाराच्या गुहेमध्ये देवीचे मंदिर आहे. पायथ्याशी पापनाशिनी नदी वाहत असून दुसरे १०×१० चौ. फूट आकाराचे एक सरस्वतीकुंड आहे. प्रभू रामचंद्र, रावणाचे युद्ध आटोपून अयोध्याकडे परत जात असता अनेक हत्यापासून झालेल्या पापाचे क्षालन येथील नदीमध्ये स्नान केल्याने झाले, अशी दंतकथा सांगितली जाते यामुळेच या तीर्थाला रामतीर्थ असे नाव प्राप्त झाले. रामाने स्नान केले त्या वेळी नदीकाठी एक शिवमंदिर होते, त्याला व्यंकटेश्वर म्हणत. आता त्या मंदिराचे नावही रामेश्वर असे झाले आहे. वास्तविक येथे पार्वतीची चतुर्भुज ५ फूट उंचीची खडकात कोरलेली मूर्ति आहे. परंतु आनदपर्वतावर तिचे स्थान असल्याने तिला आनद-नायकी हे नाव प्राप्त झाले असावे. मंदिराच्या बाजूला २×२ फूट तोंड असलेले एक खोल विवर आहे. त्याची लांबी १२० फुटापेक्षा जास्त आहे असे म्हणतात. पण सहसा आत जाऊन पाहण्याचा प्रयत्न कोणी करीत नाही. पूर्वी येथे योगसाधनेसाठी तापसी वसत असत कोहळ ऋषींने ह्या स्थानी देवीची आराधना केली आणि या स्थानाला ऊर्जितावस्था आली असे मानले जाते.

भारतामध्ये अनेक गावी रामतीर्थ हे नाव, सरोवर अगर क्षेत्राच्या पाण्याच्या कुंडाना, आढळते. ते नाव का पडले ह्याचा विचार करता असे दिसते की, रावणाला रामाने युद्धामध्ये ठार मारले. परंतु तो ब्राह्मण असल्याने मरणोत्तर तो ब्रह्मराक्षस बनून रामाच्या पाठी लागला. त्याचा पिच्छा सुटावा म्हणून रामाने अनेक उपाय केले, पण उपयोग होईना. असे मानले जाते की, येथील तीर्थामध्ये स्नान केल्यावर रामामागील रावणाचा त्रास चुकला. ह्यावरूनच पुढे असे झाले असावे की, ज्या तीर्थाच्या पवित्र पाण्याने भूत पिशाच्च बाधा नाहीशी होते, अगर ज्या पवित्र पाण्याच्या ठिकाणी भूत-पिशाच्चबाधा नाहीशी करण्याची शक्ति आहे, त्या तीर्थाला–सरोवराला–रामतीर्थ म्हणत असावेत. अनेक ठिकाणी रामाने आपल्या पापक्षालनार्थ स्नान करणे अशक्यच म्हणावयास पाहिजे.
( बेळगाव जिल्हा गॅझेट, पृ. ५९८. गुरुनाथ रामचंद्र जोशी, पुजारी )

## ( ७ ) उनाईमाता

बिलीमोरा ( जि. सुरत ) गावापासून २६ मैलांवर ह्या देवीचे स्थान आहे. यमेश्वरी अगर इतर कुंडाप्रमाणे हे स्थान गरम पाण्याच्या कुंडाबद्दल विशेष

प्रसिद्ध आहे. अशी एक दंतकथा आहे की, प्राचीन काळी ह्या स्थानी शरभङ्ग ऋषींचा आश्रम होता. ऋषी स्वतः कुष्ठरोगाने पीडित होता. श्रीरामचंद्र वनवासाच्या दिवसात फिरत फिरत ह्या क्षेत्री आले असता, कुष्ठरोगाने जर्जर झालेला ऋषींचा देह त्यांनी पाहिला. तेव्हा रोगनिवारणार्थ त्यांनी भूगर्भात बाण मारून गरम पाण्याचा झरा उत्पन्न केला, आणि पाण्याने स्नान केल्यावर तो ऋषि रोगमुक्त झाला. अद्यापही अनेक कुष्ठरोगी या ठिकाणी रोगमुक्तीसाठी येतात, आणि गरम पाण्याने स्नान केल्यावर त्यांना आराम मिळतो असे सांगतात. पाणी गरम ( किंवा ऊन ) असल्याने, तेथे देवतेची स्थापना करून तिला उनाईमाता हे नाव देण्यात आले असावे. ( कल्याण, क्षेत्र अ., ५७/४४१ ).

## ( ८ ) उमा

या देवीची उत्पत्ति अशी की, " उं शिवं माति मिमीते वा " । उ म्हणजे शिव, त्याला मापते, मोजते ती उमा ( शब्दकल्पद्रुम ).

> यतो हि तपसे पुत्रि वनं गन्तुं च मेनका ।
> उमेति तेन सोमेति नाम प्राप तदा सती ॥ (कालिका, पृ. ४२)

महाभारताच्या हरिवंश पर्वामध्ये या देवीची उत्पत्ति दिली आहे, ती अशी. हिमवान् पर्वताला तीन कन्या होत्या. ( दुर्वास ऋषींच्या प्रमाणे आडनाव असावे ). एकीचे नाव अपर्णा, दुसरीचे एकपर्णा, आणि तिसरीचे एकपाताला होते. अपर्णा काहीही न खाता राही, तर एकपर्णा दररोज वृक्षाचे एक पान खाऊन राहणारी होती आणि एकपाताला एकाच प्रकारच्या वेलींची पाने खाऊन राहणारी होती. ह्या तिन्ही मुली असे वागत, ह्याचे कारण असे की, त्यांची माता मेनावती हिने " उ + मा " म्हणजे असे पाने खाऊन जीवन शिणवू नका असे सांगितले. म्हणून अपर्णा ही उमा ह्या नावाने प्रसिद्ध झाली काही वेळा उमा ह्या शब्दाचा अर्थ उत्तम ब्रह्मज्ञानी असाही केला जातो. ह्या देवीचे एक नाव अंबिका असे आहे. ( W. J Wilkins, Hindu Mythology, P 295 )

गौरीची जी अनेक नावे व स्वरूपे आहेत, त्यापैकी उमा ही एक आहे. ह्या देवीचे स्वरूप हातामध्ये अक्षमाला, आरसा, कमंडलू व कमळ अशी चतुर्भुज, आयुधे, गौर वर्ण, मूर्तीची उंची १२० अंगुळे असे आहे.

( Hindu Iconography by T A Gopinath Rao )

शुंभ व निशुंभ वधाच्या वेळी देवांनी आदिमायेची स्तुति केल्यावर उमादेवी प्रकट झाली त्या वेळी तिचे वर्णन, शरीराचे उत्कृष्ट अवयव, पिंगळसर

वर्ण, श्यामल कांति, मस्तकावर अर्धचंद्राकृति रेषा, नाना वर्णांची वस्त्रे वापरणारी, अलंकार धारण करणारी, तेजस्वी, सूर्यपूजेत निमग्न राहणारी व वरदान करणारी, असे केलेले आहे ( भविष्य पुराण, अध्याय १७७ ). ह्याच देवीच्या शरीर-कोशातून कौशिकी देवीची उत्पत्ति झाली. ( कौशिकी पहा ).

या देवतेचे तांत्रिक पद्धतीने पूजन होते. त्या वेळीचे स्वरूप म्हणजे दोन भुजा, उजवे हाती नीलकमल व डावे हाती शुभ्रचामर आणि शंकराचे मांडीवर विराजमान झालेली, सुवर्ण कांतीची असते. या उपासनेत तिच्या सख्या जया, विजया, मातंगी, ललिता, नारायणी, सावित्री, स्वाहा व स्वधा यांचीही पूजा करावयाची असते.

उमा ही एक आदिशक्तीचे स्वरूप मानले जाते. ही देवी केवळ भारतीय संस्कृतीतच होती असे नव्हे तर इतर संस्कृतींमध्येही तिचा नामनिर्देश आढळतो. बॅबिलोनमध्ये ती Umum ( उमा ) म्हणून ओळखली जाई. अक्केडियन तिला उमी म्हणत. द्रविडियन नाव ' उमा, ' फिजिअन्स—' अम्मा, ' अनाटोलिया-' मा ', इजिप्स —' मॅट ' ( न्यायदेवता ) इत्यादि नावाने ओळखली जाते. भार्गवाची अंबा अगर अंबिका ती हीच होय. अमरकोशाप्रमाणे मा, अम्मा, मात्री, भार्गवी, लोकमाता, रमा, लक्ष्मी ही सर्व एकाच आदिशक्तीची रूपे होत, असे रा. दीक्षित ह्यांचे मत आहे. ( दीक्षित, पृष्ठ ५८ ते ६९ ) ते पुढे असेही म्हणतात की, इ. स. पूर्व बाराव्या शतकात फिजिअन लोकांच्या टोळ्या, मेसापोटेमियामधून ग्रीसपर्यंत चाल करून गेल्या, आणि त्या ठिकाणी पोहोचल्या-वर डायोनिस देवीची पूजा करू लागले. डायोनिस ही आर्यांच्या भग अथवा भगवान ह्या शब्दाचा अपभ्रंश होय. अक्केडियन संस्कृतीमध्ये ' अया ' ( Aya, Ais or Ai ) हे आदिशक्तीचे स्वरूप होय, आणि यालाच भारतीय समानार्थी शब्द मा अगर आया ( दाई ) हा होय. आया व दाई ही खाल्डियन संस्कृतीमध्ये एक देवताच आहे. शेवटी रा. दीक्षित म्हणतात की, भारतीय अदिति, बॅबिलोनियन आधितार्तु, सुमेरिअन इश्तर, फोनेशिअन अष्टार्ट, दक्षिण अरेबियाची अथ्थर, जुन्या बायबलमधील अश्तोरेथ, ॲबेसिनियन अस्टर, माओची इश्तर, इजिप्शियन अतारगॅटिस, मेडिटरेनिअन ॲफ्रोडाईट्स, स्कॉटिश केचिचगेअर इत्यादि, ही सर्व एकाच आदिशक्तीची त्या त्या संस्कृतीमधील नावे होत. ( पृष्ठ ४७–५० )

वसंततिलक

मेनावती धवु हिमाचल कन्यका ही ।<br>
तो धूर्जटी वरितसे धन देवता ही ॥

विश्वस्वरूप जगती जन मानिती हे ।
ती भारतीय जनता तुज वंदिताहे ॥ १ ॥
कांती सुवर्णसम ही मुकुटीं विराजे ।
कीं चामरें फरित वायुस शिक्षणा हें ॥
शोभे तुझा कर दुजा नवपद्म हातीं ।
वंदीतसे भय-निवारीं अशी उमा ती ॥ २ ॥

## ( ९ ) काळरात्री

ह्या देवतेच्या उत्पत्तीसंबंधीची कथा अशी की, समुद्रमंथनाच्या वेळी, क्षीरसागरातून अमृत बाहेर आले, आणि त्याच्या वाटणीसाठी देव दानवामध्ये कलह सुरू झाला. अशा वेळी अमृताचे रक्षण करणे अत्यावश्यक होते. याकरिता विष्णूने आपल्या सामर्थ्याने काळरात्री देवीची निर्मिति केली, आणि तिजकडे अमृतरक्षणाचे काम दिले. एखाद्या दानवाने चोरूनमारून ते मिळविण्याचा प्रयत्न केला, तर त्याला ही पाहून खात असे. शेवटी दोघांच्या संमतीने विष्णूने मोहिनीरूप घेतले आणि अमृताची वाटणी केली. याप्रमाणे काळरात्रीने आपली कामगिरी उत्तम बजावल्याबद्दल शंकरानी तिला आपल्याबरोबर कैलास पर्वतावर नेले, आणि हिमालय पर्वतावरील त्रिशीर्षगुहेच्या उत्तर दरवाज्यावर रक्षणासाठी ठेवून दिले. ही त्रिशीर्षगुहा शंकरानी बाण मारून मुद्दाम तयार केली होती कारण कैलासाच्या दक्षिणेस एक राजा त्यांचा मोठा भक्त होता आणि त्याला दर्शनास येण्यास सुकर मार्ग मिळावा ह्यासाठी शंकरांनी ही खास व्यवस्था केलेली होती ह्या भक्ताखेरीज अन्य कोणी त्या गुहेतून कैलासाकडे गेल्यास त्याला प्रतिबंध करण्याचे काम या देवीकडे सोपविलेले होते.

( कथासरित्सागर, स्तबक, १५–१ )

भूतलावर तारकासुर दैत्य फार माजला. देवादिकाना तो अतिशय त्रास देऊ लागल्यावर त्याचा वध करण्यासाठी देवानी अनेक उपाययोजना केल्या, पण त्या सर्व निष्फळ झाल्या. ते शंकराकडे आले आणि यावर उपाययोजना करण्याबद्दल त्यानी शंकराची प्रार्थना केली शंकर म्हणाले, "हे काम माझा पुत्र करील." तेव्हा पुत्रप्राप्तीसाठी देवांनी शंकराचे लग्न हिमालयकन्या पार्वतीबरोबर होण्याची सर्व व्यवस्था केली. त्याप्रमाणे नियोजित विवाह पार पडला आणि ती दोघे रतिक्रीडेमध्ये निमग्न झाली. अनेक दिवस ती रतिक्रीडा रात्रंदिवस चालू होती, तरी पण शंकराची कामवासना पूर्ण होईना.

तेव्हा पुत्रप्राप्ति लवकर व्हावी म्हणून ब्रह्मदेवाने एक उपाय योजला त्याने आपल्या सामर्थ्याने काळरात्री देवीची उत्पत्ति केली आणि सूक्ष्म रूपाने तिने पार्वतीच्या गर्भस्थानी शिरून शंकराची कामवासना लवकर तृप्त करून घ्यावी असा तिला आदेश दिला. याप्रमाणे केल्यावर शंकराचा कामाग्नि थोडा शांत झाला आणि शंकराच्या पाशातून पार्वती मुक्त झाली. तिला गर्भ राहिला प्रसवकाळानंतर तिच्या पुत्राने तारकासुराचा वध केला. हीच काळरात्री पुढे कार्यभाग संपल्यावर "एकानंशा" या नावाने भूतलावर प्रसिद्ध झाली

(मत्स्यपुराण, अ. १५३।१६)

दुर्गमराक्षसवधाच्या वेळी शंकरानी पार्वतीला सांगितले की, तू त्याचा वध करून ये. त्या वेळी पार्वती प्रथम काळस्वरूप होऊन त्या दैत्यावर चाल करून गेली, पण त्या प्रबळ शत्रूपुढे ह्या देवीची डाळ शिजली नाही तीस सहस्र राक्षसांनी तिचा पाठलाग करताच, ती रणभूमि सोडून पळतच परत फिरली. त्यानंतर पार्वतीने दुर्गादेवी स्वरूप धारण करून दैत्याचा वध केला. (मार्टिन, पृ १८३)

ही देवता म्हणजे आद्यशक्तीचे सर्वनाशक स्वरूप होय. भयंकर उग्र स्वरूप, पाठीवर लांब वेणी, आणि त्यामध्ये गुंफलेली सुवर्ण फुले, कानात कुंडले, गर्दभ वाहन, विवस्त्र स्थितीत त्या वाहनावर बसलेली, सर्वांगाला तेल माखलेले, डाव्या पायात लोखंडाचे कडे, गळ्यात रुद्रमाळा, चतुर्भुज, हातात तलवार, ढाल इत्यादि आयुधे घेतलेली, असे ह्या देवीचे स्वरूप असते.

[ Elements of Hindu Iconography, T A Gopinath Rao, Page 358]

विद्यार्णवतंत्राप्रमाणे काळरात्रीचे स्वरूप पुढीलप्रमाणे आहे — रक्तवर्ण, चतुर्भुज, उजवे हाती लिंग, दुसरा उजवा वरदमुद्रा, दोन डावे हाती भुवन व अपोदह, त्रिनेत्र, मुक्तकेश, मस्तकी मयूरपत्र धारण करणारी असे आहे, आणि ती स्वभावाने कामातुर असते

या देवतेच्या मंत्राचे पठण, शत्रूचे उच्चाटण, स्तंभन व नाश याकरीता केले जाते. अमावस्या हे या देवीचे प्रतीक मानलेले असल्याने त्या रात्री साधना करणे श्रेयस्कर होय पण कार्तिक अमावस्या ही विशेषरूपाने सांगितली आहे काळसंहिता नामक एक प्राचीन तंत्रग्रंथ आहे. त्यामध्ये उपासनेचे विधान दिलेले आहे. या काळरात्रीचे ८४ भेद मानलेले आहेत. त्यांचे पृथक मंत्र आहेत, यंत्रे आहेत आणि वेगवेगळ्या सिद्धीही आहेत.

वसंततिलक

हे उग्ररूप भयकारक काळरात्री ।
चारी भुजा विकट केस वर स्थिताची ॥
शस्त्रे धरी कटक-कंटक खड्ग हातीं ।
वंदीन मुक्त-वसना घननीळ कांती ॥ १ ॥

## (१०) कुडिका

मद्रास येथे मिंट स्ट्रीटवर सावुकार पेठेत या देवतेचे मंदिर आहे. मूळमूर्ति अष्टभुजास्वरूप असून कुडिका हे तेथील खास नाव आहे. हे नाव का मिळाले याची माहिती उपलब्ध दिसत नाही. दक्षिणेत सर्वसाधारणपणे अशी रूढि दिसते की, जेव्हा भक्त देवतांची पूजाअर्चा करतात आणि यात्रेकरू म्हणून दर्शन घेतात, तेव्हा एका मृत्तिका पात्रामध्ये भात शिजवून त्याचा देवीला नैवेद्य अर्पण करतात. दाक्षिणात्यांचे तांदूळ हेच प्रमुख अन्न असल्याने देवतांच्या नैवेद्यामध्ये त्याचा अंतर्भाव झालेला दिसून येतो. काही ठिकाणी अशा नैवेद्यासाठी आलेली पात्रे एकत्र करून त्यातील अन्न भक्तांना प्रसाद म्हणून वाटला जातो, अगर गरिबांना अन्नदान दिले जाते. दाक्षिणात्यांची देवीला नमस्कार करावयाची एक खास पद्धत आहे. दोन्ही कान हातांनी धरून, मस्तक इकडून तिकडे हलवून वेळप्रसंगी त्याबरोबर शरीरही हलवून नमस्कार केला जातो.

त्या भागात हे एक शक्तिपीठ मानले जाते. कारण अष्टभुजा म्हणजे महिषासुरमर्दिनी हा पार्वतीचाच अवतार होय, असे ते मानतात.

ह्या गावी दुसरे एक शक्तिपीठ आहे. ट्रिप्लीकेन भागात पार्थसारथीचे एक मंदिर आहे, तर तेथून एक मैल अंतरावर शहराच्या मध्यभागी ' मिलापोर कपिलेश्वर ' हे एक स्थान आहे. येथील शिवलिंगांना पार्वतीने भेट दिलेली आहे. या भेटीचे कारण असे दिले जाते की, शिव पार्वती कलहामुळे शंकराच्या आराधनेत व्यत्यय येऊ लागला तेव्हा ते संतापले आणि क्रोधवश होऊन त्यांनी पार्वतीस शाप दिला की, " भूतलावर तू मोर होशील " शापाचा परिणाम म्हणून पार्वती मोरस्वरूपाने भूमीवर अवतरली, आणि येथील शिवलिंगाला तिने भेट दिली. तिने शिवलिंगाची पूजा पाहिली आणि आपले भक्तिभाव अर्पण केले त्यायोगें ती शाप मुक्त झाली या प्रसंगाची स्मृति म्हणून शिवलिंगाजवळ पार्वती मोरवाहनावर आरूढ झालेली व हाती पूजासाहित्य असलेली आहे ह्या मंदिराच्या परिक्रमामध्ये शिव पार्वतीचे आलिंगन दाखविलेले आहे. त्याला आलिंगनमूर्ति असे नांव आहे. ( अय्यर, पृष्ठ ५७ )

इंद्रवंशा

मद्रास गांवीं कुंधिकाही देऊळीं ।
मृत्तिक पात्रीं शिजवोनि तांदुळा ॥
नैवेद्य देवीस सु-भक्त अर्पीत ।
कर्णासि हस्तांत धरोनि वंदीत ॥ १ ॥

( ११ ) कुलकुल्या

कुसीनगर ( कासिया ) हे उत्तर प्रांतातील एक प्राचीन शहर आहे. याच शहर ठिकाणी इ० स० ५४३ पूर्व साली भगवान बुद्धाचा जन्म झाला. त्या काळी हा भाग घनदाट जंगलाने व्याप्त होता. सांप्रत बरेचसें जंगल अस्तित्वात नसले तरी अद्याप पुष्कळसा जंगलाचा भाग शिल्लक आहे. ह्या जंगलभागातून दोन लहान नद्या वाहत जातात. ‘ कुल्या ’ ह्याचा अर्थ लहान नदी असा केला जातो. कुसीनगरापासून सुमारे ८ मैल अंतरावर अशाच एका नदीच्या काठी दुर्गादेवीचे मंदिर आहे. नदीच्या नावावरून देवीचे नाव कुलकुल्या देवी असे पडले आहे. एका लहानशा दगडी चौथऱ्यावर चार भिंतींच्या आडोशाला मातीची एक गोलसर आकाराची मूर्ति बनवून तिची पूजा केली जाते. भक्तांची अशी भावना आहे की, देवी पक्क्या मंदिरात रहाणे पसंत करीत नाही म्हणून पक्के मंदिर बांधले जात नाही. ह्यामुळे पावसाळ्यात मातीच्या मूर्तीचे स्वरूप बिघडून जात असल्याने, दुसरी मूर्ति तयार करावी लागते. ह्या देवीच्या स्थानाजवळच कुलकुल्या महादेवाचे मंदिर आहे. जंगलभागात हे स्थान असल्याने वनश्रीची शोभा पाहण्यासाठी अनेक भक्त ह्या ठिकाणी जातात. हे एक प्राचीन स्थान आहे.

( कल्याण, शक्ति अं., १९३४।६८५ )

वसंततिलक

देवी कुसीनगर सन्निध उत्तरेला ।
आहे कुल्या नदितटीं निबिडा वनाला ॥
नामें सदा कुलकुल्या वदती तियेला ।
वंदीत मृत्तिक स्वरूप चबूतऱ्याला ॥१॥

( १२ ) कौशिकी

शरीरकोशाद्यत्तस्याः पार्वत्या निःसृताम्बिका ।
कौशिकीति समस्तेषु ततो लोकेषु गीयते ॥४३॥

तस्मां विनिर्गता यातुं कृष्णाभूत्सापि पार्वती ।
कालिकेति समाख्याता हिमाचलकृताश्रया ॥४४॥
( मार्कंडेय पुराण, अध्याय ८२ ).

पूर्वी भूतलावर शुंभ व निशुंभ नावाचे दोन प्रबळ दैत्य पाताळ लोकामधून आले. बालपण संपल्यावर आपणांस अजरामरत्व प्राप्त व्हावे यासाठी त्यांनी पुष्करतीर्थावर सतत दहा सहस्र वर्षे तपश्चर्या केली. त्या वेळी त्यांनी अन्नपाणी देखील वर्ज्य केले होते. शेवटी साक्षात् ब्रह्मदेव प्रकट झाले आणि त्यांनी त्या दैत्यांच्या इच्छेनुसार वर दिला तो असा की, 'त्या दैत्यांचा वध, देवता, मानव, मृग अथवा पक्षी यांपासून होणार नाही ' स्त्रीशक्तीचा त्यांनी मागणीत समावेश केला नाही, कारण कोणतीही स्त्री त्यांचा पराभव करू शकणार नाही, याची दैत्यांना पूर्ण खात्री होती.

वरप्राप्ति झाल्यावर त्यांच्या राज्याभिषेकाच्या वेळी चंडमुंड व धूम्रलोचन हे अतिशय प्रबळ राक्षस त्यांच्या मदतीस आले. त्यांनी येताना आपले सैन्यही आणले होते रक्तबीज हा महापराक्रमी दैत्य त्यांना मिळाला. या रक्तबीजाचे वैशिष्ट्य असे होते की, समरांगणावर शरीरावर शस्त्राघाताने कोठे जखम झाली आणि त्या जखमेतून रक्तबिंदु जमिनीवर पडले म्हणजे त्या प्रत्येक बिंदुगणिक एकेक राक्षस उत्पन्न होत असे. त्याला असे वरदान मिळालेले होते.

शुंभनिशुंभांनी इंद्रावर स्वारी केली आणि त्याची सत्ता हस्तगत केली. ते स्वत: इंद्र बनून अमृतपान करू लागले. कुबेरावर चाल करून त्याची सगळी संपत्ति त्यांनी हरण करून आणली चंद्र, सूर्य त्यांच्या आज्ञेनुसार आकाशात फिरू लागले. अग्नि, वरुण व वायु यांची कार्ये तेच करू लागले. यामुळे सर्व देवांची अगदी दैना उडाली. शुंभाने याप्रमाणे एक सहस्र वर्षे राज्य केले. शेवटी देव ब्रह्मदेवाकडे गेले आणि उपाययोजना करण्याबद्दल त्यांनी त्याची प्रार्थना केली.

त्या वेळी ब्रह्मदेव त्यांना म्हणाला, " वेदप्रणीत सर्व मंत्र प्रारब्धानुसार फळ देत असतात. त्यांना स्वतंत्रपणे फळ प्रदान करता येत नाही. वेदांतील मंत्रांच्या प्रधान देवतांनो, तुम्ही स्वत च कालप्रभावाने नानाप्रकारचे कष्ट भोगीत आहांत अशा स्थितीत मी कोणती उपाययोजना करू शकेन ? भवितव्य अटळ आहे. तरी पण काहीतरी उपाय करून पाहिले पाहिजेत दैव व प्रारब्ध अनुकूल असेल आणि तुमचा भोग संपला असेल, तर फळ मिळेलच. तुम्ही हिमालय पर्वतावर जाऊन भगवती चंडीची मन पूर्वक आराधना करा म्हणजे तुमचे मनोरथ पूर्ण होतील."

ब्रह्मदेवाच्या वचनावर भरंवसा ठेवून सर्व देवांनी हिमालय पर्वतावर जाऊन उग्र तपस्या चालू केली. त्या आदिशक्तीचे नित्य गुणगान करून ते तिची प्रार्थना करू लागले. शेवटी भगवती जगदंबा प्रकट झाली आणि देवांना तिने विचारले, "तुमची मुखे एवढी चिंताग्रस्त का? आणि सतत माझी आराधना तुम्ही का करीत आहात? तुमचे माझ्यापाशी काय काम आहे ते निवेदन करा. तुमची इच्छा मी पूर्ण करू शकेन." देवांनी सांगितले की, "पूर्वी महिषासुराने त्रास दिल्यावर तूच आम्हाला त्या संकटातून तारलेस. आता शुंभ-निशुंभ त्रास देत आहेत. त्यांचा निःपात कर." या वेळी पार्वतीने आपला शरीरकोश फाडला. त्याबरोबर त्यातून एक गौरवर्णी देवता बाहेर आली. त्या देवीचे नाव कौशिकी. खाली जो काळा देह राहिला त्याचे नाव कालिका असे पडले.

जन्मतःच ती एका सिंहावर आरूढ झाली आणि शत्रूंच्या रोखाने निघाली. तिने आपल्याबरोबर कालिका देवीलाही घेतले. नगराच्या दारापाशी गेल्यावर ती सुस्वर गाणे गाऊ लागली. त्या वेळी शुंभासुराचे दोन नोकर चंड-मुंड ह्यांनी ते गाणे ऐकले आणि देवीचे रूपही पाहिले. पळतच ते शुंभासुराकडे गेले आणि त्यांनी सर्व हकीकत त्याला सांगितली. ती स्त्री शुंभासुराची पत्नी होण्याडच योग्य आहे असे ते म्हणाले. शुंभाने सुग्रीव नावाचा दूत देवीकडे पाठविला. त्याने ते अलौकिक रूप पाहून देवीची स्तुति केली आणि शुंभाचा निरोप तिला सांगितला. देवीने उलट निरोप पाठविला की, "मी विवाहास तयार आहे. पण लहानपणी अजाणतेपणाने सर्व सख्यांसमक्ष मी असा पण करून बसले आहे की, 'समरांगणावर मला जो जिंकील तोच माझा पति होईल.' मला जिंकणे शुंभासुराला मुळीच कठीण नाही." ह्यानंतर निशुंभ, धूम्रलोचन व स्वतः शुंभ समरांगणावर आले आणि देवीने त्यांचा वध केला. असा हा उत्कृष्ट कथाभाग आहे.

(देवीभागवत ५। अध्याय २२ ते २९)

दुसरी एक उत्पत्ति अशी आहे की—

कायकोपान्निःसृता या कालिकायास्तु भैरव।
सा कौषिकीति विख्याता चारुरूपा मनोहरा॥ (कालिका पुराण)

भावार्थ असा की, हे भैरवा, कालिकेच्या देहकोशातून जी देवता निघाली, ती कौषिकी नावाने प्रसिद्ध झाली. ती सुंदर व मनोहर आहे. ती चंडिका कालिकेच्या हृदयातून वर निघून जिभेच्या टोकावरून बाहेर पडली. ती सिंहारूढ असून तिने पीत वस्त्र परिधान केले आहे. तिच्या हाती शूल, वज्र, चाप, खड्ग, शक्ति, गदा, घंटा, शंख, बाण व चर्म ही आयुधे आहेत.

शिवपुराणाप्रमाणे आणखी एक उत्पत्ति आहे पार्वतीचे स्वरूप प्रथम काळे होते शंकर तिला " काळी काळी " म्हणून चिडवू लागल्यावर ती विंध्य पर्वतावर तपश्चर्येला गेली. ब्रह्मदेवाच्या वराने तिचा बाह्य काळाकोश गळून पडला, आणि ती गौरवर्णी झाली जो काळाकोश गळून पडला, तीच कौषिकी देवता होय

कौशिकी देवीचे स्थान कषाय पर्वतावर, आल्मोरा शहराजवळ जे काल्का रेल्वेस्टेशन आहे, तेच होय

आर्या

शुंभनिशुंभ असुरवर देता देवा उपद्रवा फार ।
संकट निवारणार्थ तप आचरती हिमाचलीं घोर ॥ १ ॥
होता उमा प्रसन्न सत्वर प्रकटे सुरादिका करिता ।
किमर्थ तपता सांगा कायेला का उगाच कष्टविता ? ॥ २ ॥
सुर दुःख ऐकिताची कायाकोषा दुभगते त्वरित ।
कौशिक स्वरूप देवी, अलग निघे गौरवर्ण रूपात ॥ ३ ॥
या देविने पुढती शुंभनिशुंभासि ठार मारियलें ।
अल्मोरा समीपा मग कषायगिरिं देवतेस स्थापियले ॥ ४ ॥
कौशिकी स्वरूप निघता, उरल्या रूपास कालिका वदती ।
श्यामावर्णारूपीं गिरिपरिसरिं कालिकास्थलीं वसती ॥ ५ ॥

( १३ ) कंकाळी

उत्तरप्राती मधुपरीमध्ये ह्या देवीचे स्थान आहे ज्या भागात स्थान आहे त्याला कंकाळी टिळा असे म्हणतात कंसाने आपल्या बहिणीचा मूल ज्या दगडा वर आपटून ठार मारली त हेच स्थान होय ह्या देवीला शेंदूर घालीत असल्याने तिच्यावर शेंदुराचे बरेच जाड पुट चढले होत ते सन १९२० च्या सुमारास सुटले आणि देवीची मूळ मूर्ति दृग्गोचर झाली त्या वेळी तथ तीन रूपे आढळून आली—

( १ ) श्री कंकाळी—कंकाळाची माला धारण करून सिंहावर आरूढ आहे

( २ ) महादुर्गा—दुर्गामूर्ति सिंहारूढ असून पुढे हाती ध्वज धरून लांगुरिया चालले आहेत

( ३ ) सिंहशार्दूल—ही मूर्ति कोणत्याही वाहनावर बसलेली नाही

ह्या देवीबद्दल अशी आख्यायिका सांगतात की, ती आपल्या मंदिराचा जीर्णोद्धार करू देत नाही. मंदिराचा मालक स्वामी तुळारामने एकदा जीर्णोद्धार करण्यासाठी खणण्यास प्रारंभ केला. तेव्हा "बंद करो, बंद करो" असा आवाज मंदिरातून आला परंतु तुळारामने देवीचा इशारा न मानता खोदकाम चालून ठेवल्याने, त्याचा पाचव्या दिवशी मृत्यु झाला. (कल्याण, शक्ति अ., पृ ६८०)

## (१४) गजांतलक्ष्मी

हा शब्दप्रयोग म्हणजे श्रीमतीच्या परमावधीचा निदर्शक आहे. हत्ती विकत घेणे आणि आपल्या घरी त्याचे उदरभरण करणे हे ऐऱ्यागैऱ्या माणसाचे काम नव्हे. तो तसाच मातब्बर असावयास हवा. ह्यावरून असा संकेत रूढ झालेला असावा की, ज्याच्या दारात हत्ती झुलत आहे, तो साक्षात् लक्ष्मीचा लाडका असावा, आणि तेथे लक्ष्मीचा वास असलाच पाहिजे.

क्षीरसागराचे मथन झाल्यावर लक्ष्मी हे रत्न बाहेर आले. त्या वेळी अष्टदिग्गजांनी आपल्या शुंडेत सुवर्णपात्रे धरून पवित्र जलाने तिजवर अभिषेक केला. ह्या विष्णुपुराणातील मूळ कथेवरून ह्या देवतेची उत्पत्ति झालेली आहे.

> दिग्गजा हेमपात्रस्थमादाय विमलं जलम् ।
> स्नपयाचक्रिरे देवीं सर्वलोकमहेश्वरीम् ॥

मूळच्या वर्णनात शिल्पकारांनी स्वतःची म्हणून काही भर घालून, तपशिलात फरक करून देवींची चित्रे तयार केली आहेत. ह्यामुळेच क्वचित् लक्ष्मी व कमलादेवी यांच्या शिल्पामध्ये व गजलक्ष्मीच्या शिल्पामध्ये साम्य दिसून येते. पण त्यांची कार्ये भिन्न आहेत हे वाचकांनी आपल्या ध्यानी ठेवावे. कमलादेवी ही दशमहाविद्यांपैकी एक असून ती सुवर्णकांति वर्णाची, चार हत्ती अभिषेक करीत असलेली, दोन हातात कमळपुष्पे आणि दोन हात वरद व अभय, आणि कमळासन असे वर्णन आढळते. त्यामुळेच अजिंठा येथील केलास लेणी यामधील शिल्प ह्या देवीचे असावे असे वाटते. लक्ष्मीला शापामुळे हत्तीचे मुख प्राप्त झाले म्हणून ती गजलक्ष्मी झाली असे स्कंदपुराण सांगते.

(स्क पु, ६-५)

गजांतलक्ष्मीची मूर्ति कशी असावी ह्याबद्दल मात्र एकमत आढळून येत नाही. (१) वस्तुतः या लक्ष्मीच्या शिल्पाला "श्री शिल्प" असे म्हटले जाते. "पद्मस्था पद्महस्ता च गजोत्क्षिप्तघटप्लुता" असे तिचे वर्णन हेमाद्रि आपल्या ग्रंथात करतात. (२) विष्णुधर्मोत्तर पुराणात ही लक्ष्मी कमळासनस्थ,

चतुर्भुज, कमळ, बिल्वफळ, शंख आणि अमृतघट धारण केलेली, असे वर्णन आहे. (३) मत्स्यपुराणानुसार ही देवी तप्त कांचनवर्णी, पद्मासनस्थ, दोन भुजा, एकामध्ये श्रीफल व दुसऱ्यामध्ये पद्म, मागील बाजूस सुवर्णघटांनी स्नान घालणारे दोन हत्ती, चार चामरधारी स्त्रिया आणि स्तुतिस्तोत्रे गाणारे दोन गंधर्व असे वर्णन आढळते. (४) "अभिलषितार्थचिंतामणी" या शिल्पग्रंथामध्ये ती गौरवर्णी, पद्मासनस्थ, एका हातात श्रीफळ व दुसऱ्यात कमळ, श्वेतवस्त्र परिधान केलेली, कानात कुंडले, गळ्यात हार, मागील बाजूस दोन चामरधारी स्त्रिया आणि सुवर्णघटांनी अभिषेक करणारे दोन हत्ती, असे वर्णन मिळते. (५) शिल्परत्न ग्रंथामध्येही असेच वर्णन असून बाजूस दोनाऐवजी चार हत्ती दाखविलेले आहेत. ह्याशिवाय ह्या देवीच्या नाण्यावर ज्या प्रतिमा आहेत, त्यावर ह्यापेक्षा निराळेच वर्णन आढळून येईल, आणि यास्तवच सुरुवातीला म्हटले आहे की, ह्या देवीच्या मूर्तीबाबत एकवाक्यता नाही

वेरूळ येथील लेण्यांमध्ये गजलक्ष्मीचे जे शिल्प आहे, त्यामध्ये लक्ष्मीच्या कमळासनाखाली आधारभूत असे दोन नाग दाखविले आहेत. मयुरभंज येथील एक मूर्ति विश्वाच्या पद्मासनावर बसलेली असून फार सुंदर आहे भारहुत, सांची, बोधगया, अमरावती इ० ठिकाणच्या बौद्धशिल्पांतही या मूर्ति आढळतात. इ. स. ६ व्या शतकातील ताम्रपटावर, गजयुक्त लक्ष्मीच्या राजमुद्राही दिसून येतात. तसेच त्यापूर्वीच्या काही प्राचीन नाण्यांवरही या देवीचे चित्र असे. साधारणत कळचुरी राजवंशापर्यंत या मुद्रा चालू होत्या शुंग व कुशाण काळातील काही मृण्मय मूर्ति आढळून आल्या आहेत कौशांबी येथेही अशी एक मूर्ति उत्खननात मिळाली आहे (भा स को २।६९७)

गजातलक्ष्मीच्या शिल्पाचा अंतर्भाव प्राचीन व अर्वाचीन दोन्ही काळच्या शिल्पामध्ये आढळतो ह्या देवीच्या कल्पना वैदिक, जैनधर्मीय किंवा बौद्ध ह्या सर्वांना संबंधीत आहेत असा कोणी वादाचा मुद्दा उपस्थित करतात परंतु श्रीसूक्त आणि नाण्यावरील श्रीशिल्पाच्या उत्क्रांतीचा क्रम, यांच्या आधाराने, गजलक्ष्मीची कल्पना फक्त वैदिककाळचीच असावी पुढील धर्मपंथाचा संबंध नाही, असे जाणकारांचे मत आहे

महाराष्ट्रामध्ये इनामदार-जहागिरदारांच्या अनेक जुन्या राजवाड्यांच्या दिंडी दरवाज्यावर गजलक्ष्मीचे चित्र कोरलेले दिसते ते सर्वसंपन्नतेचे द्योतक समजले जाते प्रवेश द्वारावर हे शिल्प कोरण्याची कल्पना बहुधा वेरूळच्या कैलास लेण्यापासून उचलली असावी कारण तेथे ती दृष्टीस पडते कलावंतांनी आणि शिल्पकारांनी आपले सर्वस्व पणाला लावून ती प्रतिकृति तयार केली असावी,

इतकी ती उत्कृष्ट आहे. मालखेडी येथील राष्ट्रकूट घराणे साधारणतः सातव्या शतकात उदयास आले; आणि गझनीच्या स्वारीनंतर सुमारे अकराव्या शतकाच्या सुरवातीस ते संपुष्टात आले. आपल्या वैभवाचे प्रतीक म्हणून ह्या राजघराण्यांच्या प्रवेशद्वारावर गजलक्ष्मीची मूर्ति स्थापन करण्याची रूढि चालू केली असावी. ह्या देवीची शिल्पे ज्याप्रमाणे वेरूळ लेण्यांत कोरलेली आहेत, त्याप्रमाणे ती सांची, भारहुत, पितळखोरा, महाबळीपुरम् ह्या ठिकाणीही आढळतात. उत्खननामध्ये ह्या देवीची स्वरूपे, आढळली आहेत, तशी ती सिलोनमध्ये काही ताम्रपटावरही आहेत. ( संजीव पी. देसाई, नवयुग, ५-११-१९६१ )

पन्हाळगड ( कोल्हापूर ) पासून काही मैलांवर मेळाणे नावाचे एक गाव आहे. पन्हाळगडच्या दिवाणी कोर्टाचे जजसाहेब श्री. रोहेकर हे फिरतीवर असताना त्यांना वरील गावी गजलक्ष्मीची मूर्ति एका घुडुपात मातीच्या ढिगाऱ्याखाली गाडलेली आढळली. ही मूर्ति सुमारे चारशे वर्षांपूर्वीची असावी असे तज्ज्ञांचे मत आहे. हिंदृष्टी, विशाल वक्षःस्थळ, समाधानी मुद्रा, पार्श्वभागी दोन हत्ती मागील पायावर उभे असून शुंडेतून लक्ष्मीला जलार्पण करीत आहेत असे वर्णन आढळते. असे दिसते की, मोगल साम्राज्याच्या काळी, मूर्तिभंजनाच्या भीतीमुळे तिला कोणतरी ह्या ठिकाणी लपवून ठेवले असावे. दैवाचे रहाटगाडगे सारखे वरखाली फिरत असते, त्याप्रमाणे देवाच्या मूर्तींच्या बाबतीतही असेच घडत असावे. देवीचा अज्ञातवासाचा काळ संपला असल्याने आणि ऊर्जितावस्था आल्याने ती श्री. रोहेकरांच्या हाती आली. गावकरी मंडळींनी त्या मूर्तीची स्थापना केलेली आहे.

इन्दापूर तहसील ( कामपूर ) मधील काळभगत ह्या गांवी एक शिल्प आहे. एका पाषाणावर एका यक्ष मूर्तीच्या मस्तकावर कोंबड्याचे चित्र कोरलेले आहे. त्याच्या पायाखाली एक भांडे असून, त्यामधून एक खांब बाजूला काढलेला आहे. त्या खांबाच्या दुसऱ्या टोकाला गजलक्ष्मीचे चित्र कोरलेले आहे. हे शिल्प फार कल्पक असून दुसऱ्या शतकातील असावे. ( J. N. Bannerji, Page 117. )

कोट्टूरु गावी ( जि. बेल्लारी ) लिंगायत धर्मप्रसारक बसप्पा लिंगस्वामी ह्यांची समाधी आहे. त्याच्या प्रवेशद्वारावर गजलक्ष्मीचे सुंदर चित्र कोरलेले आहे.

शार्दूलविक्रीडित

तेजस्वीनि गजांतलक्ष्मी वसे आजी पन्हाळ्यागडी ।
किल्ल्याच्या तटिं खोदितां परिसरी दैवावशें ह्या घडी ॥

आहे रम्य स्वरूप तें सिंहकटीं उत्तुंग वक्ष स्थळीं ।
देखोनीच कलाकृती फुलविते नेत्रद्वया पाकळी ॥ १ ॥
शुंडेमाजि धरोनि पद्मकुसुमा-माळा उभा स्वागता ।
लक्ष्मीसेवक तो गजेंद्र दिसतो मूर्तीपुढे सारखा ॥
मूर्ती संकटकाळीं तीं लपविली शत्रू जई पातला ।
दैवीचा कटु कर्मभोग सरतां आतां पडे दृष्टिला ॥ २ ॥

( १५ ) गोत्रदेवी

यमधर्माने पृथ्वीतलावर ज्या अरण्यात तपश्चर्या केली, त्याची स्मृति म्हणून शंकराकडून त्या अरण्याला धर्मारण्य असे नाव त्याने मागून घेतले. अशा पवित्र अरण्यात ब्राह्मणांनी कायमची वस्ती करून रहावे, या इच्छेने त्याने ब्रह्मा विष्णु-महेश यांजबरोबर विचारविनिमय केला. अशा मंगलमय प्रदेशात दररोज होम-हवनादि विधि व्हावेत ह्यासाठी तेथे ब्राह्मणांची वसाहत करण्याचे ठरविण्यात आले. या निर्णयानुसार आसपासच्या प्रांतातून एकूण २४ गोत्रातून अठरा सहस्र ब्राह्मणांना तेथे आणण्यात आले, आणि त्यांची वसाहत स्थापण्यात आली. यज्ञयागादि धार्मिक क्रिया योग्य तऱ्हेने चालू झाल्या. सर्व देवांना आनंद झाला. पण पुढे त्या भागात जृंभक नावाचा दैत्य होता, त्याने ब्राह्मणांना त्रास देण्यास सुरवात करताच ब्रह्मा विष्णु देव तेथे आले आणि प्रत्येक गोत्राच्या ब्राह्मणांचे रक्षण करण्यासाठी एकेक देवतेची त्यांनी स्थापना केली. हेतु हा की, त्यामुळे ती देवता राक्षसापासून ब्राह्मणांचे रक्षण करील. त्या देवतांची नावे पुढीलप्रमाणे :—

( १ ) श्रीमाता, ( २ ) तारिणी, ( ३ ) आशापुरी, ( ४ ) गोत्रपा, ( ५ ) पिप्पळी, ( ६ ) विकारवशा, ( ७ ) जगन्माता, ( ८ ) महामाता, ( ९ ) सिद्धा, ( १० ) भट्टारिका, ( ११ ) कदंबा, ( १२ ) विकरा, ( १३ ) मीठा, ( १४ ) सुपर्णा, ( १५ ) वसुजा, ( १६ ) मातंगी, ( १७ ) महादेवी, ( १८ ) वाणी, ( १९ ) मुकुटेश्वरी, ( २० ) भद्री, ( २१ ) महाशक्ति, ( २२ ) संहारी, ( २३ ) महाबळा, ( २४ ) चामुंडा.

देवांची अशी समजूत होती की, ब्राह्मणांच्या रक्षणाची व्यवस्था केली म्हणजे आता सर्व काही सुरळीत चालेल त्यामुळे त्यांनी बरीच वर्षे त्या भागाची चौकशी केली नाही. सुमारे एक शतकानंतर ते तेथे पुन्हा आले असता त्यांना काय दिसले? ते सर्व अरण्य ओसाड पडले होते आणि ब्राह्मणही तेथून निघून गेले होते. तेव्हा देवांना असे कळून चुकले की, नुसता पुरुष ब्राह्मणवर्ग

तेथे राहण्यासारखा नव्हता. कारण त्यांच्या पोटाचे साधन आणि संसारी आयुष्याची काहीच सोय तेथे केलेली नव्हती. म्हणून त्यांनी त्या पूर्वीच्या ब्राह्मणांना पुन्हा परत आणले आणि विश्ववसु गंधर्वाच्या साठ सहस्र कन्या व सोळा हजार वेश्या तेथे आणून ब्राह्मणांबरोबर त्यांचे विवाह लावून देण्यात आले. तसेच कामधेनूची प्रार्थना करून तिच्या दिव्य देहापासून शिखा व यज्ञोपवित धारण केलेले ३६ सहस्र वैश्य निर्माण करून ब्राह्मणाचे रक्षण करण्यासाठी तेथे ठेवले. हे वैश्य सर्व शस्त्र-शास्त्रपारंगत होते. त्यांची लग्ने लावून देण्यात आली. ह्याप्रमाणे धर्मारण्यात वस्ती करविण्यासाठी देवांनी अत्यंत प्रयत्न केले.

(स्कंद पुराण, धर्मारण्य खंड, अध्याय ९–१०).

भारतीय आर्यांनी जंगले तोडून कशा प्रकारे तेथे वसाहती स्थापन केल्या, त्याचे वरील रूपक एक उत्कृष्ट उदाहरण होय. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य समाज त्या जागी आणून त्यांची लग्ने लावून देण्यास आणि कायम वस्ती करण्यास मदत केली हे ह्यावरून समजून येते. शीतवाडिया, भट्टारिका, भगोडोआही, चचाई ह्या देवता विश्वामित्र, भार्गव, अंबरीष, अंगिरस, भारद्वाज, कुत्स ह्या गोत्रांच्या कुलदेवता मानल्या आहेत.

## (१६) गौरी

हिमवानाच्या कन्येचे नाव पार्वती असे होते. तिने शंकराची आराधना करून त्याची पति म्हणून प्राप्ति करून घेतली. पार्वतीचा वर्ण सावळा होता म्हणून शंकर कधीकधी नववधूला "काळी काळी" म्हणून चिडवीत असत. पण ह्या ठिकाणी पार्वती काळी असण्याचे दुसरे एक कारण संभवते. अंधकासुर दैत्य तपसामर्थ्यामुळे पृथ्वीवर फार प्रबळ झाला आणि त्याच्या पारिपत्यासाठी ब्रह्मा-विष्णु महेश ह्या तीन श्रेष्ठ देवांनी आपल्या एकत्रित केलेल्या तेजापासून एक स्त्री निर्माण केली. पुढे ह्या स्त्रीला काय नाव द्यावे, ह्याबद्दल वाद उपस्थित झाला, आणि तिघांपैकी प्रत्येकजण 'नाव ठेवण्याचा माझा हक्क आहे.' असे सांगू लागला. यावर अशी तोड काढण्यात आली की, तीन रूपे अलग करण्यात यावी आणि नंतर प्रत्येकाने एकेका रूपाला नाव ठेवावे. म्हणून ह्या स्त्रीला तीन रूपात प्रकट व्हावयास सांगण्यात आले. आणि त्याप्रमाणे तीन रूपे तयार झाली. शुभ्रवर्णीला सरस्वती, रक्तवर्णीला लक्ष्मी आणि श्यामवर्णीला पार्वती अशी नावे देण्यात आली.

(Kennedy, Hindu Mythology, Page 209).

पार्वतीचा उगम कसाही घेतला तरी वर्ण सावळा होता आणि शंकरांना तेवढे कारण पुरेसे होते. पार्वतीला फार सहन झाली नाही. ती विंध्य-पर्वतावर

गेली. तपश्चर्या केली, ब्रह्मदेव प्रसन्न झाल्यावर तिने त्याच्याकडे 'आपला वर्ण गोरापान व्हावा" असा वर मागितला. ब्रह्मदेवाने 'तथास्तु' असा आशीर्वाद दिल्यावर सर्प कात टाकतो, त्याप्रमाणे पार्वतीच्या सावळ्या वर्णाची खोळ बाहेर निघून गेली. शरीरावरील सावळ्या वर्णाचा पापुद्रा निघून गेल्यावर पार्वती गौरवर्ण झाली. त्या दिवसापासून पार्वतीला गौरी हे नाव प्राप्त झाले. हाच कथाभाग थोड्याफार फरकाने कौशिकीच्या उत्पत्तीच्या वेळी आलेला आहे. पण तेथे जगदंबा उमा स्वरूपात होती, असे म्हटले आहे. वृत्तांत जरी समाधानकारक वाटत नसला तरी तसा देण्यात आलेला आहे.

पार्वतीचे गौरी हे एक नाव आहे. याच नावावरून नवगौरी हे नाव आले असून नवगौरीयात्रा प्रसिद्ध आहे आणि वाराणसी क्षेत्री ती कशी केली जाते, हे 'वाराणसी देवता' ह्या प्रकरणात पाहावयास मिळेलच.

गोरखपूर, कल्याण शक्ति अंक सन १९३४ मध्ये ह्या देवतेची चित्रे व स्वरूपाचे वर्णन करणारे श्लोक आढळून आले आहेत परंतु इतर माहिती त्यामध्ये अगर इतर ठिकाणी उपलब्ध झालेली नसल्याने देता आली नाही दुर्गादेवीची प्रासंगिक जी नऊ नावे आहेत त्यांना नवदुर्गा असे म्हणतात ह्या देवतांची स्थाने वाराणसी येथे आहेत आणि नवदुर्गायात्रा जे यात्रिक करतात त्यांना ती अवगत आहेत. ('वाराणसी देवता' पहा) ह्या देवतांचा एकच समूह असल्याने त्यांना एकाच ठिकाणी ठेवले आहे व संस्कृत श्लोकाबरहुकुम मराठीत एक एक श्लोक दिलेला आहे. सर्व संस्कृत श्लोक कल्याण शक्ति अंक, पृ. ६१५ वर पाहाण्यास मिळतील. या नवगौरीपैकी कात्यायनी व काळरात्री यांची माहिती इतरत्र येऊन गेली असल्याने, द्विरुक्ति केलेली नाही. म्हणजे उरलेल्या सात देवता ह्या ठिकाणी आढळतील.

ह्या देवीची मूर्ति तयार करताना कधी दोन तर कधी चार भुजा दाखविल्या जातात दोन हात असतील, तेव्हा एक वरद आणि दुसरा अभय असतो ज्या वेळी चार हात असतील, तेव्हा एका हातात अक्षमाळा, दुसऱ्यात पद्म, तिसऱ्यात कमंडलू आणि चवथा हात अभय असतो (विष्णुधर्मोत्तर पुराण)

केदारनाथाच्या मार्गावर गौरीकुंड नावाचे स्थान आहे त्या ठिकाणी गौरीचे मंदिर आहे. थंड पाण्याच्या कुंडाला अमृतकुंड व गरम पाण्याच्या कुंडाला गौरीकुंड असे म्हणतात. (कल्याण, शक्ति अं, पृष्ठ ६७४.)

भारतामधील स्त्रिया गौरीव्रत म्हणून एक व्रत आचरतात. त्या ठिकाणी गौरीची उत्पत्ति महालक्ष्मीने केली आणि तिने असुराचा नाश करून स्त्रियांचे सौभाग्य राखले, अशी कथा सांगितली जाते. या देवीचे एक प्रमुख स्थान कनोज शहरी आहे.

या देवतेला तांत्रिक संप्रदायामध्येही स्थान आहे. तसेच जैन पंथियामध्ये या नावाची यक्षिणी आहे. या दोन्ही पंथांमध्ये मूर्ति चतुर्भुज पण आयुधे मात्र निरनिराळी दाखविली आहेत.

बौद्धाच्या वज्रयान पंथामध्ये गौरी या लोकप्रिय देवता म्हणून मानलेल्या आहेत. या द्विभुज असून, एका हाती आयुध व दुसरा हात तर्जनी मुद्रा असतो. या सर्वजणी भेसूर मुंडमाळा धारण करतात. त्यांची नावे, वर्ण आणि आयुध खालीलप्रमाणे— ( १ ) गौवी— गौरवर्ण, अंकुश; ( २ ) चौरी— पीतवर्ण, पाश, ( ३ ) वेताळी— रक्तवर्ण, सांखळी, ( ४ ) घासमारी— हरितवर्ण, घंटा; ( ५ ) पुष्कशी— नीलवर्ण, घट; ( ६ ) शबरी— श्वेतवर्ण, मेरुपर्वत, ( ७ ) चंडाळी— नीलवर्ण, अग्निकुंड; ( ८ ) डोंबी— विश्ववर्ण, पताका.

( तिबेटमध्ये या पंथाचे बरेच वर्चस्व असल्याने वरील लोकमातांना, अष्टनायिका मानलेल्या आहेत, पण दोन-तीन नावांमध्ये फरक दिसून येईल, तसेच वर्णामध्येही फरक आहे ).

## ( १७ ) चंद्रवदनी देवी

उत्तर प्रदेशात टिहरी ते देवप्रयाग यांच्या मधील घनदाट अरण्यात, हिमालयाच्या कुशीत, उंच पर्वतमाथ्यावर दाक्षायणी सतीच्या बावन्न पीठांपैकी, हे स्थान मानतात. या पीठस्थानाला चंद्रवदनी असे म्हणतात. हे शिखरस्थान पायथ्यापासून थेट वरच्या सपाटीपर्यंत सुळक्याप्रमाणे हळूहळू निमुळते होत गेलेले आहे. अत्यंत अवघड अशा एका पाऊलवाटेने, शिखरमाथ्यावर जाता येते. हिमालयाची निसर्गरम्य वनश्री येथून मनाला फार आल्हाद देते. वरील सपाटी- वर एक लहानसर दगडी बांधणीचे, खूपच ठेंगणे मंदिर आहे; आणि मागील बाजूस लहानशी उतारूसाठी धर्मशाळा आहे. यांव्यतिरिक्त तेथे इतर इमारती नाहीत. लहानसर मंदिर बांधण्याची आवश्यकता निसर्गानेच उत्पन्न होते. प्रचंड सहावात आणि हिमवर्षाव यांना वर्षानुवर्षे तोंड देण्यासाठी पर्वतमाथ्यावर अशी मंदिरे बांधतात. देवीचा गाभारा, स्वयंपाकघर आणि पूजकाची राहण्याची सोय, सर्व एकाच ठिकाणी आहे.

या मंदिरात देवीची मूर्ति नाही, तर एक यंत्र प्रतिष्ठित केलेले आहे. अशी कथा या ठिकाणी प्रचलित आहे की, दक्षयज्ञाच्या वेळी, सतीने आपला देह दग्ध करुन घेतल्यावर सुदर्शनचक्राने जेव्हा त्याचे तुकडे केले, तेव्हा त्यांतील वक्षःस्थळ भाग या ठिकाणी पडला, म्हणून हे पीठस्थान झाले. पण ही स्थानिक समजूत खरी नाही. कारण पीठनिर्णय ग्रंथाप्रमाणे, वक्षःस्थलांचे दोन भाग जालंदर आणि रामगिरी या ठिकाणी पडले असे सांगितले आहे. या क्षेत्राची प्रथा अशी की, देवीचे यंत्ररूपी मूळ स्थान कोणी पहावयाचे नाही, तसे धाडस कोणी केल्यास त्याला तावडतोब मृत्यु येतो. यास्तव गाभान्यावर आच्छादन म्हणून नेहमी एक चांदवा पसरलेला असतो. हा चांदवा बदलतानाही अतिशय काळजी घेतली जाते. प्रथम नवीन चांदवा वर पसरावयाचा, आणि नंतर जुना चांदवा हळूच खालून ओढून घ्यावयाचा. ही खबरदारी फक्त मूळ यंत्रस्थानापुरतीच मर्यादित आहे.

असे सांगतात की, आद्य शंकराचार्य धर्मोपसंचालनाचे वेळी या ठिकाणी आले होते, आणि स्थानमहात्म्य नष्ट होऊ नये, भ्रष्ट होऊ नये, म्हणून त्यांनीच वरील दंडक घातलेला आहे. वरील दंडकाचे पालन व्हावे, आणि या ठिकाणी निराशा होऊ नये यासाठी त्यानी पूजेसाठी निराळे यंत्र प्रतिष्ठित केले आहे. याचीच पूजाअर्चा होते, आणि यात्रिकाना दर्शन घडते.

येथील मूळस्थानाच्या आच्छादनरूढीवरून असे म्हणता येईल की, अरासुरी अंबा, अंबेजोगाई इ० इ० यांच्या मूर्ति चांदीच्या निरनिराळ्या आकाराच्या आच्छादनानी, झाकून ठेवण्याची प्रथा का अस्तित्वात आली; त्याचा उगम वरील कथेत असावा. हे क्षेत्र टेहरी संस्थानच्या हद्दीत असल्याने तेथील पूर्वीच्या राजाने, येथून जवळच असलेले "पूजार गाव" देवीच्या खर्चासाठी लावून दिलेले आहे. देवीचा ब्राह्मण पुजारी या गावाचे उत्पन्न वंशपरंपरेने वसूल करून, देवीच्या पूजादि विधीसाठी खर्च करतो. दुसऱ्या पहारेकरी सेवकाला यातूनच काही तनखा मिळतो. मंदिराजवळ पाण्याची सोय नाही. तेव्हा पहारेकरी सेवकाने पाणी पायथ्याच्या गावातून वर नेल्यावर नैवेद्य तयार होतो. येथील नैवेद्याचा प्रकारही वैशिष्ट्यपूर्ण आहे. दररोज पात्यावर ओले तांदूळ वाटून, तो गोळा तेलात परतून, त्याच्या बरोबर थोडे दूध घेऊन नैवेद्य करावयाचा. काही वेळा यात्रिक अगर पूजक सर्व प्रसाद भक्षण करतात. रात्री मंदिरात कोणालाही झोपावयास देत नाहीत.

या स्थानाला चंद्रवदनी देवी नाव पडले याचा धागादोरा मिळालेला नाही. मूर्तीच नसल्याने स्वरूपावरूनही अनुमानणे बरोबर होणार नाही. (हिमालयाचे कुशीत, स्वामी अखंडानंद)

(१८) कूष्मांडिणी

वसंततिलक

कूष्मांडिनी वहन शार्दुल तूज साजे।
शस्त्रायुता दशभुजा रणिं रूप तुझें ॥
शोभे घडा रुधिर अमृतपूर्ण हातीं।
मीं वंदितों तव स्वरूपहि दोन हातीं ॥ १ ॥

(१८ अ) चंद्रघंटा

पृथ्वी

तुझें सजविलें महाप्रखर रूप व्याघ्रावरीं।
दशाभुजहि दाविले वदति चंद्रघंटा वरी ॥
अरक्त-वसना-युता अमित शस्त्र हातीं दिलें।
प्रसाद कर तूं मला अणिक जे तुला वाकलें ॥ २ ॥

(१९) ब्रह्मचारिणी

अनुष्टुभ्

करपद्मीं तुझ्या शोभे, अक्षमाला कमंडलू
हे ब्रह्मचारिणी देवी दयाळू, दास मंडळू ॥ ३ ॥

(२०) महागौरी

शिखरिणी

महागौरी देवी शिव-वृषभ आरूढ दिससी।
महावस्त्रें अंगावरि हिमकणे शुक्र वरिसी ॥
चतुर्हस्ता शूलांकित डमरु शोभे तव करीं।
स्वभक्तांच्या इच्छा पुरविशि तुला वंदन करी ॥ ४ ॥

(२१) सिद्धिदात्री

मंदाक्रांता

देवी घेते कमलदलही आसनाते पवित्र।
चारी हातीं मिरवित गदा शंख पद्मादिचक्र ॥

सेनाभावें स्तविति तुजला यक्षगंधर्व विप्र।
राहो माझें मन तवपदीं सिद्धिदात्री विरक्त ॥ ५ ॥

## ( २२ ) स्कंदमाता

वसंततिलक

शोभे हरी वहन देवि किरीट माथा।
ती घेतसे कमळ-पुष्पहि चारि हातां ॥
मांडीवरी तव षडानन बाळ माते।
ते देवता-चरण वंदित स्कंदमाते ॥ ६ ॥

## ( २३ ) शैलपुत्री

वसंततिलक

शोभे युवा वृषभ आरूढ शैलपुत्री।
शस्त्रे धरी कमळ शूल स्वकीय हातीं ॥
चंद्राकृती पटल शोभत पार्श्वभागीं।
मीं वंदितों चरणयुग्म यशप्रदायी ॥ ७ ॥

प्रथमं शैलपुत्रीति द्वितीयं ब्रह्मचारिणी।
तृतीयं चन्द्रघण्टेति कूष्माण्डेति चतुर्थकम् ॥

ह्याप्रमाणे दुर्गाकवचामध्ये नवदुर्गांची नावे देताना ती, शैलपुत्री, ब्रह्मचारिणी, चंद्रघंटा, कूष्मांडिणी, स्कंदमाता, कात्यायनी, काळरात्री, महागौरी, सिद्धिदात्री अशी दिली आहेत.

## ( २४ ) चक्रपदीदेवी

" चक्रपदि जयोऽस्तु " अथवा " शतञ्जीवो " असे म्हणण्याची रूढि पंजाबप्रांती आढळून येते. माणसाला जेव्हा शिंक येते तेव्हा ह्या देवीचा नामोच्चार केला जातो. भारतातील अनेक प्रांतांमध्ये शिंक आल्यावर वरील अर्थाचे वाक्य उच्चारण्याची रीत आहे. महाराष्ट्रात " सत्य जय " असे म्हणण्याचा प्रघात आहे. प्रस्तुत ग्रंथाच्या लेखकाची माता ह्याचा उच्चार करीत असे. ह्या देवतेच्या उत्पत्तीविषयी एक कथा त्या प्रांती रूढ आहे, ती अशी—महादेवाला एकदा एक मोठी शिंक आली आणि त्याच वेळी त्याच्या नाकपुडीमधून एक मोठी माशी

बाहेर पडली. ब्रह्मदेवाच्या नाकपुडींतून बाहेर पडल्यामुळे तिला तावडतोब देवत्व प्राप्त झाले आणि तिचे नाव "चकपदी" असे ठेवले गेले. वेदातील एका ऋचेमध्ये ह्या देवीच्या नावाचा उल्लेख आढळतो. ( लाहोर जिल्हा गॅझेट, पृष्ठ २१६ ).

माणसाला येणाऱ्या शिंकेची उपयुक्तता दाखविण्यासाठी ह्या ठिकाणी देवीची स्थापना दाखविली असावी. शरीरात शिरलेली अनाहुत द्रव्ये, अगर शरीरकार्यात तयार झालेली दूषित द्रव्ये वायूच्या झटक्याबरोबर बाहेर फेकली जाऊन, शरीरस्वस्था व शरीरयन्त्रणा व्यवस्थित राखण्याचे कार्य या वायुशक्तीमुळे होत असल्याने, त्या शक्तीला देवता मानली असावी.

माणूस बाहेर निघताना अगर महत्त्वाच्या कार्यासंबंधी वाटाघाटी चालल्या असताना, जर एखाद्याला शिंक आली, तर कार्य सफल होईल अथवा कार्यात अडथळा येईल ह्याचा शकुन काही आडाख्यावरून वर्तवितात. प्रतिकूल शिंक असेल तर काही वेळा जाणे लांबणीवर टाकले जाते.

"घराच्या उंबऱ्यावर शिंकू नये" अशी प्रतिबंधात्मक म्हण मराठी भाषेत आहे. ह्याची उत्पत्ति शोधताना असे आढळून आले आहे की, पूर्वी दिंडी दरवाजा अगर घराचे प्रवेशद्वार खुजे असे. त्यामुळे घरात प्रवेश करताना कित्येक वेळा मान वाकवून आत शिरावे लागे. ह्या कारणामुळे एखादा जर दरवाज्याच्या उंबऱ्यावर उभा राहिला आणि शिंकला तर शिंकून झाल्याबरोबर जी मान वर जाते, ती वरच्या भागाला आपटेल व डोक्यावर इजा होईल. हे टळावे म्हणून वरीलप्रमाणे आज्ञा झाली आहे

२५ जगद्धात्री

मृगेन्द्रोपरि सुस्मेरा सर्वालंकारभूषिता ।
चतुर्भुजा महादेवी रक्ताम्बरधरा शुभा ॥
बालार्कसदृशीदेहा नागयज्ञोपवितिनी ।
त्रिनेत्रा कोटिचन्द्रभा देवर्षिमुनिसेविता ।
दर्शयामास देवानामेवं रूपं जगन्मयी ॥ ( कात्यायनी तंत्र )

वरील तंत्रात या देवतेची उत्पत्ति खालील प्रमाणे दिली आहे. एकदा इंद्र, अग्नि, वायु इ० देवांना आपल्या स्व सामर्थ्याचा अहंकार झाला. दुर्गा देवीला ही गोष्ट आवडली नाही. देवांच्या गर्वहरणासाठी तिने जगद्धात्री देवीचे रूप घेतले. त्या भयंकर स्वरूपाला पाहून देवही भयभीत झाले. या देवतेची माहिती

करून घेण्यासाठी प्रथम वायूला तिच्याकडे पाठविले. देवीने सांगितले की जगताला पेलून धरण्याचे सामर्थ्य तुजमध्ये असेल, तर ही गवताची काडी उचलून दाखीव वायूला ती उचलता आली नाही. तसेच अग्नीला ती जाळता आली नाही. अशा-रीतीने पजित झालेले देव, त्या देवीस्वरूपाला शरण गेले आणि मूळरूप दाख-विण्याची विनती केली. देवीने आपले स्वरूप दाखविले. हे प्रारंभीच्या श्लोकात वर्णन केलेले आहे.

सकाळी, मध्यान्ही व सायंकाळी या देवतेची पूजा करतात. त्याला त्रिगुण पूजा म्हणतात कार्तिक शुद्ध सप्तमी ते दशमीपर्यंत हिचा उत्सव साजरा करतात आणि दशमीला प्रतिमेचे विसर्जन करतात. याच देवीने शुंभ निशुंभांना मारले व त्या दिवसापासून त्रेतायुगाला प्रारंभ झाला, अशी लोकसमजूत आहे. (भा. स. को., पृ. ५२२)

विष्णुपुराणामध्ये लक्ष्मी अथवा श्री हिला प्रमुख मातृदेवता मानलेली आहे. तिला जगन्माता असेही म्हटले आहे (८-१५-२८). तिचे मातृत्व वेदगर्भा, यज्ञगर्भा, सूर्यगर्भा, देवगर्भा, दैत्यगर्भा इ० नावानी व्यक्त केले आहे. याचाच अर्थ ती विश्वाची माता असून जगद्धात्री या नावाने संबोधिली आहे. बंगाल प्रांती लक्ष्मीची याच स्वरूपाची पूजा जास्त प्रमाणात होते. मार्कंडेय पुराणात (२३-१०-४८) सरस्वतीचे रूप विश्वरूप मानले असून, पृथ्वीचा क्रम चालू ठेवणारी म्हणून जगद्धात्री म्हटले आहे. त्याच पुराणात लक्ष्मी देवीला अंबिका नावाने संबोधिले आहे. (अध्याय ७४ पहा) (The Shakti Divine Power by S K Das, P 42)

जगाची उत्पत्तिशक्ति ब्रह्मा, परंतु संवर्धनशक्ति विष्णु होय. विष्णुसूक्तामध्ये ह्या शक्तीचे संपूर्ण विवरण आढळून येईल. जगद्धात्री देवीच्या रूपामध्ये धृति आणि ज्ञानशक्ति ह्यांचा विकास झालेला दिसेल. ह्या देवीची आयुधे शंख, चक्र, धनुष्य व पांच बाण अशी विष्णूच्याच आयुधाप्रमाणे आहेत म्हणून ही देवता म्हणजे विष्णुशक्तीचाच अवतार समजतात या देवीचे वर्णन करताना ती सिंह-स्कंधावर आरूढ झालेली, नाना अलंकार धारण केलेली, चतुर्हस्ता, नागरूपी यज्ञोपवित धारण करणारी, वरीलप्रमाणेच आयुधे घेतलेली, रक्तवस्त्रे परिधान केलेली, बालार्क सदृश्य शरीरकांती, नारद आदि मुनीगण जिची सेवा करीत आहेत अशी, सिंहाच्या पाठीवर कमळासनावर बसलेली असे केले जाते शिवशक्ति ही जरी संहारकशक्ति असली तरी तिलाही काही वेळा विष्णूच्या शस्त्राचा उपयोग करावा लागतो

(कल्याण, शक्ति अंक, १९३४, पृष्ठ ३५४)

अनुष्टुभ

आधारभूत विश्वासी, श्रुतिरूपे धुरंधरे।
ध्रुवे ध्रुवपदे धीरे, जगद्धात्रीसि वंदन ॥ १ ॥
शक्तिरूप शवाकार शक्तिविग्रहकारिणी।
शक्ति आचारप्रीयांबे जगद्धात्रीसि वंदन ॥ २ ॥
जयदे जगदानंदे जगत्सर्वेही पूजिते।
जय भक्तासि तू देसी जगद्धात्रीसि वंदन ॥ ३ ॥
परिमाणू स्वरूपासि इच्छामात्रेचि होतसे।
भव्यांत भव्य तूं होमी जगद्धात्रीसि वंदन ॥ ४ ॥
महाविद्ये महोत्साहे महामाये वरप्रदे।
प्रपंचसार साध्वी तूं जगद्धात्रीसि वंदन ॥ ५ ॥
अगम्य जगतामध्यें वराङ्गने महेश्वरी।
अशेष रूप तें देवूं जगद्धात्रीसि वंदन ॥ ६ ॥
दयारूपे दयादृष्टे दयार्द्रे दु:ख मोचने।
निवारी सर्व आपत्ती जगद्धात्रीसि वंदन ॥ ७ ॥
यज्ञ दान-तप:-तीर्थ पूजनीं तव साधती।
निर्मुक्त करि पापांतें जगद्धात्रीसि वंदन ॥ ८ ॥

●

## ( २६ ) दुर्गा

ये त्वा देवि प्रपद्यन्ति ब्राह्मणा हव्य वाहनीम्।
अविद्या बहुविद्या वा सन्' पर्षदति दुर्गाणि ॥

(ऋग्वेद १०-१२७-२६.)

दुर्गादेवीचे प्रथम दर्शन ऋग्वेदातील वरील सूक्तामध्ये आढळते. हे दुर्गा-स्तोत्र १७-१८ श्लोकाचे असून " भक्ताचे आधारस्थान आणि बहुजनाना प्रिय असणाऱ्या दुर्गादेवीचे स्तोत्र मी जाता गातो " अशी त्याची सुरुवात आहे. दुर्गादेवी ही हवनीय द्रव्य वाहून नेणारी, विद्वान-अविद्वानाना संकटांतून तारणारी, अमीतमान तेजस्वी अशी आहे. ही देवी समुद्रातील नौकेप्रमाणे भक्ताना संसारसागरातून पार करून पैलतीराला नेते. किल्ल्यामध्ये बदिवान असलेले, घोर रणकंदनात असलेले तसेच अग्नि व चोर यांच्या तडाक्यात

सापडलेल्या भक्ताना ती सुरक्षित ठेवते भयंकर कठीण प्रदेशात अगर एखाद्याला पकडून निबिड अरण्यात ठार करण्यासाठी नेल्यास दुर्गादेवी त्याला निर्भय बनविते हे दुर्गास्तोत्र पठण करणाऱ्यांना अनेक फायदे होतात

महाभारताच्या विराटपर्वामध्ये दुर्गा ही नारायणाची स्त्री म्हटले असून भीष्मपर्वात ती शंकराची स्त्री असे प्रथमच म्हटलेले आढळते (भारतीय विद्या भवन इतिहास, भाग दुसरा, पृष्ठ ४६६) हरिवंशामध्ये ह्या देवीला विंध्य पर्वतावर स्थान दिले असून ती त्यामुळे विंध्यवासिनी दुर्गा ह्या नावाने प्रसिद्ध आहे ह्याचा अर्थ असा घेता येईल की, मगध, मैथिली भागात राहणारे शबर, भिल्ल आदि अनार्य लोक यांनी ह्या देवीची स्थापना आपल्या भागात केली, अगर आर्यांची ही देवता त्यांनी आत्मसात केली ह्याचे कारण असे की, अनार्य जमातींपैकी अनेकजण ह्या देवीचे आजही उपासक आहेत ह्या देवीनिमित्त नवरात्रामधील शबर लोकांचा "शबरोत्सव" हीच साक्ष देईल. धर्मराजाने दुर्गाकवच केले हे प्रसिद्धच आहे हे स्तोत्र, त्यांनी अज्ञातवासामध्ये फिरत असता विराट नगराच्या प्रवेशद्वारी आल्यावर तेथे दुर्गादेवीची मूर्ति पाहिली, तेव्हा स्तोत्र रचून आपला तेथील अज्ञातवासाचा काळ निर्विघ्नपणे पार पडावा अशी प्रार्थना केली, त्या वेळेचे आहे ह्या सर्वांचा मतितार्थ इतकाच की, दुर्गा ही देवता फार प्राचीन म्हणजे ऋग्वेद काळापासून चालत आलेली आहे

दुर्गा शंकराची जोडीदारीण झाल्यावर ती एक आदिशक्ति बनली वेळ प्रसंगी तिच्यापासून अनेक देवता उत्पन्न झालेल्या दिसतात नवदुर्गा स्तोत्रामध्ये या देवीची ही नावे पहा—(१) रुद्रांश दुर्गा, (२) वनदुर्गा, (३) अग्नि-दुर्गा, (४) जयदुर्गा, (५) रिपुमारी दुर्गा, (६) नीलकंठी दुर्गा, (७) क्षेमकरी दुर्गा, (८) विंध्यवासिनी दुर्गा व (९) हरिसिद्धी दुर्गा ही स्वरूपे आगम ग्रंथामध्ये आढळून येतात या नवदुर्गा देवींची वर्णने रूपमंडण, शारदा तिलक, कारणागम इत्यादि ग्रंथामध्ये आढळून येतात, अगर टी ए गोपिनाथराव यांच्या "Hindu Iconography" ह्या ग्रंथामध्ये आढळतात ही रूप विशेष पूजनात नसल्याने त्यांचे सविस्तर वर्णन येथे दिलेले नाही आसुरी दुर्गा म्हणून तांत्रिकांची एक देवता आहे, असे विद्यार्णव तंत्र सांगते

सात्त्विकी, राजसी व तामसी अशा त्रिगुणांनी ही देवी युक्त असल्यामुळे हिला त्रिगुणात्मिका असे म्हटले आहे हे त्रिगुणात्मकरूप असून कर्तृत्वशाली असल्यामुळे सकलगुणमयी सर्व देव मानव या देवीला शरण जातात, आणि तिच्या कृपेने सकलसुख होतात असा अनुभव आहे ह्या देवीच्या स्वभावाचा आविष्कार करणारी अनेक रूपे दाखविली आहेत उदा॰ गौरी, काली, चंडी,

रौद्रा, भास्करा, त्रिपुरा, कोल्वो (पूर्व दिशेला वराह गिरीवर), कपालेशी (कोल्वो देवीजवळच), सुवर्णाक्षी, चर्चिता, त्रैलोक्यविजया, वीरा, भूतमाला इ. इ. (चिनावकोश, पृ. २४४.)

महानवमी व्रताची माहिती देताना खालील वर्णन आढळते—

नवमीं केवला चापि दुर्गां चैव तु पूजयेत् ।
महाव्रतं महापुण्यं शंकराद्यैरनुष्ठितम् ॥
दुर्गे दुर्गे रक्षिणी स्वाहा यन्मोऽयं पूजनादिषु ।
दीर्घकारादि मित्राभि नवदेव्यो नमोऽन्विकः ॥
रुद्रचंडा प्रचंडा च चंडाग्रा चंडनायिका ।
चंडा चंडवती चैव चंडरूपातिचंडिका ॥
नवमीं चोग्रचंडा च मध्यामाग्निप्रभाकृती ।
रोचना करुणा कृष्णा नीला धूम्रा च शुक्ला ॥
पीला च पांडुराप्रोप्तां आलिढं हरितं तथा ।
महिषोऽस्य खड्गाग्रकचग्रहमुष्टिकाः ॥

(गरूड महापुराणामृत, पूर्वखंड, प्रथम शाखा, आधारखंड)

महाभारतामध्ये अर्जुनाने दुर्गादेवींची स्तुति केली असून तो सर्व भाग फार उत्तम आहे. तिच्या कर्तृत्वाचे समग्र वर्णन येथे आढळून येईल. (महाभारत ६–२३). ही हिमवानाची मुलगी असे केनोपनिषद म्हणते, तर ही मेरूपर्वताची मुलगी असे रामायण सांगते (१–३५–१४). हिमवानाच्या एकपर्णा व पाताला नावाच्या दोन मुली होत्या. त्यापैकी एकपर्णा हीच दुर्गादेवी होय. तिचे लग्न जयगीस्वय ऋषीबरोबर व पातालाचे लग्न आसितदेवल ऋषींबरोबर झाले (हरिवंश ९४३). कित्येक वेळा दुर्गा ही विष्णूची बहीण दाखविली आहे (हरिवंश१०२३५) काही वेळा ती इंद्राची बहीण असेही म्हटले आहे (हरिवंश ३२६०). दुर्गा ही सूर्याची मुलगी विरोचनाच होय, अगर गौतमी म्हणजे सप्तऋषींची सहचारिणी होय (तैत्तिरिय अरण्यक, १०–१–७).

भगवान शंकर आणि त्रिपुरासुर ह्यांचे युद्ध चालू असता, दैत्याच्या शक्तीपुढे शंकरांचा उपाय चालेना, तेव्हा त्यांनी आपली अस्त्रे खाली ठेविली आणि ते विचारमग्न झाले. ह्या वेळी नारायणाच्या आदेशावरून ब्रह्मदेव रणामध्ये आले आणि त्यांनी शंकरांना उपदेश केला की, या समयी आदिशक्ति दुर्गादेवींचे स्तोत्र गायल्याने ती युद्धामध्ये सहाय्य करून जय मिळवून देईल. ह्यास्तव

शंकरानी जे स्तोत्र गायिले, त्याचा मतितार्थ असा की, "हे दुर्गादेवी, तू संकटाचे हरण करणारी आहेस. मी तुझा भक्त आणि अनुचर आहे. शत्रूने मला घेरले आहे. त्या संकटातून तू मला वाचव. तू नारायणाची आवडती असून ब्रह्मदेवाच्या शिरीचा ताज आहेस. तू ब्रह्मदेव आणि इतर देवांची माता आहेस. गुणदर्शक विशेषण लावले असता तू गोचर आहेस. परंतु तसे नसेल तर तू अगोचर आहेस. तूच आदिशक्ति होय. तू काही वेळा ब्रह्मदेवाच्या रूपाने सृष्टि निर्माण करतेस. वेदमाता सावित्री तूच होय. वैकुंठामध्ये तू महालक्ष्मी, तर क्षीरसागरामध्ये तू विष्णुप्रिया होतेस. गोलोकामध्ये तू हरिप्रिया राधा होय. वृंदावनामध्ये वृंदा होय. शंभर शिखरे असणाऱ्या पर्वतावर तुझी सत्ता चालते. तू चंद्रावळी होय. काही वेळा तू दक्षकन्या तर दुसऱ्या वेळी पर्वतकन्या पार्वती होय, अगर लोकमाता अदिति होय. तात्पर्य, तू मानव, स्त्री आणि नपुंसक या त्रिवेणीची दर्शक आहेस. वृक्षबीज तूच, अग्नीची जळणशक्ति तूच अगर ज्वाळांचा शीतलपणाही तूच होय. इत्यादि." (ब्रह्माण्डपुराण, अध्याय ८८।१५-२९.)

हा परिच्छेद मुद्दाम विस्तृतपणे देण्याचे कारण इतकेच की, आदिशक्ति दुर्गा, त्रिपुरा, माया, पार्वती ही सर्व स्वरूपे एकच होत, हे दर्शविण्याची इच्छा आहे. दुर्ग राक्षसाला ठार मारले म्हणून दुर्गा हे नाव कारणपरत्वे आले इतकेच! पण ते यथार्थ नव्हे. आदिशक्तीच्या अनेक नावांपैकी जे ज्याला प्रिय वाटले ते त्याने देण्यास सुरुवात केली असावी. एकाच देवीचा अनेक नावाने उपयोग केला जातो, यातील मर्म हेच होय. दुर्गादेवीच्या वरील वर्णनाप्रमाणे उद्धवाने राधेचेही वर्णन केलेले आहे. तेव्हा नावावरून तेवढाच बोध न घेता ते आदिशक्तीचे एक स्वरूप मानले पाहिजे.

वरील विवेचनावरून एका कोड्याचा उलगडा होईल की, वरील उल्लेखामध्ये काही ठिकाणी ती विष्णूची प्रिया अगर बहीण, शंकराची प्रिया अगर बहीण, किंवा मेरुपर्वताची अगर हिमालयाची मुलगी का समजण्यात आली आहे. रुद्राच्या वर्णनात अंबा ही अनेक नात्यांनी शंकरांबरोबर जोडलेली आहे, त्याचेही मर्म हेच आहे. वरवर पाहणाऱ्याला अंबा ही माता, अंबा ही बहीण आणि अंबा ही पत्नी अशी निरनिराळी नाती दिसली तरी आदिशक्तीच्या स्वरूपाची ज्याला पूर्ण कल्पना आली आहे त्याला त्यामध्ये काहीही वावगे दिसणार नाही, आणि ते दिसूही नये. तरच त्याला गुढार्थ कळला असे म्हणता येईल.

बंगालमधील दिनाजपूर जिल्ह्यांत पोरशा ह्या गावी नवदुर्गादेवीची मूर्ति आढळली आहे. या ठिकाणी दुर्गादेवी आठ देवतांमध्ये उभी असून तिला अठरा हात दाखविले आहेत.

दुर्गादेवी ही एक आदिशक्ति मानली गेली असल्याने पार्वती, अष्टभुजा, महिषासुरमर्दिनी इ० देवींना दुर्गादेवी ह्याच नावाने संबोधिले जाते. परंतु ते बरोबर नाही. ह्या देवींची मंदिरे अनेक ठिकाणी आढळतात. आपण त्यापैकी काही पाहू.

( १ ) खोह ह्या गावी ( मध्यप्रदेश, नागोद ) सन ४९६ सालचा ताम्रपट आढळला आहे. त्यामध्ये जयनाथमहाराजांनी ब्राह्मणांना दिलेल्या दानाचा उल्लेख आहे. ह्या गावी भगवती पिष्टपूरिका देवीचे स्थान होते. देवीजवळच विष्णूचे मंदिर होते. यावरूनच भागवत म्हणजे विष्णु आणि भगवती म्हणजे दुर्गा असा अर्थ समजतो. याचा अर्थच असा की, पिष्टपुरिका म्हणजे दुर्गादेवी होय. दक्षिण महाराष्ट्रात— विशेषतः केरळ भागात दुर्गादेवीलाच भगवती ह्या नावाने संबोधिले जाते. सन ५१९ सालच्या ताम्रपटात ओपणी गावी पिष्टपूरिका देवीच्या स्थानाचा निर्देश आहे. ह्यावरून असे अनुमान निघते की, पाचव्या शतकात मध्य भारतामध्ये दुर्गादेवींची अनेक मंदिरे उभारली गेली होती.

( ब्रह्मविद्या मासिक, मे १९६२, पृ. १०-११ )

( २ ) चुनार ( मध्यप्रदेश ) या ठिकाणी दुर्गादेवीचे मंदिर उंच टेकडीवर आहे. चुनार रेल्वेस्टेशनपासून तीन मैलांवर विंध्य पर्वताच्या एका दरीच्या माथ्यावर हे स्थान असल्याने खाली दरीमधील शोभा रमणीय दिसते मंदिराचे प्रवेशद्वार खिडकीसारखे लहान असून, खाली बसूनच आत प्रवेश करावा लागतो. मंदिराच्या संरक्षणाच्या दृष्टीने पूर्वी काही ठिकाणी अशा दरवाज्याची व्यवस्था केलेली आढळते. नरसोबाची वाडी ( जि. सांगली ) येथे कृष्णाकाठी जे दत्तात्रयाच्या पादुकांचे स्थान आहे, तेथेही पुजाऱ्याला वागदीसारख्या वर्तुळाकाराच्या प्रवेशद्वारातून मोठ्या कष्टाने आत जावे लागते, हे लेखकाने स्वतः डोळ्यांनी पाहिले आहे. नाशिक येथील सीतागुफामध्येही हाच अनुभव येतो.

प्रवेशद्वारातून आत गेल्यावर दुर्गादेवींची प्रेक्षणीय मूर्ति आहे. हे शांत स्थान अनुष्ठान करण्यास अतिशय योग्य आहे मंदिराच्या बाजूला एक छोटासा नाला वाहत आहे. ह्या मंदिराच्या सभागृहात अनेक प्राचीन शिलालेख आहेत, पण त्यांचा उलगडा करणे कठीण जाते. ( कल्याण, शक्ति अंक, ३४।६४० ).

( ३ ) मुरुड ( गुहागर ) ह्या गावी एक दुर्गादेवीचे मंदिर आहे. येथे हे लक्षात ठेवले पाहिजे की, मुरुड ( गुहागर ) आणि मुरुड ( जंजिरा ) ही दोन गावे निराळी आहेत. बाराव्या शतकात बकाज जालंदर नावाचा शिलाहार राजा अधिकारारूढ असताना, गंगाधर, दिवाकर व पद्माकरभट असे तीन नागर ब्राह्मण

ह्या भागात आले असता त्याना मुरुड, गुहागर व दिवे ह्या तीन गावच्या जहागिऱ्या दिल्या गेल्या. मुरुड तेथे गंगाधर भटाने दुर्गादेवीचे मंदिर बांधले. पुढे सन १७६३ च्या सुमारास त्याच्या वंशजांनी मंदिराचा जीर्णोद्धार करून त्यास आजची स्थिति प्राप्त करून दिली. त्या मंदिरात नारोशंकरासारखी मोठी घंटा आहे. तेथील सभामंडप, कीर्तनमंडप व गाभारा याना विविध शिल्पाचे भाव बसविले आहेत. त्या खांबावर सर्प, पोपट, वाघ, हत्ती, सिंह इत्यादि पशुपक्ष्यांची वेलबुट्टी कोरलेली आहे. यामुळे हे मंदिर अतिशय प्रेक्षणीय झाले आहे. अनेक प्रवासी हे प्रेक्षणीय मंदिर पाहण्यास येतात. दुर्गादेवीच्या मंदिरा शिवाय ह्या क्षेत्रामध्ये सीमादेवी, वहिरी, श्रीभैरव आणि शून्यालय ( एक मशीद ) ही स्थाने आहेत ( नवशक्ति, मुंबई, यशवंत रामकृष्ण. )

मुरुड ( जंजिरा ) येथे कोटेश्वरी देवीचे देवालय आहे. पण ह्या ठिकाणी देवीची मूर्ति नाही. ज्याप्रमाणे शिवाच्या गाभाऱ्यात चार-पाच पायऱ्या उतरून जावे लागते, त्याप्रमाणे या ठिकाणी खाली उतरून गाभाऱ्यात देवीचे दर्शन होते. मूलतः आडव्या धिनाच्या पिंडीसारख्या स्थानावर दुर्गादेवींना मुखवटा बसवितात. चैत्र पौर्णिमेला यात्रा भरते.

( ४ ) हुनगुंद ( जि० विजापूर ) येथे मलप्रभा नदीमध्ये क्षत्रियांचा संहार केल्यावर परशुरामाने आपला परशु ज्या ठिकाणी धुतला ते स्थान एहोळ होय. ह्या घटनेची स्मृति म्हणून किंवा एक चिन्ह म्हणून नदीमध्ये खडकावर एक परशूचा आकार दाखवितात. तेथे पादुकाही आहेत समोर डोंगरावर मेगुतीचे मंदिर आहे. ह्या स्थानाला दुर्गादेवीचे स्थान म्हणतात.

आता विषयांतर करून या ठिकाणी दुर्गादेवीच्या दुष्काळासंबंधी थोडेसे विवेचन करणार आहे. कारण ते अनेक दृष्टींनी उद्बोधक आहे. ह्या दुष्काळाला " दुर्गाडीचा दुष्काळ " असेही नाव आहे. हे नाव पडण्याचे कारण असे की, पूर्वी प्रत्येक गावी स्मशानाजवळ एखादे तरी दुर्गादेवीचे मंदिर असे ह्या काळात माणसे भुकेने व्याकूळ होऊन प्राण सोडीत. तेव्हा त्यांना स्मशानात न्यावे लागे. प्रत्यही सहस्रावधि माणसे ह्याप्रमाणे स्मशानात जात. तेव्हा हे नरबळी देवीलाच स्वतःला हवेत, तिच्याच इच्छेने दररोज ही एवढी माणसे मरतात, अशा समजुतीने देवीला " दुर्गाडी " हे अनादरदर्शक अगर तिरस्कारदर्शक नाव लोकांनी दिले असले पाहिजे. त्यामुळेच पुढे ते नाव कागदोपत्री नमूद केले गेले असावे. ( श्री श्रीपादशास्त्री किंजवडेकर, अक्कलकोट स्वामीचरित्र, पृ. २३३ ).

ह्या दुष्काळाच्या काळाबद्दल निश्चित मत इतिहासकार देत नाहीत. ज्ञानकोशकारांच्या मते हा काळ १४६८-७५ चा आहे. तर वि का. राजवाडे

म्हणतात की, हा काळ ११९०-९७ चा असला पाहिजे. सोलापूर जिल्हा गॅझेट, पृष्ठ २७७ वर ह्या दुष्काळाचा काळ सन १३९६ ते १४०७ असा दिला आहे आणि सन १४६० च्या सुमारास दुसरा दुष्काळ काळ दिला आहे. गॅझेटमधीलच काळ बरोबर दिसतो. कारण या वेळी गादीवर असलेल्या महमुदशहा ह्या बहामनी राजाचा काळ आणि या दुष्काळाचा काळ एकच आहे. वास्तव ह्या दुष्काळाचा काळ सन १३९६ ते १४०७ हाच असावा, कारण महमुदशहाचा काळ सन १३७८-१३९७ हाच आहे.

एवढा मोठा आवर्षणाचा काळ गेल्यामुळे सर्वत्र हाहाःकार उडाला. अनेक कुटुंबे परागंदा झाली. जनावरे जलाविना तडफडून मेली आणि देश वैराण दिसू लागला. याच काळात पैठण, पुणतांबे येथील संस्कृत-पीठे बंद पडली व सर्व विद्वान ब्राह्मणांनी आपला गाशा गुंडाळून अन् तो काखोटीला मारून वाराणशी गाठली. आज वाराणशी येथे अनेक दाक्षिणी क्षेत्रोपाध्याय दिसतात, त्याचे कारण हेच होय. वतने बंद पडल्यामुळे आणि व्यवस्था पाहण्यास कोणी उरला नसल्या मुळे अनेक जुनी देवालये लयास गेली.

कित्येक वेळा वाईटामधून चांगल्या गोष्टी निघतात, असा अनुभव प्रत्यही येत असतो. अशा वेळी कित्येक व्यक्ति उदयास येतात आणि आपल्या कृतीने आपले नाव इतिहासात अजरामर करून जातात. त्यानुसार ह्या वेळी शिराळशेट नावाचा एक लिंगायत वाणी आपला लमाणाचा तांडा घेऊन गुजरात प्रांती जात असे, आणि तेथून बैलाच्या पाठीवरून धान्य वाहून आणून नफा घेतल्याशिवाय महाराष्ट्रातील क्षुधापीडित जनतेस पुरवीत असे. आपल्या लहानपणी प्रस्तुत लेखकाने आपल्या जन्मगावी असे धान्य वाहून नेताना पाहिले आहे. तसेच कोल्हापूर भागात १०० बैलांचा तांडा धान्य वाहतूक करताना पाहिलेला आहे. त्या वेळी महमुदशहा बहामनी हा राजा होता, आणि त्याचा अधिकार महाराष्ट्रा-वर चालत असे. राजा स्वतः प्रजादक्ष असावा. कारण तो स्वतः लमाणाकरवी धान्य आयात करून लोकाना पुरवीत असे. भारताला स्वातंत्र्य मिळाले असूनही नेहमीच अन्नधान्याचा तुटवडा भासत असल्याने, अमेरिका व इतर देश याजकडून धान्य आयात करून ज्याप्रमाणे केंद्र सरकार ते पुरवीत आहे, तद्वतच त्या मुसलमान राजाचे आचरण होते. इतकेच नव्हे, तर राजाने सरकारी खर्चाने गुलबर्गा, बेदर, कांधार, दौलताबाद, एलिचपूर, चौल व दाभोळ या ठिकाणी अनाथालये उघडली आणि लहान मुलांच्या भोजनाची व्यवस्था केली होती. खरोखर ह्या प्रजादक्ष यावनी राजाला धन्यवाद द्यावेत तितके थोडेच ठरतील.

या राजाने शिराळशेटचे प्रयत्न पाहून समाधान व्यक्त केले, आणि त्याला राजदरबारी पाचारण करून, धन्यवाद देऊन इच्छा असेल ते मागून घेण्यास सांगितले. शिराळशेठ मोठा चतुर असला पाहिजे. त्याने साडेतीन घटकेचे राज्यपद मागून घेतले आणि राजाने त्याला ते आनंदाने दिले. कराराप्रमाणे राजाने आपली राज्य-मोहर त्याच्या स्वाधीन केली. निःस्वार्थीपणे जनसेवा करणाऱ्या ह्या माणसाने याही लक्ष्मीसंपन्न असलेल्या काळात स्वतःकरिता एक नया पैसाही घेतला नाही. आलेल्या अमोल संधीचा उपयोग इतरासाठी केला, देवधर्मासाठी केला आणि म्हणूनच तो अजरामर झाला. जप्त केलेली हिंदुमंदिरे व खालसा केलेली त्याची उत्पन्ने शिराळशेटने राज्यमोहोर लावून सरकारी आज्ञेने परत केली आणि आणखीही अमाप दानधर्म केला.

त्याच्या ह्या कृतीने बादशहा अधिकच खूष झाला आणि शिराळशेटच्या आज्ञेची अमलबजावणी करण्यास त्याने फर्माविले. ह्या ठिकाणी पुन्हा बादशहाचे औदार्य दिसून येते. इतकेच नव्हे, तर त्याने शिराळशेटच्या मुलाला बोलावून आणून त्याने त्याला सरदारकी दिली. या सरदाराचा वंशज पुढे माणदेशातील बंड मोडण्यास बादशहाच्या वतीने आला असता वरकुटे ( म्हसवड ) येथे सैन्याचा तळ पडलेला होता. त्याची स्मृति म्हणून आजही या गावाला नामशेटीचे वरकुटे असे म्हणतात.

पुणे शहरात रास्ता पेठेत शिराळशेटीचा स्मृतिदिन साजरा केला जातो. लेखकाने लहानपणी येरवड्याहून बुधवार पेठेतील शाळेच्या मार्गावर हा समारंभ अनेक वेळा पाहिलेला आहे. दुपारी त्या जागेला यात्रेचे स्वरूप येत असे. हा समारंभ श्रावण महिन्यात शुद्ध षष्ठीला साजरा होतो. विजापूर शहरी शिराळशेट चौक असून, तेथेही हा उत्सव साजरा होतो.

असे सांगतात की, अवर्षणाचा काळ संपल्यावर पुन्हा त्या ठिकाणी वस्ती होऊन सर्व व्यवहार पूर्ववत् चालू होण्यास सुमारे तीस वर्षांचा कालावधि लागला.

सन १४६० साली जो दुष्काळ पडला ' त्याला दामाजी पंताचा दुष्काळ ' असे म्हणतात. तेव्हा सन १४६८ साली पुन्हा लगेच एवढा मोठा दुष्काळ असणे संभवनीय नाही. या वेळी दामाजी पंतांनी गरिबांच्या भुकेच्या हाकेला साथ देऊन सरकारी गुदामे लुटविली आणि ते इतिहासात अजरामर झाले.

नवदुर्गा ह्या नवाचा उल्लेख वर आलेलाच आहे. ह्या देवीच्या पूजनाचा एक प्रकार पहा. मध्यभागी दुर्गादेवीची मुख्य मूर्ति यऊन बाजूच्या आठ मूर्तींना आठ दिशांना मांडताना. त्या पद्मासनस्थ असतात. मुख्य मूर्तीला अठरा हात असून विशाल वक्षःस्थळावर अनेक अलंकार सुशोभित दिसतात. ही देवता भक्तांना सर्वश्रेष्ठ शक्ति देऊ शकते. हातामध्ये राक्षसाच्या मुंडक्याचे तोडलेले केस, खेटक, घंटा,

आरसा, धनुष्य, ध्वज, डमरु व पाश असतो. उजव्या बाजूकडील हातामध्ये शक्ति, टांक, शूल, वज्र, शंख, अंकुश, मुसळ, बाण आणि चक्र ही आयुधे असतात. देवीचा वर्ण अग्नीसारखा तेजस्वी असून, अलिढासन घालून ती सिंहाच्या पाठीवर बसलेली असते. एका हाताने महिषाच्या तुटलेल्या शिरांतून बाहेर येणाऱ्या दैत्याचे केशपाश धरलेले असतात. दुर्गादेवीशिवाय बाकीच्या आठ देवतांची नावे रुद्रचंडा, प्रचंडा, चंडोग्रा, चंडनायिका, चंडा, चंडावती, चंडारूपा, अतिचंडिका व उग्रचंडिका अशी आहेत. या देवतांचा वर्ण गोरोचना-सारखा लाल, काळा, सांवळा, शुभ्र, करडा पिवळा आणि फिकट पिवळा असावा. या सर्व देवतांचे, स्थान कमलाकृति रथावर असावे. या सर्व देवतांच्या समूहाला नवदुर्गा असे म्हणतात. असे वर्णन रुद्रयामल तंत्रामध्ये आढळते.
( Elements of Hindu Iconography by T. A. Gopinath Rao, P 35. )

तेरंबा अथवा तेरंबी ही दुर्गादेवीचीच रूपे होत. रानोद ( ग्वालियार ) येथे दहाव्या शतकातील शिलालेखात ह्या दुर्गादेवीचा उल्लेख मिळतो. त्र्यंबक हे शंकराचे एक नाव आहे. त्या शब्दाचे हे स्त्रीलिंगीरूप असावे असे एक मत आहे.

(Hindu Iconography by J. N. Bannerji, Page 38 )

वराह पुराणामध्ये " दुर्गाकवच " हे स्तोत्र दिले असून, तोच भाग हरिहरब्रह्म ह्याने निराळा प्रसिद्ध केला आहे. ह्या स्तोत्राची श्लोकसंख्या ५० असून मार्कंडेय ऋषींनी ते ब्राह्मणाला कथन केलेले आहे. हात, पाय, कमर, मस्तक शरीरातील इत्यादि प्रत्येक अवयवावर एक देवता त्यामध्ये कल्पिलेली असून सर्व देवींची स्तुतीच गाईली आहे. ( दुर्गाकवच, प्रकाशक निर्णयसागर प्रेस, मुंबई )

देवीमाहात्म्य ऊर्फ सप्तशती या नावाचा ग्रंथ ह्या विषयात अत्यंत महत्त्वाचा व वंदनीय मानला जातो. या ग्रंथामधील सातशे श्लोकसंख्येमुळे या ग्रंथाला सप्तशती असे म्हटले जाते. प्रथम अध्यायात मधुकैटभ दैत्याचा वध, २ ऱ्या, ३ ऱ्या आणि ४ थ्या अध्यायात महालक्ष्मी स्वरूपाचे वर्णन व महिषासुरवध वर्णन आहे. पाच ते तेरा ह्या अध्यायात महासरस्वतीचे चरित्र आणि शुंभनिशुंभ वधाचे वर्णन आहे. पाचव्या अध्यायातील ८ ते ८२ पर्यंतच्या श्लोकांना "देवीसूक्त" हे नाव आहे.

इत्थं यदा यदा बाधा दानवोत्था भविष्यति ।
तदा तदा अवतीर्याहं करिष्यामि संक्षयम् ॥ ( ११-५५ )

देवीसूक्तात भक्तजनांना वरील आश्वासन दिलेले आहे. ज्याप्रमाणे गीतेमध्ये श्रीकृष्णाने आश्वासन दिले आहे की, " यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत "

त्याचप्रमाणे देवी भक्तांना हे आश्वासन आहे. या ग्रंथाच्या सामुदायिक पठणाने आणि हवनाने आपली संकटे दूर करून घेणे आणि राष्ट्राचा उद्धार करून देणे ही कामे करता येतात. प्रस्तुत लेखकाने केवळ हौस म्हणून चारदोन नमस्कार देवीला श्लोकरूपाने घालण्याची मनीषा धरली आणि ह्या सातशे श्लोकसंख्येच्या प्रेरणेनेच तो हा एवढा प्रचंड ग्रंथराज निर्माण करू शकला. संतकवि ज्ञानेश्वरांच्या भाषेत सांगावयाचे म्हणजे " इवलेसे रोप लावियले द्वारीं । मेरू तयाचा गेला गगनावरी ॥ मोगरा फुलला, मोगरा फुलला । फुलता फुलतां बहराशी आला ॥ " हेच ह्या ग्रंथाचे उगमस्थान आहे. स्फूर्ति आहे. सप्तशती या ग्रंथाच्या पठणाने शतचंडी, सहस्त्रचंडी, लक्षचंडी ह्यांसारखे यज्ञ केले जातात.

देवीमाहात्म्य सप्तशती आणि गाथासप्तशती हे दोन ग्रंथ मात्र अगदी भिन्न आहेत. गाथासप्तशती हा ग्रंथ दोन हजार वर्षांपूर्वी तयार झाला असल्याचा दावा आहे. हल हा राजा दुसरातिसरा कोणी नसून शालिवाहन राजा होय. ह्या ग्रंथाची भाषा संस्कृत प्राकृत मिश्रित असून आणि हलाने हा ग्रंथ स्वतः लिहिलेला नसून केवळ माहिती संकलित केली आहे. म्हणूनच त्याचे नाव " हल की सतसई " असे पडले आहे. या ग्रंथामध्ये सृष्टिवर्णन, ग्रामीण जीवन, प्रेमी युगुलांच्या कथा, सामाजिक चालीरीति, वन्य पशूंच्या हालचाली ह्यांचे वर्णन केलेले आढळते. तेव्हा हे दोन्ही ग्रंथ एक नव्हेतच हे वाचकांनी ध्यानी असू द्यावे नावावरून फसण्याचा संभव आहे, पण तो टाळावा. ( आकाशवाणी नागपूर, दिनांक ३–८–१९६१ ).

या गाथासप्तशतीचे अनुकरण करून एका गोवर्धन नावाच्या कवीने ७०० श्लोकांची आर्यासप्तशती नावाचा ग्रंथ रचला आहे. तो बंगाल प्रांतीचा अंतीम राजा लक्ष्मणसेन (सन ११२६ चे सुमारास) यांच्या दरबारात आश्रित होता.

दुर्गादेवीला मंगळचंडी असे एक नाव आहे. हे नाव पडण्याचे कारण असे की, मनुवंशामध्ये मंगळ नावाचा एक राजा होऊन गेला. तो सप्तद्वीपाचा शास्ता होता त्याची कुलदेवता दुर्गादेवी असल्याने तो तिची नित्य उपासना करीत असे. ह्यावरूनच दुर्गादेवीचे मंगळ चंडी हे नाव रूढ झाले.

भारतामध्ये सर्वत्र दुर्गापूजाउत्सव मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो. बंगालमध्ये शक्तिपूजेचे जास्त महत्त्व असल्याने तेथील उत्सव प्रमुख मानला जातो त्याची माहिती सारांशरूपाने पाहू, तेथील हा उत्सव पंधरा दिवस म्हणजे आश्विन

शुद्ध प्रतिपदा ते पौर्णिमेपर्यंत असतो. पहिल्या चार रात्री देवीची सजावट, पाचव्या रात्री तिच्या कपड्यांची तयारी, सहाव्या रात्री देवीला जागे करणे, सातव्या रात्री बेल, पिंपळ, तुळस इत्यादी नऊ पवित्र झाडांच्या फांद्या आणून त्यांच्या लताकुंजामध्ये देवीला निमंत्रण करणे असे कार्यक्रम असतात. सात, आठ आणि नऊ हे अतिशय महत्त्वाचे दिवस मानतात. दहाव्या दिवशी देवीला पशुबळी देऊन आणि तिची षोडशोपचारे पूजा करून तिला परत मंदिरात आणतात. पंधराव्या रात्री म्हणजे पौर्णिमेच्या दिवशी सर्व देवीभक्त एकत्र जमून ख्याली-खुशालीत ती रात्र घालवितात. ती रात्र संपूर्णपणे जागून काढण्याचे कारण असे सांगतात की, त्या रात्री दैत्य आपल्या सर्व लवाजम्यानिशी दुर्गादेवीवर स्वारी करण्यासाठी येतो, परंतु भक्तांना जागे पाहून तो परत निघून जातो. जे जागरण करतात त्या सर्वांना देवी धनसंपन्न करते ( मार्टिन, पृष्ठ १८५ ). त्या ठिकाणी हा राष्ट्रीय उत्सव मानला जातो. लहानथोर, गरीब-श्रीमंत हा भेदभाव तेथे दिसत नाही. वाद्ये वाजवीत लोकांच्या झुंडीच्या झुंडीच्या राजमार्गावरून "काली मातेचा विजय असो" अशा आरोळ्या देत फिरत असतात. कालीदेवी रुधिर-प्रिया असल्याने ह्या उत्सवात हजारो पशुबळी दिले जातात. कालीदेवतेसमोर बकऱ्यांच्या मुंडक्याची रास पडते. त्यांची धडे किंवा शरीरे भक्त घरोघर नेऊन जातात आणि प्रसाद म्हणून घरातील सर्व माणसे तो भक्षण करतात. देवीसमोर रक्ताचे थारोळे बनते. ह्या उत्सवानिमित्त कालीमातेच्या मंदिरपरिसरात दुर्गा-देवीचा मुखवटा बसवितात आणि शेवटच्या दिवशी जलामध्ये विसर्जन होते. ह्या पूजेनंतर आणखी दहा दिवसांनी जगद्धात्री देवीची पूजा व उत्सव होतो. ( आर्यांच्या सणांचा इतिहास—सहस्रबुद्धे, पृष्ठ ३०३. )

भारताच्या शेजारी नेपाळ ह्या प्रदेशात दुर्गापूजाउत्सव साजरा होतो. ह्या वेळी कोटमधील इतिहास प्रसिद्ध तटाच्या आतील बाजूस एक विलक्षण विधि केला जातो. सन १८४६ साली, तेथील राजाने निरनिराळ्या राजकीय पक्षाकडून होणाऱ्या समाजविघातक कार्याने गुरखा जमातीचे सामर्थ्य कमी झाले आहे, ह्या समजुतीने, अनेक समाजविघातक लोकांची कत्तल केली. त्या वेळी फारच मोठा रक्तपात झाला. राजाच्या ह्या अघोर कृत्याची स्मृति म्हणून दुर्गापूजेच्या निमित्ताने ह्याच ठिकाणी फार मोठा रक्तपात केला जातो. पण तो निरपराधी बकऱ्यांचा होतो. नवरात्राच्या नवव्या दिवशी शस्त्रांची व राष्ट्रीयध्वजाची पूजा करण्यात येते, आणि ह्या वेळी अनेक रेडे देवीला बळी दिले जातात. साधारणपणे असा नियम पाळण्यात येतो की, फौजेमध्ये मोठ्या हुद्यावर असलेल्या प्रत्येक अधिकाऱ्याने एक रेडा बळी दिलाच पाहिजे. असा बळी दिलेल्या जनावराचे रक्त एका मोठ्या पितळेच्या भांड्यामध्ये एकत्रीत करण्यात येऊन मुख्य सेनापती आपले

दोन्ही हात त्या रक्तामध्ये भिजवून ध्वजाना चोळतो. हा देखावा कमालीचा रोमहर्षक असतो. ("नेपाळचा प्रवास-" लेखक श्री. सपतराव गायकवाड.)

नवरात्र उत्सवात देवींची सजावट अनेक ठिकाणी करतात. पुणे शहरी जोगेश्वरी, अष्टभुजा, चतुःशृंगी इ० प्रमुख मंदिरात अशी सजावट लेखकाने पाहिली आहे. या वेळी दर दिवशी देवींची वाहने बदलण्याची रूढी आहे. एके दिवशी सिंह, तर दुसरे दिवशी मयूर, तिसरे दिवशी कमळ इ० प्रकाराने वाहने बदलतात. देवी आज "कमलावर बसली आहे." आज "सिंहावर बसलेली आहे." अशा रीतीने भक्तगण तिचे वर्णन करतात.

काही मंदिरामध्ये सजावट जशी नवरात्रामध्ये करतात, तशी काही ठिकाणी ती नित्य करण्याचा प्रघात आहे. उदाहरणार्थ, अरासुरी अंबा येथे वास्तविक विसा यंत्राची पूजा, पण सात दिवस देवी, सोमवारपासून क्रमाने, नदी, सिंह, गजराज, गरुड, मोर, हत्ती आणि सिंह या वाहनावर बसवितात आणि त्या स्वरूपात भक्ताना दर्शन घडवितात. श्रीमंत संस्थानाच याप्रमाणे देवीला ऐश्वर्यभोग देणे शक्य होते.

काही रूढी कशा विचित्र भासतात, त्याचे उदाहरण अष्टभुजा देवी पुणे, येथे लेखकाला पाहावयास मिळाले. नवरात्राव्यतिरिक्त दिवसात देवीला सकाळी अभ्यंगस्नान घालण्याची सर्वत्र प्रथा आढळते तीच प्रथा नवरात्र दिवसांतही बव्हशी असते. पण या मंदिरात ती पाळली जात नाही. पुजारी वर्गाने असे सांगितले की, "नवरात्रामध्ये फक्त देवीचे पायाला अंघोळ घालतात व दहाव्या दिवशी अभ्यंग स्नान होते." या रूढीचे कारण काय? असे विचारले असता, ते त्याना सांगता आले नाही. वर्षाचे ३५६ दिवस स्नान मिळावे आणि नवरात्राचे मंगल उत्सव समयी नसावे, याचे आश्चर्य वाटते. सर्वसाधारण प्रथेला हा विरोध उठावदार दिसतो.

यासंबंधी लेखकाचा निष्कर्ष असा की, (१) या दिवसात भक्तगण नित्य दर्शनास येत असतात व देवीचे सजविलेले रूप पाहणे त्याना आवडते ते तसे मिळावे म्हणून स्नानाला फाटा दिला असावा. दुपारचे संधिकालात, पुन्हा वाहन व कपडे यांची सजावट झटपट करून काम भागविले जाते, (२) नवरात्राचे कथेप्रमाणे पहिले काही दिवस देवी, दैत्याबरोबरच्या युद्धात गुंतलेली असते आणि शेवटी दैत्याचा नाश करून विजय पावते. साहजिकच कोणी भक्ताने ठरविले असावे की, युद्धकाळात देवीला स्नान करण्यास फुरसत कोठली! तेव्हा ही स्नान न घालण्याची रूढी चालू केली असावी. विजयाचे दिवशी पुन्हा स्नानाला सुरुवात होते.

भारतामध्ये अनेक ठिकाणी हा उत्सव भव्य प्रमाणावर साजरा होतो. हा उत्सव साजरा करण्याची प्रत्येक समाजाची निरनिराळी पद्धत आहे. एवढे मात्र खरे की, जसा गणेशोत्सव सार्वजनिकरीत्या भव्य प्रमाणावर साजरा करण्याची धडपड चालते, तद्वतच आता दुर्गा उत्सवही साजरा होऊ लागलेला आहे. एका बाजूला धर्मग्लानी आली आहे, असा वाद चाललेला असतानाच दुसऱ्या बाजूला हे उत्सव भव्य प्रमाणावर चालू होत आहेत. परंतु खेदाची गोष्ट अशी की, ह्या धार्मिक उत्सवाच्या बुरख्याखाली काही ठिकाणी नाटक, तमाशे अगर हिंदु संस्कृतीला हानीकारक असे समारंभ केले जातात, आणि धर्माच्या नावाखाली उभारलेला वर्गणीचा पैसा धर्माच्या संवर्धनार्थ खर्च होत नाही.

मंदाक्रांता

दुर्गादेवि स्तवन तव गे श्रेष्ठ ऋग्वेद गाई।
वर्णोनीया अमित गुण गे मानवा मार्ग दावी॥
ज्ञाता मोठा, रणिं, व्यसनिंही, नेणता, दुर्गबंदी।
नेई कोणी फसवुनि जरी दाट रानांत कोंडी॥ १॥
आपत्कालीं टपुनि बसुं दे दुष्ट मारा कराया।
अग्नीतेजें परतिर नरां नेत नावें परी या॥
सौख्यें नेई सहज सकळां संकटा पार देवी।
सुश्रद्धेनें स्मरण करितां वारितें आपदाही॥ २॥
त्वष्टा पूषा भग धरितसे धारणा त्वत्स्वरूपीं।
शत्रूसंहारक समरिं तो सोम राही स्वरूपीं॥
देवी कार्यी हवन करि जो होतसे लक्ष्मीकांत।
व्हाया लक्ष्मीसुत नरवरा पूजि रे यज्ञरूप॥ ३॥

ओवी

दुर्गादेवी आदिशक्तिचें स्वरूप। अनेक रूपी जगीं वावरत।
मुखकांती भासुरी अमूप। दिव्य तेजें शोभली॥
बाहू चार, आठ वा अधीक। घट्ट जांघ शिरीं करंडक मुकुट।
शरीर वेष्टणी वस्त्र पीत। नागकांती दावितें॥
एक रूपें उभे पद्मावरी। दुजे शार्दूल पाठीवरी।
तिजे महीप मस्तकावरी। बहू रूपें दावि भक्तांसी॥

स्तनभाग सर्व वेष्टित । वरी शोभे रक्त कंचुक ।
भाळीं त्रिनेत्र अनलात्मिक । नव कन्यका सेविती ॥
अष्ट हातींची आयुधें । धरितसे किती विविधें ।
धनु, शंख, चक्र खड्गें । शूल खेटक पाशादिक ॥
दुर्गादेवीचीं स्वरूपें । शास्त्रीं वर्णिलीं बहुतें ।
नीळकंठी, क्षेमकरी हरसिद्धीतें । रुद्रांश दुर्गा नामातें ॥
वनदुर्गा, अग्निदुर्गा । जयदुर्गा रिपुमारी दुर्गा ।
विंध्यवासिनी नामें दुर्गा । स्वरूप स्वभाव निराळे ॥
दुर्गादेवींचीं स्वरूपें । मनुजें पूजावीं एकचित्तें ।
धारणा धरावी विरक्तें । साष्टांग वंदन करोनिया ॥ ४ ॥

वसंततिलक

पाही सुरम्य अपरांत मुरूड गावीं ।
दुर्गा सहस्रवरूपा वरि जी वसावी ।
गंगाधरें वदति नागर ब्राह्मणानें ।
या मंदिरा उभविलें बहु आदरानें ॥ ५ ॥
खांबावरी सुबक शिल्पहि कोरिलेलें ।
शार्दूल, वाघ, शुक, हस्तिही दाविलेलें ।
आणी पहा बहिरी-भैरव देव मूर्ती ।
दुर्गे वसो मजवरीहि कृपा सदाची ॥ ६ ॥

त्रिनेत्र-नील-परिते फणि भूषणातें ।
वंदीत देवि, तव पूज्य सदा पदातें ॥

( २८ ) पद्मावती

पंढरपूर ( जिल्हा सोलापूर ) येथे ह्या देवतेचे प्राचीन मंदिर आहे. शहराच्या बाहेर पश्चिम दिशेला अर्धा मैल अंतरावर हे स्थान आहे. ह्या मंदिराचे असे वैशिष्ट्य सांगता येईल की, काश्मीरची योगमाया ज्याप्रमाणे एका सरोवराच्या मध्यभागी आहे, त्याचप्रमाणे ही देवता आहे. तळ्याचा विस्तार १२००×४५० फूट असून आत उतरण्यासाठी उत्तम दगडी पायऱ्या बांधून काढल्या आहेत. मध्यभागी मंदिराचा पाया ५१×५५×८ फूट असून, या मंदिराप्रत जाण्यासाठी जो दगडी पूल आहे तो ७८×११-८ फुटांचा आहे. मंदिराला चारी दिशांना दरवाजे असून मंदिराच्या कळसावर शिलालेख आहे. त्याचा मतितार्थ असा आहे की, धारचे श्री. यशवंतराव पवार ह्यांची राणी सकुवारबाई हिने इ. स. १७७८ साली तळे आणि मंदिर बांधले. एकूण बांधणीचा खर्च सत्तर सहस्र रुपये आला.

मंदिराचे गर्भगृह १५ चौ फुटाचे असून, त्यामध्ये अडीच फूट उंचीची, काळ्या पाषाणाची, साधारण शिल्पाची अशी मूर्ति आहे. देवीच्या अंगावर कपडे नाहीत. सांप्रत ह्या देवीवर शेंदूर घालीत असल्याने ती रक्तवर्णीय दिसते. पूर्वी येथील तळ्यामध्ये कमळे फुलत होती म्हणून ह्या देवीला पद्मावती हे नाव मिळाले, असे म्हणतात. ह्या ठिकाणी दसऱ्याला उत्सव साजरा होतो.

( सोलापूर जिल्हा गॅझेट, पृ. ४५४. ).

लक्ष्मीदेवीची कथा वाचीत असताना आपणाला दिसेल की, ती जेव्हा सागरामधून बाहेर आली, तेव्हा एका पद्मावर उभी होती आणि नंतर तिने भूतलावर पाय ठेवले. यामुळेच लक्ष्मीचे नाव पद्मावती असे पडले आहे. पुणे शहराच्या दक्षिणभागी पद्मावतीचे लहानसे मंदिर आहे. परंतु तळे मात्र बरेच विस्तीर्ण असल्यामुळे त्याला "पद्मावतीचे तळे" असे म्हणण्याचा प्रघात आहे ह्या सर्वांचे सार असे दिसते की, पद्मावतीच्या पुढेमागे तळे असलेच पाहिजे.

मेहेकर ( जि. बुलढाणा ) गावच्या उत्तरेस १२ मैलावर कळंबेश्वर नावाचे गाव आहे. ह्या ठिकाणी पद्मावती देवींचे एक मंदिर पाण्याच्या तलावाच्या काठावर आहे.

आर्य संस्कृतीमध्ये ही देवता मानली आहे. तशी ती बौद्धसंस्कृतीमध्येही आढळते. ब्रह्मदेशात याच देवीला "पदामा" ह्या नावाने संबोधितात.

## (२९) प्रत्यंगिरा

नारदीय ब्रह्मांडपुराणामध्ये ह्या देवीच्या उत्पत्तीची कथा दिली आहे ती पुढीलप्रमाणे-- एक पतित माणूस पश्चात्तापाने दग्ध झाला आणि सुमार्गाकडे वळून आयुष्य घालविण्याच्या सद्हेतूने मार्गदर्शनासाठी अंगिरस ऋषींकडे आला. ह्या वेळी ऋषि एका मंदिरात समाधी लावून बसलेले त्याने पाहिले. बराच वेळ प्रतीक्षा केल्यावर जेव्हा ऋषींची समाधी काही उतरत नाही असे त्याने पाहिले, तेव्हा आपल्या आगमाची वर्दी देण्यासाठी त्याने मंदिरातील घंटा जोराने वाजविली. अर्थात् एवढ्या मोठ्या आवाजाने ऋषींच्या समाधीचा भंग झाला. ऋषींनी नेत्र उघडताच त्यांना हा पतित समोर दिसला. ह्यानेच समाधीचा भंग केला असला पाहिजे, असे समजून त्यांनी त्याला त्वरित शाप दिला की, "तू काळा पाषाण होशील." त्या पतिताने फारच गयावया केल्यावर आणि आपला हेतु विशद करून सांगितल्यावर त्यांनी त्याला उःशाप दिला की, "कल्पांती तुझ्या स्वरूपात बदल घडेल. तुझ्या देहरचनेत फरक होईल आणि स्त्रीरूपाने तुझी देवता म्हणून पूजा केली जाईल."

ऋषींच्या वचनाप्रमाणे सर्व घडून आले, आणि जी देवता निर्माण झाली तीच ही प्रत्यंगिरा देवी होय. अंगिरस ऋषींच्या कृतीने ही उत्पन्न झाली म्हणून तिला "प्रति + अंगिरा = प्रत्यंगिरा" असे नाव प्राप्त झाले.

ह्या देवीची मूर्ति सिंहमुखी, कंद कपाळ, चतुर्भुज पाश, डमरू, शूल व कमळ ही आयुधे धारण करणारी, विशाल दाढी असलेली, आरक्तनेत्री, कुहरासमान हास्य करणारी व भैरवाला उल्हसित करणारी अशी असते. ह्या देवीच्या नावाने मंत्ररचना झाली असून त्याला "प्रत्यंगिरा मंत्र" असे म्हणतात. एखाद्या माणसाच्या संकटनिवारणार्थ ह्या मंत्राचे जपानुष्ठान करतात.

(मंत्रशास्त्र, खरे, पृ. ३१२.)

दुसऱ्या एका ठिकाणी असे सांगितले आहे की, प्रत्यंगिरा म्हणजे दुर्गादेवीचीच सुंदर अवयवांची मूर्ति असते. ह्या देवीची पूजापद्धत मात्र निराळी असते. देवीचा पुजारी रात्री स्वतः रक्तवस्त्र नेसून, रक्तपुष्पाने पूजा करून, मांस व मद्य ह्यांचा नैवेद्य दाखवितो. प्रथम मांसाचे तुकडे मद्यामध्ये बुडवून ते जाळले जातात. आपल्या शत्रूंचा नाश व्हावा यासाठी ही पूजा केली जाते. जेव्हा अशी पूजा केली जाते तेव्हा शत्रूच्या शरीराची मेदशुद्धि होऊन त्याचा नाश होतो.

(*Wilkins, Hindu Mythology, Page 327*)

प्रत्यंगिरा ह्या नावाचा अपभ्रंश पिरंगाई असा झाला असून ह्या देवीची मंदिरे अनेक ठिकाणी आढळतात. कुरकुंभ (जि. पुणे) हे एक गाव पाटस रेल्वे

स्टेशनपासून ७ मैलावर आहे. ह्या ठिकाणी प्रत्यगिरा देवीची दोन मंदिरे आहेत. एक मंदिर गावात तर दुसरे गावाबाहेरील टेकडीवर आहे. गावातील मंदिर घडीव दगडाचे नि अष्टकोनी असून, सभामंडपाच्या दोन्ही बाजूंना सज्जा आहे. " टेकडीवरील मंदिर इ. स १७५९ साली सभाजीराव नाईक निंबाळकर, फलटण संस्थानाधिपति यांनी बांधले. " ह्या मजकुराचा मंदिरात शिलालेख कोरलेला आहे. ह्या दोन्ही ठिकाणी देवीचा पुजारी कैकाडी जातीचा आहे.

गावातील मंदिरामध्ये जी फिरगाई देवीची मूर्ति आहे, ती चतुर्भुज, आयुधे घेतलेली असून दुसरी पहाडावरील काळ्या पाषाणाची स्वयंभू आहे. ती शेंदूर-चर्चित असते

कोणी या देवतेची उत्पत्ति यमाई-तुकाईबरोबर लावतात. त्याचे म्हणणे असे की, पार्वतीमाता सीता स्वरूपात रस्त्यावर उभी राहिल्यावर रामप्रभु तिला म्हणाले, " फिर ग आई " फिरगाई हे नाव आले. पण ही व्युत्पत्ति समाधान-कारक दिसत नाही, कारण पार्वतीमाईंना मागे फिर म्हणजे कोठे जावयाचे होते, याचा उलगडा होत नाही. रामप्रभूंनी तिला मूळ स्वरूपात ओळखल्यावर तिचा आदरसत्कार केल्याविना " माग फिर " असे प्रथमच उद्धटपणाचे उद्‌गार निघणार नाहीत.

देवीची यात्रा नवरात्रामध्ये होते आणि षष्ठीला होमहवन होते.

(पुणे जिल्हा गॅझेट, पृ. ३–२४७)

कोल्हापूर येथील बुधवार पेठेत ह्या देवीचे एक मंदिर आहे. उत्तर भारतामध्ये ह्या देवतेची अनेक मंदिरे आढळतात.

शार्दूलविक्रीडित

कोणी एक पतीत दर्शनसुखा ये देवता मंदिरीं ।
घंटानाद प्रवेशितांच करुनी जागे ऋषींला करी ॥
होई क्रुद्ध मुनी समाधि तुटतां पाप्यास देखे पुढे ।
त्याला शापुनि देह भस्म करितां, शामा सुकाया पडे ॥ १ ॥
भेटी हेतु तदा ऋषींस वदला व शाप मागीतला ।
कल्पांतीच मिळेल रूप तुजला अंगिरसा बोलला ॥
शापांचा सरिवादि काळ, घनली प्रत्यगिरा देवता ।
दुर्गादेवि समान रूप गमतें, वंदीत मीं देवता ॥ २ ॥

शार्दूलासुर चेहरा दिसतसे देवी शरीरा वरा ।
शुभ्रा अंबूज शूळ, पाश, डमरू, शोभे तियेचे करा ।।
भासें हास्य गिरीं कुहार परिसे, दाढा कराला महा ।
पूजी उत्तर देशवासि जनता, या देवतेला पहा ।। २ ।।

## (३०) पार्वती

दक्षप्रजापतीची मुलगी सती हिने दक्ष-यज्ञामध्ये जठराग्नि प्रदीप्त करून स्वतःचा देह जाळून घेतला हे आपण "दक्ष-यज्ञ" ह्या प्रकरणात पाहणार आहोत. त्यानंतर आदिमायेच्या अवताराशिवाय आणि जोडीदार असल्यानिना शंकराचे संहाराचे कार्य अडून राहील, याकरिता तिने हिमालयाची पत्नी मेनावती हिच्या उदरी जन्म घेण्याचे ठरविले. त्याप्रमाणे मेनावती गंगानदीच्या किनारी आली आणि सतीची मृण्मय मूर्ति करून तिची तिने आराधना चालू केली. अतिशय भक्तिभावाने मेनावतीने अनेक दिवस तपश्चर्या केल्यावर देवी प्रसन्न झाली असता, मेनावतीने वर मागितला की, "आदिमायेने माझ्या उदरी जन्म घ्यावा." देवीने "तथास्तु" म्हटल्यावर ती अंतर्धान पावली. कालांतराने मेनावती गर्भवती झाली आणि चैत्र शु १ ला प्रसूत झाली. याच कारणास्तव चैत्र नवरात्र प्रचारात आले आहे. या मुलीचे नाव पार्वती असे ठेवण्यात आले.

दिसामाजी ही मुलगी हिमालयाच्या परिसरात आपल्या आई-वडिलांच्या घरी वाढत होती. पुढे तारकासुर वधाच्या वेळी शंकरानी अट घातली की, 'आधी माझा विवाह करून द्या, म्हणजे जो पुत्र उत्पन्न होईल तो तारकासुराचा वध करील.' देवांना हा विवाह घडवून आणणे आवश्यकच होते. त्यासाठी त्यांनी हिमालयाला गळ घालून आपली मुलगी पार्वती हिला शंकरांना विवाहामध्ये देण्यास प्रवृत्त केले. ह्यापुढे शंकर पार्वती हे जोडपे जगत्-कल्याणासाठी अखंड राबू लागले.

उपलब्ध असलेल्या माहितीवरून असे दिसते की, शंकराच्या दोन स्त्रिया होत्या, पहिली दक्षाची कन्या सती, आणि तिचा मृत्यु झाल्यावर हिमालयाची कन्या पार्वती ही दुसरी. सतीने वेगवेगळी रूपे धारण केल्याचे उदाहरण आढळून येत नाही, परंतु पार्वती मात्र अनेक वेळा अनेक देवीरूपात दैत्यांच्या नाशासाठी धावून गेलेली दिसते. ह्याच कारणामुळे पार्वतीच्या मूळ नावाला त्या त्या प्रसंगानुरोधाने अनेक नावांची जोड मिळालेली आहे. येथे एक शंका येणे साहजिकच आहे की, मग सतीने अनेक अवतार का घेतले नाहीत? याचे उत्तर असे समजते की, शंकर हा मूळ अनार्य लोकांचा देव. पण आर्यांना आपल्या बाजूस

वळविण्यासाठी आणि त्याच्या विरोधाची धार कमी करण्यासाठी, आर्यांनी ह्या देवाला आत्मसात केले. तेव्हा शिवसतीच्या काळी अनार्यांच्या उच्चाटणाची मोहीम जोरात नसल्याने कदाचित् तिला अनेक स्वरूपे धारण करण्याची जरूरी भासली नसावी पण शिव-पार्वतीच्या काळी परिस्थिति उलट असल्याने आणि आर्यांचे प्रसरण दक्षिण पूर्वेकडे जोरात चालू झाल्याने चंड, मुंड, महिषासुर इत्यादिकाचा नाश करण्यासाठी या आदिशक्तीला अनेक रूपे घ्यावी लागली. म्हणून ती बहुरूपा झाली, बहुनामा झाली. शंकराच्या जीवितकार्यांचे सारे वाङ्मय पार्वतीच्या जोडीनेच तयार झालेले दिसेल. त्यामध्ये सतीला महत्त्वपूर्ण स्थान नाही, कारण तिचा अवतार पूर्वीच संपलेला होता. कार्तिकेय व गणेश हे दोन शंकराचे पुत्र समजले जातात. पण त्यांची उत्पत्ति शंकराच्या वेळीच झालेली आहे. साराश, पूर्वायुष्याचा थोडासा शिवसतीचा भाग सोडला तर बाकीचा सर्वच भाग शंकर पार्वती ह्या जोडीदाराचा आहे.

## ( ३१ ) पंपावती

अनेगुडी ( जि बेल्लारी ) ह्या ठिकाणी तुंगभद्रा नदी वहात आहे तुंगभद्रा नदी म्हणजेच पूर्वीची पंपावती नदी होय अनेगुडी म्हणजेच पूर्वीची किष्किंधा नगरी. ही नगरी नदीच्या उत्तर तीरावर असून दक्षिण तीरावर पंपावतीचे स्थान आहे. जवळच विरूपाक्ष महादेवाचे मंदिर आहे ह्या स्थानापासून जवळच पंपा सरोवर आहे त्याची लांबी २४० फूट आणि रुंदी १५५ फूट आहे येथून दोन मैलावर जेथे हनुमानाचा जन्म झाला ती अंजनी टेकटी वसलेली आहे. तसेच ऋष्यमूक पर्वत, माल्यवान पर्वत, तारा, अंगद पर्वत इत्यादि ठिकाणे आहेत अनेगुडीपासून ६० मैल अंतरावर शबरीची रामप्रभूबरोबर जी प्रथम भेट झाली ती जागा आहे. ह्या ठिकाणी एक शबरीगुफा आहे इ स १३३० च्या सुमारास हरिहर आणि बुक्क हे राजे राज्य करीत असतानाच अनेगुडी येथे एक सुंदर लक्ष्मीचे मंदिर बांधलेले असून त्या ठिकाणी लाकडी गरूड व हनुमान यांच्या मूर्ति उत्सवसमयी मिरवणुकीने मिरवितात. पंपावती, विरूपाक्ष मंदिरे मात्र सातव्या शतकातील असावी असे म्हणतात.

ब्रह्मदेवाची मुलगी पंपा हिने येथील हेमकूट पर्वतावर तपश्चर्या केली. विश्वेश्वर प्रसन्न झाले असता 'आपणच मला जन्माचे जोडीदार लाभावेत' अशी इच्छा तिने प्रदर्शित केली त्यामुळे ह्या ठिकाणी पंपावती व विरूपाक्ष अशी मंदिरे आहेत ( भवान जरनल, दवे, १५-१ ५६ कल्याण, क्षेत्र अंक, ५७/३०७.)

रामायणकालीन वालीसुग्रीव कथा सर्वपरिचित आहे दुंदुभी-दैत्याला मारण्यासाठी वालीने त्याच्यावर झडप घातली आणि त्या दोघांचे तुंबळ युद्ध

झाले. मग याचनिमित्ताठी राक्षस पळत असता वालीने त्याचा पाठलाग केला. तो दैत्य एका प्रचंड गुहेत शिरला, तसा वालीही आतमध्ये गेला. जाताना सुग्रीवाने त्याची फार काळ वाट पाहिली, पण उपयोग झाला नाही. गुहेत शिरण्याचे धाडस सुग्रीवाला होईना. शेवटी तो कंटाळला आणि दोघेही युद्धात ठार झाले असावेत अशी प्रामाणिक समजूत झाल्यावर त्या गुहेच्या मुखावर एक मोठा धोंडा ठेवून तो परत आला. 'त्या उचलोनी प्रचंड गिरी। ठेविला विवरद्वारी। वैरी बाहेरी न निघावा॥" (भावार्थ रामायण, अरण्यकांड, अ. ४). झालेली सर्व हकीकत वालीची पत्नी तारा हिला सांगून तो तिच्याबरोबर विवाह करून सुखाने राहिला.

भावाच्या पत्नीबरोबर विवाह करून राहणे हे वेदकाळातही निषिद्ध मानलेले नाही. हती आश्वलायनाचे मंत्र देखील हेच दर्शवितात की, सतीने पतीच्या चितेपर्यंत जावे, त्याला स्पर्श करावा आणि परत आल्यावर जो विवाहोत्सुक असतो, अशा पतीच्या भावाबरोबर विवाह करावा. उत्तर भारतात तिबेट या ठिकाणी दोनचार भावांत एक स्त्री असते, हे आपण आजदेखील पाहतो.

शार्दूलविक्रीडित

दक्षिणापथिं हेमकूट शिखरीं हर्षप्रदा देवता।
पाहि महसुता स्वरूप मग ती पंपावती देवतां॥
वीरूपाक्षि समीप नांदत असे तुंगा नदीच्या तटीं।
किष्किंधानगरी पहा पर-तटीं सुग्रीव वाली कुटी॥ १॥
वाली-सुग्रिव वानराधिप इथे तें युद्ध कीं जाहलें।
वालीनें शिरुनी गुहेंत असुरां त्या दुंदुभा मारिलें॥
बंधू ना परते, गमे मृत तया, शिळा मुखीं ठेवुनी।
बंधूंचे अधिकार चालवि पुढे, तारापती होऊनी॥ २॥

(३२) बगलामुखी

दशमहाविद्येपैकी बगलामुखी ही एक देवता आहे.

सौवर्णासनसंस्थितां त्रिनयनां पीतांशुकोल्लासिनीम्।
हेमाभांगरुचीं शशांकमुकुटाराश्वपल्लवयुताम्॥
हस्ते मुद्गरपाशवज्ररशनासंबिभ्रतीं भूषणैः।
व्याप्तांगीं बगलामुखीं त्रिजगतां संस्तंभिनीं चिंतयेत्॥ (मन्त्रमहार्णव)

ह्या देवीची मूर्ति कशी असावी यासंबंधी वर्णन वरील श्लोकात दिलेले आहे. सुवर्णाचे आसन, त्रिनयन, पीतवस्त्र, शशांकमुकुट, चतुर्भुज, मुद्गर, पाश, वज्र इत्यादि आयुधे, ह्याप्रमाणे रूप असावे. परंतु शक्तिअंक १९३४ यामध्ये जे वर्णन दिले आहे, ह्यापेक्षा हे निराळे आहे. त्यामध्ये ह्या देवीची मूर्ति रत्नजडीत सिंहासनावर आरूढ, पीतवस्त्र, एका हाताने गदा उभारलेली असून दुसऱ्या हाताने सागरात पराजित केलेल्या दैत्याला जिव्हा धरून ओढीत आहे असे वर्णन आढळते ( कल्याण, शक्तिअंक, पृष्ठ ६१६ ).

ह्या देवतेची मंदिरे क्वचितच आढळतात. हौशांगाबाद येथे काशीनिवासी श्रीविजयनारायणजी यांनी फाल्गुन कृ. १४ रोजी इ. स. १९२० साली बगलामुखी देवीचे स्थान बांधले आहे. सध्या ह्या भागाला दुर्गाकुटी असे म्हणतात. शक्तिअंकांत देवीचे छायाचित्र दिले आहे. पण ते अस्पष्ट असल्याने तिच्या स्वरूपाची कल्पना येण्यासारखी नाही. चैत्र नवरात्र, आश्विन नवरात्र व शिवरात्र या दिवशी तांत्रिक दृष्टीने या देवीची संपूर्णपणे यथासांग पूजा केली जाते. श्रद्धापूर्वक यजन केल्यास भक्तांचा दुःखपरिहार होतो असे मानतात. ( कल्याण, शक्तिअंक, पृ. ६८४. )

काश्मीरप्रांती क्षीरभवानी मंदिराजवळ बगलामुखीचे एक मंदिर आहे आणि शक्तिसांप्रदायातील मंडळी हेच आदिस्थान मानतात. सुमारे पाचसहस्र वर्षापूर्वीचे हे स्थान आहे असे मानले जाते. मंदिराचा प्राकार भव्य असून कळसाची मांडणी मात्र गोलाकार आहे. तेथील देवतेच्या मूर्तीचे जे वर्णन सांगितले गेले तेही अर्थपूर्ण आहे. काळ्या पाषाणाची सुमारे ६ फूट उंचीची मूर्ति असून, चतुर्भुज आहे. उजव्या खालच्या हाती खड्ग, वरच्या पद्म, डाव्या बाजूस खालच्या हाती राक्षसाचे मुंडके व वरच्या हाती अमृतकुंभ अथवा रक्तकुंभ आहे. मूर्ति नीळवर्णी असून मस्तकावर सभोवार मुंडमुकुट व त्याखाली स्वैरसंचार करणारा केशकलाप असून त्याने दोन्ही कान झाकून टाकलेले आहेत. गळ्यात मणिनाग ( म्हणजे नागाच्या मस्तकावर विलसत असणारा मणी ) नेत्र मोठे व वटवटीत दिसतात. मुखकमळ गोलाकार असून, चारी बाहुंवर, आणि कोपरांवर नागफण्यांचा वेढा आहे. पोट भाग तारा देवीसारखा विशाल आहे. व्याघ्रचर्म परिधान केलेले, पदकमळे राक्षसाचे शवावर आहेत. देवीचे पुजारी मात्र ते शव शंकराचे असल्याचे सांगतात. पण मूर्तिचे एकूण वर्णनावरून त्यांचे म्हणणे खरे वाटत नाही.

स्वामी वीरानन्दसरस्वती, वीरानन्द आश्रम डलहौशी टेकडी, काकिरा पहाड, जिल्हा चंबा, पंजाब, यांनी वरील माहिती स्वतः ग्रंथकाराला दिली. ते स्वतः देवी उपासक असून, त्या मूर्तीचे ध्यान करीत असतात.

असे सांगितले जाते की, दक्षिण हैद्राबाद गावी चारमिनार हे बगलामुखी देवीचे स्थान आहे. मिनाराच्या एका वरील बाजूच्या कोनाड्यात देवीची सुवर्णाची मूर्ति असून, ब्राह्मणाकरवी तिची पूजा केली जाते. संस्थानाधिपति निजामसाहेब या देवीचे उपासक असल्याने, त्याचे निदर्शक म्हणून आपल्या मस्तकावरील मंझील ते पिवळ्या रंगाचा वापरतात. जारणमारणविद्यावाले या देवीची उपासना करतात. या देवीचे यंत्र संकटनिवारणार्थ दंडामध्ये बांधले जाते.

द्रुतविलंबित

खडितरत्न सुशोभित आसनीं। जळ सरोवर पुष्टनिवासिनी॥
वसन पीत-सुअंबर धारिणी। धरित खड्ग करि अरि शासनी॥१॥
असुर चाल करी तुझियावरी। त्रिशुळ मारुनि त्या बांधिशी तरी॥
धरुनिया रसना शव ओढिसी। नमितसे बगलामुखि देविसी॥२॥

## (२३) बळातिबळा

प्राचीन काळी रक्तासूर नावाचा एक अति बलाढ्य दैत्य होऊन गेला. त्याला बळ आणि अतिबळ ह्या नावाचे दोन पुत्र होते. तपसामर्थ्यांमुळे ते प्रबळ झाले आणि स्वर्गाचेही राज्य त्यानी जिंकून घेतले. देवांना त्यांचा त्रास होऊ लागल्यावर, उपाययोजना करण्यासाठी ते कैलासावर गेले. तेथे जाऊन आदिमायेची स्तुति केल्यावर ती प्रसन्न झाली. देवानी आपली करुणामय स्थिति तिला निवेदन केली आणि दैत्याचा नाश करावा अशी विनंती केली. अनेक मातृगणासमवेत देवी स्वतः त्या कामगिरीवर निघाली आणि ह्या प्रबळ दैत्याचा नाश केल्यावर ती प्रभास ह्या क्षेत्री जाऊन राहिली. बळ आणि अतिबळ ह्या दैत्यांचा नाश केल्यामुळे ह्या देवीला बळातिबळा हे नाव प्राप्त झाले (स्कंद पुराण, प्रभास अध्याय ११९).

## (२४) भवानी आनंदीदेवी

म्हैसूर प्रांतामध्ये, गुलबर्गा शहराच्या उत्तर दिशेला आणि अक्कलकोटच्या पूर्वेला आळंद नावाचे गाव आहे. प्राचीन काळी याच गावाला गुजोटी-आळंद अथवा अलकावती नगरी म्हणत असत. कल्याण-चालुक्य राजवंशाच्या एका शिलालेखावरून येथील एका देवस्थानाच्या इतिहासावर प्रकाश पडतो. हा शिलालेख शके १००५ चे सुमाराचा आहे. प्रसिद्ध कर्नाटक सिंह टिपु सुलतान, आणि तुकाराम महाराजांचे गुरू श्रीराघव चैतन्य यांचा या गावाबरोबर संबंध'

आहे. पहिल्याचे हे जन्मगाव, तर दुसऱ्याची समाधी येथे आहे. सांप्रतच्या गावच्या पश्चिमेस सुमारे अर्ध्यामैलावर, आणि गुलबर्गा मार्गावर "कमान दरवाजा" नावाचे ठिकाण आहे, त्या ठिकाणी ही समाधी होती. परंतु नंतर मोडतोड झालेली असून त्यावर मशजिद उभारली गेली आहे. त्या बौद्धशिल्पाचे वापरलेले सामान व मशजिदची बांधणी हीच त्याची साक्ष होय. हे बांधकाम सुमारे सन १७८० चे सुमारास झाले असे म्हणतात.

कायापालट करून अगर धर्मांतर करून अनेक ठिकाणी व घराव पूर्व-संस्कृतीच्याच रूढी कायम रहातात. याची अनेक उदाहरणे देता येतील. मुंबई-जवळ हाजीमलंग नावाच्या डोंगरावर एक क्षेत्र आहे, पण तेथील पुजारी ब्राह्मण वर्गाचा आहे. त्याचप्रमाणे येथील मूळ ठिकाणाचे रूपांतर मशजिदमध्ये झाले, तरी त्याचा पुजारी जोशी या उपनावाचा वंशपरंपरेने आहे. मुसलमान लोक या समाधीला "मर्दान गैब वासलन हक" म्हणजे "ब्रह्मीभूत झालेला गुप्त पुरुष" असे संबोधितात.

सांप्रत ज्या ठिकाणी मुले शिकावयास बसतात त्या भिंतीच्या आतील बाजूस पूर्वी भवानी आनंदीदेवीचे मंदिर होते. मोडतोड झाली तरी भुईसपाट झाले नसल्याने अद्याप देवीचा गाभारा उभा आहे, आणि त्याचा उपयोग अडगळीचे सामान रचण्यात होतो. या ठिकाणी देवी होती याला पुरावा एक मुसलमान वकील अलीमुद्दीन नावाचे आपल्या ग्रंथात देतात. त्याचे नाव आहे "रोजतुल्मपायरस" आणि त्यामध्ये चरित्र दिले आहे एका लाडलेमषाक या गृहस्थाचे, त्यांनी हा ग्रंथ सन १९३५ मध्ये लिहिलेला असून, त्यामध्ये ते म्हणतात "पूर्वी या ठिकाणी आनंदीदेवी रहात होती. हजरत लाडलेमषाख हे दिल्लीहून हिजरीसन ७६१ मध्ये आळंद या गावी आले आणि त्यांनी या भवानीदेवीची सेवा करून, नमाज पढण्यापुरती जागा मागून घेतली. काही काळाने देवी दूर पळून गेली." याचा अर्थ सरळ आहे की, नमाजासाठी जागा मिळाल्यावर, "चंचुप्रवेशः मुसलप्रवेशः" या म्हणीप्रमाणे त्यांनी सर्व मंदिर काबीज केले आणि देवीची मूर्ति तेथून दीड दोन मैलांवर असलेल्या व्हनोळी येथे नेऊन ठेवली. देवीच्या मंदिराच्या प्रवेशद्वारावर पूर्वीच्या जय विजय मूर्ति आजही दिसतात.

रशियन प्रवासी अफनासी आपल्या "Trip of Afnacy Across Three Seas" या ग्रंथात लिहितो की, पंधराव्या शतकात तो जेव्हा भारतामध्ये आला, तेव्हा बिदर गावी पांच वर्षे राहिला होता. आळंद गावी आक्टोबरमधील नवरात्र यात्रेच्या वेळी वीस सहस्र घोड्यांचा व्यापार या ठिकाणी झाला होता.

यावरून हे सिद्ध होते की, ही मूर्ति दुर्गादेवीचाच अवतार होता आणि म्हणून नवरात्र-उत्सव साजरा होत असावा

तात्पर्य, आळद येथील मोडतोड झालेल्या वास्तूचे या दृष्टिकोनातून निरीक्षण केल्यावर अशी खात्री होते की, सांप्रत मसजिद असलेले ठिकाण म्हणजेच पूर्वीचे प्रसिद्ध आनदीदेवीचे मदिर होय

केशव चैतन्य व राघव चैतन्य तीर्थाटन करीत असता एकदा या ठिकाणी आले सायंकाळची वेळ, पाऊस-वारा जोराचा होता, आणि निवाऱ्यासाठी म्हणून ते या मसजिदमध्ये शिरले काही वेळाने रक्षक तेथे आला आणि या हिंदु जोग्याना पाहून त्यांना बाहेर जाण्यास सांगितले त्यांनी उलट उत्तर दिले की, ही मसजिद आमची आहे, त्यानेच बाहेर जावे. शेवटी नाइलाज म्हणून रक्षकाने राजाकडे तक्रार केली आपल्या काही निवडक मडळींसह राजा तेथे आला आणि त्यानेही साधूना बाहेर जाण्यास फर्माविले त्या साधूनी राजाला पुन्हा पुन्हा सागितले की मसजिद त्याची आहे, आणि राजाची अनुज्ञा असेल तर ते त्या छायेसह तेथून जातील राजाने जाण्याचा आग्रह धरला, आणि शेवटी वर्दळीवर न येता साधुमहाराज म्हणाले, "चल बाई, माझे घर मजबरोबर चल." आश्चर्य असे झाले की, राजासह सर्व माणसाना घेऊन ती मसजिद तशीच अतराळात उडाली आणि दीड दोन मैलांवर जाऊन खाली उतरली केशव चैतन्याचे सामर्थ्य या रीतीने राजाच्या अनुभवाला आल्यावर, त्याने त्यांचे पाय धरले आणि कृतकर्माबद्दल क्षमा मागितली हेच साम्प्रतचे गुनोळी हे स्थान असावे. (पुराण प्रसिद्ध अलकावती, ले भीमाशकर आळदकर)

या गावी देवीचे मदिर ओढ्याकाठी आहे देवीची मूर्ति तीन फूट उचीची असून शिळावर निमुळती होत गेलेली आहे जीर्ण झाल्यामुळे अवयवाची पूर्ण कल्पना येत नाही पूर्वीच्या ठिकाणी जो दर्गा आहे, त्याचे वतनी पुजारी दर्ग्याच्या वार्षिक उरसाच्या वेळी या देवीच्या मदिरात येऊन नैवेद्य समर्पण करतात, एरव्ही त्याचा विधि पुरा होत नाही याचा अर्थ पूर्वीची देवी ती हीच होय प्रसिद्ध पडित सुरेश्वराचार्य यांचे सस्कृत विद्यापीठ याच आळद गावी होते आता या देवीला कुणी यल्लमा असेही म्हणतात

## (३४) भुवनेश्वरी

दशमहाविद्यापैकी ही एक देवता आहे ह्या देवीचे समग्र वर्णन देवी भागवतामध्ये दिलेली आहे ह्या देवीचे कायमचे निवासस्थान मणिद्वीप असून, सृष्टि उत्पन्न झाल्यावर लीलया तिने हे स्थान निवडले आहे या ठिकाणी तिचा

वास भुवनेश्वरासह असतो. दोन्ही एकरूपच अर्धनारीनटेश्वरासमान मानली जातात. उजव्या बाजूस भुवनेश्वर पचमुखी असून त्रिनेत्री, चारभुजा, पैकी उजव्या दोन भुजांमध्ये एकात परशु व दुसरा हरिणाकृति केलेला आणि दोन्ही हात भुवनेश्वरीच्या पाठीवर आहेत. भुवनेश्वरी सोळा वर्षांची कुमारी असून चतुर्भुजांपैकी एका हातात पाश व दुसऱ्यामध्ये त्रिशूळ आहे. तिसरा अभय असून चौथा वरद आहे. वैडूर्यमणियुक्त बाजुबंद दंडावर असून त्याची आकृति श्रीचक्राकारची आहे. कानांत कर्णफुले, नाकात नथ, गळ्यात मोत्यांचे पेटे आणि मस्तकावर रत्नजडीत मुकुट, त्रिनेत्र असे स्वरूप आहे. भुवनेश्वर आणि भुवनेश्वरी शिवाच्या पडलेल्या शरीरावर कमळासनावर अधिष्ठित आहेत.

ही देवी म्हणजे इच्छाशक्ति, ज्ञानशक्ति व क्रियाशक्ति यांचे संयुक्त रूपच आहे. लज्जा, तुष्टि, पुष्टि, कीर्ति, कान्ति, क्षमा, दया, बुद्धि, मेधा हे नैसर्गिक गुण मूर्तीरूपाने तिच्याजवळ वास करीत असतात. तसेच जया, विजया, अजिता, नित्या, विलासिनी, दोग्ध्री, अघोरा व मंगला, या नऊ शक्तिपीठदेवता भुवनेश्वरीच्या सेवेला उपस्थित असतात. नवरत्नवहा, कांचनस्रवा, सप्तधातुवहा, नावाच्या नद्या या देवीपासून निघून सुधासिंधूला मिळतात. या तिच्या अगाधस्वरूपामुळे ती भुवनेश्वरी हा उल्लेख पात्र ठरली आहे.

देवीभागवत ग्रंथामध्ये मणिद्वीपवर्णन हा भाग आलेला असून तो अध्याय १०–१२ मध्ये आलेला आहे, तो सविस्तरपणे वाचणेच योग्य होईल. या देवीचा वास चिंतामणि परिसरांत असतो. पण तेथपर्यंत पोचण्यासाठी किती परिसर ओलांडावे लागतात, ते पहा. तांबे, शिसे, पितळ, पंचलोह, चांदी, सुवर्ण, पुष्पराग-मणि, पद्मरागमणि, गोमेद, हिरा, वैडूर्यमणि, इंद्रनीलमणि, मुक्ता, महामरकतमणि, प्रवाळ, आणि नवरत्न इतक्या प्रकारचे परिसर ओलांडल्यावर मगच चिंतामणिगृहात प्रवेश मिळतो. हे प्रत्येक प्रकार अनेक योजने लांबरुंद असून सुशोभित केलेले आहेत. ( कल्याण, देवीभागवात अंक, पृ० ६६०–६७२)

या देवीने अनेक वेळा दैत्यनाश केलेला आहे आणि दैत्यनाशाचे आपले काम झाल्यावर पुन्हा आपल्या या निवासस्थानी येऊन राहिलेली आहे. भुवनेश्वर हे क्षेत्र ओरिसामध्ये प्रसिद्ध आहे. पुराणांतरी वर्णन केलेले क्षेत्र हेंच असावे, असे एकूण वर्णनावरून वाटते. 'महालक्ष्मी रत्नकोशा'मध्ये या देवीचे वर्णन आढळते.

भुवनेश्वरीदेवीचे एक प्राचीन मंदिर औदुंबरक्षेत्री कृष्णा नदीच्या तीरावर आहे. देवीचे नाव जरी भुवनेश्वरी असले तरी देवीचे स्वरूप अष्टभुजा महिषासुर-मर्दिनीचे आहे. मग भुवनेश्वरी नाव का? हे तेथील क्षेत्रस्थ पुजारीवर्गालाही सांगता येत नाही. गुरुचरित्र पोथी, अध्याय १७ प्रमाणे या मंदिरात एका मूढ

मुलाने तपश्चर्या केली आणि आपली जीभ कापून देवीला अर्पण केली. तरी देवता दर्शन देईना, तेव्हा त्याने मस्तक कापून वाहण्याचा निश्चय केला. पण प्रत्यक्ष कृति घडण्यापूर्वीच देवी प्रकट झाली, मुलाला दर्शन दिले आणि त्याला इच्छित वर दिला अशी कथा आहे. मंदिर हेमाडपती असून, पाषाणी शिल्प आहे. हे एक जागृत स्थान मानले जाते.

वरील उदाहरणावरून एक निष्कर्ष काढता येतो की, देवीचे नाव भुवनेश्वरी असो, रुक्मिणी असो, हिंगुलांबिका असो, अथवा भवानी असो, बहुधा अष्टभुजा महिषासुरमर्दिनीस्वरूप हेच सर्वत्र आढळते. मणिद्वीपमधील मूर्तीचे वर्णन चतुर्भुज आहे.

मालिनी

छळित अइ प्रजेला तारकासुर दैत्य ।
विनविति भुवनेशी द्वीप-देवीस नित्य ॥
अरि व्यसन हराया धांवते देवि जेव्हां ।
यमसदनिं तयाचा पाठवी प्राण तेव्हा ॥ १ ॥

वसंततिलक

स्पर्धा करी किरिट पूर्ण शशि प्रभेशी ।
त्रीनेत्र तुंग कुच सुंदर गात्र राशी ॥
चापांकुशा करिं धरी मुखिं हास्यताही ।
वंदी सदैव भुवनेश्वरि देवता ही ॥ २ ॥

## ( ३५ ) महिषासुरमर्दिनी

महिषासुरमर्दिनीचा इतिहास पाहताना प्रथम काही गोष्टींचा पूर्वेतिहास माहीत असणे आवश्यक आहे

### ही महिषी कोण ?

दुर्गादेवीचे आख्यान सांगताना गुरु दत्तात्रय परशुरामाला सांगतात की, एकदा इंद्रदेव अप्सरांसहित क्रीडा करण्यासाठी विंध्य पर्वताच्या शिखरावर गेला असता, त्याने गौतम ऋषींची सून तेथे पाहिली. ती साधारणतः अप्सरेच्या

मानाने कुरूपच असल्यामुळे, इंद्राला तिची चेष्टा करण्याची लहर आली. मोठया माणसांनी लहानांची, गरीबांची, इंद्रीयन्यूनता असलेल्यांची चेष्टा करणे हा त्यांचा जन्मसिद्ध अधिकार असल्याचे ते समजतात. पण त्यामुळे आपण त्या त्या जन्मजात वैगुण्यावर घाव घालतो, त्यांच्या दुःखावर डागण्या देतो, हे त्या चेष्टा करणाऱ्यांच्या लक्षात येत नाही. अशा चेष्टांचा परिणाम एकादेवेळी विपरीत होतो. येथेही तसेच झाले. इंद्राने तिच्या कुरूपतेची चेष्टा करण्याचे ठरविले आणि तो तिला म्हणाला, "कतर च महिष जनयिष्यसि ?" ('हे देवी, तूं म्हशीसारखी का दिसतेस ?') वेडयाच्या इस्पितळातील एकाद्या वेडयाला जर आपण "तूं वेडा आहेस" असे म्हटले तर तो खळवळून उठतो आणि अद्वातद्वा बोलू लागतो, [ अशा अनुभव प्रस्तुत लेखकाने येरवडयाच्या वेडयाच्या इस्पितळांत सन १९१७ साली घेतला आहे. ] अशा अनुभव येतो. येथेही इंद्राचे उपरोधिक शब्द ऐकून संतप्त होऊन ती स्त्री एकदम उद्‌गारली, "तुझीच पत्नी शची महिषी होऊन भूतलावर तुझा शत्रु निर्माण करील." त्याप्रमाणेच घडले.

"...... इंद्राणी क्षणात् महिषी भूत्वा घोरे अरण्ये गता। तत्र कैटभासुरस्य स्खलित वीर्यं तृणैः सह भक्षयित्वा गर्भिणी समभवत्। काले च महिष प्रसूय च सा पूर्वरूप प्राप्ता।" ह्याप्रमाणे महिषासुराचा जन्म झाला आणि इंद्राणी देवलोकांत गेली. (त्रिपुरारहस्य, अध्याय ४५). हनुमानपुत्र मकरध्वज याचा जन्मही याचप्रमाणे झाला असल्याचे वर्णन रामायणात मिळते.

वराहपुराणामध्ये अशी कथा आहे की, मंदारपर्वतावर विष्णुशक्ति वैष्णवी तप करीत असताना काही अनपेक्षित कारणाने तिचे चित्त विचलित झाले. त्याचा परिणाम असा झाला की, त्या हास्यातून (ते 'अनपेक्षित कारण' म्हणजे एक मोठा हास्यध्वनि होता) अनेक सुंदर मुलींची उत्पत्ति झाली आणि त्या सर्व वैष्णवी देवीची सेवा करू लागल्या. वैष्णवीचे तेज अप्रतिम होते आणि ती स्वरूपसुंदरी होती. त्या अनुपम सौंदर्याचे वर्णन नारदानी महिषासुराजवळ केले. असुराने तावडतोब आपले दूत पाठवून तिला आणण्याची आज्ञा केली. दूत मंदार पर्वतावर गेले आणि देवीने विचारल्यावरून त्यांनी तिला महिषासुराची जन्मकथा वर्णन करून सांगितली ती खालीलप्रमाणे.

प्राचीन काळी सुपार्श्व राजाचा पुत्र सिंधुद्वीप माहिष्मती नगरीत–म्हणजेच सांप्रतच्या नर्मदातीरावरील महेश्वर गावी–तपश्चर्या करीत होता. तपश्चर्येसाठी एक लहानसा आश्रमही त्यानी बांधलेला होता. विप्रचितीची मुलगी महिष्मती आपल्या सख्यासह सहलीसाठी त्या ठिकाणी आली असता, तिला या ऋषींची चेष्टा करण्याची लहर आली. आपल्या सख्यांसह त्या आश्रमात काही काळ विश्रांतीला

जागा मिळावी म्हणून त्यांनी ऋषीला सेयून हुसकून लावण्यासाठी महिषीरूपे घेतली आणि आश्रम खाली न केल्यास शिंगांनी भोसकण्याची धमकी दिली अन्तर्ज्ञानाने सिंधुद्वीपऋषीने सर्व प्रकार जाणला आणि त्यांच्या अहंकारी वर्तनाला शिक्षा म्हणून त्यांना शाप दिला की, "तुम्ही सर्वजणी महिषीरूपातच या जगात रहाल" महिष्मती आणि तिच्या सख्या यांना पश्चात्ताप झाला आणि त्यांनी उःशापाची याचना केली तेव्हा ऋषी म्हणाले की, "महिषीरूपाने महिष्मतीला मुलगा झाला म्हणजे तुम्ही शापमुक्त व्हाल"

पुढे काही वर्षांनी महिष्मती महिषीरूपाने नर्मदानदीच्या तीरावर चरत होती त्याच वेळी सिंधुद्वीपऋषी त्या भागात फिरत असताना नदीतीरावर त्याने इंदुमती नावाची एक अप्सरा पाहिली, आणि त्याचे रेतस्खलन झाले त्यापैकी काही भाग नदीच्या पाण्यात पडला तीरावर चरणारी महिषी पाणी पिताना तो रेताचा अंश पाण्याबरोबर तिच्या पोटात गेल्याने ती गर्भिणी झाली आणि अशा प्रकारे महिषासुराचा जन्म झाला

(Elements of Hindu Iconography by T A Gopinath Rao, Page 318)

महिषासुरवध म्हणजे एक रूपक आहे असे अनेक विद्वानांचे मत आहे महिषासुर म्हणजे अहंकार त्याचा नाश म्हणजेच महिषासुराचा वध एकनाथ म्हणतात, "मोह महिषासुर मर्दना लागूनी" एकनाथांनी त्याला मोह म्हटले आहे काहीही असो महिषासुरवध म्हणजे एक रूपक आहे, आणि त्यामुळेच त्याच्या वधाचे अनेक प्रकार समजतात कारण प्रत्येक ज्ञानी माणसाचा मोहाचा नाश करण्याचा मार्ग निरनिराळा असू शकतो यामुळेच महिषासुराचा अनेक वेळा वध झालेला या ग्रंथात दिसून येईल

(१) प्राचीन काळी दनु राक्षसाचे पुत्र रंभ आणि करंभ हे दोन प्रबळ दैत्यबंधु होते ईश्वरप्राप्तीसाठी त्यांनी उग्र तपस्या केली हा ग्रंथ वाचताना अनेक ठिकाणी 'तप केले' असा शब्दप्रयोग आढळून येईल तेव्हा ह्या तपाचे प्रकार किती आहेत हे पाहणे उचित ठरेल

तारकासुराने अनेक हालअपेष्टा सोसून खालील प्रकारांनी तप केले, असा उल्लेख आढळतो—

(१) एका पायावर उभे राहून दुसरा पाय हाताने धरून वर सोंड करून आकाशात सूर्याकडे दृष्टि लावली व तप केले

(२) पायाच्या एका अंगठ्यावर उभा राहिला नि तप केले

(३) अनेक दिवस फक्त जल प्राशून राहिला नि तप केले.

(४) फक्त हवा सेवन करून अगर वायुभक्षण करून राहिला नि तप केले.

(५) एका उंच वृक्षाची फांदी एका हाताने धरून खाली लोंबकळत राहिला नि तप केले.

(६) जलाशयात अनेक दिवस अविरत उभा राहिला.

(७) भूगर्भात खड्डा करून, आत बसून अनेक दिवस समाधी लावली नि तप केले.

(८) पंचाग्निसाधन करून, अग्निदिव्य केले नि तप केले.

(९) शीर्षासन करून पाय वर करून अनेक दिवस राहिला नि तप केले.

(१०) वृक्षाच्या फांदीवर पाय आणि खाली मस्तक याप्रमाणे स्वतःला उलटे टांगून घेतले नि तप केले. इ० इ०

ह्या सर्व प्रकारांनी त्याने एकूण शंभर वर्षे तप केले तेव्हाच त्याला इच्छित फळ प्राप्त झाले. तपश्चर्येच्या मागील मनोनिग्रह वाखाणण्यासारखा असतो, मग कोणी त्याला हटयोग म्हणो वा अघोरी कृत्य म्हणो. उभ्या आपण पाहतोच की, कथाकीर्तनाला भुईवर बसण्याचा प्रसंग आला, तर थोड्याच वेळात श्रोत्यांची कोण तारांबळ उडते. अर्थात इतक्या हालअपेष्टा सोसल्यावर आणि वरदान देण्यासाठी देवता प्रकट झाल्यावर तपस्वी तिला आज्ञा करीत असे की, मला अमकाच वर पाहिजे, त्यापेक्षा दुसरा मला नको. व्यवहारी भाषेत बोलावयाचे झाले तर बंदा रुपयाच पाहिजे; एक नवा पैसाही कमी घेणार नाही. आणि आश्चर्य असे की, ते इच्छित वरदान घेत असत. ह्याचे उदाहरण म्हणून भंडासुर राक्षसाचे देता येईल. गंगानदीतटी त्याने दहा सहस्र वर्षे तप केले. शिवशंकर प्रसन्न झाले. त्याने अमरपद मागितले, परंतु तो वर त्यास मिळाला नाही. त्याने पुन्हा तपश्चर्या चालू केली. काही वर्षांनी शंकर पुन्हा प्रकट झाले आणि त्रिमूर्ती-व्यतिरिक्त त्यास अमरपद दिले. पण त्याचे समाधान न झाल्याने त्याने पुन्हा तपश्चर्या चालू ठेवली. शेवटी शंकरांनी त्याला वरदान दिले की, "देव, पशु, पक्षी, कीटक, अस्त्रे, शस्त्रे यांपासून तुला मरण येणार नाही." हे वरदान मिळाल्यावरच त्याचे समाधान झाले. (त्रिपुरारहस्य, अध्याय ५०)

तपःसामर्थ्याने प्रबळ झाल्यावर आणि इच्छित वरदान मिळाल्यावर दैत्य मदांध होई. त्याच्याबरोबर सामना करण्यासाठी कोणीही टिकत नसे. तारकासुराने तप केल्यावर आणि इंद्रावर स्वारी केल्यावर त्याचा अष्टमुखी अश्व तारकासुराने घेतला कुबेराकडून सहस्र सागराश्व मिळविले. ऋषींनी कामधेनु दिली. सूर्याने त्याच्या भीतीमुळे उष्णता सोडण्याचे रहित केले. चंद्र नेहमीच पौर्णिमेला असतो

तशा गडू लागला, वायु त्याच्या इच्छेप्रमाणे वाहू लागला सारांश, सर्व पंचमहाभूते त्याने आपल्या ताब्यात आणली. (मार्टिन, पृष्ठ १९८)

पाच वर्षांच्या ध्रुवबाळाने अमरपदासाठी वनात जाऊन तप केले आणि सहा महिन्याच्या अवधीत त्याला परमेश्वराचे सगुण स्वरूपात दर्शन झाले त्याच्या तपाचा हा प्रकार व निष्ठा पहा — १ ला महिना–३ दिवसांनी एक बोर अथवा कवठ भक्षण, २ रा महिना–सहा दिवसांनी एकदा शुष्कपर्णे भक्षण, ३ रा महिना–नऊ दिवसांनी एकदा जल भक्षण, ४ था महिना–बारा दिवसांनी वायु भक्षण, ५ वा महिना एका पायावर उभे राहणे, आणि ६ व्या महिन्यात त्याचे भाग्य उदयाला आले आणि परमेश्वराचे दर्शन होऊन इच्छित प्राप्त झाले ती निष्ठा, ते कष्ट, तो निश्चय, सांप्रत मानव अमलात आणीत नाही, म्हणून त्यास सगुणदर्शन मिळत नाही, हेच त्याचे तात्पर्य

तप आचरणाचे हे प्रकार फक्त पुरातनकाळीच होते आणि सध्या आधुनिक काळात मात्र ते नाहीत असे नाही रामदासस्वामींनी टाकळी येथे गोदावरी नदीच्या पाण्यामध्ये उभे राहून बारा वर्षे तपश्चर्या केली, असे आपण ऐकतो सुमारे सहा वर्षांपूर्वी एका साधूने मुंबई शहरी चर्चगेटजवळील मैदानात भूगर्भात सात दिवस स्वत ला कोंडून घेतले होते आणि तो बाहेर ज्या दिवशी आला, त्या दिवशी तो समारंभ पाहण्यासाठी या ग्रंथराजाचे लेखकमहाशय जातीने तेथे हजर होते मुंबईचे "महाराष्ट्र टाईम्स" हे दैनिक आपल्या १८–९–१९६२ च्या अंकात अशी बातमी देते की, सेंट दल्मस देटंडे (फ्रान्स) या गावी मायकेल सायफर नावाचा २७ वर्षे वयाचा फ्रेंच इसम, दोन महिनेपर्यंत ४२० फूट खोल जमिनीत बसून राहिला होता ओलेत्याने एकटे राहिल्यामुळे शरीरावर काय परिणाम होतो हे जाणणे आणि याबाबतचा पूर्वीचा १५०० तासाचा विक्रम मोडणे असे दोन उद्देश त्याच्यासमोर होते खाड्यांतून वर येण्यास त्याला चार तास लागले ही उदाहरणे देण्याचा उद्देश इतकाच की, आधुनिक स्पुटनिक युगातील लोकही तपश्चर्या करू शकतात आणि आपल्या स्वत च्या शरीरावर नियंत्रण ठेवू शकतात

पंचाग्नि साधनाबाबतच असेच एक उदाहरण नागपूरचे 'जीवन विकास" मासिक वाचीत असता लेखकाच्या वाचनात आले त्या उदाहरणाबद्दल–म्हणजे ते उदाहरण खरोखरीच सत्य आहे असे–गोरेगाव येथील शक्तिउपासक श्री दादासाहेब पेंडसे यांनी कथन केले उत्तरप्रांती एका राजाच्या पदरी एक नोकर लिखाण करण्यासाठी होता दुपारच्या विश्रांतीच्या वेळी बागेत तो एका झोपडीत जाई आणि पंचाग्निसाधन करी एके दिवशी दुपारच्या विश्रांतीच्या वेळी राजाला

त्या कारकुनाची गरज भासली आणि राजाने त्याला बोलावून आणण्यासाठी दूताला पाठविले. दूत तेथे गेला. पाहतो तो झोपडीला आग लागलेली असून आतमध्ये मात्र हे कारकूनमहोदय शांत चित्ताने बसले आहेत, असे दृश्य त्यास दिसले. धावतच तो राजाकडे गेला आणि पाहिलेला सर्व वृत्तान्त त्यास निवेदन केला. राजा स्वत तेथे गेला आणि त्याने तो अद्भुत प्रकार " याचि देहीं याचि डोळा " पाहिला. नेहमीप्रमाणे समाधि उतरल्यावर तो कारकून—त्याचे उपनाव ठाकूर असे होते—कामावर हजर झाला. तव्हा राजाने त्याला साष्टांग नमस्कार घातला. विनम्रचित्ताने राजा त्याला म्हणाला, " आपली योग्यता मी ओळखली नव्हती, क्षमा करा आजपासून आपण मजकडे नोकरी न करता माझ्या घरी रहा आपणाला माझ्या घरी राहून ह्याच्या दुप्पट तनखा मिळेल. " असे त्याला सांगून राजाने त्याला सेवामुक्त केले. आजच्या ह्या विसाव्या शतकात देखील असे पंचाग्निसाधन करणारे महात्मे दिसून येतात

सन १९२० च्या सुमारास अमरावती शहरी बजरंगबुवा नावाचे एक साधु रहात असत. गावाबाहेरील हनुमान मंदिरात त्यांचा मुक्काम असे भर उन्हाळ्याच्या दिवसातही हे साधुमहाराज पंचाग्निसाधना करीत असत. दुपारी १२ वाजले, सूर्य डोक्यावर आला, म्हणजे चारी बाजूंनी गोवऱ्यांचा ढीग रचला जाई, आणि त्या पेटल्यावर, महाराज मध्यभागी बसत माथ्यावर सूर्याची उष्णता आणि चारी बाजूला अग्नींची उष्णता, याप्रमाणे तास-दोन तास कार्यक्रम झाल्यावर ते मंदिरात परत येत असत रा. नरहरशास्त्री कान्हे, डोंबिवली (ठाणे), यांनी ही साधना स्वत पाहिलेली असून, लेखकाला निवेदन केली आहे.

आता पुन्हा मूळ कथेवर येऊ. करंभ व रंभ ह्यांनी तपश्चर्या सुरू केली, हे आपण वर पाहिले, रंभ सूर्याच्या प्रखर उन्हात उभा राहू लागला नि तप करू लागला, तर करंभ पाण्यात उभा राहून तपस्या आचरू लागला. दिवसेंदिवस तपश्चर्येला जास्त जास्त उग्रपणा येऊ लागला, तशी इंद्राला काळजी वाटू लागली त्याने दोन्ही दैत्यांना तपापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला, पण ते सर्व प्रयत्न निष्फळ ठरले. तेव्हा कपटनीतीने त्यांचा नाश करावयाचा असे इंद्राने ठरविले. असुर नेहमी आपल्या प्रबळ तप सामर्थ्याने आणि परिश्रमाने अजिंक्य झाल्यावर त्यांना पराजित करण्यासाठी देवांना कपटनीतीचा अवलंब करावा लागला, ह्या बद्दलची अनेक उदाहरणे देता येतील. किंबहुना कपटाशिवाय असुरांचा पराभव करणे देवांना सर्वस्वी अशक्यच होते असे म्हणणे वावगे ठरणार नाही इंद्राने मकराचे रूप घेतले आणि पंचनदांमध्ये ज्या ठिकाणी करंभ पाण्यात उभा राहून तप साधना करीत होता तेथे जाऊन, त्याचे पाय ओढून, त्यास पाण्यात बुडविले नि ठार केले.

रंभाला हा वृत्तान्त कळताच, आपल्या बंधूचा अशा रीतीने देवांकडून घात व्हावा ह्याबद्दल फार वाईट वाटले. ते दु:ख त्याला असह्य झाले नि त्याने आपल्या बंधूसाठी प्राणार्पण करण्याचे योजिले अग्निदिव्य करून प्राणार्पण करावे असे ठरवून, तो अग्निकुंडात उडी मारणार, इतक्यात अग्निदेवता प्रकट झाली आणि तिने त्याला आत्महत्त्येपासून परावृत्त केले. इतकेच नव्हे, तर तिने त्याला एक वर दिला की, " अतिशय कीर्तिमान् असा पुत्र तुला लाभेल, पण त्याचा मृत्यु एका स्त्रीच्या हातून होईल. "

कालांतराने रंभ वनातून फिरत असताना एक चित्रवर्णाची, तीन वर्षे वयाची सुंदर महिषी त्याच्या नजरेस पडली. त्या दोघांनी समागम केल्यानंतर ती महिषी गरोदर राहिली. पुढे दुसरा एक महिष त्याच्या प्रियेवर अनुरक्त झाला आणि कामासक्त होऊन तो तिच्या मागे लागला आपल्या प्रियेच्या संकटनिवारणार्थ चाललेल्या प्रयत्नात रंभ त्या दुसऱ्या महिषाकडून मारला गेला. इतके झाले तरी तो नवीन महिष तिचा पिच्छा सोडीना शेवटी ती महिषी यक्षाला शरण गेल्यानंतर त्याने बाण मारून त्या कामासक्त महिषाला ठार केले. रंभाची चिता पेटवून ती महिषी आत्मार्पण करून सती गेली आणि त्याच वेळी चितेमधून महिषासुराचा जन्म झाला. ( देवीभागवत ५।१–३ ). ( महिषी उपनावाचे कुल आजही कर्नाटक प्रांती आहे. डॉ. सरोज महिषी या भारतीय लोकसभेच्या एक सभासद आहेत. )

पुढे वयात आल्यावर महिषासुराने तपश्चर्या करून अतुल बल मिळविले. तो अतिशय भव्य आणि शक्तिमान होता. त्याच्या शक्तीचे वर्णन श्रीधर कवींनी " अंबिकोदय काव्या " त केलेले आहे देवादिकांना त्याने त्रास देऊन सळो की पळो करून सोडले पण त्याचे निवारण कोणी करू शकले नाही. त्रस्त झालेले सर्व देव शंकराकडे गेले आणि उपाययोजना करण्याची त्यांनी शंकरांना विनंती केली. त्या वेळी रागाने त्रस्त झालेल्या शंकराच्या डोळ्यातून तप्ततेज बाहेर पडले. इतर देवानीही आपली तेजे त्यात मिसळल्यानंतर दुर्गादेवी तयार झाली. भूतलावर तिला दैत्यांच्या नाशासाठी पाठविण्यापूर्वी देवांनी आपली अमोघ अस्त्रे तिला अर्पण केली, आणि सर्वतैव शस्त्रसुसज्ज करून मगच दैत्यांबरोबर सामना करण्यासाठी पाठविले. त्याप्रमाणे दोघांचे तुंबळ युद्ध झाले आणि त्यात महिषासुर मारला गेला हा भाग सप्तशती ग्रंथामध्ये विवरणात्मक आलेला आहे. महिषासुराचा वध करणारी देवी म्हणून तिचे नाव महिषासुरमर्दिनी असे पडले आहे. या देवीला कोणी दशभुजा तर दुसरे कोणी अष्टभुजा मानतात. ( देवी भागवत ५।८–९ ) इतर पुराणेही थोड्याफार फरकाने हीच कथा देतात.

(२) महिषासुर हा हिरण्याक्ष दैत्याचा मुलगा. शंकराच्या वरदानाने तो प्रबळ झाल्यावर त्याने स्वर्गावर स्वारी करून इंद्रपदही घेतले. हे वृत्त नारदमुनींनी कार्तिकस्वामींना कळविले. कार्तिकस्वामींनी त्या दैत्याच्या नाशासाठी एक स्त्री निर्माण केली आणि तिचे नाव कात्यायनी असे ठेवले. महिषासुराचा नाश करण्यासाठी ती सिंहावर बसली, आणि दैत्याची चाहूल काढीत विंध्याचल पर्वतावर गेली. तेथे त्या दोघांत घनघोर युद्ध झाले. शेवटी महिषासुराचा पराभव झाला नंतर त्याने विजय मिळविणाऱ्या आपल्या प्रतिस्पर्धी देवींची स्तुति केली. तिला प्रसन्न करून घेतले आणि तिच्याच कृपाप्रसादाने तो शिवलोकास गेला. विंध्याचलपर्वतावर हे युद्ध ज्या ठिकाणी झाले त्या ठिकाणाला कात्यायनी क्षेत्र असे म्हणतात. ( स्कंद, नागर १११–२० ).

( ३ ) महिषासुर राज्य करीत असताना आणि त्याचे सर्व प्रजाजन त्याच्या त्रासाने त्रस्त झाले असता, ' जंबुद्वीपामध्ये एक अतिशय सुंदर युवती राहत असून महिषासुराची ती पत्नी होण्यास लायक आहे ' असे वृत्त नारदांनी त्यास कळविले अशा रूपवती रमणीची प्राप्ति व्हावी म्हणून महिषासुर विनाविलंब जंबुद्वीपामध्ये गेला आणि तपाचरणामध्ये निमग्न असलेल्या त्या युवतीला म्हणाला, " तू मजबरोबर विवाह कर. " महिषासुराची ही मागणी ऐकताच ती रूपगर्विता केवळ हसली आणि ह्या हास्यातून एक सहस्र सशस्त्र स्त्रिया भूमीवर अवतीर्ण झाल्या. नंतर महिषासुर आणि त्या स्त्रिया यांमध्ये घनघोर युद्ध झाले. त्या युद्धामध्ये महिषासुर मारला गेला. पुढे सर्व देवांनी ह्या प्रबळ आणि उन्मत्त दैत्याला ठार केल्याबद्दल त्या युवतीची मनोभावे स्तुति केली आणि तिचे नाव योगेश्वरी असे ठेवले. ती देवी नंतर प्रभासतीर्थावर जाऊन राहिली आणि तेथेच स्थायिक झाली. ( स्कंद, प्रभास ८३ )

( ४ ) पूर्वी अरुणाचलावर एक पतिव्रता तप करीत असता शंकराच्या वराने उन्मत्त झालेल्या महिषासुराचा एक दूत त्या ठिकाणी आला असता ते अप्रतिम लावण्य पाहून, ही स्त्री आपल्या धन्याला पत्नी म्हणून योग्य आहे असे समजून, तो वृत्तांत त्याने महिषासुराला निवेदन केला. महिषासुर त्वरितच तेथे गेला आणि तिला पाहताच कामपीडित झाल्याने, त्याने अतिथीरूप धारण केले त्याच स्वरूपात तो आश्रमात शिरला. तेव्हा नंतर त्याला असे आढळून आले की, लोप पावलेल्या आपल्या पतीची मर्जी संपादन करण्यासाठीच ती तप साधना करीत आहे. महिषासुर त्या पतिव्रतेला म्हणाला, " अशा दुर्बळ पतीपेक्षा मीच तुझा पति म्हणून तुला योग्य आहे. " तिने उत्तर दिले, " बलवानाची भार्या होणेच मी अधिक पसंत करते. तेव्हा दैत्याने आपले बलसामर्थ्य मला दाखवावे. " ह

शब्द ऐकताच दैत्य क्रोधायमान झाला आणि त्याने त्या स्त्रीला युद्धाचे आव्हान दिले. पतिव्रतेने हाती त्रिशूळ घेऊन महिषासुराला ठार केले.

ही पतिव्रता इतर कोणी नसून, शापभ्रष्ट स्वतः पार्वतीच होती. कांची येथे पार्वतीची तपःसाधना पुरी झाली आणि शंकरानी आपल्या जटेतील गंगादेवीच्या साहाय्याने, तेथे पूर आणला व प्राणपणाने पार्वतीने वाळूलिंगाचे रक्षण केले. ही कथा कामाक्षदेवीचा इतिहास पाहताना दिसून येते.

या ठिकाणी तपःसाधना पुरी झाल्यावर आकाशवाणी झाली की, " यापुढे तू अरुणाचलावर जाऊन तेथे तपश्चर्या चालू ठेव. प्राचीन काळी हा गिरि भयंकर ज्वालामुखी होता. पण आता त्याचे शीतस्वरूप असल्याने तो पवित्र आहे." या ठिकाणी तपःसाधना चालू असता वर म्हटल्याप्रमाणे महिषासुर मारला गेला. पुढे असे सांगतात की, महिषासुर हा शंकराचा भक्त असल्याने, त्याच्या वधाचे पातक विनाश पावावे म्हणून पार्वतीने आपला खड्ग त्या ठिकाणी भूमीमध्ये खुपसला आणि जे जलतीर्थ तयार झाले, त्यामध्ये अवगाहन केल्यामुळे पापाचा नाश झाला. हे खड्गतीर्थ आजही पाहता येते. तसेच महिषासुर आपल्या मस्तकी नेहमी शिवलिंग धारण करीत असे. तेही त्या ठिकाणी स्थापन केले. तो अरुणाचल नावाने प्रसिद्ध आहे. यासाठीच स्कंद पुराणात शंकराची जी स्थाने वर्णन केलेली आहेत, त्यामध्ये याचे वर्णन " प्रदीपः सर्वेषां अरुणगिरियोगी विजयते " म्हणजे सर्वांना प्रकाश देणारा शंकर भगवान योगी येथे अरुणाचलावर असलेला, याचा विजय असो. या कृत्याची स्मृति म्हणून, कार्तिक महिन्यात कृत्तिका नक्षत्रावर आणि पौर्णिमेचे दिवशी येथे मोठा उत्सव साजरा होतो, आणि प्रज्वलित ज्योतीमध्ये शंकर-पार्वती स्वरूपाचे दर्शन भक्तगणाना होते, अशी यात्रिकाची श्रद्धा आहे.

अरुणाचली शंकराचे मंदिर पायथ्याशी आहे. दक्षिणी पद्धतीचे भव्य मंदिर असून मुख्य गोपूर ११ माळ्यांचे असून, इतर अनेक गोपुरे आहेत. विजयसम्राट कृष्णराज याने बांधलेला सहस्रखांबी सभामंडप आहे. सांप्रत या ठिकाणाला भगवानस्वरूप रमण महर्षी यांचे निवासस्थान व आश्रम यामुळे आगळेच महत्त्व प्राप्त झालेले आहे. यांचा जन्म स. १८७९ साली होऊन स. १९५० साली ते समाधिस्त झाले. त्यांचे योगसामर्थ्य इतके उच्च प्रतीचे होते की, मातेला त्यानी ज्वालास्वरूपात स्वतःच शंकर भगवान असल्याचे दर्शन दिले. मानवदेह अदृश्य होऊन पुन्हा जन्मदेहात दर्शन दिले. त्यांची माता १९२२ साली मृत झाल्यावर, तिच्या स्मरणार्थ त्यानी जे शिवलिंग स्थापन केले, त्यालाच मातृभूतेश्वर असे नाव प्राप्त झाले आहे. अद्वैत इतके रोमरोमात भिनले होते की, कुत्री, मांजरे, सर्प, वाघ त्यांच्या समोर निर्भयपणे सचार करीत असत.

ज्ञानकोशकार केतकर आपल्या 'प्राचीन महाराष्ट्र' ग्रंथाच्या प्रस्तावनेत म्हणतात की, महिषासुरमर्दिनीची कथा, केवळ स्थानिक आहे किंवा या कथेचे धागेदोरे असुरराष्ट्रांच्या कथांबरोबर जुळविता येण्यासारखे आहेत, हे निश्चित सांगता येण्यासारखे नाही हे कथानक ऐतिहासिक स्पष्टीकरण मागत असून, पूर्वीच्या सेमेटिक वंशाच्या प्रार्थना कथांबरोबर यांचा संबंध पोहोचतो किंवा कसे ही गोष्ट संशोधनीय आहे.

राष्ट्रकूटघराण्याचा मांडलिक अरब राजा मुगतीप ह्याने संस्कृतभाषेत लिहिलेला चिंचणी ताम्रपट आज उपलब्ध आहे. त्यामध्ये महिषासुरमर्दिनी देवी व अगस्ति ऋषी याच्यावर केलेले स्तुतिपर श्लोक आलेले आहेत. ते वरील संदर्भात पाहणे युक्त ठरेल असे वाटते (संशोधन मुक्तावलि, लेखक–मिराशी, नागपूर)

भारतीय विद्याभवन इतिहास, पृष्ठ ४३९ वर म्हटले आहे की, महिषासुरमर्दिनीचे स्वरूप गुप्तवंशापासून (म्हणजे इ. स. दुसऱ्या तिसऱ्या शतकापासून) अस्तित्वात आले. त्यापूर्वी ते नव्हते. दुर्गा हे स्वरूप महाभारतकाळापासून, तर विंध्यवासिनी हे स्वरूप पुढे हरिवंश काळात पुढे आले.

अर्वाचीन भौगोलिक परिस्थितीचे सूक्ष्म निरीक्षण केल्यावर असे दिसून येते की, महिषासुरमर्दिनी देवता ही प्राधान्येकरून दक्षिणभारतीयांची पूजनीय देवता आहे. या देवतेची मंदिरे व शिल्प याच भागात अधिक आढळतात इतकेच नव्हे तर, ज्या अत्याचारी असुराला तिने ठार मारले असे पुराणातरीच्या कथा सांगतात, तो महिष पुत्र महिषासुर यानेच म्हैसूर शहर वसविले असून त्या प्रांतीचा तो अधिपती होता, अशी स्थानिक लोकांची श्रद्धा आहे. फार कशाला, त्या दैत्याचे एकमेव स्मारकही म्हैसूर येथेच प्रचंड ३५ फूट उंचीच्या पाषाणाच्या पुतळ्याने उभारण्यात आलेले आहे. याच भागात तोडा ही वन्य जमात आजही महिषी या पशूला पूजनीय मानते महिषासूर हा प्रांतीचा शासक केव्हा होता, हे जरी ऐतिहासिक साधनांनी सिद्ध करता येत नसले, तरी जेजुरीच्या खंडेराया प्रमाणे तो दुसऱ्या तिसऱ्या शतकापूर्वी झाला असावा कारण याच सुमारास या देवीच्या नावांना आणि उपासनेचा उल्लेख मिळतो कोणी एका राजाने संस्कृति वर्धनाच्या वेळी देवीच्या कृपाप्रसादाने या शत्रूचा नाश केल्यावर, महिषासुरमर्दिनी या नावाने त्याच विजयी स्मरणाने तिची पूजा सुरू केली असावी सहाव्या सातव्या शतकातील महिषासुरमर्दिनीच्या मूर्ति चतुर्भुज असून त्यामध्ये महिषाचा वध केलेला आढळत नाही परंतु कालांतराने शक्तिपूजेची वाढ झाल्यावर भक्तांनी तिच्या स्वरूपात बदल करून आठ हात, दहा हात व मुंडके तोडून त्यामधून दैत्य बाहेर येत असल्याचे स्वरूप दिले, असे वेरूळ अगर इतर ठिकाणच्या शिल्पावरून निश्चितपणे म्हणता येते.

जोधपूरपासून ४५ मैलांवर पाल्डी या गावी प्रतिहार राजवटाच्या वेळचे सहाव्या शतकातील एक सूर्यमंदिर आहे. बांधकाम लाल पाषाणाचे असून १८ चौकोनी खांब आहेत. या मंदिराच्या गाभाऱ्याबाहेरील बाजूस गणपति आणि महिषमर्दिनी यांच्या मूर्ति आहेत. येथे देवीची मूर्त तीन फूट उंचीची, चतुर्भुज असून, हाती खड्ग, सर्प, त्रिशूळ व त्यांच्या डावा हात महिषाच्या मुखावर असे स्वरूप आहे. म्हणजे महिषाची मान तोडलेली नाही व असुर बाहेर आलेला नाही (मरुभारती, एप्रिल १९६८) अशीच येथील उत्खनात २ ऱ्या शतकातील महिषमर्दिनीची याच स्वरूपाची एक मृण्मय मूर्ति आहे.

तुलसीदासजीकृत रामायणाची सुरवात खालील दोहऱ्याने होते —

एकबार त्रेतायुगमाहि । शंभु गये कुंभज ऋषि पाहि ।।

त्रेतायुगामध्ये शंकर कुंभज म्हणजे अगस्तीमुनींकडे गेले, आणि त्यांनी रामकथा पार्वतीला परस्पर ऐकविण्यास सांगितले. याचाच अर्थ असा की, रामकथा अथवा रामचरित्र कृतयुगात झाले असले पाहिजे. भारतीयतत्त्वज्ञानाप्रमाणे कृतयुग हे सात्त्विक गुणप्रधान असल्याने सत्याला प्राधान्य देऊन सर्वांची वर्तणूक होत असे. धर्माचरण त्या वेळी चार पादांनी होत असे. यामुळे राजशासन अगर सैन्य यांची विशेष गरज नसे. पापकर्म करणारे, दुसऱ्याचे अधर्माने लुबाडणारे नसल्याने, शक्तिपूजेची जास्त गरज नव्हती. धर्मसत्ताक राज्यपद्धति होती. पुढे हे आचरण लुप्त झाल्यावर शक्तिपूजेची गरज भासू लागली, आणि त्याची वाढ होत गेली. त्रेतायुगामध्ये राजसत्ताकपद्धति रूढ झाली.

भोज कवीने महिषीचे वर्णन करताना म्हटले आहे—

भर्ता मे महिषासुरः कृतयुगे देव्या भवान्या हृत ।
तस्मात्तद्दिनतो वहामि विधवा वैधव्यधर्मानहम् ।।

एके प्रसंगी महिषी सांगते की, कृत युगामध्ये माझा पति महिषासुर याचा देवीने नाश केल्यावर, मी विधवा जीवन जगत आहे. तात्पर्य हेच की, महिषासुराचा वध कृतयुगामध्ये झाला. तुळजाभवानीचा इतिहास पाहताना हेच दिसून येते की, कृतयुगामध्ये कर्दम नावाचे ऋषि व त्यांची पत्नी अनुभूती होऊन गेली.

वरील पुराव्यावरून असे म्हणता येते की महिषासुरमर्दिनी देवीची उत्पत्ति कृतयुगामध्ये झालेली आहे. भारतीय पंचांगाप्रमाणे कृतयुगाची १७ लक्ष वर्षे सोडली, तरी त्रेता व द्वापार युगाचीच २१ लक्ष वर्षे होतात, शिवाय

कलियुगाची ४५०० वर्षे निराळीच. महिषासुरमर्दिनीची उत्पत्ति इतकी जुनी असली पाहिजे. हे सर्व अशक्य कोटीतील आहे असेही समजण्याचे कारण नाही. डेक्कन कॉलेज पुणे, या संस्थेतील संशोधक डॉ. संकलिया, यांनी नेवासे व आसपासच्या उत्खननांवरून असे मत दिले आहे की, लक्षावधी वर्षांपूर्वीच्या संस्कृतिदर्शक वस्तु त्यांना सापडल्या आहेत. देवदानवांची अमृतवाटणी याच भागात झाली, असे महालयेच्या इतिहासावरून सांगता येते. हे सर्व संशोधन त्या दृष्टिकोनातून व्हावयास पाहिजे, पण आपण इतके निश्चितपणे म्हणू शकतो की, अनेक सहस्र वर्षांपूर्वी या देवीची स्थापना झालेली आहे. ती अतिप्राचीन देवता आहे. सहाव्यासातव्या शतकापर्यंत तिची मूर्ति निराळी होती, आणि सांप्रत दिसणारी अष्टभुजा, सिंहवाहिनी, रेड्याचे मुंडके तोडणारी व दैत्याचे शीर हाती धरणारी हे तिचे प्रगत स्वरूप होय; मूळचे नव्हे.

## या देवीची मूर्ति कशी असावी ?

शिल्पशास्त्रप्रमाणे ह्या देवीला दश हात असतील. त्रिनेत्र, जटा-मुकुट, व त्यामध्ये चंद्रकळा असावी. अतसी फुलासारखा वर्ण, नेत्रांचा वर्ण नीलोत्पल, उन्नत वृक्षःस्थळ, बारीक कमर, शरीराला तीन बाक असावेत, उजव्या पाच हातात त्रिशूळ, खड्ग, शक्तियुध, चक्र व धनुष्य आणि, डाव्या पाच हातात पाश, अंकुश, खेटक, परशु आणि घंटा असावी. पायाखाली महिष व त्याचे तुटलेले मुंडके–ज्यांतून रक्त स्रवत आहे असे–असावे. महिषाच्या तुटलेल्या मानेतून राक्षस बाहेर येत असून, अद्याप त्याचा एक पाय मानेतच अडकलेला आहे. त्याचे मुंडके देवीने नागपाशाने वर उचलून धरलेले आहे असे असावे. राक्षसाच्या हातात तलवार व ढाल असून, देवीने आपला त्रिशूळ त्याच्या मानेवर मारला असून तेथून रक्त बाहेर स्रवत आहे. राक्षसाचे स्वरूप उग्र असावे. देवीचा उजवा, पाय, तिचे वाहन जो सिंह, त्यावर असून डावा पाय महिषस्वरूप महिषासुराच्या शरीराजवळ असावा. विष्णुधर्मोत्तर पुराणाप्रमाणे, ह्या देवीचे स्वरूप सुवर्णकांतीयुक्त नवयौवना असून रागीट मुद्रा, सिंहाच्या पाठीवर बसलेली वीसभुजा असून उजव्या बाजूच्या दहा हातात शूल, खड्ग, शंख, चक्र, बाण, शक्ति, वज्र, डमरू अभय व छत्री या वस्तु असाव्यात. डाव्या बाजूच्या दहा हातात नागपाश, खेटक, परशु, अंकुश, धनुष्य, घंटा, ध्वज, गदा, आरसा आणि मुद्गल असावे महिषाच्या तुटलेल्या मानेतून राक्षस बाहेर येत असून त्याचे नेत्र, केस, भिवया, सर्व रक्तवर्ण असून, तो मुखातून रक्त ओकीत आहे असा दाखवावा. देवीचे वाहन सिंह हा त्या राक्षसावर गुरगुरत असून, देवी आपला त्रिशूळ त्या राक्षसाच्या मानेत खुपसीत आहे असे दाखवावे. राक्षसाचे शरीर

नागपाशाने वेष्टित असून त्याच्या हातात तलवार व ढाल आहे असे दाखवावे. ह्या वर्णनाबरहुकुम मूर्ति वेरूळ येथील लेण्यामध्ये खोदलेली आढळते. ते शिल्प अतिशय प्रेक्षणीय आहे. महाबलीपुरम् येथील लेण्यामध्ये सुद्धा अशीच आकृति कोरलेली आहे. ( शिल्परत्न संयोजित. )

टीप:—वरील ग्रंथकाराचे वेरूळ येथील देवीशिल्पासंबंधीचे विधान बरोबर नाही; लेखकाने भेट दिली तेव्हा फक्त चार भुजांचीच मूर्ति दिसली. त्याचे सविस्तर वर्णन " शिल्प देवता " प्रकरणात आढळून येईल.

हिमालयपर्वताच्या रावी-चंबा नद्यांच्या खोऱ्यांतील भागांना चंबाप्रदेश म्हणतात. चंब शहरापासून २५ मैलांवर ब्रम्हौर नावाचे म्हणजे पूर्वीचे ब्रह्मपूर गाव आहे. आठव्या शतकांतील लक्षणादेवीची तेथील मंदिरात मूर्ति महिषमर्दिनीची अष्टधातूची आहे. या क्षेत्री देवी महिषावर स्वार झाली असून, महिषाने पुढचे दोन पाय जमिनीवर टेकलेले व मुख भूमीस टेकलेले आहे. मूर्ति चतुर्भुज असून उजव्या वरच्या हातातील त्रिशूळ महिषाच्या मस्तकी टेकलेला, आणि डाव्या वरच्या हाताने महिषाची शेपटी धरलेली आहे. उजवा पाय महिषाच्या मुखावर आहे. म्हणजे या शिल्पात महिषाचा वध केलेला नाही.

महाभारत, विराटपर्व ( ८–७–२६ ) मध्ये युधिष्ठिर विराटनगराच्या प्रवेशद्वारी असलेल्या दुर्गादेवीला, महिषासुरमर्दिनी म्हणून हाक मारतो. " त्रैलोक्यरक्षणार्थाय महिषासुरमर्दिनि " असे म्हणतो.

यासंबंधी व्ही. आर. रामचंद्रन् दीक्षितार आपल्या ' ललितात्रय ' या ग्रंथामध्ये विवरण करताना म्हणतात, " Durga is said to be the same as Krishna. She is said to have four hands and four faces. Among other weapons, she holds the noose, bow and discus etc. She is addressed as a slayer of Mahisha, the demon buffalo, as Kali, Vindhyvasini etc. It has been a custom in India to attribute the exploits of one Goddess to another. The idea being that the different manifestations are after all for a certain definite purpose, and really there is one Devi, who assumes various forms, for fulfilling various purposes ( page 61 ). एका देवीला दुसऱ्या अनेक नावांनी का संबोधिले जाते, त्याचे हे एक उत्कृष्ट विवरण येथे केलेले आहे.

ह्या महिषासुरमर्दिनी मूर्तीला दुर्गादेवी हे नाव असून अनेक ठिकाणी ह्या देवीची मंदिरे व शिल्पे आढळून येतात. ज्या ठिकाणी देवीच्या पायाखाली

महिषाचे मुंडके तुटलेले असेल आणि त्यातून दैत्य बाहेर येत असलेला दाखविला असेल त्या ठिकाणी ती महिषमर्दिनी होय पण नावाचा इतका काटेकोर उपयोग न केल्याने, या देवीलाच अंबिका, भगवती, अष्टभुजा इत्यादि नावांनी संबोधिले जाते दुर्गादेवीसंबंधाने अधिक विवरण " दुर्गादेवी " ह्या शीर्षकाखाली ह्याच ग्रंथात अन्यत्र वाचावयास मिळेल तेव्हा त्याची द्विरुक्ति येथे केलेली नाही

पृथ्वी

फथा सुरस जन्मिच्या बहुत शुद्ध उत्पत्तिच्या ।
प्रसार जगिं पावल्या अमित युद्ध आपत्तिच्या ॥
प्रमत्त मद दैत्यका महिष दैत्य मारावया ।
स्वभावि सुर रक्षणा गलित धैर्य तारावया ॥ १ ॥

मंदारमाला

पृथ्वीवरी पूर्वि बंधुद्वयें, रंभ कारंभ दैत्यांनि केलें तपा ।
त्यांना करी इंद्र तो ताप, त्याचे पदाला न व्हावें मुळीं बाधका ॥
राजी न ते थांबण्याला जधीं, इंद्र हत्या करी त्या करंभासुरा ।
नाराज तो रंभ आरंभितो, अग्नि दिव्या सने प्राण टाकी त्वरा ॥ २ ॥

स्रग्धरा

अग्निदेवी तयाचें बघुनि मग फसें, कृत्य होई प्रसन्न ।
पुत्र प्राप्ती वरा घे, मरण परि असे हाति स्त्रिच्या न अन्य ॥
रंभानें लग्न केलें, महिषसतिसवें, पुत्रप्राप्तीहि घेई ।
मातेच्या जन्म जाती स्मरुनिहि महिषासूर नामासि घेई ॥ ३ ॥

पंचचामर

विशाल भव्य ज्या शरीर पर्वतासमानसे ।
महिष दैत्य मेघसा सु मेघ गर्जना असे ॥
कपाळीं शृंग लांब लांब द्वादशाहि योजनें ।
अजानु बाहु कालदंड शत्रु कांपती तनें ॥
नखें सु दीर्घ लांबशी, मुखात व्याघ्र दंष्ट्रिचें ।
भयाण दंत पंक्ति शब्द खट्ट खट्ट की तिच ॥
विदीर्घ ग्रंथि पोट होत शृंग टोक म्योचितां ।

जलाब्धि वेष्टितो धरेसि, पुच्छभार झोडितां ॥
गिरीं उडेचि अंतराळीं, श्वास, फेंक वादळी ।
सु-भग्न मेघ-डंबरी करोनि दूर झोकळी ॥
स्व-खूर झाडुनी अनेक वीर भूमि पाडिलें ।
अपार शृंग झोडमार, पुच्छमारिं ताडिलें ।
प्रदीर्घ श्वास अंबरांत शत्रु झोकितो किती ।
प्रचंड गर्जने भिवुनि पाश टाकितो किती ॥
मदा भरीत शृंग-दांडु कोलितोहि पर्वता ।
विटीस्वरूपा कंदुका, विमानि देव झोडितां ॥
पळां पळां भये पळा करीत पीठ पृथ्विचें ।
कुणी सुरां न तारितां, दडाहि पाठिं अंबिके ॥ ४ ॥

आर्या

मत्त महा महिपासूर महिवरी मार्डीत महिप धिंगाणा ।
माहेंद्रि नगरीं सुर मोहे व्याकूळ करित पिंगाणा ॥ ५ ॥
देवांची देवसभा देवपुरींतें दिसां दिसां दुमली ।
देवेंद्राच्या मागें देवपुरी शिव सभेत अवतरली ॥ ६ ॥

पृथ्वी

स्वतेज अपुलें तदा समुहिं देव तें आणिती ।
स्वरूपिं तुज निर्मिती महिवरी तुला धाडिती ॥
कुणां गमसि स्वामिनी खचित विश्व दुर्गा सती ।
दशायुध भुजाबळें रगड दानवा घोर कीं ॥ ७ ॥

मालिनी

सुरवर निज तेजे निर्मि दुर्गा सुमूर्ती ।
शिव पुरवि मुखासि देविच्या तेजकांती ॥
यम शिरासि कचा दे, नेत्र ईशान स्वामी ।
प्रबळ नयन तेजा, ज्योत दे पावकाग्नी ॥ ८ ॥

शिवगण शिर-भाला, आपदेवो जिभेला ।
शशिवर कुच भागा, वासुकी तालु भागां ॥
चपळ नयन अग्नी, कर्णरंध्रा मरूत ॥
वदनि सुरस पंक्ति, तो प्रजापत्य देत ॥ ९ ॥
धनपति शुभ नासां, युग्मभ्रू देत संध्या ।
हरि-भुज स्तनयुग्मा, सोम जंघोरु इंद्रा ॥
पदकमळ विरंची, पृथ्वि देई नितंबा ।
चरण करहि बोटां, अष्ट दिक्पाल वृंदा ॥ १० ॥

पृथ्वी

करांत मिळतो तुला अमित शस्त्रभांडार तो ।
मिळे न कधि ना कुणां नच पुढें कुणीं पाहि तो ॥
सु-पात्र प्रथमा करी, सजवि ब्रह्मदेवो दुजा ।
नितांत-स्थित वेद तो रिचित विष्णु भाला तिजा ॥ ११ ॥
त्रिशूळ दिधला तुला धवल पार्वतीच्या वरें ।
तडित्चमक शस्त्र तें वरुण इंद्र देई वरें ॥
स्व-पाश यम देतसे, धनुप अग्नि हाती ठशीं ।
खगार्पणित शंख तो शुचित वायुबाणा शशीं ॥ १२ ॥
कुबेर निजदंड दे, आणि नगेंद्र सिंहासना ।
जलाब्धि पुरवीतसे विपुल शस्त्रगारा घनां ॥
अनंत वरि घालितो सुमन पुष्पमाळा वरी ।
अशी सजविली तुला ठळक चंडिका गोजिरी ॥ १३ ॥
स्वरें उचलुनी स्वयें, धरित शस्त्रअस्त्रासि तूं ।
सुसज्ज रुभि कंदर्नी महिप दैत्य हत्येस तूं ॥
धरी विविध रूप तो असुर व्यग्र जेव्हा रणीं ।
परी हरविसी तया अचुक डाव ते हेरुनी ॥ १४ ॥
पराक्रम तुझा असा बहुत लाजवी दानवा ।
सलज्ज जइं पार्वती हळुंच पाहि विश्वंभरा ॥
परी मरत शेवटी महिप दैत्य दुर्गाबळें ।
प्रदीर्घ समया लढे परि अखेर खाली गळे ॥ १५ ॥

## ( ३६ ) महाकाली

ह्या देवीची उत्पत्ति खालीलप्रमाणे आढळते.

प्रलयकाळच्या वेळी भगवान विष्णु शेषशय्येवर असताना आणि योग निद्रेमध्ये अगदी मग्न असताना त्याच्या कर्णमळापासून मधुकैटभ दैत्याची उत्पत्ति होऊन ते ब्रह्मदेवाला ठार करण्यास उद्युक्त झाले. तेव्हा ब्रह्मदेव विष्णूकडे आले असता त्यांना जाग येण्यासाठी त्यानी योगनिद्रा देवीची स्तुति करून विष्णूला जागे करण्याची तिला प्रार्थना केली. कारण फक्त एकटे विष्णूच राक्षसापासून त्याचे संरक्षण करण्यास समर्थ होते. स्तुति ऐकल्यानंतर महामाया आदिशक्तीने भगवानाच्या नेत्र, मुख, नासिका, बाहु व हृदय इत्यादि अवयवातून आपले आवरण काढून घेतल्यामुळे भगवान जागे झाले. ब्रह्मदेवाच्या विनतीवरून त्यांनी त्याच्या रक्षणासाठी दैत्याबरोबर युद्ध चालू केले. हे युद्ध पाच हजार वर्षे चालू राहिले, परंतु ते थांबण्याचे काही चिन्ह दिसेना. ह्या वेळी मुख, नासिका आदि गात्रामधून निघालेल्या महामायेने दैत्याचा बुद्धिभेद केला आणि त्याना आपल्या दर्शनीने मोहीत केले. दैत्यानी बुद्धि फिरली आणि त्यानी आत्मनाशाचा मार्ग धरला, तो असा की,

ते दैत्य भगवानाला म्हणाले, " आम्ही तुझ्या युद्धकौशल्यावर निहायत खूष आहोत. तेव्हा इच्छा असेल तर वरदान मागून घे. " विष्णूला तेच हवे होते. सरळ सरळ युद्ध करून त्यास दैत्यांचा पराभव करणे शक्य नव्हते. म्हणून पडत्या फळाची आज्ञा समजून नारायण म्हणाले, " आपण जर माझावर संतुष्ट असाल तर माझ्या हातून आपणाला मरण यावे, असा वर आपण मला द्यावा. " मधुकैटभांनी " तथास्तु " म्हटल्यावर त्यांनी अशी इच्छा प्रदर्शित केली की, 'ज्या ठिकाणी पृथ्वीचा भूभाग पाण्याने झाकलेला नाही अशा ठिकाणी तू आम्हाला मरण दे.' विष्णुने त्या दैत्याना आपल्या मांडीवर घेतले आणि चक्राने त्यांचा शिरच्छेद केला.

ह्याप्रमाणे ह्या देवकार्यात ज्या देवीने भाग घेतला तिचे नाव महाकाली असे पडले. या देवीचे स्वरूप वर्णन करताना तिला दहा मुखे, दशभुजा व दशपाद असून हातात खड्ग, चक्र, गदा, धनुष्यबाण, परिघ, शूल, भुशुंडी, कपाल व शंख ही आयुधे आहेत. नीलमणीवर्ण कांति, वस्त्रालंकारविभूषित, जिची ब्रह्मदेवाने स्तुति केली आहे अशी ही दुर्गादेवी आहे ( कल्याण, शक्तिअंक, पृष्ठ ४७० )

महाकालीलाच दक्षिणकाली असे म्हटले आहे. याचे कारण मात्र असे की, मानवी शरीराच्या दक्षिणबाजूला पुरुषशक्ति व वामबाजूला स्त्रीशक्ति समजले

जाते. या दोन्ही शक्ति जोपर समान पातळीत असतात तोपर्यंत सुसारकाटा बरोबर मध्यबिंदूवर राहतो. परंतु पुरुष अगर स्त्री यांनी शक्तिसाधना केल्यानंतर आणि ती फलदायी झाल्यावर ही बाजू दुसऱ्या भागावर वर्चस्व गाजवू लागते. कारण या वेळी दुसरा भाग दुर्बळ असतो शक्तिसाधनेनें मन ब्रह्मानंदामध्ये डोलू लागते आणि जीवाला मोक्ष मिळतो. ज्या ठिकाणी कालीशक्तीचा जोर असतो त्या ठिकाणी त्या शक्तीला दक्षिणकाली म्हणतात.

दक्षयज्ञात सतीने जाळून घेतल्यानंतर दक्षाच्या पारिपत्यासाठी शंकरांनी आपल्या जटेतून एक केस उपटला आणि जोराने पर्वतावर आपटला. त्या वेळी एका बाजूने वीरभद्र आणि दुसऱ्या बाजूने महाकाली देवी उत्पन्न झाली.
(शिवपुराण, रुद्रसंहिता, अध्याय ३२).

अशा एका महाकालीचे स्थान आडीवरे (जि. रत्नागिरी) येथे आहे. चिं. कृ. दीक्षित यांनी "महाकाली आडीवरे" नावाची एक ल्हानशी पुस्तिका सन १९३६ साली प्रसिद्ध केली आहे. या पुस्तिकेवरून असे समजते की, अट्टवर या शब्दाचा अपभ्रंश आडिवरे असा झालेला असावा. अट्ट = बाजार. आणि वर = पूर किंवा नगर म्हणजे बाजाराचे गाव असा अर्थ होतो शके ११११ मध्ये शिलाहर वंशातील भोजराजाने एका दानपत्रात "अट्टविरे कपण मध्यवर्ती" असा उल्लेख केला आहे. अकराव्या शतकात या भागात जैनपंथीयांचे प्राबल्य होते. हे त्या भागातील अनेक देवतांच्या निरीक्षणाने समजून येते. पुढे शंकराचार्यांचा संचार धर्मप्रसारार्थ त्या भागात झाला. त्यांनी जैनमताचे खंडन करून येथील मूर्तीची स्थापना सन १३२४ च्या सुमारास केली आणि पेडावाडेत भिडे नावाचे सरमुख्यांनी जिर्णोद्धार केला खालील श्लोकात वर्णन केल्याप्रमाणे देवीचे स्वरूप आहे देवस्थानासंबंधी शिलालेख, आज्ञापत्र, सनदा, जमाखर्च इत्यादि पूर्वीची माहिती या पुस्तिकेत पाहावयास मिळेल आजही ते एक जागृत स्थान मानले जाते योगेश्वरी, महाकाली, महालक्ष्मी, महासरस्वती व रवळनाथ हेच पंचायतन होय. देवीचा उत्सव नवरात्रामध्ये होतो

उपजाति

आडीवरें गावीं तुम्हीं चला हो। पहा महाकाली महान ती हो॥
कोणी वदे स्थापन तें तियेचें। करीत आचार्यहि आद्य साचे॥ १॥
काळ्या शिळेची घडवीत मूर्ति। शवावरी पद्मासना सदार्चा॥
उंचीस चौतीसहि अंगुळे ती। चतुर्भुजा खड्ग त्रिशूल हातीं॥ २॥

गळ्यामध्ये सुंदर रुंड माळा । सु पान पात्रा धरिलें कराळा ॥
पांचामुखीं शेषफणी शिराळा । तुझ्या महाकाळि नमीं पदाला ॥ ३ ॥
योगेश्वरी रवळनाथ तेथें । सरस्वती नांदत प्रस्तरातें ॥
भेटा महालक्ष्मी नि माणकाई । सदैव त्यांना करि वंदनाही ॥ ४ ॥

महाकालीचे दुसरे एक स्थान अडूळ ( जि. रत्नागिरी ) येथे समुद्रकिनारी एका उंच डोंगरावर, दापोलीपासून ८ मैलावर आहे. सध्या आसपास विशेष वस्ती नाही, त्यामुळे दररोज पूजा होण्याची पंचाईत पडते. सणावारी अडूळ गावातून एखादा पुजारी तेथे जातो आणि देवीची पूजा करतो. मंदिर उंचावर असल्याने माणसांची प्राय. ये-जा नाहीच. नवनाथ पोथीमध्ये असे वर्णन आढळते की, मच्छिंद्रनाथ रामेश्वराहून निघाले ते पश्चिम किनाऱ्याने आपल्या पंथाचा प्रचार करीत उत्तरेकडे येत असताना या महाकालीच्या ठिकाणी आले. पोथीतील कथाभाग असा की, शंकराचे कालिकाभक्त नेहमीच्या युद्धाने श्रमल्यानंतर विश्रांति घेण्यासाठी ह्या ठिकाणी आले. त्या विश्रांतीच्या वेळी मच्छिंद्रनाथांनी देवीची भेट घेण्याचा प्रयत्न केल्यामुळे देवी क्रुद्ध झाली आणि त्या दोघांत घनघोर युद्ध चालू झाले. त्या युद्धात कालिकेचा पराभव होण्याचा प्रसंग आला असता साक्षात् शंकर प्रकट झाले. युद्ध करणारे दोन्ही पक्ष त्यांच्याच आश्रितांपैकी असल्याने त्यांनी त्या दोघांना परस्परांची ओळख करून दिली, आणि त्यांचा समन्वय घडवून आणला. या ठिकाणी नाथांच्या शिरावर देवीने आपला वरदहस्त ठेवला. त्याची साक्ष म्हणून ह्या क्षेत्री एक नाथपंथीय साधूचा पुतळा आहे. त्यालाच कोणी मच्छिंद्रनाथांचा पुतळा असे म्हणतात. महाकालीची उत्पत्ति मात्र मूळ कथेपेक्षा वेगळी आहे.

राजा कुष्टपीडित असल्याने, त्याला खाडक्या बल्लाळ असे म्हणत. शिकारी-निमित्ताने तो एकदा वनात फिरत असता एका तळ्यामध्ये त्याने स्नान करताच त्याचे कुष्ट नष्ट झाले. हा चमत्कार पाहिल्यानंतर साहजीकच राणीला अतिशय आनंद झाला आणि ती सरोवराच्या शोधार्थ निघाली. तिने ते सरोवर साफ करण्याचे योजिले. काम चालू असता तिला एके ठिकाणी अचल अशी गोपद्म आकाराची सावाची पिंडी दिसली, तसेच शेजारी खंदकात एक देवीची मूर्तीही दिसली. राणीने त्या मूर्तींची मंदिरे बांधण्यास सुरवात केली आणि त्याची नावे अचलेश्वर महादेव व महाकाली अशी ठेवण्यात आली. तीच मंदिरे अद्याप दिसून येतात याचे तात्पर्य इतकेच की, त्रेतायुगात सुनदाने बनविलेले मंदिर ध्वस्तप्राय झाले आणि द्वापार युगात पुन्हा त्याचा जीर्णोद्धार झाला.

येथील अचलेश्वर महादेवाचे लिंग कृतयुगात सुनदराजाने बसविले होते त्याला भूतनाथ नावाचा पुत्र होता. तो देवस्त्रियांना मोहित करू लागल्यामुळे, मातेने स्वतः त्याचे मस्तक तोडले आणि भूमीत पुरून टाकले. ज्या ठिकाणी ते पुरले, तेथे गाईच्या खुराच्या आकाराचा एक पाषाण बसविला, तोच पाषाण महादेव झाला.

१२ व्या शतकानंतर या क्षेत्री वाकाटकाचे राज्य होते, आणि नंतर गोंड राजे आले. गोंडराजा वीरशहाची कन्या, देवगडच्या दुर्गपाल राजाला दिली पण पुढे त्याने तिचा अपमान केला म्हणून ती पित्याचे घरी परत आली. वीरशहाने चिडून, युद्ध करून, जावयाचे मुंडके तोडून आणले आणि महाकाली देवीला अर्पण केले. या राजाची राणी हिराई नावाची होती. तिने मंदिराचा जीर्णोद्धार केला त्या वेळी जावयाचा मुखवटा मंदिरावर बसविला. त्या वेळेपासून या ठिकाणी चैत्र पौर्णिमेला देवीचा उत्सव सुरू झाला.

महाकालीचे मंदिर नैर्ऋत्याभिमुख असून, आकाराने सुमारे ५४ × ६० चौ. फूट असावे. मंदिराच्या बाजूने झरपट नदी वाहत आहे. या मंदिराचे वैशिष्ट्य असे की, या मंदिराचा गाभारा इतर क्षेत्राप्रमाणे भूमीला समांतर नाही तर १८ × १८ अशा खोल खड्यात आहे याचा अर्थ इतकाच की, उत्खनना मध्ये मूर्ति ज्या स्थळी सापडल्या तेथेच स्थानापन्न केलेल्या आहेत, वरती हलविल्या नाहीत. देवीची मूर्ति द्विभुज असून एका हाती तल्वार आणि दुसऱ्या हाती ढाल ही आयुधे आहेत. मूर्ति सुमारे पाच फूट उंच असून, ती खडकातच कोरलेली आहे. इ. स. १७५० च्या सुमारास हा जीर्णोद्धार झाला असावा, असे म्हणतात. मूर्ति नेहमी शेंदूरचर्चित असते.

येथील मंदिराच्या बांधणीप्रमाणेच कोटासंस्थानमध्ये चांदखेडी गावी भुयार खोदलेले अतिविशाल जैनमंदिर आहे. त्यामध्ये मोठमोठ्या जैनमूर्ति बसविलेल्या आहेत. त्यांची संख्या ५७७ आहे. मंदिराच्या दालनात १० फूट उंचीचा अखंड पाषाणाचा एक भव्य स्तंभ असून, त्यावर अनेक देवता कोरलेल्या आहेत.

यावरून एक निष्कर्ष काढता येतो की, शत्रूपासून देवताचे रक्षण करण्यासाठी, याप्रकारची मंदिरे मध्यभारतामध्ये बांधली जात असावीत. नाशिक येथील सीतागुंफा सोडली, तर अशी बांधणी महाराष्ट्र अथवा दक्षिणभारतामध्ये आढळून येत नाही.

साकी

तळकोंकणच्या कुडाळ भागीं अडूळ ग्राम हें आहे।
सागरतीरीं उंच मंदिरीं महाकालीला पाहे ॥ १ ॥
समर संग्रमीं सदा लढोनी अस्त्र कालिका थकलें।
शिवआज्ञेनें विश्रांतिस्तव येथे येऊनि निजलें ॥ २ ॥
नाथ मच्छिंद्र फिरतां फिरतां या स्थानावरी आलें।
वंदन करितां, निद्राभंगे, देवी लढण्या लागे ॥ ३ ॥
परस्परेंचि अस्त्र फेकिती, लढति बहु धैर्यानें।
परी कालिका-अस्त्र शिवाचें पडूं लागे थकव्यानें ॥ ४ ॥
स्वयें सदाशिव प्रकट होऊनी संधी तइं घडवितो।
प्रसन्न होतां नाथाचें शिरिं वरद-हस्तची येतो ॥ ५ ॥

( ३७ ) महासरस्वती

घण्टा शूलहलानि शंख मुसले चक्रं धनुः सायकम्।
हस्ताब्जैर्दधतीं घनान्तविलसच्छीतांशुतुल्यप्रभाम् ॥
गौरीदेहसमुद्भवां त्रिनयनामाधारभूतामहम्।
पूर्वामात्रसरस्वतीमनुभजे शुंभादिदैत्यार्दिनीम् ॥ १ ॥

अष्टभुजांमध्ये घंटा, त्रिशूळ, हल, शंख, मुसळ, चक्र, धनुष आणि बाण धारण करणारी, गौरीच्या देहापासून उत्पन्न झालेली, त्रिनेत्रा, चंद्राप्रमाणे कांति असणारी, संसाराची आधारभूता आणि शुंभादि दैत्यांचे निर्दालन करणारी अशी जी महासरस्वतीदेवी तिला माझा नमस्कार असो.

पूर्वी शुंभ-निशुंभ वधाच्या वेळी देवांचे सर्व अधिकार दैत्यांनी बळकाविले असल्यामुळे, त्यांचे पुन्हा ग्रहण करण्याच्या हर्षाने देव हिमालयपर्वतावर जाऊन देवी भगवतीची स्तुति करीत होते. तेथे पार्वतीच्या देहातून कौशिकी ही अतिशय गौरवर्णा देवी उत्पन्न झाली. तिचे ते असामान्य लावण्य पाहून शुंभ-निशुंभांचे हस्तक चंडमुंड राक्षस फारच विव्हल झाले, आणि तिचे ते स्वर्गीय अनुपमेय स्वरूप त्यांनी आपल्या राजाला निवेदन केले. निशुंभाने सुग्रीवनामक दूत तिच्याकडे पाठविला आणि त्याच्याकरवी तिला विवाहाची मागणी घातली. त्या देवीने सांगितले,

> यो मां जयति संग्रामे यो मे दर्पं व्यपोहति।
> यो मे प्रतिबलो लोके स मे भर्ता भविष्यति॥

देवीचा हा निरोप ऐकून धूम्रलोचन, चंडमुंड यांना देवीचे पारिपत्य करण्यासाठी पाठविले गेले, पण ते ठार झाले. तेव्हा स्वतः शुंभ निशुंभ प्रचंड सेना घेऊन समरांगणामध्ये उतरले. या वेळी कौशिकीने घंटानाद केल्यावर ब्रह्मा, विष्णु, महेश इत्यादि देवांच्या शक्ति तेथे साहाय्यार्थ जमा झाल्या. शिवशक्तीने कौशिकीला सांगितले की, "सर्व दानवांचा विध्वंस करून मला संतोषित कर." ही प्रार्थना ऐकल्यावर कौशिकीच्या शरीरातून एक अतिभयंकर चंडिकाशक्ति प्रकट झाली आणि रक्तबीजाच्या नाशानंतर तिने शुंभ नि निशुंभांना ठार केले. ही जी चंडिकाशक्ति निर्माण झाली तीच महासरस्वती होय.

सर्व देवगणांनी ह्या महासरस्वतीची स्तुति केली ती अशी, "हे देवि, तू अनंत पराक्रमी वैष्णवशक्ति आहेस. संसाराची आदिकारण देवता तूच आहेस. ह्या तुझ्या मोहित संसारातून तूच सोडवू शकतेस. सर्व विद्या तुझ्यामध्ये सामावलेल्या असून स्त्रीजात हे तुझेच रूप होय. तू शत्रूपासून आमचे रक्षण कर." इ० इ०. (कल्याण, शक्तिअंक, पृष्ठ ५७१.)

भारतामधील अनेक मंदिरांतून महाकाली, महालक्ष्मी आणि महासरस्वती अशा त्रिमूर्ति एकाच पीठावर स्थापन केलेल्या दिसतात.

केदारनाथची यात्रा करताना नारायणकोटीजवळ मंदाकिनी नदीच्या तटी महाकाली, महासरस्वती आणि महालक्ष्मीचे एक स्थान आहे.

## (३८) मासनदेवी

भडोच (गुजराथ) पासून १५ मैल अंतरावर रत्नपूर नावाचे एक गाव आहे. त्या गावाच्या आसपास चुनखडीच्या अनेक टेकड्या आहेत. त्यांपैकी एका टेकडीच्या माथ्यावर बाबाघोर यांचे थडगे आहे. तेथील मुजावर असा वृत्तान्त

कथन करतो की, ह्या थडग्याच्या ठिकाणी पूर्वी मासनदेवीचे मंदिर होते. मंदिर बहुधा उघडेच असावे. कारण तेथील प्रकाश अनेक मैलांवरूनदेखील दिसत असे. रात्रभर तो प्रकाश आसमंतात दिसावा म्हणून सायंकाळच्या वेळी अदाजे २५ शेर लोणी तेथील भव्य दिव्यामध्ये घालीत असत. ह्यामुळेच त्या देवीला मासनदेवी हे नाव मिळाले असावे.

ह्या दिव्याचा प्रकाश समुद्राच्या पैलतीरी मक्केपर्यंत पसरत असे. एकदा तो प्रकाश पाहून महमद पैगंबर आपला एक शिष्य सिद्दिकी ऊर्फ बावाघोर ह्याला म्हणाला, "ह्या प्रकाश कोठून येतो ह्याची चौकशी करून ये." त्याच्या आज्ञेवरून बावाघोर भडोचकडे येण्यास निघाला आपला तपास करण्यासाठी एक यवन येत आहे आणि त्यामुळे आपले स्थान भ्रष्ट होण्याची भीति आहे, असे पाहून, तेथील देवी भूमीमध्ये अंतर्धान पावली. अर्थातच लांबवर पसरणारा प्रकाशही नाहीसा झाला.

बावाघोर ह्या स्थानी आल्यावर तो तेथेच राहिला. पैगंबराच्या कृपेने त्याने त्या ठिकाणी अनेक चमत्कार केले आणि म्हणूनच ह्या ठिकाणी त्याच्या मृत्यूनंतर त्याचे थडगे उभारण्यात आले, ते अद्यापीहि दिसून येते ह्या ठिकाणी एक शयन वृक्षाचे झाड आहे. एखाद्या माणसाला खऱ्याखोट्याचा निवाडा करायचा असेल तर त्याला त्या झाडाच्या बुंध्यावर पाय ठेवून जावे लागते.

(भडोच जिल्हा गॅझेट, पृ. १६८)

( ३९ ) मूकाम्बिका

कुंदापूर ( जि० कारवार ) पासून तीस मैल अंतरावर कुदूर ह्या नावाचे गाव आहे असे सांगितले जाते की, परशुरामाने सात मुक्तिक्षेत्रे निर्माण केली ती येणेप्रमाणे—( १ ) रजतपीठ, ( २ ) कुमाराद्रि, ( ३ ) कुंभ काशी, (४) ध्वजेश्वर ( ५ ) शंकर नारायण, ( ६ ) गोकर्ण, आणि ( ७ ) मूकाम्बिका तेव्हा हे स्थान एक मुक्तिक्षेत्र आहे. ह्या देवीची स्थापना आद्य शंकराचार्यांनी केली असे सांगण्यात येते. हे एक सिद्धपीठच मानले गेले आहे. येथील शंकराच्या मंदिरात सुवर्णरेखांकित शिवलिंग आहे. त्यामुळे भाविक लोक ह्या स्थानाला फार मान देतात. ( कल्याण, क्षेत्र अंक, ५७।११६ )

( ४० ) योगेश्वरी

खड्गखट्वाङ्गधरां वद्धद्धये योगेश्वरीमिमाम् ।<br>दीर्घजिह्वामूर्ध्वकेशीमस्थिखड्गैश्च मण्डिताम् ।<br>दंष्ट्राकरालवदना कुर्याच्चैव कृशोदरीम् ॥ (शक्तिसंगमतंत्र)

या देवीच्या उत्पत्तीची कथा महिषासुरमर्दिनीचे शीर्षक पाहताना येऊन गेलेली आपल्याला दिसेल. जम्बुद्वीपामध्ये एक सुंदरी उत्पन्न झाली आणि तिने महिषाचा वध केला, ती ही देवी होय. तसेच अंबेजोगाई ह्या पीठाचा इतिहास पाहताना ह्या देवतेची दुसरी उत्पत्ति आपण पाहिलेली आहेच.

योगेश्वरी म्हणजे जोगेश्वरी देवी होय. परंतु जोगेश्वरीची उत्पत्ति अद्याप कोठे आढळलेली नाही. योगेश्वरी हा जोगेश्वरी ह्या शब्दाचा अपभ्रंश आहे. तेव्हा ह्या देवीविषयी विशेष नमूद करण्यासारखे काहीच नाही. ह्या देवीचे स्वरूप दशभुजा, त्रिनेत्री असून उजव्या बाजूकडील हातांमध्ये शक्ति, खड्ग व डमरू आणि डाव्या हातांमध्ये घंटा, खेटक, खट्वांग आणि त्रिशूळ ही आयुधे असतात. बाकीची आयुधे दिलेली नाहीत. ( लक्षणसमुच्चय ).

## (४१) रासई देवी

देवगिरी येथे यादव साम्राज्य सन ११८७ पासून सन १३१८ पर्यंत दक्षिणभारतामध्ये पराक्रम गाजवून गेले. देवगिरीचा किल्ला पहात असताना लेखकाला असे आढळून आले की, मुख्य प्रवेशद्वारीच्या मागील बाजूस, सुमारे एक मैल अंतरावर खडकात कोरलेली शेंदूरचर्चित एक भव्य देवीची मूर्ति, गुहेप्रमाणे असणाऱ्या १० चौ. फू. जागेमध्ये आहे. भक्तगणांना देवीसमोर बसून पूजन, भजन करण्याइतपतच खुली आहे आणि समोर बालेकिल्ल्याचा खोल खंदक आहे. शेंदूरचर्चित असल्याने हातामधील आयुधे नीट ओळखता येत नाहीत. तिचे स्थान आडमार्गी असल्याने दर्शनाला विशेष कोणी जात नाहीत. देवीची वार्षिक यात्रा चैत्र पौर्णिमा या दिवशी साजरी केली जाते, आणि त्या वेळी बोकड, बकरी बळी दिली जात नाहीत असे सांगण्यात आले की, यादव घराण्याची ही कुलदेवता होती.

या देवीसंबंधी अधिक चौकशी करता असे कळून आले की, विजयनगर साम्राज्याच्या राजधानीच्या गावी या देवीची मूर्ति होती आणि कुलस्वामिनी म्हणून तिची पूजा केली जाई येथील साम्राज्य सन १३३५ साली, म्हणजेच देवगिरी येथील यादव-वंश नष्ट झाल्यानंतर, या ठिकाणी, हरिहर बुक्क बंधूंनी स्थापन केले, असा इतिहास सांगतो या साम्राज्यामध्ये पुढे कृष्णराय ( कोणी रामराय असेही म्हणतात ) नावाच्या राजाने राजधानीचे शहरी रासईदेवीचे, उत्तम शिल्पाचे, आणि गाभाऱ्याला आतील बाजूला सुवर्णाचे पाणी असलेले असे मंदिर बांधले, कारण ती देवता त्याची कुलस्वामिनी होती, आता येथे असे म्हणावेसे वाटते की, यादवांच्या घरात हीच देवता कुलस्वामिनी होती. तेव्हा त्यातीलच कोणी

वंश येथे आला असावा, ते आपणास यदुवंशीय म्हणवीत आणि राजाईदेवीला कुलदेवता त्यांनी मानली असावी. कसेही असो या शहरी तिचे मंदिर उभारण्यात आले ही गोष्ट सत्य आहे.

पुढे अशी कथा सांगतात की, पंढरीक्षेत्रीचा एक श्रद्धावान ब्राह्मण नामे जनार्दनपंत उदरनिर्वाहासाठी विद्यानगरला आला.

पंढरी क्षेत्रीचा एक ब्राह्मण । द्रव्यइच्छा मनीं धरून ।
देशावरासी चालून । विद्यानगरा पातला ॥

राजाई देवीचे मंदिर पहावे म्हणून मंदिराप्रत गेल्यावर, राजाने स्वत त्याला आत घेतले, आणि स्वत. करीत असलेले पूजाविधि दाखविले. स्वत निर्माण केलेली कृति प्रत्येकाला उत्तम वाटते, हा मानवी स्वभाव आहे. राजाई कुलस्वामिनीचे मंदिर कृष्णरायाने स्वत अमाप द्रव्य खर्चून बांधले होते. त्याच्या अभिमानाने तो म्हणाला,

राजाई ऐसें दैवत पाहीं । धुंडिता त्रिभुवनीं नाहीं ।
आम्हीं ऐकिलें देखिलें नाहीं । कृष्णराजा बोलतसें ॥
सुंदर देऊळ पहावें नयनीं । यासी रुप्याचें सारिलें पाणी ।
राजाई ऐसें भोग-उपचार । पांडुरंगासी नमतील ॥

राजाच्या या भाषणाने त्या ब्राह्मणाचा मानबिंदु डिवचला गेला आणि राजाने देवतांमध्ये असा भेदभाव मानावा याचे त्याला आश्चर्य वाटले. आपले श्रद्धास्थान असलेल्या पंढरीनाथाची निंदागर्भ राजवाक्ये ऐकूण ब्राह्मणाने राजाला उत्स्फूर्त उत्तर दिले,

देऊळासी रुप्याचें पाणी । तेची भूषण सांगसी जनीं ।
पंढरीक्षेत्र सुवर्ण कोंदणी । गेला रचोनी विश्वकर्मा ॥

ज्याप्रमाणे सतमहात्म्यानीं पंढरीचे वर्णन केले आहे, त्याप्रमाणे तो पुढे सांगू लागला की, त्या क्षेत्री कल्पतरूची वने, कामधेनूंचे वाडे, परीस-चिंतामणीसारखे पायदळी लोळणारे खडे, रत्नजडित सिंहासन, अमृतवाहिनी चंद्रभागा, तिलोत्तमादि अप्सरांचे नृत्य, गंधर्वांचे गायन यांनी आकाश निनादून गेलेले आहे. पण राजा, एवढ्याने संपले नाही ही तुझी कुलस्वामिनी त्या क्षेत्री झाडण्याचे काम करीत असते

राजाई तुझी कुळदेवता । नित्य पंढरी वर्तता । सडासंमार्जन करीतसे ॥

राजाला हे सर्व थोतांड आहे, असेच वाटले. पण ब्राह्मण पुनःपुन्हा शपथेवर सांगू लागल्यावर, कृष्णरायाने पढरीसेभी जाऊन स्वतः अनुभव घेण्याचे ठरविले. बरोबर ल्याजमा घेतला. निघताना ब्राह्मणाला मात्र ताकीद दिली की, वर्णन खोटे निघाल्यास शिरच्छेद केला जाईल.

पढरीचे मार्गावर असता ब्राह्मणाचे मनात मात्र चुळबूळ झाली. संतांनी जरी वरीलप्रमाणे वर्णन केले असले, तरी प्रत्यक्षात ते सर्वांनाच दिसत नव्हते. आता संकटाचे वेळी आपल्या आवडत्या देवाला हाक मारायची नाही तर कोणाला!

> देवा तुझी अद्भुत कीर्ति। जैसी वर्णिली पूर्वी संती।
> तैसीच सांगितली रायाप्रती। साक्ष पहावयासी येत असे॥
> वर्णिले क्षेत्र न देखतां दृष्टी। मजलागी दंडील॥

भक्ताने निष्ठेने हाक मारली तर देव धावून येतो आणि मानवी बुद्धीला अशक्य वाटणाऱ्या गोष्टी करतो, हा भक्तांना नित्याचा अनुभव आहे. राणाजींनी दिलेला विषाचा प्याला देव प्याले, आणि पचरस धातूची श्यामसुंदराची मूर्ति हिरवी पडली पण मीरा वाचली, भजन चालू झाल्यावर भक्ताला टाळी वाजविता येईना, म्हणून गोरा कुंभाराच्या थोटया हाताला बोट फुटली आणि तो भजन करू लागला, भीमाचे भ्रमनिरसन करण्यासाठी अमावास्येचे रात्री गंगातटावर त्याला एका वटवृक्षावर बसवून सर्व देवांची सभा भरवून, द्रौपदी ही आदिमायेचे स्वरूप कसे हे श्रीकृष्णांनी दाखविले. ईश्वरनिष्ठाच या अद्भुत गोष्टींची उकल करू शकेल, इतर कोणतीही कसोटी येथे चालणार नाही. याप्रमाणे पढरीनाथाला आपल्या भक्ताची काळजी उत्पन्न झाली आणि ते रुक्मिणीला म्हणाले,

> देव म्हणे माझी कीर्ती वाखाणिता गहन। होतो ब्राह्मणाचा अपमान।
> तरी दाखविणे प्राप्त, केलें कथन। द्वारकापुरी पूर्वीची॥

साक्षात पढरीनाथानेच पूर्वीचे द्वारकापुरीचे वैभव दाखविण्याचे ठरविल्यानंतर, मग इतरांची पर्वा कसली! राजे अवारीत बसून इतर मानकऱ्यां-सहित नगरात प्रवेश करताच त्यांना आश्चर्याचा धक्का बसला.

> देवालयाचे कळस शोभती। मंदिरे चमकती, लखलखती।
> अष्टसिद्धी सेवा करिती। त्यामाजी राजाई झाडित अंगण॥

कल्पतरूंचे वन, गंधर्वांचे गायन इ० प्रकारही राजाला दिसले, आणि तो या वैभवाने मोहून गेला. असा ऐश्वर्यसंपन्न देव आपल्या राजधानीत असावा,

अशा त्याने निश्चय केला. देवाला त्याने आपले मनोगत सांगितले आणि विद्यानगरला येण्याची प्रार्थना केली. देवांनी तिकडे जाण्याचे कबूल केले. पण त्याला अटी घातल्या

देव म्हणे भूमीवरी ठेवितां मजसी । तरी तेथेंच राहीन निश्चयेसी ।
कांहीं अन्याय घडतां तुजसी । मागुती पंढरीसी येईन ॥

संत एकनाथ चरित्रामध्ये असा उल्लेख आहे की, कृष्णरायाने पंढरपूरपासून अनागोंदीपर्यंत सोवळे नेसलेले ब्राह्मण मार्गावर उभे केले आणि हातोहात मूर्ति आपले गावी नेऊन, तेथे स्थापन केली. मूर्ति आल्यावर अन्य मंदिर बांधण्यास सवड नसल्याने, राजाई देवीला उचलून बाहेर ठेवली आणि गाभाऱ्यात विठ्ठल मूर्ति चढविली. याप्रमाणे असामान्य वैभवात विठ्ठल राहू लागले. पण ही मुद्रा एक प्रकारची देवांना बंदीशाळाच होती. कारण राजा स्वतः पूजन करी आणि इतर वेळी दरवाजा बंद करून, कुलूप घालून, बंदोबस्त करीत असे. वाटेल त्याला दर्शन घेण्याला बंदी होती.

पण इकडे पंढरपुरी जेव्हा संतमंडळी वारीसाठी जमली आणि गाभाऱ्यामध्ये विठ्ठल-मूर्ति नाही हे त्यांनी पाहिले, तेव्हा सर्वत्र हाहाकार उडाला. जमलेल्या मंडळींत त्या वेळी भानुदास नावाचे विख्यात संत होते. लहानपणी त्यांचा ओढा अध्यात्माकडे असल्याने, त्यांनी कधी विद्याभ्यास केला नाही, वेदपठण केले नाही किंवा शाळेतही गेले नाहीत. वडिलांनी नेहमी रागे भरावे, यांनी तिकडे दुर्लक्ष करावे. पण एके दिवशी वडील रागे भरल्यावर भानुदास गुपचूप घराबाहेर पडले आणि रानात एका ओसाड तळघरात जाऊन बसले. कर्मधर्मसंयोगाने त्या ठिकाणी एक सूर्यनारायणाची मूर्ति त्यांना दिसली हीच आपला उद्धार करील, या निष्ठेने अन्नपाणी वर्ज्य करून त्यांनी तपश्चर्या आरंभिली. पण चमत्कार असा की, त्या ओसाड जागी तिसरे दिवशी एक विप्र प्रकट झाला आणि त्याला दूध प्यावयास दिले याप्रमाणे सात दिवस गेले. आठवे दिवशी साक्षात् सूर्यनारायण प्रकट झाले आणि त्याला दर्शन दिले भानुदासाचा उद्धार केला या भानुदासाचा पुत्र चक्रपाणी, त्याचा पुत्र सूर्यनारायण आणि त्याचे पोटी शके १४३५ साली संत एकनाथाचा जन्म झाला.

भानुदासांची योग्यता इतर संतमंडळींना माहीत असल्याने विठ्ठल मूर्ति परत आणण्याची कामगिरी त्यांनी त्यांजवर सोपविली. भानुदास विद्यानगरला गेले आणि चौकशी अंती समजले की, त्याचा देव कडी-कुलुपाच्या बंदोबस्तामध्ये आहे. कसेही करून ते मंदिराच्या दाराजवळ आले आणि देवाचे दर्शन घेण्याचा मार्ग शोधू लागले. तोच आश्चर्य झाले !

द्वारापासीं येता जाण । कुलुपें गळाली न लागतां क्षण ।
भानुदास मंदिरीं प्रवेशोन । घातले नमन साष्टांगीं ॥

देवभक्ताची प्रेमाची बोलणी सुरू झाली. पंढरीची स्थिति भानुदासांनी सांगितली, आणि परत येण्याची विनंती केली, तेव्हा देव म्हणाले,

रायें आणोनी मजलागोनी । येथें घातलें बंदीखानी ।
वस्त्रेंभूषणें न रुचती मनीं । कधीं देखेन भीमातीर ॥
मग नवरत्नांचा काढोनी हार । भानुदास गळा घाली शार्ङ्गधर ।
म्हणे विन्हाडासी जाई सत्वर । येईल नृपवर दर्शना ॥

पुन्हा दुसरे दिवशी देवाला भेटण्याचे भानुदासांनी ठरविले आणि बाहेर पडले. कडीकुलपे पूर्ववत् लागली गेली. राजा नित्याप्रमाणे सकाळी पूजेला आला. कुलूप काढून आत मंदिरात गेला, पूजा सुरू झाली. राजाला आढळून आले की, नवरत्नांचा हार मूर्तीच्या गळ्यामध्ये नाही. कोणी चोरी केली हे समजेना. सर्वत्र जासूद रवाना झाले. चोरीचा तपास सुरू झाला. भानुदास या वेळी तुंगभद्रा नदीच्या तीरावर स्नानसंध्या आटोपून ध्यानस्त बसले होते. गळ्यामध्ये देवांनी घातलेला हार चमकत होता. राजसेवकांना तो नवखा ब्राह्मण आणि हार दिसताच आनंद झाला. चोरी करणारा सापडला, या भावनेने त्यांनी भानुदासाला पकडून राजाकडे नेले. रागाच्या भरात माणसाला विवेक रहात नाही. क्षणभंगूर सत्तेच्या अमलाखाली, अहंकाराखाली तो अन्याय करण्यास प्रवृत्त होतो. कृष्णराजाने या वेळी तेच केले. कोणतीही अधिक चौकशी न करता, भानुदासांना सुळावर देण्याची आज्ञा केली.

भक्तमंडळी असे मानतात की, विठ्ठलाला परत पंढरीला जायचे होते. राजाकडून अन्याय घडल्याविना, त्याला जाता येत नव्हते. तेव्हा ही बुद्धि, प्रेरणा देवानेच त्याला दिली असावी. हा धडधडीत अन्याय झाला होता. भानुदासाला सुळाकडे नेत असताना, तो देवाला म्हणतो,

भानुदास म्हणे देवाप्रती । मी न्यावयाला आलों एकांती ।
म्हणोनी योजिली ऐसी युक्ती । नृपाहातीं दंडविलें ॥
जो न्यावया येईल तुजकारण । त्याचा ऐसाची घ्यावा प्राण ।
राजमंदिरीं विलास भोगून । सुखें या ठायी रहावें ॥

या विचारप्रणालीत भानुदास निमग्न असता, तो सुळाजवळ आला. असंख्य प्रजाजन हा अन्याय पहाण्यास उपस्थित होते. राजेसाहेबही होते. आता

आज्ञेप्रमाणे भानुदासाला काष्टपाषाणाच्या सुळावर चढविणार, तो अणकुचीदार शूळ त्याच्या पोटात शिरून प्राण घेणार, तरी भानुदास म्हणतात,

परी शतसहस्र जन्मा अंती। तुजसी न सोडी रुक्मीणपिती।
ऐसे सांगोनी देवाप्रती। नमन प्रीती घातलें॥
जरी आकाश वरी पडों पाहे। ब्रह्मगोळ भंगो जाये।
वडवानळ त्रिभुवन खाये। तरी मी तुझीच वाट पाहे गां विठ्ठला॥
सप्तसागर एकवट होती। जरी हे विरोनी जाय क्षिती।
पंचमहाभूतें प्रलय पावती। तरी मी तुझेंची सांगाती, गा विठ्ठला॥

देव भक्ताची परिक्षा पाहत असतो. कसोटीच्या दगडावर घासून कस पारखीत असतो. वाटेल तेव्हा वाटेल त्यावर कृपा करण्याइतका तो सहजसाध्य नाही. जो परिक्षा पास होतो, त्याचा देव उद्धार करतो या ठिकाणी तेच झाले.

नवल वर्तलें अद्भुत। शुळा पल्लव आले अकस्मात।
फुलें फळें आली बहुत। पंढरीनाथ पावला॥

वाळलेल्या लाकडाचा शूळ सजीव झाला, पाने, फुले, फळे आली राजा आश्चर्यचकित झाला. देवाचे सामर्थ्य प्रत्ययास आले. देवाघरी केलेला अन्याय त्याला दिसू लागला. त्याच्या आवडीच्या भक्ताचा केलेला छळ त्याला समजून आला देवाला दिलेले वचन आपण मोडले, याची जाणीव झाली तो क्षमायाचना करू लागला, पण आता उपयोग नव्हता देवानी तेथे राहण्याचे नाकारले. लहान रूप घेऊन भानुदासाच्या झोळीतून परत स्वगृही पंढरपुरी जाण्यास निघाले कार्तिक एकादशी दिवशी गोपाळपुऱ्यात आले राउळात बातमी समजली, तेव्हा अनेक भक्तमंडळी वाद्यासह सामोरी गेली देवानी पूर्ववत रूप धारण करून, अवारीत बसून मिरवीत मिरवीत राऊळात आले, आणि स्थानापन्न झाले या दिवसाची स्मृति म्हणून आजही, कार्तिक एकादशी दिवशी वरील प्रकारचा सोहळा साजरा केला जातो

संत भानुदासाची चरित्रे अनेक भक्तानी लिहिली आहेत महीपतीने भक्तिविजय ग्रथात (अध्याय ४२–४६) हे चरित्र लिहिले आहे त्यातीलच ओव्या वर उद्धृत केलेल्या आहेत राजारामभट्ट रामचंद्रभट्ट हेलेकर यानी ओवीबद्ध चरित्र लिहिलेले आहे, ते पुणे येथे काशिनाथ पंढरीनाथ ठाकूरदास (१४ बुधवार पेठ) याचे संग्रही आहे केशवदास नावाच्या गृहस्थानी एक चरित्र लिहिलेले आहे संत एकनाथ महाराजाच्या काही ओव्या आहेत या सर्वांच्या आधारे अनेक कीर्तनकार भानुदास आख्यान वर्णन करतात

आपल्या भक्ताचे महत्त्व वाढावे याकरिता देवता याप्रमाणे चमत्कार करतात, याचे आणखी हे एक उदाहरण पहा.

नृसिंहवाडीला पूर्वी नारायणस्वामी नावाचे सत्पुरुष होऊन गेले. त्यांना दत्तगुरूंनी स्वतः गुरूपदेश दिला. याविषयी ते लिहितात की, एके समयी कृष्णानदीवर नेहमीप्रमाणे ते स्नानाला गेले असता पाण्यात कोणी तरी त्यांचे पाय ओढू लागला आणि थोड्याच वेळात त्यांना तळाशी नेले. या ठिकाणी दत्तात्रयांनी लीलामात्रेकरून एक सुंदर मंदिर तयार केलेले होते, त्यामध्ये त्यांना नेण्यात आले. त्या ठिकाणी विद्वान ब्राह्मणांचे वेदपठण चालू असून, गुरुमहाराज स्वतः कोटीतेज प्रकाशात आसनस्थ झालेले होते. त्यांना यथाविधि त्या ठिकाणी गुरुपदेश झाला. कषाय वस्त्रे धारण करण्यात आली. हाती दंड, कमंडलू दिला आणि यथाकाल त्याच वेषात पुन्हा पूर्ववत कृष्णेच्या काठावर आणून सोडण्यात आले. मठात आल्यावर लोकांचा विश्वास बसेना, तेव्हा तेथील पुजारी मंडळींना दत्तात्रयांनी दृष्टांताने कळविले की, "नारायणस्वामींचा गुरूपदेश समारंभ आम्हीच गुप्तपणे उरकून घेतला आहे, त्यांना त्रास देऊ नये."

कऱ्हाड गावी भिक्षेसाठी फिरत असताना समर्थांच्या झोळीत एका विधवाबाईने ५ वर्षांचा मुलगा घातला. समर्थांनी सांगितल्यावरून त्याने विहिरीत उडी मारली, तेव्हा तळाशी त्याला प्रत्यक्ष रामरायांनी झेलले, मांडीवर बसविले आणि मेवामिठाई खाऊ घातली. वर आल्यावर त्याने ही हकीगत स्वमुखे मातेला सांगितली. तेव्हा तिचे अंतःकरण गहिवरून आले. हाच मुलगा पुढे उद्धव गोसावी म्हणून तंजावर येथे मठाधिपति झाला.

साध्या संसारी मनाला हे अनुभव व देवाची करणी असत्य भासते, कारण त्यांच्या मनाची पातळी वाढलेली नसते, आणि देवतांच्या कर्तृत्वावर विश्वास नसतो. पूर्वी या प्रवृत्तीचे लोक होते आणि आजही आहेतच. यासंबंधी अंध संत गुलाबराव महाराज याचे विवरण असे करतात की, पांडुरंगाचे मंदिर सुवर्णाचे दिसणे, अथवा नदीच्या पोटात नारायणस्वामींना गुरुपदेश होणे, ह्यासारख्या कथा खऱ्याच आहेत पण जरी त्या कल्पित असल्या, तरी त्या सत्य होतातच. कोणी जर असा प्रश्न केला की, कथा जर खऱ्या आहेत, तर कल्पित असे सांगण्याचे प्रयोजन काय? महाराज म्हणतात की, कल्पित कथा व्यक्तींवरील विशिष्ट संयमाने विशिष्ट पुरुष निर्माण करता येतो, असा दृष्टिसृष्टिवादाचा सिद्धान्त आहे. परमेश्वराविषयी हजारो कथा जरी कल्पित असल्या तरी त्या खऱ्याच होतात, कारण त्या परमेश्वराचे नावच मुळी आहे भक्तकाम कल्पद्रुम. तेव्हा पंढरीच्या ब्राह्मणाने सांगितलेली सुवर्णमंदिराची कल्पित कथा

विठ्ठलाला खरी करावी लागली, ते याच कारणाकरिता. याकरिताच धर्मातील परमेश्वरीय इतिहासात अतीब्राह्मणपणा करणे ब्राह्मण्यास शोभत नाही. तो भक्तकामकल्पद्रुम सर्वांच्या इच्छा पूर्ण करणारा, सर्व शक्तिमान् परमात्मा, ज्याप्रमाणे माता आपल्या अज्ञानी मुलांचा हट्ट पुरविते, त्याप्रमाणे आपल्या निःसीम भक्तांचा हट्ट पुरवितो. अशी भक्तिमार्गातील लोकांची भावना आहे, श्रद्धा आहे.

या अशा अद्‌भुत चमत्कारासंबंधी कै. चिं. वि. वैद्य एके ठिकाणी विवरण करतात की, साधुपुरुषांकडून जे चमत्कार घडतात ते श्रुतिसिद्धतेसाठी घडतात. ज्या वेळी त्यांची वृत्ति परमेश्वराशी तादात्म्य पावते, त्या वेळी ते सहजपणे घडतात. मानवाच्या ठिकाणी वसत असलेल्या आत्यंतिक श्रद्धेमध्ये हे सामर्थ्य असते, आणि साधुपुरुषाच्या ठिकाणी ते सामर्थ्य निश्चितच असते.

भौतिक शास्त्रान्वये ज्याप्रमाणे विद्युच्छक्तीमुळे अनेक गोष्टी-आकाशवाणी, तारायंत्र इ०-साध्य झालेल्या दिसतात त्याप्रमाणे भक्तीश्रद्धेने साध्य होणाऱ्या तादात्म्यामुळे अशक्य गोष्टीही शक्य होतात. नित्याच्या व्यवहारात घडणाऱ्या सर्वच गोष्टींची उकल निसर्गसामर्थ्याने अथवा जडवादाने करता येत नाही. अशा वेळी दैवीशक्तीचा प्रभाव मान्य करावाच लागतो. अनेक असाध्य रुग्णांचे रोग निर्मूलन होण्याच्या बाबतीत ही गोष्ट मान्य करावीच लागते. मानवरूपी साधू चमत्कार करू शकतो. मग सर्व व्यापी परमेश्वराला कोणतीच गोष्ट अशक्य नाही, हेच सार आहे.

असे दैवी चमत्कार काही लोकांना खरे वाटत नाहीत. हे सर्व थोतांड आहे असे ते मानतात. यासाठी आजच्या युगातील साधी गोष्ट त्यांना आवर्जून सांगावीशी वाटते. रघुवीर जादूगार, बंगाली जादूगार अथवा इजिप्शियन जादूगार अनेक अद्‌भुत प्रकार करून लोकांचे मनरंजन करतात. पाहणाराला माहीत असते की, मानवदेहाचे तुकडे करून पेटीत भरणे, शरीरात अनेक सुया खुपसणे, हे सर्व प्रकार खरे नव्हेत, येथे काही दृष्टिभ्रम आहे. जादूगारही तसे स्पष्टपणे सांगतो की, जे पहाता ते खरे नाही. हा केवळ भास आहे. मग जी गोष्ट मानव करू शकतो, जो आभास तो काही क्षण निर्माण करू शकतो, ती लीला करणे त्या ऐश्वर्यसंपन्न परमेश्वराला का अशक्य असावे ! सारांश, एकच की, भक्ताच्या ठायी निष्ठा असेल, तर सर्व शक्य आणि निष्ठा नसेल तर सर्व अशक्य आहे.

संत भानुदास हे एकनाथ महाराजांचे पणजोबा होत, आणि त्यांचा काळ साधारणतः शके १३७० ते १४३५ असा मानला जातो. विजयनगरचा कृष्णराय याचा काळ शके १४१० ते १४५१ असा आहे आणि त्यानंतर

शके १४६४ चे सुमारास रामरायाचा काळ आहे असे इतिहासकार देतात. याचाच अर्थ असा की, भानुदासांच्या कालावधीत रामराय नसून कृष्णरायच होते, आणि त्यानीच विठ्ठलमूर्ति नेली असावी. हा पराक्रमी व धार्मिक वृत्तीचा राजा होता. श्री. ल. रा. पांगारकर "मराठी वाङ्मयाचा इतिहास" (भाग १) या ग्रंथात, विठ्ठलमूर्ति कृष्णरायाने नेली असा निर्वाळा देतात. (पृ. १०५). यावरून असाच निष्कर्ष काढावा लागतो की, ही घटना कृष्णराय राजाच्या वेळी घडली.

पंढरपूर येथील विठ्ठलमूर्ति अनेक वेळा गुप्त झाली, त्याचा संबंध मात्र या कथेशी लावणे बरोबर होणार नाही. कारण पद्मपुराणांतर्गत 'पांडुरंग महात्म्य' यातील पंढरीक्षेत्राच्या वर्णनात, ती मूर्ति मुसलमानांच्या त्रासामुळे अनेक वेळा लपविली गेली असा उल्लेख आहे. एके वेळी ती देगाव या गावी लपविली होती, आणि मराठ्यांची सत्ता आल्यावर, पुन्हा स्थानापन्न झाली. सन १६५७ च्या सुमारास कोणी रघोजी नामे लुटारूने ती चोरलीही होती. पण सध्या सुधारलेल्या अमेरिकेसारख्या देशात ज्याप्रमाणे श्रीमंतांची मुले, पळवून नेऊन भरपूर खंडणी वसूल झाल्यावर त्यांची मुक्तता करतात, त्याप्रमाणे भक्तांकडून भरपूर खंडणी घेऊन, रघोजीने मूर्ति परत केली, पण धनसंपत्ति मिळविण्याचा हा सहजसुलभ मार्ग माहीत झाल्यावर, उगाच कोण बसेल! काही महिन्यानंतर देवाचे पुजारी बडवे, यांच्याच साहाय्याने, मूर्ति पुन्हा चोरीला गेली, आणि अमाप खंडणी आल्यावर परत देण्यात आली. सारांश इतकाच की, कोणी वस्तूचा व्यापार करून, कोणी माणसांचा व्यापार करून, तर कोणी देवतांचाही व्यापार करून धनसंपत्ति कमवितो. भक्तगणाबरोबर असेही महाभाग निपजतात, हे आश्चर्य नव्हे काय!

राधाईदेवीचे स्वरूप काय असावे, याचा विचार करता असे दिसते की, ते शितळा अथवा जेष्ठा देवीप्रमाणे असावे. शितळादेवीचे ध्यान आपण अन्यत्र या ग्रंथात पाहिलेच आहे. टी. ए. गोपीनाथराव आपल्या "हिंदु देवता स्वरूप" ग्रंथात म्हणतात, अलक्ष्मी अथवा जेष्ठादेवी, ही गर्दभवाहनी असून, हातात झाडू आहे. तसेच '*अमृतसर जिल्हा गॅझेट*'मध्ये *ग्रामदेवता शितळामाता, ही गर्दभ*-वाहनी आहे, असाच उल्लेख आहे. व्युत्पत्तिशास्त्राचे दृष्टीने विचार केल्यास गर्दभ = रासभ = त्यावर आरूढ होणारी ती राधाई असा अर्थ ध्वनित होऊ शकतो. याशिवाय आपण वरील वृत्तांतामध्ये पाहिलेच आहे की, कृष्णरायांनी विठ्ठलमंदिराला भेट दिली, त्या वेळी त्याची कुलस्वामिनी, हाती झाडू घेऊन मंदिर सफाईचे काम करीत होती. यावरून राधाई हे शितळा देवीचे स्वरूप असावे, असे वाटते.

वरीलप्रमाणे जरी राउई नावाची व्युत्पत्ति देता येत असली, तरी आणखी एक संदर्भ पाहण्यासारखा आहे. 'नारद पंचरत्न' या ग्रंथामध्ये कृष्ण आणि राधा यांच्या संबंधाचे उत्तम विवरण आहे शैवसंप्रदायामध्ये जे स्थान दुर्गादेवी अथवा पार्वतीला आहे, तद्वतच वैष्णवसंप्रदायामध्ये राधेला ते स्थान दिलेले आहे. या ग्रंथामध्ये एके ठिकाणी खालीलप्रमाणे उल्लेख आहे,

रासेश्वरी च सर्वाद्या सर्वशक्तिस्वरूपिणी ॥ (नारद पंचरत्न)

या ठिकाणी राधेचा उल्लेख रासेश्वरी शब्दाने केलेला आहे, म्हणजेच ती रासक्रीडा प्रमुख अशी होती रासेश्वरीचा अपभ्रंश राउई होणे असंभवनीय नाही परंतु राधेच्या स्वरूप-मूर्ति ज्या सर्वत्र पाहण्यात येतात, त्यांमध्ये ती दोन हातांची आणि वाहन नसलेली अशी असते, तसेच हातात आयुधेही नसतात तेव्हा यादव घराण्यात राधेची पूजा करणे जरी शक्य मानले, तरी स्वरूपे भिन्न वाटतात या सर्वांचा विचार करता राउई म्हणजे सितळा माता हेच बरोबर आहे, असे वाटते

विजयनगर शहरी राउई मंदिरात विठ्ठलमूर्तिची स्थापना केली असे वर म्हटले आहे देवीची मूर्ति बाहेरील परिसरात ठेवण्यात आली विठ्ठलमूर्ति पंढरपुरी परत गेल्यावर गाभारा रिकामाच ठेवण्यात आला, आणि विठ्ठलमंदिर म्हणून ते स्थान जनतेच्या ध्यानी राहिले इतिहास असेही सांगतो की, कृष्णरायांनी शके १४३५ साली विठ्ठलस्वामींचे मंदिर बांधण्यास सुरवात केली, आणि त्यांच्या मृत्यूनंतर शके १४८७ सालापर्यंत ते पुरे झालेले नव्हते पण सांप्रत ती कलाकृति अर्धवट स्थितीतही उभी आहे आणि त्याच्या पूर्णतेसाठी, वर्गणी जमविण्याचे काम सन १९२० च्या सुमारास तिकडील एक ब्राह्मण पुणे शहरी करीत होता, असे रामचंद्रबुवा शिरवळकर यांनी सांगितले याचाच दुसरा अर्थ असा की, कृष्णरायांनी मूर्ति विजयनगरी नेल्यावर राउई मंदिरात बसविली भानुदास विजयनगरी गेले तेव्हा विठ्ठलमंदिर अस्तित्वात नव्हते त्यांच्या निर्वाणा नंतर त्याची बांधणी सुरू झाली प्राचीन विजयनगर म्हणजे सांप्रतचे अनागोंदी शहर तेथील सरकारी गॅझेट किंवा अन्य वाङ्मय यांमध्ये या गोष्टीचा उल्लेख मिळत नाही त्या प्रांतातील रहिवाशीयांजवळ विचारपूस केली असता वरील राउईदेवीमूर्तीसंबंधी माहिती ते देऊ शकत नाहीत

(मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड १, ले ल रा पांगारकर, महाराष्ट्रातील मंदिरे, ले श्री म माटे, नारायणस्वामी चरित्र, ले जेरे शंकराचार्य, चातुर्य चंद्रोदय, ले गुलाबराव महाराज, संत एकनाथ चरित्र,

ले गो. नी. दाडेकर; ह. भ. प. काशिनाथ ठाकूरदास ( पुणे ), चिंतामणीबुवा अपामार्जनी ( उज्जैन ), Art of India & Asia by Joseph Campbell, Doctrine of Shakti in Indian Literature by P. C. Chakravarti, महिपतीचा भक्तिविजय etc )

## (४२) वृंदा

स्वयंभू मनुचे दोन पुत्र होते. एकाचे नाव प्रियव्रत आणि दुसऱ्याचे नाव उत्तानपाद. उत्तानपादाचा पुत्र ध्रुव, ध्रुवाचा पुत्र वत्सार्ण आणि वत्सार्णाच्या पुत्राचे नाव केदार. हा केदार मोठा दानशूर होता. असे सांगतात की, त्याची अन्नदाने एवढ्या अवाढव्य प्रमाणावर असत की, स्वयपाक करण्यासाठी एक लाख आचारी आणि वाढप करण्यासाठी दोन लाख वाढपी असत. आपल्या सर्व प्रजेला तो भोजन घालीत असे. हल्लीच्या आधुनिक युगातही एवढा प्रसरणशील समाजवाद आढळून येत नाही. अनेक दिवस हा क्रम चाल्लेला असल्याने साहजिकच राजखजिन्यावर बराच ताण पडला आहे, हे त्याच्या ध्यानात आले.

संपत्ति जमा करण्याच्या हेतूने त्याने यज्ञ आरंभिला. पूर्णाहुतीच्या वेळी त्या अग्निकुंडामधून साक्षात् लक्ष्मीस्वरूप एक कन्या उदयास आली. तिचेच नाव वृंदा असे ठेवण्यात आले. जणू काय ती आपलीच कन्या आहे ह्या भावनेने राजा तिला वागवीत असे. मूलत:च ती लक्ष्मीस्वरूप असल्याने श्रीकृष्णाबरोबर विवाह करून देण्याचा हट्ट तिने धरला. भूलोकावरील एकही राजपुत्र तिच्या पसंतीस उतरेना. शेवटी श्रीकृष्णाला शोधण्यासाठी ती गोलोकात गेली आणि तेथे भगवान श्रीकृष्णाच्या चिरंतन सहवासासाठी त्याच्या चरणी मस्तक ठेवून ती श्रीकृष्णापाशी एकरूप झाली. त्याच्याशी तादात्म्य पावली. (ब्रह्मांडपुराण, कृष्णजन्मखंड, अध्याय ८६।१२–३६.)

तुलसी-शंखचूड आख्यानामध्ये ह्या देवतेचा उल्लेख आलेला आहे आणि " वृंदरूपश्च वृक्षाश्च यदैकत्र भवन्ति च " ह्या स्तोत्राने तिची स्तुति केलेली आहे. ( देवीभागवत, ९।२४।३२–३३. )

## (४३) विद्यावती

प्राचीन काळी मथुराभागात मधुदैत्य नावाचा राजा राज्य करीत होता आणि म्हणून ह्या शहराला मधुपुरी असे नाव दिलेले आहे. राम अवतारामध्ये मधुदैत्याने प्रभुरामचंद्रांना आव्हान दिले, तेव्हा त्यांनी शत्रुघ्नाला त्याचा बंदोबस्त करण्यासाठी पाठविले. त्या दोघांचे युद्ध होऊन त्यात मधुदैत्य व त्याचा पुत्र

लवणासुर हे दोघेही मारले गेले. मथुरा शहराच्या आसपास त्या वेळी बारा वने होती त्यांची नावे पुढीलप्रमाणे — ( १ ) मधुवन, ( २ ) ताल, ( ३ ) कुमुद, ( ४ ) बहुला, ( ५ ) काम्य, ( ६ ) खादिर, ( ७ ) वृंदावन, ( ८ ) भद्रवन, ( ९ ) भदीर, (१०) बेल, (११) लोह आणि (१२) मोहवन.

येथील प्रमुख शक्तिपीठ म्हणून विद्यावती ऊर्फ महाविद्या ऊर्फ चरसाना देवीचे मंदिर दाखवितात. भारतातील हे देवीचे एकमेव स्थान आहे मंदिर उच टेकडीवर असून देवीच्या नेत्रांमध्ये दिव्य तेजज्योत प्रकट होत असते हा ठिकाणी होलिकोत्सव फार मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो

वसंततिलक

नांदे प्रमूख मथुरा नगरींत पीठ ।
शोभे कलाकुसरीं मंदिरिं देवि रूप ।
तेजस्वि ज्योत नयनीं जनरक्षणातें ।
विद्यावती नमन मीं करितो पदातें ॥

मथुरा, कंस ही नावे आली म्हणजे भगवान श्रीकृष्णाची आठवण होणे साहजिकच आहे यमुना नदीच्या एका तीरावर मथुरा तर दुसऱ्या तीरावर वृंदावन आहे. कंसाची बंदीशाळा ह्याच गावी होती ज्या ठिकाणी पूर्वी बंदी शाळा होती तो भाग आता ओसाड आहे त्याला केशवटिळा असे म्हणतात. हल्लीच्या काळीसुद्धा ह्या बंदीशाळा मूळ गावापासून बऱ्याच लांब असतात पुण्याची बंदीशाळा शहरापासून सहा मैल अंतरावर येरवडे ह्या गावी आहे बेळगावची बंदीशाळा हिंडलगा येथे आहे तेव्हा मुख्य बंदीशाळा लांब गावाबाहेर बांधण्याचा प्रघात फारच जुना दिसतो भगवान श्रीकृष्णाचा जन्म एका अंधाऱ्या रात्री ह्याच बंदीखान्यात झाला पण आज त्या जन्मस्थानाची स्थिति काय आहे? हे पाहणे उद्बोधक वाटल्यामुळे मुद्दाम नमूद केलेले आहे

भगवान श्रीकृष्णाचा जन्म झाल्याबरोबर त्याला नदीच्या प्रवाहातून मोठ्या शर्थीने पैलतीरी नेऊन, मथुरेला नंदपत्नी यशोदा हिच्या घरी पोहोचविण्यात आले, आणि दुसऱ्या दिवशी होणाऱ्या हत्येपासून त्याला वाचविण्यात आले. कालांतराने यदुवंशाचा नाश झाला कंसाची परंपरा संपली, आणि बंदीशाळाही जमीनदोस्त झाली अनेक शतके ते पवित्र स्थान जनस्मृतीतून नामशेष झाले

“ चक्रनेमिक्रमेण ” ह्या न्यायाने पुन्हा त्या स्थानाला ऊर्जितावस्था, गुप्त राजवंशाच्या वेळी आली म्हणजे तिसऱ्या शतकात त्या जन्मस्थळी गुप्तवंशीय

दुर्गमासुराला हा वृत्तांत समजल्यावर तो देवीच्या पारिपत्यासाठी एक अक्षौहिणी सैन्यासह आला. त्या वेळी देवीने आपल्या साहाय्यासाठी कालिका, त्रिपुरा, बगला, कामाक्षी, तुळजा, गुह्यकाली इत्यादी अनेक शक्तींना पाचारण केले आणि त्याप्रमाणे देवीच्या शक्तिरूपे आणि चौसष्ट योगिनी साहाय्यास आल्या. दहा दिवसांमध्ये सर्व दैत्य सैन्य ठार केल्यावर अकराव्या दिवशी दुर्गम स्वतः युद्धास उभा ठाकला. त्या वेळी त्याने सर्वांगाला लाल चंदनाचा लेप दिला होता, गळ्यांत लाल फुलांची माळ घातली होती. लालवस्त्र परिधान करून रथामध्ये बसून तो युद्धास सज्ज झाला होता. देवीने काही बाण मारून रथाचे घोडे ठार केले, त्याचा सारथी मारला, चार बाणांनी दुर्गमाचे नेत्र फोडून त्याच्या भुजा तोडून टाकल्या. शेवटी एका बाणाने त्याचे वक्षःस्थळ फोडले. दैत्य भूमीवर पडला. त्या वेळी त्याच्या शरीरातून एक ज्योति निघाली आणि ती देविस्वरूपात विलीन झाली. त्या वेळी देवीने सांगितले की, "मी दुर्गम राक्षसाला ठार केले असल्याने माझे नाव 'दुर्गा' हे राहील." सारांश, या कथेतून, शताक्षी, शाकंभरी व दुर्गा या तीन देवतांची उत्पत्ति मिळते. शेवटी देवी अंतर्धान पावली आणि मणिद्वीपात आपल्या नित्याच्या निवासस्थानी गेली. (देवीभागवत, स्कंध ७ । २८-२९)

ओवी

शताक्षी देवीची जन्मकथा । सुरस वर्णिली देवीभागवता ॥
तप आचरोनी प्रमत्ता । दुर्गमासुर जाहला ॥ १ ॥
सुरांचें वेद हरिलें । यज्ञयाग थांबविले ।
व्रतादिक कर्म लोपलें । अवसर घातला सत्कार्यी ॥ २ ॥
मग समस्त देव एकवटोनी । जगदंबेसी शरण रिघोनी ।
संकटाचे निवारण करोनी । विनवीत वेद आण कीं ॥ ३ ॥
भुवनेश्वरी प्रसन्न जाहली । देहावरी सहस्र नयनें ल्याली ।
शाक-फळें करीं घेतलीं । प्रकट जाहली ते वेळीं ॥ ४ ॥
दुर्गमासुरासी घेरिलें । घोर युद्धीं ठार केलें ।
वेद परत सुरांना दिले । त्या शताक्षीला वंदितों ॥ ५ ॥
हीच देवी शाकंभरी । आणि दुर्गानाम पावली ।
संतोष देऊन भूमंडळीं । निजस्थाना पातली ॥ ६ ॥

## ( ४६ ) वत्सलादेवी

नेपाळमध्ये पशुपतिनाथ ह्या देवी बागमती नदी आहे. ह्या नदीवर दोन पूल आहेत. त्या दोन पूलांच्या मध्यंतरी आर्यघाट नावाचे क्षेत्र असून तेथे वत्सलादेवीचे मंदिर आहे. या देवीबद्दल अशी माहिती देतात की, शंकरांना पशुपति हे क्षेत्र फार आवडले आणि त्यांनी तेथेच राहण्याचा मनोदय केला. शंकर तेथे राहू लागल्यावर पार्वतीला भगवानांची सेवा करण्यास मिळेना म्हणून पशुपतिनाथाच्या मंदिरापासून थोड्याच अंतरावर ह्या ठिकाणी राहून ती शंकराची सेवा करू लागली. पत्नीच्या वात्सल्याने तिने अनेक दिवस सेवा केली आणि शंकरांना प्रसन्न करून घेतले. शेवटी शंकरांनी तिला ह्याच ठिकाणी कायमचे राहण्यासाठी अनुज्ञा दिली. त्याचे प्रतीक म्हणून येथे पार्वतीची स्थापना करण्यात आली आणि तिला वत्सलादेवी हे नाव ठेवण्यात आले.

जवळच जयमंगला आणि नीलसरस्वती यांची मंदिरे आहेत. वत्सला देवीच्या दक्षिणेस ५०० फूट अंतरावर नवदुर्गांचे मंदिर असून तिला राजराजेश्वरी असे म्हटले जाते. या मंदिरात यंत्राची पूजा केली जाते.

('नेपाळ मार्गदर्शक', श्री. महेश्वरशास्त्री हेबळे )

## ( ४७ ) शिवदूती

एकदा शंकरानी आपल्या जटा झटकल्यावर त्यामधून एक शक्ति बाहेर पडली. सर्व जगाचा नाश करण्याचे सामर्थ्य अंगी यावे, ह्यासाठी ती नीलपर्वतावर गेली आणि तिने तपश्चर्या चालू केली. पंचाग्निसाधनाने तिने स्वतःला आणखी बल प्राप्त करून घेतले, त्यामुळे ती अतिशय शक्तिशाली बनली. याच वेळी हिरण्याक्षाचा वंशज रुरू दैत्य ब्रह्मदेवाच्या वराने फार उन्मत्त झाला होता, आणि स्वर्गावर स्वारी करण्यापर्यंत त्याची मजल गेली. अर्थात संकट निवारण करण्यासाठी देवानी ह्या देवीची मदत घ्यावयाचे ठरविले. ह्याप्रमाणे देव नील पर्वतावर गेले आणि त्यानी शिवदूतीची प्रार्थना केली. देवीने दैत्याचा नाश करण्याचे ठरविले. तिने एक विकट हास्य केले. त्या हास्यातून अनेक शाकिणी व डाकिणी ह्यांची उत्पत्ति झाल्यावर देवीने त्यांच्या मदतीने त्या दैत्याचा पराभव केला. शिवदूतीने रुरू दैत्याला पायाच्या अंगठ्याच्या नखाने मारले, त्याचे शीर कापले आणि देवांना आणून दिले. त्यानंतर ती स्वस्थळी गेली.

शाकिणी आणि डाकिणी युद्ध करून थकल्या, देवीजवळ त्यांनी क्षुधाशांति करण्यासाठी अन्न मागितले. देवीजवळ त्यांना अन्न पुरविण्याचे सामर्थ्य नव्हते, त्यामुळे तिने आपल्या जन्मदात्याचा–शंकराचा धावा चालू केला, आणि

राजाने केशवजीचे मंदिर उभारले. मुसलमानांचे आक्रमण येईपर्यंत ते मंदिर सुखाने काही काळ नांदले. गझनीचा महंमद ते मंदिर पाहून इतका खूष झाला आणि इतका आश्चर्यचकित झाला की, त्याच्या मुखातून शब्द बाहेर पडले, "एक कोटि दिनार खर्चूनही असली कलाकृति निर्माण करता यावयाची नाही! अनेक निष्णात व नामांकित कारागीर कामाला लागले तरी वीस वर्षांच्या कालावधीत असले शिल्प पुरे व्हावयाचे नाही." परंतु एवढी स्तुति करूनही शेवटी ते मंदिर तोडले गेलेच. इतर देवालयेही धुळीला मिळाली. मंदिरातील सर्व सोन्या-चांदीच्या मूर्ति व एकूण तीन कोटी दिनार किंमतीची लूट त्या वेळी येथून बाहेर गेली.

काही शतकांनी बंगाल प्रांतीय सेन राजवटीने ते स्थान ताब्यात घेतले आणि तेथे श्रीकृष्णाचे मंदिर उभारले. पण तेही धर्मवेडाला बळी पडले. भाविकांच्या भक्तीने आणि आपल्या पूज्य अवतारी पुरुषांच्या आदराने पुन्हा उचल खाल्ली, आणि देवालयाची उभारणी झाली. सोळाव्या शतकात औरंगजेब बादशहाच्या कारकीर्दीत ते पुन्हा पाडण्यात आले. त्या वेळच्या राज्यकर्त्यांच्या शिरस्त्याप्रमाणे, मंदिराच्या पायावर अर्ध्याभागी मशीदही उभारली गेली आणि ती त्या ठिकाणी आजतागायत अबाधित उभी आहे. चालू शतकात त्या आदि-मानव श्रीकृष्णाच्या सुदैवाने तेथे शिल्लक असलेल्या अर्ध्या पायावर, लाल पाषाणाचे, ओरिसा स्थापत्यशैलीचे मंदिर उभारले जात आहे. प्रचंड संगमरवरी शिळेवर कोरीव काम चालू आहे. उत्खननामध्ये सापडलेले कंसाचे प्रचंड सिंहासन त्यामध्ये ठेवलेले आहे. परंतु काशी-विश्वेश्वर अगर रामचंद्राच्या जन्म-स्थानाप्रमाणे अर्ध्या भागावर मशीद ह्या स्वातंत्र्यकाळातही उभीच आहे. हिंदूंच्या श्रद्धास्थानाची सध्याची स्थिति ही अशीच आहे.

(शंकर आर. सारडा, महाराष्ट्र टाईम्स, १८–७–१९६२.)

## (४४) वैष्णवीदेवी

विष्णूच्या देहातून जी शक्ति बाहेर पडली अगर जी शक्ति त्याच्या तेजापासून उत्पन्न झाली, ती वैष्णवीदेवी होय. ह्या देवीचे एक स्थान हिमालय पर्वतावर आढळून येते. जम्मू (काश्मीर) पासून वायव्य दिशेला ४६ मैलांवर हे स्थान ५३०० फूट उंचीवर आहे. मोटारने जम्मूपासून काही अंतर गेल्यावर पुढे पायी प्रवास करावा लागतो, रबरी बूट, काठी इत्यादि पर्वत चढण्याची साधनसामुग्री बरोबर घेऊनच तेथपर्यंत जाता येते. मार्गावर तीन मैल आधी चरणपादुका हे स्थान असून, "कुमारी" स्थानावर "गर्भवास" गुहेतून बाहेर पडल्यावर हाथीमाता हे अतिशय कठीण शिखर चढून गेल्यावर पुन्हा खाली तीन खोल दरीमध्ये उतरावयाचे आणि देवतेच्या मंदिरात प्रवेश करावयाचा.

देवीचे स्थान एका अंधकारमय गुहेमध्ये असून असे सांगितले जाते की, देवीने स्वतः त्रिशुळ मारून ही भव्य गुहा तयार करून घेतली. सुमारे १५० फूट आत गुहेमध्ये गेल्यावर महाकाली, महालक्ष्मी आणि महासरस्वती ह्या तीन मूर्तींच्या चरणकमळापासून निर्झर वहात असतो. त्यालाच बाणगंगा म्हणतात. ह्या मूर्तींच्या मागील बाजूस वैष्णवी देवीची मूर्ति आहे. हे एक सिद्धिपीठ मानले जाते. (कल्याण, क्षेत्र, ५७।४५)

## (४५) शताक्षी

ह्या देवतेची जन्मकथा अशी की, प्राचीन काळी हिरण्याक्ष दैत्याच्या वंशात रुरूचा पुत्र दुर्गम हा फार प्रबळ झाला. त्याने असा विचार केला की, देवतांचे बळ वेदामध्ये आहे. तेच जर आपण हरण केले तर, युद्ध न करता देवाची दुर्दशा करता येईल. आपल्या हेतूच्या सिद्धयर्थ तो हिमालय पर्वतावर गेला आणि ब्रह्मदेवाचे चिंतन करून तपश्चर्या चालू केली. एक सहस्र वर्षे तपस्या केल्यावर ब्रह्मदेव प्रकट झाले आणि त्या दैत्याच्या इच्छेनुसार त्याला सर्व वेद अर्पण केले.

> वेदान् देहि सुरेश्वर ।
> त्रिषु लोकेषु ये मंत्रा ब्राह्मणेषु सुरेष्वपि ।
> बलं च देहि येन स्याद्देवानां च पराजयः ॥ (पद्मपुराण)

ह्याचा परिणाम असा झाला की, ब्राह्मणांना वेदाची विस्मृति झाली. वैदिक नित्यकर्म थांबले. देवतांना हविर्भाग मिळेनासा झाल्यामुळे त्यांच्यावर वार्धक्याची छाया पसरली, आणि शत्रूशी सामना देण्यास त्या असमर्थ झाल्या. यज्ञाग्नि थांबल्याने पर्जन्य थांबले आणि नदीनाले कोरडे पडल्यामुळे सर्वत्र हाहाकार उडाला. ह्यामुळे सर्व देवता हिमाल्यपर्वतावर गेल्या, आणि त्यांनी जगदंबेची आराधना सुरू केली. काही काळाने भुवनेश्वरी देवी अनंत नेत्रयुक्त शरीराने प्रकट झाली. तिच्या हातात धनुष्य, पद्म, फळे आणि भाजीपाला होता. भूतलावरील देवाची आणि प्राणिमात्रांची ही दशा पाहून देवी गहिवरली. आणि तिच्या अनेक नेत्रातून अश्रुधारा वाहू लागल्या. त्या धारांनी एवढे प्रचंड स्वरूप धारण केले की, शुष्क झालेले नदी नाले, विहिरी तलाव सर्व जलमय झाले. सर्वत्र आनंदीआनंद झाला. तसेच फळे आणि भाजीपाला खावयास मिळाल्याने त्या सर्वांना पूर्ववत् शक्ति प्राप्त झाली. त्या वेळी देवांनी त्या देवीरूपाला "शताक्षी" आणि "शाकंभरी" अशी दोन नावे दिली.

राजाने केशवजीचे मंदिर उभारले. मुसलमानांचे आक्रमण येईपर्यंत ते मंदिर सुखाने काही काळ नांदले. गझनीचा महंमद ते मंदिर पाहून इतका खूष झाला आणि इतका आश्चर्यचकित झाला की, त्याच्या मुखातून शब्द बाहेर पडले, "एक कोटि दिनार खर्चूनही असली कलाकृति निर्माण करता यावयाची नाही! अनेक निष्णात व नामांकित कारागीर कामाला लावले तरी वीस वर्षांच्या कालावधीत असले शिल्प पुरे व्हावयाचे नाही." परंतु एवढी स्तुति करूनही शेवटी ते मंदिर तोडले गेलेच. इतर देवालयेही धुळीला मिळाली. मंदिरातील सर्व सोन्या-चांदीच्या मूर्ति व एकूण तीन कोटी दिनार किंमतीची लूट त्या वेळी येथून बाहेर गेली.

काही शतकांनी बंगाल प्रांतीय सेन राजवटीने ते स्थान ताब्यात घेतले आणि तेथे श्रीकृष्णाचे मंदिर उभारले. पण तेही धर्मवेडाला बळी पडले. भाविकांच्या भक्तीने आणि आपल्या पूज्य अवतारी पुरुषांच्या आदराने पुन्हा उचल खाल्ली, आणि देवालयाची उभारणी झाली. सोळाव्या शतकात औरंगजेब बादशहाच्या कारकीर्दीत ते पुन्हा पाडण्यात आले. त्या वेळच्या राज्यकर्त्यांच्या शिरस्त्याप्रमाणे, मंदिराच्या पायावर अर्ध्याभागी मशीदही उभारली गेली आणि ती त्या ठिकाणी आजतागायत अबाधित उभी आहे. चालू शतकात त्या आदि-मानव श्रीकृष्णाच्या सुदैवाने तेथे शिल्लक असलेल्या अर्ध्या पायावर, लाल पाषाणाचे, ओरिसा स्थापत्यशैलीचे मंदिर उभारले जात आहे. प्रचंड संगमरवरी शिळेवर कोरीव काम चालू आहे. उत्खननामध्ये सापडलेले दगडाचे प्रचंड सिंहासन त्यामध्ये ठेवलेले आहे. परंतु काशी-विश्वेश्वर अगर रामचंद्राच्या जन्म-स्थानाप्रमाणे अर्ध्या भागावर मशीद ह्या स्वातंत्र्यकाळातही उभीच आहे. हिंदूंच्या श्रद्धास्थानाची सध्याची स्थिति ही अशीच आहे.

(शकर आर. सारडा, महाराष्ट्र टाईम्स, १८-७-१९६२.)

## (४४) वैष्णवीदेवी

विष्णूच्या देहातून जी शक्ति बाहेर पडली अगर जी शक्ति त्याच्या तेजापासून उत्पन्न झाली, ती वैष्णवीदेवी होय. ह्या देवीचे एक स्थान हिमालय पर्वतावर आढळून येते. जम्मू (काश्मीर) पासून वायव्य दिशेला ४६ मैलांवर हे स्थान ५२०० फूट उंचीवर आहे. मोटारने जम्मूपासून काही अंतर गेल्यावर पुढे पायी प्रवास करावा लागतो, रबरी बूट, काठी इत्यादि पर्वत चढण्याची साधनसामुग्री बरोबर घेऊनच तेथपर्यंत जाता येते. मार्गावर तीन मैल आधी चरणपादुका हे स्थान असून, "कुमारी" स्थानावर "गर्भवास" गुहेतून बाहेर पडल्यावर हाथीमाता हे अतिशय कठीण शिखर चढून गेल्यावर पुन्हा खाली तीन खोल दर्यांमध्ये उतरावयाचे आणि देवतेच्या मंदिरात प्रवेश करावयाचा.

देवीचे स्थान एका अंधकारमय गुहेमध्ये असून असे सांगितले जाते की, देवीने स्वत त्रिशुळ मारून ही भव्य गुहा तयार करून घेतली. सुमारे १५० फूट आत गुहेमध्ये गेल्यावर महाकाली, महालक्ष्मी आणि महासरस्वती ह्या तीन मूर्तीच्या चरणकमळापासून निर्झर वहात असतो. त्यालाच बाणगंगा म्हणतात. ह्या मूर्तींच्या मागील बाजूस वैष्णवी देवींची मूर्ति आहे. हे एक सिद्धपीठ मानले जाते. (कल्याण, क्षेत्र, ५७।४९)

## (४५) शताक्षी

ह्या देवतेची जन्मकथा अशी की, प्राचीन काळी हिरणाक्ष दैत्याच्या वंशात रुरुचा पुत्र दुर्गम हा फार प्रबळ झाला. त्याने असा विचार केला की, देवाचे बळ वेदामध्ये आहे. तेच जर आपण हरण केले तर, युद्ध न करता देवाची दुर्दशा करता येईल. आपल्या हेतूच्या सिद्धयर्थ तो हिमालय पर्वतावर गेला आणि ब्रह्मदेवाचे चिंतन करून तपश्चर्या चालू केली एक सहस्र वर्षे तपस्या केल्यावर ब्रह्मदेव प्रकट झाले आणि त्या दैत्याच्या इच्छेनुसार त्याला सर्व वेद अर्पण केले.

वेदान् देहि सुरेश्वर।
त्रिषु लोकेषु ये मंत्रा ब्राह्मणेषु सुरेष्वपि।
बलं च देहि येन स्याद्देवानां च पराजय॑ ॥ (पद्मपुराण)

संकट निवारण करण्याची त्यांना प्रार्थना केली. दक्ष यज्ञामध्ये झालेल्या पशुहत्येमुळे त्या ठिकाणी रक्ताचा अजगध पडलेला होता. शंकरानी तो त्याना खावयास दिला त्यांच्या नित्याच्या खाण्याची सोय म्हणून त्यानी आणखी दोन स्थळे सांगितली (१) गर्भिणी स्त्री जर दुसऱ्याचे वस्त्र न धुता नेसेल तर तिचे नवीन बालक एक वर्ष पूर्ण होण्याच्या आत त्यांनी खावे (२) ज्या पाळतिणीच्या खोलीत शाकिणी डाकिणी ह्यांचे पूजन होणार नाही, तेथील बालक त्यांनी खावे. शंकरांनी त्यांना असाही वर दिला की, सर्वजण त्यांना ह्यापुढे " लोकमाता " ह्या नावाने ओळखतील ( पद्मपुराण, सृ. ११)

वरील कारणामुळेच षष्ठीदेवीची पूजा अस्तित्वात आली असावी आणि ती देवी ह्यापैकी एक रूप असावे

ह्या देवीची मूर्ति बनविताना तिचे मुख कोल्ह्यासारखे असावे विकट वर्ण, कृश परंतु चिवट शरीर, सर्पांची भूषणे, गळ्यात कपालकुंडलाची माला, चतुर्भुजा, रक्तपात्र, खट्वांग, शूळ आणि मांसाचा एक तुकडा चौथ्या हातात असावा शालिवाहनावर बसलेली व खड्ग जवळ ठेवलेले असावे (मत्स्य पुराण) दुसऱ्या एका मताप्रमाणे तिचा वर्ण मध्यान्हीच्या प्रखर सूर्यकांतीसारखा असावा त्रिनेत्र, आठ हात, उजव्या बाजूकडे रक्त पात्र, गदा, खेटक व पाश, आणि डावीकडे पद्म, कुठार, खड्ग, व अंकुश, रत्नजडित अलंकार, आणि देव व ऋषि तिची सेवा करीत आहेत, असे रूप असावे [श्री तत्त्वनिधी] शंखचूड-महादेव युद्धामध्ये शंकराच्या बाजूने मध्यस्थी केली, म्हणून हिला शिवदूती नाव असे म्हटले आहे ( Elements of Hindu Iconography by T A Gopinath Rao, Page 365 )

(४८) सहस्रकाव्यमाता

धर्मारण्यं हि तत्पुण्यमाद्यं च भरतर्षभ ।
यत्र प्रविष्टमात्रो वै सर्वपापैः प्रमुच्यते ॥
(महाभारत, वन, तीर्थयात्रा ८२।४६)

गुजराथप्रांती अहमदाबाद–दिल्ली रेल्वेमार्गावर सिद्धपूर नावाचे स्टेशन सरस्वतीनदीच्या किनाऱ्यावर वसलेले आहे सरस्वतीनदी दक्षिणेकडे आली असता मरुभूमि (मारवाड) मध्ये गुप्त होते आणि पुन्हा अरासूरी अंबेच्या ठिकाणी उत्पन्न होते हे आपण पाहिले आहे अरासूरीपासून पुन्हा दक्षिणेकडे वहात जाऊन ती खंबायतजवळ सागराला मिळते, सिद्धपूर हे फार पवित्र क्षेत्र मानले आहे, हे वरील महाभारतातील उताऱ्यावरून दिसून येईल ह्या क्षेत्री

मातृश्राद्ध केल्यावर मातेला मोक्ष मिळतो, ह्या श्रद्धेने अनेक यात्री या ठिकाणी येत असतात, आणि तसा विधि करतात हे क्षेत्र येथील अक्षयवटासाठी प्रसिद्ध आहे त्याचा विस्तार भव्य असून तसा जुना वृक्ष इतरत्र पाहाण्यात येत नाही.

सरस्वती नदीच्या किनारी, सरस्वती-मंदिर, ब्रह्माडेश्वर शिवमंदिर व प्रसिद्ध काळमातामंदिर आहे. हे नाव देवीला का पडले याचा उलगडा पाहण्यात आला नसल्याने निश्चितपणे सांगता येत नाही पण कालदर्शक देवीचे नाव असावे असे वाटते ह्या मंदिराशिवाय अंबामाता, कनकेश्वरी ऊर्फ आशापुरी, रणछोडजी, सिद्धेश्वर इ० इ० मंदिरे येथे आहेत (कल्याण, क्षेत्र ८७/४०२.)

असे सांगतात की, समुद्रमंथन झाल्यावर लक्ष्मीचा प्रथम प्रादुर्भाव ह्या क्षेत्री झाला आणि नंतर तिने भृगुकच्छ हे गाव वसविले, किंवा असेही असू शकेल की, काही इतिहासकाराच्या मताप्रमाणे, भृगु लोक उत्तम नावाडी व दर्यावर्दी असल्याने परदेशी व्यापार करण्याच्या उद्देशाने त्यांनी हे बंदर वसविले. हैहयवंशीय राजाच्या वेळी या बंदरातून व्यापार चालत असे. त्या दर्यावर्दी व्यापारात भृगु लोकांनी खूप संपत्ति मिळविली म्हणून असे म्हणण्याचा प्रघात पडला की, "हे शहर लक्ष्मीने वसविले आणि भृगु ऋषीला दिले"

## (४९) संज्ञादेवी

सूर्याचा निर्माता विश्वकर्मा ह्याने आपली कन्या संज्ञा ही विवस्वान सूर्याला दिली ह्या दांपत्याला कालांतराने वैवस्वतमनु, यम व यमी अशी तीन मुले झाली काही दिवसपर्यंत जरी संज्ञा पतीबरोबर राहिली होती आणि तिला मुले झाली होती, तरी पुढे पुढे तिला आपल्या पतीचे प्रखर तेज सहन होईना, तेव्हा आपली ह्यातून सुटका करून घेण्याचे तिने ठरविले. तिने आपली प्रतिकृति (छाया) निर्माण केली आणि तिला आपल्या पतीबरोबर राहण्यास सांगताना ती म्हणाली, " माझे येथून निघून जाणे तू कोणालाही कळवू नकोस." नंतर ती विश्वकर्म्यांच्या घरी गेली, आणि पुढे तप करण्यासाठी उत्तर कुरुपांचाळ देशात निघून गेली. आपला शोध कोणाला लागू नये यासाठी तिने अश्विनचे रूप घेतले होते

छाया विवस्वानाबरोबर नांदत असता तिला सावर्णिमनु, शनैश्चर आणि तपती नावाची कन्या झाली संज्ञाची पहिली तीन मुले होतीच. त्यांना आता सावत्रपणाचा जाच होऊ लागला. एके दिवशी सावत्र आईचा जाच असह्य झाल्यावर तिला मारण्यासाठी यमाने लाथ उगारली. तावडतोब छायेने शाप दिल्यावर त्याचा एक पाय गळून पडला.

इतके झाल्यावर यमाने आपल्या वडिलांना सर्व मजकूर सांगितला आणि शापाचा परिणाम घालविण्याविषयी विनविले. पिता म्हणाला, " सर्वांवर उपाय आहे, पण मातेकडून मिळणाऱ्या शापावर काही उपाय नाही. सहसा माता आपल्या मुलाला उद्देशून वाईट आणि अहितकारक शापवाणी उच्चारणारच नाही कारण आपल्या बाळाचे वाईट व्हावे अशी तिची कधीच इच्छा नसते. " विवस्वानाला संशय आला आणि आपल्या पत्नीने मुलाला असा शाप का दिला ह्याचा छडा लावण्याचे त्याने ठरविले. तो आपल्या पत्नीकडे जाऊन तिला म्हणाला, " तू काही मुलाची खरी आई दिसत नाहीस. एरव्ही तू यमाला असा शाप दिला नसतास. गुणहीन आणि व्रात्य मुलालाही माता असा क्रूर शाप देणार नाही. " तेव्हा सत्य परिस्थिति छायेने निवेदन केल्यावर विवस्वानाला रज्ञेचे कपट समजले

विनालंब पत्नीच्या शोधार्थ तो विश्वकर्म्याच्या घरी गेला. तेथे सूर्याला असे सांगण्यात आले की, " तुमचे प्रखर तेज असह्य होत असल्यामुळे तिने तुमचा त्याग केला असून ती उत्तरकुरुपांचल देशात तप करीत आहे. " त्या जावयाला असेही सांगण्यात आले की, " बायको हवी असेल, तर प्रथम तेज कमी करा आणि मगच जा. एरव्ही ती नांदणार नाही. " तेज कमी करण्याचे सूर्याने कबूल केल्यावर विश्वकर्म्याने शाक द्विपात एक भयंकर मोठी अणकुचीदार गिरकी बसविली आणि तेज कातण्यास सुरुवात केली. सूर्याचे विशाल परिमंडलात्मक शरीर तासून फक्त $\frac{1}{16}$ भाग शिल्लक ठेवला आणि बाकीचा अवाढव्य भाग कापून काढला, याच कारणामुळे सांप्रत दिसत असणारा सुटसुटीत सूर्य तयार झाला. कातलेल्या तेजाचे तुकडे अंतराळात विखुरले गेले आणि तारामंडळ तयार झाले.

ह्यानंतर सूर्य उत्तरकुरुपांचल देशात गेला असता आपली पत्नी अश्वरूपात वावरत असलेली पाहताच त्यानेही अश्वरूप घेतले आणि तो हळूहळू तिच्याजवळ गेला. नवख्या माणसाशी ओळख करून घ्यायची मानवाची पद्धत जशी वेगवेगळी असते तद्वतच पशूमध्येही असते उदाहरणार्थ, लेखकाने अनेक वेळा निरीक्षण केले आहे की, दोन गाढवे जेव्हा एकत्र येतात, तेव्हा प्रथम नाकातोंडाचा भाग ते परस्परांसमोर धरतात, एकमेकांना हुंगतात आणि मगच बहुधा ओळख करून घेतात. मुंगीसारखा लहान प्राणीही तेच करतो. तसेच घोड्यामध्येही असावे दोघेही चरत असताना, विवस्वान व संज्ञा त्याचप्रमाणे एकत्र आले असता, सूर्याचे तेज घोडीच्या नाकपुडीमधून उदरात गेले आणि त्यामुळे कालांतराने ती गर्भिणी झाली. तिला दोन मुलगे झाले. नाकपुडीतून त्यांची धारणा झाली असल्याने त्यांना नासत्य हे नाव मिळाले. विवस्वान आणि संज्ञा या दोघांना परस्परांची ओळख

पटली विवस्वानाचे छोटेसे रूप पाहून सज्ञेला हर्ष झाला आणि ती पुन्हा विवस्वानाबरोबर राहू लागली. ( मार्कंडेय पुराण, अध्याय १२५ )

भारतीयांच्या पुराणकथा व देवतांच्या कथा या सृष्टीतील निरनिराळ्या निसर्गसृष्टीवरील रूपके आहेत असे अनेक वेळा सांगितले जाते इंद्र वरूण या देवता निसर्गाच्या प्रतीकात्मक आहेत हे आता सर्व जाणतात. देवीपीठाचे मूळ उत्पत्तिस्थान मृग नक्षत्राच्या मांडणीत आहे, हे पुराव्याने सिद्ध करता येते त्यापेक्षा सज्ञादेवीची कथा कशी रूपात्मक आहे, याचे विवरण श्र. ज. करंदीकर यानी एका लेखात केले आहे, ते साराशरूपाने मुद्दाम उद्धृत करीत आहे. हेतु हाच की, देवताची कल्पना सृष्टीतील निसर्गाचे मांडणीवर कशी आधारित असते, हे वाचकांना समजावे.

सज्ञा ही प्रजापतीची कन्या आणि तिचे निवासस्थान चित्रा नक्षत्रामध्ये असते, पण वेदामध्ये खालील ऋचा पहा.

त्वष्टा दुहित्रे वहतुं कृणोति इतिद विश्व भुवनं समेति ।
यमस्य माता पर्युह्यमाणा महो जाया विवस्वतो ननाशा ॥

या विवाहाचे वेळी सारे विश्व वऱ्हाडी बनले, आणि यमाची माता व विवस्वानाची पत्नी सज्ञा, विवाह होताच मरण पावली यावरून असे अनुमान निघते की, सुमारे आठ सहस्र वर्षापूर्वी चित्रानक्षत्रात रवि असताना, उत्तरायणाचे अती आणि दक्षिणायनाचे प्रारंभी हा विवाह झाला आहे. यामुळेच विवाह होताच दक्षिणायनाचा अधिपति जो यम, त्याची सज्ञा ही माता बनली रवींचा ताप उत्तरायणाच्या अती अती कडक असतो. सर्व नद्या कोरड्या पडतात, पण दक्षिणायन लागताच त्या वाहू लागतात या परिस्थितीचा उपयोग करून पुराणकारांनी ही कथा रचलेली असावी.

मार्कंडेय पुराणकार यासबंधी म्हणतात —

संज्ञा च रविणा दृष्ट्वा निमिलति लोचने ।
यतस्तत सरोषोऽर्क संज्ञा निठुरमब्रवीन् ॥
मयि दृष्टे सदा यस्मात्कुरुषे नेत्रसंयमम् ।
तस्या ज्जनिष्यसे मूढे प्रजासंयमन यमम् ॥
तत सा चपला दृष्टि देवी चक्रे भयाकुला ।
विलोलितदृशं दृष्ट्वा पुनराह च ता रवि ॥
यस्माद्विलोलिता दृष्टिर्मयि दृष्टे त्वयाऽधुना ।
तस्माद्विलोला तनया नदीं त्व प्रसविष्यसे ॥

सूर्य आपली पत्नी सशेला म्हणाला, ' ज्याअर्थी मला पाहताच तू नेत्र मिटून घेतेस, तेव्हा साऱ्या जगाला नेत्र मिटावयाला लावणारा यम नावाचा तुला पुत्र होईल.' पतीचा हा शाप ऐकून बिचारी त्याची पत्नी अधिक घाबरली, आणि लज्जायुक्त होऊन नेत्र उघडून विलोलदृष्टीने इकडे तिकडे पाहू लागली. सूर्याची पुन्हा मर्जी गेली, आणि तिचे हे वर्तन पाहून त्याने पुन्हा शाप दिला की, ' ज्या अर्थी आता तू विलोलदृष्टीने पाहू लागलीस, तेव्हा तुला विलोलरूपाने फिरणारी नदीरूप कन्या होईल.' आणि तीच यमुना होय. या दुहेरी शापामुळेच तिला दोन मुले झाली आहेत.

खगोलशास्त्राच्या दृष्टिकोनातून विचार केला तर याचा अर्थ असा की, अश्विनीनक्षत्रामध्ये सूर्य असता त्याचा ताप कमी होत असे याचाच अर्थ की, त्या वेळी उत्तरायण अश्विनीनक्षत्रामध्ये होत असे. अश्विनीनक्षत्रापासून चित्रानक्षत्र १८० अशावर आहे, आणि या ठिकाणी दक्षिणायन होत असे. याचा अर्थ असा की, विवाह झाला तेव्हा अश्विनीनक्षत्रामध्ये रवि असल्याने उष्णतामान भयंकर असल्याने त्याची पत्नी सशा ताप सहन न झाल्यामुळे निघून गेली. पत्नी निघून गेल्यावर तो प्रजापतीकडे आला, आणि आपला आकार कमी करून घेतला व ती गोष्ट शाकद्विपात झाली. पुराणकार विवरण करतात,

विश्वकर्मा त्वनुज्ञात• शाकद्वीपे विवस्वता ।
भूमिमारोप्य तत्तेजः शातनायोपचक्रमे ॥

यावरून असा निष्कर्ष निघतो की, अश्विनीनक्षत्रामध्ये जेव्हा उत्तरायण होत असे, तेव्हा वैदिक आर्यांचे पूर्वज मध्यआशियातील शाकद्वीपात राहत होते. शाकद्वीप हे अश्वांकरिता आजही प्रसिद्ध आहेच. याच द्वीपात रवि आपल्या पत्नीला सशेला पुन्हा भेटला आणि अश्विनीकुमारांचा जन्म झाला.

खगोलात अश्विनीनक्षत्र तीन ताऱ्यांनी ओळखतात. वेदामध्ये याच ताऱ्यांना अश्विनीकुमाराचा मधु-वाहन रथ असे म्हटले आहे, आणि तुमच्या रथाला वेगवान रासभ केव्हा जुपाल, असा प्रश्न विचारला आहे "कदायोगो वाजिने रासभस्य !" पहाटेच्या वेळी अश्विनीनक्षत्र उगवले म्हणजे अश्विनीकुमार आपल्या मधुवाहन रथामध्ये बसून आले की, मधुर वारे वाहू लागतात सर्व वनस्पति मधुर सुगंध पसरवतात, सर्व नद्यांचे पाणी मधुर होते असे वैदिक ऋषि त्याचे वर्णन करतात याचाच अर्थ असा की, हा काळ म्हणजे वसंत काळाचे आगमन होय. अरब ज्योतिषी या अश्विनीला " अल् शरतन् " म्हणजे दोन चिन्हे मानतात. आणि भारतीयांप्रमाणेच ती नूतन वर्षाच्या आगमनाची पूर्व सूचना समजतात. ख्रिस्ताब्द २५४० पासून मेषराशीचे तारे सूर्योदयापूर्वी आकाशात दिसू लागले म्हणजे वसंत ऋतूचा प्रारंभ होत असे.

अश्विनीच्या तीन ताऱ्याना भारतीय अश्वमुख मानतात, तर पाश्चिमात्य त्याला मेंढ्याचे मुख मानतात आणि भरणीचे तारे त्याचे उदर मानतात. ग्रीक ज्योतिषानी सुवर्णमेंढयाचे आख्यान याच कल्पनेवर रचलेले आहे. यम व यमुना याप्रमाणे तिकडे इनो ही सावत्र माता फुक्कुस व त्याची भगिनी हेले याना त्रास देई असा उल्लेख आहे. इनो ही शिशिरऋतूची माता आहे आणि हिच्या त्रासानंतरच वसंतऋतु येणार आहे. ग्रीक कथा वसंतसंपातावर अनुलक्षून असल्याने, त्याची नायिका, तिचा प्रवास पश्चिमेकडून पूर्वेकडे होत असे. तरी पण त्यांचा कोल्पिस प्रांत कॉकेशसच्या शेजारी उत्तरकुरुप्रांताला लागूनच आहे. तात्पर्य ग्रीक, अरब व आर्य यांच्या कथामध्ये या प्रसंगासंबंधी बरीच एकवाक्यता आहे, असे म्हणता येते.

यमाने आपली सावत्र माता छाया हिला मारण्यासाठी पाय उचलला म्हणजे शनीचे उच्चस्थान तूळरास व नीचस्थान मेषरास याचा उपयोग कथेत केलेला आहे. ( अ. अ. करंदीकर, कौस्तुभ १९६४, पृ. ६५ ).

रा. करंदीकर याचा या विषयावरील अभ्यास सखोल आहे आणि तो गुण त्यानी आपले पिताजी तात्यासाहेब यांच्यापासूनच घेतला असला पाहिजे. के. ल. स. करंदीकर हे गाढे ज्योतिषी आणि केंद्रसरकारच्या भारतीय पंचांग-समितीचे सभासद होते. आर्यांच्या देवताची उत्पत्ति निसर्गाच्या ठेवणीवर कशी कल्पित आहे, याचे दिग्दर्शन येथे होते.

## (५०) हुंकारेश्वरी

भडोच ( गुजराथ ) शहरापासून सुमारे १० मैल अंतरावर शुक्रतीर्थ नावाचे स्थान आहे. तेथे नर्मदा नदीच्या उत्तर तीरावर या देवीचे स्थान आहे. भक्तजनांच्या हुंकाराबरोबर नर्मदेच्या पाण्यातून ही मूर्ति वर आली म्हणून तिला हुंकारेश्वरी हे नाव पडले आणि क्षेत्र तयार झाले. मंदिराची बांधणी प्राचीन असून प्रथम २१ × ७ फुटाच्या दालनातून गेल्यावर आपला दुसऱ्या एका ११॥ चौ. फुटाच्या दालनात प्रवेश होतो. शेवटी १०॥ × ७ चौ. फुटाचा गाभारा आहे. या गाभाऱ्यात पांढऱ्या शुभ्र पाषाणाची पाच फूट उंचीची श्रीविष्णूची मूर्ति आहे. शंख, चक्र, गदा, पद्म ही आयुधे हातात आहेत. या प्रमुख मूर्तीच्या बाजूला ब्रह्मा आणि महेश यांच्या मूर्ति आहेत. म्हणजे या ठिकाणी त्रिमूर्ति-स्वरूपच आहे. मूर्ति जरी विष्णूची असली तरी ती हुंकारेश्वरी या नावाने प्रसिद्ध आहे.

या तीर्थाचा इतिहास फारच रम्य आहे. पूर्वी हे ठिकाण गुप्त होते. उज्जैनच्या राजाचा मंत्री चाणक्य हा फार हुशार असून त्याच्या " कुटिल

चाणक्य नीती " चा उल्लेख आपण व्यवहारात करतो. वृद्धावस्था प्राप्त झाल्यावर आपल्या पूर्वायुष्यातील पातकाचा नाश करण्याच्या मार्गाचा तो शोध करू लागला. त्या काळात कावळ्याचे पंख काळे नव्हते आणि त्यांना देवलोकी जाण्यासही मज्जाव नव्हता. अद्यापीही हिमालय व उत्तर भारतात काही पांढऱ्या पंखाचे कावळे दिसून येतात. दक्षिणेत पक्षीतीर्थावरील कावळेही पांढरेच आहेत. तेव्हा चाणक्याने विचार केली की, कावळ्यातर्फे देवलोकातून पापक्षालनाचा मार्ग शोधून काढावा आणि स्वहस्तानेच पापाचे क्षालन करून घ्यावे. त्याप्रमाणे त्याने कावळ्याना देवलोकी पाठविले. परंतु त्याना पाठविण्यापूर्वी त्याना त्याने असे वृत्त तेथे प्रसृत करण्यास सांगितले की, " पृथ्वीवरील चाणक्य मेलेला आहे. " आज्ञेप्रमाणे पांढऱ्या पंखाचे कावळे देवलोकी गेले आणि त्यानी त्याना शिकविण्यात आलेले वृत्त तेथे प्रसृत केले. नंतर तेथे देवाच्या आपसात झालेल्या भाषणावरून असे समजले की, " नर्मदा नदीतून पश्चिम दिशेला गेले असता एक तीर्थ आहे, आणि तेथपर्यंत होडग्यातून जावे लागते या क्षेत्री पूजन केले असता मानवाच्या पापाचा नाश होतो " कावळ्यानी हे वृत्त चाणक्याला कळविले. मग त्या कुशाग्र बुद्धीच्या चाणक्याने पडावातून पांढरे निशाण लावून त्या ठिकाणी जाण्याचे ठरविले. पाण्यातून काही अंतर गेल्यावर होडीवरील निशाणाचा रंग बदलू लागला. तेव्हा चाणक्य त्या ठिकाणी उतरला आणि त्याने हे क्षेत्र शोधून काढले. चाणक्याच्या असामान्य बुद्धिमत्तेचे लक्षण म्हणून हे उदाहरण देता येईल पुढे चाणक्य आणि त्याचा धनी चंद्रगुप्त या तीर्थावर गेले आणि दोघांनी तेथे स्नान करून आपल्या पापाचे क्षालन केले.

पण कावळ्याच्या ह्या कारवाईची बातमी यमराजाला समजताच त्याने त्यांना शाप देऊन त्याचे पंख काळे केले, आणि त्याना देवलोकात येण्याची बंदी केली. तेव्हापासून कावळ्याचे पंख काळेच राहिले. ह्या कथेची स्मृति म्हणून आजही या तीर्थावर होडीतून जाताना काळे निशाण लावतात, पण ते पांढरे होत नाही, ही गोष्ट वेगळी ( खेडा जिल्हा गॅझेट, पृष्ठ ५६७–६८ )

'सप्तशती ' ग्रंथामध्ये अध्याय ३ मध्ये या नावाचा उल्लेख आढळतो. देवी आणि महिषासुर यांचे युद्ध चालू असताना त्याचा सेनापती मारला गेल्यावर, राक्षसाचे सैन्य देवीच्या अंगावर धावून आले. पण या यःकश्चित राक्षसांबरोबर लढण्याची गरज नव्हती देवीने एक मोठा हुंकार केला आणि त्याबरोबर सर्व सैन्य लांबवर फेकले गेले. यास्तव देवीला हुंकारेश्वरी असे नाव आलेले आहे.

# आदिशक्तीचे तात्त्विक स्वरूप

## सृष्टीची उत्पत्ति

कल्पारंभी महामयी शक्तिदेवीशिवाय काहीही नव्हते. तिने आपल्या मनापासून एक पुत्र उत्पन्न केला आणि तोच पुढे तिचा पति व प्रियकर झाला. मग त्या उभयतांच्या संबंधातून अनेक देव देवता, जीव-जंतु, वृक्ष वनस्पति, पशु पक्षी, मानव-दानव असा विश्वविस्तार निर्माण झाला. भारतामध्ये ज्या काही मातृपूजक देवता आहेत, त्या सर्वांच्या उत्पत्ति कथा ह्या शक्तिप्रधानच आहेत. प्रथम शक्ति आणि मग तिच्या इच्छामात्रे सारी विश्वरचना झालेली आहे. ( पं. महादेवशास्त्री जोशी ).

वरील उतारा एका आद्यशक्ति मानणाऱ्या लेखकाचा आहे. त्यांच्या मताप्रमाणे शक्ति हेच मूळ होय. पण हे मत इतर धर्मीय लोकांना मान्य नाही. उत्पत्तीसंबंधीच्या कल्पना प्रत्येकाच्या निरनिराळ्या आहेत. त्यांच्या प्रधानदेवता निरनिराळ्या व कथाही मनोरंजक आहेत. ह्या सर्वांचा सारांश काढणेही मला अशक्य आहे. तेव्हा ती मते जशीच्या तशीच उतरल्याशिवाय दुसरा उपाय नाही.

( १ ) प्रलयकाल संपल्यावर श्रीगजाननांनी ब्रह्मदेवाला सृष्टि उत्पन्न करण्यास सांगितले. ब्रह्मदेवाने कश्यपादि सात मानसपुत्र निर्माण केले. मत्स्य पुराणाप्रमाणे हे दहा मानसपुत्र आहेत. ते येणेप्रमाणे—भृगु, मरीचि, अत्रि, अंगिरा, पुलह, क्रतु, मनु, दक्ष, वसिष्ठ, पुलस्त्य ( अ. १४१।९१ ). कश्यपाने एकाक्षरमंत्राने श्रीगजाननांची एक सहस्र वर्षे आराधना केली. आणि त्यानंतर गजाननांनी ऋषीला सृष्टि उत्पन्न करण्याचे सामर्थ्य दिले. मग कश्यप आणि त्याच्या १४ स्त्रिया ह्यांनी सृष्टि निर्माण केली. ( गणेशपुराण, अ. ९२ )

( २ ) ज्या वेळी प्रलयकाळ होतो त्या वेळी पर्वतही वायूने उडून जातात. बारा सूर्य एकदम प्रकाशमान होतात. पृथ्वीवरील उदक आटून जाते. मग अग्नि सर्व स्थावर-जंगम जाळून भस्म करतो. अशा वेळी संवर्तक मेघ हत्तीच्या सोंडेप्रमाणे धारा सोडून सर्वत्र जलमय करतात. असल्या प्रलयकाळी परमात्मा अणुरूपाने कोठेतरी राहिलेला असतो. सर्व विश्व ओंकारमय होते. शेवटी ओंकाररूप नादब्रह्म मायेने युक्त होऊन, सर्व विश्व पुन्हा निर्माण होते. पुन्हा ब्रह्मदेव व उत्पत्ति हा क्रम चालू राहतो. ( गणेशपुराण, अ. १२ )

( ३ ) कल्पाच्या आरंभी महेश्वर एकटाच निर्गुण स्वरूपात होता. त्याने आपल्या इच्छेने दक्षिणांगाने ब्रह्मदेव व वामांगाने विष्णु निर्माण केले. त्यांच्याकडे

रज, तम गुण दिले. नंतर सृष्टीच्या वाढीसाठी ब्रह्मदेवाने आगठ्यापासून मरिचि प्रमुख दहा ब्राह्मण उत्पन्न केले, आणि मांड्या, बाहु व मुख ह्यापासून इतरांची उत्पत्ति केली. (स्कंदपुराण, अरुणा ८.)

(४) मार्कंडेय म्हणतात —पूर्वी अव्यक्तापासून जन्म पावणारा ब्रह्मदेव उत्पन्न होताच त्याच्या मुखापासून वेद व पुराणे निघाली. धर्म, ज्ञान, वैराग्य व ऐश्वर्य हे चतुष्टय त्या महात्म्याला उपदेशाविना स्वाभाविकच प्राप्त झाले. सप्तऋषि हे त्याचे मानसपुत्र व त्यानीच सृष्टीची निर्मिती केली. (मार्कंडेयपुराण, अ. ४०२)

(५) सर्व प्रकारचे जीव जेथे राहतात त्यास सृष्टि असे म्हणतात. हिचा कर्ता कोणीही नाही. ही स्वभावानेच उत्पन्न झाली. हिचा नाश कधीही होत नाही. ती अनंत आकाशाच्या पोकळीत राहिलेली आहे. काही लोक ह्या सृष्टीचा कर्ता ईश्वर म्हणून कोणी आहे असे मानतात, पण ते चुकीचे आहे, आकाश हे सृष्टि कर्त्याने उत्पन्न केले नसून ते स्वयंसिद्ध आहे. म्हणून सृष्टि ही स्वयंसिद्ध आहे. ती अनादि आहे. ह्या सृष्टीचा नाश कधीही होत नाही. येथे प्रलयकाळ वगैरे काही नाही. ही सृष्टि कोणास उत्पन्न करता येत नाही व कोणीही तिचा नाश करू शकत नाही. स्वभावतःच तिची स्थिति नियमित झाली आहे.

(महापुराणामृत, पृ. २५।२६)

(६) ऋग्वेदात म्हटले आहे की, त्या वेळी जे काही होते ते मायेसहित होते. त्या एका ब्रह्माशिवाय दुसरे काहीही नव्हते. त्यापूर्वी काय होते हे कोणीही पाहिलेले नाही, ते जाणणारा कोणी असेल तर तो सृष्टीचा अध्यक्ष, जो आकाशात राहतो तोच होय. पण दुसऱ्याला त्याच्याकडून काहीही कळणे शक्य नाही. मग सृष्टीची उत्पत्ती कशी झाली हे कोण सांगू शकणार? हे सर्व सूक्तच मुळांतून वाचण्यासारखे आहे. (ऋग्वेद, १०।१२९)

(७) बॅबिलोनियन संस्कृतीप्रमाणे सृष्टीच्या उत्पत्तीपूर्वी प्रथम पाणी होते. त्याची अधिष्ठात्री देवता तैमत (Taimat) होती. तिला मार्डुक ह्याने मारून पृथ्वीवर वस्ती केली. नाईल नदीच्या खोऱ्यात असे मत होते की, सुउम ह्याने नदीच्या गाळापासून पृथ्वीचे अंडे निर्माण केले. परंतु मॅफिस येथे असे मानतात की, सूर्यदेवता पटाह ह्याने ते अंडे फोडून सध्याची पृथ्वी निर्मिली.

(८) मानवाच्या मूळ उत्पत्तीची कल्पना अशी आहे की, प्रथम असे काहीच नव्हते. मग परमेश्वराने पृथ्वी व आकाश ही निर्माण केली आणि दवा-द्वारे जमिनीची मशागत केली व त्यातून वनस्पतींची निर्मिती केली. नंतर एक मातीचा सजीव पुतळा बनविला व जमिनीवरील पिकाला त्याला आहार

ठरविला. ह्या आहारावर पाचन वगैरे प्रक्रिया होऊन त्याचे वीर्य बनले. त्याच्या पुढची पायरी म्हणजे मानवाची जनन-मरण ही अवस्था चालू झाली.

(कुराण, २-२६।२८.)

(९) अवेस्ता ह्या पार्शी धर्मग्रंथामध्ये असे म्हटले आहे की, प्रथमतः अदृश्य व दैवी सृष्टि निर्माण झाली; आणि नंतर दृश्य सृष्टि म्हणजे आकाश, पाणी, पृथ्वी, वनस्पति, प्राणिसृष्टि आणि सर्वांत शेवटी मानवाची निर्मिती झाली (जगातील धर्मपंथ, पृ. ५९).

(१०) चायनामधील टौइझम (Teosism) प्रमाणे पहिल्याने यँग व यिन ह्यांच्या संयोगाने चार ऋतु निर्माण झाले आणि त्यांनी पृथ्वी उत्पन्न केली. चिनी तत्त्ववेत्ता लाओत्से ह्याचे मत फारच मजेशीर आहे. तो म्हणतो, "स्वर्ग आणि पृथ्वी ही काही कामाची नाहीत. त्यांची उत्पत्ति टाओपासूनच झाली. टाओच्या निर्मितीपूर्वी जे काय होते, त्याला काय नाव द्यावे हे मात्र मला कळत नाही. म्हणून मी त्यालाही टाओच म्हणतो झाले!" देवाने ही पृथ्वी व सर्व विश्व निर्माण केले. त्या देवाला सात हात व आठ पाय असून त्याचे वय सुमारे १८००० वर्षांचे असावे. ह्या देवाने जगाला आकार दिला. अशा ह्या देवाचे नाव 'पान-कु' असे आहे (जगातील धर्मपंथ, पृ. ७५).

ह्याच तत्त्ववेत्त्याचा आपल्या शिष्याबरोबरचा संवाद किती अर्थपूर्ण आहे तो पहा. मानवाला स्वतःचीच ओळख करून घेण्यास तो खात्रीने स्फूर्तिदायक ठरेल.

शिष्य :—ईश्वराची सेवा उत्तम प्रकारे कशी करावी?

गुरु :—अजून तुला मानवाची सेवा कशी करावयाची हे समजत नाही, तर ईश्वराची सेवा कशी करावयाची हे समजून काय करावयाचे आहे?

शिष्य :—मरण म्हणजे काय?

गुरु :—जिवंतपणा म्हणजे काय? हे तुला अद्याप कोठे कळले आहे? त्याचा अर्थ समजल्यावर मग मरण म्हणजे काय ह्याची चौकशी कर.

शिष्य :—मेलेला मनुष्य शुद्धीवर असतो काय?

गुरु :—तू मेलास म्हणजे ह्या गोष्टीचा विचार करण्यास तुला खूप वेळ आहे. आजच त्याची चौकशी कशाला पाहिजे (जगातील धर्मपंथ, पृ. ७५).

अशा रीतीने अनेक पंथांची मत नोंदता येतील. परंतु स्थलाभावी ते टाळले आहे. सृष्टीच्या उत्पत्तीसंबधी कल्पना येण्यास वरील उदाहरणे पुरेशी आहेत. सृष्टिनिर्मितीचे ज्ञान होण्यासंबधी ती मते कितपत उपयोगी व व्यवहार्य आहेत ह्याची कल्पना वाचकांनीच करावी.

( ११ ) मानवी बुद्धीला पटणारी अशी व्युत्पत्ति लो. टिळकांनी केली आहे. ओरायन ग्रंथामध्ये ते म्हणतात की, प्रथम बाष्पमय अथवा तेजोमय मेघाच्या अवस्थेत सृष्टि निर्माण झाली व हळूहळू घनावस्थेत तिचे संक्रमण झाले. घनावस्था येताच पृष्ठभागावर कवचे अगर थर चढून जमीन तयार झाली जीवनानुकूल परिस्थिति निर्माण झाल्यावर प्रथम वनस्पति, मत्स्यादि कीटक उत्पन्न झाले. नंतर कूर्मादि सरपटणारे प्राणि, चतुष्पाद (चालणारे) प्राणि व शेवटी मानव प्राणि उत्पन्न झाले. आर्यांच्या मत्स्य, कूर्म इत्यादि अवतारामध्ये हीच कल्पना अभिप्रेत आहे. हीच व्युत्पत्ति अधिक सयुक्तिक वाटते, यात शंका नाही.

प्रारंभी म्हटल्याप्रमाणे त्या सर्वांचे सार काढून एक मध्यवर्ती कल्पना करणे हे किती अवघड काम आहे हे आता वाचकांना कळून येईल.

( १२ ) सांप्रतच्या वैज्ञानिक दृष्टिकोनातून पृथ्वीची निर्मिती कशी झाली हेही आपणांला पाहणे आवश्यक आहे.

( अ ) सर जेम्स् जीन्स् नावाचा खगोलसंशोधक म्हणतो की, आकाशातील रुद्र तारा हा आपल्या सूर्यापेक्षा २३५२ पट मोठा आहे व तितकाच तेजस्वी आहे. आकाशस्थ तारागोलांचा—" गॅलेक्सी "-पुंज हा मध्यबिंदू कल्पिलेला असून सर्व लहानमोठ्या ग्रहमाला त्याभोवती निरनिराळ्या वेगांनी फिरत असतात. आपला सूर्य आणि त्याची ग्रहमाला, याला मध्यबिंदूला प्रदक्षिणा करण्यास २३ कोटी वर्षे लागतात. अनेक कोटी वर्षांपूर्वी, रुद्रतारा आणि सूर्य, भ्रमतीमध्ये जेव्हा जवळ आले असतील, तेव्हा सिगारेटच्या आकाराची गॅसची पुंगळी, त्याने आपल्या गुरुत्वाकर्षणाने, सूर्यामधून खेचून बाहेर काढली असली पाहिजे आणि कालांतराने त्याचे ग्रहगोल निर्माण झाले आता पुढच्या भ्रमंतीवेळी हे दोन तारे जवळ आले, म्हणजे कदाचित् ग्रहगोल नष्ट होऊन जाऊन त्या ठिकाणी निहारिका ( नेब्युला ) तयार होतील, म्हणजेच पृथ्वीचा नाश होईल.

( आ ) डॉ. चिं. श्री. कर्वे व इतर संशोधकांचे मत जरा वेगळे आहे. आकाशगंगेने निर्मित केलेल्या जागेत आपल्या सूर्यासारख्या शंभर अब्ज तारका आहेत. त्यातील अनेकांना आपल्या ग्रहमालेप्रमाणे ग्रहमाला आहेत. हे विश्व इतके

अफाट आहे की, त्याच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकास जाण्यास एक लक्ष प्रकाशवर्षे लागतात. प्रकाशाची गति एका सेकंदाला १,८६,००० मैल असते. म्हणजेच १,००,००० × २,२१,५८८ कोटी प्रकाशवर्षे मैल = कोटी प्रकाशवर्षे अंतर येईल. पण अफाट विश्वात हेही आश्चर्य नाहीच. एखाद्या आधुनिक सुसज्ज दूरदृष्टि उपकरणाच्या दूर्वीणीमधून जर हे विश्व अवलोकन केले, तर अशा प्रकारची अब्जावधी विश्वे आपणाला दिसू शकतील. सुमारे दहा अब्ज तरी दिसतात असे वाटतात. याचाच अर्थ अखिल विश्व हा शब्द जेव्हा आपण उच्चारतो, तेव्हा तो आपल्या विश्वाला अनुलक्षून नसून पृथ्वी, सूर्याभोवतीचे ग्रहगोल, आकाशगंगा, महगोल, आणि वरील अब्जावधी विश्वे त्यामध्ये सामावलेली असतात.

या विश्वाची निर्मिती कशी झाली यासंबंधी वैज्ञानिक म्हणतात की, हे अफाट विश्व विस्तारवादी आहे, म्हणजेच पूर्वी ते संकुचित असले पाहिजे. सुरवातीला तो सुमारे पंधरा किलोमीटर व्यासाचा गोळा असावा आणि ज्याप्रमाणे अणुबॉम्बचा स्फोट होऊन त्यातील संकुचित जागेत असलेल्या वस्तु दूरवर फेकल्या जातात, त्याप्रमाणे "बिग बँग थिअरी" सिद्धांताने गोळ्याचा स्फोट होऊन विश्वे निर्माण झाली. स्फोटातून स्फोटनिर्मिती होत असते आणि विश्व विस्तार पावत आहे. पण ८२ अब्ज वर्षांनी पुन्हा ते संकुचन पावेल. अफाट विश्वाचा नाश होईल, आणि पुन्हा स्फोट घडून नवीन विश्व निर्माण होईल. मागील स्फोट होऊन १०।१५ अब्ज वर्षे झाली असावीत, तेव्हा एवढ्यात घाबरण्याची मानवाला जरूरी नाही. पण यालाही दुसरी बाजू आहे की, विस्तार जरी होत असला तरी एकूण घनत्व कायम रहाते. याला शास्त्रज्ञ "स्थिरस्थिति" असे म्हणतात. डॉ. जयंत नारळीकर व प्रा. हॉईल याचाच शोध घेत आहेत, व या सिद्धांताला दुजोरा मिळविण्याचा प्रयत्न करीत आहेत.

भस्मसात होऊन जाईल कधी काळी भ्रमतीमध्ये कॉसर्स जवळ आल्यास तीच गति होईल

वरील विधानाला प्राचीन भारतीय ऋषींचे उत्तर असे आहे की, विश्वगोल हा स्थिर आहे तो विस्तार पावत नाही अथवा आकुंचन पावत नाही जुने तारागोल स्फोटाने नष्ट झाल्यावर, त्याचे अनंत तुकडे तुकडे होतात, अणु परमाणु होतात आणि अंतराळामधील धुळीकणाबरोबर वायुच्या मिश्रणाने संयोग पावून नव्या तारका जन्माला येतात वस्तु नष्ट पावत नाही रूपांतरीत होते, हेच भारतीय तत्त्वज्ञान सांगते प्राचीन ऋषींनी आपल्या ज्ञात दृष्टीने दिक्कालगणनाचे अचूक सिद्धांत मांडले आहेत वेदामध्ये आकाशाचे वर्णन 'लोकोऽसि, स्वर्गोऽसि, अनन्तोऽसि' या शब्दांनी केलेले आहे सूर्यगोल व ग्रहमाला म्हणजे एक विश्व मानले तर आकाशात अनेक विश्वे आहेत म्हणून सर्वव्यापी सर्वशक्तिमान परमेश्वराला "अखिल विश्व अनंत कोटी ब्रह्मांडनायक" अशी बिरुदावली त्यांनी लावलेली आहे ऋषींना या अनेक विश्वांचे ज्ञात दृष्टीने ज्ञान होते, हेच दिसून येते असे ईशावास्यावरील भाषणात श रा राजवाडे प्रतिपादितात

याचा भावार्थ असा की, विश्वगोलातील सर्व भूतमात्रे आकाशापासूनच उत्पन्न होतात, आणि शेवटी आकाशात विलीन होतात. आकाश सर्वश्रेष्ठ आहे. उत्पत्ति, स्थिति, लय ही सर्व काही तेच करते. आकाश हेच शेवटचे परमस्थान होय.

उपनिषदाचा या दृष्टिकोनातून अभ्यास केला तर साम्प्रतच्या विज्ञान-संशोधकांना त्यांच्या संशोधनाचे अनेक धागेदोरे प्राचीन ऋषींच्या या ज्ञात दृष्टीत आढळून येतील, असे अनेक विद्वानांचे मत आहे.

कालगणना

भारतीय पुराणकारांनी कालगणना कशा प्रकारे केली आहे हे पाहणे मनोरंजक आहे म्हणून मुद्दाम उल्लेख करीत आहे. तसेच आपल्या पुराणकारांची दृष्टि किती विशाल, ज्ञानपूर्ण व अचूक होती हे समजून येण्यासाठी रा. कर्वे ह्यांनी लिहिलेल्या एका लेखाचा मी नामनिर्देश करणार आहे. हेतु इतकाच की, आज विसाव्या शतकात भरपूर वैज्ञानिक साधनसामुग्रीने काढलेले निष्कर्ष हे काही नवीन नव्हेत. थोडयाफार फरकाने आमच्या ऋषिवर्यांनी ते आधीच काढून ठेवलेले आहेत.

१५ निमेष = काष्ठा, ३० काष्ठा = कला, ३० कला = मुहूर्त, ३० मुहूर्त = १ अहोरात्र. ह्यातही पुन्हा दिवसाचे पाच भाग कल्पिले आहेत. ते प्रातः, संगव, माध्यान्ह, अपराण्ह व सायान्ह होत. १५ अहोरात्र = १ पक्ष, २ पक्ष = १ महिना, २ महिने = १ ऋतु, ३ ऋतु = अयन, २ अयने = १ वर्ष. संवत्सर, परिवत्सर, इडावत्सर, अनुवत्सर व युग असे वर्षाचे पाच नामभेद आहेत. १०,६७,२०,००० मानव वर्षे म्हणजे एक मन्वन्तर, ८,४०,००० दिव्य वर्षे म्हणजे ब्रह्मदेवाचा एक दिवस. तसेच कृतयुग = १,७२,८०,००० मानववर्षे, त्रेतायुग = १,२९,६०,००० वर्षे, द्वापारयुग = ८६,४०,००० वर्षे, कलियुग = ४,३२,००० वर्षे. अशी चार युगे संपली म्हणजे देवाचे एक युग होते. ७,१०,००० युगे झाली म्हणजे एका मनूचा काळ संपतो. ह्याप्रमाणे १४ मनूंचा काळ पूर्ण झाल्यावर ब्रह्मदेवाचा एक दिवस होतो. ब्रह्मदेवाचे आयुष्य शंभर वर्षांचे आहे. त्या काळाच्या शेवटी नैमित्तिक प्रलय होतो.

(स्कंदपुराण, कौमारिका, अ. ३९).

ह्यावरून आपणाला असे दिसून येईल की, आमच्या आधुनिक युगात आपण एका अहोरात्रीचे २४ तास मानतो आणि त्याचे लहान विभाग २४ × ६० × ६० म्हणजे ८६,४०० सेकंदापर्यंत जातो पण पुराणकारांनी एका

अहोरात्रीचे ३० मुहूर्त कल्पून त्याचे लहान भाग म्हणजे ४,०५,००० निमेष इतकी सूक्ष्म विभागणी केली आहे, ह्याचाच अर्थ असा की, सेकंदाच्या कालगणनेपेक्षा सुमारे पाच पट अधिक विभागणी निमेष ह्या स्वरूपात केली आहे.

रा. चि. श्री. कर्वे ह्यांनी 'केसरी' पुणे, दि० १५-५-६० च्या अंकात 'अग्निबाणाने अखंड यौवनाचा लाभ' असा लेख लिहून त्यात खालीलप्रमाणे आपले मत प्रतिपादन केले आहे. "अग्नीबाणातून प्रवास करीत राहिले तर दीर्घकाळ मानव तरुण राहू शकेल अशी शास्त्रज्ञ ग्वाही देतात. १०-२०-१०० वर्षेच नव्हे तर अखंड यौवनप्राप्ति होईल. मानव ज्या वयापासून अग्निबाणात बसून तो अंतराळात प्रवासाला निघेल त्या वयापासून इच्छित कालापर्यंत तो आपले क्रमप्राप्त म्हातारपण दूर ठेवू शकेल. न्यूटनची कालप्रवाहाची कल्पना आईन्स्टाईनच्या सापेक्षतावादाशी मुळीच मिळती-जुळती नाही. सापेक्षतावादाप्रमाणे पृथ्वीवरचा कालप्रवाह अग्निबाणातून वर गेल्यावर झपाट्याने बदलतो. बाण जितका उंच जाईल तितके कालमापन कमी होईल. प्रकाशाचा वेग प्रतिसेकंदाला १,८६,००० मैल आहे, तर आधुनिक बोईंग विमानाचा वेग ताशी ८०० मैल म्हणजे प्रतिसेकंदाला $\frac{1}{4}$ मैल आहे! कालमापनात जर जोरदार फरक होऊन अग्निबाणाचा वेग जर १६१०० मैल झाला, तर पृथ्वीवरील दहा वर्षांचा काळ, अग्निबाणात बसणाऱ्या मानवाचा पाच वर्षांचा होईल. त्याच्या शरीराची झीज, स्पंदन, वगैरे कमी होऊन आयुष्य वाढेल. समजा अग्निबाणाचा वेग दर सेकंदाला ३२ फूट याप्रमाणे, प्रतिसेकंदाला वाढतच राहिला, तर तुमच्या अग्निबाणातील कालमापनाप्रमाणे होणाऱ्या २१ वर्षांत, तुम्ही सर्व सूर्यग्रहमाला व अनेक विश्व-बेटे पार ओलांडून जाल आणि सध्या ह्या विराट विश्वाच्या ज्ञात असलेल्या मर्यादेपर्यंत पोहोचू शकाल. पण जेव्हा पृथ्वीवर परत याल तेव्हा त्या अवधीत पृथ्वीवरील मानवाची एक अब्ज वर्षे होऊन गेलेली असतील." आपल्या पुराणकारांनी अशाच कोणत्या तरी प्रमाणावर आपली कालगणना प्रलयकालापर्यंत ठरविली असली पाहिजे. गणितशास्त्राच्या आधारे आधुनिक शास्त्रज्ञांनी केलेले वरील विवेचन वाचले म्हणजे पुराणकारांनी केलेली कालगणना ही कोणत्या तरी शास्त्राच्या आधाराने केलेली होती हे वाचकांना समजून येईल. निदानपक्षी ती पुराणातील एखादी भाकडकथा निश्चितच नव्हे एवढे तरी कळून येईल. ह्यासाठीच थोडेसे विषयांतर पत्करून हा भाग येथे मुद्दाम उद्धृत केला आहे. मानवाचा एक वर्षांचा काल म्हणजे देवाचा एक दिवसाचा काल व ब्रह्मदेवाचे एक वर्ष कसे होऊ शकेल, हे वरील विवेचनावरून ध्यानात येण्यास हरकत नाही.

पुराणकारानी ज्याप्रमाणे कालमानाचा अभ्यास केला होता, त्याप्रमाणेच त्यानी अणुशास्त्राचाही केलेला होता, असे निश्चितपणे म्हणता येईल अणूसबधी त्यानी केलेले खालील कोष्टक पहा.

पुराणकारानी कोणाला अणु म्हणावे याचे दिग्दर्शन पूर्वीचे केले आहे प्रत्येक प्राकृत पदार्थ हा अणूचा बनलेला असतो, असा दार्शनिकाचा अणुवादाचा सिद्धात आहे ज्या पदार्थाचे पुढे आणखी अवयव पाडता येत नाहीत, तो अणु होय अणु किती सूक्ष्म असतो,

जालसूर्यमरीचिस्थ सूक्ष्म यद् दृश्यते रज
तस्य षष्ठतमो भाग परिमाणु स उच्यते ॥

खिडकीतून येणाऱ्या सूर्याच्या किरणात जो सूक्ष्म रज कण दिसतो, त्याच्या सहाव्या भागाला परिमाणु म्हणतात दर्शनशास्त्राचे आचार्य कणाद महर्षि याना अणूचा इतका ध्यास लागलेला होता की, 'पीलव पीलव' म्हणतच त्यानी आपल देह विसर्जीत केला प्राचीन काळी अणु हा दार्शनीकाचा विवेचनाचा विषय होता, तर साप्रतच्या सुधारलेल्या आधुनिक काळात तो वैज्ञानिक सशोधनाचा च नूर अशा सहारशास्त्राचा विषय झालेला आहे इतकेच

सूर्यकिरण पाण्यामध्ये पडल्यावर पाण्यात ज्या सूक्ष्म जतूची हालचाल आपणास साध्या डोळ्यानी दृग्गोचर होते, ते सूक्ष्म जतु म्हणजेच अणु होय, असे त्यानी ठरविले

कोष्टक

| | | | |
|---|---|---|---|
| ८ अणु | = १ परिमाणु | २१ अगुळे | = १ रत्न (मुडा हात) |
| ८ परिमाणु | = १ रथरेणु | २४ अगुळे | = १ हात |
| ८ रथरेणु | = १ बालाग्ररेणु | ४२ अगुळे | = १ किष्कु |
| ८ बालाग्ररेणु | = १ लिक्षारेणु | ९६ अगुळे | = १ धनु |
| ८ लिक्षारेणु | = १ युकारेणु | १०० धनु | = १ नाल |
| ८ युकारेणु | = १ यवरेणु | २०० धनु | = १ गव्युति |
| ८ यवरेणु | = १ अगुळ | ८०० धनु | = १ योजन |
| १२ अगुळे | = १ वितस्ति (वीत) | | |

याप्रमाणे चद्र, सूर्य आणि इतर गोलार्ध किती योजने अतरावर आहेत, त्याचे मापन केलेले असून गोलोक, ब्रह्मलोक व स्वर्गलोकापर्यतचे भूलोकापासून अतर दिलेले आहे (ब्रह्मांडपुराण, अ ११६)

आधुनिक शास्त्रज्ञांनी हे कोष्टक आधारभूत धरूनच अणुयुगाचा पसारा मांडलेला असावा असे मानावयास हरकत नाही पण आपल्या पूर्वजांचे कार्य न पाहता, ज्यांना आधुनिक शास्त्रज्ञांनाच अणुयुगाचे श्रेय द्यावेसे वाटते, त्याला कोण काय करणार !

देवतांच्या तात्त्विक स्वरूपात आणि शास्त्रामध्ये वर्णन केलेल्या उपासनेच्या स्वरूपात बराच फरक आढळतो तात्त्विक स्वरूपाचे यथार्थ आकलन न झाल्या मुळेच भारतामध्ये अनेक धार्मिक मतभेद निर्माण झाले आहेत, आणि वेळप्रसंगी त्यामध्ये कट्टरपणा उत्पन्न झालेला आहे जसे शिवभक्त व विष्णुभक्त यांची भांडणे अगर वारकरीपंथी व समर्थ संप्रदायी यांच्यामधील प्रसंग दाखविता येतील यासाठी ऋग्वेदकाळापासून देवतांचे तात्त्विक स्वरूप समजून घेणे इष्ट आहे

न हि कश्चिदविज्ञाय याथातथ्येन दैवतम् ।
लौक्याना वैदिकाना वा कर्मणा फलमश्नुते ।। १४ ।।

बृहद्देवताकारांचे वरील मत पक्के ध्यानात आल्याखेरीज लौकिक व वैदिक कर्मांच्या फलाची यथावत प्राप्ति होणे शक्य नाही भगवान मनु व आद्य शंकराचार्य यांचेही हेच मत आहे छांदोग्य उपनिषद म्हणते की, गुरूपासून श्रद्धायुक्त व अर्थज्ञानपूर्वक एकादी गोष्ट समजून घेऊन आचरण केले, तर त्याचे फळ त्वरित मिळते

इंद्र मित्र वरूणमग्निमाहुरथो दिव्य सुपर्णो गुरुत्मान् ।। ( ऋ वे १।२२ १६४ ) याचा भावार्थ असा की, एकाच महान परमात्म्याला इंद्र, वरुण, अग्नि, यम वायु, अशी नावे दिली जातात यामध्ये महत्त्वाचा मुद्दा असा की एकच वस्तु अनेक कशी होऊ शकते ! यामध्येच भारतीय तत्त्वज्ञानाचा गाभा आहे एकच असलेला परमात्मा उपाधींच्या योगाने निरनिराळी नावे धारण करतो व ही नावे व रूपे मायेच्या प्रांतात मोडत असल्याने तत्त्वत एकच असणारा परमेश्वर अनेक स्वरूपात दृग्गोचर होत असतो याचे दररोजच्या व्यवहारातील उदाहरण म्हणजे, एकच मनुष्य संबंधभेदाने, कार्यभेदान, तो पुत्र होतो, पिता असतो, पती असतो, काका असतो, मामा असतो, पण या अनेकत्व स्वरूपात वावरणारी व्यक्ति मात्र एकच असते, अनेक नसतात त्याचप्रमाणे मूलत एकच असणारा परमात्मा, अनेक मानवी रूपामध्ये इतकेच नव्हे तर चराचर सृष्टीमध्ये, अनेक नावे व रूपे धारण करून वावरत असताना, अनेक रूपाने दिसत असतानाही मूलत एकच असतो हे लक्षात येईल

परमात्म्यशक्ति

चराचर सृष्टीचे नियंत्रण प्रसंगविशेषी अनेक देवतांकडून होते असे दिसत असले तरी मूळ परमात्म्यशक्तीच्या अनुज्ञेशिवाय जगात गवताची काडीही हलत नाही असे श्रुतिकाराचे मत आहे. भागवतकार म्हणतात की, आकाश, वायु, उदक, पृथ्वी, जीवजंतु, नद्या, समुद्र, पशुपक्षी वृक्षवनस्पति इ० सर्व त्या परमात्म्यशक्तीच्या रूपानेच वावरत असतात. त्या प्रत्येकामधून परमेश्वराचे स्वरूप ज्ञानी माणसाला दिसत असते. यामुळेच 'हरिरेवजगत्, जगदेव हरिः', अशी त्याची अद्वैत भावना होऊन बसते. इतकेच नव्हे तर समोर दिसणाऱ्या प्रत्येक सजीव अथवा निर्जीव पदार्थास, साक्षात् परमात्मा समजून तो वंदन करीत असतो. सर्व देवतांना सामर्थ्य परमेश्वरापासून मिळते. यासंबंधी केनोपनिषदातील हा सिद्धान्त पहा.

तद्धैषां विजज्ञौ तेभ्यो ह प्रादुर्बभूव ।
तन्न व्यजानन्त किमिदं यक्षमिति ॥ (खंड ३-२)

ब्रह्मदेवानी सृष्टीची रचना केल्यावर सर्व देवांना उत्पन्न केले व अनेकविध शक्ति त्यांना दिल्या. पण देवांना गर्व झाला की, पृथ्वीरचना त्यांनीच केली आणि त्यामुळे सृष्टीचा कारभार चालू झाला. तेव्हा या गर्वाचा परिहार करण्यासाठी तो यक्षरूपाने येथे आला आणि प्रत्येक पंचमहाभूतापुढे गवताची काडी टाकली, पण वायूला ती उडविता येईना, अथवा कोणाला ती नाहीशी करता येईना. सर्व देवांची मति कुंठित झाल्यावर, आकाशात त्यांना उमाशक्ति भेटली आणि ती म्हणाली की, परीक्षा घेणारा यक्ष प्रत्यक्ष ब्रह्मदेवच होता. " सा ब्रह्मेति होवाच " तात्पर्य, या पंचमहाभूतात्मकदेवतांना सामर्थ्य, त्या एक मूळ शक्तीपासूनच मिळते. देवता अनेक असल्या, अनेक रूपात असल्या, तरी त्यांची मूळ शक्ति एकच आहे.

मूर्तिपूजा म्हणजे काय ? आपण देवता अनेक स्वरूपात पाहतो, आणि त्यांच्या प्रतिमाही भिन्न भिन्न असतात मूर्ति पाषाणाची असो, धातूची असो, अथवा कागदावरील चित्ररूपात असो. आपण जेव्हा त्यांचे पूजन करतो, तेव्हा ते त्या त्या प्रतिमेचे नसून, त्यामध्ये असलेल्या परमात्म्यतत्त्वाचे ते पूजन असते. आपण गणेशाची मूर्ति मातीची बनवितो, पण गणपति म्हणजे माती नव्हे हे आपण जाणतो त्या मूर्तीची पूजा ही मातीची नसून गणपतीची असते व ती त्याला पावते राष्ट्रध्वजाचे पूजन केले जाते, म्हणजे ते रंगीबेरंगी कपड्याचे पूजन नसून त्यामागे असलेल्या राष्ट्रीयभावनातत्त्वाचे पूजन असते. मूर्ति स्थापन करताना, नानाविध मंत्रांनी अभिषेक करून तिजमध्ये परमात्म्यतत्त्व आपण

ये व नंतर विवाहास उभी रहा.'' अशी अट घालण्याचा हेतु असा की, विष्णूला मनातून तिच्याशी मुळी लग्नच करावयाचे नव्हते. त्यामुळे ती स्नानाला गेल्यावर सर्वच्या सर्व सप्तसागरच आपल्या उदरात विष्णूने समाविष्ट केले. त्यामुळे त्या मातेला समुद्रस्नानास पाणीच मिळाले नाही. सर्व पृथ्वी तिने पादाक्रांत केली, परंतु तिला कोठेही अंशमात्र पाणी मिळाले नाही.

निराशेने परत येत असताना एके ठिकाणी तिला, जमिनीवर उमटलेल्या गाईच्या पावलांत पाणी साठलेले आढळून आले. गायत्रीचे-गोमातेचे ते जल म्हणजेच समुद्रजल होय, अशा श्रद्धेने तिने त्यातील थोडेसे पाणी आपल्या अंगावर शिंपडले; आणि आपले समुद्रस्नान झाले असे मानून ती परत आली. विवाह-स्थानावर आल्यावर तिला आपला भावी पति व इतरही मुले दिसली नाहीत. वचन दिल्याप्रमाणे विष्णु जागेवर हजर नसावा ह्याचे तिला आश्चर्य वाटले. इकडेतिकडे शोध करताकरता तिची तिन्ही मुले वर अंतराळात जात असल्याचे तिला दिसले. विष्णूला ओरडून हाक मारून तिने असे सांगितले की, "आपले समुद्रस्नान झाले असून आपण आता विवाहास तयार आहोत." विष्णूनेही ते ऐकून तिला वर अंतराळात येण्यास सांगितले व तिला वर येण्यासाठी चक्र खाली सोडले. चक्राला धरून ती वर जात असताना त्याच चक्राने विष्णूने तिला ठार केले. अशा रीतीने मातेचा देह भूमीवर पडल्यावर ते तिघेही खाली आले आणि त्यांनी त्या मृतदेहाचे तीन तुकडे केले. ब्रह्मदेवाने धड, विष्णूने शीर आणि महेशांनी पाय ह्याप्रमाणे ते तीन तुकडे वाटून घेतले. पुढे त्या अवयवा-पासून सरस्वती, लक्ष्मी व पार्वती ह्यांची उत्पत्ति झाली व त्या तीन देवांच्या स्त्रिया झाल्या (देवी भागवत).

पं. राहूल सांकृत्यायन ह्यांनी आपल्या 'व्होल्गा ते गंगा' ह्या ग्रंथात असे वर्णिले आहे की, अश्मयुगात माता हीच घराची व जमातीची स्वामिनी होती. तीच सर्व व्यवस्था पाही. त्या काळच्या जमातींमध्ये सांस्कृतिक व लैंगिक बंधने नसल्यामुळे पिता कोण, पुत्र कोण, माता कोण, भगिनी कोण आणि स्त्री (पत्नी) कोण हे समजणे कठीण असे. माता हीच सर्व जमातींची पुढारी असल्याने तीच सर्वशक्तिमान अशी शक्ति होती. तिला 'मा' म्हणून संबोधीत असत. कदाचित् हीच मातृशक्तीची प्रारंभीची कल्पना असावी.

आपणाला मातृशक्तीचे सुंदर रूपक त्रिचनापल्ली (त्रिशिरःपुरी) येथील मातृभूतेश्वर ह्या एकमेव मंदिरात पहावयास मिळते. साधारणतः त्रिमूर्ति म्हणजे ब्रह्मा-विष्णु-महेश असा समज रूढ आहे. पण ह्या ठिकाणी सरस्वती, लक्ष्मी आणि पार्वती ह्यांचाही त्यात समावेश केलेला आहे. ह्याचा अर्थ असा की,

प्रत्येक देवतेबरोबर शक्तिरूपिणी देवीचाही समावेश व्हावयास पाहिजे. एरव्ही त्याला पूर्णत्व येत नाही

यवन अगर इसाई धर्मात स्त्रीला देवतेचे स्थान नाही. त्या धर्मात फक्त पुरुष देवताची पूजा होते. ह्याच वैगुण्यामुळे त्याच्या धर्मतत्त्वाची बाजू तोकडी पडते त्यामुळे ती धर्मतत्त्वे पूर्ण आहेत, असे म्हणता येत नाही मातृशक्तीविना प्राणिमात्राची उत्पत्तीच होऊ शकत नाही ह्याच कारणास्तव त्या धर्मातील अपुरेपणा प्रकर्षाने उठून दिसतो ( कल्याण, शक्तिअंक, १९३४।२१ )

सिंधु संस्कृतीमधील हराप्पा व मोहेंजोदरो येथील उत्खननामध्ये मातीच्या लहानलहान अनेक पुतळ्या सापडल्या आहेत त्यापैकी एक मातृशक्तीची असावी असे वाटते अंगावर भरपूर दागिने, पंख्याच्या आकाराचा मस्तकावर मुकुट आणि दोन्ही बाजूंना धुपाटण्यासारखे गोल पेले आढळून आले आहेत ह्या पेल्यातून धुपाच्या धुराचे डाग अद्याप दिसून येतात. ह्यावरून असा अंदाज करता येतो की, ह्या शक्तीची पूजा करणारे त्या पेल्यात धूप जाळीत असावेत मूर्तीचे स्वरूप जरी खराब झाले असले तरी ह्या पुतळ्या म्हणजे मातृशक्तीच्या निदर्शक होत असे मानण्यास शंका नसावी त्या काळी मूर्ति भिंतीवर टांगून ठेवण्याचा प्रघात असावा, कारण मूर्तीचा पृष्ठभाग ओबडधोबड आहे

सांप्रत ज्याप्रमाणे भारतामध्ये देवी ही सर्वांची रक्षणकर्ती व इच्छित पूर्ण करणारी असे मानले जाते, त्याप्रमाणे त्या वेळीही तिचे स्वरूप असावे. संरक्षणकार्यातील तिचा पुरुषजोडीदार कोण ह्याचा मात्र उलगडा पुतळ्यांवरून होत नाही कदाचित् असे असावे की, देवी ही सर्वशक्तिमान असल्याने तिला रक्षण-कार्यात मदतीसाठी जोडीदाराची अपेक्षा नसावी आजही प्रत्येक मंदिरात देवीची पूजा एकटीचीच करण्याचा प्रघात आहे गौरी शंकर लक्ष्मी नारायण अशी काही उदाहरणे सोडली तर माता रेणुका, जरीमरी, मारी, जाखाई, जोखाई इ० देवता एकट्याच पुजिल्या जातात

उत्खननामध्ये सापडलेल्या मूर्तीच्या अंगावर एका अगदी तोकड्या लंगोटीविरहित अन्य वस्त्र नाही छातीपर्यंत लोंबणारा फुलांचा हार गळ्यात आहे कंबर बारीक, हात सरळ व लांब, तोंड रुंद डोळे टपोरे, कानात कुंडले व पुढे फणा उभारलेला व तीन वेटोळी असलेला नागाचा कमरपट्टा असे तिचे एकंदर स्वरूप आहे. ( Mackey, India's Civilization )

ह्या मातृस्वरूप आदिशक्तीचे एकूण स्वरूप कसे सर्वव्यापी आहे, ह्याचे वर्णन आपल्याला "श्रीदेव्यथर्वशीर्षम्" ह्या स्तोत्रामध्ये पहावयास मिळते ह्या स्तोत्रातील देवीचे वर्णन सारांशरूपाने खालीलप्रमाणे आहे.

अनुस्यूत करीत असतो, आणि नंतर त्या तत्त्वाचे पूजन होते. परमात्मतत्त्व एकच असताना श्रुतींनी अनेक देवतांची उपासना का सांगितली आणि सांप्रदायिक मतभेदांना का वाव करून दिला, असा प्रश्न जर कोणी केला, तर त्याचे उत्तर असे की, भारतीय धर्मांचे व दर्शनकारांचे हेच महत्त्वाचे तत्त्वज्ञान आहे. मराठी भाषेमध्ये एक उक्ति आहे की, " व्यक्ति तितक्या प्रकृति " म्हणजे मानवाची निर्मिती कमीअधिक प्रमाणात सत्व-रज तमोगुणमिश्रित असल्याने, अनेक प्रकृतिभेद उत्पन्न झालेले आहेत. या सर्व निरनिराळ्या व्यक्तींना एकाच चाकोरीत बांधून ठेवणे हिताचे झाले नसते. तमोगुणात्मक प्रकृतीला देवी, मद्य, मांस यांची उपासना मानवेल, तर सत्वगुणात्मक व्यक्तिला विठ्ठल, बुद्धदेव यांची उपासना आवडेल. भगवान रामकृष्ण परमहंस म्हणतात "यत मत तत पथ" याचाच अर्थ असा की, जितकी निरनिराळी मते, तितके निरनिराळे पथ. श्रुति-कारांनी या सर्वांच्या रुचि ध्यानात घेऊन सर्वांना हितकारक असा उपदेश केला आणि उपासनामार्ग दाखविले. श्रीमत् भागवताच्या एकादश स्कंदाच्या विसाव्या अध्यायात यासंबंधी सविस्तर वर्णन आहे, त्याचा भावार्थ असा की,

जो आसक्त विषयावरी । तो कर्ममार्गाचा अधिकारी ।
मंद वैराग्यशीला भक्तियोग । तीव्र वैराग्या ज्ञानयोग ॥

मंद बुद्धिजीवाला सगुण उपासना जास्त उपयोगी पडते. सगुण उपासने तूनच त्याला नंतर निर्गुणाकडे जाता येते. सर्व उपासनामार्गांचे अंतीम ध्येय आणि पर्यवसान म्हणजे मानवाला त्याच्या जन्मजात भूमिकेवरून प्रारंभ करून क्रमाक्रमाने त्याला सच्चिदानंद स्वरूपाची जाणीव करून देणं हेच आहे जीवाच्या खऱ्या स्वरूपाला झाकणारे मायारूप आच्छादन, म्हणजेच अज्ञान याचा नाश करून त्याला स्वानंद साम्राज्यावर, मूळ परमात्मशक्तीवर आरूढ करणे हेच वेदान्ताचे मुख्य प्रयोजन आहे. पूर्वीचे ऋषि त्रिकालज्ञ आणि सर्वज्ञ असल्याने त्यांच्या ठायी दोष संभवत नाहीत भावी काळातील बहीर्मुख होणाऱ्या जीवांना नजरेसमोर ठेवून त्यांनी सर्व सिद्धान्त व प्रस्थाने ठेवलेली आहेत, आणि विना तक्रार ती आचरणे यातच मानवाचे हित आहे. आता आणखी एका तात्त्विक गोष्टीचा ऊहापोह करणे इष्ट वाटते पुराणातून अगर अनेक देवतांच्या ग्रंथावरून, स्तोत्रांवरून असा भास निर्माण केला जातो की ती विशिष्ट देवता म्हणजेच सर्व काही असून इतर देवता तिच्यापुढे क्षुल्लक आहेत, फिकट आहेत, विष्णुभक्तांना वाटते, विष्णु हीच आदि देवता असून शंकर, देवी, गणेश या सर्व दुय्यम होत. क्रमाने शिवभक्त, देवीभक्त, गणेशभक्त वगैरे भक्तांना नेमके तेच वाटत असते. असे का व्हावे ! या ठिकाणी भक्तांनी हे लक्षात ठेवले पाहिजे की, ज्या

ठिकाणी देवी हीच एक प्रमुख देवता मानली असून सर्व कर्तुम् अकर्तुम् शक्ति तिच्यामध्ये अंतरभूत मानलेली असते, त्या ठिकाणी देवताचा गाभा जो परमात्मा, त्याचे ते वाचक स्वरूप समजतात आणि इतर देवता तिच्या कार्यात अंतरभूत असतात. देवीने महिषासुर दैत्याला मारला. या ठिकाणी देवी ही प्रमुख असून, इतर, शंकर, विष्णु समुद्र, वायु, यांनी तिला शस्त्रभाराने सपन्न केली आपली दिव्य आत्मतेजे तीमध्ये मिसळली म्हणूनच ती महिषासुराला ठार करू शकली म्हणजे इतर देवताचे या कार्यात सहाय्य होतेच. शंकरानी शंखचूड दैत्याला मारला, पण देवी व विष्णु यांचे सहाय्य त्या वेळी होतेच. यास्तव देव जरी प्रधान देवता असली तरी इतर देव तुच्छ मानणे चूक होईल. हीच परीस्थिति इतर उदाहरणानी दाखविता येईल. दुसऱ्याची देवता तुच्छ मानल्यास त्याच्या उपासनेचे फळ त्याला मिळणार नाही ही श्रुति पहा. नारायण पर ब्रह्म ॥ राम विद्धि पर ब्रह्म ॥ कृष्णो ब्रह्मैव शाश्वतम् ॥ त्वमेव प्रत्यक्ष ब्रह्मासि ॥ त्वमेव प्रत्यक्ष विष्णुरसि ॥ अहं ब्रह्मरूपिणी ॥ अहं अखिल जगत् ॥ इ० इ०

कैवल्योपनिषदात तर निरनिराळ्या देवता एकच परब्रह्माची रूपे आहेत असे सांगण्यात आले आहे.

> स ब्रह्मा, स शिवः, स इन्द्रः, सोऽक्षरः परम स्वराट् ।
> स एव विष्णुः, स एव प्राणः, स कालः, सोऽग्नि, स चंद्रमा ॥

या सर्वांचे सार एकच की, उपासनेला निरनिराळी देवतांची रूपे असली तरी सर्वांचे परमात्म्यतत्त्व एकच होय. निर्गुण-निराकार परमब्रह्म हेच ते परमात्म्य होय. कोणत्याही देवाला केलेले वंदन, हे मूळ परमात्म्यतत्त्वालाच वंदन होय, असे समजून भिन्न दृष्टिकोनाचा त्याग करावा.

( श्रीराम माधव चिंगळे, पुरुषार्थ, जुलै १९६३ चे आधारे )

## मातृशक्ति

विश्वनिर्मितीनंतर पुरुष-संयोगाविना प्रथम मातृशक्तीची निर्मिति झाली. ती शक्ति ब्रह्मा विष्णु महेश ह्यांना प्रसवली. ही तीन मुले झाल्यावर मग तिला लग्न करण्याची इच्छा झाली. भूमीवर इतरत्र कोणीच पुरुष नव्हता, तेव्हा मुले मोठी झाल्यावर त्यांनाच तिने पति होण्याची विनंती केली. त्या तीन मुलांपैकी विष्णूने तिजबरोबर लग्न करण्याची अनुमती दिली. परंतु लग्न करण्यापूर्वी मातेपासून त्याने तिचा तृतीय नेत्र व चक्र मागून घेतले. विवाहाची तयारी करताना विष्णूने तिला सांगितले की, " तू प्रथम समुद्रावर जाऊन स्नान करून

ये व नंतर विवाहास उभी रहा." अशी अट घालण्याचा हेतु असा की, विष्णूला मनातून तिच्याशी मुळी लग्नच करावयाचे नव्हते. त्यामुळे ती स्नानाला गेल्यावर सबंध्या सर्व सप्तसागरच आपल्या उदरात विष्णूने समाविष्ट केले. त्यामुळे त्या मातेला समुद्रस्नानास पाणीच मिळाले नाही. सर्व पृथ्वी तिने पादाक्रांत केली, परंतु तिला कोठेही अणुमात्र पाणी मिळाले नाही.

निराशेने परत येत असताना एके ठिकाणी तिला, जमिनीवर उमटलेल्या गाईच्या पावलांत पाणी साठलेले आढळून आले. गायत्रीचे-गोमातेचे ते जल म्हणजेच समुद्रजल होय, अशा श्रद्धेने तिने त्यातील थोडेसे पाणी आपल्या अंगावर शिंपडले, आणि आपले समुद्रस्नान झाले असे मानून ती परत आली. विवाह-स्थानावर आल्यावर तिला आपला भावी पति व इतरही मुले दिसली नाहीत. वचन दिल्याप्रमाणे विष्णु जागेवर हजर नसावा ह्याचे तिला आश्चर्य वाटले. इकडेतिकडे शोध करताकरता तिची तिन्ही मुले वर अंतराळात जात असल्याचे तिला दिसले. विष्णूला ओरडून हाक मारून तिने असे सांगितले की, "आपले समुद्रस्नान झाले असून आपण आता विवाहास तयार आहोत." विष्णूनेही ते ऐकून तिला वर अंतराळात येण्यास सांगितले व तिला वर येण्यासाठी चक्र खाली सोडले. चक्राला धरून ती वर जात असताना त्याच चक्राने विष्णूने तिला ठार केले. अशा रीतीने मातेचा देह भूमीवर पडल्यावर ते तिघेही खाली आले आणि त्यांनी त्या मृतदेहाचे तीन तुकडे केले. ब्रह्मदेवाने धड, विष्णूने शीर आणि महेशानी पाय ह्याप्रमाणे ते तीन तुकडे वाटून घेतले. पुढे त्या अवयवां-पासून सरस्वती, लक्ष्मी व पार्वती ह्यांची उत्पत्ति झाली व त्या तीन देवांच्या स्त्रिया झाल्या (देवी भागवत).

प. राहूल सांकृत्यायन ह्यांनी आपल्या 'व्होल्गा ते गंगा' ह्या ग्रंथात असे वर्णिले आहे की, अश्मयुगात माता हीच घराची व जमातीची स्वामिनी होती तीच सर्व व्यवस्था पाही त्या काळच्या जमातींमध्ये सांस्कृतिक व लैंगिक बंधने नसल्यामुळे पिता कोण, पुत्र कोण, माता कोण, भगिनी कोण आणि स्त्री (पत्नी) कोण हे समजणे कठीण असे माता हीच सर्व जमातींची पुढारी असल्याने तीच सर्वशक्तिमान अशी शक्ति होती तिला 'मा' म्हणून संबोधीत असत कदाचित् हीच मातृशक्तीची प्रारंभीची कल्पना असावी

आपणाला मातृशक्तीचे सुंदर रूपक त्रिचनापल्ली (त्रिशिर पुरी) येथील मातृभूतेश्वर ह्या एकमेव मंदिरात पहावयास मिळते साधारणत त्रिमूर्ति म्हणजे ब्रह्मा विष्णु महेश असा समज रूढ आहे पण ह्या ठिकाणी सरस्वती, लक्ष्मी आणि पार्वती ह्यांचाही त्यात समावेश केलेला आहे. ह्याचा अर्थ असा की,

प्रत्येक देवतेबरोबर शक्तिरूपिणी देवीचाही समावेश व्हावयास पाहिजे, एरव्ही त्याला पूर्णत्व येत नाही

यवन अगर इसाई धर्मांत स्त्रीला देवतेचे स्थान नाही. त्या धर्मांत फक्त पुरुष देवतांची पूजा होते. ह्याच वैगुण्यामुळे त्यांच्या धर्मतत्त्वाची बाजू तोकडी पडते त्यामुळे ती धर्मतत्त्वे पूर्ण आहेत, असे म्हणता येत नाही मातृशक्तीविना प्राणिमात्रांची उत्पत्तीच होऊ शकत नाही ह्याच कारणास्तव त्या धर्मांतील अपुरेपणा प्रकर्षाने उठून दिसतो ( कल्याण, शक्तिअंक, १९३४।२१ )

सिंधु संस्कृतीमधील हराप्पा व मोहेंजोदरो येथील उत्खननामध्ये मातीच्या लहानलहान अनेक पुतळ्या सापडल्या आहेत त्यापैकी एक मातृशक्तीची असावी असे वाटते अंगावर भरपूर दागिने, पंख्याच्या आकाराचा मस्तकावर मुकुट आणि दोन्ही बाजूंना धुपाटण्यासारखे गोल पेले आढळून आले आहेत ह्या पेल्यांतून धुपाच्या धुराचे डाग अद्याप दिसून येतात. ह्यावरून असा अंदाज करता येतो की, ह्या शक्तीची पूजा करणारे त्या पेल्यांत धूप जाळीत असावेत मूर्तीचे स्वरूप जरी खराब झाले असले तरी ह्या पुतळ्या म्हणजे मातृशक्तीच्या निदर्शक होत असे मानण्यास शंका नसावी त्या काळी मूर्ति भिंतीवर टांगून ठेवण्याचा प्रघात असावा, कारण मूर्तीचा पृष्ठभाग ओबडधोबड आहे

सांप्रत ज्याप्रमाणे भारतामध्ये देवी ही सर्वांची रक्षणकर्ती व इच्छित पूर्ण करणारी असे मानले जाते, त्याप्रमाणे त्या वेळीही तिचे स्वरूप असावे संरक्षणकार्यातील तिचा पुरुषजोडीदार कोण ह्याचा मात्र उलगडा पुतळ्यावरून होत नाही कदाचित् असे असावे की, देवी ही सर्वशक्तिमान असल्याने तिला रक्षण कार्यात मदतीसाठी जोडीदाराची अपेक्षा नसावी आजही कित्येक मंदिरात देवीची पूजा एकटीचीच करण्याचा प्रघात आहे गौरी शंकर लक्ष्मी नारायण अशी काही उदाहरणे सोडली तर माता रेणुका, जरीमरी, मारी, जाखाई, जोगाई इ० देवता एकट्याच पूजिल्या जातात.

उत्खननामध्ये सापडलेल्या मूर्तीच्या अंगावर एका अगदी तोकड्या झग्याविरहित अन्य वस्त्र नाही छातीपर्यंत लोंबणारा फुलांचा हार गळ्यात आहे कंबर बारीक, हात सरळ व लांब, तोंड रुंद डोळे वटवटीत, कानात कुंडले व पुढे फणा उभारलेला व तीन वेटोळी असलेला नागाचा कमरपट्टा असे तिचे एकंदर स्वरूप आहे ( Mackey, India's Civilization )

ह्या मातृस्वरूप आदिशक्तीचे एकूण स्वरूप कसे सर्वव्यापी आहे, ह्याचे वर्णन आपल्याला "श्रीदेव्याथर्वशीर्षम्" ह्या स्तोत्रामध्ये पहावयास मिळते ह्या स्तोत्रातील देवीचे वर्णन सारांशरूपाने खालीलप्रमाणे आहे.

देवांनी आदिशक्तीला प्रश्न केला की, " तू कोण आहेस व तुझे स्वरूप कोणते ? " तिने उत्तर दिले की, " मी ब्रह्मस्वरूप आहे. माझ्या प्रकृतीपासून पुरुषात्मक सत् व असत् उत्पन्न झाले असून मी साक्षात् आनंद आहे. ब्रह्म, अब्रह्म, वेद, रुद्र, वसु, पूषा, विष्णु इ० सर्व मीच आहे. मोठमोठ्याना कार्य-प्रवण करणारी मीच आहे. ज्ञानाने तळपणारी दीप्तमती, कर्मफल हेतु जाणणारी व असुराचा नाश करणारी मीच आहे. मी परमात्मशक्ति, विश्वमोहिनी, पद्मांकुश धारण करणारी महाविद्या आहे माझे हे सत्य स्वरूप जाणणारे भवसागर तरून जातात "

माझे स्वरूप ब्रह्मदेवाला अगम्य व अज्ञेय असल्याने माझे नाव अज्ञेया आहे. माझा आदि-अंत कोणालाही सापडत नाही म्हणून मला अनंता म्हणतात. कैवढही प्रयत्न केले तरी माझे स्वरूप साक्षात् दिसून येत नाही म्हणून मला अलक्षा ह्या नावाने संबोधतात माझ्या जन्मकाळाचे आदिकारण कोणालाही लागत नाही म्हणून मी अजा ह्या नावाने प्रसिद्ध आहे माझे फिरणे ( संचार ) सर्वत्र एकट्याने असते म्हणून माझे नाव ' एका ' असे ठेवले गेले. तो संचार स्वैर रूपाने अंतरिक्षामध्ये होतो म्हणून मला ' नैका ' ह्या नावाने संबोधतात. मी त्रिगुणात्मक मायाशक्तिरूपाने प्रगट होऊन जगाची उत्पत्ति, स्थिति व लय ही कार्ये करते. ब्रह्मशक्ति सरस्वतीरूपाने निर्मिति करते, विष्णुशक्ति महालक्ष्मीरूपाने पालन करते आणि रुद्रशक्ति महाकालीरूपाने सृष्टीतील जीवमात्राचा संहार करते. त्याचा सारांश असा की, ईश्वर रागावला तर शक्तीचा क्षय होतो आणि तोच क्षय सर्वनाशास कारणीभूत होतो माता ज्याप्रमाणे आपल्या लहान बालकाला मार्गदर्शन करते, शिकविते, समृद्ध करते, तद्वत जे कोणी श्रद्धेने आणि भक्तिभावाने माझी सेवा करतील त्यांना मी सुखी व संपन्न करीन

महाभारतकार व्यास म्हणतात की, मनूने सृष्टीची रचना केली तेव्हा दक्षिणभागी पुरुष, वामभागी त्याची स्त्री शतरूपा हिला बसविले, पण त्या दोघांचे शरीर मात्र एकच असल्याने तेच पुढे अर्धनारीनटेश्वराचे रूप मानले गेले भारतीय धर्मसंस्कृतीमधील उच्च वर्णीयामध्ये हेच तत्त्व थोड्याफार अंशी आजही चालू असलेले आढळते. कोणत्याही देवकार्यास सुरुवात करताना कर्त्याची ( यजमानाची ) स्त्री त्याच्या वामभागाला बसलेली असते कर्त्याची स्त्री हयात नसल्यास त्या स्त्रीऐवजी तिचे प्रतीक म्हणून सुपारी डाव्या कनवटीस लावतात. देवीच्या भक्तांनी स्त्रियांची निंदा करणे, त्यांना मारणे, फसविणे, त्यांची मने दुखविणे इत्यादि गोष्टी वर्ज कराव्यात ह्या गोष्टी करणाराला देवीचा अनुग्रह मिळत नाही. उलट देवीचा कोप होऊन सर्वनाश होतो

'लक्ष्मी तन्त्र' ग्रंथाप्रमाणे (२।११।१२) श्रीमहाविष्णूची अहंकारशक्ति हीच महालक्ष्मी होय ती शक्ति नित्य, निर्दोष, असीम व कल्याणकारक आहे. विष्णूची ती परा शक्ति होय सृष्टीची उत्पत्ति, स्थिति, लय हे तिचे कार्य होय एखाद्या स्त्रीचा पति रागावला तर ' कोण चुकत नाही ' अशा हळुवार शब्दाने ती स्त्री त्याचा राग शांत करते तसाच एखाद्या पित्याचाही क्रोध शांत करते म्हणूनच ती मातृस्वरूपात नेहमी वावरत असते

## अर्धनारीनटेश्वर

ह्या स्वरूपाच्या उत्पत्तीच्या कथा खालीलप्रमाणे आहेत

( १ ) अरुणाचल पर्वतावर शंकर पार्वती तपश्चर्या करीत असताना भूलोकावर महिषासुर दैत्याचा फार उपद्रव होऊ लागला भूलोकावरील देवा ब्राह्मणांची त्या दैत्यासंबंधीची तक्रार शंकर पार्वतीकडे आली त्यामुळे पार्वती दुर्गादेवीच्या स्वरूपात भूलोकावर गेली, व तिने त्या दैत्याचा नि पात केला ह्या विजयामुळे ती आनंदाने बेभान होऊन एकदम पतीच्या वामांकावर येऊन विराजमान झाली तिला मिळालेल्या विजयामुळे शंकरही प्रसन्न झालेच होते त्यांनी तिला आपल्या वामांगामध्ये कायमचे विलीन करून टाकले हेच अर्ध नारीनटेश्वराचे स्वरूप होय ( स्कंदपुराण, स्वायंभुव १-२-३-२१ )

( २ ) स्मशानात क्रीडा करण्यात रममाण होणाऱ्या शंकराचा संसार म्हणजे सदा सर्वदा " भिक्षां देहि " स्वरूपाचा असावयाचा रोज काही तरी भिक्षा मागून आणल्याशिवाय उदरभरणाची सोय होत नसे ही त्यांची स्थिति अन्नपूर्णा देवीला पाहवली नाही तिने ही शंकराची ' भिक्षावृत्ति ' नष्ट करण्याचे ठरविले नारदमुनींना तिने आपला हा बेत कळविला व ह्या कामी त्यांचे सहाय्य मागितले नारदांनी तिला सांगितले की " आज ह्या वेळी शंकर भिक्षेसाठी बाहेर गेलेले आहेत त्यांना कुठेही भिक्षा मिळणार नाही अशी व्यवस्था कर म्हणजे शंकर अखेर तुझ्याच जवळ येतील " नारदाच्या सांगण्या प्रमाणे तिने तशी व्यवस्था केली त्यामुळे त्या दिवशी शंकरांना कुठेही भिक्षा मिळाली नाही म्हणून ते अखेर अन्नपूर्णा हिच्या घरी आले तिथे मात्र त्यांना अतिशय सुग्रास अन्नाची भिक्षा मिळाली त्याबरोबर त्यांना अत्यानंद झाला आनंदाच्या भरात त्यांनी अन्नपूर्णेला घट्ट प्रेमालिंगन दिले परंतु त्याचा परिणाम मात्र असा झाला की, अन्नपूर्णेचे रूप त्यांच्या वामांगी कायमचेच चिकटले आणि अशा तऱ्हेने अर्धनारीनटेश्वराचे स्वरूप तयार झाले

( Wilkins, Hindu Mythology, P 328 )

( ३ ) ब्रह्मदेवाच्या मुलांनी प्रजोत्पत्ति करण्याचे वद केल्यामुळे ब्रह्मदेव एकदा त्याच्यावर फार रागावला ब्रह्मदेवाच्या त्या रागातूनच अर्धा शंकर व अर्ध्या सतीचे रूप तयार झाले हेच ते अर्धनारीनटेश्वराचे स्वरूप होय

( Wilkins, Mythology, P 296-97 )

( ४ ) ब्रह्मदेवाने सृष्टिकार्याचे प्रसगी अनक मानसपुत्र निर्माण करून प्रजा निर्मिति करण्याचे कार्य त्याजवर सोपविले पण ते त्याजकडून झाले नाही तेव्हा ब्रह्मदेवाने कडक तपश्चर्या करून त्याच्या मस्तकातून अर्धनारी रूप घेऊन भगवान शंकर बाहेर आले तृतीय नेत्रशक्तीच्या प्रभावाने त्याने ब्रह्मदेवासह सव सृष्टीच जाळून टाकली नतर स्वत च्या भार्येबरोबर ( सती ) यौगिक प्रक्रियेने समागम करून पुनश्च ब्रह्मा, विष्णु याच्यासह सर्व सृष्टि निर्माण केली ( लिंग पुराण )

वरीलप्रमाणे जरी या रूपाच्या अनेक उत्पत्ति दिलेल्या असल्या तरी तत्त्वत शिव पार्वतीच्या सयुक्त रूपालाच हे नाव दिलेले आहे शिव शक्तिसयोग म्हणजेच स्त्री पुरुष सयोगाचे मूलभूत तत्त्व यामध्ये प्रतीत आहे सृष्टीच्या प्रारभिक अवस्थेमध्ये स्त्री पुरुष ही तत्त्वे अविभक्त होती आजही अत्यत खालच्या थराच्या जीवामध्ये, स्त्री तत्त्व आणि पुरुष तत्त्व ही दोन्ही एकाच शरीरात वास्तव्य करात असलेली आढळतात, आणि अशा जीवाना हर्मोफ्रोडाईट असे नाव शास्त्रज्ञ देतात ते एकाच शरीरात नर नारी असतात आणि कोणत्याही सयोगाविना प्रजानिर्मिति करतात हेच आद्यतत्त्व विशद करण्यासाठी अर्धनारीनटेश्वराचे प्रतीक निर्माण केलेले असावे

( ५ ) तसेच फार प्राचीन काळी योनी व लिंग याची पूजा वेगवेगळी होत असे, पण कालातराने मानवाने त्याना एकाच प्रतिकामध्ये गोवले आणि शिवलिंगाकृति तयार झाली मानवसमाज सुधारत चालला, त्याप्रमाणे याच तत्त्वाचे रूपातर त्यानी शिल्पामध्ये करून ही मूर्ति तयार केली रुद्रहृदयोप निषदामध्ये वर्णन आहे की,

रुद्रो नर उमा नारी तस्मै तस्यै नमो नम

माया ही प्रकृति असून शिव हा तिचा धारणकर्ता आहे या उभयताच्या सयोगातूनच सर्व विश्व निर्माण झाले मनु यासबधी लिहितो की,

द्विधाकृतात्मनो देहमर्धेन पुरुषोऽभवत् ।
अर्धेन नारी तस्या स विराजमसृजत्प्रभु ॥

भावार्थ असा की, दयाघन परमेश्वराने स्त्री व पुरुष अशा उभयरूपात आत्मदेह धारण केला आणि नंतर स्त्रीच्या ठिकाणी विराजाला (चराचर विश्वाला) जन्म दिला.

हे अर्धनारीनटेश्वराचे स्वरूप कसे बनवावे, यासंबंधी हेमाद्रि वर्णन देतात ते असे,

मूर्तीच्या डाव्या बाजूला शिवाचे अर्धस्वरूप बनवावे, मस्तकी जटाजूट व चंद्र असावा, अंगाला भस्मचर्चन व नागयज्ञोपवित असावे, उर्ध्वलिंग आणि कटीला सर्पमेखला असावी. पाय कमळावर असावा आणि हाती त्रिशूळ व अक्षमाळा असावी. डाव्या बाजूला नारीरूप असून, कपाळी कुंकुमतिलक असावा, केशसंभार दाखवावा, स्तन वाटोळे व घन असून, गळ्यात हार असावा. वस्त्र नेसवावे आणि त्यावर मेखला बांधावी, पायाला अलिता लावावा आणि एका हाती आरसा व दुसऱ्या हाती कमळपुष्प द्यावे.

तंत्रसार-कर्त्यांनीही या स्वरूपाचे वर्णन केले आहे, पण ते याहून निराळे आहे (भारतीय संस्कृति कोश, १।२३८).

ह्या देवतेची स्वरूपे अनेक ठिकाणी देवालयांमध्ये व पाषाण-शिल्पात पहावयास मिळतात. आपण घारापुरी (एलिफंटा) येथील गुहेत असलेले स्वरूप पाहू या. हे शिल्प अतिभव्य असून त्याची उंची १६ फूट ९ इंच आहे. पुरुष-बाजूकडील एक हात नंदीवर ठेवलेला असून मस्तकावर चंद्र, त्याखाली केसांच्या जटांचे जाड पेळू, कानात बाळी, कसलेले पिळदार दंड व त्यावर अलंकार घातलेले, मानेभोवती नागफणा डुलते आहे. वामांगी स्त्री-बाजूकडील स्वरूपात मस्तकावर लांब केशकलाप, त्यातील काही चुकारतट्टू भुरभुरणारे कुरळे केस डोळ्यांच्या भुवईपर्यंत भुरभुरत आहेत, कानात वरील बाजूस रत्नजडीत कर्णभूषणे आहेत, तर खालील पाळीमध्ये जाडशी ठळक भूषणे, दंडावर बाकी, मनगटात जाडशी भूषणे व एका हातात आरसा असे ते स्वरूप आहे.

(A Guide to Elephanta by Dr. Hiranand Shastri, P. 43)

मत्स्यपुराणातही ह्या स्वरूपाचे वर्णन आढळते. दक्षिणभागाच्या पुरुषाकडील बाजूस मस्तकावर जटाभार, गळ्याभोवती वासुकीचा वेढा व कुंडल, अंगावर सर्पभूषणे, हातामध्ये नर-कपाल व त्रिशूळ आणि उजवा पाय कपाळावर ठेवलेला असून वामांगीच्या स्त्रीभागास मस्तकावर केशकलापांचा भांग पाडलेली, भाळी कुंकुमतिलक, कानांत बाळ्या-बुगड्यांसारखे अलंकार,

दुर्गा अगर काली ही शिवाची प्रतीक मानतात इतर धर्मीयही त्रिमूर्ति मानतात ओसिरस, इसिस व होरस ही इजिप्तमधील त्रिमूर्ति होय तसेच चद्र, पृथ्वी आणि पाताळ ही पण त्रिमूर्ति मानतात सिरियन सस्कृतीत आटार गॅटीस, हडाड व तिचा मुलगा मिळून त्रिमूर्ति होते, तर बॅबिलोनमधील अनु ( स्वर्ग ), बेल ( पृथ्वी ) आणि आ ( जल ) मिळून त्रिमूर्ति होते मेक्सिकनही त्रिमूर्ति मानत असत ( जेम्स धर्मकोश १२।४५७ )

त्रिपुरासुर दैत्य आणि कैलासपति शकर ह्याचे युद्ध चालू असता दैत्याच्या त्या अचाट शक्तिशाली सामर्थ्यापुढे शकराचा तितकासा प्रभाव पडेना अनेक दिवस युद्ध करूनही दैत्याच्या पराभवाची चिन्हे दिसनात व योग्य तो उपायही सुचेना तेव्हा शकरानी आपली सर्व शस्त्रास्त्रे खाली ठेवली आणि ते विचारमग्न झाले भगवान नारायणाला शकराची ही करुणाजनक स्थिति समजल्यावर त्याने ब्रह्मदेवाला शकराच्या मदतीस धाडून दिले ब्रह्मदेवाने शकराना असा सल्ला दिला की, " अशा बिकट सकटकाली दुर्गादेवीचे स्तोत्र जर भक्तिभावाने पठण केले तर ती सुप्रसन्न होऊन युद्धात सहाय्य करील " त्याप्रमाणे शकरानी दुर्गास्तोत्र अतिशय भक्ति प्रेमपरिप्लुत वाणीने आळविले व दुर्गादेवीला प्रसन्न करून घेतले त्या स्तोत्राचा मराठी भाषेत साराश खालीलप्रमाणे आहे

" हे दुर्गादेवी ! तू सकटनिवारक आहेस मी तुझा भक्त आणि अनुचर आहे शत्रूने चारी बाजूनी मला घेरले आहे ह्या सकटातून तूच मला वाचवू शकतेस तू नारायणाची आवडती असून ब्रह्मदेवाच्या शिरावरचा ताज आहेस ब्रह्मदेवादि देवताची तू माता आहेस तू अगोचर आहेस आणि गुणदर्शक विशेषण लावले तरच तू गोचर आहेस तूच आदिशक्ति आहेस तू काही वेळा ब्रह्मदेवाच्या रूपाने सृष्टि निर्माण करतेस तर शकराच्या रूपाने जीवमात्राचा सहार करतेस वेदमाता सावित्री तूच होय गोलोकामध्ये हरिप्रिया राधाही तूच होय वृंदावनामध्ये तू वृन्दा आहेस शभर शिखराच्या पर्वतावर तुझीच सत्ता चालते तू चद्रावली आहेस काही वेळा तू दक्षकन्या तर काही वेळा पर्वतकन्या पार्वती ह्यांचे रूप घेतेस देवमाता अदिति तूच होय तात्पर्य असे की, तू पुरुष, स्त्री व नपुसक ह्याचा निदर्शक शक्ति होय वृक्षबीज, पशुपक्ष्याची नानाविध रूपे, अग्नीची दाहक शक्ति, जलाचा शीतलपणाही तूच आहेस इ० इ० " ( ब्रह्माडपुराण, कृष्ण अ ८८/१५-२९ )

हरिवश ( विष्णुपर्व ) अध्याय ३ मध्ये विष्णूने नारायणी देवीचे स्तवन केले आहे त्यातील ३७ श्लोकांचा मथितार्थ वरीलप्रमाणेच आहे देवीभागवत ग्रथात अनेक देवताचे स्तवन आढळून येते त्यामध्येही वरील दुर्गास्तोत्रातील सर्व

गुणविशेषणे त्या त्या देवतांच्या ठिकाणी कल्पिलेली आढळून येतील. इतकेच काय, परंतु एकादा गणेशभक्त आपल्या प्रिय देवताच्या ठिकाणी हेच गुण आहेत असे मानतो; आणि गणेशामुळेच सर्व जग उत्पन्न झाले असे समजतो. गोकुळवासीजनांना धीर देण्यासाठी, त्यांचे सांत्वन करण्यासाठी श्रीकृष्णाने उद्धवाला पाठविले. गोकुळात गेल्यावर तेथे उद्धवाला राधा अतिशय शोकाकुल दिसली. त्याने जी तिची स्तुति केली आहे त्यामध्ये वरीलप्रमाणे दुर्गादेवीचे सर्व-व्यापित्व राधेच्या ठिकाणी कल्पिलेले आहे. असेच वर्णन त्रिपुरा, माया, पार्वती, नारायणी इ० देवताच्या ठिकाणी कल्पिलेले आहे.

## आदिशक्तीची रूपे

दुर्गादेवीला 'दुर्गा' हे नाव पडण्याचे कारण तिने दुर्गमराक्षसचा वध केला आणि विंध्यपर्वतावर कठीण जागी जाऊन ती राहिली. तेथे पोहोचण्यास दुर्घट म्हणूनही 'दुर्गा' अशा तऱ्हेची व्युत्पत्ति आढळते. तरीही ती एक आदिशक्ति आहे, असे ब्रह्माण्डपुराण म्हणते. ह्यावरून कारणपरत्वे ज्या भक्ताला आदिमायेचे जे नाव प्रिय वाटले त्याने ते तिला दिले. पुरुष आणि प्रकृति ह्यापैकी प्रकृति हीच खरी आदिशक्ति होय.

कल्पारंभी आदिशक्तिशिवाय दुसरे कोणीही नव्हते. तिने आपल्या मनापासून पुत्र केले आणि त्यापैकीच एक तिचा पति झाला. मग ह्या दोघांच्या संबंधातून पुढे अनेक देवता, जीव-जंतु, वृक्ष-वनस्पति पशु-पक्षी कृमि-कीटक व मानव-दानव असा सर्व विश्वविस्तार झाला. भारतामध्ये ज्या जमाती मातृपूजक आहेत त्यांच्या उत्पत्तिकथा ह्या शक्तिप्रधानच आहेत.

उभय स्वरूपात आहेत. परंतु बहुधा स्त्री-रूपाचेच ध्यान केले जाते. ती आदिमाया सौंदर्याचे अनिकृत निधान आहे. ती चंद्रसूर्यांनी मंडित आहे. तिच्या मुखमंडलावर चकाकणारे ते मत्स्यरूप नेत्र कधी प्रकाशाने उजळतात, तर कधी तमांधकाराने मिटून जातात. नामरूपात्मक वस्तूंच्या दृश्याने ते उघडतात, तर नामरूपे अव्यक्तामध्ये निर्लीन झाल्यावर ते शयभचे मिटतात ती ललिता म्हणजे खेळकर आहे. तिचा खेळ कोणता म्हणाल तर अखिल विश्वपटावर मानवरूपी बाहुल्या मांडणे आणि कंटाळा आल्यावर लहान मुले जसा आपला खेळ टोपलीत भरून ठेवतात त्याप्रमाणे मानव वगैरे प्राणि-मात्राना, ही ललिता अव्यक्ताच्या टोपलीत भरंदिली भरून टाकते

(प महादेवशास्त्री जोशी, 'विवेक' दसरा अंक, शके १८८०)

संतशिरोमणि एकनाथ महाराजानी आपल्या एका भारुडामध्ये ह्या आदिमायेचे वर्णन सविस्तर केले आहे, ते पहाण्यासारखे आहे

नमो आदिमाया भगवती । अनादिसिद्ध मूळप्रकृती ॥
महालक्ष्मी त्रिजगती । बया दार उघड, बया दार उघड ॥ १ ॥
हरिहर तुझें ध्यान करिती । चंद्र सूर्य कानीं तळपती ॥
गगना ते तारागणें रुळती । देवीं भागी भरिलें मोतीं ॥
बया दार उघड, बया दार उघड ॥ २ ॥
नवखंड पृथ्वी तुझी चोळी । सप्त पाताळीं पाउलें गेलीं ॥
एकवीस स्वर्गे मुगुटीं झळाळी । बया दार उघड, बया दार उघड ॥ ३ ॥

आचार्यांना काही उलगडा होईना. अशा विकट परिस्थितीत ती मुलगी महाराजांना म्हणाली, " शिव हा निश्चल आहे आणि क्रिया घडविणारी शक्ति आहे. त्या शक्तीच्या उपासनेशिवाय मानवांना काहीही करता येण्यासारखे नाही. आपणांस तिचीच कृपा असावयास पाहिजे. "

शिवः शक्त्या युक्तो यदि भवति शक्तः प्रभवितुम् ।
न चेदेवं देवो न खलु कुशलः स्पन्दितुमपि ॥ ( सौंदर्यलहरी )

भावार्थ असा की, शिव जेव्हा शक्तीने युक्त असतो, तेव्हाच तो सृष्टीवर प्रभुत्व गाजविण्यास समर्थ असतो. पण जर तो शक्तीविरहित असेल, तर त्याला आपल्या स्वतःच्या हृदयाचे स्पंदनही करता येत नाही. हा वेदान्त त्या लहान बालिकेच्या मुखातून ऐकल्याबरोबर शंकराचार्यांना आजारीपणाचे गूढ उकलले व विद्वत्तेमुळे झालेल्या अहंकाराचा त्यांनी त्याग केला. तात्पर्य काय, प्रत्यक्ष शंकरानाही शक्तीच्या सहाय्याशिवाय कार्य करता येणे अशक्य आहे.

हनुमान हा मर्कट जातीमध्ये जन्म पावला असताही, त्याच्या पुच्छामध्ये अतिप्रचंड सामर्थ्य का, असा विचारवंतांना प्रश्न उत्पन्न होतो. त्याच्या ज्ञातिबंधूंमध्ये इतरांच्या ठिकाणी हे सामर्थ्य नव्हते, असे सूक्ष्मावलोकनाने दिसते. एकदा शंकरानाच हा प्रश्न एका भक्ताने विचारला असता ते म्हणाले, हनुमान हा माझाच अवतार आहे, पण तो ब्रह्मचारी स्वरूपात असल्याने शक्तीला तेथे स्थान नाही. शक्ति बरोबर असल्याशिवाय शिवाचे रूप पूर्ण होत नाही, आणि त्याच्या हातून कार्य होत नाही. यासाठीच शक्तिस्वरूप पार्वतीदेवी, हनुमानाच्या पुच्छामध्ये ठाण मांडून बसल्या व मानवाला अतर्क्य वाटणाऱ्या क्रिया घडू शकल्या. ज्यामध्ये स्वतः शक्तिदेवता वास करते ते स्थान काय चमत्कार करू शकणार नाही ! ( श्रीविद्यारण्यस्वामीविरचित ' शांकरविजय ' ग्रंथातून ).

तंत्रग्रंथाप्रमाणे ब्रह्मा, विष्णु व महेश ही आद्यशक्तीची तीन स्वरूपे होत. सूर्यरूपाने तेज व गणेशरूपाने सिद्धि ती जगाला पुरविते. ह्या ठिकाणी सूर्यासंबंधी त्रोटक माहिती देणे योग्य होईल असे वाटते. आपल्याला ज्ञात असलेली सूर्याची नावे बारा आहेत. मित्र, रवि, सूर्य, भानु, खग, पूषन्, हिरण्यगर्भ, मरीचि, आदित्य, सवितृ, अर्क, भास्कर ह्याप्रमाणे ही बारा नावे असून हे बारा सूर्य होत. परंतु स्कंद-पुराणाप्रमाणे ह्या नावांतही फरक आढळतो. वरील बारा नावांपैकी मित्र, खग, पूषन्, हिरण्यगर्भ, मरीचि ह्या नावांऐवजी तेथे मिहीर, प्रतापवान्, मार्तंड, चित्रभानु व दिवाकर ही नावे आढळतात. इतर सात नावे समानच आहेत. ह्यावरून दोन अंदाज करता येतात. एक सूर्याची

संख्या १२ च्या ऐवजी १७ पर्यंतही असावी किंवा दुसरे म्हणजे एकंदर नावे १२ च असतील, फक्त नावांमध्ये फरक झालेला असावा.

त्याच पुराणामध्ये प्रत्येक महिन्यागणिक एक स्वतंत्र असे सूर्याला नाव दिलेले आहे. चैत्र-वैशाख ह्या अनुक्रमाने विष्णु, अर्यमन्, विवस्वत्, अंशुमान्, पर्जन्य, वरुण, इंद्र, धातृ, मित्र, दिवाकर, भग आणि त्वष्टा अशी नावे आहेत. तेव्हा वरील दोन्ही यादीतील नावे एकत्र केली तर ती २६ भरतात. अंतरिक्षामध्ये अनेक सूर्यमंडले आहेत असे आजचे शास्त्रज्ञ प्रतिपादन करतात. ती नेमकी किती आहेत ह्याचा नक्की अंदाज सुधारलेल्या यंत्रसामुग्रीनेही त्यांना देता येत नाही. परंतु हजारो वर्षांपूर्वी आपल्या अत्युद्भुत ज्ञानसामर्थ्याने आपल्या ऋषिमुनींनी ती सूर्यमंडळांची संख्या निदान २६ पर्यंत नेलेली आहे. त्या वेळी भारतीय खगोलशास्त्र इतके प्रगत झालेले होते. क्रांतदर्शीने प्राचीन ऋषींना एवढे ज्ञान प्राप्त झालेले होते. (स्कंद पुराण, प्रभास १०१)

सूर्यगोलाचे पृथ्वीवर प्रभुत्व आहे, आणि त्याचे परिणाम सतत होत असतात, हे आता आधुनिक संशोधकानाही मान्य करावे लागलेले आहे. त्यांनी प्रतिपादिले आहे की, सूर्यबिंबावर अनेक काळे डाग आहेत. एक डाग तर १८००० चौरस मैलाचा आढळून आला आहे. दर ११/१२ वर्षांनी त्यांची संख्या वाढते. त्या वेळी भूतलावर वादळे, युद्धे, जागतिक मंदी, राज्यक्रांति, अपघात, आत्महत्या, मानसिक रोग, शारीरिक दुःखे यांची वाढ होत असते. सन १९२८–२९; १९३८–३९, १९४९–५०; १९६०–६१ या काळांची उदाहरणे देऊन त्यांनी वरील सिद्धांत खरा असल्याचे दाखविले आहे. त्यांचे म्हणणे असे की, सौर कणा विद्युत्कण बाहेर फेकीत असतो, ते भूपृष्ठाच्या उत्तरध्रुवावर आदळतात, व त्यामुळे चुंबकीय वादळे निर्माण होतात. मानवशरीरातील नाड्यांमध्ये विद्युत ऋण व धन प्रवाह असतात, आणि त्यांचा संबंध या चुंबकीय वादळांबरोबर आल्याने, मन स्वास्थ्य बिघडते, चलबिचल होते. या वादळामुळे ज्याप्रमाणे रेडिओलहरींची वाहतुक बंद होते, टेलिफोन बिघडतो, टेलीमार नीट चालत नाही त्याप्रमाणे, मन:स्वास्थ्य बिघडते आणि मानसिक व्यथा वाढीस लागून मानसिक रोग व आत्महत्या विचार प्रबळ होतात. व्यवहारामध्ये आपण नेहमी पाहतो की, कृत्रिम उपायांनी जेव्हा मानवी शरीरातील विद्युत्कणांचे उत्पादन वाढवितात, अगर कमी करतात, तेव्हा हृदयाची स्पंदने, मज्जारोग, रक्तदाब यांवर परिणाम होतो, तोच परिणाम सौर-डागामुळे दुःखपर्यवसायी अथवा आनंदपर्यवसायी होत असतो.

सौर-डागाप्रमाणे भौतिक शास्त्रज्ञ आता असेही मानू लागले आहेत की, इतर ग्रहशक्तींचा परिणाम भूलोकावरील मानवी जीवनावरही होत असला पाहिजे.

भारतीय ज्योतिषशास्त्रज्ञांनी हीच गोष्ट अनेक शतकांपूर्वी ओळखली होती, आणि त्याचे परिणाम काय होतात, याचे सिद्धांतही नोंदून ठेवलेले आहेत. (डॉ. चि. श्री. कर्वे, केसरी २२–५–६६ ).

तेव्हा ती आद्यशक्ति इतक्या सूर्यांच्या सहाय्याने जगाला कमी-अधिक प्रमाणात तेज पुरवीत आहे. केवळ ह्याच भूलोकालाच नव्हे तर ती अशा अनेक भूलोकांनाही तेज पुरवीत असली पाहिजे. राधा, लक्ष्मी, सरस्वती, दुर्गा, सीता, रुक्मिणी इ० मूळ देवता त्या मूळ आदिशक्तीचीच नानाविध स्वरूपे होत. वैष्णव, विष्णुशक्तीला प्रधानपद देतात. पण जोपर्यंत ते शिव शक्ति, सूर्य शक्ति ह्यांना समान महत्त्व देणार नाहीत तोपर्यंत त्यांना आदिशक्तीचे खरे स्वरूप यथार्थपणे समजले असे म्हणता येणार नाही. त्याचप्रमाणे शिवभक्त, गणेशभक्त, विठ्ठलभक्त ह्यांचीही गोष्ट आहे. विनम्रतेची कास धरून द्वैतभाव सोडल्याशिवाय आदिशक्तीच्या स्वरूपाची ओळख होणार नाही.

आदिशक्तीची जी तीन रूपे वर सांगितली त्यांचा संबंध विश्वाच्या तीन अवस्थांबरोबर आहे. विश्वाच्या तीन अवस्था म्हणजेच विश्वांतर्गत अणु परिमाण पदार्थापासून व महात्मपरिमाण पदार्थापर्यंत जो पदार्थसमूह आहे त्याच्या तीन अवस्था म्हणजेच विश्वाच्या तीन अवस्था होत. उत्पत्ति, स्थिति, लय ह्या तीन शब्दांनी त्या तीन अवस्थांचे वर्णन केलेले आहे पदार्थांच्या उत्पत्तीला जी कारणीभूत होते ती पराशक्ति, स्थितीला कारणीभूत ती सूक्ष्मशक्ति आणि स्थितीपासून लया॰ पर्यंतच्या स्थूल व्यापाराला कारणीभूत होते ती स्थूलरूपा शक्ति होय. अशा रीतीने आदिशक्तीचे स्वरूप हे सर्वव्यापक आहे ( विष्णुयामल तंत्र )

काही देवता स्वयभू तर अनेक देवता मानवनिर्मित आहेत. पंढरपूरचा विठ्ठल हा स्वयभू असल्याने, त्याच्या चरणापर्यंत कोणत्याही वर्णीय भक्ताला जाता येते पण मानवनिर्मित देवतांची स्थापना मंत्राने झालेली असल्याने सर्व वर्णीयांना सर्व ठिकाणी प्रवेश हमखास मिळेल, असे निश्चयाने सांगता येणार नाही मग शासनआज्ञा काहीही असो देवतामधील हा बारकावा लक्षात ठेवण्यासारखा आहे.

वैदिकयुगातच ईश्वराच्या परमतत्त्वाची मातृरूपाने उपासना करण्याची पद्धत प्रचलित झालेली होती ऋग्वेदात मातृ ब्रह्माचा स्पष्ट परिचय करून दिला आहे त्या काळी उपासनेत असलेल्या अनेक देवतांवरून ह्याची स्पष्ट कल्पना येते. ऋग्वेदामधील देवीसूक्तात आद्यशक्ति देवी भगवतीचे स्वरूप आणि महात्म्य याचे वर्णन आहे. सूक्तात देवी स्वमुखाने सांगते की, ''ब्रह्मस्वरूपात भूतलावर मीच वावरत आहे. रुद्र, वसु आणि आदित्य व इतर विश्वेदेवांच्या स्वरूपात साक्षात

सचार आहे. मित्र, वरुण, इंद्र, अग्नि, अश्विनीकुमार ह्यांना मीच धारण करते. मीच जगत्कल्याणासाठी दैत्यांचा आणि आसुरवृत्तीचा नाश करते. माझ्या निस्सीम भक्तांना मनोवांछित भोग व मोक्ष मी उपलब्ध करून देते. प्राणिमात्रांचा अभ्युदय व विश्वकल्याण हे सर्व माझ्याच कृपेवर अवलंबून आहे. "यं कामये तं तमुग्रं कृणोमि तं ब्रह्माणं तमृषिं तं सुमेधाम्।" (ऋग्वेद १०। १२५-५). जे जे भक्त मला आवडतात त्यांना मी श्रेष्ठ बनविते त्यांना प्रत्यक्ष ब्रह्मा, प्रज्ञावान् ऋषि बनविते."

कृष्ण-यजुर्वेदांतर्गत तैत्तिरीय आरण्यकामध्ये जगज्जननीचे स्वरूप वर्णन केले आहे. तामग्निवर्णां तपसा ज्वलन्तीम्। वैरोचनीं कर्मफलेषु जुष्टाम्॥ (आरण्यक १०-१). जिचा वर्ण अग्नीसमान आहे, जी तप सामर्थ्याने दिव्य व दाहक अशा तेजाने तळपत आहे, जी स्वयंप्रकाशमान आहे, ऐहिक या पारलौकिक प्राप्तीसाठी साधक जिची उपासना करतात, जी संसारसागरातून पलतीराला नेण्यास समर्थ आहे, जी अखिल प्राणिमात्रांचे रक्षण करण्यास समर्थ आहे अशा त्या आदिशक्तीला माझा नमस्कार असो.

महाभागवतांतर्गत भगवती-गीतेत परमेश्वरी तत्त्वाचे विवरण आहे. "सृजामि ब्रह्मरूपेण जगदेतच्चराचरम्। संहरामि..."

देवी हिमालयाला सांगते "मी ब्रह्मरूपात सर्व जगत्-सृष्टि उत्पन्न करते आणि माझ्या इच्छेप्रमाणे वर्तन करणाऱ्या महारुद्राकडून मी शेवटी विश्वाचा संहार करते. (माउली, सप्टेंबर १९६०)

ह्याप्रमाणे आदिशक्तीचे कितीही वर्णन केले, तरी ते अपुरेच पडणार. आजवर अनेक ग्रंथकारांनी ह्या आदिशक्तीच्या संबंधी भरपूर गुणसंकीर्तन केलेले आहे. सारांश वरील वर्णन जरी त्रोटक भासले तरी त्या मूळ आदिशक्तीबद्दल यथार्थ ज्ञान होण्यास ते पुरेसे होईल असे वाटते. म्हणून हा विषय मी येथेच संपवितो कारण आपल्याला अजून अनेक गोष्टींचे समालोचन करावयाचे आहे.

## आर्यांच्या देवता शस्त्रधारी का ?

भारतामधील प्रत्येक देवतेचे जर आपण निरीक्षण केले तर सामान्यतः प्रत्येक देवतेच्या हातात कोणते ना कोणते तरी शस्त्र असलेले आपणास दिसून येईल. विष्णूच्या हातात सुदर्शन चक्र, परशुरामाजवळ परशु, रामाजवळ धनुष्य, अंबा, दुर्गा, भवानी त्यांच्या हातांत अनेक शस्त्रे आपण पाहतो. आर्यदेवतांचे हेच वैशिष्ट्य म्हणून सांगता येईल आर्यांच्या वैदिककाळातील देवता म्हणजे इंद्र, वरुण,

पूषन्, मित्र ह्या होत आर्यांच्या उत्कर्षाच्या काळी दुर्गा, काली, कात्यायनी, भवानी इ० देवता हातात शस्त्र धारण करून अनार्यांचा पाडाव करीत पुढे झाल्या कालाला अनुरूप असेच त्यांचे वर्तन असल्याने आजही त्या देवता आदर्शवत आहेत वरुण, मित्र, इंद्र इत्यादि देवतांनी कालाला अनुसरून योग्य असे वर्तन केले नाही व त्यामुळे आपले पुढारीपण त्यांनी गमावले व यज्ञातील हविर्भागावर जे सतुष्ट राहिले त्या देवता आज पूजनातून जवळजवळ नष्टच झाल्या आहेत पौराणिक कालात आपल्या शस्त्रबलाच्या सामर्थ्यावर ज्या देवतांनी अग्रस्थान मिळवून पूजेचा मान मिळविला तो मान आजतागायत कायम आहे, त्यांची प्रतिष्ठा बद्धमूल झाली असे नव्हे तर ती अद्याप वाढतच आहे

ऐतिहासिक काळातही ह्या शस्त्रधारी देवता आपल्या निस्सीम भक्तांना पूज्य झालेल्या आहेत रजपुतांचा राजा उग्रप्रभु ह्याला ‘ हिंगुला ’ देवीने शस्त्रप्रसाद दिला आणि त्यामुळे त्याचा कधीही पराजय झाला नाही यशानतर गुरू गोविंदसिंहाला कालीदेवीने तलवार दिली प्रतापगडच्या भवानी देवीने श्रीशिवछत्रपतीला तलवार प्रसाद म्हणून दिली आणि त्या प्रसादाच्या सामर्थ्यावरच श्रीशिवप्रभूंनी ‘ हिंदवी स्वराज्य ’ यशस्वी केले माडला किल्ल्यामध्ये राजराजेश्वरी देवीने यावनी निझामाला जोपर्यंत तलवारीच्या ‘ कौला ’ने पाठबळ दिले, तोपर्यंतच तो विजयी होत गेला परतु त्याची घटका भरल्यावर मात्र त्याला नेहमीप्रमाणे कौल मिळाला नाही, म्हणून त्याला त्या वेळी मराठ्यांचा हल्ला होण्यापूर्वीच पळून जावे लागले अशी अनेक उदाहरणे इतिहासातून देता येतील पौराणिक काल व ऐतिहासिक काळ यामधील वरील उदाहरणांवरून आजच्या पिढीला अत्यत बहुमोल असा बोध घेता येईल की, धर्म, देश, समाज ह्यांच्या रक्षणासाठी प्रत्येकाने शस्त्रधारी झाले पाहिजे व मनात सदैव विजिगिषु वृत्ति जोपासिली पाहिजे.

आर्यावर्तातील रामकृष्ण आदि अवतारी पुरुष ज्याप्रमाणे शस्त्रधारी दाखविले आहेत, त्याप्रमाणे त्या काळी अनेक स्त्रियाही युद्धकलेत निपुण होत्या असे कैकयी, विश्पला, सजयमाता, विदुला, सुभद्रा, सत्यभामा यांच्या उदाहरणा वरून म्हणता येते मुलाला ज्याप्रमाणे वीर म्हणत, त्याप्रमाणे गृहाचे रक्षण करणारी म्हणून स्त्रीलाही वीरा म्हणत पौराणिक काळीच शक्तिपूजेची वाढ जास्त झाली असे दिसते एखादे वेळी पुरुष जे काम आठ हातांनी करू शकणार नाही, ते स्त्री दोन हातांनी करते, अगर आठ हातांचे काम दोन हातांनी करू शकते वास्तव त्या शक्तिमूर्तींला चार, सहा, आठ भुजा दाखविल्या असल्या पाहिजेत असे काहींना वाटते. स्त्री अनेक शस्त्रांचा वापर करू शकते, म्हणून ती ती आयुधे

मूर्तीमध्ये दाखविली. ज्या वेळी शंकरासारखे वीर राक्षसांना मारू शकले नाहीत, रामासारखा वीर शतमुखी रावणाचा वध करू शकला नाही, तेव्हा स्त्रीशक्ति पुढे सरसावली आणि शत्रूचा वध केलेला आहे. आधुनिक काळातही चाँदबिबी, ताई तेलीण, राणी लक्ष्मीबाई, कॅ. लक्ष्मी यांची उदाहरणे देता येतील. या शिक्षणामुळे धैर्य, शौर्य, कर्तृत्व, प्रसंगावधान इ० गुण स्त्रीच्या ठिकाणी प्राप्त होत व ती सबल झालेली असे.

मध्यपूर्व देशामध्ये ज्या वेळी सुमेरियन, सेमेटिक, बॅबिलोनिअन वगैरे संस्कृति नांदत होत्या, तेव्हा तेथील देवताही भारतीय देवताप्रमाणच शस्त्रधारी होत्या. अथेनीजवळ ढाल, तलवार, अनाथ—भाला, परशु, इस्टर—धनुष्य, बास्ट–ढाल, मा–परशु, खंजीर वगैरे शस्त्रे त्या काळी देवताजवळ आढळून येतात. आर्यदेवतांसारखा शस्त्रांचा प्रचंड उपयोग मात्र त्या देवतांनी केलेला दिसून येत नाही

## देवतांची उत्पत्ति

मातृस्वरूप देवतांची भारतामध्ये जी पूजा होत आहे त्या देवतांची उत्पत्ति मानवाप्रमाणे झालेली नाही असे आढळून येईल. आदिशक्ति भक्तांच्या संकटकाळी संकटनिवारणार्थ एखादी देवी उत्पन्न करते. महिषासुरवधाच्या वेळी अशा अनेक देवता उत्पन्न झालेल्या आपणांस दिसून येतील. पार्वतीचे मूळचे रूप श्यामवर्ण होत. देवांनी तिची प्रार्थना केल्यावर तिची दोन रूपे झाली कौशिकी गौरवर्णी व कालिका श्यामवर्णी झाली. ब्रह्मतेजापासून कात्यायनी व मनसादेवी यांचा जन्म झालेला आपण पाहतो. तसेच महिषासुरमर्दिनी, अष्टभुजा, दुर्गा या अंतरिक्षामध्ये अनेक देवतांच्या तेजापासून उत्पन्न झाल्या आणि भूलोकावर दैत्यांच्या नाशार्थ अवतरल्या. मीनाक्षी व द्रौपदी ह्या अग्निकुंडातील अग्नितत्त्वापासून तयार झाल्या, ह्याबद्दल असे अनेक दाखले देता येतील. इंद्राणी, रुद्राणी, लक्ष्मी आदि देवता आपण पाहतो, पण त्यांना प्रसूतिवेदना होऊन नंतर मुले झाल्याचे आपल्या ऐकिवात नाही. ह्याचे कारण आपणांस पुढील कथेत आढळून येईल.

श्रीहरि नदाल सांगतात की, देवस्त्रियांना मुले होत नाहीत ह्याचे कारण असे की, एकदा राधा व मी ह्यांचा संयोग गोलोकामध्ये अनेक वर्षे चालू होता कालांतराने राधा गर्भवती झाली. अनेक वर्षे (ब्रह्मदेवाच्या आयुमर्यादेचा काळ) उदरात गर्भ राहिल्यावर तिला प्रसूतिवेदनांनतर एक अंडाकृति झाली. त्याचे पोषण करण्याऐवजी तिने ते अंडे जलामध्ये फेकून दिले. आपल्या स्त्रीने कर्तव्यच्युत होऊन जननत्वाच्या विरुद्ध वर्तन केल्यामुळे माझा कोप अनावर

झाला. त्या रागाच्या भरात मी राधेला शाप दिला की, "तूं नेहमी वांझ राहशील" दुर्गा, लक्ष्मी, सरस्वती आदि देवता त्या आदिशक्ति राधा हिच्याच अंशस्वरूपाने वावरत असल्यामुळे त्याही वांझच राहिल्या. अखेर राधेने जलात फेकलेली ती अंडाकृति जलातच वाढीला लागली; त्यामधूनच श्रीमहाविष्णूंनी उत्पत्ति झाली, पर्यायाने विश्वनिर्मिति झाली. अथवा असे म्हणता येईल की, पार्वती, दुर्गा, लक्ष्मी ही सत्य स्वरूपे नसून आदिशक्तीची मानवांनी कल्पिलेली स्वरूपे असल्याने त्यांना मुले प्रसवणे अशक्यच आहे.

( ब्रह्मांडपुराण, कृष्ण खंड ७१ ।७८-८ )

## नवरात्र व दुर्गापूजा

दुर्गादेवीस्वरूप महिषासुरमर्दिनी देवीची आराधना अनन्यभावाने भारतात फार प्राचीन काळापासून म्हणजे पौराणिक कालापासून होत आलेली आहे. देवी भागवतात ह्या पूजेचा उल्लेख असून ती पूजा चैत्र, आषाढ, अश्विन व माघ ह्या चार महिन्यातील शुक्ल प्रतिपदेपासून नवमीपर्यंत होत असे. कालांतराने चैत्र व आश्विन ही दोनच नवरात्रे अस्तित्वात राहिली; आणि इतर दोन मागे पडली.

## चैत्र नवरात्राची कथा

दक्षयज्ञाच्या वेळी सतीने आपला देह योगाग्नीने जाळून घेतला हे आपणाला माहीतच आहे. त्यानंतर त्रिपुरासुर, नरकासुर ह्या दैत्यांच्या नाशासाठी आदिशक्तीला भूतलावर अवतार घ्यावयाचा होता. त्यासाठी तिने हिमवानाची पत्नी मेनावती हिला प्रेरणा दिली व तिच्या पोटी जन्म घेण्याचे तिने ठरविले. त्याप्रमाणे सती योगाग्नीने नष्ट झाल्यावर मेनावतीने सतीची मातीची मूर्ति तयार केली व गंगाकिनारी उग्र तपश्चर्येला प्रारंभ केला. आदिशक्तीने आपल्या उदरी जन्म घ्यावा असा मेनावतीचा हेतु होता. तिची चिकाटी आणि तपश्चर्या पाहून, प्रसन्न होऊन आदिशक्तीने मेनावतीच्या उदरी जन्म घेतला. तो दिवस चैत्र शुद्ध प्रतिपदेचा होता. मेनावतीला मुलगी झाली तिचे नाव पार्वती असे ठेवण्यात आले. हिमवान पर्वताची कन्या पार्वती कशी असावी ? असा प्रश्न सर्वसाधारण माणसाचे मनात सहज उभा राहतो. पण हे कोडे सोपे आहे. कुळाची आडनावे अनेक प्रकारची असतात. रेडे, वाघ, म्हैषी जशी आहेत तसेच दुर्वास ऋषींचे आडनाव पर्वत असल्याचा उल्लेख मिळतो. आजही पर्वत, पवते आडनावे आहेत. मग हिमवान नावाचा, पर्वत आडनाव असलेल्याच्या पोटी पार्वतीचा जन्म झाला असे म्हटले तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही.

सप्तशति ग्रंथामध्ये दिलेली कथा— प्राचीन काळी राजा सुरथ हा राज्य करीत असता त्याच्या प्रधानाने त्याला पदभ्रष्ट केले आणि त्याची सर्व संपत्ति हरण केली. मोठया शिताफीने आपला जीव बचावून अत्यंत विपन्नावस्थेत हिंडत हिंडत तो सुरथ राजा मेधाऋषींच्या आश्रमात आला. त्याच आश्रमात थोड्याच काळात समाधि नामक एक वैश्यही येऊन पोहोचला. त्याच्याही बायकामुलांनी त्याचे सर्वस्व हरण करून त्यालाही घराबाहेर काढले होते. समदु:खी अशा त्या दोघांनी मेधाऋषीला आपला सर्व दु:खद वृत्तान्त निवेदन केला व त्या ऋषींनाच योग्य ती उपाययोजना करण्याची नम्रपणाने प्रार्थना केली. त्या मुनिवर्यांनी त्या दोघा दु:खितांना असा उपदेश केला की, "परमदयाळु जगन्मातेची मृण्मय मूर्ति तयार करून तिची सर्वभावे आराधना करावी म्हणजे ती माता प्रसन्न होऊन तुमचे संकट निवारण करील." ऋषिश्रेष्ठांच्या उपदेशाप्रमाणे सुरथ व समाधि ह्या दोघांनी त्या महन्मंगल यशोदायी जगन्मातेची एकाग्र चित्ताने व तहान भुकेची पर्वा न करता अत्यंत कठोर अशी तपश्चर्या केली. त्याने जगन्माता प्रसन्न होऊन ती साक्षात् प्रगट झाली आणि त्या दोघांना इप्सित वर मिळाला. ही समग्र कथा सप्तशतीच्या अखेरच्या अध्यायामध्ये दिलेली आहे. हीच महामयी देवी म्हणून प्रसिद्ध आहे.

ह्या देवीच्या प्रसादानेच सुरथ राजाने आपले राज्यपद परत प्राप्त करून घेतले, म्हणून त्याने चैत्र महिन्यात पार्वतीच्या जन्मदिवशी जन्मदिनानिमित्त नवरात्र महोत्सव चालू केला, व त्याचा मोठया घडाडीने प्रसारही केला. अनेक शतके हे नवरात्र फार गाजले. परंतु पुढे श्रीरामचंद्राने रावणाचा वध आश्विन शुद्ध दशमीस केला, म्हणून त्याच्या स्मरणार्थ हा चैत्र महिन्यातील नवरात्रोत्सव आश्विन महिन्यात सुरू झाला. त्यालाच 'शारदीय नवरात्र' असे म्हणतात.

मुख्य उत्सव जरी पुढे आश्विनात सुरू झाला तरी अद्यापही 'चैत्र गौरीचे' नवरात्र थोड्याफार प्रमाणात सर्वत्र साजरे केले जाते. त्याची एक दोन उदाहरणे अशी. (१) महाराष्ट्रात चैत्र-गौरीचा समारंभ 'हळदी कुंकू' ह्या नावाखाली केला जातो. ह्यासाठी एक महिन्याचा कालावधी दिला आहे. वैशाख शु० ३ (अक्षय्यतृतीया) पर्यंत हा समारंभ करता येतो. त्या दिवशी स्त्रियांना निमंत्रण देऊन त्यांना हळद-कुंकू, देवीचा प्रसाद व वाण म्हणून रोजच्या उपयोगातील काही वस्तु दिल्या जातात. आलेल्या सुवासिनींना देवतास्वरूप कल्पून त्यांची ओटी भरून त्यांना नमस्कार केला जातो. ज्या घरी हा समारंभ असतो तेथे चैत्रगौर मांडली जाते. गौरीचे प्रतीक म्हणून एखादा मुखवटा मांडतात आणि त्याला वस्त्रालंकारांनी व आनुषंगिक आकर्षक सजावटीने सजवितात.

हा देखावा मोठा प्रेक्षणीय असतो. आजकाल अशा समारंभाचा उपयोग स्नेहसमेलनासारखा होतो

( २ ) राजस्थानमध्ये चैत्र गौरीच्या पूजेला ' गणगौर ' असे म्हणतात. तीन व चार फूट उंचीच्या सुंदर मूर्ति बनवितात. त्या मूर्तींना राजस्थानी स्त्रीवेष चढवून त्या अलंकारानी मंडित करतात त्यानंतर राजस्थानी महिला ह्या गौरी मस्तकावर धारण करून, नऊ दिवस गावातील प्रमुख मार्गावरून त्याची मिरवणूक काढतात नवव्या दिवशी जमातीचा पुरोहित त्या मूर्तीची पूजा करतो सायंकाळी त्या सर्व मूर्तींना एका जलाशयाच्या काठावर एकत्र जमा करतात. त्यानंतर सजविलेल्या नावांमधून त्याची मोठी प्रेक्षणीय मिरवणूक काढली जाते त्या वेळी वाद्यांचा गजर चालू असतो व त्या तालावर त्या नावातून नृत्यही चालू असते जलाशयाच्या काठावर अनेक नागरिक हा सोहळा पाहण्यास उपस्थित असतात सायंकाळपर्यंत अशा तऱ्हेने मिरवणुकीचा सोहळा संपवून त्या मूर्ति जलाशयात विसर्जित करतात ( अमृत, मे १९६२ ).

( ३ ) बिहारमध्ये चैत्रगौरीच्या पूजनासाठी देवालयामधील जागा शेणमातीने सारवून पवित्र करतात मातीच्या कलशामध्ये पाणी भरून त्यावर आंब्याचा टाळा खोचून त्यावर मातीचेच झाकण ठेवतात कलशामध्ये साळी अगर सातु ह्या धान्याचे दाणे टाकून त्याचे तोंड पिवळ्या फडक्याने बांधतात त्यानंतर कुलोपाध्याय त्या कलशाचे शास्त्रोक्त अर्चन करतो व नंतर दर्भाने कलशावर जलसिंचन करून देवीचे आवाहन करतो देवी त्या कलशामध्ये आल्याची खूण म्हणून त्या कलशावर कुंकु उधळले जाते त्या दिवशी फलाहार करून उपाध्याय व्रतस्थ राहतो आठव्या दिवशी देवीसमोर होम हवन करून भस्म आणि कुंकु यजमानाला प्रसाद म्हणून देण्यात येतो ह्याप्रमाणे चैत्रगौरीची नवरात्रामध्ये पूजा केल्याने यजमानावर देवीची कृपा राहते अशी त्यांची नितांत श्रद्धा आहे

( ४ ) दक्षिण भारतामध्ये बंगळूर या शहरी हा उत्सव एका वैशिष्ट्यपूर्ण रीतीने साजरा केला जातो, आणि म्हणून तो या ठिकाणी देत आहे. हे शहर सन १५३७ साली केंपगौडा नावाच्या सेनानायकाने वसविले त्यानेच त्या वेळी एक धर्मराजाचे मंदिर उभारले, आणि हा उत्सव सुरू चालू केला पुढे म्हैसूर संस्थानाधिपति कृष्णराज वडेयार ( तिसरा ) याने या उत्सवाला सामाजिक स्वरूप भव्य प्रमाणात दिले आणि सन १८११ पासून " करगा " या नावाने हा उत्सव चालू आहे त्याने या उत्सवाला राजसहाय्यही देण्याचा प्रघात ठेविला आहे. या उत्सवाचा हेतु म्हणून असा सांगितला जातो की, विश्वाच्या निर्मितीस कारणीभूत

दरलेली जी आदिशक्ति तिला मानवाची कृतज्ञता अर्पण करण्याची प्रमुख भावना यामध्ये अंतर्भूत आहे.

चैत्र शु० सप्तमीच्या दिवशी चंद्रोदयावर या उत्सवाचा प्रारंभ होतो. ४५ फूट उचीचे ध्वजारोहण होते आणि अग्रभागी पीतवस्त्रे फडकतात. त्यानंतर रथ सजविणे, सप्त प्राकाराची पूजा, दिशावंदन इ० विधी करून प्रत्येक दिशांना भाताचा बळी देतात. दशदिशांना देवींच्या आगमनाची वार्ता कळविली जाते.

या धर्मराजमंदिराचा पुजारी उत्सवपूर्व आठ दिवस संपूर्ण उपोषण करतो आणि व्रतस्थपणे राहतो. चैत्र पौर्णिमेला रात्री १२ वाजता तो आपल्या पत्नीच्या अंगावरील सर्व स्त्री अलंकार मंगळसूत्रासह उतरून घेऊन आपल्या अंगावर चढवितो. हा पोषाख तो चढवीत असताना, देवालयाबाहेर शेकडो तरुणभक्त, हातातील नग्न्या तरवारींनी स्वतःची छाती बडवून घेत असतात. हे उघड्या छातीवर तरवारींचे घाव बसण्याचे दृश्य, पाहणारास भोवळ आणल्याशिवाय राहत नाही, इतके ते भयानक असते. तथापि देवींची कृपा अशी की, ती तरवारींची टोके उघड्या छाताडावर आघात करीत असताना रक्ताचा एक टिपूसही निघत नाही.

स्त्रीवेषांतर झाल्यावर तो पुजारी बाहेर येतो आणि आपल्या मस्तकावर मोगऱ्याच्या फुलांनी अलंकृत असे तीन मातीचे घडे एकावरएकप्रमाणे धारण करतो. हातामध्ये भलीमोठी काठी घेऊन, बंगलोर शहरातील प्राचीन जुन्या विभागातून एकसारखा धावत सुटतो रात्रभर सर्व रस्त्यावर याप्रमाणे फिरत राहून सूर्योदयापूर्वी मंदिरात परत येतो. रस्त्यावरून तो पळत असताना आणखी एक भयानक दृश्य पहावयास मिळते. त्या पुजाऱ्याच्या मागे शेकडो तरुण हातात नग्न तरवारी व मशाली घेऊन धावत असतात. या धावण्याचे प्रयोजन असे सांगितले जाते की, पुजाऱ्याच्या मस्तकावरील त्या पुष्पालंकृत घटांपैकी एकही घडा तोल गेल्यामुळे जर खाली पडला तर या तरवारधारींनी त्या पुजाऱ्याचे मस्तक तायडतोब उडवावयाचे असते. पण दैवी सामर्थ्य व आजवर अनेक वर्षांच्या साक्षात्कारांची प्रचीती अशी की, एकदाही असा घडा पडल्याचे उदाहरण नाही. तोल सांभाळण्यात पुजारी कितीही वाकबगार असला तरी रात्रभर धावत असता व रस्तोरस्ती अनेक वळणांवरून फिरत असता असे काही घडत नाही, हाच देवीचा साक्षात्कार मानला जातो.

आदिशक्तिस्वरूप हा पुजारी धावत असताना असंख्य भाविक लोक खणा-नारळांनी, फळा-फुलांनी, सोन्या-नाण्यांनी तिची ओटी भरीत असतात. परंतु ती गतिमान असल्याने, सर्व काही स्वीकारणे तिला शक्य होत नसल्याने,

त्या दानाला ती केवळ हस्तस्पर्श करून पुढे निघून जाते. भाविकांच्या भावना उचंबळून आणणारे हे दृश्य असते. परंतु यालाही एक अपवाद आहे, आणि तोही इस्लाम धर्मीयांचा. ही गतिमान आदिशक्ति "मालानसाबी" दर्गा या ठिकाणी आल्यावर मात्र क्षणभर थांबते. या हिंदु देवतेचे आगमन होताच, दर्ग्याचा मुसलमान मौलवी आपल्या धर्मानुसार तिची पूजा करतो, धूप जाळतो आणि जातीभेद न मानणारी ही देवता त्याचा स्वीकारही करते, मौलवीला स्वहस्ते प्रसाद देते आणि पुन्हा गतिमान होते. गेली २५० वर्षे ही प्रथा चालू आहे. मग ही देवता आपले पति पांडव यांना भेटण्यास मंदिराकडे जाते, आणि उत्सवमूर्ति पांडवमूर्ति तिचे स्वागत तेथे करतात. हा कार्यक्रम आटोपल्यावर मिरवणूक स्वस्थानी जाते.

दुसऱ्या दिवशी सजविलेल्या रथातून त्या शक्तीची मिरवणूक गावातून मिरविल्यावर सोहळा समाप्त होतो. ही शक्ति म्हणजे पांडवांची धर्मपत्नी द्रौपदी-स्वरूप समजतात, आणि १०० दुष्ट कौरवशक्तींचा नाश तिने केला असे मानतात द्रौपदीचा जन्म हा यज्ञकुंडातून झालेला असून ती अयोनीसंभवा आदिशक्ति मानली जाते

या उत्सवाप्रीत्यर्थ बंगलोर शहरी लाखो लोक जमा होतात. शहरातील १०–१२ लक्ष आणि आसपासचे २५–३० लक्ष लोक हा सोहळा पाहतात असा अंदाज करता येतो रात्रभर जादा आगगाड्या धावत असतात, हजारो मोटार-बसेसनी रस्ते फुलून जातात, हॉटेले, सिनेमा व इतर वहाने रात्रभर लाखो रुपयांची उलाढाल करतात आणि सर्वत्र गजबजाट असतो असे सांगतात की, नुसत्या मोटार-बसचे उत्पन्न एक लाखाचे असते आदिशक्तीचा चैत्रातील एक सोहळा हा अपूर्वच म्हणावयाला पाहिजे. देवता आपला साक्षात्कार आजही घडवितात, हाच याचा अर्थ होय (केसरी, पुणे, दि. १८–४–१९६३)

दक्षिणभारतात चनेनदवर नावाची एक ग्रामदेवता आहे. तिची वार्षिक यात्रा चैत्र महिन्यात भरते त्या वेळी पद्याची जातीतील पुरुष, स्त्रीचा वेष धारण करून उत्सवात भाग घेतो उसने घेतलेले स्त्रियांचे गळ्यातील मंगळसूत्र, सायंकाळी तो परत करतो आणि पुन्हा पुरुष वेषाचे कपडे अंगावर चढवितो.

दक्षिणप्रांती अनेक ठिकाणी द्रौपदीसह पांडवांची मंदिरे आहेत. महाबळी पुरम् या गावी रथाकार स्थापत्य यासवंधी प्रसिद्ध आहे. या ठिकाणी पाषाणात कोरलेले त्याचे रथ आहेत. द्रौपदीसह पांडवांची पूजा विशेषकरून करगा पल्लव राजाचे कारकीर्दीमध्ये चालू झालेला आहे. कैंपगौडा याने तो उत्सव कर्नाटकप्रांती चालू केला उत्सव चालू करण्यापूर्वी, पल्लव राज्यातून, अग्नीकुळातील काही

क्षत्रिय आपले राज्यात आणून बसविले, आणि धर्मराजमंदिर तयार झाल्यावर, तेथील पूजापाठ व करगा महोत्सवाची जबाबदारी त्यांच्यावर सोपविली

देवीच्या शरद्‌ऋतूतील उत्सवाची माहिती 'कालिकापुराणात' विस्तृत स्वरूपाने वर्णन केलेली आहे हे पुराण इ. स. १० व्या शतकात निर्माण झाले असे म्हणतात यामध्ये ९३ अध्याय आणि ९००० श्लोक असून शिवपत्नी अंबिका, हीच गिरिजा, काळी, भद्रकाळी, महामाया, कामाख्या, पार्वती, त्रिपुरा, ताम्रेश्वरी, उग्रतारा इत्यादि रूपाने भूतलावर कशी वावरते याचे विवरण केलेले आहे या पुराणात भिन्न भिन्न मूर्तींचे तपशीलवार जे वर्णन केलेले आहे, ते इतर मूर्तिकला ग्रंथापेक्षा थोडे निराळे वाटते याचे कारण असे संभवते की, ग्रंथकाराने निरनिराळी प्रादेशिक स्वरूपे व त्यामध्ये कालमानाप्रमाणे झालेली स्थित्यंतरे, याची समक्ष पाहणी करून ते वर्णन केले असावे

नवरात्रपूजेमध्ये पशुबळी व नरबळी देण्याची प्रथा रूढ होती महाअष्टमी आणि नवमीचे दिवशी यथाविधि पूजन झाल्यावर, दहाव्या दिवशी देवीचे विसर्जन होई, आणि या उत्सवाला शबरोत्सव नाव होते उत्सवसमाप्तीनंतर उच्छृंखळ आणि अश्लील वर्तन म्हणजे प्रियाराधनयुक्त व कामोत्तेजक खेळ, वेश्या, नर्तकी आणि स्त्रिया यांजबरोबर सवाद्य रतिक्रीडा इ० वर्णन आढळते

शारदीय नवरात्र हे शाक्तपंथीय मानले जाते शाक्तपंथीय व इतरही देवभक्त हे नवरात्र फार मोठ्या प्रमाणावर भारतात सर्वत्र साजरे करतात शारदीय म्हणण्याचे कारण इतकेच की, हे शरद् ऋतूच्या प्रारंभी येते पृथ्वी-धरणीमाता धनधान्याने समृद्ध झालेली असते हवा पाणी उत्तम असत, आणि एकंदरीत नैसर्गिक वातावरण फार सुप्रसन्न असते अशा ह्या सुमंगल प्रसंगी आई जगदंबा आपल्या नैसर्गिक स्वरूपात फारच प्रसन्न दिसते ती त्या प्रसन्न वातावरणात आपल्या निस्सीम व प्रिय भक्तांना भेट देते अशी भाविकाची श्रद्धा आहे ह्या काळात देवीचे मुखमंडळ प्रखर तेजाने उजळलेले दिसते असा अनेक भक्तांचा अनुभव आहे तसाच तो लेखकाचाही आहे ह्या काळातील देवीची मुद्रा विजयी भासते पूर्वीच्या ऋषि-मुनींनी बलसवर्धनार्थ हेच शारदीय नवरात्र पसंत केले असावे असे वाटते काही ठिकाणी 'दुर्गापूजा' म्हणून हा उत्सव करतात

कलश घेऊन त्याला हळदी कुंकवाने रंगवितात. त्यामध्ये धान्ये अथवा प्रत्येकाच्या रूढीप्रमाणे आंब्याचा टाळा त्यात घालून त्यावर पूर्णपात्र ठेवून त्यात देवीची मूर्ति ठेवतात. घटाशेजारी एका पात्रात नऊ प्रकारची धान्ये रुजत घालतात. देवीजवळ अखंड नंदादीप तेवत ठेवतात. त्या काळात देवीजवळ सप्तशती (नवचंडी) दुर्गापाठ अगर देवीभागवतादि उत्तम ग्रंथांचे पठण केले जाते. काही ठिकाणी हे पाठ पुरोहितांकडून केले जातात. नऊ दिवस संपूर्ण उपोषण किंवा एकभुक्त राहून हे व्रत करतात. शेवटच्या दिवशी होम-हवन, बलीसमर्पण, ब्राह्मण, सुवासिनी व कुमारिका यांना भोजन व दक्षिणा अर्पण करून ह्या व्रताची सांगता करतात. रूढीप्रमाणे 'महिष बळी' याला ह्या व्रतात प्राधान्य असले तरी त्यात आता कालमानाप्रमाणे सुधारणा होऊन उडिदमिश्रित धान्याचा पुरोडाश धार्मिक वचनानुसार दिला जातो. आश्विन शु० अष्टमीला महातिथि म्हणतात सारांश भारतामध्ये सर्वत्र ह्या नवरात्रामध्ये प्रत्येकाच्या कुलाचाराप्रमाणे कमी अधिक स्वरूपात पूजा-कृत्य घडते

मार्कंडेय पुराणामध्ये सांगितले आहे की, तामसी, क्रूर वृत्तींच्या दुर्जनांचे प्राबल्य जेव्हा भूतलावर वाढते तेव्हा त्या दुर्जनांपासून साधु-सज्जनांचे रक्षण करण्यासाठी देवी अवतार धारण करते, अशी भक्तांची श्रद्धा आहे. प्रत्येक व्यक्तीला जन्मापासूनच स्वतंत्र कार्य नियतीने दिलेले असते. कोणी आचार्य होईल, तर कोणी साधु-संतांचे आदरातिथ्य करण्यात मोठी धन्यता मानील, कोणी कथा पुराण श्रवण करील तर कोणी कुवतीप्रमाणे समाजकार्य, राष्ट्रकार्य अगर देवकार्य करील, तर कोणी आपल्या विशुद्ध आचरणाने इतरांना आदर्श होऊन राहील इ० इ० प्रत्येक स्वतंत्र कार्यास निष्ठा असे म्हणतात. अशा निष्ठा एकूण २४ आहेत. साधु-संतांच्या बाबतीत त्यांना एकापेक्षा अधिक निष्ठा असू शकतात स्वीकृत कार्यात जर आत्यंतिक निष्ठा असेल तरच ते १०० टक्के यशस्वी होते, असा लेखकाचा व अनेकांचा ह्याबाबतीत अनुभव आहे

नवरात्रातील नऊ दिवस विधिपूर्वक देवीची षोडशोपचारे पूजा करून पूर्णाहुति दिल्यावर पूजक (यजमान, भक्त) देवीच्या कर्तृत्वाची मंगलमय स्तोत्रे गातो व तिच्याकडून स्वतःच्या संरक्षणाची अपेक्षा करून त्याप्रमाणे मागणे मागतो देवी त्या वेळी आपल्या प्रिय भक्ताला आशीर्वाद देते "मी तुमच्या रक्षणासाठी सदैव सिद्ध आहे संकटकाळी मला अनन्यभावाने शरण येताच मी तत्काळ प्रकट होऊन तुमचे दु:ख निवारण करीन. मी सदैव प्रसन्न रहावे असे ज्याला वाटत असेल त्याने शारदीय नवरात्र यथासांग आचरावे माझ्यावर संपूर्ण निष्ठा ठेवून जे वागतील त्यांच्या मुलाची मी सदैव काळजी वाहीन."

## विजयादशमी–दसरा

नवरात्र संपल्यावर दहावा दिवस ' विजयादशमी ' ह्या नावाने पाळला जातो. ह्या दिवशी सर्वत्र फार मोठ्या प्रमाणावर उत्सव साजरा केला जातो. धर्मशास्त्रदृष्ट्या साडेतीन मुहूर्तांपैकी ' दसरा ' हा एक मुहूर्त असल्याने कोणत्याही शुभ-मंगल कार्यास ह्या दिवशी प्रारंभ करता येतो. मराठे सैनिक ह्याच दिवशी मुलूखगिरीचे प्रस्थान ठेवीत व युद्धात अभूतपूर्व असा पराक्रम करून विजय संपादन करून स्वगृही परतत असत. ह्या दिवशी सायंकाळी देवीची मिरवणूक वाजत-गाजत हमरस्त्यावरून मिरवत मिरवत गावाबाहेरच्या शमीच्या झाडापर्यंत नेतात. नंतर तेथे त्या शमीवृक्षाची पूजा होते; आणि नंतर शमीची पाने, जमलेली सर्व मंडळी आप-आपसात प्रेम-भेट म्हणून वाटतात. पांडवांनी अज्ञातवासाच्या काळात आपली सर्व शस्त्रास्त्रे ह्याच शमीवृक्षावर लपवून ठेवली होती; म्हणून हा वृक्ष अनन्यसाधारण पूज्य मानला गेला आहे.

शमीची पाने पवित्र असण्याचे आणखी एक कारण सांगतात. फार प्राचीन काळची ही गोष्ट आहे. वरतन्तु ऋषींचा कौत्स नावाचा एक शिष्य होता. कौत्साने आपल्या पूज्य गुरुजींकडून चौदा विद्या आत्मसात केल्या. आपल्या शिष्याचे अध्ययन यथासांग पूर्ण झालेले पाहून वरतन्तु मुनींनी त्याला निरोप देण्याचा बेत केला. परंतु कौत्साने आश्रम सोडून जाण्यापूर्वी आपल्या विद्याधन देणाऱ्या गुरुजींना काही गुरुदक्षिणा देण्याचा संकल्प केला. त्याप्रमाणे कौत्साने आपली ही मनीषा गुरुजींच्या कानावर घालून गुरुदक्षिणा किती व कोणत्या स्वरूपात द्यावी ह्याची त्यांच्याकडे पृच्छा केली. कौत्साकडून गुरुदक्षिणा घेण्यास त्यांनी स्पष्टच नकार दिला. शेवटी कौत्साच्या अतिशय आग्रहामुळे रागावूनच वरतन्तु ऋषी म्हणाले, " कौत्सा, तू जितक्या विद्या माझ्याजवळ शिकलास तितक्या कोटी मोहरा मला गुरुदक्षिणा म्हणून दे. "

खजिन्यात सुवर्णमोहारांची अतिवृष्टि करून त्याचा खजिना अगदी भरून टाकला. काहींच्या मते ही धनवृष्टि शमीच्या वृक्षावर झाली.

आता त्या खजिन्यात १४ कोटींपेक्षा अधिक मोहरा झाल्या होत्या. तो कौत्सही ठरल्याप्रमाणे १४ कोटी मोहरांपेक्षा एकही अधिक मोहोर घेण्यास तयार होईना व रघुराजाही १४ कोटींपेक्षा अधिक धन आपल्या खजिन्यात ठेवण्यास तयार होईना! याचक व दाता दोघेही विलक्षण निरपेक्ष!! अखेर उरलेले खजिन्यातील धन रघूने सर्व नागरिकांकडून लुटविले. ह्या गोष्टीचे संस्मरण म्हणून आपण दसऱ्याच्या दिवशी सोने लुटण्याची प्रथा पाळीत असतो.

शिलगणाचे सोने लुटण्याचा हा समारंभ म्हैसूरमध्ये फार मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो. राज्याधिपति हत्तीवर अंबारीत बसून व इतर सरदारमंडळी आपआपल्या इतमामाप्रमाणे आपल्या सैनिकांसह मिरवणुकीत सामील होत असत. त्या वेळी वाद्यांचा प्रचंड गजर चालत असे. ह्या वेळी असंख्य आबालवृद्ध स्त्री पुरुष नागरिक त्या मिरवणुकीत भाग घेऊन मोठ्या उत्साहाने हा उत्सव अपूर्व पद्धतीने साजरा करीत असत. हा सोहळा पहाण्यासाठी परदेशस्थ पाहुणे मुद्दाम येथे येत असत.

इतरत्र हा सण जरी दशमीला करतात, तरी नागपूरच्या भोसले घराण्यात मात्र हा सण नवमीलाच साजरा करण्याची वहिवाट आहे. भोसले घराण्याचे पूर्वज रघूजीराव भोसले ह्याचे कारण सांगताना असे सांगत की, " आम्ही रणांगणातील योद्धे नसून मूळचे जमीनदार आहोत. आम्ही जमीनदारांनी घोड्या पाळावयाच्या असतात व घोड्याच्या प्रजोत्पादनास मदत करावयाची असते. म्हणून जमीनदारानी नवमीच्या दिवशी घोडीची पूजा करावी व विजयादशमी दिवशी घोड्याची पूजा करावयाची असते. (दमोह जिल्हा गॅझेट, पृ. ५७)

हे शारदीय नवरात्र अनेक ठिकाणी निरनिराळ्या प्रकारांनी साजरे केले जाते. त्यातील काही प्रकार आपण पाहू.

वऱ्हाडमध्ये बुलढाणा भागात ह्या नवरात्राला भवानी नवरात्र म्हणतात नवरात्राचा घट बसविताना मातीच्या घटाऐवजी एका बांबूच्या टोपलीच्या तोंडावर देवीची मूर्ति मांडतात. ह्या मूर्तीला फुलांच्या माळा घालून तिचे पूजन करतात. नंतर ती टोपली पाण्याच्या तांब्यावर ठेवतात. नऊ दिवस अखंड नंदादीप तेवत असतो दसऱ्या दिवशी देवीच्या मूर्तीजवळ एका कुमारिकेला बसवून तिचीही पूजा केली जाते. आठव्या दिवशी डुकराचा बळी देऊन हा समारंभ समाप्त करतात.

वऱ्हाडमधील दिवणी भागात नवरात्रामध्ये 'खेरमाता' देवीची पूजा करतात. नवरात्राच्या पहिल्या दिवशी एका भांड्यात धान्य पेरून त्या धान्याला उत्तमपैकी मोड आले तर त्यावरून त्या वर्षाचे पीक उत्तम येईल असे ते भविष्य करतात.

दक्षिण भागात या नवरात्रामध्ये 'कोल्लू' समारंभ साजरा करतात. कलाप्रवृत्तींना प्रोत्साहन देण्याचे हे पर्व असते. 'कोल्लू' म्हणजे मातीच्या अगर धातूच्या अनेक बाहुल्यांची आरास. वर्षभर जमविलेल्या सर्व तऱ्हेच्या बाहुल्या शृंगारून सजवून त्यांचे प्रदर्शन मांडतात. दिवाळीमध्ये किल्ल्याची सजावट करतात त्याप्रमाणे ह्या प्रदर्शनात सुंदर व आकर्षक सजावट करतात. विविध प्रकारच्या रंगीबेरंगी रांगोळ्या काढून सजावटीच्या मध्यभागी मूर्ति बसवितात. तिची स्थापना एका मंगल कलशावर करून प्रतिदिनी तिला नवनवीन भोग्य पदार्थ अर्पण करतात, आणि गोडधोड खाण्याची आपली पुरातन हौस ह्या निमित्ताने पुरी करतात. 'कोलवू अमर्चिन देवी' म्हणजे "कलारूपाने आविष्कृत झालेल्या व शोभणाऱ्या सरस्वतीच्या दर्शनाला या" असे घरोघरच्या सुवासिनींना निमंत्रण दिले जाते. सुवासिनींची ओटी भरली जाते त्या प्रसंगी घरोघरच्या मुली-बाळी नटून, सजून गडदरंगाच्या साड्या नेसून वेण्यांमध्ये नाना रंगांची फुले घालून त्यांच्याकडून विणगार केला जातो. त्या दिवशी अशा सु लकृत वधूंचे थवेच्या थवे राजमार्गावरून इतस्ततः फिरताना दिसतात त्या वेळी मौज वाटते.

(प. महादेवशास्त्री जोशी. 'विवेक' शके १८८०)

राजस्थानातील रजपूत वंश हा जरी शिवोपासक असला, तरी पण शक्ति-पूजन करीत असे. विशेषतः बौद्धकाळात भारतीयसंस्कृतीचा ऱ्हास झाल्यावर, आणि मुसल्मानी संस्कृतीचे आक्रमण चालू झाल्यावर, त्यांनी शक्तिपूजेकडे विशेष लक्ष दिलेले दिसते. इतकेच नव्हे तर नवरात्र उत्सवसमयी, दुर्गामातेच्या प्रतीका ऐवजी तोफेवर शक्तिदर्शक त्रिशूळ शेंदराने रेखाटून, त्यांचे पूजन प्रचारात आणले. चालुक्य, काकतीय राजांचे वेळी, राजविस्तारासाठी, दक्षिणेवर रजपुतांनी स्वाऱ्या केल्या, आणि त्यानंतरच दक्षिणेकडे शक्तिपूजन वाढीस लागले असावे.

पूजन करतात. समाजात रूढीचे प्राबल्य आजही किती प्रखर आहे, याचेच हे उदाहरण होय. ही रूढी कशी उत्पन्न झाली याचे ते विवरण करू शकले नाहीत.

वसईभागातील वज्रेश्वरी देवी ज्यांची कुलस्वामिनी आहे अशी काही दैवज्ञब्राह्मण घराणी, नवरात्र पूजेच्या वेळी, देवीची अगर घटांची पूजा न करता केवळ फक्त एक लाकडी पाट मांडून, देवीची आकृति काढून, त्यांचे पूजन नऊ दिवस करतात. कुंकू अथवा गंधाने ही आकृति काढण्यात येते. पूजन करणारा उपवास वगैरे विधि इतरांप्रमाणे करतो. याला ते पाटाची पूजा असे म्हणतात

गुजराथ प्रांतात हा उत्सव साजरा केला जातो. काही गुर्जर महिला चतुर्थी व अष्टमीच्या दिवशी उपवास करतात. काही मुली ह्या दिवसात सच्छिद्र मडक्यात दिवा लावून ते मडके मस्तकावर धारण करून घरोघर फिरतात आणि पैसे गोळा करतात. नवरात्रामधील पूजाविधि सामान्यत पुढीलप्रमाणे असतो घरांतील भिंतीवर एक लहानशी जागा पूजेसाठी योजून ती शुभ्र रंगाने पवित्र करतात, आणि त्यावर मध्यभागी शेंदुराचा त्रिशूळ रेखतात. हा त्रिशूळ म्हणजेच दुर्गा देवीची प्रतिमा असे ते समजतात. त्या त्रिशूळाखाली मातीचा ढीग रचून त्यावर गहू व बाजरी पेरतात ह्या ढिगावर, मध्यभागी छिद्र असलेला रंगीत कलश मांडून त्यावर श्रीफल ठेवतात. त्या कलशामध्ये एक दिवा सतत तेवत ठेवतात. खेड्यापाड्यात एकाद्या मोकळ्या मैदानात झाड पुरून त्यावर दिवे टांगून, भोवताली लोक गाणी म्हणत व टाळ्या वाजवीत फेर धरतात ह्या रचनेला गर्बो किंवा गर्बी असे नाव असून त्या वेळी सभोवती फिरून म्हणावयाच्या गीतास 'गर्बा' असे म्हणतात. आठव्या दिवशी बळी समर्पण करून नवव्या दिवशी मातीच्या ढिगाऱ्यावरील गहू व बाजरीच्या रोपांसह आणि कलशावरील देवीसह विसर्जन करतात गुजराथी कोळीसमाजाची अशी समजूत आहे की, ह्या देवीचे विसर्जन सागरजलामध्ये केल्यास सामुद्रीदेवी या समाजांतील पुरुषवर्गाचे सागरावरील जीवन सुखदायी करते

शहरी गुर्जरवधु हा उत्सव खास शामियाना उभारून साजरा करतात. प्रत्येक दिवशी देवीला हार चढविणे हे एक मानाचे लक्षण समजले जाते. पण हा मान फुकट मिळत नाही समारंभाचे चालक ह्या हाराचा लिलाव पुकारतात, आणि सौदेबाजारात होतो त्याप्रमाणे पाच रुपयांवरून चढत्या-वाढत्या श्रेणीने हा लिलाव दोनशे ते तीनशे रुपयांपर्यंत जातो. ही रकम देणारासच हार चढविण्याचा मान मिळतो. या प्रकाराने समारंभाच्या खर्चास मात्र मदत होते

महाराष्ट्रामध्ये पेशव्यांच्या कारकीर्दीमध्ये हा उत्सव कोणत्या प्रकारे साजरा केला जाई, हे पाहण्यासारखे आहे. प्रतिपदेच्या दिवशी पेशवे सरकार स्वतः घट-स्थापन करून अंबेची स्थापना करीत. त्या प्रसंगी ब्रह्मा, विष्णु व महेश आणि यमाई देवी यांचे पूजन होत असे. त्या प्रसंगी जमलेले नागरिक 'देवीचा उदो' बोलून जयजयकार करीत असत.

द्वितीया — रेणुकादि चौसष्ट योगिनींची पूजा करून कस्तुरी मळवट भरून उदो करीत.

तृतीया — अंबा अष्टभुजा शिणगार घालून विराजमान होत असे.

चतुर्थी — सरकारवाड्यातील व बाहेरील नागरिकांनी निराहार उपवास करून विश्वव्यापक भवानीला सामुदायिक प्रार्थना करावयाची.

पंचमी — श्रद्धेने देवीचे पूजन करून रात्री सर्वांनी जागरण करावयाचे.

षष्ठी — दिवट्याचा गोंधळ देवीसमोर घालीत. काही वेळा पेशवे सरकार जातीने कवड्याची माळ गळ्यात घालून जोगवा मागत असत.

सप्तमी — सप्तशृंग गडावर पेशव्यांनी जातीने आदिमायेची पूजा बांधावयाची.

अष्टमी — देवी-पूजनाच्या वेळी अष्टभुजा नारायणी देवी 'शेषाद्रि पर्वतावर उभी देखिली' असा देखावा डोळ्यांसमोर उभा करून तिला अनन्यभावे शरण जावयाचे. त्या वेळी भाविकांना देवीचे साक्षात् दर्शन घडे असे सांगितले जाते.

नवमी — होमहवन, अपजाप्य, षोडश पक्वान्नांचा देवीला नैवेद्य, ब्राह्मण-सुवासिनी, कुमारिका भोजन आणि विडा दक्षणा देवून त्यांची बोळवण करून त्यांना संतुष्ट करून पारणे सोडावयाचे.

दशमी — अंबा मिरवणुकीने शिलंगणास जाई, गावाबाहेर शमीपूजन होऊन नंतर सोने लुटण्याचा कार्यक्रम झाल्यानतर अंबा मिरवणुकीने परत येई. राजाश्रयाखाली हे शक्तीचे भव्य पूजन होत असे, म्हणून त्या वेळी महाराष्ट्र वैभवाने तळपत होता.

पराजय न व्हावा, ह्यासाठीच मुख्य देवीच्या बाजूला जया व विजया ह्या देवतांची स्थापना करून त्यांची पूजा केली जाते. ह्या देवतेच्या आवाहनचा मंत्र असा,

जयदे वरदे देवि दशम्यामपराजिते ।
धारयामि भुजे दक्षे यशोलाभाभिवृद्धये ॥ १ ॥

"हे अपराजिते, वरदात्री आणि जयदात्री देवी आज दशमीच्या दिवशी मी तुला उजव्या दंडावर धारण करतो. तू माझ्या यशाची व लाभाची वृद्धि कर." ह्या देवतेचे प्रतीक म्हणून हळदीने पिवळ्या केलेल्या वस्त्रात मोहऱ्या व दूर्वांकुर एकत्र बांधून ती पुरचुंडी दंडावर बांधावयाची, अगर शमीवृक्षाच्या मुळाजवळ ठेवावयाची आणि पूजन करावयाचे. पूजनानंतर देवीजवळ मागणे मागावयाचे ते असे,

हारेण तु विचित्रेण भास्वत्कनकमेखला ।
अपराजिता भद्ररता करोतु विजयं मम ॥

दशमीच्या या देवतेच्या पूजनाचा अर्थच असा की, उत्कर्षाची अनेक क्षेत्रे मी पादाक्रांत करीन, पडलो तरी पुन्हा उठेन आणि पुढे जाईन, पराजय कधीही पाहणार नाही, मानणार नाही. सतत उद्योगी राहून उत्कर्ष गाठीन. हेच अपराजितादेवीच्या पूजनाचे रहस्य होय.

या देवीचे स्वरूप खालीलप्रमाणे वर्णन करतात,

अष्टापदं समारूढा देवी नाम्नाऽपराजिता ।
फलासिखेटहस्ताऽसौ हरिद्वर्णी चतुर्भुजा ॥

भावार्थ असा की, ही कमळावर आरूढ असणारी, चार भुजाची, हातामध्ये मातुलिंग, खड्ग व खेटक धारण करणारी, हरितवर्ण असणारी अपराजिता देवता होय. जैनमताप्रमाणे ही सिंहारूढा असून मातुलिंग, खड्ग, खेटक आणि वरदमुद्रा धारण करणारी आहे दुर्गादेवीचेच हे एक रौद्र स्वरूप असून अनेक असुरांचा नाश या देवीने केलेला आहे. देवीपुराणात सविस्तर वर्णन आढळते.

बौद्धपंथीयही ही देवता मानतात. पण त्याचे स्वरूप अगदीच निराळे आहे. पीतवर्ण, द्विभुज असून गणेशाला पायदळी तुडवीत असताना दिसते, आणि ब्रह्मादि देव हिच्या मस्तकावर छत्र धरतात. भाद्रपद शु० ७ ही अपराजिता-सप्तमी म्हणून व्रत पाळले जाते.

नवरात्रोत्सव कसा रीतीने साजरा होत असे ह्याचे एक वैभवशाली उदाहरण पाहू. सन १३३६ च्या सुमारास दक्षिणेतील मुसलमानी सत्तेची लाट थोपविण्यासाठी हरिहर व बुक्क ह्यांना हाताशी धरून विद्यारण्यस्वामींनी विजयनगर येथे हिंदुसाम्राज्य स्थापन केले व नंतर २५० वर्षे मुसलमानांचे आक्रमण त्यांनी थोपवून धरले. हे साम्राज्य अत्यंत वैभवशाली असून त्या काळात अनेक अप्रतीम मंदिरे व कलापूर्ण गोपुरे बांधली गेली. ह्या बांधणीला विजयनगरकालीन शिल्प असेच नाव दिलेले आहे. हे साम्राज्य त्या काळी अत्यंत भरभराटीत असल्याने अनेक परदेशस्थ प्रवाश्यांनी विजयनगरला भेटी दिल्या असून काहींची प्रवासवर्णने आता उपलब्धही झालेली आहेत. निकोला दि कोंती हा इटालियन प्रवासी सन १४२०, अब्दुल रझाक हा इराणी प्रवासी सन १४४३, दोमिंगो पैस हा पोर्तुगीज प्रवासी व व्यापारी सन १५२०, दुसरा पोर्तुगीज प्रवासी फेर्नांव्ह नुनिझ हा सन १५३५, ह्याप्रमाणे हे प्रवासी आलेले आहेत. त्या वेळी दसरा कसा साजरा होत असे, त्याचे त्यांनी वर्णन केले आहे. त्याचा सारांश असा.

ह्या नवरात्राच्या उत्सवाला तत्कालीन लोक महानवमीचा उत्सव म्हणत असत. ह्या काळात राजा राजधानीत रहात असे. ह्या उत्सवानिमित्त राज्यातील नामवंत कलावंतिणी, मांडलिक राजे, सरदार, दरकदार, मानकरी, कारभारी वगैरे सर्व मंडळी आपआपल्या लवाजम्यानिशी उपस्थित असत. ह्या उत्सवासाठी एका भव्य व प्रशस्त पटांगणात नऊ मंडपांना एक प्रशस्त शामियाना उभारीत असत. त्यापैकी एका मंडपात राजासाठी उच्च सिंहासन तयार होई. ते कल्पनातीत मौल्यवान व आकर्षक असे. सिंहासनमंडपाभोवती पडद्यांचे मंडप फिरते असत. त्यामुळे जरूर ती थाटू प्रेक्षकांसमोर आणणे सुलभ जाई. राजसिंहासनासमोर दुर्गादेवीची स्थापना करण्यात येई. राजा सिंहासनारूढ झाला म्हणजे सुवर्ण चवऱ्यांनी देवीला आणि राजाला वारा घालण्यात येत असे ह्या उत्सवाचे वैशिष्ट्य असे की, नऊही दिवस राजाने उपवास करावयाचा आणि देवीचे पूजन, व शेवटचे झाले म्हणजे मग रात्री पारणे सोडावयाचे

उघळून त्यांची आरती करी. दुसऱ्या मंडपात त्यानंतर होमहवनाचा कार्यक्रम चाले. पूर्णाहुतीचे वेळी पशु बळी देत असत. पहिल्या दिवशी नऊ रेडे, बकरी व बोकड बळी देत. पण पुढे प्रतिदिनी ही संख्या क्रमाने वाढत वाढत शेवटच्या दिवशी तर २४ रेडे व १२५ बकऱ्यांचा बळी पडे. पूर्णाहुती झाल्यावर राजा नंतर पुढील मंडपात जाऊन बसत असे. तेथे जमलेले मांडलिक राजाला नजराणे अर्पण करीत.

तिसऱ्या प्रहरी कलावतींचा कार्यक्रम, नाचगाणे झाल्यावर मल्लांच्या कुस्त्या होत. त्या वेळी आखाड्याभोवती २००/२५० शृंगारलेले हत्ती उभे करीत असत व त्यावर रुईदार डगले घालून माहूत विराजमान झालेले असत. त्यांच्या हाती ढाली, तलवारी, बरच्या दिलेल्या असत. रत्नजडित अलंकारांसह राजा सिंहासनावर बसे. प्रथम काही वेळ नाचगाणे झाल्यावर कुस्त्यांची दंगल चालू होई. राज्याच्या सर्व भागातून मल्ल जमा होत असत. पण त्याशिवाय राजाच्या पदरी १०० मल्ल असत. तेही ह्यात सहभागी होत असत. ह्या कुस्त्या फारच भयंकर स्वरूपाच्या व अटीतटीच्या होत असत. त्यामुळे डोळे फुटणे, दांत पडणे, थोबाड फुटणे, चेहरा विद्रूप होणे इत्यादि प्रकार घडून येत. ते एकमेकाला काटेदार चक्रांनी जखमी करीत. बेकायदा कुस्ती होऊ नये, हार–जीत बरोबर व्हावी आणि योग्य इनामे दिली जावीत ह्यासाठी एक पंचसमिति असे. त्या समितीचा निर्णय निकाली समजण्यात येई. सूर्यास्तापर्यंत कुस्त्यांची ही दंगल चालत असे.

ह्यानंतर मशाली, पोत, दिवे ह्यांच्या प्रकाशात अनेक खेळांचे प्रात्यक्षिक होई. लाकडी घोड्यावर स्वार झालेल्यांची लटकी लढाई, पारध्यांची सोंगे आणून जाळी टाकून आखाड्यातील लोकांना जाळ्यात ओढणे इत्यादि प्रकार झाल्यानंतर दारूकाम व आतषबाजी होई

शेवटच्या दिवशी वरील कार्यक्रम झाल्यावर मिरवणुकीचा अपूर्व सोहळा होई. ह्या वेळी शृंगारलेले रथ, हत्ती, घोडेस्वार व सैनिक राजमार्गाने वाद्यांच्या तालावर चालत जात ह्या मिरवणुकीसाठी लोकांचा उत्साह उतू जात असे. लोक स्वखुषीने राजरस्त्यावर गुढ्या, तोरणे उभारीत. अबदागिऱ्या व सुवर्णाच्या छत्र्या ह्यांनी वेढलेला खाशा स्वारीचा घोडा मिरवणुकीत आघाडीवर असे. मिरवणूक राजवाड्यात परत आली म्हणजे मंदिरातून ब्राह्मणपुरोहित सामोरे जाऊन राजाची पूजा करून त्याला प्रदक्षिणा घालीत. नाना अलंकारांनी नटलेल्या राजस्त्रिया हत्ती, घोडे आदि पशुधनाला ओवाळणी करून प्रदक्षिणा घालीत असा सोहळा व वैभव पाहून जनतेला का आनंद वाटणार नाही ! 'कालाय तस्मै नमः' भारताचे ते वैभव, ती संपत्ति आणि ऐश्वर्य लयाला गेले आहे. राजेशाही संपुष्टात आल्याने लोकराज्यात तसे ऐश्वर्य दिसण्याची शक्यता

नाही. ह्या ऐश्वर्याचा काही अंश म्हैसूरसंस्थानातील दसरा पाहताना दिसून येतो; पण तोही यापुढे बहुधा दिसणार नाही. भारताला हे पूर्वीचे वैभव लाभावे असे वाटत असेल, तर लोकराज्यकर्त्यांनी देवीचे पूजन, यजन करून या उत्सवाचे पुनरुज्जीवन केले पाहिजे, हाच बोध आहे.

सन १५६५ साली मुसलमानांच्या संयुक्त सैन्याने राक्षसतगडीजवळ ह्या घराण्यातील शेवटच्या राजाचा पराभव केला आणि नेहमीच्या विजयोत्साही वृत्तीने राजाचे महाल, मंदिरे ह्यांचा विध्वंस झाला. मूर्ति, पुतळे फोडले गेले. महानवमीचा कार्यक्रम ज्या सिंहासनावर बसून राजा पहात असे, तो चबुतरा, त्यावरील मंडप व शिल्पकाम पार छिन्नविच्छिन्न झाले.

(संजीव देसाई, विवेक, दसरा अंक, शके १८८४)

शारदीय नवरात्र बंगालप्रांती पूजापर्व या नावाने प्रचलित आहे. सांप्रत त्याला समाजोत्सवाचे स्वरूप प्राप्त झालेले आहे. दुर्गापूजा म्हणजेच आनंदाची पर्वणी. शाळा-कचेऱ्यांना देखील त्या वेळी सुट्टी देतात. नवी वस्त्रे, नवे अलंकार ह्या पूजेच्या निमित्ताने खरेदी व्हावयाचेच. खेडोपाडी देखील आनंदाचे वातावरण निर्माण झालेले असते.

सोळा दिवसांचे हे पूजापर्व असते. कुठे घट बसवितात, तर कुठे दुर्गादेवीची दशभुज मृण्मयमूर्ति तयार करून पूजन करतात. काही स्थानी घट व मूर्ति ही दोनही असतात. घटमांडणी ही व्रतासाठी व मूर्ति ही उत्सवासाठी मांडली जाते. दुर्गापूजेच्या विविध पद्धती आहेत. त्यांना 'कल्प' म्हणून संबोधतात. एकूण सात कल्प आहेत. नवम्यादि कल्प हा भाद्रपद वद्य नवमीपासून सुरू होतो. प्रतिपदादि कल्प घटस्थापनादिनापासूनच चालू होतो. ह्याप्रमाणे कमी कमी दिवसांचे दुसरे कल्प आहे. राजा कामाक्षनारायण याने अकबर बादशहाच्या वेळी हा उत्सव बंगाल प्रांती प्रचारात आणलेला आहे.

त्यानंतर त्याच दिवशी ' नवपत्रिका ' पूजन होते. केळी, हळद, जायपत्री, डाळिंब, कचू अशोक, मानव, आणि धान्य यांची रोपे व अंकुर मिळून नवपत्रिका तयार होते. ही पत्रिका अपराजिता वेलीने एकत्र बांधून देवीच्या शेजारी ठेवावयाची आणि त्याचीही पूजा करावयाची.

अष्टमीच्या दिवशी देवीची पूजा दोन वेळा करावयाची असते. सकाळी नित्यपूजा आणि दुसरी अष्टमी आणि नवमी यांच्या संधिकाळी करतात. अशी श्रद्धा आहे की, दक्षयज्ञामध्ये वीरभद्राच्या नेतृत्त्वाखाली भद्रकाली देवीने ह्याच दिवशी कोट्यवधी योगिनींसह अवतार घेतला आणि यज्ञाचा विध्वंस केला, असे हेमाद्रींचे म्हणणे आहे. वास्तव या दिवशी पशुबळी, रात्री जागर आणि कुमारिकांचे पूजन असे विधि सांगितले आहेत. दशमी दिवशी सायकाळी देवीची मृन्मयमूर्ति एकाद्या जलाशयात विसर्जन करतात.

याच वेळी शबरोत्सव साजरा होतो. हा उत्सव म्हणजे प्रायः शिमगा सण होय. धूलिवंदनाचाच हा एक प्रकार म्हटला पाहिजे. हा उत्सव फार प्राचीन आहे. रावणवधाच्या आनंदाप्रीत्यर्थ तो प्रथम शबर जमातीने चालू केला आणि त्या वन्य जमातींची रूढी म्हणून आजही त्या उत्सवात अंगाला झाडाची पाने बांधावयाची, चिखल मासावयाचा आणि दुसऱ्याच्या अंगावर तो उडवावयाचा. हे सर्व करताना अश्लील गाण्याचा उद्घोष करीत सार्वजनिक ठिकाणी नाचावयाचे असे प्रकार चालतात.

दुर्गापूजेच्या अंतर्गत असा आणखी एक उत्सव बंगालमध्ये घरोघर साजरा होतो. ' कलावहु ' हे त्या उत्सवाचे नाव. यामागे कौटुंबिक भावनांचे, वात्सल्याचे पोषण व्हावे हा हेतु आहे. तेथील लोकांची परंपरागत अशी समजूत आहे की, हिमालयाची मुलगी पार्वती, विवाह होऊन कैलास पर्वतावर रहावयास गेल्यावर षष्ठीच्या दिवशी श्रमपरिहारार्थ माहेरी येते तीन दिवस माहेरचा पाहुणचार घेऊन नंतर ती सासरी जाते. याच समजुतीवर सासरी गेलेल्या आपल्या मुली माहेरी आणतात. कलावहु म्हणून केळीचा खुंट सालंकृत उभारतात व त्याखाली देवीची मूर्ति स्थापून शंख, नगारे वगैरे वाद्ये वाजवून तिचे आगमन जाहीर करतात. त्यानंतर देवीची षोडशोपचारे पूजा केल्यावर महानैवेद्य होऊन निमंत्रितांना भोजन दिले जाते. रात्री संगीत, भजन इत्यादि कार्यक्रम करून आदराने पूजन होते. अशा रीतीने गौरविलेली ' कलावहु ' दशमीच्या दिवशी सायंकाळी विसर्जित करतात. त्या वेळी घरातील वातावरण गंभीर असते. मुलगीच प्रत्यक्ष सासरी निघाली आहे अशा भावनेने स्त्रिया निरोप देत असल्याने त्यांचे डोळे ओलावतात. त्या वेळी मूर्तिमंत कारुण्य साकार होते.

आजपर्यंतच्या काही उदाहरणांवरून असा निष्कर्ष काढता येतो की, आमच्या इतिहास-पुराणांत सामान्यतः असे दिसते की, विष्णु असो, शिव असो अथवा राम असो, या सर्व देवाधिदेवानी स्वतः संकटमुक्त होण्यासाठी अनेक वेळा शक्तीची आराधना, पूजा केली आहे. पण उलट शक्तीने मात्र कधीही पुरुषोत्तमाची अगर पुरुषाची आराधना केलेली कोठेही दिसत नाही. ( पं. महादेवशास्त्री जोशी, विवेक, शके १८८० )

उत्सव करण्याकरिता विजयादशमीचा उपयोग करतात, हे आबालवृद्धांना माहीत आहे. शिलंगणाची मिरवणूक आणि दुर्गापूजा याकरिता हा दिवस प्रसिद्ध आहे. पण धन्दाडातील सोनार जमात या दिवसाचा उपयोग एका निराळ्याच रीतीने करते. दसऱ्याच्या आदल्या रात्री ह्या जमातीतील सर्व माणसे एकत्र येतात आणि नदीकाठी भोजन-समारंभ करतात. याच वेळी त्यांचा शपथविधी होतो की, " धंद्यानिमित्त आपल्यापैकी कोणी कितीही भेसळ सोन्याचांदीमध्ये केली तरी त्याचा उच्चार बाहेर करावयाचा नाही. " ही शपथ कोणी मोडल्यास त्याला जातीबाहेर टाकतात.

## देवीच्या मंदिराचे स्थान

भारतामध्ये चंद्रगुप्ताच्या काळात चाणक्य (कौटिल्य) नावाचे एक अत्यंत प्रतापी अर्थशास्त्रज्ञ होऊन गेले. त्यांनी ' दुर्गनिवेश ' हे प्रकरण एका ग्रंथात लिहिले आहे. त्यामध्ये ते लिहितात. " देवीचे मंदिर शहराच्या अगर गावाच्या मध्यभागी असावे. त्यामध्ये चार कोपऱ्याला चार रक्षक देवता स्थापन कराव्यात. मुख्य देवीव्यतिरिक्त अपराजित, अप्रतिहत, जयंत, वैजयंत ( इंद्र ), शिव, वैश्रवण ( कुबेर ), अश्वी, मदिरादेवी यांच्या मूर्ति असाव्यात. मदिरा म्हणजे विधुषी होय. आपस्तंबगृह्यसूत्रामध्ये ईशान, विधुषी व जयंत या देवता मानलेल्या आहेत. हिरण्यकेशीगृह्यसूत्र ( २–३–८ ) यामध्ये सु-लाघव यत्कृति कशी असावी याचे वर्णन केलेले आहे. गुरांचे रोगनिवारार्थ शंकराची प्रार्थना सांगितली आहे. या देवांना प्रार्थना करण्यात येते की, " यज्ञीय पशूंना त्यांनी हात लावावा. " विधुषी व मदिरा जर एकच आहेत असे मानले तर ती शंकराची पार्वती आहे असे समजण्यास हरकत नसावी. कारण शंकराचे एक नाव विधुषा असे आहे. सारांश मदिरा ही दुर्गादेवी-अंबिका-स्वरूपच होय असा अर्थ घ्यावयास प्रत्यवाय नसावा."

( Hindu Iconography by J. N. Bannerji, P. 95 )

## उत्तमोत्तम मंदिर कोणते ?

उत्तमोत्तम मंदिर गणावे असे वाटत असल्यास त्यामध्ये एकूण सात आवारे असली पाहिजेत. प्रत्येक आवारात मुख्य देवतेच्या परिवार-देवतांची स्थापना वैखानसागमोक्त पद्धतीप्रमाणे व्हाययास पाहिजे. या देवतांची एकूण संख्या १४० असून कोणत्या देवता कोठे स्थापन कराव्या याचाही आलेख तयार केलेला आहे. एक एक आवार कमी होत गेल्यास त्या त्या प्रमाणात ते मंदिर कमी दर्जाचे मानले जाते. याप्रमाणे उत्तमोत्तम, मध्यमोत्तम, मध्यम-मध्यम, अधमोत्तम, अधमाधम अशी मंदिरांची प्रतवारी लावली जाते. असे जरी असले, तरी कोणत्या देवतांची स्थापना कोणत्या आवारात केलेली आहे, यावरून त्याच्या प्रतवारीत फरक पडतो. असे मंदिर भारतामध्ये एकच एक आहे. ते म्हणजे श्रीरंगम् येथील रंगनाथाचे देवालय होय. हे मंदिर श्रीरामानुजाचार्यांनी उभारले असे सांगतात. रामानुजाचार्य पूर्वी वैखानसमार्गी होते. पण त्यांनी हे मंदिर पंचरात्र आगमाप्रमाणे बांधले असल्यामुळे वैखानस आगमाप्रमाणे आवारातील मूर्तीची स्थापना न करता त्याऐवजी अनेक आचार्यांच्या मूर्ति बसविण्यात आलेल्या आहेत.

(Hindu Iconography by Gopinath Rao, Appendix P. 3-4)

मीनाक्षी, कामाक्षी, कन्याकुमारी व रामेश्वर इ. दक्षिणेतील जी नामांकित मंदिरे आहेत त्यांची आवारे मोठी का बांधली आहेत आणि मुख्य देवतेपर्यंत पोहोचण्यापूर्वी अनेक प्राकारांतून प्रवेश का करावा लागतो याची कल्पना वरील विवेचनावरून येईल. मथुरा-वृंदावनामध्ये अशी तीन तीन, चार चार आवारांची काही मंदिरे लेखकाने पाहिली आहेत. आपली संस्कृति मलाया, सिंगापूरकडेही गेली असल्याने तेथेही जावामध्ये डिआंग पठाराचे माथ्यावर अशा धर्तीचे बांधलेले एक देवालय आढळून आले आहे.

मुख्य देवतांच्या चारी कोपऱ्यात रक्षक-देवता असाव्या असे जे वर सांगितलेले आहे त्याचा अनुभव खेडोपाडी पहावयास मिळतो. गावाच्या चारी दिशेला रक्षक-देवताची स्थापना करतात. आणि वर्षातून एक वेळ तरी पूजा-अर्चा केली जाते. या रक्षक देवतांमध्ये स्त्री व पुरुष अशा मिश्र देवतांची नावे आढळतात. काही ठिकाणी अशा स्त्री देवतेला ‘ गावदेवी ’ या नावाने संबोधिले जाते. सध्या लेखक ज्या गावी वस्ती करून आहे त्या पहाडी गावात पूर्वेला लीलावती, पश्चिमेला चंपावती, दक्षिणेला मायावती, उत्तरेला भोगावती या नांवाची चार स्थाने आढळून येतात.

सांप्रत कालमानाप्रमाणे एवढ्या भव्य प्रकारची मंदिरे बांधण्यास परवडत नाही. शिवाय मोकळी जागाही आजकाल उपलब्ध होऊ शकत नाही. तेव्हा जे लहान-मोठे मंदिर उपलब्ध असेल तेच उत्तमोत्तम मंदिर समजून त्याची सेवा केली पाहिजे.

## देवतांची नामोत्पत्ति

आर्यांच्या प्रसरणकाली त्याना अनेक वन्य जमातींबरोबर झगडे करावे लागले. आर्यांची वस्ती पंजाब प्रांती झाली त्या वेळी इतर भागात अनार्यांची वस्ती होती. ( अ ) माहिष असे नाव असलेली एक जमात विंध्यपर्वताच्या दक्षिणेस व सह्याद्रिपर्वताच्या उत्तरेस पूर्व भागात विशेष प्रसिद्ध होती. त्यांची सत्ता दक्षिणेस दूरवर पसरलेली होती. तुंगभद्रा नदीच्या दक्षिणेस माहिष्मती ( आजचे म्हैसूर ) नगरी होती. ती याच माहिष जनांनी वसविली असावी असे नावावरून व एकंदर भौगोलिक परिस्थितीवरून अनुमान काढता येते. थोडा ही माहिषपूजक वन्यजमात आजही या भागात आपणांस दिसून येते. या जमाती-मधील काही शाखा, वृक्षांना किंवा प्राण्यांना आपली दैवते मानीत, आणि अशी दैवते पूजणाऱ्या त्या त्या शाखांना त्यावरून नाव मिळत असे. जसे काकपूजक ते काक, गृध्रपूजक ते गृध्र, माहिषपूजक ते माहिष इत्यादि. प्रभु रामचंद्र दक्षिणेत आल्यावर त्याना काक गृध्र जमातींचे पुढारी ( जटायू ) भेटले होते, असा उल्लेख आढळतो. राज्यकारभार हाती असता ते उन्मत्त झाले, जनतेचा छळवाद वाढला तेव्हा तेथील सुबुद्ध लोकांनी आर्यांकडे तक्रारी नेल्या व त्यांच्या-कडे मदतीची याचना केली. त्यानंतर आर्यांच्या एकाद्या शाखेने त्या जमातीतील दुष्ट शत्रूंचा नीमोड केला असला पाहिजे. ज्या दुष्ट शत्रूंचा नाश आर्यांनी केला व आपले वर्चस्व प्रस्थापित केले त्या आर्यशक्तीला त्यांनी माहिष असुर-मर्दिनी हे बिरुद जोडले. एवढ्या मोठ्या जमातीचे निर्दालन दोन हातांनी करणे अशक्य म्हणून त्या देवतेला चार, आठ, अठरा, किंबहुना १०८ हात कल्पिले ( विंध्यप्रदेशात १०८ हातांची देवीची मूर्ति हल्ली सापडली आहे ) आणि तेच पुढे देवीचे स्वरूप रंगवितांना रूढ झाले.

( आ ) कोल ही दुसरी जमात सह्याद्रीच्या पूर्वेकडे कोल्हापूर-सातारा भागात वस्ती करून होती. ते डुकराची शिकार करताना मोठा कल्लोळ करीत, आरडाओरडा करीत. कोलाहल शब्दाचा हा अपभ्रंश आहे. कोलापूर हे शहर त्यांनीच वसविले. हजारो वर्षांपूर्वीची ही गोष्ट आहे. त्या वेळी या शहरात अनेक जलसरोवरे होती. महिषाचा विध्वंस केल्यावर आर्यांनी या जमातीचे उच्चाटन केले. ज्या देवीच्या कृपेने ते विजय पावले तिचे नाव त्यांनी ' कोलासुर-

भयकारी ' असे ठेवले. या जमातीचा शेष म्हणून की काय आजही रानडुकराची शिकार करताना चारी बाजूनी शिकारी आधी रान उठवतात, आरडाओरडा करतात.

( ६ ) बंगालच्या दक्षिण भागी व विंध्याद्रीच्या पूर्वेस ( बिहार ओरिसा प्रांती ? ) चंड-मुंड या जमातीची वस्ती होती. ज्यांना सांप्रत चांडाळ किंवा मातंग म्हणून संबोधिले जाते, ते याच जातीचे वंशज असावेत मुंड ही वन्य जमात आजही अस्तित्वात आहे. त्यांचे वर्णन पूर्वीच्या ऑस्ट्रिक वंशियासारखे असल्याने ते अधिक प्रकर्षाने उठून दिसतात. या जमातीतील स्त्रीवर्गाला कण्हेरीची लाल फुले फार प्रिय असल्याने ' चंडात ' हे नाव त्या वेलीलाच दिलेले अमरकोशामध्ये दिसून येईल. ते आपला कटिभाग कण्हेरीच्या पाना फुलांनी झाकून घेत, म्हणून त्या पर्णवस्त्राला ' चंडातक ' हे नाव दिले गेले. आर्यांनी या जमातीच्या म्होरक्याचा बीमोड केला. ज्या शक्तीने बीमोड केला तिला ' चंडिका ' अगर ' चंडमारी ' असे अभिधान प्राप्त झाले वरील विवेचनावरून देवतांच्या नावांची कशी उत्पत्ति झाली त्याची चांगली कल्पना येईल.

तिसरा प्रकार म्हणजे उत्पन्नकर्त्यांच्या नावावरून अभिधान प्राप्त होणे. कात्यायन मुनींनी आपल्या व देवांच्या संयुक्त तेजाने देवी उत्पन्न केली व तिचे नाव कात्यायनी असे ठेवले. कश्यप ऋषींनी मनानेच कन्या उत्पन्न केली, म्हणून ती ' मनसा ' झाली कुलकुल्या नदीच्या काठी स्थापन झाली म्हणून कुलकुल्या देवी, पद्म सरोवराच्या स्थानी स्थापना झाली म्हणून पद्मावती, देवांनी जपानुष्ठान केल्यावर त्यांना देवीने वरदान दिले म्हणून ती वरदायिनी, युद्धामध्ये शिव ( शंकर ) मग्न असताना त्याचे दूत म्हणून काम केले म्हणून ती शिवदूती, डोंगराची सात शिखरे आहेत अशा ठिकाणी तिची स्थापना केली म्हणून ती सप्तशृंगी, कामासुर मिनासुर ह्यांना तिने ठार केले म्हणून ती कामाक्षी मिनाक्षी तसेच काही पर्वतांच्या व नद्यांच्या नावांवरूनही देवतांना नावे प्राप्त झाली आहेत

देवीच्या काही कृतींवरून तिला नावे प्राप्त झाली आहेत. तो प्रकार असा

हुंकारें मारिले धूम्रलोचनीं । हुंकारेश्वरी नाम आले ॥
निवटिले व्याघ्रासुरासी । व्याघ्रांबरी नाम आले ॥
रक्तबीजाचे प्राशिले रक्त । रक्तदंतिका नाम पावसी ॥
भग राक्षसाचे केलें हनन । भगवती म्हणोनि पूजिती ॥
मातंग राक्षसा मारिसी । मातंग नाम पावसी ॥

अशी अनेक उदाहरणे देता येतील. वरील सर्व विवेचनावरून देवतांनी अनेक नावे कशी प्राप्त झाली त्याची साधारण कल्पना येईल

देवतांचे प्रकार

कुलदेवता, ग्रामदेवता आणि उपास्यदेवता असे साधारणपणे देवतांचे तीन प्रकार मानले जातात. काही समाजसमूहांच्या खास कुलदेवता असतात, समाजाचे अथवा व्यक्तीचे स्थलांतर होत गेले, तरी कुलदेवता बदलत नाहीत. इतकेच नव्हे तर कुलदेवतेच्या नामाभिधानावरून त्या घराण्याचे अथवा समाजाचे मूळचे ठिकाण निश्चित करता येते. उदाहरणार्थ कऱ्हाडे ब्राह्मण समाजातील काही घराण्यांची कुलदेवता "महाळसा–नारायणी" ही आहे. प्रस्तुत लेखकाची हीच कुलस्वामिनी आहे. या देवतेचे सांप्रतचे मुख्य स्थान गोमांतकामध्ये म्हारदोळ या गावी आहे. याचाच अर्थ असा की, या घराण्यातील मूळ पुरुष त्या भागात रहात होते. पण तेथे तरी ही देवता कोठून आली ! नेवासे येथील मोहिनीराज हेच आदि महाळसेचे रूप होय.

आठव्या शतकात राष्ट्रकूटवंशीय राजा ध्रुव याचे सैन्यात म्हाळ पै नावाचा ऋग्वेदी अश्वलायन शाखेचा कौशिक गोत्री ब्राह्मण नोकरीला होता. सेनापतीपदापर्यंत त्याची बढती झाली. सेवानिवृत्तीच्या काळी हा गोमांतकामध्ये गेल्यावर त्याने त्या प्रांती म्हाळसादेवीची स्थापना केली. कदंब राजवंशानेही तिला कुलस्वामिनी मानले. याचाच अर्थ असा की, म्हाळ पै हा नेवासे भागातील देवीचा उपासक, आणि त्याने देवता गोमांतकात नेली. गोमांतक भागातून पोर्तुगीजांचे धर्मछळाचे वेळी काही घराणी दक्षिण रत्नागिरी जिल्ह्यात सरकली, आणि स्थायिक झाली, पण कुळदेवता तीच राहिली. आता कोकणातून लेखका-प्रमाणे काही घराणी देशावर आली, काही झांशीच्या राणीचे वेळी सागर, मध्यप्रदे-शात गेली व काही सांप्रत भारतात इतरत्र व्यवसायानिमित्त गेली, तरी कुलस्वामिनी महाळसा–नारायणी हीच कायम आहे. तेव्हा कुलदेवतेच्या नावावरून समाजाची देशांतरे कशी कशी होत गेली याचे मार्गदर्शन होऊ शकते

दुसरा प्रकार ग्रामदेवतांचा. काही भागात एक विशिष्ट देवताच ग्रामदेवता म्हणून मानली जाते, अगर गावक्रमाने ती बदलत जाते, पण कुलदेवता तीच रहाते. गोमांतक भागात भूदेवता हीच ग्रामदेवता मानली जाते आणि ती सातेरी, भूमिका, माऊली, रोहिणी, भवानी, भगवती इत्यादि नावांनी ओळखिली जाते. दक्षिणभारतामध्ये पोयनार व हनुमान या ग्रामदेवता मानल्या जातात. सारांश, ग्रामदेवतेला पण स्थानमहात्म्य आहे.

तिसरा प्रकार उपास्यदेवतांचा. कुलदेवता, ग्रामदेवता यांचे पूजन वरील दोन निरनिराळ्या कारणासाठी होते. पण ह्या दोन्हीही उपास्यदेवता नव्हेत.

भयकारी ' असे ठेवले. या जमातीचा शेष म्हणून की काय आजही रानडुक्कराची शिकार करताना चारी बाजूंनी शिकारी आधी रान उठवतात, आरडाओरडा करतात.

( इ ) बंगालच्या दक्षिण भागी व विंध्याद्रीच्या पूर्वेस ( बिहार ओरिसा प्रांती ! ) चंड-मुंड या जमातीची वस्ती होती. ज्यांना सांप्रत चांडाल किंवा मातंग म्हणून संबोधिले जाते, ते याच जातीचे वंशज असावेत मुंड ही वन्य जमात आजही अस्तित्वात आहे. त्यांचे वर्णन पूर्वीच्या ऑस्ट्रिक वंशियासारखे असल्याने ते अधिक प्रकर्षाने उठून दिसतात. या जमातीतील स्त्रीवर्गाला कण्हेरीची लाल फुले फार प्रिय असल्याने ' चंडात ' हे नाव त्या वेलीलाच दिलेले अमरकोशामध्ये दिसून येईल. ते आपला कटिभाग कण्हेरीच्या पाना-फुलांनी झाकून घेत, म्हणून त्या पर्णवस्त्राला ' चंडातक ' हे नाव दिले गेले. आर्यांनी या जमातीच्या म्होरक्याचा बीमोड केला. ज्या शक्तीने बीमोड केला तिला ' चंडिका ' अगर ' चंडमारी ' असे अभिधान प्राप्त झाले वरील विवेचनावरून देवतांच्या नावाची कशी उत्पत्ति झाली त्याची चांगली कल्पना येईल.

तिसरा प्रकार म्हणजे उत्पन्नकर्त्यांच्या नावावरून अभिधान प्राप्त होणे. कात्यायन मुनींने आपल्या व देवांच्या संयुक्त तेजाने देवी उत्पन्न केली व तिचे नाव कात्यायनी असे ठेवले. कश्यप ऋषींनी मनानेच कन्या उत्पन्न केली, म्हणून ती ' मनसा ' झाली. कुलकुल्या नदीच्या काठी स्थापन झाली म्हणून कुलकुल्या देवी, पद्मा सरोवराच्या स्थानी स्थापना झाली म्हणून पद्मावती, देवांनी जपानुष्ठान केल्यावर त्यांना देवीने वरदान दिले म्हणून ती वरदायिनी, युद्धामध्ये शिव ( शंकर ) मग्न असताना त्याचे दूत म्हणून काम केले म्हणून ती शिवदूती, डोंगराची सात शिखरे आहेत अशा ठिकाणी तिची स्थापना केली म्हणून ती सप्तशृंगी, कामासुर-मिनासुर ह्यांना तिने ठार केले म्हणून ती कामाक्षी मिनाक्षी. तसेच काही पर्वतांच्या व नद्यांच्या नावांवरूनही देवतांना नावे प्राप्त झाली आहेत.

देवीच्या काही कृतींवरून तिला नावे प्राप्त झाली आहेत. तो प्रकार असा.

हुंकारें मारिले धूम्रलोचनीं । हुंकारेश्वरी नाम आले ।।
निवटिलें व्याघ्रासुरासी । व्याघ्रांबरी नाम आले ।।
रक्तबीजाचे प्राशिलें रक्त । रक्तदंतिका नाम पावसी ।।
भग राक्षसाचे केलें हनन । भगवती म्हणोनि पूजिसी ।।
मातंग राक्षसा मारिसी । मातंग नाम पावसी ।।

अशी अनेक उदाहरणे देता येतील. वरील सर्व विवेचनावरून देवतांची अनेक नावे कशी प्रसृत झाली त्याची साधारण कल्पना येईल.

त्याचा भावार्थ असा की, वाहनात बसून अथवा पादुका घालून मंदिरात जाणे; देवाची उत्सवादि सेवा न करणे, उत्थाने अथवा अशौच्याने देवाचे दर्शन घेणे, एकाच हाताने नमस्कार करणे, देवमूर्ति पुढे नुसते हात ओवाळणे; देवासमोर पाय पसरून बसणे, पर्यंकबंध बसणे, खाणे, खोटे बोलणे, मोठयाने व आपसात कुरकुर करणे; रडणे, भांडणे, परनिंदा करणे, परस्तुति करणे, अश्लील भाषा वापरणे, आर्थिक सामर्थ्य असता, गौणउपचार समर्पण करणे, नैवेद्य न दाखविता खाणे, देवाकडे पाठ करून बसणे, देवासमोर दुसऱ्याला नमस्कार करणे इ. हे देवताविषयक अपराध होत. मंदिरात जाणाऱ्यांनी आणि कथाकीर्तन श्रवण करणारांनी वरील अपराध सदैव ध्यानात ठेवले तर दर्शन शांतता लाभेल आणि व्यवस्थापकांना सहकार्य दिल्यासारखे होईल. देवताच्या शुद्ध स्वरूपाचे मनन करता येईल, एकचित्त होईल आणि मंदिरात जाऊन दर्शन घेण्याचे खरेखुरे भाग्य लाभेल. देवताशी एकरूप होता येईल.

## नरबळी

आर्यांच्या प्रसरणकाली ही चाल अस्तित्वात आली असावी. प्रसरणानिमित्त शत्रूबरोबर लढाया कराव्या लागत आणि त्यांमध्ये जय मिळाल्यावर, आनंदोत्सव साजरा करताना ज्या शक्तीच्या कृपेने विजय मिळाला, त्या देवतेलाच शत्रूचे मुंडके अर्पण करावयाचे आणि त्या देवतेला शांत करण्याचा प्रयत्न करावयाचा असा या कृतिमागील हेतु असावा. या कृत्याचे प्रतीक सांप्रत आसामातील वन्य जमातींमध्ये पहावयास मिळते. ताम्रघरातील देवीला मनुष्य बळी दिला जातो, तो दुसऱ्या शत्रुपक्षातील जातीमधील असतो. काही वेळेला त्या व्यक्तीला विकतही घेतात

ही चाल भारतामध्ये फार पुरातन आहे. हरिश्चंद्र राजाचा मुलगा रोहित याने अजीगर्त ब्राह्मणाचा मधला मुलगा शुनःशेप याला १०० गाईस विकत घेतला व यज्ञामध्ये बळी देण्यासाठी वरुण राजाला दिला. एवढ्यावरच भागले नाही प्रत्यक्ष जन्मदाता बाप आणखी १०० गाई मिळाल्यावर त्याची हत्या करण्यास तयार झाला. शेवटी त्याने वरुणाचीच स्तुति केली आणि आपले प्राण वाचविले. नंतर तो आपल्या निष्ठुर पित्याच्या घरी जाण्यास राजी होईना. तेव्हा विश्वामित्राने त्याला आपला पुत्र मानून जवळ केले आणि त्याचे पुत्रवत पालन पोषण केले (ऐ. ब्रा. ७।१३–१८).

स्वयंभू मनूच्या वंशामध्ये ऋषभ नावाचा एक पुरुष होऊन गेला. त्याचा पुत्र भरत नावाचा होता. तो उत्तम ज्ञानी असूनही इतरांना बुद्धिहीन भासत असे, त्यामुळेच त्याला जडभरत हे नाव प्राप्त झाले होते. या वृत्तीमुळे

महाराष्ट्रामध्ये विशेषत. विठ्ठलोपासना अथवा दत्तोपासना जास्त प्रमाणात आहे, तर बंगालप्रांती देवीउपासना जास्त आहे. याव्यतिरिक्त प्रत्येकाचे धर्मसंप्रदाया-प्रमाणे, कोणी रणछोडजी, ठाकूरजीची उपासना करील, तर जैनधर्मीय लिंगाची उपासना करील. कोणाची उपास्यदेवता गणपती असेल, कोणाची शंकर असेल अथवा विष्णुस्वरूप असेल. त्या त्या देवताच्या उपासनेमुळे, त्यांना सौख्य लाभते आणि उत्तम गति प्राप्त होते अशी त्यांची समजूत असते, श्रद्धा असते उपास्य देवतेच्या ठायी परमनिष्ठा असल्याने त्यांना फळ प्राप्त होते.

## देवताचे रंग काळे अथवा पांढरे का?

आपण भारतामधील देवतांकडे पाहिले म्हणजे चौकस दृष्टीला असे शोधावेसे वाटते की, राम जर एक, तर मग मुंबई, ठाकूरद्वार भागांतील काळाराम, गोराराम याप्रमाणे निरनिराळे रंग का? काही ठिकाणी शेंदूर माखून लाल स्वरूप का बनवितात!

या प्रश्नाचे सर्वसाधारण उत्तर असे देता येईल की, ज्या वेळी देवता असुरनाशासाठी अवतार घेतात, जसे दुर्गा व महिषासुर, राम आणि दशमुखी रावण, कृष्ण आणि जरासंधासारखे दुष्ट लोक, ललिता आणि भंडासुर इत्यादि, त्या वेळी या दुष्टांचे नाश-निदर्शक म्हणून मूर्ति काळ्या पाषाणाची बनवितात पण देवाचा अवतार जेव्हा भक्तांच्या पालनासाठी अथवा शुभकार्यासाठी होतो, तेव्हा ते स्वरूप शुभ्र पाषाणाचे बनवितात. लक्ष्मी, सरस्वती, कमला यांच्या मूर्ति बहुधा पांढऱ्या असतात शंकराच्या विवाहासाठी जन्म घेतलेली पार्वती शंकरा-प्रमाणेच गौरवर्ण आहे पण तीच जेव्हा दैत्यनाशासाठी चामुंडा, काली, कराळा बनते, तेव्हा कृष्णवर्ण असते मूर्तीचे रूप उग्र दाखविण्यासाठी ती रक्तपिपासू आहे, हे दाखविण्यासाठी शेंदुरचर्चित असावी अनेक ग्रामदेवता शेंदुरचर्चित असतात. सर्वच मूर्तींच्या ठिकाणी हे विधान लागू होण्यासारखे नाही अपवादात्मक काही निराळी उदाहरणेही मिळतील

(The Shakti or Divine Power by S K Das, Page 63)

## मानवाचे देवताविषयक अपराध कोणते?

यानै र्वा पादुकै र्वापि गमनं भगवद्‌गृहे।
देवोत्सवाद्यसेवा च अप्रणामस्तदग्रत॥

(वराहपुराण, श्लोक ८)

त्यांचा भावार्थ असा की, वाहनात बसून अथवा पादुका घालून मंदिरात जाणे; देवाची उत्सवादि सेवा न करणे; उष्ट्याने अथवा अशौच्याने देवाचे दर्शन घेणे, एकाच हाताने नमस्कार करणे; देवमूर्ति पुढे नुसते हात ओवाळणे; देवासमोर पाय पसरून बसणे; पर्यंकबंध बसणे; खाणे; खोटे बोलणे; मोठ्याने व आपसात कुरबुर करणे; रडणे; भांडणे; परनिंदा करणे; परस्तुति करणे; अश्लील भाषा वापरणे, आर्थिक सामर्थ्य असता, गौणउपचार समर्पण करणे; नैवेद्य न दाखविता खाणे; देवाकडे पाठ करून बसणे; देवासमोर दुसऱ्याला नमस्कार करणे इ. हे देवताविषयक अपराध होत. मंदिरात जाणाऱ्यांनी आणि कथाकीर्तन श्रवण करणारांनी वरील अपराध सदैव ध्यानात ठेवले तर सर्वत्र शांतता लाभेल आणि व्यवस्थापकांना सहकार्य दिल्यासारखे होईल. देवताच्या शुद्ध स्वरूपाचे मनन करता येईल, एकचित्त होईल आणि मंदिरात जाऊन दर्शन घेण्याचे खरेखुरे भाग्य लाभेल. देवतांशी एकरूप होता येईल.

## नरबळी

आर्यांच्या प्रसरणकाली ही चाल अस्तित्वात आली असावी. प्रसरणानिमित्त शत्रूंबरोबर लढाया कराव्या लागत आणि त्यांमध्ये जय मिळाल्यावर, आनंदोत्सव साजरा करताना ज्या शक्तीच्या कृपेने विजय मिळाला, त्या शक्तीलाच शत्रूचे मुंडके अर्पण करावयाचे आणि त्या देवतेला शांत करण्याचा प्रयत्न करावयाचा असा या कृतिमागील हेतु असावा. या कृत्याचे प्रतीक सांप्रत आसामातील वन्य जमातीमध्ये पहावयास मिळते. ताम्रघरातील देवीला मनुष्य बळी दिला जातो, तो दुसऱ्या शत्रुपक्षातील जातीमधील असतो. काही वेळेला त्या व्यक्तीला विकतही घेतात.

ही चाल भारतामध्ये फार पुरातन आहे. हरिश्चंद्र राजाचा मुलगा रोहित याने अजीगर्त ब्राह्मणाचा मधला मुलगा शुनःशेप याला १०० गाईंस विकत घेतला व यज्ञामध्ये बळी देण्यासाठी वरुण राजाला दिला. एवढ्यावरच भागले नाही. प्रत्यक्ष जन्मदाता बाप आणखी १०० गाई मिळाल्यावर त्याची हत्या करण्यास तयार झाला. शेवटी त्याने वरुणाचीच स्तुति केली आणि आपले प्राण वाचविले. नंतर तो आपल्या निष्ठुर पित्याच्या घरी जाण्यास राजी होईना. तेव्हा विश्वामित्राने त्याला आपला पुत्र मानून जवळ केले आणि त्याचे पुत्रवत पालन-पोषण केले ( दे. भा. ७।१३–१८ ).

स्वयंभू मनूच्या वंशामध्ये ऋषभ नावाचा एक पुरुष होऊन गेला. त्याचा पुत्र भरत नावाचा होता. तो उत्तम ज्ञानी असूनही इतरांना बुद्धिहीन भासत असे. त्यामुळेच त्याला जडभरत हे नाव प्राप्त झाले होते. या वृत्तीमुळे

त्याच्या भावांनी त्याचा छळ केला. भावजयांनी त्याची हेळसांड केली. त्यामुळे त्याला अन्नाची पंचाईत पडू लागली. एकदा रानावनांतून पोटासाठी हिंडत असता चोरांनी त्याला धरले व आपल्या देवीसमोर बळी देण्यासाठी त्याला उभा केला. तो अतिशय शांत स्वभावाचा असल्याने व देवावर त्याचा पूर्ण भरवसा असल्याने तो तशाही बिकट परिस्थितीत अगदी शांत होता. चोरांनी नरमेधाची सर्व तयारी पूर्ण केली. आता त्याचा शिरच्छेद होणार इतक्यात दैवी चमत्कार झाला. दुर्बळांची रक्षणकर्ती, भक्तांची पालनकर्ती देवी साक्षात् प्रकट झाली आणि तिने मारेकऱ्यांच्या हातातील तलवार त्यांच्यावर धरली. जडभरतासारख्या विरक्त वृत्तीच्या व्यक्तीचा बळी घेण्यात आपलीच पुण्याई कमी होईल असे देवीला वाटले आणि म्हणून तिने त्याला वाचविले. नंतर जडभरताने सर्वांना वेदान्त सांगून त्यांचा उद्धार केला (भागवत ५ वा स्कंध, गणेशपुराण २ रा खंड).

पूर्वी अनेक जमातींमध्ये अशी श्रद्धा होती की, विधिपूर्वक देवीला नरबली अर्पण केल्यास देवी प्रसन्न होऊन एक सहस्र वर्षे त्या माणसाला सुख देते. (कालिकापुराण). नरमेध कसा करावा याचे सविस्तर वर्णन या पुराणात आहे. प्रसिद्ध बाण कवि आपल्या 'कादंबरीत' नरमेधाचे वर्णन करतो. (पीटरसनकृत भाषांतर पृ० २२३). भवभूति कवि आपल्या 'मालती-माधव' नाटकांत (अंक ५) चामुंडा देवीचे भक्त आणि नरमेधाचा विधि याचे समग्र वर्णन करतो.

ऐतिहासिक काळात ही रूढी चालूच होती तंजावर येथील शिव मंदिरात एक कालिकेची मूर्ति आहे. तेथे प्रत्येक शुक्रवारी एका मुलीचा बळी देण्याची चाल होती मध्यप्रदेशात एका देवीला प्रतिवर्षी एक ब्राह्मण बळी देत असत, छोटा नागपूरकडील द्रवीड लोक संकटनिवारणार्थ, रोगराई दूर करण्यासाठी शत्रूवर विजय मिळविण्याकरिता अगर उत्तम पीक पाणी यावे म्हणून 'तारी पेन्नु' देवीला-पृथ्वी देवीला नरबली अर्पण करीत भूमीज जातीचे द्रवीड लोक मुलांना पर ठिकाणाहून पळवून आणून 'राकिनी' देवीसमोर बळी देत. मध्यप्रदेशातील बस्तर संस्थानाधिपति आपली कुलदेवता 'दांतवाळी' देवीपुढे प्रतिवर्षी २० नरबली देत असत शाहूराजे जेव्हा कुलदेवतेच्या दर्शनाला प्रतापगडावर जात तेव्हा तत्पूर्वी एका वृद्ध स्त्रीचा बळी देण्यात येई.

नरबलीची रूढी फक्त भारतामध्येच होती असे मात्र नाही. इतर देशांतही ही रूढी आढळून येते ज्या कारणास्तव ती भारतात रूढ होती त्याच कारणास्तव ती तिकडेही रूढ होती. जर्मनराजा औन वृद्ध झाला असता आपले आयुष्य वाढावे यासाठी त्याने 'ओडिन' देवीला आपले ९ पुत्र बळी दिले. आईसलंडमध्ये ट्युटानिक वंशीय 'थोर' देवीला नरबळी अर्पण करीत असत. मध्य

अमेरिकेमध्ये टोलटेकवंशीय लोक युद्धातील युद्धकैद्यांचा उपयोग देवीसमोर बळीसाठी करीत. अशी अनेक उदाहरणे देता येतील ( जेम्स धर्मकोश, ५।११९ ).

दक्षिण महाराष्ट्रामध्ये कऱ्हाडे ब्राह्मणांचा एक वर्ग आहे. हे लोक देवीचे भक्त व शक्तीचे उपासक समजले जातात. शाक्तपंथीय असल्याने हा वर्ग नरबळी अर्पण करीत असे. दुर्गापूजेच्या दहाव्या दिवशी सर्व गणगोत जेवावयास बोलावीत. ज्या माणसाचा बळी देण्याचे पूर्वनियोजित असेल त्याला प्रत्येक दिवस घरात ठेवून घेत असत. त्याच्याबरोबर सलगी वाढवीत आणि वेळप्रसंगी संशय दूर होण्यासाठी त्याला आपली कन्याही अर्पण करीत. दसऱ्याचे दिवशी सर्वांबरोबर तो जेवायला बसला म्हणजे विष मिसळलेले अन्नपदार्थ त्याचेच पानात वाढीत. भोजनोत्तर विष अंगात भिनू लागले म्हणजे घरातील यजमान त्या माणसाला घेऊन देवीच्या मंदिरात जाई. देवीसमोर प्रदक्षिणा घालून नमस्कार करीत असताना तो खाली वाकला म्हणजे; संधी साधून यजमान त्याची मान तोडीत असे. एका भांड्यात त्याचे रक्त जमा करून प्रथम देवीच्या ओठांना ते लावून नंतर सर्वांगावर शिंपडले जाई. देवीच्याच पायाजवळ एक खड्डा तयार करून गुप्तपणे त्याच्यात मृतदेह पुरून टाकीत. हा विधि पुरा झाल्यावर तो यजमान घरी परत येई व ती रात्र इतरांबरोबर भजेत घालवीत असे. त्यावेळी अशी श्रद्धा होती की असा नरबळी दिल्याने बारा वर्षेपर्यंत देवता संतुष्ट राहते आणि भाग्य देते. ( सर जॉन माल्कम कृत नॉर्थ इंडियन नोट्स्, पृ० ११२ ). यातील हा उतारा मार्टिन यांनी आपल्या ग्रंथात पृ० १८७ वर दिलेला आहे. यावरून असे स्पष्ट दिसते की, ज्यावेळी बंधन नव्हते तेव्हा उघडपणे विधियुक्त नरबळी दिला जाई, पण बंधन आल्यावर काही कर्मठ घराणी असे अघोर कृत्य क्वचित् करीत असावीत. परंतु त्याचा दोष मात्र सर्व वर्गावर आला. त्यामुळे 'कऱ्हाडे हे जावयाला विष घालणारे आहेत' असा प्रवाद प्रसृत झाला असावा. ( जेम्स धर्मकोश )

भारतात ब्रिटिश राज्य आल्यावर त्यांनी अशा रूढीवर बंधने घातली. तरी चोरून मारून असे प्रकार होतच असत. असा प्रकार इ. स. १८८१ मध्ये संबळपूर परगण्यात झाला. एका भक्ताने काली देवीपुढे नरबळी दिला म्हणून त्याला फासावर चढविण्यात आले. इ. स. १८८६ साली पत्तरांधपतीने 'दावबाली' देवीला बळी दिला म्हणून पोलिस चौकशी झालेली होती ( केसरी–पुणे दि० ९–२–१८८६ ). ही रूढी आता बंद पडलेली दिसली तरी क्वचित् प्रसंगी आसाम भागातील रानटी जमाती चोरूनमारून अमलात आणतात, असे देवीच्या मंदिरातील टांगलेल्या मुंडक्यांवरून दिसते.

नरबळीची प्रथा जरी बंद पडलेली दिसली तरी त्यासंबंधीची अफवा मात्र दुसऱ्या स्वरूपात आजतागायत चालूच आहेत. लहानपणी लेखक डेक्कन कॉलेज मध्ये वडिलांजवळ रहात असे, व तेथून सुमारे एक मैल अंतरावर असलेल्या येरवडा येथील म्युनिसिपल शाळेत प्राथमिक शिक्षणासाठी जात असे. त्यावेळी नेहमी अफवा उठत असत की, कोठेतरी नदीवर पूल बांधण्याचे काम चालू असून त्यासाठी मुलाना बळी द्यावयाचा आहे. या कामासाठी मुले पळविण्याचे काम चालू आहे. कोणी एखादा नवखा मनुष्य त्या भागात दिसला अगर एखादा विचित्र पोषाख केलेला कोणी दिसला तर तोच मुले पळविणारा असला पाहिजे अशी समजूत होई व मुले भिऊन पळत असत कित्येक वेळा दहा बारा मुलांचा समूह असला तरी कोणी जाणता मोठा मनुष्य बरोबर असल्याशिवाय ती शाळेत जात नसत. या सबबीवर कित्येक वेळा शाळेत गैरहजेरी लागत असे. मुले पळविण्याच्या अफवा अजूनही मधून मधून उठतात. सारांश, त्यावेळी समजूत अशी की, एवढ्या मोठ्या पुलाच्या कामाला यश येण्यासाठी तेथील भूदेवतेला नरबळी दिलाच पाहिजे. ही परिस्थिति सुमारे १९१० च्या वेळची आहे.

देवीची कृपा भक्तावर कशी होते याचे उदाहरण म्हणून जडभरताची कथा आपण वर पाहिलीच आहे. रामायणकाळी तशी देवीची कृपा श्रीरामचंद्रावरही झालेली आहे. राम रावण युद्ध चालू असता रावणाचा पुत्र इंद्रजित मारला गेल्यावर रावणाने दुर्गा देवीची आराधना करून तिला प्रसन्न करून घेतली, आणि तिच्या कृपाछत्राखाली तो रामाबरोबर युद्धास निघाला. रावणाला पाहताच रामही रथारूढ झाला व युद्धास निघाला. परंतु इतक्यात चमत्कार असा झाला की, प्रत्यक्ष दुर्गादेवी रावणाचे मागे रथात उभी असून ती रावणाचे रक्षण करण्यास सिद्ध आहे असे रामाला दिसले. त्याबरोबर आपणास युद्धात जय मिळणे शक्य नाही असे समजून तो रथाखाली उतरला. त्याला अतिशय दुःख झाले आपले सर्व परिश्रम फुकट जाऊन आपली सीता काही रावणाच्या तावडी-तून सोडविली जाणार नाही म्हणून तो शोकाकुल झाला.

ब्रह्मदेवाने नारदांना समरांगणात पाठविले. त्यांनी रामाला सांगितले की, युद्धात विजय मिळविणे असेल तर दुर्गादेवीचीच आराधना केली पाहिजे. ती आराधना १०८ कमळदळाने मात्र करावी त्याप्रमाणे हनुमताने कमळे आणली. पूजा सुरू झाली. परंतु कमळे वाहताना त्यांमध्ये एक कमी असल्याचे आढळून आले. पुनश्च राम चिंतित झाले, तेव्हा त्याचा कनिष्ठ बंधु लक्ष्मण पुढे सरसावला व आपला नेत्र कमल काढून देण्यास तयार झाला. तत्काळ दुर्गादेवी प्रसन्न झाली,

प्रकट झाली आणि रावणाचा त्याग करण्याचे तिने मान्य करून रामाला विजयी होण्याचा आशीर्वाद देऊन ती अंतर्धान पावली.

( आनंद रामायण, प्रस्तावना, अद्भुत रामायण )

आधुनिक काळातही श्रीशिवछत्रपतींवर देवीची कृपा होती याची अनेक उदाहरणे देता येतील. जन्मवेळी शिवाई देवीचा दृष्टांत, अफझुलखानवधाचे प्रसंगी शुभ कौल, सिंहगड किल्ला सर करताना प्रत्यक्ष देवीने दरवाजा उघडून मराठी सैन्याला आत घेणे व जय मिळवून देणे इ० अनेक प्रसंग दाखविता येतील.

पंडित श्री. दा सातवळेकर एके ठिकाणी म्हणतात की, मानवाचे देहामध्ये नवचक्रे वसलेली आहेत, आणि ती तमांधकाराने वेष्टिलेली आहेत. पण या तमांधाचा नाश नवरात्रीचे वेळी जे दीप उजळतात, त्यांच्या प्रकाशाने होतो. प्रत्येक दिवशी जळणाऱ्या दीपाने एक एक चक्रावर आक्रमण होते आणि शेवटच्या दिवशी साधकाचे मन विशुद्ध होते.

शास्त्रीबुवांचे हे विधान समजण्यास आपणाला कुंडलिनीशक्तीचा थोडक्यात इतिहास अवलोकन करणे अत्यावश्यक आहे. मानव देहामध्ये मूलाधार चक्राच्या आधाराने ही कुंडलिनीशक्ति आश्रय करून असते. तिचे उत्थापन करून तिला मस्तकावरील ब्रह्म-रंध्रामध्ये योगसामर्थ्याने नेता येते. या ठिकाणी शिव आणि शक्ति यांचा संयोग होऊन साधक ब्रह्मानंदामध्ये डोलू लागतो, आणि त्या अनुपम आनंदामुळे, पुन्हा पूर्व स्थितीवर येण्यास तो नाखुष असतो, हा विषय अतिशय गहन असून अनेकांनी यावर ग्रंथनिष्पत्ति केलेली आहे. ही नव चक्रे कोणती एवढेच आपणाला पाहणे आहे.

आधारं प्रथमं चक्रं स्वाधिष्ठानं द्वितीयकम् ।
योनिस्थानं द्वयोर्मध्ये कामरूपं निगद्यते ॥ ( गोरक्षण )
नाभिदेशे स्थितं चक्रं दशारं मणिपूरकम् ।
द्वादशारं महाचक्रं हृदये चाणि अनाहतम् ॥
कण्ठे कूपे विशुद्धाख्यं यच्चक्रं षोडशास्त्रकम् ।
आज्ञानाम भ्रुवोर्मध्ये द्विदलचक्रमुत्तमम् ॥ ( योगशिखोप )
बिन्दुरूपं परं ब्रह्म सहस्रदलसंस्थितम् ॥ ( कुलार्णवतंत्र )

( १ ) मूलाधार चक्र

हे दोन्ही जांघेच्या शिवणीत अधिष्ठित आहे या चक्राचे ठिकाणी कुंडलिनीचे मुख्य वास्तव्य असते. जगत्पालक शक्तीचे दोन विभाग कल्पिलेले असून

चैतन्यशक्ति व शेषशक्ति ही त्यांची नावे आहेत. सृष्टीचा उत्पादकशक्तीचा भाग निघून गेल्यावर जो भाग त्याला शिल्लक उरतो त्याला शेषशक्ति म्हणतात. ती निद्रिस्त असते. मानवयोनीत हीच कुंडलिनी शक्ति म्हणून ओळखिली जाते. शास्त्रांचे म्हणणे असे की, मानवजन्म मिळूनही जेव्हा तो तमोगुणी मूढ बहिर्मुख वृत्तीच्या विषयलंपट सुखामध्ये नित्य गुरफटलेला असतो. तेव्हा ही शक्ति अधोमुखी होऊन सुप्तावस्थेमध्ये पडून राहिलेली असते. पण सदाचरण योग-सामर्थ्य इत्यादि सत्त्वगुणांनी युक्त वृत्ति जेव्हा मानव प्रदीप्त करतो आणि पूर्णतः अंतर्मुख होतो, त्या वेळी ही शक्ति ऊर्ध्वमुखी होऊन शरीरातील इतर चक्रांचा भेद करीत करीत मस्तकातील सहस्रदलातील ब्रह्मरंध्रचक्रामध्ये शिरते व असे झाल्यावर साधकाची ब्रह्मानंदी टाळी लागते.

खालील चक्रांच्या शरीरामधील जागा येणेप्रमाणे.

( २ ) स्वाधिष्ठानचक्र— लिंगरूपामध्ये जलरूपी आहे.
( ३ ) मणिपूरचक्र — नाभीभागामध्ये तेजोमय आहे.
( ४ ) अनाहतचक्र — हृदयामध्ये वायुरूपाने आहे.
( ५ ) विशुद्धचक्र — कंठस्थानी आकाशरूपाने आहे.
( ६ ) आज्ञाचक्र — दोन भुवयांमध्ये महत्‌रूपाने आहे.
( ७ ) सहस्रचक्र— शिरोभागी कोणत्याही तत्त्वाविरहित आहे.

याचप्रमाणे इतर दोन चक्रे आहेत.

शास्त्रीबुवांचे म्हणणे असे की, नवरात्रीच्या दहादिनाच्या पूजनाने मानवाचे मन सत्वगुणयुक्त बनत जाते व ते दिव्याच्या मंद प्रकाशातील साधनेने जास्त जास्त अंतर्मुख होत गेल्यामुळे कुंडलिनी जागृत होऊन इतर चक्रांचा भेद करीत ब्रह्मरंध्रात प्रवेश करते. हा संपूर्ण विषय योगशास्त्राचा आहे.

( डॉ. रघुनाथ गर्दे, माऊली अंक, सप्टेंबर १९६० )

कुंडलिनी चक्राची माहिती सांगताना संत गुळवणी महाराज म्हणतात की, काही पाश्चात्य प्लेक्सस अथवा लार्ज बॉवेल्स ( पोटातील आतडे ) यालाच कुंडलिनी चक्र समजतात. पण ही जर कुंडलिनी ठरली तर ती मेंदूपर्यंत चढावी कशी हा प्रश्न शिल्लक उरतोच, आणि कदाचित् ही आतडी चढलीच तर समाधीऐवजी योग्याचा कपाळमोक्षच व्हावयाचा. योगचक्राची वास्तविक गोष्टच अशी आहे की, शरीरातील काही भाग स्वतःच मानसिक बनलेले आहेत आणि मनाची भावना जागृत झाली म्हणजे न कळतच शरीरात त्या त्या ठिकाणी विकार उत्पन्न

होतात. 'माझा हात वाळला आहे', ही भावना झाली की, रक्ताभिसरणक्रिया आपोआप मंदावते. प्रसिद्ध मल्ल सँडो लिहितो की, " मी मनात आणतो तेव्हा माझे शरीर इतके फुगते, की माझ्या पाठीवर लोखंडाची कांब मारली तर ती मोडली जाईल." सर्कशीमध्ये छातीवर प्रचंड पाषाण फोडणे, बंदुकीची गोळी हातावर झेलणे, हे सर्व मानसिक भावनेचेच प्रकार होत. हाच प्रकार चक्र आणि कुंडलिनीजागृतीला लागू असतो.

( चातुर्य चंद्रोदय, साधुबोध, पृ. १३६, तृतीयावृत्ति )

पंडित सातवळेकर यांनी जो नवचक्राचा उल्लेख केला तो ऋग्वेदातील खालील ऋचेला अनुलक्षून केलेला असावा.

आजनाय द्रुह्वणे पार्थिवानि ।<br>
दिव्यानि दीपयोऽन्तरिक्षा ॥ ( ऋ. ६-२२-८ )

हे बलवान् इंद्रदेवा, द्रोह करणाऱ्या राक्षसाला मारण्यासाठी पृथ्वीवरील, अंतरिक्षावरील आणि द्युलोकावरील दीपांना प्रकाशित कर, आणि त्याच्या वेगाने तू त्या राक्षसांना चारी बाजूंनी तापव. ऐश्वर्यवान ईश्वर सर्व लोकांना प्रकाशित करून ज्ञानाचा द्वेष करणाऱ्याला नष्ट करतो. हे एक अलंकारिक वर्णन आहे. मानव ज्याप्रमाणे दिवे लावून अंधकाराचा नाश करतात, तसेच या शरीरामध्ये ज्ञान व सद्गुणांचे दिवे लावून, दुर्गुण व अज्ञानरूपी राक्षसांचा नाश मानवांनी केला पाहिजे. शरीरामध्ये पृथ्वी, अंतरिक्ष व द्युलोक यांचा समावेश असल्याने त्या शरीरात ज्ञानाचा प्रकाश पडला म्हणजे आपोआप त्यामध्ये घर करून असलेले दुर्गुण उघडे पडतात, दिसून येतात, आणि त्यांचा नाश करणे सोपे होते. नवरात्रामध्ये नऊ दिवस दीप लावण्यामागे हा गूढार्थ आहे असेच येथे दाखवावयाचे आहे.

( पुरुषार्थ, दिवाळी अंक १९६१ )

ज्ञानेश्वरमहाराज म्हणतात की, ज्याची कुंडलिनीशक्ति जागी होते, त्याला पुढील सिद्धि प्राप्त होतात.

१. देहावर सुवर्णकांती चढणे, २. देह वायूसारखा हलका होणे, ३. दृष्टि आकाशव्यापी बनणे, ४. पाण्यावर चालणे, ५. समुद्राच्या पलीकडील गोष्टी पाहणे. ६. मुंगीच्या मनातीलही भाव ओळखणे. यावरून असे दिसून येईल की, स्वामी समर्थ अक्कलकोटनिवासी महाराज जे पाण्यावरून खडावा घालून चालत जात अथवा वायुवेगाने मार्ग आक्रमण करीत, त्याचे रहस्य कुंडलिनीशक्तीवर विजय हेच असले पाहिजे.

( ज्ञानेश्वरी ६। २६०–७० )

जीवन हे गतिशील आहे त्याचे ध्येय पुढे जाणे हे असून ते देवीच्या कृपेवर अवलंबून आहे, गीतेत 'पत्र पुष्प फल तोय' जो भक्तिभावाने अर्पण करतो त्याला देव पावतो असे सांगितले आहे. प्रत्येकाने देवपूजा ही शक्यतोवर केलीच पाहिजे. बाह्यपूजेने मन एका उच्च पातळीवर आले म्हणजे मग ती सोडून मानसपूजा केली तरी चालण्यासारखे आहे. मानसपूजेच्या वेळी खालील श्लोकाने देवाचे ध्यान करावे.

पूर्णस्यावाहनं कुत्र सर्वाधारस्य चासनम् ।
स्वच्छस्य पाद्यमर्घ्यं च शुद्धस्याचमनं कुतः ॥ १ ॥
निर्मलस्य कुतः स्नानं वस्त्रविश्वोदरस्य च ।
निरालंबस्योपवीत पुष्पं निर्वासनस्य च ॥ २ ॥
निर्लेपस्य कुतो गंधोऽरम्यस्याभरणं कुतः ।
नित्यातृप्तस्य नैवेद्य तांबूलं च कुतो विभो ॥ ३ ॥
प्रदक्षिणा ह्यनंतस्य ह्यद्वयस्य कुतो गतिः ।
वेदवाक्यैरवेदस्य कुत: स्तोत्रं विधीयते ॥ ४ ॥
स्वयंप्रकाशमानस्य कुतो निराजनं विभो ।
अन्तर्बहिश्च पूर्णस्य कथमुद्वासनं भवेत् ॥ ५ ॥

भाविकांनी वरील स्तोत्र म्हणून मानसिक समाधान प्राप्त करून घ्यावे.

नियव तंत्रपटल ५५ प्रमाणे एकूण उपचार ३६ आहेत, फेटकारिणी-तंत्रपटल ३ प्रमाणे १८, शिवार्चन चंद्रिकेप्रमाणे १६, मन्त्ररत्नावलीप्रमाणे १६, स्वतन्त्रतंत्राप्रमाणे १२, कालीतंत्र १०, प्रयोगसार ७ व ६० प्रकार आहेत. षोडशोपचार हे जरी इतर ठिकाणी मान्य असले तरी ते तंत्रशांना मान्य नाहीत हे वरील तंत्रग्रंथांवरून ध्यानी येईल (Hymns to Kali, P 1169 ).

मानसपूजा करताना साधकाचा भक्तिभाव व सोऽहंभाव विकसून पराकोटीला पोहोचलेला असला पाहिजे. देवीची मूर्ति अगर प्रतीक आत्मप्रतिबिंब स्वरूपात दिसू लागले पाहिजे, इतकेच नव्हे तर ते समक्ष दिसतच आहे अशी मनाची एकाग्रता करून पूजेला सुरवात केली पाहिजे. जितके दिवस मूर्ति आत्मभावस्थ होत नाही, अंत:करणामध्ये प्रतीत होत नाही तोपर्यंत अज्ञानरूपी अंधकार नष्ट झाला आहे असे समजू नये. इष्ट मूर्ति आत्मभावस्थ झाली की इतर कोणतीही मूर्ति अंत:करणामध्ये लीलया साकार होते. भक्तिभावाची हीच पराकाष्ठा समजावी. जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी सर्वत्र परमात्मशक्तीचे रूप दिसू लागते. अष्टभाव

दाटून येतात आणि मग हळुहळू मीपण लोपले जाते. आईजगदंबा कृपापूर्वक साधकाच्या अंतरात आत्मरूपाने दर्शन देते. ते स्वरूप प्रत्यक्ष दिसत असताना नेत्रावाटे घळघळा आनंदाश्रु ओघळत असतात. आत्मा त्या स्वरूपात ब्रह्मानंदाचा आनंद उपभोगीत असतो व जीवित सफळ झाल्याचे त्याच्या मुखकमलावर झळकत असते. हाच ब्रह्मानंद. मानवाने तो मिळविण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

आद्य शंकराचार्यांनी या मानसपूजेचे महत्त्व जाणले होते. त्यासाठी त्यांनी शिवमानसपूजा नावाचे पाच श्लोकांचे एक स्तोत्र रचलेले आहे. त्याचा सुरवातीचा श्लोक असा.

रत्नैः कल्पितमासनं हिमजलैः स्नानं च दिव्याम्बरं ।
नानारत्नविभूषितं मृगमदामोदाङ्कितं चन्दनम् ॥
जातीचम्पकबिल्वपत्ररचितं पुष्पं च धूपं तथा ।
दीपं देव दयानिधे पशुपते हृत्कल्पितं गृह्यताम् ॥

इतर श्लोकांमध्ये पूजासाहित्य कोणत्या प्रकारचे असावे, त्यामध्ये सुवर्णपात्रे, दही-दूध, सुगंधी पेये, पंचपक्वान्नांचा नैवेद्य, त्रयोदशी तांबूल, चवऱ्या, वंतुवाद्ये, चर्मवाद्ये यांचा समावेश असून शेवटी विहित-अविहिताचे वर्णन असून अपराधांची क्षमायाचना आहे.

ज्याला मानसपूजेमध्ये आनंद लुटता येतो, त्याला बाह्योपचारांची मुळीच जरूरी रहात नाही.

शार्दूलविक्रीडित

ब्रह्मा विष्णु महेश पुत्र प्रसवें ती मातृशक्ति धृती ।
संभोगाविण जन्म घेत जगतीं कीं शाक्तपंथा मती ॥
पुत्राला प्रसवोनि इच्छित वरा, पुत्रामधें मागुती ।
हें तो अद्‌भूत विष्णु दे अनुमती घेवोनि चक्रादिकीं ॥ १ ॥
स्नानां आटप सागरीं म्हणुनियां विष्णु पितो सागरां ।
गोपद्माजलिं न्हाउनी परततां पाही मुळां अंबरा ॥
विष्णूने मग चक्र फेकुनि तिला भूमीवरी पाडलें ।
ब्रह्मा-विष्णु-महेश वाटुनि धडा-शीर्षा-पदां घेतलें ॥ २ ॥

कामदा

प्रभातकाळीं तें आधिं उठतां । रूप आठवी पृथ्वि देवता
पक्ष वेष्टिता सप्तसागरां । कुचहि शोभती जे गिरीधरां ॥ ३ ॥

मानिती तुला विष्णु पत्निही । मंगळा-दिना इच्छिती मनीं ।
चरण स्पर्श हा देवते तुला । नित्य होतसे करि क्षमा मला ॥ ४ ॥

पृथ्वी

कळे न मज रूप ते म्हणुनि नांव हें अज्ञया ।
कळे न मज अंत तो म्हणुनि तूं अनंता मया ॥
कळे न मज लक्ष ते म्हणुनि तू अलक्षा खरी ।
कळे न मज जन्म-काळ म्हणुनि अजा तूं खरी ॥ ५ ॥
तुझ्या उदरिं जन्म हा लय घडे खरा या जगां ।
स्वरूप प्रकटें तुझें परम ब्रह्म ते गावया ॥
स्वयें कथन कालिका करित योगतंत्रांत गा ।
'अहं हि वद सच्चिता' सुभग ब्रह्मयाची प्रभा ॥ ६ ॥
स्वभावि तुज खेळ हा जग पटावरी बाहुली ।
सदा फिरविणें चमत्कृतित ती तुझ्या सावली ॥
रमून श्रम झालिया पटदिशीं जमाही करीं ।
करें भरिसी तूं स्वयें मग अव्यक्तिच्या टोपरीं ॥ ७ ॥

सूर्यकांत

खेळ मांडिला जगन्नायकें जगतपटाच्यावरी ।
मानव नरदा दिवस यामिनी फासे धरिलें करी ॥
भिन्नत्वास्तव रंग चढविला हिरवा पिवळा वरी ।
रंगाखाली साऱ्या नरदा शुष्क लाकडें खरीं ॥ ८ ॥

अनुष्टुभ्

आद्यशक्ति बहुरूपा । कार्यान्वित करी जना ।
कार्याकारण रूपानें । विविधा नाम पावली ॥
त्रिगुणा युक्त ही शक्ति । ब्रह्मा विष्णु शिवा मिसें ।
सृजनपालनादीक । संहारा चालवीतसे ॥
संसार बंधनें जोडा । विषयासक्त तामसी ।
राजसी सुख भोगा दे । तोडाया भज सात्विकी ॥

दहनभाव अग्निचा । जाणोनि तुळवी कुणी ।
मंत्र शक्ति तया ज्ञात । साधेना दाखवा कधीं ॥
भावना एक ती शक्ति । इच्छापूर्ती करीतसे ।
नेत्रशक्ति प्रेमशक्ति । वर्णावी रूपकें किती ॥ ९ ॥

पृथ्वी

स्वयें कथित शक्तिदेवि परी भाष्यकारासही ।
क्रिया घडवि सर्व मी अचल सांब आहे मही ॥
क्रिये रहित तो असे, नच कुणि तया जाणतें ।
तया करित कार्यवान शिवशक्ति की सांगतें ॥ १० ॥

वसंततिलका

जाणाच साधक खरा उमजे स्वरूप ।
विष्णू-शिवा नच मनीं धरि भेदरूप ॥
मानी जरी कुणि मनीं लव भेद थोडा ।
ज्ञानीं नसेचि मुक्ति तो चिरमोक्ष मोडा ॥ ११ ॥

पृथ्वी

पहा निरखुनी तुम्ही अमित आयुधें देवता ।
सदैव धरिलें करीं बहुत शस्त्र-अस्त्रादिकां ॥
असंख्य अवतारि ठोक रणि शत्रुला तो मिळे ।
म्हणोनि तर आर्यनीति शिकवी रणीं झुंज घे ॥ १२ ॥
सु-भक्त अम्हि देविचे अनुसरूप कीं तत्त्वही ।
निवृत्तिपर वृत्तिनें सतत नांदु शेजारिही ॥
जरी कधित कोणि आक्रमक वृत्तीला दाखवी ।
मुत्सद्दी सी खुई अधम वृत्तीची मैत्रिही ॥ १३ ॥
सदा रगडिलें तुवां दुरित दानवां थेटही ।
सदा झगडुनी तुवां मिरविलेस स्वातंत्र्यही ॥
तुला नमन अंबिके स्मरुनि कार्य त्या काळचे ।
सदा स्फुरण दे आम्हां हवन अर्पु या काळचें ॥ १४ ॥

कदा वुळ्वुळीत नी गुळ्गुळीत वृत्ती नको।
मऊ मऊ करोनि ते भरविणे शिशूचे नको॥
स्वभाव घनवीच शत्रु चिरणे, रणीं ओढुनी।
अधर्म नियती जगीं गिरवुंदे धडा हा क्षणीं॥ १५॥
अनन्य भव अर्पुनी भजत जो तुला तामसी।
दया सतत दाविशी निज सहाय्यता दे तशी॥
प्रथीत बहु सांख्य तत्त्व मिळतेंच गीतेंत तें।
नकोच रणि पंढता म्हणुनि अर्जुना साह्य तें॥ १६॥
अनार्य जनता जई छळत आर्यवीरांसवें।
वसाहति करावया निघति आर्य जेव्हां थवे॥
सदा हरविलें तुवां समर-संभ्रमीं दुर्जन।
वदो म्हणुनि देविचा करिति भारती सज्जन॥ १७॥
घडे उगम हा तुला जलधिं अंतरिक्षामधें
प्रवेश घडतो पुढे विविधरूपिं लोकांमधें॥
करी रणधुमाळि तूं जनहितार्थ घा या जगीं।
सदैव तरी शत्रुना खचित ळोळवीं या जगीं॥ १८॥

हरिणीप्लुता

नवरात्र कसें वदती पहा। सुजन पंडित सांगति ते महा।
नवचक्र वसे शरिरांतरी। बहु तमांधपणें रिघलें हरी॥ १९॥
दररोज सुदीप जसा जळे। करित नाश त्वरेंचि नवां बळें।
तिमिरास हरी मन शुद्धिही। तनुस कांति चढे दसऱ्यासही॥२०॥

अनुष्टुप्

वंगदेशीं तुझी सेवा। व्रत स्तवन पूजनीं।
अखंड षोडशादिनीं। मानिती जन पर्वणीं॥
मांडिती घट हो कोठें। कोठें दुर्गा स्वरूप वें।
पूजिती सप्त तें कल्प। देवता मग उठते॥
'कळावहु' बहु प्रिय। दुजा उत्सव तो जनां।
दृढता प्रेमबंधा ये। पोसण्या रसभावना॥

मानसीं धारणा मोठी । उमा प्रमुती सासरीं ।
पहीला परते जैसी । स्वकन्या आणिती घरीं ॥
रंभेचा घेउनी गाभा । फळावहु उभारिती ।
तया तरु-त्वचीं तूझी अंबा मूर्तीच पूजिती ॥ २१ ॥

मणिबंध

दक्षिणदेशीं आचारिती । 'कोलवुं' नामें व्रता सती ।
ठेवुनी वस्त्रालंकृती । अर्चन पूजन समर्पिती ॥
तन्मय वृत्ति होत थती । रेखाटीती चित्रकृती ।
एक ठायीं बहु जमती । गाऊनि देवि आळविती ॥ २२ ॥

शुद्धकामदा

स्तविति गुर्जरदेशवासिते । सुमनीं अर्पिती भक्तिभाव ते ।
नवहि रात्रिला सेविती तुला । धरुनि फेर हा घाली गरबा ।
कामिनीजनासह निषाद तो । पात्र मृत्तिका बहु चितारितो ।
छेदयुक्त तो ज्योत लावुनी । त्या सभोवती घोळ घालितो ॥
एक ताल हा धरुनि नाचतो । चित्तवृत्ति ही चरणिं अर्पितो ।
पर्व संपतां वुडवितो घटा । सागरा तटा पतिस तारिता ॥ २३ ॥

पृथ्वी

असंख्य वध आसुरीं गमत सार अबे मला ।
सदैव निरदाळिलें असुर-वृत्तिचा मामला ॥
उदाहरण एकही नच गमे तुझ्या संग्रही ।
निवृत्त मन काम मोह मनुभावरी वारहीं ॥ २४ ॥
मरुद्गण अर्यमा अग्नि इंद्र देवां सुरा ।
पुरोगपर देवता स्तवनिं वेद आर्यांवरा ॥
तुझ्या सम न कार्य त्या म्हणूनि लोप कालोदरीं ।
जनास रणिं साह्य तू स्मरुनि भक्त सेवा करी ॥ २५ ॥

# दक्षयज्ञ व पीठनिर्मिती

भारतामधील शक्तिपीठाच्या निर्मितीचा इतिहास पाहताना आपणास त्यासंबंधी काही प्राथमिक माहिती असणे अत्यंत जरूर आहे. ती पाहताना रुद्र कोण, दक्ष कोण, यज्ञ कोठे झाला, श्रीशंकराना निमंत्रण का नव्हते व त्याचा परिणाम काय झाला वगैरे गोष्टींचा आपल्याला ऊहापोह करावा लागेल. तेव्हा प्रथम आपण रुद्र कोण हे पाहू.

सौराष्ट्रे सोमनाथं च श्रीशैले मल्लिकार्जुनम् ।
उज्जयिन्यां महाकालमोंकारेममलेश्वरम् ॥ १ ॥
परल्यां वैद्यनाथं च डाकिन्यां भीमशंकरम् ।
सेतुबन्धे तु रामेशं नागेशं दारुकावने ॥ २ ॥
वाराणस्यां तु विश्वेशं त्र्यम्बकं गौतमीतटे ।
हिमालये तु केदारं घुश्मेशं तु शिवालये ॥ ३ ॥
एतानि ज्योतिर्लिङ्गानि सायं प्रातः पठेन्नरः ।
सप्तजन्मकृतं पापं स्मरणेन विनश्यति ॥ ४ ॥

भारतामध्ये प्रसिद्ध व प्रमुख अशी ही बारा ज्योतिर्लिंगे आहेत. त्यांचे स्मरण प्रात:काळी व सायंकाळी केल्यास सर्व पापांचा नाश होतो असे त्यांचे फळ सांगितले.

शतपथ व कौषितक ब्राह्मणांमध्ये रुद्र हा उषेचा पुत्र आहे असे म्हटले आहे श्वेताश्वर उपनिषद् हे श्रीमद्भगवद्गीतेच्या पूर्वीचे असावे, कारण त्यामध्ये रुद्र-शिव ह्यांची भक्ति सांगितली आहे. गीता सांगितली गेल्यावर सामान्यत: वसुदेव, कृष्ण ह्या देवता पूजनात आल्या असाव्यात (सहस्रबुद्धे पृ० १२९). रुद्राची नावे अकरा समजली जातात म्हणून 'एकादश रुद्र' हा शब्द रूढ झाला असावा. परंतु ही नावे पुराणातून सर्वत्र सारखीच आढळत नाहीत प्रत्येकामध्ये थोडाफार फरक आहे. भविष्यपुराणामध्ये (अ. १५१) अज, एकपत, अहिर्बुध्न्य, पीत, कांच, परंतप, दमन, ईश्वर, कपाली, स्थाणु व भग ही नावे आहेत. तर स्कंदपुराणामध्ये (अ. २७७) मृगव्याध, सर्पशर, निर्दित, महायश, अजैकपाद, अहिर्बुध्न्य, पिनाकी, दमन, ईश्वर, कपाली परंतप, ही नावे आढळतात. पद्मपुराणात (सृ. अ. ६) अजैकपाद, अहिर्बुध्न्य, विरूपाक्ष रैवत,

हर, बहुरूप, त्र्यंबक, शर्व, जयत, पिनाकी अशी नावे आढळतात इतर पुराणांतही असाच थोडाफार फरक आढळून येतो.

जेम्स धर्मकोशात रुद्राला तीन माता होत्या असा उल्लेख आढळतो. ह्या विधानासंबंधी अधिक चौकशी करता असे दिसून आले की, सायणाचार्यांचे ऋग्वेदावर जे भाष्य आहे त्यामध्ये ते म्हणतात, 'त्रयाणां ब्रह्म-विष्णु-रुद्राणामंबक पितरं यजामहे, इति शिष्यसमाहितो वसिष्ठो ब्रवीति।' ( तृतीयभाग, ९-८ मंडल ) म म पां वा. काणे मला म्हणाले, वेदामध्ये त्र्यंबक म्हणजे माता, नदी अशा अर्थाने चार वेळा हा शब्द आला आहे. लेखकाने पत्र प्रसिद्ध करून ( केसरी–पुणे ) ह्याबाबत खुलासा मागितला असता श्री शामनाथ जोशी म्हणतात की, त्र्यंबक ह्या शब्दातील घटक त्रि + अंबक असे आहेत त्रि = तीन आणि ह्या धातूपासून अम्बते अशा व्युत्पत्तीने पुल्लिंगी शब्द अम्ब किंवा अम्बक होतो पण ह्याचा अर्थ पिता असा होतो सायणाचार्य पिता असा अर्थानेच हा शब्द वापरतात परंतु स्त्रीलिंगी रूप अम्बा अगर अम्बिका असे होते आणि त्याचा अर्थ माता असा होतो. अमरकोशामध्ये 'अम्बा माता' असा शब्दप्रयोग रूढ असून तोच अर्थ जेम्स कोशकारांनी घेतला असावा अंब शब्दाचा 'नेत्र' असा अर्थ श्री. कोलगडे आपल्या 'ऋग्वेददर्शन' ह्या ग्रंथात देतात

वरील विवेचनावरून असे म्हणता येईल की, व्युत्पत्तिशास्त्राने 'त्र्यंबक' ह्याचा अर्थ 'माता' हा बरोबर आहे पण रूढ अर्थाने मात्र 'नेत्र' असाच ह्याचा अर्थ घेतला जातो शुक्लयजुर्वेदाने तर ह्यावरही मात केली आहे ( अ ३–५७ पहा ) "एष ते रुद्रभाग सह स्वस्राम्बिकयायात जुषस्व" म्हणजे ह्याचा अर्थ असा की, 'हे रुद्रा, अम्बिकानामक भगिनीसह, यज्ञकर्मासाठी येणाऱ्या तुला हा हविर्भाग आम्ही अर्पण करतो' म्हणजे त्या ठिकाणी अंबिका ही रुद्राची भगिनी दाखविली आहे सारांश काय तर अंबिका ही रुद्राची माता, स्त्री व भगिनी ह्या तिन्ही स्वरूपात वर्णिलेली आढळते

## शंकरांना पाच मुखे का ?

ब्रह्मवैवर्तपुराण ( अ १५।७७–८७ ) ह्या प्रश्नाचे उत्तर देते ते असे एके काळी परमेश्वराचे सत्यस्वरूप पाहण्यासाठी श्रीशंकरांनी ६०००० वर्षे तपश्चर्या केली ती तपस्या सुफलित झाली आणि परब्रह्मस्वरूप त्यांच्यासमोर साक्षात् प्रकट झाले श्रीशंकरांना विस्मयाने मोहिनी पाडणारे ते रूप आपल्या नेत्रांमध्ये साठविण्याचा खूप प्रयत्न केला, पण तृप्ति झाली नाही त्यामुळे त्यांना

अत्यंत वाईट वाटले आणि त्यांच्या नेत्रांवाटे घळघळ अश्रुधारा वाहू लागल्या. ते म्हणाले, " सहस्र मुखांचा शेष व चतुर्मुख ब्रह्मा जे रूप सतत पाहूनही तृप्त झाले नाहीत, तो मी एक दोन डोळ्यांनी ते परमेश्वरस्वरूप पाहून कसा तृप्त होणार ! " अशा रीतीने ते विचारमग्न झाले असता त्यांची समाधी लागली आणि त्या अनुपमेय रूपाचे चिंतन पुनश्च सुरू झाले. परमात्म्याची लीला अगाधच आहे. त्याने श्रीशंकरांचे इच्छित पूर्ण करण्यासाठी त्यांना आणखी चार मुखे दिली. प्रत्येक मुखाला तीन तीन नेत्र होते. याप्रमाणे पाच मुखे व पंधरा डोळ्यांची प्राप्ती झाल्यावर शंकर तृप्त झाले.

## श्रीशंकरांची पूजा लिंगस्वरूपात का केली जाते ?

ब्रह्मदेवाने एकदा श्रीशंकरांना पृथ्वीची उत्पत्ति करण्यास सांगितले. त्यांचे नेहमीचे कार्य संहाराचे असल्याने सृजनकार्य त्यांना जमेना. आज्ञापित कर्तव्य पार पाडण्यास जमेना म्हणून ते लपून बसले. ब्रह्मदेवाने खूप काळपर्यंत त्यांची वाट पाहिली, पण शंकरांचा शोध लागेना आणि पृथ्वीची उत्पत्तीही झालेली दिसेना. तेव्हा स्वतःच त्याने पृथ्वी उत्पन्न केली. कालांतराने शंकर प्रकट झाले आणि आपली स्वतःची दुर्बलता इतरांना दिसावी म्हणूनच ब्रह्मदेवाने सृष्ट्युत्पत्तीचे कार्य आपणांस सांगितले असा प्रामाणिक गैरसमज करून घेऊन श्रीशंकरांनी ब्रह्मदेवावर सूड उगविण्याचे ठरविले. त्याप्रमाणे पृथ्वीचा संहार करण्यास प्रारंभ केला. इतर देवांनी त्यांना प्रतिबंध केला, श्रीशंकरांना परावृत्त करण्याचा प्रयत्न केला, विनंति केली, पण व्यर्थ. श्रीशंकराने ब्रह्मा, विष्णु इत्यादि देवतांची शक्ति हरण केली आणि ती स्वतःच आत्मलिंगस्वरूपात साठविली. याप्रमाणे त्यांना आत्मलिंगाची प्राप्ति झाली. ( कोल्हापूर जिल्हा गॅझेट पृ० ११८ )

लिंगस्वरूपात पूजा का केली जाते यासंबंधीची ही मनोरंजक कथा पहा. दारुकवनामध्ये शंकर एकदा नग्नावस्थेत विहरत असता ते ऋषींच्या आश्रमावरून चालले होते. त्या वेळी ऋषिगण स्नानासाठी तीर्थावर गेला होता. आश्रमातील स्त्रियांनी त्या शिवस्वरूप अतिथीला भिक्षा घातली. परंतु ती भिक्षा सकामदृष्टीने घेऊन शंकर कैलासाकडे जात असता त्यांच्यावर मोहित झालेल्या ऋषि-स्त्रियाही त्यांचे मागून जाऊ लागल्या. स्नानाहून परत येताना ऋषिगणाने हे दृश्य पाहिले. त्यानाही सत्य माहीत नसल्याने तत्काळ श्रीशंकरांना शाप दिला की, 'तू षंढ होशील ' या शापामुळे श्रीशंकरांचे आत्मलिंग तत्क्षणी भूमीवर पडले.

पुढे चमत्कार असा झाला की, भूमीवर पडल्यावर ते लिंग क्रमशः वाढू लागले व वाढता वाढता त्याने त्रैलोक्यही व्यापून टाकले. देवांना हे काय वाढते आहे हेच मुळी समजेना. तेव्हा या वाढणाऱ्या लिंगाचे मूळ अगर मस्तक

शोधण्यासाठी म्हणून देव बाहेर पडले. शोधून शोधून सर्व देव दमले तरी लिंगाचे मस्तक काही त्यांना सापडेना. ब्रह्मदेवही थकले. पण आपली दुर्बलता लपविण्यासाठी त्याने असत्यपणे सांगितले की, 'लिंग मस्तक आपण स्वर्गात पाहिले आहे." आपल्या ह्या विधानाच्या पुराव्यासाठी म्हणून त्याने सुरभि-गायीला ह्या बाबतीत खोटीच साक्ष देण्यास सांगितले. त्याप्रमाणे तिने खोटी साक्ष दिली; पण इतर देवांना तिचा हा खोटेपणा कळून आल्यावर त्यांनी सुरभीस शाप दिला की, "यापुढे तुझे मुख अपवित्र व धर्मबहिष्कृत होवो." ह्या शापामुळेच आजही आपण गायीचे सर्वांग पवित्र मानतो, पण मुख अपवित्र मानतो. ह्यानंतरच ती विष्ठा आदि घाणेरडे पदार्थ खाऊ लागली असे मानतात.

श्रीशंकराच्या ह्या अवाढव्य वाढलेल्या व त्रैलोक्य व्यापून राहिलेल्या लिंगाची भीति नष्ट करण्याचे देवांचे प्रयत्न असफल झाल्यावर वीरभद्र पुढे सरसावला आणि त्या प्रचंड रूपाची त्याने षोडशोपचारे पूजा करून श्रीशंकरांना शांत होण्याची व आपले मूळचे मंगल स्वरूप धारण करण्याची प्रार्थना केली. ह्यामुळे श्रीशंकर प्रसन्न होऊन ते वीरभद्रासमोर प्रकट झाले. "सर्वांना सुलभ रीतीने आपली पूजा करता येईल, असे सौम्य स्वरूप आपण मानवासाठी घ्या" अशी विनीतभावाने वीरभद्राने श्रीशंकराच्या चरणी प्रार्थना केली. झाले, तो कारुण्यसागर हेलावला ! विश्वकरुणेने प्रमुदित होऊन ह्या विश्वमंगल विश्वेश्वराच्या मुखावाटे सहजोद्गार बाहेर पडले, "तथास्तु !" तत्काळ त्या अवाढव्य लिंगाची अनेक लहान लहान रूपे झाली आणि ती निरनिराळ्या क्षेत्री स्थानापन्न झाली.

ब्रह्मलोकात–महेश्वरलिंग, वैकुंठात–सदाशिव, अमरावती–अमरेश्वर, मृत्यु-लोक–केदारादि प्रथम परिच्छेदात सांगितलेली १२ ज्योतिर्लिंगे, कांतीपुरी–अह्ननाथ, सिंहलदेश–सिद्धनाथ, पाताळात–भोगेश्वर, हटकेश्वर इ० इ० (स्कंद–महेश्वर खंड). शिवलिंगासभोवार जी गोल कडा आपण पाहतो ती योनीस्वरूप होय. शिव आणि शक्ति ह्यांचा संयोगदर्शक ती कडा होय.

## शंकर भस्मचर्चित का असतात ?

दक्षयज्ञामध्ये शंकराची स्त्री सती हिने स्वतःचा आत्मघात केल्यावर शंकरांनी तिच्या देहाची रक्षा एकत्र केली आणि पत्नीवरील निस्सीम प्रेमाची स्मृति म्हणून देहावर धारण केली. त्यानंतर त्यांनी चिताभस्मच लावण्याचा परिपाठ ठेवला. हे आपल्याला माहीतच आहे.

(Wilkins, Hindu Mythology, P. 302.)

## लिंगनामाची उत्पत्ति

स्कंदपुराण वाचीत असता शंकराच्या लिंगांची अनेक नावे वाचण्यात आली. अगस्तेश्वर, रामेश्वर, लक्ष्मणेश्वर, इंद्रेश्वर इ० नावे वाचली आणि त्यांची कारणपरंपरा शोधताना असे दिसले की, त्या त्या प्रसिद्ध पुरुषांची ही स्मारकेच होत. ही स्मारके त्या वेळी लिंगरूपाने स्थापण्याचा प्रघात होता, आणि सांप्रतही तो चालू आहे. गोरेगाव (मुंबई) येथे दहा वर्षांपूर्वी एका गुजराथी बाईने आपल्या मृत पतीच्या स्मरणार्थ 'प्रणवेश्वर' महादेवाची स्थापना केली (प्रणवशंकर हे तिच्या पतीचे नाव होते). प्रसिद्ध पुरुषाची स्मारके सांप्रत पुतळे अगर स्मृति-स्तंभ उभारून करण्याचा रिवाज रूढ आहे; पण पूर्वीच्या आणि आजच्या ह्या पद्धतीत मोठाच फरक दृग्गोचर होतो. आजचे स्मारक मृताचे व्यक्तिदर्शन घडावे ह्या स्वार्थबुद्धीने प्रेरित असते, तर पूर्वीचे स्मारक आत्मा शिवस्वरूपात विलीन झाल्याचे दृश्य दर्शविते. तेथे व्यक्तीला प्रसिद्धीची हाव नाही.

## रुद्राक्ष

शिवलिंग हे ज्याप्रमाणे शंकराचे पूजनीय स्वरूप मानले जाते त्याप्रमाणे रुद्राक्ष हेही वंदनीय व धारणीय स्वरूप मानले जाते. त्यातील निरनिराळ्या प्रकारांना तर फारच महत्त्व दिलेले आढळून येईल. तो इतिहास आपण थोडक्यात पाहू. रुद्राक्षाची जन्मकथा अशी आहे की, ब्रह्मदेवाच्या वरामुळे त्रिपुरासुर दैत्य मदान्ध झाला. सर्व देवादिकांना त्याने 'त्राहि भगवन्' करून सोडले. त्या वेळी ब्रह्मा, विष्णु आदि देवता शंकरांकडे गेल्या आणि त्रिपुरासुरापासून होणाऱ्या त्रासाचे निवारण करण्याची त्यांना प्रार्थना केली. देवांची अशी ही दुर्बल, असहाय्य अवस्था पाहून शंकराना त्यांची दया येऊन ते त्रिपुरासुरावर अत्यंत संतप्त झाले. त्यांचे नेत्र खदिरांगाराप्रमाणे लाल झाले. त्रिपुरासुराच्या नाशासाठी त्यांनी आपले 'अघोर' अस्त्र वापरण्याचे ठरविले. त्या अस्त्राचे स्मरण करताच ते दिव्य तेजाने प्रकट झाले. प्रत्यक्ष शंकराचे नेत्रसुद्धा त्या अद्भुत तेजाने दिपून गेले. ते तेज शंकरांना असह्य होऊन त्यांच्या नेत्रावाटे ते जलरूपाने वाहू लागले. जे जलबिंदू भूमीवर पडले तेच रुद्राक्ष बीज झाले. त्याच ठिकाणी भव्य वृक्ष तयार झाला. त्या वृक्षापासून एकूण ३८ प्रकारचे रुद्राक्ष तयार झाले, ते ह्याप्रमाणे—

सूर्यनेत्रातून कपिलवर्णी १२ प्रकारचे, चंद्रनेत्रातून श्वेतवर्णी १६ प्रकारचे आणि अग्निनेत्रातून कृष्णवर्णी १० प्रकारचे, असे रुद्राक्ष तयार झाले. शंकरांचे त्रि-नेत्र म्हणजे सूर्य, चंद्र, अग्नि हेच होत.

ज्याप्रमाणे हिंदुधर्मात वर्णव्यवस्था आहे त्याप्रमाणे रुद्राक्षामध्येही आढळून येते. श्वेतवर्णी हे ब्राह्मण, रक्तवर्णी हे क्षत्रीय, मिश्रवर्णी हे वैश्य आणि कृष्णवर्णी हे शूद्र समजावेत. रुद्राक्ष हे एका मुखापासून १४ मुखांपर्यंत आढळून येतात. प्रत्येक स्वतंत्र मुखाच्या रुद्राक्षाचे गुणधर्म व फळही निरनिराळे आहे.

## (१) एकमुखी रुद्राक्ष—

हा रुद्राक्ष म्हणजे प्रत्यक्ष शंकराचेच प्रतीक समजावे आणि परमतत्त्व जाणावे. हा रुद्राक्ष जवळ ठेवल्यास लक्ष्मीचा सतत लाभ होतो. ह्याच्यामुळे शत्रूकडून होणारा शस्त्राघात टळतो. खरा रुद्राक्ष ओळखण्याची कसोटी अशी की, तो मेंढीच्या गळ्यात बांधून मग तिच्या मानेवर शस्त्राने वार करावयाचा. वार करूनही जर त्या मेंढीची मान तुटली नाही तरच तो खरा मानला जातो. असा हा खरा रुद्राक्ष अतिशय दुर्मिळ गणला जातो तेव्हा तो मिळेल तेथून व मिळेल त्या किंमतीस घ्यावा. सुवर्णाच्या डबीत तो ठेवून त्याची नित्य पूजा केल्याने आपल्या घरी लक्ष्मीचा निरंतर वास होतो.

(२) द्विमुखी—ह्याला शंकर-पार्वती स्वरूप मानतात अगर अर्धनारीनटेश्वर समजतात.

(३) त्रिमुखी— त्याला अग्निरूप मानतात देहावर हा धारण केला असता अग्नि प्रसन्न होतो.

(४) चतुर्मुखी—हा जवळ बाळगल्याने मनुष्य धनवान होतो.

(५) पंचमुखी—हा कालाग्नि असून पंचब्रह्मस्वरूप होय.

(६) षण्मुखी—हा कार्तिकेयस्वरूप मानला जातो.

(७) सप्तमुखी—हा अनंगनामक होय. हा जवळ असल्याने अधिदेवता सप्तमातृका, सप्ताश्व व सप्तर्षि प्रसन्न होतात.

(८) अष्टमुखी—हा गणेशस्वरूप होय. हा जवळ बाळगल्याने गणेश, अधिदेवता, अष्टमातृका, अष्टवसु आणि गंगादेवी प्रसन्न होते.

(९) नवमुखी—हा भैरवस्वरूप होय. तसेच हा धर्मराजस्वरूप मानला जातो.

(१०) दशमुखी—हा साक्षात जनार्दन होय ह्याची अधिदेवता दिक्पाल होय.

(११) एकादशमुखी—हा साक्षात एकादश रुद्ररूप होय. ह्याची अधिदेवता रुद्र अथवा इंद्र समजावी.

(१२) द्वादशमुखी—हा बारा आदित्यरूप होय. अधिदेवता महाविष्णु म्हणजे १२ सूर्य होत.

(१३) त्रयोदशमुखी— हा सिद्धस्वरूप होय. हा जवळ असल्याने कामदेव संतुष्ट होतो.

(१४) चतुर्दशमुखी— हा प्रत्यक्ष शंकरच होय. हा जवळ असल्याने सर्व आधिव्याधि नष्ट होऊन कामना पूर्ण होतात.

हे रुद्राक्ष जवळ बाळगून इच्छित फळ मिळविण्यासाठी काही पथ्यपाणीही पाळावे लागते. सात्त्विक आहार ठेवावा लागतो आणि मद्य, मांस, कांदा, लसूण ह्यांसारखे उत्तेजक पदार्थ वर्ज करावे लागतात.

शंकराचा श्रद्धावान भक्त हे रुद्राक्ष धारण करतो. कारण त्या रुद्राक्षाना तो रुद्रस्वरूप समजतो. ते धारण करण्याने आपल्यावर शंकर प्रसन्न राहतील असे तो मानतो. रुद्राक्ष धारण करण्याची रीत खालीलप्रमाणे आहे. १०८ रुद्राक्षांची माळ छातीवर रुळेल अशी गळ्यात घालणे, १२ रुद्राक्षांची माळ गळ्याभोवती घालणे, ४० रुद्राक्षांची माळ मस्तकावर धारण करणे, ६ रुद्राक्षांची माळ दोन्ही कानांत घालणे, शेंडीमध्ये १ धारण करणे (देवी भागवत ११/३–७). शिवलीलामृत (अ० ११) तसेच गुरुचरित्र (अ० ३३) ह्यामध्ये रुद्राक्ष धारण विधि सांगितला आहे त्यासंबंधाची कथाही तेथे दिली आहे. ह्या विषयाचे संपूर्ण विवरण रुद्रोपनिषद्, रुद्राक्षमहात्म्य, रुद्राक्षमहिमा इ० ग्रंथामध्ये केलेले असून त्यांच्या मनोरंजक कथा व फलश्रुति ही त्यांमध्ये दिलेली आहे.

नेपाळ, जावा, मलाया आणि क्वचितपणे म्हैसूरभांती रुद्राक्ष वृक्ष दिसून येतात. ह्या वृक्षांची पाने साधारणतः काजूच्या पानासारखी असून त्यांच्या फळांतील बीज हेच रुद्राक्ष होत. रुद्राक्षाचे फळ किंचित आंबट व उष्ण असून वात, कफ, रक्तवाहिन्यांची पीडा व भूतबाधा नाशक आहे. रक्तदाबाच्या विकारावर रात्री रुद्राक्ष पाण्यात टाकून ते पाणी सकाळी पिण्यास दिले तर रक्तदाब कमी होतो असा अनेकांचा अनुभव आहे. ह्या त्याच्या औषधीगुणामुळे शास्त्रीय चिकित्सक बुद्धीने त्याचे पृथक्करण व्हावयास पाहिजे. ह्या व्यावहारिक दृष्टीने रुद्राक्षाकडे पाहिल्यास ते अंगावर का धारण केले जातात व जावेत ह्याचा आपोआपच उलगडा होईल.

भद्राक्ष नावाचे मणि बाजारात मिळतात. पण ते रुद्राक्षापेक्षा निराळे आहेत हे ध्यानी असू द्यावे. साधारणपणे ते रुद्राक्षाप्रमाणेच दिसतात. जाणकार तज्ज्ञच त्यांची परीक्षा करू शकतात भद्राक्ष फार ठिसूळ असतो. उत्कृष्ट रुद्राक्ष मूलतःच छेदयुक्त असून सुवर्णरेषायुक्त असतात. शिवाय हे अतिशय कडक देवता असल्याने रुद्राक्षमाळेने जप करताना फार काळजी घ्यावी लागते, कारण

गणसंख्या चुकल्यास सर्व खटाटोप फुकट जातो. (चिं. ग. कर्वे, 'प्रसाद' ऑक्टोबर १९६०)

सोमनाथ ह्या प्रसिद्ध क्षेत्राची महात्मता शंकर स्वतः पार्वतीला सांगत असताना म्हणाले, प्रत्येक मन्वंतराला ह्या जोतिर्लिंगाची नावे बदलत असतात. क्रमाने आजवर ह्या स्थानावरील देवतांची नावे मृत्युंजय, काळाग्नि, अमृतेश, अनामय, कीर्तिमाला, भैरवनाथ ही होऊन गेली. चालू युगातील त्याचे नाव सोमनाथ असून पुढील युगात प्राणनाथ होईल. पार्वती म्हणाली, "मला ही नावे आठवत नाहीत." त्यावर शंकर म्हणाले की, "त्या वेळी तुझी नावे जगन्माता, जगद्योनि, शांभवी, विश्वरूपा, नंदिनी, गणांबिका, विभूति, आनंदा, वामलोचना, वरारोहा, सुमंगला, महामाया, अनंता, मूलमाता, उत्तमा, सती, ह्याप्रमाणे होती. चालू युगात तुझे नाव पार्वती असे आहे." (स्कंद प्रभास ७)

दक्ष — दक्षप्रजापति हा आदिप्रकृति अदितीचा पुत्र होय. तसेच अदिति ही दक्षप्रजापतीची कन्या होय असे हे जोड नाते आहे. इजिप्त पुराणातही इसिस देवी व ऑसिरस ह्यांचा संबंध ह्याच प्रकारचा दाखविला आहे. स्वायंभुव मन्वंतरामधील मनुप्रजापतीची कन्या प्रसूति ही दक्षाची पत्नी होय. मनूला एकूण तीन कन्या होत्या. त्यांपैकीच ही एक होय. ह्या पत्नीपासून दक्षाला एकूण १६ कन्या झाल्या. त्यांपैकी श्रद्धा, मैत्री, दया, शांति, तुष्टि, पुष्टि, क्रिया, उन्नति, बुद्धि, मेधा, तितिक्षा आणि मूर्ति ह्या कन्या धर्मप्रजापतीला दिल्या. स्वाहा अग्नीला दिली. स्वधा अग्निआत्मांना दिली आणि सती शंकरांना दिली. (भागवत ४-१)

एके ठिकाणी दक्षप्रजापतीने ६० कन्या निर्माण केल्या असे सांगितले असून १३ कश्यप ऋषीला, २७ चंद्र अथवा सोमदेवाला, १० धर्माला, ६० वाटणी केलेली आढळते. दक्षाने मानवाच्या नित्य वागणुकीसंबंधीचे नियम घालून दिले असून त्याला 'दक्षस्मृति' असे म्हणतात. ह्या स्मृतीच्या ज्या पोथ्या आज उपलब्ध आहेत त्यांमध्ये श्लोकांसंबंधी एकवाक्यता नाही. काही ठिकाणी ही श्लोकसंख्या २२० वर आहे, तर डेक्कन कॉलेज, पुणे येथील ग्रंथालयातील पोथीत ही संख्या फक्त १९७ च दिलेली आहे. (चित्राव, प्राचीन चरित्र कोश, पृ. २२६)

दक्ष व शंकर ह्यांमध्ये वैरभाव का निर्माण झाला? ह्यासंबंधी एक-दोन कथा आपण पाहू. (१) दक्ष हा असुरप्रकृति व शंकर हे शिवप्रकृति असल्यामुळे स्वभावतःच-विशेषतः दक्ष-परस्परांना पाण्यात पहात असत. वैरभाव-मर्दन करून युद्ध घेत असत.

(२) शंकर हे दक्षप्रजापतीचे जावई झाल्यावर दक्ष-प्रजापति एकदा नैमिष्यारण्यात गेला. सर्व देवांनी व ऋषींनी त्याचा आदरसत्कार करून त्याला

उत्थापन दिले, परंतु शंकरांनी त्याच्या स्वागतात भाग घेतला नाही. अर्थात् दक्ष-प्रजापतीला जावयाची ही वर्तणूक रुचली नाही. कारण मानाने आणि अधिकाराने दक्ष शंकरापेक्षा श्रेष्ठ होता. दक्ष-प्रजापतीने ह्या अपमानाचा सूड घेण्याच्या बुद्धीने शंकराला शाप दिला की, "यज्ञ-कृत्यांमध्ये तुझ्यावर बहिष्कार घालण्यात येईल व तुला हविर्भागही मिळणार नाही." शंकराचा प्रमुख सेनापती नंदी ह्याला ह्या गोष्टीचा राग आला आणि त्याने दक्षाचा तिरस्कार करून त्याला उलट शाप दिला की, ह्यापुढे ब्राह्मण वेदवाद करणारे निघतील, अधर्माने शूद्रांचे वैदिक कृत्य करतील व नेहमी दरिद्री राहतील. (स्कंद केदार, १·५)

(३) प्रजापतीच्या यज्ञामध्ये दक्ष व शंकर ह्यांचे काही कारणाने वितुष्ट आले; आणि पुढे ते वाढतच गेले. काही काळाने दक्षाला सर्व प्रजापतींचे अध्यक्षपद ब्रह्मदेवाने अर्पण केले. अर्थात् ह्या मानप्राप्तीमुळे दक्षाला अहंकार व गर्व उत्पन्न झाला. त्यामुळे शंकरादि ब्रह्मनिष्ठांचा अव्हेर करून यज्ञ पुढे चालूच ठेवला.

(४) मुद्गल ऋषी सांगतात की, ब्रह्मदेवाचा मुलगा दक्ष-प्रजापति झाल्यावर फार उन्मत्त झाला. राजा ज्याप्रमाणे आपल्या प्रजेला भेटण्यासाठी अनेक ठिकाणी भेटी देतो, त्याप्रमाणे दक्ष-प्रजापतीने कैलास पर्वतावरील शंकरांच्या स्थानास भेट दिली. अतिथिसत्कार म्हणून शंकरांनी त्याचा सत्कारही केला. परंतु त्याला (दक्षाला) नमस्कार मात्र केला नाही. शंकरांनी आपला हा जाणूनबुजून अपमान केला, असे समजून दक्षाने त्याच ठिकाणी त्यांची खूप निंदा केली. नंदीनेही त्वरितच दक्षाला शाप दिला की, "तुला मेंढ्याचे तोंड उत्पन्न होईल."

वरीलप्रमाणे उत्पन्न झालेल्या वैरामुळे दक्षप्रजापति संतप्त झाला आणि जावयाचा सूड घेण्यासाठी सज्ज झाला. इतक्यात त्रैलोक्यसंचारक नारदमुनी तेथे उपस्थित झाले. त्यांनी दक्षाला असा मार्ग सुचविला की, "तू बृहस्पति-याग कर व त्याचे निमंत्रण शंकरांना देऊ नको. त्यामुळे शंकरांना यज्ञात हविर्भाग मिळणार नाही व लोकांत त्याचे हसे होईल." नारदमुनींचा हा युक्तिवाद दक्षाला पटला आणि त्याने त्या सल्ल्याप्रमाणे वागण्याचे ठरविले. ठरल्याप्रमाणे दक्षाने शंकर-सतीला आपल्या यज्ञाचे निमंत्रण केले नाही. नारदमुनींचे एवढ्यावरच समाधान झाले नाही. ते तडक कैलास पर्वतावर गेले व त्यांनी शंकरांना सांगितले, "दक्ष-प्रजापति 'बृहस्पति-याग' करीत आहे. पण त्याने आपल्याला आमंत्रण दिलेले नाही." नंतर नारदमुनींनी सतीची भेट घेऊन दक्षाची सर्व हकीकत तिला सांगून वडिलांकडे यज्ञसमारंभास विनानिमंत्रण जाण्यास प्रवृत्त केले.

(गणेशपुराण, प्र. खंड)

दक्षयज्ञ—वरीलप्रमाणे सर्व पूर्वेतिहास पाहिल्यावर आता आपण दक्ष-यज्ञाकडे वळू. ठरल्याप्रमाणे यज्ञासाठी सर्व देव, दक्षाच्या इतर सर्व मुली-जावई जमा झाले आणि सर्व कार्यक्रम व्यवस्थित सुरूही झाले.

नारदांनी सतीला कैलासावर जाऊन बातमी दिल्यावर, तिने काही काळ वडिलांकडून निमंत्रण येण्याची वाट पाहिली, परंतु अखेर तिच्या पदरी निराशाच पडली. शेवटी तिने विचार केला की, "इतक्या अवाढव्य व गडबडीच्या कामात वडील निमंत्रण धाडण्यास नक्कीच विसरले असले पाहिजेत आणि वडिलांकडून, माझ्यासारख्या जाणत्या मुलीने का इतरांसारखी सन्मानपूर्वक आमंत्रणाची अपेक्षा करावयाची ? छे, छे आपलेच चुकले ! त्यापूर्वीच आपण-हूनच आपल्या घरी जाऊन अशा मंगलकार्यात वडिलांना यथाशक्ति मदत करायला पाहिजे होती." तेव्हा तिने दक्षाच्या घरी जाण्याचा बेत निश्चित केला. तिने आपला हा बेत शंकरांना सांगितला व जाण्याची अनुज्ञा मागितली. परंतु शंकर तिला म्हणाले की, "कोठेही निमंत्रणाशिवाय जाणे हानिकारक असून अपमान होण्याचा फार मोठा धोका असतो. नंतर पश्चात्ताप करण्यापेक्षा आताच जर दक्षाच्या घरी जाण्याचा आपला बेत रद्द ठरविला तर ते अधिक हितकारक ठरेल." शंकरांनी सतीची परोपरीने समजूत घालण्याचा प्रयत्न केला परंतु स्त्री-स्वभावसुलभ माहेरची ओढ अखेर विजयी ठरून शंकरांना नाईलाजास्तव सतीला अनुज्ञा द्यावी लागली. काही रुद्रगणांसमवेत सती यज्ञस्थानी उपस्थित झाली. "भवितव्यता बलीयसी" या उक्तीप्रमाणे काळानेच सतीला तेथे नेले होते.

कालिका पुराणामध्ये असा उल्लेख मिळतो की, उत्पत्ति, स्थिति व लय या त्रयीच्या वाटणीत भगवान् शंकराकडे संहाराचे काम असते. पण ही स्वारी महायोग-निद्रेमध्ये निमग्न असल्याने संहाराची क्रिया बंद पडली. तेव्हा ब्रह्मदेवाने दक्ष-प्रजापतीला सांगितले की, आदिमायेची प्रार्थना करून तिला तुझे पोटी जन्म घेण्याची विनती कर. त्याप्रमाणे दक्ष प्रजापतीने सतीला जन्म दिला आणि तिचा विवाह शंकराबरोबर करून देण्यात आला. दक्षाने यज्ञ सुरू केला, पण जावयांना आणि मुलीला निमंत्रण दिले नाही.

कपालिभार्येति सती दयितापि सुता निजा।
नाहूता यज्ञविषये दक्षेण दोषदर्शिना॥
(कालिकापुराण १६।३०–३१)

पतीची कोणी निंदा केली तर—

वास्तविक शास्त्राज्ञा अशी आहे की, "कर्णौ पिधाय निरियात् यदकल्प ईशे।" इ० इ० कोणी उच्छृंखल व्यक्तीने, पतीची निंदा तिच्यासमोर करताच त्या पतिव्रतेने त्या व्यक्तीचा नाश करावा. इतकेच नव्हे तर जर अंगी सामर्थ्य असेल, तर त्या व्यक्तीची जिव्हा त्वरित उपटून काढावी आणि त्याचा नाश करावा (श्रीमद्भागवत, ४।४।१७). पण या ठिकाणी निंद्य अपमानास्पद वर्तन करणारा तिचा पिताच असल्याने तिने आत्मनाश करण्याचा निश्चय केला असावा.

ब्राह्मणांकडून हवनक्रिया चालू होती. एकामागून एक आहुती पडत होत्या, पण शंकराचे मंत्र आल्याबरोबर दक्षाने ते म्हणण्यास ब्राह्मणांना मनाई केली. त्यामुळे ते मंत्र गाळून पुढे हवन चालू झाले. हा घडघडीत पतीचा अपमान पाहून सतीच्या अंगाचा तिळपापड झाला. संतापाने भडका उडाला, क्रोध अनावर झाला व जगणे असह्य झाले.

कैलास पर्वतावर शंकरांना सतीच्या ह्या करुणामय मृत्यूची वार्ता कळविण्यात आली. ती ऐकल्याबरोबर त्यांना अतिशय खेद झाला. आपल्या प्रिय पत्नीला मिळालेल्या अपमानास्पद वागणुकीबद्दल शंकरांना दक्षाचा अतीव संताप आला. जावयावरील राग दक्षाने स्वतःच्या मुलीवर अशा रीतीने का काढावा हेच मुळी शंकरांना समजेना. त्यांनी अविलंबे आपल्या जटेतून एक केस उपटून काढला. त्यापासून एक ' वीरभद्र ' नामक अत्यंत शक्तिशाली असा रुद्रगण उत्पन्न केला. दक्षाचे समूळ पारिपत्य करण्याची कामगिरी त्याच्यावर सोपविण्यात आली. असंख्य रुद्रगण त्याच्या आधिपत्याखाली देण्यात आले, आणि वीरभद्र मोठ्या उत्साहाने आपल्या नियोजित कामगिरीवर निघाला.

वायुवेगाने घोडदौड करीत वीरभद्र यज्ञभूमीस आला आणि त्याने सरळ यज्ञमंडपावरच जोरदार हल्ला चढविला. ध्यानीमनी नसताना आलेल्या ह्या प्रचंड व विध्वंसक अरिष्टामुळे सर्वोच्च पात्रावर धारण वसून सर्वत्र एकच हलकल्लोळ उडाला. ह्या संकटसमयी दक्षाच्या साहाय्यास कोणीही टिकून उरले नाही. वीरभद्राने इतरांची विल्हेवाट लावल्यावर यज्ञकुंडच उखडून टाकले, दक्षाचा शिरच्छेद करून त्याचे मस्तक अग्नीलाच समर्पण करून टाकले, व बाकीचा मृतदेह तसाच समरांगणावर फेकून दिला.

दक्षपत्नी प्रसूतीला हा वृत्तान्त कळल्यावर ती समरांगणात आली. आपल्या पतीच्या देहाची झालेली ती क्रूर विटंबना पाहून ती शोकविव्हल झाली. त्याही अवस्थेत तिने पतीच्या देहाला अग्निसंस्कार करण्यासाठी एक चिता तयार करविली आणि त्याच चितेवर पतीच्या देहाबरोबर ' सहगमन ' करण्याचे ठरविले. सती जाण्यासाठी आवश्यक ती सर्व पूर्वतयारी झाल्यावर, कपाळावर मळवट भरलेली ती प्रसूति घोड्याशा उंच जागी धर्मशिळेवर उभी राहिली. धर्मशिळा म्हणजे पतीबरोबर सहगमन करण्याच्यापूर्वी स्त्री ज्या दगडावर उभी रहाते, सौभाग्य वायने वाहून चितेत प्रवेश करते, तो दगड. पेशवाईमध्ये माधवराव पेशव्यांच्या पत्नीने अशा धर्मशिळेवर उभे राहून नारायणाचा हात रावसाहेबांच्या हाती दिला आणि त्यांची अंतिम इच्छा म्हणून त्याचे संरक्षण करण्यास सांगितले. अग्नि-नारायणाला देह समर्पण करण्यापूर्वी तिने प्रथम अग्निदेवाला श्रीफळ अर्पण केले. आणि आता ती उडी टाकणार तोच एक चमत्कार झाला! एक कोकिळा त्या ठिकाणी आली आणि तिच्या तोंडून वाणी बाहेर पडली " हे प्रसूति ! तू सती जाऊ नकोस. तू सुदीर्घ तपश्चर्या कर म्हणजे तुला तुझा पति पुन्हा जिवंत होऊन मिळेल. "

तत्काळ रद्द केला. नंतर त्याच ठिकाणी तिने अतिशय उग्र तपश्चर्या केली. देहाचा केवळ अस्थिपंजर सांगाडा मात्र राहिला, परंतु तिने त्याची कधीच पर्वा केली नाही. त्या तपश्चर्येपूर्वी प्रसूतीने भक्तिभावाने कोकिळाव्रताचे आचरण केलेले असल्यामुळे प्रत्यक्ष ब्रह्मदेव ह्या वेळी तिच्यासमोर प्रगट झाले. ब्रह्मदेवांनी शंकरांची प्रार्थना करताच शंकर उपस्थित झाले, व त्यांनी दक्षाला जिवंत करण्याचे मान्य केले. परंतु दक्षाचे मृत शरीरच फक्त त्या ठिकाणी शिल्लक होते. मस्तक तर केव्हाच यज्ञकुंडात भस्मसात झाले होते ! मस्तकाशिवाय देह जिवंत करून काय उपयोग ! इतक्यात यज्ञीय बोकडाचे शीर तेथे शंकरांना दिसले. तेच त्यांनी दक्षाच्या धडाला चिकटवून त्याला जिवंत केले. ( भागवत ४–७ )

देवीभागवतामध्ये सतीसंबंधी अन्य रीतीने उल्लेख आढळतो तो असा. दुर्वासऋषि हे एकदा जंबुनदीच्या किनारी हिंडत असताना त्यांनी जगदंबेची एक सुंदर मूर्ति पाहिली. मनोभावाने त्यांनी षोडशोपचारे त्या मूर्तीची पूजाअर्चा केली, तिची स्तुति केली. अनेक दिवसांनी त्या देवीला पूजाअर्चा प्राप्त झाल्यामुळे ती जगदंबा प्रसन्न झाली. तिने स्वहस्ताने आपल्या गळ्यातील कंठा काढून तो दुर्वास ऋषींना प्रसाद म्हणून दिला. नंतर देवीला भक्तिभावाने वंदन करून दुर्वास मार्गस्थ झाले. ते आकाशमार्गाने जात असता प्रथम त्यांना दक्ष-प्रजापति भेटला. तो तेजस्वी दिव्य कंठा पाहून दक्षाला त्याचा मोह उत्पन्न झाला. त्याने तो कंठा दुर्वास ऋषींकडून मागून घेतला. दिगंबरवृत्तीने विहरणाऱ्या त्या मुनिश्रेष्ठाने तो कंठा त्वरितच दक्षाला मोठ्या आनंदाने दिला.

कंठा घेऊन मोठ्या उत्साहाने दक्ष स्वगृही परतला. रात्री भोजन झाल्यावर शयनगृहात स्त्रीसह सुखाने तो निद्रित झाला. परंतु अशा वेळी तो, पवित्र कंठा बाजूला काढून ठेवण्यास विसरल्यामुळे कंठा अपवित्र झाला. शंकरांनीच हा कंठा जगदंबेला दिला होता. त्यामुळे शंकरांना दक्षाचा राग आला. पतीच्या रागाचे कारण सतीला समजताच तिलाही अतिशय दुःख झाले आणि वडिलांच्याबद्दल तिच्या मनात घृणा उत्पन्न झाली. पतीच्या कोपनिवारणार्थ अन्य मार्ग न सुचल्याने व पित्याच्या पापक्षालनार्थ तिने जठराग्नि प्रदीप्त करून स्वतःचा देह जाळून घेतला. ( देवीभागवत, ७–३० )

वीरभद्र बनून नृत्य करतो. त्या वेळी तो 'हे हेरे हलमा' असा उद्‌घोष करीत असतो, आणि आपले हात अनेक वेळा मडक्यावर धरतो. आश्चर्याची गोष्ट अशी की, ह्या नृत्य-प्रसंगी माता पिता आपल्या मनगटाच्या कातडीमध्ये दोवलेच सुया खुपसून ठेवतात, पण त्याना कोणतीही इजा झालेली दिसून येत नाही. त्या भागात लग्नप्रसंगी हा एक आवश्यक विधि म्हणून मानला जातो. काही ठिकाणी ह्या विधीला 'गन्गल' असेही म्हणतात.

(लोकसत्ता, मुंबई, २२-४-६२)

## पीठनिर्मिती

दक्षयज्ञामध्ये सतीने आपला देह भस्मसात् करून घेतला हे आपण वर पाहिलेच आहे. हे दु:खद वृत्त ऐकून शंकर यज्ञभूमीत अवतरले, आणि दु:खा-वेगाने बेभान झाले. पत्नीचा विरह त्यांना असह्य झाला. अर्धनारीनटेश्वर स्वरूपात ती दोघे एकमेकात विलीन झाली असल्यामुळे अर्धे स्वरूप नाहीसे झाल्यावर दुसरे अर्धे स्वरूप देहातीत झाले. तशाही स्थितीत शंकरानी सतीचा मृत देह उचलून, तो दोन्ही हातांनी मस्तकावर धारण करून त्यांनी तांडव नृत्य करण्यास सुरवात केली. बराच काळ लोटला, तरी शंकर शांत होण्याचे चिन्ह दिसेना. शंकराचे संहाराचे कार्य स्थगित झाल्याने ब्रह्मा, विष्णु आदि देवांना फार चिंता उत्पन्न झाली व शंकरांना शांत करण्याचा उपाय म्हणून शंकरापासून सतीचा मृत देह दूर सारण्याच्या हेतूने विष्णूने आपले सुदर्शन चक्र सोडले. त्या चक्राने सतीच्या मृत देहाचे ल्हान ल्हान तुकडे करण्यास प्रारंभ केला. तिच्या देहाचे अनेक तुकडे सर्वत्र विखुरले गेले. सती म्हणजे प्रत्यक्ष आदिशक्तीचे स्वरूप असल्याने ते तुकडे ज्या ठिकाणी खाली पडले, त्या त्या ठिकाणी 'शक्तिपीठे' तयार झाली. उदाहरणार्थ, कामाख्या येथे योनीचा भाग पडला, म्हणून तेथे देवी योनी स्वरूपात आजही नांदत आहे. उज्जयिनी येथे कूर्पर (कोपर) भाग पडला म्हणून येथे शक्तिपीठ तयार झाले.

स्नान करून सत्वरच परत येतो" असे सांगून ते सर्वजण नदीवर स्नानास निघून गेले. नदीवर कालक्षेप करणे हा प्रधान उद्देश असल्याने ते लवकर परतलेच नाहीत.

साधनद्वादशीचे व्रत करावयाचे म्हणजे दशमीला एकभुक्त रहावयाचे, एकादशी निर्जळी करावयाची आणि द्वादशीला सूर्योदयानंतर एक घटकेच्या आत भोजन करावयाचे. हा विधि चुकल्यास व्रतभंग झाला असे समजतात.

इकडे अंबरीष राजाची पारणे फेडण्याची वेळ झाली म्हणून पाने वाढून तयार झाली, तरी ऋषींचा अद्याप पत्ता नव्हता. अतिथीला वगळून भोजन करणे सुसंस्कृत राजाला बरे वाटेना व वेळेवर व्रताचे पारणे न सोडणेही इष्ट दिसेना. इकडे आड तिकडे विहीर अशी त्याची दोलायमान स्थिति झाली. अशा ऐन प्रसंगी राजपुरोहितांनी राजाला शास्त्रवचन सांगितले की, "अशा संकटसमयी तुळशीचे तीर्थ घेतले असता व्रतभंग होत नाही." कविराज मोरोपंत 'अंबरीष आख्याना'त म्हणतात,

> अशन न जलपाने होय पीताहि पाणी ।
> अनशनहि नव्हेचि स्पष्ट ही वेदवाणी ॥ १ ॥

राजाने शास्त्रप्रामाण्याला अनुसरून तीर्थ घेऊन आपले पारणे सोडले आणि उपस्थित भक्तवृंदाना भोजनास प्रारंभ करण्याची विनंति केली. स्वतः मात्र दुर्वासादि समस्त ऋषींची वाट पहात बसला. वेळ टळून गेली अशी खात्री झाल्यावर मगच दुर्वास मुनि राजगृही परतले. आपल्यासारख्या मान्यवर अतिथीला वगळून म्हणजेच आपली वाट न पाहता ब्राह्मणभोजन चाललेले पाहून ते राजावर क्रोधाने संतप्त झाले. राजाने आपला फार मोठा अपमान केला असे समजून ते त्याला शाप देण्यास प्रवृत्त झाले. क्रोधाधीन झालेले दुर्वास ऋषि राजाचा एक शब्दही ऐकून घेण्यास तयार नव्हते. आपण शाप कोणाला देतो आणि त्याचे दूरगामी परिणाम काय काय होतील, ह्याचा विवेक त्या क्रोधवश मुनिवर्यांना त्या वेळी राहिला नाही. त्या संतप्त अवस्थेत त्यांनी राजाला शाप दिला की, "अतिथीचा अपमान केल्याने एकादशी व्रताने तुला मोक्ष तर मिळणार नाहीच परंतु तुला दात जन्म घ्यावे लागतील." नंतर भोजन न करताच दुर्वास तेथून निघून गेले.

अंबरीष राजा अतिशय खिन्न झाला. दुर्वासमुनि सत्य परिस्थितीचा असा विपर्यास करतील असे त्याला वाटले नव्हते. त्याने आपल्या इष्टदेवताची, करुणासागर, दीनवत्सल भगवान् विष्णूची अनन्यभावाने करुणा भाकली. भक्तकामकल्पद्रुम भगवंताची स्वारी तत्काळ तिथे भक्तरक्षणार्थ प्रगट झाली !! भक्तभेट

अंबरीषाला दुर्वास महर्षींच्या शापापासून अभय दिले! नंतर विष्णूसह सर्व देवांनी हे शंभर जन्म आपल्यातच वाटून घेण्याचे ठरवून त्याप्रमाणे स्वतः विष्णूने १०, शंकराने १२, व गजाननाने ११ जन्म इ० वाटणी झाल्यावर उरलेले एकावन्न जन्म देवीने स्वतः स्वीकारले. ह्यामुळेच एकावन्न शक्तिपीठे तयार झाली. विष्णूने सुदर्शनचक्र दुर्वासामागे सोडून त्याला अंबरीषासह समझोता करावयास लाविला. नतर दुर्वास व अंबरीष ह्यांनी एकत्र भोजन केले. ( भागवत, स्कंध ९ )

## दक्षाची यज्ञभूमि कोणती ?

दक्षाच्या बृहस्पतियागाची भूमि कोणती, ह्याबद्दल कोणाला निश्चित माहिती नाही. उपलब्ध माहिती खालीलप्रमाणे आहे.

( १ ) 'कथाकल्पतरु' ह्या ग्रंथामध्ये असे वर्णन केले आहे की, माळव्यामधील क्षिप्रा व वृद्धा ह्या नद्यांच्या संगमावर हा यज्ञसमारंभ झालेला आहे. बृहस्पतियागाच्या वेळी तेथे जी वस्ती झाली त्याला बृहस्पतिपूर असे नामाभिधान प्राप्त झाले. ह्या नावाचे क्षेत्र आजही त्या ठिकाणी आढळते. शंकराचे 'महाकाळ वन' म्हणतात ते ह्याच भागाला होय.

( २ ) श्री. मा. ना. बर्वे ह्यांनी स्कंदपुराणाच्या आधारे प्राकृतामध्ये 'क्षिप्रामाहात्म्य' नावाचे ओवीबद्ध काव्य रचिले आहे. त्यामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की,

सांप्रत त्याचे नांव महत्पूर। वाटेत तीरीं असे शहर।
तेथें पूर्वीं यज्ञसंभार। केला असें कोणी ॥ १९१ ॥
येथील भस्म पावन। मानिती अद्यापि सर्व जन।
आणिती तेथें जाऊन। क्षिप्रेसी भावें सेविती ॥ १९२ ॥

( क्षिप्रामाहात्म्य )

(४) सतीने आत्मनाश केल्यावर तिला दुसरा जन्म अटळच होता. कारण ती आदिमाया होती. ती शिव शक्ति होती. ती अदृश्य झाल्यावर घरूंना कोणतेच कार्य करता येणे अशक्य होते. ह्यामुळे हिमवानाची भार्या मेनावती हिला प्रेरणा झाली. ह्या मृत आदिमाया सतीचा जन्म आपल्या उदरी व्हावा म्हणून तिने गंगातीरी उग्र तपश्चर्या सुरू केली. यज्ञभूमीपासून हे तपश्चर्येचे स्थान समीपच होते असे सांगतात, परंतु कोणते स्थान ते निश्चित सांगता येत नाही. हे मात्र सत्य आहे की, माळव्याच्या उत्तरेस थोड्याच अंतरावर गंगा नदीचा प्रवाह वाहतो आहे. त्या ठिकाणी तपश्चर्या केल्यावर मेनावती गर्भवती झाली आणि योग्य वेळी चैत्र पौर्णिमेच्या दिवशी तिच्या उदरी पार्वतीचा जन्म झाला.

वरील विधानावरून असे दिसते की, माळव्यामध्ये क्षिप्रातटी हा यज्ञ झालेला असावा. पण जेम्स धर्मकोश (६ : ५१६) प्रमाणे हा यज्ञ हरिद्वार येथे झाला असे त्याचे मत आहे. भौगोलिक पुराव्यावर त्यांचा भर आहे. दक्षाचे मंदिर ह्या ठिकाणी आहे. एक दंतकथाही प्रचलित आहे. वीरभद्राच्या आक्रमणाने यमाचा दंड मोडला, सरस्वती व मातृ देवतांचे पाश तुटले, यज्ञदेवाचे शीर तुटले, आणि आज भेरमंडळात दृग्गोचर होणारे 'मृगशीर्ष' नक्षत्र तयार झाले.

हा यज्ञ हरिद्वार या ठिकाणी झाला असे म्हणण्याचे कारण हे संभवते की, येथून दोन मैलावर कनखल क्षेत्र आहे. या ठिकाणी गंगेची निळी धारा व काल्व्यामधून येणारी धारा दोन्ही एकत्र मिळतात बाजारच्या रस्त्याने गेल्यावर दक्ष प्रजापतीचे मंदिर लागते. याच ठिकाणी दक्षाने यज्ञ केला आणि शिवाने त्याचा विध्वंस केला असे वायुपुराण म्हणते (पृ ८३–२१). सतीने अग्निप्रवेश केल्याचे कुंड जवळच दाखविले जाते. या क्षेत्राला मायाक्षेत्र असेही नाव आहे. या माहितीवरूनच जेम्स धर्मकोशात जागेसंबंधी विधान केलेले असावे.

कोणाचे म्हणणे असेही आहे की, बद्रीनारायणच्या मार्गावर कनखलक्षेत्री हा दक्षयज्ञ झाला.

शार्दूलविक्रीडित

पूर्वी दक्ष प्रजापती करितसे तो यज्ञ पृथ्वीतळा ।
आप्तेष्टांसि निमंत्रिले परि उमा–शंभू न पाचारिला ।।
भार्येला शिव सांगतो उचित गे जाणे नसे तत्वतां ।
होई गे अपमान नित्य गृहि त्या जाता न पाचारितां ।। १ ।।

सारोनी उपदेश दूर पतिचा यज्ञगृहीं पातली ।
नाहीं आदर प्रेमदृष्टि तिजला पितृगृहीं लाभली ॥
येई क्रोध खरा अनावर पुरा संतप्त कीं जाहली ।
योगाग्नी जठरीं प्रदीप्त करुनी त्यानें तनू जाळिली ॥ २ ॥
तेव्हां रुद्रगणीं विलोकुनि क्षणीं काया तिची सावळी ।
क्रोधाग्नीं भडकोनिया झडकरी ती मंडपीं पातली ॥
केलें घोर अपार युद्ध समयीं दक्षास निर्दाळिलें ।
विध्वंसोनिहि यज्ञकुंड पुरतें भूमीवरी टाकिलें ॥ ३ ॥

स्रग्धरा

पत्नीच्या देहत्यागें शिव त्वरित रिघे बाणवेगेंचि ठायीं ।
स्कंधीं वाहोनियां ते सति-मृतशरिरां नाचतो ठायिं ठायीं ॥
विष्णू चक्रासि सोडी क्षणि मृतशरिरां खंडितो अंश भागा ।
त्या ठायीं पुण्य गात्रीं पतन घडतसें निर्मिती पीठ जागा ॥ ४ ॥

शिखरिणी

प्रसूतीला जेव्हां सति वदत दक्षास वधिलें ।
शिरां यज्ञा अर्पी धड समरिं फेरून दिधलें ॥
जया धर्मांशीं पति-गमनि साध्वी तई उभी ।
दिसे ती अद्यापी सजविहि मूर्ती बहु भरी ॥ ५ ॥

शार्दूलविक्रीडित

क्षिप्रेला मिळते शृहत्पतिपुरी ती वंद्य वृंदा महा ।
दक्षाने शुभ संगमीं निवडिली ती यज्ञभूमी पहा ॥
टेंडा भिवसमीप मामि दिसते विस्तीर्ण जें कुंडही ।
मानी यज्ञ सु भूमि भूजे जनही क्षेत्रापरी आजही ॥ ६ ॥

—

पीठनिर्णय

रॉयल एशियाटिक सोसायटी, बंगाल ह्या संस्थेमार्फत प्रकाशित होणाऱ्या मासिकाद्वारे काही प्राचीन माहिती प्रत्यही प्रसिद्ध होत असते. इ० स० १९४७ साली ( Vol. 13 ) प्रसिद्ध झालेल्या मासिकामध्ये डॉ. दिनेशचंद्र सरकार ह्यांचा " शक्तिपीठे " ह्या विषयावर एक लेख प्रसिद्ध झाला आहे. त्या लेखाच्या आधारे खालीलप्रमाणे विवेचन केले आहे.

लेखारंभी डॉ. सरकार म्हणतात की, पीठनिर्णय अथवा महापीठ-निर्णय, तंत्रचूडामणी, मंत्रचूडामणी, चंद्रचूडामणी, भवचूडामणी, शब्दकल्पद्रुम, प्राणतोषणी तंत्र, आनंदमंगल काव्य इ० इ० ग्रंथांच्या आधारे आपण वरील लेख तयार केला आहे.

पीठोत्पत्तीचा धागा ऋग्वेद ग्रंथामध्ये आढळून येतो. ( १०-६१-५/७ ) पण त्याची पूर्णता पुराणे व तंत्रशास्त्र ह्यांच्या निर्मितीनंतरच झालेली आढळून येते. अनुक्रमे शतपथब्राह्मण, ऐतरेयब्राह्मण व ताण्ड्यमहाब्राह्मण ( Tandya Maha brahmana ) ह्या ग्रंथांतून पीठोत्पत्तीसंबंधीच्या कथेची उत्क्रांति होत गेलेली आहे. प्रजापतीने आपल्या द्यौस् अथवा उषा नामक कन्येवर बलात्कार केला. त्यामुळे त्याचा सूड घेण्यासाठी इतर देवांनी रुद्रांना विनंति केल्यावरून त्यांनी बाण सोडून त्याला घायाळ केले. पण कामतृप्तीच्या पूर्वीच प्रजापतीच्या शरीरात बाण घुसल्याने त्याचे रेत भूमीवर पडले. प्रजापति म्हणजे प्रत्यक्ष यज्ञरूपच असल्याने व यज्ञीय द्रव्याचा कोणताही भाग अगर अंश हा फेकून द्यावयाचा नसल्याने देवांनी ते रेत भगाकडे नेले. यज्ञभूमीच्या दक्षिणबाजूकडे ह्या देवतेचें आसन असते. भगाने त्या रेताकडे पहाताच तत्क्षणीच त्या दिव्य दाहक रेतामुळे त्याचे नेत्रच अंध झाले. नंतर देवांनी ते रेत पूषन् देवाकडे नेले. त्याने रेताची चव पाहण्याचा प्रयत्न करताच त्याची दंतपंक्तीच गळून पडली. गोपथब्राह्मणामध्ये ( २ : १ ) हाच कथाभाग जरा अधिक विस्ताराने आलेला आहे.

भारतीय पौराणिक कथा या आकाशातील महगोलांच्या रूपकपर कथा आहेत असे अनेक वेळां आढळून येते. तद्वत् येथेही घडलेले असावे. कारण दिव्य तेज धारण करणारे ते देव, आकाशात तारकारूपाने वावरतात. ग्रीक, इजिप्त व भारतीय आर्य यांनी बारा आदित्य आणि आठ वसू हे प्रमुख देव मानले आहेत. त्यांमध्ये सर्वांत प्रकाशमान तारा रुद्र अथवा महादेव होय. सूर्याच्या २३ पट तो मोठा आहे. त्याचे ग्रीक नाव " सिरियस " आहे. आग्नेयब्राह्मणातील भाग ३ रा, श्लोक ३३ चा आधार घेऊनच लो. टिळकांनी आपल्या ' ओरायन ' या ग्रंथात ( पृ. १०२ ) या ताऱ्याला रुद्र म्हटले आहे. गुजराथी शिवपुराण प्रकरण ३-९ ( पृ. १९२ ) मध्ये शिवपार्वतीला सांगतात, " ज्यावेळी मी ज्योतिर्लिंगाच्या रूपाने जन्म घेतला होता त्यावेळी मार्गशीर्ष महिन्यात आर्द्रा नक्षत्र होते "

आकाशगंगेचा उगम या ताऱ्याच्या वरच्या बाजूला होतो, म्हणून शिवजटेतून गंगा अवतरली असे म्हटले जाते. या ताऱ्यांचे समोर वृषभ राशीचा तारा आहे. त्याचे ग्रीक नाव "टॉरस" आहे. वृषभ हे शंकराचे वहान यामुळेच ठरले असावे. शिवाय मृगशीर्ष नक्षत्रात जी निहारिका ( नेब्युला ) आहे ती दुर्बिणीतून पाहिली तर नदीरूपच दिसते.

रुद्र ताऱ्याच्या समोर कृत्तिका नक्षत्रांचा सहा ताऱ्याचा पुंजका आहे. हाच शंकराचा कार्तिकेय पुत्र होय. दुसऱ्या बाजूला हत्तीचे मस्तक असलेला गणपतीचा तारा आहे. तेव्हा तोही पुत्र मानला गेला. रुद्राला खेटून एक नक्षत्र आहे त्याला एकशिंगी ( मिनो सरोज ) किंवा एकदंती म्हणतात. रुद्रासह या ताऱ्याला कॅनीस मेजर ( मोठा कुत्रा ) व गणेशाच्या ताऱ्याला कॅनीस मायनर ( लहान कुत्रा ) असे म्हणतात या ठिकाणी निहारिका N G C २२६४ आहे तिचा आकार मूषकासारखा आहे. म्हणून गणेशाचे वहान मूषक मानले गेले असले पाहिजे.

( अनवचद भायावाला, नवशक्ति, दि. २५–९–६९ )

वरील तारकांची भौगोलिक आकाशस्थ स्थिति पाहिली म्हणजे दक्षवधाचा अधिक खुलासा होतो. आकाशात दक्षाच्या धडापासून वेगळे झालेले शरीर, डोळे, नाक, जटादाढीसह असलेले मस्तक, व्याध, बाण इ. इ. तारे पाहिले म्हणजे या रूपकांचा खुलासा होतो. ज्याप्रमाणे काही नीतितत्त्वे सुरसकथांच्या रूपाने सांगितली म्हणजे लवकर समजतात. कहाणीरूपाने कथन केली म्हणजे धर्मतत्त्वात अंतर्भूत होतात. तद्वतच सृष्टिनिर्मितीमधील ही सत्य सृष्टि, रूपकाने आपल्या प्राचीन ऋषींनी रेखाटून ठेवलेली आहे पण सांप्रतचे टीकाकार, अथवा वाचक, त्या त्या पातळीवरून ह्या गोष्टी पाहण्यास असमर्थ असल्याने विपरीत भाव निर्माण करीत असतात

महाभारतामध्ये ( १२/२८३-८४ ) ह्या कथेमध्ये आणखी सुधारणा झाली. तसेच मत्स्य, कूर्म, पद्म, ब्रह्मांडपुराण ह्यामध्येही ह्याबाबत अधिक खल झालेला आढळून येतो, त्यानंतरच सांप्रतची कथा तयार झाली असावी. मध्ययुगीन म्हणजे साधारणत इ० स० १५–१६ शे पासून ह्या कथाभागाला रंग भरलेला दिसतो. त्याचा कथाभाग म्हणजेच दक्षयज्ञविध्वंस व सतीचा पुनर्जन्म हे आपण यापूर्वी मागे पाहिलेच आहे. स्वसामर्थ्याच्या जोरावर शंकरांनी आर्यसंस्कृतीमध्ये आपले श्रेष्ठ स्थान प्रस्थापित करून ते अद्यापपर्यंत अबाधित राखले आहे. देवीभागवत ( ७ ३० ) व कालिकापुराण ( भाग १८ ) यातील कथांवरून असे वाटते की, सतीच्या मरणाने शंकराचा कोप अनावर झाला आणि तिच्या मृतदेहासह त्याने तांडव नृत्य करण्यास प्रारंभ केला विष्णूने सुदर्शन-चक्राने तिच्या देहाचे तुकडे केले आणि पीठे निर्माण झाली.

## योनिकुंड

मोहेंजोदरो उत्खननापासून असे सिद्ध झाले आहे की, शिव आणि शक्तीची पूजा, आर्यलोक भारतामध्ये येण्यापूर्वीची आहे. लिंग व योनिभागांची प्रतीके तेथे सापडलेली आहेत. त्या वेळी त्याला शिस्नदेवी असे म्हणत असत. आदिशक्तीचे एक नाव भगवती असे आहे. ह्यांतील मूळ शब्द भग म्हणजे योनि अशा अर्थाचा आहे. भूमीवरील डोंगराचे उंच सुळके लिंगस्वरूप भासत असल्याने त्यांना कदाचित् स्वयंभु नाम प्राप्त झाले असावे. ह्यामुळेच पर्वत-माथ्यावर शिवलिंग अगर देवींची स्थाने आढळून येतात. महाभारतातील 'तीर्थयात्रा' प्रकरणात अशा तीन योनिकुंडांचा निर्देश आढळतो. पंजाबमधील भीमस्थान, उदयत पर्वत व गौरीशंकर शिखर ही ती तीन स्थाने होत ( महाभारत ३ : ८३–८५ ). भीमस्थान म्हणजे भीमादेवीचे स्थान. हे पेशावर जिल्ह्यात करमार येथे वसलेले आहे. सातव्या शतकात चिनी प्रवासी ह्युएनत्संगने ह्या स्थानाला भेट दिली होती. त्या काळी हे अतिशय प्रमुख क्षेत्र होते. तो म्हणतो की, पलुशा गावापासून ८ मैल ईशान्य दिशेला हे स्थान होते. स्वयंभु उंच पर्वत हाच होय. या क्षेत्री सात दिवस तपश्चर्या केल्यावर देवी प्रत्यक्ष दर्शन देते असा समज त्या काळी रूढ होता.

## चतुष्पीठांचा इतिहास

चतुष्पीठ हा शब्द रूढ होण्यास अकराव्या शतकातील बौद्धधर्मीय सहजयानपंथाचा 'चतुष्पीठ तंत्र' हा ग्रंथ कारणीभूत झाला असावा. बौद्ध-धर्मातील धर्मसूत्राप्रमाणे आत्मपीठ, परापीठ, योगपीठ व गुह्यपीठ ही मालिका आहे व त्यामध्ये योगिनींचा विचार झालेला आहे. सातव्या शतकामध्ये पद्मवज्र भिक्षूने 'हेवज्रतंत्र' ग्रंथ लिहिला. त्यामध्ये त्याने जालंदर, उदियान, पूर्णगिरी आणि कामरूप अशी चतुष्पीठांची यादी दिलेली आहे. कालिकापुराण ( ६४ : ४३, ४५ ) साधारणपणे हीच यादी देते. ( १ ) पश्चिमेला उदियान येथे कात्यायनी आणि भैरव जगन्नाथ, ( २ ) जालंदर येथे चंडीदेवी आणि भैरव महादेव, ( ३ ) पूर्णगिरी येथे पूर्णा अगर पूर्णशैला, पूर्णेश्वरी व भैरव महानाथ, व ( ४ ) कामरूप येथे कामेश्वरी व भैरव कामेश्वर.

अबुल फझलने 'ऐने-अकबरी' ग्रंथ सोळाव्या शतकाच्या शेवटी लिहिलेला असावा. त्यामध्ये चतुष्पीठांचा उल्लेख आढळतो.

( १ ) काश्मीरमध्ये शार्दी येथे शारदा, ( २ ) दक्षिणेत तुळजा, ( ३ ) आसाममध्ये कामाख्या व ( ४ ) नगरकोट येथे जाल्दरी. नगरकोट येथील देवीबद्दल तो लिहितो की, दूर दूर अंतरावरून भक्तगण येथे दर्शनाला येतात, व आपली

जिव्हा देवीला समर्पण करतात. परंतु आश्चर्य असे की कोणाची जिव्हा दोन दिवसांत परत मिळते तर कोणाची चार, आठ दिवसांत मिळते. हा सर्व देवीचाच कृपाप्रसाद समजला जातो.

कालिका पुराणातील एका प्रकरणामध्ये जरी चार पीठे सांगितली असली तरी दुसऱ्या एका प्रकरणात तीं सात सांगितली आहेत. रुद्रयामल तंत्र हे साधारणतः इ. स. १०५२ च्या सुमारास लिहिले गेले. त्यामध्ये दहा स्थाने सांगितली आहेत ती ह्याप्रमाणे—( १ ) कामरूप, ( २ ) जालधर, ( ३ ) पूर्णागिरी, ( ४ ) उडियान, ( ५ ) वाराणसी, ( ६ ) ज्वल्ती ( ज्वालामुखी ), ( ७ ) मायावती ( ८ ) मधुपुरी, ( ९ ) अयोध्या, ( १० ) कांची हीं होत.

जयपूरजवळ चतुष्पीठ पर्वत आहे. त्याचा ह्या पीठांबरोबर काय संबंध आहे तो अद्याप प्रस्थापित झालेला नाही. वज्रतंत्र व कालिपुराणाप्रमाणे तीं पीठे चारच आहेत. ह्या पीठांच्या स्थानावरून एक गोष्ट सिद्ध होते की, त्याकाळी तंत्र निर्मितीची ही पीठे वायव्य भागात, गंधर्व उड्डियान, जालधर ह्याच भागात होती. ह्याचे कारणही उघडच आहे. उडियान येथील राजा इंद्रभूति हा बौद्ध पंथाचा होता त्याने 'ज्ञानसिद्धि' व इतर ग्रंथ लिहिलेले आहेत हा राजा पद्मसंभवाचा पिता होय. पद्मसंभवाने इ. स. ७४७ मध्ये तिबेटमध्ये पहिला बौद्धमठ स्थापन केला आणि त्या धर्माचा प्रसार केला पद्मसंभवाची बहीण लक्ष्मीकारा ही सुद्धा ज्ञानी स्त्री होती. तिने 'अद्वयसिद्धितंत्र' लिहिलेले आहे. कालांतराने हा भूभाग मुस्लीम धर्मांच्या वर्चस्वाखाली आल्यावर ह्या ठिकाणचे महत्त्व कमी होऊन ते बंगाल, आसाम भागात काली-कामाख्या देवींच्या भोवती स्थिरावले.

सम्राट् समुद्रगुप्ताने चवथ्या शतकात अलाहाबाद येथे जो स्तूप उभारला आहे त्यावर कामाख्या देवीचे नाव आढळते. गौरीशंकरचे 'स्तन कुंड' म्हणजेच सांप्रतचे 'सीताकुंड' होय. ह्या कुंडाचेही नाव आढळते. आसाममधील च्युतिया ही वन्य जमात काली देवीची उपासक आहे. ह्या देवीला ते 'केसाई खाती' असे नाव देतात. ह्या शब्दाचा अर्थ कच्चे मांस भक्षण करणारी देवता असा आहे. एखाद्या माणसाला ह्या जातीने मृत्यूची शिक्षा दिली तर त्याला ह्या देवीसमोर बळी देण्याचा प्रघात होता. ह्या देवीला नरबळी देण्यासाठी काही वेळा अन्य जमातींमधून माणसे विकत घेत. त्यांना भरपूर जेऊ खाऊ घालीत, आणि नंतर बळी देत. टिपरोज, कचारिज, जतिया ह्या इतर जमातीसुद्धा 'केसाईखाती' देवीला नरबळी देत असत.

चतुष्पीठाचे ठिकाणी सतीचे अवयव पडलेले दाखविले आहेत. ते खालप्रमाणे कालिकापुराण अध्याय १८ प्रमाणे ( १ ) देवीकूट ( बंगाल )

ह्या ठिकाणी दोन्ही पाय पडले आणि देवीला ' महाभागा ' असे नाव प्राप्त झाले. ( २ ) उड्डियान येथे दोन्ही मांड्या पडल्या व देवीचे नाव ' कात्यायनी ' झाले. ( ३ ) कामगिरी येथे योनिभाग पडला आणि देवीचे नाव 'कामाख्या ' झाले. ( ४ ) कामाख्याच्या पूर्वेस नाभिभाग पडला आणि तिचे नाव ' दिक्करवासिनी ' झाले. दिक्कर हे गाव सपदा शहराजवळ आहे. ( ५ ) जालंदर येथे दोन्ही स्तन खाली पडले आणि देवीला ' चंडी ' हे नाव मिळाले. ( ६ ) पूर्णगिरी येथे ग्रीवा व स्कंद हे पडले आणि ' पूर्णेश्वरी ' असे नामकरण झाले. ( ७ ) कामरूपच्या सीमा भागात मस्तक पडले, आणि देवीनाव ' ललितकांता ' असे झाले. आपण वर पाहिलेच आहे की, कालिकापुराण प्रथम भागात चारच पीठे देते, तर १८ व्या अध्यायात वरीलप्रमाणे ७ पीठे देते म्हणजे संख्या वाढत वाढत ४ ची ७ झाली आहे

' ज्ञानार्णव तन्त्रा 'मध्ये एके ठिकाणी आठ पीठे सांगितली आहेत, तर पटल १४ मध्ये ती ५२ असल्याचा उल्लेख आहे. ' रुद्रयामल तन्त्र ' इ. स. १०५२ च्या पूर्वी तयार झालेले असावे, त्यामध्ये पूर्वी निर्देशित केल्याप्रमाणे १० पीठे दिलेली आहेत. ज्ञानार्णवतन्त्रकाराने मायावती व मधुपुरीची भर घालून ती दहा पीठे केली ' कुलार्णव ' तन्त्राप्रमाणे ती १८ झाली. हिंगुळा, कोटिमुद्रा, अंतर्वेदी, प्रयाग, मिथिला, मागध, मेखला, अंगवंग, कलिंग, सिंहल, स्त्रीराज्य, राधा, गौडा इ० ह्याचा अर्थ असा की, ही सर्व पीठे तन्त्रकाराने नवीनच निर्माण केली आहेत कारण ह्यामध्ये इतर ग्रंथांतील एकही नाव नाही ह्या काळापर्यंत पीठ-संख्या १८ पर्यंत गेली रॉयल् एशियाटिक सोसायटी, बंगाल येथे ' अष्टादशपीठ ' म्हणून एक हस्तलिखित प्रत उपलब्ध आहे. ह्यानंतरचा काळ म्हणजे ' कुब्जिका-तन्त्राचा ' होय त्यामध्ये त्याची संख्या एकदम नवी, जुनी मिळून ४२ पर्यंत नेण्यात आली आहे ह्यात देवीची स्थाने बहुधा जास्त आहेत, परंतु त्यात ' विंध्य-वासिनी 'चा उल्लेख नाही ' ज्ञानार्णवतन्त्रा ' मध्ये ती पीठसंख्या ५२ झाली आहे ह्यातील बराचसा भाग ' तन्त्र चूडामणि ' ह्या ग्रंथात घेतला गेला आहे. पण ह्या यादीमध्ये ' शक्तिपीठ ' म्हणून अमरकटकेश्वर, कैलास, केदार, ओंकार मान्धाता, गोकर्ण, कालेश्वर, महेन्द्र इ० अनेक शंकराच्या स्थानांचा उल्लेख आहे ह्या पीठांना ' शक्तिपीठे ' म्हणण्याऐवजी ' शिवपीठे ' म्हणणेच अधिक योग्य होईल ती ' शक्तिस्थाने ' असली तरी ' शक्तिपीठे ' मात्र नव्हेत तेव्हा सर्व साधक बाधक विचार केल्यावर असे दिसते की, ' कुब्जिका तन्त्रा 'तील यादी साधारणपणे बरोबर आहे

' पीठनिर्णय ' हा ग्रंथ पीठसंख्या ५१ करतो त्यामध्ये चितागाव, टिपेरा, नलहाटी, वक्रेश्वर, जेसोर, कालीघाट ही नवीन पीठे कुब्जिका तन्त्राला जोडतो, पण ' उड्डियान ' सारखी काही मूळ पीठे गाळून टाकतो हा ग्रंथकर्ता बंगाली

असल्याने पीठसंख्या वाढविण्याच्या उद्देशाने, आसपासची काही स्थाने मूळ यादीला जोडून ती संख्या वाढविली असावी. कारण श्लोक ४८ ते ५५ हे श्लोक मागाहून जोडलेले दिसतात. कवि मुकुंदरामने 'चंडीमंगल' काव्यात पीठे सांगताना म्हटले आहे की, (१) घाटशीला येथे (खरगपूर व टाटानगर ह्यांच्या मध्यभागी) सतीचा डावा पाय पडला आणि त्या ठिकाणी रुक्मिणी देवीचे पीठ तयार झाले. वास्तविक ह्या ठिकाणी शांकिनी देवीचे स्थान आहे. तुळजापूर येथे घाटशीला आहे; पण तेथे तुकाई देवीचे स्थान आहे. (२) हिंगुळा येथे नाभीचा भाग पडला. वास्तविक ह्या ठिकाणी ब्रह्मरंध्र भाग पडलेला आहे. (३) वळीडागा (जि० हुगळी) त्या ठिकाणी उजवा दात पडला व तेथे राजेश्वरी देवता उत्पन्न झाली. इतर ग्रंथाबरोबर ह्या काव्याची तुलना केली तर ही यादी बरोबर नाही असे वाटते. तात्पर्य, तंत्रकार अगर लेखक ज्या भागातील असेल त्याच भागात त्याने अनेक 'शक्तिपीठे' घडविली आहेत मग ती बरोबर असोत की चूक असोत. शिवचरित्रामध्ये ५१ पीठे दिलेली आहेत; पण 'नल्हाटी' पासून पुढील आठही पीठे त्यात दिलेली नसून त्याऐवजी तारा, मनाखंड, मणिवेद, कोनामुख, विंध्येश्वर, इ० नवीनच पीठे त्यात दिलेली आहेत. तेव्हा पीठाचा निर्णय सर्वच बरोबर आहे असे समजण्याचे कारण नाही.

ऋग्वेदापासून शक्तिपीठाची संख्या कशी वाढत गेली हे समजावे म्हणून वरील खुलासेवार वर्णन करण्याची जरूरी भासली. प्रत्येक लेखक आपली म्हणून काही तरी नवीन भर घालण्याचा प्रयत्न करतो. काही वेळा ती पचते पण काही वेळा ती उघडकीस येते. असो. एकावन्न शक्तिपीठे जी मानली जातात त्यांची यादी खाली दिल्याप्रमाणे आहे ती प्रत्येकाने भाविकपणे व श्रद्धेने पहावी ही विनंति.

एकावन्न शक्तिपीठे

पंचाशदेकपीठानि एवं भैरवदेवता: ।
अङ्गप्रत्यङ्गपातेन विष्णुचक्रक्षतेन च ॥ १ ॥
ब्रह्मरन्ध्रं हिंगुलायां भैरवो भीमलोचन: ।
कोट्टरी सा महामाया त्रिगुणा या दिगम्बरी ॥ २ ॥
करवीरे त्रिनेत्रं मे देवी महिषमर्दिनी ।
क्रोधीशो भैरवस्तत्र सुगन्धायां च नासिका ॥ ३ ॥ इ. इ.

तंत्रचुडामणि, महापीठनिर्णय इ० ग्रंथामध्ये एकावन्न पीठाचे वर्णन वरीलप्रमाणे श्लोकरूपाने केलेले आहे. पीठांचे नाव, अंगप्रत्यंगाचा अंश, तेथील देवता आणि भैरव इत्यादि वर्णन आढळेल, ते येणेप्रमाणे—

| पीठाचे नाव | सतीचा पडलेला अवयव | पीठदेवता | पीठ-भैरव |
|---|---|---|---|
| १ श्रीशैल, श्रीहट्ट | ग्रीवा | महालक्ष्मी, महामाया | सवरानंद, समरानंद |
| २ श्रीपर्वत | दक्षिण कर्ण ( गुल्फ ) | सुंदरी | सुंदरानंद, सुनंदानंद |
| ३ उज्जयिनी, उजानी | कूर्पर ( कोपर ) | मगला मंगलचंडी | कपिलेश्वर |
| ४ करतोया तट | वामकर्ण ( गुल्फ ) | अपर्णा | वामेश अथवा वामन |
| ५ कालमाधव | नितंब | काली | भद्रसेन |
| ६ कांची | कंकाल, अस्थि | देवगर्भा | रुद्र |
| ७ कुरुक्षेत्र | दक्षिण गुल्फ | सावित्री | स्थाणु, स्नायु |
| ८ कन्याश्रम | पृष्ट दृष्टि | शर्वाणि | निमिश |
| ९ कालीपीठ ( कालीघाट ) | दक्षिण पदांगुली | काली | नकुलेश, नलीश |
| १० कामगिरी | महामुद्रा ( योनी ) | कामाख्या | उमानंद, शिवानंद, रावणानंद |
| ११ करवीरा सरकरारा | त्रिनेत्र | महिषासुरमर्दिनी | क्रोधिश, क्रोधेश |
| १२ काश्मीरा | कण्ठ | महामाया | त्रिसंध्येश्वर |
| १३ किरीट, किरीट-कोना | किरीट | भुवनेशी, विमला | सिद्धरूप, संवर्त |
| १४ गोदावरी तीर | वामगंड | विश्वेशी, राकिनी | विश्वेश, दंडपाणि |
| १५ गंडकी | गंडा ( कपोल ) ( गंडस्थल ) | गंडकी, चंडी | चक्रपाणि, जगन्नाथ |
| १६ नट्टल ( चंद्रशेखर ) | दक्षिण बाहु | भवानी | चंद्रशेखर |
| १७ जलस्थान, जलस्थल | चिबुक | भ्रामरी | विकृत, विकृताक्ष |
| १८ जयंती, जयता | वाम जांघ | जयंती | क्रमदीश्वर |

| पीठाचे नाव | सतीचा पडलेला अवयव | पीठदेवता | पीठ भैरव |
|---|---|---|---|
| १९ जालंदर | स्तन ( वाम ) | त्रिपुरमालिनी, त्रिपुरनाशिनी | भीषण, ईशान |
| २० ज्वालामुखी | जिव्हा | सिद्धिदा, अंबिका | उन्मत्त |
| २१ त्रिपुरा | दक्षिण पाद | त्रिपुरा, त्रिपुरसुंदरी | त्रिपुरेश, त्रिपुरांत |
| २२ त्रिस्रोता | वाम पाद | भ्रामरी, अमरी | ईश्वर, अमर |
| २३ नेपाळ | जानु | महामाया | कपाली |
| २४ नर्मदा, शोण, शैल | नितंब | शोणा, नर्मदा | भद्रसेन |
| २५ पंचसागर | अधोदंत | वाराही | महारुद्र |
| २६ प्रयाग | हस्तांगुली | ललिता | भव |
| २७ प्रभास | उदर, अधर | चंद्रभागा | वक्रतुंड |
| २८ बहुला, बाहुला | वाम बाहु | बहुला, बाहुला | भिरुका, तीव्रक |
| २९ भैरवपर्वत, भीरुपर्वत | ऊर्ध्वोष्ठ, तुंड | अवंती | लंबकर्ण, नम्रकर्ण |
| ३० मणिकर्णिका ( काशी ) | कुंडल | विशालाक्षी | कालभैरव |
| ३१ मणिवेद, मणिवेदिक | मणिबंध | गायत्री | सर्वानंद |
| ३२ मानस, मालव | दक्षिणहस्त | दाक्षायणी | हर, हरी, अमर |
| ३३ मिथिला | वाम स्कंध | उमा–महादेवी | महोदर |
| ३४ युगाद्या, क्षीरग्राम | दक्षिण पदांगुष्ठ | युगाद्या | क्षीरकंठ, क्षीरखंड |
| ३५ रत्नावली | दक्षिण स्कंध | कुमारी, शिवा | कुमार, शिव |
| ३६ रामगिरी, राजगिरी | नला, नासा, स्तन | | |
| | | शिवानी | चंडा |

| पीठाचे नाव | सतीचा पडलेला अवयव | पीठदेवता | पीठ भैरव |
|---|---|---|---|
| ३७ वैद्यनाथ | हृदय | जयदुर्गा | वैद्यनाथ |
| ३८ वरजाक्षेत्र ( उत्कल ) | नाभी | विमला, विजया | जगन्नाथ, जय |
| ३९ वृंदावन, केशजाल | केस | उमा, कात्यायनी | भूतेश, कृष्णनाथ |
| ४० विभास | वाम गुल्फ | भीमरूपा, कपालिनी | कपाली, सर्वानंद |
| ४१ शुचि, अनल | उर्ध्वदंत | नारायणी | संहार, संकूर |
| ४२ सुगंधा | नासिका | सुनंदा, सुगंधा | त्र्यंबक |
| ४३ हिंगुला, हिंगुल्ता | ब्रह्मरंध्र | कोट्टरी, कोट्टवी | भीमलोचन |
| ४४ नलहाटी | नला | काली | योगीश, योगेश |
| ४५ कालीपीठ ( कालीघाट ) | मुडा | जयदुर्गा | क्रोधेश, क्रोधिश |
| ४६ वक्रेश्वर | मानस, मन | महिषासुरमर्दिनी | वक्रनाथ |
| ४७ यशोरा | वाम पाणि | यशोरेश्वरी | चंड, चंडेश |
| ४८ अट्टहास | ओठ | फुल्लारा | विश्वेश |
| ४९ नंदीपुरा | कंठहार | नंदिनी | नंदिकेश्वर |
| ५० लंका | नूपुर | इंद्राक्षी | राक्षसेश्वर, नंदिकेश्वर |
| ५१ विराट | पदांगुली | अंबिका | अमृताक्ष |

पीठाच्या वरील यादीमध्ये आपण सर्व तपशीलवार माहिती पाहिली. परंतु वरील यादी वाचून ही पीठे कोणत्या स्थळी आहेत ह्याचा बोध होत नाही. म्हणून देवींच्या भक्तांसाठी ही माहिती खाली देत आहे.

(१) श्रीशैल

श्रीशैल ह्या शब्दाऐवजी 'श्रीहट्ट' हाच पाठ 'आनंद मंगलकार' पसंत करतात. कारण ह्याच यादीमध्ये 'श्रीपर्वत' हे स्थान आलेच आहे. तेव्हा ह्या ठिकाणी श्रीहट्ट म्हणजे आजचे 'सिल्हेट' गाव होय. सिल्हेट पासून जवळच गोटीकर जैनपूर ह्या गावी हे पीठ नांदते आहे. इतिहासकार रा. रा. सरकार ह्यांचे जरी हे मत असले तरी दक्षिणेत 'श्रीशैल' पर्वत आहे, व तेथे भ्रमरांबिका देवींचे पीठ आहे. ही सत्य गोष्ट बाजूला ठेवून हे पीठ बंगालमध्ये नेण्यात त्यांचा "आन्तरः कोऽपि हेतुः" समजत नाही.

(२) श्रीपर्वत

कृष्णा नदीच्या दक्षिणेस नल्लमल्लूर पर्वताच्या मालिकेत हा पर्वत आहे. परंतु ह्या ठिकाणी शिवतीर्थ मल्लिकार्जुन व भ्रमरांबा देवी आहे. ह्यांचा यादीमध्ये उल्लेख नाही. यादीत उल्लेख केल्याप्रमाणे त्या ठिकाणी सुंदरीदेवीची मूर्ति नाही. दक्षिण गुल्फ ह्या ठिकाणी पडला असे म्हटले आहे. पण कुरुक्षेत्राच्या ठिकाणीही तोच अवयव पडलेला सांगितला आहे. ह्यावरून इतकेच म्हणता येईल की, स्तोत्रकारानी श्रीपर्वताचे वर्णन बरोबर केलेले नाही.

(३) उज्जयिनी

माळव्यातील ह्या शहरी, बारा ज्योतिर्लिंगापैकी महाकाळ ही प्रमुख देवता आहे. परंतु वरील यादीमध्ये तिचा निर्देश नाही. त्याऐवजी कपिलेश्वराचे नाव दिलेले आहे. 'आनदमंगल'कार हा पाठ 'उजानी' असा देतो. हे गाव बंगालचे बरद्वान जिल्ह्यातील कोग्राम होय. पण सर्वसाधारणपणे उज्जयिनी हाच पाठ मान्य मानला गेला आहे.

(४) करतोया तट

करतोया हे उत्तर बंगालमधील एका नदीचे नाव आहे. बोग्रा जिल्ह्यातील भवानीपूर ह्या गावी हे देवीचे स्थान आहे.

(५) श्रीमाधव

स्थान निश्चितपणे सांगता येत नाही.

(६) कांची

कांची हा शब्द उच्चारला म्हणजे साधारणपणे वाचक दक्षिणेतील कांची अगर कांजीवरम् ही भूमि समजतो आणि शिवकांची येथील कालीमंदिर त्याचे दृष्टिसमोर उभे राहते. पण हे पीठ जि. वरद्वान, धोलपूरजवळ कामाय ह्या गावी दाखविले आहे.

(७) कुरुक्षेत्र

'आनंदमंगलकार' श्लोक २१ मध्ये थोडासा फरक करतात. त्यावरून स्थाणुभैरव म्हणजे जि. कर्नाळमधील थाणेश्वर असावा. कुरुक्षेत्र ही भारतीय युद्धाची समरभूमि म्हणून सर्वांना परिचित आहेच. द्वैपायन सरोवराजवळ हे पीठ आहे.

(८) कन्याश्रम

उत्तर प्रदेशामधील कान्यकुब्ज अथवा कनोज हे शहर असावे. परंतु तंत्रशास्त्रकाराना हे मत मान्य नाही. दीक्षा देण्यासाठी कोणती क्षेत्रे वर्ज्य करावी ह्याची यादी त्यानी दिली आहे. ती अशी,

> गंगायां भास्करक्षेत्रे विरजे चंद्रपर्वते।
> चट्टले च मतंगे च तथा कन्याश्रमेषु च॥

बंगाली तंत्रशास्त्रज्ञाना हे पीठ माहित होते. आणि म्हणूनच, कन्याश्रमः चंद्रशेखरगिरिसमीपवर्ती॥ असे त्यांनी म्हटले आहे. ह्याचा अर्थ जि० चितगाव-मधील कुमारीकुंड होय. कन्याकुमारीमंदिर परिसरातील भद्रकालीचे स्थान असे आणखी एक मत आहे.

(९) कालीपीठ

गंगा नदीच्या किनारी कालीघाट, कलकत्ता. (दक्षिणेश्वरकाली निराळी आहे.)

(१०) कामगिरि

म्हणजे कामाख्या होय. ह्या पीठालाच कोणी कामेश्वर अथवा महागौरी पीठ असे म्हणतात. ह्या क्षेत्रामध्ये दशमहाविद्येचे स्थान आहे. त्याची नावे— भैरवी, कामाख्या मातंगी, प्रकाण्डचण्डिका (छिन्नमस्ता), त्रिपुरा, अंबिका, बगला, भुवनेश्वरी, धुमिनी.

(११) करवीरा

करवीर व सरकरारा हे पीठ एकच समजले जाते, पण ते बरोबर वाटत नाही. करवीर म्हणजे दक्षिणेतील कोल्हापूर होय. तर सरकरारा म्हणजे सिंधमधील सक्कर

शहर होय. कालिकापुराणाप्रमाणे (भाग ३८-३९) ब्रह्मावर्त प्रांताची (पूर्व पंजाब) शक्कर ही राजधानी होती; आणि ती दृषद्वती नदीच्या तीरावर वसलेली होती. असे असले तरी करवीर म्हणजे कोल्हापूर हाच अर्थ घेतला जातो. जरी तसा तो घेतला जात असला तरी तेथील देवता महालक्ष्मी आहे, महिषासुरमर्दिनी नव्हे. 'पीठनिर्णया'मध्ये तर तेथील देवता महिषासुरमर्दिनी ही दिली आहे.

(१२) काश्मीरा

काश्मीर प्रांतात श्रीनगर ते वोलार ह्या मार्गावर शारदा अथवा शारदी हे क्षेत्र आहे. दुसरे मत असे आहे की, अमरनाथ येथील गुहेत बर्फाच्छादित शक्तिपीठ आहे.

(१३) किरीट

जि. मुर्शिदाबादमधील लालबागजवळ वट नगर गावी, गंगानदीच्या तीरावर आणि हावरा लालबाग-कोर्ट मार्गावर हे ठिकाण आहे.

(१४) गोदावरी तीर

राजमहेन्द्री स्टेशनजवळ कुब्बुर कोटीतीर्थ हे पीठ असावे.

(१५) गंडकी

गंडकी नदीचे उगमस्थान, साळग्राम अथवा मुक्तिनाथ तीर्थ. ही नदी बिहारमध्ये भवलपूर येथे गंगा नदीला मिळते

(१६) चट्टल

म्हणजेच आजचे सीताकुंड होय. हे जि. चितगावमधील चंद्रनाथ पर्वतावर आहे.

(१७) जनस्थान

नाशीक शहरातील भद्रकालीचे मंदिर असावे.

(१८) जयंती

जि. सिल्हेट बौरभोगजवळ जयंतियागिरी भागी कळजोर गावी आहे. श्री. कर्नल गेट आपल्या आसामच्या इतिहासामध्ये (पृ २६८) म्हणतात की, फजलपूर परगण्यामध्ये एका गावी एक शक्तिपीठ आहे. ह्या ठिकाणी सतीचा डावा पाय पडला असल्याची दंतकथा आहे नवरात्रातील नवमीला ह्या पीठाला नरबळी नरबळी अर्पण करीत. एकादा भक्त आपला नवस फेडण्याच्या दिवशी नरबळी अर्पण करीत असे. बळी जाणारा मनुष्य त्यापूर्वी काही दिवस स्वेच्छेने वागे. ती

खाणे, पिणे, संभोगादि सर्व इच्छा तृप्त करून घेई आणि मग तो बळी दिला जात असे. जेव्हा स्वेच्छेने बळी जाणारी माणसे दुर्मिळ झाली तेव्हा धाटमारी करून बळी दिला जात असे.

### (१९) जालंधर

पंजाबमध्ये जालंधर शहरी.

### (२०) ज्वालामुखी

पंजाबमधील ज्वालामुखी देवीचे स्थान.

### (२१) त्रिपुरा

त्रिपुरा संस्थानमधील राधाकिशोरपूर हे पीठ होय. ह्या पीठाचे पूर्वीचे नाव 'रंगमति' अगर उदयपूर असे होते. धर्ममाणिक्य ह्या शक राजाने येथे सन १५०१ साली मंदिर बांधले. पुराणकाळातील त्रिपूर अगर त्रिपुरी म्हणजे सांप्रतचे जबलपूरजवळील तेवार हे गाव होय.

### (२२) त्रिस्रोता

जि. जलपैगुरी येथील शालमारी पीठ होय. त्रिस्रोता म्हणजे ब्रह्मपुत्रा नदीला मिळणारी ल्हानशी नदी होय. ह्या पीठाला त्रिहुत अगर तिरहुत असे म्हणतात. 'आनंदमंगल'कार म्हणतात की, स्त्री ह्या संस्कृत शब्दाबद्दल असामी भाषेत 'ति' लिहिण्याचा प्रघात आहे. म्हणून हे तिरोता झाले, आणि नंतर त्याचा अपभ्रंश तिरहुत असा झाला असावा.

### (२३) नेपाळ

नेपाळमध्ये ह्या पीठाचे नेमके स्थान कोणते ह्याचा शोध लागलेला नाही. पशुपतिनाथाजवळ हे स्थान असावे असे म्हणावे तर वरील यादीमध्ये तेथील भैरव कपाली हा दिलेला आहे, त्यात पशुपतिनाथाचा उल्लेख नाही. पशुपतिनाथाजवळ गुह्येश्वरी देवीचे स्थान आहे. त्याचा संबंध असावा असे वाटते.

### (२४) नर्मदा

हे पीठ शोणनद अगर नर्मदानदी ह्यांपैकी कोठे असावे, ह्याबद्दल निश्चिती नाही. दीड मैल अंतरावर नर्मदादेवी अथवा शोणादेवीचे मंदिर आहे.

### (२५) पंचसागर

ह्याचा वाच्यार्थ पांच सागर असा होतो पण जनरूढीमध्ये 'सप्तसागर' नावाने प्रसिद्ध आहे. हरिद्वार येथे पांच कुंडे आहेत तेच पीठ बहुधा असावे.

(२६) प्रयाग

गंगा-यमुनेच्या पवित्र संगमावर वेणीमाधव भैरवाचे मंदिर आहे, ते स्थान असावे. वरील यादीमध्ये 'भैरव-भव' असा उल्लेख आहे. कोणी तंत्रशास्त्र असे मानतो की, सतीच्या हाताची बोटे या ठिकाणी पडली म्हणून कामाख्या येथील दशमहाविद्येचे स्थान ह्या ठिकाणी आणतात, पण ते बरोबर नाही. प्रसिद्ध पुराण वटवृक्ष मंदिरातील अथवा शहरातील ललितादेवीचे हे स्थान असावे असेही आणखी एक मत आहे.

(२७) प्रभास

काठेवाडातील सोमनाथ हे प्रसिद्ध क्षेत्र होय. अधर देवीचे स्थान ह्या ठिकाणी आहे असे मानतात. पण उदर ह्या शब्दाचा तो अपभ्रंश असावा. अरासुरी अथवा येथील देवीलाही अधर देवी असे म्हणतात. परंतु प्रभास हे अति प्राचीन व प्रसिद्ध तीर्थक्षेत्र 'सोमनाथ' असल्याने तेच स्थान खरे मानावे लागेल.

(२८) बहुला

जि. बरद्वान, बट्टा ह्या तालुक्याच्या गावाजवळ केतुग्राम ह्या ठिकाणी हे पीठ आहे.

(२९) भैरवपर्वत

हे पीठ कोठेतरी माळव्यात असावे, कारण तेथील देवता अवन्ती दिली आहे. म्हणजे ह्याचा संबंध अवन्तीनगराबरोबर आहे किंवा काय हे निश्चित नाही. काहींच्या मते ते गिरनारपर्वताजवळ आहे.

(३०) मणिकर्णिका

वाराणसी येथील गंगाकाठचे मणिकर्णिका हे तीर्थ होय.

(३१) मणिवेद

ह्या ठिकाणी मनगटाचा भाग पडला. स्थान अनिश्चित, कदाचित् आसाम-मधील मणिपुर हे स्थान असावे, कारण तेथे गायत्री व सावित्री मंदिरे आहेत. पण पुष्कर येथे गायत्रीपर्वतावर ही दोन्ही मंदिरे आहेत

(३२) मानस

जेथून ब्रह्मपुत्र नदी उगम पावते, ते हे हिमालय पर्वतावरीलस्थान होय. उज्जयिनी हे पीठ अलग दिले असल्याने, माल्य हा पाठभेद बरोबर नाही.

(३३) मिथिला

नेपाळ तराईमधील जनकपूर गावाच्या आसपास हे असावे. पण निश्चितपणे कोणते ते सांगता येणार नाही. आसपासची देवतास्थाने पुढील प्रमाणे,

( १ ) बत्तीस मैलांवर उच्चैठमधील दुर्गामंदिर

( २ ) नऊ मैलांवर वनदुर्गामंदिर.

( ३ ) सहरसा स्टेशनपासून थोडी अंतरावर उग्रतारादेवीचे मंदिर.

( ४ ) सलौना स्टेशनपासून सहा मैलांवर जयमंगलादेवीचे मंदिर.

याबाबत आपण थोडा विचार करू. या पीठाची, पहिली यादी महाभारत (६-२३)मध्ये दिली आहे, तर वराचसा भाग स्कंदपुराण, पद्मपुराण यांतही आलेला आहे. तोच देवीभागवतामध्ये आहे. येथे जरी पीठस्थान व देवीचे नाव दिले असले तरी वैगुण्य असे की, सतीचा कोणता अंश ह्या ठिकाणी पडला हे दिलेले नाही. म्हणून ह्याला शक्तिपीठ न म्हणता देवीस्थाने म्हणणेच योग्य होईल.

(३४) युगाद्या

जिल्हा बरद्वान, वद्वाजवळ क्षीरग्राम हे स्थान होय

(३५) रत्नावली

जिल्हा हुगळी, रत्नाकर नदीवरील खानकुल-कृष्णनगर हे गाव असावे काव्यमीमांसा ग्रंथामध्ये रत्नवती नावाचे शहर आहे पण संबंध निश्चित झालेला नाही, कोणी असे मानतात की, नेपाळमधील बागमती रत्नावली नद्यांचे संगम-क्षेत्र ' प्रमोदतीर्थ ' होय.

( ३६ ) रामगिरी

नागपूरजवळील रामटेक हे स्थान होय काही वेळा बुंदेलखंडातील चित्रकूट क्षेत्र मानतात

( ३७ ) वैद्यनाथ

बिहारमधील संताळ परगण्यातील देवघर-वैद्यनाथ धाम हे ठिकाण होय.

( ३८ ) वरजाक्षेत्र

जिल्हा कटकमधील जयपूर हे पीठ अगर जगन्नाथपुरी येथील विमलादेवीचे मंदीर होय

( ३९ ) वृंदावन

मथुरा शहराजवळील वृंदावनाच्या मार्गावर हे क्षेत्र आहे पण ह्या ठिकाणी वैष्णवपीठ आहे, शक्तिपीठ नाही तेव्हा कदाचित् कृष्णजन्मस्थान म्हणून

शाक्तलोक ह्या क्षेत्रावर हक्क सांगत असावेत. पण याचा उलगडा दुसऱ्या एका तऱ्हेने करण्यासारखा आहे. मूळ पाठ असा—"उमावने केशजालं भूतेशः परभैरव.।" उमावन हा भाग देवीकोट म्हणून ओळखला जातो. त्यामध्ये सतीचे केश पडल्यामुळे केशजाळ हे पीठाचे नाव पडले असावे.

(४०) विभास

जिल्हा मिदनापूर. तुमलुकजवळ कालीमंदिर हे पीठ आहे.

(४१) शुची

कन्याकुमारीपासून ८ मैलांवर शुचिंद्रम् शिवमंदिर.

(४२) सुगंधा

जिल्हा बारीसालच्या उत्तरेस सुमारे १३ मैलांवर शिकारपूर हे गाव आहे. ह्या स्थानाचा भैरव, त्र्यंबकाचे मंदिर सोंधा नदीच्या तीरावर पोना-घाग्या-समराईल ह्या ठिकाणी आहे. सुनदा नदीवरून सुगंधा हे नाव आले असावे.

(४३) हिंगुळा

हे बलुचिस्तानामध्ये हिंगुळा नदीच्या उगमस्थानी आहे. तेथील देवी कोटवी याचा संस्कृत अर्थ विवस्त्र स्त्री असा आहे. ह्या देवीला नानी बिबी असे म्हटले जाते. कुशान राजांनी आपल्या नाण्यांवर "दिगंबरी" म्हणजे ह्याच देवीची मूर्ति घातली आहे.

(४४) नल्हाटी

नळहाटी ह्या गावी, हावरा व मूल मार्गावर आहे.

(४५) कालीपीठ

जिल्हा बरद्वान, कट्वाजवळ जुरनपूर ह्या गावी हे पीठ आहे. कलकत्ता येथील कालीघाट पीठावर सतीची दक्षिण पदांगुळी पडलेली आहे. मुद्रा नव्हे. तेव्हा नामसादृश्यावरून संशय न यावा. पीठदेवतांची नावेही निराळीच आहेत. पण कलकत्ता येथील आदिकाली देवीचे मंदिर असावे असे एक मत आहे.

(४८) अट्टहास

जिल्हा वीरभूम, लाभपूर ह्या गावी, अहमदपूर–कट्वा मार्गावर.

(४९) नदीपुरा

जिल्हा वीरभूम, सैनथिआ ह्या गावी हे स्थान हावरा–क्यूल मार्गावर आहे.

(५०) लंका

येथील भैरवाची नावे नंदिकेश्वर अथवा राक्षसेश्वर अशी आहेत. त्यावरून हे पीठ सीलोनमध्ये असावे. पण निश्चित ठिकाण माहीत नाही.

(५१) विराट

प्राचीन विराट, म्हणजे सांप्रतचा जयपूर–अलवार–भरतपूर हा भाग होय. परंतु काहींच्या मताने तो देश बंगालमध्ये आहे जयपूरपासून ४० मैलावर वैराट ग्रामी हे पीठ आहे, असे आढळून आले आहे.

वरील पीठ स्थानाची जरा बारकाईने विचक्षणा केली, तर असे आढळून येईल की, बहुसंख्य शक्तिपीठे ओरिसा, बंगाल, आसाम ह्या भागातच आहेत. इतर प्रदेशाच्या वाट्याला हाताच्या बोटावर मोजण्याइतपतही नाहीत याच कारणास्तव म्हटले जात असावे की, बंगालमध्ये शक्तिपूजक अधिक आढळून येतात. एखाद्या पीठास भेट दिली असता यादीमध्ये सांगितल्याप्रमाणे पीठदेवता व भैरवस्थाने आढळून येतीलच ह्याचा भरवसा नाही. ह्याचे कारण असे संभवते की, एकतर ग्रंथकारांनी पीठ-स्थानांची यादी तयार केली नसावी, अगर कालांतराने मूर्ति नाहीशा झाल्या असाव्यात, अथवा नावे बदलली असावीत. कसेही असो देवी पीठाची कल्पना येण्यास ही माहिती उपयुक्त होईल, असा विश्वास वाटतो.

वरील पीठ स्थानांबद्दलचे संस्कृत श्लोक, महापीठनिर्णय (५८), आनंदमंडळ (४०), तन्त्रचूडामणि, तसेच आणखी पीठनिर्णय देणारे एक स्तोत्र इत्यादि सविस्तर माहितीसाठी मूळ ग्रंथच वाचावे. शेवटी एकशे आठ देवीपीठे देणारे स्तोत्रही दिलेले आहे.

हृदयापासून वरील अवयव ज्या ठिकाणी पडले आणि शक्तिपीठे तयार झाली, त्या ठिकाणी वैदिक म्हणजे दक्षिणमार्गी लोक भक्ति करून सिद्धि पावतात पण हृदयापासून खालील भाग ज्या ठिकाणी पडले आणि शक्तिपीठे तयार झाली, त्या पीठांमध्ये वाममार्गी सिद्धि पावतात, असा शाक्तपंथीयांचा दावा आहे.

अनंतस्वामी करपात्रीजी स्वामी म्हणतात, "प्रत्येक पीठाचे ठिकाणी एक एक शक्ति उत्पन्न झाली, त्याप्रमाणे वर्णमालेतील एक एक अक्षरही उत्पन्न झाले. जसे योनीभाग पडला त्या ठिकाणी कामाख्या देवी उत्पन्न झाली. आणि वर्णमालेतील 'अकार' उत्पन्न झाला. स्तन भाग पडून वाराणसी पीठ तयार

झाले, तसा 'आकार' उत्पन्न झाला. वक्षःस्थळ पडले त्या ठिकाणी 'गकार' उत्पन्न झाला, इ० इ० वर्णमालेची उत्पत्ति जर माह्य मानली, तर 'सतीच्या अवयवांचे तुकडे पडले' याचा अर्थ तात्त्विकपणे निराळाच लावता येईल.

आदिशक्ति सतीचे प्रेत आणि शंकरासारखा आदिदेव तिचा पति असताना विष्णूने सुदर्शन सोडून प्रेताचे तुकडे का केले असा प्रश्न स्वाभाविकपणे उभा राहणे शक्य आहे. त्याचे उत्तर असे संभवते की, शंकरासारखी संहारक देवता जर मृत देहाच्या लोभात आणि मोहात गुंतून राहिली तर संहाराचे जगत्कार्य अडून बसेल, आणि सृष्टिनियमाविरुद्ध गोष्टी घडतील. तेव्हा शंकराची मोहातून सोडवणूक करण्यासाठीच विष्णूंनी हा मार्ग अनुसरला असला पाहिजे."

## १०८ शक्तिपीठे

एकावन्न शक्तिपीठांची यादी आपण वर पाहिली. आता १०८ शक्तिस्थानांसंबंधी विचार करू. देवीभागवत, अध्याय ३० मध्ये, श्लोक ५५-८४ यामध्ये ह्या स्थानांचे वर्णन केले आहे. तसेच मत्स्यपुराण, अ. १९१, श्लोक २९-५६ मध्येही तेच वर्णन आहे.

> वाराणस्यां विशालाक्षी नैमिषे लिङ्गधारिणी ।
> प्रयागे ललितादेवी कामाक्षी गंधमादने ॥ १ ॥
> मानसे कुमुदा नाम विश्वकाया तथाम्बरे ।
> गोमन्ते गोमतीनाम मन्दरे कामचारिणी ॥ २ ॥ इ० इ०

याप्रमाणे श्लोक दिलेले आहेत. दक्ष-प्रजापतीच्या यज्ञामध्ये सती, पितृगृही जाण्यास निघाली, तेव्हा शंकरांना तिच्यापुढे काय वाढून ठेवले आहे याची कल्पना होतीच. ते द्रष्टे होते, आणि म्हणूनच तेथे न जाण्याचा त्यांनी तिला उपदेश केला, पण तिने तो मानला नाही. आपली पत्नी पुन्हा दिसणार नाही या जाणिवेने शंकरांनी तिला प्रश्न केला की, 'यदाकदाचित् काही विपरीत घडले तर तुला मी कोठे पहावे ! हे सांगितल्यास मला आनंद वाटेल.' त्यावर तिने आपली स्थाननिर्देशाने सांगितली ती खालीलप्रमाणे.

( १ ) विशालाक्षी—वाराणसी
( २ ) लिंगधारिणी—नैमिषारण्य
( ३ ) ललिता—प्रयाग
( ४ ) कामाक्षी—गंधमादनपर्वत
( ५ ) कुमुदा—मानससरोवर
( ६ ) विश्वकामा—दक्षिणेत आणि उत्तरेस भगवती.
( ६ ) गोमती—गोमतपर्वत
( ७ ) कामचारिणी—मंदारपर्वत
( ८ ) मदोत्कटा—चैत्ररथवन

(९) जयंती—हस्तिनापूर
(१०) गौरी—कान्यकुब्ज
(११) रंभा—मलयपर्वत
(१२) कार्तिमति—एकाम्रकपर्वत
(१३) विश्वेश्वरी—विश्वेश्वरक्षेत्र
(१४) पुरूहुता—पुष्कर
(१५) सन्मार्गदायिनी—केदार
(१६) नंदा—हिमालय
(१७) भद्रकर्णिका—गोकर्ण
(१८) भवानी—ठाणेश्वर
(१९) बिल्वपत्रिका—बिल्वकपीठ
(२०) माधवी—श्रीशैव
(२१) भद्रा—भद्रेश्वर
(२२) जया—वराहपर्वत
(२३) कमला—कमलालय
(२४) रुद्राणी—रुद्रकोटितीर्थ
(२५) काली—कलजरपर्वत
(२६) कपिला—महालिंगक्षेत्र
(२७) महादेवी—शाळिग्रामक्षेत्र
(२८) जलप्रिया—शिवलिंगक्षेत्र
(२९) मुकुटेश्वरी—मोकाटक्षेत्र
(३०) कुमारी—मायापुरी
(३१) ललिताम्बिका—सतानक्षेत्र
(३२) मंगला—गया
(३३) उत्पलाक्षी—सहस्राक्षक्षेत्र
(३४) महोत्पला—हिरण्याक्षक्षेत्र
(३५) अमोघाक्षी—विपाशानदीवर
निघालाक्षेत्र
(३६) पाडला—पुंड्रवर्धनक्षेत्र
(३७) नारायणी—सुपार्श्व
(३८) रुद्रसुंदरी—चित्रकूटपर्वत
(३९) विपुला—विपुलक्षेत्र
(४०) कल्याणी—मल्याचलपर्वत
(४१) एकवीरा—सह्याद्रीपर्वत
(४२) चंद्रिका—हरिश्चंद्रपीठ
(४३) रमणा—रामतीर्थ
(४४) मृगावती—यमुनापीठ
(४५) कोटवी—कोटितीर्थ
(४६) सुगंधा—मधुवन
(४७) त्रिसंध्या—गोदावरी तीर
(४८) रतिप्रिया—गंगाद्वार
(४९) शुभानन्दा—शिवकुंड
(५०) नंदिनी—देविकानदीतटी
(५१) रुक्मिणी—द्वारका
(५२) राधा—वृंदावन
(५३) देवकी—मथुरा
(५४) परमेश्वरी—पाताळ
(५५) सीता—चित्रकूट
(५६) विंध्यवासिनी—विंध्याचल
(५७) महालक्ष्मी—करवीरक्षेत्र
(५८) उमा—विनायकक्षेत्र
(५९) आरोग्या—वैद्यनाथ
(६०) माहेश्वरी—महाकालपीठ
(६१) अभया—उष्णतीर्थ
(६२) नितंबा—विंध्यपर्वतावर
(६३) मांडवी—मांडव्यपीठ
(६४) स्वाहा—माहेश्वरीपूर
(६५) प्रचंडा—छगलंडक्षेत्र
(६६) चंडिका—अमरकंटक
(६७) वरारोहा—सोमेश्वर
(६८) पुष्करावती—प्रभासक्षेत्र
(६९) देवमाता—सरस्वतीतीर्थ
(७०) पारावारा—पारानदीतटी
(७१) महाभागा—महालयक्षेत्र
(७२) पिंगलेश्वरी—पयोष्णी
(७३) सिंहिका—कृतशौचतीर्थ

(७४) अतिशांकरी—कार्तिकस्वामी तीर्थ
(७५) उत्पला—वर्तकतीर्थ
(७६) लोला—शोणनदीसंगम
(७७) लक्ष्मी—सिद्धवन
(७८) अनगा—भारताश्रमतीर्थ
(७९) विश्वमुखी—जालंधरपर्वत
(८०) तारा—किष्किन्धापर्वत
(८१) पुष्टि—देवदारुवन
(८२) मेधा—काश्मीर प्रदेश
(८३) भीमा—हिमालयपर्वत
(८४) तुष्टि—विश्वेश्वरक्षेत्र
(८५) शुद्धिकाया—कपालमोचनतीर्थ
(८६) माता—कायारोहणतीर्थ
(८७) धरा—शंखोधरतीर्थ
(८८) धृति—पिंडारकतीर्थ
(८९) कला—चंद्रभागानदीतटी
(९०) शिवधारिणी—अच्छोदक्षेत्र
(९१) अमृता—वेणानदीतटी
(९२) उर्वशी—बदरीवन
(९३) ओषधि—उत्तरकुरु प्रदेश
(९४) कुशोदका—कुशद्वीप
(९५) मन्मथा—हेमकूटपर्वत
(९६) सत्यवादिनी—कुमुदवन
(९७) वंदनीया—अश्वत्थतीर्थ
(९८) निधी—वैश्रवणालयक्षेत्र (कुबेरगृह)
(९९) गायत्री—वेदवदनतीर्थ
(१००) पार्वती—भगवान शंकराच्या सान्निध्यात
(१०१) इंद्राणी—देवलोकात
(१०२) सरस्वती—ब्रह्मलोकात
(१०३) प्रभा—सूर्यबिंबाच्या ठिकाणी
(१०४) वैष्णवी—मातृकांमध्ये
(१०५) अरुंधती—पतिव्रता स्त्रीवर्गामध्ये
(१०६) तिलोत्तमा—अप्सरामध्ये
(१०७) विमला—पुरुषोत्तम पीठ
(१०८) ब्रह्मकला—प्राणिमात्रांच्या चित्तामध्ये वास करीत असते.

हे एकशेआठ पीठांचे देवीस्तोत्र जो रोज पठण करील अगर सर्व पीठदेवतांचे दर्शन घेईल, त्यावर देवीची कृपा सदैव राहील असे फळ सांगितले आहे.

देवीची बारा प्रमुख स्थाने

काञ्चीपुरे तु कामाक्षी मलये भ्रामरी तथा ।
केरले तु कुमारी सा अम्बाऽऽनर्तेषु संस्थिता ॥ १ ॥
वाराणस्यां विशालाक्षी गयायां मंगलावती ।
करवीरे महालक्ष्मी कालिका मालवेषु सा ॥ २ ॥
प्रयागे ललिता देवी विन्ध्ये विन्ध्यवासिनी ।

याप्रमाणे त्रिपुरारहस्य (महात्म्यखंड, अ. ४८) यामध्ये देवीची बारा प्रमुख स्थाने सांगितली आहेत.

महापीठ निर्णयामध्ये देवीची आणखी प्रमुख स्थाने दिली आहेत, आणि ती श्री. सरकार यांच्या लेखाला परिशिष्ट म्हणून जोडलेली आहेत.

( १ ) अर्बुदा— अरासुरी.
( २ ) उत्कल— येथे कात्यायनीदेवी.
( ३ ) उड्डियान— वीरजा, जया, विजयादेवता.
( ४ ) इंद्रनील पर्वत— स्राट भागात कात्यायनी व कालिका
( ५ ) कर्कोटक— महाकांतिदेवी.
( ६ ) कामरूप— अलाहाबादपासून ४० मैलावर कारा ह्या गावी सतीचा डावा हात पडला ते स्थान.
( ७ ) कटक— कटकेश्वरी. हे उपपीठ मानतात
( ८ ) केदार— सन्मार्गदायिनी, वरदा.
( ९ ) कोकामुखा — नेपाळमधील वराहक्षेत्रातील कोकेश्वरी.
(१०) कृष्णावेणी— महाराष्ट्रात कृष्णादेवी
(११) देवकोटा— जि. दिनाजपूर, बाणगड येथे महाभागा अखिलेश्वरी.
(१२) मधुपुरी ( मथुरा )— माधवी, देवकी.
(१३) माहिष्मती— माळव्यातील महेश्वर येथे स्वाहादेवी.
(१४) मातंग— बुद्धगयेच्या समोर, फल्गूनदीवर मतौर येथे मातंगाश्रम आहे. ते मातंगीदेवीचे प्रमुख स्थान मानतात.
(१५) रणखंड— बहुलाक्षीदेवी. हे बहुधा बहुलाशक्तीपीठच असावे.
(१६) सोमेश्वर— वरारोहादेवी.
(१७) त्रिपुरा— त्रिपुरसुंदरी, त्रिपुरादेवी.
(१८) श्वेतबंध अगर सेतुबंध— महाभीमा
(१९) सप्तगोदा— जि. गोदावरी, पिठापुरमपासून १६ मैलांवर सोलंगीपूर ह्या गावी अखिलेश्वरीदेवी.
(२०) ललिता— झाशी शहराजवळील ललितपूर या गावी ललितादेवी

# ऐतिहासिक देवता

(१) कनकसुंदरी, (२) कालिका [ चितोड ], (३) कालिका [ दिल्ली ], (४) खोडियारमाता, (५) चामुंडादेवी, (६) तुळजा भवानी, (७) देवगिरी अंबा, (८) नागनकी, (९) भवानी (१०) विदर्भ चंडिका, (११) छत्रपती श्रीशिवाजी महाराजावर देवी अनुग्रह.

राष्ट्राचा इतिहास काही राष्ट्रपुरुष घडवीत असतात भारतातील प्राचीन व अर्वाचीन काळांतील इतिहासावर दृष्टिक्षेप टाकला असता आपल्याला दिसून येईल की, परशुराम, श्रीरामचंद्र, भगवान श्रीकृष्ण, सम्राट अशोक, विक्रमादित्य, शालीवाहन, छत्रपती श्रीशिवाजी महाराज, पेशवे घराणे, अकबर, औरंगजेबासारखे मोगल बादशाहा, यांनी भारताचा प्राचीन अर्वाचीन इतिहास आपल्या पराक्रमी कृत्यांनी घडविलेला आहे. हा इतिहास जरी त्यांनी आपल्या तलवारीच्या सामर्थ्यावर बनविलेला असला, तरी त्यामागे त्यांना दैवीशक्तीचे पाठबळ होते, हेही तितकेच खरे आहे. परशुरामाचे उदाहरण घेतले तर आपल्याला दिसून येईल की, त्याने प्रत्यक्ष भगवान श्रीशंकरांकडून अस्त्रविद्या प्राप्त करून घेतली होती आणि तिच्याच साहाय्याने अनेक विजय प्राप्त करून घेतले होते

श्रीकरणजीदेवीचे भक्त आहेत. ते स्वत जातीने दररोज या देवतांची पूजा करीत असत, म्हणून त्या ऐतिहासिक महत्त्व पावलेल्या आहेत.

अशाच काही देवताचा ह्या प्रकरणात विचार करण्यात येणार आहे. या देवताचे महत्त्व इतर देवतापेक्षा आगळे असल्यामुळे हे प्रकरण स्वतत्र दिलेले आहे.

## ( १ ) कनकसुंदरी

माळव्यामध्ये मुंबई–आग्रा सडकेवर शाजापूरजवळ करेडी नावाचे एक गाव आहे. ह्या ठिकाणी या देवीचे स्थान आहे. गावाच्या नावावरून देवीचे केरडी–माता असेही नाव रूढ आहे या मदिराबाबतचा खात्रीलायक इतिहास उपलब्ध नाही. परतु ज्या काही दतकथा उपलब्ध आहेत त्यावरून असे दिसते की, प्राचीन काळी ही एक व्यापारपेठ होती. लमाणाचे तांडे आपला माल या ठिकाणी आठवड्यातील एका ठराविक दिवशी आणीत आणि बाजार भरवून त्या बाजारात ते त्या मालाची विक्री करीत असत. त्या वेळी झालेल्या विक्रीतील नफ्याचा काही अश ते एका मुखियाजवळ साठविण्यास देत. हेतु हा की, त्या द्रव्याचा उपयोग आगामी अडचणीत आणि सकटात स्वत ला अथवा इतराना व्हावा थोडक्यात म्हणजे सहकारी तत्त्वावर चालणाऱ्या बँकेसारखीच त्यांची ही योजना होती. मुखियाजवळ पैसा सुरक्षित ठेवण्याचा उत्तम मार्ग म्हणजे तो जमिनीत पुरून ठेवणे हाच असल्याने, त्याच मार्गाचा तो अवलंब करीत असे

काही वर्षांनी या रीतीने बरीच रक्कम शिल्लक दिसल्यावर त्यांनी आपापसात असे ठरविले की, देवीच्या कृपेने आपल्याला हा फायदा झालेला असून त्या फायद्यातूनच हा धर्मादाय फड उभा झालेला आहे. त्यामुळे त्या ठिकाणी देवीचे एक मदिर बाधावे आणि येणाऱ्या व्यापाऱ्यांची राहण्याची कायमची व्यवस्था करावी. या विचारानुसार मदिर उभारण्यात आले आणि त्या मदिरात अष्टभुजा देवीची स्थापना करण्यात आली सर्व व्यापाऱ्यांनी जमविलेल्या नफ्याच्या पैशामधून–कनकामधून–हे क्षेत्र उभारले गेले असल्याने अथवा तिच्या श्रीमत भक्तवर्गामुळे तिला कनकसुंदरी हे नाव दिले गेले असावे. या मदिराच्या बांधणीचा काळ मात्र भूतकाळाच्या काळ्याकुट्ट उदरातच आहे. तो अजून उजेडात आलेला नाही

या देवालयाच्या आसमतामध्ये सर्पचिन्हाचे अनेक मोडकेतोडके अवशेष सापडतात त्यावरून असे अनुमान केले जाते की, या ठिकाणी पूर्वी नागवशीय लोकांचे बरेच प्राबल्य होते नागवशीय राजे म्हणजे महाभारतातील पांडव अथवा तत्पूर्वीच्या काळातील राजे हेच सर्वसाधारणपणे मानले जातात. अर्जुनाने नागीला

खांडववन भक्षण करावयास दिले, कारण तो नागवंशीय लोकांचा भाग होता असे म्हणतात. कदाचित असेही असू शकेल की, नागवंशीय राजांच्या राजवटीत तो भाग भरभराटीत असल्यामुळे लमाणांचे तांडे येऊन ते आपला माल बैलांवरून त्या ठिकाणी आणीत असावेत, आणि त्यांना झालेल्या फायद्यातूनच या मंदिराची उभारणी झाली असावी. वरील विधानाला दुजोरा तेथे असलेल्या पांडवखोह व गवालियाखोह ही नावे धारण करणाऱ्या भागामुळे मिळतो. पांडवखोह ह्या ठिकाणी म्हणजे डोंगरदऱ्यांच्या भागात पांडवांनी आपल्या वनवासकाळातील काही दिवस व्यतीत केले असावेत असे मानतात. तसेच गवालियाखोह या ठिकाणी गालवमुनी यांनी आपली दीर्घ तपश्चर्या केली असे म्हणतात. या क्षेत्राच्या परिसरात अनेक लहानमहान मंदिरे व स्तूप उभारलेले आढळून येतात तसेच, ह्या ठिकाणी काही शिलालेखही आहेत. या सर्व गोष्टींचा साकल्याने विचार केला असता असे अनुमान काढता येईल की, हे मंदिर साडेतीन सहस्र वर्षांपूर्वीचे असावे.

या ठिकाणी अशी एक कथा प्रचलित आहे की, छत्रपती श्रीशिवाजी-महाराज दिल्लीला औरंगजेब बादशहाच्या भेटीला जातेवेळी या ठिकाणी आले होते आणि या देवीची आराधना करून तिजजवळ त्यांनी कृपाप्रसादाची मागणी केली होती. तेव्हा देवीने त्यांना स्वप्नात दृष्टान्त देऊन श्रीशिवाजीरायाच्या मस्तकावर मुकुट चढविला होता. राजांनी देखील या स्थानाचे महत्त्व जाणून या ठिकाणी किल्लाही बांधलेला होता. त्यामुळे ह्या क्षेत्राला ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले आहे.

या मंदिरापासून दहाबारा मैलांच्या अंतरावर उज्जयिनीची कालिकादेवी व देवास येथील भगवतीदेवी यांची मंदिरे आहेत. त्यामुळेच या तीन देवींच्या स्थानांना "शक्ति-त्रिकोण" असे म्हणतात. कनकसुंदरीची मूर्ति अष्टभुजास्वरूप असून ती सिंहारूढ आहे. तिच्या हातामध्ये वाटीच्या आकाराचे पानपात्र आहे. त्या पानपात्रामध्ये बाराही महिने ताजे रक्त दिसते, आणि या चमत्कारामुळे भाविकजन तिच्याकडे अधिकच आकर्षिले जातात.

द्रुतविलंबित

कनकसुंदरी देविहि मालवी । वसतसेचि करेडी समीपही ।।
प्रथम होऊनि आपण नागर । वणिक जाति उभारित मंदिर ।। १ ।।
वदति पांडव आणि गवालिया । मिळती खोह इथें दरिखोरिया ।।
शिवप्रभूस किरीट तुवां दिला । करूनि वंदन जातहि दिल्लीला ।। २ ।।

## (२) कालिका (चितोड)

"गढमे गढ चितोडगढ। बाकीकी सब गढैय्या है॥"

मध्यभारतामधील चितोडगड हा एक इतिहासप्रसिद्ध किल्ला आहे. रजपूत वीरांनी आणि वीरांगनांनी या ठिकाणी आपले अलौकिक आत्मबलिदान करून इतिहासात त्याला अजरामर करून ठेवले आहे. या ठिकाणी कालिका, अन्नपूर्णा, तुळजाभवानी या देवतांच्या मूर्ति आहेत, आणि त्यांना ऐतिहासिक महत्त्व असल्याने त्यांचा इतिहास पाहणे योग्यच होणार आहे.

या शहराचे रजपूत राजे आपणास श्रीरामरायाच्यां रघुकुळातील वंशज मानीत असत. असे मानण्यात येते की, चितोडगड हे ठिकाण महाभारतकाळा-पासून अस्तित्वात असून तेथील भीमगोडी व भीमलत्ता हे तलाव ह्या गोष्टीला अधिकच पुष्टि देतात पाचव्या शतकामध्ये मौर्य राजवंशीय राजा चित्रांगद ह्याने हा किल्ला बांधला असे मानले जाते. बापा रावळ याने स. ७३४ मध्ये तो जिंकून घेतला आणि त्याच्या वंशजांनी स. १५६७ पर्यंत तेथे राज्य केले.

तत्र चित्रांगदे दुर्गंचित्रनगोस्योपरी।
नगरं चित्रकूटाख्यं देवेन तदधिष्ठितम्॥ (कुमारपालप्रबंध)

मोंगलाच्या अमदानीमध्ये या गडावर एकूण चार स्वाऱ्या झाल्या आणि प्रत्येक वेळा हिंदूंची खूप मोठी हानी झाली.

इ. स. १३०३ साली अल्लाउद्दीन खिलजी ह्याने ह्या गडावर पहिली स्वारी केली, त्या वेळी राजा रत्नसिंह रावळ हा या ठिकाणी राज्य करीत होता. त्याच्या राणीचे नाव पद्मिनी. अतिशय रूपसुंदर म्हणून ती त्या वेळी प्रसिद्ध होती. परंतु निसर्गाची ही देणगीच तिच्या व राजाच्या नाशाला कारणीभूत झाली. पद्मिनी आपल्या हाती मिळावी म्हणून खिलजीच्या सर्व सैन्याने चितोड-गडाला वेढा दिला. परंतु रावळाच्या प्रखर प्रतिकारामुळे किल्ला पडण्याचे काहीच लक्षण दिसेना तेव्हा तद्विषयक गोडगोड भाषेच्या जाळ्यात पकडून अल्लाउद्दीनाने रत्नसिंहाला आपल्या राहुटीत नेले आणि त्याला कैद करून ठेवले. "शठं प्रति शाठ्यम्" या न्यायाने आपल्या पतीला सोडविण्यासाठी पद्मिनीने कपटनीतीचा उपयोग करण्याचे ठरविले. तिने स्वतः अल्लाउद्दीनास "आपण तुमच्या भेटीस येत आहोत" असा निरोप पाठविला. राणीचा मेणा रंगीबेरंगी वस्त्रांनी आणि सुवासिक सुमनांनी सुशोभित करण्यात आला. तसेच तिच्यामागे लवाजमा म्हणून अनेक मेणे देण्यात आले. प्रत्येक मेण्याचे भोई म्हणजे वसलेले वीर होते. शिवाय प्रत्येक मेण्यात एक एक बसलेला वीर सशस्त्र

होऊन बसला होता. खाशा राणीच्या मेण्यातही एक सशस्त्र वीर बसला होता. प्रत्यक्ष राणी किल्ल्यातच होती आणि सुलतान अल्लाउद्दीनाच्या अंगात शिरलेला कामदेव जसजसा तो लवाजमा पुढेपुढे सरकत होता तसतसा खूबसुरत पद्मिनीची मूर्ति डोळ्यांपुढे आणून विषयधुंदीने बेहोष होत होता.

मध्यस्थाने वरील लवाजम्यासह शत्रूच्या गोटात प्रवेश केला आणि राणी स्वतः हुजुराबरोबर राहण्यास तयार असल्याचे अल्लाउद्दीनास कळविले. आपले उद्दिष्ट साध्य झाले, विनासायास खूबसुरत औरत उपभोगास मिळाली या आनंदात अल्लाउद्दीन देहभान विसरून गेला. पद्मिनीबरोबर आलेल्या मध्यस्थाने त्याच वेळी त्याला विनंती केली की, "खाविंद, आमच्या राजेसाहेबांची बेगम तर आता आपल्या चरणांची दासी होणारच आहे. पर हुजूर, उसे उसके पहले अपने पतीसे मिलनेकी इजाजत मिल जाय, तर धर्माच्या दृष्टीने ही गोष्ट केव्हाही योग्यच होईल. आपल्या पूर्वपतीला प्रथम भेटून व त्याच्याशी असलेले आपले नाते तोडून मग ती आनंदाने सर्वस्वी तुमची होऊ शकेल." हे बोलणे ऐकल्यावर डाव्या हाताची मूठ पालथी करून आपल्या मिशीवरून हात फिरवीत आणि मिशांतल्या मिशीत हसत जेव्हा अल्लाउद्दीनाने "हाँ, हाँ, क्यों नहीं! बेशक, बेशक!" असे म्हटले. तेव्हा राणीचा खास मेणा रत्नसिंह होता त्या राहुटीत गेला. त्या 'खास' मेण्यात बसून रत्नसिंह कैदखान्यातून बाहेर आल्यावर सर्व सैनिक प्रकट झाले आणि त्यांनी बेसावध शत्रूवर हल्ला चढवून त्यालाच पिटाळून लावले. परंतु एकदा सापाच्या शेपटीवर पाय दिला, की तो डसायचा सोडतो थोडाच? काही महिन्यांनी जबरदस्त तयारी करून अल्लाउद्दीन परत आला नि त्याने किल्ल्यावर हल्ला चढविला. त्याच्या या प्रचंड सैन्याच्या मान्यापुढे रत्नसिंहाचा निभाव लागणे अशक्य झाले. जिवावर उदार होऊन रत्नसिंह नि त्याचे बहादूर सैनिक लढले नि लढता लढता धारातीर्थी पडले. एकूण तीसहजार माणसे या वेळी शत्रूने कापून काढली.

अन् बिचारी पद्मिनी! ती कुठे होती! ती आणि तिच्या हजारो सखींनी आपल्या पातिव्रत्याच्या नि शीलाच्या रक्षणास्तव धडधडत्या अग्नीच्या बाहुपाशात केव्हाच विश्रांती घेतली होती! अल्लाउद्दीनाला मात्र त्या रजपूत रूपवती रमणींचे केवळ चिताभस्मच पाहून मुसकारा सोडावा लागला.

दुसरी स्वारी बहादुरशहाने केली. या वेळी कर्णावती राणी तेथे होती. पूर्वीपासूनच असलेल्या उत्तम स्नेहसंबंधामुळे तिने या वेळी दिल्लीच्या हुमायून पादशहाकडे मदत मागितली. हुमायुनाने देखील आपल्या भगिनीवरील हे संकट जाणून तत्परतेने मदत पाठविली. पण हाय रे दुर्दैवा! चिचिलिस्तित काही

निराळेच होते. बहादुरशहाने किल्ला घेण्याच्या पूर्वी, किल्ल्याचा संरक्षक शिलाद याला कैद केले शिलादचा भाऊ लक्ष्मण व पत्नी दुर्गावती नावाची होती. बहादुरशहाने पत्र लिहिले की, गड ताब्यात दिल्यास शिलादची मुक्तता करण्यात येऊन कोणास त्रास पोहोचणार नाही लक्ष्मण घाबरला आणि या गोष्टीस अनुकूलता दर्शवितांच दुर्गावतीने चंडिकेचा अवतार धारण करून दिराची निर्भर्त्सना केली तिने पतीच्या रक्षणाकरिता शरण जाण्याचे नाकारले आणि स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी सैन्यासह पुढे सरसावली मोंगलाचे सैन्य किल्ल्यात शिरले मदत वेळेवर पोहोचण्या पूर्वीच शत्रूने जोर केला नि किल्ला पडणार अशी लक्षणे दिसू लागताच स्वत राणी कर्णावती आणि यौवनाने मुसमुसलेल्या तेरा सहस्र रमणींनी शीलरक्षणा-स्तव जोहार केला गुजराथचा बादशहा बहादूरशहा ह्याने ही स्वारी सन १५३४ साली केली

तिसरी स्वारी सन १५६७ साली हिंदुमुसलमानांना समान वागणूक देणारा म्हणून ज्याचा डांगोरा पिटला जातो त्या अकबर बादशहाने केली त्या वेळी उदयसिंह या नावाचा राजा गादीवर होता त्याच्या पत्नीचे नाव वीरा असे होते ती अतिशय शूर व धीराची बायको होती उदयसिंह हा स्वभावत च भित्रा असल्याने वेढ्यामध्ये पकडला गेला तेव्हा वीरा पुढे सरसावली आणि तिने अकबराच्या सैन्याचा मोड करून पतीला सोडवून आणले आंग्ल इतिहासकार कर्नल टॉड लिहितो की, "केवळ वीराराणीच्या शौर्यामुळे या वेळी गड वाचला " अर्थात बादशहाने काही विश्रांतीनंतर पुन्हा हल्ला चढविला आणि रजपूत वीरांचा पराजय होणार नि किल्ला शत्रूच्या हाती पडणार असे दिसताच, शेकडो रजपूत रमणींनी शीलरक्षणासाठी जोहारकुंडाचा आश्रय घेतला बादशहा केवळ किल्ला जिंकूनच स्वस्थ बसला नाही तेथील अमोल वस्तूंची, अमाप संपत्तीची मनसोक्त लयलूट करून ती तो दिल्लीला घेऊन गेला औरंगजेब बादशहाने आपल्या कारकीर्दीत जेव्हा या गडावर स्वारी केली तेव्हा तेथील ६३ मंदिरे उध्वस्त केल्याचे इतिहासात नमूद केले आहे

इतकेच कशाला ' औरंगजेब बादशहा गादीवर आल्यावर " काफीरांचा " नि पात करण्याचा दृष्टीने सन १६६९ सालच्या एप्रिलच्या ९ तारखेस त्याने एक आज्ञापत्र काढले त्यातील भाषा पाहा म्हणजे वरील गोष्टीवर अधिक स्पष्ट प्रकाश पडेल

ह्या फर्मानामुळेच काशीविश्वेश्वराचे मंदिर पाडण्यात आले. तेहतीस लक्ष रुपये खर्चून बांधलेले मथुरा येथील केशवाचे मंदिर नष्ट करून तेथील मूर्ति आग्रा येथील मशिदीला पायऱ्या म्हणून वापरण्यात आल्या. सोमनाथ पुन्हा भुईसपाट झाला. सतनामी साधूंची सरसहा कत्तल करण्यात आली. एकट्या मेवाडात पावणेदोनशे उत्तमोत्तम हिंदू मंदिरांचा विध्वंस करण्यात आला. ह्याच क्रूरतेचे वर्णन मुसलमान संशोधक शेख कादी ह्याने पुढीलप्रमाणे केले आहे.

> "बादशहाने जर प्रजारूपी वृक्षाची एक फांदी तोडली, तर त्याचे मग तो वृक्षच मुळापासून उखडून टाकण्याच्या उद्योगाला लागत."

काश्मीरच्या निसर्गरम्य प्रांती काही हिंदू पंडित जीव मुठीत धरून तग धरून होते. पण त्यांच्यावरही अखेर गदा आलीच! याच वेळी तेथील सुभेदार शेर अफगाण ह्याने भीषण अत्याचाराच्या सदकात त्या सर्वांना लोटून दिले आणि त्या सर्वांच्या माना पिरगाळून टाकल्या. असे सांगितले जाते की, ह्या प्रतिकरणाच्या मोहिमेत हिंदूंच्या अवघ्या एका दिवसात तोडून घेतलेल्या यज्ञोपवितांचे वजन सव्वादोन मण भरले आणि असे प्रकार अनेक दिवस चालू होते.

(गुरु गोविंदसिंह चरित्र, ले. बळवंत वट, पृ० ४)

उडवून टाकीत, पण कोणाच्याही तोंडून हूं का चूं आवाज येत नसे. सर्व विधि मयाण स्मशानशांततेत पार पडे. रडारड नाही की ओरडाओरड नाही.

स्वातंत्र्याचे युद्धात कोणताही विचार न करता कार्य करीत रहाणे, प्रसंगी मृत्यूच्या दरीत सुद्धा उडी घेणे आवश्यक असते. पारातंत्र्याची चीड, आणि अंतः-करणातील धगधगती आग, मिळेल त्या मार्गाने ओकणे हेच शत्रुविरुद्ध उठावाचे साधन असते. आंग्ल कवी टेनिसन ( Tennyson ) या संबंधात लिहितो,

> There's not to question why,
> There's but to do and die,
> Into the valley of death.

अशा प्रसंगाला अनुसरून कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर एके ठिकाणी म्हणतात, " तळपती शस्त्रे जिचा छेद करू शकत नाहीत, प्रज्वलित अग्नि जिचे दहन करू शकत नाही, मुसळधार पर्जन्यवृष्टीने जी आर्द्र होत नाही आणि झंझावाती वादळाने जी नम्र होणार नाही, अशी दुर्दम्य स्वातंत्र्यकांक्षा त्यांनी उराशी बाळगिली होती. " शरीरातून उडणाऱ्या रक्ताच्या चिळकांड्यांनी ते देह न्हात आहेत. पण डोळ्यांत पाण्याचे दिपूसही नाही, अग्निज्वालांनी देह होरपळून निघत आहेत, पण अंतःकरणात भयाचा लवलेश नाही, देहार्पणाने त्यांचे तेज-सौभाग्य प्रज्वलित होते, मृत्यूने अमर होते, पण पराभवाने पराभूत होत नाही. त्या अलौकिक त्यागात त्यांना तेजोमयता प्राप्त होते.

> वतनकी गमगुसारीके कोई अरमान पैदा कर ।
> जिगरमें जोश, दिलमे दर्द, तनमें जान पैदा कर ।
> तो मरमिटनेकी ख्वाहिश ए दिले नादान पैदा कर ॥

स्वातंत्र्य व शीलरक्षण यांसाठी या कवीने म्हटल्याप्रमाणे मरणालाही कवटाळण्याला ते पुढे सरसावतात. शत्रूच्या सुवर्ण सिंहासनाचा चुरा करणारी, सम्राटाचे मुकुट मातीला मिळविणारी, दुष्टांचे निर्दालन आणि सज्जनांचे पालन करणारी स्वातंत्र्यदेवता, अशा स्वातंत्र्यवीरांचा त्याग वार्यावर लावल्याशिवाय रहात नाही अशी त्यांची पूर्ण निष्ठा असते

त्या समर्पीने वर्णन लोकगीतामध्ये मे नेहे आढळते. ते असे,

अहाहा ! धन्य या वीरांगना ! धडधडत्या अग्नीची दाहकता शरीर जाळत असता देखील त्यांचे केवळ मुखच नव्हे तर शरीरातील नस न् नस हरिनामाचा जयघोष करीत असे. खरोखरच त्या आदर्श नारी मानाचे जीवन जगल्या आणि अभिमानाने मृत्यु पावल्या. दरदिनी त्यांचे स्मरण केले तरी त्यांनी आपल्या अलौकिक नि असामान्य अशा त्यागाने करून ठेवलेल्या डोंगरा-एवढ्याल्या उपकारांची फेड आपल्या हातून कदापि होणे नाही. केवळ एकच क्षण ! त्या इवल्याशा एका क्षणात मागचापुढचा काहीएक विचार न करता त्या अग्निकाष्ठ भक्षण करीत. हे सर्व त्या कशाकरिता करीत ? तर आपला परम-पवित्र देह—ज्याच्यावर केवळ स्वतःच्या पतीशिवाय इतर कोणाचीच सत्ता नाही—तो परपुरुषाच्या हाती लागून त्याची त्याच्या हातून वाटेल तशी अमानुष विटंबना होऊ नये म्हणून. जगाच्या इतिहासात या आर्य-स्त्रियांच्या त्यागाच्या तोडीचे दुसरे एकही उदाहरण सापडत नाही. त्यांच्या वर्तनाचा आदर्श दुसरीकडे कोठेही आढळत नाही. भारतीय स्त्रिया मागे ही अशी हजारो वर्षांपूर्वीच्या त्यागी स्त्रियांच्या परंपरेची पार्श्वभूमि उभी आहे, म्हणूनच जगाच्या रंगभूमीवर ती अधिक खुलून दिसते. हिरा नुसता ठेवण्यापेक्षा कोंदणात बसवून ठेवला तर अधिक शोभिवंत दिसतो. त्याचप्रमाणे ह्या परंपरेच्या कोंदणात भारतीय स्त्री प्रकर्षाने चमकू लागते. हिऱ्याच्या पैलूप्रमाणे तिच्या प्रभा चहूदिशांना फाकतात. म्हणूनच भारतीय स्त्री ही आदर्श स्त्रीचा नमुना समजला जातो त्या अनेक देवतासमान रजपूत रमणींच्या अभूतपूर्व त्यागाने ती गुहा आज अत्यंत पावन आणि म्हणूनच चिरस्मरणीय झाली आहे तेथे जाणाऱ्या अनेक स्त्रिया त्या स्थानाला देवतासमान मानतात. त्याची पूजा करतात, नवस करतात आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्यांच्या त्या भोळ्याभाबड्या परंतु आत्यंतिक आंतरिक श्रद्धेने केलेल्या नवसांना फळ येऊन त्यांच्या त्या इच्छा परिपूर्णही होतात. प्रत्येक भारतीय स्त्रीने एकदा तरी ह्या गुहेचे अवश्य दर्शन घ्यावे आणि त्या हुतात्म्यांची स्मरणगीते आळवून त्यांना वंदन करावे.

झाले की मग आपल्या दैवाच्या याळीत कसल्या प्रकारचे पदार्थ येऊन पडणार आहेत याची त्या अभागी स्त्रियाना पुरेपूर कल्पना असे. मुसलमानी अमदानीत क्रूरपणाची मजल कोठपर्यंत जात असे त्याचे काही नमुने पहा.

( १ ) " लढाईत जे मृत्यु पावले ते परम भाग्याचे म्हणावयाचे. ज्या स्त्रिया जिवत राहिल्या व पकडल्या गेल्या त्याच्या दुर्दैवाला पारावार नव्हता. ह्या स्त्रिया सामान्य नव्हत्या. राजाच्या आया व मुली बहिणी होत्या. त्यांना अत्यत अमानुषतेने भ्रष्ट करून जनानखान्यात कोंबण्यात येई. तिथे एखादा दिवस धन्याची कामवासना तृप्त करण्याचे हृदयशून्य व प्रेमरहित साधन व्हावयाचे आणि बाकीचा सारा जन्म गृहस्थाच्या गृहिणीचा किंवा मातेच्या ममतेचा अनुभव न घेता कैदखान्यात–नव्हे पृथ्वीवरच्या नरकात–कठावयाचा. " ( यदुनाथ सरकारकृत औरंगजबाचा इतिहास, भाग १ ला, पृष्ठ २७ ).

( २ ) बहामनी राज्यातील हुमायून ह्याने आपल्या राज्यातील मुलींचा उपयोग आपली कामवासना तृप्त करण्याकडे केला. रस्त्यामधून चाललेली हिंदूची वरात तो एकदम अडवी आणि ह्या वरातीतील वधूचे हरण करी. मग तिला आपल्या महालात नेऊन आपली कामवासना तृप्त करून घेऊन मगच तिला तिच्या नवऱ्याच्या घरी पाठवीत असे. आपल्या स्वत:च्या घरातील स्त्रियांचा वध तो अगदी क्षुल्लक कारणावरून करीत असे. ( महमद सहाय याची तवारीख, भाषांतर ब्रिग्ज्, पृष्ठ ४६२ )

( ३ ) दक्षिण प्रांतीच्या बहामनी राज्याचा सस्थापक हसन गगू बहामनी, नतर त्याचा मुलगा महमदशहा सुलतान झाला. त्याने अनन्वित जुल्म केले. आंध्र प्रांतीचा राजपुत्र विनायकदेव याची जीभ छाटली, आणि वेलिंगपट्टणच्या किल्ल्यावरून त्याला अग्नीत फेकून जाळले. अडोनीजवळ एकाच वेळी ७० सहस्र माणसांची कत्तल केली. तसेच कर्नाटकच्या स्वारीवर असताना चार लक्ष माणसांची कत्तल केली. ती एवढी मोठी होती की, नतर सर्व मुलूख ओसाड झाला. शिल्पकला आणि लावण्यमय मंदिरे फोडूनतोडून पाडून्या मशिदी बनविल्या. सर्व आयुष्यभर सशोधन करून लिहिलेले ग्रथ आगीत जाळून टाकले.

( ४ ) अहमदनगरचा हुसेनशहा आणि इतर मुसलमान सरदार एक झाले आणि विजयनगरचे साम्राज्य नामशेष करण्यासाठी सन १५६४ साली रामराया वर स्वारी केली. राजाजवळ त्या वेळी ९ लाख सैन्य, १ लाख घोडेस्वार, २ सहस्र गजदल, १५ सहस्र याजारखुणगे मदतनीस, पण रामरायाचा पराभव झाल्यावर या सर्वांचा नाश झाला. ५ × १० कोस लांबीरुंदीच्या आणि २० लक्ष वस्तीच्या विजयनगराची ओसाड मसणवट झाली. युद्धानतर सहा महिन्यांपर्यंत मुसलमानांची

विजयी सेना नगरातील शेकडो इमारती, मंदिरे, राजवाडे, विद्यामंदिरे यांची फोडफाड करण्यात मश्गूल होती. आणि शेवटी रामरायाचे नशिबी काय आले! विजापूरच्या आदिलशहाने त्याचे मुंडके पोखरून आपल्या महालातील मोरीच्या तोंडावर बसविले. हिंदुसाम्राज्याचे रक्षण करणाऱ्या पाईकाच्या नशिबी शेवटी सटवीने हेच का लिहावे! (शिवछत्रपति, ले. ब. मो. पुरंदरे, पृ. १४-४२).

(५) हिंदूंच्या बाबतीतच अशी निर्घृण वागणूक होती असे नव्हे. हुमायुनाने आपला भाऊ हुसेनखान याला ज्याप्रकारे वागविले, तो प्रकार कोणत्याही संस्कृतील लाजिरवाणा असाच आहे. हुसेनखानाचा वध करण्यासाठी त्याने चौकाचौकातून मस्त हत्ती व रानटी जनावरे मोकळी सोडली. ठिकठिकाणी उकळत्या पाण्याचे साठे ठेवले. अशी जय्यत तयारी झाल्यावर व राजेसाहेब उंचासनावर तो देखावा पाहाण्यासाठी आरूढ झाल्यानंतर हुसेनखानाला त्या रानटी प्राण्यांच्या समोर निशस्त्र फेकण्यात आले. वाघाने त्याला फाडून फस्त करून टाकले. युसुफ तुर्क आणि त्याचे सात साथीदार यांचा शिरच्छेद करण्यात आला. त्यांच्या स्त्रियांना घरातून ओढून भरचौकात आणून गुंडलोकांकडून त्यांच्यावर सर्वांसमक्ष अत्याचार करण्यात आले. त्यांच्या अब्रूचे असे धिंडवडे काढून होतो नव्हतो ती अब्रूदेखील अशी वेशीवर टांगण्यात आली. स्वतः फेरिस्तादेखील म्हणतो, "They were violated in the public square by ruffians, in a manner too indecent to relate" (इलियटकृत ब्रिग्ज फेरिस्ता, भाषांतर पृ. ४९९) ("दासायन" ह्या ग्रंथात अनंतदास रामदासी ह्यांनी वरील उतारे घेतले आहेत, पृष्ठ ११५ ते १३७.)

वरील उतारे मुसलमान बखरकारांनी अत्याचारांची जी वर्णने केलेली आहेत, त्यांमधून घेतलेले असल्यामुळे कोणासही संशय घेण्यास जागा नाही. त्या काळी सामाजिक जीवन किती दुर्घट होते याची कल्पना यावी आणि असले निर्माल्यवत् जीवन जगण्यापेक्षा मृत्यूला कवटाळलेले अधिक चांगले होते, हेही समजावे म्हणून जोहार करण्यात येत असे. या मुसलमानी अत्याचारासंबंधात आधुनिक मुसलमान इतिहासकार डॉ. हबीबसाहेब म्हणतात की, "गझनीच्या सैन्याने भारतीय मंदिरांचा जो घोर विध्वंस केला, तो कोणत्याही प्रामाणिक आणि इमानदार इतिहासकाराने लपविता कामा नये. इस्लाम धर्माचा सुव्यवस्थीतीने अभ्यास केलेला कोणताही भारतीय मुसलमान, महमूद गझनीच्या त्या अत्याचाराचे समर्थन करणार नाही." पण असे विशाल दृष्टिकोनातून त्या अत्याचाराकडे पाहणारा विरळाच दिसतो. (भारतीय संस्कृति कोश, पृ. ५७२)

नि परदेशी हौशी प्रवाशी दररोज येथे येत असतात. आता पूर्वीच्या काही चौथऱ्यावर विष्णुमंदिर व रत्नमंदिर अशी स्थाने निर्माण झालेली आहेत.

दिंडी

कालिमातेच्या पहा मंदिराते ।
तुलसिवृंदावन सहित त्या मिराचें ॥
दशम माळ्याचा विजयस्तंभ पाही ।
अंतमाळ्या गजपाठिं डोलतोही ॥ १ ॥
अन्नपूर्णेसह तुळजा भवानी ।
कुलस्वामीनी रजपुतां कुळांनीं ॥
तया रक्षाया राजपूत रमणी ।
देह आहुती अर्पिती खुषींनीं ॥ २ ॥

फटाव

चितोडगड हा आज देखतां । जोहाराची गुहा पाहतां ।
विषण्णतेला भरती येतां । मना मिळे ना मुळीं शांतता ।
जोहाराचा त्रिकाळ किता । समया आठवतो ॥ १ ॥
राजपुताची धीर पद्मिनी । अद्भुत सुंदरतेची राणी ।
यवनराज्ञीपद झिडकारोनि । राज्य पित्याचें राहावे म्हणुनी ।
स्पर्श नको यवनाचा मदनी । दीड सहस्र घेऊनी भगिनी ।
अग्निकुंडामाजीं शिरूनी । शीलासी राखी ॥ २ ॥
कर्णावती ही दुसरी राणी । तेरा सहस्र घेऊनी भगिनी ।
वीरमाता वीरपत्नी । जळत्या कुंडीं देह फेंकुनी ।
अग्निदाह भक्षण करूनी । अग्रुमाठीं देह जाळुनी ।
चिरंतना टाळी ॥ ३ ॥
उदयसिंग राजाचें काळीं । पेटे कुंड तिसरें येथीं ।
अगणित रमणी देहा जाळी । शीलभ्रष्टता पार्गी टाळी ।
अमर जगीं होती ॥ ४ ॥
जोहारानें पवित्र बनली । पतिव्रतांच्या पुण्य पाउलीं ।
आर्यसंस्कृति जगा दाविली । यवन संस्कृति उपरी केली ।

चितोड गडावरील जोहार हे प्रसिद्ध असल्याने, तेच पहिले जोहार होत, अशी सर्वसाधारण समजूत आहे. पण ती खरी नव्हे. भारतीय इतिहासात या पूर्वीही जोहार झालेले आहेत. शिकंदर बादशहाने भारतावर स्वारी केली आणि त्याचे सैनिक सिंधुनदीतून नौकेतून परत जात असता अग्रश्रेणीच्या हिंदु-सैन्याने त्याजबरोबर प्राणांतिक लढा दिला. परंतु या घनघोर संग्रामामध्ये विजय मिळण्याची आशा नष्ट झाल्यावर, सैनिकांनी आपल्या तंबू राहुट्यांना आगी लावून दिल्या आणि त्यांच्या स्त्रियांनी त्यामध्ये उड्या घालून बलिदान केले, असे युरोपिअन इतिहासकार कर्टीस म्हणतो. पुढे सन ७११ मध्ये महंमद कासीमने सिंध प्रांतावर स्वारी केली. त्या वेळी तेथील शूर राजा दाहर याने आक्रमणाचा प्रतिकार केला, पण दैववशात तोच समरांगणावर पडला. राजा पडल्याची बातमी समजताच त्याच्या तेजस्वी राणीने शतावधी हिंदुस्त्रियांसह जोहार केला. सन १२९४ साली दिल्लीच्या सुलतानाचा खजिना जेसलमीरच्या रजपुतांनी लुटला, त्यामुळे त्यांच्यावर स्वारी झाली. मुसलमानांचा हल्ला परतविणे अशक्य झाल्याने व अनेक वीर धारातीर्थी पडल्यामुळे त्यांच्या एकूण २४ हजार स्त्रियांनी जोहार केला, असे कर्नल टॉड इतिहासकार लिहितो. दहा-बारा वर्षांनी पुन्हा एकदा जोहार त्या शहरी झाला आहे.

यानंतर तीन जोहार चितोडगड येथे झालेले आहेत. या गडावरील जोहार गुहेतील सतींच्या अस्थींचे पावित्र्य रक्षण व्हावे म्हणून या ठिकाणी एक नागदेव सतत पहारा करीत असतात, अशी तेथील आख्यायिका आहे.

(भारतीय संस्कृति कोश, ३।६८०)

सन १४२९ साली ह्या गडावर अन्नपूर्णेचे मंदिर बांधण्यात आले. १४४२-४९ मध्ये राणा कुंभ याने जयस्तंभ उभारला. हा स्तंभ १२० फूट उंच असून त्याच्या पायाजवळ ३० फुटाचा घेर आहे. ह्या मनोऱ्याचे वैशिष्ट्य असे की, त्याचा शेवटचा नववा मजला गजाच्या पाठीवर बांधलेला असून तो दोलायमान आहे. या खांबावर हिंदूंच्या अनेक देवता कोरल्या आहेत. महाराणा कुंभाने सुलतान महमद खिलजींवर सन १४४० साली विजय मिळविला. ह्या निमित्ताने हा स्तंभ उभारला गेला आहे. येथील कीर्तिस्तंभ मात्र निराळा आहे. सन १३०० मध्ये तो जैन संप्रदायींनी उभारला. त्याला ७ मजले असून तो ८० फूट उंच आहे. ह्या गडावर कालिका देवीचेही एक मंदिर आहे. प्रख्यात कवयित्री आणि कृष्णभक्त मीराबाई ज्या शामनाथाची व तुळशीवृंदावनाची पूजा करीत असे, तो शामनाथ आणि तुळशीवृंदावन आजही आपण पाहू शकतो. असा हा ऐतिहासिक महत्त्व नि मान्यता पावलेला किल्ला पाहाण्यासाठी सहस्रावधी भारतीय

स्मृतिस तव उभारी मंदिरा इंद्रप्रस्था ।
पदकमळ तियेचें वंदितो दोन्ही हस्ता ॥ २ ॥

## ( ४ ) खोडियारमाता

सौराष्ट्र प्रांतामध्ये अनेक लहान लहान राज्ये होतीं. शिहोर ह्या ठिकाणी आतामाई या नावाचा अत्यंत पराक्रमी पुरुष गादीवर होता. तो महान् देवीभक्त होता. एके वेळी तो युद्धास निघाला असता त्याला विजयाची खात्री वाटेना. तेव्हा त्याने देवीची आराधना केली. देवी प्रसन्न झाली आणि तिने त्याला दृष्टांत देऊन सांगितले की, "लढाईच्या वेळी तू जो त्रिशूळ वापरशील, त्यावर मी 'देव-चकली'च्या रूपाने बसलेली असेन. ती चकली ( पाकोळी ) पाहिल्यावर मी स्वतः तुझ्या साहाय्यास आहे असे समजून तू निश्चित असावेस. तसेच ह्या शिहोर गावापासून पाचसहा मैल अंतरावर खोडियार ह्या गावी एका विवक्षित ठिकाणी तुला देवीचा एक मुखवटा भूमीतून वर आलेला दिसेल. त्यावर तू माझे मंदिर उभारावे."

मिळालेल्या दृष्टांतप्रमाणे आतामाईला त्या गावी देवीचा मुखवटा सापडून आला. देवीला दिलेल्या वचनाप्रमाणे त्याने त्यावर मंदिर उभारले. देवीने त्याला एक तलवार प्रसाद म्हणून दिली आणि त्यामुळे प्रत्येक युद्धात त्याला जय मिळत गेले.

आतामाईला भावसिंह या नावाचा एक पुत्र होता. एकदा त्याचे गायकवाडीच्या सरदाराबरोबर युद्ध चालू असताना जंगलात एका जलाशयाच्या ठिकाणी आपले पिढीजाद वैर विसरून सिंह आणि बकरी एकत्र पाणी पीत असल्याचे त्याला आढळून आले. त्यामुळे हे स्थान त्याला फारच आवडले. आपला पसारती वसविण्यास हे क्षेत्र अतिशय योग्य आहे असे त्याला वाटले. आपला विचार त्याने कृतीत उतरविला आणि त्या ठिकाणी वसाहत वसविली. त्याच्याच

जोहारगुहें साक्ष पटविली । आजवरी जी नांदत आली ।
पतिव्रतांनीं देवी मानिली । नरनारींनीं जंई देखिली ।
नेत्रजलानें ओली झाली । सहज मस्तकें खालीं आली ।
अश्रुमाला हलुंच पडली । आर्य स्त्री ही अमर जाहली ।
विधर्मी कोणी नाहिं उपजली । नवस करांची त्यांस पावली ।
ऐसी जयाची कीर्ति पसरली । कवि विनवितो पाहि एकदां ।
जोहारगुहा पाहि एकदां ॥ ५ ॥

## ( २ ) कालिका ( दिल्ली )

भारतीय युद्ध सुरू झाले आणि अर्जुन रथातून बाहेर पडला. त्याच्या रथाचे सारथ्य श्रीकृष्ण करीत होते. ते अर्जुनाला म्हणाले, “रणांगणात विजय पावणे असेल तर रणदेवता कालीमातेची आराधना प्रथम कर.” त्याप्रमाणे अर्जुनाने मनोभावे कालीदेवीची मानसपूजा केली आणि तिजजवळ आशीर्वाद मागितला. तेव्हा देवता साक्षात् रणांगणी प्रकट झाली आणि तिने त्याला शुभाशीर्वाद दिले. पुढे अठरा दिवस हे तुंबळ युद्ध झाले आणि त्या युद्धात पांडव विजयी झाले. कालिदेवीच्या कृपेमुळे आपणास विजय प्राप्त झाला, वास्तव सर्वत्र आनंदीआनंद झाल्यावर पांडवांनी अर्जुनाला ज्या ठिकाणी देवीचे साक्षात् दर्शन झाले होते, त्या ठिकाणी देवीचे मंदिर बांधले आणि त्यात मूर्तीची स्थापना केली.

सांप्रत, दिल्ली शहराच्या उत्तर दिशेला आठ मैल अंतरावर जे कालिकेचे मंदिर दिसते, तेच हे मंदिर होय. अनेक जीर्णोद्धारानंतर अजूनही ते उत्कृष्ट स्थितीत उभे आहे (कल्याण शक्तिअंक १९३४, पृ ६६१).

मालिनी

बहुत समय पूर्वी भारतीं युद्ध झालें ।
स्तवन करुनि पार्थे कालिके आळविलें ॥
वरद कर यशार्थे घेउनीया शिरातें ।
समरिं घुसत योद्धा युद्ध जिंकावयातें ॥ १ ॥
समरिं विजय प्राप्ती पांडवांना मिळाली ।
सचित गमत त्यांना कालिकादेवी वाली ॥

स्थापिस तव सभारी मंदिरा इंद्रप्रस्था ।
पदपंकज तियेचे वंदितो दोन्ही हस्ता ॥ २ ॥

(४) खोडियारमाता

सौराष्ट्र प्रांतामध्ये अनेक लहान लहान राज्ये होती. शिहोर या ठिकाणी भावाभाई या नावाचा अत्यंत पराक्रमी पुरुष राज्यावर होता. तो महान् देवीभक्त होता. एके वेळी तो युद्धास निघाला असता त्याला विजयाची खात्री वाटेना. तेव्हा त्याने देवीची आराधना केली. देवी प्रसन्न झाली आणि तिने त्याला दृष्टांत देऊन सांगितले की, "लढाईच्या वेळी तू जो त्रिशूळ वापरशील, त्यावर मी 'देव चकली'च्या रूपाने बसलेली असेन. ती चकली (पाकोळी) पाहिल्यावर मी स्वतः तुझ्या साहाय्यास आहे असे समजून तू निश्चित असावेस. तसेच या शिहोर गावापासून पाचसहा मैल अंतरावर खोडियार या गावी एका विवक्षित ठिकाणी तुला देवीचा एक मुखवटा भूमीतून वर आलेला दिसेल. त्यावर तू माझे मंदिर उभारावे."

मिळालेल्या दृष्टांतप्रमाणे भावाभाईला त्या गावी देवीचा मुखवटा सापडून आला. देवीला दिलेल्या वचनाप्रमाणे त्याने त्यावर मंदिर उभारले. देवीने त्याला एक तलवार प्रसाद म्हणून दिली आणि त्यामुळे प्रत्येक युद्धात त्याला जय मिळत गेले.

भावाभाईला भावसिंह या नावाचा एक पुत्र होता. एकदा त्याचे गायकवाडांच्या सरदाराबरोबर युद्ध चालू असताना जंगलात एका जलाशयाच्या ठिकाणी आपले पिढीजात वैर विसरून सिंह आणि बकरी एकत्र पाणी पीत असल्याचे त्याला आढळून आले. त्यामुळे हे स्थान त्याला फारच आवडले. वसाहती वसविण्यास हे क्षेत्र अतिशय योग्य आहे असे त्याला वाटले. आपला विचार त्याने कृतीत उतरविला आणि त्या ठिकाणी वसाहत वसविली. त्याच्याच नावावरून त्या गावाला भावनगर हे नाव मिळाले.

खोडियारमाता ही या राजघराण्याची कुलस्वामिनी झाल्याने तिला एकप्रकारचे राष्ट्रदेवतेचे स्थान प्राप्त झाले. भावनगरपासून हे क्षेत्र जरी आठ मैल दूर असले तरी मार्ग उत्तम डांबरी सडकेचा बनलेला आहे. शिवाय ते एक प्रसिद्ध देवस्थान झाल्याने खोडियार या नावाने लोहमार्गाचा एक स्थानकही आहे. सन १९४१ साली भावनगरचे राजे कृष्णकुमार ह्यांनी मंदिराचा जीर्णोद्धार केला आणि संगमरवरी फरशवर्दीचे ६० × ६० चौ. फूट क्षेत्रफळाचे सुंदर मंदिर बांधलेले आहे. मध्यभागी देवीचा लहानसा गाभारा आहे. देवीची मूर्ति स्वयंभू

असल्यामुळे सुमारे एक फूट उंचीचा तिच्या गळ्यापर्यंतचा भाग दिसतो. देवीच्या दोन्ही हातांत तलवारी आणि त्रिशूळे आहेत. मूर्तीसमोर गाभाऱ्यात शंकराची पिंडी बसविलेली आहे. मंदिराजवळ तातणीया धारा नावाचा पाण्याचा जलाशय आहे. देवीचा धार्मिक उत्सव आश्विन नवरात्रामध्ये होतो, म्हणजे हे दुर्गास्वरूप आहे. गव्हाची लापशी हे देवीचे मुख्य भोज्य असल्याने भक्तगण त्याचाच नैवेद्य तिला समर्पण करतात. यात्रेकरूंसाठी येथे धर्मशाळा असून स्वयंपाकासाठी भक्तांना भांडीकुंडी पुरविली जातात. ह्या देवतेचे वैशिष्टय असे की, सर्व जातींचे व सर्व वर्णांचे लोक ह्या मंदिरात जाऊन देवीची पूजा करू शकतात. विशेषतः चारण, छामता या जमातीचे लोक ह्या देवीला कुलस्वामिनी मानतात. भावनगरचे राजे अद्यापीहि तिच्या दर्शनाला जातात, आणि मनोभावे तिची पूजा करतात हे स्थान सुमारे दोनशे वर्षांपूर्वीचे असावे. खोडियार गावची देवी म्हणून तिला खोडियारमाता हे नाव पडले आहे.

## ( ५ ) चामुंडादेवी

> काली करालवदना विनिष्क्रान्तासिपाशिनी ।
> विचित्रखट्वाङ्गधरा नरमाला विभूषिणा ॥
> द्वीपिचर्मपरीधाना शुष्कमांसातिभैरवा ।
> अतिविस्तारवदना जिव्हाललनभीषणा ॥
> निमग्ना रक्तनयना नादापूरितदिङ्मुखा ॥

चामुंडादेवी ही उग्रवदना, खड्‌ग, पाश, विचित्र खट्‌वाग, मुंडमाला धारण करणारी, गजचर्म पांघरणारी, शुष्क मांसामुळे उग्र दिसणारी, रुंद तोंडाची, लळलळणाऱ्या जिव्हेमुळे भयंकर दिसणारी, खोल आणि आरक्त नेत्र असणारी, हास्यनादाने दशदिशा भारून टाकणारी, अशा स्वरूपाची आहे.

म्हैसूर स्थानकापासून दीड मैल अंतरावर म्हैसूर सरकारचे राजभवन असून तेथून पुढे दोन मैल अंतरावर चामुंडा टेकडी आहे. या टेकडीची उंची अंदाजे ३५०० फूट असून टेकडीवर जाण्यासाठी पायऱ्यांचा आणि नुसत्या सडकेचा असे दोन मार्ग आहेत. सतराव्या शतकात दोड्डदेवरायन ह्याने या पायऱ्या बांधून काढलेल्या आहेत. सडकेचा मार्ग वळणावळणाचा चार मैल लांबीचा असून पश्चिम दिशेकडून गेलेला आहे. तसेच, मोटरबसद्वाराही आता टेकडीमाथ्यावर जाण्याची सोय उपलब्ध आहे.

या मंदिराच्या पायथ्याजवळ काळ्या पाषाणाचा भव्य नंदी असून त्याची उंची १६ फूट आहे. सन १६५९ साली हा नंदी बसविला गेला. ही नंदीची मूर्ति

म्हणजे उत्कृष्ट शिल्पाचा अप्रतीम नमुना आहे. त्याच्या गळ्यात लहान लहान घंटांची माळा असून ती पाहणाऱ्याला त्या घंटा प्रत्यक्ष वाजतच आहेत असा भास होतो. रात्रींच्या वेळी समईंच्या मंद प्रकाशात देवीकडे मुख करून पाहात असलेली ही नंदीची मूर्ति अतिशय रम्य दिसत. दक्षिण भारतामध्ये भव्य मूर्ति खोदण्याचे काम अखंडित चालत असावे, असे अनेक ठिकाणच्या शिल्पावरून वाटते. रामेश्वर येथील नंदीदेखील असाच भव्य असून १५ × ८ × १२ फूट इतका त्याचा आकार आहे. बंगलोर येथेही असा एक भव्य नंदी आहे.

चामुंडादेवीच्या मंदिरासमोर महिषासुराचा भव्य पुतळा उभारलेला असून त्याच्या एका हातामध्ये तलवार व दुसऱ्या हातामध्ये नागफणा आहे. त्याच्या मस्तकावरील विपुल केस इतस्ततः विखुरलेले असून भरदार व पिळदार अशा भव्य मिशांमुळे चेहरा उग्र आणि भव्य वाटतो. हा तेथील एके वेळचा राजा होता, म्हणून त्याचे स्मारक उभारलेले असावे. पण वर्णन केल्याप्रमाणे जर तो खरोखर दैत्यच असता तर त्याचा पुतळा कुणी उभारला नसता. दुर्जनांचे पुतळे कोण उभारणार! रावण एवढा पराक्रमी पण त्याचा पुतळा उभारलेला ऐकीवातही नाही.

म्हैसूरचा प्राचीन इतिहास पाहिला तर असे दिसते की, ख्रिस्ती शकापूर्वी अशोक सम्राटाच्या काळी ह्या भागाला महिषमंडळ हे नामाभिधान होते. महिषमंडळ म्हणजे रेड्यांचा देश असाही अर्थ होऊ शकतो. सांप्रत, निलगिरी पर्वतावर तोडा नावाची जी वन्य जमात राहाते ती महिषीपूजक आहे. ही जमात अतिप्राचीन असल्याने भारत सरकारने त्यांच्या चालीरिती आणि राहणीमान ह्यांचे चित्रदर्शन केले आहे. महिषी या कुलनामाचे घराणेही त्या भागात प्रसिद्ध आहे.

चामुंडादेवीचे मंदिर भव्य आहे. अनेक दालने ओलांडल्यानंतर देवीच्या गाभाऱ्यात प्रवेश होतो. मंदिरात काळ्या पाषाणाची महिषासुरमर्दिनी स्वरूपाची देवीची मूर्ति असून तिला वीस भुजा आहेत. हातांतील आयुधांमध्ये शूल, खट्वांग, शंख, परशु इत्यादि आयुधे असून पायाखाली रेड्याच्या मुखातून महिषासुर बाहेर पडत आहे असे दृश्य आहे. सन १८२७ साली कृष्णराज वडियार (३ रा) ह्याने मंदिराचा जीर्णोद्धार केला. त्या वेळी देवीचे वाहन असलेल्या सिंहाची त्याने सुवर्णाकृति बनवून ती मंदिरामध्ये ठेवून दिली. देवीचे सुवर्णाचे अनेक अलंकार असून त्यांमध्ये वैशिष्ट्यपूर्ण म्हणून 'नक्षत्रमालिका' ह्या सुवर्णहाराचा प्रामुख्याने व आवर्जून निर्देश करावा लागेल. त्यामध्ये ८० पुतळ्या असून प्रत्येकावर एकेक संस्कृत श्लोक लिहिलेला आहे.

मुख्य मंदिराच्या दक्षिण बाजूला महाकपालेश्वराचे मंदिर आहे. सन ११२८ साली विष्णुवर्धन होयसळ राजघराण्याने ते बांधले आणि सन १६२० साली विजयनगर येथील नायक घराण्याने त्याची वाढ केली. प्रवेशद्वारावरील गोपुर अतिशय भव्य असून ते दोनशे फूट उंचीचे आहे. या गोपुरावर अनेक देवतांच्या मूर्ति कोरलेल्या दिसून येतात (कल्की साप्ताहिक (तामिळ) मद्रास, दि. ९-९-१९६२).

ही देवता म्हैसुरी राजघराण्याची कुलदेवता असल्याने तिला राजवैभव प्राप्त झालेले आहे. ह्या देवीला भेरुंडादेवी असेही संबोधिले जाते. राजघराण्याने ह्या देवीची राजमुद्रा करून घेतली असून सरकार-दरबारी तिचा वापर केला जातो. इतिहासात असे नमूद करून ठेवले आहे की, हैदरअली व टिपु सुलतान हे जरी परधर्मीय होते, तरी ते या देवीचे निस्सीम भक्त होते. प्रतिवर्षी वाढदिवसाच्या वेळी ते नजराणे पाठवीत असत. ह्या देवीने चंड व मुंड या दैत्यांचा नाश केला म्हणून त्याबद्दल तिचे चामुंडा हे नाव रूढ झाले, अशी कथा प्रचलित आहे.

येथील राज्याच्या निशाणावर हनुमानाचे चित्र आहे. याबाबतचा इतिहास रम्य व उद्‌बोधक आहे. शंकराचार्यांच्या गादीचे एक वारसदार शिष्यवर भास्करराय या नावाचे होते. एकदा हैदरअली त्यांच्याकडे गेला, आणि "मला राज्यपद मिळावे" अशी इच्छा प्रदर्शित करून त्याने त्यांच्याजवळ आशीर्वाद मागितला. भास्कररायांनी त्यावर त्याला "तू कपडा आणला आहेस काय?" असे विचारले. हैदरअलीने आपल्या मस्तकावरील फेटा त्यांच्यापुढे टाकला. भास्कररायांनी त्यावर हनुमानाचे चित्र काढले, आणि तोच फेटा आपले निशाण बनवून स्वारीवर निघण्यास हैदरअलीस सांगितले. पुढे हैदरअलीने म्हैसूरचे राज्य घेतले आणि त्यामुळे त्याने बनविलेले हनुमानाच्या चित्राचे निशाण अस्तित्वात येऊन तेच रूढ झाले आहे.

देवीचे स्वरूप वर्णन करणारी जी पुराणे आहेत, त्यानुसार चामुंडा देवीची (१) वारुणी चामुंडा व (२) रक्तचामुंडा अशी दोन स्वरूपे दिलेली आहेत. वारुणी-चामुंडा ही मुळी देवता असून वारुणीला विशाल उदर, त्यावर लोळणारे वक्षःस्थळ, रक्तवस्त्रे आणि शूल व बाण ही आयुधे दिलेली आहेत, तर चामुंडाला लांब व तीक्ष्ण नखे आणि अनेक हात दाखवून ती आपल्या शक्तिसामर्थ्याने सर्वांना खेचून घेत आहे असे स्वरूप दाखविलेले आहे. (विष्णुधर्मोत्तर पुराण).

रक्तचामुंडा ही योगेश्वरीस्वरूप समजली जाते. तिच्या हातांमध्ये खड्ग, हल, मुसळ व पात्र ही आयुधे असून विश्वातील सर्व चल आणि अचल वस्तूंमध्ये

तिचे अस्तित्व प्रचलित आहे, ह्या समजुतीने तिचे भक्त आपली सत्ता सर्वत्र गाजवू इच्छितात ( रूपमंडण पुराण ).

ह्या देवीला सप्तमातृकांमध्येही स्थान आहे (मातृका पहा). ह्या ठिकाणी देवीचे वर्णन थोडे निराळेच आढळेल.

भारतीय सांस्कृतिक कोशामध्ये या देवीचे वर्णन निराळेच आहे. ही अत्यंत पराक्रमी असल्याने प्रसंगवशात देवही हिला शरण जातात. या देवीच्या जन्माची कथा अशी.

( १ ) प्राचीनकाळी महिषासुराने इंद्राबरोबर सतत १०० वर्षे युद्ध करून शेवटी त्याचे इंद्रपद हरण केले. ही वार्ता ब्रह्मा-विष्णु-महेश याना कळताच त्यानी आपल्या मुख तेजामधून एक तेजस्वी देवता निर्माण केली. तीच चामुंडा होय. सर्व देवांनी तिला आयुधे दिली आणि हिमालयाने सिंहासन दिले. नंतर युद्ध करून तिने महिषासुराला मारले. (या ठिकाणी हे ध्यानात घ्यायास पाहिजे की, महिषासुरमर्दिनी देवीची उत्पत्ति जवळ जवळ अशीच आहे. देवीने चंड दैत्याला मारले म्हणून चामुंडा नाव प्राप्त झाले. )

( २ ) शुंभ-निशुंभ दैत्यांनी इंद्रापासून स्वर्गाचे राज्य घेतले, तेव्हा सर्व देवांनी अंबिकेचे स्मरण केले. अंबिका मातेने आपल्या कुशीमधून एक देवता उत्पन्न केली, तिचे नाव कालिका. या देवीने चंड-मुंडांना ठार केले म्हणून ती चामुंडा नावाने प्रसिद्ध झाली. तिने चंड-मुंडांची शिरे अंबिकेला अर्पण केली होती.

वसंततिलक

म्हैसूर ग्राम वसवीत महीप जाती ।
चामुंडदेवी गिरिमंदिरीं शोभतेची ॥
चामुंडदेवीयुत शासनिं राजमुद्रा ।
नंदी विशालतम वंदित योगनिद्रा ॥ १ ॥

( ६ ) तुळजाभवानी

तेथून कूच केलें कटकाला । अबदुल फौजेनें चालला ।
तुळजापूर गांवाला आला । फोडिली तुळजा ।
अबदुल फोडी देविला । वरती मसुदच बांधिला ।

( शाहीर अज्ञानदास पोवाडा, केळकर पोवाडेसंग्रह १–११ )

मराठवाड्यातील उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये तुळजापूर हे तालुक्याचे ठिकाण आहे. सोलापूर शहरापासून २८ मैलांचे हे अंतर मोटरमार्गाने तोडता येते. समुद्रसपाटीपासून २६१० फूट उंची असलेल्या ह्या क्षेत्राला पूर्वी यमुनाचल अथवा चालाघाट असे नाव होते. नैसर्गिक स्थानामुळे तेथील हवापाणी नेहमीच उत्तम असते. पुराणांमधून दंडकारण्याच्या सीमेवर दिंडीरवनाचा उल्लेख मिळतो, तो हाच भाग होय.

हे स्थान अतिशय प्राचीन असले पाहिजे यांत शंका नाही. कृतयुगामध्ये ह्या वनात कर्दम नावाचे ऋषि आपली पत्नी अनुभूति हिच्याबरोबर राहात असे. ( स्वायंभु मनूचा पुत्र प्रियव्रत आणि त्याची कन्या देवहुती ही कर्दम ऋषींना दिलेली होती. तिला ९ मुली झाल्या आणि त्या निरनिराळ्या ऋषींना दिल्या गेल्या. पण त्या कर्दम ऋषीचा येथे संबंध नाही. ) एकदा दुर्दैवाने ह्या मुनींचा अंतःकाल समीप येऊन ठेपला. परंतु त्या वेळी त्यांची पत्नी गरोदर असल्यामुळे ती त्यांच्याबरोबर सहगमन करू शकली नाही. काही दिवसांनी ती प्रसूत झाल्यावर मंदाकिनी नदीच्या किनाऱ्यावर तिने तपश्चर्या चालू केली. तिची खडतर तपश्चर्या चालू असताना एकदा कुक्कुट दैत्य शिकारीसाठी हिंडत हिंडत या नदीच्या किनाऱ्यावर आला, त्या वेळी अनुभूति त्याच्या नजरेस पडली. त्या तापसीचे तेजस्वी स्वरूप पाहून तो अतिशय मोहित झाला आणि कामवासना अनावर झाल्याने त्याने तिच्या देहाला स्पर्श केला. दैत्याच्या त्या स्पर्शाने अनुभूतीची समाधि भंग पावली. तिने नेत्र उघडले. नेत्र उघडताच दैत्याची भेसूर आकृति तिच्या दृष्टीस पडली.

प्रसंग बाका होता. त्या निर्जन वनात, बलाढ्य कामातुर दैत्यासमोर ती अबला एकटी उभी होती. तिने तेव्हा आदिशक्ति पार्वतीचा मनातल्या मनात धावा केला आणि संकटातून मुक्त करण्याची तिला विनवणी केली. भक्ताची हाक ऐकून प्रत्यक्ष पार्वती भवानी स्वरूपात प्रकट झाली आणि तिने त्या दैत्याचा नाश केला. भक्ताच्या हाकेसरशी त्वरित धावून आली म्हणून देवीचे नाव तुरजा असे ठेवण्यात आले. ह्या घटनेची स्मृति म्हणून त्या ठिकाणी देवीची मूर्ति स्थापन करण्यात आली. 'तुरजा' ह्या शब्दाची व्युत्पत्ति अशी सांगितली जाते की, तुर म्हणजे वेग आणि जा म्हणजे जाणे. तेव्हा 'वेगाने जाणारी' ती तुरजा होय. कालांतराने "तुरजा" ह्या शब्दाचा अपभ्रंश "तुळजा" असा झाला असावा. असेही सांगितले जाते की, मरता मरता कुक्कुट राक्षसाने महिषासुराचे रूप घेतले. परंतु देवीने त्यालाही ठार केले. तुळजादेवीच्या पायाखाली राक्षसाचे शव आणि हातामध्ये त्याचे शीर आहे. ( Monogram Series by D. R. Amaladi )

त्वरितादेवी म्हणजेच तुळजाभवानी होय असेही वर्णन एके ठिकाणी आढळते.

तैसे त्वां अम्हांप्रती । कथिली त्वरितादेवी अद्‌भुती ।
तिचेंच नाम तुळजा विख्याती । किमर्थ जहालें तें सांगा ॥
कर्दम कृतयुगांत । नामें द्विज विख्यात । त्याची भार्या अनुभूति ।
पतिनिधनानंतर । तपश्चर्येस बैसली । ... प्रकट जाहली त्वरितादेवी ।
सर्व योगिनींवृंद मिरवी । त्वरितादेवी परमेश्वरी । प्रवर्तली महामारी ॥

( तुळजा महात्म्य, लेखक, पांडुरंग जनार्दन पांगारकर )

'तुळजा महात्म्य' मधील वरील उताऱ्यावरून असे दिसते की, त्वरितादेवी तुळजाभवानी होय. दोन्ही नावे एकच आहेत.

घाटमाथ्यावरून ९३ पायऱ्या उतरून खाली दरीमध्ये उतरल्यावर मुख्य देवीचे मंदिर आढळते. स्कंदपुराण, अग्निपुराण, देवीभागवत इत्यादि ग्रंथांतून ह्या क्षेत्राचे वर्णन मिळते. ह्याचे कारण ते फार प्राचीन असले पाहिजे हेच होय. पायऱ्या उतरत असताना प्रथम कल्लोळतीर्थ आणि नंतर क्रमाने गोमुखतीर्थ, अमृतकुंड, गणेशतीर्थ, सिद्धिविनायक, नागरतीर्थ, नारसिंह, लक्ष्मीनारायण, खंडोबा, शाकंभरी इत्यादि लहान लहान स्थाने आढळतात. मुख्य मंदिराचा परिसर प्रशस्त असून गाभाऱ्यात देवीची मूर्ति आहे. या सर्व तीर्थांचा इतिहास व माहिती 'तुळजा महात्म्य' ह्या ग्रंथात सविस्तर दिलेली आहे.

मूर्तीचे स्वरूप अष्टभुजा महिषासुरमर्दिनीचे असून तिच्या पाठीवर बाणाचा भाता, हातांमध्ये क्रमाने त्रिशूळ, बिचवा, बाण, चक्र, शंख, धनुष्य, पानपात्र व राक्षसाची शेंडी याप्रमाणे आयुधे असून देवीच्या मस्तकावरील अंगच्या मुकुटावर सयोनिलिंग आहे. तिच्या ह्या मुकुटाखालून केशकलापाच्या बटा बाहेर आलेल्या दिसतात. तिचा उजवा पाय राक्षसावर आणि डावा पाय जमिनीवर आहे. आपल्या दोन्ही पायांमध्ये तिने राक्षसाचे तुटलेले मस्तक धरलेले आहे. उजव्या बाजूस सिंहाकृति असून मार्कंडेय मुनींची प्रतिमा आहे. डाव्या बाजूस अनुभूतीची प्रतिमा ठेवली आहे. तसेच उजव्या बाजूस चंद्र आणि डाव्या बाजूस सूर्य यांच्या आकृत्या आहेत. देवीच्या अंगावर अंगचेच भरपूर अलंकार आहेत.

ह्या देवीचे वैशिष्टय म्हणून असे सांगता येईल की, वर्षातून तीन वेळा ह्या देवतेचे सार्वजनिक शयन घडते. भाद्रपद व. ८ पासून अमावास्या, आश्विन शु. ११ पासून पौर्णिमा, आणि पौष शु. १ पासून अष्टमीपर्यंतचा काळ हा तिचा शयनकाळ असतो. ह्या शयनकाळांत भक्तांना देवीची षोडशोपचारे पूजा-अर्चादी करता येत नाही. गाभाऱ्याच्या बाजूला जे शयनगृह आहे, तेथे पलंगावर देवी पहुडलेली असते. देवतांचे दर्शन पुजारी ह्या तऱ्हा पहुडलेल्या स्थितीतच यात्रिकांना करवितात. निद्राकाळाच्या पूर्वी व अंती एक एक बकरा बळी देण्याचा प्रघात आहे. शयनगृहातील पलंग कोल्हापूरच्या महाराजांनी दिलेला असून तो संपूर्णतः हस्तिदंती आहे.

या क्षेत्री देवीला तीन वेळ शयन घडते. याचे कारण असे संभवते की, आश्विन शुद्ध पक्षात देवीचे नवरात्र असते. दसऱ्याला शत्रूचा नाश होऊन विजयोत्सव साजरा केला जातो. तेव्हा त्याच्या आधीचे भाद्रपदातील शयन हे लढाईपूर्वीचा विश्रांतीचा काळ असावा, आणि आश्विन शु. ११ पासूनचा युद्ध झाल्यावर थकवा घालविण्यासाठी विश्रांतीचा काळ असावा. तसेच पौष शु. ८ ला शाकंभरी नवरात्र असते, तेव्हा त्या नवरात्रापूर्वी एक सप्ताह विश्रांतीचा काळ म्हणून शयन घडत असावे. शाकंभरी नवरात्रात युद्धप्रसंग नसल्याने, नंतर थकवा घालविण्यासाठी विश्रांतीची जरूरी नाही. तीन वेळा शयनाचे हे

स्वरूप असावे

ही देवी जागेवर आली नाही. पूजेची वेळ चुकली, कारण भक्तांबरोबर सारीपाट खेळण्यात देवता दंग होऊन गेली होती. हे त्या वेळी देवीच्या लक्षात आले, तेव्हा तिने आज्ञा केली की, पूजेची वेळ टळली म्हणजे मला भोंगरण्यात यावे. त्या मनुष्याने आपला देह ठेवला तरी रूढी मात्र अद्यापही चालूच आहे. हाही प्रकार त्या क्षेत्री पाहावयास मिळतो.

या देवीने ज्याप्रमाणे सिंहवाहन स्वीकारले आहे, त्याचप्रमाणे ग्रीस देशामध्ये ग्रीसेत या देवीने हे स्वीकारलेले आहे. फ्रिजिअन लोक ज्यांना सिंहाची पितर देवता मानीत, तेही भारतीयांच्या पार्वतीपरमेश्वराप्रमाणे सिंह आणि नंदी याच वाहनावर आरूढ झालेली असत. हायरापोलिस येथील सुप्रसिद्ध मंदिरात हारा आणि झेऊस या दोन देवतांचा अर्धनारीनटेश्वराप्रमाणे जो जोड पुतळा आहे, त्यामध्येही हारा ही सिंहावर आणि झेऊस हा नंदीवर आरूढ झालेली दिसून येतात. रोमन स्मारकामध्येही देवीची काही चित्रे सिंहारूढच आढळून येतात. या साम्याचा अर्थ एकच समजतो की, भारत व ग्रीस देश येथील देवतांची कल्पना, नद्यांच्या स्थानाप्रमाणे एकच ठिकाणची असावी. (तीर्थरूप महाराष्ट्र, ले. महादेवशास्त्री जोशी, पृ. ११), (Temples & Legends of Maharashtra by M. S Mate).

देवीची पूजा दिवसभरात एकूण चार वेळा होते. देवीचा पुजारीवर्ग पाळीने मराठाच आहे. देवीला सकाळी भाजीभाकरीचीच न्याहारी देतात. दुपारच्या वेळी जी महापूजा होते ती पंचामृतपूजा होय. या वेळी देवीच्या अंगावर पंचामृताची पूजा म्हणून दही, दूध, तूप, यांची भांडीच्या भांडी उपडी करतात, आणि त्यामुळेच देवीची ही महापूजा करणे हातपाय धाडस पुष्कळच लागते. दर मंगळवारी रात्री सिंह, गरुड, हंस, मोर इत्यादि लाकडी वाहनांवरून मंगलवाद्यांच्या निनादात देवीचा छबिना निघतो. त्या प्रसंगी काही भक्तांच्या अंगात देवीचे वारे संचारते आणि त्यामुळे बेहोश होऊन ते पालखीपुढे नाचत असतात. (चार दैवते, लेखक ग. ह. खरे, पृ. १८३.)

या देवस्थानचा सेवेकरी म्हणून जो वर्ग आहे, त्यांची निरनिराळी कामे त्यांना वाटून दिलेली असून त्यांची नावेही त्यांच्या कामाप्रमाणे त्यांना दिलेली आढळतात.

(१) घजाजी—मंदिराच्या दारांची उघडझाप करणे, नैवेद्य दाखविणे आणि मंदिरातील नंदादीप सतत उजळत आहे किंवा नाही त्यावर देखरेख ठेवणे.

(२) चिटोजी—देवीच्या मूर्तीला नटवावयाचे, थटवावयाचे, आणि तिच्या अमूल्य अलंकारांचा संभाळ करावयाचा.

(३) वाकोजी—देवालयात दिवाबत्ती करणे, पाणीपुरवठा करणे, आल्यागेल्याची विचारपूस करणे, बैठका घालणे ही कामे हा वर्ग करतो.

(४) पलंगोजी—देवालयात स्वच्छता राखणे, इतरांना अस्वच्छपणे वागू न देणे आणि शेजघराची व्यवस्था ठेवणे.

ह्या क्षेत्रामध्ये सेवेकऱ्यांना जशी कामाची वाटणी करून देण्यात आलेली आहे, तशी वाटणीची पद्धत महाराष्ट्रात इतरत्र क्वचितच दिसून येते. ह्याचे कारण, महाराष्ट्रातील सर्वच देवस्थानांची सांपत्तिक स्थिति तितकीशी उत्तम नाही हेच संभवते.

असे जरी असले तरी दक्षिण भारतातील देवालये अधिक संपन्न असल्या-मुळे त्या भागात अनेक ठिकाणी अनेक सेवेकरी त्यांना वाटून दिलेली कामे चोख बजावत असताना आपल्याला आढळून येतात. उदाहरणार्थ, रामेश्वर येथील सेवेकऱ्यांची ही यादी पहा.

(१) गुरुकुल—हा देवालयाचा प्रमुख होय.

(२) सदाचार्य—हा दुय्यम प्रमुख पुजारी समजला जातो.

(३) सव्वयार—अभिषेकाची तयारी करणारा व इत्तीवरून नैवेद्य आणणारा हा सेवेकरी होय. नैवेद्यासाठी १४० मणांचा चरू शिजवितात.

(४) मंत्रपुष्प—पूजा झाल्यावर देवाचे मंत्रपुष्पाचे विधि ह्याने पार पाडावयाचे.

(५) वेदपारायण—उत्सवप्रसंगी मूर्तीची मिरवणूक चालू झाल्यावर ह्याने वेदघोष चालू ठेवावयाचा.

(६) कट्टीयम—दीप-राधनेसाठी मूर्ति बाहेर आणल्यावर ह्याने चांदीचा दंड हाती धरावयाचा.

(७) श्रीपादम्—पालखीत मूर्ति नेऊन ठेवणे आणि मिरवणुकीनंतर ती पुन्हा जागेवर आणून ठेवणे ही कामे हा सेवेकरी करतो.

(८) परिआमुरई—पूजेसाठी दूध, दही इत्यादि साहित्य आणून व पंचारतीचे दिवे लावून ते गुरुकुलाला देणे हे त्या सेवेकऱ्याचे कर्तव्य होय.

(गोपीनाथ अय्यर, पृष्ठ १९४)

आश्विन महिन्यातील नवरात्र हा येथील प्रमुख उत्सव मानला जातो. त्याची सुरवात गोमुखी तीर्थाजवळ कुंभाराच्या हातून तीन घट मांडून केली जाते. घटस्थापनेनंतर वाजतगाजत हे घट हलविले जातात आणि एक सभामंडपामध्ये,

दुसरा शिवमंदिराच्या मागील बाजूस ओवरीमध्ये आणि तिसरा मातंगीच्या मंदिरात ह्याप्रमाणे ठेवल्यावर व्रतास सुरुवात होते. प्रत्येक दिवशी एक ह्याप्रमाणे फुलांच्या माळा घटावर बांधल्या जातात, खड्ग नवमीला एक बोकड बळी दिला जातो, आणि नंतर व्रताचा विधि समाप्त होतो. दसऱ्याच्या दिवशी देवीची पालखी बाघ्या मुरळीच्या गजरात मिरविते. सध्याकाळी शमीची पूजा केल्यावर हा सुखसोहळा समाप्त होतो आसमंतातील असंख्य लोक अगणित संख्येने हा उत्सवसमारंभ पाहण्यासाठी एकत्र जमत असतात.

परमार वंशातील जगदेव राजाने सात वेळा आपले मस्तक देवीला अर्पण केले, असा पितळी दरवाज्यावर तेथे शिलालेख आहे. एका कवीने त्याचे वर्णन केले ते असे

तोषोनि त्वां उठविला तरि तो पुन्हाही।
कापून मस्तक पदावरि शिघ्र वाही॥
पूजी असे तुजसि वल्लभ सात वेळां।
अत्यंत तोष वरदे तुजलागि झाला॥

(पुरुषार्थ मासिक, देवता अंक १९६३)

[टीप — उज्जयनी येथील हरसिद्धीचे समोर विक्रमाने आपले मस्तक ११ वेळा वाहिले होते]

पधराव्या शतकात त्र्यंबकराय नावाचे एक संत कवी होऊन गेले. कृष्ण देवाचा पुत्र भैरव याने वंशवृद्धीसाठी तुळजापुरी भवानीसमोर अनुष्ठान केले १ ल्या रात्री माता प्रसन्न झाली आणि तिने त्याचे हाती २ फळे दिली दुसरे फळ देताना माता म्हणाली, "पुत्र जालेया केवळ। करी देखसी त्रिशूळ। ते ज्ञानगर्भ माझे फळ। माझे वरद॥" आणि या मधल्या फळाचा प्रसाद म्हणजे त्र्यंबकराज कवी होत मातेने सांगितल्याप्रमाणे जन्मत च त्याचे हातावर रेखा स्वांकित त्रिशूळ चिन्ह होते पुढे हा मोठा झाल्यावर त्याने १६ वे वर्षी चंडीची उपासना केली असता सोळावे रात्री 'पांचा वर्षांची कुमारी प्रगट झाली' आणि त्याला सप्तशृंगीवर अनुष्ठान करण्यास सांगितले

(मराठी वाङ्मयाचा इतिहास, ले पांगारकर, पृ. ५०५)

छत्रपति शिवाजीमहाराजांमुळे सतराव्या शतकात त्या क्षेत्राला ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले. त्यांची ह्या देवीवर निस्सीम अन् नितांत श्रद्धा होती, ते ह्या देवीला साक्षात् भवानी देवीचाच अवतार समजत आल्याने ती जनमान्यता पावली आणि अगणित भक्तांच्या हृदयातील श्रद्धेच्या सिंहासनावर आरूढ झाली.

ह्या शक्तिस्थानाची उपासना करूनच मराठ्यांनी आपल्या राज्यविस्ताराच्या कार्यास पाठबळ मिळविलेले होते. देवीशक्तीचे पाठबळ असल्याविना मानवाचे उद्दिष्ट साध्य होणार नाही याची त्यांना मनोमन खात्री पटलेली होती. ह्यासाठीच शिवाजीराजे प्रत्येक शुभ कार्यांच्या वेळी त्या देवीचा कौल घेत असत.

मराठी सत्तेचा हा मानबिंदु हेरूनच अफझुलखान, शिवाजीला कैद करण्याचा पैजेचा विडा उचलून विजापुराहून जो निघाला तो पुण्यपत्तनी न जाता तुळजापुरी गेला. मराठ्यांचे हे स्फूर्तिस्थान, मर्मस्थानची त्यांची ही पवित्र आणि प्राणप्रिय मूर्ति त्याने फोडून, तोडून, मोडून, तुकडे करून, जात्यांत घालून, भरडून, धूळ करून मातीत मिळवून टाकली. हेतु हा की, आपण हिंदु देवतांना किती किंमत देतो हे हिंदूपुढे प्रदर्शित व्हावे आणि आपण केलेली त्यांच्या मानबिंदूची ही दशा पाहून त्यांना आपल्या प्रचंड शक्तीची कल्पना यावी आणि त्यांचे धैर्य खचावे. प्रारंभी ज्या पोवाड्याच्या काही ओळी उद्धृत केलेल्या आहेत, त्या ह्याच प्रसंगाबाबतच्या आहेत. शाहीर अज्ञातदासाने अफझुलखानाने ज्या वेळी मूर्ति फोडली त्या वेळी केलेले वर्णन आहे. "बताव मुझे तेरी करामत। बताव तेरी अजमत" दावीव तुझे कर्तृत्वाचा आणि सामर्थ्याचा चमत्कार, असे आव्हान देत खानाने मूर्तीवर घाव घातला. मूर्ति फुटली. नतर खानाने एक गायीची कुरबानी करून, मराठ्यांच्या कुलस्वामीनीचा भयंकर अपमान केला. आणि अचया करण्यासारखी गोष्ट अशी, हे सर्व त्याने मराठे सरदारांचे समोर केले. कोणकोण सरदार होते ते पहा—पिलाजी मोहिते, शंकराजी मोहिते, कल्याणराव यादव, नाईकजी खराटे, नाइकजी पांढरे, प्रतापराव मोरे, झुंजारराव घाटगे, काटे, घोरपडे, आणि शिवाजी राजांचे प्रत्यक्ष चुलतभाऊ मबाजी राजे भोसले. हे सर्व विजापूर सेनेतील सरदार, शिवाजीचा नाश करण्यास आले होते. पंढरपूर येथील विठ्ठलमूर्तीवरही त्याने हल्ला केला असा उल्लेख बखरीत मिळतो. शिवाजी महाराजांनी ह्या घटना ऐकून गळ्याशी आलेला आवंढा अगदी शांतपणे गिळला. आपल्या सैनिकांचे सांत्वन केले आणि नंतर योग्य वेळ मिळताच प्रतापगडावरील सर्वविश्रुत कार्यभाग साधून घेतला.

काही संशोधकांचे मत असे आहे की, अफझुलखानाने तुळजापूरला भेट देण्याचे ठरविल्यावर, बजाजी-वाकाजी या सेवेकऱ्यांनी देवीची मूळ मूर्ति होम कुंडाजवळील पिंपळ वृक्षाचे आग्नेय कोपऱ्यात असलेल्या ब्रह्मकूपांत सोडून सुरक्षित केली. (तीर्थरूप महाराष्ट्र, ले. महादेवशास्त्री जोशी, पृ ३६). खान क्षेत्रामध्ये आल्यावर त्याला वाटले की, आपणाला देवता भिऊन पळून गेली आहे आणि म्हणून तो पुढे निघून गेला. पण इतर पुराव्याची छाननी केली तर हे मत टिकण्यासारखे नाही.

सतराव्या शतकाच्या शेवटी 'सभासद बखर' लिहिली गेली, आणि त्यामध्ये या संबंधीचा उल्लेख असा की, "फौजा निघाल्यावर तुळजापूर येथे पहिले ठाणे झाले. तुळस्वामिनीची मूर्ति फोडून जात्यामध्ये भरडली गेली." हा ऐतिहासिक पुरावा असल्यावर तीर्थरूप महाराष्ट्रातील मजकुर यानुसार का न यावा याचा उलगडा होत नाही. ( Temples and legends of Maharashtra by M S Mate )

खानाचा पुरा नि पात केल्यावर शिवाजी महाराजांनी दोन उत्तम समसरवरी पाषाणाच्या काळ्या शिळा नेपाळातून आणल्या, आणि त्यांच्या मूळ मूर्तीच्या स्वरूपाच्या दोन मूर्ति बनवून घेतल्या. त्यापैकी एका मूर्तीची स्थापना तुळजापूर येथे मूळ मूर्तीच्या ठिकाणी केली. याच संदर्भात श्रीस्वामी रामदास म्हणतात,

तुळजापूर ठाकेना। चालली पश्चिमेकडे।
पारघाटीं जगन्माता। सद्य येऊनि राहिली॥

परमानंदांच्या शिवकाव्यात खालीलप्रमाणे उल्लेख आढळतो.

इदानीमपि दैत्यारे विमुच्य तुळजापुरम्।
उपेतास्मीति जानीहि साहाय्यार्थेव ते स्वयम्॥

'मी तुळजापूर सोडून तुला सहाय्य करण्यासाठी या ठिकाणी येऊन राहिले आहे.' असा ह्याचा भावार्थ.

प्रतापगडच्या भवानीसंबंधी सभासद बखर (पृ २३) मध्ये अशी हकीकत दिली आहे की, तुळजापुरी कुलदेवतेचे दर्शनास वारवार जाणे घडेना आणि तिच्याच कृपेने तर अफझुलखानावर विजय मिळविला, यास्तव त्या गडावर मूर्तीची स्थापना करण्याचे ठरले. मवाजी नाईक बिन गोमाजी नाईक पानसरे यांना हिमालय प्रदेशी पाठवून नेपाळ हद्दीतील त्रिशूळगडकीतून उत्तम शिळा शोधून आणण्यास सांगितले. त्याच प्रांतातील कुशल कारागिराकडून, अष्टभुजा भवानी स्वरूप हाती खड्ग, बाण, धनुष्य, ढाल, शस्त्र, त्रिशूळ इ० आयुधे असून, त्रिशूळ महिषासुराचे वक्ष स्थळी खोचलेला, डाव्या हाती त्याच्या मस्तकाची शेंडी, उजव्या पाय सिंहवाहनाच्या पाठीवर, सिंहाने दैत्याचे मनगट पकडलेले, उजव्या व डाव्या कर्णावर चंद्र सूर्य झळकताहेत, व मस्तकी मुकुटावर शिवलिंग आरूढ असे स्वरूप बनविलेले आहे सन १६६१ साली मोरोपंत पिंगळे यांच्या हस्ते स्थापना

केली. स्वतः महाराज त्या वेळी देवीचे भोपे बनले. त्याच वेळी मंदिरव्यवस्थेसाठी, पेशवा, पुजारी, पुराणिक, हवालदार, खाटीक यांच्या नेमणुका केल्या. दर पौर्णिमेस छबिना व बकऱ्याचा बळी, आणि खाडे नवमीस व दसऱ्याचे दिवशी अजबळी देण्याची व्यवस्था केली ( शिवचरित्र, ले. ब. मो. पुरंदरे, पृ. ४६२ ).

श्रीशिवछत्रपतींच्या वेळी ही देवता एकप्रकारे राष्ट्रदेवता म्हणून मिरवीत होती. ‘ जय भवानी ’ ह्या परवलीच्या शब्दाने मराठे बहाद्दर मावळ्यांची लढाईची आणि चढाईची वेळ आसमंत दुमदुमून टाकीत असे. ह्या स्फूर्तिदायक शब्दाच्या उच्चाराने मराठे वीरांच्या अंगातील रक्त सळसळत असे. त्या शब्दाने त्यांना स्फुरण चढून बेभान होऊन जीवीताची अथवा इतर कशाची पर्वा न करता ते शत्रूवर तुटून पडत असत.

‘ हर हर महादेव ’ ही मराठेवीरांची गर्जना शत्रुसंहाराला स्फूर्तिदायक आहे. शंकर ही स्वतः संहार करणारी देवता असल्याने ही गर्जना तयार झाली असावी.

पुढे औरंगजेबाने जेव्हा मराठी मुलुखामध्ये वीसपंचवीस वर्षे धुमाकूळ घातला आणि मराठ्यांची सत्ता नामोहरम करण्याची पराकाष्ठा केली, त्या वेळी पुन्हा या देवस्थानावर थोडीशी अवकळा आली. त्यामुळे ऐन पेशवाईतही बराच काळ ह्या देवस्थानाकडे दुर्लक्ष झाले. कालांतराने, निजामाने महादजी नाईक-निंबाळकर यांना जो मुलूख जहागीर दिला, त्यामध्ये हे क्षेत्र आल्यावर जानोजीराव व रावरंभा निंबाळकर यांच्या वेळी क्षेत्राची पुनश्च सुधारणा झाली, आणि त्याचा लौकिक वाढू लागला. ह्या राष्ट्रदेवतेला पुन्हा तिचे स्थान प्राप्त होवो हीच स्वतंत्र महाराष्ट्रातील मराठी जनतेची इच्छा असणार. ह्याच कारणास्तव संरक्षणमंत्री नामदार यशवंतराव चव्हाण ह्यांना तेथील विश्वस्तांनी देवीचा प्रसाद म्हणून एक तलवार अर्पण केली आहे आणि त्यांनी देखील देवीसमोरच तिचा स्वीकार केलेला आहे. ह्याचाच अन्वयार्थ असा घेता येईल की, ह्या देवतेला पुन्हा तिच्या राष्ट्रदेवतेच्या पदावर बसविण्याचे महन्मंगल कार्य त्यांच्याकडून अवश्य होणार आहे.

तुळजापूर भवानीच्या बाबतीत एका रूढीप्रमाणे शास्त्राने निराकरण व्हावयास पाहिजे. देवीभक्तांनी शब्दांचा वापर भोंगळपणाने केल्यामुळे, अथवा त्यांतील फरक न समजल्यामुळे ही रूढी प्रचलीत असावी. माझ्या अल्प बुद्धीप्रमाणे मी त्या विषयाला चालना देण्याचे कार्य करणार आहे. विद्वानांनी याचा सखोल अभ्यास करून चिकित्सबुद्धीने निर्णय देणेच श्रेयस्कर होईल. असो. मुद्दा असा की, तुळजाभवानी देवीला कोणी रामवरदायिनी अगर तुकाई म्हणून

मानतात. तेव्हा ही दोन्हीही नामाभिधाने एकच आहेत, की तीन निरनिराळी आहेत, याचे निराकरण करण्यासाठी मुद्दाम दोन वेळा स्वतः त्या दृष्टीकोणातून, वे. मू. नारायण गणपत रामराज, क्षेत्रोपाध्याय यांच्यासह परिसर पाहिला, आणि खालील निर्णयाप्रत आलो.

( १ ) तुकाई देवीचे मंदिर सोलापूरकडून जाणाऱ्या रस्त्याच्या घाटमाथ्यावर दिसते, आणि ते तुळजाभवानी मंदिराच्या दक्षिणेला सुमारे १ मैल अंतरावर आहे. हे स्थान घाटशीळा नावाने प्रसिद्ध आहे. येथून आसमंतातील प्रदेशाचे दर्शन घडते. तुकाई देवीचा पाषाण सुमारे ६ × ६ ची. फूट असून ३ फूट तरी उंच असावा. याच पाषाणावर पार्वतीमाई, सीतास्वरूपात उभ्या राहिल्या, म्हणून त्यांची दोन पादपद्मे वरील बाजूस आहेत. पाषाणाला आच्छादन म्हणून घुमटीवजा लहानसे मंदिर आहे, आणि ते हेमाडपंती धाटाचे आहे. पुजारी सकाळी पूजन करून जातो. सभोवार संरक्षण तट आहे.

जनस्थान सुटल्यावर श्रीरामप्रभूंचा लंकेकडे जाण्याचा जो मार्ग आहे तो याच बाजूने आहे. तेव्हा या ठिकाणी पार्वती उभी राहिली, तर ती दहा पाच मैलावरूनही दिसून येण्यास हरकत नसावी, अशी एकंदर भौगोलिक परिस्थिति आहे.

( २ ) तुळजा भवानीचे मंदिर या तुकाईमंदिराच्या पूर्वेस एक मैलावर खोल दरीत आहे. अनुभूतींच्या रक्षणासाठी अनेक सहस्र वर्षांचे पूर्वी पार्वती येथे धावून आली आणि कायम वस्ती झाली. त्वरित आली म्हणून तुरजा–तुळजा नाव आले. असे जरी असले तरी मूर्ति अष्टभुजा महिषासुरमर्दिनीचीच आहे.

( ३ ) रामवरदायिनी देवीचे मंदिर भवानी मंदिराच्या उत्तरेला सुमारे अर्धामैल अंतरावर आहे. मूर्ति महिषासुरमर्दिनीची म्हणजे तुळजेसारखीच आहे. या लहानशा मंदिराजवळ रामकुंड-लक्ष्मणकुंड आहेत. याच भागाला अरण्यबुवांचा मठ असे म्हणतात. हा मठ सध्या भावसारपंथीय लोकांच्या ताब्यात आहे. तेथे एक शंकराची पिंडी आहे, त्याला लक्ष्मणलिंग म्हणतात. तेथील मराठावर्गीय पुजाऱ्याने असे सांगितले की, या लिंगाची पूजा चिताभस्म लावून करावी लागते, तसे न केल्यास पूजकाला ती बाधक होते.

आता प्रश्न असा की, तुकाई आणि भवानी यांच्या उत्पत्ति निराळ्या असता हा एकच कसा ? भवानीचा उत्पत्तिकाळ हा खास न तुकाईच्या उत्पत्तीपेक्षा प्राचीन असला पाहिजे. कारण तिचेच दर्शन रामरायांनी घेतले आहे. दोन्ही स्वरूपे जर एक, तर दोन निरनिराळी लांब अंतरावर मंदिरे का ! दोन्ही

स्वरूपे जर एक, तर दोन्हींच्या मूर्तिरूपात फरक का ? इत्यादी अनेक प्रश्नांचा विचार व्हावयास पाहिजे. क्षेत्राचे अवलोकन व वरील माहिती यांच्या आधारे माझे मात्र प्रांजळ मत आहे की, तुकाई व भवानी या दोन निराळ्या देवता आहेत, एकच नव्हेत.

या दोन देवता एकच आहेत, असा जो सर्वसाधारण लोकांचा समज होतो, त्याला कारण कदाचित् एकनाथ महाराजांच्या भावार्थ रामायणातील ओवी कारण असावी. कारण महाराज त्यामध्ये म्हणतात,

'श्रीरामवरदायिनी माता । तुकाई म्हणती रामवाक्यार्था । पुढे काय वर्तली कथा । सावधान श्रोती परिसावे ॥' मला या ओवीवर टीका करण्याचा अधिकार नाही. पण तुळजापूर क्षेत्राचे बारकाईने निरीक्षण केल्यावर तुकाई, तुळजाभवानी आणि रामवरदायिनी या तीन वेगवेगळ्या देवता आहेत, त्यांच्या उत्पत्ति निरनिराळ्या आहेत, असे निश्चित म्हणता येते. रामदासस्वामींची तुकाईसंबंधी उत्पत्ति वरील प्रकारचीच आहे, आणि तिनेच लक्ष्मणाला बसल्या जागी लंकेचे दर्शन घडविले असे मराठी वाङ्मयाच्या इतिहासात ल. रा. पांगारकर यांनी म्हटले आहे. तुळजापुरी वर म्हटल्याप्रमाणे रामवरदायिनींची मूर्ति तुळजाभवानीप्रमाणे आहे. हे लेखकाने निश्चितपणे पाहिलेले आहे. तेव्हा वाचकांनीच तो आपला ग्रह बनवावा.

आता राहिली रामवरदायिनी या देवीची मूर्ति तुळजेसारखीच अष्टभुजा स्वरूपाची, मग निराळे येण्याचे कारण तिने रामाला वर दिला की, "तू विजयी हो" यासाठीच त्या स्वरूपाला ते नामाभिधान मात्र झाले. रामरायाचा लंकेकडे जाण्याचा मार्ग दक्षिणेकडून उत्तरेकडे आहे, आणि वरदायिनीचे मंदिर हेही भवानी मंदिराच्या उत्तरेलाच आहे. तेव्हा मला असे वाटते की, देवी या ठिकाणापर्यंत रामरायांना निरोप देण्यास आली. त्यांना वर दिला. आणि रामराय पुढील मार्ग आक्रमण करू लागले. तेव्हा ज्या ठिकाणी देवीने निरोप दिला, त्याची स्मृति म्हणून कोणी भक्तांनी, या ठिकाणी भवानीच्या मूर्तीची स्थापना केली असावी आणि रामवरदायिनी हे नाव दिले. असे जर नसेल, तर रामवरदायिनीचे निराळे क्षेत्र असण्याची गरजच नव्हती. यावरून असे दिसेल की, तुकाई, भवानी व रामवरदायिनी ही तीन स्थाने तुळजापुरी निरनिराळी आहेत. एकाच देवीला तीन्हीही नावे नाहीत.

म. म. दत्तो वामन पोतदार म्हणतात की, प्रतापगडच्या आसमंतात ही एक ग्रामदेवताच बनली आहे. रामदास जेव्हा म्हणतात की, "रामवरदायिनी माता, दासे धुंडोनी काढली." याचा अर्थ या देवीचे पूजन त्या भागात

आधीपासूनच होते; इतकेच नव्हे तर या नावाचा अपभ्रंश " वर्धिनी " या ग्रामदेवतांच्या नावात झालेला आहे. पण स्वरूप मात्र वरदायिनीचेच असते. प्रा. न. र. फाटक या संबंधात म्हणाले, " जावळीचे मोरे व इतर मराठे सरदार यांची मुद्रा, याच देवीच्या नावाची होती. याचाच अर्थ ती देवता त्या प्रांतात समर्थांपूर्वीही होती."

स्कंद-पुराणामध्ये तुरजा-कवच, तुरजा-स्तव, तुरजा-स्तुति इत्यादि प्रकरणे सह्याद्रिखंडामध्ये समाविष्ट आहेत. तुरजासहस्रनाम, तुरजाष्टक, तसेच कृष्णानंद सरस्वतींचे शिष्य निजानंद ह्यांचे तुरजाष्टक आणि त्रिपुरी-सुंदरीअष्टक इत्यादि स्तोत्रे ह्या देवीच्या स्तुतीवर लिहिलेली आहेत. रामदासस्वामींनी तुळजा-स्तुति ह्या शीर्षकाखाली देवीच्या माहितीपर काव्य केलेले आहे. ह्या देवीच्या नावावर एक भारुडही उपलब्ध आहे.

ह्या देवीबद्दलची एक आख्यायिका अशी सांगितली जाते की, सन १९३५ च्या सुमारास हे मंदिर हैद्राबाद संस्थानाच्या ताब्यात असताना, एके वेळी तेथील देवीचा खजिना निजाम सरकारने तेथून हलवून राजधानीच्या शहरी नेला. त्याचा परिणाम तात्काळच दिसून आला. स्वतः निजामसाहेबाची दृष्टि एकाएकी अधू झाली आणि दिवसेंदिवस त्यांना कमी दिसू लागले. कोठे आणि कोणती चूक झाली, ती मौलवींनी राजाच्या नजरेस आणून देताच तो खजिना मंदिरात पुनरपि परत करण्यात आला. आश्चर्य असे की, त्या दिवसापासून निजामची दृष्टि काहीएक उपचार न करता पूर्ववत् बरी झाली. सन १९२० सालच्या मोजदादीच्या वेळी देवीच्या अलंकारांची किंमत रु. १,१७,७४१/- इतकी होती. देवताही काही वेळा अशा तऱ्हेने आपल्या शक्तीचा प्रभाव वाट चुकलेल्या भक्तांना दाखवितात आणि म्हणूनच ' जागृत देवता ' म्हणून भक्तांकडून त्यांना मान्यता मिळते. ( श्री. काटरे, उस्मानाबाद )

देवता आपला साक्षात्कार भक्तांना पूर्वीच्या काळी दाखवीत असत आणि आजकाल मात्र तो दाखवीत नाहीत, असे म्हणणे चुकीचे आहे. फक्त आपल्या हृदयातील तीव्र श्रद्धेने आणि भक्तिभावाने त्यांची आळवणी केली गेली पाहिजे. प्रस्तुत ग्रंथाच्या लेखकाला देवतेचा साक्षात्कार दिनांक १८ एप्रिल १९६३ रोजी घडला आणि आदिशक्तीच्या साक्षात अवताराची प्रत्यक्ष प्रचीति आली. ओघा-ओघानेच आलेच आहे. म्हणून तो प्रसंग भाविक भक्तांच्या माहितीसाठी खाली उद्धृत करीत आहे.

गोरेगाव ( मुंबई ) येथील अंबाबाई देवस्थानातील अंबाबाईच्या अष्टभुजा मूर्तीची स्थापना सुमारे ७५ वर्षांपूर्वी झाल्याने त्याचा अमृतमहोत्सव धुमधडाक्याने

दिनांक ८ ते २४ एप्रिलपर्यंत चालू होता. ह्या उत्सवाची धार्मिक बाजू म्हणून ऋक्संहिता स्वाहाकार चार घनपाठी ब्रह्मवृंदाकडून करण्यात आला. तसेच बारा लक्षाचे गायत्री पुरश्चरण व स्वाहाकारही करण्यात आला गायत्री महायज्ञाची पूर्णाहुति १९ एप्रिल १९६३ रोजी होती. लेखक स्वत त्यांची पत्नी सौ. पार्वतीबाईसह यजमान म्हणून यज्ञसमारंभात वावरत होते.

दिनांक १८ एप्रिल १९६३ रोजी दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास मंदिराच्या सभामंडपात एका भक्ताच्या ओरडण्याचा आवाज झाला म्हणून मी (प्रस्तुत ग्रंथाचे लेखक सांगत आहेत) तेथे गेलो. तेथे गेल्यावर पाहिले तो एका स्त्रीच्या अंगात देवतेचा संचार झालेला होता आणि ती खाली वाकून त्या विव्हळणाऱ्या भक्ताला समजावीत होती. त्या श्रीचे स्वरूप आणि तेज प्रथमदर्शनीच नेत्र दिपवणारे आणि कोणाही इसमास नतमस्तक करायला लावणारे होते. त्यामुळे माझ्या नकळतच माझा माथा तिच्या चरणावर टेकला गेला. साक्षात् देवता प्रकट झाल्याने पर्यायानेच यज्ञाचे सार्थक झाले, या भावनेच्या जाणीवेने माझ्या डोळ्यातून घळघळा अश्रुमाला ओघळू लागली. अंगात हिरवी चोळी, नेसणीस हिरवे लुगडे आणि हातात हिरवा चुडा हा सगळा सरंजाम पाहिल्यावर ती साक्षात् देवताच भासत होती. त्या वेळी ती आपल्या डाव्या हाताच्या तळव्यातून कुंकू काढून घेऊन अनेकांना प्रसाद म्हणून ते वाटत होती. माझ्या अंगावर आणि मस्तकावर मूठभर कुंकू फेकल्यानंतर मला हाताला धरून वर उठवीत ती म्हणाली, "उठ बेटा, अरे तू जो येथे यज्ञ करीत आहेस आणि जो ब्राह्मणांनी मतस्थ राहिल्यामुळे शास्त्रशुद्ध झाला आहे, तो शंभर टक्के माझ्या मनासारखा झाला असल्यामुळे मला येथे यावे लागले आहे मी तुळजापूरची भवानी आहे." एवढे बोलून ती पुढे दरवाज्याकडे पाहून म्हणाली, "अरे, पण मला बसायला जागा कुठे आहे! गाभाऱ्यात माझी हक्काची जागा आहे. परंतु, तेथे जाण्याचा मार्गच तू हा दरवाजा बंद करून अडवला आहेस" त्या वेळी मोठ्या तत्परतेने गाभाऱ्यात जाण्यास देवीस वाट मोकळी करून दिली त्यानंतर पुढे आम्हा सर्व भक्तांना उद्देशून ती म्हणाली, "यज्ञयाग होमहवन म्हणजे शक्तीची पूजा. म्हणूनच पर्यायाने माझीच पूजा व कार्य होय. हे माझेच पूजाकार्य तू करीत असल्यामुळे तो सोहळा पाहण्यास मी मुद्दामच येथे आले आहे. भारतातील शक्तिस्थानांची याद होऊन आणि वाढत्या प्रमाणात लोकांच्या मनात वास करून असलेली कामभावना लोप पावून तेथे धर्मभावनेचे प्राबल्य होऊन धार्मिक परंपरांची जोपासना व वाढ होणे अत्यंत आवश्यक आहे. येथील मूर्ति हे माझेच स्वरूप आहे."

नंतर पुन्हा माझ्याकडे वळून ती म्हणाली, अरे, पण तू एवढा चिंताग्रस्त निरस्त का! पैशासाठी उन्हातान्हाची, रात्रंदिवसाची पर्वा न करता तू जो

वणवण फिरतो आहेस तो का? माझ्या सेवेस्तव फंड जमा करण्यासाठी तू असा अपरिमित त्रास घेऊ नकोस. तू करीत असलेले कार्य हे माझेच कार्य असल्यामुळे ते माझे मलाच पुरे करून घ्यावयाचे आहे व ते पुरे करण्यास माझी मी समर्थच आहे. यापुढे तू खर्चाची, पैशाची, कशाचीच काळजी करू नकोस, व दारोदार हिंडू पण नकोस. माझी इच्छा म्हणून आपली एक शतचंडी यज्ञ या ठिकाणी कर."

अनेकांना कुंकवाचा प्रसाद देत देत नंतर ती देवता यज्ञमंडपात आली. कारण ब्रह्मवृंदाश्री श्री. मालचंद्रशास्त्री करंजेळकर, श्री. दत्तात्रयभट्ट किंजवडेकर, श्री. बाळभट भावे, महाबळेश्वरकरगुरुजी व इतर घनपाठी ऋत्विज हे अनुष्ठित असल्याने त्यांना कुंडापासून दूर जाता येण्यासारखे नव्हते. अनुष्ठानास बसलेल्या सुमारे तीस ब्राह्मणांना कुंकवाचा प्रसाद वाटल्यावर यज्ञकुंडाजवळ येऊन अंदाजे दहा मिनिटे ती एकसारखी तळहातातून कुंकू काढून घेऊन ते यज्ञकुंडात वाहात होती. अशा तऱ्हेने सुमारे अर्धातासभर आपल्या तळहातातून कुंकू काढून ती ते भक्तांना वाटत होती. तरीदेखील तिच्या तळहातातील कुंकवाचा साठा कणभरही कमी न होता उलट आपोआप वाढतच होता.

पूर्णाहुतीच्या दिवशी ती पुन्हा आली. सुमारे चार ते पाच तासपर्यंत हजारो स्त्रीपुरुष देवीभक्तांना हळदीकुंकवाचा प्रसाद देऊन त्यांच्या काही प्रश्नांची तिने उत्तरे दिली. हजारोंनी तिचे दर्शन घेतले, प्रसाद घेतला आणि साक्षात् देवताच भेटल्याच्या आनंदाने उर भरभरून हर्ष घेऊन भक्तमंडळी आपापल्या घरोघरी निघून गेली. यज्ञाचे सार्थक झाले. देवीला जागृति आली. मूळस्वरूप गाभाऱ्यात आपल्या स्थानी जाऊन विराजमान झाले आणि सौ. इंदुताई पंगाळे या साक्षात्कारी देवतारूप मानवीस्वरूपात भक्तांना देवी दर्शनाचा लाभ झाला. अद्यापही धर्म जागा आहे देव जागा आहे हीच भावना यज्ञकर्माची फलश्रुति मिळाल्याने गोरेगावकर आणि आजूबाजूच्या परिसरातील भाविक रहिवाशांमध्ये रुजली आणि वाढीस लागली.

वरील प्रकारचेच हे दुसरे उदाहरण पहा. पुणे शहरी माळीबुवा नावाचे सत्पुरुष होऊन गेले. त्यांनी सन १९०७ च्या सुमारास समाधी घेतली. त्यांचा शिष्य म्हणून पुढे मारुती रामजी मोडके हा प्रसिद्धीला आला आणि त्यानेही सन १९६० च्या सुमारास समाधी घेतली. या मारुतीबुवांची अशी आख्यायिका प्रत्यक्ष पाहिलेले गृहस्थ सांगतात की, पुण्यापासून शिरवळ, हे सातारा रस्त्यावर आहे. तेथून दहा मैलांवर लोहमगावी डोंगरमाथ्यावर मांढरा देवीचे स्थान आहे. पायथ्याशी शंकराचे स्थान आहे. त्याचा जीर्णोद्धार निवेदकाने स्वतः

केलेला आहे. साधारणतः पायथ्यापासून तीन मैल चढणीवर देवीचे स्थान आहे. वार्षिक यात्रेच्या वेळी मारुतीबुवा या क्षेत्री येत असत. त्या ठिकाणी त्यांच्या अंगात देवीचा संचार होई. त्या वेळी त्यांच्या मुखातून, पाण्याच्या नळाप्रमाणे लालभडक कुंकवाचा ओघ बाहेर वहात असे. अनेक भक्तमंडळी ओंजळी भरभरून प्रसाद म्हणून घेत असत. असे बराच वेळ चाले. तसेच त्यांच्या अंगात मारुती अथवा गरुडाचाही संचार होई आणि त्या त्या स्वरूपाप्रमाणे त्यांच्या मुखावर फरक होत असे. म्हणजे चेहरा मारुतीप्रमाणे अथवा लंबायमान गरुडा प्रमाणे दिसे.

या अवस्थेत शरीर गेल्यावर तो जवळच्या डोंगरमाथ्यावर जाई आणि सपाटीवर जमलेल्या असंख्य भक्तगणांच्या रोखाने, तेथून उडी घेई. पाण्यामध्ये पोहणारा जसा हात मारून पुढे अंतर कापतो, तद्वत हवेमधून हात मारीत मारीत सुमारे ५०–७५ फुटांवर खाली उतरे. यात्रेच्या वेळचे हे वैशिष्ट्य पाहण्यासाठी अनेक भक्त जमत असत. जड देहाने अंतराळामधून संचार करणे ही क्रिया भारतीय आर्यांना परिचित होती. हे आपण शुकाचार्यांच्या उदाहरणावरून पाहू शकतो योगशास्त्रामध्ये समाधीचे जे तीन प्रकार आहेत, त्यामध्ये अधांतरी आसन हाही एक प्रकार सांगितला आहे. तेव्हा योगसामर्थ्याने ज्याने पंचेंद्रियांवर ताबा मिळविला, त्याला वरीलप्रमाणे वर्तन करणे मुळीच कठीण नाही. (सीतारामपंत पंडित मोतीवाले–पुणे). खेचरी मुद्रा साधनाने या प्रकारचे उड्डाण करता येते.

स्त्री किंवा पुरुष त्यांच्या अंगात कोणत्याही देवतेचा संचार होतो म्हणजे काय होते ! हा प्रश्न विचार करण्यासारखा आहे. एका मीमांसातीर्थ विद्वद्-वर्यांनी ह्याचा खुलासा केला. तो असा की, हा एकप्रकारे परकायाप्रवेशाचाच प्रकार असावा. आदिशक्तीला मूळचे देहरूप नाही, परंतु ती शक्ति मात्र निश्चितपणे संचार करीत असते. जेव्हा तिला प्रकट व्हावयाचे असेल अगर साक्षात्कार दाखवावयाचा असेल तेव्हा ती कोणाच्यातरी देहात प्रवेश करून प्रकट होते आणि त्याद्वारे हुद्रत बोलून दाखविते. स्वतःला मूळचे देहरूप नसल्याने कोणाच्या तरी माध्यमाने ती प्रकट होते इतकेच.

ह्यासंबंधात एकदोन उदाहरणे पाहू. एकदा आद्यशंकराचार्य विजयपत्रके मिळवीत नर्मदाकाठी आले. तेव्हा तेथे मंडलेश्वर येथे त्यांची मंडणमिश्रांशी गाठ पडली. चर्चा व वादविवाद चालू असता सरस्वतीने बालब्रह्मचारी आचार्यांना कामशास्त्रातील काही कूट प्रश्न विचारले. शंकराचार्यांना कामशास्त्र अवगत होते परंतु कामसुखाचा अनुभव नव्हता, म्हणून त्यांनी सरस्वतीकडून सहा महिन्यांची मुदत मागून घेतली. तावत्‌तोवर त्यांनी आपला आत्मा आपल्या शरीरातून काढून

घेतला आणि अमरू नावाच्या एका मृत राजाच्या शरीरात प्रवेश केला. त्या राजाच्या शरीराद्वारे ते जनानखान्यातील हजारो स्त्रियांचा आणि तरुण स्वरूपसुंदर राणींचा उपभोग घेऊन कामसुखाबरोबरच कामानुभव घेत होते. शेवटी मुदत संपत आली तेव्हा त्यांच्या शिष्याने त्यांना शुकाच्या रूपाने येऊन मुदत संपत आल्याची जाणीव करून दिली. तेव्हा कुठे स्वारींचे पाय भूमीला लागले! ते झोपी गेलेले जागे झाले! आणि परत आपल्या स्वदेहात गेले. मिळालेल्या अमाप अनुभवामुळे सरस्वतीच्या प्रश्नांची बरोबर उत्तरे देऊन शंकराचार्यांनी तिच्याकडून विजयपत्र मिळविले ही गोष्ट निराळी सांगावयास नकोच.

दुसरे एक उदाहरण जनमेजय राजाच्या अश्वमेध यज्ञाच्या वेळचे वाचण्यात आहे. ऋत्विजांनी यज्ञाश्व ठार केला. त्या यज्ञामध्ये मृत अश्व व पट्टराणी यांचे मैथुन विहीत आहे (कात्यायनी श्रौसूक्त, २०-६-१५-१६). वाल्मिकी रामायणामध्येही त्याचा उल्लेख मिळतो तो असा.

पतत्रिणा तदा सार्धं सुस्थितेन च चेतसा।
अवसद्रजनीमेकां कौसल्या धर्मकाम्यया।

(बाल कांड, १८-३८).

कौसल्येने धर्मकामना मनात धरून स्थिर चित्ताने त्या (मृत) अश्वासह एक रात्र घालविली.

हा यज्ञ होऊ नये यासाठी इंद्राने आपला देह त्यागून घोड्याच्या शरीरात प्रवेश केला. सजीव घोड्याजवळ राणी झोपल्यामुळे अर्थातच घोड्याकडून ती भ्रष्ट झाली. ऋत्विजांनी अश्व पूर्णपणे ठार केला नाही, ह्या समजुतीने जनमेजय राजाने त्या ऋत्विजांना नगरहद्दीबाहेर हाकलून दिले. त्यामुळे यज्ञ अपुरा राहिला. इंद्राच्या परकायाप्रवेशामुळे हे सर्व घडले आणि एवढे करून, सवरूनहि त्याचे पद मान अढळच राहिले.

दाखविली वसली आणि तिसऱ्या दिवसापासून, " मी गोरखनाथ आहे, एकनाथ आहे " अशी वाणी उच्चारू लागला. कोणाला अंगारा, धुपारा देऊ लागला. आणि लोकांना गुणही येऊ लागला. काही दिवसांनी पुत्राच्या इच्छेने एका गुजराथी श्रीमंत गृहस्थाने त्याजकडून प्रसाद घेतला आणि त्याची मनीषा पूर्ण झाली. या बाबाच्या कृपेने आपल्याला पुत्ररत्न लाभले, म्हणून " बाबांनी काही सेवा सांगावी " असा हट्ट घेताच बाबा त्यांना म्हणाले, " या एकनाथ स्थानाचा जीर्णोद्धार कर. " पाच-सात हजार रुपये खर्च करून, त्याने त्या स्थानाची डागडुजी पूर्ण केली. हे काम पूर्ण झाल्यावर थोड्याच दिवसात त्या शेतकऱ्याच्या अंगावरील वारे नाहीसे झाले. तात्पर्य हेच की, काही जिवात्मे वायुरूपाने संचार करीत असतात आणि मिळेल त्या माध्यमाने, आपले इच्छित काम करून घेतात, व पुन्हा वायुरूपात विलीन होतात. अंगावर देवताचे वारे येणारे इसम, हे सदासर्वदा त्याच स्थितीत आढळत नाहीत. काही दिवसांनी त्यांचे शब्द खरे होत नाहीत व वारेही बंद होते, याचे कारण वरील विवरणातच आढळून येईल. ( बापूजी भडारी, धुळे ).

तुळजा मंदिराच्या परिसरात यमाई, तुकाई आणि रामवरदायिनी अशी मूळस्थाने आहेत. परंतु त्यांच्याबद्दलचा समग्र वृत्तांत त्या देवतेच्या शीर्षकाखाली आलेला असल्याने द्विरुक्तिदोष टाळलेला आहे. या देवता आणि मूळस्थानची तुळजाभवानी या मात्र एक नव्हेत हे वाचकांनी पक्के ध्यानी असू द्यावे.

ह्या देवतेची इतरत्र अनेक मंदिरे आढळतात. मराठवाड्यामध्येच माहूर, अंबेजोगाई, राणीसावरगाव, डिग्रोळ, वसमत, बासर, बोधन या ठिकाणी तुळजा-भवानीची मंदिरे आहेत. ( रा. पोहनेकर ह्यांच्या दिनांक २२–१–६१ च्या ' केसरी ' अंकात छापलेल्या पत्रावरून ).

सोलापूर शहराजवळ ( छोटी ) तुळजाभवानी हिचे स्थान आहे. असे सांगतात की, ह्या गावातील एक भवानी-भक्त नेहमी तुळजापूरच्या देवीच्या दर्शनार्थ जात असे. परंतु पुढे पुढे वृद्धावस्थेमुळे मूळस्थानाला म्हणजेच तुळजा-पुराला जाणे त्याला अशक्य होऊ लागल्यावर त्याने देवीची प्रार्थना केली आणि आपली परिस्थिती तिच्या निदर्शनास आणून दिली. तेव्हा देवीला त्याची दया येऊन ती प्रसन्न झाली आणि त्याला आपले दर्शन देऊन आपली धातूची प्रतिमा त्याला नेहमीच्या पूजेसाठी दिली. ह्या भक्ताने एक लहानसे मंदिर उभारले आणि त्यात त्या छोट्या प्रतिमेची स्थापना केली. सांप्रत, तेच हे स्थान छोटी-भवानी ह्या नावाने ओळखले जाते. ( कल्याण शक्तिअंक १९५७, पृष्ठ २६४ ).

करमाळा ( जिल्हा सोलापूर ) शहराच्या आग्नेय दिशेस एक तुळजाभवानीचे मंदिर आहे. फलटणकर राजे निंबाळकर ह्यांनी लाखो रुपये खर्च करून ते उभारले आहे. मंदिराच्या वार्षिक खर्चासाठी सरकारतर्फे दरवर्षी १७०० रुपये मदत मिळते. ह्या ठिकाणी कार्तिक पौर्णिमेला यात्रा भरून चार दिवस मोठा उत्सवसोहळा चालतो. ( सोलापूर जिल्हा गॅझेट, पृ ४१२ )

## (६) तुळजा भवानी ( नेपाळ )

सन १४५७ च्या सुमारास नेपाळ प्रांतावर यक्षमल्ल राजाची राजवट होती. त्या वेळी मिथिला शहरी हरिसिंह नावाचा राजा गादीवर असता, दिल्लीचा मोंगल बादशहा महमद तुघलक ह्याने दोन वेळा मिथिला शहरावर हल्ला केला. त्या वेळी हरिसिंह राजाची कुलदेवता तुळजाभवानी हिने त्याच्या स्वप्नात येऊन त्याला दृष्टांत दिला की, "मुसलमानांच्या संसर्गाने भ्रष्ट झालेल्या या भूमीचा त्याग करून नेपाळप्रांती जाऊन तेथे नवीन राज्याची स्थापना कर." आपल्या कुलस्वामिनीची ही आज्ञा शिरसावंद्य मानून हरिसिंहाने मिथिलेचा त्याग केला. तो नेपाळप्रांती गेला व तेथील राजांचा पाडाव करून त्याने तेथे आपले राज्य स्थापन केले. सर्व काही स्थिरस्थावर झाल्यावर राजाने आपल्या कुलस्वामिनीचे तेथे मंदिर उभारले.

दरम्यान देवीचे अलौकिक सामर्थ्य तिबेटी लोकांना माहीत झाले आणि त्यांनी देवीची ती मूर्तीच पळविण्याचा प्रयत्न केला. ही देवता जागृत असल्याने व दुसरे म्हणजे आपले सामर्थ्य किती दाखवायचे असल्याने, तिबेटी चोरटे भाटगावाजवळ येताच सर्व शहराभोवती आपोआप एक अग्निवलय उभे राहिल्याचे त्यांना दिसून आले. हा प्रकार पाहून ते चोरटे हबकूनच गेले आणि पुन्हा चुकूनसुद्धा त्यांनी देवीची मूर्ति पळविण्याचा विचार मनात आणला नाही नि तसा प्रयत्नदेखील कधी केला नाही. ( नेपाळचा प्रवास, लेखक श्री. रुपतराव गायकवाड, पृ० १२ )

स्रग्धरा

राष्ट्राते उद्धराया विफलजननिं सदा स्फूर्ति दे आदिशक्ती ।
स्पर्धा देवतांची विविधसमधियाँ होय देई प्रचीती ॥
वीरांच्या श्रेष्ठपंक्ती स्तवति घटुंकळे आदिशक्ति प्रभावें ।
त्यामाजी तो शिवाजी तळपवि तुळजादेवता स्वप्रसादें ॥ १ ॥

दातखिळी बसली आणि तिसऱ्या दिवसापासून, " मी गोरखनाथ आहे, एकनाथ आहे " अशी वाणी उचारू लागला. कोणाला अंगारा, धुपारा देऊ लागला. आणि लोकांना गुणही येऊ लागला. काही दिवसांनी पुत्राच्या इच्छेने एका गुजराथी श्रीमंत गृहस्थाने त्याजकडून प्रसाद घेतला आणि त्याची मनीषा पूर्ण झाली. या बाबाच्या कृपेने आपल्याला पुत्ररत्न लाभले, म्हणून " बाबांनी काही सेवा सांगावी " असा हट्ट घेताच बाबा त्यांना म्हणाले, " या एकनाथ स्थानाचा जीर्णोद्धार कर. " पाच-सात हजार रुपये खर्च करून, त्याने त्या स्थानाची डागडुजी पूर्ण केली. हे काम पूर्ण झाल्यावर थोड्याच दिवसात त्या शेतकऱ्याच्या अंगावरील वारे नाहीसे झाले. तात्पर्य हेच की, काही जिवात्मे वायुरूपाने संचार करीत असतात आणि मिळेल त्या माध्यमाने, आपले इच्छित काम करून घेतात, व पुन्हा वायुरूपात विलीन होतात. अंगावर देवतांचे वारे येणारे इसम, हे सदासर्वदा त्याच स्थितीत आढळत नाहीत. काही दिवसांनी त्यांचे शब्द खरे होत नाहीत व वारेही बंद होते, याचे कारण वरील विवरणांतच आढळून येईल. ( बापूजी भंडारी, धुळे ).

तुळजा मंदिराच्या परिसरात यमाई, तुकाई आणि रामवरदायिनी अशी मूळस्थाने आहेत. परंतु त्यांच्याबद्दलचा समग्र वृत्तांत त्या देवतेच्या शीर्षकाखाली आलेला असल्याने द्विरुक्तिदोष टाळलेला आहे. या देवता आणि मूळस्थानची तुळजाभवानी या मात्र एक नव्हेत हे वाचकांनी पक्के ध्यानी असू द्यावे.

ह्या देवतेची इतरत्र अनेक मंदिरे आढळतात. मराठवाड्यामध्येच माहूर अंबेजोगाई, राणीसावरगाव, डिघोल, वसमत, बासर, बोधन या ठिकाणी तुळजा भवानीची मंदिरे आहेत. ( रा. पोहनेकर ह्यांच्या दिनांक २२–१–६१ च्या 'केसरी' अंकात छापलेल्या पत्रावरून ).

सोलापूर शहराजवळ ( छोटी ) तुळजाभवानी हिचे स्थान आहे. असे सांगतात की, ह्या गावातील एक भवानी-भक्त नेहमी तुळजापूरच्या देवीच्या दर्शनार्थ जात असे. परंतु पुढे पुढे वृद्धावस्थेमुळे मूळस्थानाला म्हणजेच तुळजा-पुराला जाणे त्याला अशक्य होऊ लागल्यावर त्याने देवीची प्रार्थना केली आणि आपली परिस्थिती तिच्या निदर्शनास आणून दिली. तेव्हा देवीला त्याची दया येऊन ती प्रसन्न झाली आणि त्याला आपले दर्शन देऊन आपली धातूची प्रतिमा त्याला नेहमीच्या पूजेसाठी दिली. त्या भक्ताने एक लहानसे मंदिर उभारले आणि त्यात त्या छोट्या प्रतिमेची स्थापना केली. सांप्रत, तेच हे स्थान छोटी-भवानी ह्या नावाने ओळखले जाते. ( कल्याण क्षेत्रांक १९५७, पृष्ठ २६४ ).

करमाळा ( जिल्हा सोलापूर ) शहराच्या आग्नेय दिशेस एक तुळजाभवानीचे मंदिर आहे. फलटणकर राजे निंबाळकर ह्यांनी लाखो रुपये खर्च करून ते उभारले आहे. मंदिराच्या वार्षिक खर्चासाठी सरकारतर्फे दरवर्षी १७०० रुपये मदत मिळते. ह्या ठिकाणी कार्तिक पौर्णिमेला यात्रा भरून चार दिवस मोठा उत्सवसोहळा चालतो. ( सोलापूर जिल्हा गॅझेट, पृष्ठ ४१२ )

## ( ६ ) तुळजा भवानी ( नेपाळ )

सन १४५७ च्या सुमारास नेपाळ प्रांतावर यक्षमल्ल राजाची राजवट होती. त्या वेळी मिथिला शहरी हरिसिंह नावाचा राजा गादीवर असता, दिल्लीचा मोगल बादशहा महमद तुघलक ह्याने दोन वेळा मिथिला शहरावर हल्ला केला. त्या वेळी हरिसिंह राजाची कुलदेवता तुळजाभवानी हिने त्याच्या स्वप्नात येऊन त्याला दृष्टांत दिला की, "मुसलमानांच्या संसर्गाने भ्रष्ट झालेल्या या भूमीचा त्याग करून नेपाळप्रांती जाऊन तेथे नवीन राज्याची स्थापना कर." आपल्या कुलस्वामिनीची ही आज्ञा शिरसावंद्य मानून हरिसिंहाने मिथिलेचा त्याग केला. तो नेपाळप्रांती गेला व तेथील राजांचा पाडाव करून त्याने तेथे आपले राज्य स्थापन केले. सर्व काही स्थिरस्थावर झाल्यावर राजाने आपल्या कुलस्वामिनीचे तेथे मंदिर उभारले.

दरम्यान देवीचे अलौकिक सामर्थ्य तिबेटी लोकांना माहीत झाले आणि त्यांनी देवीची ती मूर्तीच पळविण्याचा प्रयत्न केला. ही देवता जागृत असल्याने व दुसरे म्हणजे आपले सामर्थ्य तिला दाखवावयाचे असल्याने, तिबेटी चोरटे भाटगांवाजवळ येताच सर्व शहराभोवती आपोआप एक अग्निवलय उभे राहिल्याचे त्यांना दिसून आले. हा प्रकार पाहून ते चोरटे हबकूनच गेले आणि पुन्हा चुकूनसुद्धा त्यांनी देवीची मूर्ति पळविण्याचा विचार मनात आणला नाही नि तसा प्रयत्नदेखील कधी केला नाही. ( नेपाळचा प्रवास, लेखक श्री. रुपराव गायकवाड, पृ० १२ )

स्रग्धरा

रायाते यद्रराया विफलजनिं सदा स्फूर्ति दे आदिशक्ती ।
उत्पत्ती देवतांची विविधसमयिंची होय देई प्रचीती ॥
वीरांच्या श्रेष्ठपंक्ती उठवि चहुंकडे आदिशक्ति प्रसादें ।
त्यामाजीं तो शिवाजी उपजवि तुळजादेवता स्वप्रसादें ॥ १ ॥

द्रुतविलंबित

वदत अग्निपुराण कथा बरी। मिळत साथही भागवतांतरीं।
गडद रानिं अनूभुति राहिली। स्व-पति कर्दम रंजानिं वाहिली ॥१॥
छळितसे तिज कुक्कुट पाहतां। मदभरान्वित कामिनी मोहितां।
विनवितां सति-पार्वती सोडवी। अवतरे तुरजा असुरां वधी ॥२॥

अनुष्टुभ्

तुरजा तुळजानामे। तुळजापुरिं राहिली।
पार्वती मूळरूपीची। अष्टभूजाच देखिली ॥ १ ॥
मोंगला जाण ही होती। मराठी स्थान स्फूर्तिचें।
उखडितां मानबिंदूतें। विजयश्री हातिं येतसे ॥ २ ॥
फोडिली भंगिली जाती। मूळमूर्ती महामया।
यावनीं अफजूलानें। मराठ्या चीड यावया ॥ ३ ॥
पाषाण गंडकीं आणी। यवनीं शत्रु छोडितां।
अष्टभूजा भवानीला। शिवरायेंचि स्थापिली ॥ ४ ॥

पृथ्वी

तुला सतत सेविती वतनिं चार सेवेकरी।
"बजाजी" करि काम ते उघड झांप दारे बरी ॥
"चिलोजी" नटवी तुला थटचि साज आलंकरी।
जला पुरवि "वाकुजी" आणि "पलंगुजी" शेजही ॥ १ ॥
प्रमूख तुळजे तुझे शयन दीर्घ काळ्या तिन्हीं।
सु-भाद्रपद अष्टमी सरत ते अमास्या दिनीं ॥
सु-वैष्णविस आश्विना धरुनि पौर्णिमा चांदही।
तिथी प्रथम अष्टमी सहित पौष मासांत ही ॥ २ ॥

शार्दूलविक्रीडित

आरामाचे शयन पडतें काळ तिन्ही त्रिकाळीं।
पूजाबंदी सुखद असतें, नाहीं गान्हाणीं भाळीं ॥
निद्रेतूनि उचलिती पहा देवि सिंहासनातें।
निद्रेपूर्वी अणिक उठतां, पांस लागे घळी ते ॥ १ ॥

वसंततिलक

चोहोंकडेही नवरात्र सणास कीर्ति।
कुंभार हातिं घट गोपुरिं स्थापिताती॥
नेती पुढें हळुहळूं तव मंदिरातें।
मूर्तीपरी परीसरीं सरती क्रमानें॥ १॥
होतें समाप्ति दसरा दिनिं उत्सवाची।
देवात बोकड बळी बहुसाल साची॥
अर्पीत भक्त बळी हा तुज शांतवाया।
कीं मागती सु-फळ वांच्छित सौख्य व्हाया॥ २॥

पृथ्वी

शहेनशहा मोंगला पुढति नेत संभाजीला।
स्वधर्म त्यजि आपुला वरिल कन्यका रे तुला॥
वदे "मरण ओढवो नच फसे मराठा खरा"।
स्वधर्म-रत वीर तो म्हणुनि चेंचुनी मारिला॥ १॥

मंदारमाला

आख्यायिका देवी सांगे कुणी, तो रजिना तुझा नेत राजा पहा।
ना आवडे तें तुला कृत्य त्याचें, दिली त्यास शिक्षा बने अंध हा॥
मौलागुरु सांगती कीं तयाला, रजीना तुला रे पचेना कधीं।
नेयोनि दे, देविला तो पुन्हां, दृष्टि देवीरूपे ये निजामा सुधि॥ १॥

रथोद्धता

देवि राहि यमुनाचलावरी।
बाळघाट वदती कुणी गिरी?
मूर्तिरक्षण घडावया तरी।
मंदिरा उभविलें गिरीदरीं॥ १॥

(७) देवगिरी अंबा

एके काळी देवगिरी येथे मराठ्यांची सत्ता अस्तित्वात असताना तेथे यादव घराणे राज्य करीत होते. येथील दौलताबादचा किल्ला हा आजही अतिशय

प्रख्यात आहे. ह्या यादव घराण्याचा प्रथम पुरुष भिल्मा ह्याने राष्ट्रकूट व पश्चिमे-कडील चालुक्यवंश यांच्या पडत्या काळात काही सैन्य जमविले. मुलुखगिरी करीत असतानाच होयसळ व कलचुरी या दोन घराण्यांचा पराजय करून त्याने सन ११८७ साली देवगिरी येथे राज्य स्थापन केले व किल्ला बांधला. त्याचा पुत्र जैयतुगी ह्याने राज्याचा विस्तार बराच वाढविला. पुढे सिंघण गादीवर आल्यावर त्याने पन्हाळा किल्ल्यापर्यंतचा मुलूख कोल्हापूरच्या शिलाहार घराण्याचा पराभव करून पादाक्रांत केला. हेमाद्री हा ब्राह्मण जातीचा प्रधान त्याच्या पदरी होता. त्याने मोडी लिपी प्रथमत प्रचारात आणली. चतुर्वर्ग चिंतामणी, व्रतपरिचय यांसारखे महान् ग्रंथ त्याच हेमाद्रीने लिहून ते प्रसिद्ध केले, आणि किल्ल्यातील अशा मंदिरांची मांडणी तयार केली. त्याने निर्माण केलेले शिल्प आजही हेमाड-पंती शिल्प या नावाने ओळखिले जाते.

अशा त्या ऊर्जितावस्था आलेल्या व भरभराटीत असलेल्या राज्यावर सन १२९४ साली दिल्लीचा बादशहा अल्लाउद्दीन खिलजी ह्याने स्वारी केली आणि त्या लढाईत रामदेवराव यादवाचा सपशेल पराभव केला. त्या वेळी यादवाचा नि खिलजीचा जो तहनामा झाला, त्या तहनाम्यानुसार रामदेवरायाने ६०० मण सुवर्ण, बसराई मोती ७ मण, २ मण निरनिराळ्या प्रकारची रत्ने, एक सहस्र मण चांदीचे पाट, चार सहस्र रेशमी कापडाचे तागे, इतकी संपत्ति व ऐवज दिला शिवाय राज्यातील प्रजाजनांची उल्लाउद्दीन खिलजीच्या सैनिकांकडून अमाप लूट झाली ती निराळीच ! हिरेमाणकांनी उंट व खेचरे भरभरून दिल्लीला गेली. अंबरकस्तुरी आणि अमोलिक अत्तरे यांची अगणित लूट झाली वरील संपत्तीशिवाय वार्षिक खंडणी देण्याचा करार उल्लाउद्दीनाने रामदेवरावाकडून करून घेतला ही गोष्ट निराळीच ! ह्या तहकरारासाठी शिवाय आपली स्वत ची कन्याही बळी दिली ती वेगळीच.

सन १३१० साली रामदेवरावानंतर त्याचा मुलगा शंकरदेव हा गादीवर आला आणि त्याने अल्लाउद्दीनाला खंडणी देण्याचे अजिबात नाकारले. त्यामुळे सन १३१८ साली कुतुबुद्दीन खिलजी ह्याने देवगिरीवर पुनश्च स्वारी केली. ह्या लढाईत शंकरदेवाचा जावई हरपालदेव याचा पराभव केला आणि देवगिरीचा किल्ला आपल्या ताब्यात घेतला. हरपालाचा देह सोलून किल्ल्यावर टांगून ठेवला.
(शिवचरित्र, ले. ब. मो. पुरंदरे, पृ १२)

देवगिरीचा डोंगरी किल्ला औरंगाबादहून सुमारे १० मैलांवर आहे. हाच मार्ग पुढे वेरूळच्या लेण्याकडे जातो. जवळच खुलताबाद येथे औरंगजेब बादशहाची कबर आहे पूर्वीचे राजेरजवाडे संरक्षणासाठी किल्ले किती मजबूत बांधीत असत याची साक्ष हा जीर्णावस्थेत असलेला किल्ला सांप्रतच्या काळी देत आहे व पुढेही देईल या किल्ल्याला सात तट आहेत. बाह्य तटाच्या भोवती लांबरुंद असा खंदक असून प्रवेशमार्ग मर्यादित केलेले आहेत, पूर्वी या खंदकात पाणी भरलेले असे प्रत्येक तटाचे दिंडी दरवाजे भक्कम बांधणीचे असून तेरा चौदा फूट रुंदीच्या भिंती आहेत दरवाज्यांच्या आतील बाजूस फुटाच्या जाडीचे अडसर आजही दिसू शकतात, आणि ते बाहेर ओढण्यासाठी गोल लोखंडी कड्या पाहता येतात. प्रत्येक तटामध्ये भरपूर जागा आणि संरक्षणात्मक इमारती असल्यात शत्रूवर मारा करण्यासाठी बुरुजावर तोफा डागलेल्या दिसतात प्रवेश मार्गांच्या भव्य दरवाजावर बाहेरील बाजूने जाडजूड अणकुचीदार लोखंडी खिळे ठोकलेले असून, हत्तींनाही धडक घेण्यास सवड सापडू नये असा हेतु होता

तिसऱ्या तटाचे आत अनेक भग्न मूर्ति एकत्र ठेवलेल्या आढळल्या, आणि त्यामध्ये गणेशाच्या मांडीवर सरस्वती देवी, लक्ष्मीच्या पायाखाली सिंह, मस्तकावर नागफणा, अशा अनेक देवता असलेल्या दिसतात. कुतुबमिनारप्रमाणे उभा असलेला जयस्तंभ, हा हेमाड शिल्प मोडून उभारलेला असावा, याची साक्ष बांधणीचे दगड देतात, पाचव्या तटावर मेंढातोफ बुरुजावर पंचरस धातूची तोफ असून तिची लांबी सुमारे १५ फूट असावी, आणि त्यातून ६ इंची गोळा सुटत असावा सर्व तट संपल्यावर बालेकिल्ल्यावर जाण्यास एकच गुप्तमार्ग आणि समोरच पुन्हा खंदक. त्या अंधेऱ्या मार्गाने वर गेल्यावर गणेश मंदिर, न्यायसभा, जनार्दनस्वामींची समाधी इ० स्थाने आहेत येणेप्रमाणे या किल्ल्याचे सारांश रूपाने वर्णन आहे.

तटाच्या चवथ्या कोटामध्ये भारतमातेचे मंदिर पहावयास मिळते. सन १९४७ सालापर्यंत या ठिकाणी मशीद होती, पण भारतातील स्वातंत्र्यपूर्वीच्या प्रसंगात निजामशाहीत काही तरुण देशभक्तांच्या अंतःकरणात शिरला आणि

औरंगाबाद येथील काही धार्मिक वृत्तीच्या भक्तांनी या पूर्वीच्या ठिकाणी देवीची मूर्ति बसविली आणि तिला भारतमाता असे सूचक नाव दिले. ही मूर्ति प्लॅस्टर पॅरिसची असून उंचीला सुमारे ५ फूट आहे. आठ हातांमध्ये तलवार, चक्र, त्रिशूळ, शंख, अग्निज्योत, सर्प, अभय अशी अस्त्रे दिलेली आहेत. माथ्यावर किरीट असून नेसणीस हिरवे लुगडे व लाल चोळी आहे. भिंतीमध्ये मेहरपी कमानीवजा लहानशा जागेत तिची स्थापना केलेली आहे, म्हणजे गाभारा नाही.

पूर्वीच्या या नवा मंदिराचा प्राकार फारच भव्य आहे. सध्याचे देवीचे दालन पूर्वाभिमुख असून त्याची लांबीरुंदी २५०×५० चौ. फूट असावी. नक्षीकाम असलेले सुमारे ९० खांब या सभागृहाला शोभा देतात. पाषाणाचा हा प्रत्येक खांब १।।×१।। चौ फुटांचा असून सुमारे २० फूट उंच असावा. खांबाच्या माथ्यावर चारी बाजूला मूर्ति कोरलेल्या असून छताचा भागही दगडाचाच बांधून काढलेला आहे. या शिल्पाला तेथे हेमाडपंती शिल्प संबोधतात. वर्णन करून शिल्पाची यथार्थ कल्पना येणार नाही. ते त्या दृष्टिकोनातून प्रत्यक्षच पाहावयास पाहिजे.

या सभागृहाच्या समोर भव्य चौक (सुमारे २३०×१५०चौ फूट आकाराचा) असून पूर्वी इतर तिन्ही बाजूस बांधकाम असावे कारण भग्न शिल्पाचे अवशेष चौकात विखुरलेले दिसतात. समोरून प्रवेश करण्यासाठी देवडीवजा दरवाजा आहे आणि काही ओवऱ्या अद्याप उभ्या आहेत. या पडव्यांच्या मागे सहा फूट रुंदीची व १५ फूट उंचीची संरक्षक भिंत आजही उभी आहे भग्न होऊन पडलेल्या खांबाच्या माथ्यावर एक हाताच्या चार भुजा असलेल्या मूर्ति कोरलेल्या दिसतात त्यापैकी वरील दोन भुजा अभय स्वरूपात आणि खालील मांडीवर हात टेकलेल्या आहेत मूर्तीच्या पोटाचा आकार मात्र मोठा आहे. लेखकाने प्रत्यक्ष निरीक्षण केले असल्याने इतके बारकाव्याने वर्णन करता आले. अनेक यात्रिक हे क्षेत्र पाहतात पण त्यामागील इतिहास माहिती नसल्याने पाहण्याच्या दृष्टीत फरक पडतो. पूर्वीची ही ऐतिहासिक स्थाने आजच्या आणि भावी तरुण पिढीची स्फूर्तिस्थाने आहेत आणि त्या दृष्टीने अवलोकन व्हावे, हीच अंतरीची तळमळ आहे

पूर्वी किल्ल्याच्या पायथ्याशी जैन बांधणीचे एक मंदिर होते त्याला दीडशे चौकोनी दगडी कोरीव शिल्पाचे खांब असून देवळाचा सभामंडप अत्यंत शोभिवंत होता ते मंदिर सुमारे सन ७५० च्या सुमारास बांधलेले होते परंतु ह्या किल्ल्यात यवनी राजवट सुरू झाल्यावर ते मंदिर पाडण्यात आले आणि त्या जागी मशीद उभारण्यात आली त्याचप्रमाणे किल्ल्यातील अंबेचे मंदिर पाडून त्यावरही मशीद उभारण्यात आली ( औरंगाबाद जिल्हा गॅझेट, पृष्ठ ५७० )

देवगिरीचे राज्य भरभराटीत असताना ह्याच अंबामंदिरासमोर दसऱ्याच्या दिवशी सैनिकी संचलन होत असे. नवीन सैनिकांचे शपथविधि आणि नवीन स्वाऱ्यांचे बेत ह्याच ठिकाणी अन् येथेच ठरत असत. शेकडो वर्षे ही देवता राजाची कुलस्वामिनी आणि राज्याची राज्यदेवता म्हणून मिरविली. परंतु सन १३१८ मध्ये यादवांचा पराभव झाल्यावर ह्या देवतेचे सारे अस्तित्वच संपुष्टात आले. दैवाचा आसुरी आघात राज्याप्रमाणेच ह्या देवस्थानावरही झाला आणि पाहता पाहता अंबेच्या जयघोषाने नि घंटांच्या नादाने पतितपावन झालेल्या त्या जागेतून "अल्ला हो अकबर" चे गंभीर नि सर्वस्वी अपरिचित असे आवाज दाढीवाल्या मोंगलांच्या तोंडून नमाज पढत असताना ऐकू येऊ लागले. मराठी मनाची पूर्वापारची अशी एक समजूत आहे की, कोणतीही वास्तु साधारणपणे तीन पिढ्यापर्यंत टिकून रहाते आणि मग आपण होऊनच कटाळून ती तेथून उठते अशा काही उदाहरणांनी ही समजूत खरीच आहे असेच म्हणावेसे वाटते. अर्थात् नियमाला अपवाद हा असणारच ही गोष्ट अलाहिदा !

ह्या विश्वातील प्रत्येक गोष्ट ही नाशिवंत आहे. सजीव व निर्जीव, कोणत्याही गोष्टींचा, प्राण्याचा वा वस्तूचा कधी ना कधी ऱ्हास घडणार, नाश होणार ही गोष्ट म्हणजे एक कटु सत्य आहे. विश्वाचे रहाटगाडगे अविरत फिरत आहे, जगाचा चक्रनेमीक्रम अखंड चालूच आहे देवगिरी अंबेच्या मंदिराच्या जागेवर बांधलेली मसजिद् कालांतराने नष्ट केली जाऊन तेथे आता भारतमातेचे मंदिर उभारले गेले आहे. प्रत्येक मानवाच्या जन्मदात्री, कर्मदात्री व स्फूर्तिदात्री अशा तीन माता आहेत. त्यापैकी स्फूर्तिमाता म्हणजेच देशमाता अथवा भारतमाता ही होय. कदाचित् कोणाला हे निरर्थकही वाटेल. परंतु तसे वाटणे चुकीचे आहे. महान् स्फूर्तिदायक अशी ती एक राष्ट्रशक्ति आहे व्यक्तीप्रमाणेच राष्ट्रालाही आत्मा आहे असे मानले, तर विकासाला अत्यंत आवश्यक अशी अंत प्रेरणा देणारी भारतमाता ही आत्मशक्ति मानली पाहिजे. ही प्रेरक शक्ति म्हणजेच जगन्मातेचा एक आविष्कार मानला पाहिजे. ही देवता म्हणजे विकासाचा आत्माच होय. राष्ट्राला साकार बनविणारी, अज्ञान, बेकारी, दारिद्र्य रूपी आमावास्येच्या अंधःकारातून राष्ट्राला विकासरूपी उषःकालाच्या उजेडात आणणारी ती एक महान् शक्ति आहे.

वाराणशी येथेही भारतमातेचे एक मंदिर लेखकाने पाहिलेले आहे. आपल्या मातृभूमीचे सर्व आणि सत्य स्वरूप तिच्या पुत्राच्या ध्यानात चटकन् यावे यासाठी मंदिरातील आलेखामध्ये देशातील नद्या, पर्वत, पवित्र स्थाने,

हवामानाचे निरनिराळे प्रदेश यांच्या आकृत्या चितारलेल्या आहेत. अशा ह्या देवगिरीच्या अवेचे तिच्या प्रत्येक पुत्राने एकदा तरी अवश्य दर्शन घ्यावे अशी माझी नम्र विनती आहे.

पृथ्वी

कुणास नच ज्ञात देवगिरी यादवाचा थवा ।
मराठ-कुळ भूपणीं सतत दौलताबाद हा ॥
तया गडिं सु वैभवीं झुलत होति ना अंबिका ।
परी तुडविली पदीं, युवक हो नको चीड कां? ॥ १ ॥
अपार दळभार वंदित तुलाचि नौरात्रिला ।
अनेक तव रक्षणीं मरणिं झुंजले या स्थलां ।
मशीद बनली तरी वफलुनीच ये ऊर्जिता ॥
म्हणोनि नमितो तुलां भरत देवते पालिका ॥ २ ॥

( ८ ) नागनकी

मध्य भारतामध्ये लहानमोठी अनेक राज्ये होती, त्यापैकी मारवाडच्या राठोड घराण्याची ही कुलदेवता होय. ह्या भागामध्ये शाक्तपंथीयांची बरीच वस्ती आहे. ते वाममार्गी पंथाचे पूजक असून त्यांना ' देवीमत ' ह्या नावाने संबोधिले जाते. ह्या घराण्याचे वैशिष्ट्य असे की, हा राजवंश सत्ययुगापासून अखंड नांदत आलेला आहे दुसरी एक आश्चर्याची गोष्ट अशी की, प्रत्येक युगामध्ये ह्या घराण्याच्या कुलदेवता बदललेल्या आहेत कशा त्या पहा.

सत्ययुग

मनसादेवी. मानवजातीची उत्पत्ति माया व ब्रह्मापासून झाली असून ती ज्या शक्तीच्या इच्छामात्रे झाली ती मानसादेवी होय असे त्यांचे मत आहे.

द्वापारयुग

पंखिनीदेवी ( पंख असलेली देवता ). सृष्टीची उत्पत्ति ज्या शक्तीच्या इच्छामात्रे झाली तिनेच पहिरी ससाण्याचे रूप घेतले आणि देवता म्हणून अवतरले

त्रेतायुग

राष्ट्रसेनादेवी. ह्या शब्दाचा अर्थ विग्रह दसात की, राष्ट्र = भूमि + सेन ससाणा. ससाण्याच्या रूपांत भूमीवर प्रत्यही फिरत राहून, सृष्टीचे पालन करणा

देवता. यामुळेच मारवाडच्या राजघराण्याचे पूर्वी राष्ट्रवर हे नाव होते आणि कालांतराने त्याचा अपभ्रंश राठोर अथवा राठोड असा झाला.

कलियुग

देवी नागनकी अथवा नागनेची. ह्या देवीचे मूळ स्वरूप राष्ट्रश्येना देवीचे असून काही कारणास्तव तिला नागनकी हे नाव पडले आहे. प्राचीन काळी कर्नाटक प्रांतावर राठोड घराणे सत्ता गाजवीत असताना येथे राष्ट्रश्येना देवी राष्ट्रदेवता म्हणून पूजिली जात होती. घराणेही जुनेच असल्यामुळे अनेक वंशज इतस्ततः फिरत होते. त्यांपैकी शिवाजी नावाच्या एका राठोडाने मारवाड प्रांती खेर ह्या गावी राजसत्ता स्थापन केली. त्या शिवाजीचा दुहर या नावाचा नातू गादीवर असताना आपल्या घराण्याची कुलस्वामिनी राष्ट्रश्येनादेवी आपल्या प्रांती आणावी, या हेतूने तो कर्नाटक प्रांती गेला. देवीची भक्तिभावे आराधना केल्यावर देवी त्याला प्रसन्न झाली. आपल्याबरोबर आपल्या इच्छित ठिकाणी येण्याची विनती राजाने देवीला केली आणि तिने देखील ती विनती मोठ्या आनंदाने मान्य केली. तावडतोब देवीची मूर्ति रथामध्ये ठेवून रथ मारवाडच्या दिशेने धावू लागला. मजल दरमजल करता करता तो रथ खेर या गावी पोहोचण्यापूर्वीच वाटेत नागन ह्या गावाजवळ रथाचे चाक भूमीमध्ये अडकले. प्रयत्नांची पराकाष्ठा करूनही ते चाक काही भूमीमधून बाहेर निघेना आणि त्यामुळे तो रथही काही चालू होईना.

शेवटी, दुहर राजाने देवीच्या मनातील आशय जाणला की, ह्यापुढे ती जरी राज्याच्या हद्दीमध्ये आलेली असली तरी राजधानीच्या शहरी तिला यावयाचे नाही. देवीच्या हट्टास्तव त्याने आपला हट्ट सोडला, आणि त्याच गावी देवीचे मंदिर बांधून त्या मंदिरात देवीच्या मूर्तीची स्थापना केली. नागन गावी देवीची स्थापना झाली म्हणून राष्ट्रश्येना देवीलाच नागनकी हे नाव प्राप्त झाले. मारवाड प्रांती या देवीची दुसरीही मंदिरे आहेत (मारवाड, मलानी, जेसलमीर गॅझेट, पृष्ठ २६)

राजस्थानमध्ये उदयपूरच्या उत्तरेला १४ मैलावर कैलासपुरी नावाचे एक पवित्र क्षेत्र आहे. या ठिकाणी चतुर्मुखी प्रकाराचे शिवलिंग असून त्यालाच एकलिंगजी म्हणतात. हे रजपुतांचे पूज्य श्रद्धास्थान मानतात या मंदिराच्या पूर्वेस भोज राजाने दोन टेकड्यामध्ये बांध घालून तयार झालेला भोजेला तलाव असून त्याच्या पूर्वेकडील टेकडीवर राष्ट्रश्येना देवीचे एक मंदिर आहे.

## ( १० ) विदर्भचंडिका

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर अनेक प्रांतांना राज्यसरकारे मिळाली. परंतु महाराष्ट्र-राज्याची निर्मिती मात्र स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सुमारे तेरा वर्षांनी म्हणजे दि.१ मे १९६० रोजी झाली. महाराष्ट्राच्या पोटविभागात मराठवाडा व विदर्भ या दोन प्रांतांची आणखी भर घालण्यात आली. ज्यांना विदर्भ हा स्वतंत्र प्रांत म्हणून हवा होता ते लोक अर्थातच ह्यामुळे चिडले, खवळले आणि ह्याबाबतचा आपला निषेध व्यक्त करण्यासाठी दिनांक २५ एप्रिल १९६० रोजी त्यांनी नागपूर शहरी शहीद चौकात एका चंडिका देवीच्या मूर्तीची जाहीररीतीने स्थापना करून तिचे नाव विदर्भचंडिका असे ठेवले. या देवतास्थापनेमागील जनतेचा हेतु असा होता की, त्यामुळे विदर्भप्रांत स्वतंत्र होण्यास दैवीशक्तीचे पाठबळ मिळावे व देवीपुढे होणाऱ्या हवनात विरोधी शक्तींचे हवन होऊन तिचा पूर्णतः नाश व्हावा. त्या वेळी स्थापन झालेले व अस्तित्वात असलेले मंत्रीमंडळ स्वतंत्र विदर्भनिर्मितीच्या आड येते, या समजुतीने मंत्रीमंडळाच्या नावाने सामुदायिक हवन करण्यापर्यंत विरोधकांची मजल गेली. स्वतंत्र विदर्भाच्या स्थापनेबद्दलची चळवळ चालविण्यासाठी नामवंत नेत्यांची समिति स्थापन करण्यात आली होती, आणि एके काळी गाजलेले विदर्भीय पुढारी श्री. माधव श्रीहरि ऊर्फ बापूजी अणे हे त्या समितीच्या अध्यक्षस्थानी होते. रोजची पूजा आणि सामुदायिक प्रार्थना ह्यामुळे शहरातील वातावरण साफ बिघडून गेले. दगेधोपे झाले, लुटालूट केली गेली आणि जनतेच्या मालमत्तेची अतोनात नुकसानी झाली.

शेवटी ९६ दिवसांच्या काळानंतर एका शुक्रवारी मोठी मिरवणूक काढून देवीच्या मूर्तीचे विसर्जन करण्यात आले. अल्पकाळ का होईना, परंतु या देवीने त्या लहानशा गटाची राष्ट्रदेवता हा मान मिळविला, आणि इतिहासात आपले नाव अजरामर करून टाकले. चंडिका देवीची मूर्ति स्वतंत्र विदर्भ प्रांताच्या प्राप्तीसाठी बसविली म्हणून तिला विदर्भचंडिका हे नाव मिळाले, परंतु तिचारीची कारकीर्द जास्त काळ अस्तित्वात राहिलीच नाही. मानवाप्रमाणे आपल्या बालवयातच त्या देवतेचा अवतार समाप्त झाला असे समजले पाहिजे

पुनर्जन्माचे अनादितत्त्व अथवा एका कवीने म्हटल्याप्रमाणे "उपजणे मरणे न चुके नरा। फिरतसे नित्य असे भव भोवरा॥" ही उक्ती या देवतेलाही लागू पडावी हा दैवदुर्विलास नव्हे काय? एकदा विसर्जन झाल्यावर पुन्हा अवतार घ्यावा लागावा, यापेक्षा आश्चर्य ते कोणते! पण तसा विचार केला तर ही गोष्ट गणपति, सरस्वती, दुर्गामूर्ति यांच्याही बाबतीत नित्य घडतच असते. दरवर्षी उत्सवाच्या वेळी आपण मूर्ति बसवितो आणि विसर्जन करतो. इतकेच

प्रसंगाला, प्रत्येक मंगल कार्यामध्ये आपण देवतांचे आवाहन करतो. सुपारी-पर्ण प्रतीकांची पूजा करतो आणि कार्य संपल्यावर त्यांचे विसर्जन करतो. पूजा सांगणारा ब्राह्मण विसर्जनाची अक्षत यजमानाला देतो आणि घरी जातो. ही पण एक तऱ्हेने देवतांची मानवसदृश उपाधी नव्हे काय! पण नित्याच्या अवलोकनाने माणसाचे लक्ष या गोष्टीकडे जात नाही आणि त्यात कुतूहल वाटत नाही इतकेच. केशवसुत म्हणाले, "नित्याच्या अवलोकनें मन पहा होती परी आंधळे" कविवर्यांचे हेच अवलोकन सत्य भासते.

वरील ऊहापोह करण्याचे कारण इतकेच की, विदर्भचंडिकेचे विसर्जन झाले तरी तिचे भक्त तिला विसरले नाहीत. कारण उत्पन्न झाल्याबरोबर पुन्हा तिची स्मरणपूर्वक स्थापना करण्यासाठी मूर्ति तयार केली. देशामध्ये महागाईचा राक्षस थैमान घालू लागला, मानवांना जीव जगविणे अशक्य वाटू लागले आणि या दुर्भिक्षासुराला ठार करण्यासाठी मूर्ति बसविण्याचे ठरविले. पण हे साधे कृत्यही शासनीय अधिकाऱ्यांना आवडले नाही. जनतेचा हेतू चांगला नसावा या संशयामुळे मूर्ति बसविण्यावर बंदी घातली, इतकेच नव्हे तर चंडिका मूर्ति शासनाने बंदीखान्यात नेऊन ठेवली. म्हणजे मानवाप्रमाणे देवीलाही बंदीवास भक्तांसाठी नशिबाला आला. रावणाने नव्हते का सर्व देव बंदीशाळेत घातले; पण भक्तमंडळीसुद्धा लढवैय्यावृत्तीची. नागपूर येथे बंदी झाल्यावर वर्धा येथे मूर्ति बसवून त्यांनी आपला हेतु साध्य करून घेतला.

शेवटी जनता आणि शासन यांमध्ये विचारविनिमय झाला आणि पाच दिवसांसाठी नागपूरशहरी विदर्भचंडिकेची मूर्ति बसविण्यास अनुज्ञा मिळाली. त्याप्रमाणे दि. १६-९-१९६४ रोजी ब्राह्ममुहूर्तावर मूर्तीची स्थापना मान्यवर नेते श्री. बापूजी अणे यांच्या हस्ते झाली. पाच दिवसांचे नवरात्र पाळण्यात आले. देवीचे स्वरूप म्हणजे दुर्भिक्षासुराच्या छातीत आपला त्रिशूळ खुपसून देवता उभी असून, डाव्या हाताला यज्ञकुंड व उजव्या हाताला मान्यवर विदर्भीय नेत्यांची बैठक भरली असल्याचा देखावा होता. यथाकाल देवतेचे विसर्जन झाले. देवता आणि मानव यांचे सुखदुःखातही काही वेळा साम्य आढळावे, हे विचित्र नव्हे काय? वऱ्हाडच्या स्वातंत्र्यासाठी पुन्हा स्थापना, पुन्हा विसर्जन चालूच आहे.

(११) शिव छत्रपतींवर देवीची कृपा.

संकट पडले अंबाबाईला। प्रतापगडच्या भवानी देवीला।
उभी राहिली सांकडयाला। देवीनें कल्याण दरवाजा उघडिला।।

(तुळशीदास शाहीर)

एकलिंगजीच्या आवारातच महाराणा कुंभ याने बांधलेले मिराबाई मंदिर आहे. त्यातील मूर्ति मात्र त्रिमूर्ति, वराह, विष्णु व नारसिंह या स्वरूपात आहे. मध्य भारतात विष्णूचे हे त्रिमूर्ति स्वरूप इतर ठिकाणीही आढळते. वाहन मात्र गरुडाचे आहे. असे सांगतात की, गुप्त काळात मथुरा शहरी विष्णूचे हे स्वरूप प्रथम तयार झाले व नंतर गुजराथ–राजस्थानमध्ये प्रचारात आले. या क्षेत्राजवळ नागदा व अदबाद येथेही अनेक प्राचीन हिंदूंची आणि जैनांची मंदिरे आहेत व कोरीव शिल्पकाम प्रेक्षणीय आहे. पण दिल्लीचा शमसुद्दीन अल्तमश याने त्याची बरीच मोडतोडही केलेली आहे. ( भारतीय संस्कृति कोश २।५३१ )

## ( ९ ) भवानी देवी

वऱ्हाडप्रांती चिखली ह्या गांवापासून सुमारे चौदा मैलांवर एका लहानशा टेकडीवर भवानीचे एक सुंदरसे मंदिर आहे. देवीची मूर्ति अहोरात्र लाल शेंदुराने माखलेली असते. मंदिराच्या कळसाजवळ एक मोठा झरोका असून त्या झरोक्यातून फक्त देवीच्या मुखावर प्रकाश पडत असतो. सभामंडपात फारसा उजेड नाही. त्यामुळे प्रवेशद्वारातून मंडपात शिरताना झरोक्यातून पडणारा प्रकाशस्रोत आल्हाद दायक वाटतो. ह्या देवतेला आता कोणी कोणी बल्लाळदेवी असेही म्हणतात.

ह्या ठिकाणी मध्ययुगीन कालात एक भव्य मंदिर होते आणि ते पद्मुमन शेटी नावाच्या सावकाराने बांधलेले होते. त्या ठिकाणी सन १२११ सालचा एक शिलालेखही सापडला आहे. त्यावरून या इतिहासावर प्रकाश पडतो. मंदिरात पन्नास फूट उंचीची पाषाणाची भवानीची प्रचंड मूर्ति होती. परंतु पुढे मूर्तिभंजकांची ज्या वेळी सद्दी होती त्या काळी मूर्ति छिन्नविच्छिन्न झाली आणि मंदिरही जमीनदोस्त करून टाकले गेले. देवतेच्या मूर्तीचे अवशेष इतस्ततः पडलेले आहेत. पायाची जी जोडी दृष्टीस पडते त्यावरून धडधाकट मूर्तीच्या भव्यपणाची स्थूल कल्पना येते. बाजूलाच एक महादेवाचे मंदीर आहे. त्याला पडिक देवळाचे काही दगड वापरलेले असावेत असे वाटते. पडिक मंदीर हेमाडपंती बांधणीचे होते असा जाणकाराचा कयास आहे ह्या गावाला पूर्वी अमरापूर आणि सांप्रत अमदापूर असे म्हणतात ( ज्ञानकोश ६।३२२ आणि बुल्ढाणा जिल्हा गॅझेट, पृ. ३९९ )

जैन शिल्पकलेची जेव्हा चलती होती तेव्हा असे भव्यदिव्य पुतळे तयार करणे हा शिल्पकारांच्या हातचा मळ होता. म्हैसूर राज्यांत श्रवण बेलगोळ ह्या ठिकाणी अद्यापीही असाच दिगंबर बाहुबली ह्याचा ५८ फूट उंचीचा पुतळा पाहाता येतो यावरून असे अनुमान काढता येते की, भवानी देवीचा छिन्नविच्छिन्न झालेला हा पुतळा जैन शिल्पकारांनीच बनविलेला असला पाहिजे.

जैन शिल्पकलेचा उगम फार प्राचीन काळी भारतामध्ये झाला असला पाहिजे, असे हरप्पा येथील उत्खननावरून म्हणावे लागते. परंतु या कलेचा विकास गुप्त काळामध्ये शिखराला पोहोचलेला दिसतो. यानंतर दिगंबर पंथीयांनी विशालकाय जैनमूर्ति अनेक ठिकाणी निर्माण केल्या, त्यापैकीच भवानीची वरील मूर्ति असावी. मध्यप्रदेशात बडवानी नगराजवळ चूलगिरी या ठिकाणी पहाडावर ८४ फूट उंच खड्गासनी जैनमूर्ति खोदलेली आहे. ती बावनगजा नावाने प्रसिद्ध आहे.

दक्षिणभारतामध्ये दहाव्या शतकात गंगा-राजमल्ल नावाच्या राजाचा चामुंडराय नावाचा जैनधर्मीय प्रधान होता. त्याने श्रवणबेळगोळ या गावी बाहुबलीचा पुतळा बनविला, (सन ९७४-९९८) असे तेथील शिलालेखनावरून म्हणता येते. ही मूर्ति अद्वितीय तर मानली जातेच, पण मुखावरील शांति आणि कांति अपूर्व आहे शतबोटाची लांबीच २ फूट ८ इंच आहे. या पुतळ्याचे एक वैशिष्ट्य म्हणून सांगितले जावे की, दर १२ ते १४ वर्षांनी महामस्तकाभिषेक, श्रावण महिन्यात या पुतळ्याला एक सहस्र मण दुधाचा अभिषेक केला जातो. तो सर्व दुधाचा प्रवाह गुप्त नलिका मार्गे दोन मैलावरील एका गायमुखातून खाली वाहतो ते सर्व दूध गोरगरिबांना प्रसाद म्हणून वाटले जाते ही प्रथा सांप्रतही चालू आहे कार्कल येथे गोमटेश्वराचा एकसंध पाषाणाचा ४१ फूट उंचीचा पुतळा आहे महाभिषेकासाठी १००८ कलश मांडून ठेवतात, आणि त्यांची विक्री प्रत्येकी रु २५० पासून रु. १०००/- पर्यंत होते. दि ३०-३-१९६७ ला असा अभिषेक झाला

काबूल मधून भारतामध्ये येण्याचे रस्त्याच्यावरही असाच १५१ फूट उंचीचा खडकात कोरलेला बुद्धाचा भव्य पुतळा आहे.

१४ व्या शतकानंतर जैन कलाकारांनी धातुमूर्ति बनविण्यास प्रारंभ केला. अबू येथील पित्तलहर मंदिरात आदिनाथाची पितळेची मूर्ति ८ फूट उंचीची आणि १०८ मण वजनाची आहे तसेच यक्षिणींच्या मूर्ति बनविलेल्या आढळून येतात भिंतीचित्रे, ताम्रपत्रावरील चित्रे अथवा वस्त्रावरील उत्तम शिल्प यानेही १४ वे शतकातील नमुने मिळालेले आहेत (भारतीय संस्कृति कोश ३। ६३८)

महर्षिणी

वैदर्भी अमदापुरीं वसे भवानी।<br>
पन्नासा वरतीही उंचिशा फुटांनीं॥<br>
बांधितो पदूमन शेटि मंदिरातें।<br>
दुर्दैवें आजि तुकडे परी पहा तें॥ १॥

सिंधखेडचे लखुजीराव जाधव म्हणजे एके काळी दक्षिण भारतातील मुसलमानी अमदानीतील एक बडे प्रस्थ होते. त्यांच्याच सैन्यातील मालोजी भोसले हा एक साधा बारगीर. रंगपंचमीच्या सणाच्या दिवशी लखुजीरावांची मुलगी जिजाई आणि मालोजीचा मुलगा शहाजी यांच्या बालसुलभ लीला पाहून लखुजीरावांच्या तोंडून कौतुकाने परंतु अभावितपणे "उभयतांचा जोडा छान शोभतो" असे शब्द बाहेर पडले. परंतु या शब्दावरच कल्पनातीत वादळ माजून उभयतांची बोलाचाली झाली आणि त्यात सहाजिकच मालोजीचा अपमान झाला. त्यामुळे चिडून जाऊन या अपमानाचा सूड घेण्याचा निश्चय मालोजीने केला.

जो मनुष्य स्वभावतःच मानी असतो त्याच्या उत्कर्षासाठी एखादी लहानशी घटना देखील कारण म्हणून पुरेशी होते. याच ठिकाणी पहा ना! लहान मुलांवरून निर्माण झालेल्या शुल्लक बाचाबाचीमधून उद्भवलेल्या अपमानाचा बदला घेण्यासाठी मालोजीने आपला उत्कर्ष साधण्याचा दृढनिश्चय केला. तो देवांची आराधाना करू लागला. त्याचा भाऊ विठूजी हा देखील त्याला साथ देत होता. एके समयी हे दोन भाऊ रात्री आपल्या शेताची राखण करीत असता शेतातील कणसांच्या मध्यभागी काही अंतरावर एक सुवर्णकंकणमंडित व तेजस्वी असा एक हात कणसांतून वर आलेला विठोजीला दिसला. विठोजीने ही गोष्ट आपला भाऊ मालोजी ह्याला कळविली. पुढे त्याची पाळी आली असता त्यालाहि तोच अनुभव आला. पहाटेच्या वेळी मालोजीच्या डोळ्यावर थोडी झापड आली असता, देवीने त्याच्या स्वप्नात येऊन त्याला दृष्टांत दिला, आणि शेताच्या बांधावर एक वारूळ दाखविले. तसेच त्या वारूळाखाली असलेला द्रव्याचा खजिनाही त्याला दाखविला.

मालोजी भोसल्यांची औरंगाबाद-पैठण भागात पाटीलकी होती. त्याचा जन्मकाल शके १४७४ असावा. तो व विठोजी प्रथम अहमदनगरच्या निजामशाहीत नोकरीस होते. त्याची पत्नी उमाव्वा हिने मुलासाठी नवस, गावाजवळील शहाशरीफ अवलियाला केला. यास्तव मुलांची नावे शहाजी व शरीफजी ठेवण्यात आली. शहाजींचा जन्म सन १८-३-१५९४ साली झाला. मालोजीने तुळजा भवानीची सेवा केली, म्हणून त्याला भूमीगत द्रव्याचा दृष्टांत झाला आणि ते धन त्यांनी श्रीगोंदे येथील शेषाप्पा नाईक पुंडे या सावकाराकडे ठेवून, नंतर लष्करी सामर्थ्य वाढविले. पुढे शहाजी व जिजाई यांचा विवाह सन १५९९ चे सुमारास झाला आणि मालोजी सन १६२० स्वर्गवासी झाला. (मराठी वाङ्मयाचा इतिहास, भाग १, पृ. ६२१).

शहाजी मोठा झाल्यावर त्याने विजापूर दरबारी नोकरी धरली आणि मोठीच मान्यता मिळविली. जुन्नरपासून नाशिकपर्यंतचा सर्व प्रदेश त्याच्या देखरेखीखाली बादशहाने दिलेला होता. त्या दरबारात त्याने चांगलेच वजन प्राप्त करून घेतले होते. कालमानानुसार जिजाई वयात आली आणि प्रथम डोहाळ-जेवण समारंभ जाधवरावाच्या घरी चालला असता, जिजाईच्या अंगावर राजचिन्हे पाहून जाधवरावाचे पित्त भडकले आणि त्याने सख्या मुलीला कैदखान्यात टाकण्याची आज्ञा दिली. "देव तारी त्याला कोण मारी!" देवीच्या कृपेने जिजाई कैदखान्यातून निसटली आणि आपल्या पतीकडे गेली.

तेवढ्यात जाधवरावांनी आपल्या मुलीचा आणि जावयाचा पाठलाग सुरू केला. शहाजीराजे आपल्या पत्नीसह जुन्नरच्या दिशेने दौडाने कूच करीत होते. त्या वेळी जुन्नर येथील शिवनेरी किल्ला हा एक मजबूत किल्ला विजापूरकरांच्या ताब्यात होता. कोकण व देश यांना जोडणारा प्राचीन नाणेघाट मार्ग या शहरातून जात होता. पैठण येथे राजसत्ता असताना तेथील वस्तूंचा परदेशाशी व्यापार होत असे. कोकण प्रांतातील सोपारा व चौल ही बंदरे या रस्त्याने जोडलेली होती. त्यामुळे व्यापारी मार्गांच्या सुरक्षिततेसाठी ह्या किल्ल्याचा अतिशय उपयोग होत असे. बौद्ध काळापासून हा मार्ग उपयोगात होता. तेथील बौद्ध लेणीच याची साक्ष देतात.

शहाजी आणि जिजाई यांचा सारा प्रवास घोड्यावरून चालला होता. परंतु ह्या घोडदौडीचा त्रास त्या गरोदर स्त्रीला सहन न झाल्याने शहाजीने जिजाईला शिवनेरी किल्ल्यात ठेवून दिले आणि स्वतः पुढे निघून गेले. ह्या किल्ल्यावर शिवाई देवीचे स्थान आहे. जिजाईने मनोभावे ह्या देवीची प्रार्थना केली आणि अशा संकटकालात रक्षण करण्याबद्दल तिचे डोळ्यात पाणी आणून

विनवणी केली. ह्या वेळी जिजाईच्या अंगात ह्या देवतेचा संचार झाला आणि ती म्हणाली, "प्रत्यक्ष सांबसदाशिव तुझ्या पोटी अवतार घेणार असून तोच तुझे रक्षण करण्यास समर्थ आहे." आपण पुढे असे पाहातो की, शिवाजीच्या अंगात देवीचा संचार होत असे, तो ह्या स्थितीचाच परिपाक असावा. या ठिकाणी फाल्गुन वद्य ३ शके १५५१ साली, शिवछत्रपतींचा जन्म झाला.

(दासायन, ले. अनंत रामदासी, पृष्ठ ९१)

ह्या पराभवामुळे निजामशहाची मर्जी खप्पा होऊन त्याने लखोजी जाधवांना देवगिरी येथे बादशहासमक्ष ठार करण्याचा हुकूम दिला. ही गोष्ट १६२९ सालीच झालेली आहे. सिंदखेड येथे जिजाईंना जन्म ज्या ठिकाणी झाला तो दगडी महाल व लखूजी जाधवांचा स्मारक घुमट, ज्याच्या प्रवेशद्वारावर त्यांची वंशावळ दिलेली आहे, ते आजही दिसतात. जाधवांनी ही जहागिरी सन १५५० साली काजी व मुळे घराण्यातील एका विधवेकडून आपल्याकडे घेतली होती. (अमृत दीपावली अंक, १९६२)

शिवनेरी येथे ज्या स्थानी श्रीशिवछत्रपतींचा जन्म झाला, त्या ठिकाणी दिनांक १ मे १९६० रोजी नवमहाराष्ट्र-स्थापनेच्या शुभ दिवशी राज्यकर्त्यांनी जिजाई व बालशिवाजी यांचे पुतळे मोठया समारंभाने ना. यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते बसविले आहेत.

शिवाई देवी ही कोरीव लेण्यांमध्ये स्वयंभू आहे असे मानतात. पण सन १९४८ साली कुसुरग्रामवासियांनी जी देवीची मूर्ति तयार करून बसवून घेतली ती चतुर्भुज, सिंह वाहन, हाती गदा, तलवार आयुधे असून दोन बाजूंना महिषासुराच्या मूर्ति आहेत. मूर्तीची उंची सुमारे ३॥ फूट उंच आहे. शिवजन्मस्थान या मूर्तीपासून मैलभर लांब असून तेथे पुतळे बसविलेले आहेत.

(श्री. शुक्र, देवीचे पुजारी, जुन्नर)

प्रतापगड हा किल्ला सन १५५६ साली श्री. मोरोपंत पिंगळे ह्यांनी बांधावयास घेतला, आणि तेथे भवानी देवीची स्थापना केली. पुढे दोन वर्षांनी विजापूरहून अफझुलखान शिवाजीस भेटण्यासाठी ह्या ठिकाणी आला असता महाराजांनी वेळीच सावध होऊन त्याचा वध केला; खानाला भेटण्यास जाण्यापूर्वी त्यांनी मनोभावे देवीची पूजा केलेली होती आणि तिचा आशीर्वाद घेतला होता.

श्री अंबिकेनें अभयंकराला।
केलें दिनातें अभयंकराला॥
भीतो जगा कोण भयंकराला?।
प्रसन्न अंबा जइं किंकराला॥

अशी निर्भयतेची भावना श्रीशिवबाची ह्या वेळी झालेली होती, म्हणूनच ते निःशंकपणे शत्रूच्या डेऱ्यामध्ये जाऊ शकले. जाण्यापूर्वी त्यांनी आपल्या परमपूज्य आईचा आशीर्वाद घेतला; कमीजास्त घडल्यास राज्याची विल्हेवाट मातुश्रींना सांगून ठेवलेलीच होती. परंतु भवानी आईच्या कृपेनेच ते सुखरूपपणे मृत्यूच्या दाढेत जाऊन परत आले होते एवढे मात्र नक्की! अफझलखानाने तुळजापूर येथील मूर्ति फोडलेलीच होती. त्यामुळे शिवाजी महाराजांनी गंडकीहून दोन पाषाण आणून त्यांच्या अष्टभुजा देवींच्या दोन मूर्ति तयार करवून घेतल्या. एक तुळजापूर येथे बसविली आणि दुसरीची सन १६५१ साली प्रतापगड येथे स्थापना केली. देवीचा गाभारा लहानसाच असून ५०'×३०'×१२' या मापाचा सभामंडप आहे सर्व शिल्पकाम लाकडीच आहे. देवीच्या खर्चासाठी म्हणून पंधरा गावांचे उत्पन्न लावून दिलेले आहे. त्या वेळी उत्पन्नाचा आकडा अंदाजे रुपये ३,३५० होता. ( सातारा जिल्हा गॅझेट, पृष्ठ ५४६ )

याच देवीने शिवाजीला भवानी तलवारीचा प्रसाद दिला अशी कथा आहे. त्या तलवारीच्या प्राप्तीनंतर मात्र शिवाजीमहाराजांचा सर्वत्र विजयच होत गेला. ह्या भवानी तलवारीचा इतिहास फार रम्य आहे. श्री. कृष्णाजी अनंत सभासद-विरचित बखर ही शिवकालीन समजली जाते. त्यामध्ये तुळजाभवानीचा उल्लेख शिवाजीची कुलस्वामिनी म्हणून आढळतो. अफझलखानाने भरडून तिची बारीक भुकटी करून टाकली याचाही उल्लेख आढळतो. परमानंद कवीचे संस्कृत शिवभारत हेही समकालीन मानले जाते. शिवाजीच्या तलवारीला भवानी तलवार हे नाव का पडले याचा इतिहास ह्या शिवभारतामध्ये दिलेला आहे. अफझलखानाने तुळजा-भवानीची मूर्ति फोडली. आसपासच्या मुलखांची जाळपोळ केली. या सर्वांचा परिणाम असा झाला की, शत्रूचा नीःपात करणे आवश्यक झाले. त्या वेळी भवानीदेवीने स्वप्नात येऊन त्यांना दृष्टांत दिला की, "शत्रूचा नाश करण्यासाठी मी स्वतःच तुझ्या तलवारीमध्ये प्रविष्ट होत आहे." यासाठीच महाराजांच्या तलवारीला भवानी तलवार असे नाव मिळाले असावे. 'शिवदिग्विजय' बखरीमध्ये या तलवारीबद्दलचा उल्लेख आढळतो. तो असा की, जंजिऱ्याजवळच्या गोवळकर सावंतांनी देवीने स्वप्नात दिलेल्या आदेशानुसार एक उत्तम तरवार शिवाजीला अर्पण केली आणि भवानी देवीच्या आदेशानुसार ही दिली म्हणून तिला 'भवानी तरवार' असे नाव मिळाले. संभाजीराजांच्या वेळी सुरत येथे हरिकवि नामक एका कवीने 'शंभुराजचरित्' नांवाचा एक ग्रंथ रचला आहे. त्यामध्ये तो म्हणतो की, 'वीरश्रीशोभायमानः करतलविलसंचद्रहासे भवान्याः' याचा भावार्थ असा की, शंभुराजाजवळ जी भवानी तलवार होती ती शिवाजीराजांकडून त्यांच्याकडे आली. हरिकवीच्या अगोदर जयराम नांवाचा एक कवि होऊन गेला.

त्याने 'राधामाधवविलासचंपू' या नावाचा शहाजीराजे यांच्या कारकीर्दीच्या वर्णनपर ग्रंथ रचिला आहे. त्यामध्ये देखील ह्या भवानी तलवारीचे वर्णन आढळते. ह्यावरून असा निष्कर्ष काढला जातो की, शहाजीराजापासून ती शिवाजीराजांकडे आली आणि नंतर संभाजीराजाकडे आली असावी.

आज ती तलवार कोठे आहे हे मात्र खात्रीलायकपणे कोणी सांगू शकत नाही. कोणी म्हणतात की, ती इंग्लंडच्या राजघराण्याजवळ आहे, तर दुसरे कोणी म्हणतात की, ती सातारा येथील राजवाड्यातच आहे. तर आणखी कोणी असा अजब शोध लावला आहे की, सन १८७८ साली पॅरीस येथील प्रदर्शनात म्हणे ती मांडून ठेवलेली होती. (श्री. सजीव पी. देसाई, नवनीत, मे १९६१ पृ. ६७ )

या जगात अहिंसा सुखाने नांदावी म्हणून हिंसा करावी लागते, नीति अबाधित रहावी म्हणून दंड हाती घ्यावा लागतो. आत्म्याच्या विकासाचा मार्ग सांगणाऱ्या धर्माचा लोप होऊ नये म्हणून धर्मद्वेष्ट्या दुष्टांचे दमन करावे लागते, असा इतिहास आहे. प्रभुरामचंद्रापासून भगवान श्रीकृष्णापर्यंत भारताची अशी जाज्वल्य परंपरा आहे. प्रभुरामचंद्राचे धनुष्य त्याचसाठी पवित्र आहे आणि श्रीकृष्णाचे सुदर्शनचक्रही त्याचसाठी वंदनीय आहे. पण ही परंपरा सुटली म्हणजे मग हिंसेचे साम्राज्य पसरते. नीति तोंड काळे करते, धर्मग्लानी येते आणि सज्जनांचे जीवित दुष्ट दुर्जन अशक्य करून टाकतात. गुरू गोविंदसिंहाच्या वेळी जी परिस्थिति समाजात उत्पन्न झालेली होती तीच परिस्थिति छत्रपति श्रीशिवाजी महाराजांच्या काळी महाराष्ट्रात पसरली होती. वास्तव कालीदेवीने गुरु गोविंद सिंहांना यद्वत् खड्ग दिले तद्वत् प्रतापगडच्या भवानीदेवीने शिवरायांना तलवार दिली अशी त्यांच्या पाठीराख्यांची श्रद्धा होती. ( गुरु गोविंदसिंह चरित्र, लेखक श्री. बळवंत भट्ट )

याच प्रतापगड येथील देवीबद्दलची एक कथा प्रसिद्ध आहे. समर्थ रामदासस्वामी एकदा देवीच्या दर्शनाला गेले. असता तेथील पुजाऱ्यांना आश्चर्य वाटले आणि त्यांनी त्यांना सहजगत्या प्रश्न केला की, "या रामभक्तांनी आज ह्या मंदिराकडे कशी काय वाट वाकडी केली?" तेव्हा स्वामींनी सांगितले की, "श्रेष्ठांनी तुळजाभवानीला एक नवस केला होता, तो फेडण्यासाठीच मी या ठिकाणी आलेलो आहे."

श्रेष्ठाचा नौस जो होता। तो मी फेडितसे म्हणे ॥
पुष्प देवोनि उतराई। ऐसे हे कल्पिले मनी ॥

( तुळजाभवानी स्तोत्र )

रामदासांनी ह्या स्तोत्रामध्ये देवीची महती गायिली असून श्रीरामाला प्रत्यक्ष दर्शन देणारी अशी तिची थोरवी गायिलेली आहे. याप्रमाणे देवीला सोन्याचे फूल वाहिल्यावर देवी प्रसन्न झाली आणि तिने स्वामींना वर मागण्यास सांगितले. मोरोपंत कवींनी म्हटलेच आहे की, " धरही वराचाहि पाहिजे समज " वर मागून घेण्यास तल्लख बुद्धि लागते. सर्वसाधारणपणे अशा वेळी कोणताही सामान्य माणूस आपल्या हितासाठीच काहीही मागून घेईल, परंतु लोकोत्तर पुरुषोत्तमांचे सर्वच निराळे असते. यासाठीच समर्थांनी वर मागून घेतला तो असा, " शिवाजीराजे लवकरच महाराष्ट्रात स्वराज्याचा उद्घोष करोत. " अशा त्यागी व्यक्तींच्या अस्तित्वामुळेच राष्ट्रकार्य अबाधित चालू रहाते.

आणखी एका गोष्टीचा विचार करून ह्या प्रकरणावर पडदा पाडू या. शिवाजीच्या आज्ञेप्रमाणे सिंहगड जिंकून परत घेण्यासाठी तानाजी बारा हजार फौजेसह निघाला. 'यशवंत' घोरपड कडा चढून वर गेली. परंतु फक्त ५० वीरच गडावर चढून गेल्यावर दोर अचानकपणे तुटला. त्याचा परिणाम असा झाला की, बाकीचे सैनिक खाली राहिले आणि गडावरील ५० वीरांना शत्रूच्या दोन हजार फौजेबरोबर मुकाबला करावा लागला.

सोळ मधीच तुटला । पन्नास कमि बाराहजार ।
फौज धरणीवर पडली ॥

गडावरील तीन दरवाज्यावरील ८०० पठाण त्या वीरांनी रात्रीच्या अंधःकारामध्ये कापून काढल्यावर, किल्लेदार उदयभानू उघड्या मैदानात आला. परंतु उदयभानूबरोबर झालेल्या द्वंद्वयुद्धात तानाजी धारातीर्थी पडला. शिवबांचा उजवा हात तुटून पडला. 'गड आला पण सिंह गेला.' मुसलमान सैनिकांनी गवताच्या गंजीला आग लावून दिली, शत्रूच्या संख्येचा मागोवा घेण्याचा प्रयत्न केला, तेव्हा फक्त पचवीस–तीस सैनिकच त्यांच्या दृष्टीस पडले. याचाच अर्थ आठशे पठाणांचा वध करण्यापायी फक्त वीस सैनिकच कामी आले होते. मामाचा सूड म्हणून शेलारमामाने दांडपट्ट्याने उदयभानूला उभा चिरून काढला. तरी बाकीचे पठाण सैन्य मराठ्यांच्या त्या लहानशा चमूवर तुटून पडले. त्यांची सरेहोलपट सुरू झाली आणि नेता गेल्यामुळे त्यांना कोणी त्राता उरला नाही. मराठ्यांची अब्रू धुळीला मिळण्याचा प्रसंग ओढवला. किंबहुना, शिवाजीच्या कीर्तिचंद्राला हा एक कायमचा कलंक लागण्याची वेळ होती. अशा वेळी, संकटकाळी शिवाजीची दैवी–साहाय्यकारी शक्ति तेथे प्रकट झाली आणि तिने तिरक्याचा कल्याण दरवाजा उघडला. मराठे सैन्य विलयात शिरले.

तुळशीदास शाहीर या प्रसंगाचे वर्णन करताना म्हणतो,

नऊशें पठाण बोलायला लागला । चला कल्याण दरवाज्याला ।
आहुत देऊं पंचवीस माणसांची । संकट पडलें अंबाबाईला ॥
प्रतापगडची भवानी उभी राहिली संकटाला ॥
पिवळें पातळ नेसली । गळ्यांत कवड्यांची माळा ल्याली ।
संकट पडिलें देवीला ।
देविनें आपलें हातीं दरवाजा उघडिला ॥

याप्रमाणे मराठ्यांची अब्रू संकटामध्ये असताना त्यांच्या अब्रूचे रक्षण करण्यासाठी साक्षात् देवता प्रकट झाली. तिने कल्याण दरवाजा उघडला, शिवयांच्या मराठा मावळ्यांना आत प्रवेश करू दिला आणि याप्रमाणे त्यांना गड जिंकण्यास सर्वतोपरी साहाय्य केले. भवानी देवतेने आपल्या सच्च्या भक्तासाठी जर हे सर्व केले नसते, तर मराठ्यांची पिछेहाट होऊन त्यांची सर्वत्र छीः थू झाली असती. " आपत्काळी देवता आपल्या भक्ताच्या रक्षणासाठी असेल तेथून धावून येते. " याचा असा प्रत्यय नेहमीच येतो. शके १५९१ माघ वद्य नवमीला हा गड घेतला गेला. या स्वारीत मराठ्यांचे एकच नुकसान झाले. तानाजीसारखा कुशल योद्धा, सुरेख संघटक, ' आधी लगीन कोंडाण्याचे, मग रायबाचे ' असे म्हणून धन्याच्या आशेपुढे स्वतःच्या पोटच्या गोळ्याचे लग्नही तुच्छवत् मानणारा शिवबांचा सच्चा स्वामीभक्त, मराठ्यांचा मोहरा हरपला. त्याचे शव पाहून वज्रासारखे कठोर असे धीराचे धैर्यवान महाराजही नवनीताहून नरम झाले नि सद्गदित होऊन म्हणाले, " गड आला, पण माझा सिंह गेला ! " तानाजीने गाजविलेल्या या शौर्याचे स्मारक म्हणून किल्ल्याचे मूळ ' कोंडाणा ' हे नाव बदलून " सिंहगड " असे ठेवण्यात आले.

( तुळशीदास पवाडा, महाराष्ट्र सरकारी नवनीत प्रत, १९६० )

[ शिवछत्रपती चरित्रकार ब. मो. पुरंदरे लिहितात, तानाजीने घोरपड वापरली हे खरे नाही. पाचशे मावळे कौशल्याने कडा चढून वर गेले. तानाजी-उदेभान लढता लढता एकमेकांच्या तलवारीच्या घावांनीच मेले. शेलारमामाचा उल्लेख नाही. सूर्याजीने पळणाऱ्या मावळ्यांना रोखले आणि गड काबीज केला. इ० इ० ( पृ. २७८ )]

शिवाजीराजावर देवीची कृपा कशाप्रकारे होती यासंबंधी पुढील माहिती उद्बोधक वाटेल, म्हणून देत आहे. राधामाधवविलासचंपूकारांनी, शहाजीचा

तुळजाभवानी देवीवर नितांत विश्वास होता असा उल्लेख केलेला आहे. परमानंद कवि आपल्या शिवभारतामध्ये म्हणतात, "राजा राजगिरीश्वरः तुळजायाः प्रसादेन लब्धराज्यः ॥" (शि. भा. १-११). सभासद बखरीमध्ये भवानीने राजाला मार्गदर्शन केल्याची अगर अभय दिल्याची अनेक वर्णने आहेत. आपल्या पत्रव्यवहारावर शिवाजीराजे केवळ "श्री" च्या ऐवजी "श्री भवानी" असा मायना लिहीत असत. यामध्ये त्यांची देवीवरील श्रद्धाच दिसून येते.

अफझलखानाने तुळजादेवीचा अपमान केला, त्याचा बदला देवीने कसा प्रकारे घेतला याबद्दल परमानंद कवि म्हणतात, "अवाग्नायत वै देवी तुळजापुरवासिनी"; आणि तो अपमान कोणता याचा खुलासा सभासद बखरकार देतात की "श्री भवानी कुलदेवता महाराजाची. तीस फोडून, जातियात घालून, भरडून पीठ केले." हा अपमान होत असतानाच आकाशवाणी झाली, "अरे अफझुलखाना, नीचा, आजपासून एकविसाने दिवशी तुझे शीर कापून, तुझे लष्कर अवघे संहार करून नवकोटी चामुंडांना खावयास देऊन संतुष्ट करते." याप्रमाणे त्याला शिक्षा मिळाली.

प्रतापगड येथील मूर्तीसंबंधी चिटणीस बखरीत पुढील उल्लेख मिळतो, 'पर्वताचा राजा लीलासेन याचे राज्यापविरो जाऊन त्रिशूलगडकी व श्वेतगडकी आणि सरस्वती संगमी शिळेचा शोध करून उत्तम शिळा प्राप्त झाली. शिल्पी प्रांतीचे हुनरवंद आणून मूर्ति सिद्ध केली आणि मोरोपंत प्रधान या समागमे पाठवून प्रतिष्ठा केली.'

सभासद बखरकारांनी चार कठीण प्रसंगी देवीने शिवाजीचे रक्षण केले असे नमूद केले आहे. (१) अफझलखान वधाचा, (२) शाहिस्तेखान स्वारीचा (३) जयसिंगाच्या मोहिमेत आणि (४) आग्र्याहून सुटकेचा प्रसंग. हे ते प्रसंग होत. अशा प्रसंगी शिवाजीच्या अंगी देवतेचा संचार होई, आणि त्या स्वरूपात जे शब्द बाहेर पडत, ते चिटणीस कारकून लिहून घेत, आणि ते मार्गदर्शक ठरत.

कर्नाटक स्वारीच्या वेळी महाराज श्रीशैल क्षेत्री मल्लिकार्जुनाचे दर्शन घेतल्यावर त्यांना वाटले की, या पवित्रक्षेत्री आपले शिरकमळच शंकराना वाहावे. पण मराठी बखरकार म्हणतात, "ते समयी भवानी अंगात संचरली आणि बोलली, तुझे ये गोष्टी मोक्ष नाही. हे कर्म करू नये, पुढे कर्तव्यही उदंड तुझे हाते करणे आहे" यासाठीच शिरकमळ वाहण्याचा बेत रहित झाला.

शेवटी चिटणीस बखरकार राज्याचे पुढील भविष्य सांगताना म्हणतात, "देशीचे राज्य ताम्र घेईल. रायगड जाईल. संभाजी राजा सापडेल. हैराण होतील. नंदीश राजाराम राज्य करील. शिवनामे राजा दिल्लीपावेतो राज्य करील. भोसले यांची राजसत्ता सत्तावीस पिढ्या चालेल. शेवटचा पुरुष गर्भांध निपजून राज्य बुडवील." ही वाक्ये बाळाजी चिटणिसांनी शके १५९५ चैत्रमासी त्रयोदशी मंगळवारी लिहून घेतली असा शेरा आहे. (संजीव पी. देसाई, वसंत, मे १९६३ ).

हा कथाभाग कंटाळवाणा वाटला तरी प्रकरणातील मथळ्यावर दिव्य प्रकाशझोत टाकणारा असल्याने उद्धृत करणे भाग आहे. शिवरायाची देवीशक्तीवर किती नितांत श्रद्धा होती आणि ती कशी मार्गदर्शक ठरत होती, याची ही उदाहरणे म्हणजे उत्कृष्ट सांगड आहे. या दृष्टांताचा आध्यात्मिक दृष्टिकोनातून अर्थ लावणे हे विषय तज्ज्ञाचे काम आहे. साधारण मनाला हे गूढ उकलण्यासारखे नाही. अश्रद्ध मनाला तर नाहीच नाही. यातून तात्पर्य हेच घ्यावयास पाहिजे की, देवीशक्तीविना राजशक्तीचा विजय होणार नाही.

शिवाजीच्या चरित्रातील हा सर्वविश्रुत कथाभाग या ठिकाणी मुद्दाम देण्याचा हेतू प्रामुख्याने असा की, आजच्या विसाव्या शतकातील राज्यकर्त्यांनी यापासून बोध घ्यावा की, देवीशक्तीच्या पाठबळाशिवाय त्यांचे राज्य व्यवस्थितपणे चालणे संभवनीय नाही. युद्धाच्या सावल्या पडू लागल्या म्हणजे मग विजयासाठी मंदिरे, मशिदा व चर्चेसमधून प्रार्थना करा, अशी आज्ञा जनतेला देण्यापेक्षा राज्यकर्त्यांनी नेहमीच जाहीरपणे शक्तिदेवतेची आराधना करावी आणि तिचे पाठबळ प्राप्त करावे. भारतीय युद्धामध्ये भगवान श्रीकृष्ण पांडवांच्या बाजूने लढले म्हणून संख्याबलाने व शौर्यबलाने अधिक श्रेष्ठ अशा पराक्रमी शत्रूबरोबरच्या युद्धात त्यांना जय मिळाला हाच वारसा त्यांच्या वंशजांनी पुढे चालवावा हीच प्रस्तुत ग्रंथाच्या ग्रंथकाराची मनापासून इच्छा आहे. दैवी शक्तीच्या पाठबळाच्या साहाय्याने राजांनी विजय संपादन केल्याची अनेक उदाहरणे ह्या ग्रंथात वाचकांना आढळून येतील.

शार्दूलविक्रीडित

ऐकावा इतिहास अद्‌भुत असा तो भोसल्यांच्या कुळीं।
आदीशक्ति कृपा सदैव दिसते, निर्भीत योद्धे बळीं ॥
मालोजी नि विठोजी बंधुद्वय ते रक्षीत क्षेत्रावरीं।
अंधारीं बहुरत्नकंकणयुता हस्तास देखे वरी ॥ १ ॥
पारुढां सुख-स्वप्निं तें भग तुवां कीं दाविले देवते।
प्रातःकाळिं खुणा अनूसरुनियां ते आहळे खोदिते ॥
द्रव्यारक्षक तो भुजंग सरला निष्कंट मार्गा करी।
राष्ट्रोद्धार करावया पुरविसी द्रव्यास येणें परी ॥ २ ॥

भुजंगप्रयात

शहाजी जई कोंडिला जुन्नरीतें।
जिजाई अती संकटीं आठवीतें ॥
शिवाई करी रक्षणा गर्भ मातें।
अति भक्तिभावेंचि वंदी पदातें ॥ १ ॥
तुझ्या ध्यानमाजि पुरी दंग होतें।
"वदे सांब घे जन्म माझ्या कुशीतें ॥
नको काळजी रक्षणातें करी गे।"
म्हणोनी नृपाअंगीं संचार ये गे ॥ २ ॥

आर्या

गंडक शीळा अणवुनि मूर्ती घडवीत दोन देवींच्या।
एका प्रतापगडिंतें दूजी मांडीत क्षेत्रिं तुळजेच्या ॥ १ ॥
सन सोळाशें एकसद् साली झालीच स्थापना पहिली।
अरि मर्दि दहतां दहतां शंभूरायें फिरून स्थापियली ॥ २ ॥
अफझूल यवन वीरें कोंडियलें या गडांत शिवरायातें।
देवी वरप्रसादें धुसवो तो शत्रु सापळीयातें ॥ ३ ॥

आर्यां वार शिरावरि येतां फोडीत पोट खानाचें ।
देवीकवच ज्यावरि कोणी मारूं नरा न त्या शकतें ॥ ४ ॥

अनुष्टुभ्

प्रतापगड तिर्थी या । महाराष्ट्रचि स्फूर्ति घे ।
शिवाजी वरदायिनी । भवानी देवी मूर्तिचें ॥
उत्कट देखतां निष्ठा । देवि सत्वर पावली ।
समशेर प्रसादाची । शिवरायासि अर्पिली ॥
राया घेवोनि ते खड्ग । चढाई करि धीटसा ।
मेळवी जय सर्वत्र । निर्दाळी शत्रु भीमसा ॥
पंडीत नेहरू उभवी । अश्वस्वार शिवाकृती ।
यशवंतांसवें वंदी । मराठ्या मानबिंदुसी ॥ १ ॥

पृथ्वी

सुवर्ण सुमनास दास नवसासहि वाहतो ।
तुला गुपित सांगतों, नवस श्रेष्ठीचा फेडितों ॥
प्रसन्न मग देवि, माग, म्हणतां वरां मागतो ।
" शिवाजी अमुचा स्वराज्य जगतीं करो घोष तो " ॥ १ ॥
गडावरिं रिघे सवे तुकडी वीर पन्नासची ।
सुटे म्हणुनि दोर राहिं सहस्रावधि खालती ॥
परि लढती वीरही वधि पठाण ती आठशे ।
अखेरि परी मारितो उदयभानु तानाजीतें ॥ २ ॥
शठा उदयभानुला समरिं खेचिलें मातुलें ।
स्वयें जरठ वीर तो तरिही शत्रुला ठेचिलें ॥
पुरा खवळला बळे समयिं पुन्हतुसंभार तो ।
पळापळित मारपीटिं बुडला मराठाच तो ॥ ३ ॥
अशा परम संकटीं त्वरित देवते धांवसी ।
मराठ कुल अन्नु रक्षण करीत शत्रु-कुशीं ॥
भवानिच स्वरूप घे कवडिं पीत-पत्रांतकीं ।
कपाड उघडीं त्वरें घुसत सैन्य किल्ल्यांत कीं ॥ ४ ॥

कथा सुरस वर्णितो तुळशिदास तो शाहीर ।
तुझ्या चतुरतेस श्रेय सगळें समर्पी तर ॥
रिघे तटिं मराठसैन्य अवघे जया मेळवी ।
शिवाजी गड मेळवी परि खरा हिरा घालवी ॥ ५ ॥

हरिणी

अभय मिळवी देवी तूझें स्मरूनि क्षणां क्षणां ।
प्रतिसमयीं गे कार्या जातां करी तुज वंदना ॥
स्व मनिं समजे धर्मांकार्यी सदा रत देविचें ।
म्हणुनि विजय प्राप्ती प्राप्ती सदा शिवसमुतें ॥ १ ॥

---

# पर्वतीय देवता

(१) अर्बुदादेवी,
(२) अरासुरी अंबा,
(३) ओसाम माता,
(४) कराला,
(५) कालिका ( पावागड ),
(६) कालिका ( कालीमठ ),
(७) कालिका ( दिल्ली ),
(८) कालिका ( पूर्णगिरी ),
(९) गिरनार अंबा,
(१०) जननीदेवी,
(११) नयनादेवी,
(१२) नंदादेवी,
(१३) भीमेश्वरी.

'समुद्रवसने देवि, पर्वतस्तनमंडले' या श्लोकामध्ये भूदेवता पृथ्वी ही सागररूपी वस्त्र नेसली असून, तिच्या वक्षःस्थळाचा भाग पर्वतांनी शोभायमान झालेला आहे, असे वर्णन आढळते. मानवी शरीराचा वक्षःस्थळ हा भाग अतिशय पवित्र मानला जातो, कारण मन व प्राणवायूचे ते ठिकाण होय. तद्वतच पर्वताचा भाग हा देखील पवित्र मानला जातो. पूर्वी पर्वत हे वृक्षलतांनी गजबजलेले असत, आणि सहजासहजी किंवा हेतुतः त्यावर आक्रमण होण्याची धास्ती नसे. यासाठीच ऋषीमुनींनी आपले आश्रम ध्यानमनन करण्यासाठी त्या ठिकाणी बांधले. मानवालाच जर राहावयास स्वच्छ नि पवित्र जागा लागते तर मग देवांना तरी ती का लागू नये? शांतता आणि पावित्र्य सांभाळणे सोपे जावे म्हणून काही देवतांनीही आपली निवासस्थाने पर्वतमाथ्यावर नेली. आजही हिमालयामध्ये आणि विंध्य पर्वतावर अनेक तापसी आपली ध्यानधारणा चालू ठेवण्यासाठी येतात आणि तेथेच वास्तव्य करून राहतात, हे आपण पाहतोच. आर्यांनी जे सप्तलोक सांगितले त्यापैकी अनेक हिमालयाच्या एकापेक्षा अनेक पातळीवर आहेत. पितृलोक, स्वर्गाश्रम ही नावे आजही आपण ऐकतो.

आर्यांचा एक प्रमुख देव शंकर भगवान याचे निवासस्थान कैलास पर्वतावर आहे. शंकर-पार्वतीचा निरंतरचा वास या ठिकाणी होत असे. त्याचप्रमाणे गौरी-शंकर शिखर अगर सागरमाथ्यावर नंदादेवी अथवा देशदेवी तेच दाखवितात. हिमालय पर्वतावरच ही परिस्थिति आहे असे नव्हे, तर इतर ठिकाणीही तेच आहे. जसे, बलुचिस्तानमध्ये हिंगलजदेवी, अरवली पर्वतावर अरासुरी अंबा, विंध्य पर्वतावर विंध्य वासिनी, अमरकंटकावर नर्मदादेवी, सह्याद्रीवर भीमादेवी, प्रतापगडावरील भवानीदेवी, श्रीशैलपर्वतावर भ्रमरंबा इत्यादि. याचप्रमाणे गिरीजा, मांदारवासिनी, मंदाद्रिनिवासा ही नावेही त्याचीच साक्ष देतात.

केवळ भारतामध्येच ही परिस्थिति आहे, असे नव्हे. इतर देशातही तीच परिस्थिति आहे. आफ्रिका खंडात किलिमांजारो पर्वतावर मसाई वंशाची एनाय देवी आहे. इजिप्तमध्ये पश्चिमेकडील पर्वत हा पृथ्वी आणि मृत्यु यांच्यामध्ये आडवा पडलेला आहे असे तेथील लोक मानतात. त्या पर्वताच्या माथ्यावर हॅथोर देवता वसलेली असून मृत्यूच्या मार्गावरील माणसाचे रक्षण करते अशी त्यांची श्रद्धा आहे. पार्वतींचा रक्षणकर्ता जसा शंकर तसाच या हॅथोर देवतेचा न्हा हा रक्षणकर्ताही तेथे असतो. त्याचप्रमाणे आफ्रिकेतील अवेवादेवी ही सर्वांची रक्षणकर्त्री आहे, असे तेथील लोक मानतात. क्रीट लोकांची आदिशक्ति न्हा ही इडा पर्वतावर जन्मली. लिडिआमध्ये त्मोलस पर्वतावर डिंडीमनी, सिनई पर्वता वर एलोहिमा ही चंद्रदेवता वास्तव्य करते. (दीक्षित, मदर गॉडेस, पृष्ठ ६८).

ग्रीसमधील एका मंदिरातील चित्रात प्रलयकाळचे चित्रण केलेले आहे. त्यामध्ये स्वर्ग व पृथ्वी ही पर्वतमाथ्यावर एकमेकांना भिडलेली दाखविली आहेत. पर्वतमाथ्यावर पृथ्वीदेवता उभी आहे तिचा झगा हवेत फडफडत आहेत. तिने हातात राजदंड घेतलेला असून तिच्या रक्षणार्थ दोन्ही बाजूंना दोन सिंह उभे आहेत असे वर्णन मिळते. ज्याप्रमाणे आर्य प्रलयकालचे तत्त्व मानतात आणि प्रत्येक प्रलयानंतर पुनश्च मनु पृथ्वीची उत्पत्ति करतो, असे मानले जाते, तद्वतच ख्रिस्ती धर्मही प्रलयकालाचे तत्त्व मानतो. प्रलयकाल ही भाकडकथा नव्हे, हे सिद्ध करण्यासाठी पाश्चिमात्य संशोधकांचे सतत प्रयत्न चालू आहेत. यापैकी अशाच एका प्रयत्नामध्ये एक संशोधक विमानातून ग्रीसमधील पर्वताचे निरीक्षण करीत असताना त्याला असे आढळून आले की, नोव्हाने जी नाव प्रलयकाळी वापरली तीच दीडशे दिवसांच्या प्रवासानंतर त्या पर्वतावर उलटी होऊन पडली असावी. ती नौका सुमारे ३०० फूट लांब आणि १६ फूट उंच होती. नाव उलटी झाल्यामुळे आणि खडकावर अडकून पडल्यामुळे, कालांतराने तेथील खडकाचा आकारच तसा बनला आहे. ऑक्टोबर १९६० साली या संशोधनाचा वृत्तांत वर्तमानपत्रातून आला होता.

जपानमध्ये फुजियामा पर्वतमाथ्यावर फुजियामा देवी आहे कुराण सपा (२।१५३) प्रमाणे हाजू यात्रा करताना यात्रिकाला मारव्हा व सफा या टेकड्यांवर दौड मारावी लागते. याचा अर्थ असा की, प्राचीनकाळी पर्वतमाथ्यावर देवतांची मंदिरे होती पण इस्लामी प्रसाराच्या वेळी ती उध्वस्त करण्यात आली तरीपण प्राचीन धर्मश्रद्धांची रूढि मात्र आचरणात टिकली गेली.

(जेम्स धर्मकोश, ८।८६४)

आता भारतातील पर्वतमाथ्यावर असलेल्या काही क्षेत्रांचा इतिहास पाहू. या देवतांची स्थाने पर्वतमाथ्यावर असल्यामुळे या प्रकरणाला 'पर्वतीय देवता' हे शीर्षक दिले आहे. हिंगुळादेवीसारख्या काही पर्वतीय देवता 'शक्तिपीठे' शीर्षकाखाली आल्या असतील हा भाग निराळा.

## (१) अर्बुदादेवी

> ततो गच्छेत धर्मज्ञ हिमवत्सुतमर्बुदम् ।
> पृथिव्यां यत्र वै छिद्रं पूर्वमासिद्युधिष्ठिर ॥ १ ॥
> तत्राश्रमो वसिष्ठस्य त्रिषु लोकेषु विश्रुतः ।
> तत्रोष्य रजनीमेकां गोसहस्रफलं लभेत् ॥ २ ॥

(महाभारत वन तीर्थ, ८०।५७-५८).

"हिमालयपुत्र अर्बुद याने तेथे जावे, आणि पूर्वी पृथ्वीवरून पाताळाकडे जाण्यासाठी जे मोठे विवर आहे, ते बुजवून टाकावे. त्या ठिकाणी वसिष्ठऋषींचा आश्रम आहे. त्या पुण्यक्षेत्री (केवळ) एक रात्र राहिल्याने देखील अपार पुण्य पदरी पडते."

आता अर्बुदा हे नाव का आले हे आपण पाहू.

पूर्वी या ठिकाणी वसिष्ठऋषींचा आश्रम होता. एकदा त्यांची नंदिनी ही गाय चरत असताना चुकून नागतीर्थामध्ये पडली. वसिष्ठांनी सरस्वती नदीची स्तुति केल्यावर ती प्रकट झाली आणि तिने खड्डा भरताच नंदिनी वर आली. या वेळी शिष्यांच्या विचारण्यावरून त्या तीर्थाची उत्पत्ति त्यांनी सांगितली, ती अशी.

प्राचीन काळी गौतम मुनींकडे उत्तक या नावाचा एक शिष्य होता. तो बुद्धीने जड असल्यामुळे अनेक वर्षे गुरुगृही राहूनही तो कोरडाच राहिला होता शेवटी गुरुकृपा झाली आणि त्याची विद्या पूर्ण झाल्याचा आशीर्वाद त्याला गुरूकडून मिळाला घरी जाण्याची अनुज्ञा त्याला मिळण्यापूर्वी एके दिवशी जंगलातून लाकडे तोडून परत आश्रमात आल्यावर ती लाकडाची मोळी खाली ठेवताना त्याच्या डोक्याचा एक केस त्यामध्ये अडकला आणि तो पांढरा झाला असल्याचे त्याच्या निदर्शनास आले. तेव्हा कोठे त्याच्या ध्यानात आले की आता आपण आपल्या आयुष्याची उतरण उतरावयास प्रारंभ केला आहे. ही जाणीव होताच तो खिन्न झाला. गौतम पत्नीच्या दृष्टीतून मात्र ही गोष्ट सुटली नाही.

त्या पुत्र व चारित्र्य स्त्रीने तात्काळ सर्व प्रकार जाणला आणि त्याला घरी जाण्यास तिने परवानगी दिली.

आता परवानगी तर मिळाली. पण उत्तंकापुढे दुसरा प्रश्न उभा राहिला तो गुरुदक्षिणेचा. तेव्हा त्याने गुरुपत्नीस विचारले की, " कोणती दक्षिणा दिली असता गुरु संतुष्ट होतील ? " त्या वेळी क्षत्री क्षेत्री सुदास नावाचा राजा राज्य करीत होता आणि त्याच्या राणीजवळ मौल्यवान कर्णभूषणे होती त्या मौल्यवान कर्णभूषणांची मागणी उत्तंकाजवळ गुरुपत्नीने केली. तेव्हा ही मागणी पूर्ण करण्यासाठी महत्प्रयासाने उत्तंक सुदास राजाच्या राणीकडे गेला आणि गुरुदक्षिणेच्या पूर्ततेसाठी त्या कर्णभूषणाची मागणी त्याने राणीजवळ केली. दारी आलेल्या ब्राह्मणाला विन्मुख पाठवावयाचे नाही. या उदात्त हेतूने तिनेही मोठ्या आनंदाने ती कर्णभूषणे त्याला दिली आणि सांगितले की, " या कर्णभूषणांवर नागराजाची लोभी दृष्टि आहे तेव्हा ही केव्हाही जमिनीवर ठेवू नकोस. तरच ती तुला लाभतील "

ही कर्णभूषणे एका ठराविक काळाच्या आत गुरुपत्नीला द्यावयाची अशी अट होती आश्रमाकडे परत येत असताना वाटेत उत्तंकाला कडकडून भूक लागली, म्हणून परिपक्व बेलफळे काढण्यासाठी तो बेलाच्या झाडावर चढला परंतु त्यापूर्वी त्याने ती भूषणे राणीच्या सांगण्याविरुद्ध कृष्णाजिनात गुंडाळून जमिनीवर ठेवली नागराज तक्षक टपूनच बसलेला होता. त्याने झडप घालून ती हस्तगत केली आणि तो आपल्या बिळात निघून गेला उत्तंकाने हे सर्व झाडावरून पाहिले. तो त्वरेने खाली उतरला आणि बिळात शिरण्याचा प्रयत्न करू लागला. जे मूढमति असतात त्यांना कशाचा उपयोग कोठे करावा याचे तारतम्य ज्ञान नसते पण ते प्रयत्न मात्र सोडत नाहीत. उत्तंकाच्या बाबतीतही तेच झाले आपल्या हातातील काष्ठदंडाने त्याने तक्षकाचे बीळ खोदण्यास प्रारंभ केला पण त्याचा काय उपयोग होणार ? शेवटी इंद्राला त्याची करुणा आली आणि त्याने ते बीळ वज्राने खोदून पाताळाचा मार्ग त्याला मोकळा करून दिला उत्तंक त्या मार्गाने भूगर्भात शिरला तक्षकाला त्याची खरी परिस्थिति समजल्यावर त्यानेही उदार अंतःकरणाने ती कर्णभूषणे त्याला परत दिली पण हा सर्व व्यवहार होण्यास बराच कालावधि लोटला असल्यामुळे ठरलेल्या वेळात आश्रमात पोहोचणे उत्तंकाला सर्वस्वी अशक्य होते. यास्तव तक्षकाने त्याला अग्निस्वरूप घोडा दिला त्यामुळे त्या घोड्याच्या मदतीने वेळेवर आश्रमात पोहोचून आपली गुरुदक्षिणा तो अदा करू शकला

त्या वेळी इंद्राने आपल्या वज्राने जो खड्डा तयार केला होता, तोच हा अर्बुद पर्वतावरील खड्डा होय. नंतर हा खड्डा भरून काढण्यासाठी वसिष्ठ

ऋषींनी हिमालय पर्वतराजाला विनती केली. तेव्हा त्यांनी नदींवर्धनपुत्राला अर्बुद नावाच्या नागावर बसवून पाठविले, आणि तो पर्वत विवरात टाकण्यात आला. परंतु तो खड्डा पूर्णपणे भरला नाही. नाकापर्यंतचा भाग मोकळाच राहिला. यास्तव त्याला नागतीर्थ हे नाव प्राप्त झाले. याप्रमाणे त्या क्षेत्राला अर्बुदा हे नाव का आले याचा हा संक्षिप्त इतिहास आहे (स्कंदपुराण, प्रभास, अर्बुदाचल, अध्याय १–३).

या क्षेत्रासंबंधी आणखी एक आख्यायिका अशी आहे की, विश्वामित्र ऋषि या ठिकाणी शिवाची उपासना करीत असताना त्यांच्या तपश्चर्येत दैत्य विघ्न आणू लागल्यावर, त्याने देवाची प्रार्थना संकटनिवारणार्थ केली. देव साक्षात् अवतरले आणि तेथील तपश्चर्येच्या अग्निकुंडातून त्यांनी चौहान, परिहार सोळंकी आणि परमार अशी चार क्षत्रीय कुळे निर्माण केली. यांनी दैत्यांना संहार करून, संकट निवारण केले, यास्तव या क्षत्रीय कुळांना साम्प्रतही अग्निकुळे अशी संज्ञा आहे (भारतीय संस्कृति कोश, १–१७६).

अर्बुदा पर्वतावरील देवीचे हे स्थान मुंबई–दिल्ली लोहमार्गावर असून अबुरोड स्टेशनपासून सात मैलांवर आहे अर्बुद पर्वत २०० × १४ मैल असून माथ्यावरील पठाराची लांबी १४ मैल व रुंदी ४ मैलपर्यंत आहे. स्कंद पुराणा मध्ये याचा उल्लेख १० योजने लांब आणि ५ योजने रुंद असा दिला आहे. इसवी सन ६२५ सालापासून या पर्वताचा उल्लेख इतिहासात मिळतो. त्या वेळी तेथे वर्मलता नावाचा नृपति राज्य करीत होता. नवव्या शतकात परमारवंशीय सत्ता तेथे आली देवीचे स्थान चांगले उंचावर आहे. साधारणपणे तीन चारशे पायऱ्या चढून गेल्यावर देवीच्या मंदिराप्रत जाता येते. पायऱ्या चढत असता अर्ध्या रस्त्यावर दूधबावडी कुंड आहे. त्याची अशी आख्यायिका सांगतात की, प्राचीन काळी ऋषींसाठी या कुंडात दूध साठवून ठेवीत असत. एवढे मात्र खरे की, सध्या त्या कुंडात दूध नसले तरी त्या कुंडातील पाण्याचा रंग पांढुरका आहे. कदाचित् पाण्याच्या या रंगामुळेही त्याला हे नामाभिधान मिळाले असावे.

सरोवरावर स्नानाला जाते. या तलावाच्या सभोवार सुंदर पर्वतराजी असून त्यामध्ये नौकाविहार करण्याची उत्कृष्ट सोय आहे. इतकेच नव्हे तर घोड्यावरून रपेट करण्यास भोवताली खास मार्ग तयार केलेला आहे. काठावर लहानसे अर्बुदादेवीचे मंदिरही आहे. मुख्य देवीच्या गाभाऱ्यात तुपाचा नंदादीप सतत तेवत असतो, आणि त्यामुळेच देवीचे जेवढे स्वरूप दिसेल तेवढेच पाहता येते. येथेच एका दुसऱ्या लहानशा गुहेमध्ये दुर्गादेवी आणि चौसष्ट योगिनी यांच्या कोरीव मूर्ति आहेत.

ही देवता ज्याप्रमाणे अधांतरी आहे अशी भक्तांची श्रद्धा आहे, त्याप्रमाणे गुजराथ प्रांती सोमनाथ लिंग हेही अधांतरी असल्याचा उल्लेख मिळतो. गझनीच्या महमदाने सन १०२४ मध्ये सोमनाथावर स्वारी केली. तेव्हा त्याला असे सांगण्यात आले की, "सोमनाथाचे लिंग हवेत अधांतरी आहे." या मूर्तीला अदृश्य आधार असला पाहिजे, म्हणून आश्चर्याने थक्क झालेला महमद, भाल्याने सर्व बाजू तपासून पाहू लागला. पण त्याचे प्रयत्न निष्फळ ठरले. त्याला असे सुचविण्यात आले की, लिंगाच्या मस्तकावरील घुमटामध्ये अत्यंत आकर्षक लोहचुंबक बसविलेला असावा आणि त्याने ही अष्टधातूंची मूर्ति मध्येच धरलेली असावी. त्याप्रमाणे त्याने छताचे पाषाण दूर करताच, मूर्ति जमिनीवर आदळली. झकेरिया कझवीनी या इराणी गृहस्थाने सन १२६३ साली हे वर्तमानवर्णन लिहून ठेवलेले आहे, ते वरीलप्रमाणे इलियट व डाउसन या आंग्ल इतिहासकारांच्या विधानाला पुष्टी देणारेच आहे. रियासतकार सरदेसाई मात्र म्हणतात की, ही परिस्थिति खरी नसावी, तर मुसलमान इतिहासकारांनी कल्पनेने सजविलेली असावी. वरील प्रकारानेच अर्बुदादेवींची मूर्तीही अधांतरी असण्याची शक्यता आहे. त्या वेळी या प्रकाराचे शिल्प बनविण्याची कला गुजरात प्रांती होती हेच यावरून दिसून येते (सोमनाथतीर्थ, ले. गौतमसुवा पाठक, पृ. ५७)

द्रुतविलंबित

अरवली गिरि दक्षिणचा कडा। शिखरि नांदत दैवत अर्बुदा।
अधरदेवि कुणी तिजला वदे। वदत सूत्र सुटेचि पदातळें॥ १॥
विवर खोडुनिया खडकामध्ये। वमळि मूर्ति विशाल तयामध्यें।
इभचि कुंभरिया मग मंदिर। रचित तें गमतें अति सुंदर॥ २॥
मुनि वसिष्ठ निवास नगाशिरीं। पतन पावत नंदिनी वीवरीं।
नदि सरस्वति ऐकुनि धांवली। भरुनि खोल दरी वचली वरी॥ ३॥

आर्या

गौतम वसिष्ठ मुनिचें आश्रम येथें परीसरीं दिसती।
गुंफा भर्तृहरीची गोपीचंदादि रामप्रभू वसती॥ ४॥
सूर्याग्नि परशूची कुंडें, नामाभिधानि पाण्याची।
नाग कनक-कपिलादि पावन तीर्थिंची पूण्य-भू साची॥ ५॥

अतिरेखा

त्रिशत चढा गिरीवरती पायरी सदा।
गहन असी शिरां विवरीं पाही अर्बुदा॥
सप्तांसम योगिनी आणिक देवी अंबिका।
वसविंत फोडूनि खडक, भक्त पालिका॥ ६॥

◆ ◆ ◆

(२) अरासुरी अंबा

देव्या यया तत्वमिदं जगदात्मशक्त्या।
निःशेषदेवगणशक्तिसमूहमूर्त्या॥
तामम्बिकामखिलदेवमहर्षिपूज्यां।
भक्त्या नताः स्म विदधातु शुभानि सा नः॥

(मार्कंडेय पुराण, शक्रादि स्तुति)

" आत्मशक्तीने जिने सर्व जगत् उत्पन्न केले आहे, सर्व देवांची शक्ति जीमध्ये एकवटली आहे, सर्व देव आणि ऋषिजन ज्या देवीची उपासना करतात, त्या अंबिका देवीला आम्ही भक्तिपूर्वक नमन करतो. "

आर्यांची आंबिकादेवी व जैनधर्मीयांची अंबिकादेवी यांमध्ये फरक काय हे खालील विवरणावरून ध्यानात येईल. जैनधर्मामध्ये जे चोवीस तीर्थंकर होऊन गेले त्या प्रत्येकाच्या शासनदेवता निरनिराळ्या आहेत. त्यांचा बाविसावा तीर्थंकर नेमिनाथ याचे चित्र पाहता तो अंबिका देवीच्या मस्तकावर आरूढ झालेला दिसतो वास्तविक त्याची शासनदेवता गांधारी ही आहे. जैनधर्मीय याचा असा अर्थ घेतात की, देवीने आपल्या भक्ताला आपल्या मस्तकावर धारण केला आहे आर्यधर्मामध्ये देव अगर देवता यांना मस्तकावर धारण करण्याची रूढी दिसत नाही याला अपवाद फक्त शंकराच्या जटेतील गंगेचा आहे परंतु बौद्ध धर्मात मात्र ही रूढी आहे. मोहेंजोदरो व निलगिरी येथे काही पुतळे या स्वरूपाचे आढळले आहेत

जैनांच्या काही धर्मग्रंथातून या देवीबाबत उल्लेख मिळतो तो असा

( १ ) कूष्मांडी देवीं, कनकवर्णा, सिंहवाहना, चतुर्भुजा, मातु लिंग शिरोधारिणी, पाशयुक्तदक्षिणकरा, पुत्रांकुशान्वितवामकरा चेति। ( निर्वाण कलिका).

( २ ) द्विभुजा सिंहमारूढा आम्रदेवी हरित्प्रभा ( प्रतिष्ठासारसंग्रह ).

( ३ ) सिंहारूढा, कनकतनु, वाम बाहूमध्ये वेद, दक्षिण हातात पाश असणारी, सकल जगताची रक्षणकर्त्री अशी देवी अंबा प्रसन्न होवो आणि सर्व विघ्नांचे हरण करो ( आचार्य दिनकर ).

या सर्व अवतरणाचा अर्थ हाच की, जैनधर्मीयांची अंबा ही सिंहारूढ, हातात एकदोन मुले असलेली, दोन भुजा असणारी, मस्तकावर मातु लिंग धारण करणारी अशी आहे, म्हणजेच आर्यांच्या अंबेचे हे रूप नव्हे ही कोणीतरी जैनयक्षिणी किंवा शासनदेवी असावी.

अरासुरी अंबेचे ठिकाण अर्बुदा देवीच्या पुढे तीनचार मैलांवर आहे आणि म्हणूनच दोघींचेही रेल्वेस्टेशन एकच आहे हे क्षेत्र अरवली पर्वताच्या नैर्ऋत्य कोपऱ्यात दांतिया शहरापासून १५ मैल अंतरावर आहे या मंदिरापर्यंत जाण्यास अबुरोडवरून आणि दांतिया शहरावरून असे दोन मार्ग आहेत. उंच उंच टेकड्या, नयनमनोहारी वृक्षराजी यामुळे या मार्गावरून मंदिरापर्यंत जाताना मन अतिशय प्रसन्न होते दक्ष यज्ञात सतीच्या शरीराचे जे तुकडे झाले त्यांपैकी एक अंश या ठिकाणी पडला म्हणून हे शक्तिपीठ मानले जाते.

आरासनेऽर्बुदाग्रे क्षेत्रे जालंदरे तथा।
क्रमश पतितौ तस्य कुचौ तु वामदक्षिणौ॥
( कालिका पुराण )

याप्रमाणे देवीचा वाम स्तन–भाग या ठिकाणी पडला आहे.

दतियापासून गड चढताना जी चढण सुरू होते, तिच्या अर्ध्या वाटेवर आल्यावर एक नानाभाईची विहीर लागते काही काळ या ठिकाणी विश्रांति घेऊन मगच यात्रेकरू उरलेली चढण चढतात देवीचा मूळचा गाभारा लहानसर असून आता त्याचे भव्य मंदिर झालेले आहे आजुबाजूला धर्मशाळा आणि पुरोहित वर्गाची घरे आहेत मंदिराच्या भोवती संरक्षण म्हणून भक्कम तटबंदी आहे संगमरवरी मंडपाच्या पार्श्वभागी अरासुर पर्वत शुभ्रफेनासारखा शोभत असल्याने या देवीला "धोला गढवाली" असेही संबोधितात आसपासच्या पन्नाससाठ धर्मशाळांमधून यात्रेकरूंची राहण्याची सोय केली जाते त्यांना भांडीकुंडी पुरविली जातात सर्व काही व्यवस्था अगदी घरच्यासारखी असते

श्रीकृष्णाच्या षोडश संस्कारांपैकी जावळ काढणे अगर चौलविधि हा या ठिकाणी झाला असे मानतात, आणि याच कारणास्तव या देवीची भक्तमंडळी जरी त्यावर कोठेही असली तरी या विधीसाठी आपली मुले या क्षेत्री आणतात आणि येथ हा विधि उरकतात हिंदु, पारशी, जैन, मुसलमान इत्यादी सर्व धर्मांचे लोक या देवीचे भक्त आहेत उत्सवप्रसंगी हे सर्वजण उपस्थित असतात रजस्वला स्त्रीने जर या मंदिरात प्रवेश केला तर देवीला तो विटाळ सहन होत नाही आणि तिचा त्रिशूळ गदगदा हलू लागतो आजच्या कलीयुगातील हा अगदी चक्षुर्वैसत्य चमत्कार आहे आणि या चमत्काराची प्रचीति आजही अनेक वेळा अनेक भक्तांना आली आहे

मेवाडचा महाराणा प्रतापसिंह हा या देवीचा उपासक होता देवीच्या कृपेमुळेच अकबर बादशहाने दिलेला वेढा तो उठवू शकला, अशी त्याची स्वतःची ठाम समजूत होती तो प्रसंग असा की, अकबर बादशहा महाराणा प्रतापचा पाठलाग करीत असताना त्याला बातमी मिळाली की, एका विवक्षित वेळी प्रताप आपली पत्नी इंदरची राजकन्या हिला भेटण्यासाठी येणार आहे अकबराने लगेच आपले जाळे पसरले भेट घेऊन परत येत असताना दुथडी भरून वाहात असलेली साबरमती नदी पार करण्यासाठी प्रतापने आपला चेटक या नावाचा घोडा पाण्यात घातला परंतु नदीच्या पात्रात घोड्याचे पाय वाहणाऱ्या झाडात अडकले त्यामुळे त्याला पुढे जाता येईना शेवटी राण्याने कुलस्वामिनी अंबेची प्रार्थना केली की, "या संकटातून मी वाचलो तर तुला तलवार अर्पण करीन" देवीच्या कृपेने तो संकटमुक्त झाल्यावर त्याने देवीला तलवार अर्पण केली तीच आज यात्रिकांना दाखविण्यात येते


करीत असे. देवीला कपडे वर अनेकजण दान करतात. मंदिरामध्ये नेहमी तुपाचा दिवा जळत असतो. सिद्धपूरचे औदिच्य ब्राह्मण या देवीचे पुरोहित आहेत.

(रासमाला, १।४०५)

तेषां वासस्य संजातः पर्वतेऽर्बुदसंज्ञके।
एवं तत्र समापन्ना गंगा चैव सरस्वती ॥ (स्कंद, प्रभास, १०)

सरस्वती नदी दक्षिणेकडे आल्यावर मारवाडामध्ये गुप्त होते. ती पुन्हा या ठिकाणी उत्पन्न होते आणि दक्षिणेकडे वाहात जाऊन कच्छच्या रणात समुद्राला मिळते वाटेत सिद्धपूर येथे ती पवित्र मानली असल्यामुळे आणि मातृगया हे तीर्थ मानले गेल्यामुळे मृत मातेचा श्राद्धविधि या ठिकाणी करण्यात येतो, आर्यांची सरस्वती नदी कोणती याचा उलगडा नीटपणे झालेला नाही. पारसीक अवेस्ताप्रमाणे अफगाणिस्तानमधील हरक्ती हीच सरस्वती होय, तर संशोधक ओल्डहॅम यांच्या मताप्रमाणे मुदुटु नदीला ती मिळाली आणि तिच्याशी एकरूप होऊन गेली पंजाबमधील सिरपूर भागात एक सरस्वती नदी उगम पावून नंतर ती पतियाळाच्या हद्दीमध्ये घागर नदीला मिळते. ही घागर नदी मारवाडातून वाहते. तेव्हा सरस्वती ती हीच की काय अशी काहीजणांना शंका येते

स्कंदपुराणाची एक हस्तलिखित प्रत इंडिया ऑफिस व दुसरी बंगालमधील रॉयल एशियाटिक सोसायटीच्या संग्रही आहे. त्यामध्ये अंबिका खंडाचे १२०० श्लोक असल्याचे दिसून येते.




वीसा यंत्र

एकूण आठ प्रकारांनी यांतील आकड्यांची बेरीज वीसच येईल.

विवेचनावरून वाचकांना कल्पना आलीच असेल की, अर्बुदादेवी व अरासुरी अंबा ही ठिकाणे जरी जवळजवळ असली तरी दोन्ही क्षेत्रे निराळी आहेत.

अंबाजी मंदिराच्या पायथ्याजवळ नदी व झाडीमध्ये चितोर नावाचे एक खेडे आहे. ते कुंभारिया या गृहस्थाने वसविले. अंबिका पुराणात अशी कथा आहे की, विमलशहा कुंभारियाला अंबाजी देवीने भरपूर द्रव्य दिले आणि त्यातून या ठिकाणी त्याने ३६० मंदिरे बांधली ती सर्व जैन पार्श्वनाथाची होती. कारण विमलशहा हा स्वतः जैन धर्मीय होता. त्यानंतर देवीने विमलशहाची परीक्षा घेण्याचे ठरविले. त्याला आपण एवढी संपत्ति दिली. त्याला ती देणाराबद्दल कितीशी जाणीव आहे, एवढेच प्रामुख्याने देवीला पाहावयाचे होते. स्वप्नात त्याला देवीने दृष्टांत दिला आणि त्याला विचारले, "ही सर्व मंदिरे कोणी बांधली !" विमलशहाने उत्तर दिले, "माझा धर्मगुरु धर्मघोषसुरी याच्या कृपेमुळे मी ती बांधली." देवीने आपला प्रश्न पुन्हा दोनतीनदा त्याला विचारला पण त्याचे उत्तर आपले एकच होते सहाय्यकर्तीला हा विसरला म्हणून देवी कोपायमान झाली आणि तिने त्याला बजाविले, "शक्य तितक्या त्वरेने येथून चालता हो. नाहीतर फुकट प्राणास मुकशील" या भयानक स्वप्नातून विमलशहा ओरडतच जागा झाला आणि एका भुयारातून निघून दिलवाडा येथे माऊंट अबू पर्वतावर आला.

त्यानंतर लगेच तेथे भयंकर अग्निप्रलय झाला आणि त्या ३६० मंदिरांपैकी अवघी पाच मंदिरे शिल्लक राहून बाकीची सर्व मंदिरे जळून खाक झाली. आजही त्या उध्वस्त पडक्या मंदिरांचे दगड आसपास विखुरलेले दिसतात.

कदाचित् असेही झाले असेल की, भूकंपासारखे एखादे अरिष्ट त्या क्षेत्रावर कोसळून ती मंदिरे पडली असतील. पण या बाबतीत स्वतः विमलशहा एका शिलालेखात वरील वृत्तांत देतो, आणि झाले ते सर्व देवींच्याच कोपामुळे झाले अशी कबुली देतो. या कोपाच्या अंशतः निवारणार्थ नंतर त्याने 'दिलवारा मंदिरे' म्हणून ओळखली जात असलेली संगमरवरी बांधणीची काही मंदिरे बांधली. (रासमाला, भाग १/४०५).

अरासुरी अंबेच्या जवळच एक कोसाच्या अंतरावर गब्बरगड या नावाचे एक पवित्र ठिकाण आहे. या गडाजवळ एक गुंफा आहे तिला "माईका द्वार" असे म्हणतात. या गुळऱ्याच्या आत एक देवीचे मंदिर आहे आणि त्या मंदिरात देवी झुंप्यावर बसत असते, अशी भक्तांची भावना आहे या गुहेचा दरवाजा आज बंद झालेला असला तरी दरवाजाला कान लावून लक्षपूर्वक ऐकल्यास कधी कधी झुल्याचा आवाज ऐकू येतो, असे काही भक्त सांगतात. याचसाठी या स्थानाला आरासुरी अंबेचे मूळपीठ मानले असावे. कल्याणजवळ टिटवाळा या क्षेत्री गणपतींचे एक स्वयंभू स्थान आहे त्या ठिकाणी एका विशिष्ट जागी कान लावल्यास भजनाचा आवाज ऐकू येतो, असा अनेकांचा अनुभव आहे.

भक्ताची अशी श्रद्धा आहे की, रात्री अरासुरी अंबा या गडावर विश्रांतीसाठी येते. याच संदर्भात एक दंतकथा रूढ आहे, ती अशी. या देवीची एक गाय पायथ्याशी इतर गुराबरोबर चरत असे. पण गुराख्याला तिच्याबद्दल कवडीचीही राखणावळ मिळत नसे. परंतु एक दिवस त्याने या गाईच्या मालकाचा शोध घेण्याचे ठरविले. सायंकाळी ती गाय परत जात असताना तो तिच्या मागोमाग गेला, आणि अगदी थेट गब्बरगडावर पोहोचला. तेथे एका भव्य महालांत एक स्त्री साजशृंगार करून कोचावर बसली होती. त्या गायीची मालकीण हीच असावी असे समजून त्याने तिच्याजवळ राखणावळीचे पैसे मागितले. बारा वर्षांची राखणावळ शिल्लक आहे, असे त्याने तिला सांगितले. ह्या स्त्रीने म्हणजेच देवीने आपल्या एका दासीला हाक मारली आणि पसाभर मक्याचे दाणे त्याला द्यावयास सांगितले. त्याप्रमाणे दासीने त्याला पसाभर दाणे दिले.

परंतु या एकंदर प्रकारावरून तो गुराखी नाराज होऊनच परत फिरला, आणि त्याने ती भिकार राखणावळ फेकून दिली. परंतु त्यांपैकी काही दाणे त्याच्या घोंगडीत अडकून राहिले होते. घरी आल्यावर कपडे काढताना जे दाणे वाचले होते ते सुवर्णाचे असल्याचे त्याला आढळून आले. मग मात्र त्याला पुरा पश्चात्ताप झाला. दुसरे दिवशी तो पुन्हा गडावर गेला. पण आदल्या दिवशीच्या वैभवाचा मागमूसही तिथे त्याला आढळला नाही. तो महाल दिसला नाही, ती सालंकृत स्त्री दिसली नाही, आणि ती गायही त्याला दिसली नाही. अर्थात ती गाय पुन्हा तेथे चरावयास आली नाही, हे निराळे सांगणे नकोच.

(रासमाला, भाग १ । ४०२)

दतियाचे राजघराणे या देवीचे विश्वस्त आहे. हे घराणे या देवीचे भक्त होण्याचे कारण असे देतात की, दतिया घराण्यातील एक राजकन्या खिरोदी घराण्यात दिलेली होती. स्वतः देवीचे 'विश्वस्त' असल्यामुळे देवीसाठी आलेले उंची कपडे विश्वस्त आपल्या घरात वापरीत असत. कारण प्रतिष्ठेमुळे त्यांना याचा जाब कोणी विचारू शकत नसे. हीच भावना सांप्रतही अनेक विश्वस्त मंडळीमध्ये चालत असलेली दिसते. पण देवीचे विश्वस्त म्हणविणाऱ्यांनी असे करणे बरे नव्हे. कथेतील परिणाम पुढे किती घोर झाला तो पाहून त्यापासून सांप्रतच्या अन्य विश्वस्तांनी धडा घेण्यासारखा आहे. देवीला अर्पण करण्यात आलेला एक अतिशय उंची शेला त्या राजकन्येने आपल्या अंगावर घातला आणि ती आपल्या सासरी गेली. मुलीच्या दुर्दैवाने तो अतिशय उंची शेला खिरोदीच्या घराण्याने देवीला अर्पण केलेला होता. तेव्हा तो देवीमातेचा शेला आपल्या पत्नीच्या अंगावर पाहताच तिचा पति तिला म्हणाला, "आम्ही अंबामातेला वाहिलेला शेला दुसऱ्या

कोणा स्त्रीच्या अंगावर आला तर धर्मांशेनुसार आम्ही तिला आमची माताच मानतो. तेव्हा आता तू जरी माझी पत्नी असलीस तरी हा शेला अंगावर पांघरल्यामुळे माझी माता झाली आहेस म्हणून आता तुझा स्वीकार करणे म्हणजे धर्माचा अवमान करण्यासारखे आहे." यानंतर तिच्या पतीने तिला कायमचेच माहेरी पाठविले. अर्थात तेव्हापासून दांतिया घराण्याची देवीवरील श्रद्धा घटली आणि त्यांनी कपड्याचा एक तुकडाहि घरी नेण्याचे बंद केले. सांप्रतच्या मंदिराच्या विश्वस्त आणि पुरोहित यांनी यापासून बोध घेण्यासारखा आहे.

(रासमाला, भाग १ । ४०२)

या देवीचा जन्म भाद्रपद महिन्यात झाला असे मानतात आणि म्हणूनच ह्या महिन्यात त्या ठिकाणी फार मोठी जत्रा भरते. नवरात्रीच्या आठव्या माळेला स्वतः महाराज देवीची पूजा करतात आणि तिला पाण्याने वारा घालतात. त्या दिवशी होम हवन वगैरे झाल्यावर लोकांना प्रसाद वाटण्यात येतो या वेळी काही भक्त देवीला कोंबडी बकरी यांचे बळी देतात, आणि तिला मद्याचा नैवेद्य दाखवितात दर्शन घेणाऱ्या भक्ताने सरस्वती नदीवर देवीस्थान या तीर्थामध्ये स्नान करून मगच मंदिरात प्रवेश केला पाहिजे, असा तेथील दंडक आहे. प्रसाद वाटण्याच्या वेळी देवीचे भिल्ल भक्त देवीच्या गळ्यातून हार खाली पडून लुटण्याचा इशारा मिळाल्याबरोबर राजाने आणलेली मिठाई लुटण्यास आरंभ करतात.

(कैरा जिल्हा गॅझेट, पृष्ठ ४३३)

अंबा मंदिराच्याजवळ सिरोहीच्या बाजूला एक टेकडी आहे. तेथील दंतकथा अशी आहे की, एकदा त्या राज्यातील एक शेतकरी आपला बैल विकण्यासाठी बाजारात घेऊन चालला होता. वाटेत त्याला एक गोसावी भेटला आणि 'माझ्याबरोबर आलास तर तुझा बैल विकत घेतला जाईल' असे त्याने त्याला सांगितले. काही वेळाने ते दोघे या टेकडीवर आले आणि एका खोल गुहेत शिरले थोडेच आत गेल्यावर तेथे त्या शेतकऱ्याला एक भव्य महाल, त्याचप्रमाणे त्याला घोड्यांचा तबेला, शिरस्त्राणे बनविण्याचा कारखाना, दारूगोळ्याचा कारखाना हेही सर्व दिसले. तो गोसावी त्याला म्हणाला, "हे सर्व युद्धसाहित्य ब्रिटिशांबरोबर होणाऱ्या युद्धासाठी तयार होत आहे" शेतकऱ्याला आश्वासन दिल्याप्रमाणे त्या गोसाव्याने त्या शेतकऱ्याचा तो बैल विकत घेतला बैलाच्या मोबदला घेऊन तो शेतकरी आपल्या गावी गेला आणि त्याने ही बातमी इतर गावकऱ्यांना सांगितली तावडतोब अनेक लोक हा चमत्कार पाहण्यासाठी त्या टेकडीकडे धावले पण,

आश्चर्य असे की, तेथे त्याना काहीच आढळले नाही. प्रा. रॉलिन्सन म्हणतात की, अशा कथा भारतातच नव्हे तर जर्मनी, इंग्लंड, स्विट्झर्लंड, अमेरिका या देशातही आढळून येतात. ( रासमाला, भाग १, पृष्ठ ४०४ ).

या देवीच्या साक्षात्काराबद्दलची आणखी एक कथा उपलब्ध आहे. मदोखोरचा एक व्यापारी असे रामजी समुद्रावर व्यापार करीत असता, त्याच्या जहाजाला भोक पडून ते बुडू लागले. त्याने देवीचा धावा केला आणि ' संकटनिवारण झाल्यास तुला माझी अर्धी संपत्ति अर्पण करीन ' असा नवस केला. देवीने स्वत. त्या ठिकाणी जाऊन आपल्या भाल्याचा आधार देऊन जहाज सुखरूप किनारी आणले. इकडे देवीच्या पुजाऱ्याला दृष्टान्त झाला की, देवीचे कपडे ओले आहेत, ते बदलले पाहिजेत. पुजारी लगेच उठला. त्याने बंद दरवाजा उघडला आणि दृष्टान्ताप्रमाणे खरोखरीच देवीचे कपडे ओले झालेले त्याने पाहिले, त्या देवीभक्त पुजाऱ्याने देवीच्या अंगावरील ओले कपडे बदलले. त्यानंतर एकवीस दिवसांनी तो व्यापारी मंदिरात आला आणि आपली अर्धी संपत्ति आणि एक हिरा त्याने देवीला अर्पण केला. तेव्हा सारी हकीकत सर्वांना समजली. तो हिरा अद्याप देवीच्या मुकुटाच्या कोंदणात आहे.

( शक्ति अंक २४, पृ. ६४८ ते ६५२. )

अंबाजीची मंदिरे अनेक ठिकाणी आहेत. त्यापैकी एक मंदिर सुरत येथे आहे. या देवीच्या नावामुळे तेथील एका रस्त्याला अंबाजी रस्ता हे नाव पडले आहे. एका भक्ताला स्वप्नात देवीने आदेश दिल्याप्रमाणे सुमारे ४०० वर्षांपूर्वी अहमदाबाद येथून ही मूर्ती आणली गेली. दोन घोडे आणि दोन सिंह जोडलेल्या रथावर देवीच्या मूर्तीची स्थापना केलेली आहे. त्यामुळे देवीचे स्वरूप काही आगळेच दिसते. ( कल्याण क्षेत्र अंक ५७।४४० )

भुजंगप्रयात

धरासूरीं अंबे तुझें पीठ मोठें । धरासूर मारावया जन्म तेथें ।
नसे देविमूर्ति असे यंत्रशक्ति । स्तनाचा दुजाभाग येथें गळेची ॥ १ ॥
दिसे शुभ्रसा पार्श्व तो भाग भाळीं । म्हणोनी वदे धौलही गावपाळीं ।
तपा आचरी रुक्मिणी घोर येथें । पती इच्छिला कृष्ण तो देवि देते ॥ २ ॥

द्रुतविलंबित

शिखर गव्हर तें जयलीं धमे । विकट घाट चढ़ियट होतसे ॥
चढति भक्त परी अति आदरें । नमन देवि तुला करि आदरें ॥ २ ॥

## ( ३ ) ओसाम माता

हे क्षेत्र सौराष्ट्रामध्ये गोंडलवन भागात आहे. महाभारतकाळी या वनाचा विस्तार २४ मैल होता, असा उल्लेख मिळतो. त्या वेळी त्याला हिडिंबवन हे नाव होते. महाभारतामधील पुढील कथाभाग सर्वविश्रुतच आहे की, पाच पांडवांपैकी भीमाने हिडिंबा राक्षसीबरोबर विवाह केला होता आणि त्याला घटोत्कच या नावाचा पुत्र होता. एकदा भीम या भागात फिरत असता त्याला असे समजले की, या भागात हिडिंब राक्षसाचा फार उपद्रव आहे. नंतर तो या देवीच्या दर्शनास आला आणि तिच्या कृपाप्रसादाने या राक्षसाला मारून तो त्याच्या बहिणीबरोबर विवाहबद्ध झाला.

परंतु शानकोश ( खंड २३।११ ) ग्रंथामध्ये या देवीसंबंधी थोडा निराळा वृत्तांत मिळतो. कौरवांनी पांडवांना लाक्षागृहात जाळण्याचा प्रयत्न केल्यावर ते तेथून भुयारमार्गे निसटले आणि गंगानदीच्या दक्षिण किनाऱ्यावर येऊन वनात वस्ती करून राहिले. त्या ठिकाणी एका वडाच्या वृक्षाखाली भीमाने हिडिंबासुराचा वध केला आणि हिडिंबा राक्षसणीबरोबर विवाह केला. त्यापुढे असे वर्णन आहे की, त्या राक्षसिणीने आपल्या पतीला उचलून घेतले आणि आकाशमार्गाने उडत एका सुंदर पर्वताच्या माथ्यावर जाऊन तेथे दोघांनी क्रीडा करून सुखोपभोग घेतला.

यावरून असे अनुमान करावयास हरकत नसावी की, हिडिंबेचे मूळ स्थान सौराष्ट्रात पण काही निमित्ताने ती गंगातीरी गेल्यामुळे भीमाबरोबर तिची गाठ पडली आणि नंतर त्याला घेऊन ती स्वगृही आली. नीट निरीक्षण करून पाहता हेच अधिक सयुक्तिक दिसते. कारण भीम एकटाच या प्रदेशात येण्याची शक्यता दिसत नाही. येथे कोणाला शंका येईल की, तेच हे स्थान कशावरून ? या प्रश्नाला उत्तर असे की, या वनात एका पर्वताच्या टोकाला हिडिंब टोक असे म्हणतात आणि या वनालाही हिडिंब वन हे नाव प्रचलित आहे. यावरून लेखकाचे असे मत झाले आहे; पण इतर ठिकाणच्या हिडिंबेच्या उल्लेखावरून हे निर्णायक मात्र मानू नये.

निशाणी दाखविण्यात येते. या शिळेजवळ एक लहानसर दगडी कुंड असून, संकटसमयी ग्रामदेवतेला बकरे बळी अर्पण केल्यावर, त्याचे रक्त या कुंडामध्ये टाकतात. दसरा आणि वसंतपंचमीच्या वेळी, कुलु गावात रघुनाथजींचे उत्सव होतात. त्या वेळी शंभर गावचे देव तेथे समारंभाला आणतात, पण ही ग्रामदेवता तेथे गेल्याविना उत्सवपूर्ती होत नाही.

भारताच्या उत्तरेला पठाणकोट हे शेवटचे रेल्वेस्थानक असून तेथून १७६ मैल अंतरावर कुलुनगर व तेथून पुढे २३ मैलांवर मनाली हे बारा हजार फूट उंचीचे निसर्गरम्य थंड हवेचे ठिकाण आहे. कुलुनगरातील रघुनाथजी उत्सवाचे वैशिष्ट्य असे की, तो दसऱ्यापासून सात दिवस पुढे चालू राहतो. शेवटच्या दिवशी राम-सीता मूर्ति रथामध्ये घालून गावभर मिरविल्यावर, बियास नदीच्या किनारी मिरवणूक विसर्जित होते. अश्वारूढ गुग्गादेवाचा पुतळाही प्रेक्षणीय आहे.

भारताचे लोकप्रिय दिवंगत पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू याच ठिकाणी विश्रांतीसाठी का जात असत, याचे कोणाला जर कुतुहल असेल, तर त्याचे उत्तर खालीलप्रमाणे आहे.

निसर्गरम्य हिमाचल प्रदेशांतर्गत बियास नदीच्या खोऱ्यातील सांप्रतचा कुलु-कांगडा भू-भाग हाच महाभारतकालीन त्रिगर्त देश होय. पंडुपुत्र अर्जुन राजसूययज्ञाच्या वेळी दिग्विजयाला गेला असता, कुलुताच्या राजाने त्याचा मार्ग रोखला, असे महाभारत सांगते. देवदारू वृक्षांचे घनदाट अरण्य, रोगनिवारक आणि उकळत्या पाण्यापेक्षाही अधिक उष्ण असे भू-गर्भातून वर उसळ्या मारणारे उष्णोदकाचे फवारे; अखिल मानवकुळाला पितृस्थानी असलेला पहिला प्रजापति मनु याचे मनुरिखीचे मंदिर; साठ फूट उंच दंड असलेले बिजली महादेवाचे शिवालय, की ज्यावर विद्युल्लतेचा आघात झाला असता, आतील शिवलिंगाचे तुकडे तुकडे होतात, आणि पुन्हा पुजाऱ्याला जुळणी करावी लागते; शिल्पकलेसाठी प्रसिद्ध असलेले विश्वेश्वर महादेवाचे मंदिर; प्रभु रामचंद्राचा अश्व-मेध यज्ञ पूर्ण झाल्यावर पार्थिव देहाचे विसर्जन करण्यासाठी राजगुरू वसिष्ठ ऋषींनी आरंभिलेली अंतिम तपश्चर्या आणि त्याच अवस्थेत रूपांतरित झालेली त्यांची पाषाणमूर्ति; प्राचीन भारतीय संस्कृति आणि अनुपम शिल्पकला यांचे दर्शन घडविणारी रघुनाथजी, श्रीकृष्णजी, त्रिमूर्ति दत्तात्रय आदि ३६५ मंदिरे यांनी 'देवतांचे खोरे' या सार्थ नावाने नटलेले, असे हे कुलुखोरे आहे. सर्व देवतांचे कुळ म्हणजे समुदाय या खोऱ्यात असल्याकारणानेच, कुलुखोरे हे नामा-भिधान प्राप्त झालेले असावे. (भारतीय संस्कृति कोश, २–४३३)

'प्रसादचिन्हानि पुरः फलानि' या उक्तीप्रमाणे, नजिकच्या भविष्यकाळात घडणाऱ्या घटनांचे मानसिक चित्रण अंतःपटलावर झाल्यामुळेच की काय, पंडित नेहरू हे मनःशांति आणि शरीरस्वास्थ्य यांसाठी वारंवार या देवतांच्या खोऱ्यांत मनाली आणि त्यांच्या परिसरातील गावी जात होते. या ठिकाणी प्रत्यक्षात् पाषाणमूर्ति स्वरूपात, पण तत्त्वतः वासना-देह धारण करून वायूरूपात संचारणाऱ्या दिवंगत विश्ववंद्य विभूतींच्या सान्निध्यात, उर्वरीत आयुष्याचा काही काळ व्यतीत करून अंतिम स्वर्गसुखाचा मार्ग सुलभ करून ठेवावा, हीच हृदयाच्या खोल दरीत दडलेली त्यांची सुप्त भावना येथे येण्यात प्रगट होते, असा तर्क केल्यास तो सुसंगतच ठरेल. 'महान् महतः जानाति' या उक्तीप्रमाणे प्राचीन विश्ववंद्य विभूतींत आपला समावेश व्हावा, यासाठी दिनांक २७-५-१९६४ रोजी पार्थिव देहाचे विसर्जन करण्याच्या काही काळ पूर्वी, हे देवतांचे खोरे विश्रांतीस्थान म्हणून निवडले असावे अशी लेखकाची श्रद्धा आहे.

दुसऱ्या एका दृष्टिकोनातून विचार केल्यास असे दिसेल की, पंडित मदनमोहन मालवीय आणि दीनदयाळ शास्त्री यांच्या अनुभवावरून, पं. जवाहरलाल हे पूर्वजन्मीचे एक तपस्वी होते. लोकांच्या आग्रहास्तव तपस्वी देह विसर्जित करून त्यांनी पं. मोतीलालच्या पोटी जन्म घेतला होता. तेव्हा अवतारकार्य संपल्यावर, पुन्हा पूर्वाश्रमीचा तपश्चर्येचा अर्धवट सोडलेला मार्ग अनुसरण्यास ते गेले असे अनुमान केल्यास, ते भारतीय परंपरेला धरूनच होईल.

प्रभुदत्त ब्रह्मचारी म्हणतात की, जवाहरलाल नास्तिक मुळीच नव्हते. कारण गळ्यात जानवे घालणे, स्नानानंतर बंद खोलीत अर्धा तास ध्यानमग्न होणे, गीता सदैव जवळ बाळगणे, वाढदिवसाच्या दिवशी जप तप, अनुष्ठान, संकल्प सोडणे, तुपामध्ये प्रतिबिंब पाहून ते ब्राह्मणाला दान करणे, आई-वडिलांसाठी तर्पण करणे हे त्यांचे नेहमीचे आचरण असे; पण त्यांच्या आचरणात बाह्य देखाव्या मान नव्हता.

ओसाम मातेचे मंदिर उंचावर असून सुमारे ८५० पायऱ्या चढून जाव्या लागतात. ही देवता पूर्वी एका लहानशा गुहेत होती. परंतु आता गुहेसमोर सुंदर मंदिर बांधलेले दिसते. सुमारे २५०-३०० वर्षांपूर्वी या मंदिराचा एका दानशूर गृहस्थाने जीर्णोद्धार केला होता, हे त्या वेळच्या शिलालेखा-वरून पाहावयास मिळते. या मंदिराच्या गाभाऱ्यात देवीची जी मूर्ति आहे तिला ओसाम माता हे नाव का मिळाले याचा उलगडा मात्र मला झालेला नाही. परंतु ओसमण म्हणजे उत्तेजन, जोरदार समर्थन अशा अर्थाचा शब्द गुजर

भाविक वापरतात. त्याचा या नावाबरोबर काही संबंध असावा. कदाचित् एखाद्या प्राचीन ऋषीने आपल्या उपासनेसाठी खडकाच्या गुहेत मूर्ति स्थापन केली असावी.

या मंदिराच्या बाजूला ३६×३६ चौरस फूट अशी एक पाण्याची टाकी आहे. या टाकीचे आश्चर्य असे की ती इतक्या उंचावर असूनहि त्यातील पाणी कधीच आटत नाही. ( कल्याण शक्ति अंक ३४।६६१ ).

शार्दूलविक्रीडित

सौराष्ट्रीं घनदाट गोंडलवनीं ओसाम तो डोंगर।
देवी ओसम नांदते गिरिशिरीं द्वापार कालावर ॥
राहीं दैत्य हिडिंब आणि भगिनी या घोर रानीं वनीं।
आहे ज्ञात-हिडिंब-टोंक-वनहि कीं सांप्रतीं या वनीं ॥ १ ॥
देवीचा वर घेउनी वधियला भीमें हिडिंबासुर।
मातृज्ञेस्तव राक्षसा भगिनीचा होई हिडिंबा-वर ॥
नांदे अक्षय वारिसंचय इथें विस्तीर्ण टांकीमधें।
त्या देवीप्रति मीं सदा नमितसे, भक्ता साहाय्यास ये ॥ २ ॥

( ४ ) कराळा

करालादेवी हे चंडीदेवीचेच एक नाव आहे. कराला या शब्दाचा अर्थ भयंकर, उग्र असा आहे. त्यामुळे ही देवता म्हणजे योद्धे वा वीरपुरुषांनी उपासना करावी अशी देवता, अशीच प्रतिष्ठा या देवीला प्राप्त झाली आहे. या देवीचे एक स्थान अरवली पर्वताच्या रांगेने वेष्टित अशा एका उंच पर्वतावर, चितोड गडाजवळ आहे. देवीचे मंदिर आणि सभामंडप संगमरवरी पाषाणाचा असून त्याचा विस्तार फार विस्तीर्ण आहे. गगनभेदी गोपुरे, सुवर्णाचे कळस हे या मंदिराचे वैशिष्ट्य सांगता येईल. मुख्य देवतेसमोर सभामंडपातच एक यज्ञ-कुंड असून नवरात्रातील उत्सवाच्या वेळी त्यामध्ये होमहवन केले जाते. रजपुतांच्या काही घराण्यांची ही कुलस्वामिनी असल्यामुळे युद्धाला निघण्यापूर्वी ते या देवतेचे दर्शन घेतात. तिचा आशीर्वाद घेऊन मगच ते रणांगणात पाऊल ठेवतात.

( ' इला सुंदरी ' लेखक न. न. पटवर्धन ).

शार्दूलविक्रीडित

आहे देवि चितोडच्या परीसरीं नामे कराला धरा ।
नांदे शुभ्र विशालशा अरवली वेष्टीत ती मंदिरा ॥
गोपूरे गगनास भेद करिती, आहे कुलस्वामिनी ।
वीराच्या रजपूत जाति समरा, गेल्या तिला वंदुनी ॥ १ ॥

## (५) कालिका (पावागड)

कालिका म्हणजे कालीदेवीचे स्वरूप होय. बडोदे शहरापासून ईशान्येस २९ मैलांवर पावागड हे समुद्रसपाटीपासून सुमारे २८३० फूट उचीवर असलेले क्षेत्र आहे. पूर्वकालीन चंपानेरचा किल्ला येथेच आहे, सध्या त्याचे भग्न अवशेष दिसतात. मुंबई सरकारने सन १८७९ साली जेव्हा जिल्हा माहितीपत्रके तयार केली त्या वेळी कैरा जिल्ह्याचेही माहितीपत्रक तयार केले आहे. त्यातील माहिती वाचनीय असल्यामुळे ती उद्धृत केली आहे, ती येणेप्रमाणे.

पावागड हे स्थान गोध्रा रेल्वेस्टेशनपासून ४० मैलांवर आहे. या टेकडीचा परीघ २६ मैलांचा असून तेथे सर्वत्र घनदाट जंगल आहे. या गडाला पावागड हे नाव पडण्याचे कारण असे समजते की, प्राचीन काळी या पर्वतावर विश्वामित्र ऋषी राहात असत. एकदा त्यांची नंदिनी नावाची गाय चरत असता एका मोठ्या खोल दरीत पडली. ते पाहून तिला आता वर कशी काढावी याचा ते विचार करू लागले. तेव्हा त्यांनी आपल्या सामर्थ्याच्या बळावर एक दुधाचा सागर त्या दरीत उत्पन्न केला. त्यामुळे ती खोल दरी भरून आली आणि दुधाच्या पातळीबरोबर ती गाय आपोआप वर आली. यानंतर पुन्हा असा प्रकार न व्हावा म्हणून विश्वामित्रांनी परमेश्वराची प्रार्थना केली. तेव्हा एक मोठी टेकडी त्या दरीत पडली आणि त्यामुळे दरीचा पाऊण भाग भरून आला, म्हणून या ठिकाणाला पावागड हे नाव मिळाले. या विधानाला पुष्टी देणारे दुसरे एक विधान संशोधक करतात. त्यांचे म्हणणे असे की, राम-रावण युद्धाच्या वेळी हनुमान द्रोणागिरी पर्वत घेऊन चालला असता त्याचा एक तुकडा खाली गळून पडला तोच हा पावागड होय.

या क्षेत्राचा ऐतिहासिक भागही उद्बोधक आहे. किती मजबूत किल्ल्याच्या अंतर्भागी देवीचे मंदिर होते तेही पाहण्यासारखे आहे. अनहिलवाड येथील भीमदेव (पहिला) याच्या वेळेपासून या स्थानाचा उल्लेख मिळतो (सन १०२२ ते १०७२). त्यानंतर ११०० च्या सुमारास रजपूत नराधाम

घराण्यांनी हा भाग ताब्यात घेतला त्यामध्ये पाटणचे घराणे पण मोडते. दिनांक १७ नोव्हेंबर १४८४ मध्ये गुजराथमधील प्रबळ मुसलमान बादशहा महंमद बेगडा याने तो ताब्यात घेतला. सन १७२७ साली कंताजी कदमबाडे याने तो मोंगलाकडून घेतला, आणि मराठेशाहीचा दरारा गुजराथभर बसविला. नंतर शिंदे घराण्याकडून त्याचा ताबा ब्रिटिशांकडे गेला.

या मंदिराचा ताबा मोंगल घराण्याकडे असताना या चंपानेरच्या किल्ल्यामध्ये वेळोवेळी तट, खंदक उभारून तो अतिशय मजबूत करण्यात आला. पावागडावरील या किल्ल्यालाच चंपानेर असे नाव आहे. चंपानेरपासून गाडीरस्त्याने मुख्य मंदिराकडे जाताना तीन मैलांपर्यंत चढण चालू होते. साधारणपणे दोन मैल गेल्यावर, डोंगराचा माथा लागतो. पूर्व दिशेने चढण चढू लागल्यावर प्रथम अटक दरवाजा लागतो. या ठिकाणी दगडाचा पहिला कोट आहे. अटक दरवाज्याच्या आतील बाजूस मेडी ऊर्फ हिन्ना राजवाडा आहे. नंतर अर्धा मैल चालून गेल्यावर मोहोती दरवाजा या ठिकाणी दुसरा कोट आहे. या दरवाजाच्या वाटेवर खडकातून आत जाण्यासाठी वाटा तयार केल्या आहेत आणि त्या प्रत्येकावर मजबूत चौक्या बसविलेल्या आहेत. बुधिया, भालापूल असे त्यांचे नाव आहे. यातून आत प्रवेश केल्यावर सुदन दरवाजाचा तिसरा कोट लागतो. या ठिकाणची प्रवेशद्वारे खडक फोडूनच तयार केली आहेत. यातून पुढे गेल्यावर उजव्या बाजूला तीनशे फूट अंतरावर दरीचा भाग लागतो या ठिकाणी सात महाल या नावाच्या इमारतीमधून दरीचे सौंदर्य पाहाता येते.

सहेनशहा दरवाजातून ३०० फुटाचा प्रवास केला म्हणजे आपण याच महालामध्ये पोहोचतो. ही इमारत लाकडाची असून येथे पोलिस ठाणे आहे. डाव्या बाजूच्या पाच विहिरी आणि उजव्या बाजूचा तेलिया तलाव यांमुळे तेथे पाण्याचा भरपूर साठा आहे. यांना पूरक असा अन्नपूर्णा तलावही येथेच आहे. थोडेसे पुढे गेल्यावर तेथे मकई कोठार दरवाजा आहे, आणि या ठिकाणी चौथा कोट आहे. त्यातून आत गेल्यावर पटई दरवाजा आणि नंतर भद्रकालीचे मंदिर आणि त्या मंदिरासमोरच मोती तलाव आहे.

मकई कोठार दरवाजापासून डाव्या हाताला चढणीचा भाग आहे. हा भाग आणि बालेकिल्ल्याचा भाग एका लाकडी पुलाने जोडलेला आहे. त्या ठिकाणी सूर्यगेट, तारागेट असून त्यातून आत गेल्यावर बालेकिल्ल्यात प्रवेश होतो. तेथे विश्वामित्र कुंडात स्नान केल्यावर मगच सर्वश्रमाचा परिहार करणाऱ्या कालिका देवीच्या मंदिरात प्रवेश होऊन विश्रांति मिळते.

येथील मंदिरात कालिकादेवीच्या तीन मूर्ति आहेत. मध्यभागी कालिका, उजवीकडे महाकाली आणि डावीकडे बहुचराजी अशा तीन मूर्ति आहेत. कालिका म्हणजे कालीचा अवतार हे जे विधान मी सुरुवातीला केले ते याच कारणामुळे केले. कारण साधारणतः महाकाली, महासरस्वती व महालक्ष्मी या तिघींचे त्रिकूट असते, आणि या ठिकाणी मात्र ते त्रिकूट नाही. तसेच महाकालीव्यतिरिक्त दुसरी कालिकादेवी म्हणजेच प्रतीक होय असे अनुमान निघते. दुसरी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे या ठिकाणी अनेक शतके मुसलमानी वर्चस्व असता चुकूनही या मंदिराचा एकदासुद्धा विध्वंस झालेला नाही. याबाबतचे कारण मोठे मजेदार आहे पहा! मंदिराच्या कळसावर एका दाढीवाल्या साधूची मूर्ति बसविलेली आहे. पण त्या साधूचे नाव मात्र सदनपीर असे आहे. नीट विचार केला तर लक्षात येते की, बहुधा मंदिराचा नाश न व्हावा म्हणून हिंदूंनीच ही मूर्ति बसविली असावी. पण मुसलमानी समाज म्हणतो की, आमचा फकीरच देवीच्या डोक्यावर बसलेला असल्यावर ते आता तोडण्याचे काही कारणच नाही. काही कारण असो वा नसो पण मंदिर आणि मूर्ति मात्र शाबूत आहे. (कैरा जिल्हा गॅझेट, पृ. १८८ ते १९१)

या ठिकाणचे विस्तृत वर्णन एवढ्यासाठीच केले की, उत्तम बांधणीचा किल्ला पूर्वकाळात कसा बांधीत आणि शत्रूला सर्व कोट फोडून बालेकिल्ल्यात शिरकाव करण्यासाठी केवढे अचाट साहस करावे लागे याची वाचकांना तिळमात्र कल्पना यावी. या ठिकाणी विश्वामित्राने तपश्चर्या केली आणि नंदिनी गाईला वर काढण्यासाठी जी खोल दरी त्याने दुधाने भरली त्यातून पुढे एका नदीचा उगम झाला म्हणून तिला विश्वामित्री नदी असे नामाभिधान मिळाले आहे. विश्वामित्राने देवीची स्थापना केली अशी समजूत आहे.

या देवीसंबंधीची एक अद्भुत कथा आता पहा. येथे आश्विन नवरात्रामध्ये देवीचा उत्सव समारंभ साजरा होत असताना एकदा देवी स्वतः स्त्रीवेषात गरबा नृत्य करावयास अवतरली. त्या वेळी चांपानेरचा राजा पतई जयसिंह उपस्थित होता. त्याने देवीला पाहिले. त्या मदनमंजिरीच्या अलौकिक व अनुपमेय लावण्याने त्याच्या मनात कामाग्नि प्रज्वलित झाला. नृत्य संपल्यावर आणि स्त्रियांनी गर्दी ओसरल्यावर त्याने त्या स्त्रीचा हात धरला. देवी म्हणाली, "मी प्रसन्न आहे. पाहिजे ते मागून घे." पण त्या मूढ कामांध राजाने या बोलण्याचा विपरीत अर्थ घेऊन तिच्याजवळ भोगाची इच्छा प्रदर्शित केली. 'विनाशकाले विपरीतबुद्धि' म्हणतात ते काही खोटे नाही. देवी भयंकर क्रोधायमान झाली आणि तिने त्याला शाप दिला की, "तुझ्या भविष्याचा आता [illegible] विनाश

होईल " तावडतोब देवी अदृश्य झाली नि मंदिरातून मेघगर्जनेसारखा आवाज निघू लागला सर्वत्र भीतीचे वातावरण पसरले या महाभयंकर निनादाच्या प्रतिध्वनींने सर्वच्या सर्व पहाडच जणू अकाळविक्राळ आक्रोश करीत आहे असे वाटू लागले देवीची मूर्ति खाली खाली खचू लागली या विनाशकाली मंदिराच्या पिछाडीस एक साधु महात्मा रहात होता त्याला हा प्रकार समजल्यावर देवी शांत व्हावी म्हणून त्याने देवीची प्रार्थना केली, " आई कालीमाते, जेवढा कोप झाला तेवढा पुरे आता शांत हो आणि पूर्वस्थळी, विराजमान हो " देवीने प्रार्थना ऐकली आणि तिचा जेवढा भाग खचला होता, तेवढ्यावरच ती स्थिर झाली अधिक खचली नाही हे स्थान याच कारणासाठी जाज्वल्य मानण्यात येते

देवीचा शाप खरा ठरला महमद बेगडयाने गडावर स्वारी केली तेव्हा जयसिंहाच्या पदरी असलेल्या जावोलोवो नावाच्या एका ब्राह्मणाने बातमी आणली की, गडाखाली मोंगल सैन्य चालून येत आहे राजाने हल्ला परतविण्याची शिकस्त केली, पण अखेर किल्ला पडलाच देवीचा शाप खरा ठरला यासाठीच मोरोपंत कवी म्हणतात, 'वरहि वरायास पाहिजे समज ' भाग्य आपल्या दारी कधी कधी चालून येते पण ते ओळखण्याचीही कुवत अंगी असावी लागते 'दैव देते नि कर्म नेते ' म्हणतात ना ते हे असे ! आपल्या फायद्याचा वर मागायलाही तेवढी अक्कल, तेवढी समज असावी लागते हेच खरे

पृथ्वी

महासदय कालिका प्रथित पीठ पावागडी ।
बडोद शहरासमीप गुजराथ चपानरी ।।
असी कठिण दुर्ग धाक बहु शत्रुवीरा वरा ।
पराजित करी तया परि महमद बेगडा ।। १ ।।
तपाचरणि विश्वामित्र उभवीत पावागडा ।
तया स्मरणि विश्वमित्री उगमास घेते गडा ।।
कुणी वदति अंजनी सुत वाहात द्रोणागिर ।
तुटोनी तुकडा गळे समयि होई पावागड ।। २ ।।
स्वयेंचि नवरात्रि देवी गरबा धरी एकदा ।
प्रमत्त जयसिंह वाञ्छित तिची मनीं संपदा ।।
वद त्वरित सर्वनाश तव राज्य जाई लया ।
तया मुदत षट् मास दिधली तुला मी पहा ।। ३ ।।

अदृश्य मग मंदिरीं त्वरित कालिका पावली।
पहाडिं रिघतांच मूर्ति प्रतिगर्जना जाहली॥
"क्षमा करि नृपास नांद सदये" महात्मा वदे।
म्हणोनि तर सांप्रती दिसत मूर्ति अर्धी वरें॥ ४॥

मंदाक्रांता

या तीर्थीची हळुं हळुं चढा पायरी, उंच मोठी।
तक्षा कुंडा आणिक दुधिया, तैल कुंडासि देखी॥
त्रैमूर्तीच्या सम वहुचरा, कालिका माहकाली।
पाही देवी सुखद नयनीं मस्तकां ठेवी पायीं॥ ५॥

( ६ ) कालिका ( कालीमठ )

कालिका नावाबद्दल थोडासा खुलासा आपण वरील वृत्तान्तामध्ये पाहिला. आता दुसरा एक उल्लेख पाहू. महाभारतामध्ये असा उल्लेख आढळतो की, कालिका ही दक्षप्रजापतीची कन्या आणि कश्यप ऋषींची पत्नी होय. विष्णुपुराण म्हणते की, कालिका व तिची बहीण पुलोमा या दोघींना कश्यपापासून ६०,००० दानव झाले. कालिकेपासून ज्यांची उत्पत्ति झाली ते कालकेय अथवा कालखंज दैत्य या नावाने प्रसिद्ध झाले आणि पुलोमापासून जे उत्पन्न झाले त्यांना पौलमा असे नाव मिळाले (डौसन, पृष्ठ १४० ) या दोघांचेही मूलस्थान इराण अगर त्याच्या आसपासच्या भागात होते आणि रावणाचे पूर्वजही त्याच भागात होते. पाश्चात्य जास्त संशोधन केल्यास इराणी लोकांचा देव असुर आणि आर्यांचे हे असुर यांचा संबंध काय हे प्रस्थापित करता येईल याच कालिकेला कोणी वैश्वानर दानवाची कन्या असेही मानतात, तर तिला मारीच असुराची पत्नी म्हणून ओळखतात. पण हे खरे वाटत नाही कारण कश्यपाचे दुसरे एक नाव मारिच ऋषी असे असल्याने ही कश्यपाचीच पत्नी होय मारीच नावामुळे हा घोटाळा झाला असावा ( चित्राव, प्राचीन चरित्र कोश, पृष्ठ ११७ )

कालिमठ हे पीठ हिमालयाच्या पर्वतराजीवर केदारनाथाच्या आसपास मंदाकिनी नदीच्या तीरावर आहे समुद्रसपाटीपासून सुमारे नऊ सहस्र फूट उंचावर भारतामधील हे प्रमुख शक्तिपीठ आहे येथील मंदिरात महाकाली, महालक्ष्मी व महासरस्वतीच्या मूर्ति असून देवालय सखल भागात आहे व ते बरेच विस्तीर्ण आहे. या ठिकाणी देवांनी तप करून महाकालिका प्रसन्न करून घेतल्यावर तिने रक्तबीज दैत्याचा नाश केला. येथे चैत्र व आश्विन नवरात्रामध्ये

याना भरते आणि यज्ञ कुंडामध्ये स पाद आहुतीने हवन केले जाते. रक्तबीज वधाच्या कारणामुळे या ठिकाणाला कालिमठ हे नाव आलेले आहे. या रक्तबीज वधाच्या प्रसंगी महाकाली उत्पन्न झाली आणि तिने दैत्याचा नाश कोणत्या प्रकाराने होईल हे सांगून देवाना मार्गदर्शन केले. तिच्यामुळे या ठिकाणाला कालीमठ हे नाव प्राप्त झाहे. महाकालीची मूर्ति शवारूढ आहे.

कालीमठापासून दोन मैलांवर कोटिमहेश्वरी देवीचे स्थान आहे. या ठिकाणी यात्रिक आपल्या पितराना पिंडदान व तर्पण करतात.

(कल्याण शक्ति अंक, पृष्ठ ६७४)

उपेंद्रजाती

मंदाकिनीच्या सरिता तटाला। निबीड रानीं गिरिं गव्हराला।
विख्यात कालीमठ क्षेत्र नांदे। विशालसे मंदिर दिव्य शोभे॥ १॥
मानीत मोठें जन शक्तिपीठ। म्हणोनि यात्री पदिं धांव घेत।
स्वीकार देवि प्रणिपात केला। सरस्वति, लक्ष्मी, कालिकेला॥ २॥

(७) कालिका (दिल्ली)

भारतीय युद्धाच्या प्रारंभी श्रीकृष्णाने प्रथम काली देवीची स्तुति करण्यास सांगितले. कारण शत्रूचा नि पात करणे हा कालीदेवीचा प्रमुख गुणधर्म आहे. अर्जुनाने कालीदेवीची स्तुति केल्यावर ती प्रसन्न झाली आणि 'विजय मिळो' असा तिने त्याला आशीर्वाद दिला पुढे युद्धात पांडव विजयी झाल्यावर ज्या ठिकाणी त्यांना देवी प्रसन्न झाली त्याच ठिकाणावर त्यानी कालिका देवीचे मंदिर बांधले. सांप्रत दिल्ली शहराच्या उत्तरेस आठ मैलावर जे कालिकेचे मंदिर आहे, ते हेच ठिकाण होय, असे समजले जाते. गाभाऱ्यात देवीची साकार मूर्ति विराजमान आहे. देवीच्या रक्षणासाठी म्हणून दोन सुंदर हत्ती दरवाजावर कोरलेले आहेत. तुपाचा नंदादीप तेथे अखंड तेवत असतो

(शक्ति अंक ३४ । ६६१)

मालिनी

बहुत समय पूर्वी भारतीं युद्ध झालें।
स्तवन करुनि पार्थे कालिके आळविलें॥
उचित वर यशाचा घेउनीया शिरातें।
समरिं घुसत योद्धा, युद्ध जिंकावयातें॥

समरि विजय प्राप्ती पांडवांना मिळाली।
उचित गमत त्यांना कालिका देवी वाली ॥
स्मृतीस तई उभारी, मंदिरा इंद्रप्रस्था।
पदकमळ तियेचें वंदितों दोन्ही हस्ता ॥ २ ॥

( ८ ) कालिका ( पूर्णगिरि )

नैनिताल पीलभीत लोहमार्गावरील टणकपूर रेल्वे स्टेशनापासून सुमारे १८ मैलांवर देवीचे हे प्राचीन पीठ सुमारे ८०० फूट उंचावर आहे. शारदा नदीच्या तटावर आणि नेपाळच्या सीमेवर पूर्णगिरि नामक पर्वत असून तोच या देवीचे स्थान मानला जातो. कोणी तरी एका भक्ताने मंदिरापर्यंत जाण्यासाठी ओबडधोबड पायऱ्या खडकात खोदलेल्या आहेत. परंतु त्या अतिशय धोकादायक असल्याने त्या चढताना बाजूलाच बांधलेल्या लोखंडी साखळीचा आधार म्हणून उपयोग करावा लागतो. या क्षेत्रातील वृक्ष सहसा तोडत नाहीत. कारण नवीन वृक्ष फारच क्वचित उगवतात. पर्वतामाथ्यावर एकही वृक्ष अगर झाडझुडप नाही. त्यामुळे हा प्रदेश रुक्ष भासतो. आणि एकाद्या मानवाला येथे वस्ती करून रहाणे धोकादायक वाटते.

या देवतेचे अधिष्ठान एका चबुतऱ्यावर असून त्यावर लहानशा तांदळा-स्वरूपात देवीचे पूजन होते या ठिकाणी देवीची मूर्ति नाही. जवळच एका झाडाची जुनीपुराणी फांदी वाकवून तिला एक धागा बांधलेली आहे. ही पूजेच्या वेळी वाजवितात. प्रवाशांच्या सोयीसाठी तेथे एक लहानशी विहीर आहे. तिचे वैशिष्ट्य असे सांगतात की, या विहिरीतील पाण्यात जर कोणी अमंगल अथवा अपवित्र वस्तु टाकली तर प्रवाह त्वरित बंद होतो आणि तो शुद्ध केल्याशिवाय चालू होत नाही. तसेच रजस्वला किंवा ओंगळ माणूस देवस्थाना-पर्यंत पोहोचू शकत नाही. मध्येच काहीतरी अडचण येऊन त्याला मागे फिरावेच लागते. पायऱ्या चढताना मार्गांत इतर लहानसहान मंदिरे आहेत. आद्य चार पीठापैकी हे एक शक्तिपीठ असल्याने याला फारच महत्त्व प्राप्त झाले आहे. बहुधा मूळपीठ झाकलेले असते, पण पुजाऱ्याला सांगितले म्हणजे तो ते उघडून दाखवितो.

( शक्ति अंक १९३४, पृष्ठ ६७३ )

ओवी

शक्तिपीठे भारतीं अनेक। त्यामाजीं चतुष्टय श्रेष्ठ ॥
पूर्णगिरी असे विशेष। पिलभीत परिसरीं ॥ १ ॥

निबिड वन घनदाट । शारदा नदीचा तट ।
चढा गडाची डोंगरवाट । लोहजंजीर धरुनिया ॥ २ ॥
उंच डोंगराचें माथीं । झाडें झुडुपें नच दिसती ।
नसे मानवाची वस्ती । देवालयही ना दिसे ॥ ३ ॥
उघड्या चबुतऱ्यावरी । कालिका तांदळ्या स्वरूपावरी ।
पुजारी देवीभेट करीं । दर्शनइच्छा दर्शवितां ॥ ४ ॥
परी मृत पुरातन वृक्ष । देखोनी आश्चर्य वाटत ।
भक्त घंटा वरी बांधित । शुष्क शाखेचिये शिरीं ॥ ५ ॥
शक्तिचें हें प्रधान पीठ । शक्तिपूजक देती भेट ।
भक्तिभावें वदन करीत । तेच देवी मीं वंदिनसे ॥ ६ ॥

कालिका ( अकोला )

अकोल्यापासून सुमारे ११ मैलावर बारसी टकली या नावाचे गाव आहे. त्या ठिकाणी हे प्राचीन स्थान आहे. येथील मंदिरात शके १०९८ चा संस्कृत भाषेत लिहिलेला शिलालेख आहे. त्यावरून असे म्हणावे लागेल की, हे मंदिर बरेच जुने आहे या ठिकाणी या मंदिराशिवाय आणखी ४ प्रेक्षणीय वास्तु असून त्यांतील दोन हेमाडपंती आहेत कालिका मंदिराचा गाभारा आणि सभागृह ही कलापूर्ण शिल्पाची असून घुमटाचा आकार ताराकृति आहे. मंदिर चौकोनी असून बाहेरील बाजूने गणपति, महाकाली, महिषासुरमर्दिनी यांची मंदिरे आहेत. एक प्राचीन स्थान म्हणून त्या भागात हे प्रसिद्ध आहे. ( अकोला जिल्हा गॅझेट, पृष्ठ ५३ ).

( ९ ) गिरनार अंबा

सौराष्ट्रमध्ये गिरनार पर्वतावर अंबा देवीचे स्थान आहे. त्यालाच गिरनार अंबा असे म्हणतात. या मंदिराची उंची समुद्रसपाटीपासून सुमारे तीन सहस्र फूट असून, सहा सहस्र पायऱ्या चढल्यावर देवीची भेट होते अंबादेवीची मूर्ति चतुर्भुज आणि विशाल असून त्या वन्य प्रदेशात आणि निसर्गराजीत ती फारच नयनमनोहर दिसते. गिरनार या प्रख्यात सिंहाचा मुक्कामही कधी कधी या ठिकाणी असतो. सतीचा उरोभाग या ठिकाणी पडला म्हणून याला शक्तिपीठ मानतात असे जरी असले तरी ५१ शक्तिपीठाच्या यादीमध्ये हे नाव नाही.

या क्षेत्राविषयी स्कंदपुराण प्रभास खंडामध्ये अशी कथा आहे की, शिव पार्वती कैलास पर्वतावर रहात असताना, सर्व प्रमुख देव त्या ठिकाणी

आले आणि शंकरांना म्हणाले, " तुम्ही दैत्यावर नेहमी कृपा करता, हे बरे नव्हे. त्यामुळे ते उन्मत्त होतात आणि सर्वांना शाही भगवान करून सोडतात." शिवाने शांतपणे उत्तर दिले " मी आशुतोष आहे. जो कोणी निष्ठाभावाने माझी भक्ति करतो, त्याला मी वरदान देतो, भेदाभेद करीत नाही, मग भक्ति करणारा देव असो अगर दैत्य असो. तुम्हाला माझी ही वर्तणूक जर मान्य नसेल, तर मी कैलास पर्वत सोडून जातो. " इतके बोलून थोडेसे रागानेच शंकर तेथून एकटेच निघाले, ते गिरनार पर्वतावर आले आणि गुप्तरूपाने राहू लागले. अंगावरील चर्मवस्त्रेही त्यांनी उतरून ठेवली.

काही काळाने शंकराचा शोध करीत पार्वती व इतर देव त्या ठिकाणी आले. त्यांनी शंकराची क्षमा मागितली आणि परत कैलास पर्वतावर येण्याची विनंती केली शंकर पार्वतीने अंशरूपाने त्या क्षेत्री राहण्याचे ठरविले, आणि मूळ स्वरूपे परत कैलासाकडे गेली. पार्वती अंबारूपाने ओळखली जाऊ लागली. शंकरांनी या ठिकाणी वस्त्रे उतरून ठेवली, यासाठी या क्षेत्राला वस्त्रपथ असेही म्हणतात या ठिकाणी एकूण २१ शिखरे आहेत असे म्हणतात. क्षेत्रीचे लोक या शिखरांना टुक नावाने संबोधितात.

गिरनार पर्वताचे महाभारतकालीन नाव उज्जयनपर्वत असून, रैवताचल हे एका शिखराचे नाव आहे, संपूर्ण पर्वताचे नव्हे पायथ्याजवळील वागेश्वरी दरवाज्याने देवालयाकडे प्रवेश करावा लागतो. आत गेल्यावर तेथे रामझरोका या नावाची धर्मशाळा आहे गवडी जमातीने बांधलेली दुसरी एक धर्मशाळा येथेच तिच्याशेजारी आहे. त्याला " सात वाव " म्हणतात जवळच एक तलाव आहे. त्याला वागेश्वरी तलाव म्हणतात या तलावाचे एक वैशिष्ट्य असे की, तलावातील पाण्याच्या मध्यभागी एक विहीर आहे. तलावातील पाणी आटले म्हणजे या विहिरीचा उपयोग करण्यात येतो. त्यामुळे पाण्याचा तुटवडा कधीही भासत नाही दुसरी एक व्यवस्था स्थापत्यदृष्ट्या अत्युत्तमच आहे पावसाळ्यात हा तलाव भरला म्हणजे यातील अधिक पाणी बाजूच्या दुसऱ्या दातार तलावात सोडण्याची व्यवस्था केली आहे. या तळ्यांनी वेढलेल्या प्रदेशात एका लहानशा टेकडीवर वागेश्वरी मंदिर आहे. अंबा देवालयाकडे जाण्याचा पुढचा मार्ग पलाशिनी नदीच्या पुलावरून आहे. असे सांगतात की, पूर्वी घोड्यांचा व्यापार करणारा व ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या नेहमी उपयोगी पडणारा सुदराजी शामजी याने हा पूल बांधला आहे. नदीच्या पैलतीरी २७९ × ५० चौरस फुटांचे दामोदर कुंड आपण पाहतो. या कुंडाला थोडासा प्राचीन इतिहास आहे. लहानपणी श्रीकृष्णाला यशोदेने गोळणींनी केलेल्या तक्रारीवरून उखळीला बांधून टाकले.

तेव्हा तो उखळीसह बाहेर पडला. पळता पळता त्या उखळीने मार्गात आडवे आलेले दोन अर्जुनवृक्ष पाडून टाकले. ते वृक्ष याच कुंडाच्या तीरावर होते. हे वृक्ष म्हणजे पूर्वीच्या कोणी शापभ्रष्ट देवता होत्या. त्या कृष्णस्पर्शाने पावन झाल्या आणि मुक्त होऊन निघून गेल्या. (ही कथा वास्तविक श्रीकृष्ण मथुरेमध्ये असताना घडलेली आहे. मग या ठिकाणी तिचा संबंध कसा आणला, याचा उलगडा झालेला नाही)

दामोदर या शब्दाची व्युत्पत्ती अशी आहे की, दाम म्हणजे दोरी आणि उदर म्हणजे पोट. म्हणजे ज्याच्या पोटाला दोरी बांधलेला आहे तो दामोदर. यामुळेच या तलावाचे पाणी अतिशय पवित्र मानतात. येथील कुंडात नाशिकाच्या रामकुंडाप्रमाणे अस्थि विरघळतात. या कुंडाच्या बाजूला बलरामाची पत्नी रेवती हिच्या नावाचे कुंड आहे. रेवतीचा विवाह झाल्यावर तिचे पितामह रैवताचलावर येऊन राहिलेले होते.

ही रमणीय स्थाने पाहात पुढे चालत असताना सुदर्शन तलाव दिसतो तो कोणी बांधला याचा उल्लेख मिळत नाही, पण अशोक, रुद्रमन व स्कंदगुप्त राजांनी याची दुरुस्ती केल्याचा उल्लेख मिळतो. म्हणजेच त्याच्याही पूर्वीचा तो असला पाहिजे. या ठिकाणी एका अशोकस्तंभावर अशोक, रुद्रदमन यांची नावे आढळतात. सुवर्णरेखा उगमाचे हेच स्थान होय. येथून पुढे गेल्यावर अंबामातेच्या मंदिरात प्रवेश होतो.

कोणी कोणी असे मानतात की, या मंदिराच्या बांधणीवरून ते बाराव्या शतकातील म्हणजे जैन काळातील असावे. या देवीचे भक्त लांबवर पसरलेले असले तरी विवाह झाल्यावर नवदांपत्य या क्षेत्री प्रथम येते. मग वधूवराच्या वस्त्रांना गाठी मारून देवीचे पूजन करून तिची खणानारळाने ओटी भरतात.

एक शृंगावरी गोरक्षनाथ । दुसरें हिंगुळादेवी वसत ॥
तिसऱ्यावरी स्वयें अवधूत । विश्रांति घेत या स्थळां ॥ १ ॥
आद्यशंकराचार्य गिरनार पर्वती । श्रीगुरुदत्तात्रयासि आराधिती ॥
दत्तप्रसादें विजय विख्याती । स्वल्पवयांत लाधली ॥ २ ॥

(वामनबुवा)

अक्कलकोटनिवासी महाराज हे स्वतःला साक्षात् दत्तात्रयाचा अवतार मानीत असत. शके १७७५ मध्ये महाराजांनी येथे देवीचे दर्शन घेतले. तेव्हा ती त्यांना म्हणाली, " आजवर आपले हे मुख्य ठाणे सोडून कोठे गेला होता ! "

स्वामी म्हणाले, " लोककल्याणार्थ भूतलावर संचार करीत होतो. आता दर्शन झाले. वरदहस्त सदैव शिरी असावा."

आद्य शंकराचार्यांनी या ठिकाणी दत्तात्रयाची उपासना केली, असे वरील उल्लेखावरून दिसते.

(" अक्कलकोटनिवासी स्वामी चरित्र" ले. श्रीपादशास्त्री किंजवडेकर, पृ. १८६ )

या मंदिराच्या आसमंतात अनेक नामवंत शिखरे आहेत.

( १ ) ओघाड शंकर— हे एक प्रसिद्ध स्थान आहे.

( २ ) अश्वत्थामा टेकडी— या ठिकाणी तो चिरंजीवी अश्वत्थामा अद्यापही भेटू शकतो, अशी श्रद्धा आहे.

( ३ ) गुरु दत्तात्रय शिखर— या शिखराची उंची २७७९ फूट आहे. शिखरावर जमिअल शहा या नावाची ल्हानशी मूर्ति आहे. या शिखराच्या पायथ्याशी असलेल्या दत्तात्रय-मूर्तीच्या तीर्थाने कुष्ठरोगीही बरा होतो अशी भावना आहे.

( ४ ) गोरखनाथ माथा— याची उंची ३६६६ फूट आहे. गोरखनाथांनी या माथ्यावर समाधी घेतली असे म्हणतात.

( ५ ) गोमुखी— हनुमानधारा, कमंडलुकुंड व भैरवजप ही मुख्य ही स्थाने जैनधर्मीयांची क्षेत्रे आहेत. २१ वा जैन तीर्थंकर नेमिनाथ हा या भूमीला अतिशय पवित्र मानीत असे. या टेकड्यांच्या पायथ्याशी त्रेतायुगातील बळीस्थानची राजधानी वामनस्थळी ही सांप्रत मिलका या नावाने प्रसिद्ध आहे संशोधनाच्या दृष्टीने ही माहिती उपयुक्त ठरेल. भडोच शहर हेही पूर्वी बळीचे राजधानीचे शहर होते, असा उल्लेख मिळतो

वरील स्थानांव्यतिरिक्त जुनागडच्या परिसरात ( १ ) खासाकोडिया, ( २ ) उपरकोट, ( ३ ) बावा पीरचामठ, ( ४ ) वाकोटा, ( ५ ) शाश्रिया तिंबो, ( ६ ) धनेश्वर, ( ७ ) माश्री, ( ८ ) होपल, ( ९ ) पद्मिनी इत्यादि अनेक बुद्धविहार आढळून येतात. पुराणामध्ये या पर्वतराजीवर अनेक शिखरे असल्याचा उल्लेख मिळतो. पण तूर्त इतकीच माहिती उपलब्ध आहे. यादवकाली या क्षेत्राची फार उत्कृष्टावस्था असावी, हे वरील अवशेषावरून दिसून येईल.

( काठेवाड जिल्हा गॅझेट, ८।४४१-४४४ )

इंद्रवंशा

सौराष्ट्रदेशीं गिरनार काननीं । श्री अंबिका नांदतसे पुरातनीं ॥
दत्तात्रय, गोरखनाथ, कालिका । ओघाख शंकर आणिक देवता ॥ १ ॥
वागेश्वरी देवि असेचि पायथा । जेथोनि मार्गास चढाव वाढता ॥
वाटेंत गौमुख कमंडलू तळीं । मारोति दामोदर रेवती बरी ॥ २ ॥
होतां विवाह पति पत्नी भेटती । वस्त्रांस गांठी बसवोनि पूजिती ॥
देवी कुळाचार समस्त आचरी । माझा नमस्कार तिला असो तरी ॥३॥

## (१०) जननी देवी

तळवली ( जि. कुलाबा ) गावाजवळ सह्याद्रि पर्वताची एक उच रांग आहे. त्यावरील दिसे या भागात सुमारे १७०० फूट उचीवर या देवीचे स्थान आहे. या देवीप्रत जाण्यासाठी पायऱ्या बांधून काढलेल्या आहेत. हा भाग वृक्षराजींने वेष्टित असल्याने मंदिराकडे जाताना मनोहर सृष्टिशोभा आपल्या नजरेस पडते. या पर्वतमाथ्यावर गेल्यावर आपला मंदिरात प्रवेश घडतो. हे मंदिर कोणी बांधले याचा इतिहास मिळत नाही. परंतु उत्तर कोकणात जेव्हा शिलाहार राजसत्ता होती त्या काळचे म्हणजे जवळजवळ अकराव्या शतकातील ते असावे. या देवीचे भक्त प्रामुख्याने दिघे, दीक्षित, देशपांडे, टिपणीस या आडनावाचे आणि कायस्थ प्रभु ज्ञातीतील आहेत. ही कायस्थांची वस्ती त्या काळातील कुलाबा जिल्ह्यातील आहे. ओघाओघाने कायस्थ ही मंडळी कोण हे पाहणे वावगे ठरणार नाही.

पांचाळ, देवरु, दोदेल, मोढ, दशामोढ, पातेणा इत्यादी शाखी आणल्या. तसेच त्याने पैठणहून प्राची, नैदिक, पंडित, आचार्य, उपाध्ये यांची घराणी आणून त्यांना वृत्ति देऊन स्थायिक केले. पातेणा शाखेला त्याने वसुली करण्याचे काम दिले. या प्रतापबिंबाची सत्ता आजच्या मुंबई ते वेळगे माहीम एवढ्या परिसरात होती. तेव्हा साहजिकच या भागात पाठारे ज्ञातीची वस्ती झाली

'काय' याचा अर्थ गावची सरकारी वसुली व स्ती करणारा इसम तो कायस्थ होय. यावरून पुढे कायस्थ हा एक जातीवाचक शब्द बनला. साधारणत तो गावचा प्रमुख असल्याने त्याने प्रभू हे नाव रूढ झाले. शिलाहाराच्या वेळी हे कुलाबा भागात गावची वसुली करीत असत. शिलाहारांचा शेवटचा राजा सोमेश्वर (शके ११७१ ते ११८?) हा होता. सोम म्हणजेच चंद्र. सोमेश्वराचे आश्रित म्हणून चांद्रसेनीय हे उपपद या भागातील कायस्थांनी आपल्या नावामागे जोडले, आणि 'ठाणे जिल्ह्यातील पातेण्या प्रभूहून आम्ही निराळे आहोत' असा भाव व्यक्त केला यामुळे कुलाबा जिल्ह्यात चांद्रसेनीय कायस्थांची वस्ती जास्त आहे त्यांची वतने त्याच भागात आहेत तेव्हा साहजिकच दर्शन पूजेसाठी त्यांनी हे जननी देवीचे क्षेत्र निर्माण केले असावे असे अनुमान निघते. बंगाल, ओरिसा, उत्तर प्रदेशातील कायस्थ हे या जमातीहून निराळे आहेत, एकच नव्हेत.

आदिशक्तीच्या अनेक नावापैकी जनी हे एक नाव आहे. या जनीचा अपभ्रंश जननी असा झालेला असावा. या देवीचे स्वरूप अष्टभुजा असून बाजूला केदारनाथ व पद्मादेवी यांच्या मूर्ति आहेत, यामुळेच काही वेळा हिला केदार जननी या नावाने संबोधितात. माघी पौर्णिमेला या देवीची वार्षिक यात्रा भरते. लांबवर पसरलेले तिचे भक्त त्या वेळी तिथे एकत्र जमतात हा उत्सवसमारंभ केदार जननी उत्सव मंडळातर्फे (हिंदू कॉलनी, दादर, मुंबई १४) केला जातो हे देवस्थान जागृत असल्याचा प्रत्यय आजलागायत अनेकांना आलेला आहे या देवीला जनी, जनाई या नावानेही संबोधिले जाते. या क्षेत्राचा जीर्णोद्धार वरील मंडळातर्फे चालू असून धर्मशाळा, पाण्याच्या टाक्या यांचीही सोय आयोजित आहे.

शुद्ध कामदा

जननी देवते वास तव निका । सह्य पर्वती तव्हळी शिखा ।
चांद्रसेनिया वंशजाप्रती । तूच स्वामिनी हो कुलाप्रती ॥ १ ॥
अष्ट बाहुचें सगुण रूप हें । आदिशक्तीचें जननी रूप हे ।
केदार जननीही वदति कुणि तुला । हात जोडुनि वंदितो तुला ॥२॥

## ( ११ ) नयनादेवी

नैनिताल हे उत्तर प्रदेशातील थंड हवेचे एक प्रसिद्ध ठिकाण आहे, समुद्रसपाटीपासून या क्षेत्राची उंची ६३५० फूट आहे. इतक्या उंचीवर या ठिकाणी एक भव्य सरोवर आहे. त्याची लांबी, रुंदी १५६७×५०६ चौ फूट व खोली ९५ फूट इतकी आहे. या गावची वस्ती या सरोवराच्या तीरावर असल्याने या निसर्गरम्य ठिकाणी वातावरण फार आनंददायक वाटते. निसर्गाची शोभा आणि थंड हवा! समसमा संयोगच!! अर्थातच हे थंड हवेचे ठिकाण बनले यात काही नवल नाही स्कंद पुराणात या सरोवराचा उल्लेख मिळतो, त्या काळी त्याचे नाव तिरखी अथवा त्रिष्येश्वर असे आढळून येते. प्राचीन काळी या ठिकाणी अत्रि, पुलस्त व पुलह ऋषि राहत होते या तीन ऋषींच्या वास्तव्यामुळेच या सरोवराला त्रिष्येश्वर नाव प्राप्त झाले होते

ज्या अर्थी हे स्थान व सरोवर इतके प्राचीन आहे, त्या अर्थी नयना देवीचे स्थानही तितकेच प्राचीन असले पाहिजे कदाचित ते वरील तीन ऋषींच्या काळातीलही असावे सन १८८० मध्ये भूकंपाच्या धक्क्याने पूर्वीचे मंदिर उध्वस्त झाले, म्हणून सध्याच्या स्थानी तिची पुन्हा स्थापना केली गेली. देवीच्या नावावरुन गावाचे नाव नैनिताल असे पडले असावे पार्वतीचे नयन येथील सरोवरामध्ये पडले, म्हणून नयना–देवी हे नाव तिच्या स्मरणार्थ स्थापलेल्या देवीला मिळाले. ( नैनिताल जिल्हा गॅझेट )

भाक्रा-नान्गलपासून ३२ मैलांवर एका पर्वतावर या देवीचे दुसरे एक सिद्धपीठ आहे. या ठिकाणी श्रावण शुद्धपक्षात पहिले नऊ दिवस वार्षिक यात्रा भरते. ( कल्याण क्षेत्र अंक १९५७, पृष्ठ ६७ )

मालिनी

मनहर नयना ही देवता नैनितालीं।
जलसमुह तटाकीं मंदिरीं स्थापियेली॥
शिखर जइ दुभागे, गाडिलें मंदिरातें।
म्हणुनि जन अताही वंदितातीं नव्यातें॥ १॥

## ( १२ ) नंदादेवी

या देवीबद्दलची एक प्राचीन आख्यायिका प्रसिद्ध आहे ती आपण आता पाहू

त्वष्ट्याचा एक पुत्र इंद्राने काही वैमनस्यामुळे ठार केला त्याचा पुनर्जन्म झाल्यावर, तो दुसऱ्या जन्मात पुढे सिंधुद्वीप या नावाचा राजा झाला. पूर्वजन्मीची

आचरण त्याला चांगले असल्याने त्याने इंद्राचा सूड उगविण्याचा निश्चय केला. आपली शक्ति वाढावी आणि इंद्राशी आपल्याला बरोबरी करता यावी यासाठी त्याने तपश्चर्या सुरू केली. त्यावेळी वेत्रवती नदीने स्त्रीरूपाने त्याची सेवा केली. परंतु त्याचा परिणाम मात्र ती गर्भवती राहून वेत्रासुराचा जन्म होण्यात झाला. या वेत्रासुराने आसाम भागातील प्राग्ज्योतिषपूर या ठिकाणी आपले राज्य स्थापन केले, आणि आपल्या सामर्थ्याच्या जोरावर तो इंद्रालाही त्रास देऊ लागला. शेवटी या दैत्याच्या त्रासाला कंटाळून सर्व देव ब्रह्मदेवाकडे गेले आणि त्यांनी त्याला वेत्रासुराचा नाश करण्याची विनंती केली.

ब्रह्मदेवांनी अंतर्ज्ञानाने जाणले की, ही सर्व विष्णूची माया आहे. ब्रह्मदेवांनी एका अप्सरेला बोलावून तिला देवीरूप सजविले. तिच्या मस्तकावर मुकुट आणि आठ हातांमध्ये शंख, चक्र, गदा, पाश, खड्ग, घंटा, धनुष्य व बाण ही आयुधे देऊन त्यांनी तिला पृथ्वीवर वेत्रासुराच्या नाशार्थ पाठविले. ती त्याप्रमाणे भूतलावर अवतरल्यानंतर तिने आपल्या मदतीसाठी अनेक अप्सरा उत्पन्न केल्या. त्या सर्वांनी वेत्रासुराचा नाश केला. कार्य संपल्यावर देवीसह सर्व अप्सरा अंतर्धान पावल्या.

राक्षसाचा नाश नाहीसा झाल्यावर देव सुद्धा आपल्या निवासस्थानी म्हणजे हिमालय पर्वतावर आले. आनंदोत्सव साजरा करण्यासाठी त्यांनी आपल्या उपकारकर्तीची मूर्ति स्थापन केली, आणि देवांना आनंद देणारी म्हणून नंदादेवी असे तिचे नाव ठेवले. हिमालयाच्या एका शिखराचे नावही नंदादेवी असे आहे. (वराह पुराण)

विष्णुधर्मोत्तर पुराणाप्रमाणे देवी भारद्वाज ऋषींच्या इच्छेनुसार जन्म पावली, असे मानतात. भारद्वाज ऋषि हे विमानविद्येत पारंगत होते आणि विमानाची यंत्ररचना कशी असावी याबद्दल त्यांनी सहास्रो श्लोक लिहिले होते. ते त्यांचा अमूल्य आणि अनुपयोगी संग्रह नुकताच उपलब्ध झालेला आहे.

ही देवी चतुर्भुजा आहे. ती गजवाहना, शुभ्रवर्णी असून तिच्या चार हातांपैकी एक हात अभय, दुसरा वरद, तिसरा खड्गयुक्त आणि चवथा अंकुश धारा अथवा खेटक धारण करणारा आहे. (टी. गोपिनाथ राव, पृष्ठ ३८६)

## (१३) भीमेश्वरी (जिल्हा पुणे)

खेड (जि. पुणे) तालुक्यात जी पश्चिम बाजूला सह्याद्री पर्वताची रांग आहे, त्यावर सुमारे २०१० फूट उंचीवर हे ठिकाण आहे. पुणे-जुन्नर मार्गा- वरून आणि आळेगाव पेठेवरून या ठिकाणापर्यंत मोटरमार्गाने जाता येते. देवीभागवतामध्ये देवीची जी १०८ शक्तिस्थाने वर्णिली आहेत, त्यांपैकी हे एक

आहे. त्याचप्रमाणे शंकराची जी बारा ज्योतिर्लिंगे आहेत त्यांपैकी एक याच क्षेत्री आहे. पाच-सहा देवपूजक व महादेव कोळी यांची थोडी वस्ती येथे आहे.

वास्तविक या ठिकाणी शंकराची दोन मंदिरे आहेत. त्यांपैकी एक पडीक आहे. दुसऱ्या मंदिराचा जीर्णोद्धार सन १८०० च्या सुमारास नाना फडणविसांची पत्नी जिऊबाई हिने केला होता. हे मंदिर काळ्या पाषाणाचे असून मंदिराचा कळस नॉमॅन बांधणीचा आहे. शंकराचा मुखवटा पाचमुखी आहे व मूर्तीच्या समोर मोठा नंदी आहे.

या मंदिरात एक भलीमोठी व जाडजूड पाऊण हंड्रेडवेटची घंटा टांगलेली आहे. या घंटेवर मेरीची आकृति व सन १७२९ ही अक्षरे कोरलेली आहेत. कोणी कोणी असे सांगतात की, चिमाजीअप्पाने वसईच्या किल्ल्यातून वसईच्या लढ्यात ज्या अनेक वस्तू आणल्या, त्यांपैकी ही घंटा आहे. कोणी असेही म्हणतात की, बासिंद ( ठाणे ) येथील चर्चमधून ती आणली आहे.

या स्थानाबद्दलची कथा अशी. एकदा त्रिपुरासुराबरोबर युद्ध करून शंकरांना थकवा आला असता ते या ठिकाणी विश्रांतीसाठी आले. त्या वेळी या ठिकाणी औंधचा राजा भीमक हा, त्याने स्वतः केलेल्या मृगहत्येच्या पापातून मुक्त होण्यासाठी तपश्चर्या करीत बसला होता. त्याने शंकराचीच आराधना चालविली होती. त्याच्या तपश्चर्येला अखेर फळ आले. शंकर प्रसन्न झाले. भीमकाने त्यांच्याजवळ वर मागितला की, "तुमच्या अंगाच्या घामापासून या ठिकाणी नदी उत्पन्न व्हावी आणि त्या नदीत स्नान केल्यावर माझ्या सर्व पातकांचा नाश व्हावा." शंकरांनी तथास्तु म्हटले आणि त्याच्या इच्छेप्रमाणे तेथे नदी उत्पन्न केली. तिचे नाव भीमा असे पडले. या नदीचा उगम जेथून होतो त्याच ठिकाणी भीमेश्वरी देवीचे मंदिर बांधण्यात आले. ही पार्वतीस्वरूप चतुर्भुजा देवी आहे. मूळ शंकर मंदिराच्या वरील बाजूस एका दरीमध्ये एक पुरुषभर उंचीचे पाषाणाचे कुंड आहे. त्यामधून नदीचा उगम होतो आणि नंतर गुप्तमार्गे गावतीर्थात येते व पुढे प्रवाह चालू होतो. जेथे प्रवाह चालू होतो, त्या क्षेत्राला गुप्तभीमाशंकर नावाने संबोधिले जाते.

( पुणे जिल्हा गॅझेट, पृष्ठ ११९ )

रुक्मिणी

भीमानदी पुनितही सह्य पर्वताच्या ।<br>
शिखरावर उपजत भीम शंकराच्या ॥<br>
पुरातनीं प्रचलित पीठ भीमदेवी ।<br>
तिचे पदीं अविरत वंदना असावी ॥ १ ॥

भीमाशंकर मूर्तीची स्थापना चौदाव्या शतकात झाली असे सांगितले जाते. त्या काळी एक लाकूडतोड्या या ठिकाणी लाकडे तोडीत असता एका झाडाच्या बोडावर कुऱ्हाडीचा घाव बसल्याबरोबर त्यातून रक्ताच्या धारा लागल्या. दुधाचा अभिषेक केल्यास देवी प्रकट येणार नाही असे, कोणी त्याला सांगितल्यावरून त्याने एक गाय आणून तिच्या धारांनी अभिषेक केला. आश्चर्य असे की, रक्तधारा बंद झाल्या आणि काही वेळाने त्या वृक्षबुडापासून एक स्वयंभू शिवलिंग बाहेर आले. त्या लाकूडतोड्याने छायेसाठी लहानसे मंदिर उभारले आणि पुढे त्याचा जीर्णोद्धार झाला यावरून असे दिसते की भीमेश्वरी देवीचे स्थान हे प्राचीन असून शंकराचे स्थान मागाहून स्थापन झालेले असावे.

शंकराची जी बारा ज्योतिर्लिंगे आहेत त्यामध्ये ‘ डाकिन्या भीमशंकरम् ’ असे या श्लोकात म्हटले आहे. या ठिकाणी डाकिनी या शब्दाचा अर्थ डाग प्रदेश असा कोणी घेतात. कदाचित त्या वेळी डाग प्रदेशाची सरहद्द या क्षेत्रापर्यंत असावी एरव्ही ‘ डाकिनी ’ या पदाचा अर्थ स्पष्ट होत नाही.

# दशमहा विद्याशक्ति विवरण

चालू युग वैज्ञानिक-युग म्हणून समजले जाते. तेव्हा आर्यांच्या तत्त्वज्ञानाचा विचार करणे झाल्यास, अगर त्यासंबंधी काही सांगणे झाल्यास, ते वैज्ञानिक दृष्टिकोणातून सांगितले तर अंधश्रद्धा असलेल्या भक्तांना तर ते पटेलच, परंतु आधुनिक विचाराच्या सुशिक्षित वर्गासही त्याचे महत्त्व पटेल, असे वाटते. प्राचीन काळी आपल्या ऋषिमहर्षींनी काही सिद्धांत म्हणून जगापुढे मांडलले आहेत. हे सुज्ञांना आजही तावडतोब पटते. ज्यांना आपण आज संशोधक म्हणतो ते सी. व्ही. रामन, बोस, आईन्स्टाईन जयंत नारळीकर इ० इ० हे आधुनिक काळातील ऋषीच होत. सूर्यग्रहमालेचा संपूर्ण अभ्यास करून सिद्धांत मांडणारे अश्वलायन ऋषि, ज्योतिषशास्त्राचा अभ्यास करून एक लक्ष जन्म कुंडल्यांचा साधकबाधक विचार करणारे भृगु ऋषि, अथवा काळपुरुषाच्या महाविश्वाचे संशोधन करून सिद्धांत मांडणारे गर्ग ऋषि हे आपल्या वनातील आश्रमातून संशोधनच करीत नव्हते काय ! अशी अनेक उदाहरणे देता येतील. दशमहाविद्यातत्त्व समजण्यास वरील संशोधनाची माहिती उपयुक्त होण्यासारखी आहे. तेव्हा त्यासंबंधी काही शब्द व त्यांची निदाने पहाणे आवश्यकच आहे.

## महाविश्वरचना

गार्गायण ऋषि असे प्रतिपादन करतात की, भूतलाला प्रकाश देणारा सूर्य व त्याचे सात-आठ उपग्रह मिळून एक ब्रह्मांड तयार होते. अशी सात ब्रह्मांडे मिळून एक 'जगत्' तयार होते. अशा एक सहस्र जगताचे एक 'विश्व' तयार होते आणि शेवटी अशी दीडकोटी विश्वे एकत्रित झाली म्हणजे त्याला 'महाविश्व' असे म्हणतात. तसेच याहीपुढे २ शंकु महाविश्वे म्हणजे १ लोक, १ शकु लोक म्हणजे १ महालोक आणि १०० पद्ममहालोक म्हणजे १ जग (अतिविश्व) असे त्यांचे कोष्टक आहे.

'या पृथ्वीवरच सर्व काही आहे. त्याच्या पलीकडे काहीच नाही' इतकी आर्यांची संकुचित दृष्टि केव्हाही नव्हती. त्यांच्या संशोधनाची व ज्ञानाची झेप अनंत कोटी ब्रह्मांडापर्यंत कशी पोहोचली होती आणि विश्वविजयाची अंतिम व दुर्दम्य मनीषा त्यांनी कशी सिद्धीस नेली हे वरील सिद्धांतावरून वाचकांच्या ध्यानी आले असेलच. वैज्ञानिक काळातील आजचे संशोधक आता कोठे पृथ्वीपासून दूर जाऊ लागले आहेत. अंतरिक्षाचा पाच-पंचवीस मैलांचा अथवा काही शतक मैलांचा भेद करू लागले आहेत. मंगळ, चंद्रावर जाण्याची भाषा बोलू

लागले आहेत. पण तेथे गेल्यावर प्राणधारणा कशी करावी यातील गूढार्थ शोधण्यासाठी त्यांनी भारतीय योगशास्त्राचा अभ्यास चालू केला आहे. कारण त्याशिवाय पद्यांशाने अंतराळातून सदेह भ्रमण करता यायचे नाही, अशी त्याची दृढ खात्री होऊन चुकलेली आहे. रॉकेट सोडून त्यामध्ये मानव काही तास पृथ्वीप्रदक्षिणाही करू लागलेला आहे; अंतराळामध्ये रॉकेटच्या बाहेर पडून अनुभव घेत आहे; इतकेच नव्हे तर महगोल चंद्रावर पाठवून तेथील छायाचित्रेही येऊ लागली आहेत, तरी अद्याप पुष्कळच अपुरेपणा त्यांना जाणवत आहे. परंतु आपल्याला आश्चर्य वाटेल की, या सर्व गोष्टी आर्यांनी पूर्वीच अनेक सहस्र वर्षांपूर्वीच अनुभवलेल्या होत्या. व्यास-पुत्र शुक अथवा हनुमान सदेह वायुरूपाने अंतरिक्षामध्ये भ्रमण करीत असत. एकोणिसाव्या शतकातही सांत्रिक विद्यापारंगत, खेचरी मुद्रेच्या सहाय्याने आकाशमार्गे सदेह जात असत.

महाविश्वाची चौदा भुवने आर्यांनी वर्णिली आहेत. त्यांपैकी सप्त पाताळलोक सोडले तर अंतरिक्षामध्ये सात भुवने आहेत. त्या प्रत्येकाला त्यांनी नावे दिली आहेत आणि त्या दोहोंमधील अंतर दिले आहे. याप्रमाणे त्यांनी अंतरिक्षाचा अनंत ब्रह्मांडापर्यंत छेद केलेला आहे. कसा तो पहा.

ॐ भूर्भुवः स्वः महः जनः तपः सत्यं ।

( १ ) भूलोक—मानवप्राणी राहात असलेली सृष्टि.

( २ ) भुवर्लोक—सिद्धचारण, गंधर्व राहातात ती सृष्टि.

( ३ ) स्वर्लोक—देवांचे वसतिस्थान-भुवर्लोक-यापासून ८०,००० योजनेवर असलेली सृष्टि.

( ४ ) महर्लोक—स्वर्लोकाच्या वर एक कोटी योजने असलेली सृष्टि.

( ५ ) जनलोक—महर्लोकाच्या वर दोन कोटी योजने असलेली सृष्टि.

( ६ ) तपलोक—जनलोकाच्या साडेतीन कोटी योजनेवर असलेली सृष्टि.

( ७ ) सत्यलोक—तपलोकाच्या २१ कोटी ३६ लक्ष योजनेवर असलेली सृष्टि.

याच्यापुढे ॐ रूपी उमामहेश्वर, लक्ष्मीनारायण यांचे शाश्वत निवासस्थान इत्यादि सृष्टि आहेत. यावरून आपल्याला दिसून येईल की, आर्यांनी आपल्या प्रतिभासंपन्न शांत दृष्टीच्या प्रज्ञेच्या जोरावर अवकाशाचा किती खोलवर भेद केलेला होता.

परंतु याच समुज्ज्वल पार्श्वभूमीवर पाश्चात्य संशोधक आईन्स्टाईन याने जो विश्वाचा वेध घेण्याचा प्रयत्न केला त्याचे वर्णन लेखकाने खालीलप्रमाणे केले आहे.

पृथ्वि फिरते आपुल्याभोंवतीं ताशीं सहस्र मैल।
सूर्याभोंवती फिरते ताशीं मास सहस्र मैल ॥ १ ॥
सूर्य धांवतो, नवग्रहांसह तारामंडळी कक्षा।
चार सहस्रे-सहा शतकें वेगा धरुनि दक्षा ॥ २ ॥
तेही जाई सप्तमहर्षीं, आकाशींच्या गंगा।
तोंधि वेगही घेऊनि गंगा, जात गॅलक्सी पुंजा ॥ ३ ॥
पुढे थांबते पश्चात्पर्वी ही, पुढें त्यांसि ना कळतें।
सूज्ञ शेवटीं निर्णयीं येई, एक नियंता यातें ॥ ४ ॥

वरील विवरणावरून एवढे ध्यानी येईल की, आधुनिक काळात, आधुनिक सामुग्रीने सुसज्ज असलेल्या संशोधकालाही गार्गायण ऋषींच्या प्रज्ञेची झेप घेता आलेली नाही. याच्याठी या संशोधकांना अजून बरीच मजल मारावयाची आहे. प्रा. हाईल, डॉ. जयंत नारळीकर यासारखे संशोधक ' स्थिरास्थिति अगर स्फोट स्थितीचा विश्वावर होणारा परिणाम ' यांचा अभ्यास करीत आहेत.

भूलोकावरील सर्व व्यवहार स्थितप्रद सृष्टीप्रमाणे होत आहेत. हवेत बांधून ठेवलेला रबरी चेंडूदेखील दुसऱ्या दिवशी आपली जागा सोडून दुसऱ्या ठिकाणी जाऊ शकत नाही. त्याच ठिकाणी सापडतो. पृथ्वीची स्वत भोंवती व इतर ग्रहांभोवती फिरण्याची गति केवढी अचाट आहे हे पहा. स्वत भोंवती चोवीस तासांत ती एक प्रदक्षिणा करते. ही एक गति, स्वत भोवती फिरत असतानाच ती सूर्याभोवतीही प्रदक्षिणा घालते, ही तिची दुसरी गति. सूर्य आपल्या नवग्रहासह तारामंडळाभोवती ( अभिजित् किंवा कृत्तिकामंडळ ) फिरतो ही तिसरी गति, ते तारामंडळ आकाशगंगेभोवती भ्रमण करीत आहे ही चवथी गति, आकाशगंगा गॅलक्सी पुंजाभोवती भ्रमण करते ती पाचवी गति, आणि अशा कितीक गति आहेत कुणास ठाऊक ! इतक्या भयंकर गतिमान पृथ्वीवर राहाणारे आपण सजीव प्राणी मात्र अचल आणि स्थिर आहोत, ही त्या विश्वकर्म्यांची केवढी महान् कृपा मानवादि जीवप्राण्यावर आहे !

संख्याशास्त्रातील शून्याचा शोध सर्वप्रथम आर्यांनीच लावला आहे. या शून्यामुळेच नऊ या संख्येपुढे संख्यावाढ करता आली. एरव्ही ती तेथेच राहिली असती कालौघात केव्हाच नामशेष झाली असती पाश्चिमात्य अगर अन्यदेशीय या शून्याला " हिंदळा " असे म्हणतात कारण ते हिंदुसंस्कृतीने शोधून काढलेले आहे. या शास्त्राच्या संशोधकांनी असे मानले आहे की, महाविश्व, अतिविश्व यांच्या निर्मितीपूर्वी फक्त शून्य होते. त्यांच्या मताप्रमाणे शून्य याचा अर्थ

'काहीही नव्हे' असा नसून तेच 'सर्व काही आहे' अमृतस्वरूप आहे, असा आहे. या शून्यापासूनच नऊ या संख्येचे विराट स्वरूप तयार झाले. परंतु त्यापुढे जेव्हा ही वाढ खुंटली तेव्हा त्यांनी आदितत्त्व शून्याचा आधार घेतला आणि नऊच्या पुढे त्याची मांडणी केल्यावर दहा, अकरा, बारा या क्रमाकाने संख्या वाढत गेल्या. परंतु पुढे जरी वाढून वाढून कितीही संख्या वाढली आणि मोठी झाली तरी त्यातील मूळ संख्या दहा हीच मानली जाते. हीच संख्या म्हणजे पूर्णतत्त्व मानले जाते. यामधूनच अनंत ब्रह्मांडांची निर्मिती झाली असे तंत्रशास्त्रकार मानीत असल्यामुळे या पूर्णतत्त्वाचे जे दहा विभाग झाले त्यालाच 'दशमहाविद्या' हे नाव त्यांनी दिले. या विद्या महाकाली, उग्रतारा, षोडशी, भुवनेश्वरी, छिन्नमस्ता, भैरवी, धूमावती, बगळामुखी, मातंगी व कमळा या नावाने प्रसिद्ध आहेत.

भारतीयांच्या या शून्याच्या शोधाबद्दल विल ड्युरंट नावाचा ग्रंथकार आपल्या Story of Civilization, our Oriental Heritage ग्रंथात म्हणतात की, एक भूमितिशास्त्र सोडल्यास, हिंदु आर्यांनी ग्रीक लोकांपेक्षा गणितशास्त्रात प्रत्येक बाबतीत श्रेष्ठ रचना केलेली होती; अरबी आकडे व दशमान पद्धति हे महत्त्वाचे भाग भारताकडून, अरबांचे द्वारे युरोपला प्राप्त झालेले आहेत. अरबी साहित्यात प्रथम जे आकडे आढळले आहेत, त्यापेक्षा एक सहस्र वर्षे (खि. पू. २५६ साली) अशोकाच्या शिलालेखात ते उपलब्ध आहेत. लाप्लास याने असे प्रतिपादिले आहे की, दहा प्रतिकांचे द्वारे सर्व प्रकारच्या संख्या व्यक्त करण्याची कौशल्यपूर्ण पद्धति भारताकडून जगाला मिळाली. आर्किमिडीज आणि अपोलोनियस यांनाही तो शोध लागलेला नव्हता. आर्यभट्ट व ब्रह्मगुप्त यांना ही पद्धति अवगत होती. चीन देशाने ही पद्धति बौद्ध भिक्षूकडून घेतली. संख्या शास्त्रात सर्व आश्चर्यांत अगदी लहान दिसणाऱ्या या शून्याची भारताने मानव जातीला एक मार्मिक देणगी दिलेली आहे.

या संख्याशास्त्राची कोठवर प्रगति झाली होती त्याचे एक मजेशीर उदाहरण पहा. गणितातील शून्याचा शोध ज्याप्रमाणे इतर देशांना उपयोगी पडला तसाच तो अरबस्थानातील विद्वानांनाही फायदेशीर झाला. अरबस्थानातील एक संशोधक सस्सा बिन दाहर याने शतरंज (सोंगटी) या खेळाची मांडणी शून्याच्या पायावर केली. म्हणून तेथे ती "दाहरविद्या" या नावाने प्रसिद्ध आहे. त्या वेळचा तेथील राजा शिरहामा याला त्या खेळाचे पूर्ण वेड लागले आणि रात्रंदिवस तो त्या खेळातच रमून गेला. या खेळामुळे राजा दाहरवर इतका खूष झाला की, त्याने त्याला वाटेल ते मागून घेण्यास सांगितले. दाहर राजाला म्हणाला, "मला जास्त काही नको. या पटावरील चौसष्ट घरांत जेवढे

या चतुर्दश भुवनांची रचना त्या त्या लोकामध्ये राहणाऱ्या जीवांच्या पूर्व-सुकृतानुरूप झालेली आहे आणि त्याप्रमाणे त्यांना नावे प्राप्त झाली आहेत. मर्त्यप्राणी भूलोकावर राहतो म्हणून मर्त्यलोक झाला. सगुणनिर्गुण ब्रह्मोपासकांस प्राप्त होणारा ब्रह्मलोक, पितरांचा पितरलोक होत. त्याप्रमाणे इंद्रलोक, अग्निलोक, यमलोक, सोमलोक, वरुणलोक, वायुलोक, सूर्यलोक इ० इ० असून मंगळ, बुध, शनि, गुरु ग्रह आणि असंख्य तारामंडळे, याशिवाय आम्हा दृष्टीस न दिसणारे अनंत ग्रह, यांनी ही सर्व मंडळे भरलेली आहेत. हे इतर गोल ज्याप्रमाणे मर्त्यलोकातील जीवांना दृग्गोचर होतात, त्याप्रमाणे भूलोकासह सर्व ब्रह्मांड इतर ग्रह गोलांना दिसत असले पाहिजे. ते जसे आपणाला प्रकाशमान दिसतात, तसा आपला गोलही त्यांना प्रकाशमान दिसत असला पाहिजे.

## महाशक्ति अखिल विश्वगोल कोणत्या रीतीने सदैव परिभ्रमणांत ठेवते ?

सृष्टीची उत्पत्ति पृथ्वी, आप, तेज, वायु आणि आकाश या पाच प्रमुख तत्त्वापासून झालेली आहे, हे सर्व जाणतात. या पंचमहाभूतापासून पंचीकरण अथवा मिश्रणक्रियेने, एकूण पचवीस तत्त्वे तयार होतात. जसे पृथ्वीचा आठ आणे अंश + इतर चवघांचा प्रत्येकी दोन आणे अंश मिळून प्रत्येकी पांच तत्त्वे याप्रमाणे पचवीस होतात.

पृथ्वी, आप, तेज आणि वायू या पंच महाभूतांना काही प्रधानांश गुण आहेत. ते येणेप्रमाणे पृथ्वी ( गुरुत्व + गंध ), आप ( आर्द्रता + शीतलता ), तेज ( प्रकाश + उष्णता ), वायु ( गती + स्पर्श ), पाचवे तत्त्व आकाशाचा प्रधानांश गुण शब्द, हा गुण पहिल्या चारी तत्त्वांमध्ये दिसून येतो. वायू गतीमध्ये असताना शब्द गुण होतो. अग्नीमध्येही शब्दगुण व्यतीत होतो. इ० तेव्हा वरील चार तत्त्वांच्या प्रत्येकी दोन प्रधानांश गुणांबरोबर शब्द हाही गुण असतो. मिळून प्रत्येकी तीन प्रधानांश गुण झाले आणि एकूण बारा तत्त्वे तयार झाली. ही बारा तत्त्वे पूर्ण समजून घ्यावयास पाहिजेत. यांच्या मूळाधारावर पुढील अनेक गोष्टी अवलंबून आहेत. गवताची एक काडीही या बारा तत्त्वांच्या सहाय्यावाचून निर्मिली जाऊ शकत नाही. त्या महाशक्तीची ही अशी अतर्क्य योजना नियमांनी बद्ध आहे.

परिभ्रमणासंबंधी दररोजच्या व्यवहारातील एक उदाहरण घेऊ. घड्याळाच्या यंत्रास चावी दिली म्हणजे आतील अनेक चक्रे व काटे नियमित फिरत राहतात. चावीच्या स्प्रिंगच्या जागी होणारा आघात, खोखोच्या खेळाप्रमाणे पुढच्यास धक्का देत असतो, ढकलीत असतो आणि चक्रे चालू ठेवतो. ही चक्रे जशी घड्याळाच्या आवरणात बसविलेली आहेत, त्याप्रमाणे विश्वातील अनेक ग्रह,

तारे, अनताच्या आवरणात पसविलेले आहेत. वर जी बारा तत्त्वे सांगितली आहेत, त्यांच्याच मूळ गर्जिन्यातून हे अनत गोल तयार झालेले आहेत, म्हणून सर्वांची घटक द्रव्ये बारा पदार्थमय आहेत. दारूकामाने ठेचून भरलेली चकी चित्रविचित्र वर्ण प्रकाशक द्रव्यांनी भरलेली असते आणि एकवार तिला बत्ती लागली, की जोरजोराने परिभ्रमण करते आणि नाना प्रकारच्या रंगीत प्रकाशांना व असख्य अग्निकणांचा मडलाकार जोराचा प्रवाह सुरू होतो या महावेगात सापडलेले अग्निकणही परिभ्रमण करू लागतात लांबून पाहणाराला चकीतून निर्माण होत असलेल्या दृश्याने मौज वाटते. त्याचप्रमाणे सृष्टिनिर्मितीच्या वेळी महाशक्तीने या चकीरूप गोलाकारांना बत्ती देऊन परिभ्रमण चालू केले आहे, आणि अग्नीकणरूपी हे असख्य तेजोगोल त्यामध्ये सूत्रबद्ध फिरत आहेत. वादळाचा तडाखा सुरू झाला म्हणजे त्यामध्ये ज्या ज्या वस्तू सापडतील त्या त्या त्यामध्ये ओढल्या जातात आणि गति घेतात. त्याचप्रमाणे महाशक्तीच्या तावडीत सापडलेले असख्य गोल परिभ्रमण करीतच आहेत. शक्तीचा प्रवाह चालू असल्याने त्या गोलाला आपल्या परिभ्रमणाच्या वृत्ताबाहेर पडताच येत नाही रेलगाडीत बसलेला मनुष्य गाडीच्या वेगाप्रमाणे, स्वत वेग घेतोच आणि त्या वेगाचे बाहेर निघण्याचा प्रयत्न केल्यास चांगलाच आपटी खातो रेल्गाडीत वेग असल्याने तिच्यातील प्रत्येक पदार्थाला वेग भरलेला असतो. तेव्हा गाडीतून एखादा दगड खाली टाकला तर तो सरळ खाली पडणार नाही. या रीतीने महाशक्तीने विश्वाचे निर्माण केलेले परिभ्रमण सतत चालू आहे.

ज्या अर्थी बारा मूलतत्त्वेच परिभ्रमणात आहेत. त्या अर्थी मूलतत्त्वाच्या मिश्रणातील यच्चयावत पदार्थही परिभ्रमणात असलेच पाहिजे या परिभ्रमणात एकाचा धक्का दुसऱ्याला बसलाच पाहिजे. आणि तो बसल्यावर दुसऱ्यावर थोडाफार परिणाम झालाच पाहिजे परिणाम होणे म्हणजे काय, तर एकामधील स्थूल अथवा अतिसूक्ष्म अशाचे दुसऱ्या पदार्थात मिश्रण होणे हे आहे. दररोजच्या व्यवहारातील उदाहरण असे की, अनेक चदन वृक्षांच्या राईमध्ये गावठी झाडेही चदनाप्रमाणे सुगधी होतात अगर कस्तुरीच्या पोत्यात थोडीशी काळी माती मिसळली तर काही वेळा वेळाने ती सुगंधित होते या ठिकाणी एकाचा अश दुसऱ्यात परिभ्रमणाने उतरला जातो आपणाला भासत नसले तरी प्रत्येक पदार्थ हा पृथ्वीचे परिभ्रमणातच आहे तेव्हा हाच नियम इतर पदार्थास लागू समजावा अशी परस्परावर आघात होणारी क्रिया, मग ती साहजिक असो अथवा सहेतुक असो, चालू असते. याप्रमाण क्रिया आणि प्रतिक्रिया यांची द्वंद्वे सदैव असून भ्रमणाचा वेग वाढवीत असतात सर्व ज्ञात अज्ञात कर्मांच्या मडलाकार धाराप्रवाहाने आणि त्याच्या आघाताने महाशक्तीच्या प्रवाहात वेग

भरतच राहतो. काही माणसे झोपाळयावर बसली आहेत असे आपण समजू. त्यापैकी एकाने त्याला गति दिली, म्हणजे झोपाळा झुलतो, का माणूस झुलतो हे सांगणे कठीण आहे. माणसाला वेग झोपाळ्याने आणला आणि झोपाळ्याने माणसाला वेग आणलेला आहे. अशी परस्पर क्रिया आहे. या ठिकाणी पहिल्या माणसाने पाय वर घेऊन झोपाळा थांबविण्याचा प्रयत्न केला, तरी दुसरा कादी मनुष्य वरच्यावर अथवा पायाने वेग भरीत राहतो. तसेच या महाचक्राचे आघाताने गति देणारे पदार्थ व जीव असल्याने हे सृष्टिचक्र अनादि काळापासून सतत चालू आहे आणि राहणारही आहे.

वरील एका परिच्छेदामधील अगडबंब लांबीची संख्या, भूभागावरील कोणत्याही प्रगत राष्ट्रांतील संख्याशास्त्रांच्या अभ्यासकांना एका निश्चित संख्या-नावाने सांगता येणार नाही असे वाटते. पण भारतीयांनी या वीस अंकी संख्येला "क्षिती" असे नाव दिलेले आहे, म्हणजे वरील संख्या सुमारे दोन क्षिती आहे, असे चटकन सांगता येते. याप्रमाणे ३० संख्येला क्षोणी, ४० = ताल, ५० = पचूर, ६० = गिरी, ७० = बल, ८० = तेज, ९० = अमित व ९७ = दशअनंत येथपर्यंत संख्येला नावे दिलेली आहेत. याचाच स्पष्टार्थ असा की ९७ संख्येवर ९६ पूज्ये दिली म्हणजे त्या संख्येचे नाव दशअनंत असे म्हणावे. ज्याप्रमाणे आपण दोन लक्ष तीन हजार आठशे नव्वद ही संख्या वाचू शकतो, तद्वत् ९७ अंकांची संख्याही वरील पद्धतीने वाचता येईल, हे आश्चर्य नव्हे काय !

( आत्मज्ञान ग्रंथ, ले. वि. ना. आपटे. )

एक दशशतसहस्रायुत लक्ष प्रयुत कोटयः क्रमशः ।
अर्बुदमब्जं खर्वं निखर्वं महापद्मशंकवस्तमात् ॥
जल धिश्चान्त्यं परार्धमिति दशगुणोत्तर. संज्ञः ।
संख्यायां स्थानानां व्यवहारार्थं कृतः पूर्वैः ॥ लीलावती ॥

त्याचप्रमाणे "गीर्वाणभाषा लघुकोश" ले. वि. अ. ओक यामध्ये खालीलप्रमाणे संख्यागणन दिलेले आहे. तसेच तैत्तिरीय व तांडय ब्राह्मणात काही संख्यावाचक शब्द आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| दहा हजार | = अयुत | दशलक्ष | = प्रयुत |
| दश कोटी | = अर्बुद | लक्ष कोटी | = शंकू |
| लक्ष शंकू | = वृंद | लक्ष वृंद | = महावृंद |
| लक्ष महावृंद | = पद्म | लक्ष पद्म | = महापद्म |
| लक्ष महापद्म | = खर्व | लक्ष खर्व | = समुद्र |
| लक्ष समुद्र | = निखर्व | दहा निखर्व | = शंख. १० १० |

महाभारत-सभापर्वामध्ये पांडवांची संपत्ती वर्णन करताना, वरील काही शब्दप्रयोग केलेले आढळतात.

वरील भुवनतत्त्वाचे त्यांनी रूपकाने कसे विवरण केले आहे ते पहा. भारतीय पुराणात नमूद केल्याप्रमाणे श्रीकृष्णाचा नित्य गोलोकात वास असे. त्याची प्रिया (राधा) ही देखील त्याच्याबरोबर तेथे असे. एकदा ब्रह्मा, विष्णु, महेश त्यांना भेटण्यासाठी तेथे गेले. तेव्हा प्रथम त्यांच्या स्वागतार्थ राधा पुढे झाली. तिने त्यांची विचारपूस केली आणि "आपण कोणत्या लोकांतून आलात ?" असा त्यांना प्रश्न केला. त्यांनी तिला त्यावर जे काही उत्तर द्यावयाचे होते ते दिले. पण त्यांनी दिलेल्या उत्तरावर राधेचे समाधान झाले नाही. महाविश्वात फिरणारे अनेक लोक आणि महागोल–जे थोडा वेळ प्रकाशतात आणि थोडा वेळ अंधाराच्या पांघरुणाखाली गाढ झोपी जातात– त्यांपैकी 'कोणत्या लोकांवर तुम्ही राहाता' असे राधेने त्या तिघांना विचारले आणि 'त्या लोकांवर किंवा महावर तुम्ही राहाता तो कृपया मला दाखवा' अशी तिने त्यांना विनंती केली. परंतु राधेला उत्तर देण्यापूर्वीच त्या लोकांची आणि पृथ्वीची अनेक युगे व्यतीत होऊन चुकली होती. त्यामुळे त्यांचे संभाषण तेवढ्यावरच थांबले.

श्री. चिं. ग. कर्वे आपल्या एका लेखात याच तत्त्वाच्या आधारावर जोरदारपणे प्रतिपादन करतात की, प्रकाशाचा दर निमिषार्धाला जो वेग आहे त्या वेगाने मानव अग्निबाणातून अंतराळात गेल्यास, विश्वाभोवती प्रदक्षिणा घालून येण्यास जर त्याला पाच वर्षे लागली असे गृहीत धरले तर त्या वेळी तो जो कोणी अंतराळात गेलेला इसम पृथ्वीवर परत आला असेल त्याला पृथ्वीवर शंभर वर्षांचा काळ लोटून गेलेला आहे, असे आढळून येईल. खगोलशास्त्रामुळेच आर्यांना हे प्रमाणशीर रीतीने सिद्ध करता आले की, पृथ्वीची इतकी संवत्सरे म्हणजे ब्रह्मांडाची अमुक वर्षे, ब्रह्मांडाची अमुक वर्षे म्हणजे जगताची एवढी वर्षे इ० इ०. यावरूनच ब्रह्मदेवाचा एक दिवस म्हणजे पृथ्वीची लक्षावधी वर्षे होत, हे आर्यांना पुराव्यानिशी सिद्ध करता आले.

आर्यांनी ही कालगणना एका चक्रामध्ये अंतर्भूत केलेली आहे. या चक्रामध्ये विश्वाच्या गतीचा प्रामुख्याने विचार केला आहे. एका चक्राचा फेरा साठ वर्षांचा मानून, प्रत्येक वर्षाला अगर संवत्सराला त्यांनी निरनिराळे नाव दिले आहे. परंतु या संवत्सराच्या फेऱ्याला मात्र त्यांनी निरनिराळी नावे न दिल्याने इतिहास-काळाचा नीट उलगडा होत नाही. महाविश्वाच्या गतीलाही याच चक्राचे तत्त्व लावलेले असल्याने ते चक्र अतिशय परमपवित्र मानले जाते. रामायणकाळापूर्वी उत्तर भारतामध्ये अनेक संस्कृति झाल्या, त्यामध्ये नागसंस्कृतीहि एक संस्कृति

होती. हस्तिनापूरचे पूर्वीचे मूळ नाव हस्ति-नागपूर असे होते. कारण ते नाग लोकांनी वसविले होते. रामायणकाळी या शहरातील धर्मचक्राचा अपहार रावणाने केला, असा उल्लेख मिळतो. रघुवंशीय लिच्छवी राजांनी ते धर्मचक्र खडकातून कोरून निर्माण केले होते, असे पुराण्यावरून आढळून येते. इसवी सनाच्या मागेही अगर किंचित् पूर्वी अशोकाने तेच धर्मचक्र आपले राजचिन्ह मानले होते आणि सांप्रत केंद्र सरकारनेही तेच धर्मचक्र आपले राजचिन्ह मानले आहे.

( ' विज्ञान-क्षेत्रातील भारत ' लेखक श्री. अनंतन्, एम्. एस्सी., ' विवेक ' विजयादशमी अंक, सन १९६२ यांच्या आधारे )

आर्यधर्मातील हे सिद्धांत पहा.

( १ ) नित्यं विज्ञानमानन्दं ब्रह्म ।

( २ ) ज्ञानं तेऽहं सविज्ञानम् ।

ही श्रौत-स्मार्त वचने हेच सांगतात की, आर्यधर्मांची काही मूलतत्त्वे ज्ञानमय ब्रह्मतत्त्व व विज्ञानमय आहेत. यामुळेच प्राचीन भारतीय वाङ्मय विज्ञानशून्य आहे असे सुशिक्षितानाही म्हणण्याचे धाडस करवणार नाही. दश महाविद्या समजण्यास काही शब्दांची व्युत्पत्ति व उगम माहीत असावयास पाहिजेत. त्यासाठींच आगम, निगम व निदान यांचे त्रोटक विवरण केले आहे. ते पुढीलप्रमाणे:—

आगम

सूर्यापासून पृथ्वी, चंद्र, गुरु, मंगळ यांची उत्पत्ति झालेली आहे. हे सर्व ग्रह सूर्याभोवती फिरत आहेत. हे सर्व ज्ञान सुलभपणे व्हावे म्हणून ऋषींनी त्याला आगम विद्या हे नाव दिले. आपल्या सूर्यापासून जसे ग्रहगोलाचे ज्ञान मिळते, तद्वत् अनंतकोटी ब्रह्मांडाच्या गतीच्या उत्पत्तीचे अगर विलयाचे ज्ञान जे येथे मिळते त्यालाच आगम असे म्हणतात ' निगमात् आगत. ' अशी व्युत्पत्ति केल्यामुळे आगम हे नाव प्राप्त झाले. ( जैन धर्मीयांच्या धर्मग्रंथांना आगम असेच म्हणतात. त्यांचे, एकूण ४५ धर्मग्रंथ आहेत. या ग्रंथांचे विभाजन अंगग्रंथ, उपांगग्रंथ, छेदसूत्रे, मूलसूत्रे, प्रकीर्णक आणि चूलिकासूत्र या नावाखाली झालेले आहे परंतु प्रस्तुत आगम शब्दाशी त्यांचा काडीमात्रही संबंध नाही. )

## निगम

अतिविश्व, महाविश्वाची रचना व गति, आणि शब्दसृष्टि यांची दोन भागांत ऋषींनी विभागणी केलेली आहे. ह्या दोन भागांना त्यांनी आगम आणि निगम अशी नावे दिली. निगम याचा अर्थ बाहेर जाणे, बाहेर टाकणे, आणि आगम म्हणजे आत येणे अथवा दुसऱ्या कोणत्यातरी शक्तितत्त्वापासून ग्रहण केलेले असणे, असा या दोन शब्दांचा अर्थ आहे. सूर्यविद्या ही स्वरमूलक असून तिला 'त्रयीविद्या' या नावाने संबोधिले जाते. सूर्यबिंब म्हणजे ऋग्वेद, सूर्याचे रश्मीमंडळ म्हणजे सामवेद व सूर्यामध्ये वास्तव्य करणारा अग्नि हा यजुर्वेद होय. आपण कित्येकदा सहजिकपणे 'काय सूर्य तापला आहे ?' असे शब्द उच्चारतो. परंतु वास्तविक 'सैषा त्रय्येव विद्या तपते' यातच त्याचे खरे रहस्य आहे. ज्याप्रमाणे स्वराशिवाय व्यंजनाचा उच्चार नीट होत नाही, तद्वतच ही सूर्यविद्या स्वरमूलक आहे. त्याचे तत्त्व नीट समजण्यास वेदपुरुषाचे ज्ञान असणे आवश्यक आहे या विद्येलाच निगमविद्या असे म्हणतात.

## निदान

निदान या शब्दाने काही संकेत दर्शविले जातात अमक्याला अमके समजा म्हणजे ते त्याचे निदान झाले खानगीदाखलच म्हणावयाचे झाले तर असे म्हणता येईल की, चार जाडजूड पाय, सुपासारखे कान, लांब आणि मोठे नाक, बारीक डोळे व तोंडात दोन लांब दात, हे वर्णन वाचल्यावर हत्तीचे चित्र डोळ्यांसमोर उभे राहते तेव्हा वरील वर्णन हे हत्तीचे निदान झाले तसेच तीक्ष्ण दृष्टि असणे हे कावळ्याचे, तीक्ष्ण कान असणे हे सर्पाचे, अगर उकीरड्यावर लोळणे हे गर्दभाचे निदान होय. याचप्रमाणे निदानशास्त्रात काही संकेत ठरलेले आहेत कसे ते पहा शोक दर्शविण्याचे निदान काळे वस्त्र, धोका दर्शविणारे लाल वस्त्र, सर्व काही ठाकठीक आहे, शांत आहे याचे निदान हिरवे वस्त्र, कीर्तियशाचे श्वेतवस्त्र, पृथ्वीचे कमळ, मोहशक्तीचे सुरा, लक्ष्मीचे हत्ती, विजयाचे ध्वज, संहारशक्तीचे कापलेले मस्तक इ० इ०. वरील संकेत भारतीयच पाळतात असे नाही हे संकेत पाश्चिमात्यदेखील पाळतात. काही ख्रिश्चन आपला कोणी आप्त अथवा नातेवाईक स्वर्गवासी झाल्यावर शोकप्रदर्शन म्हणून काळे वस्त्र आपल्या हातावर बांधतात राजघराण्यातील एखादी व्यक्ति मृत्यु पावली तर सर्व प्रजाजनांना—मग त्यांची जात, गोत, धर्म कोणताही असो—हातावर काळी फडकी बांधून दुःखप्रदर्शन करावेच लागते आरोपीला फाशीची शिक्षा सुनावताना न्यायाधीश लाल झगा परिधान करतो.

आर्य संस्कृतीवर शिलोटे उडविणे हीच ज्यांची प्रकृती त्यांना शोक आणि काळे वस्त्र यांचा परस्पर संबंध काय असा प्रश्न विचारला असता कदाचित उत्तर देता येणार नाही, परंतु भारतीय निदान शास्त्राने याचे उत्तर देऊनच ठेविले आहे. रोजच्या व्यवहारातील एका साध्या उदाहरणाने हा परस्परसंबंध सिद्ध करून दाखविता येतो. डोक्यावर धरणाऱ्या छत्रीचा रंग काळा असतो. पावसाप्रमाणे उन्हातदेखील आपण छत्रीचा उपयोग करतो. सूर्याचा असह्य ताप छत्रीचे काळे कापड कितीतरी सुसह्य करते. तद्वतच ज्या वेळी शोकामुळे ज्ञानप्रकाश मंद होतो. सारी चेतनाशक्ति शोकसंतापाने मंद होते याचाच अर्थ शोक ज्ञानप्रकाशाचे ग्रहण करतो, त्याला खाऊन टाकतो, ज्ञानप्रकाशाला मंद बनवितो, त्या वेळी या शोकाचा दर्शक म्हणून काळे वस्त्र आपण हातावर बांधतो. काळ्या रंगाच्या या प्रकृतिधर्मामुळे काळा रंग शोकाचे निदान ठरला, काळे वस्त्र हे शोकाचा संकेत ठरला. तसेच पाण्यामध्ये रुद्रवायूचा प्रवेश झाला म्हणजे त्याचा वर्ण हिरवा बनतो. वृक्षाच्या पानांचा वर्णहि हिरवाच आहे. याचा अर्थ वृक्षाचे पान हे पाण्याच्या अंशाने तयार झाले, हाच होय. पृथ्वी आणि तिच्यावरील सृष्टि ही पाणी आणि पर्ण यांनी भरलेली आहे. म्हणून पाण्यात उत्पन्न होणाऱ्या आणि सर्वस्वी पाण्यावरच जीवित अवलंबून असणाऱ्या कमळाला पृथ्वीचे निदान मानले. पाण्यातून कमळे बाहेर काढली तर चारदोन तासातच ती कोमेजून जातात. तसेच एखाद्या देवतेच्या हातात कमळ असेल तर त्या देवतेची सत्ता अखिल विश्वावर चालत आहे, असे निदान केले जावे. यावरून आणि इतर अनेक उदाहरणावरून असे दाखविता येईल की, निदानाचा परस्परसंबंध त्या त्या वस्तूच्या अनुरूप भावाबरोबर असतो. देवतांची स्वरूपे आणि त्यांची आयुधे यांचे पूर्ण ज्ञान होण्यास हे निदानशास्त्र पूर्णत: अवगत होणे आवश्यक आहे. म्हणून विषयप्रवेशाच्या पूर्वी हे स्फोटक विवेचन केले आहे.

ऋग्वेदात ( ४ । ८ । ११ मध्ये ) 'द्यौ. पिता पृथिवी माता' असे एक वचन आहे. याचा अर्थ द्यौलोकात तळपणारा जो सूर्य तो पिता आणि आपण ज्या पृथ्वीतलावर वास्तव्य करून आहोत ती आपली माता होय सूर्याला रुद्र ही संज्ञा आहे, आणि म्हणूनच सूर्याचे अनंतरश्मी हे अनंत रुद्र समजले जातात. 'असंख्याताः सहस्राणि ये रुद्रा.' अशी श्रुति आहे. सूर्यरूपी रुद्राची दोन शरीरे मानलेली आहेत. पहिले घोर आणि दुसरे शिव होय. अग्निर्वा रुद्र' । तस्यै ते द्वौ तन्वे ॥ घोरान्याच शिवान्याच ॥ अग्नि हा अन्नाद असल्यामुळे खाणे हा त्याचा स्वभावधर्मच आहे. मग ते खाणे काष्ठरूपी असो, अथवा आहुति रूपाने अर्पण केलेले असो. मानवी शरीरातील अग्नीला वैश्वानर असे म्हणतात, आणि अन्नरूपाने त्या अग्नीला नित्य आहुति द्यावी लागते. या अन्नाद अग्नीला

सदैव धगधगते ठेवण्यासाठी सकाळ-संध्याकाळ आपल्याला अन्नभक्षण करावे लागते. जोपर्यंत वेळेवर अन्नाहुति मिळत आहे तोपर्यंत हा अग्नि शांत असतो, शिव असतो, सर्व काही ठाकठीक असते, शरीराचे सर्व व्यवहार, कामधंदा बरोबर चालतो. परंतु ज्या वेळी हीच अन्नाहुति बंद होते, तेव्हा हा शरीरात वसती करून राहणारा वैश्वानर घोररूप बनतो, तापतो, पेटतो आणि काही सुद्धा खायला न मिळाल्यामुळे शरीरातील रस मांस मेद यांचेच भक्षण चालू करतो. याचाच परीणाम कालांतराने शरीराचा संहार होण्यात, नाश होण्यात होतो, याचाच सारांश असा की, अन्नाहुतीमुळे रुद्र-तनु शिवाभावात परिणत होऊन शरीराचे पालन करते तर अन्नाभावी घोर बनून शरीराच्या नाशास कारणीभूत होते.

सौरशक्ति ही हिरण्यमयी आहे, आणि तिची सत्ता अन्नादावर चालते. सोम हा अन्नादाचे वर्धन करणारा मानला जातो. ज्या शक्तीने या अन्नादाचे वर्धन होते त्यालाच चित्-शक्ति असे पारिभाषिक नाव आहे. या शक्तीला कोणी उमा हैमवती शक्ति असे म्हणतात. वल्लभधर्मपंथीय हिला भगवत्शक्ति असे म्हणतात. अद्वैतवादी मायाशक्ति म्हणतात. वैष्णव उपासकांची राधाशक्ति आणि रामानुज पंथीयांची लक्ष्मीशक्ति ती हीच होय. या उमाशक्तीला ब्राह्मणग्रंथांमध्ये अंबिका, अंबा, माता, जनी, धारा, जया, आप इत्यादि नावांनी संबोधिले आहे. सूर्यप्रधान प्राणशक्तीमुळे पुरुष सृष्टि निर्माण होते, तर सोमप्रधान शक्तीमुळे स्त्री-सृष्टीची निर्मिति होते. यामुळेच पुरुषवर्ग हा शिवरूप मानला जातो आणि स्त्री वर्ग शक्तिरूप मानला जातो. असेच विश्वातील व्यवहार शिव-शक्तिमय स्वरूपातच होत असतात. हेच पृथ्वीतत्त्व होय, आणि हे पृथ्वीतत्त्व विशद करून सांगणाऱ्या शास्त्राला आगम असे नाव दिले आहे.

दशमहाविद्येचे निरूपण म्हणजेच संपूर्ण सृष्टितत्त्वाचे निरूपण होय. त्याप्रमाणे आगमामध्ये ' सैषा त्रयी विद्या ' हे सूत्र पाहिले, त्याचप्रमाणे निगमामध्ये ' विद्यासि सा भगवती ' या सूत्राने ' विद्या ' या शब्दाचा अर्थ सांगितला सृष्टितत्त्व समजण्यास या दोन्ही विद्यांचा उपयोग आहे. विषयब्रह्म हे ब्रह्मतत्त्व आहे. ब्रह्मतत्त्वाचा उत्पादक प्रजापति हा होय. प्रजापतीने आपले अंशभूत असे जे राम, कृष्ण, वामन, परशुराम निर्माण केले, त्याचप्रमाणे त्याने अश्व, गज ही पशुसंपत्ति आणि पक्षीही निर्माण केले. यातील प्रत्येक शब्द उच्चारला म्हणजे आपल्याला एकेका विषयाचे ज्ञान प्राप्त होते कृष्ण शब्द उच्चारला म्हणजे त्याच्यातील काही दैवी, धर्मरक्षक गुणाचे ज्ञान होते घोडा या शब्दाच्या उच्चाराने घोड्याची चपळता इत्यादिसंबंधीचे ज्ञान आपल्याला प्राप्त होते. या

ज्ञानालाच वैज्ञानिक भाषेत विद्या असे म्हटले आहे. अथवा दार्शनिक शास्त्राने त्याला संस्कार ही संज्ञा दिली आहे. ज्याप्रमाणे पृथ्वी ही एक संस्कार आहे, तद्वत विश्व, महाविश्व यातील घडामोडी समजण्यास ही विद्या आवश्यक आहे. याचसाठी सूर्य, चंद्र, औषधी, कृमि कीटक, मानव, पशु पक्षी या प्रत्येकीसंबंधीचे जे ज्ञान ती ती एक एक विद्या होय. अर्थात यापैकी काही विद्या या पृथ्वीवरील वस्तुविषयी असतील, तर काही महा विश्वाच्या हालचालीसंबंधी उत्पत्ति विनाश यांचे ज्ञान देणाऱ्या असतील. हे ज्ञान सुलभ व्हावे म्हणून भारतीय ऋषींनी सृष्टिक्रमानुसार या विद्यांचे दहा विभाग केले, आणि म्हणूनच त्याला 'दशमहाविद्या' हे नाव प्राप्त झाले. या दशमहाविद्येच्या अभ्यासामुळे महाविश्व म्हणजे काय, ब्रह्मांड कशाला म्हणतात, अंतरिक्ष आणि पृथ्वी म्हणजे काय, त्याची उत्पत्ति कधी झाली, लय केव्हा होईल, ही लय करणारी शक्ति कोणती इत्यादिंबाबतचे ज्ञान आपोआपच अभ्यासूला होते. या दशमहाविद्या आगमोक्त आहेत.

महाकाली

> शवारूढां महाभीमां घोरदंष्ट्रां हसन्मुखीम् ।
> चतुर्भुजां खड्गमुंडवरां भयकरां शिवाम् ॥
> मुण्डमालाधरां देवीं ललज्जिह्वां दिगम्बराम् ।
> एवं संचिंतयेत् कालीं स्मशानालयनिवासिनीम् ॥ (कालीतंत्र)

निदानशास्त्रात वरीलप्रमाणे महाकालीचे ध्यान वर्णन केलेले आहे. ती शवावर उभी आहे, कराल मुखी दाढा आहेत, हसत आहे, चतुर्भुज, खड्ग, मुंड धारण करणारी, मुंडमाळा गळ्यात असणारी, दीर्घजिव्हा असणारी, नग्न, स्मशान वासी इत्यादि, इत्यादि तिचे स्वरूप वर्णिले आहे

प्रथमारंभी ज्याला महाविश्व म्हटले, त्या परात्पर महाकाळाची जी सौरशक्ति तिचे नाव महाकाली होय नेहमीचा सिद्धांत असा की, शक्ति ही शक्तिमानाहून भिन्न आहे अग्नि हा शक्तिमान खरा परंतु त्याची दाहकशक्ति ही वेगळी आहे, सूर्य हा शक्तिमान खरा पण त्याची प्रकाशशक्ति ही वेगळी आहे त्यानुसार पूर्वी वर्णन केल्याप्रमाणे सौरशक्ति ही शवाशाचे वर्णन करणारी शक्ति-चित्-शक्ति होय, ती चिदात्म्याहून भिन्न आहे शिवशक्ति रूपामध्ये हेच तत्त्व अंतर्भूत आहे

> सा च ब्रह्मस्वरूपा च नित्या च सनातनी ।
> यथात्मा च तथा शक्ति यथाग्नौ दाहिका स्थिता ॥ (देवी भागवत)

सृष्टिउत्पत्तीपूर्वी याच महाविद्येचे साम्राज्य होते, म्हणून ही प्रथमपदास पोहोचली. जोपावेतो संसार हा शक्तिमान आहे, तोपावेतो तो शिव आहे. परंतु या संसारातली शक्ति निघून गेल्यास तो शिवाऐवजी शव बनतो. कोळसा जळून गेला, की खाली उरते ती निव्वळ राख! महाकाली शक्ति ही सर्व विश्वाचा संहार करणारी अशी शक्ति आहे. हीच काळरात्री आहे. सृष्टीनिर्मितीच्या वेळी या शक्तीला कोणी मानीत नाही. परंतु प्रलयकाळी हिची प्रतिष्ठा भरपूर वाढते. दुसऱ्या शब्दातच सांगावयाचे तर शक्तिमान संसारात ही कोणीही नव्हे, पण शक्तिशून्य, शवरूप संसाराची हीच शिवशक्ति होय. संहाराच्या वेळी ही शक्ति भयानक स्वरूप धारण करते. म्हणून त्याचे निदान भव्य शरीरप्रकृतीत दाखविले आहे. शक्ति निघून गेल्यावर संसार शवरूप बनतो, म्हणून ती शवावर उभी आहे. शत्रूचा बीमोड केला म्हणजे विजयाचा आनंद चेहऱ्यावरून ओसंडत असतो, हेच निदान तिच्या हसतमुखी चेहऱ्याचे कारण आहे. विश्वाच्या आकाराचे ३६० अंश कल्पिलेले आहेत. त्याचे चार सम भाग करतात. चित्रानक्षत्रापासून श्रवणापर्यंतचा षड्भांतराचा एक भाग, आणि रेवतीपासून लुब्धकापर्यंतचा दुसरा भाग होय. याचे पुन्हा ९० अंशांचे दोन दोन भाग केलेले आहेत. तेव्हा या चार दिशांचे निदान तिच्या चार भुजांमध्ये झालेले आहे. प्राणिमात्राचा खड्गाने नाश करता येतो, म्हणून खड्ग हे नाशशक्तीचे निदान तिच्या हाती दिले. पृथ्वीच्या स्थितिमात्रात फरक पडला, जसा भूकंपाच्या धक्क्याच्या वेळी पडतो म्हणजे अखिल प्राणिमात्रात भयाने कंप उत्पन्न होतो आणि ती अनाठायी भीति निवारण करण्याचे सामर्थ्य दर्शविण्यासाठी अभय हस्ताचे स्वरूप दाखविले. उध्वस्त विश्वामध्ये सजीव प्राणी निर्जीव होऊन प्रेतवत्–एखादी सुकलेली फुलांची वेणी रस्त्यावर पडलेली असावी त्याप्रमाणे–पडलेले असतात, याचे निदान तिच्या गळ्यात मुंडमाळा घालून दाखविले. विश्वाच्या दाही दिशा हेच तिचे खरे वस्त्रप्रावरण होय. परंतु त्याच्या विनाशकाली ते वस्त्रही ती फेकून देते आणि सैरावैरा इतस्ततः धावत सुटते. याचेच निदान महाकालीच्या वर्णनात 'नग्न' या शब्दाने केले आहे. प्रलयकाली सर्व विश्वच स्मशानवत होत असल्याने, स्मशान हे तिचे निवासस्थान म्हटले आहे.

शक्तिदेवतांमध्ये अनेक रूपे आढळून येतात. कोणाला चार हात, तर कोणाला आठ, तर कोणाला सोळा, कोणाचा चेहरा उग्र, तर दुसऱ्या कोणाचा शांत, कोणाची जिव्हा बाहेर, तर कोणाचे मस्तक कापलेले, कोणी नग्न आहे, तर कोणी सुरापान करीत आहे. ही विविध रूपे पाहून निदानशास्त्रविन्मुखांनी खुशाल या स्वरूपाकडे पाहून नाके मुरडावीत आणि कुचेष्टेने त्याकडे पहावे. परंतु त्यांनी निदानशास्त्राचा अभ्यास केला तर भारतीय संस्कृति किती श्रेष्ठ कोटीला पोहोचली होती याचे त्यांना खात्रीने ज्ञान होईल. प्रत्येक देवतेचे निदान, ध्यानस्वरूपात ऋषींनी दिलेले आहे आणि स्तोत्रपाठापूर्वी अगर पूजाविधीच्या पूर्वी "अथ ध्यानम्" या सूत्राने त्याची सुरवात केली आहे. मंगलकार्याच्या वेळी गणपतीला आवाहन करताना 'ॐ गणानां त्वा गणपतिं हवामहे' हे सूक्त म्हणतात. त्याप्रमाणे महाकालीचे स्मरण "शवारूढां महाभीमां घोरदंष्ट्रां हसन्मुखीम्" या निदानाने करण्याचा प्रघात आहे.

उग्रतारा

प्रत्यालीढपदार्पिताङ्घ्रिशवहृद् घोराट्टहासापरा ।
खड्गेन्दीवरकर्त्रिखर्परभुजा हुंकारबीजोद्भवा ॥
खर्वा नीलविशालपिंगलजटाजूटैकनागैर्युता ।
जाड्यं न्यस्यकपालकर्तृजगतां हन्त्युग्रतारा स्वयम् ॥ ( तारायंत्र )

सूर्योदयापूर्वी महाकालीचे अधिराज्य संपल्यानंतर मग या देवतेचे साम्राज्य सुरू होते. हिरण्यगर्भ विद्येच्या अनुषंगाने, निगमशास्त्राने संपूर्ण विश्वाची रचना सूर्याला आधारभूत मानून केलेली आहे. अग्नि हा हिरण्यरेता असल्यामुळे सौरमंडळ लालभडक झाल्यानंतर त्याला हिरण्मय म्हणतात. यासाठी या सौरशक्तीला हिरण्यगर्भ असे म्हणतात. भूलोक, भुवःलोक व स्वर्गलोक आणि पृथ्वीवरील सर्व मर्त्यसृष्टी यांवर हिरण्यगर्भाची सत्ता चालते. श्रुतीमध्ये सूर्याला एक नक्षत्र मानले आहे. म्हणूनच सूर्य हा एक तारा ठरतो. महाकालाची शक्ति जशी महाकाली त्याप्रमाणे सूर्याची शक्ति ताराशक्ति होय. अन्न हे प्रत्येकाला आवश्यक आहेच हे आपण वर पाहिलेच आहे. सूर्यालादेखील आहुतीची गरज आहे. कोणी त्याला आज्याहुति देतो, तर कोणी त्याला अर्घ्यप्रदान करतो. ही आहुति देण्याची रूढि अस्तित्वात येईपर्यंत सूर्याचे रूप उग्र होते, म्हणून त्याच्या शक्तीला उग्रतारा शक्ति असे नाव प्राप्त झाले. सप्तदेवीचा इतिहास पाहताना आपल्याला हेच दिसून येईल की, सूर्याचे उग्र रूप हिला असह्य

झाल्यामुळे तिने आपली छाया तेथे ठेविली, आणि ती आपला पिता विश्वकर्मा याच्या घरी निघून गेली. सूर्याला आपल्या पत्नीने केलेले हे कपट समजताच तो श्वशुरगृही गेला. तेव्हा विश्वकर्म्याने त्याला निक्षून सांगितले की, "तुझी पत्नी तुझ्याजवळ राहावी असे तुला वाटत असेल, तर तू आपले तेज कमी करून घे." म्हणजेच 'आपले उग्ररूप कमी करून घे.' असा त्याच्या सांगण्याचा आशय होता.

पुरुषतंत्राप्रमाणे ही शक्ति 'अक्षोभ्य' आहे. वैदिक सिद्धांतानुसार सूर्य हा स्थिर मानला जातो. विषुववृत्तावर तो क्षोभरहित होऊन स्थिररूपाने प्रकाशतो, म्हणून त्याला 'अक्षोभ्य' असे संबोधिले आहे. हे या शक्तीचे एक निदान आहे. जोपावेतो आहुति मिळते, तोपावेतो सूर्य शांत असतो. परंतु आहुति मिळण्याचे बंद झाले म्हणजे तो उग्र बनतो आणि तिन्ही भुवनांचा नाश करतो. या उग्रशक्तीचे निदान म्हणजेच उग्रतारा देवीचे वरील वर्णनानुसार असलेले ध्यान होय. यासाठीच ब्राह्मणवर्गाने तरी प्रातःकाळी सूर्य उगवताना त्याला अर्घ्यप्रदान व आहुति द्यावी, असे शास्त्रकारांनी सांगितले आहे.

महाकालीप्रमाणेच सूर्य प्रलयकाळाची उग्रतारा ही प्रलयशक्ति असल्यामुळे दोघींच्या ध्यानामध्ये विशेष फरक नाही. चारी भुजा सर्पवेष्टित दाखविल्या आहेत. कारण प्रलयकाळी सूर्य आपले कडक ताप-रश्मी बाहेर ओकतो. त्याचे निदान सर्प विष ओकतात आणि त्यायोगे विश्वाचा संहार करतात असे यामध्ये दर्शविले आहे. प्रलयकाली सूर्याची सत्ता शवरूप झाली म्हणजे ही शक्ति त्यावर उभी राहते म्हणून ती शवावर उभी आहे असे दाखविले आहे. सौर अग्नीची आहुति बंद झाली म्हणजे तो प्रबळ वेगाने "खाय, खाय" शब्द उच्चारून भटकू लागतो. हेच निदान अट्टहासामध्ये गोविले आहे. प्रलयकाळी सूर्य, पृथ्वीवरील प्राणिमात्रांचा व पशुपक्ष्यांचा रस आकर्षून घेतो, म्हणजेच पिऊन टाकतो. आणि त्याली उरते ते रिक्त कपाल. आपल्याला एखाद्याने दुधाचे भांडे दिले आणि त्यातील दूध आपण पिऊन टाकले, तर उरते ते फक्त रिकामे भांडे. तेव्हा याचे निदान म्हणून या शक्तीच्या हातात खापर दिलेले आहे. यजुर्वेद सूर्याला 'नील ग्रीव' असे म्हणतो, म्हणून त्याची शक्ति नीलग्रीवा झाली. सूर्य हेच मस्तक कल्पून, त्याच्या चारी बाजूंना पसरणारे त्याचे स्वैर रश्मी हेच केस मानून या शक्तीचा केशकलाप स्वैर दाखविला आहे. तो नील, विशाल, पिंगट, जटायुक्त आहे इत्यादि इत्यादि त्याचे वर्णन केलेले आहे. "पौराणिक देवता" या याच ग्रंथातील एका प्रकरणात या देवीचे अधिक विवरण पहावे.

षोडशी

मुक्तापीतपयोदमौक्तिकजवावर्णैर्मुखैः पंचभिः ।
त्र्यक्षैरंचितमीशमिंदुमुकुटं पूर्णेंदुकोटिप्रभम् ॥
शूलं टंककृपाणवज्रदहनान् नागेंद्रपाशांकुशान् ।
पाशं भीतिहरं दधानममिताकल्पोज्ज्वलांगं भजे ॥ (सनत्कार)

दशमहाविद्यैपैकी ही तिसऱ्या क्रमांकाची देवताशक्ति होय. उग्रतारेचे विवरण करताना आपण पाहिले की, उग्र सूर्याचे स्वरूप सोमाची (अन्नादाची) आहुति मिळाल्यामुळे शांत झाले, म्हणजेच शिव झाले आणि तो शिवसूर्य बनला. तिन्ही भुवनाची उत्पत्ति व पृथ्वीवरील प्राणिमात्राची उत्पत्ति ही उग्रसूर्य करू शकत नाही. उलट तो संहारक आहे. तेव्हा येथील उत्पत्तीचे कार्य हा शिवसूर्य करीत असतो. या शिवसूर्याची स्त्री शक्ति षोडशी शक्ति ही होय.

शिवतत्त्वाप्रमाणे शिवसूर्य हा पंचमुखी आहे. तो पंचमुखी कसा आणि का याचे विवरण आवश्यक आहे. वैदिकांनीही शिव हा पंचमुखीच मानलेला आहे हे दक्षयज्ञ प्रकरणात आपण पाहिले आहे. हा सूर्य पाच दिशामध्ये कार्यप्रवण होऊन वावरत असल्यामुळे तो पंचमुखी झालेला आहे. प्रत्येक ठिकाणी त्याचे नाव व वर्ण निरनिराळे आहेत, हे खालील कोष्टकावरून ध्यानी येईल.

| दिशा | नाव | मुख | वर्ण | देवता |
|---|---|---|---|---|
| पूर्व | तत्पुरुष | चतुष्कळ | हरित | ब्रह्मा |
| पश्चिम | सद्योजात | अष्टकळ | रक्त | विष्णु |
| उत्तर | वामदेव | त्रयोदशकळ | धूम्र | इंद्र |
| दक्षिण | अघोर | अष्टकळ | नील | अग्नि |
| ऊर्ध्व | ईशान | पंचकळ | पीत | सोम |

टीप—वीरशैव पंथ या पाच शिवांपासून पंथाचे पहिले पाच प्रचारक तयार झाले, असे मानतो.

या पंचमुखी शिवाला दहा हात आहेत आणि त्यांत खालीलप्रमाणे आयुधें आहेत

(१) शूल, (२) टंक, (३) वज्र, (४) पाश, (५) खड्ग, (६) अंकुश, (७) घंटा, (८) नाग, (९) अग्नि आणि दहावा हात अभय आहे.

वरीलप्रमाणे पंचमुखी शिवामधील उत्तराभिमुख जे इंद्रात्मक स्वरूप आहे, त्यामध्ये षोडशी शक्तीचा पूर्ण विकास झालेला आहे. याकरिता 'इंद्रो ह वै षोडशी' असे शतपथ ब्राह्मणातील श्रुतिवचन आहे (४ । २ । ५ । १४). भूः, भुवः आणि स्वः हे तिन्ही लोक त्रिपुर या महाशक्तीमुळे उत्पन्न झाले आहेत, आणि म्हणून त्या महाशक्तीला त्रिपुर-सुंदरी असे नाव दिले आहे.

शिवसूर्याच्या हाती जी आयुधे आहेत त्यांचे निदान पुढीलप्रमाणे आहे — टंक– आग्नेय ताप सूचित करते, शूल– वायव्य ताप, वज्र– ऐंद्र ताप, पाश– वरूण ताप, खड्ग– चंद्रशक्ति, अंकुश– चारी दिशांचा संबंध, नाग– मानवी शरीरातील रक्तवाहिन्या आणि त्यामधून वाहणारा विषरूपी वायूचा प्रभाव (यालाच संचारनाडी असे म्हणतात) सूचीत करते. रक्तवाहिन्यांचा वर्ण व आकार सर्पाप्रमाणे असल्याने रुद्राचे सर्व शरीर सर्पवेष्टित दाखविलेले आहे. अभय हात हा शिवाचे शांत स्वरूपाचा दर्शक आहे आणि घंटा ही *आगम*-शास्त्रानुसार स्वर आणि वाणी यांचे अधिष्ठान आहे.

रुद्राचे शरीर सर्पवेष्टित दाखविण्याचे एक कारण वैद्यकशास्त्रानुसार असे आहे की, सर्पांचे शरीर हेच मूलतः थंड आहे. इटालीच्या एका राजवैद्याने असा प्रयोग केला होता की, एकदा त्याच्या रोग्याला अजिबात झोप येईना. तेव्हा त्या राजवैद्याने त्या रोग्याच्या बिछान्यावर मोठे जाडेजुडे दोनतीन साप ठेवून दिले. अर्थातच ते साप दंतहीन होते. सर्पांच्या शीत स्पर्शाने त्या रोग्याचा निद्रानाशाचा रोग बरा झाला. कैलासपति शिवशंकर हलाहल विष पिऊन नीलकंठ झाले, परंतु त्या विषाचा कंठाला अद्यापही होणारा दाह शमविण्यासाठी ते सर्प भूषणे वापरतात अशी पुराणात आख्यायिका आहे. तो राजवैद्य मानचिन्ह म्हणून सर्पांची मूठ असलेली काठी वापरीत असे, आणि आपल्या अंगावर सर्प घेऊन तो रोग्याकडे जात असे.

या शक्तीच्या हातातील आयुधाचे निदान पूर्वी येऊन गेलेले आहे.

भुवनेश्वरी

**उद्यदिनद्युतिमिन्दुकिरीटां तुंगकुचां नयनत्रययुक्ताम् ।**
**स्मेरमुखीं वरदांकुशपाशाभीतिकरां प्रभजे भुवनेशीम् ॥** (भुवनेश्वरी तंत्र)

अखिल सृष्टयुत्पत्तीचे षोडशीचे कार्य संपल्यानंतर तिचे संचलन करण्यात या देवीचे कार्य सुरू होते. पारमेष्ठ्य सोमाची आहुति सौरमंडळामध्ये पडल्यावर, यज्ञ उत्पन्न झाला. याचाच अर्थ आहुति देण्याची प्रथा रूढ झाली, तेव्हा यज्ञसंस्था अस्तित्वात आली. यज्ञात दिलेल्या आहुतिमुळे तीन भुवने उत्पन्न झाली, आणि

त्याचे कार्य चालू झाले. ते कार्य करणारी सृष्टीमधील चौथी शक्ति तीं हीच भुवनेश्वरी होय. तिन्ही भुवनांचे पालन करणारी आणि त्यांच्यावर सत्ता गाजविणारी अशी ही भुवनेश्वरी. या देवीचे स्वरूप वरीलप्रमाणे आहे.

भुवनेश्वरी ही उद्‌बुद्ध आहे म्हणून त्याचे निदान इन्दुकिरीट हे होय. सूर्याचा प्रकाश, ताप ( अग्नि ) आणि आहुति ( सोम ) या तीन स्वरूपांचे निदान त्रिनेत्रामध्ये आहे. सृष्टीतील सर्व प्राणिमात्रांना आणि इतर जीवसृष्टीला, ८४ लक्ष योनिसृष्टीला ही देवता अन्न पुरविते, याचे निदान तिच्या वरद हाताने दर्शविले आहे जी भुवने प्रलयरात्रीमध्ये विलीन झालेली होती, ती या शक्तीमुळे विकसित होत आहेत प्रलय करणारी उग्र शक्ति आपली उग्रता टाकून देऊन सृष्टीकडे कृपादृष्टीने भुवनेश्वरी स्वरूपात पाहात आहे, याचे निदान ' स्मेरमुखी ' या शब्दात आहे त्रिभुवनावर अधिकार गाजविण्यासाठी शस्त्रांची जरूरी लागते, याचे निदान अंकुश पाश या आयुधांनी दाखविलेले आहे

या देवीचे संपूर्ण विवरण 'देवी भागवत' पुराणामध्ये केलेले आहे त्यामध्ये या देवीच्या वास्तव्यस्थानाचे वर्णन फारच बहारीचे आहे जिज्ञासूंनी ते मुळातूनच वाचावे त्याबद्दलचे थोडक वर्णन याच ग्रंथातील " पौराणिक देवता " या प्रकरणातील " भुवनेश्वरी " देवीचा इतिहास देताना केलेले आहे.

सृष्टीचे अस्तित्व मूलत यज्ञामध्ये आहे. या यज्ञाचे पाकयज्ञ, हविर्यज्ञ, महायज्ञ, अतियज्ञ आणि शिरोयज्ञ असे पाच विभाग कल्पिलेले आहेत. यांना कोणी कोणी ' गृहयज्ञ ' असेही म्हणतात. त्यामध्येही उपांगे आहेत ती पुढीलप्रमाणे

हविर्यज्ञ— अग्नीहोत्र, दर्शपौर्णिमास्य, चातुर्मास्य, पशुबंध.

महायज्ञ— भूतयज्ञ, मनुष्ययज्ञ, पितृयज्ञ, देवयज्ञ, ब्रह्मयज्ञ

क्रतुयज्ञ— राजसूय, अश्वमेध, वाजपेय.

' छिन्नशीर्षो वै यज्ञ ' म्हणजे जेथे ( किंवा ज्यात ) कापलेली शिरे आहेत तो यज्ञ याचा संबंध पौराणिक काळातील हयग्रीव आख्यानाकडे आहे या आख्यानात विष्णूचा शिरच्छेद केलेला दाखविला आहे कारण आदिमायेने श्रीविष्णूंना तसा शापच दिलेला होता विष्णूचे मस्तक तुटल्यावर ते क्षीरसागरात जाऊन पडले त्यासमयी हयग्रीव राक्षस तप करीत असता त्याने असा वर मागून घेतला होता की, त्याचा मृत्यु श्रीविष्णूकडूनच व्हावा, इतरांकडून न व्हावा. विष्णूचे मस्तक कापले गेल्यावर पशुसदृश यद पडल्यासारखेच झाले होते शेवटी तुटलेल्या मस्तकाच्या ठिकाणी घोड्याचे शीर लावून विष्णूंनी हयग्रीव दैत्याचा

नाश केल्यावर यज्ञसंस्था चालू झाली ( देवीभागवत अध्याय पाचवा ). याठायीच यज्ञाचे शीर कापलेले आहे असे समजतात, आणि म्हणूनच प्रत्येक यज्ञाच्या अंती शिरसंधानासाठी शिरोयज्ञ करण्याची रूढि चालू झाली म्हणजेच कोणत्यातरी पशूचे शीर यज्ञात अर्पण करण्यास येऊ लागले.

यज्ञाला छिन्नशीर्ष का म्हटले याचे विवरण गूढ असल्याने आणि त्याचे संपूर्ण विवेचन करणे येथे शक्य नसल्यामुळे तसे ते केलेले नाही, शिवाय येथे त्याची आवश्यकता देखील नाही. शीर्ष नसलेल्या शरीरास कबंध असे म्हणतात आणि त्याची शक्ति म्हणजेच छिन्नमस्ता ही होय. याच स्वरूपात ती विश्वाचा संहार करते. नुसत्या कबंधाने संहार करता येतो काय ! यासंबंधी मराठ्यांच्या इतिहासात एक उदाहरण आहे. पुरंदरच्या किल्ल्याजवळ मोगल सैन्याला थोपवून धरण्याची कामगिरी श्रीशिवछत्रपतींनी मुरारबाजीवर सोपविली. युद्धात त्या पठ्याचे शीर कापले गेले, तरीही त्याच्या धडाने १०० शत्रुसैनिकांचा निःपात केला अशी कथा प्रचलित आहे. यावरून मानवी धड जे कार्य करू शकते तेच विश्वकार्य देवता का करू शकणार नाही!

छिन्नशीर्ष यज्ञाला अंती शिरोयज्ञ केल्याने हवन मिळते, आणि त्यायोगे पृथ्वीवरील सर्व व्यवहार सुरळीतपणे चालतो. परंतु हवन बंद झाले तर भुवनेश्वरी-रूपाने पालन करणारी शक्ति, छिन्नमस्तारूपाने तिचा नाश करील. या देवीचे निदान श्लोकात पुढे वर्णन केलेले आहे.

वर जी यज्ञाबद्दल माहिती आली आहे, ती साधारणतः उत्तर भारतातील रूढींपैकी आहे. पण दक्षिण भारतामध्ये याचे विवरण जरा निराळे आहे. वाचकांना ती बाजूही समजावी म्हणून थोडक्यात सारांश देत आहे. वैदिक धर्म हा यज्ञप्रधान आहे, हे सर्वांना ज्ञात आहेच. श्रौत आणि स्मार्त असे यज्ञाचे दोन प्रमुख भेद आहेत.

श्रौत यज्ञ कोणते ? महाराष्ट्रामध्ये काही ठिकाणी आपण अग्निहोत्री ब्राह्मण पाहतो. पुणे येथील मीमांसा विद्यालयातील आचार्य अग्निहोत्रीच असावा लागतो. याला श्रौताधान स्वीकारणे अशी संज्ञा आहे. तेव्हा या अग्निहोत्रीने अग्नीवर जे यज्ञ होतात, त्याला श्रौतयज्ञ म्हणतात. जसे विवाहप्रसंगी होणारे होमादिहवन. वैदिक धर्मात मानवाच्या उन्नतीसाठी एकूण ४८ संस्कार सांगितले आहेत, आणि ते गर्भाधानविधीपासून शेवटी शरीरदहनापर्यंत आहेत, या संस्कारांना नित्यकर्म अशी संज्ञा आहे. या ४८ संस्कारांपैकी काही श्रौत व काही स्मार्त विभागांखाली येतात. श्रौत सूत्रांमध्ये आणि ब्राह्मणग्रंथात सांगितलेले ते श्रौतसंस्कार, आणि गृह्यसूत्रांत सांगितलेले ते स्मार्त संस्कार होत.

सप्त पाकसंस्था, सप्त हविःसंस्था, सप्त सोमसंस्था असे २१ संस्था प्रकार या संस्कारात मोडतात. यापैकी सप्त हविःसंस्था गृह्याग्नीवर करतात. जसे स्थालीपाक, अश्वयुजी, अष्टका, श्रवणाकर्म, शूलगव इ० इ० ह्या गृह्याग्नीवर होतात. अग्न्याध्यान, अग्निहोत्र, दर्शपूर्णमास, चातुर्मास्य, पशुबन्ध, सौत्रामणी इ० श्रौत मार्गाने करतात. देवयज्ञ, पितृयज्ञ, भूतयज्ञ, मनुष्ययज्ञ, ब्रह्मयज्ञ हे पंचमहायज्ञ श्रौत कर्मात मोडतात. चयन याग हा स्वतंत्र नसून वर जी सप्तसोमसंस्था दिली आहे, त्याबरोबर केला जातो. याशिवाय उत्सन्नक्रतु, सत्र, सव, मेध असे यज्ञाचे आणखी प्रकार आहेत.

यज्ञामध्ये बकऱ्याचे शीर्ष घ्यावे असे म्हटले आहे, पण इकडील रूढी अशी की, यज्ञामध्ये यज्ञीय पशूच्या ११ अवयवांची आहुति द्यावयाची असते, पण शीर्ष किंवा सर्व शरीराचे हवन सांगितलेले नाही. हवन झाल्यावर पशूला ठार मारतात. ( शंकराचार्य जेरे स्वामी यांच्या प्रवचनावरून )

छिन्नमस्ता

प्रत्यालीढपदां सदैव दधतीं छिन्नं शिरः कर्तृकां ।
दिग्वस्त्रां स्वकबंधशोणितसुधाधारां पिबन्तीं मुदा ॥
नागाबद्धशिरोमणिं त्रिनयनां हृद्युत्पलालंकृतां ।
रत्यासक्तमनोभवोपरि दृढां ध्यायेज्जवासन्निभाम् ॥
दक्षे चातिसिता विमुक्तचिकुरा कर्त्री तथा खर्परं ।
शक्तिः सापि परात्परा भगवती नाम्ना परा डाकिनी ॥

( छिन्नमस्ता तंत्र )

छिन्नमस्ता देवीच्या वरील ध्यानाचे निदान पूर्वी बहुतेक येऊन गेलेले असल्याने द्विरुक्ति-दोष टाळीत आहे. यज्ञरूपी कबंधावर शीर बसविले नाही म्हणजे त्यामधून उडणाऱ्या रक्ताच्या चिळकांड्या छिन्नमस्ता शक्ति पिते, कारण यज्ञातील हवन बंद झाले म्हणजे तिला खावयास दुसरे काहीच नाही, म्हणून आपलाच रस ती शोषून पिते, असे निदान आहे.

या देवतेसंबंधी स्वातन्त्र्यवीर श्री. विनायकराव सावरकर यांनी केलेले हे प्राकृत वर्णन पाहा.

विक्राल क्रोधभरें अति भयंकरा ।
एक्या निजहस्तेंची छाटुनी स्वयें ॥
खड्गानें मुंडफळ आपुलेंच तसें ।
अन्या निजहस्ती घे, आणि जी अहो ॥
रक्ताची धार उडे वीर उफाळुनी ।
लाल लाल चिकट चिकट त्या गळ्यांतुनी ॥
धार तीच घटघट त्या शुद्ध मुखें पी ।
पेल्यातुनी लाल मद्य पी जसे कुणी ।
पिवुनि रक्त आपुलेचि आपली तृपा ।
शांतविल्या त्या प्रचंड रौद्र भीषणा ॥
रुंडधरा छिन्नमुंड, मूर्तीसी नमो ।
नमो नम. सहस्रधा प्रमत्त वर्तते ॥

(" मूर्ति दुजी ती..... "—स्वा. विनायकराव सावरकर)

या देवतेचे महत्त्व तंत्र संप्रदायामध्येही आहे. 'छिन्न मस्त शिरो यस्य' जिचे मस्तक तुटलेले आहे अशी देवता 'धन्वंतरी तंत्रशिक्षा' या ग्रंथामध्ये या देवीचे वर्णन आहे, ते असे—नाभिप्रदेशात असलेल्या प्रफुल्ल आणि शुद्ध कमळाच्या आत सूर्याचा प्रदेश असून तो तांबडा आहे. त्याच्या भोवती सत्व, रज, तम अशी तीन रेषा वलये आहेत. त्याच्या अंतर्भागात या देवीचे वास्तव्य असून, ती कोटी सूर्यांच्या इतकी तेजस्वी आहे. तिच्या एका हातात तिचे स्वत चे मस्तक असून, स्वत च्याच कंठातून वाहणारे रक्त ती पीत आहे. तिचा केशकलाप मोकळा असून, अनेक प्रकारच्या फुलांनी तो सुशोभित आहे. तिचे उजवे हाती तीक्ष्ण शस्त्र असून, गळ्यात रुंडमाळा आहेत. ती नग्न असून, गळ्यात जानव्या-प्रमाणे एक सर्प धारण केलेला आहे. तिच्या पदकमळी रति आणि कामदेव आलिंगन देत असलेल्या अवस्थेत असून, ती त्याच्यावर उभी आहे. ही सुंदर व पुष्टस्तनी असून, डावे, उजवे बाजूला डाकिनी व वर्णिनी देवता उभ्या आहेत. या देवीला मस्तक नसतानाही हिने निशुंभ दैत्याला ठार मारलेले आहे. या देवतेच्या नावाने एक पूजनीय यंत्रही बनविलेले आहे. या देवतेच्या नावाचा मंत्र जप केला असता इष्ट फलप्राप्ति होते.

भैरवी

उद्यद्भानुसहस्रकांतिमरुणक्षौमां शिरोमालिकां ।
रक्तालिप्तपयोधरां जपवटीं विद्यामभीतिं वरम् ॥
हस्ताब्जैर्दधतीं त्रिनेत्रविलसद्वक्त्रां रविन्द्रश्रियं ।
देवीं बद्धहिमांशुरत्नमुकुटां वन्दे समन्दारियताम् ॥ (भैरवी तंत्र)

छिन्नमस्ता शक्तीच्या निदानावरून हे ध्यानात येईल की, तिचा संबंध महाप्रलयानंतर आहे. परंतु या महाप्रलयाव्यतिरिक्त दुसरा नित्य प्रलय आहे. प्रतिक्षणाला प्रत्येक पदार्थ नष्ट होत असतात. नष्ट करण्याचे काम रुद्राचे आहे. हा रुद्र विनाशोन्मुख झाला म्हणजे त्यालाच यम ही संज्ञा देतात. या याम्य-शक्तींची सत्ता प्रधानपणे दक्षिण दिशेला आहे. म्हणून यमाला दक्षिण दिशेचा लोकपाळ मानला आहे षोडशी देवीच्या वर्णनात आपण पाहिलेच आहे की, रुद्राच्या पांच शक्तिपैकी दक्षिणेला अग्निदेवाची सत्ता तर उत्तरेकडे इंद्राची सत्ता आहे. अग्नितेजतत्त्वाचे कार्य नाश करणे हे असल्याने यमाचा धर्म नाश करणे हा दाखविला आहे. या कारणासाठी या दक्षिणमूर्ति यमाला म्हणजे रुद्राला कालभैरव अशी संज्ञा दिली आहे या काळभैरवाच्या शक्तीला भैरवीशक्ति असे म्हणतात. भुवनेश्वरी शक्तीला ज्याप्रमाणे राजराजेश्वरी हे उपनांव आहे, त्याप्रमाणे भैरवी-शक्तीला त्रिपुर भैरवी हे उपनांव आहे. भू , भुव आणि स्व लोकाचा पुरांचा नाश करणारी देवी म्हणून त्रिपुरभैरवी हे नांव आले त्रिभुवनातील पदार्थांचा ही शक्ति नित्य नाश करीत असते छिन्नमस्तादेवी ही परा डाकिनी तर भैरवीही अपराडाकिनी होय. रुद्राचे एक नाव भैरव असे आहे परंतु त्याचा या भैरवी बरोबर अजिबात संबंध नाही

धुमावती

विवर्णा चंचला दुष्टा दीर्घा च मलिनाम्बरा ।
विमुक्तकुंतला वै सा विधवा विरलद्विजा ॥
काकध्वजरथारूढा विलंबितपयोधरा ।
शूर्पहस्तातिरूक्षाक्षा धृतहस्ता वराजना ॥ (धुमावती तंत्र)

सर्व दुःखाचे मूळ कारण रुद्र, यम, वरुण आणि निर्ऋति या देवता होत रुद्रामुळे अनेक प्रकारचे ज्वर, महामारी, उन्माद, संतापजनक प्रकृति निर्माण होते यमामुळे मूर्च्छा, मृत्यु, अंगभंगाचे रोग उत्पन्न होतात वरुणामुळे शरीरावर गाठी येणे, शूल उठणे, उदरात वातविकार निर्माण होणे इत्यादि, रोग

होतात. निर्ऋतिमुळे कलह, दारिद्र्य निर्माण होते. यामुळे तिन्ही शक्तींचे निदान भिकारी, खतखिता, मोडकेतोडके वाडे, फाटकी वस्त्रे, बुभुक्षितपणा, रुदन, वैधव्य इ० इ० ही दृग्गोचर होते, याकरीच 'शतपथ ब्राह्मणा'त (७।२।१।११) या शक्तीचे वर्णन करताना 'घोरा पाप्मा वै निर्ऋति' असे वचन दिले आहे. परंतु या देवतेने मूळस्थान जेव्हा नक्षत्रामध्ये असल्यामुळे त्या नक्षत्रावर जन्म पावलेली व्यक्ती नेहमीच दुःखी आणि दरिद्री राहाते यावर निर्ऋति शक्तीला धुमावती असे नाव देण्यात आले आहे. धुमावती हीच अलक्ष्मी होय. या देवीची मुद्रा भयाळ, भीतिदायक आणि तोंडातील दातांच्या विचित्र ठेवणीमुळे रुक्ष भासते.

पर्जन्यकाळी पृथ्वीवर सर्वत्र पाणीच पाणी झाले म्हणजे अनेक ठिकाणी अनेक वस्तूंची हानि होते हे आपण पाहतो. नद्या-नाल्यांना पूर येऊन पानशेत धरण फुटल्यामुळे जसे पुणे शहराचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले तसे अनेक ठिकाणी घडते. याचाच वैज्ञानिक भाषेत अर्थ असा की, जलमय आप्य प्राण हा असुर-प्राण बनतो आणि सर्वनाश करतो. धर्ममार्तंडांनी पर्जन्याचा विवक्षित कालावधि ठरवूनच दिलेला आहे. आषाढी एकादशी ते कार्तिक शुद्ध एकादशी असा हा सर्वसाधारणपणे चार महिन्यांचा काळ असतो. यालाच चातुर्मास्यकाल असे म्हणतात. या काळाच्या विरुद्ध काळ म्हणजे ऐन्द्रकाळ. हा देवतांचा काळ होय. पर्जन्यवृष्टीमुळे जिकडे तिकडे जलमय सृष्टि झाल्यावर पृथ्वीपिंड आणि सौर-पिंड आपोमय होऊन जातात आणि या आपोमय असुरप्राण्याच्या प्रबलतेमुळे, देवता निष्प्रभ होत असल्याने, निर्बल बनतात. चलनवलन होत नसल्यामुळे शक्ति क्षीण होते याकरीच चातुर्मास्याचा काळ हा देवता झोपल्या असल्याचा काळ मानला जातो त्यामुळे यज्ञोपवित, यानासवत्सप, विवाह इत्यादि इत्यादि धार्मिक विधि या वेळी निषिद्ध मानले आहेत

कार्तिक महिना उजाडला, की पावसाळा आपला काढता पाय घेतो आणि असुरप्राणाची समाप्ति 'नरकचतुर्दशी'चा महन्मगल दिन साजरा करून केली जाते. लगेच दुसऱ्या दिवशी लक्ष्मीपूजन समारंभ होतो आणि लक्ष्मी घरात प्रवेश करते धान्यधुन्य वा संपत्ति यापैकी कोणत्याही रूपाने ती घरात येते. ज्योतिषशास्त्रानुसार कार्तिक महिन्यातील कन्या राशीचा सूर्य 'नीचे'चा समजतात कारण या वेळी सौरप्राण असुरप्राणाच्या आवरणामुळे मलिन झालेला असतो अतिवृष्टीमुळे निर्बल झालेला असतो त्याला तजेला येण्यासाठी दिवाळीच्या वेळी दारूकाम उडविले जाते वरील विवेचनावरून चातुर्मास्य हा धुमावतीचा प्रबल काल असतो हे ध्यानी येईल.

पुराणांतील वर्णनात देवीच्या स्वरूपाचे निदान दिलेले आहे. पर्जन्याच्या माऱ्यामुळे वस्त्रे मलिन झालेली, वेताळरूप केस सुटलेला, गलितगात्र झालेली आणि स्थूळ पयोधर छातीवर लोंबत असलेले, हातामध्ये सूप घेतलेली, अकाली वार्धक्य आलेली, आणि पर्जन्याच्या माऱ्यामुळे रक्षण करण्यास असमर्थ असलेली अशी विधवा, हे या शक्तीचे निदान दाखविलेले आहे. 'पौराणिक देवता' या प्रकरणात या देवीबद्दलची अधिक माहिती मिळावी. काही वेळा मायाराणी-बरोबर या देवीचा संबंध जोडला जातो.

## बगलामुखी

प्राणिमात्राच्या शरीरामध्ये अथर्वा नावाची एक शक्ति आहे. ही स्थूलरूप नसल्याने तिला आपण नेत्रांनी पाहू शकत नाही, परंतु प्रत्यक्षात मात्र अनुभवू शकतो. इंग्रजी भाषेत ज्याला 'पॅरलेल टेलीपाथी' असे म्हणतात, त्यातलाच हा प्रकार आहे. शेकडो मैल दूर राहात असलेल्या आपल्या एखाद्या आप्तेष्टाच्या अगर मित्राच्या दुःखाच्या प्रसंगाने वाटल्या जागी कुठल्याशा कारणाने आपण दुःखी होतो आणि त्या त्या विवक्षित माणसाची हटकून आठवण होते. हा अनुभव कित्येक वाचकांच्या परिचयाचा असेल. याच परोक्षज्ञानाला अथर्वाशक्ति असे नाव ऋषींनी दिले आहे. योगसामर्थ्याने अगर साधना करून आपण जर या शक्तीचे सामर्थ्य वाढविले, तर शेकडो मैल अंतरावरील व्यक्तीचे आकर्षण आपण करवून घ्यावयास करू शकतो. या शक्तीमुळे भावी संकटकाळाचे अगर आनंदपर्वकाळाचे ज्ञान आपणाला नकळत होत असते. मानवापेक्षा कावळा, कुत्रा यांमध्ये ही शक्ति जास्त परिणत झालेली असते, असे अनुभवास येते. आपल्या घरी कोणी पाहुणा येण्यास निघाला, तर अग्रदूताप्रमाणे पुढे धावणारी ही शक्ति कावळ्याला दिसते व तो ओरडू लागतो. या ओरडण्याचे निदान ठरलेले असल्यामुळे कावळा ओरडला म्हणजे आपल्या घरी पाहुणा येत आहे असे महाराष्ट्रीय लोक मानतात. या अथर्वाशक्तीमुळे घरी येणाऱ्या पाहुण्याचे ज्ञान कावळ्याला होत असते आणि त्याच्या आगमनाची शुभवार्ता तो मानवाला अगोदर कळवीत असतो.

या पक्ष्याच्या पूर्वज्ञानाचे आणखी उदाहरण पहा. अमरावतीपासून सहा मैल अंतरावर वरणगाव हे लहानसे खेडे आहे. सुमारे पन्नास वर्षांपूर्वीची गोष्ट आहे (सन १९१९). अमरावतीहून एक सत्पुरुष मार्कंडबाबा एके दिवशी बैलगाडीत बसून त्या गावी जात होते. गाडीत चारपाच इतर माणसे होती. त्यामध्ये नरहर कान्हे नावाचा मुलगाही होता. गाडी आस्ते कदम चालली असता

काही वेळाने एक कावळा झाडावर मोठमोठ्याने ओरडत होता. पक्ष्यांची भाषा यांना अवगत असल्याने त्यांनी लक्षपूर्वक त्याचे म्हणणे ऐकले. त्याचा अर्थ गाडीतील मंडळींना सांगितला. तो असा की, कोणी एक बाई पुढे नदीवर पाणी भरण्यास गेली आहे, ती पाणी भरून वर किनारी आली म्हणजे शेणाचे पोवात पाय पडून घसरेल, खाली पडेल आणि डोईवरचे मातीचे घडे फुटतील. नदी लांब असल्याने या बोलण्याकडे विशेष कोणी लक्ष दिले नाही सुमारे अर्धातासाने त्यांची गाडी जेव्हा नदीजवळ आली तेव्हा बावांनी सांगितलेले कावळ्याचे शब्द त्यांना आठवले, आणि ते ततोतत खरे ठरले. प्रत्यक्षात एक बाई पडली, आणि पाण्याचे डेरे फुटले. तात्पर्य, कावळ्यांना हे पूर्वज्ञान येते असे दिसते.

( निवेदक नरहरशास्त्री कान्हे )

लेखक सकाळी कावळ्यांना काही पदार्थ खावयास टाकतो, तेव्हा त्यांच्या हालचाली अनेकदा सूचक असतात याचा अनुभव घेतलेला आहे, पण विस्तार भयास्तव तो येथे टाळीत आहे.

एक विशिष्ट वयोमर्यादा गाठलेल्या आणि विशिष्ट मानसिक पातळी तयार असलेल्या मानवाला नेहमी अनुभव येतो. तो असा की, आपण बरेच दिवस आपल्या मित्राच्या घरी गेलेले नसावे, आणि एकाद्या दिवशी मनाला रुखरुख सकाळपासून लागून रहावी व सायंकाळी त्याच्याकडे जावे. तेथे पोहोचल्या-बरोबर तो म्हणतो, " आज सकाळपासून सारखे वाटत होते की, तुम्ही येणार म्हणून. " सारांश हाच की, एकमेकांच्या भेटीची आंतरिक इच्छा एकाच वेळी. दोन निरनिराळ्या ठिकाणी या शक्तीमुळे उत्पन्न होते. किंबहुना असाही अनुभव येतो की, एकाद्याला भेटण्याची जबरदस्त इच्छा निर्माण झाली म्हणजे, ती इच्छा-शक्ति त्या दुसऱ्या व्यक्तीला न कळतच त्या दिवशी अगर दुसऱ्या दिवशी त्याच्या घरी ओढून नेते व भेट होते. हा सर्व शक्तीचाच गोळ असला पाहिजे.

याचप्रमाणे दुसरे उदाहरण कुत्र्याचे देतात. सध्याच्या वैज्ञानिक युगात गुन्हे हुडकून काढण्यासाठी कुत्र्याचा उपयोग केला जातो. परंतु हा शोध पाश्चिमात्यांचा आहे, असे समजून आपण आर्यवंशज त्यांचेच गोडवे गात बसतो. परंतु हे आपले शुद्ध अज्ञान आहे. आर्यांच्या तल्लख बुद्धीतून निघालेले सर्व ज्ञान 'साहेबा'ने आपल्या सुपीक डोक्यात पचविले आणि ' बिन-बैलाची गाडी " हाकून दाखवून आपल्याला मात्र शुद्ध होयबा बनविले. असो. पूर्वी देखील गुन्हे हुडकून काढण्यासाठी कुत्र्याचा उपयोग केला जात असे, याबद्दलचे एक उदाहरण वेदामध्ये दिलेले आहे. वेदात असे स्पष्ट म्हटले आहे की, बृहस्पतीच्या गायी चोरीला गेल्यावर त्याने देवांचा राजा इंद्र याजकडे

वेळी नकारात्मकच उत्तर आले. कानात दगलीचा आवाज तर पुन्हा पुन्हा सुरू लागला. त्यामुळे मन अतिशय अस्वस्थ झाले. कर्तव्याचा स्टकती तलवार शिरावर टांगलेली असल्यामुळे मन कचेरीत स्वस्थ बसू देईना. म्हणून हाताखालचे काही शिपाई बरोबर घेऊन आम्ही मोटारीत बसून शोधाशोधीसाठी समग्र निघालो. त्या भागात सर्वत्र फिरलो. परंतु दगलीचे कसलेच चिन्ह तिथे दिसले नाही. उलट, ज्या काही इसमांना "येथे दगल झाली होती का?" असे विचारले, त्यांनी त्या वेळी तेथे असलेल्या शांततेचा उल्लेख करून आम्हालाच वेड्यात काढले. परंतु इतक्यात काय आश्चर्य! अचानक एका चाळीतून रॉकेल तेलात भिजवून पेटविलेले गोळे तेथील अनेक झोपड्यावर पडून पडले शिपायांच्या सहकार्याने जेवढे धक्के टाळता आले तेवढे टाळले. परंतु ही प्रयत्नाची शिरस्त पाच दहा मिनिटे करीत असताना काही गोळे झोपड्यांच्या मध्यभागी पडले आणि ते काढण्यापूर्वीच झोपड्यांनी पेट घेतला दादरचे अग्नि शामकाचे ठाणे जवळ असल्याने त्यांना वर्दी दिली. परंतु आगीचा बंब येऊन आग विझविण्यापूर्वीच अनेक झोपड्या भस्मसात झालेल्या होत्या. मी त्या वेळी परमेश्वराचे एवढेच आभार मानले की, भयंकर स्वरूपात होणारी हानि थोडक्यात टळली प्राणावर बेतलेले बोटावर निभावले! परंतु ही अशी पूर्वसूचना देणारी संवेदना मला का आणि कशी झाली हे कोडे मला त्या वेळी उलगडले नाही पण हे प्रकरण लिहीत असताना त्यामागची शास्त्रीय बैठक मला कळून चुकली माझी अंतर्बाह्यशक्ति जागृत असल्याने तिनेच ती पूर्वसूचना मला दिली होती असाच प्रकार दोन तीन वेळा घडलेला आहे त्याच्या सविस्तर वर्णनाची येथे जरूरी नाही.

भाऊ रघु कुंदे, रा सिन्नर (नाशिक) याचा भाऊ गोविंद त्याचा खून दोन वर्षांपूर्वी झाला त्याने भाऊला स्वप्नात येऊन सांगितले की, तो खून पंढरीनाथ नावाच्या शेजाऱ्याने केला कोणत्या जागी खून झाला, हेही सांगितले. भाऊने हे स्वप्न पोलीसाना कळविले. चौकशीअंती खुनाचे अवशेष निर्दिष्ट केलेल्या जागी सापडले आणि आरोपी पकडला गेला

मानवाला अतींद्रिय ज्ञान असते याचाच हा पुरावा होय. मानवाला सर्व ज्ञान इंद्रियजन्य अनुभूतीनेच होते, हेच अनुमान सत्य नव्हे भाऊला स्वप्नात झालेली खुनाची जाणीव ही ऐंद्रिय नाही, ती अतींद्रिय होती हे मानावेच लागेल. नामदेवरायांनी तुकोबांना केलेला उपदेश अगर तुकोबांनी निळोबाना दिलेला उपदेश हे स्वप्नातच होते 'ट्रू डिटेक्टिव्ह' या अमेरिकेतील मासिकाने वरील गोष्टींची दाद घेतली आहे यावरून अतिंद्रिय ज्ञानाचे महत्त्व लक्षात यावयास

शक्त नसावी. यथा कन्यका ब्रवीति श्वो मे भ्राताऽऽगन्तेति हृदये मे कथयति ! भाष्यकारांनी आपल्या वैशेषिक शास्त्रामध्ये, तसेच न्यायकदलीकारांनी हे उदाहरण दिलेले आहे वरील सूत्राचा भावार्थ असा की, मानवालाही पशु प्रमाणे एखाद्या वेळी त्रिकालज्ञ ज्ञान उत्पन्न होते. प्राचीन काळी त्रिकालज्ञ म्हणजे तिन्ही काळाचे ज्ञान असणारे अनेक ऋषिमुनि भारतामध्ये, होते हे व्यासासारख्यांचे वरून दाखविता येते या ठिकाणी कन्या म्हणते, " माझा भाऊराया उद्या येईल असे माझे मन मला सांगत आहे " अशी मन संवेदना असणे हे एक ज्ञानी-पणाचे लक्षण मानले जाते. वराहमिहिरासारख्या वेदान्त्यांनी या संवेदनाचा स्वीकार केलेला आहे. मानस तारायंत्र ( टेलेपथी ) आणि मानसचिकित्सा ( Mental healings ) इ० पाश्चिमात्य शास्त्रांच्या गोष्टी याच भारतीय शास्त्रा वर उभारलेल्या आहेत, यात संशय नसावा (चातुर्य चंद्रोदय, अष्टमषष्टी, ले गुळवराव महाराज, पृ. १३६ )

अथर्ववेदाप्रमाणे या शक्तीचे दोन भाग सांगितले आहेत पहिला घोरांगिरा आणि दुसरा अथर्वांगिरा या दुसऱ्या शक्तीचे नाव वल्गामुखी असे आहे, आणि त्याचाच अपभ्रंश बगलामुखी असा झालेला आहे. या शक्तीचे सामर्थ्य वाढविले तर आपल्या शत्रूला आपण वाटेल तसा त्रास देऊ शकतो. यालाच 'कृत्याप्रयोग' असे म्हणतात आपला शत्रु कितीही लांबवर असू दे. कृत्याप्रयोग केल्यावर तेथे तो त्याजवर लागू होतोच होतो यासाठी विशेषत मांत्रिक लोक या विद्येची उपासना करतात, आणि या विद्येचा दुसऱ्यांवर प्रयोग करतात राजकारणी लोक आपल्या शत्रूचा काटा काढण्यासाठी या विद्येचा प्रयोग करतात

जिह्वाग्रमादाय करेणदेवीं । वामेन शत्रून् परपीडयन्तीम् ।
गदाभिघातेन च दक्षिणेन । पीताम्बराढ्यां द्विभुजां नमामि ॥
( बगलामुखी तंत्र )

याचा सारांश असा की, आपल्या शत्रूला देवी त्याची जिव्हा धरून फराफरा ओढते आणि त्याच्या डोक्यात गदा घालून त्याचा नाश करते अशा या द्विभुजा देवीला माझा नमस्कार असो. या स्वरूपाच्या निदानामध्ये विशेष असा गूढार्थ नसल्यामुळे विवेचनाची जरूरी नाही 'पौराणिक देवता' या प्रकरणात या देवीबद्दल थोडी अधिक माहिती मिळू शकेल, ती तेथे पाहावी.

**मातंगी**

या देवतेचे वर्णन अन्यत्र 'ग्रामदेवता' प्रकरणात आलेलेच आहे, त्यामुळे येथे द्विरुक्ति केली नाही

कमला

ही देवता धुमावती शक्तीच्या अगदी विरुद्ध आहे. धूमावती ही जेष्ठा नक्षत्रावर जन्म पावल्यामुळे अवरोहिणी झाली, तर कमला ही रोहिणी नक्षत्रावर जन्म पावल्यामुळे रोहिणी झाली. धुमावती ही आसुरी तर कमला ही दैव्या, ती दरिद्री तर ही लक्ष्मीस्वरूप. जेष्ठा नक्षत्रावर जन्म पावलेली व्यक्ति ही जशी जन्मदरिद्री राहाते, तद्वत् त्याच्याउलट रोहिणी नक्षत्रावर जन्म पावलेली व्यक्ति जीवनात अतिशय सुखासमाधानाने जगते. या देवतेचे स्वरूप आणि तिच्याबद्दल अधिक माहिती ' शक्तिपीठ ' प्रकरणात पाहावी.

आतापर्यंत पाहिलेल्या वरील दशमहाविद्याशक्तींशिवाय अनेक इतर शक्ति आहेत. त्यातील काही महाविद्या आहेत, तर काही महारात्री, काळरात्री, मोहरात्री, दारुणरात्री आहेत. परंतु त्या सर्वांचे वर्णन करणे स्थलाभावी अशक्य आहे. परंतु यासंबंधात अधिक विवरण ' शक्तिपीठदेवता ' या प्रकरणात पाहावे.

( वरील दशमहाविद्याशक्तींचे विवरण. कल्याण शक्तिअंक १९३४ यातील श्री. मोतीलालजी शर्मा, गौड, यांच्या लेखाच्या आधारे केलेले आहे. )

वरीलप्रमाणे जरी दशमहाविद्यांची वैज्ञानिक उत्पत्ति झालेली असली तरी रूपकाने ती आणखी एका वेगळ्या रीतीने उपलब्ध आहे. दक्षयज्ञाच्या वेळी शंकरांना दक्षाकडून निमंत्रण मिळाले नाही. शंकरांनाच नव्हे तर प्रत्यक्ष सतीलाही कोणी बोलाविले नाही. तरीपण माहेराबद्दल वाटणाऱ्या स्वाभाविक ओढीमुळे तिने शंकराजवळ माहेरी जाण्यास अनुज्ञा मागितली. शंकरांनी तशी अनुज्ञा देण्याचे का नाकारले, याचे सविस्तर विवेचन " दक्ष-यज्ञ " प्रकरणात केलेले आहे. परंतु त्यामुळे सतीची मात्र गैरसमजूत झाली. श्रीशंकर आपल्यावर नवरेपणाचा हक्क बजावू पाहात आहेत आणि ते आपले पति आहेत याचा त्यांना गर्व झालेला आहे म्हणून त्यांनी अनुज्ञा देण्यास नकार दिला असा क्षुद्र विचार तिच्या मनात आला, आणि शंकरांचा अहंकार नष्ट करण्यासाठी तिने उपाय-योजना केली. त्या आदिमायाशक्तीने आपले स्वरूप विशाल बनविले आणि त्यायोगे शंकरांना भिवविण्याचा प्रयत्न केला. भागवतकारांनी या रूपाचे अतिशय सुंदर वर्णन केलेले आहे ते मुळातूनच वाचावयास पाहिजे. सतीचे ते विशाल स्वरूप पाहून शंकर भयभीत झाले, आणि ते सैरावैरा पळू लागले. पार्वतीचे ते उग्र विशाल स्वरूप आणि तिचा तो कर्णकटु आणि कर्कश आवाज त्यांना सहन होईना. सतीला आपल्या पतीला सोडावयाचे नव्हते तर त्याचे फक्त गर्वहरण करावयाचे होते. आपण स्वतः कोण आहोत हे तिला त्यांना दाखवा-वयाचे होते. यासाठी शंकर पळू लागल्यावर त्यांना रोखण्यासाठी दाही दिशांना

तिने आपली निरनिराळी स्वरूपे उभी केली आणि त्यांचा मार्ग रोखून धरला. वर महाकालीच्या वर्णनात 'विश्वाच्या विनाशशाळी ती भैरवरा इतस्तत: धावत असते.' असे विधान आहे. त्याला अनुलक्षूनच हे रूपक बनविले असावे असे वाटते. कारण या ठिकाणी त्या महाशक्तीला यज्ञ विध्वंसनाचे काम करावयाचेच होते. असो. ते हा पार्वतीच्या या कडक बंदोबस्तामुळे शंकरांना कोठेच निसटून जाता येईना. इकडे तिकडे पळून पळून अखेर दमून गेल्यावर ते त्या विशाल स्वरूपालाच दोवटी शरण गेले. त्या वेळी सती शंकरांना म्हणाली, "आदिशक्ति मूळमाया मीच असून तुम्हाला वरण्यासाठी दक्षाच्या पोटी मी सतीरूपाने जन्म घेतला आहे. आता जे मूळ स्वरूप तुम्ही पाहिलेत तेच मला दक्षयज्ञ विध्वंसनाच्या वेळी घ्यावे लागेल." नतर ती शांत झाली आणि अर्थातच शंकरांनी तिला माहेरी जाण्यास अनुज्ञा दिली.

या ठिकाणी दशमहाविद्यांची नावे काली, तारा, षोडशी, भुवनेश्वरी, भैरवी, छिन्नमस्ता, सुंदरी ( कमळा अथवा महालक्ष्मी ), बगलामुखी, धुमावती आणि मातंगी या क्रमाने आहेत. या दशमहाविद्यांचे मूळ कार्य उच्चाटण, क्षोभन, स्तंभन इत्यादि सांगितले आहे. सर जॉन वुड्रॉफ यांच्या ग्रंथाच्या आधारे या क्षोभन, स्तंभन विद्यांचे स्थान दशमहाविद्येमध्ये मोडते. त्यांच्या मते या देवता निरनिराळ्या गुणप्रधानात्मक आहेत. काली ही शुद्धतत्त्व गुणप्रधान, निर्विकार, निर्गुण, ब्रह्मस्वरूप व प्रकाशिका आहे. ताराशक्ति ही सत्वगुणात्मिका आहे. षोडशी, ( महात्रिपुर सुंदरी ), भुवनेश्वरी, छिन्नमस्ता या राजसप्रधान आणि सत्त्वगुणात्मिका होत. या देवतांची उपासना मोक्षदायी ठरते. धुमावती, बगला, मातंगी आणि कमळा या तामसी असून त्यांची साधना केल्याने षट्कर्ममार्गाने शत्रूचा मृत्यु घडवून आणता येतो. त्याला हानि पोहोचविता येते.

या देवतांची वर्गवारी दोन कुळांत केलेली आहे. पहिले कालीकुल आणि दुसरे श्रीकुल कालीकुळातील देवता काली, तारा, रक्तकाली, भुवना, मर्दिनी, त्रिपुरा, त्वरिता, दुर्गा आणि प्रत्यंगिरा या होत. श्रीकुळातील देवता सुंदरी, भैरवी, बाला, बगला, कमला, धुमावती मातंगी, विद्यास्वप्नवती, महाविद्या-मधुमती या होत. पहिल्या कुळातील देवतांची पूजा ज्ञानमार्गी करतो. तर दुसऱ्या कुळातील देवतांची पूजा कर्ममार्गी करतो. 'उपासनारहस्य' या ग्रंथामध्ये श्री. प्रसन्नकुमारशास्त्री यांनी या दशमहाविद्याशक्तींचे खुलासेवार वर्णन केलेले आहे.

वरती कमलाशक्तीचे विवरण केल्यावर असे म्हटले आहे की, "लहानसहान अनेक विद्याशक्ति आहेत. परंतु स्थळाभावी त्यांचा निर्देश केलेला नाही." तेव्हा

वरील परिच्छेदात त्यापैकी काही देवतांची नावे आलेली दिसून येतील. देवतांची जी नामावली वर दाखविली आहे ती तर्कशुद्ध आहे असे मात्र प्रथमारंभी जी रूपे आपण सविस्तर पाहिली त्यावरून वाटत नाही.

शक्तीने आपले विशाल स्वरूप दाखवून शंकराना रोखून धरले असे, वर्णन जे आले आहे ते रूपक आहे यांत अजिबात संशय वाटत नाही. निरनिराळ्या विद्यांची उत्पत्ति आणि कार्ये, जी वर विवेचन केली आहेत तेच सत्य स्वरूप समजावयास पाहिजे. रूपकामुळे फक्त दशमहाविद्या का उत्पन्न झाल्या, हेच दाखविले आहे. परंतु ते संपूर्ण चित्र नव्हे, हे वाचकांनी ध्यानी धरावे. शक्ति मानापेक्षा शक्ति प्रबल हेच दाखविण्याचा उद्देश असावा.

कामाख्या शक्तिपीठाच्या ठिकाणी एक दशमहाविद्याशक्तीचे स्थान आहे. त्याची नावे पुढीलप्रमाणे. ( १ ) भैरवी, ( २ ) कामाख्या, ( ३ ) प्रकाण्डचंडिका, ( ४ ) मातंगी, ( ५ ) त्रिपुरा, ( ६ ) अंबिका, ( ७ ) बगला, ( ८ ) भुवनेशी, ( ९ ) धुमिनी ( धुमावती ) या शक्तींचा क्रमही फार वेगळा आहे आणि कामाख्या, त्रिपुरा, अंबिका यांची गणना या विद्येमध्ये केलेली आहे. अर्थातच महाकाली व कमला ह्या देवता त्या यादीतून वगळल्या आहेत.

ही दुसरी एक यादी पहा. प्रथमारंभी वर्णनाशी जुळणारी आहे.

काली, तारा, महाविद्या, षोडशी, भुवनेश्वरी ।
भैरवी, छिन्नमस्ता च विद्या धुमावती तथा ॥
बगला, सिद्धविद्या च मातंगी, कमलात्मिका ॥

तसेच हा तिसरी यादी पहा.

काली, नीला, महादुर्गा त्वरिता छिन्नमस्तका ।
वाग्वादिनी, चान्नपूर्णा, तथा प्रत्यंगिरा पुन्हा ॥
कामाख्यावासिनी बाला मातंगी शैलवासिनी ॥

( तंत्रसार, मालिनीविजय तंत्र )

यावरून असे दिसून येईल की, या महाविद्यांच्या नावांमध्ये एकवाक्यता नाही. ज्या तंत्रकाराला जी नावे सोयीची वाटली ती त्याने दिलेली दिसतात. हे असे का व्हावे, ते तंत्रग्रंथकार अथवा सूत्रधारच जाणोत. परंतु सर्वसाधारणपणे प्रथमारंभी जी दहा रूपे महाकालीपासून कमळाशक्तीपर्यंत दिलेली आहेत, ती ग्राह्य मानण्यास कोणाची हरकत नसावी. कारण या शास्त्रावर बरेच संशोधन

झाल्यानंतर सन १९३४ साली ती क्रमाक्रमाने आणि वैज्ञानिक भूमिकेवरून दिलेली आहेत.

कृष्णरूपा कालिका स्यात्, रामरूपा च तारिणी। बगला कूर्ममूर्तिः स्यात्। मीनो धुमावती, छिन्नमस्ता नृसिंहः स्यात्, भैरवी वराहः स्यात्। सुंदरी जामदग्न्यः स्यात्, वामनो भुवनेश्वरी। कमला बुद्धरूपा स्यात्, दुर्गा स्यात्कल्किरूपिणी। स्वय भगवती काली कृष्णस्तु भगवान् स्वयम्॥

या ठिकाणी दशमहाविद्यादेवीचा संबंध दशावतारावरोबर जोडलेला दिसतो. धुमावती–मत्स्य, बगळामुखी–कूर्म, भैरवी–वराह, छिन्नमस्ता–नृसिंह, भुवनेश्वरी–वामन, सुंदरी–परशुराम, तारिणी–राम, कालिका–कृष्ण, कमला–बौद्ध, दुर्गा–कल्की. श्रीकृष्ण हा साक्षात् षोडशकलापूर्ण भगवान असून स्वतः कालीदेवी त्याच्यारूपाने गोकुळात प्रकट झालेली आहे. (कल्याण-नारीअंक, १९४८, पृष्ठ ६३).

स्रग्धरा

दक्षानें यज्ञकालीं सतिनिजतनया नाहिं बोलावियेली।
रक्षाया स्वाभिमाना पितु गृहिं सतीला जायया बंदि झाली।
स्वाध्वी कोपायमानी स्वमनिं समजली दर्प शंभू धरापें।
त्याच्या दर्पा हराया सति त्वरित धरी रौद्र भेसूर रूपें॥ १॥

दिंडी

मूलप्रकृतीचें देखुनी स्वरूप।
रुद्र झालासे भीरु हरणिं रूप॥
पळो लागे दशदिशा व्याध मार्गे।
प्राण रक्षाया सती चरणीं लागे॥ २॥

हरिणी

द्रवलि मनिं ती आदिशक्ति पळापळी पाहुनी।
अभय पतिला देती झाली उपायहि योजुनी॥
त्वरित प्रकटे दाही दिशा धरी शिव रोखुनी।
उगम दशमा माहाविद्या असा मिळतो जनीं॥ ३॥

त्रिपुर सुंदरी— दशमहाविद्या देवतेपैकी षोडशी ही तिसऱ्या क्रमांकाची शक्ति होय. यामध्ये असे वर्णन मिळते की, शिव हा पंचमुखी आहे. त्याचे उत्तर दिशेकडील जे रुद्रात्मकरूप आहे, त्यामध्ये षोडशी शक्तीचा पूर्ण विकास झालेला आहे भू, भुव आणि स्व हे तिन्ही लोक म्हणून या महाशक्तीमुळे उत्पन्न झाले आहेत आणि म्हणून या शक्तीला त्रिपुर सुंदरी असे नाव प्राप्त झाले.

या शक्तीला बाला त्रिपुर सुंदरी, महात्रिपुर सुंदरी अशी नावे सूर्याच्या कमाजास्त प्रकाशशक्तीच्या संदर्भाने प्राप्त झाली आहेत जसे प्रभाती असणारा बालसूर्य, बाला त्रिपुर सुंदरी, तर माध्यान्हीला असणारा प्रखर सूर्य हा महात्रिपुर सुंदरी स्वरूपाचा होय

मानव शरीराचे संचलन करणारी त्रिपुर शक्ति ही या प्रकाराशिवाय वेगळी मानावी लागेल दशमहाविद्यांचा उपयोग जारण मारण तंत्रात सर्रास करतात त्यामुळे त्रिपुर सुंदरी देवतांचा उपयोग त्या कार्याकडेही केलेला आढळून येतो

प जगन्नाथ याला त्रिपुर सुंदरीची उपासना करीत असत प्रथम पत्नी निवर्तल्यावर, पित्याच्या आज्ञेप्रमाणे, त्यांनी या देवीची उपासना केल्यावर, त्यांना दृष्टांत मिळाला की, "इच्छेप्रमाणे गत पत्नी भामिनी रूपाने उत्तर प्रदेशी लाभेल व ती सुसंस्कृत असेल यापुढे त्याने मायदेश सोडून उत्तरेकडे जावे" असेही सांगितले जाते की, देवी स्वत प्रकट झाली, आणि त्याने केलेल्या पुरश्चरणाचा प्रसाद म्हणून त्याच्या मुखात विडा घातला

मुसल्मान तरुणीबरोबरचा जगन्नाथाचा विवाह अनेकांना आवडला नाही, तसा तो वाराणसी येथील हरि दीक्षितांनाही आवडला नाही हा विवाह तोडण्याची त्यांनी अनेक कारस्थाने केली. त्यामध्ये छिन्नमस्ता देवीची मर्जी संपादन करून घेतल्यावर, पंडित आणि भामिनी यांची दोन रक्तबंबाळ मस्तकं त्याने मागून घेतली ती शिरकमले दोघांकडे पाठवून, पंडिताने भामिनी मेली असे समजावे आणि तिने पती मेला असे समजावे व त्यांची ताटातूट व्हावी, हा हेतु मुळात होता हे सर्व कार्य सावकाश व सावधगिरीने करावयाचे असल्याने तीन महिन्यांची मुदत मागून घेतलेली होती ती शिरकमले दोघांकडे पाठविली गेली. पण त्या दोघांनी न घाबरता, एकमेकांना शोधणे चालूच ठेवले.

भामिनीच्या शोधार्थ पंडित चंबळा नदीच्या काठाकाठाने जात असता अतिशय ग्लानी आल्यामुळे एका वृक्षाखाली हताश होऊन पडला. जगन्नाथाचा घटकाळ समाप्त व्हाव्याची वेळ आली होती तीन महिन्याची मुदत भरत आली होती. अशा वेळी एक ९० वर्षांची वृद्धा, काठी टेकीत टेकीत त्या स्थळी

प्राप्त झाली आणि पंडितांना सावध केले. या वृद्धेचे दर्शन झाल्याबरोबर छिन्नमस्ता देवीचा मोहपाश दूर झाला आणि पंडित त्या वृद्धेला पाहून ढसाढसा, ओक्साबोक्शी रडू लागला. त्याच वृद्धेला मातास्वरूप मानले, तिच्या चरणावर मस्तक ठेवले, आपली दैन्यवाणी स्थिति कथन केली. शेवटी त्याने त्या अनोळखी स्वरूपाची करुणा भाकली की, अनात्तर झालेले दुःख निवारण व्हावे. ती वृद्धा म्हणाली, "अरे, तू तर राजमान्य पंडित, आणि संकटसमयी असे वर्तन कसे करतोस?" पायावर डोकी ठेवून तो त्रिवार उच्चारला, "मी पंडित नाही, मी पंडित नाही, मी पंडित नाही." असे सांगतात की, पंडिताला गर्व झाल्यामुळेच त्यावर ही संकटपरंपरा ओढविली होती.

त्या वृद्धेने पंडिताचे सांत्वन केले, त्याचा गर्व विरघळला आहे हेही पाहिले आणि म्हणाली, "तुझा गर्व नष्ट झाला आहे, आता वाराणशीला जावे. एक महिन्याने गंगामय्या तुझे हेतू पूर्ण करील. तुझा संकटकाळ संपलेला आहे." इतके बोलून ती वृद्धा काठी टेकीत टेकीत जवळच्या झाडीत शिरली आणि गुप्त झाली. पंडितजी उठले आणि इकडे तिकडे तिचा शोध घेतात, तर ती अदृश्य झालेली होती.

पंडिताची हितकर्ती ही कोण वृद्धा होती? साक्षात् बाला त्रिपुर-सुंदरी, त्या रूपात तेथे अवतरली होती. पंडितांचा गर्व गेला आहे याची खात्री करून घेतली आणि आशीर्वाद देऊन गुप्त झाली.

(पं. जगन्नाथ चरित्र, ले. रा. म. भांबूरकर, पृ. १०१)

भारताच्या दक्षिण टोकाची देवता कन्याकुमारी ही सुद्धा बाला देवीचेच स्वरूप काही देवीभक्त मानतात.

—

# अधिकारी विद्वानांचे अभिप्राय

★

## श्रीद्वारका शारदा पीठाधीश्वर जगद्गुरु शंकराचार्य

श्रीशक्तिविषयलिखितेषु निबन्धेषु अन्यतमोयं निबन्धः विविध-विषयेषु निबन्धेषु नितरामतिशेते इत्यत्र न संशयलेशः लौकिककार्ये निर्वाहितजीवन अप्येते लेखका वेदपुराणादिविविधग्रन्थकृतपरिश्रमः भारतीयविविधतीर्थक्षेत्रयात्राप्राप्तनैकविषयज्ञानाः शक्तिस्वरूपाया भगवत्याः स्वरूपविशेषान् लीलाचरित्रमूर्तिमंदिरशिल्पसंप्रदायभेदांश्च अनितसाधारणरूपेण सम्यक् परिशील्य विशालेस्मिन् ग्रन्थे जनसाधारण-सुखावबोधाय स्वमातृभाषायां प्रत्यपादयन्निति दृष्ट्वा श्रुत्वा च सुतरां सन्तुष्यन्ति अन्तरंगमस्माकम् ।

सा परा शक्तिः ग्रन्थकृद्भ्यः एभ्यः सर्वप्रकारकां मंगलपरम्परां आतनुतात् ग्रन्थश्चायं भाषान्तरेष्वपि प्रसिद्धिमियात् इति शुभा आशिषः प्रयुज्यन्ते इति शिवम् ।

◆ ◆ ◆

## श्रीमज्जगद्गुरु श्री शंकराचार्य (स्वामी महाराज वाडीकर–जेरे)
संस्थानमठ संकेश्वर–करवीर–

गोरेगाव मुंबई नं. ६२ येथील श्री अंबामातेचे मंदिरात वैदिक धर्माचे प्रचारासाठी आचार्यपीठाचें वास्तव्य झाल्या वेळीं, तेथील सुप्रसिद्ध गृहस्थ श्री. प्रल्हाद कृष्ण प्रभुदेसाई यांनी स्वतः अनेक परिश्रम करून 'आदिशक्तीचे विश्वस्वरूप (देवीकोश)' नावाचा एक प्रचंड ग्रंथ लिहून तयार केला आहे, तो ग्रंथ आचार्यपीठाकडे अवलोकनार्थ आला. त्या सर्व ग्रंथाचे संपूर्ण अक्षरशः निरीक्षण करता आले नाही. तथापि सामान्यतः त्या ग्रंथाचे वाचन करण्यात आले. त्यावरून या ग्रंथात भारतातील सर्व व परदेशातील श्री 'आदिशक्तीची' अनेक पवित्र स्थाने आहेत, ह्या सर्वांचे एकत्र संकलन मोठ्या परिश्रमानें केले असल्याचें आढळून आले. हा संपूर्ण ग्रंथ सुमारे १५०० पानाचा झाला आहे, व त्याचे तीन खंड होणार आहेत. हा ग्रंथ लवकरच छापूनही प्रसिद्ध होणार

आहे. अनेक विद्वानांचे या ग्रंथास अभिप्राय उत्तमपणे लाभलेले आहेत. त्यावरून या ग्रंथाची उपयुक्तता व महत्त्व याची जाणीव होते. या ग्रंथाच मुद्रणासाठीही महाराष्ट्र राज्य सरकारकडून अनुदान मिळण्याचे आश्वासन मिळालेले आहे.

या ग्रंथात दशमहाविद्या, योगिनी व मातृका, सामाजिक देवता, व्रतदेवता, ग्रामदेवता, पीठदेवता, वैदिक देवता, पाश्चिमात्य देवता इ० इ० अशा अनेक देवतांची माहिती सप्रमाण व सोपपत्तिक दिली आहे. आपल्या भारतात आदिशक्तीची उपासना करणारे भाविक बहुसंख्य आहेत, त्यांना हा ग्रंथ फार उपयोगी पडेल. ज्या मधमाशा अनेक ठिकाणचे रस एकत्र करून मधाचे सुंदर पोळे तयार करतात व त्या मधाचा लाभ आपणांला अनायासे होतो, त्याप्रमाणे विश्वातील आदिशक्तीची माहिती, मराठी भाषेत आणून, एवढा मोठा ग्रंथ निर्माण करणे हे अत्यंत परिश्रमाचे काम आहे. श्री अंबिकेच्या प्रसादाने हा ग्रंथ लिहिण्याचे सामर्थ्य त्यांना लाभले आहे. लेखकास प्रसिद्धीचा आनंद उपभोगण्यास मिळावा, यासाठी दीर्घायुष्य आरोग्य लाभावे, याविषयी श्रीशारदा चंद्रमौलीश्वराराधन समर्थी श्री संस्थान देवतेची नित्य प्रार्थना आहे.

◆ ◆ ◆

## वेदमूर्ति पंडित **श्रीपाद दामोदर सातवळेकर**, पारडी आश्रम

श्रीयुत प्रल्हाद कृष्ण प्रभुदेसाई, मु. गोरेगाव यांचा 'आदिशक्तीचे विश्वस्वरूप' (देवीकोश) हा अपूर्व ग्रंथ मी काळजीपूर्वक अवलोकन केला. या ग्रंथामध्ये त्यांनी देवतासंबंधीची उत्तम माहिती दिलेली आहे. अशी माहिती दुसऱ्या कोठेही मिळण्यासारखी नाही. ही उत्तम माहिती एकत्र करण्यामध्ये त्यांनी फार परिश्रम घेतले आहेत, त्याबद्दल त्यांची प्रशंसा करावी तेवढी थोडीच होईल. हा ग्रंथ छापला गेल्यावर त्याची लोकप्रियता अतिशयच होईल यात मला शंका नाही. असा माहितीपूर्वक उत्तम ग्रंथ देवतासंबंधी लिहिल्याबद्दल लेखकाचे मी मनःपूर्वक अभिनंदन करतो.

◆ ◆ ◆

## माननीय माधव श्रीहरी ऊर्फ बापूजी अणे, नागपूर

ग्रंथकर्त्यांच्या या देवीकोशातील प्रतिपादन २८ नीट निरनिराळ्या प्रकरणात केलेले आहे. त्या प्रकरणांची नुसती ओळख करून घेतली तरी सर्व कोशग्रंथाच्या अत्यंत व्यापक स्वरूपाची-कल्पना वाचकास येऊ शकते. माझ्या अल्प माहितीप्रमाणे शक्तिदेवतेचे सर्व दृष्टींनी विवेचन करणारा एवढा मोठा व्यापक

प्रयत्न, यापूर्वी कोणी भारतात किंवा भारताच्या बाहेरच्या पंडितांनी किंवा संशोधक संस्थांनी केलेला नाही. त्यामुळे हा फार मोठा मोलाचा आणि अत्यंत परिश्रमाचा यत्न श्रीयुत प्रभुदेसाई यांनी ७–८ वर्षे चिकाटीने केला आणि एक लोकोत्तर ग्रंथ निर्माण केला, याबद्दल त्यास जेवढे धन्यवाद द्यावे तेवढे थोडे आहेत.

माझ्या मते भारतात दुसऱ्या कोणत्याही देवतेपेक्षा शक्तीच्या उपासकांची संख्या खात्रीने अधिक आहे, असे मला वाटते. महाराष्ट्रात विदर्भात, मराठवाड्यात आणि अखिल मध्य भारतात शक्तीची उपासना स्वतंत्रदेवता म्हणून, किंवा शिवशक्तींचे अविभाज्य अंग म्हणून सर्वत्र आहे. परंतु, काही कुलाचार परिपालन करणे आणि काही सांप्रदायिक पद्धतीने आपल्या उपासनेचा आविष्कार करणे यापलीकडे या जुन्या भाविक उपासकाचे लक्ष गेलेले नाही. प्रभुदेसाई यांनी इतिहाससंशोधनाच्या तसेच जागतिक धर्मसंस्थांच्या कक्षेत शक्तिउपासनेचा आविष्कार कसा दृष्टीस पडत आहे, या व्यापक समीक्षणाच्या पद्धतीने अवलंब केला असल्यामुळे, ग्रंथाला विश्वकोशाचे स्वरूप आले आहे. शाक्तमार्गाचे पूजक स्वरूप व ऐतिहासिक कार्य यांच्यावर नवीन प्रकाश यामुळे पडेल. असे अनेक प्रसंग आणि प्रश्न, त्यांच्या अभ्यासवृत्तीने हाताळण्याचा मोठा सक्षेपी प्रयत्न त्यांनी करून, हा ग्रंथ लोकांच्या पुढे आणलेला आहे सांस्कृतिक कल्पनांचा विस्तार व संकर जगतात कसा झाला हे जर नीट कळले तर, आत्मोद्धाराचे सर्वथैव उच्चाटन करण्याचे धीट प्रयत्न काही हट्टी अट्टाहासाने करीत आहेत, त्यांच्या उपद्व्यापाचा फोलपणा आणि निरर्थकता किंवा अनर्थकता याचाही विचार जनतेसमोर साधार मांडण्यात मौल्यवान विश्वकोशाचे फार मोठे सहाय्य होण्यासारखे आहे.

मी प्रभुदेसाई यांचे पुनश्च एकदा अभिनंदन करतो व त्यांच्या या वाङ्मयीन यज्ञाची यथासांग पूर्णता व्हावी म्हणून प्रत्येक संस्कृताभिमानी व्यक्तीने काही तरी यज्ञसंभार आणण्यास अवश्य सहाय्य करावे, म्हणजे पूर्णाहुतीनंतर त्यांच्या ज्ञानगंगेत अवभृत स्नान करण्याचे पुण्य त्यांना लाभेल. 'परोपकारस्तु पुण्याय' हे व्यासवचन लक्षात ठेवून "देशे काले च पात्रे च" दान करण्याची ही आलेली संधी वैदिक व अवैदिक भारतीय फुकट जाऊ देणार नाहीत अशी बळकट आशा प्रकट करून, मी हे अभिप्रायलेखन पुरे करतो. इति शम्।

◆ ◆ ◆

पद्मभूषण महामहोपाध्याय **दत्तो वामन पोतदार,** माजी कुलगुरु, पुणे विद्यापीठ.

गोरेगावचे चि. प्र. कृ. प्रभुदेसाई यांनी तयार केलेला प्रचंड " देवी कोश " मी पाहिला आणि एकदम त्याच्या परिश्रमामुळे चकीत झालो. महाराष्ट्रात सुरू झालेल्या कोशयुगाला हे उत्तम नवे फळ लागले आहे यात शंका नाही. कोशातील विविध माहितीचे संकलन मोठया आस्थेने केलेले दिसले. आमच्या सांस्कृतिक इतिहासाच्या अभ्यासकांच्या हाती या कोशामुळे एक अभिनव साधन येईल हे उघड आहे.

देवदेवतांचे प्राबल्य व ठसा आमच्या संस्कृतीवर किती दृढ बसलेला आहे, हे सर्वांस विदितच आहे. पण त्याचा अभ्यास करण्यास साधने मात्र फारच तुटपुंजी आहेत, आणि आहेत ती फार विखुरलेली आहेत. अनेक महात्म्ये, पुराणें, कवने, परंपरा यांच्या आधारे विखुरलेली माहिती आधी एकत्र केली पाहिजे, मग चिकित्सा व विचार. अनेक देवस्थानांना इनामे, दानपत्रे लाभलेली आहेत, त्यातील काही सामग्री प्रसिद्ध झालेली आहे. तिचाही मूळ पाहून समावेश करावयास पाहिजे, पण तो एक निराळाच उद्योग आहे, आणि त्याला निराळेच साहाय्य लागेल. प्रथम आहे ती विखुरलेली माहिती एकत्र आणता आली तर तेच मोठे कार्य आहे, मग त्यात भर, सुधारणा यथाक्रम, यथावकाश करणे सोपे होईल. गणेशाबद्दल, पंडीत सातवळेकर व एका फ्रेंच विदुषीचे असे ग्रंथ आहेत. शंकर, रामचंद्र, कृष्ण, नारसिंह, दत्त इत्यादि अनेक दैवतांबद्दल माहितीचे कोश तयार झाले पाहिजेत.

देसाई यांनी बाली बेटातील देवीची माहिती इंग्रजी ग्रंथावरून दिली आहे. त्यामध्ये येथे भारतात प्रचलित असलेले संस्कृत श्लोक " पापोऽहं पापकर्मात्मा " इत्यादि समाविष्ट केलेले पाहून अचंबा वाटला एकंदरीत थोडक्यात अभिप्राय एवढाच की, कोणत्याही भाषेत, देसाई यांनी तयार केला आहे तसा कोश, आजवर मुळीच कोणी रचलेला नाही. तेव्हा या अपूर्व प्रयत्नाच्या प्रकाशनास सर्वतोपरी साहाय्य झाले तर ते फार श्रेयस्करच ठरेल, कळावे.

◆ ◆ ◆

तर्कतीर्थ **लक्ष्मणशास्त्री जोशी,** अध्यक्ष,
महाराष्ट्र-राज्य साहित्य-संस्कृति मंडळ, मुंबई.

आपला " देवीकोश " मराठीतील धार्मिक वाङ्मयात एक महत्त्वाची भर टाकील यात मला शंका नाही. भाविक व विद्वान अभ्यासू या दोघांनाही, या

कोशाचे चांगले सहाय्य मिळेल. आपण भक्तिभावाने प्रेरित होऊन ही वाङ्मयीन उपासना केल्यामुळेच एवढे मोठे कार्य करू शकलात.

आपले हार्दिक अभिनंदन.

◆ ◆ ◆

भारतीय चरित्रकोश मंडळाचे अध्यक्ष, महामहोपाध्याय **सिद्धेश्वरशास्त्री चित्राव, पुणे.**

श्री. प्र. कृ. देसाई, यास अनेक आशीर्वाद, आपण दिलेले देवीकोश ग्रंथाचे हस्तलिखित मी वाचले. देवीविषयक माहिती एकत्र वर्गीकरण करून दिलेली समाधानकारक आहे. अशी माहिती मराठीत अद्यापि एकत्र आलेली नाही. आपण परिश्रमपूर्वक एकत्रित केलेली माहिती प्रसिद्ध झाल्यास अभ्यासकांना अत्यंत उपयुक्त होईल.

◆ ◆ ◆

वारकरी सांप्रदायाचे अध्वर्यु गुरुवर्य **शंकर वामन तथा सोनोपंत तथा मामासाहेब दांडेकर—**

चि. श्री. प्र. कृ. देसाई, यांचे "आदिशक्तिचे विश्वस्वरूप" (देवी कोश) या ग्रंथाचे हस्तलिखित चाळले व त्यांच्याकडून त्याबाबत माहितीही करून घेतली. कारण त्यांच्या या मोठ्या ग्रंथात नेहमी वाचण्यात न येणारी अशी बरीच नवी माहिती आढळून आली.

मराठी भाषेमध्ये देवदेवतांची अशा प्रकारची माहिती देणारे ग्रंथ मुळातच कमी आहेत. त्यांत देवीच्या आदि स्वरूपाच्या विशिष्ट आविष्कारासंबंधी माहिती देणारे ग्रंथ तर फारच कमी आहेत. याचा अर्थ देवी या देवतेवर मराठीत अभंगात्मक अथवा पद्यात्मक वाङ्मय मुळीच नाही असे नाही. ज्ञानेश्वर महाराजांनी अनुभवामृताच्या "शिवशक्ति समावेशन" नामक प्रकरणात शिवशक्ति यांना "समरूपिणौ:" म्हणून त्यांचे एकमेकांचे संबंध दाखवून, शक्तिस्वरूपावर प्रकाश टाकलेला आहे. एकनाथ महाराजांनीही "महालक्ष्मी, भवानी, अंबा" इ० देवी स्वरूपावर अभंग रचले आहेत. पण सर्व महाराष्ट्रीय संतांची बैठक अद्वैताची असल्यामुळे, हे संत देव अथवा देवी यांचे वर्णन करू लागले म्हणजे "एकं सन्तं बहुधा कल्पयन्ति" या सूक्ताच्या प्रमेयाकडे वळतात व मूळ स्वरूपाचेच वर्णन करू लागतात, असे अनुभवास येते यामुळे त्यात देवीच्या

वेगवेगळ्या आविष्काराच्या चरित्राचे गान करणारे अभंग अथवा पद्ये मराठीत थोडी आहेत.

यासंबंधात आणखी एक गोष्ट महाराष्ट्रापुरती तरी लक्षात ठेवणे जरूर आहे. कुलदेवता म्हणून या ना त्या स्वरूपात देवीची उपासना सर्व महाराष्ट्रभर रूढ आहे. पण त्या उपासनेस विठ्ठलोपासना अगर दत्तोपासना इतके उच्च स्थान प्राप्त झालेले नाही. याचे कारण असे असू शकेल की, विठ्ठलोपासनेत जसे श्रीज्ञानदेव–तुकोबासारखे अथवा दत्तोपासनेत श्रीनरसिंहसरस्वतीसारखे प्रभावी उपासक निर्माण झाले, तसे या पंथात झालेले नाहीत. श्रीसमर्थ अथवा श्रीशिवाजीमहाराज यांच्यासारखे जे निर्माण झाले, त्यांनी मातेची उपासना-प्रार्थना उच्च अशा पण कामिक अंशाने राजकारणाच्या क्षेत्रात केली. यामुळे तिला निष्काम उपासनेचे रूप प्राप्त होऊन जो तिचा विस्तार होणे अवश्य होते, तसा तो झाला नाही. देवाची महति भक्तच वाढवितो हे खरे आहे.

आणखी एक गोष्ट लक्षात ठेवणे अवश्य आहे व ती ही की, मध्ययुगात श्रीएकनाथ-तुकोबांच्या काळात— मातेच्या शुद्ध उपासनेपेक्षा, तिच्या वामाचारी उपासनेच्या प्रकाराचा प्रसार महाराष्ट्रात अधिक असावा. यामुळेच तुकोबादिकांनी शाक्तांवर टीकेचे फार कोरडे ओढले आहेत. याचा परिणाम मात्र असा झाला की, दुर्दैवाने शाक्त म्हटला की, तो "पंचमकारातला" असा समज महाराष्ट्रात रूढ झाला, आणि परवापरवापर्यंत तो होता, असे म्हटल्यास हरकत नाही. देवीच्या शुद्ध उपासनेचे दृश्य लोकांसमोर नसल्याने, तिच्या उपासनेबाबत गैरसमजच वाढला. आशा आहे की, श्री. प्रभुदेसाई यांच्या ग्रंथराजाच्या प्रकाशनाने हा गैरसमज दूर होईल व शक्तिदात्या मातेच्या उपासनेकडे महाराष्ट्र अधिक वळेल.

आतापर्यंत जे सांगितले, हे प्रामुख्याने महाराष्ट्राच्या दृष्टीने सांगितले. पण या ग्रंथाचे महत्त्व त्यापेक्षाही अधिक आहे. त्यांत शक्तिउपासनेचा वैदिक कालापासून आजपर्यंतचा संशोधनपूर्वक इतिहास दिला आहे. तेवढे दिले असते तरीसुद्धा ते मोठेच कार्य होते. पण त्याच्या जोडीस भारताबाहेरील देशांत आढळून येणाऱ्या देवीच्या आविष्काराचीही संशोधनपूर्वक माहिती दिलेली आहे, हे विशेष होय. अशा नव्या माहितीने भरलेला ग्रंथ लिहून श्री. प्रभुदेसाई यांनी देवताविषयक ग्रंथात एक अमोलिक भर टाकली आहे, यात शंका नाही.

पण या ग्रंथासंबंधी चार गौरवपर शब्द लिहून— श्री. प्रभुदेसाई यांचे अभिनंदन करण्यात मला विशेष आनंद वाटत आहे. कारण श्री. प्रभुदेसाई हे नूतन मराठी विद्यालय पुणे, या संस्थेचे माजी विद्यार्थि असल्याने, मी त्यांना विद्यार्थिदशेपासून जवळून ओळखतो. शाळेत अथवा स. प. महाविद्यालयात

शिकत असताना सुद्धां, त्यांच्या ठिकाणी सार्वजनिक कामाची हौस, दीर्घोद्योगाची आवड, सचोटी इत्यादि गुण वसत असलेले दिसत. पोलीसखात्यातून सेवानिवृत्त झाल्यावर, ते सार्वजनिक व धार्मिक कार्ये करताना आढळून येत. पण सात-आठ वर्षे एका विषयावर परिश्रम करून ते हा ग्रंथराज निर्माण करतील अशी मला कल्पनाही नव्हती. उतारवयात इतक्या वर्षानंतरही कंटाळा न करता, काम करण्याची चिकाटी त्यांच्याच अजून आहे, हे पाहून मनास मोठा संतोष वाटला. या त्यांच्या ग्रंथनिर्मितीबद्दल मी त्यांचे अंतःकरणपूर्वक अभिनंदन करीत आहे. आदिमाता त्यांना अशेच बळ देऊन, देवाधर्माची, देशाची सेवा त्यांच्या-कडून करवून घेवो, हीच प्रार्थना.

• • •

## मीमांसातीर्थ पंडित श्रीपादशास्त्री किंजवडेकर, पुणे.

आमचे मित्र प्रल्हाद कृष्ण प्रभुदेसाई उर्फ दादा देसाई यांनी अत्यंत परिश्रमपूर्वक आणि सुमारे सात आठ वर्षांत एकाद्या चिकाटीने व व्यासंगपूर्वक "आदिशक्तीचे-विश्वस्वरूप" हा ग्रंथ लिहिलेला आहे. मराठी वाङ्मयात आपल्या आगळ्या आणि अपूर्व वैशिष्ट्याने शोभणारा असा हा ग्रंथ मराठी भाषेला भूषणावह ठरावा. लेखकांनी लिहिला असता, तर त्याचे वैशिष्ट्य अशा-पुरते राहिले नसते. लेखकांनी लिहिणे यात वैशिष्ट्य नसून, ते त्यांचे सहजकर्म आहे. पण आमचे मित्र देसाई, हे लेखक असल्याचा आजवर इतर कोणालाही सुगावा नव्हताच, पण त्यांचा त्यांना तरी होता की नाही याचीच आम्हांला शंका आहे. आजवरचे त्यांचे क्षेत्र पाहिले तर ते लेखनाला मुळीच उपयोगी नव्हते. ज्या हाताला दंडुका आणि पिस्तुल यांची सवय सवय, त्या हातांनी लेखणी घ्यावी आणि सराईतपणे चालवावी, हा एक वाङ्मयीन चमत्कार म्हणावा लागेल. याबाबत आमची उपपत्ति अशी की, माता जगदंबेनेच त्यांना ही प्रेरणा दिली असावी. एरव्ही हा ग्रंथ पाहता तो देसाई यांनी लिहिला असा विश्वास ठेवणे धाडसाचे झाले असते, पण आता तसे वाटत नाही.

ही माहिती संकलित करताना भारतीय संस्कृतीबद्दल वाटणारा लेखकाचा अभिमान हा या ग्रंथाचा एक विशेष आहे. एका विशिष्ट दृष्टीने भारतीय संस्कृती-कडे पाहू लागले म्हणजे आपली संस्कृति, ही अनेक विद्यांची साक्षात् जननी कशी आहे, हे समजावून घ्यावयाचे असेल तर हा ग्रंथ वाचणे आवश्यक आहे असे म्हणण्याचा मोह होतो देवतावादाच्या उत्क्रांतीचा क्रमवार सुसंबद्ध इतिहास या विषयावर एकत्रित माहिती असणारा, आमच्या समजुतीप्रमाणे मराठीतील हाच एक ग्रंथ असावा.

या ग्रंथामध्ये आलेला भारतीय संस्कृतीचा इतिहास हा तर आमच्या मते आजच्या शाळा कॉलेजातून शिकवावा असा आहे. आजच्या पिढीला भारताच्या मूलभूत आणि मौलिक अशा परंपरेचे ज्ञान होत नसल्याने, आजचा भारतीय विद्यार्थी हा निष्ठाशून्य, सत्त्वशून्य आणि पौरुषशून्य असा आहे. कारण ज्यापासून स्फूर्ति मिळावी असे काही त्याला माहीतच नसते, ते शिकविले जात नाही भारताची पूर्वकालीन माहेश्वर वैभवाची परंपरा पुनर्जीवीत करावयाची असेल, तर विद्यमान शासनाने या व अशासारख्या मौलिक ग्रंथाचा परामर्ष घेऊन, ज्ञानाचा आदर राखण्याची आपली पूर्वपरंपरा अनुसरली पाहिजे.

केवळ ऐतिहासिक म्हणूनच नव्हे, तर राष्ट्रीय पुनर्जीवनाच्या दृष्टीने अलिकडच्या कालखंडात, राष्ट्राचे प्रबोधन करणारा एवढा समर्थ ग्रंथ आमच्या तरी पाहण्यात नाही या ग्रंथाचा संपूर्ण परिचय होण्यासाठी, अभ्यासूनी हा ग्रंथ आरंभापासून क्रमाने तीन वेळा तरी वाचावयास हवा चालू व भविष्यकाळात अनंत पिढ्यांना, अनंत काळपर्यंत स्फूर्ति देणारा हा प्रस्तुतचा ग्रंथ लिहून, आमचे स्नेही कविराज ऊर्फ दादा देसाई यांनी मराठी सारस्वतात फार मोठी भर घातलेली आहे. या ग्रंथाचे स्वरूप देवीकोशासारखे आहे. देवीभक्तांना तो पावलोपावली उपयोगी पडेल, हे आणिक एक वैशिष्ट्य आहे. आम्ही तर असे इच्छितो की, साहित्य अकादमीने, या ग्रंथाची प्रादेशिक भाषांतरे करून सर्व भारतीयांना यातील ज्ञानगंगेची अखंड पाणपोई उघडावी. भाक्रा–नानगल धरणापेक्षा हे कार्य अधिक मोलाचे आहे

◆ ◆ ◆

**पं. महादेवशास्त्री जोशी,** संपादक भारतीय संस्कृति कोश.

आदिशक्तीचे विश्वस्वरूप अर्थात देवीकोश हा ग्रंथ श्री. प्र. कृ प्रभुदेसाई यांनी तयार केलेला मी पाहिला थोडाबहुत वाचलाही देवी म्हणजे आद्यशक्ति जगदंबा, तिची नामरूपे अनंत, आविष्कार सौम्य, उग्र इत्यादि अनेक, जल, स्थल, नद्या, पर्वत, आकाश अशी या देवींची स्थानेही विविध. देवीविषयक या सर्व गोष्टींची वैदिक, पौराणिक, ऐतिहासिक माहिती सायासाने गोळा करून आणि त्या माहितीची वर्गवारी करून हा व्यापक देवीज्ञान कोश तयार केलेला आहे केवळ भारतातल्याच नव्हे, तर बृहत्तर भारतातल्या देवतांचाही प्रस्तुत कोशात समग्र आलेला आहे, हे या ग्रंथाचे वैशिष्ट्य होय देवताविषयक वाङ्मयात हा कोश मोलाची भर टाकील यात संदेह नाही

◆ ◆ ◆

वयोवृद्ध कीर्तनकेसरी **नरहर विष्णु कुलकर्णी तथा हरिभाऊ कऱ्हाडकर बुवा.**

जगन्माता श्री अंबादेवीची, कीर्तनसप्ताहरूपाने सेवा करण्याकरिता, गोरेगावी आलेवेळी, येथील सुप्रसिद्ध कार्यकर्ते व कवि श्री. प्रल्हाद कृष्ण प्रभुदेसाई यांच्या सबधींच्या पूर्ण परिचयात भर पडली. अगदी जवळून त्यांचे अष्टपैलुत्व पहायला मिळाले. जगदंबिकेच्या कृपेने त्यांच्याकडून लिहिला गेलेला, आदिशक्तीचे विश्वस्वरूप (देवीकोश) हा ग्रंथ (हस्तलिखित) वाचावयाला मिळण्याचे भाग्य लाभले. स्वत सर्व ठिकाणी फिरून, माहिती गोळा करून, पुष्कळ साधनग्रंथ वाचून, अत्यंत परिश्रमपूर्वक लिहिलेल्या या त्यांच्या ग्रंथात चतुरस्रपणा, कल्पकता, कविता यांचा संगम दिसून आला. अशा मोलाचा ग्रंथ माझ्या इतक्या वयात वाचण्यात आलेला नाही.

कीर्तनकार या नात्याने मला सुचवावेसे वाटते की, सर्व हरिदासांनी, प्रवचन-पुराणिकांनी सदर ग्रंथाचे परिशीलन करावे व त्या आदिशक्तीच्या सामर्थ्यांचा प्रसार आपल्या वक्तृत्वातून करावा, म्हणजे मातृसेवेचे पुण्य मिळून जनताजनार्दनाची सेवाही होईल. ग्रंथकाराचे म्हणण्याप्रमाणे "कलौ चंडी-विनायकौ" देवी व गणपतीची उपासना करणेच या कालात इष्ट आहे. तेणे करून हल्लीच्या भारताच्या आणिबाणीच्या परिस्थितीत शक्ति-युक्ति-संपत्ति यांचा लाभ होईल. अर्थात या गोष्टीची जबाबदारी कीर्तनकारांवर, अनेक कार्यकर्त्यांवर आणि सरकारवरही आहे.

अशा संशोधनात्मक लिखाणाला मदतीची आवश्यकता असते. पूर्वी राजाश्रयाने ज्या गोष्टी घडत, त्या आता सरकारकडून घडाव्यात अशी प्रामाणिक इच्छा आहे. सदर ग्रंथाला थोरामोठ्यांचे आशीर्वाद लाभलेले आहेत. श्री. प्रभुदेसाई यांचा हा ग्रंथ लवकर प्रकाशित होऊन ग्रंथकर्त्यांना परम समाधान व आयुरारोग्य लाभावे, त्यांची दिगंत कीर्ति अखंड नांदावी, अशी मातोश्री चरणी विनंती करीत आहे.

◆ ◆ ◆

आजन्म हरिजनसेवक पद्मश्री गणेश गोविंद तथा काकासाहेब कारखानीस, विजापूर.

पोलीसपेशातील माणसाने "देवी कोश" सारखा विद्वत्तापूर्ण ग्रंथ लिहावा ही "देखिले ना ऐकिले" पैकी गोष्ट आहे. त्याबद्दल आश्चर्ययुक्त

कौतुक वाटते, आनंद वाटतो. सेवा-निवृत्तीच्या कालाचा खरोखर सदुपयोग झाला. ह्यावरील मोठ्यांचे अभिप्राय वाचून मन प्रसन्न झाले. अशीच उर्वरित आयुष्यात आपल्या हातून मातृभाषेची सेवा होत जावो एवढीच मनिषा.

◆ ◆ ◆

प्रसिद्ध साहित्यिक वि. मा. दि. पटवर्धन, नासिक.

या ग्रंथाच्या निमित्ताने आपण वाढविलेला अनेक वर्षांचा आपल्या परिश्रमाचा पसारा पाहिला की, मन थक्क होते. या उद्योगात आपले मन रमून जाऊन आपणास एका दैवी सुखाचा अनुभव मिळतो, हीच सध्या तरी आपली कमाई एका ध्येयाला वाहून घेऊन, आपण मराठी साहित्याचे एक अनमोल लेणे घडवीत आहात यांत काही शंका नाही. ब्रह्मप्राप्तीचा आनंद याहून अधिक तो काय असणार ?

जगन्माता हा उद्योग पाहून संतोषली आहे. अनंत हस्तांनी आपल्या यशाला हातभार लावावयास सिद्ध आहे. खरोखर आपणासारखे भाग्यवान् आपणच.

◆ ◆ ◆

मॉरिशस बेटातील एक विद्वान शिक्षक व मराठी भाषेचे जाज्वल्य अभिमानी **बाळ गोपाळशेट महाबळेश्वरकर** आपल्या दि. ९ १-१९६७ चे पत्रात लिहितात.

आपण पाठविलेले पत्र व "आदिशक्तीचे विश्वस्वरूप,' चे परिचय पत्रक पोचले. मजकूर कळला. त्याबद्दल मी तुमचे आभार मानतो. "आदि-शक्तीचे विश्वस्वरूप" हा खरोखर एक अपूर्वच ग्रंथ असेल. आदिशक्ति ही आपली आई, आणि आई आपल्या विश्वातील लेकरांच्या कल्याणासाठी काय करू शकत नाही ! म्हणून मी तर असेच मानतो की, जगदंबा मातेने आपणांला, आपल्या मातेच्या मांडीवर बसवून व हाती लेखणी देऊन, ग्रंथ लिहवून घेतला आहे. सर्व काही तिच्या कृपेने पार पडले आहे. करती करवती ती आदिशक्ती माताच होय. तो ग्रंथ इकडे पोहोचल्यावर मी फार काळजी-पूर्वक अभ्यासून, अधूनमधून मॉरिशस आकाशवाणीवरून मराठी कार्यक्रमात त्यांतील देवतांच्या गोष्टी सांगत जाईन.

◆ ◆ ◆

नामदार त्र्यंबक शिवराम तथा बाळासाहेब भारदे, अध्यक्ष, महाराष्ट्र शासन विधान सभा, मुंबई. ( दि. १९–६–१९६७ )

श्रीयुत प्र. कृ. प्रभुदेसाई यांनी लिहिलेला " आदिशक्तीचे विश्वस्वरूप या देवीकोश " हा ग्रंथ वाचून मला विशेष कौतुक वाटले. पोलीसखात्यातील एक सेवानिवृत्त अधिकारी देवीचा अनन्य उपासक बनतो, केवळ उपासनेत स्वतः रममाण न होता जनताजनार्दनाला त्या उपासनेचे संस्कार द्यावेत, असा निर्धार करतो, शक्तीची उपासना केवळ श्रद्धेवर अवलंबून न ठेवता तिला ज्ञानाची बैठक देण्याचे ठरवितो, त्यासाठी आदिशक्तीच्या विश्वरूपदर्शनाचा साक्षात्कार घेण्याचा महा प्रयत्न करतो, वेद, पुराणे, सूत्रे, निबंध, तंत्रशास्त्र, परंपरा, आख्यायिका, प्रबंध, इतिहास, भूगोल इत्यादि अनेक शास्त्रग्रंथ संशोधनाची समीक्षा करतो, आणि या सर्व प्रदीर्घ अभ्यासातून आदिशक्तीच्या प्रेरणा, परंपरांची, कथाकार्यांची आणि स्थानमहात्म्याची उद्बोधक माहिती देऊन महाशक्तीच्या महात्म्याचा महाकोश निर्माण करतो, हा एक चमत्कारच मानावा लागेल. आदिशक्तीची प्रेरणा शक्ति किती प्रभावी आहे, यासंबंधीची साक्ष श्री. प्रभुदेसाईंच्या या ग्रंथ निर्माणकार्यावरून कोणालाही येऊ शकेल.

शक्तिदेवींची विविध स्वरूपे, त्याची उत्पत्ति व व्युत्पत्ति, त्यासंबंधीच्या कथा-आख्यायिका, त्यांचे स्थान-महात्म्य, वेदकाळापासून तो आजतागायत अवतीर्ण झालेली शक्तिदेवींची भिन्नभिन्न प्रमुख रूपे व प्रतिकावतार, त्यांच्या उपासना व मंत्र-तंत्र, पुराणेतिहासावरून व भूगोलाज्ञानादी साधनावरून या देवतांचे स्थल कालमहात्म्य, देवतांचे सुबोध वर्गीकरण इत्यादि अनेकविध साधनांनी देवी-बद्दलची इतकी विपुल व उद्बोधक माहिती या ग्रंथात दिली आहे की, " देवीकोश " हा शब्द श्री. देसाई यांच्या ग्रंथरचनेत कृतार्थ झाला आहे. हा कोश अनेक खंडांत प्रकाशित करण्याची इच्छा असून, हस्तलिखितही तयार झालेले आहे

या ग्रंथाचा विचार करावयाचा तर वैदिक देवतापासून लेखकाने सुरवात केली आहे. वैदिक देवता व पौराणिक देवता या दोन्ही प्रकरणांत, वेद पुराणांचे मंथन करून देवीसंबंधीच्या वर्णनाचे जणू सारामृतच त्यांनी वाचकांस सादर केले आहे. " आदिशक्तीचे तात्त्विक स्वरूप " हे या ग्रंथातील प्रकरण तर अनेक दृष्टीने उद्बोधक आहे. श्री. देसाई यांच्या ग्रंथात ध्यान आणि ज्ञान, श्रद्धा आणि चिकित्सा, उपासना आणि कल्पना हातात हात घालून चालत आहेत असा प्रत्यय वारंवार येतो. श्रद्धावान भक्ताने एवढे ज्ञान मिळविण्याचा भारी

उद्योग करावा व शक्तिस्वरूपाचे विश्वरूपदर्शन तत्संबंधीच्या सर्व उपलब्ध ज्ञान साधनांतून द्यावे हा या ग्रंथाचा विशेष आहे.

हे सर्व करीत असताना श्री. देसाई यांनी केवळ सांप्रदायिक दृष्टिकोन न स्वीकारता वाचकांना सर्व माहिती उपलब्ध व्हावी हीच भूमिका घेतलेली आहे. त्याबरोबरच या सर्व कल्पनांचा तौलनिक विचार करण्याच्या दृष्टीने अन्य देश, अन्य धर्म, अन्य भाषा यांचा जरूरीपुरता मागोवा घेऊन व्यापक संदर्भावर आदिशक्तीचे विश्वरूप मांडण्याचा कौतुकास्पद प्रयत्न लेखकाने केला आहे.

माझ्या समजुतीने हा देवीकोश वाचला म्हणजे अनेक ग्रंथांच्या वाचन-मननातून जे देवीदर्शन घडणे अवघड जाईल, ते येथे संक्षेपाने, सुलभतेने व सुबोधतेने घडू शकेल.

" कलौ चंडी विनायकौ " या न्यायाने देवींची उपासना बहुजन समाजात मोठ्या प्रमाणात रूढ आहे. " नवरात्र महोत्सव " हा आजही घराघरांतून, शक्ति आणि भक्ति यांची प्रेरणा देत असून सर्व भाविकांना उत्साही व प्रसन्न बनवीत आहे. " यो यद् श्रद्धः स एव सः " ज्याची जशी श्रद्धा तशी त्याची गती, या न्यायाने या उपासना भाविकांना चिरशांतीचा लाभ देत आल्या आहेत. श्री. प्रभुदेसाई यांचा हा ग्रंथ भाविकांना व चिकित्सकांनाही नवबोध व नवस्फूर्ती देईल, अशी मला उमेद आहे.

◆ ◆ ◆

Dr. S. M. Katre, M. A. Ph. D. ( London ), Director, Deccan College Research Institute, Poona 6.

I have great pleasure in stating that I had the pleasure of going through the voluminous manuscript "Adishaktiche Vishva-swarupa" ( Encyclopaedic Devikosh ) compiled by P. K. Desai of Goregaon, Bombay. The author has taken immense pains in collecting his material from different sources and providing sifted information for ready use by those interested in the development of the Mother Goddess in India. It fills a gap of our knowledge of the shakti cult. By collating evidences from the literary sources and from ethnographic and other material, the compiler has done a distinct service to our knowledge of this little known subject. It has considerable information neatly presented and is an excellent work for those interested in the pursuit of this subject. The work deserves speedy publication.

◆ ◆ ◆

**Shri. T. D. Waknis, F. L. A.,** Retired Curator of Libraries Baroda State and Maharashtra Rajya.

Brahma, Maya, Shakti, Purush, Prakriti, are some of the terms, which sound familiar to most Indians, but there full significance is grasped only by very few. People would like to be instructed about them in simple words. Scholars who however write about them, address their message to other scholars, whose understanding is on par with their own. The Writer of the present book "Adishaktiche Vishwaswarupa", Pralhad Krishna Prabhudesai devoted seven long years of retirement to a study of the Mother Goddess for dispelling doubts of the common man, that Indian-literature is deficient in counsels for subjugating evil by aggression.

It is humanistic in approach rather than scholastic. It has an immense readership wanting for it in libraries, patronised by serious readers who are anxious to enrich their learning and lives. Librarians should have a further motive in acquiring it for collection. They have a duty of not only supplying what the readers care for, but in bringing to their notice good wholesome reading. Not satisfaction of existing wants but creation of new wants, is their ideal. Sight of books to satisfy the new needs with prompt readers, to take them home for study. Thirdly such books are by nature multitopical and should help librarians in giving first aid material, much as reference books like encyclopaedias help them.

◆ ◆ ◆

**Rao Bahadur S. R. Patwardhan,** a Retired Police Officer, Bombay City and D. S. P. Aundh State, Satara.

My old colleague of the police Department, I heartity congratulate for producing such a unique religious book I hasten to request you to register my name for the first copy of your book.

I was stunned with admiration to know that you were able to put in, presently hard labour of several years of your pension time, for producing the unique religious book. God bless you. Yours is an instance of Devi-Kripa

◆ ◆ ◆

# आदिशक्तीचे विश्वस्वरूप

या ग्रंथाचा हा पहिला खंड. आणखी दोन खंड प्रसिद्ध होऊन हा ग्रंथ पूर्ण होईल. आगामी दोन खंडात येणारे विषय पुढीलप्रमाणे आहेत.

खंड २ रा

(१) शक्ति आणि वेदान्त, सांख्य, शैव, वैष्णव पंथ इ०,
(२) पीठ-देवता,
(३) योगिनी आणि मातृका,
(४) मंत्र-तंत्र-यंत्र देवता,
(५) सामाजिक देवता,
(६) निग्रही देवता इ०.

खंड ३ रा

(१) जन्य देवता, वृक्ष देवता, व्रत-देवता,
(२) उत्खननातील–शिल्पातील देवतांचे स्वरूप,
(३) देवी नामोत्पत्ती,
(४) संकीर्ण देवता,
(५) पाश्चिमात्य आणि पूर्व गोलार्धातील देवतांचे स्वरूप,
(६) विविध जाति-जमाति देवता आणि
(७) देवी केकावली.

टीप— या दोन्हीही खंडांची पृष्ठसंख्या वाढण्याची शक्यता आहे आणि सर्वत्र होणारी दरवाढही आमच्या हाती नाही. खंडांची आज ठरलेली प्रत्येकी रु. १२ ५० ही किंमत अपरिहार्य म्हणून कदाचित वाढविणेही भाग पडेल.